गुरुवर्य कृष्णराव अर्जुन केळूसकर यांचे समग्र वाङ्मय

क्षत्रिय कुलावतंस
छत्रपती शिवाजी महाराज
यांचे चरित्र

कृष्णराव अर्जुन केळूसकर

संपादक
राजन गवस

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ

क्षत्रियकुलावतंस

छत्रपती शिवाजी महाराज

यांचे चरित्र

कृष्णराव अर्जुन केळूसकर

संपादक - राजन गवस

प्रस्तावना - अवनीश पाटील

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

वाय ६४६-१

पुस्तकाचे नाव : गुरुवर्य कृष्णराव अर्जुन केळूसकर यांचे समग्र वाङ्मय
क्षत्रिय कुलावतंस छत्रपती शिवाजी महाराज यांचे चरित्र

लेखक : कृष्णराव अर्जुन केळूसकर

संपादक : डॉ. राजन गवस

पुनर्मुद्रण : २०१९

प्रकाशक :

सचिव,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,
रवींद्र नाट्यमंदिर इमारत, दुसरा मजला,
पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी आवार,
सयानी रोड, प्रभादेवी, मुंबई ४०० ०२५.

© प्रकाशकाधीन :

मुखपृष्ठ : सरदार जाधव

मुद्रक :

व्यवस्थापक,
शासकीय मुद्रणालय व लेखनसामग्री भांडार,
ताराबाई पार्क, कोल्हापूर ४१६ ००३.

किंमत : ३११/-

या पुस्तकात व्यक्त केलेली मते स्वतः लेखकाची असून या मतांशी साहित्य आणि संस्कृती मंडळ व महाराष्ट्र शासन सहमत असेलच असे नाही.

महाराष्ट्राचे वाङ्मयमहर्षी

गुरुवर्य कृष्णराव अर्जुन केळूसकर

अध्यक्षांचे मनोगत

महाराष्ट्राचे वाङ्मयमहर्षी गुरुवर्य केळूसकर

आज जगभर सगळ्या क्षेत्रातलं वर्तमानपर्यावरण झाकोळलेलं असताना जनकल्याणासोबत उत्तम प्रशासनासाठी आयुष्यभर ध्यास घेतलेल्या छत्रपती शिवरायांची प्रकर्षाने आठवण येत आहे. छत्रपती शिवराय जाऊन तीनशे वर्षं उलटली; तरीही जगभरातील इतिहासतज्ज्ञ, अभ्यासक त्यांच्या सर्व क्षेत्रांतील कामांचे, उत्तम प्रशासनाचे मुक्तकंठाने प्रशंसा करत आले आहेत. मानवीइतिहास हा सरकारी दप्तरखान्यात, लोकसंस्कृतीच्या कथा-गीतांत आणि हजारो लोकांच्या जिभांतून मौखिक परंपरेच्या रूपाने उलगडत जातो. याकरिता इतिहासलेखकास या सर्व लेखनसाधनांचा शोध घेत विषयांच्या मुळापर्यंत जावे लागते. दुर्दैवाने आपल्याकडे तटस्थपणे इतिहास लिहून ठेवण्याची परंपरा कमी असल्याने बरेचदा लिहिणारा त्याच्या सोयीप्रमाणे लिहून घेणाऱ्याचे हितसंबंध राखत लिहीत जातो. यामुळेच छत्रपती शिवरायांचे सर्वांगपूर्ण चरित्र येण्यास खूप काळ जावा लागला.

छत्रपती शिवराय या युगपुरुषांचे मराठीतील पहिले चरित्र लिहिले गुरुवर्य कृष्णराव अर्जुनराव केळूसकर या बहुजन समाजाच्या प्रज्ञावंत लेखकाने. मराठीतील आजचे विख्यात चरित्रकार डॉ. धनंजय कीर लिहितात, ''केळूसकरकृत शिवचरित्राएवढे समग्र व सविस्तर चरित्र आजपर्यंत कोणीही लिहिले नाही. छत्रपती शिवाजी महाराजांचे पहिले मोठे चरित्र जसे गुरुवर्यांनी लिहिले; तसेच गौतमबुद्ध आणि संत तुकाराम यांचे पहिले चरित्रकारही केळूसकरच आहेत.'' मराठीतील मोठे विचारवंत, विख्यात चरित्रकार, इतिहासकार, विवेकवादी वत्ते, सामाजिक नेते आणि कामगारांचे ते कैवारी होते. राजकीय ऋषी मामा परमानंद, न्यायमूर्ती माधवराव रानडे या विचारवंतांनी त्यांच्या लेखणीची व विचारांची प्रशंसा केली. त्यांनी लहानमोठी पस्तीस चरित्रं लिहिली. ते गीता आणि बौद्ध धर्माचे भाष्यकार होते. धर्मशास्त्र, अर्थशास्त्र, शिक्षणशास्त्र, समाजशास्त्र, इतिहास, तत्त्वज्ञान या विषयांवर अनेक ग्रंथ लिहिणारे प्रकांड पंडित होते. गेल्या शतकातील ख्यातनाम लेखक प्रा. माधवराव दामोदर आळतेकर म्हणाले, ''रा. रा. केळूसकर हे जुन्या पिढीतील म्हणजे आगरकर-टिळकांच्या पिढीतले महत्त्वाचे लेखक होऊन गेले; पण बहुजन समाजाच्या वाट्याला येणारी फरफट केळूसकरांच्या वाट्याला आली आहे.''

२.

या प्रज्ञावंत लेखकाची पारख राजकीय ऋषी मामा परमानंदांनी केली. गुरुवर्य केळूसकर विल्सन हायस्कूलला शिक्षक म्हणून काम करू लागले. लेखक व्हायचे या जिद्दीने त्यांनी लेखन-वाचनाची साधना सुरू केली. महात्मा फुले यांच्या सत्यशोधक चळवळीत ते ओढले जाऊन ठिकठिकाणी भाषणे करू लागले. त्याचे वृत्तांत 'दीनबंधूत' येऊ लागले. सुबोधपत्रिकेतील एक निनावी लेख मामा परमानंद यांना आवडला. मामांनी केळूसकरांचा शोध घेतला. त्यांच्यातील लेखनगुण ओळखले. त्यांची भेट घेतली. या लेखकात लेखनकौशल्य आहेत. त्याला पुस्तक प्रकाशनाची संधी मिळाली पाहिजे, या विचारांनी ते म्हणाले, ''बडोद्याचे श्रीमंत सयाजीराव महाराज हे साहित्यकलेचे चाहते आणि जाणकार आहेत. महात्मा फुले यांचे कार्यकर्ते रामचंद्र धामणसकर महाराजांचे दिवाण आहेत. त्यांचेकडे मी तुमची शिफारस करतो''.

महाराजा सयाजीराव गायकवाड यांचा मुंबईत मुक्काम असताना मामांनी केळूसकरांबद्दल विनंती केली. महाराजांनी केळूसकरांना भेटीस बोलावले. केळूसकरास प्रश्न विचारून खडसून परीक्षा घेतली. केळूसकरांचे चांगले वाचन बघून महाराजांचे समाधान होऊन ते म्हणाले, ''दि स्टोरी ऑफ नेशन्स सिरीजमध्ये जगभरातील बारा ग्रंथांचा मराठीत भाषांतर करण्याचा आमचा बेत आहे. यातील फ्रान्सचा जुना इतिहासाचे भाषांतर तुम्ही करा.''

महाराजांनी एका पुस्तकाचे भाषांतर करण्याचे काम बहुजनाच्या शूद्र माणसाला दिले, ही गोष्ट बडोद्यातील विद्वानांना आवडली नाही. या संदर्भात कुजबुज अन् केळूसकरांच्या लेखनदर्जाबद्दल संशयाची चर्चा महाराजांच्या कानावर आली; पण ते आपल्या निर्णयावर खंबीर राहिले. ते बारा ग्रंथ १८८३ ला छापून झाले आणि त्यावेळच्या दक्षिणाप्राइज कमेटीचे पहिले बक्षीस 'फ्रान्सचा जुना इतिहास' या केळूसकरांच्या ५६८ पृष्ठांच्या भाषांतरास मिळाले. यानंतर लागलीच महाराजांनी 'सेनका व एपिक्टेट्स' ६५० पृष्ठांच्या ग्रंथाच्या भाषांतराचे काम केळूसकरांना दिले आणि गुरुवर्य केळूसकरांच्या साहित्यसेवेची सुरुवात गायकवाड सरकारच्या मदतीने सुरू झाली.

३.

फ्रान्सचा जुना इतिहास (१८८३), तुकारामबावांचे चरित्र (१८९६), सेनेका व एपिक्टेट्सची बोधवचने (१८९७), गौतमबुद्धाचे चरित्र (१८९८), सात उपनिषदांचे भाषांतर (१८९८) आणि श्रीमद्भगवतगीता हा ११०० पृष्ठांचा ग्रंथ (१९०२) यासारखे चौफेर लेखन केलेल्या केळूसकरांचे बडोद्यात येणे-जाणे वाढले होते. बडोद्याचे दिवाण रामचंद्र विठोबा धामणसकर हे त्यांचे चांगले स्नेही झाले होते. शिक्षकाची नोकरी, वेगवेगळ्या मासिकांचे संपादन, कौटुंबिक आर्थिक ओढाताण - त्यासाठी शिकवण्या घेणे आणि राहिलेल्या वेळात झंझावातासारखे लेखन करत होते. मध्येच प्रकृती ढासाळली. अशात ते बडोद्यात धामणसकरांना भेटायला आले. त्यावेळी खासेराव जाधव हे कलेक्टर हुद्द्यावरील अधिकारी तेथे बसलेले होते. धामणसकर खासेरावांना म्हणाले, ''हे गुरुवर्य रा. रा. कृष्णराव केळूसकर. आपल्या समाजातील विद्वान इतिहासतज्ज्ञ आहेत. त्यांनी आतापर्यंत काही मराठी ग्रंथ लिहिले आहेत. आता छत्रपती शिवाजी महाराजांवर चरित्र लिहिण्याचा त्यांचा मानस आहे. त्याकरिता चर्चा करण्यासाठी मुद्दाम आले आहेत.''

तरुण खासेराव म्हणाले, ''ग्रंथ चांगला लिहा हं गुरुजी; कारण आपल्या मराठ्यात ग्रंथ लिहिणारे तुम्हीच पहिले आहात.'' खासेरावांच्या प्रतिक्रियेस गुरुवर्य केळूसकरांनी हसून प्रतिसाद दिला आणि केळूसकर-खासेरावांची पुढे ओळख वाढत गेली. नुकतेच आजारातून उठलेल्या गुरुवर्य केळूसकरांना दाजीसाहेब व रामचंद्र दळवी हे दोघे बंधूही शिवचरित्र लेखनाचा आग्रह करत होते. मराठा प्राव्हिडंट फंडातर्फे ते प्रकाशित व्हावे, अशी त्यांची इच्छा होती. १९०३ साली गुरुवर्यांनी श्री शिवाजी महाराजांसंबंधाचा अभ्यास सुरू केला. उपलब्ध सामग्री वाचून टिपणे काढली. होईल तेवढे चांगले आणि निर्दोष शिवचरित्र लेखन सुरू केले. मधल्या काळात पत्नीचे आजारपण, दोन मुलींचा विवाह आणि अतिश्रमाने पुन्हा आजारी पडले. वासुदेव लिंगोजी बिर्जे हे विद्वान सत्यशोधकी माणूस मदतीला धावून आले. हे श्री. बिर्जे सयाजीराव महाराजांकडे काही काळ ग्रंथपाल होते. यांच्या मदतीने छत्रपती शिवरायांचे चरित्रलेखन पूर्ण होऊन डिसेंबर १९०६ ला ग्रंथ निर्णयसागर छापखान्यात गेला. १९०७ साली प्रकाशित झाला. गुरुवर्य केळूसकरांनी छत्रपती शाहू महाराजांना हा ग्रंथ अर्पण केला. छत्रपतींनी एक हजार रुपये देऊन आणखी पाचशे प्रती घेतल्या. महाराजा सयाजीराव आणि बापूसाहेब कागलकरांनी प्रत्येकी दोनशे प्रती घेऊन मदत केली.

''क्षत्रियकुलावतंस छत्रपती शिवाजी महाराज यांचे चरित्र'' हा ५९८ पृष्ठांचा पहिला चरित्रग्रंथ लिहिताना इतिहासकाराने सत्याचे प्रकाशन व समर्थन करावे, अशी गुरुवर्य केळूसकरांची विवेकवादी भूमिका होती. सत्य बिनधोक सांगितले पाहिजे. मग त्यामुळे कोणाला आनंद होईल किंवा वाईट वाटेल याचा चरित्रलेखकाने मनात किंतु ठेवू नये, असे ते म्हणत. यामुळेच गुरुवर्य केळूसकर यांनी पहिले समग्र आणि सविस्तर शिवचरित्र लिहिले, असे डॉ. धनंजय कीर यांनी गौरवाने लिहिले आहे.

शिवचरित्रातील ऐतिहासिक सत्याबद्दल लिहिताना आपल्या आत्मकथेत गुरुवर्यांनी लिहिले आहे, ''कित्येक लोकांना न आवडणाऱ्या गोष्टी मी या चरित्रात आधारभूत लिहिल्या आहेत. छत्रपती शिवाजी महाराजांना स्वराज्य स्थापण्याच्या कामी मसलत व उपदेश दादोजी कोंडदेव, शहाजी महाराजांचे कित्येक हस्तक आणि रामदास स्वामी होते, असे म्हणणे मी साफ खोडून काढले आहे. दादोजीने शहाजी महाराजांकडे अनेक पत्रं लिहून कागाळी केली की, शिवबा आपले ऐकत नाही.''

रामदास स्वामींच्या उपदेशाने व सल्ल्याने शिवरायांनी स्वराज्यांचे तोरण बांधले, यालाही बिलकूल आधार नाही. शिवाजी महाराज आणि रामदास यांची पहिली भेट १६७३ ला झाल्याचा सबळ लेखी पुरावाही त्यांनी दिला आहे. त्यामुळे यापूर्वीची १६४९ ची स्वामी व शिवरायांची भेट झाली, यास आधार नाही. दासबोधाच्या शेवटी राजकीय बाबींचा उल्लेख आहे; परंतु तो रामदास स्वामींच्या हातचा नसून केवळ प्रक्षिप्त आहे. स्वामी १६८२ ला निधन पावल्यानंतर लिहिला आहे, असे केळूसकर गुरुजी लिहितात.

न्यायमूर्ती माधवराव रानडे यांनी मराठ्यांचा इतिहास लिहिला. यात ते म्हणतात, शिवरायांचा महाराष्ट्रापुरते स्वराज्य स्थापण्याचा उद्देश व प्रयत्न होता. न्या. रानडे यांचे हे म्हणणे अप्रमाण असून अखिल हिंदुस्थानवर स्वराज्य स्थापण्याचे शिवरायांचे स्वप्न होते, हे गुरुवर्य केळूसकरांनी या चरित्रात लिहिले आहे. शिवाजी महाराज आणखी दहा वर्षं जगले असते, तर त्यांनी या सगळ्या गोष्टी जगाला करून दाखवल्या असत्या.

दादोजी कोंडदेव व रामदास हे शिवाजींचे गुरू नाहीत हे स्पष्ट सांगणे अनेक मंडळींना आवडले नाही. काही मंडळींनी त्यांच्यावर जातिद्वेषाचाही आरोप केला. समकालीन वृत्तपत्रांनी हात राखून या शिवचरित्राबद्दल लिहिले. मात्र प्रा. ना. के. बेहरेसारखे विद्वान मनमोकळेपणाने म्हणाले, ''केळूसकरकृत श्री छत्रपतींचे चरित्र हा सुंदर ग्रंथ अनेक वर्षांपासून माझ्या नित्यपाठाचा झाला आहे.'' शिवचरित्र प्रकाशित झाले त्याच वर्षी १९०७ साली अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषदेची पहिली परिषद धारवाड येथे भरविण्यात आली. कोल्हापूरचे ना. भास्करराव जाधव या परिषदेचे स्वागताध्यक्ष होते. सयाजीराव महाराजांचे उजवे हात असलेले खासेराव जाधव अध्यक्ष होते. हे खासेराव महाराजांचे जवळचे नातेवाईक आणि कलेक्टरच नव्हते, तर क्रांतिकारकांना मदत करणारे, सत्यशोधक चळवळीचे सक्रिय कार्यकर्ते आणि बडोद्यातील अनेक कल्याणकारी योजनांचे प्रवर्तकही होते.

आपल्या अध्यक्षीय भाषणात गुरुवर्यांच्या शिवचरित्राबद्दल गौरवाने बोलताना खासेराव म्हणाले, ''आमच्या महाराष्ट्रातील काँग्रेसभक्त मंडळी श्री शिवाजी महाराजांचा उत्सव करिते. हा उत्सव खरोखर भक्तिपुरस्सर आहे असे आम्ही समजतो काय? त्यांची जर श्री शिवाजी महाराजांच्या ठायी खरी पूज्य बुद्धी असती तर त्यांच्याच वंशजांस ते शूद्र म्हणण्यास का तयार झाले असते? आमचे मित्र रा. रा. केळूसकर यांनी नुकतेच श्री शिवाजी महाराजांचे चरित्र लिहिले आहे. ते फार सरळ आणि मनोवेधक भाषेत परिश्रमाने लिहिले असून ऐतिहासिक माहितीने भरलेले आहे. पुष्कळ गोष्टी आजपर्यंत लोकांच्या नजरेआड होत्या त्या या पुस्तकामुळे पुढे आल्या आहेत आणि त्या योगाने आपल्या लोकांच्या संबंधाने जे अज्ञानाचे समज होते ते दूर झाले आहेत. असे हे

एक चांगले पुस्तक एका मराठ्याने लिहिले असल्याने आमच्या ब्राह्मण बंधूस आनंद व्हावयास पाहिजे होता; परंतु निराळाच प्रकार माझ्या कानी आला आहे. ब्राह्मण लोकांनी हे पुस्तक वाचण्याकरिता विकत घेतले नाही एवढेच नाही, तर या पुस्तकाची जाहिरातसुद्धा त्यांनी आपल्या वर्तमानपत्रात पैसे घेऊन प्रसिद्ध करण्याचे नाकारले, हा किती शूद्र विचार! यावर आपल्या मंडळींनी बेदिल न होता त्यांच्यासारखे लायक आहोत असेच दाखविणे हा उत्तम मार्ग आहे. विनाकारण हेवा, द्वेष करण्यात अर्थ नाही. यावर एकच उपाय आहे – शिकले पाहिजे. आपण एका देशात राहतो; आपले फार काळापासून चांगले संबंध आहेत. ते संबंध वाढले पाहिजे. त्यात दोघांचाही फायदा आहे. शिक्षण हाच उत्कर्ष आणि परिवर्तनाचा एकमेव मार्ग आहे.''

गुरुवर्य केळूसकरांनी त्यांच्या छत्रपती शिवाजी महाराज यांच्या चरित्राचे इंग्रजी भाषांतर प्रा. नीळकंठराव ताकाखाव यांनी केले. ते भाषांतर खासेराव जाधवांनी वाचले. हा उत्तम ग्रंथ जगभरातील इंग्रजी वाचकांसमोर गेल्याने छत्रपती शिवरायांचे अलौकिक काम जगापुढे येईल, असे त्यांना वाटू लागले. खासेराव गुरुवर्य केळूसकरांना म्हणाले, हा तुमचा ग्रंथ छापावयाला लागणारे द्रव्य मी अवश्य मिळवून देतो. या ग्रंथाच्या प्रकाशनासाठी सयाजीराव महाराजांकडे प्रथम शब्द टाकावा, असा खासेरावांचा विचार होता; पण त्या काळात बडोद्यातील कौटुंबिक-राजकीय अडचणींची कल्पना खासेरावांना होती. त्यामुळे त्यांनी स्वत: ग्वाल्हेरच्या श्री. खासेराव पवार आणि श्रीसंत सरदार शितोळे यांच्याकडे गोष्ट काढली. सरदार शितोळे यांनी कर्जाऊ साडेपाच हजार रुपये दिले आणि इंग्रजी शिवचरित्र १९२१ साली छापून आले. ग्रंथाच्या पाच हजार प्रती छापल्या. छत्रपती राजाराम यांनी दोनशे प्रती घेऊन मदत केली. इतर राजेरजवाड्यांकडून अन् धनवान मराठा मंडळींकडून या ग्रंथांबद्दल कमालीची उदासीनता अनुभवायला मिळाली. साडेचार हजार प्रती गुरुवर्य केळूसकरांच्या अंगावर पडून राहिल्या. तुमचे कर्ज फेडण्यासाठी मी महाराष्ट्रभर फिरून भीक मागेन असा शब्द खासेराव जाधवांनी दिला. छत्रपती शाहूंनी मदतीचा शब्द दिला; पण थोड्या अंतराने हे दोन्ही पुरुष अकाली गेले. शेवटी इंदूरचे महाराज तुकोजीराव होळकरांनी मदत केल्याने गुरुजींच्या डोक्यावरचे कर्जाचे ओझे दूर झाले. तीन हजार प्रती जगभरातील इंग्रजी वाचनालयांना स्वखर्चाने भेट पाठविल्या. पाचशे प्रती होळकर सरकारांना दिल्या. पुढे दुर्दैवाने या स्वाभिमानी राजाला संस्थान सोडून जावे लागले. याचे दु:ख गुरुवर्य केळूसकरांना झाले. होळकरांच्या या मदतीमुळे केळूसकरांचे सगळे देणे फिटले. पाच हजार रुपये त्यांच्याकडे शिल्लक राहिले. शिवचरित्राचे भाषांतरकार प्रा. ताकाखाव यांना कृतज्ञता म्हणून पाच हजार रुपयाचे शंभर तोळे सोने घेऊन सन्मानाने मानधन म्हणून दिले. हा त्या काळातला लेखकाचा सर्वांत मोठा सन्मान होता.

५.

महाराजा सयाजीरावांनी तत्कालीन विद्वानांचा विरोध झुगारून गुरुवर्य केळूसकरांना ग्रंथलेखनास प्रोत्साहन दिले, ते ग्रंथ बडोदा संस्थानने प्रकाशित केले आणि बहुजन प्रज्ञावंतास लेखक म्हणून उभे राहण्यास मोठी संधी दिली. हे गुरुवर्यांनी कृतज्ञतापूर्वक आपल्या आत्मकथेत नमूद केले आहे.

म. फुले, राजर्षी शाहू आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर या कर्त्या युगपुरुषांना सर्वार्थाने साहाय्य करणारे, पाठबळ देणारे महाराजा सयाजीराव होते, हे आता पुरोगामी महाराष्ट्र समजून घेत आहे; लोकमान्य टिळकांनी गीतारहस्य ग्रंथ लिहिण्यापूर्वी तेरा वर्षं अगोदर म्हणजेच १९०२ साली ११०० पृष्ठांचा श्रीमद्भगवद्गीता ग्रंथ १९०२ साली लिहिला; पण बावीस वर्षं प्रकाशक न मिळाल्याने तो धूळ खात पडून राहिला, अशी खंत त्यांनी आपल्या आत्मकथेत लिहिली. पुढे तो सावळाराम यंदे यांनी प्रकाशित केला. सावळाराम यंदे यांना पुस्तक प्रकाशनास सयाजीरावांनी मदत केली. गुरुवर्य केळूसकर हे गौतमबुद्ध, संत तुकाराम आणि छत्रपती शिवाजी या युगपुरुषांचे मराठी भाषेतील पहिले महत्त्वाचे चरित्रलेखक आहेत. मामा परमानंद, न्या. रानडे, डॉ. धनंजय कीर, क्रांतिकारक खासेराव जाधव या विचारवंतांनी केळूसकरांच्या लेखणीची व विचारांची प्रशंसा केली.

(सहा)

महात्मा फुले यांची सत्यशोधक चळवळ, मराठा ऐक्येच्छू सभा, कामगार चळवळ आणि अनेक सामाजिक संस्थांत त्यांनी आयुष्यभर काम केले. त्यांच्यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांसारखे नेते समाजास मिळाले. नाईक मराठा मंडळाची स्थापना गुरुवर्य केळूसकरांनी ब्याऐंशी वर्षांपूर्वी केली. खेड्यातील गरीब आणि शिकू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना आजही या मंडळातर्फे शिष्यवृत्ती देण्यात येते.

जनात जनार्दन पाहणारे गुरुवर्य केळूसकरांनी आयुष्यभरात सात हजार पृष्ठांहून अधिक चौफेर लेखन केले. पुरोगामी महाराष्ट्रातील वाचकांनी व अभ्यासकांनी केळूसकरांच्या एकूण लेखनाची म्हणावी तशी दखल घेतलीच नाही. त्यांनी उभ्या आयुष्यात चाळीसेक मोठे ग्रंथ लिहिले; पण गौतम बुद्धांचे चरित्र आणि छत्रपती शिवाजी महाराजांचे चरित्र वगळता उभ्या महाराष्ट्राने या बहुजन समाजाच्या महर्षीकडे पूर्णत: पाठ फिरवली. त्यांचे संत तुकारामबावांचे चरित्र हा मराठीतील पहिला गद्य स्वरूपातील विवेकवादी चरित्रग्रंथ १८९६ साली प्रकाशित झाला. गेल्या एकशे अठरा वर्षांत या ग्रंथांची दुसरी आवृत्ती प्रकाशित करावी असे महाराष्ट्रातील संत साहित्याच्या प्रकाशकास, अभ्यासकास आणि संत तुकारामाच्या अभ्यासकांस शोध घ्यावा वाटला नाही, हाही इतिहास आहे. अशा या वाङ्मयमहर्षीची ओळख महाराष्ट्राने आज पुन्हा करून घेण्याची गरज असल्याने मी महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचा अध्यक्ष होताच कार्यकारी मंडळाच्या पहिल्या बैठकीत समग्र कृ. अ. केळूसकरचे प्रकाशन शासनाने करावे असा निर्णय घेतला. या वाङ्मयीन जबाबदारीचे काम आमचे मित्र श्री. राजन गवस यांच्याकडे सोपविले. त्यांनी ही महत्त्वाची जबाबदारी पार पाडून या वाङ्मयीन महर्षीची ओळख महाराष्ट्राला नव्याने करून दिली आहे, याचा मला खूप आनंद आहे.

दि. २८-५-२०१८

बाबा भांड

अध्यक्ष

म. रा. साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई.

संपादकीय

गुरुवर्य केळूसकरांनी लिहिलेले 'छत्रपती शिवाजी महाराज यांचे चरित्र' हे मराठीतील पहिले चरित्र आहे. हे चरित्र विश्वसनीय मानले जाते. केळूसकर गुरुजींनी महात्मा फुलेंच्या सभा लहानपणीच ऐकल्या होत्या. त्यांच्या विचाराचा आणि कार्याचा प्रभाव स्वाभाविकपणे गुरुवर्य केळूसकरांवर पडला. यामुळेच ते गौतम बुद्ध, संत तुकाराम व छत्रपती शिवाजी महाराज यांच्या चरित्रलेखनात रममाण झाले. फुलेंच्या सत्यशोधकीय विचारसरणीचा प्रभाव त्यांच्या सर्वच लेखनावर असल्याचे दिसून येते. मुळात केळूसकरांची नाळ ही कृषिसंस्कृतीशी जोडलेली होती. तत्कालीन शेतकऱ्याच्या घरात शिक्षणाकडे फारशा गांभीर्याने बघितले जात नव्हते. शिकणे हे शेतकऱ्याचे काम नसून ती फक्त ब्राह्मणांचीच मक्तेदारी, असे समाजमानसात खोलवर रुजलेले होते. अशा काळात गुरुवर्य केळूसकरांचे वडील मात्र शिक्षणाकडे डोळसपणे पाहणारे गृहस्थ होते. आपल्या मुलांनी शिकले पाहिजे असा त्यांचा अट्टाहास होता. अर्जुनराव केळूसकरांनी बेळगाव, मुंबई, सावंतवाडी अशी पोटापाण्यासाठी भ्रमंती केली. पण ओढाताणीच्या संसारात मुलांनी शिकले पाहिजे याकडे त्यांनी कटाक्षाने लक्ष दिले. त्यामुळे कृष्णराव केळूसकर यांचे बालपण अत्यंत कष्टात गेले असले तरी शिक्षणाची ओढ कायम राहिली. घरच्या दारिद्र्यामुळे मोफत शिक्षणासाठी प्रचंड खटपट करावी लागली. गुरुवर्य केळूसकरांची असामान्य बुद्धिमत्ता पाहून जगन्नाथ शंकरशेठ यांच्या मुलाने त्यांची मोफत शिक्षणासाठी शिफारस केली. तत्कालीन मोठे व्याकरणकार कृष्णशास्त्री गोडबोले त्यांना मुख्याध्यापक म्हणून लाभले. त्यांच्या सहवासात व्याकरण, गणित, कविता यांची चांगली तयारी होत गेली. कृष्णशास्त्री गोडबोले हे बुद्धीप्रामाण्यवादी, निरीश्वरवादी, समता, नैतिकता मानणारे गृहस्थ असल्यामुळे हे संस्कार आपोआपच गुरुवर्य केळूसकरांवर होत गेले.

१८८१ साली गुरुवर्य केळूसकर विल्सन हायस्कूलमधून मॅट्रिक झाले. उच्चशिक्षण घेण्याची अतीव इच्छा असूनही घरच्या गरीबीमुळे त्यांना ते घेता आले नाही. व त्यांना शिक्षकाची नोकरी पत्करावी लागली. १८८१ ते १८८५ पर्यंत त्यांनी इस्राइली शाळेमध्ये नोकरी केली. गुरुवर्य केळूसकरांची ज्ञानलालसा आणि प्रामाणिकपणा पाहून शाळेच्या व्यवस्थापनाने त्यांच्याकडे 'इस्रायल' या साप्ताहिकाच्या संपादनाची जबाबदारी सोपवली. इस्रायल साप्ताहिकाचे संपादन करत असताना त्यांना लेखनाबाबतचा आत्मविश्वास प्राप्त झाला. शिक्षक म्हणून ते विद्यार्थीप्रिय होतेच; पण लेखनामुळे ते समाजात लोकप्रिय झाले. १८८६ साली विल्सन हायस्कूलमध्ये त्यांनी नोकरीस सुरुवात केली. अखंड विद्याव्यासंग, विद्यार्थ्यांवर निरतिशय प्रेम, सामान्य विद्यार्थ्यांबद्दल संवेदनशील दृष्टिकोण यामुळे ते सर्वत्र गुरुवर्य म्हणून ओळखले जाऊ लागले. गरीब मुलांच्याबद्दल कणव आणि तळमळ, त्यांना सर्वप्रकारची मदत करणारे असे ते शिक्षक असल्यामुळे समाजात त्यांच्याबद्दल आपोआपच श्रद्धाभाव वाढीस लागला.

आपल्याला उच्चशिक्षण घेता आले नाही ही सल त्यांना सततच अस्वस्थ करीत होती. त्यामुळे स्वत: प्रयत्न करून आपण उच्च ज्ञान मिळवण्याची धडपड त्यांनी सुरू केली. स्वत:च्या कष्टावर व ध्यासावर त्यांनी आपला व्यासंग सततच अद्ययावत ठेवला. घरची परिस्थिती ओढग्रस्ततेची असल्यामुळे शाळेत नोकरी करून त्यांना

खाजगी शिकवण्या घ्याव्या लागत. उरलेला प्रत्येक क्षण त्यांनी आयुष्यभर वाचन, लेखन व्यासंगात घालवला. वृद्धापकाळामुळे दृष्टी मंद झाल्यानंतर आपल्याला वाचता येत नाही ही सल त्यांना पोखरत गेली. तत्कालीन आढ्यताखोर ब्राह्मणांनी मराठा चांगले मराठी लिहूच शकत नाही, अशी शेरेबाजी केल्यामुळे गुरुवर्य केळूसकरांनी चिकाटीने आपली भाषा, शब्दसंग्रह आणि शैली व्यासंगाच्या जोरावर अद्ययावत केली आणि शेरेबाजी करणाऱ्या जात्याभिमान्यांचा भ्रम घालवून टाकला. तत्त्वज्ञान, नीतिशास्त्र, मानसशास्त्र, अर्थशास्त्र, इतिहास, धर्मशास्त्र आदी शाखांच्या सखोल अभ्यासासाठी जुन्या प्राचीन ग्रंथांचे चिकाटीने वाचन केले. याबरोबरच जॉन स्टुअर्ट मिल, स्पेन्सर, ऑगस्त कॉम्त, डार्विन, इंगरसॉल इत्यादी पाश्चात्त्य विचारवंतांचा अभ्यास करून आपणही काही कमी नाही हे त्यांनी दाखवून दिले. यातूनच त्यांची व्यासंगी लेखनशैली विकसित झाली.

आपल्या आयुष्यात आलेल्या चढउतारामुळे त्यांना पुस्तकांइतकेच जगण्यानेही समंजस व समृद्ध केले. फक्त शाळेत शिकवणे एवढे आपले काम नसून आपल्या भोवतालचा समाज आपल्याला बदलवायचा आहे ही धारणा मनाशी पक्की करून त्यांनी सामाजिक कार्यास स्वत:ला जोडून घेतले. ते महात्मा फुले यांच्या सत्यशोधक चळवळीचे निष्ठावान कार्यकर्ते बनले. 'मराठा ऐक्येच्छू सभेच्या' संस्थापकांपैकी ते एक होते. मराठा प्रॉव्हिडंट फंड, रत्नागिरी जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे दु:खनिवारण करणारी सभा, नारायण मेघाजी लोखंडे यांनी स्थापन केलेल्या 'बॉम्बे मिल हॅन्ड्स असोसिएशन' इत्यादी संस्थांशी ते संबंधित होते. गुरुवर्य केळूसकर उत्तम संघटक आणि मार्गदर्शक असल्यामुळे तत्कालीन सामाजिक चळवळीत त्यांचा वावर अधिकच वाढत गेला. गोमंतक मराठा समाज, धर्माजी रोकडे मोफत वाचनालय, न्यायिक मराठा मंडळ. नीतिप्रसारक मंडळ, सोशल सर्व्हिस लीग, सेवासदन सोसायटी, बुद्ध सोसायटी, मराठी ग्रंथसंग्रहालय इत्यादी संस्थांशी त्यांचा कृतिशील संबंध होता. गुरुवर्य केळूसकरांनी सहकारी संस्था व पतपेढ्यांच्या स्थापनेतही महत्त्वाचा सहभाग घेतला. लोकांमध्ये अंधश्रद्धा, जादूटोणा, चमत्कार, धार्मिक कर्मकांडे यांचे माजलेले स्तोम कमी करण्यासाठी त्यांनी अनेक ठिकाणी व्याख्याने देऊन प्रबोधनाचे काम केले.

गुरुवर्य केळूसकरांनी आयुष्यभर व्रतस्थपणे लेखन करून प्रचंड ग्रंथसंपदा निर्माण करून ठेवली. यामध्ये गौतम बुद्धाचे चरित्र, छत्रपती शिवाजी महाराज यांचे चरित्र, संत तुकारामांचे चरित्र अशा अनेक चरित्रांचे लेखन केले आहे. याबरोबरच उपनिषदांचे भाषांतर, फ्रान्सचा जुना इतिहास, सार्थ सटीक श्रीमदभगवद्गीता, नीतिबोधमाला खंड १ ते ४ ही त्यांची महत्त्वाची ग्रंथसंपदा आहे.

केळूसकरांच्या सर्वच लेखनात एक स्वतंत्र वैचारिक दृष्टी असल्याचे प्रत्ययास येते. विषयनिवडीपासून ते ग्रंथनिर्मितीपर्यंत त्यांनी आपल्या भूमिकेशी कधीही तडजोड केल्याचे दिसत नाही. आपल्याला आपला समाज आधुनिक करावयाचा आहे याचे भान त्यांच्यातील लेखकाला सतत असल्याचे जाणवते. या गंभीर वैचारिक दृष्टिकोणातूनच त्यांनी शिवचरित्राचे लेखन केले असल्याचे दिसून येते.

१८९५ साली गोविंदराव कृष्णराव दळवी यांनी 'मराठा प्रॉव्हिडंट फंड' ही संस्था सुरू केली. गुरुवर्य केळूसकर या संस्थेचे मार्गदर्शक व सल्लागार होते. गरीब स्थितीतील गरजू लोकांना अर्थसहाय्य करण्यासाठी दरमहा काहीतरी शिल्लक टाकण्याची सवय लोकांना लागावी हा या फंड स्थापनेपाठीमागचा हेतू होता. मराठा प्रॉव्हिडंट फंड या संस्थेने गरीब विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी मदत करून अनेकांचे संसार उभे केले. या संस्थेत सर्व जातीधर्माच्या लोकांना मुक्त प्रवेश होता. या फंडाचे चालक गोविंदराव कृष्णराव दळवी यांना शिवचरित्र लिहिले जावे असे वाटत होते. परंतु, त्यांना अल्पायुष्य लाभल्यामुळे हा संकल्प सिद्धीस जाऊ शकला नाही. मात्र फंडाच्या सर्व लोकांना

फंडामार्फत शिवचरित्र प्रसिद्ध करण्याची तीव्र इच्छा होती. हे चरित्र गुरुवर्य केळूसकरांशिवाय कोणीही लिहू शकणार नाही, असेही त्यांना वाटत होते. १९०३ साली दाजीसाहेब दळवी आणि रामचंद्र ऊर्फ आबासाहेब दळवी यांनी गुरुवर्य केळूसकरांना शिवचरित्र लिहिण्याचा आग्रह धरला. गुरुवर्य केळूसकर त्या काळी सांसारिक अडचणींमुळे आर्थिक अडचणीतून जात होते. त्यांचा बराच वेळ नोकरीशिवाय खाजगी शिकवण्यांमध्ये जात होता. त्यामुळे हे चरित्र सिद्ध करण्यासाठी त्यांना पुरेसा वेळ व स्वस्थता मिळणे दुरापास्त होते. मराठा प्रॉव्हिडंट फंडाच्या संचालकांनी यातून मार्ग काढण्यासाठी गुरुवर्य केळूसकरांना दरमहा २० रुपयाची रक्कम कर्जाऊ देण्याचे ठरले. यापाठीमागचा त्यांचा हेतू गुरुवर्य केळूसकरांनी खाजगी शिकवण्या बंद करून तो सर्व वेळ शिवचरित्र लेखनाच्या कामास द्यावा असा होता. केळूसकरांनी त्याप्रमाणे खाजगी शिकवण्या बंद करून चरित्रलेखनाचे काम सुरू केले. घरच्या अनंत अडचणी असूनसुद्धा गुरुवर्य केळूसकरांनी चरित्रलेखनाचे काम सलग तीन वर्षे सर्व उपलब्ध साधनांचा अभ्यास करून पूर्ण केले आणि 'क्षत्रिय कुलावतंस छत्रपती शिवाजी महाराज यांचे चरित्र' हा ग्रंथ सिद्ध झाला. मराठा प्रॉव्हिडंट फंडाच्या चालकांनी आपल्या फंडातील श्री शिवाजी व विद्याप्रसारक या खात्यांच्या तर्फे मुंबईच्या निर्णयसागर छापखान्यातून हे शिवचरित्र १९०७ साली प्रकाशित केले. ५९७ पृष्ठाच्या या पुस्तकाची किंमत फक्त दीड रुपया ठेवण्यात आली होती. गुरुवर्य केळूसकरांनी हा ग्रंथ कोल्हापूरचे छत्रपती शाहू महाराज यांना अर्पण केलेला आहे. छ. शाहू महाराजांनी गुरुवर्य केळूसकरांनी केलेल्या या ऐतिहासिक कामाबद्दल प्रशंसा करून रु. १०००/- चे बक्षीस दिले व पुस्तकाच्या ५०० प्रती विकत घेतल्या. याबरोबरच श्रीमंत बापूसाहेब कागलकर व महाराजा सयाजीराजे गायकवाड बडोदा यांनी २०० प्रती विकत घेऊन या ग्रंथावरचे आपले प्रेम व्यक्त केले. या ग्रंथाची किंमत अत्यल्प असल्यामुळे समाजातील सर्व स्तरामध्ये हा ग्रंथ सहज पोहोचावा अशी सर्वांचीच अपेक्षा होती. गुरुवर्य केळूसकरांनी या ग्रंथाची रचना करून केलेले कार्य महत्त्वपूर्ण आणि त्यांच्या व्यासंगाचे दर्शन घडवणारे आहे.

गुरुवर्य केळूसकरांपूर्वी शिवाजी महाराजांचे चरित्र का लिहिले गेले नाही याबाबत विविध तर्क संभवतात. गुरुवर्य केळूसकरांनी आपल्या प्रस्तावनेतही हा प्रश्न उपस्थित केलेला आहे. 'ज्या प्रौढ प्रताप वीरमणीने स्वदेशास स्वातंत्र्य मिळवून देण्याचे सुयश संपादिले त्यांचे सविस्तर चरित्र लिहिण्याची स्फूर्ती कोणालाही होऊ नये यास काय म्हणावे?' हा केळूसकरांचा प्रश्न अधिक गंभीर व विचार करावयास लावणारा आहे. गुरुवर्य केळूसकरांनी फक्त प्रश्न उपस्थित केला नाही तर प्रत्यक्ष शिवचरित्र लेखनाचे कार्य हाती घेऊन महाराष्ट्रातील इतिहासकारांच्या व संशोधनाच्या क्षेत्रात स्वत:चा ठसा निर्माण केला. या चरित्र लेखनाचा उद्देश त्यांनी प्रस्तावनेत स्पष्ट केला आहे. ते म्हणतात, 'महाराष्ट्रातील एकदोन विद्वान गृहस्थ शिवाजी महाराजांचे चरित्र लिहित आहेत असे कळल्यावरून व केसरी पत्रकाराकडे शिवाजी महाराजांच्या स्मारकासाठी सन १८९५ पासून जमा होत असलेल्या हजारो रुपयांपैकी थोड्याशा रकमेचा विनियोग महाराजांचे एखादे चरित्र लिहून छापण्याकडे घेऊन ते सर्व लोकास ख्रिस्ती धर्मपुस्तकाप्रमाणे अगदी अल्प किमतीस विकत मिळण्याचा योग येईल असे वाटल्यावरून (केळूसकरांनी) हे काम हाती घेतले नाही. परंतु, पुढे ६-७ वर्षांपर्यंत ह्या विद्वानांकडून एखादे चरित्र प्रसिद्ध होईना व केसरीकाराकडे जमलेली रक्कम तशीच पडून राहिली असे पाहून आपण तरी आपल्या शक्तीप्रमाणे सांप्रत अनुकूल असलेल्या माहितीचा आधार घेऊन शिवरायांचे चरित्र लिहिण्याचा प्रयत्न करावा व परमप्रिय मित्राचा सदुद्देश सिद्धीस न्यावा.' या त्यांच्या प्रस्तावनेतील विवेचनावरून ते चरित्राकडे कसे वळले याची माहिती तर मिळतेच पण त्याबरोबरच केळूसकरांची माहितीचा आधार घेऊन शिवचरित्र लिहिण्याची भूमिकाही आपल्यासमोर येते. दुसऱ्या आवृत्तीच्या प्रस्तावनेत ते लिहितात, ' शिवाजी महाराजांसंबंधीचा अभिमान चोहोकडे जागृत होऊन त्यांच्या नावाचा सर्वत्र जयजयकार होऊ

लागला, तेव्हा आपणही स्वसामर्थ्यानुरूप या जयजयकारात अल्पस्वल्प भर घालावी' अशा उद्देशाने प्रस्तुत लेखकाने हा चरित्रलेखनाचा खटाटोप केला होता. शिवरायांना लघुत्व व वैगुण्य आणणारे असे जे कित्येक निराधार व निरर्थक प्रवाद पुष्कळ दिवसांपासून प्रचलित होते त्यांची असत्यता योग्य पुराव्यानिशी स्थापित करण्याचा प्रयत्न त्यांनी केला होता. या निवेदनातून गुरुवर्य केळूसकर आपण करीत असलेला खटाटोप अभ्यासपूर्णरीत्या व पुराव्यानिशी करत आहोत याची खात्री देतात. याबरोबरच आपला लेखन उद्देश सविस्तर सांगताना चरित्राच्या शेवटी ते लिहितात, 'शिवाजी महाराजांविषयी महाराष्ट्रात किंबहुना अखिल भरतखंडात जो अभिमान सांप्रतकाळी जागृत झाला आहे तो लोकांच्या मनात कायम राहून त्याजविषयीची यथार्थ बुद्धी सर्व लोकांच्या मनात वसावी. महाराजांचे साद्यंत चरित्र अवलोकन केल्यावाचून ही बुद्धी कायम राहणे शक्य नाही. त्यांचे देहावसन होऊन आज २२५ वर्षे लोटली आहेत इतक्या अवकाशात त्यांचा चरित्रमहिमा अनेक गद्यपद्यात्मक ग्रंथात ग्रंथिला आहे. अनेक यवनी व युरोपीय ग्रंथकारांनी त्यांच्याविषयी यथाबुद्धि उल्लेख केले आहेत; त्याप्रमाणे ते आज कीर्तीरूपाने अमर होऊन राहिले आहेत; परंतु त्यांचे ते कीर्तीतेज एका केंद्रात आणून त्यांचा वास्तविक प्रभाव किती आहे व ते कलंकमिश्रित किती आहे, असे जे कित्येकांचे म्हणणे आहे, त्यात कितीसे तथ्य आहे हे त्यांचे समग्र चरित्र कथन करून आजपर्यंत कोणीही दाखवण्याचा प्रयत्न केला नव्हता तो प्रकृत लेखकाने यथामती व यथाशक्ती केला केला आहे.' गुरुवर्य केळूसकर यांच्या या निवेदनातून चरित्र लेखनाचे कार्य त्यांनी का हाती घेतले याचे बळकट स्पष्टीकरण आपल्यासमोर येते.

गुरुवर्य केळूसकरांनी लिहिलेले हे शिवचरित्र ३२ प्रकरणांमध्ये विभागलेले आहे. या प्रकरणांची विषयानुरूप मांडणी खालीलप्रमाणे करता येईल.

१)शिवरायांची जडणघडण

२)महाराजांची राजकीय कारकीर्द

३)मुलकी व लष्करी प्रशासन व्यवस्था

४)शिवरायांची राजनीती व गुणविशेष

या सर्व चरित्रग्रंथात गुरुवर्य केळूसकर उपलब्ध माहितीचा यथासांग अभ्यास करून सत्याच्या जवळ पोहोचण्याचा आपल्या परीने प्रयत्न करतात. ज्या ग्रंथकाराने शिवाजी महाराजांच्या जीवनकार्याचा अन्वयार्थ लावताना जे एकांगी दिशाभूल करणारे आकलन मांडले होते, त्याबाबत पुराव्यांसह सत्य वाचकांसमोर ठेवणे हा हेतू गुरुवर्य केळूसकरांनी मनात बाळगलेला होता. शिवाजी महाराजांच्या कर्तृत्वाचे वस्तुनिष्ठ यथायोग्य मूल्यमापन व्हावे ही त्यांची मनस्वी इच्छा होती. त्यांची भूमिका स्वतंत्र व शास्त्रीय होती. हे त्यांच्याच निवेदनावरून दिसते. ते म्हणतात, 'इतिहास लिहिताना सत्याचाच अवलंब करावयाचा असतो मग तो कोणाला विशाद करणारा असो किंवा आनंद करणारा असो, त्याची क्षिती सत्यप्रिय इतिहासकाराने कदापिही बाळगता कामा नये, त्याने सत्याचे प्रकाशन व समर्थन बिनधोकपणे केले पाहिजे.' या त्यांच्या भूमिकेला ते सतत प्रामाणिक राहिलेले आहेत. त्यांनी इतिहासकार किंकेड यांचे मत उद्धृत करून शिवाजी महाराजांच्या संबंधाने इतिहासकाराने किती अन्याय केला आहे हे दर्शविलेले आहे. शिवाजी महाराजांच्या संदर्भात उपलब्ध असणाऱ्या विविध साधनांचा मतमतांतरांचा यथातथ्य विचार करून तटस्थ, निःपक्ष सत्य निर्णय करणारा चरित्रकार शिवाजी महाराजास लाभला नाही याबद्दल गुरुवर्य केळूसकर खंत व्यक्त करतात. आपण हाती घेतलेली कामगिरी यथास्थित होणे

शक्य नाही याचे कारण आपण महाराष्ट्रीयवासी असून शिवाजी महाराजांचे पूर्ण अभिमानी असल्याने हे होणार नाही अशी कबुलीही ते देतात.

केळूसकरांनी शिवाजी महाराजांचे हे चरित्र लिहित असताना सर्व साधनांची सूक्ष्म चिकित्सा करून त्यांची विश्वसनीयता, ग्राह्याग्राह्यता ठरवण्याचा प्रयत्न यथामती यथाशक्ती केलेला आहे. शिवाजी महाराजांवर व मराठ्यांच्या इतिहासावर देशीविदेशी इतिहासकार, संशोधक, लेखक, कवी आदींनी लिहिलेल्या सर्व ऐतिहासिक साधनांची त्यांनी सखोल पारख केल्याचे त्यांच्या ग्रंथातील तळटीपांवरून आपल्या प्रत्ययास येते. *शिवदिग्विजय, मराठी साम्राज्याची बखर, चित्रगुप्ताची बखर, शहाजीराजांची कैफियत, यवनी बखर, सभासदाची बखर, चिटणीसांची बखर, मल्हाररावकृत बखर, जेधे शकावरी, शेडगावकरांची बखर, हनुमंतस्वामीकृत बखर,* प्रो. जदुनाथ सरकारांचे *औरंगजेब चरित्र, शिवचरित्र,* ग्रँट डफचा *मराठीचा इतिहास,* मोडक यांचा *अदिलशाहीचा इतिहास,* मि. किंकेडकृत *मराठ्यांचा इतिहास,* वि. का. राजवाडे लिखित *मराठ्यांच्या इतिहासाची साधने,* टॉडचा *राजस्थानचा इतिहास,* एम विल्कीजकृत *म्हैसूरचा इतिहास,* डॉ. फ्रिअर बर्निअर, ऑर्नी यांचे लेखन, इंग्रजी व्यापाऱ्यांचा पत्रव्यवहार, अन्य परदेशी प्रवाशांचे कागदपत्र, *आलमगीर नामा, मासिर-ई-आलमगीर, तारीख-ई-शिवाजी, बसातीन-ई-सलातीन* आदी ग्रंथ आणि काफीखान, रा.ब.पारसनीस, गो.का.चांदोरकर, गो.चि.भाटे, रियासतकार देसाई इत्यादी साधनांचा सखोल अभ्यास गुरुवर्य केळूसकरांनी करून त्याचा वापर या शिवचरित्र लेखनात केलेला आहे.

गुरुवर्य केळूसकरांनी उपलब्ध लेखनाची चिकित्सा करीत असताना सत्याशिवाय अन्य कशासही झुकते माप दिलेले नाही. त्यांनी सर जदुनाथ सरकार, इतिहासकार वि. का. राजवाडे इत्यादींच्या लेखनाची निर्भीड चिकित्सा करून न पटणारी मते व लेखन निकालात काढले आहे. रामदासांचे चरित्रकथन करणाऱ्या *हनुमानस्वामीच्या बखरीला* चिकित्सेच्या ऐरणीवर ठेवून सप्रमाण निकालात काढले आहे. हे करत असताना यथायोग्य तळटीपा दिल्या असून त्यामध्ये तपशील, मत, पुरावे नोंदवून त्यातील योग्य अयोग्य ठरवताना इतिहासलेखनाच्या शास्त्रीय पद्धतीचा गांभीर्याने उपयोग केला आहे. दुसऱ्या आवृत्तीच्या प्रस्तावनेत सर जदुनाथ सरकार लिखित शिवचरित्राचा आपणांस खूप उपयोग झाला असे सांगून ते लिहितात, 'या सर्वांमध्ये बंगालचे सुप्रसिद्ध इतिहासकार प्रो. जदुनाथ सरकार यांचे ऋण फारच मोठे आहे. शिवरायांच्या चरित्रासंबंधीची जी माहिती आजपर्यंत अनुपलब्ध होती. ती या विद्वान इतिहासकाराच्या स्तुत्य पराक्रमामुळे इंग्रजी वाचकांस त्यांनी लिहिलेल्या शिवचरित्राच्या आधारे उपलब्ध झाली आहे.' प्रो. जदुनाथ सरकार यांचे ऋण व्यक्त करून त्यांच्या मर्यादा नोंदवण्यासही ते विसरत नाहीत. ते लिहितात, 'यवनी बखरकारांच्या आधारावरच मुख्यत: भिस्त ठेवल्यामुळे आमच्या देशी इतिहासलेखकांच्याही मनाची कशी अवस्था होते हे अलीकडे प्रो. जदुनाथ सरकार यांनी जे शिवाजी महाराजांचे चरित्र इंग्लिश भाषेत लिहिले आहे ते वाचल्यावर ध्यानात येईल. ते हिंदी गृहस्थ असून पारशी भाषेत पारंगत आहेत. त्यांनी जुन्या पारशी ग्रंथांचे अवलोकन करून मोंगलांच्या इतिहासाची व विशेषत: औरंगजेबाच्या सगळ्या कारकीर्दीची बरीच माहिती मिळवली आहे. व ती औरंगजेबाच्या चरित्राचे चार भाग इंग्रजीत लिहून प्रसिद्ध केली आहे. शिवाजी महाराजांचे चरित्र त्याने लिहिले आहे ते केवळ मोंगली बादशहांच्या दक्षिणेतील चळवळीचे एक उपकथानक म्हणून लिहिले गेले आहे. ते वाचताना त्या काळच्या कोणी यवन ग्रंथकाराने ते लिहिले आहे काय असा भास होतो. प्रो. सरकारांनी ह्या चरित्रलेखात जागोजाग यवनी ग्रंथकारांचा अनुवाद करून महाराजांच्या संबंधाने अनुदारतेचे व असत्यमय उल्लेख केले आहे.' केळूसकरांनी अशा प्रकारे शिवाजी महाराजांच्या चरित्राविषयी उपलब्ध असलेल्या सर्व लेखनाचा यथायोग्य अभ्यास करून सत्य असणाऱ्या तपशीलाचाच आपल्या चरित्रलेखनास उपयोग केलेला आहे. विपर्यास्तव अनैतिहासिक माहितीचा समाचारही घेण्यास ते विसरलेले नाहीत. दादोजी कोंडदेव यांनी

शिवाजी महाराज यांच्या स्वराज्य स्थापनेच्या प्रयत्नास सतत विरोध केला आणि शिवाजी महाराज आपले ऐकत नाहीत अशी तक्रार शहाजीमहाराजांकडे अनेकवेळा केली होती. हेही केळूसकर नोंदवून ठेवतात. संत रामदासांच्या गुरुपदाबद्दल जी मांडामांड अनेक लेखकांनी केली त्याबाबतही गुरुवर्य केळूसकरांनी आपली भूमिका स्पष्टपणे मांडलेली दिसते. याबरोबरच 'महाराष्ट्र धर्म' या संकल्पनेबाबतही केळूसकरांनी आपली मते स्पष्टपणे मांडलेली आहेत. 'महाराष्ट्र धर्म' या सामासिक पदाचा अर्थ महाराष्ट्रातील लोकांचा धर्म असा असावा असे केळूसकरांना वाटते. अशा सर्वच पुराव्यांबाबत गुरुवर्य केळूसकर दक्षतेने सत्याजवळ पोहोचण्याची सर्व खबरदारी आपल्या ग्रंथात घेतात. परकीय इतिहासकार, स्वकीय इतिहासकार यांच्या लेखनाची यथार्थ चिकित्सा करून नि:पक्षपातीपणे शिवाजी महाराजांचे चरित्र सिद्ध करण्याचा प्रयत्न करतात.

शिवाजी महाराजांचे चरित्र लिहित असताना केळूसकरांनी उपलब्ध माहितीची सखोल चिकित्सा तर केली आहेच. त्याबरोबरच यथायोग्य शास्त्रीय इतिहासलेखनपद्धतीचा अंगीकार केलेला आहे. गुरुवर्य केळूसकरांनी हे चरित्र ज्या कालखंडात लिहिले त्या कालखंडात उपलब्ध असणाऱ्या कागदपत्रांच्या आधारे त्यांनी हाती घेतलेले शिवचरित्र सिद्ध करणे क्रमप्राप्त होते. नवनवे पुरावे शोधण्याइतपतचा अवधी त्यांच्याजवळ उपलब्ध होताच असे नाही. तरीही यथाशक्ती त्यांनी हे शिवचरित्र निर्दोष व्हावे म्हणून प्रयत्न केलेले आहेत. हे चरित्र सिद्ध करणे एक आव्हान होते, तरीही या व्रतस्थ संशोधकाने हे आव्हान समर्थपणे पेललेले आहे. महाराजांचे चरित्र लिहीत असताना एकांगी चित्रणाला त्यांनी फाटा दिलेला आहे. महाराजांचा त्यांनी व्यक्ती म्हणून शोध घेतला असून त्यामध्ये अतिशयोक्ती, व्यक्तिमहात्म्य, दैवतीकरण येणार नाही याची जाणीवपूर्वक खबरदारी घेतली आहे. युक्तीवाद करताना आपली तार्किकता पणास लावली आहे. अत्यंत साध्या सोप्या भाषेत लिहिलेले हे चरित्र मराठी चरित्रलेखनाच्या इतिहासात मानदंड ठरले आहे. असे असले तरी गुरुवर्य केळूसकर यांच्या चरित्राची यथायोग्य दखल घेतली गेली असे म्हणता येत नाही. आजवर त्यांच्या सर्वच लेखनाची उपेक्षाच झाली. त्यांच्या या उपेक्षेचे समाजशास्त्र शोधणे ही सुद्धा आजच्या काळाची गरज आहे. एक माध्यमिक शिक्षक आपल्या आयुष्यातील एक हिस्सा फक्त चरित्रलेखनास देतो आणि परिश्रमपूर्वक शिवचरित्र सिद्ध करतो ही केवळ अलौकिक गोष्ट आहे. इतिहासात त्यांची उपेक्षा झाली असली तरी उद्याच्या इतिहासकारांना गुरुवर्य केळूसकर यांना वाट पुसतच पुढे जावे लागणार आहे.

छत्रपती शिवाजी महाराज यांचे चरित्र महाराष्ट्रातील सामान्य जनतेसह इतिहासकार व साहित्यिकांना नेहमीच आस्थेचे व कुतूहलाचे वाटत आले आहे. यातूनच अनेक भारतीय इतिहासकार व साहित्यिकांच्या लेखणीतून छत्रपती शिवाजी महाराजांविषयी भारतीय भाषांमध्ये लेखन होत आलेले आहे. याचवेळी पाश्चात्त्य इतिहास संशोधकांना व मध्ययुगीन समाज अभ्यासकांनाही छत्रपती शिवाजी महाराज यांचे कार्य, काळ व कर्तृत्व याविषयी ओढ निर्माण झालेली आहे. भारतातील इस्लामी राजवटीच्या शिरकावापासून इंग्रजी सत्तेच्या स्थिरीकरणापर्यंतचा मध्ययुगीन भारताचा इतिहास हा मोठ्या संघर्षाचा आणि पराक्रमाचा आहे. मराठ्यांच्या इतिहासात छत्रपती शिवाजी महाराज यांचे जीवन आणि चरित्र हे केवळ पराक्रमाचेच नव्हे तर त्यांच्या जीवनातील योगायोग, त्यांचा अतुल पराक्रम, त्यांच्या जीवनातील दैवी चमत्कार, आणि शत्रूलाही अचंबित करणारा त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा प्रभाव यांनी भरलेले आहे असे असले तरी; छत्रपती शिवाजी महाराजांच्या व्यक्तिगत जीवनाकडे पाहताना त्यांच्या ठायी असणारी अन्यायास प्रतिकार करण्याची वृत्ती, त्यांची नैतिकता व न्यायबुद्धी, प्रजा, मित्र आणि सहकाऱ्यांविषयी त्यांच्या मनातील आत्मीयता, आई जिजाऊ व त्यांच्या मनात असणारी स्त्रियांविषयीची आदरबुद्धी, त्यांच्यातील मानवीय गुणांमुळे साहजिकच कोणीही त्यांच्याकडे आकर्षित होतो. मित्र, प्रजा व स्वधर्मीय लोकांबरोबरच त्यांनी

तत्कालीन परधर्मीय व मुस्लीम लोकांविषयी बाळगलेली सहिष्णुता या व अशा अनेक कारणांनी छत्रपतींचे जीवन आजही लोकांच्या व जनसामान्यांच्या आदरास पात्र आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनाकडे प्रेरित होऊन मराठीमध्ये शिवाजी महाराजांची अनेक चरित्रे लिहिली गेली आहेत. यामध्ये प्रामुख्याने इतिहासकारांनी लिहिलेली चरित्रे व साहित्यिकांनी लिहिलेली चरित्रे असे दोन भाग करता येतील. या दोनही चरित्र लेखनाच्या प्रकारामध्ये सत्य आणि कल्पित अशा दोन भूमिका पाहवयास मिळतात. यातील पहिल्या प्रकारामध्ये ऐतिहासिक सत्य, इतिहासाची साधने, कालिक पुरावे यांची वस्तुनिष्ठता महत्त्वाची असते व त्याप्रमाणे या चरित्राचे लेखन वाचन अपेक्षित असते. चरित्र लेखनाच्या दुसऱ्या प्रकारामध्ये ऐतिहासिक वास्तवाच्या आधारे कल्पित-वास्तव म्हणून चरित्रे लिहिली गेली आहेत. अशा चरित्रांची मराठी साहित्यात मोठी संख्या आढळते. यात काव्यात्मक चरित्रे, कादंबरीमय चरित्रे, नाट्यमय चरित्रे व रंजक व लोकप्रिय होण्यासाठी लिहिलेली चरित्रे मराठी साहित्यात प्रचंड आहेत. अशा चरित्रांचा समाजासाठी व प्रत्यक्ष इतिहासासाठी धोका होण्याची शक्यता असते. अशा चरित्रांमुळे निर्माण झालेले वाद व शिवाजी महाराजांच्या व्यक्तिगत जीवनाविषयी वादळे निर्माण होण्याचे प्रकार अलीकडे महाराष्ट्रात झाल्याची उदाहरणे आपणास ज्ञात आहेच. मराठी साहित्यात अशा शिवचरित्रांचे लेखन करून प्रसिद्धी व स्टंट करण्याचे उद्योग अनेक लेखकांनी करून स्वत:स शिवशाहीर, शिवसंशोधक, इतिहासतज्ज्ञ वगैरे पदव्यांनी गौरविले आहे. परिणामत: अशा शिवचरित्रांच्या लेखनामुळे खरे शिवाजी महाराज व त्यांचा शिवकाल वस्तुस्थितीपासून कोसो दूर गेल्यामुळे येणाऱ्या पिढीपुढे शिवचरित्राविषयीच्या संभ्रमात वाढ होण्याची शक्यता दिसते आहे. अशा शिवचरित्रांचा आणखी एक धोका म्हणजे छत्रपती शिवाजी महाराजांना विशिष्ट जातीधर्माचे बनवणे, विशिष्ट जातीधर्मासाठीच त्यांनी आपले जीवन समर्पित केले असे प्रचारकी लेखन करणे हा उद्योग साहित्यिक शिवचरित्रकारांनी केल्याचे जाणवते. अशा साहित्यिक शिवचरित्राच्या तुलनेने ऐतिहासिक सत्यावर आधारलेली शिवचरित्रे अत्यल्प असल्याने व सत्याधारित शिवचरित्रांचा विशेष बोलबाला न झाल्याने रंजक साहित्य लिहिणाऱ्या शिवचरित्रांनी समाजात संभ्रम निर्माण होण्याला खतपाणी घातले आहे.

या सर्वाच्या पार्श्वभूमीवर श्री. कृष्णराव अर्जुन केळूसकरांनी लिहिलेले हे शिवचरित्र का महत्त्वाचे ठरते याविषयी काही मते मांडता येतील. आजच्या आपल्या एकूणच राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक पर्यावरणात शिवाजी महाराज यांचे कार्य कालबाह्य झालेले नाही; तर त्या विचारांची यथार्थता अधिकच प्रकर्षाने जाणवते आहे. सामाजिक मूल्यांची खुलेआम होत असलेली पायमल्ली, सत्तेचा आणि पदाचा अतिरेकी हव्यास, एक देश म्हणून, एक राष्ट्र म्हणून समग्रतेच्या विचाराचे दुर्भिक्ष, परराष्ट्रनीतीचा सावळागोंधळ, सारा समाज खाजगीकरण, उदारीकरण आणि जागतिकीकरणाच्या नावाखाली भयग्रस्त करणे, बोलण्यात आणि कृतीत महदंतर असणे, सत्तेच्या हव्यासापोठी जाती धर्मांमधील तेढ वाढविणे, जाणीवपूर्वक समाजाला हिंसेच्या खाईत लोटून देणे, स्त्रियांना केवळ एक उपभोगाची वस्तू मानणे, त्यांच्या शीलाची आणि पावित्र्याची विटंबना करणे, कोणत्याही प्रकारचा विधिनिषेध न बाळगता स्वत:च्या बेजबाबदार कृत्याचे वृथा समर्थन करणे, विचाराची लढाई शस्त्राने संपविण्याचा प्रयत्न करणे, प्रसंगी विचारवंतालाच संपविणे, जनतेला दिलेली आश्वासने सोयीस्करपणे विसरणे, खऱ्या इतिहासाचे दमन करून खोटा इतिहास समाजात दृढ करण्याचा प्रयत्न करणे ही अशी संवेदनशील माणसाला अस्वस्थ करणारी यादी आजच्या वर्तमान वास्तवात वाढतेच आहे. याचा परिणाम आपल्या समाजव्यवस्थेवर अर्थातच अतिशय घातक होऊ लागल्याचे चित्र प्रकर्षाने दिसू लागले आहे. माणसामाणसांमध्ये आलेली संवेदनशून्यता, संवादहीनता, भयग्रस्तता, एकटेपणा, पोरकेपणा, चिंताग्रस्तता इत्यादींमुळे ओढवलेली समाजविन्मुखता असे

दिशाहीन वास्तवाचे दर्शन केवळ देशपातळीवरच नव्हे; तर जगभर दिसू लागले आहे. माणसाच्या व्यक्तिमत्त्वाला पर्यायाने साऱ्या समाजालाच योग्य ती दिशा देऊ शकेल असा महापुरुष आपणास केवळ इतिहासाच्या पानांमध्येच शोधावा लागणार हे वास्तव आहे. त्यामुळे अशा चरित्रग्रंथाची उजळणी सातत्याने करीत राहणे; हेच आपल्या आजच्या समाजाचे भागधेय आहे असे म्हटले तर ते वावगे ठरू नये.

मानवी नातेसंबंध आपल्या इतिहासात कधी नव्हते इतके वर्तमान वास्तवात उद्ध्वस्त होऊ घातलेले आहेत. या अनुषंगाने शिवाजीराजांचे त्यांच्या कुटुंबातील माणसांशी तसेच त्यांनी आपल्या सैन्याशी, शूर वीर मावळ्यांशी निर्माण केलेले नातेसंबंध पाहिले; तर थक्क व्हायला होते. प्रेम, माया, ममता, जिव्हाळा, करुणा, परस्परांवरील गाढ विश्वास, वृत्तीचा दिलदारपणा हे सारे काही शिवाजी महाराजांनी जिवापाड जपलेले होते. याचा प्रत्यय या चरित्रग्रंथातून आपणास वारंवार येत राहतो. आजचे राजकारणी अथवा समाजकारणी यांनी शिवाजी महाराजांनी लाखमोलाची माणसे कशी शोधली होती, त्यांचा कसा सांभाळ केला होता; हे आवर्जून वाचावे आणि त्यानुसार वर्तावे असेच आहे. महाराजांनी आपल्या राष्ट्रबांधणीच्या कामी जे मावळे संघटित केलेले होते. त्या मावळ्यांच्या हिताचा विचार तर त्यांनी केला होताच, पण देशकार्यांसाठी प्राणाची आहुती दिलेल्या मावळ्यांच्या उर्वरित कुटुंबाच्या उदरनिर्वाहाचीही सोय लावून दिलेली होती. त्यांच्या गरीब आणि शोषितांकडे पाहण्याच्या उदार आणि करुणात्मकवृत्तीचे अत्यंत समर्पक शब्दांकन केळूसकर यांनी या ग्रंथात केले आहे. प्रजेचे पालनपोषण कसे करावे, निसर्गाचे आपल्या पर्यावरणाचे रक्षण कसे करावे याचा वस्तूपाठच शिवाजीराजांनी आपल्या कृतीउक्तीच्याद्वारे सामाजिक जीवनात घालून दिलेला होता. माणसांची आणि आपल्या पर्यावरणाची अक्षम्य हेळसांड करण्याऱ्या समाजकंटकांनी महारांच्या या आचारविचारांपासून खचितच बोध घेण्यासारखा आहे. यादृष्टीनेही या ग्रंथाचे मोल आजच्या आपल्या परिप्रेक्ष्यात खचितच उल्लेखनीय आहे, असे हा चरित्रग्रंथ वाचताना वाटत राहते.

केळूसकरांचा हा चरित्रग्रंथ वाचताना आणखी एक बाब सातत्याने विचाराच्या केंद्रस्थानी येत राहते आणि ती म्हणजे आजच्या आपल्या समाजाला तीव्रतेने भेडसावणारे धार्मिक वास्तव. विज्ञान तंत्रज्ञानाचा प्रसार जसजसा जगभर होऊ लागलेला आहे, आणि या साऱ्या वास्तवाने एकप्रकारचा खुलेपणा, मोकळेपणा, स्वातंत्र्य, माणसाला लाभेल; अशी अपेक्षा झपाट्याने फोल ठरते आहे. म. फुले, शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर या आणि अशा अनेक समाजसुधारकांनी खिळखिळ्या केलेल्या जातीधर्माच्या भिंत्ती पुन्हा एकदा नको तितक्या संकुचित होत आहेत. केवळ संकुचितच नव्हे; तर माझाच धर्म श्रेष्ठ कसा इतरांचा टाकाऊ कसा हे समाजमनावर सतत बिंबवत राहून इतर धर्मविचारांचा ते कमालीचा तिरस्कार करीत आहेत. यासाठी शेकडो निरपराध लोकांचे अत्यंत क्रूरपणे बळी घेतले जात आहेत. या पार्श्वभूमीवर शिवाजी महाराजांची धर्मनीती निःसंशय अनुकरणीय अशीच होती. कारण महाराजांचे व्यक्तिमत्त्व दांभिक नव्हते. शुद्ध मन, सद्वासना आणि सदाचरणाचे संस्कार बालपणापासूनच त्यांच्यावर झालेले होते. जिजाबाई यांनी हेतूत: हे संस्कार महाराजांवर केलेले होते. या संस्कारांचे पडसाद त्यांच्या समग्र जीवनावर पडल्याचे दिसून येतात. शिवाजी महाराज यांनी त्यांच्या आयुष्यभर यवनीसत्तेविरुद्ध लढा दिला होता. त्यांचे भांडण दुष्ट व जुलूमी सत्तेच्या विरोधात होते. इस्लाम धर्माशी नव्हते, हे आपण जाणीवपूर्वक ध्यानात घेतले पाहिजे. यवनांच्या पूज्यस्थानांसंबंधीही शिवाजी महाराजांच्या मनात तिरस्कार अथवा द्वेष नव्हता. युद्धात सापडलेली कुराणाची प्रत योग्य तो आदर राखत मुस्लीम सैनिकाकडे देणे, मुस्लीमांच्या प्रार्थनास्थळांना इजा न पोहचविणे, सैन्यात मारल्या गेलेल्या शत्रूंच्या स्त्रियांचा योग्य तो मान राखणे, शत्रूंच्या मृतदेहाची विटंबना न करणे, यथासांग त्यांचा दफनविधी घडवून आणणे इतर धर्मियांविषयीच्या शिवाजी महाराजांच्या या कृती आजच्या आपल्या तथाकथित समाजमार्तंडांनी धार्मिक उच्छाद मांडलेल्या कालखंडात केवळ विचारप्रवृत्तच नव्हे; तर

त्यानुसार कृती करायला भाग पाडणाऱ्या आहेत. देवस्थाने व तीर्थस्थानांचीही उत्तम व्यवस्था त्यांनी लावून दिलेली होती. शिवाजी महाराजांची धर्मसंबंधाने उदारबुद्धी होती. धर्मवेड त्यांच्या ठायी बिल्कुल नव्हते. हा बोधही या ग्रंथाच्या अनुषंगाने आपणास निश्चितच घेता येतो.

या चरित्रग्रंथात शिवाजी महाराजांच्या राजव्यवस्थेविषयीचे केळूसकरांनी लिहिलेले प्रकरण आजच्या स्वमग्न राज्यकर्त्यांनी आवर्जून वाचावे असेच आहे. आत्मविश्वास गमावलेल्या, स्वत:ची अस्मिता विसरलेल्या समाजास ताठ मानेने उभे करण्याचे बळ देण्याचे लोकोत्तरकार्य शिवाजी महाराज यांनी केलेले होते. आपली राजव्यवस्थेची किती रेखीव घडी बसविण्याचा प्रयत्न शिवाजी महाराजांनी केलेला होता आणि त्यात ते कसे यशस्वी झालेले होते हे पाहिले की थक्क व्हायला होते. समाजहिताचा यत्किंचितही विचार न करणाऱ्या आजच्या तथाकथित पुढाऱ्याच्या डोळ्यात हे सारे झणझणीत अंजन घालणारे आहे. अष्टप्रधान मंडळाच्या कामांचे स्वरूप, दौलतीची नेटकी व्यवस्था, लष्कराची व्यवस्था, किल्ल्यांचा सुयोग्य बंदोबस्त, तोफखान्याची व्यवस्था, आरमाराची व्यवस्था, दरबार भरवण्यासंबंधीची व्यवस्था, जमीनमहसुलाची व्यवस्था, गाईगुरांच्या आणि सैन्यातील हत्ती, घोडे, उंट इत्यादींच्या दाणावैरणीची त्यांच्या औषधपाण्याची व्यवस्था, नोकरांचे पगार, वेतने व तैनातीची व्यवस्था, यासोबतच पाटील, कुळकर्णी, खोत, देशमुख, देसाई, देशपांडे, जमीनदार, मोकासदार, मिरासदार, जहागीरदार वगैरे लोकांच्या तावडीतून रयतेला मुक्त करणे, कोणताही सरकारी हुद्दा वंशपरंपरेने कोणाच्याही कुळात चालू न ठेवणे, चोरांचे भय नष्ट करणे, ब्राह्मणांनी आणि पुजाऱ्यांनी देवस्थानांच्या खर्चाचा हिशेब नीट ठेवण्याची खबरदारी घेणे अशी शिवाजी महाराजांनी केलेली ही सारी व्यवस्था पाहिली की एक कर्तव्यदक्ष राजा कसा असावा याची प्रत्यंतर आल्यावाचून राहत नाही. इतकेच नव्हे तर गायक, वादक, नर्तक यांचा योग्य तो सन्मान कसा करावा, त्यांना योग्य ती बिदागी कशी द्यावी, गुणीजनांचा योग्य तो परामर्श कसा घ्यावा याचाही प्रत्यय वाचकांना हे चरित्र वाचताना येत राहतो. केळूसकरांनी लिहिलेल्या 'राज्यव्यवस्था' या प्रकरणात यासंदर्भातील तपशील विस्ताराने आले आहेत.

शेती आणि त्यावर गुजराण करणाऱ्या शेतकऱ्यांचे मोल शिवाजी महाराज चांगलेच ओळखून होते. तेव्हा यासंदर्भात त्यांनी केलेल्या सुधारणा आणि कार्यपद्धती आजच्या आपल्या शेतीविषयक धोरणांच्या संदर्भात विशेष उल्लेख करण्याजोगी आहे. 'लागवडीस न आलेल्या जमिनी नव्या रयतेस द्यावयाच्या झाल्या म्हणजे तिच्यापाशी गुरेंढोरें नसल्यास ती तिला सरकारांतून द्यावी, तिला बीजास दाणा द्यावा, व पीक होईपर्यंत निर्वाहासाठी धान्य व पैका द्यावा. दोनचार वर्षांनी हा ऐवज उगवून घ्यावा. ह्याप्रमाणें रयतेस कौल करून देऊन जमिनी इस्ताव्याने दिल्या व बहुतेक जमीन लागवडीस आणली. उत्पन्नाचा अजमास बरोबर पाहून रयतेवर कर बसवावा, जुलूम असा कोणावर करू नये, अशी अधिकाऱ्यांस सक्त ताकीद असे.' इतका व्यापक आणि सर्वसमावेशक विचार आपली तथाकथित राजकीय व्यवस्था करते का? या प्रश्नाचे उत्तर दुर्दैवाने नकारार्थी असेच मिळते आहे. शेतकऱ्यांचा कर्जबाजारीपणा, त्यासंदर्भात शासन राबवित असलेले वेगवेगळे मार्ग, त्या मार्गांमधील सत्यानिष्ठता, शेतकऱ्यांच्या आत्महत्या, बाजारभावाचा अद्यापि न सुटलेला गुंता आणि या साऱ्यांवर दशांगुळे उरणारी संवेदनहीनता. आजच्या या साऱ्या पार्श्वभूमीवर शिवाजी महाराज यांनी केलेला शेतीनिष्ठ वा भूमिनिष्ठांच्या हिताचा विचार आजही विचार करावयास भाग पाडणारा आहे.

छत्रपती शिवाजी महाराज यांविषयी मराठी समाज, महाराष्ट्र प्रांत व जगभरातील इतिहास अभ्यासकांना आस्था आहे. हे आजकालचे वर्तमान सत्य आहे. ही आस्था महाराष्ट्रात १०० वर्षांपूर्वीही होती. हे प्रस्तुत चरित्राची प्रस्तावना वाचताना लक्षात येते. केळूसकरांनी लिहिलेले दीर्घ शिवचरित्र व महाराष्ट्रातील सामान्य जनता आणि तरुणांना प्रेरणादायी ठरावे यासाठी लिहिलेले हे संक्षिप्त चरित्र याच आस्थेने मराठा ऐक्येच्छू सभेच्या

विद्यमाने छापले गेले आहे. यापैकी पहिले दीर्घचरित्र १९०७ साली मराठा प्रॉव्हिडंट फंडाकडून श्री. रामचंद्रराव दळवी यांनी छापले व दुसरे १९२७ मध्ये संक्षिप्त चरित्र 'त्रिशतसांवत्सरिक शिवजयंती उत्सव'च्या निमित्ताने शिवाजी महाराजांचा एक स्मारक ग्रंथ म्हणून छापले गेले. ही मराठा ऐक्येच्छू सभा १८८७ पासून शिवजयंती साजरी करत होती. आजचा गणेशोत्सव व शिवजयंतीचा इतिहास सांगणाऱ्यांना ही गोष्ट नमूद करावी लागेल. शिवजयंती उत्सवाच्या निमित्ताने स्मारक ग्रंथांचा स्तुत्य उपक्रम करणे हे त्याकाळातील मराठा तरुणांच्या कामगिरीचे स्मरण आजही समाजासाठी व आजच्या शिवजयंती उत्सवासाठी निश्चितच प्रेरणादायी आहे.

या चरित्राची वाङ्मयीन उपयोगिताही महत्त्वाची आहे. आज भारतीय समाजातील थोर नेते, इतिहासातील कर्तबगार व्यक्ती यांच्या कर्तृत्वाची विभागणी जातनिहाय, वंशनिहाय होत आहे. परंतु इतिहासातील असो अथवा वर्तमानातील असो कोणतीही कर्तबगार व्यक्ती सर्वसमावेशक, सहिष्णु, निधर्मी, मुत्सद्दी, पराक्रमी, सदाचारी व न्यायनीतीवान असल्याखेरीज ती समाजात आदर्श व आदरास प्राप्त होणार नाही. छत्रपतींच्या अंगी हे सर्व गुण होते. त्यांनी स्वराज्यस्थापनेबरोबरच इथल्या गरीब रयतेसह सर्व धर्मीय व स्त्रीबालक तसेच शत्रूच्या सैन्यातील शरण आलेल्यांना माणुसकीची वागणूक दिली. सहकारी सरदारांच्या बरोबर व स्वराज्याच्या विस्तारास हातभार लावणाऱ्या प्रत्येक घटकाचा आदरसत्कार व त्यांचे उत्तरदायित्व स्वीकारण्यासह एक आदर्श परिपाठ घालून दिला. याचे प्रत्यंतर आपणास हे चरित्र वाचताना वारंवार येते. आज समाजाचे नेतृत्व करणाऱ्या प्रत्येक पुढारी/म्होरक्यासमोर हे चरित्र ठेवले पाहिजे असे आहे. दुसरे असे की शिवाजी महाराजांच्या काळात निजामशाही, अदिलशाही, कुतूबशाही आणि परकीय इंग्रज यांच्याबरोबर सतत संघर्ष करताना या शत्रू राज्यातील राजवटींचा उन्मत्तपणा, धार्मिक असहिष्णुता, रयतेवरचे व गोरगरीब जनतेवरचे अत्याचार, धार्मिक स्थळांची मोडतोड अशा अनेक गोष्टी वारंवार पाहायला मिळतात. याउलट छत्रपतींनी आपले शत्रू असलेल्या इस्लामी राजवटींसह सर्वांना सामावून घेऊन त्यांना दिलेली वागणूक, स्त्री बालकांसह अनेक स्त्रियांच्या राजवटींना दिलेले अभय हे छत्रपतींचे गुण त्या काळातीलच नव्हे तर आजही सामाजिकदृष्ट्या आदर्शवत आहेत. म्हणून हे चरित्र समकाळातही उपयुक्त आहे.

क्षत्रियकुलावतंस श्री छत्रपती शिवाजी महाराज यांचे चरित्र केळूसकरांनी अभ्यासपूर्ण लिहिले आहे. याकरिता त्यांनी पूर्वसूरींची चरित्रे, भारतीय इतिहासकारांची चरित्रे अवलोकिली आहेत. शिवचरित्रा-विषयीच्या अनेक आक्षेपांचे केळूसकरांनी या चरित्रात खंडण केले आहे. अनेक ऐतिहासिक कागदपत्रांच्या आधारे छत्रपतींच्या जीवनातील घटना तारखेसह सांगितल्या आहेत. अनेक कागदपत्रांतील मजकूर स्वभाषेत योग्य ठिकाणी घातला आहे. विशेषत: औरंगजेबाची पत्रे, तहाची पत्रे, इंग्रजी राज्यकर्त्यांची पत्रे, वकिलांकडून पाठवलेली पत्रे व स्वत: महाराजांनी लिहिलेली पत्रे अशा पत्रांमुळे ऐतिहासिक सत्यतेच्या जवळ हे चरित्र जाते. याचवेळी काही ठिकाणी बखरीतल्या मजकूरावरून शिवाजी महाराजांच्या जीवनातील अलौकिक घटनांना या चरित्रात स्थान दिले आहे. अशा काही घटनांमुळे हे चरित्र ऐतिहासिक सत्यापासून दूर जाण्याचा दोष यात येऊ शकतो. परंतु छत्रपती शिवाजी महाराज आपल्या जीवनात ज्या ज्या वेळी अशा काही घटनाप्रसंगांच्या पेचात अडकतात तेव्हा त्यातून त्यांची झालेली सुटका ही केवळ मानवी पातळीवर अशक्य होती. साहजिकच अशा पेच प्रसंगातून मार्ग काढण्यासाठी गुरुवर्य केळूसकरांनाही दैवी आणि अलौकिक पर्यायांचे सहाय्य घ्यावे लागले आहे. असे असले तरी या चरित्राच्या ऐतिहासिक सत्याला फारशी बाधा येऊ न देता, हे चरित्र ऐतिहासिक सत्याजवळ जाणारे चरित्र ठरते. छत्रपतींच्या जीवनातील एकूण चार घटनांच्या प्रसंगी भवानी माता त्यांच्याशी संवाद साधते. या चारही ठिकाणी छत्रपतींनी सुरू केलेले स्वराज्याचे कार्य थांबते की काय अशी अचंबित करणारी परिस्थिती निर्माण होताना दिसते. यापैकी

अफजलखानाचा वध ही घटना तर केवळ दैवी साक्षात्कारच म्हणावा लागेल. याचप्रमाणे दिल्लीची भेट व सुटका आणि छत्रपतींची श्रीशैलमल्लिकार्जुनच्या ठिकाणी निर्माण झालेली वैराग्यभावना, तुकारामभेटीचा प्रसंग व त्या ठिकाणी निर्माण झालेली विरक्ती यातून परत छत्रपतींना स्वराज्य कार्यासाठी प्रेरित करणे व या प्रसंगी महाराजांच्या निराश मानसिकतेतून बाहेर काढणे यासाठी चरित्रकाराने हे प्रसंग वर्णिले असावेत. याचबरोबर चरित्रकारावर मराठीतील बखरींचा प्रभाव असणेही शक्य आहे. मराठीतील बखर साहित्य हे ऐतिहासिक सत्याला धरून नाही. या विषयी अनेक इतिहासकारांनी बखरींना इतिहासाचे दुय्यम साधन मानले आहे. असे असले तरी बखरी या साहित्यिकदृष्ट्या सरस असल्याने त्या इतिहास वाचनापेक्षा साहित्यिक वाचनासाठी सरस ठरतात. गुरुवर्य केळूसकर यांच्या प्रस्तुत चरित्रावर ऐतिहासिक वास्तवाची जशी पकड आहे त्याचवेळी हे चरित्र वाङ्मयीन गुणांनीही समृद्ध आहे. या चरित्रावर बखरलेखनाची छाप असल्यासारखे भासते. ते यातील अलौकिक व दैवी घटनांच्या लिखाणामुळे होय. त्यामुळे हे चरित्र वास्तव व ऐतिहासिक सत्याधारित आहे, त्याचवेळी साहित्यिक गुणवत्तेसाठी कल्पित वास्तवाच्या पातळीवरही आहे. चरित्रलेखनामध्ये लालित्य येण्यासाठी ज्या कल्पित वास्तवाची आवश्यकता असते ते कल्पित वास्तव गुरुवर्य केळूसकरांनी यात पकडले आहे.

हे चरित्र वाङ्मयीन गुणांनी समृद्ध आहे. हे या चरित्रातील घटना, प्रसंगवर्णने, निवेदनशैली, व्यक्तिवर्णने आणि स्थलवर्णने यातून प्रत्ययास येते. बखरीची गतिमान आणि स्पृहणीय व स्फूर्तीदायक भाषा हाही या चरित्राचा विशेषच म्हणावा लागेल.

चरित्रातील घटना मालिकेच्या रूपाने केळूसकरांनी ओघवत्या शैलीत मांडल्या आहेत. छत्रपतींच्या जीवनातील अनेक घटना या क्रमबद्ध वाटाव्यात अशा आहेत. स्वराज्याच्या सिद्धतेपासून महाराजांच्या अंतकाळापर्यंतच्या घटना केळूसकरांनी शृंखलाबद्ध पद्धतीने मांडल्या आहेत. एका संकटातून सुखरूप सुटावे व तात्काळ दुसरा प्रसंग उभा राहवा अशा एखाद्या परिकथेतल्या राजकुमारासारखी कथा व्हावी व संकट-सुटका परत संकट सुटका अशा घटनांनी छत्रपतींचे जीवन भारलेले आहे. अशा घटनांची मालिका केळूसकरांनी या चरित्रात हुबेहूब मांडली आहे.

घटनांबरोबर छत्रपतींच्या जीवनात आलेले अनेक बाके प्रसंगही चरित्रकारांनी मांडले आहेत. त्याचवेळी छत्रपतींनी आपले कौशल्य पणाला लावून जिंकलेले प्रसंगही उभे केले आहेत. शहाजीराजांना नजरकैदेत ठेवून भिंतीत गाडण्याच्या प्रसंगापासून, अफजलखानाचा वध, शाहिस्तेखानावर केलेला हल्ला, मोगलांशी व अदिलशहाशी वेळोवेळी झालेल्या चकमकीचे प्रसंग, प्रतापराव गुजराचा पराक्रम, बाजीप्रभू देशपांडेंची शूरता, सुरतेची लूट, अनेक स्त्रियांना दिलेले अभय, तानाजी मालुसरेंचा प्रसंग असे कितीतरी प्रसंग हुबेहूब उभे राहवेत अशी प्रसंगवर्णने यात आली आहेत. केळूसकरांनी ती अत्यंत चित्रदर्शी रूपाने या चरित्रात उभी केली आहेत.

घटना प्रसंगानंतर या चरित्रातील व्यक्तिवर्णने व स्थलवर्णनेही वाचनीय झाली आहेत. अफजलखानाचे आणि महाराजाचे वर्णन करताना चरित्रकार एकाच वाक्यात म्हणतो, ' त्याचे धूड मोठे विशाल होते आणि महाराजांचा बांधा अमळ ठेंगणा व सडपातळ होता.' छत्रपतींच्या व्यक्तिमत्त्वाचे इंग्रज अधिकाऱ्याने केलेले वर्णन केळूसकर असे करतात. 'शिवाजीचा देह वायुरूप असून त्याला पंख असावे असे ज्याला त्याला वाटू लागले आहे. कारण तो कोणत्यावेळी कोठे प्रगट होईल याचा काहीच नेम नाही, तो आज एके ठिकाणी आहे तर उद्या कोठे प्रगट होईल याचा नेम नाही.' अशा छोट्या छोट्या वाक्यांमध्ये अनेक व्यक्तीची वर्णने यात आली आहेत. 'औरंगजेब

अतिबलाढ्य आहे' हे विधान वारंवार येते. यातून औरंगजेबाचे व्यक्तिमत्त्व लक्षात येते. छत्रपती शिवाजी महाराजांविषयी चरित्रकारास अत्यंत आदर आहे. त्यांचा उल्लेख करताना त्यांच्याविषयी अनेक विशेषणे चरित्रकार वापरतो. 'त्यात त्यांच्या अंगचे शौर्य, वीर्य, औदार्य, राजकार्यनिपुणत्व, प्रजापालनपटुत्व, युक्तिमत्ता, बुद्धिमत्ता, मातृपितृभक्ती अशा उज्ज्वल गुणांचे दिग्दर्शन अनेक प्रसंगी झाले आहे.' तुकाराम बावांचे वर्णन एकाच वाक्यात त्यांचे संतत्व दिग्दर्शित करते. तुकारामबावा त्या काळच्या कीर्तनकारांत अग्रगण्य असून पराकाष्ठेचे भाविक व प्रेमळ भगवद्भक्त असल्याकारणाने त्यांची बोधवाणी अत्यंत प्रासादिक व मनोवेधक असे. या आणि अशा अल्प शब्दांतून केळूसकरांनी संक्षिप्त व्यक्तिवर्णने केली आहेत.

चरित्रातील ठिकाणांची वर्णने आणि भौगोलिक प्रदेशांची माहिती हाही एक या चरित्रग्रंथाचा विशेष म्हणावा लागेल. चितोडच्या प्रदेशापासून ते महाराष्ट्रातील गडकोट किल्ल्यांच्या ठिकाणापर्यंत अनेक प्रदेशांची माहिती या ग्रंथात मिळते. सिंगणापूरच्या पाटीलकीपासून सुरू झालेली भोसले घराण्याची राजवट महाराष्ट्र, कर्नाटक, कोकणापासून तंजावरपर्यंत छत्रपती शिवाजी महाराजांनी विस्तारली. या विस्तीर्ण प्रदेशाचा साद्यंत इतिहास व भौगोलिक माहिती यादृष्टीनेही या ग्रंथाचे ऐतिहासिक महत्त्व आहे. पुढे लिहू पाहणाऱ्या संशोधकांना हा ग्रंथ व यातील भौगोलिक संदर्भ महत्त्वाचे ठरतील. छत्रपतींनी पादाक्रांत केलेला प्रदेश, विविध ठिकाणी झालेल्या लढाया, प्रादेशिक वैशिष्ट्यांमुळे मराठ्यांना आलेले यश, यासह छत्रपतींच्या जीवनप्रवासाबरोबरच त्यांनी केलेला प्रादेशिक प्रवास तत्कालीन महाराष्ट्राच्या व मराठी साम्राज्याच्या विस्तीर्ण सीमारेषा या ग्रंथाच्या पानोपानात अधोरेखित होतात. साहजिकच ग्रंथ वाचताना प्रदेशाविषयीची उत्सुकता वाढीस लागते.

कोणत्याही ग्रंथांचे वाचनीय यश हे त्या ग्रंथाच्या निवेदनशैलीवर व भाषेवर अवलंबून असते. कृष्णराव अर्जुन केळूसकरलिखित या शिवचरित्राची निवेदनशैली व भाषा वेधक आहे. या चरित्राचा विषय शिवाजी महाराजांचे जीवन व कार्य असा मध्यवर्ती आहे. शिवाजी महाराजांच्या जीवन व कार्याचा ओघवता इतिहास या चरित्रात आला आहे. हा चरित्र ग्रंथ ऐतिहासिक सत्यावर आधारलेला वास्तविक ग्रंथ असला तरी 'चरित्र' या वाङ्मयप्रकाराला साजेशी निवेदनाची भाषा या ग्रंथात आलेली दिसते. हे ऐतिहासिक चरित्र असले तरी याची रचना इतिहासाची साधने, सनावळ्या, पुरावे, दाखले यासह न होता छत्रपतींच्या जीवनाचा अखंड इतिहास लालित्यपूर्ण भाषेत लिहिले गेले आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांचे संपूर्ण जीवन हे प्रचंड गतिमान, अस्थिर, धामधूमीचे आणि घोडदौडीचे होते. ही गतिमान धामधूम आणि घोडदौड या चरित्रातील निवेदनातही प्रत्ययास येते. शिवाजी महाराजांच्या जीवनाची घोडदौड त्यांच्या बालपणापूर्वीच सुरू झालेली आहे. शहाजीराजे शत्रूच्या प्रबळ सैन्याच्या पाठलागास्तव दौड करीत असता जिजाबाई बरोबर होत्या. त्या गरोदर असल्यामुळे तिला घोड्यावरून नेता येईना. म्हणून त्यांनी जिजाबाईंना शिवनेरी किल्ल्यांत ठेविले. तेथे ती शके १५४९ प्रभव नाम संवत्सर, वैशाख शुद्ध पंचमी सोमवार यादिवशी प्रसृत झाल्या. ह्याप्रमाणे मराठी साम्राज्याच्या संस्थापकाचा जन्म ह्या अशा धामधुमीच्या वेळी शिवनेरी किल्ल्यात झाला. जन्मापूर्वी सुरू झालेली दौड व धामधूम शेवटी त्या सरशी त्यांनी निवडक घोडेस्वारांनिशी निघून ती रक्कम घेऊन येणाऱ्या लोकांवर अचानक हल्ला केला. ते सगळे द्रव्य हस्तगत करून शत्रूकडील हरकत येण्यापूर्वी ते रायगडावर अतिवेगाने येऊन पोचले. त्या दौडीमुळे त्यांना अतिशयित थकवा आला. त्यांच्या छातीत दुखू लागले. येथपर्यंत त्यांच्या मृत्यूसमयापर्यंत त्यांची घोडदौड व त्यांच्या जीवनातील धामधूम कायम होती. ही गतिमान घोडदौडीची निवेदनशैलीही या चरित्रात आपणास जाणवते. त्यामुळे चरित्र वाचताना ही गती वाचकाला वाचनाची पकड घेण्यास उद्युक्त करते. ती पकड चरित्र वाचनात कायम राहते. यात चरित्रकाराच्या निवेदनकौशल्याचे रहस्य जाणवते.

घटना, प्रसंग, व्यक्तिवर्णने, स्थलवर्णने, युद्धाची वर्णने, यातील गतिमानताही महत्त्वाची आहे. या वर्णनातील चित्रमयता व हुबेहूबपणा आपणासमोर एक शिवाजी महाराजांच्या जीवनाचा चलत् चित्रपट उभा करतो. चरित्राचे निवेदन तृतीयपुरुषी आहे. चरित्रकार गुरुवर्य केळूसकर यांनी तटस्थपणे हे चरित्र लिहिले आहे. हा त्यांचा तटस्थपणा या निवेदनात सतत जाणवतो. जणू काही छत्रपतींच्या जीवनाचे साक्षी असल्यासारखे या चरित्राचे निवेदन झाल्यामुळे वाचकांच्या समोरही हा तटस्थपणा उभा रहातो. निवेदनात जीवनकथा सांगितली आहे. हे सांगताना त्यांना अवगत असलेली माहिती सतत आपल्यासमोर येत असते. पण त्याचवेळी स्वत: चरित्रकारास माहिती नसणाऱ्या ऐकीव गोष्टी सांगताना चरित्रकार शिवाजी महाराजांना असा बोध केला की, असे सांगतात की, 'ह्या अफजुलखानाविषयीची एक दंतकथा अशी आहे की,' अशा वाक्याने आपली सोडवणूक करून घेतो. चरित्रकाराला शिवाजी महाराजांचे चरित्र सांगण्यापेक्षा दाखवून देण्यात व समोर ठेवण्यात रस वाटतो. त्यामुळे अनेक उताऱ्यांची सुरुवात 'हे असे, हे आरमार ह्याप्रमाणे, ह्या मोहिमेत, याशी, यावेळी, या रणात, या लढाईत, इकडे' अशा दर्शक सर्वनामांनी, शब्दांनी अनेक उताऱ्यांची सुरुवात होताना दिसते.

चरित्रातील अद्‌भुत प्रसंगांचे वर्णन व पावित्र्याचे वर्णन अशाच शब्दांनी केले आहे. वारंवार यांच्या जीवनातील कठीण प्रसंगी त्यांच्या अंगी भवानीचा संचार होत असतो. 'त्यांनी स्नान करून श्री भवानीची सोत्कंठ होऊन प्रार्थना केली. तेव्हा भवानी त्यांच्या अंगात संचारून पुढीलप्रमाणे बोलली' अशा स्थितीत त्यांच्या अंगात देवी संचारून येणेप्रमाणे बोलली' अशा वाक्यांनी अद्‌भुत प्रसंगाचे वर्णन त्यांनी बखरीतील भाषेचा प्रत्यय या चरित्रात दिला आहे.

चरित्राची भाषा १९ व्या शतकातील मराठी गद्याच्या वळणाची झाली आहे. हे चरित्र तत्कालीन तरुणांसाठी व सामान्य लोकांसाठी लिहावयाचे असल्याने अत्यंत ओघवत्या व सोप्या भाषेत चरित्राची प्रतिती येते. एखाद्या रोमांचकारी कादंबरीमय भाषेसारखी लालित्यपूर्ण व त्याचवेळी आवेशपूर्ण भाषाही प्रत्ययास येते. शिवाजी महाराजांचे जीवनकथन असल्याने या चरित्राची भाषा कल्पित वास्तवाचा भास निर्माण करते. त्यामुळे वाचकांना अखंडपणे गुंतवून ठेवण्याचे सामर्थ्य असणाऱ्या या चरित्राची भाषा नितांत रमणीय होते. ती उत्स्फूर्त, स्पृहणीय होते. त्याचवेळी छत्रपतींच्या जीवनातील संकट व दु:खद समयी ती करुणामयी होताना दिसते.

वाङमयमहर्षी गुरुवर्य कृष्णराव अर्जुन केळूसकरांचे वाङ्‌मयातील व सामाजिक कार्यातील असामान्य कर्तृत्व जाणून घेऊन महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे अध्यक्ष मा. बाबा भांड व मंडळातील त्यांचे सहकारी, मंडळाच्या सचिव मिनाक्षी पाटील यांनी ह्या महत्त्वकांक्षी प्रकल्पाची जबाबदारी महाराष्ट्र शासनाच्या वतीने माझ्यावर सोपवून माझ्यावर जो विश्वास दाखवला त्या बद्दल त्यांच्या ऋणातच असणे मी पसंत करतो. महाराष्ट्र शासनाच्या उदार व वाङ्‌मयप्रेमी दृष्टिकोणाचा मी कृतज्ञपूर्वक उल्लेख करतो.

हा प्रकल्प पूर्ण करताना अनेकांचे सहकार्य लाभले. सतीश बडवे, प्रकाश पवार, अवनीश पाटील, प्रवीण बांदेकर, नीतीन रिंढे, रणधीर शिंदे, नंदकुमार मोरे, अरुण शिंदे, नीला जोशी यांनी गरुवर्य केळूसकरांच्या ग्रंथांना अभ्यासपूर्ण प्रस्तावना लिहून दिल्या. त्यासाठी त्यांनी बरेच परिश्रम घेतले. तसेच रफिक सूरज, शोभा नाईक, सुजय पाटील, अनिल गवळी, रमेश साळुंखे, गोमटेश्वर पाटील यांचे मोलाचे सहकार्य लाभले. त्यांचे आभार मानणे त्यांना आवडणार नाही. कारण हे सर्व अभ्यासक व्रतस्थ वाङ्‌मयसेवक आहेत. या ग्रंथाचे संकलन करण्यात साकेत बाबा भांड यांनी केलेली मदत मोलाची आहे. याबरोबर हे प्रकल्प काम पूर्ण करण्यास आप्पासाहेब बुडके, तेजस चव्हाण, राजेश पाटील, नवनाथ गोरे, संदीप मुंगारे, प्रदीप पाटील, निहाल शिपुरकर यांची मदत झाली.

त्यांचे मनःपूर्वक आभार. त्या बरोबरच मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयचे ग्रंथपाल, सा.वा.ना. नाशिक, श्रीराम वाचन मंदिर सावंतवाडी, करवीर नगर वाचन मंदिर कोल्हापूर, बॅ. खर्डेकर ग्रंथालय, कोल्हापूर या बरोबरच महाराष्ट्रातील अनेक ग्रंथालयाच्या ग्रंथपालांनी विशेष मदत केली. त्यांचे मनःपूर्वक आभार. या शिवाय या प्रकल्पास मदत करणाऱ्या सर्व ज्ञात अज्ञातांचे अंतःकरणपूर्वक आभार मानतो. ह्या प्रकल्पाचे वाचक मनापासून स्वागत करतील अशी खात्री आहे. या प्रकल्पात काही त्रुटी असेल तर ती माझी असेल मात्र चांगल्याचे सर्व श्रेय बाबा भांड आणि त्यांचे सहकारी यांचे आहे. धन्यवाद!

– राजन गवस

प्रस्तावना

मराठ्यांच्या इतिहास लेखनाच्या दृष्टीने, शिवाजी महाराजांचे जीवन व कार्य हे नेहमीच एक मध्यवर्ती सूत्र राहिलेले दिसते. मराठ्यांचा पहिला इतिहास ग्रँट डफ याने इ.स. १८२६ मध्ये इंग्रजी भाषेतून लिहिला असला तरी शिवाजी महाराजांकडे जनमानसाचे लक्ष वेधण्याची कामगिरी महात्मा जोतिराव फुले यांनी केलेली दिसते. इ. स. १८६९ मध्ये त्यांनी शिवाजी महाराजांच्यावर सुमारे एक हजार ओळी असलेला प्रदीर्घ असा एक पोवाडा लिहिला होता. त्याच वर्षी म. मो. कुंटे यांचे 'राजा शिवाजी' हे महाकाव्य प्रसिद्ध झाले. इ.स. १८८९ मध्ये राजाराम शास्त्री भागवत यांनी शिवाजी महाराजांचे छोटेखानी चरित्र लिहिले होते. न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे यांनी इ.स. १८९२ ते १९०० या काळात आपला प्रसिद्ध 'मराठा सत्तेचा उत्कर्ष' हा ग्रंथ लिहिला. शिवाजी महाराजांच्या बद्दल या काळात अनेकांनी लेखन केले असले तरी, शिवाजी महाराजांचे समग्र चरित्र १९व्या शतकाच्या अंतापर्यंत प्रसिद्ध झालेले नव्हते.[१]

मराठ्यांच्या इतिहास लेखनातील ही उणीव गुरूवर्य कृष्णराव केळूसकर यांनी इ.स. १९०६ मध्ये भरून काढली. 'क्षत्रियकुलावतंस छत्रपती शिवाजी महाराज यांचे चरित्र' ह्या केळूसकरांच्या शिवचरित्राची दुसरी आवृत्ती इ.स. १९२० मध्ये व संक्षिप्त आवृत्ती इ. स. १९२७ मध्ये प्रकाशित झाली. २० व्या शतकाच्या प्रारंभीच्या काळात इतर काही अभ्यासकांनी शिवचरित्र लिहिण्याचे उपक्रम पूर्ण केले. ह्या मध्ये सर जदुनाथ सरकार, ह्युग रॉलिन्सन, चि.वि. वैद्य (१९३१) आणि डॉ. बाळकृष्ण (१९३२) हे मुख्य होते.[२]

२० व्या शतकाच्या प्रारंभीच्या काळातील शिवचरित्र लेखक एका बाबतीत वेगळे होते. त्यांच्या मध्ये 'वैज्ञानिक दृष्टिकोनातून' इतिहास लिहिण्याची इच्छा निर्माण झालेली होती. ह्या नवीन पद्धतीमध्ये जास्तीत जास्त 'मूळ कागदपत्रे' (original documents) वापरून भूतकाळाचा वेध घेणे अपेक्षित होते.[३] जर्मन इतिहासकार लिओपोल्ड रँके व इतर आधुनिक विज्ञानवादी विचारवंतांनी आपल्या इतिहासलेखन पद्धतीमध्ये शासकीय कागदपत्रे व अभिलेखागारातील लिखित साधनांना खूप महत्त्व दिले होते. त्यांची 'विश्वसनीय साधनांची' (reliable sources) एक विशिष्ट संकल्पना होती, ज्यामुळे त्यांच्या वैज्ञानिक इतिहास लेखनाच्या दृष्टिकोनात अभिलेखागारातील लिखित साधनांना अनन्य साधारण महत्त्व प्राप्त झाले होते. लिखित साधनांशिवाय इतिहास लिहिता येत नाही. (no documents, no history) हा रँकेवादी इतिहासकारांच्या विश्वासाचा अविभाज्य भाग बनला.

इ. स. १९३० च्या दशकापर्यंत शिवाजी महाराजांच्या जीवन व कार्यावर मोठ्या प्रमाणात लेखन झाले होते. इतिहासकार डॉ. बाळकृष्ण यांनी मांडल्या प्रमाणे शिवाजी महाराज हयात असतांना त्यांना काही प्रमाणात देवत्त्व प्राप्त झाले होते. त्यांच्या कार्यकर्तृत्वामुळे भारतीय लोकांमध्ये स्वदेशाभिमान व राष्ट्रीयत्व जागृत झाले व ते भारतीय स्वराज्याचे दिशादर्शक 'ध्रुव तारा' बनले. साहजिकच ह्या महामानवाभोवती अनेक मिथके व दंतकथा निर्माण झाल्या. याबद्दल डॉ. बाळकृष्ण लिहितात : In truth, there is scarcely an event in his brilliant career, the veracity of whose details recorded in the Marathi chronicles cannot be challenged.

थोडक्यात, मराठी बखरींमध्ये शिवाजी महाराजांच्या संबंधित एकही घटना नाही ज्या घटनेच्या सत्यतेला आव्हान दिले जाऊ शकत नाही. डॉ. बाळकृष्ण यांनी आपल्या 'शिवाजी द ग्रेट' या ग्रंथाला लिहिलेल्या प्रस्तावनेत शिवाजी महाराजांच्या जीवनातील चार चित्तथरारक घटनांचे उदाहरण देऊन हे दाखवले आहे की, कशा प्रकारे वेगवेगळी वादग्रस्त माहिती वेगवेगळ्या ऐतिहासिक साधनांतून उपलब्ध होते. बाळकृष्ण यांनी अफजल खानाची हत्या, शाहिस्तेखानावरील हल्ला, औरंगजेब- शिवाजी महाराज भेट व आग्र्याहून सुटका ह्या चार घटनांमध्ये वेगवेगळ्या ऐतिहासिक साधनांनी दिलेल्या परस्परविरोधी माहितीचे तुलनात्मक विश्लेषण केले आहे. डॉ. बाळकृष्ण यांनी ह्याच ग्रंथाच्या एका परिशिष्टांमध्ये इतिहास लेखनाचे साधन म्हणून 'बखरींचे वैगुण्य' दाखवून दिले आहे.[४]

१७ व्या शतकात मराठ्यांच्या सत्तेचा पाया बळकट झाल्यानंतर मराठ्यांच्या इतिहासावर अनेक बखरी लिहिल्या गेल्या. या काळात सर्व राजकीय घडामोडी मध्ये शिवाजी महाराज हेच केंद्रबिंदू होते. साहजिकच मराठ्यांचे वर्चस्व असलेल्या स्वराज्यात जास्तीत जास्त बखरी या शिवाजी महाराजांवर लिहिल्या गेल्या. २०व्या शतकाच्या दुसऱ्या दशकात नुसत्या मराठी बखरींमधील माहितीवर आधारलेल्या शिवचरित्रांवर टीका केली जाऊ लागली. वि. का. राजवाडे यांनी मराठी बखरींना इतिहासलेखनाचे एक महत्त्वाचे साधन म्हणून वापरण्याला जोरदार विरोध केला. बखरी आणि मूळ ऐतिहासिक कागदपत्रातील फरक विषद करतांना राजवाडे नमूद करतात की, 'एक अस्सल चिटोरे सर्व बखरींच्या बहुमताला हाणून पाडण्यास पुरेसे आहे'. इतिहासलेखनाचे साधन म्हणून बखरीच्या टीकात्मक चिकित्सेमुळे पुढील काळात शिवाजी महाराजांचा इतिहास लिहिण्यासाठी अस्सल दस्तावेज शोधण्याच्या मोहिमेला गती मिळाली. वि. का. राजवाडे, द. ब. पारसनीस आणि वा. वा. खरे यांनी मराठा इतिहासलेखनाला उपयोगी असणारी अस्सल मराठी साधने शोधणे आणि ती प्रकाशित करणे हे आपले जीवनकार्य मानले. रँकेच्या विचारांचा प्रभाव असणारे राजवाडे आणि पारसनीस यांनी पायपीट करून व खटाटोप करून अस्सल लिखित कागदपत्रे प्राप्त केली. पुढे राजवाड्यांनी मराठा इतिहासाच्या अभ्यासासाठी उपयुक्त असे संकलित मूळ साधनांचे २२ खंड अभ्यासकांना उपलब्ध करून दिले.

ह्याच दरम्यान भारतीय इतिहासातील 'मोगल काळाचे' इतिहासकार म्हणून प्रसिद्ध असलेले सर जदुनाथ सरकार यांनी देखील शिवाजी महाराजांचे चरित्र लिहिण्यास सुरुवात केली. मराठा इतिहासाचा अभ्यास करताना सर जदुनाथ सरकार यांनी मराठा इतिहासाची उपलब्ध असलेली जवळजवळ सर्व साधने वैज्ञानिक इतिहासलेखनाच्या दृष्टिकोनातून तपासली. उपलब्ध असलेल्या प्रत्येक साधनाचा शिवाजी महाराजांचे चरित्र लिहिण्यासाठी कितपत उपयोग होतो, याची चिकित्सा केली. त्यांच्या मते इतिहासकारांनी शिवाजी महाराजांचे चरित्र लिहिण्यासाठी मराठी साधनांचा उपयोग जपूनच करायला हवा व आपला पूर्ण विश्वास फारसी व इंग्रजी साधनांवर ठेवायला हवा. सर जदुनाथ सरकारांनी परकीय साधनांना दिलेल्या झुकत्या मापामुळे त्यांच्यावर महाराष्ट्रातील इतिहासकारांनी जोरदार टीका केली होती .

खरे तर, शिवाजी महाराजांचा इतिहास लिहिण्यासाठी उपलब्ध असलेल्या मराठी व परकीय साधनांचा उपयोग करण्याच्या संदर्भात अनेक प्रश्न आहेत. इ.स. १६८२ ते १७०७ या कालखंडात मुघलांच्या विरुद्ध सुरू असलेल्या मराठ्यांच्या स्वातंत्र्य लढ्यात मराठा राज्याची बहुतेक मूळ कागदपत्रे व इतर साधने नष्ट झालेली होती. शिवाजी महाराजांबद्दल माहिती देणाऱ्या बखरींमध्ये अनेक दंतकथा व आख्यायिकांनी प्रवेश केला होता. दुसरे असे की, फारसी, इंग्रजी, डच, पोर्तुगीज व फ्रेंच भाषेतील साधने जरी काही प्रमाणात कालक्रम ठरवण्यासाठी उपयोगी असली तरी त्यांच्या मधील माहिती ही विखुरलेल्या स्वरुपात होती. त्यामुळे इतिहासकाराला युरोपियन लोकांनी लिहिलेल्या विविध कागदपत्रांमधून माहिती वेचून ती एकत्रित करून आपली मांडणी करावी लागत असे. आणि असे केले तरी ह्या मांडणीमध्ये अनेक कच्चे दुवे राहण्याची शक्यता असे. हे कच्चे दुवे पूर्ण करण्यासाठी मराठी साधनांची मदत इतिहासकाराला घ्यावीच लागते.

आणखी एक असे की, फारसी व युरोपियन भाषेतील साधने ही शिवाजी महाराजांच्या अथवा एकूणच मराठा राज्याच्या शत्रूंनी निर्माण केली असल्यामुळे आपल्याला त्यामध्ये मराठ्यांबद्दल आक्षेपार्ह मजकूर लिहिलेला आढळतो. ह्या लोकांनी आपल्या लिखाणात मराठ्यांचे वर्णन उघडपणे चोर, गनिम, लुटारू अशा अपशब्दांनी केल्याचे दिसते. अशा प्रकारच्या पूर्वग्रहदूषित साधनांचा इतिहास लेखनात वापर केला तर मग एक विकृत इतिहास पुढे येण्याची शक्यता निर्माण होते. मराठ्यांचे ख्यातनाम इतिहासकार डॉ. अ. रा. कुलकर्णी यांनी आपल्या *शिवकालीन महाराष्ट्र* ह्या ग्रंथात मुघलांचे प्रसिद्ध इतिहासकार डॉ. इरफान हबीब यांनी आपल्या *अग्रेरीयन सिस्टिम ऑफ मुघल इंडिया* (१९६३) या ग्रंथात केलेल्या अशाच एका चुकीमुळे इतिहासाचे झालेले विकृतीकरण दाखवून दिले आहे.[५]

मराठ्यांचा इतिहास लिहिणाऱ्या काही आधुनिक इतिहासकारांनी तर परकीय भाषेतील पूर्वग्रहदूषित साधने वापरून मराठ्यांच्या बाबत एक 'लुटमारीचा सिद्धांतच' मांडला! त्यांच्या मते १८व्या शतकामध्ये मुघल साम्राज्याची वाताहत होण्यामध्ये मराठ्यांच्या लुटारू कारवाया जबाबदार होत्या. प्रसिद्ध बंगाली इतिहासकार डॉ. अनिरुद्ध रे यांनी आपल्या संशोधनाने दाखवून दिले आहे की, गुजरात मधील खंबायत (Cambay) प्रदेशामध्ये इ.स. १७२५ ते १८२५ या काळातील मराठ्यांची लुटारू प्रतिमा ही अत्यंत चुकीची आहे. मराठ्यांचे विरोधक असलेल्या इंग्रजांनी आपल्या समकालीन लिखाणात मराठ्यांच्याबाबत हा विपर्यास निर्माण केला होता.[६] शिवचरित्र लिहिणाऱ्या अलीकडच्या अभ्यासकासमोर ही एक महत्त्वाची समस्या आहे. मराठी व संस्कृत भाषेतील साधने ही शिवाजी महाराज आणि त्यांच्या पूर्वजांच्या कार्याचे वर्णन करतांना अतिशयोक्ती करतात तर बखरीमध्ये मोठ्या प्रमाणात दंतकथा व आख्यायिका आहेत, ज्यामुळे त्यांची ऐतिहासिक विश्वासार्हता कमी होते. याउलट, फारशी आणि युरोपियन भाषेतील बहुतेक मराठा इतिहासाची साधने पूर्वग्रहदूषित दृष्टिकोनातून लिहिली गेली आहेत. पण घटनांची कालक्रमणा ठरवण्यासाठी ती महत्त्वाची ठरतात. मराठ्यांचा इतिहास लिहिण्यासाठी आवश्यक असलेल्या साधनांची स्थिती संभ्रम तयार करणारी असल्यामुळेच शिवचरित्र लेखक व वाचक यांच्यावर अतीव जबाबदारीचा भार पडतो.

शिवचरित्र वाचकांची जबाबदारी

उपरोक्त चर्चेवरून एक गोष्ट स्पष्ट होते की, देशी भाषिक आणि परकीय भाषिक साधने शिवचरित्र लिहिण्यासाठी उपयोगी आहेत. दोन्ही प्रकारच्या साधनांमध्ये उपलब्ध झालेली माहिती इतर समकालीन विश्वसनीय साधनांशी ताडून पाहिल्याखेरीज ती प्रमाणभूत मानणे मूर्खपणाचे ठरेल. दुसरे असे की, साधन जरी समकालीन असले तरी साधन निर्माण करणाऱ्यांनी दिलेली माहिती ही स्वतःच्या निरीक्षणावर अथवा स्वानुभवावर आधारलेली आहे, याची खात्री करून घेणे आवश्यक ठरते. जर माहिती ऐकीव असेल तर ती इतर विश्वासू साधनांमधील माहितीशी ताडून पाहणे क्रमप्राप्त ठरते. ही झाली शिवचरित्रासाठी वापरण्यात आलेल्या साधनांच्या संदर्भातील गोष्ट.

आधुनिक इतिहासलेखन पद्धतीमध्ये साधनांची चिकित्सा करण्याबरोबर इतिहासकाराला लेखन करताना 'वस्तुनिष्ठता' जोपासणे अपेक्षित असते. आधुनिक इतिहासकारांमध्ये प्रचलित असलेल्या वस्तुनिष्ठतेच्या संकल्पनेमध्ये एक महत्त्वाचा समज अंतर्भूत झाला आहे की, 'सत्य हे एक असते, ते परिप्रेक्ष्यीय नसते.' थोडक्यात, ऐतिहासिक सत्य हे एकच असते, ते इतिहास लिहिणाऱ्या अभ्यासकाचे परीप्रेक्ष्य बदलले तरी ते बदलत नसते.' इतिहासातील घटनांचे आकृतिबंध इतिहासकार शोधत असतो; तो ते आकृतिबंध तयार करत नसतो. इतिहासकाराची प्राथमिक निष्ठा व उद्देश वस्तुनिष्ठ ऐतिहासिक सत्य शोधून काढण्याकडे असतात.[७]

थोडे खोलात जाऊन पहिले तर, 'वस्तुनिष्ठ ऐतिहासिक सत्य' हे साधनांना प्रभुत्व दिले तरच शोधले जाऊ शकते, असे इतिहासकारांना वाटू लागले. म्हणूनच दुय्यम ऐतिहासिक साधनांवर (समकालीन नसलेल्या) जास्त अवलंबून न राहता, मूळ प्राथमिक (समकालीन) साधने वापरणे जास्त उचित व संयुक्तिक समजले जाऊ लागले. याचा परिणाम म्हणून मूळ साधनांचा वापर करा अशा प्रकारची अट इतिहासकारांची योग्यता ठरवण्यासाठी वापरली जाऊ लागली.

इतिहासाच्या वाचकांनी, वरील सर्व चर्चेवरून जर कोणता धडा घ्यायचा असेल तर तो हा की, कोणत्याही इतिहासकाराने लिहिलेले शिवचरित्र समजून घ्यायचे असेल तर त्याचे वाचन डोळसपणे करणे गरजेचे आहे. कोणताही इतिहासकार सांगतोय म्हणून त्याच्या कोणत्याही म्हणण्यावर विश्वास ठेवणे हे आजच्या जगतात भाबडेपणाचे लक्षण होईल. इतिहासलेखन पद्धतीचे पालन केले आहे असा दावा सर्वच इतिहासकार करतात. मात्र त्यांनी किती प्रमाणात पालन केले आहे?, किती प्रमाणात दंतकथा किंवा आख्यायिका दूर सारून सत्य घटनांची कास धरली आहे?, अथवा प्रामाणिकपणे साधनांचे टीकात्मक परीक्षण करून सुसंगत अन्वयार्थ लावला आहे का?, हे ठरवण्याची जबाबदारी वाचकाची असते. इतिहासकार अनेक वेळा पूर्वग्रहदूषित साधनांना विश्वासार्ह मानतात आणि यामुळे इतिहास लेखनात विपर्यास येतो. हे विशेषतः नाट्यमय किंवा चमत्कारिक घटनांच्या बाबतीत लक्षात ठेवणे गरजेचे ठरते. इतिहासकाराने एखाद्या बखरीचा आधार घेऊन जर एखादी नाट्यमय घटना रंगवली असेल, तर इतिहासाचे विकृतीकरण होण्याची दाट शक्यता आहे, हे वाचकांनी लक्षात ठेवले पाहिजे. विशेषतः शिवचरित्राच्या संदर्भात ही गोष्ट जास्त महत्त्वाची आहे.

आजकाल सर्व इतिहास अभ्यासकांना हे माहीत आहे की कोणत्याही इतिहासकाराकडून शंभर टक्के वस्तुनिष्ठतेची अपेक्षा करणे उचित नाही. इतिहासकार नेहमीच आपले पूर्वग्रह घेऊनच अभ्यास करत असतो आणि म्हणून इतिहास वाचकांनी विख्यात इतिहासकार ई.एच. कार यांनी दिलेला सल्ला उराशी बाळगणे गरजेचे आहे. इ. एच. कार यांनी आपल्या नावाजलेल्या इतिहास म्हणजे काय?(What is History?) ह्या ग्रंथात म्हटले आहे की, जर इतिहास वाचकांना इतिहास समजावून घ्यायचा असेल तर त्यांनी इतिहासकाराची ओळख करून घेतली पाहिजे; त्याच्या डोक्यात काय चालले होते, त्याची पुन्हा कल्पना (re-enact) केली पाहिजे. इतिहासकाराने मांडलेली घटीते (facts) वाचण्याआधी त्याचा अभ्यास केला पाहिजे व त्याच्या बद्दल माहिती मिळवली पाहिजे. त्याच्या डोक्यात कोणत्या मधमाशा आहेत, हे समजून घेतले पाहिजे आणि मग त्याने लिहिलेला इतिहास वाचताना त्या मधमाश्यांचा गुंजन ध्वनी ऐकला पाहिजे. कार म्हणतो की, जर वाचकाला ध्वनी ऐकू आला नाही तर तो बहिरा आहे किंवा ज्याने इतिहास लिहिला आहे तो एक सुमार इतिहासकार आहे. थोडक्यात, कार यांना असे म्हणायचे आहे की, प्रत्येक इतिहासकार माहितीच्या एका विशाल अगम्य समुद्रातून आपली माहिती व घटीते निवडत असतो. आपल्या लिखाणात तो कोणती माहिती वापरतो हे त्याच्या पूर्वग्रह किंवा दृष्टिकोनावर अवलंबून असते.[८] इतिहासकाराचा दृष्टिकोन व परिप्रेक्ष्य जाणल्याशिवाय त्याने विशिष्ट माहितीचा वापर विशिष्ट ठिकाणी का केला आहे, हे वाचकाला समजणे कठीण असते.

उपरोक्त इतिहासलेखन दृष्टिकोनाचे प्रवाह स्पष्ट करण्याचे एकूणच प्रयोजन यासाठीच होते की वाचकांना प्रस्तुत शिवचरित्राची समकालीन उपयुक्तता व मर्यादा लक्षात यावी.

इतिहासकाराची ओळख

कृष्णराव अर्जुन केळूसकर हे मूळचे कोकणातील वेंगुर्ले तालुक्यातील केळूस ह्या गावचे होते. त्यांचा जन्म दि. २० ऑगस्ट १८६० रोजी झाला. पुढे त्यांच्या वडिलांनी त्यांना मुंबईतील इंग्रजी शाळेत घातले. मुंबईचे प्रसिद्ध नागरिक नामदार नाना ऊर्फ जगन्नाथ शंकरशेट यांच्या शिफारशीमुळे ते मोफत शिक्षण घेऊ शकले. ते इ.स.१८८१ मध्ये मुंबईतील विल्सन हायस्कूल मधून मॅट्रिक झाले. इ.स. १८८६ मध्ये मुंबई मधील विल्सन हायस्कूल मध्ये शिक्षकाची नोकरी स्वीकारली. ही शाळा मिशनरी रेव्हरंड जॉन विल्सन यांनी स्कॉटिश मिशनरी सोसायटी ह्या ख्रिस्ती प्रोटेस्टंट पंथासाठी इ.स. १८३२ मध्ये सुरू केलेली होती. पुढे ह्याच जॉन विल्सनने मुंबई विद्यापीठाच्या विकासामध्ये महत्त्वपूर्ण भूमिका बजावली.[९] केळूसकर कशा प्रकारचे शिक्षक असावेत याची जाणीव डॉ. आंबेडकर यांच्या जीवनातील इ.स. १९०७ मधील एका प्रसंगावरून येते. केळूसकर हे ग्रंथ वाचण्यासाठी मुंबईतील एका बागेत जात असत. तेथे त्यांचा संपर्क शाळेत शिकत असलेल्या भीमराव आंबेडकरांशी आला. आंबेडकरांचा अभ्यासूपणा पाहून केळूसकरांनी

त्यांना आपल्या संग्रहातील अनेक ग्रंथ वाचायला दिले. याशिवाय त्यांचा नवीन ग्रंथ 'बुद्धचरित्र' भेट दिला. आंबेडकर नुकतेच मॅट्रिक पास झाले होते. त्यांचे अभिनंदन केळूसकर आणि थोर समाजसुधारक सी. के. बोले यांनी त्यांच्या घरी जाऊन केले. त्यांचा सत्कार करण्यासाठी एक सभा आयोजित करण्यात आली. ह्या सभेचे अध्यक्ष बोले होते व केळूसकर देखील उपस्थित होते. ह्या प्रसंगावरून दोघा सामाजिक नेत्यांची दृष्टी किती विशाल व कशी समतावादी होती हे कळते.[१०] आपल्यासाठी महत्त्वाचा योगायोग असा की, केळूसकर लिखित 'संक्षिप्त शिवचरित्राची ' प्रस्तावना सी.के. बोले यांनी लिहिलेली आहे!

कृष्णराव केळूसकर आपल्या आत्मचरित्रात स्वतःचा संदर्भ 'ब्राह्मणेतर लेखक' असा देतात . इ.स. १९०६ मध्ये शिवचरित्र प्रसिद्ध झाल्यावर त्यांच्या मांडणीमुळे 'ब्रह्मवृंदास' झालेल्या त्रासाचा उल्लेख त्यांनी आपल्या आत्मचरित्रात केला आहे.[११] कृष्णराव केळूसकरांनी प्रकाशित केलेले शिवचरित्र छत्रपती शिवाजी महाराजांचे वंशज कोल्हापूर संस्थानाचे अधिपती छत्रपती शाहू महाराज यांच्या राजाश्रयाने प्रसिद्ध केलेले होते. ह्या शिवचरित्राचे पूर्ण शीर्षक 'क्षत्रियकुलावतंस छत्रपती शिवाजी महाराज यांचे चरित्र' असे होते. इ.स. १९०२ साली कोल्हापूर संस्थानात 'वेदोक्त प्रकरण' घडले होते. काही ब्राह्मण मंडळीनी छत्रपतींच्या 'क्षत्रियत्वावर' शंका घेतली होती. अशा तणावपूर्ण वातावरणात केळूसकरांनी छत्रपती शाहू महाराजांच्या वंशातील छत्रपती शिवाजी महाराज व त्यांचे पूर्वज यांच्या 'क्षत्रिय कुळाचा' इतिहास उलगडून दाखवणारे चरित्र लिहिले होते. केळूसकर स्वतः ब्राह्मणेत्तर जातीचे असल्यामुळे त्यांना देखील उच्चभ्रू ब्राह्मण लोकांचा तिरस्कार सहन करावा लागला होता. हे त्यांचे आत्मचरित्र वाचले की स्पष्ट होते.

इ.स. १९१९ मध्ये प्रसिद्ध झालेले शिवचरित्राचे इंग्रजी भाषांतर आणि इ. स. १९२० मध्ये प्रसिद्ध झालेली दुसरी आवृत्ती ही देखील छत्रपती शाहू महाराज यांच्याच आश्रयाने प्रसिद्ध केली गेली होती. इ. स. १९२२ साली छत्रपती शाहूंचा मृत्यू झाला, यामुळे इ. स. १९२७ मध्ये प्रसिद्ध केलेले 'संक्षिप्त शिवचरित्र', केळूसकरांनी छत्रपती शाहूंचे वारसदार छत्रपती राजाराम यांच्या आश्रयाखाली प्रसिद्ध केले. केळूसकरांचा छत्रपती शाहूंच्या सारखा एक प्रागतिक राजकीय दृष्टिकोन होता. त्यांचा ब्राह्मणेतर चळवळीच्या विचारांना व अस्पृश्य आणि मागासलेल्या वर्गातील लोकांच्या उध्दाराला पाठिंबा होता.

केळूसकरांच्या शिवचरित्राचा पूर्वेतिहास

कृष्णराव केळूसकरांनी शिवाजी महाराजांचे चरित्र इ. स. १९०३ मध्येच लिहायला हाती घेतले होते. मराठा प्रॉव्हीडंट फंडाचे श्री. गोविंदराव दळवी यांची इच्छा होती की फंडाच्या मार्फत शिवाजी महाराजांचे चरित्र प्रसिद्ध व्हावे. मात्र त्यांचा अकाली मृत्यू झाल्याने त्यांची ही इच्छा अपूर्ण राहिली होती. गोविंदरावांचे बंधू श्री. दाजीबा दळवी हे केळूसकरांचे परममित्र होते. ते व त्यांचे दुसरे बंधू रामचंद्रराव दळवी यांनी गोविंदरावांची इच्छा पूर्ण करण्याच्या उद्देशाने शिवचरित्र पूर्ण करण्याची जबाबदारी केळूसकरांवर सोपविली. शिवचरित्र लिहिण्याचे काम साध्य करण्यासाठी घ्यावे लागलेल्या कष्टांचे वर्णन केळूसकरांनी आपल्या आत्मचरित्रात असे केले आहे: 'हे काम होईल तेवढे निर्दोष पुरे करावयाचे असा निर्धार करून मी त्यास लागणाऱ्या साहित्याची जुळवाजुळव साधेल तेवढी पुरी केली. शिवाजी महाराजांच्या संबंधी जेवढा म्हणून छापील मजकूर होता तेवढा सगळा वाचून त्याची टिपणे मी घेतली. शिवाय एक-दोन हस्तलिखित ग्रंथही मी पाहिले.' केळूसकरांनी लिहिलेले शिवचरित्र इ. स. १९०७ मध्ये प्रकाशित करण्यात आले.

कृष्णराव केळूसकरांनी पुढे ज्यांना मराठी येत नाही अशा लोकांपर्यंत शिवरायांचा यथार्थ व साधारण इतिहास पोहोचावा म्हणून त्यांच्या मराठी शिवचरित्राचे इंग्रजी भाषांतर करण्याचा उपक्रम हाती घेतला. मुंबईमधील विल्सन कॉलेजमधील इंग्रजी भाषेचे प्राध्यापक निलकंठराव ताकाखाव यांनी हे भाषांतर केले. प्रा. ताकाखाव हे चिकित्सक बुद्धीचे होते. त्यांनी केळूसकरांच्या ग्रंथाचे नुसतेच भाषांतर केले नाही, तर ग्रंथात केलेली विधाने ऐतिहासिक

सत्याच्या कसोटीवर खरी उतरतात का, हे देखील तपासून पाहिले. याशिवाय ग्रँट डफ, सर जदुनाथ सरकार, सी. ए. किंकेड यांनी इंग्रजीत लिहिलेल्या शिवचरित्रातून निर्माण झालेले पूर्वग्रह व गैरसमजुती दूर करण्याचा प्रयत्न केला. प्रा. ताकाखाव यांनी शिवाजी महाराजांच्या बाबतीत झालेले नवीन संशोधन वाचून ग्रंथाच्या इंग्रजी आवृत्तीमध्ये जागोजागी भर घातलेली आढळते. शिवचरित्राचे इंग्रजी भाषांतर तयार करण्याने केळूसकरांना मराठी आवृत्तीमध्ये भर घालण्याची संधी प्राप्त करून दिली. इ.स. १९२० मध्ये केळूसकरांनी शिवचरित्राची दुसरी आवृत्ती प्रसिद्ध केली. ह्या दुसऱ्या आवृत्तीत त्यांनी पुष्कळ मजकुराची भर घातली होती. शिवचरित्राचे इंग्रजी भाषांतर तयार झाले असले तरी ते प्रसिद्ध करण्यासाठी पैसा उभा करणे अवघड होते.

शिवाजी महाराजांचे इंग्रजी चरित्र कसे छापले गेले याची गोष्ट केळूसकरांनी आपल्या आत्मचरित्रात लिहून ठेवली आहे. बडोदा संस्थानाचे सरदार खासेराव जाधव यांची केळूसकरांशी जुनी ओळख होती. ते एकदा मुंबईत आले असतांना केळूसकरांनी त्यांना भेट दिली. काही गप्पागोष्टी झाल्यावर खासेराव जाधवांनी केळूसकरांना विचारले, तुम्ही बंगालच्या जदुनाथ सरकारांना शिवाजी संबंधीची काही माहिती का देत नाही? ते इंग्रजी शिवचरित्र लिहित आहेत. यावर केळूसकर त्यांना म्हणाले आमच्या राष्ट्रवीराचे चरित्र ते कायसे लिहिणार? आम्हीच ते लिहिले पाहिजे. यावर जाधव म्हणाले आमच्याकडे त्यांच्याइतका चांगले लिहिणारा कोण आहे? केळूसकर म्हणाले, मी मराठीत लिहिलेले चरित्र आपल्याला पसंत आहे काय? त्याचे इंग्रजी भाषांतर मी एका पंडिताकडून करविले असून ते एका मोठ्या इंग्रज विद्वान गृहस्थांकडून तपासले आहे. ते छापावयास द्रव्य नाही म्हणून ते पडून राहिले आहे. खासेराव जाधवांनी भाषांतर केलेला ग्रंथ पाहण्यासाठी मागितला. केळूसकरांनी त्यांना इंग्रजी ग्रंथाचा शेवटचा भाग पाहायला दिला. जाधवांना शेवटचा भाग खूप आवडला व त्यांनी केळूसकरांना हे वचन दिले की ग्रंथ छापण्यासाठी लागणारे पैसे ते मिळवून देतील. लवकरच जाधवांनी आपले वचन पूर्ण केले आणि प्रा. ताकाखाव व केळूसकर लिखित छत्रपती शिवाजी महाराजांचे इंग्रजी चरित्र इ.स. १९२१ मध्ये छापले गेले.

वाचकांना सूचना

ज्या काळात केळूसकर लिहित होते त्या काळात शिवचरित्र लेखकांवर असलेल्या ऐतिहासिक साधने व दृष्टिकोनाच्या बाबतीतील मर्यादांची वर चर्चा झालीच आहे. केळूसकरांवर देखील ह्या मर्यादा होत्या हे वाचकांनी लक्षात ठेवले पाहिजे. त्याकाळात शिवचरित्राचे सुसंगत कथन व्हावे म्हणून इतिहासकारांना मराठी बखरींवर व उत्तरकालीन साधनांवर अवलंबून राहावे लागत असे. अस्सल मूळ कागदपत्रे फारच अल्प प्रमाणात उपलब्ध असल्यामुळे शिवचरित्र कथानकामध्ये अनेक फटी राहत असत. साहजिकच चरित्रकार ह्या फटी बखरीतील मजकूर वापरून भरून काढत असत. २०व्या शतकाच्या प्रारंभी लिहिणारे बहुतेक शिवचरित्रकार ह्या अडचणीत अडकलेले आपल्याला दिसतात. केळूसकर देखील याला अपवाद नव्हते.

वर सांगितल्याप्रमाणे मराठी बखरींमध्ये अतिशयोक्ती, चमत्कारिक घटना, मिथके व आख्यायिका यांचा सुळसुळाट होता. बहुतेक बखरी उत्तरकालीन ऐतिहासिक साधने असल्यामुळे त्यामध्ये दिलेली माहिती ताक फुंकून प्यावे तशी वापरली तरच इतिहासकाराचा हेतू साध्य होऊ शकतो. केळूसकरांनी जरी बखरीतील माहिती जपून वापरली असली तरी त्यांनी लिहिलेले शिवचरित्र हे ऐतिहासिक साधन म्हणून बखरींचा जो दोष होता त्यापासून मुक्त राहू शकले नाही. काही बखरी ह्या विशिष्ट भूमिकेतून लिहिलेल्या आहेत. उदाहरणार्थ बखरींमध्ये शिवाजी महाराजांना साक्षात अवतार मानण्यात आले होते. त्यांच्यावर भवानी देवीची कृपा दृष्टी होती, भवानी देवी शिवाजी महाराजांच्या अंगात संचारत असे व त्यांच्या मुखातून स्वतः बोलत असे; सभासद आणि चिटणीस बखरींमध्ये तर अशी अतिशयोक्ती केली आहे की, महाराजांच्या मुखातून देवीने बोललेले आदेश काही कारकून लिहून घेत असत. दुसरे असे की चिटणीस बखर

सारख्या साधनांमध्ये शिवाजी महाराजांनी स्वराज्य स्थापनेचा उपक्रम हा हिंदू धर्माच्या संरक्षणासाठी व महाराष्ट्रामधील मुस्लीम सत्ता नष्ट करण्याच्या हेतूने हाती घेतलेला होता.[१२] ह्या पूर्वग्रहदूषित ऐतिहासिक साधनांच्या वापरामुळे इतिहासकाराकडून समकालीन राजकारण धर्माच्या चष्म्यातून पाहण्याचा धोका निर्माण होतो.

कृष्णराव केळूसकर देखील बखरींमधील ह्या चकव्याला बळी पडले आहेत. प्रस्तुत शिवचरित्रात काही ठिकाणी महाराजांच्या अंगात भवानी देवी संचारण्याच्या घटनांचा उल्लेख आला आहे. याशिवाय केळूसकरांनी कल्याणच्या सुभेदाराच्या सूनेची दंतकथा रंजकतेने सांगितली आहे. शिवपुत्र संभाजी महाराजांबद्दल बखरींमध्ये प्रचलित असलेल्या आख्यायिकांवर विश्वास ठेवून अवमानकारक मजकूर लिहिला आहे. दुसरे असे की, बखरींमधील एक काल्पनिक घटना केळूसकरांनी सत्य म्हणून स्वीकारण्याची चूक केली आहे. त्यांनी महाराज विजापुरला गेले असतांना त्यांचा गोवध करणाऱ्या कसायावर कसा रोष निर्माण झाला, याबद्दलचा काल्पनिक वृत्तांत सत्य घटना म्हणून स्वीकारून शिवचरित्रात दिला आहे.[१३]

वाचकांनी आणखीन एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे की, केळूसकरांचे शिवचरित्र प्रसिद्ध होऊन एका शतकापेक्षा जास्त काळ लोटला आहे. त्याकाळात शिवचरित्र लिहिण्यासाठी खूप कमी ऐतिहासिक साधने उपलब्ध होती. उदाहरणार्थ कविंद्र परमानंद लिखित शिवभारत हा ग्रंथ केळूसकरांना मिळालेला नव्हता. याशिवाय त्यांना शिवकाळातील वेगवेगळ्या सरदार घराण्यांची कागदपत्रे किंवा पोर्तुगीज, फ्रेंच, आणि इंग्रजी लोकांनी लिहिलेल्या कागदपत्रांची भाषांतरे उपलब्ध नव्हती. या सर्व गोष्टींमुळे त्यांच्या शिवचरित्रामध्ये काही घटनांचा कालक्रम चुकला असण्याची शक्यता निर्माण होते.

उपरोक्त चर्चेमुळे स्पष्ट होते की, जर वाचकाला असे वाटत असेल की प्रस्तुत शिवचरित्र वाचून आपल्याला योग्य बोध व्हावा तर त्यांनी हा ग्रंथ काळजीपूर्वक व जबाबदारीने वाचणे औचित्याचे ठरेल.

कृष्णराव केळूसकरकृत शिवचरित्राचे वाचन करण्याचे प्रयोजन आणि प्रस्तुतता

शे-सव्वाशे वर्षापूर्वी लिहिलेले शिवचरित्र आज वाचून काय मिळणार? असा प्रश्न विचारता येईल. हे खरे आहे की, केळूसकर यांच्या नंतर अनेक इतिहासकारांनी शिवचरित्र लिहिले. शिवचरित्राचे संशोधन व लेखन ही इतिहासाच्या क्षेत्रातील प्रक्रिया गेली शे-सव्वाशे वर्ष चालू आहे. महाराष्ट्रात क्वचितच असा एखादा इतिहास अभ्यासक सापडेल, की ज्याने शिवाजीमहाराजांवर काही लिहिलेले नाही. शिवछत्रपतींच्या युगकार्याची नंतरच्या पिढीतील थोर इतिहासकारांनी विविध दृष्टिकोनातून अभ्यासपूर्ण चिकित्सा केली आहे. ह्या अभ्यासकांच्या नामावलीत त्र्यंबक शंकर शेजवलकर, वा.सी.बेंद्रे, पं.सेतूमाधवराव पगडी, डॉ. अप्पासाहेब पवार, प्रा. ग. ह. खरे, डॉ. अ. रा. कुलकर्णी, डॉ. जयसिंगराव पवार यांच्या सारखे दिग्गज इतिहासकार आहेत. ह्या सर्व इतिहास अभ्यासकांना केळूसकरांना उपलब्ध असलेल्या ऐतिहासिक साधनांपेक्षा कितीतरी पटीने जास्त साधने उपलब्ध झाली होती. शिवचरित्रावर विविध भाषांमध्ये असलेल्या साधनांची सारखी भर पडत असल्यामुळे त्यांनी केलेले शिवाजीमहाराजांचे चरित्रलेखन केळूसकरकृत शिवचरित्राच्या तुलनेत माहिती व कालक्रमणेच्या बाबतीत जास्त अद्ययावत म्हणावे लागेल.

कोणताही इतिहास नुसता जुन्या काळात लिहिला गेला व तो लिहिला गेला तेव्हा ऐतिहासिक साधनांची उपलब्धता कमी होती, म्हणून त्याचे मूल्य कमी होत नसते. कोणत्याही इतिहासाचे मोल हे इतिहासकाराने लावलेल्या अन्वयार्थावर व केलेल्या मूल्यमापनावर ठरत असते. कोणत्याही काळात कोणीही लिहिलेले शिवचरित्र कधीतरी जुने होणारच आहे! दुसरी गोष्ट अशी की, कितीही नवीन साधने, माहिती अथवा पुरावे उपलब्ध झाले तरीही इतिहासकारांना छत्रपती शिवाजी महाराजांचे 'निश्चित' (definitive) अथवा 'अंतिम' (final) चरित्र लिहिणे शक्य नाही. कारण शिवाजीमहाराजांची त्यांच्या अनेक उपक्रमामागे कोणती भूमिका व प्रेरणा होती, या बद्दल विद्वानात एकमत नाही.

याशिवाय महाराजांच्या आयुष्यात घडलेल्या अनेक घटना सर्वांना मान्य होतील अशा प्रकारे निश्चित करण्यात विद्वानांना अद्याप यश आले नाही. ज्या साधनांवरून अशा घटनांची चर्चा होते, त्या साधनांच्या खरेखोटेपणाबद्दल विद्वानांचे एकमत झालेले नाही. काही वर्षापूर्वी पं. सेतूमाधवराव पगडी यांनी आपल्या ''श्री शिवचरित्रातील कांही शंकास्थळे'' ह्या लेखाच्या शेवटी १३ शंकास्थळांची यादी दिली आहे: १) शिवजन्मतिथी २) शिव-चरित्रातील शहाजी राजांचे स्थान ३) स्वराज्याचा उपक्रम कधी सुरु झाला, तात्कालिक प्रेरणा कोणती ४) बाजाजीचे शुद्धीकरण ५) चंद्रराव मोरे यांचा पाडाव. त्यात दगा होता की ती सरळ स्वारी होती ६) अफझलवध प्रसंग ७) शाहिस्तेखानावरील छाप्याचा तपशील ७) बाजी घोरपडे संबंधीचे पत्र विश्वासनीय आहे काय? ११) शिवाजी- व्यंकोजी संबंध १२) शिवाजी-संभाजी संबंध १३) सोयराबाईचे महत्त्व किती.[१४] ह्या यादीमधील काही आणि इतर अनेक बाबींच्या बद्दल इतिहासकारांमध्ये आजदेखील मतभेद आहेत. शे-सव्वाशे वर्षापूर्वी अस्तित्वात असलेले शिवचरित्रातील अनेक शंकास्थळांच्या बद्दल अभ्यासकांमध्ये स्थूल मतैक्य होऊ शकलेले नाही. वरील सर्व बाबींच्या विचार केला तर असे म्हणावे लागेल, की अलीकडील काळात लिहिलेल्या शिवचरित्राचे मोल पूर्वीच्या काळात लिहिलेल्या शिवचरित्रापेक्षा जास्त असते, हे समीकरण बरोबर असते असे नाही.

दुसरीही एक गोष्ट लक्षात घायला हवी, की केळूसकर यांच्या शिवचरित्रात वर नमूद केलेल्या काही वादग्रस्त मुद्यांवर अत्यंत उद्‌बोधक लिखाण केले आहे. केळूसकर लिखित शिवचरित्र हे मराठी भाषेतून लिहिलेले पहिले सविस्तर शिवचरित्र होते. केळूसकरांना आजकालच्या अभ्यासकांच्या तुलनेत कमी ऐतिहासिक साधने उपलब्ध असली तरी त्यांच्या राष्ट्रवादी आणि बहुजनवादी भूमिकेमुळे त्यांना शिवचरित्राकडे पाहण्याची वेगळी मर्मदृष्टी लाभली होती. इतिहास हा घटीत पुराव्यांच्या पलीकडे जात असतो; कारण स्थळ, काळ व अवकाश यांच्या साह्याने कार्यकारण व तारतम्य लक्षात घेत मीमांसा करावी लागते. केळूसकरांनी हीच मर्मदृष्टी वापरून शिवाजीमहाराजांच्या जीवन कार्याचे मूल्यमापन केले; एक वेगळा अन्वयार्थ लावला. केळूसकरांनी शिवाजी महाराजांच्या चरित्रातील महत्त्वाचे प्रसंग, त्यांची राजनीती, रणनीती, लोककल्याणकारी प्रशासन इत्यादी बाबींचा परामर्श घेऊन काढलेले निष्कर्ष आज देखील समर्पक आहेत. त्यांच्यामध्ये व्यक्ती आणि समाज ह्या दोन्ही घटकांना जीवनाची दिशा दाखवण्याची क्षमता आहे, यात कोणतीही शंका नाही.

कृष्णराव केळूसकर हे महात्मा फुले यांच्या सहवासात आल्यामुळे त्यांच्यावर सत्यशोधक विचारांचा प्रभाव होता. केळूसकरांच्या मते जात्याभिमान, जातिभेद, अस्पृश्यता, जातिमत्सर, वर्णश्रेष्ठत्वाचा अहंभाव हीच आपल्या समाजाच्या, देशाच्या अवनतीची मूळ कारणे आहेत, ती दूर न करता जे देशाच्या राजकीय स्वातंत्र्याची चळवळ करतात त्यामुळे देशोद्धार होणार नाही. त्यांची अशी प्रामाणिक धारणा होती की, ''सर्वार्थाने मागासलेल्या व गुलामीत पडलेल्या आपल्या समाजाला शिवाजीमहाराजांचे चरित्र मार्गदर्शक व प्रेरणादायी ठरते.''[१५] त्यामुळे केळूसकरकृत शिवचरित्रातील माहिती जुनी असली तरी त्यामध्ये लेखकाने घेतलेल्या भूमिका व शिवाजीमहाराजांच्या जीवनांमधील प्रसंगांबद्दल केलेले युक्तिवाद शिवचरित्रातील वादग्रस्त मुदद्यांवर प्रकाशझोत टाकणारे आहेत. पं. सेतूमाधवराव पगडी यांनी मांडलेल्या शिवचरित्रातील काही शंकास्थळाच्या संदर्भात केळूसकरांनी केलेली मांडणी विचार प्रवर्तक आहे. पुढील पिढीच्या इतिहासकारांनी त्यांच्या मांडणीला योग्य महत्त्व दिले असते तर शिवचरित्रातील अनेक शंकास्थळासंबंधित वाद झाले नसते वा चिघळले नसते, असे वाटते.

केळूसकर लिखित शिवचरित्राचा मथितार्थ

कृष्णराव केळूसकरांनी आपल्या शिवचरित्रात अशा कित्येक गोष्टी पहिल्यांदा मांडल्या ज्यामुळे त्याकाळात प्रचलित असलेल्या इतिहासाच्या मांडणीला आव्हान निर्माण झाले. त्यातील काही बाबींची चर्चा खाली केली आहे.

शिवचरित्रात आजवर सर्वात जास्त चर्चा झालेला वादग्रस्त मुद्दा म्हणजे दादाजी कोंडदेव, रामदासस्वामी व शिवाजी महाराज यांच्यातील गुरु-शिष्य संबंध. कृष्णराव केळूसकर यांनी हे संबंध कपोलकल्पित असून एकाही विश्वसनीय ऐतिहासिक पुराव्यातून याला दुजोरा मिळत नाही हे नवीन साधनांच्या आधारे दाखवले. छत्रपती शिवाजी महाराजांना त्यांच्या स्वराज्य स्थापनेच्या उपक्रमात दादाजी कोंडदेव, रामदासस्वामी किंवा शहाजी महाराजांच्या इतर कोणत्याही सेवकाचा उपदेश किंवा मसलत मिळाली नाही. केळूसकरांच्या मते, शिवाजी महाराज दादोजी कोंडदेव यांचे ऐकत नसत. रामदास स्वामींचा आणि शिवाजी महाराजांचा फारसा संबंध महाराजांचा राज्याभिषेक होईपर्यंत आलेला नव्हता. थोडक्यात सांगायचे तर, शिवाजी महाराजांना स्वराज्य स्थापनेसाठी रामदासस्वामी यांच्या कडून स्फूर्ती मिळाली नव्हती. शिवाजी महाराजांनी जे स्वराज्य साध्य केले ते कोणाच्याही मार्गदर्शनामुळे केले नाही, तर त्यांच्या ठायी असलेल्या क्षमतेद्वारे व त्यांच्या गुणांमुळे केले.

कृष्णराव केळूसकरांनी न्यायमूर्ती रानडे यांच्या 'मराठा सत्तेचा उत्कर्ष' ह्या ग्रंथातील युक्तिवादाला नकार दिला आहे. न्यायमूर्ती रानडे यांनी आपल्या ग्रंथात हे मांडले होते की, शिवरायांचा महाराष्ट्रापुरताच स्वराज्य स्थापण्याचा उद्देश व प्रयत्न होता. केळूसकरांनी अनेक साधनांचा आधार घेऊन न्यायमूर्ती रानडे यांचे म्हणणे खोडून काढून दाखवून दिले की, शिवाजी महाराजांचा अखिल हिंदुस्थानात स्वराज्य स्थापन करण्याचा हेतू होता. केळूसकरकृत शिवचरित्र वाचत असतांना एक मुद्दा ध्यानात ठेवला पाहिजे, तो हा की ते शिवाजी महाराजांचे पहिले समग्र चरित्र होते. त्यामुळे त्यांना इतर इतिहासकारांनी पूर्वग्रहदूषित साधनांच्या आहारी जाऊन शिवाजी महाराजांच्या संबंधित केलेली वादग्रस्त विधाने खोडून काढावी लागली. छत्रपती शिवाजी महाराजांवर झालेला बंडखोरपणा, कपटीपणा, क्रूरपणाचा आरोप त्यांनी आपल्या युक्तिवादाने खोडून काढला आहे.

एका टिपेमध्ये त्यांनी सर जदुनाथ सरकारांनी लिहिलेल्या शिवचरित्राची कठोर समीक्षा केली आहे. जदुनाथ सरकार यांनी इंग्रजी भाषेत शिवचरित्र लिहिले होते. ते मूळचे मुघल कालखंडाचे इतिहासकार असल्यामुळे आणि त्यांना फारसी भाषा अवगत असल्यामुळे त्यांनी शिवचरित्र लिहिण्यासाठी फारसी साधनांचा मोठ्या प्रमाणात वापर केला होता. सरकारांनी वापरलेली बहुतांश साधने ही पूर्वग्रहदूषित असल्याकारणाने त्यातील अनुवादित मजकूर हा शिवाजी महाराजांच्या संदर्भात 'अनुदारतेचे व असत्यमय उल्लेख' करणारा होता. या शिवाय सरकारांनी महाराजांना संबोधण्यासाठी 'शिवा' असा तिरस्कार सूचक एकेरी शब्द वापरला होता. सरकारांच्या ह्या मांडणीचा योग्य समाचार घेऊन केळूसकर हे मत मांडतात की, ''हे एकेरी नाव वाचून खऱ्या देशभक्तांच्या व विशेषतः महाराजांविषयी यथार्थ अभिमान वाहणाऱ्या महाराष्ट्रीयांच्या मनाला वाईट वाटण्यासारखे आहे.''[१६]

सरकारांनी हा एकेरी शब्द वापरल्यामुळे अनेक मराठी लोकांमध्ये प्रक्षोभ निर्माण झाला होता. मराठ्यांचे ख्यातनाम इतिहासकार आणि सरकारांचे परममित्र गो.स. सरदेसाई यांनी देखील याबाबत सरकारांना एक पत्र लिहून जदुनाथ सरकारांना एक वैयक्तिक सूचना केली होती की, त्यांनी लिहिलेल्या शिवचरित्राच्या पुढच्या आवृत्तीत 'शिवा' ह्या शब्दाच्या जागी 'शिवाजी' असा उल्लेख करावा.[१७]

विशेष नमूद करण्याची गोष्ट अशी की, केळूसकरांनी शिवाजी महाराजांवरील द्रव्यलोभाने लूट केल्याच्या आरोपाचे सविस्तर खंडन केले. त्याकाळात काही लोकांमध्ये हा गैरसमज पसरला होता की महाराजांनी द्रव्य मिळवण्यासाठी शत्रू प्रदेशात हल्ले केल्यामुळे अस्वस्थता निर्माण झाली होती. केळूसकरांनी युक्तिवाद केला की शिवाजी महाराजांना स्वराज्य स्थापनेसाठी व त्याचे संरक्षण करण्यासाठी संपत्तीची गरज होती यात कोणतीही शंका नाही. मात्र, महाराजांनी ही संपत्ती मिळवण्यासाठी निर्बंधरहित लूट केली नाही. शत्रू प्रदेशात हल्ले करतांना मराठा सैनिकांना काही नियम पाळावे लागत असत. मराठी सैनिकांवर महाराजांनी ठरविलेले अंकुश असल्यामुळे शत्रू प्रदेशात देखील ''गरीब रयतेस व

शेतकऱ्यास त्याच्या लोकांकडून मुळीच उपद्रव होत नसे.''[१८] शत्रू प्रदेशावर होणारे हल्ले हे त्यांची शक्ती क्षीण व्हावी म्हणून केले जात असत. सतत होणाऱ्या त्रासापासून मुक्त होण्यासाठी अदिलशहा व कुतुबशाह वार्षिक खंडणी देण्यासाठी तयार झाले . नंतर त्यांनी मराठ्यांचे चौथाई व सरदेशमुखी कर गोळा करण्याचे हक्क देखील कबूल केले. केळूसकरांनी समकालीन राजकीय परिस्थितीचे वास्तव वाचकांच्या पुढे उलगडून महाराजांनी शत्रू प्रदेशात केलेल्या आक्रमणांचे आणि संपत्ती संग्रहाचे समर्थन केले.

महाराष्ट्रामधील काही विचारवंतांमध्ये त्या काळात एक विचार प्रभावी होता की, महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात भागवतधर्म पसरल्यामुळे समाजातील उच्च-नीच भावना कमी झाली. यामुळे जातीजमाती एकत्रित आल्या आणि त्यांच्यामध्ये एकी निर्माण झाली. पुढे रामदासस्वामी यांनी भागवत धर्माचे रुपांतर महाराष्ट्र धर्मामध्ये केले. परिणामी, शिवाजी महाराज आणि त्यांच्या सहकाऱ्यांना मराठ्यांचे स्वराज्य स्थापन करणे शक्य झाले. केळूसकरांनी ह्या विचाराला विरोध केला. त्यांनी हे मांडले की, भागवत धर्माने सामाजिक उच्चनीच फुटीरतेमध्ये शिथीलता आणल्यामुळे शिवाजी महाराजांना मराठी लोकांनी पाठिंबा दिला, हा विचार चुकीचा होता. केळूसकरांनी युक्तिवाद करून हा निष्कर्ष काढला की, शिवाजी महाराजांनी ''जो एवढा लोकसंग्रह केला व त्यांच्याकडून जे हे अपूर्व देशकार्य करविले त्याच्या मुळाशी... केवळ महाराजांच्या अंगच्या अलौकिक करामतींचे ते फळ होय.'' केळूसकर असे म्हणतात की, शिवाजी महाराजांच्या यशाची कारणमीमांसा अशा प्रकारे करणे म्हणजे ''आमच्या चरित्रनायकाच्या वास्तविक योग्यतेस लघुत्त्व आणणे होय.''[१९]

केळूसकरांनी शिवचरित्राच्या दुसऱ्या आवृत्तीच्या शेवटच्या प्रकरणातील शेवटच्या तीन पोट-भागांची शीर्षके- 'प्रकृत चरित्रापासून बोध', 'लोकाग्रणींनी घेण्यासारखा बोध', 'संसारी जनांनीं घेण्याजोगा बोध', अशी दिली आहेत. ह्या शेवटच्या पानांमध्ये केळूसकरांनी संस्थानिकांनी, लोकाग्रणींनी व सामान्य संसारी लोकांनी शिवचरित्रापासून काय बोध घ्यावा याबद्दल आपले विचार मांडले आहेत.

ब्रिटीश अमलातील संस्थानी राज्यकर्त्यांना त्यांनी हा सल्ला दिला की, तलवार घेऊन युद्ध करण्याचे दिवस गेले असले तरी शिवाजी महाराजांनी ज्याप्रमाणे स्वराज्यासाठी परिश्रम घेतले त्याच प्रकारचे परिश्रम त्यांनी आपल्या जनतेची परिस्थिती सुधारण्यासाठी घेतले पाहिजे. समाजातील मागासलेल्या घटकांची स्थिती सुधारण्यासाठी विशेष उपाय केले पाहिजे. राजाने काहीही केले तरी चालते असा गैरसमज करून घेऊ नये. जीवनामध्ये आचरण करताना त्यांनी शिवाजी महाराजांचे आचरण किती निर्दोष होते, हे सतत ध्यानात ठेवावे.

केळूसकरांसाठी समाजातील लोकाग्रणी व्यक्तींचा वर्ग महत्त्वाचा होता. समाजाच्या कल्याणासाठी, त्याच्या उत्कर्षासाठी वेगवेगळ्या संस्था चालवणारा हा वर्ग होता. अशा लोकांनी शिवाजी महाराजांनी उत्तम प्रकारे साधलेल्या लोकवशीकरणाच्या कलेचा अवलंब केला पाहिजे, असे त्यांचे मत होते. शिवाजी महाराजांनी केवळ राज्यतृष्णावश होऊन फक्त स्वत:चे वैभव वाढवण्यासाठी जर खटपट केली असती तर त्यांना ह्या प्रचंड मराठी जनसमूहाने पाठिंबा दिला नसता. मात्र, शिवाजी महाराजांचा हेतू हा परकीय अन्यायकारी शत्रूची सत्ता नष्ट करून स्वराज्य स्थापन करण्याचा असल्यामुळे हा हेतू सिद्धीस नेण्यासाठी लोक त्यांच्या मागे उभे राहिले. केळूसकर हे समकालीन समाजाबद्दल कळकळ व्यक्त करतात की, भारतामध्ये अनेक धर्म, अनेक जाती प्रचलित असल्यामुळे समाजाचे अस्तित्व खंडित झाले आहे. लोकांमध्ये स्वधर्माभिमान व स्वजात्याभिमान पसरल्यामुळे लोकांच्या हृदयात एकमेकांचा मत्सर व हेवा निर्माण झाला आहे; ते एकमेकाला हीन व तुच्छ समजत आहेत. अशा स्थितीत समाजातील लोकाग्रणी मंडळीनी जर स्वतःच्या जातीच्या अथवा धर्माच्या लोकांना एक करून त्यांचे हित साधण्याचा प्रयत्न केला, तर त्यांना इतर लोकांचे सहाय्य मिळणार नाही. परिणामी, संघशक्ती लागणारी कार्ये यशस्वी होणार नाहीत.

कृष्णराव केळूसकरांच्या मते, येथे समाजनेत्यांनी शिवाजी महाराजांकडून प्रेरणा घेतली पाहिजे. शिवाजी महाराजांनी अमुक एका जातीवर अथवा लोकसमूहावर विशेष कृपादृष्टी केली, असे कधीही झाले नाही; त्यांनी सर्वांना समान वागणूक दिली, कोणताही भेदभाव केला नाही. पुढे पेशवाई मध्ये शिवाजी महाराजांचे हे धोरण पाळले गेले नसल्यामुळे जात्याभिमान पुन्हा एकदा उफाळून आला. ह्याचाच परिणाम मराठी माणसाला पुढील अनेक शतके भोगावा लागत आहे. जर महाराष्ट्रात एकी नांदायची असेल तर सामाजिक नेत्यांनी हे ध्यानात घेणे जरुरी होते की, ''जात्याभिमानमूलक पक्षपात व मत्सरभाव यांचा सांप्रतच्या दैन्यावस्थेत समूळ उच्छेद होणे अत्यंत इष्ट होय.''[२०]

शिवचरित्र वाचून सामान्य लोकांनी हे लक्षात घ्यायचे आहे की, उद्योगशीलता, निर्व्यसनीपण , दृढ निश्चय, सदाचार, साहस, बुद्धिमत्ता, कुशलता इत्यादी गुण जे शिवाजी महाराजांच्या व्यक्तिमत्त्वामध्ये विकसित झाले होते, ते गुण जोपासले तर प्रपंचात नेहमी सुख व यश लाभते. केळूसकर म्हणतात, शिवचरित्रापासून लोकांनी हे शिकले पाहिजे की, सार्वजनिक हितसंबंधात खासगी द्वेष व मत्सर बाळगू नये व जातिभेद व उच्चनीचता नाकारून सामाजिक ऐक्य आणि परस्परप्रेम जोपासावे. केळूसकरांच्या मते, कोणत्याही धर्माचा अथवा जातीचा अभिमान बाळगून समाजात दुफळी किंवा कलह निर्माण करण्याचे दिवस राहिले नाहीत. त्यामुळे असे करणाऱ्यांचा सामान्य लोकांनी निषेध व अधिक्षेप केला पाहिजे. त्याला आपल्या जातीचा आहे किंवा धर्माचा आहे असे म्हणून पाठीशी घालता कामा नये. शेवटी त्यांनी सामान्य शिवचरित्र वाचकावर एक महत्त्वाची जबाबदारी टाकली की, ''स्वधर्माचा किंवा स्वजातीचा अपप्रयोजक किंवा दुर्हेतुक अभिमान चित्तात बाळगून जे लोकाग्रणी समाजात वैरभाव व दुफळी माजविण्यास प्रवृत्त होत असतील त्यांचे अग्रणीत्व बिलकुल मान्य करायचे नाही व त्यास कोणत्याही प्रकारचे उत्तेजन द्यावयाचे नाही.''[२१]

कृष्णराव केळूसकर यांनी समग्र शिवचरित्राच्या शेवटी शिवाजी महाराजांच्या जीवन व कार्यामधून मिळणाऱ्या प्रेरणांचा उपयोग समता, न्याय व बंधुता ह्या आधुनिक मूल्यांवर आधारलेल्या नवसमाज निर्मितीसाठी कसा मार्गदर्शक ठरू शकतो, हे दाखवून दिले आहे. अर्थातच हाच केळूसकरांच्या शिवचरित्राचा मथितार्थ आहे.

संदर्भ आणि टीपा

१. २०व्या शतकाच्या प्रारंभी शिवाजी महाराजांवर लिहिलेल्या ग्रंथांची इतर काही उदाहरणे खालील प्रमाणे आहेत: अंताजी रामचंद्र हर्डीकर, श्री शिवविजय अथवा छत्रपती शिवाजीमहाराज यांचे ओंवीबध्द चरित्र, १९०९; सीताराम नरहरी ढवळे, बाल शिवाजी, रत्नागिरी, १८८४ (नाटक); गोविंद नारायण दातार, छत्रपती शिवाजी महाराजांचे चरित्र, १९०६.

२. सर जदुनाथ सरकार, शिवाजी अँण्ड हिज टाईम्स (१९१९); ह्युग रॉलिन्सन, शिवाजी, द मराठा: हिज लाइफ अँण्ड टाईम्स (१९२६); चि.वि. वैद्य, शिवाजी, द फाउंडर ऑफ मराठा स्वराज्य, (१९३१) आणि डॉ. बाळकृष्ण, शिवाजी, द ग्रेट (१९३१).

३. दीपेश चक्रवर्ती , कॉलिंग ऑफ हिस्टरी : सर जदुनाथ सरकार अँण्ड हिज एम्पायर ऑफ ट्रूथ, द युनिव्हर्सिटी ऑफ शिकागो प्रेस, शिकागो, २०१५, पृ. १०४.

४. बाळ कृष्ण, शिवाजी द ग्रेट, खंड- १, डी. बी.तारापोरवाला सन्स अँण्ड कंपनी, मुंबई, १९३१, पृ. १-३४.

५. अ. रा. कुलकर्णी, शिवकालीन महाराष्ट्र, राजहंस प्रकाशन , पुणे, पृ. १८९ ते १९०.

६. अनिरूद्ध रे, ट्रेड, पॉलिटीक्स अँण्ड प्लन्डर: द मराठास् ॲट क्यॉम्बे १७२५- १८२५, मुन्शीराम मनोहरलाल पब्लिशर्स, नवी दिल्ली, २००६.

७. पीटर नोविक, द्यॅट नोबल ड्रीम: द ऑब्जेक्टिविटी क्वेक्श्चन अँण्ड द अमेरिकन हिस्टोरिकल प्रोफेशन, केंब्रिज यूनीव्हर्सिटीप्रेस, १९८८.

८. इ. एच. कार , व्हॉट इज हिस्टरी?, मॅकमिलन, १९६१, पृ. २६.

९. अरुण टिकेकर, द क्लॉइस्टर्स पेल : अ बायोग्राफी ऑफ युनिव्हर्सिटी ऑफ मुंबई , पॉप्युलर प्रकाशन , २००६, पृ. ११.

१०. धनंजय कीर, गुरूवर्य कृष्णराव अर्जुन केळूसकर: आत्मचरित्र व चरित्र , मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, मुंबई, १९७७, पृ. १५९-१६० ; धनंजय कीर, डॉ. आंबेडकर: लाइफ अँण्ड मिशन , पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९९०, पृ. १९-२०.

११. धनंजय कीर, गुरूवर्य कृष्णराव अर्जुन केळूसकर: आत्मचरित्र व चरित्र,पृ. १००- १०३.

१२. प्राची देशपांडे, क्रिएटिव पास्ट्स : हिस्टोरिकल मेमरी अँण्ड आइडेंन्टिटी इन वेस्टर्न महाराष्ट्र १७०० -१९६०, पर्मनंट ब्ल्याक, २००७, पृ. २९-३२.

१३. वा. सी. बेंद्रे, छत्रपती शिवाजी महाराज : पूर्वार्ध , पार्श्व पब्लिकेशन्स, कोल्हापूर, १९७२, पृ. ४९.

१४. सेतुमाधवराव पगडी, शिवचरित्र- एक अभ्यास, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, १९७१ (पुनर्मुद्रण २०१२), पृ. २५३

१५. जयसिंगराव पवार (प्रमुख संपादक), छत्रपती शिवाजी महाराज स्मृतिग्रंथ, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे, २०११, पृ. ८.

१६. कृ. आ. केळूसकर, क्षत्रियकुलावतंस छत्रपति शिवाजी महाराज यांचे चरित्र, द्वितीय आवृत्ती, १९२०, पृ.५५९.

१७. हरी राम गुप्ता (संपादक), लाईफ अँण्ड लेटर्स ऑफ सर जदुनाथ सरकार, पंजाब यूनीव्हर्सिटी, होशियारपुर, १९५७, पृ. २७७.

१८. कृ. अ. केळूसकर, क्षत्रियकुलावतंस छत्रपति शिवाजी महाराज यांचे चरित्र, द्वितीय आवृत्ती, पृ. ५६८.

१९. उपरोक्त, पृ. ५७८-५७९.

२०. उपरोक्त, पृ.६१०.

२१. उपरोक्त, पृ. ६१२.

– अवनीश पाटील, कोल्हापूर

प्रस्तावना

मराठा प्राविडन्ट फंडाचें उत्पादक कै. रा. रा. गोविंदराव कृष्णराव दळवी यांच्या मनांत हे चरित्र लिहिण्याची कल्पना प्रथम आली होतीं; परंतु ते अल्पायु झाल्याकारणानें त्याचा तो संकल्प असिद्ध राहिला. पुढें ह्या फंडाच्या चालकांनी प्रस्तुत लेखकास हें काम सांगितलें; परंतु महाराष्ट्रातील एकदोन विद्वान् गृहस्थ शिवाजीमहाराजांचे चरित्र लिहीत आहेत असे कळल्यावरून व केसरीपत्रकारांकडे शिवाजीमहाराजांच्या स्मारकासाठी स. १८९५ पासून जमा होत असलेल्या हजारों रुपायांपैकी थोड्याशा रकमेचा विनियोग महाराजांचे एखादे चरित्र लिहवून छापण्याकडे होऊन तें सर्व लोकांस खिस्तीधर्मपुस्तकांप्रमाणें अगदीं अल्प किंमतीस विकत मिळण्याचा योग येईल असें वाटल्यावरून त्यानें हें काम हाती घेतलें नाहीं, परंतु पुढें सहासात वर्षेपर्यंत ह्या विद्वानांकडून एखादे चरित्र प्रसिद्ध होईना व केसरीकारांकडे जमलेली रक्कम तशीच पडून राहिली असें पाहून आपण तरी आपल्या शक्तीप्रमाणें सांप्रत अनुकूल असलेल्या माहितीचा आधार घेऊन शिवरायांचे चरित्र लिहिण्याचा प्रयत्न करावा व परम प्रिय मित्राचा सदुद्देश सिद्धीस न्यावा असें त्यांच्या मनांत आलें आणि ह्या उद्योगास तो लागला. त्याचें हें फळ आज महाराष्ट्रीयांच्या पुढें ठेवण्यास तो समर्थ झाला. याबद्दल त्यास अत्यानंद वाटत आहे. हें फळ लहान असून अपक्क आहे, किंवा यांत असावा तसा गोड रस नाहीं किंवा हें अगदींच बेचव आहे असें भिन्नरुचि वाचकांना कदाचित् वाटेल; परंतु एक कुशल बागवान् नुसते बीं व खत जमा करण्यांतच अद्यापि गुंतला आहे व दुसरा देशांतराहून कलमे आणण्याच्या उद्योगांत मग्न झाला आहे, तोपर्यंत जे फारसे चोखंदळ नाहींत अशा साध्या जनांच्या क्षुधातृप्तीस हें फळ दुसऱ्या रसभरित फळांच्या अभावीं थोडेसे तरी उपयोगी पडेल अशी उमेद आहे.

मराठ्यांचे नांव जगाच्या इतिहासांत अजरामर करून ठेवणाऱ्या अशा ह्या महाप्रतापशाली राष्ट्रीय वीराच्या अतुल पराक्रमांचें विस्तृत वर्णन स्वतंत्र चरित्रलेखाच्या रूपाने करण्याच्या कामी महाराष्ट्रांतील मोठमोठ्या विद्वान् ग्रंथकारांकडून आजपर्यंत आळस किंवा अनास्था कां झाली हें कळत नाहीं. पूर्वकालीन बखरकारांनी व कवींनीं शिवाजीमहाराजांचा चरित्रमहिमा आपआपल्या माहितीप्रमाणें व शक्तीप्रमाणें इतका गाइला असतां, आधुनिक विद्याविचारसंपन्नतेच्या काळी स्वदेश, स्वराज्य, स्वातंत्र्य इत्यादिकांविषयी सदोदित विचार प्रकट करणाऱ्या पंडितांकडून ह्या महापुरुषाविषयी नुसता तोंडाने अभिमान प्रकट करण्यापलिकडे कांहींच होऊं नये हें चमत्कारिक दिसते. दुसऱ्यांच्या स्वातंत्र्याचा अपहार करणाऱ्या किंवा स्वदेशाचा नाश करण्यास प्रवृत्त होणाऱ्या अनेक पुरुषाची चरित्रे मराठीत प्रसिद्ध व्हावीं आणि ज्या प्रौढप्रताप वीरमणीने स्वदेशास स्वातंत्र्य मिळवून देण्याचे सुयश संपादिलें त्याचें सविस्तर चरित्र लिहिण्याची स्मृति कोणालांहि होऊं नये यांस काय म्हणावे? नाही म्हणायला गुरुवर्य प्रो. राजारामशास्त्री भागवत यांनी शिवाजीमहाराजांचे एक लहानसे चरित्र पुष्कळ वर्षांपूर्वी लिहून प्रसिद्ध केलें होतें, परंतु तें फारच त्रोटक होतें. तसेच प्रकृत चरित्राची जाहिरात प्रसिद्ध झाल्यावर एक बहुतेक तेवढ्याच आकाराचे चरित्र घाईघाईने छापून निघाले आहे; परंतु शिवरायांच्या प्रतापकिरणांचा समावेश अशा लहानशा अवकाशांत होणें शक्य नाहीं हें बहुश्रुत वाचकांस सांगावयास नकोच.

प्रकृत चरित्रलेख लिहिण्याच्या कामीं सांप्रत उपलब्ध असलेल्या एकंदर माहितीचा आधार घेतला असून त्यास साधेल तेवढे पूर्णत्त्व आणण्याचा प्रयत्न केला आहे, ह्याबद्दल शिवाजीमहाराजांसंबंधांचे लेख लिहिणाऱ्या एकंदर नव्याजुन्या ग्रंथकारांचा प्रस्तुत लेखक ऋणी आहे. त्याला ज्या गोष्टी आज सत्य वाटल्या, ज्या क्रमाने त्या घडल्या अशी त्याची खात्री झाली, त्या गोष्टी त्या क्रमाने त्यानें प्रस्तुत ग्रंथांत नमूद केल्या आहेत. कित्येक पंडिताचे इतिहास संशोधनाचे काम सांप्रत चालू आहे. त्यांचे शोध जगापुढे आल्यावर प्रकृत चरित्रलेखांत कांहीं दुरुस्ती करावी लागेल हें उघड आहे, परंतु तेवढ्यासाठी अडून शंकाग्रस्त होऊन बसणे बरोबर नाहीं असें वाटल्यावरून हा लेख प्रसिद्ध केला आहे. यांत जे कांहीं दोष व न्यूनता अभिज्ञ वाचकांस दिसून येतील त्याबद्दल ते लेखकांस क्षमा करतील व हें शिवरायांचे यशोवर्णन आहे हें लक्षांत आणून त्याचा यथोचित आदर करतील अशी उमेद आहे.

ह्या ग्रंथास आश्रय देण्याचे ज्या उदार गृहस्थांनी आगाऊ अभिवचन दिलें त्याचें येथे आभार मानणे उचित होय. आश्रयदात्यांस हे पुस्तक सातआठ महिन्यांपूर्वी मिळावयास हवें होतें, परंतु अनेक अपरिहार्य अडचणींमुळें छापण्याचे काम लांबणीवर पडलें. तरी विनंतिपत्रांत जेवढा ग्रंथ देण्याचे वचन दिले होतें त्याच्या दीडपट मोठा ग्रंथ त्यांस पूर्वी ठरलेल्याच किंमतीस मिळाला आहे, हे लक्षात आणून ते प्रस्तुत लेखकांस ह्या दिरंगाईबद्दल क्षमा करितील अशी आशा आहे. हा ग्रंथ महाराष्ट्रीयांस थोड्या किंमतीस द्यावा अशी उत्कट इच्छा असल्याकारणानें तो इतका वाढला असूनहि मागाहून विकत घेणारांस त्याची किंमत त्या मानानें फारशी वाढविली नाहीं.

शेवटीं चरित्र तयार करण्यास अगदीं दुर्मीळ जुन्या ग्रंथांचे साहाय्य रा. रा. गणपतराव कृष्णराव तिवरेकर, जे. पी., रॉयल एशिआटिक सोसायटीचे लायब्रेरिअन् यांच्या कृपेने मिळाले त्याबद्दल त्यांचे, मराठा प्राव्हिडण्ट फंडाच्या चालकानी प्रिय मातृभाषेची ही अल्पस्वल्प सेवा करण्याचा सुयोग आणून दिल्याबद्दल त्यांचे व शेट तुकाराम जावजी जे. पी., निर्णयसागर छापखान्याचे मालक, यांनीं हें पुस्तक छापून प्रसिद्ध करण्याच्या कामीं दिलेल्या सवलतीबद्दल त्यांचे आभार प्रस्तुत लेखक मनःपूर्वक मानितो.

ता. २० डिसेंबर, स. १९०६ इ.

चरित्रलेखक
दादर, मुंबई

द्वितीय आवृत्तीची प्रस्तावना

आज बरोबर चौदा वर्षांनी ह्या चरित्रग्रंथास दुसऱ्या आवृत्तीचा योग आला आहे. शिवाजीमहाराजांसंबंधाचा अभिमान चोहींकडे जागृत होऊन त्यांच्या नावाचा सर्वत्र जयजयकार होऊं लागला तेव्हां आपणहि स्वसामर्थ्यानुरुप ह्या जयजयकारात अल्पस्वल्प भर घालावी अशा उद्देशाने प्रकृत लेखकाने हा चरित्रलेखनाचा खटाटोप केला होता आणि शिवरायांना लघुत्व व वैगुण्य आणणारे असे जे कित्येक निराधार व निरर्थक प्रवाद पुष्कळ दिवसांपासून प्रचलित होते त्यांची असत्यता योग्य पुराव्यानिशीं स्थापित करण्याचा प्रयत्न त्यानें केला होता. हा प्रयत्न कित्येकांना न आवडावा हें साहजिक होतें; परंतु प्रकृत लेखकाचे एतद्विषयक स्पष्ट अभिप्राय असत्य व निराधार आहेत असें सप्रमाण सिद्ध करण्यास कोणीहि समर्थ किंवा उद्युक्त झाला नाहीं याचे नवल वाटतें. यास्तव विरुद्ध पुराव्याच्या अभावी प्रथमावृत्तींतले अभिप्राय ह्या आवृत्तीत कायम ठेवावे लागले आहेत. आपल्या लेखांत प्रकट झालेलीं कित्येक मते कांहीं जणांस आवडली नाहींत म्हणूनच केवळ तीं त्या लेखाच्या पुढील आवृतींतून काढून टाकणे कोणाहि सत्यनिष्ठ मनुष्यास सहसा योग्य वाटणे स्वाभाविक नाहीं. तीं खोटी ठरत तोपर्यंत त्यांचा अवलंब करणें अगदी बरोबर आहे.

युरोपांतल्या रणभूमीवर आमच्या मराठे बांधवांनी आपल्या अंगचे शौर्य व पराक्रम उत्तम प्रकारे प्रकट केल्यावरून त्यांची चोहींकडे वाहवा झाली आणि ह्या त्यांच्या ठायींच्या युद्धोपयोगी गुणांचा प्रकर्ष पूर्वकाळी ज्या प्रौढप्रताप राजमणीच्या प्रोत्साहनानें व अलौकिक कर्तृत्वामुळे झाला होता त्यांचे स्मरण आमच्या मराठे बांधवांस विशेष प्रकारे होऊन त्यांचे काही तरी शाश्वत स्मारक करावे असें त्यांच्या मनांत आलें आणि तत्यप्रीत्यर्थ फंड जमविण्यास ते लागले. तेव्हा प्रकृत लेखकाला असें वाटलें कीं, ह्या महातेजस्वी राजमणीच्या चरित्रासंबंधानें बऱ्याच पाश्चात्य इतिहासज्ञांचा जो विपरीत ग्रह झाला आहे तो काढून टाकण्याचा प्रयत्न केल्यावाचून त्याच्या स्मारकास निर्दोष स्वरूप प्राप्त होणार नाही. म्हणून त्यानें आपल्या ह्या ग्रंथाचे इंग्रजी भाषातर करविण्याचा निश्चय केला आणि हा त्याचा निश्चय त्याचे विद्वान् मित्र प्रो. नी. स. ताकखाव, एम्. ए. यांच्या साहाय्याने सिद्धीस जाऊन हा भाषांतररूप ग्रंथ आतां एकदोन महिन्यांत प्रसिद्ध होण्याचा योग आला आहे. आता आमच्या महाराष्ट्रीय जनांसहि शिवरायाचें साद्यंत चरित्र वाचण्याची इच्छा होणें स्वाभाविक असल्याकारणानें त्यांच्यासाठी प्रकृत लेखकाने आपल्या ग्रंथाची ही द्वितीय आवत्ती प्रसिद्ध करण्याचें धाडस केलें आहे. हा चरित्रग्रंथ वाचून शिवरायांविषयी महाराष्ट्रीयांच्या–विशेषतः मराठे बांधवांच्या ठायीं यथार्थबुद्धि व खरा अभिमान जागृत झाल्याने त्याच्या स्मारकाच्या कार्यास मनापासून साहाय्य करण्यास उदारधी पुरुष उद्युक्त होतील आणि पंचवीस वर्षांपूर्वी अशाच कार्यासाठी एक मोठा फंड जमा होऊन तो जमा करणारांच्या ठायीं शिवरायांविषयी खरा अभिमान वसत नसल्याकारणानें व प्रामाणिकपणाचा अभाव असल्याकारणानें जमलेली मोठी रक्कम गडप होऊन स्मारककार्य असिद्ध राहिलें, तसा प्रकार पुनरपि होणार नाहीं असा पक्का भरवंसा आहे.

ही आवृत्ती अर्थात गेल्या चौदा वर्षांच्या अवधीत इतिहास संशोधकांनी प्रसिद्ध केलेल्या बहुतेक माहितीचा उपयोग करून सुधारून वाढविली आहे. ह्याबद्दल ह्या इतिहास संशोधकांचा प्रकृत लेखक ऋणी आहे. ह्या सर्वांमध्ये बंगालचे सुप्रसिद्ध इतिहासकार प्रो. जदुनाथ सरकार यांचें ऋण फारच मोठे आहे. शिवरायांच्या चरित्रासंबंधाची जी

माहिती आजपर्यंत अनुपलब्ध होती ती ह्या विद्वान् इतिहासकारांच्या स्तुत्य परिश्रमामुळे इंग्रजी वाचकास त्यांनी लिहिलेल्या शिवरायांच्या चरित्राच्याद्वारें उपलब्ध झाली आहे. ह्या त्याच्या बहुमोल माहितीच्या आधाराने प्रकृत ग्रंथास बरेच पूर्णत्व आलें आहे.

हा चरित्रलेखाच्या प्रथमावृत्तीस करवीर संस्थानाचे अधिपती **श्रीछत्रपती शाहूमहाराज सरकार, श्रीमंत महाराज बापूसाहेब कागलकर, आणि श्रीमंत महाराज सयाजीराव गायकवाड सरकार** यांनीं उदार आश्रय दिला होता, ह्याबद्दल लेखक त्यांचा ऋणी आहे. आमच्या इलाख्याच्या शिक्षणखात्याच्या अधिकाऱ्यांनी हा ग्रंथ लायब्ररयांत ठेवण्यास लायक आहे असें ठरविलें होतें आणि दक्षिणा प्राईझकमिटीकडून लेखकास पारितोषिक मिळाले होतें. यास्तव ह्या अधिकाऱ्यांचेहि आभार मानणे उचित होय.

ह्या ग्रंथाची ही आवृत्ती सुधारून वाढविल्यामुळे तीत शंभरसवाशे पृष्ठांचा नवा मजकूर घालावा लागला. तरी कागदाच्या विलक्षण महर्गतेस्तव बारीक टाईप योजून ग्रंथाची पृष्ठसंख्या फारशी वाढू दिली नाहीं. छपाईच्या एकंदर साहित्याच्या किंमती चौपटपांचपट वाढल्यामुळे व मजुरीचे दरही तिप्पट वाढल्यामुळे ह्या ग्रंथाची किंमत मोठी ठेवणे भाग पडलें आहे. तरी किंमतीच्या भारीपणास्तव शिवरायांचा खरा अभिमान बाळगणारांनी ह्या चरित्रात्मक ग्रंथास आश्रय देण्यास माघार घेऊं नये, अशी त्यांस नम्रतेची विनंती आहे.

हा ग्रंथ छापीत असतां तपासण्याच्या कामी माझे मित्र रा. रा. विठ्ठलराव जिवाजी नाडकर्णी, मनोरंजन मासिक पुस्तकाचे संपादक, यांनी उत्तम साहाय्य केलें याबद्दल लेखक त्यांचा फार आभारी आहे. त्याप्रमाणेच हा ग्रंथ छापावयास लागणारे द्रव्यसाहाय्य मराठा प्राव्हिडण्ट फंडाचे चालक आणि माझे परमस्नेही रावसाहेब हरिश्चंद्र विश्राम राजवाडकर, जे. पी. रा. रा. यशवंतराव तानाजी माणगावकर व रा. रा. रामचंद्रराव अर्जुन गोळे यांनी दिलें याबद्दल लेखक त्यांचा फार आभारी आहे. शेवटी शिवरायांविषयी वास्तविक अभिमान वाहणाऱ्या महाराष्ट्रीयांस एवढीच विनंती आहे की, प्रकृत चरित्रलेखांत कांहीं अपूर्णता व दोष अद्यापि त्यांस दिसतील त्याबद्दल लेखकास गय करून हें शिवरायाचे चरित्र आहे यास्तव हें स्वत: वाचून आपल्या पुढील पिढीला वाचावयास मिळावे म्हणून संग्रही ठेवण्याचे त्यांनीं अवश्य मनावर घ्यावे आणि लेखकाच्या परिश्रमाचे चीज करावें.

ता. २० डिसेंबर स. १९२०

चरित्रलेखक
दादर, मुंबई

अनुक्रमणिका

	विषय	पा. क्र.
	अध्यक्षांचे मनोगत	तीन
	संपादकीय	नऊ
	प्रस्तावना	तेवीस
भाग पहिला	पूर्वजवृत्त	१
भाग दुसरा	शहाजीराजे यांचे वृत्त	९
भाग तिसरा	शिवाजीमहाराजांचें बालपण	२९
भाग चवथा	शिवाजीमहाराजांचें शिक्षण	३७
भाग पाचवा	स्वराज्यस्थापनेची सिद्धता	४६
भाग सहावा	स्वराज्यस्थापनेला आरंभ	५०
भाग सातवा	स्वसत्तावृद्धी	६०
भाग आठवा	पितृसंकटनिवारण	६६
भाग नववा	मोगलांशी संबंध	७२
भाग दहावा	विजापूरकरांचा आणखी मुलूख काबीज करितात	७७
भाग अकरावा	अफझुलखानाचा वध	८४
भाग बारावा	विजापूरसरकाराच्या दुसऱ्या सरदारांचा पराभव	९८
भाग तेरावा	विजापूरसरकारास हतवीर्य केले	१०७
भाग चौदावा	पितृदर्शन	११३
भाग पंधरावा	आरमार व समुद्रांतील किल्ले	११८
भाग सोळावा	मोगलांच्या राज्यांत स्वाऱ्या व शास्ताखानाची मोहीम	१२२
भाग सतरावा	सुरत, बार्सिलोर वगैरे शहरांची लूट	१३३
भाग अठरावा	मिर्झाराजा जयसिंग यांची स्वारी	१४०

अनुक्रमणिका--समाप्त

	विषय	पा. क्र.
भाग एकुणिसावा	आग्र्यास प्रयाण	१५५
भाग विसावा	गेलेले किल्ले व प्रांत परत घेतले	१७०
भाग एकविसावा	मोगलांच्या मुलखांत पुनः स्वाऱ्या	१७८
भाग बाविसावा	विजापूरकरांशी पुनः युद्धप्रसंग	१९४
भाग तेविसावा	राज्याभिषेक	२०१
भाग चोविसावा	राज्यव्यवस्था	२१२
भाग पंचविसावा	मोगलांशी व विजापूरकरांशीं पुनःकलह	२३३
भाग सव्विसावा	कर्नाटकांतील मोहीम	२३९
भाग सत्ताविसावा	मोगलांशी शेवटले युद्धप्रसंग	२६४
भाग अठ्ठाविसावा	इंग्रज व शिद्दी	२७५
भाग एकुणतिसावा	सज्जनसेवा	२८९
भाग तिसावा	अंतकाळ	३०४
भाग एकतिसावा	दौलतीचा हिशोब	३१०
भाग बत्तिसावा	गुणदोषविवेचन	३१५
परिशिष्ट		३४७
टीपा		३४९

छत्रपती शिवाजीमहाराज

भाग पहिला

पूर्वजवृत्त

प्रौढ प्रतापनिधि क्षत्रियकुलावतंस छत्रपती शिवाजीमहाराज यांचें जन्म भोंसलेनामक एका नामांकित कुलांत झालें. हें क्षत्रियघराणें देवराजजी महाराणा या नांवाच्या एका रजपूत राजाने महाराष्ट्रांत स्थापिलें. ह्या महाराण्याची पूर्वपीठिका येणेंप्रमाणें आहे–अयोध्याप्रांतांत शिसोदे नांवाचे सूर्यवंशीय राजे राज्य करीत असत. त्यांपैकीं कोणी पुरुष नर्मदा नदीच्या दक्षिणतीरीं येऊन तेथें स्वतंत्र राज्य संपादून राहिला. पुढें शालिवाहननामक शककर्ता राजा झाला. त्यानें ह्या पुरुषाच्या वंशातील एका राजाला पराजित करून त्याचें राज्य हरण केलें. त्या समयी राजपत्नी आपला एक पाचसहा वर्षांचा पुत्र घेऊन नर्मदा नदीच्या उत्तरभागी मेवाडप्रांतांत विंध्य पर्वताजवळ गेली आणि तेथें एका ब्राह्मणाच्या घरी आपल्या पुत्रास गाई राखावयास ठेवून त्याच्या आश्रयाने राहिली. ह्याप्रमाणे गोरक्षण करीत असतां ह्या मुलास एके जागी पुरलेलें पुष्कळ द्रव्य सापडले. तें त्यानें त्या ब्राह्मणास दाखवून आपण कोण, कोठून आलों वगैरे सर्व वर्तमान विदित केलें. मग त्या ब्राह्मणानें त्यास स्वराज्यस्थापनेच्या कामी मनापासून साहाय्य केलें. तो पहाडी मुलूख भिल्लांच्या हाती होता. त्यांशीं लढून त्यांनीं त्यांस पादाक्रांत केलें व त्या पहाडांत एके स्थलीं भवानीचे देवालय होतें त्याजवळ एक किल्ला बांधून त्याचें नांव चित्रकूट असें ठेविले. भवानीच्या देवालयाचा जीर्णोद्धार करून त्या किल्ल्यांत आणखी एकलिंगजी आंबाचे देवालय त्यांनी बांधिलें. ह्या पुरुषाच्या वंशजांनी चित्रकूटास पाचशे वर्षे राज्य केले, असें म्हणतात. हा चित्रकूट किल्ला चितोड ह्या नांवानें पुढें इतिहासात प्रसिद्ध झाला.

पुढें दिल्लीस यवनी पातशाहत झाली. तेव्हां यवन बादशहाची व रजपूत राजांची वारंवार युद्धे होऊं लागली कित्येक हिंदुराजे यवनशत्रूपुढे हतवीर्य होऊन त्यांचे अंकित होऊन राहिले. चितोडच्या रजपूतराजांशींही ह्या दिल्लीच्या बादशहांनीं अनेक वेळां घोर संग्राम केले; परंतु त्यांनी शत्रूस पुष्कळ वर्षे मुळींच दाद दिली नाही. स्वराज्य व स्वातंत्र्य यांचें रक्षण त्यांनी मोठ्या शौर्याने केलें. स. १२७५ च्या सुमारास चितोडच्या गादीवर लक्ष्मणसिंहनामक महाराणा बसला. त्याचा चुलता भीमसिंग राज्यकारभार पाहत असे. ह्या भीमसिंगानें पद्मिनी नावाच्या एका अतिलावण्यवती स्त्रीशी विवाह केला होता.[१] ही स्त्री त्यानें सिंहलद्वीपाहून आणविली होती असें म्हणतात. ह्या रूपवती स्त्रीच्या लोकोत्तर सौंदर्याची वार्ता अल्लाउद्दीन खिलजीनामक दिल्लीच्या बादशहाच्या कानी जाऊन तिचा अभिलाष त्यानें धरला आणि प्रबल सेनेनिशीं मेवाडप्रांतांत स्वारी करून चितोड किल्ल्यास वेढा दिला. आतील रजपूत शत्रूशी मोठ्या शौर्याने लढले. ते त्यास कैक दिवसपर्यंत मुळीच हार गेले नाहींत; परंतु अल्लाउद्दीन कांहीं केल्या वेढा उठवीना. त्याच्या प्रचंड

१ ही पद्मिनी लक्ष्मणसिंहाची राणी होती असे कित्येक बखरींत आढळते.

सैन्याचा गराडा किल्लासभोंवती एकसारखा पडला होता. तेव्हा राजाने निरुपाय होऊन असा बेत केला कीं, किल्ल्यांतील एकंदर रजपुतांसह शत्रुसैन्यावर एकदम हल्ला करून धारातीर्थी पतन पावावे. हा बेत त्याच्या पदरच्या एकूण एक शूर रजपुतांस पसंत झाला; पण ह्या वेळी राजास असा एक विचार सुचला कीं, मेवाडच्या शिसोदेवंशाचा समूळ उच्छेद होणें इष्ट नाहीं. तो कायम राहण्यास कांही तरी उपाय योजिला पाहिजे. त्याचे बारा पुत्र होते. ते सगळे समरयज्ञात स्वप्राणांची आहुति देण्यास सिद्ध झाले होते. लक्ष्मणसिंहाचें आपल्या द्वितीय पुत्रावर इतरांहून विशेष प्रेम होतें. ह्या पुत्राचे नांव अजयसिंह असें होतें. त्याला राजाने असें सांगितलें कीं, आमच्या घराण्याचे निर्मूलन होणें इष्ट नाहीं. यास्तव तू अरवली पर्वतांत कैलवाडा म्हणून एक बिकट स्थल आहे तेथें पळून जाऊन स्वप्राणाचें रक्षण करावे. हा सल्ला त्या वीर्यशाली पुत्रास पसंत होईना; परंतु पित्याचा फारच आग्रह पडल्यामुळे हा अजयसिंह निरुपायास्तव पित्राज्ञेप्रमाणें कैलवाडा येथें जाऊन राहिला.[१] इकडे राजा आपल्या आप्तजनांसह शत्रूच्या सैन्यावर तुटून पडला. ह्या रणकंदनांत चौदाशे रजपूत प्राणास मुकले. किल्ला शत्रूच्या हातीं लागला. आतील सर्व चीजवस्तू यवनांनी लुटून नेली व सर्व राजचिन्हांचें हरण केलें. किल्ल्यांत एक भव्य नौबत होती ती व किल्ल्यास पंचरसी दरवाजे होते ते त्यांनीं काढून नेले.

अजयसिंहानें वर सांगितल्याप्रमाणें पळून जातांना आपल्या ज्येष्ठ बंधूचा अल्पवयी पुत्र हम्मीरसिंह यास बरोबर नेले होतें. पुढें त्यानें लोकांची जमवाजमव करून आपलें बरेंच राज्य पुनः काबीज केले. हम्मीरसिंह वयात येऊन मोठा पराक्रमी निपजला. अजयसिंह मोठा धर्मशील असून त्याचें ह्या आपल्या पुतण्यावर फार प्रेम असे. यास्तव त्यानें त्याला त्याच्या वडिलांच्या गादीवर बसवून आपण त्याचा कारभार पाहूं लागला. त्यांनी राजनगर म्हणून दुसरा एक किल्ला बांधून तेथें आपली गादी स्थापिली. कारण चितोड येथील नौबत वगैरे राजचिन्हे शत्रूच्या हाती गेली होती ती परत मिळवीपर्यंत त्या किल्ल्याची पायरी चढावयाची नाही अशी त्यांनीं प्रतिज्ञा केली होती. ज्या शत्रूंच्या पायी आपल्या घराण्याचा असा भयंकर संहार झाला व वडिलांच्या राजधानीचा असा धुव्वा उडाला, त्यांचा पुरा पराभव करून सूड उगवीपर्यंत आपली निशाणे मागें चालवावी, ताटांत भोजन करूं नये, पलंगावर निद्रा करूं नये, श्मश्रू करूं नये, असा त्यांनी नियम केला. हा यवनद्वेष त्या शिसोदे राजवंशानें पुढें असाच चालविला. त्यांनीं जागजागी आपली ठाणी बसवून व नवीन किल्ले बांधून स्वसत्तावृद्धी पुष्कळच केली व उदेपूर येथे आपली गादी स्थापून स्वत्व रक्षण केलें.

अजयसिंह मरण पावल्यावर त्याचा पुत्र सजनसिंह याने असें मनांत आणिलें कीं, राज्यविभागाकारणें आपल्या चुलत भावाशीं कलह करीत बसण्यांत कांही अर्थ नाही, तर स्वबाहुबलेंकरून नूतन राज्य संपादन करण्यांत वास्तविक पुरुषार्थ आहे; असा पोक्त विचार करून हा शूरपुरुष दक्षिणेकडे आला. त्यानें सोंधवाड प्रांत काबीज करून तेथें आपली गादी स्थापिली. ह्या महाराण्याच्या वंशांत दिलीपसिंहजी महाराणा, सिंहजी महाराणा[२], भोजासी महाराणा व देवराजजी महाराणा असे राजे अनुक्रमे झालें. ह्या सर्वांनी यवनांशी सतत युद्धे करून स्वराज्य कायम राखिलें; परंतु पुढें देवराजजी महाराणा यवनांच्या सतत होणाऱ्या त्रासाने जेरीस येऊन स्वराज्याचा त्याग करून दक्षिणदेशीं आला व कृष्णा आणि भीमा ह्या नद्यांच्या तीरीं पाळेगारी करून कसाबसा योगक्षेम करूं लागला. दक्षिणेत आल्यावर त्यानें आपले नांव यवनभीतीनें पालटले आणि आपणांस भोसावंत भोंसलें असें म्हणवू लागला. ह्या शूर पुरुषाच्या मनांत ह्या प्रांतीं साधल्यास पुनः स्वराज्य स्थापावयाचें होतें; परंतु जिकडे तिकडे यवनांचे प्राबल्य झालें असल्याकारणानें त्याचा हा उद्देश सिद्धीस गेला नाहीं. तेव्हां शेवटीं त्यास सिंगणापूरची पाटीलकी मिळवून स्वस्थ रहावे लागलें.

---

१ चिटणीसकृत बखरींत असे म्हटले आहे की, लक्ष्मणसिंह आपल्या सर्व लोकांनिशी शत्रूशी अखेरचा संग्राम करून गतप्राण झाला, तेव्हा त्याच्या पत्नीने किल्ल्यांतून आरससिंहजी व सजनसिंहजी अशा दोन राजपुत्रांसह पलायन करून भिल्लांचा आश्रय धरिला. पुढें हे राजपुत्र वयात येऊन मोठे पराक्रमी निपजले व त्यांनी चितोड वगैरे ठिकाणे यवनापासून परत घेतली. प्रतापसिंहमहाराजांनी तयार केलेल्या वंशावळीत लक्ष्मणसिंहाच्या ह्या दोनच पुत्रांची नावे दिली आहेत. आरससिंहाच्या ऐवजी अरसीसिंग असे नांव तींत आहे. 'सिंह' ह्या शब्दाचा सिंग हा अपभ्रंश आहे.

२ ह्याचे नाव शिवाजी महाराणा असें इतरत्र आढळते.

ह्याच्या वंशजांनी पुढें खानवट, हिंगणी, बेरडी, देऊळगाव, जिंती, वेरूळ, बनसेंद्र, कळसवावी, मुंगीपैठण, नानजव इत्यादी गावांच्या पाटीलक्या खरेदी केल्या. ह्या देवराजीची वंशपरंपरा येणेप्रमाणें आहेः इंद्रसेन, शुभकृष्णजी, रूपसिंहजी, भूमींद्रजी. धापजी, बरहटजीचें,[१] खलाजी[२] उर्फ खलकर्ण, कर्णसिंहजी ऊर्फ जयकर्ण, संभाजी आणि बाबाजी ऊर्फ शिवाजी. ह्या बाबाजीचा जन्म स. १५३३ त झाला.[३] बाबाजी मोठा सदाचारी व धर्मशील होता.

---

१ चिटणीसाच्या वंशावळीत याचे नाव बरबटजी असें दिलें आहे.

२ इतरत्र खेलोजी असे नांव आहे.

३ ही वंशावळ चिटणीसकृत बखरीतून घेतली आहे. ही सातारचे छत्रपती प्रतापसिंहमहाराज यांनी तयार करविलेल्या वंशावळीशी तंतोतत जुळते. ही वंशावळ हल्ली छत्रपती शाहूमहाराज, संस्थान करवीर, यांच्या आश्रयाने कोल्हापुरास छापून प्रसिद्ध झाली आहे. राजस्थानचा प्रख्यात इतिहासकार टॉड याने आपल्या ग्रंथात मेवाडच्या भाटांकडून मिळालेल्या शिवाजीच्या वंशावळीचा उल्लेख केला आहे. तोही सदरील वंशावळीशीं बराच जमतो. ह्या वंशावळींचा अनुक्रम येणेंप्रमाणे आहे : लक्ष्मणसिंह, अजयसिंह, सजनसिंह, दिलीपसिंह, शिवाजी, भोसजी, देवराजजी, उग्रसेन, माहुलजी, खेलोजी, जनकोजी, सतुजी, संभाजी आणि शिवाजी उर्फ बाबाजी. ह्या वंशावळीचा उल्लेख सदरील इंग्रज ग्रंथकाराने ज्या ठिकाणी केला आहे तेथें तो येणेंप्रमाणें म्हणतो. 'ह्या सजनसिंहाच्या वंशात पुढें एक महापुरुष निर्माण होऊन हिंदुस्थानातील यवनपादशाही उलथून टाकील व त्याच्या पूर्वजांची जी दुर्दशा यवनांनी केली होती तिजबद्दल त्यांचा चांगलाच सूड उगवील, असा योगायोग होता. कारण सातारच्या गादीचा मूळस्थापक जो शिवाजी तो ह्या सजनसिंहाच्या वंशात उत्पन्न झाला.' मुळांत दिलेल्या वंशावळीच्या सत्यतेस एवढा पुरावा पुरे आहे. राजस्थानातील भाटांच्या तोंडच्या राजप्रशस्तिसुद्धा कृत्रिम असून त्या शिवाजीमहाराजांचा दरारा व वैभव यामुळेंच केवळ अस्तित्वांत आल्या; त्या वस्तुतः पाहता सत्य नव्हेत, असा तर्क जे करीत असतील त्यांचा तो तर्क निराधार आहे, असें म्हणण्यास हरकत नाही. एकंदरीत पाहतां शिवाजीमहाराजांच्या पूर्वजासंबंधाने माहिती देताना बहुतेक बखरकारांनी वाटतील तसे प्रवाद जमेस धरून कांही तरी जंत्री जुळवून दिली आहे. यास्तव त्या परस्परांविरुद्ध असल्या तर त्यांत कांही नवल नाही. अशांपैकी कांही येथें नमूद करितों. श्रीशिवदिग्विजयनामक बखरींत महाराजाचे वंशवृत्त येणेंप्रमाणें दिलें आहे. शिसोदे भोसल्यांच्या कुळांत उदेसिंग नामेंकरून कोणी राज्यस्थापक निर्माण झाला. त्यानें उदेपूरनगर वसविले. याच्या वंशातील एका पुरुषास चितोड किल्ला एका यवनपादशहाकडून मिळाला. त्या किल्ल्यावर त्यानें आपलें राज्य स्थापिले. ह्या किल्ल्यावर एक फार मोठी पंचरसी नौबत होती. ती तेथला राजा सामोपचारानें देईना म्हणून दिल्लीच्या बादशहाने त्याच्यावर स्वारी करून चितोड किल्ल्यास मोठ्या सैन्याचा गराडा दिला. तेव्हा निरुपाय होऊन पंधरा वीसहजार रजपूत शत्रूवर चालून जाऊन सगळे रणात पडले. ती नौबत, किल्ला व एकंदर मालमत्ता बादशहाच्या हातीं लागली. ह्या गर्दीत काकाजी भोसले म्हणून एक राण्याच्या चुलता कारभारी होता तो आपले कुटुंब व राजपत्नी यांस घेऊन किल्ल्यातून चोरवाटेने निघून गेला व उदेपुरच्या राण्याचा आश्रय धरून राहिला. ह्यावेळी राजपत्नी गरोदर होती. तिला पुढें पुत्र झाला. त्याचें नाव चंद्रसेन असें ठेविले. उदेपूरच्या राण्याने ह्या आपल्या आप्तांस काही मुलूख तोडून दिला. पुढे चंद्रसेन वयांत आला तेव्हा ह्या काकाजीचें व त्याचें पटेना. म्हणून काकाजीस तेथून पळून जावे लागलें. तो दक्षिणेत येऊन दौलताबाद सरकारचा आश्रय करून, हिंगणी, बेरडी, देऊळगाव, वेरूळ इत्यादी गावाच्या पाटीलक्या खरेदी करून तेथें सुखवस्तू राहिला. ह्या काकाजीच्या वंशात बाबाजी निर्माण झाला. मराठी साम्राज्याच्या बखरीत हें वंशवृत्त येणेंप्रमाणें दिलें आहे : भोसल्यांच्या कुळाचा मूळपुरुष शिवराव चितोडकर उदेपुरीं राहात होता. यास पुत्र तीन – रामराव, उदेसिंग व भीमसिंग. अकबरानें उदेपुरावर स्वारी करून युद्ध केले तेव्हा रामराव व उदेसिंग हे रणात पडले व भीमसिंग याने उदेपुरच्या राण्यास भोंसच्या किल्ल्यात नेऊन ठेविले. ह्या किल्ल्याच्या नांवावरून त्याच्या वंशास भोंसले असें नांव पडलें. ह्या भीमसिंगास विजयभान व रायभान असे दोन पुत्र होते. रायभानाचा वंश चितोडास राहिला. तर विजयभानाचा पुत्र खेळकर्ण हा चितोडाहून महाराष्ट्रात आला. त्याच्या वंशजांचा अनुक्रम येणेंप्रमाणे आहे : खेळकर्ण, जयकर्ण, महाकर्ण, शिवाजी (हा भीमातीरीं भीमखेटमाहुली येथें डोहात बुडून मेला), बाबाजी भोंसला, हा वेडसर होता. भिडेकृत शिवाजीमहाराज यांच्या वंशाच्या व अष्टप्रधानांच्या इतिहासात अशी माहिती दिली आहे की, मूळपुरुष सजनसिंह महाराणा हा उदेपुरानजीक चितोडें शहरी रहात असे. यास दिलीपसिंह, सिंहाजी व भोंसाजी असे तीन पुत्र होते. त्यांपैकी भोंसाजी हा चितोडानजींक भोसावंत म्हणून एक गाव आहे तेथें येऊन राहिला. त्यावरून त्यास भोसलें हे उपनांव प्राप्त झालें. ह्या भोसावंतांचे भाऊबंद कोणी खेळकर्ण व मालकर्ण असे होते. हे अहमदनगरच्या बादशहापाशी चाकरीस राहिले. यास लोक खेलोजी व मालोजी असें म्हणू लागले. यांस त्या बादशहाकडून प्रत्येकी पंधराशें स्वारांच्या नेमणुका मिळाल्या. चाकणचौऱ्यांशी, पुरंदरपरगणा व सुपेंमहाल हे त्यांस सरंजामादाखल मिळाले. पुढे खेलोजी एके लढाईत पडला व मालोजी चाकसमानी ह्या गांवी डोहांत बुडून मरण पावला. मालोजीचा बाबाजीनामक एक मुलगा होता. तो अल्पवयी असल्याकारणाने मालोजीचा सरंजाम जप्त झाला. बाबाजीची आई त्यास घेऊन वेरूळघुमेश्वर येथें जाऊन राहिली. बाबाजी वयात आल्यावर देऊळगांव, खानवटें, जिंती वगैरे गांवांच्या पाटीलक्या खरेदी करून त्यांची व्यवस्था गुमास्ते ठेवून करूं लागला. ह्याप्रमाणें बाबाजी भोसल्यांपर्यंतच्या वंशावळीसंबंधाने अनेकांचे अनेक तर्क आहेत. छत्रपती प्रतापसिंह यांनी तयार केलेली वंशावळ इतरांहून विशेष ग्राह्य व विश्वसनीय वाटल्यावरून तिचाच आधार मुळांत घेतला आहे.

ह्याला मालोजी व विठोजी असे दोन पुत्र होते. मालोजी स. १५५० त जन्मला व विठोजी स. १५५३ त जन्मला.[१] हे मोठे हुशार व सद्गुणी निपजले. हे वयांत येऊन संसार पाहू लागले असता देऊळगांवच्या शेतकऱ्यांचे व यांचे जमिनीसंबंधाने तंटे उपस्थित होऊन त्यांशीं त्यांचें पटेना. यास्तव ते दौलताबादेजवळ वेरूळ गांवीं येऊन राहिले; परंतु शेतकीच्या रडक्या उत्पन्नावर निर्वाह करण्याऐवजी आपल्या अंगची धमक व हुशारी यांचे योग्य चीज होईल असा कांहीं तरी व्यवसाय पहावा असें त्यांच्या मनांत येऊन त्यांनी सिंदखेडच्या लखुजी जाधवरावाच्या पदरीं प्रथमतः पायबारगिरीची नोकरी धरिली. हा जाधवराव देवगिरीच्या यादवांचा वंशज असून सिंदखेडचा देशमुख होता. अहमदनगरच्या निजामशाहींत याला बारा हजार स्वारांची मनसब होती व ह्या फौजेच्या खर्चासाठी त्याला त्या सरकारांतून जहागीर मिळाली होती. त्याचें त्या सरकारांत मोठे वजन असून त्याच्यासारखे बलाढ्य व शूर सरदार त्या वेळीं निजामशाहींत फारच थोडे होते. जाधवरावानें मालोजी व विठोजी यांस मोठ्या आनंदाने आश्रय दिला. प्रत्येकास पांच होन पगार देऊं करून शिवाय त्यांनी आपल्या पंक्तीस भोजन करावे असे ठरविलें. ही गोष्ट स. १५७७ त घडली.[२]

मालोजीराजे यांचें वृत्त

मालोजी शरीरानें मोठा धिप्पाड असे. तो इतका कीं, त्याच्या स्वारीस घोडे टिकत नसे. यास्तव जाधवरावानें त्याला देवडीवर ठेविलें. तो मोठा चतुर, हुशार व गुणी असल्यामुळें जाधवरावाचा त्याच्यावर लवकरच लोभ जडला. त्यानें त्यास मूर्तिजानिजामशहापाशीं नेऊन, हा मोठा नेकीचा व उमदा पुरुष आहे, अशी त्याची शिफारस केली. बादशहानें त्याची इभ्रत व हुशारी पाहून खुष होऊन त्याला आपल्या लष्करांत शिलेदारी दिली. मग मालोजी घरचीं घोडीं व बारगीर ठेवून निजामशहाची नोकरी करूं लागला, तरी तो जाधवरावाचा अंकितच होता असें दिसते.

मालोजीचें लग्न फलटणचा देशमुख जगपाळराव निंबाळकर याच्या बहिणीशीं झालें.[३] हिचे नाव दिपाबाई असें होतें. वर सांगितल्याप्रमाणे त्याला बढती मिळाल्यावर त्याचा संसार चांगला थाटला. त्याचा भाऊ विठोजी ह्यासही शिलेदारी मिळाली होती. ह्या विठोजीस आठ पुत्र झाले[४]; परंतु मालोजीस कांहीं एक संतती होईना. आपल्या पोटी मूल नाहीं म्हणून दिपाबाईस अतिशय वाईट वाटूं लागलें. त्या दंपत्याने पुत्रप्राप्तीसाठी पुष्कळ दानधर्म, अनुष्ठानें व नवससायास केले. शेवटी त्यानें नगरचा पीर शहाशरीफ यास नवस केला. प्रत्येक गुरुवारी मालोजी फकिरांस दानधर्म व खैरात करीत असे. असा क्रम त्यानें सतत सहा महिने चालविला. तेव्हां सुदैवानं दिपाबाई गरोदर होऊन स. १५९४ त तिला प्रथम पुत्ररत्न झालें. हा पुत्र आपणांस त्या पिराच्या अनुग्रहानें प्राप्त झाला असें मानून मालोजीने त्याचें नांव शहाजी असें ठेविले. नंतर दुसरा मुलगा झाला. त्याचे नाव शरीफजी असें ठेविले. शहाजी हा चांगला देखणा असून मोठा चलाख, हुशार व गुणी होता. त्याची वाणी मधुर असून चालचलणूक फारच मोहक असे. ह्या मुलाची चालचर्या

---

१ शेडगावकरांच्या बखरींत हा जन्मशक १५५२ दिला आहे.

२ मि. किंकेड व रा. ब. पारसनीस यांनी आपल्या मराठ्यांच्या इतिहासात मालोजी व विठोजी यांची ही हकीकत शेडगावकराच्या बखरीच्या आधाराने अशी दिली आहे की, हे दोघे बंधू प्रथम फलटणचा सरदार जगपतराव ऊर्फ वणगपाळ याच्या पदरी नोकरीस राहिले. तेथें ते आपल्या अंगच्या कर्तबगारीच्या व शौर्यवीर्यादि गुणांच्या योगाने मोठ्या योग्यतेस चढले. एके समयी ते आपल्या धन्याबरोबर एका तलावांत स्नान करावयास उतरले असता त्यांच्यावर विजापुरकरांच्या लोकांनी हल्ला केला. त्या समयी उभय पक्षाचे युद्ध झालें. त्यात मालोजी व विठोजी यांनी मोठ्या शौर्याने लढून शत्रूस पिटाळून लाविलें. ह्या त्यांच्या शौर्याची वार्ता पहिला मूर्तिजानिजामशहा याच्या कानी गेल्यावरून त्यानें त्यांस बोलावून आपल्या पदरी सरदाऱ्या दिल्या.

३ एकदोन बखरींत असें आढळतें की, मालोजी जाधवानें दिलेल्या कामगिरीने संतोष न पावून तो फलटणचा निंबाळकर जगपाळराव याजकडे गेला. त्यानें त्याची हुषारी पाहून आपली बहीण दिपाबाई ही त्याला दिली; पण त्याने ह्या वेळीं जाधवरावाचा आश्रय सोडला होतासें दिसत नाही. मि. किंकेड व रा. ब. पारसनीस शेडगावकरांच्या बखरीच्या आधाराने येथे असें म्हणतात की, लुखजी जाधवरावाच्या शिफारशीवरून ह्या जगपतरावानें (जगपाळरावानें) आपली बहीण मालोजीराजांस दिली.

४ त्यापैंकी नागोजी याचे वंशज बनसेंद्रे येथे अद्यापि आहेत.

पाहून जाधवरावास मोठे कौतुक वाटे. तो त्याला आपल्या घरीं वेळोवेळी घेऊन जाई व त्याला वस्त्राभरणें देऊन नटवी- सजवी, असे त्याचे अनेक प्रकारीं लाड करी. जाधवरावाला जिजाऊ नावाची दोनतीन वर्षांची एकुलती एक मुलगी होती. तिच्याबरोबर शहाजी तासांचे तास खेळे. अशी ह्या मुलांची मैत्री बालपणापासूनच जमली होती. शहाजी पांच वर्षांचा असतां शिमग्याचा सण आला. जाधवरावानें रंगपंचमीचा समारंभ करून मातबर लोकांस व आप्तांस आपल्या घरी आमंत्रण केलें. इतरांबरोबर मालोजीस आमंत्रण मिळाले. त्यावरून तो शहाजीस घेऊन समारंभास गेला. जाधवरावानें शहाजीस हाक मारून आपल्याजवळ बोलविले. तो जाऊन त्याच्या मांडीवर बसला. इतक्यांत जिजाऊ घरांतून धांवत येऊन आपल्या बापाच्या दुसऱ्या मांडीवर बसली. दोन्ही मुले बहुतेक समानवय व गोजिरवाणी पाहून जाधवराव सहज लडिवाळपणानें बोलला, 'मुली, हा तुला नवरा पाहिजे काय? खरोखर हा जोडा योग्य दिसतो!' इतक्यांत ही दोन्ही मुले जवळ असलेल्या तबकातील रंगगुलाल घेऊन एकमेकांवर उडवू लागली. ती त्यांची बालस्वभावास अनुरूप अशी क्रीडा पाहून सभेत बसलेल्या लोकांस मोठे कौतुक वाटलें व ते हसून म्हणाले कीं, जोडा योग्य आहे.' तेव्हां मालोजी व विठोजी उठून सभासदास म्हणाले, 'ऐका हो, जाधवराव आजपासून आमचे व्याही झाले व जिजाऊ आमची सून झाली. ते आता काय बोलले तें तुम्ही सर्वांनीं ऐकिलेंच आहे. आतां हा निश्चय बदलणार नाही. थोर लोक सभेत बोलल्यावर मागें सरणार नाहींत!' ह्याप्रमाणे सर्व सभाजनांस साक्षी ठेवून ते खाली बसले. तें त्यांचें बोल ऐकून सभेतील लोक म्हणाले कीं, 'प्रमाण आहे.' जाधवराव हा प्रकार पाहून अगदीं चकित झाला. त्यानें त्या वेळीं कांहींएक उत्तर केलें नाही.

दुसरे दिवशी जाधवरावानें सर्व आप्तांस भोजनाचे आमंत्रण दिलें. इतरांबरोबर मालोजीसही बोलावूं पाठविलें. मालोजींने उलट असा निरोप दिला कीं, 'आम्ही तुम्ही व्याही झालो. आतां तुमच्याबरोबर भोजन लग्नसमारंभाच्या वेळीं होईल. मध्यंतरी आम्हांस बोलावू नये!' ही गोष्ट जाधवरावाची स्त्री म्हाळसाबाई हिला कळली. तेव्हां ती मालोजीचा हा उद्दामपणा पाहून फारच रागावली. जाधवरावासारख्या मातबर मनसबदाराशी मालोजीसारख्या यःकश्चित् शिलेदारानें सोयरीक करूं पाहणे हें अर्थात् मोठेच धाडस होतें. म्हाळसाबाई आपल्या नवऱ्यास म्हणाली, 'आपल्या तोंडून सभेत शब्द गेला हें अनुचित झालें. ते उठून बोलले त्या वेळी त्यांस लागलीच धमकी द्यावी ती आपण दिली नाहीं. त्या वेळीं उगीच बसला हें ठीक झाले नाहीं. मालोजी आपल्या पदरचा नोकर. त्याच्या घरीं मुलगी दिल्याने लोकापवाद होणार. निंबाळकर, शिर्के, महाडीक असे बरोबरीचे सरदार, मनसबदार, देशमुख आहेत. त्यांच्या घराण्यांत मुलगे आहेत, ते टाकून मालोजीच्याच मुलास मुलगी द्यावयाची ती एवढी त्याची मातबरी तरी काय पाहिली?' जाधवरावानें तिचे असें समाधान केलें कीं, 'मी सभेत सहज विनोदाने बोललो. माझें त्याबद्दल वचन कांहीं गुंतले नाही.' मग त्याने मालोजीस परत असे सांगून पाठविलें कीं, शरीरसंबंधाची गोष्ट बिलकूल बोलू नका. आमच्या घरात ती कोणाच्या विचारास येत नाही. सभेत मी बोललो तें केवळ विनोदाचे होतें. तें खरे समजून हट्ट धरून बसणे समजूतदार मनुष्यास शोभत नाही. भोजनास अवश्य यावें. पुढें ब्रह्मसूत्र असेल तसें घडून येईल!' त्यावर मालोजीचा असा जबाब आला कीं, 'इतक्या लोकांसमक्ष आपण बोलला तें अप्रमाण कसें होईल? आम्हांस आपल्याशी सोयरीक अवश्य कर्तव्य आहे!' हा त्याचा उद्धटपणाचा जबाब ऐकून जाधवरावास अतिशयित क्रोध आला. भोजन आटोपल्यावर त्यानें कारकुनास बोलावून आणून असा हुकूम केला कीं, मालोजीचा व विठोजीचा जो कांहीं हिशोब झाला असेल तो त्यांस चुकता करावा व नोकरी सोडून आताच्या आतां मुलेमाणसे घेऊन येथून जावयास सांगा. ह्याप्रमाणें जाधवरावाची नोकरी सुटून त्या दोघां बंधूस वेरूळगांवी जाऊन रहावे लागलें व पुनः त्यांच्या हाती नांगर आला!

ह्या अपमानामुळे मालोजीस पराकाष्ठेचे वाईट वाटलें. आपली योग्यता मोठी नाही, आपल्यापाशी दौलत नाही म्हणून जाधवरावानें आपला हा उपमर्द केला, तर आतां आपली योग्यता हरउपायानें वाढवावयाची असा निश्चय त्यानें केला. त्याला रात्रंदिवस हाच ध्यास लागून राहिला. सभेत सर्वांदेखत केलेला करार मोडून जाधवराव मुलगी दुसऱ्यास

देणार, ही आपली मोठीच अप्रतिष्ठा झाली, याहून मरण पुरवले, असें त्या मानी पुरुषास वाटून त्याच्या चित्तास सारखी तळमळ लागून राहिली. मनाच्या अशा उद्विग्न स्थितींत असतां ते दोघे बंधू एके दिवशी रात्री आपल्या शेताची राखण करावयाकरितां गेले. ती माघ महिन्यांतील पूर्णिमेची रात्र होती. ते शेत आळीपाळीने राखीत बसले. पहिल्याने विठोजी निजला आणि मालोजी जागत बसला. तो बसला त्या जागी एक वारूळ होतें. कांहीं वेळ गेल्यावर त्या वारुळांतून भवानीचा सुवर्णकंकणमंडित असा देदीप्यमान हस्त हळूच बाहेर निघून त्यानें त्यास पालविल्याचा भास झाला व तो असा हलून एकदम अदृश्य झाला. मालोजीनें विठोजीस उठवून आपणांस झालेला दृष्टांत सांगितला. विठोजी म्हणाला, 'हा दृष्टांत लटका आहे. मग तो जागत बसला आणि मालोजी झोपी गेला. तो निद्रिस्त होताच त्याला स्वप्न पडलें. त्यांत भवानीदेवी शुभ्र पातळ नेसलेली, कपाळी कुंकुममळवट भरलेली व सर्व अलंकारांनी युक्त अशी त्याच्यापुढे उभी राहिली, व त्याच्या पाठीवर हात मारून त्यास जागृत करून म्हणाली, 'मी तुला सर्व प्रकारे प्रसन्न झालें आहें. त्या वारुळांत सर्प आहे तें स्वरूप माझें आहे. त्यास नमस्कार करून ते वारूळ खण म्हणजे त्यांत तुला द्रव्य सापडेल, तें तूं घे. सर्प निघून जाईल. त्याच्या वाटेस जाऊ नको. तुझ्या वंशास सत्तावीस पिढ्या राज्य दिलें आहे.' हें स्वप्न पडल्यावर मालोजी जागा झाला व तें त्यानें आपल्या भावास निवेदन केलें. मग त्या दोघां बंधूंनी स्वप्नातील दृष्टांताची प्रतीती पाहण्याचा विचार करून तें वारूळ खणले. त्यांत त्यांस पुष्कळ द्रव्य सापडले. तें त्यांनीं घरीं आणून मागल्या दारीं परसात पुरून ठेविले.[१]

हा अवचित धनलाभ झाल्यामुळें मालोजीस मोठा हुरूप आला. त्यानें लोकांत असा प्रवाद पसरविला कीं, आपणांस श्रीभवानी प्रसन्न झाली असून तिने आपणांस पुष्कळ द्रव्य दाखविले आहे, व आमच्या कुळांत शककर्ता उत्पन्न होईल असा वर दिला आहे.[१] नंतर त्यांनीं तें द्रव्य, श्रीगोंदे येथें शेषावा नाईक पांडे ह्या नांवाचा एक सावकार राहात असे, त्याच्या घरी नेऊन ठेविले. ह्या सावकाराचा व त्यांचा पुष्कळ दिवसांचा घरोबा होता. त्याच्या मदतीने मालोजींने हजार घोडीं खरेदी करून पुष्कळ बारगीर व शिलेदार नोकरीस ठेविले. तो पहिल्यापासूनच धर्मशील होता. त्यांत आणखी ही द्रव्यप्राप्ती दैवी प्रसादाने झाली असें वाटून त्याचा भाविकपणा विशेषच वाढला. प्राप्त झालेल्या द्रव्याचा विनियोग धर्मकृत्यांकडे करावा अशी त्याच्या मनाची प्रवृत्ती झाली. ज्या शेतातल्या वारुळांत तें द्रव्य सापडले तें त्यानें ब्राह्मणांस दान केलें व त्या वारुळावर एक सुंदर देवालय बांधिलें. सातारा जिल्ह्यांत शंभुमहादेवाचा डोंगर आहे, त्याच्या शिखरावर चैत्र महिन्यांत मोठी यात्रा भरत असे. ह्या यात्रेस पाचसात लाख माणसे जमत. ह्या वेळीं तेथें पाण्याचा फारच तोटा येत असे. यात्रेकरूंस तीन-तीन कोसांवरून पाणी आणावे लागे. हा त्रास कमी करण्याच्या उद्देशाने मालोजीनें त्या डोंगरावर एक उत्तम स्थल पाहून तेथें विस्तीर्ण तलाव बांधिला. ह्या कामी त्यानें पुष्कळ पैसा

---

१ ग्रांट डफ म्हणतो कीं, हे द्रव्य मालोजीनें कोणास तरी लुटून मिळविले असावें. हा असा निराधार तर्क करण्याचें काहीएक प्रयोजन नाहीं. कारण त्या धामधुमीच्या व राज्यक्रांतीच्या काळी द्रव्य लपवून सुरक्षित ठेवण्याचा मुख्य उपाय म्हटला म्हणजे तें जमिनींत पुरून ठेवावें हा असे. हें लक्षांत आणिलें म्हणजे त्यास हा असा आकस्मिक द्रव्यलाभ झाला यात कांहीं गूढ मानण्याजोगे नाही. मि. किंकेड शेडगावकराच्या बखरीच्या आधाराने हा धनलाभाचा प्रकार निराळाच देतात. ते म्हणतात की, हे दोघे बंधु फलटणच्या जगपाळरावापाशीं नोकरीस राहण्यापूर्वी त्याना हा धनलाभ झाला. तो असा : एके दिवशी विठोजी प्रातःकाळी शेतावर गेला असून सायंकाळपर्यंत घरी आला नाहीं म्हणून मालोजी त्याला पाहावयास गेला. तो एका दाट रानातून चालला असता काळोख पडला आणि तेथें त्याला भवानीने दर्शन देऊन असा वर दिला कीं ''तुझ्या घराण्यात शिव अवतार घेईल. तो हिंदुधर्माची पुनरपि स्थापना करून मुसलमानास देशातून हाकून देईल आणि हिंदूंचे राज्य स्थापील. ते २७ पिढ्या चालेल. शेवटला राजा आंधळा असेल.'' मग तिने एक वारूळ दाखवून ते खणले असता त्यात द्रव्य सापडेल असे सांगितले.

खर्चिला. हा तलाव बांधून त्यांत विपुल पाणी झाल्यावर मालोजीनें तेथें ब्राह्मणभोजन घातले व फकिरांस खैरात देवविली. ह्याशिवाय आणखी तेथें त्याने धर्मशाळाही बांधिल्या. वेरूळ येथें कृष्णेश्वराचे देवालय अगदी जीर्ण झालें होतें, त्याची त्यानें डागडुजी केली व त्या गांवाजवळ एक तलाव बांधिला. ह्याप्रमाणें आणखी कित्येक ठिकाणी तळी, विहिरी वगैरे बांधून त्यानें क्षेत्राच्या ठिकाणी पुष्कळ दानधर्म केला.

ह्याप्रमाणें अनेक धर्मकृत्ये करून त्यानें मातबरपणाविषयीं व पुण्यशीलपणाविषयीं लौकिक संपादिला. मग त्यानें आपला मूळ हेतू सिद्धीस नेण्याचा उद्योग पुन: सुरू केला. वर सांगितल्याप्रमाणें त्यानें हजारबाराशें स्वार पदरी बाळगून आपला इतमाम बराच वाढविला व जाधवरावापाशी मुलीविषयी पुनः मागणी केली; परंतु जाधवराव कांही केल्या त्याच्याशी शरीरसंबंध करण्यास राजी होईना. तेव्हां मालोजीनें जाधवरावाच्या ताब्यातील परगण्यांत धामधूम सुरू केली व निंबाळकरास भेटून असें सांगितलें कीं, जाधवराव मुलगी देण्याचे कबूल करून आतां देत नाहीं म्हणतो. यास्तव त्याची खोड मोडण्याकरिता आम्हांस दोन हजार स्वारांची कुमक द्यावी. ही कुमक मिळाल्यावर त्यानें जाधवरावाच्या जहागिरीस उपद्रव देण्याचा क्रम चालू ठेविला. इतकेही करून जाधवराव आपला हटाग्रह सोडीना. तेव्हां त्यानें पुढील युक्ति योजिली. निंबाळकराच्या स्वारांनिशीं मालोजी व विठोजी श्रीगोंद्यास आलें. तेथें सगळे अडगळ सामान ठेवून निंबंद व्होऱ्याचा घाट उतरले व नेवासे गावावरून जाऊन गोदावरीच्या अलीकडे आले. तेथें त्यांनी पारध करून दोन डुकरे मारून ती दौलताबादेजवळच्या मशिदींत टाकिलीं आणि त्या डुकरांच्या गळ्यात चिठ्ठ्या बांधिल्या. ह्या चिठ्ठ्यात त्यांनीं निजामशहाला असा अर्ज केला कीं, जाधवरावानें आमच्या मुलास मुलगी देण्याचे भरसभेत कबूल केलें असून आतां बायकोच्या सांगण्यावरून वचनास फिरला आहे व त्यानें आम्हांस नोकरीवरूनही दूर केलें आहे. यास्तव आम्ही निरुपाय होऊन निंबाळकरांचा आश्रय धरून हा प्रकार केला आहे. ह्याउपर बादशहा आमची दाद घेऊन जाधवरावाशीं आमची सोयरीक करून देईल तर उत्तम; नाहीं तर आम्ही असाच प्रकार दुसऱ्या मशिदींतही करूं.'[१] हा भ्रष्टाकार निजामास कळला तेव्हां त्याला जाधवरावाचा अतिशयित राग आला आणि त्यानें त्याला आपल्या हुजुरास तत्काळ बोलावून आणून पुष्कळ दम दिला. तो जाधवरावास म्हणाला कीं, तुम्ही करार करून आतां नाहीं म्हणतां हें उचित नव्हे. तुमच्यामुळे आमच्या मशिदींत हा भ्रष्टतेचा प्रकार मालोजी भोंसल्यानें केला आहे. तुम्ही हा कलह विनाकारण माजविला आहे. तरी आतां मालोजीच्या मुलास मुलगी देऊन त्याच्याशी समेट करा!' त्यावर जाधवरावानें असा जबाब दिला कीं, 'भोसल्यांच्या मुलास मुलगी देण्यासंबंधाने अपमान करण्याचें कारण एवढेच कीं, त्यांची आमची योग्यता सारखी नाहीं. एरवीं ते आमचे आप्तच आहेत. आमच्या घरांत सर्वांचा विचार असा आहे कीं, समान स्थल पाहून मुलगी द्यावी!'

हा त्याचा जबाब ऐकून बादशहास वाटलें कीं, आपण सांगत असतां हा ऐकत नाहीं; उद्दामपणा दाखवितो; तरी ह्याचा गर्व हरण करण्यासाठीं मालोजीस चांगली मनसब देऊन योग्यतेस चढवावे. खरें म्हटलें असतां हा मोठा अपराध केल्यामुळें मालोजी व विठोजी यांचें शासन करण्याचा विचार त्यांच्या मनांत यावा; परंतु तो काळ निजामशाहीस प्रतिकूल होता. मोगलांची त्या राज्यावर एकसारखी वक्रदृष्टी असून, ते बुडवून टाकण्याचा निर्धार अकबरबादशहानें केला होता. अशा आणीबाणीच्या वेळीं आपल्या राज्यांतील मराठे सरदारांत कलह माजून, त्यांपैकीं काही शत्रूस जाऊन मिळाल्यानें आपला पक्ष तितका कमजोर होईल असा विचार बादशहाने करून मालोजीस आपलासा करण्याचा

---

१ मि. किंकेड म्हणतात की, जाधवरावानें मुलगी देत नाहीं असें सांगितलें तेव्हां मालोजी तुळजापूरच्या भवानीच्या दर्शनास गेला आणि तिच्या पुढें दंडवत घालून त्यानें आपलें गाऱ्हाणें तिला निवेदन केलें. नंतर रात्री देवीने स्वप्नांत येऊन त्याचा मनोरथ पूर्ण होईल असे आश्वासन दिलें. मग त्यानें परत अहमदनगरास येऊन लखुजी जाधवास आपला अपमान केल्याबद्दल द्वंद्वयुद्धास आवाहन केलें. हें त्यांचें भांडण मूर्तिजाच्या कानावर जाऊन त्यानें मध्यस्थी केली आणि जाधवाला शहाजीस मुलगी द्यावयास भाग पाडलें.

बेत केला. मग त्यानें मालोजी व विठोजी यांस मोठ्या स्नेहस्वभावानें बोलावून आणून प्रत्येकी बारा हजार[१] स्वारांची मनसब दिली व मालोजीस राजे हा किताब देऊन शिवनेरी व चाकण हे किल्ले व त्यांसभोंवतालचा मुलूख सरंजामादाखल दिला आणि पुणे व सुपे ह्या परगण्यांची जहागीर करून दिली.[२] हें वर्तमान स.१६०४ च्या मार्च महिन्यांत घडले.

ह्याप्रमाणे मालोजीचा पक्ष बादशहाने घेऊन त्याची योग्यता वाढविली, हे पाहून जाधवरावाला त्याची मागणी इतःपर नाकबूल करवेना. बादशहाने उभय पक्षास आपली कुटुंबे व आप्त यांस दौलताबादेस आणावयास सांगितलें आणि विवाहसमारंभ आपल्या समक्ष करविला. खुद्द बादशहा समारंभास हजर राहिल्यामुळें दरबारचे एकूणएक अमीर आले होते. अशा प्रकारे शहाजी व जिजाबाई यांचा विवाह मोठ्या थाटाने झाला. मालोजीनें ह्या समयी पुष्कळ खर्च केला. दरबारच्या सगळ्या अमिरांस टोलेजंग मेजवानी दिली व ब्राह्मणास दानधर्म व फकिरांस खैरात केली. हा विवाह स. १६०४ च्या एप्रिल महिन्यांत झाला. ह्याप्रमाणे मालोजीचा हेतू सिद्धीस जाऊन वरती आणखी त्यास मनसब व राजे हा किताब मिळाला.

ह्या विवाहानंतर मालोजीराजे निजामशाही राज्याचे मनसबदार होऊन त्या गडबडीच्या काळी त्या सरकारास फार उपयोगी पडले. ते मोठे शूर व हुशार असल्यामुळें त्याचें दरबारांत तेज पडूं लागलें. सरकारच्या अनेक बिकट कामगिऱ्या करून त्यांनी दरबारची शाबासकी मिळविली. ह्याप्रमाणें मालोजीरावाच्या हट्टास्तव बादशहाने त्यांस जी ही एकदम मोठी मनसब दिली तीस ते सर्वथैव पात्र होते असें निदर्शनास आलें. सरकारचे मुत्सद्दी मोठमोठ्या कामांत त्यांची मसलत घेऊं लागले. शिवाय त्यांचा स्वभाव मोठा प्रेमळ व परोपकारी असल्यामुळे दरबारचे लोक त्यांना सर्वदा अनुकूल असत. शहाजी बापाबरोबर नेहमीं दरबारात जात असे. तो मोठा देखणा, कुशाग्रबुद्धि, आर्जवी व सुशील असल्यामुळें बादशहाची त्याच्यावर फारच मर्जी बसली व दरबाराच्या अमीरउमरावांसही तो फार आवडू लागला. मालोजीराजे आपल्या मनसबदारीचा पंधरा वर्षे मोठ्या इभ्रतीनें उपभोग घेऊन व दरबारांत आपलें वजन अतोनात वाढवून सन १६१९ त मृत्यू पावले आणि निजामशहानें त्याची दौलत व मनसब शहाजीराजे यांस दिली.

***

१ ही मनसब फक्त मालोजीस दिली असून ती पाच हजाराची होती असें कित्येक ठिकाणी म्हटलें आहे. कित्येकाचें असें म्हणणें आहे की, मालोजीनें जगदेवराव निंबाळकराच्या मार्फत निजामशाही दरबाराकडे फिर्याद केली; परंतु निंबाळकर आदिलशाहीला सरदार असल्याकारणानें त्याचे निजामशहाशी काहीं सूत होतें किंवा कसें याची शंका वाटते.

२ ह्या वेळीं मालोजीस मिळालेल्या जहागिरीची यादी शि. दि. यात फार मोठी आहे. ती खरी आहे असें मानिल्यास त्याला पुणे, नाशिक, अहमदनगर व खानदेश एवढ्या प्रांतातील काही परगणे मिळाले होते असें म्हणावे लागतें. पण त्या सुमारास यातल्या काहीं प्रांतांवर मोगलाचा अंमल बसला असल्याकारणाने हे संभवनीय दिसत नाही.

भाग दुसरा

शहाजीराजे यांचे वृत्त

निजामशाहींतील नोकरी

शहाजीराने यांस मनसबदारी मिळाली त्या वेळी निजामशाही राज्याचा कारभार मलिकंबर पाहत होता. आतां येथे पहिल्याने ह्या सरकारची त्या काळी कशी काय स्थिती होती तें थोडक्यात सांगतो. सन १६०० त अकबर बादशहाने अहमदनगर काबीज केलें व चांदबिबी सुलताना हिचा खून तिच्याच पदरच्या सरदारांकडून झाला. तिने निजामशाही तक्तावर बहादूर निजामशहा ह्या नांवाचा जो एक बालराजा बसविला होता. तो मोगलांच्या हाती लागला व त्यांनी त्याला ग्वाल्हेरच्या किल्ल्यांत[१] नेऊन कैदेत ठेविले ह्याप्रमाणे निजामशाही राजधानी व निजामशहा शत्रूंच्या हातीं लागला असतां, मलिकंबरानें मुळींच न डगमगता लोकांची पुनः जूट केली व निजामशाही तक्तावर दुसरा एक अल्पवयी वारस बसवून त्यास दुसरा मूर्तिजा[२] निजामशहा असे नांव दिलें आणि त्यास दौलताबादच्या मजबूत किल्ल्यांत नेऊन ठेवून तेथें बहिरी घराण्याचें निशाण त्यानें पुनः उभारले. ह्या प्रकारे मलिकंबराच्या हाती सर्व सत्ता येऊन हबशी लोकांचा दरबारांत वरचष्मा झाला. त्यामुळें निजामशाहींतील मराठे सरदारांच्या मनांत वैषम्य येऊन राज्यांत दोन फळ्या झाल्या. मराठे सरदारांच्या फळीचा प्रमुख मिआन राजू नामेंकरून एक सरदार होता. मलिकंबर व मिआन राजू यांनी निजामशाहीचा जो मुलूख मोगलांनी काबीज केला होता त्यापैकीं बराच परत घेतला. मिआन राजूने दौलताबादेपासून उत्तरेस गुजराथेपर्यंत व दक्षिणेस अहमदनगरपर्यंत सगळा मुलूख आपल्या कबजांत घेतला व दक्षिणेकडचा सगळा प्रांत मलिकंबराच्या हातीं आला. हे दोघेही सरदार आपण निजामशहाचे अंकित आहो असे बाह्यात्कारी म्हणत; परंतु वास्तविक सत्ता त्यांनी आपल्या हातीं ठेविली होती. मूर्तिजा निजामशहास आवशाच्या किल्ल्यांत ठेविले असून त्याच्या खर्चासाठी त्या किल्ल्याच्या सभोंवतातील कांही गांवांचे उत्पन्न लावून दिलें होतें.

पुढें मिआन राजूनें मोगलांशी सख्य करून मलिकंबराबरोबर युद्ध चालविले; परंतु त्यात मलिकंबराची सरशी होऊन मिआन राजू त्याच्या हातीं लागला आणि मराठे सरदारांची फळी फुटून सगळे मलिकंबराचे अंकित झाले. ह्याप्रमाणें प्रतिपक्षास हतवीर्य करून मलिकंबर निर्वेधपणें कारभार पाहूं लागला. त्यानें सर्व राज्याचा बंदोबस्त यथास्थित करून जमाबंदीची उत्तम शिस्त लाविली. ह्या सुधारणेबद्दल त्याचा महाराष्ट्रात मोठा लौकिक झाला. पुढें त्यानें स. १६१० त दौलताबादेजवळ खडकी[३] नांवाचे नवे शहर वसवून तेथें निजामशाही तक्त नेले. त्यानें मोगलांशी अनेक युद्धप्रसंग करून पुष्कळ यश संपादिलें. अहमदनगर मोगलांच्या हातीं गेलें होतें तें त्यानें पुनः काबीज केलें. ह्याप्रमाणे

---

१ कोणी म्हणतात की, त्याला आग्रा येथें नेऊन कैदेत ठेविले होतें.

२ प्रो. जदुनाथ सरकार याला बुराण निजामशहा म्हणतात. दुसरे बहुतेक इतिहासकार याचे दुसरा मूर्तिजा निजामशहा हेंच नाव देतात. आता एवढे मात्र खरे की, याच्या आजाचे नाव पहिला बुराण निजामशहा असें होतें. यास्तव गादीवर बसण्यापूर्वी याचे नाव कदाचित बुराण निजामशहा असे असावे.

३ ह्याच शहरास पुढें औरंगजेबानें औरंगाबाद असें नाव दिले.

मलिकंबर प्रबळ होऊन मोगलाचे कांही चालू देईना, तेव्हां दिल्लीचा बादशहा जहांगीर याने आपला पुत्र शहाजहान यास मोठे सैन्य देऊन निजामशाही मुलूख पुनरपि काबीज करण्यासाठी दक्षिणेत स. १६१७ त रवाना केलें व त्याच्या मागोमाग आपणही सैन्य घेऊन निघाला. मोगल सैन्याची व मलिकंबराची स. १६२० त मोठी निकराची लढाई झाली. या युद्धांत मराठे सरदार मोठ्या शौर्याने लढले. शहाजीराजे यांच्या अंगच्या शौर्यवीर्यादी गुणांचे निदर्शन पहिल्याने ह्याच युद्धांत झालें. मलिकंबराचा पराभव होऊन त्यास मागें हटावे लागलें. तरी शहाजीराजे यांनी कच न खाता मोगलांच्या सैन्यावर वेळोवेळी छापे घालून त्यास पुरेपुरे करून सोडिलें. ह्या मर्दुमकीस्तव त्यांची निजामशाही दरबारांत मोठी वाहवा झाली. ते मोठे शूर व युद्धकुशल सरदार आहेत अशी सर्वांची खात्री झाली. मलिकंबराचा त्यांच्यावर फारच लोभ जडला.

शहाजहानानें पाहिले कीं, मराठे सरदारांचे पाठबळ आहे तोपर्यंत निजामशाही पादाक्रांत होणें कठीण आहे. यास्तव त्यानें त्यांच्यांत फंदफितुरी आरंभिली. लुखजी जाधवराव वगैरे सरदारांस त्यानें मोठी लालूच दाखवून वश करून घेतलें. ह्या सरदारांचें मलिकंबराशी चांगलेंसें पटत नसल्यामुळें ते ह्याप्रमाणें फितूर झाले. असें सांगतात कीं, लुखजी जाधवरावास मोगलांकडून चोवीस हजारांची मनसब प्राप्त झाली.[१] शिवाय त्याच्या कित्येक आप्तांसही मोठमोठ्या मनसबा मिळाल्या. हें वर्तमान स. १६२१ त घडले. शहाजीराजे मात्र मोगलांच्या ह्या लालचीस भुलले नाहींत. ते मलिकंबराचा पक्ष धरून राहिले.

ह्याप्रमाणे फितुरी होऊन आपला पक्ष दुर्बळ झाला असें पाहून मलिकंबरानें निरुपायास्तव अहमदनगर व त्या भोवतालचा मुलूख मोगलांस देऊन त्याशीं सख्य केलें. पुढें शहाजहानास दिल्लीकडे जावे लागलें. ही संधी साधून मलिकंबराने मोगलांच्या सैन्यास हाकून देऊन त्यांच्या हातीं गेलेला मुलूख पुनरपि काबीज केला. नंतर शहाजहान पुनः दक्षिणेत आला व फितूर झालेल्या मराठे सरदाराच्या साहाय्याने मलिकंबरानें घेतलेला मुलूख त्यानें पुनरपि हस्तगत केला. ह्यावेळी मलिकंबर फारच जेरीस आला. शहाजीराजे यांनीं त्यास मोठ्या इमानाने साहाय्य केलें; परंतु मोगलांचे सैन्यबळ प्रचंड असल्यामुळें त्याचें काहीएक चालेना. तेव्हां अशा प्रबळ शत्रूशी भांडत राहून निजामशाही बुडवावी त्यापेक्षा त्याशी तह करून सलोखा करावा, असा मलिकंबरानें विचार केला व त्याप्रमाणें त्यांशी संधी करून तो त्यांच्या तावडीतून बरेपणीं सुटला. यानंतर त्यानें मोगलांशी विरोध असा कधीही केला नाही. ह्यापुढे मलिकंबर फार दिवस जगला नाहीं. एकाएकीं रोग होऊन स. १६२६ त त्याचे देहावसान झालें. मरणसमयी त्याचें वय ८० वर्षांचे होतें.

मलिकंबर मरण पावतांच मोगलांनी लुखजी जाधवरावाच्या मदतीने निजामशहाशी पुनः युद्ध सुरू केलें. ह्या सुमारास जहांगीर बादशहा मरण पावल्यामुळें शहाजहानास दिल्लीस जावे लागलें. तेव्हा त्यानें जाधवरावाच्या मदतीस काहीं फौज ठेवून दिल्लीकडे कूच केलें. ह्या वेळीं शहाजीराजांनी साबाजी अनंतनामक एका चतुर पुरुषाच्या साहायानें अल्पवयी मूर्तिजा निजामशहाच्या आईचा आपल्यावर पूर्ण भरवसा बसवून निजामशाहीचा सगळा कारभार आपल्या हातीं घेतला होता आणि दौलताबादेवर मोगल चालून आले तेव्हां निजामशहास व त्याच्या आईस तेथून काढून

१ काही बखरीत लुखजी जाधवराव मोगलास जाऊन मिळाल्याचें कारण येणेंप्रमाणें दिलें आहे; दुसरा मूर्तिजानिजामशहा मरण पावल्यावर त्याचे दोघे लहान मुलगे सहासात वर्षांचे होते. बादशहाच्या स्त्रियांनी, साबाजी अनंत म्हणून एक चतुर पुरुष निजामशाहीत मुत्सद्दी होता, त्याला विचारले की, वजिरी चालविण्यास लायक असा पुरुष आपल्या राज्यात कोण आहे, तेव्हा त्यानें शहाजीराजे याचे नांव सांगितले. त्यावरून त्यानी त्यास वजिरी देऊन सर्व राज्यकारभाराचा कुलअखत्यार दिला. शहाजीराजे निजामशहाच्या मुलास आपल्या मांडीवर घेऊन तक्तावर बसत, व लुखजी जाधवराव वगैरे मोठमोठ्या सरदारास तक्तापुढें येऊन कुर्निसात करावी लागे. जाधवरावास ह्याबद्दल फारच वाईट वाटूं लागलें. जो कुणबी आपल्या देवडीवर एक वेळ चाकर होता, त्याच्या पोराची अशी बढती होऊन त्यानें मसनदीवर बसावे आणि आपण त्याच्या समोर उभे राहून मुजरा करावा. ह्यात आपला पाणउतारा होत आहे, असें जाधवरावास वाटून त्याच्या मनात त्या सरकाराविषयीं वैषम्य आलें. मग त्यानें दिल्लीच्या बादशहाकडे आपला वकील पत्र देऊन पाठविला आणि त्यास निजामशाहीवर स्वारी करावयास सांगितले. त्यानें मीरजुमलानामक एका सरदारास साठ हजार फौज देऊन जाधवरावाच्या मदतीस पाठविलें. त्यास जाधवराव व दुसरे काही मराठे सरदार जाऊन मिळाले.

कल्याणाजवळ माहुली नांवाचा एक किल्ला कासार घाटांत आहे तेथें नेऊन ठेविले. ह्या किल्ल्यास जाधवरावानें मोगल सैन्यानिशीं वेढा दिला. शहाजीराजांनी सहा महिने किल्ला लढवून शत्रूस बिलकूल दाद दिली नाहीं. तरी शत्रूचा वेढा कांहीं केल्या उठेना. मोगलांचे अधिकाधिक सैन्य किल्ल्यासभोंवार जमा होऊं लागलें. इतकें झालें तरी शत्रूशी शेवटपर्यंत टक्कर देण्याची हिंमत शहाजीराजांस होती. खरें पाहता निजामशाहीचें रक्षण करण्यास इमानाने व शौर्यानें झटणारा पराक्रमी सरदार त्यावेळी शहाजीराजांवांचून कोणीही नव्हता; परंतु त्या पडत्या काळी निजामशहाच्या आईला दुर्बुद्धी सुचल्यामुळे राजाचे मन उदास होऊन त्यांस आपल्या धन्यास सोडून जावे लागलें. लुखजी जाधवरावानें निजामशहाच्या आईशी मिलाफाचें बोलणे लावून तिला वश करून घेतलें व निजामशाही अजिबात बुडविण्याचा घाट घातला. हें पाहून शहाजीराजांस फार वाईट वाटलें. त्यांनी असा विचार केला की, खावंदच बेदील झाला तर त्याच्या वतीने लढून आपला प्राण धोक्यांत घालण्यांत काय अर्थ आहे? आपण याचे सेवक म्हणवून येथवर निमकहलालीनें वागलो, त्याचें यापुढें कांही चीज होईलसें दिसत नाहीं. तेव्हां आपल्यामुळे पादशाहत बुडाली हें अपयश कशास घ्यावे? आपणच येथून निघून जा हें उत्तम. असा बेत करून व तो निजामशहास व त्याच्या आईस कळवून त्यांनी आपल्या निवडक विश्वासू लोकांनिशी किल्ल्यांतून निघून जाण्याची सिद्धता केली. मग एके रात्रीं अकस्मात् किल्ल्याबाहेर पडून, शत्रूची फळी फोडून ते पार निघून गेले. जाधवरावाला हेंच हवें होतें. शहाजीराजे किल्ल्यांतून पळून गेल्याचे वर्तमान त्यास कळताच तो त्यांच्या पाठलागास निघाला. हा पाठलाग जाधवरावानें कित्येक दिवस मोठ्या आवेशाने व नेटाने चालविला. ही श्वशुरजामातांची धरपकड फलटणपर्यंत झाली. तेथपर्यंत शहाजीराजांना त्याने बिलकूल गांठले नाही. फलटणच्या सरहद्दीवर पोचताच जाधवरावानें लागलीच माघार खाल्ली. कारण त्याला ठाऊक होतें कीं, निंबाळकरांचें साहाय्य मिळून शहाजीराजांला अंमळ जोर आला कीं, ते आपणावर उलटून आपली दाणादाण करण्यात कदापि चुकणार नाहींत.

शहाजीराजे माहुली किल्ल्यांतून निघाले त्या वेळीं त्यांची बायको जिजाबाई व त्यांचा मुलगा संभाजी, जो त्या वेळी तीनचार वर्षांचा होता, ही त्यांच्या बरोबर होतीं. जिजाबाई त्या वेळीं सात महिन्यांची गरोदर होती. पाठीवर शत्रू असल्यामुळें त्यांना मोठ्या वेगाने दौड करावी लागली. जिजाबाईस घोड्यावर बसवून नेत होतें. कांहीं कोस दौड झाली न झाली तो तिच्या पोटांत दुखून येऊन अशा वेदना होऊं लागल्या कीं, तिच्याने एक पाऊल पुढे जाववेना, तेव्हां तिला कोठे तरी सुरक्षित स्थळी ठेवून पुढें जावे असा राजांनी बेत केला. ह्यावेळी जुन्नरास श्रीनिवासरावांचे ठाणे होतें. हा तेथें स्वतंत्र होऊन बसला होता. ह्याचे व शहाजीराजांचे पूर्वीपासून सख्य होतें. यास्तव जिजाबाईस त्याच्या आश्रयाने शिवनेरी किल्ल्यांत ठेविले व तिच्या रक्षणार्थ कांही स्वार व इतर लोक दिलें.[१] शहाजीराजे पुढें निसटून गेल्यावर मागोमाग जाधवराव त्या किल्ल्यापाशीं आला, तेव्हा लोकांनी त्याला असें सांगितले कीं, शहाजीराजांचे आणि तुमचे वैमनस्य असलें तरी मुलीने कांहीं तुमचा अपराध केलेला नाहीं. यास्तव तिला भेटून तिच्या रक्षणाविषयीं योग्य तजवीज करावी. ती मोगलांच्या हातीं लागली असतां विटंबना कोणाची होणार याचा विचार करा. हा बुद्धिवाद ऐकून जाधवरावांचें मन द्रवले आणि तो तिच्या भेटीस गेला. तिने त्याला पुष्कळ दोष देऊन म्हटले; 'त्यांच्या ऐवजी मी आतां तुमच्या हातीं सापडले आहें. जें कांहीं पारिपत्य करावयाचें तें मला करा.' जाधवरावानें तिला पोटाशी धरून म्हटलें; 'होणारासारखी बुद्धी सुचून वैमनस्य पडलें, त्याला काही इलाज नाहीं. तुला आता कोठे जावयाचें तें सांग. सिंदखेडास चलत असलीस तर तुला मी तिकडे सुरक्षितपणे पोचविण्याची व्यवस्था करितो.' ती म्हणाली, 'मला येथेंच रहावयाचें, माहेरी जावयाचें नाही.' तिचा असा निश्चय पाहून जाधवरावानें तिच्या रक्षणार्थ आणखी काहीं सरंजाम दिला. ह्याप्रमाणें ती मानी स्त्री आपल्या पतीने नेमून दिलेल्या ठिकाणींच राहिली. आपल्या पतीशी आपल्या पित्याने असें वैर करावे हें तिला मुळींच आवडले नाही. चोहींकडे अशी धामधूम चालू असतां तेथेंच राहण्याचा तिने आग्रह धरिला आणि पुढेही कधीं ती माहेरी गेली नाही.

---

१ कित्येक बखरींत असा उल्लेख आहे की, शहाजीराजांनी निरुपायास्तव जिजाबाईला वाटेतच टाकून व तिच्या रक्षणार्थ काही लोक ठेवून पुढें पलायन केलें. पुढें जाधवराव तेथें आला व त्याला आपल्या मुलीची करुणा येऊन तिला त्यानें शिवनेरी किल्ल्यात सुरक्षितपणे पोचविले व तिच्या रक्षणार्थ पाचशे स्वार ठेविले.

शहाजीराजे पळाले ते थेट विजापुरास गेले. निजामशहाच्या आईची घरफूट नजरेस येतांच त्यांनी विजापूरसरकाराशीं राजकारण करण्यासाठी बाळकृष्णपंत हनुमंते यास तिकडे अगोदरच पाठविलें होतें. त्या सरकारचे त्या वेळेचे मुख्य मुत्सद्दी मुरार जगदेव व रणदुल्लाखान यांस शहाजीराजांची योग्यता चांगली ठाऊक होती. अदिलशहाने राजांचा बहुमान केला, व निजामशाही बुडू न देण्याचा जो त्यांचा हेतू तो सिद्धीस नेण्यास लागेल तें साहाय्य करण्याचे त्यानें त्यास वचन दिलें व त्यांच्या मदतीस कांहीं फौजही दिली.

इकडे निजामशाहीत अधिकारांतर झालें. मलिकंबर मरण पावल्यावर त्याचा पुत्र फत्तेखान ह्यास वजिरी प्राप्त झाली. हा फत्तेखान स्वभावाने मोठा गर्विष्ठ व क्रूर होता. मलिकंबराची कर्तबगारी, धोरण व राज्यांतील मोठमोठ्या सरदारांस वागवून घेण्याची शैली ही त्यास मुळींच नव्हतीं. त्याने मोगलांशी कांहीं वेळ युद्ध चालविले, पण त्यांत त्याला यश असें कधींच आले नाहीं. ह्या वेळी मोगलांचा सरदार खानजहान लोदी हा त्याच्याशी दक्षिणेत लढत होता. ह्या सरदाराने फत्तेखानाशीं पुढें लवकरच तह केल्यामुळें लढाई बंद पडून निजामशाहीचा कांही वेळ निभाव लागला.

निजामशहास फत्तेखानाचा शिरजोरपणा सहन न होऊन त्यानें त्याला अधिकारावरून दूर करून कैदेत टाकिलें आणि तकरीबखाननामक एका दुसऱ्या सरदारास आपला वजीर केलें.[1] हें असें अधिकारांतर झालें तेव्हां जाधवरावानें पुनः निजामशहाकडे जावे असें मनात आणून त्याच्याशीं सलोख्याचे बोलणे लाविलें. मूर्तिजानिजामशहा हा मोठा खुनशी मनुष्य असून त्याला धोरणही बेताचेच होतें, त्याच्या मनांत जाधवरावाविषयी पराकाष्ठेचा दंश होता. एवढा बलाढ्य सरदार आपण होऊन आपल्याकडे येत आहे, तर मागले सगळे विसरून जाऊन त्याला आपल्या पक्षाकडे घेऊन आपल्या राज्याची बळकटी करावी, असा विचार त्याला कांहींच सुचला नाहीं. पूर्वी केलेल्या निमकहरामीबद्दल सूड उगविण्याचा त्यानें बेत करून जाधवरावाला दौलताबादेच्या किल्ल्यांत आपल्या भेटीस बोलाविले व त्याचें काय म्हणणें आहे तें समक्ष ऐकून घेण्याचे मिष केलें. त्याप्रमाणे जाधवराव आपला मुलगा अचलोजी यासह निजामशहाच्या दरबारास आला. इतक्यांत काही गुप्त मसलत करावयाची आहे असा बहाणा करून बादशहा कचेरीतून उठून आत गेला आणि पूर्वी ठरवून ठेविल्याप्रमाणें तिघे मुसलमान सरदार आपल्या तरवारी उपसून जाधवरावाच्या व त्याच्या मुलाच्या अंगावर धावून आलें, आणि त्यांनीं त्यांच्या हातांतल्या तरवारी हिसकावून घेतल्या. हा असा दगा पाहून ते पितापुत्र आपल्या कंबरेच्या कटारी काढून त्यांच्याशी मोठ्या शौर्याने लढले परंतु यवनसरदारांपुढें त्यांचें काहीएक न चालून शेवटी ते तेथेंच ठार झाले.[2] जाधवरावाची बायको गिरिजाबाई व बंधू भोताजीराव हे कांहीं सैन्यासह शहराबाहेरील हौदापाशीं उतरले होते. त्यांना हें घोर वर्तमान कळताच ती आपली फौज घेऊन सिंदखेडास पळून गेली. मग गिरिजाबाईनें मोगल बादशहापाशीं अर्ज करून आपला दीर भोताजीराव[3] ह्यास आपल्या नवऱ्याची मनसब व जाहगीर देवविली. बादशहाने तिच्या एका मुलास व नातवासही मनसब दिली. ह्यानंतर हें जाधवाचे घराणे अखेरपर्यंत मोगलांची नोकरी करून राहिलें.

---

१ खाफीखान म्हणतो की, फत्तेखानामागून हमीदखान हा वजीर झाला. हा हबशी सरदार होता. याची स्त्री अतिरूपवती होती. तिला सुलतान मोहित झाल्यामुळे हा मोठ्या योग्यतेस चढला.

२ मोडककृत अदिलशाहीच्या इतिहासांत ही जाधवरावाची हकीगत अमळ निराळ्या रीतीनें दिली आहे. ती अशी : फत्तेखानास कैद केल्यावरून जाधवराव वगैरे मराठे सरदारांस आपल्या जिवाचे व अब्रूचें रक्षण कसें करावे याची फिकीर वाटूं लागली. जाधवरावानें पळून जाऊन मोगलांचा आश्रय करण्याचें मनात आणले. ही गुणगुण निजामशहाच्या कानावर जाताच तो घोटाळ्यांत पडला. जाधवरावासारखा बलाढ्य सरदार मोगलांकडे जाऊन त्यांनी त्यास पाठीशी घातले असता आपला पक्ष बराच दुर्बळ होईल असें त्याला वाटलें व त्यास पकडून कैद करण्याचा त्यानें बेत केला. नंतर एके दिवशी जाधवराव आपल्या पुत्रासह दरबारांत कांहीं कामानिमित्त आला असतां, हा असा दग्याने त्यांचा खून झाला. जाधवरावाबरोबर त्याच्या दुसऱ्या मुलाचा व एका नातवाचा खून झाला. असें मुसलमानी बखरींत आहे.

३ कित्येक बखरींत याचे नाव विठोजी असें दिलें आहे. कित्येक तर याचे नाव नथुजी असेही देतात.

शहाजीराजे ह्या वेळी परिंड्याच्या किल्ल्यांत असून, आसपासचा मुलूख हस्तगत करून त्यांत स्वतंत्रपणे अंमल चालवीत होते. आपल्या सासऱ्यास दग्याने ठार मारिल्याचें वर्तमान ऐकून त्यांनी असें मनांत आणिलें कीं, निजामशहाशीं पुनः सलोखा करण्याच्या नादास लागण्यांत किंवा त्याच्या पक्षाने भांडण्यांत आता कांहीं अर्थ नाहीं. कारण मूर्तिजाबादशहा मोठा खुनशी व घातकी मनुष्य आहे अशी त्याची पुरी खात्री झाली. मग राजांनी असा बेत केला कीं, ह्या वेळीं साधेल तेवढा मुलूख हाताशी घालून आपण स्वतंत्र होऊन बसावे. त्यांनी संगमनेरापासून पुण्यापर्यंतचा सगळा मुलूख काबीज केला व आसपासचे सगळे किल्ले हस्तगत केले. ह्या धामधुमीत त्यांनीं विजापूरसरकारचाही कांही मुलूख घेतला. त्यावरून त्या सरकारास राग येऊन राजांचा बंदोबस्त करण्यासाठी मुरारपंतास मोठ्या सैन्यानिशी पाठविलें. त्यानें राजांच्या ताब्यांतले कांही महाल हस्तगत केले. पुणे, इंदापूर वगैरे काबीज करून राजांचा वाडा वगैरे घरे जाळून टाकली. विजापूरकरांच्या ह्या मोठ्या सैन्याशी झुंजण्याचे राजास ह्या वेळीं सामर्थ्य नव्हतें. म्हणून त्यांनी जुन्नरच्या श्रीनिवासरावाचा आश्रय धरिला. मुरारपंतानें भिलसारच्या टेकडीवर एक किल्ला बांधून त्याचें नांव दौलतमंगळ असें ठेविले आणि त्यावर दोन हजार लोक हाताखाली देऊन रामरावास ठेविले. त्यानें चंद्रराव, बाजी दळवी वगैरे सरदारांबरोबर सैन्य देऊन तळकोकण काबीज करावयास पाठवून स्वत. विजापुराची वाट धीरली. विजापूरकरांची वावटळ निघून गेल्यावर त्यांनी जुन्नराहून निघून, पमेगड नांवाचा किल्ला मोडकळीस आला असून त्यांत कोणाचे ठाणे नव्हतें, त्याची डागडुजी करून त्याचें शामगड[१] असें नांव ठेविले व त्यांत ते राहू लागले. येथें राहून त्यांनी आपल्या हातचे गेलेले सगळे किल्लेव महाल पुनः हळूहळू काबीज केले, पाचसहा हजार फौजेची जमाजम केली व जुन्नर व संगमनेर ह्यांपासून अहमदनगर व दौलताबाद ह्यांपर्यंत सगळा मुलूख हाताशी घातला; त्याप्रमाणेंच बालेघाटाचाही मुलूख त्यांनी कबजांत घेतला.

ह्या सुमारास मोगलांच्या खानजहान लोदी नांवाच्या एका सरदारावर शहाजहान बादशहाची इतराजी झाल्यावरून तो दक्षिणेत पळून येऊन निजामशाही सरकारच्या आश्रयाने राहिला. त्याच्या पारिपत्यास दिल्लीच्या बादशहाने फौज रवाना केली. तेव्हा निजामशाहींतील देशमुख व जहागीरदार लोदीचा पक्ष उचलून मोगलांशी लढू लागलें. शहाजीराजांनींही त्याचा पक्ष स्वीकारून त्याला पुष्कळ साहाय्य केलें व मोगलांच्या सैन्याचे काहीएक चालू दिलें नाहीं. हे वर्तमान शहाजहानास कळले तेव्हां त्याला अशी भीती वाटली कीं, दक्षिणेंतील मराठे सरदार व मुसलमान बादशहा लोदीस सामील झाल्याने आपल्या सत्तेला व गादीला धक्का बसेल; यास्तव ह्या लोदीचा व त्याच्या पक्षाच्या लोकांचा वेळींच नायनाट केला पाहिजे, असा निर्धार करून तो मोठ्या सैन्यानिशी दक्षिणेत आला व त्यानें असें जाहीर केलें कीं, जे कोणी लोदीला मदत करतील किंवा त्याच्या पक्षाला सामील होतील त्यांचा समूळ नाश केल्यावांचून आपण रहाणार नाही. मग त्यानें आपल्या एकंदर सैन्याच्या तीन टोळ्या करून त्या तीन सरदारांच्या हातीं देऊन लोदीवर व त्याच्या पक्षाच्या लोकांवर रवाना केल्या. त्यापुढे लोदीच्या पक्षाचा टिकाव न लागून तो दक्षिणेकडे पळत सुटला. त्यानें विजापूरकरांची कुमक मागितली; पण ती त्यांनी त्याला दिली नाहीं. तेव्हां तो पुनः दौलताबादेकडे वळला व निजामशहानें त्याला मदत केली. मोगलांच्या व निजामशहाच्या सैन्यांची लढाई झाली. तींत मोगलांची सरशी झाली. ह्याप्रमाणें चोहोकडून निरुपाय होऊन लोदी काबुलास पळून जाण्याच्या उद्देशानं उत्तरेकडे दौड करूं लागला. मोगलांच्या फौजेने त्याचा सारखा पिच्छा पुरविला. तेव्हां शेवटी निराश होऊन लोदी आपल्या विश्वासू लोकांसह एकदम मागें उलटला व शत्रूच्या सैन्यावर हल्ला करून मोठ्या शौर्याने लढून समरभूमीवर पडला.

---

१ बसातीन-इ-सलातीन यांत असें म्हटलें आहे की, राजांनी भीमगडाची दुरुस्ती केली असून त्यास शहागड असें नांव ठेविले होतें. पृ. ४४१ पमेगडाला यात भीमगड हे नाव दिले आहे. शहाजीराजांनी एका बाळनिजामशहाला गादीवर बसवून त्याच्या नावाने पुढे कारभार चालविला तो ह्याच गडात.

ह्याप्रमाणे लोदीचा नाश झाल्यावर शहाजीराजांस अशी दहशत पडली कीं, आतां शहाजहान आपल्या प्रतिज्ञेप्रमाणें वर्तन करण्यास प्रवृत्त होऊन आपल्या प्रचंड सैन्याचा मोर्चा आपणावर फिरवील. ह्या प्रसंगी आपला बचाव करण्याची त्यांला एकच युक्ती बरीशी दिसली. ती ही कीं, बादशहाला शरण जाऊन कृतापराधाची क्षमा मागावी, व त्याची नोकरी पतकरून राहावें. मग ह्या आशयाचा अर्ज त्यांनीं अजिमखाननामक एका सरदाराच्या द्वारे बादशहास केला. त्यांत त्यांनी बादशहास अशी विनंती केली होती कीं, 'मी तुमच्या नोकरीस रहावयास तयार आहें. तुम्ही मला माझ्या अपराधांबद्दल क्षमा करून माझ्या जिवास कांही अपाय करणार नाहीं, असे आश्वासन द्याल तर मी आपल्या हुजुरास दाखल होईन!' शहाजहानास राजांच्या अंगच्या शौर्यवीर्यादी गुणांची चांगलीच प्रतीती आली होती. शिवाय निजामशाही बुडविण्याचा जो त्याचा संकल्प तो सिद्धीस नेण्याच्या कामीं शहाजीराजांसारख्या बलाढ्य व पराक्रमी सरदाराचे साहाय्य मिळाल्यास फारच उत्तम, असें त्या बादशहास वाटून त्यानें राजाचे बोलणे तत्काळ मान्य केलें व त्यांस अभयवचन देऊन हुजुरास बोलाविले. तेव्हां राजे आपले दोन हजार स्वार घेऊन बादशहाच्या भेटीस गेलें. तेथें त्यांचा बहुमान होऊन त्यांस पांच हजारांची मनसब मिळाली.[१] निजामशाही सरकारकडून त्याला पूर्वी मिळालेली जाहगीर त्यांच्याकडे कायम केली व तीशिवाय आणखी कांहीं महाल दिले.[२] शहाजहान इतकेंच करून राहिला नाहीं तर त्यानें राजांच्या कांहीं आप्तांस व पदरच्या इतर सरदारांसही मनसबा दिल्या.[३] विठोजीचा खेळोजी[४] म्हणून एक मुलगा होता. तो ह्या वेळीं राजांबरोबर होता. त्यासही इतरांबरोबर मनसब मिळाली. हें वर्तमान स. १६३० त घडले. ह्या वेळीं जुन्नर, संगमनेर व वैझापूर हे प्रांत शहाजीराजांस मिळाले. ते हस्तगत करण्यास राजांस पाठविलें. आणि नंतर त्यास नाशिक येथे ठेविले.

ह्यावेळीं दक्षिणेत मोठा दुष्काळ पडून लोक अगदीं हैराण झाले. निजामशाही प्रजेचा फारच नाश झाला. त्यांत आणखी पटकी उद्भवली. तीमुळें तर हजारों लोक पटापट मरू लागलें. सगळा देश ओस पडून सरकारी वसुलास मोठाच धक्का पोचला असा दुहेरी कहर गुदरला असून मोगलांसारखा प्रबळ शत्रू निजामशाहीत सारखा धुमाकूळ उडवून देत होता. निजामशाहींतील बरेच जहागीरदार व मनसबदार मोगलांनी नाहींतसे करून त्यांच्या जागी आपले सरदार नेमून दिले. असा चोहोकडून गहजब झाल्यामुळे आपली गादी आतां खास जाते असें निजामशहास वाटूं लागलें. आपले मोठेमोठे सरदार फितूर करून मोगलांनीं आपल्या पक्षास सामील करून घेतले, तेव्हां आतां आपली धडगत दिसत नाहीं, असा विचार करून, ह्या सर्व कहराचे मूळ तो शोधू लागला. तेव्हां त्याच्या मनाने असें घेतलें कीं, आपला नवा वजीर ह्या सर्व संकटांचे कारण आहे. मग त्यानें त्याला अधिकारावरून दूर करून, फत्तेखानास बंदींतून आणून पुनः वजिरी दिली. तकलीबखानास ही आपली मानखंडना सहन न होऊन तो मोगलांस जाऊन मिळाला. त्यांनीं त्याला सहाहजारी सरदार करून आपल्या पदरी ठेवून घेतलें.

---

१ काही मराठी बखरींत शहाजीराजाला ह्या वेळी बावीस हजारांची मनसब मिळाली होती असे आहे. खाफीखान म्हणतो की, सहा हजार पायदळ व पाच हजार घोडदळ ठेवितां येईल एवढी मनसब त्यास मिळाली होती. (इलियट भा. ७, पृ. १५)

२ ह्या नवीन मिळालेल्या प्रांतापैकी अहमदनगरचा प्रांत असावा. कारण पुढें शिवाजी महाराजांनी ह्या प्रांताला हक्क सांगितला होता. मि. किंकेड म्हणतात की, त्यास आणखी फत्तेखानाचीही जाहगीर दिली.

३ प्रो. जदुनाथ सरकार म्हणतात की, राजांना ह्या वेळीं बादशहाने दोन लक्ष रुपये इनाम दिले व त्यांचा मुलगा संभाजी यास दोन हजारांची मनसब दिली व त्याच्या एका मिनाजी नावाच्या बंधूला तीन हजारांची मनसब दिली.

४ ह्याला पाच हजारी हजारी मनसब मिळाली होती. त्याच्याबरोबर याचे दोघे भाऊ मालोजी व परसोजी हेही मोगलांकडे गेले. पुढें दौलताबाद मोगलाच्या ताब्यात जाऊन निजामशाही बुडते असें पाहून खेलोजी मोगलास सोडून विजापूरकराकडे गेला. याची बायको गोदावरी नदीवर स्नानास गेली असता तिला एका मोगल सरदाराने पकडून नेले. त्यानें चार लाख होन खंडादाखल घेऊन तिला सोडून दिले. ह्यानंतर विजापूरकराचा मोगलाशी तह झाल्यावर त्याला त्या सरकारने आपल्या नोकरीवरून दूर केलें. तेंव्हा तो दौलताबादेजवळील आपल्या वडिलांच्या पाटीलकीच्या गावी जाऊन राहिला आणि तेथून मोगलाच्या अंमलात लुटालूट करू लागला. औरंगजेबानें आपले लोक त्याच्यावर पाठवून त्यास पकडून आणून ठार मारिलें. (प्रो. सरकारकृत औरंगजेबाचे चरित्र, भा. १, पृ. ५५).

फत्तेखानाच्या हाती पुनः अधिकार येतांच त्यानें निजामशहाचा मागील अपकाराबद्दल सूड उगविण्याचा निर्धार केला. बादशहास वेड लागलें आहे असा प्रवाद त्यानें लोकांत पसरवून त्याला प्रतिबंधांत ठेविले व लवकरच गळफास देऊन ठार मारिलें. त्याच्या पक्षाच्या मोठमोठ्या पंचवीस सरदारांचा एकेच दिवशीं त्यानें खून करून सर्व सत्ता आपल्या हातीं घेतली. हें असें क्रूरकर्म करून सर्व राज्याधिकार आपण बळकाविला तो आपल्या हातीं कायम राहावा यासाठी त्यानें शहाजहान बादशहास असा अर्ज केला कीं,[१] दिल्लीच्या बादशहाचा अंकित होऊन राहण्याची मला किती उत्कट इच्छा आहे याविषयी खात्री व्हावी म्हणूनच केवळ हें साहसकर्म मीं केलें आहे. तूर्त मीं मूर्तिजाबादशहाचा शहाहुस्तेन नांवाचा दहा वर्षाचा मुलगा गादीवर बसविला आहे. या सबंधाने बादशहाचा काय अभिप्राय आहे तो कळावा. शहाजहान मोठा धूर्त होता. त्याला फत्तेखानाचा मनसुबा तत्काळ कळून आला. निजामशाहीचे बरेच परगणे ह्यावेळी त्याच्या हातीं आले होते. कांही किल्ले मात्र अंमळ मजबूद असल्यामुळें हस्तगत झाले नव्हते. यास्तव फत्तेखानास हाताशी धरून आपला मतलब पुरा साधावा असा विचार करून त्यानें त्याला असा निरोप पाठविला कीं, निजामशाही खजिन्यांतील सर्व मोलवान् जवाहीर व उत्तम उत्तम हत्ती आमच्याकडे पाठवून द्याल तर जो मुलूख अद्यापि तुमच्या हातीं उरला आहे तो बालराजास बहाल करून तुम्हांसही खासगी जाहगिरीदाखल कांहीं प्रांत तोडून देऊं. फत्तेखानास ही मागणी प्रथमतः रुचली नाहीं. जवाहीर व हत्ती पाठविण्यास तो बिलकुल राजी नव्हता. तेव्हां शहाजहानानें त्याच्या पारिपत्यासाठी मोठे सैन्य रवाना केलें. मोगलाशी सामना करण्याचे त्राण फत्तेखानास मुळींच नव्हतें. म्हणून तो घाबरून जाऊन बादशहास शरण गेला. तो मागत होता तेवढा सगळा ऐवज त्यानें बिनहरकत त्याच्याकडे पाठविण्याची व्यवस्था केली व रोख आठ लाख रुपये देऊन आणखी सालिना कांहीं खंडणी देण्याचेही कबूल केलें. त्यावरून त्यास देऊं केलेली जहागीर त्याच्या नांवानें करून बालराजाच्या वतीने सर्व राज्यकारभार पाहण्याची परवानगी त्याला शहाजहानानें दिली. ही जी जहागीर फत्तेखानास मिळाली तीत शहाजीराजांस पूर्वी दिलेल्या कांहीं महालांचा समावेश झाला.[२] त्यामुळें त्यांस पराकाष्ठेचें वाईट वाटलें व त्यांना मोगलांची ताबेदारी झुगारून देऊन पुन: स्वतंत्र होऊन राहण्याचा विचार केला. त्यांनीं फत्तेखानाचा पडता काळ पाहून निजामशाहीचा साधेल तेवढा मुलूख काबीज करावा असें मनांत आणिलें आणि नाशिक, त्रिंबक, संगमनेर, जुन्नर व उत्तरकोंकणाचा कांही भाग हाताशी घातला. गालनाचा किल्लेदार फत्तेखानाच्या शिरजोरपणास त्रासून किल्ला शहाजीराजांस कांही दाम घेऊन द्यावयास सिद्ध झाला. हे वर्तमान मोगल सुभेदारास कळताच त्यानें त्या किल्लेदारास मोठी लालूच दाखवून तो किल्ला आपल्या स्वाधीन करून घेतला.

मग शहाजीराजानीं विजापूरसरकाराशीं पुनः समेट करण्याचें मनात आणून त्या दरबारचा मुख्य मुत्सद्दी मुरारपंत ह्याला आपलासा करून घेतलें व त्याच्याद्वारें त्या सरकाराशी असें बोलणे लाविलें कीं, निजामशाहीत चोहींकडे बेबंदाई होऊन फत्तेखानावर कोणाचाही भरवंसा नाही असें झालें आहे. मोगलांनी त्याला अगदीं दीन करून सोडिले आहे. अशा समयी निजामशाही प्रांत काबीज करणें फारसे कठीण नाहीं. तूर्त दौलताबादचा किल्ला सहज हस्तगत होण्याजोगा आहे. कारण तेथील बंदोबस्त चांगला नसून तो ज्या सरदारांच्या हवाली आहे, ते बेदील झाले आहेत. सरकारच्या मर्जीस येत असल्यास त्या किल्ल्यावर फौज पाठवावी. मी सरकारच्या नोकरीस राहून तो किल्ला मोठ्या युक्तीने व हिंमतीने लढून काबीज करून देतो.' ही त्याची मसलत त्या सरकारास पसंत वाटली. शहाजीराजांसारखा बलाढ्य व पराक्रमी सरदार आपणांस लाभल्याने मोगलांशी टक्कर देण्यास आपणांला बराच वकूब येईल असें त्यास वाटलें. मग अदिलशहानें आपली फौज शहाजीराजांच्या मदतीस देऊन मुरारपंतांस राजांबरोबर दौलताबादेवर पाठविलें.

---

१ मि. किंकेड म्हणतात की, त्याने हा अर्ज आपला मुलगा अबदूल रसूल याच्या हस्ते पाठविला.

२ मि. किंकेड म्हणतात की, ह्या फत्तेखानाची जी जहागीर शहाजीराजास दिली होती ती त्याची त्यास शहाजीराजास वाईट वाटलें आणि परत दिल्यामुळे त्यांनी मोगलांची नोकरी सोडली.

शहाजीराजे विजापूरकरांशी संगनमत करून त्यांची फौज घेऊन आपणांवर चालून येत आहेत असें पाहून फत्तेखान[१] घाबरून गेला. त्यांच्याशीं सामना करण्याचा त्याला आवाका नव्हता. मग त्यानें मोगल सुभेदार मोहबतखान यास असे कळविले कीं, शहाजीराजे मजवर चाल करून येत आहेत. किल्ल्यांत सामुग्री मुळीं नाहीं. तरी येऊन माझा बचाव करावा व किल्ला स्वाधीन करून द्यावा. मी बादशहाचा अंकित होतों. त्यावरून मोहबतखान त्याच्या कुमकेस आला. ह्या मोगल सरदाराने विजापूरकरांचें सैन्य दौलताबादेवर चालून येत होतें त्यास अडवून त्याच्याशीं मोठ्या निकराचा सामना केला. ह्यावेळी शहाजीराजांनी आपल्या अंगच्या शौर्याची व युद्धकौशल्याची अगदीं पराकाष्ठा केली. परंतु शत्रुसैन्याचा जमाव मोठा असल्याकारणानें विजापूरकरांच्या फौजेचा मोड होऊन तीस मागें हटावे लागलें.

किल्ला लढून हाती येत नाहीं असें पाहून शहाजीराजे व अदिलशहाचे सरदार यांनी तो भेद करून ताब्यांत घेण्याचा बेत केला. त्यांनीं फत्तेखानास असा निरोप पाठविला कीं, दौलताबादचा किल्ला मोगलांच्या स्वाधीन कराल तर तुमचा सर्वस्वीं नाश होईल. परंतु शहाजीराजे यांचें जें नुकसान झालें आहे त्याची भरपाई करून देऊन तो किल्ला आमच्या ताब्यांत द्याल तर आमच्या दरबारचा तुमच्याशी पूर्ववत् स्नेह राहील व तुमचा शत्रू तो आमचा शत्रू असें मानून आम्ही तुम्हांस सर्व प्रसंगीं साहाय्य करूं. हें त्यांचें बोलणे फत्तेखानास मान्य होऊन त्यानें मोगलांशी दगा करण्याचें धाडस केलें. मोगल सैन्याने किल्ल्याखालीं तळ दिला होता, त्यावर त्यानें किल्ल्यावरून एकाएकी तोफांचा भडिमार सुरू केला. शहाजीराजे विजापूरकरांची फौज घेऊन फत्तेखानाच्या कुमकेस आले. मोठा घोर संग्राम माजला. परंतु मोगलांच्या प्रबल सैन्यापुढें त्यांचा दम निघेना. अखेरीस मोहबतखान विजयी होऊन दौलताबादचा किल्ला त्यानें सर केला.[२] हे वर्तमान १६३३ त घडले.

फत्तेखानाची ह्या युद्धांत पुरी दुर्दशा उडाली. तो अगदी हतवीर्य होऊन मोगलांस शरण गेला. दिल्लीच्या बादशहाने त्याचा सर्व अधिकार काढून घेऊन त्याला कांही वार्षिक वेतन ठरवून स्वस्थ बसावयास लाविलें. ज्या बालराजास निजामशाही तक्तावर बसविले होतें त्याला ग्वाल्हेरच्या किल्ल्यांत नेऊन कैदेत ठेविले आणि निजामशाही राज्य खालसा करून सगळा मुलूख आपल्या ताब्यात घेतला. ह्याप्रमाणें स. १६३३ त निजामशाहीची अखेर झाली. शहाजहान बादशहास याबद्दल कृतकृत्यता वाटून आपण एवढ्यापुरता निर्वेध झालों असें तो मानू लागला. शहाजीराजे प्रबल होऊन पुन: निजामशाहीची स्थापना करतील व त्यांच्याशी आपणांस पुनरपि युद्धप्रसंग करावे लागतील, हें त्याच्या ध्यानींमनींही नव्हतें.

ह्या लढाईच्या वेळीं शहाजीराजांस साधेल त्या उपायाने जेर करण्याचा विचार मोगल सेनापतीने केला होता. दौलताबादेस मोगलांचा वेढा पडला असतां, शहाजीराजे त्यांच्यावर वेळोवेळी छापे घालून त्यांस हैराण करूं लागले.

---

१ अबदूलहमीदच्या बादशाहनाम्यात असें म्हटलें आहे की, ह्या वेळी विजापूर सरकारचा मुख्य कारभारी खवासखान हा होता. हा मूळचा कलावंत असून ह्या अधिकारास पोचला होता. मुरारपंत हा त्याचा विश्वासू मसलतगार होता. (इलियट, भा. ७. पृ. २३)

२ प्रो. सरकार – हा किल्ला मोगलांच्या हातीं जाण्याचे कारण असे सांगतात की, किल्ल्यातील माणसांची भारी उपासमार होऊ लागली तेव्हा फत्तेखानानें मुरारपंताकडे अन्नसामुग्रीची मागणी केली. त्यास त्यानें असा जबाब दिला की, किल्ला पहिल्याने आमच्या हवाली करा, म्हणजे अन्नसामुग्री देतो. ही अट त्यास मान्य न होऊन त्यानें तो अभेद्य किल्ला मुघलांच्या स्वाधीन केला. मि. किंकेड असें म्हणतात की, महबतखानाचा मुलगा खानजमान दौलताबादेकडे येत आहे असे कळताच शहाजीराजे त्याच्या अगोदर दौलताबादेकडे येऊन थडकले. आणि त्याने फत्तेखानाशी असें बोलणे लाविलें की, त्यानें मोगलांचा नाद सोडून विजापूरकरांशी संगनमत करावे व सोलापूर व दुसरे पाच प्रांत यावरची आपली सत्ता सोडावी म्हणजे दौलताबाद वगैरे किल्ले निजामशाहाकडे राहू दिले जातील. हें बोलणे फत्तेखानाला कबूल झालें. तेव्हां शहाजीराजे किल्ल्यात काही लोक व अन्नसामग्री भरून मोगलाशी टक्कर देण्यास सिद्ध झाले.

तेव्हां मोहबतखानानें त्यांचा सूड उगविण्यासाठी असा बेत केला कीं, शहाजीराजांची स्त्री जिजाबाई ही बायझापुरास[१] आहे, तिला हरउपायाने पकडून आणावे इतक्यात निजामशाहींतील एक किल्लेदार[२] मोहबतखानास शरण येऊन आपणांस मोगल बादशहाच्या नोकरीस ठेवा, असें म्हणूं लागला. तेव्हां त्यानें त्याला असें सांगितलें कीं, 'शहाजीराजे यांची स्त्री बायझापुरास आहे. तिला पकडून आणून आमच्या स्वाधीन कर, म्हणजे तुझ्या इमानाविषयी बादशहाची खात्री होऊन तुला नोकरी मिळेल.' ही अट त्या किल्लेदारास मान्य होऊन त्या प्रयत्नास तो लागला. त्यानें मोठ्या युक्तिप्रयुक्तीनें जिजाबाईस पकडून मोगलांच्या छावणींत आणून दाखल केलें. परंतु ह्यावेळीं मोगलांच्या लष्करांत जाधवरावाचा भाऊ जगदेवराव हा होता. त्याला ही गोष्ट रुचली नाहीं. त्यानें खानापाशी अशी रदबदली केली कीं, शहाजीराजे यांचें आमच्या घराण्याशी वाकडे आहे, तें तुम्हांस महशूर आहेच. ह्या वैमनस्यामुळे त्यांनीं जिजाबाईस व तिच्या मुलास सोडून दिलें असून दोनतीन वर्षापूर्वी मोहित्यांची कन्या तुकाबाई हिजशी विवाह केला आहे. त्यामुळें तर जिजाबाईचा व त्यांचा पुरा बेबनाव झाला आहे. यास्तव त्यांना पकडून कैद केल्याने शहाजीराजांस तर कांहींएक वाईट वाटणार नाहीं; पण ह्यामुळे आमच्या घराण्याची मात्र नाहक इज्जत घेतल्यासारखे होईल. हें त्याचें म्हणणें खानास खरें वाटून जिजाबाईस त्यानें जाधवाच्या स्वाधीन केलें. त्यानें तिला शहाजीराजांच्या ताब्यांतील कोंडाणा किल्ल्यांत सुरक्षितपणे पोचते केले. ह्याप्रमाणें आमच्या चरित्रनायकावर बालपणी आलेले हे एक मोठेच अरिष्ट टळले.

पूर्वोक्त प्रकारे दौलताबादेजवळ विजापूरकरांच्या फौजेचा मोड होऊन तिला माघारी फिरावे लागलें आणि तीबरोबर शहाजीराजेही निरुपायास्तव मागें आले. परंतु ह्या पराभवाने व आशाभंगानें राजे मुळींच हताश झाले नाहींत. त्यांचा जोम व उत्साह ही कायम होती; किंबहुना ती ह्या अपयशाने विशेषच वृद्धिंगत झाली. त्यांनीं ह्या समयी असा निश्चय केला कीं, निजामशाही मोंगलानी बुडविली ती पुनः स्थापित करावयाची. ही प्रतिज्ञा कांहीं अशी तशी सोपी नव्हती. मोगलांसारख्या बलाढ्य शत्रूशी त्यांना झगडावयाचें होतें. राजांनीं विजापूरकरांच्या सैन्यासह परत तिकडे माघारी न जातां तिला वाटेतच सोडून नाशिकाकडून भीमगडाकडे कूच केलें.[३] हा किल्ला त्यांच्या ताब्यांत पूर्वीपासूनच होता. तिकडील डोंगरी मुलखात राहून त्यांनीं पुनः फौज जमविली. पदरी बरीचशी फौज झाल्यावर त्यांनीं पुणे व चाकण यांपासून बालेघाटापर्यंत सगळा प्रांत मोगलांच्या हातचा हिसकावून घेतला. ह्याप्रमाणें ते मोगलांची एकामागून एक ठाणी उठवीत चालले, तेव्हां दौलताबादेच्या बंदोबस्तासाठी इरादतखाननामक एका सरदाराची नेमणूक झाली होती, त्यानें शहाजीराजांची ही धामधूम बंद करण्याचा एक उपाय योजिला. तो असा कीं, विठोजीचा मुलगा मालोजी भोसले म्हणून होता, त्याशी त्यानें स्नेह करून त्याच्याद्वारे शहाजीराजांशीं असें बोलणे लाविलें कीं, तुम्ही मोगलांच्या मुलखास उपद्रव करण्याचें सोडून द्याल तर तुम्हांस पुनः शहाजहान बादशाहाकडून बावीस हजारी मनसबा देववितों व

---

१ हे शहर औरंगाबादेच्या पश्चिमेस २५ मैलावर आहे. शहाजीराजे खानजहान लोदीचा पक्ष सोडून मोगलांच्या सरदारास कुमक करूं लागले. त्यावेळी जुन्नर, नाशिक, त्रिंबक, संगमनेर वगैरे प्रांत त्यास जहागिरीदाखल मिळाले. त्याबरोबरच बायझापूर त्याच्या हातीं आलें होते. ह्या गांवी जाधवरावांचे कुटुंब राहत असून जिजाबाई आपल्या आईकडे त्या वेळीं गावी राहात होती असे जे. रा. सरदेसाई यांचे म्हणणें आहे तें निराधार आहे. जुन्नरच्या श्रीनिवासरावाचा पुंडावा मोडून त्यास पकडण्याच्या धामधुमीत राजांनी जिजाबाई व शिवाजी यांस शिवनेरी किल्ल्यातून काढून बायझापुरास नेऊन ठेविले होतें असें ते आपल्या मराठी रियासतींत म्हणतात. (पृ. १५२ पाहा) प्रो. सरकार जिजाबाईला पकडून नेल्याची हकीकत देत नाहींत. खेलोजीच्या स्त्रीला पकडून नेल्याचे मात्र तें लिहितात; पण बहुतेक मराठी बखरींत जिजाबाईस पकडून नेल्याचे लिहिले आहे.

२ मि. किंकेड म्हणतात की, हा त्रिंबकचा किल्लेदार होता व त्याचें नाव म्हालदारखान असें होतें.

३ मि. किंकेड – बादशाहीनाम्याच्या आधाराने म्हणतात कीं, महबतखान दौलताबादेस आपले लोक ठेऊन माघारीं वळताच शहाजीराजानीं लागलीच पुन दौलताबादेवर हल्ला केला. तेव्हा किल्ल्याचा रखवालदार खानदौरान याने मोठ्या शौर्याने लढून राजाचे कांहींएक चालू दिलें नाहीं.

तुमच्या मुलासही मोठ्या मनसबा देववितो; शिवाय तुमच्या ज्या कांही दुसऱ्या मागण्या असतील त्या मान्य करवितो. हें राजांना मुळींच कबूल झालें नाहीं. असल्या लालचीने त्यांचें मन ह्या वेळीं वळण्यासारखे नव्हतें.[१]

शहाजीराजांच्या पदरी ह्या वेळीं आठदहा हजार फौज झाली असून निजामशाहीचा मोगलांच्या ताब्यांत गेलेला बराच प्रांत त्यांनीं काबीज केला. ह्यामुळे मोगलांच्या सैन्याचा आपणांवर लवकरच हल्ला होईल हें त्यांना ठाऊक होतें. त्याच्याशी एकटे भांडण्याचें सामर्थ्य त्यांस नव्हतें हें उघड आहे. यास्तव त्यांनीं असा विचार केला कीं, विजापूरसरकाराची मदत मिळाल्यावांचून आपली प्रतिज्ञा शेवटास जाणार नाहीं. त्या वेळीं त्या दरबारांत खवासखान मुख्य कारभारी होता. त्याच्याशी राजांनी मुरारपंताच्या द्वारे असें बोलणे लाविलें कीं, निजामशाहीच्या ८४ किल्ल्यांपैकी एक दौलताबादेचा किल्ला गेला म्हणून काय झाले? 'तुम्ही मला साहाय्य कराल तर मी होईल तेवढी खटपट करून निजामशाही पुनः उभी करितों व बहिरी घराण्याचा झेंडा पुनः उभारितों.' हें त्यांचें म्हणणें कांही मुत्सद्यांस पसंत वाटलें नाहीं; परंतु राजांनी त्यांच्या सर्व हरकती व संशय मोडून काढून त्यांची मने आपल्याविषयी शुद्ध केली. तेव्हां त्यांच्या मसलतीस कबूल होऊन त्यांस लागेल ती कुमक करण्यास ते तयार झालें व त्यांनी राजांकडून असा करार करवून घेतला कीं, निजामशाही वंशातील कोणीतरी वारस पाहून, त्यास गादीवर बसवून त्याच्या वतीने राजांनी निजामशाहीचा कारभार पाहावा. ह्या कराराप्रमाणें राजांनी, मूर्तिजा नांवाचा एक दहा वर्षांचा मुलगा श्रीवर्धन[२] येथें नजरकैदेत होता, त्याला सोडवून आणून भीमगड येथे तक्ताची जागा करून तेथें ठेविले हे वर्तमान स. १६३३ च्या सप्टेंबर महिन्यात घडले.

ह्या मुलाच्या नांवाची द्वाही फिरवून आणखी मुलूख व किल्ले घेण्याचा सपाटा राजांनी चालविला. ही त्यांची हिंमत व कर्तबगारी पाहून व ह्या स्तुत्य कृत्यानें संतोष पावून, निजामशाही घराण्याचा अभिमान बाळगणारे सर्व सरदार, जाहगीरदार व देशमुख त्यांच्या पक्षास सामील होऊन त्यांस लागेल ती मदत करण्यास उद्युक्त झाले. निजामशाही लष्करातील शिपाई बेकार होऊन सैरावैरा फिरत होते, ते शहाजीराजांच्या निशाणास येऊन मिळाले. ह्याप्रमाणें त्यांचा पक्ष बळावत जाऊन सैन्यबळही हळूहळू वृद्धिंगत झालें. राजांनी निजामशाहीच्या ताब्यातली सगळी कोंकणपट्टी, पूर्वेस[३] अहमदनगरापर्यंत सारा मुलूख व दक्षिणेस नीरानदीपासून चांदोरच्या डोंगरांपर्यंत एकंदर प्रांत हस्तगत केला. राजांचा जुन्नर शहरावर फारच डोळा होता. तेथें श्रीनिवासराव हा स्वतंत्रपणे अंमल करीत होता. हा राजांचा मोठा दोस्त होता. निजामशाहीचे प्रांत बळकावून जे सरदार स्वतंत्र होऊन बसले होते, त्याला मोडून काढिल्यावांचून राज्यास बळकटी येणार नाहीं, हें राजांच्या लक्षात येऊन, त्यांनीं श्रीनिवासरावाला आपला अंकित होऊन राहण्याविषयीं सामोपचारानें पुष्कळवेळा सांगून पाहिले परंतु जुटीचे बळ केवढे आहे हें त्या स्वार्थी सरदाराच्या ध्यानांत न येऊन, तो राजांच्या म्हणण्यास कांही केल्या कबूल होईना. तेव्हां त्यास ताब्यांत आणण्यासाठी राजांला कपटविद्येचा प्रयोग

---

१ मोडककृत अदिलशाहीच्या इतिहासात ह्या सबंधाचा उल्लेख अगदींच निराळा आहे. तो असा : विजापूरकराच्या एका सरदाराने हें सलोख्याचे बोलणे राजाशीं लाविलें, तेव्हा त्यानी असा उलट निरोप पाठविला की, अदिलशहा मला आपल्या पुत्राप्रमाणे मानून बावीस हजाराची मनसब करून देईल तर तुम्ही सांगाल तसें वर्तन मी करीन. ही अट त्या सरदारास मान्य होऊन त्यानें अदिलशहाकडून आज्ञापत्र आणविलें, आणि राजांशी असा करार केला की, निजामशाही प्रांत काबीज करण्याच्या कामी विजापूरसरकारानें फौजेची मदत द्यावी, व काबीज केलेला प्रांत उभयतांनी वाटून घ्यावा. मुळातील मजकूर शहाजीराजांच्या कैफियतीतून घेतला आहे.

२ प्रो. सरकार म्हणतात की, जुधन किंवा अंजराई नावाचा किल्ला जुन्नरच्या पश्चिमेस तीन मैलावर आहे. तेथें ह्या मुलास नजरकैदेत ठेविले होतें.

३ प्रो. सरकार म्हणतात की, तळकोकणात शिद्दी साइबखान नामक निजामशाही सरदार स्वतंत्र होऊन कल्याणास होता. त्याला शहाजीराजानी मुरारपंताच्या सल्ल्याने असें पत्र लिहिले की, ''तुम्ही नवीन निजामशहाला मुजरा करावयास यावे आणि आम्हास सहाय व्हावें.'' हें त्याचें सांगणे त्या शिद्दीनें कबूल केलें नाही. त्यानें सगळे तळकोकण शहाजीराजांच्या स्वाधीन करून आपण विजापूरकराच्या दरबारी जाऊन राहण्याचे योजिले. शहाजीराजांना ही गोष्ट रुचली नाही आणि मुरारपंत शहाजीराजाच्या मदतीस काही लोक ठेवून विजापूरास जाऊ लागला तेंव्हा त्यास जाऊन मिळण्यास हा शिद्दी निघाला असता त्याच्यावर शहाजीराजानी हल्ला करून त्यास अगदी हैराण केलें आणि मुरारपंताच्या रदबदलीमुळे तो त्यांच्या हातचा सुटला.

करावा लागला. त्यांनीं त्याच्याशी शरीरसंबंधाचें बोलणे लावून त्याची मुलगी आपला मुलगा संभाजी यास मागितली. अशा प्रकारे सोयरीक जुळविण्याच्या मिषाने त्यास त्यांनीं आपल्या घरीं भोजनाचे आमंत्रण केलें. त्याप्रमाणें श्रीनिवासराव भोजनास आला असतां त्यास त्यांनी कैद केलें व त्याच्या ताब्यांतलीं जुन्नर, जीवधन, सौदा, भोगा वगैरे ठाणी हस्तगत केली. तक्तावर बसविलेल्या मुलास भीमगडाहून जुन्नरास आणिलें. श्रीनिवासरावाप्रमाणेंच भिवंडीस शिद्दी सायासैफखान, व जंजिऱ्यास शिद्दी अंबर[१] हे स्वतंत्र होऊन पुंडावा करीत होते. त्यांसही राजानी आपल्या काढून आणिलें.

ह्याप्रमाणें मोगलांनीं काबीज केलेला निजामशाहीचा बहुतेक मुलूख हस्तगत करून शहाजीराजांनी निजामशाही तक्त पुनरपि स्थापिलें, हें वर्तमान शहाजहान बादशहास कळताच त्याने राजांच्या पारिपत्यासाठी फौज पाठविली. तिचा राजांनी पुरा धुव्वा उडवून दिला. परिंडे येथें मोगलांच्या सैन्याशीं विजापूरकरांच्या साहाय्याने मोठे तुंबल युद्ध करून त्याचा राजांनी अगदीं फडशा उडविला. मग शहाजहानानें खानडौरान[२] व खानजमान यांस मोठे सैन्य देऊन शहाजीराजांचें बंड मोडून टाकण्यासाठीं रवाना केलें. परंतु ह्याही सरदारांस राजांनी चांगलेच खडे चारिले. विजापूर दरबारचे रणदुल्लाखान व मुरारपंत यांचा राजांस चांगला पाठिंबा असून खुद्द त्यांच्यापाशींही जय्यत फौज जमली होती. ह्यामुळे मोगलांच्या सैन्याचा त्याला वर सांगितल्याप्रमाणें पराभव करितां आला व त्यांनी अहमदनगर येथे फौज जमा करून दौलताबादेपर्यंतचा मोगलांच्या मुलखात लुटालूट चालविली.

आपण दोन वेळां सैन्य पाठविलें आणि त्याची शहाजीराजांनी दुर्दशा उडविली, हें पाहून शहाजहान अगदीं संतापून गेला. त्यांत आणखी विजापूरसरकारानें ह्या बंडखोरास मदत केल्याचे समजून तर त्याला अधिकच चेव आला. निजामशाही अजिबात बुडवून आपला ताबा त्या मुलखात बसविल्याबद्दल जी त्यास धन्यता वाटत होती तो सगळा श्रम होता, असें राजांनी थोडक्याच अवकाशांत त्याच्या प्रत्ययास आणून दिलें. निजामशाहीशी प्रारंभीं कलह सुरू केला तेव्हां जी स्थिती होती तीच पुनरपि प्राप्त झाली असून पूर्वीच्याहून विशेष बलाढ्य शत्रूशी लढण्याची पाळी आली, हें त्या बादशहाच्या लक्षात येऊन त्याच्या अंगाचा तीळपापड झाला. मग क्रोधाच्या आवेशांत त्यानें अशी प्रतिज्ञा केली कीं, प्रचंड सेना घेऊन दक्षिणेत जावयाचें, शहाजीराजाचा पुरा नायनाट करून निजामशाही मुलूख पुनरपि सगळा काबीज करावयाचा व प्रसंग पडल्यास विजापूरची अदिलशाही व गोवळकोंड्याची कुतुबशाही ह्या यवनी राज्याचे समूळ उच्चाटन करावयाचें. असा पक्का निर्धार करून हा बादशहा मोठ्या जय्यत फौजेनिशी[३] शहाजीराजांच्या पारिपत्यास पिसाळलेल्या चित्याप्रमाणें दक्षिणेत धावून आला.

प्रथमतः त्यानें असा बेत केला कीं, महमद अदिलशहास धमकीचा निरोप पाठवून शहाजीराजांच्या कटांतून फोडावे. ह्याप्रमाणे त्यानें अदिलशहाकडे आपला वकील पाठवून असें कळविले कीं, मिजामशाहीतील जे किल्ले तुम्ही घेतले आहेत ते सगळे आमच्या स्वाधीन करावे; मुलुकमैदान[४] नावाची तोफ तुम्ही परिंड्याच्या किल्ल्यातून विजापुरास

---

१ हा अंबर साइफखानाच्या वतीने शहाजीराजांराबरोबर लढत असतां राजांनी त्यास जेर करून कैद केले, असें प्रो. सरकार म्हणतात.

२ प्रो. सरकार लिहितात की, ह्या सरदाराने शहाजीराजांच्या एका तुकडीस गाठून तिचा मोड केला, आणि त्यांच्या लोकांची मोठी कत्तल उडवून तीन हजार लोक कैद केले, व त्यांचे आठ हजार बैल, धान्य वगैरे सामुग्री घेऊन जात होते, ते सगळे धरुन नेले.

३ पन्नास हजार फौज घेऊन बादशहा ह्यावेळी दक्षिणेत उतरला असे प्रो. सरकार म्हणतात.

४ ह्या नावाचा अर्थ रणभूमीचा राजा किंवा सिंह असा आहे. ही तोफ अहमदनगर येथें निजामशहाच्या हुकमावरून कुस्तुंतुनियातील एका कारागीराने ओतून तयार केली. हिचे वजन साठ खंडी आहे असें म्हणतात. एका इंग्लिश कामगाराने हिच्या वजनाचा अजमास ३२००० रत्तल केला आहे. हिची लांबी नऊ हात असून परीघही तितकाच आहे. हीत गोळा रहाण्याची जागा इतकी मोठी आहे की, तींत बसून पागोटे सहज बांधिता येते. हिच्या तोंडाचा व्यास चार फूट आठ इंच आहे. हुसेन निजामशहानें विजयनगरच्या रामराजावर स्वारी केली तेव्हा ही तोफ बरोबर नेली होती असें म्हणतात. ही हल्ली महाकाली ह्या नावाने प्रसिद्ध आहे. भाविक लोक हिची पूजा अजून करितात. औरंगजेबानें विजापूर जिंकल्याच्या स्मरणार्थ हिजवर स. १६८५ त एक लेख कोरला होता. कंपनीसरकारच्या मनात ती इंग्लंडच्या राजास नजर करण्याचे स. १८२३ त आलें होतें. परंतु ती किनाऱ्यापर्यंत आणण्यास सोईचे रस्ते नाहीत, असा एका इंजिनिअरानें अभिप्राय दिला, म्हणून ती येथें राहिली.

नेली आहे ती परत करावी; शहाजीराजास व त्यांच्या पक्षाच्या लोकांस कोणत्याही प्रकारचे साहाय्य करू नये; ह्या अटी कबूल करून त्याबरहुकूम वागण्यास तुम्ही तयार झाला तर तुम्हांस निजामशाहीच्या सत्तेखालील सगळी कोंकणपट्टी, सोलापूरचा किल्ला व त्याखालचा सगळा मुलूख आम्ही देऊं आणि ह्या अटी तुम्हांस कबूल झाल्या नाहींत तर तुमचे राज्य सफाई बुडवून टाकण्यास आम्ही उद्युक्त होऊं.' विजापूरकरांना ह्या त्याच्या अटी मान्य झाल्या नाहींत. कारण रणदुल्लाखान वगैरे सरदारास शहाजीराजांच्या कटातच रहाणे विशेष हिताचे वाटलें.

हा बेत फसला तेव्हां शहाजहानानें दोघांचेही एकाच वेळीं पारिपत्य करण्याचा बेत करून आपल्या फौजेचे चार भाग केले; आणि दोन शहाजीराजांवर व दोन विजापूरकरांवर पाठविले. शहाजीराजांवर पाठविलेल्या दोन टोळ्यांपैकीं एकीवर शाइस्ताखाननामक सरदार प्रमुख असून त्याला चांदोर, नाशिक, संगमनेर वगैरे शहरे, त्याच्या आसपासचा मुलूख व किल्ले, जे राजांच्या ताब्यात होते, ते घेण्याचे काम सांगितलें. दुसऱ्या टोळीवर खानजमान नांवाच्या सरदारास नेमिलें असून तीत वीसहजार स्वार होते. त्याला अशी कामगिरी सांगितली कीं, त्यानें शहाजीराजांशी मैदानप्रांतांत सामना करून त्याला तेथून हाकून द्यावे व कोंकणपट्टींतील किल्ले सर करून निजामशाही मुलखांत राजांस कोठेही थारा देऊं नये.

ह्याप्रमाणें मोगलांच्या जबरदस्त सैन्याचा शहाजीराजांवर दोहों बाजूंनी एकदम मारा सुरू झाला. तरी ते यत्किंचितही डगमगले नाहींत. शत्रूशी अढळ धैर्यानें टक्कर देऊन शेवटपर्यंत लढावयाचें, भिऊन हार जावयाचें नाहीं, असा निर्धार त्या वीर्यशाली पुरुषानें केला. ह्या प्रसंगीं राजांनी आपलें सर्व क्षात्रतेज प्रगट केलें; त्यांचें अप्रतिम युद्धकौशल्य, विलक्षण रणवेग, पुरा गनिमी कावा पाहून त्यांच्या कट्ट्या शत्रूनें देखील तोंडांत बोट घातले. मोगलांच्या सैन्यास राजांनी पुष्कळ हैराण केलें. पण त्याचा जमाव फारच मोठा असल्याकारणानें राजांचा जिकडूनतिकडून मोड होऊं लागला. नाशिक व चांदोर ह्या प्रांतांतले पंचवीस किल्ले मोगलांनी काबीज केलें; सोलापूर व बेदर ह्या शहरांच्या दरम्यानचा सगळा मुलूख राजांच्या हातचा गेला. कोंकणपट्टींतलींही बरींच ठाणी मोगलानी घेतली. शत्रूने कोंकणांतून हुसकून लाविल्यामुळे शहाजीराजे अहमदनगराकडे जाऊन दबा धरून बसले. तेथें त्यांच्यावर शत्रूच्या दोन्ही टोळ्यांनी एकवट होऊन चाल केल्यामुळें निरुपाय होऊन, त्यांच्या तावडीतून मोठ्या शिताफीने सुटून चांभारगोदें व बारामती यांच्या दरम्यानच्या मुलखात ते हटून राहिले. तेथेही शत्रूनें पिच्छा पुरविल्यामुळे ते कोल्हापूर व मिरज ह्या प्रांतांकडे वळले. तेथें त्यांस विजापूरकरांची कुमक मिळताच ते उलटून मोगलांच्या सैन्यावर छापे घालू लागले; त्यांची रसद मारून त्यांस दाणावैरण मिळेनासे त्यांनी केलें. राजांशी सामना करण्याचा किंवा त्यांच्या पाठीस लागण्याचा आवाका त्यांस उरला नाहीं.

हें वर्तमान शहाजहानास कळले तेव्हां त्यानें खानजमानास असा हुकूम पाठविला कीं, शहाजीराजांच्या पाठीस लागून फौजेची खराबी फार होत आहे, तरी तूर्त त्यांचा नाद सोडून विजापूरसरकारच्याच मुलखात स्वारी करावी. त्या सरकाराचा पाडाव केल्यावर मग शहाजीराजांस जेर करण्यास उशीर लागणार नाहीं. ह्या हुकूमाप्रमाणे तीन मोगल सरदारांनी विजापूरकरांच्या राज्यांत स्वारी करून जिकडेतिकडे एकसारखा धुमाकूळ उडवून दिला. त्यांचे पुष्कळ किल्ले व शहरे त्यांनी हस्तगत केलीं व हजारों लोक बंदिवान केले. शत्रूची भली मोठी फौज थेट विजापुरापाशीं जाऊन थडकली. तेव्हां अदिलशहा अगदीं घाबरून गेला. शत्रूशी सामना करण्याचें सामर्थ्य त्यास नव्हतें. यास्तव त्यानें त्याच्याशी तहाचे बोलणे लाविलें व उभयपक्षांमध्यें लागलीच तह झाला.[१] तो विजापूरकरांला अनुकूल असाच झाला. ह्या तहात असें ठरलें कीं, परिंडा व सोलापूर हे किल्ले व त्याखालील सगळा मुलूख महमद अदिलशहाला मिळावा;

१ मोगलांच्या ह्या स्वारीचे वर्णन प्रो. सरकारांनी औरंगजेबाच्या चरित्रात केलें आहे तें असें– मोगल सैन्य शेताची नासाडी करीत घरेदारे जाळीत चालले व गुरेढोरे हरण करून गावातील लोकांची कत्तल करीत चालले; त्यांनी धट्ट्याकट्ट्या माणसास पकडून गुलाम केलें. त्याप्रमाणें चांगलें नांदते गाव त्यांनी अगदी बेचिराख करून टाकिलें. विजापूरकरांनी शहापूरच्या तलावाचा बांध फोडून विजापुराच्या आसपासचा प्रदेश जलमय करून सोडला. त्यामुळें मोगलांचा निरूपाय होऊन ते परत गेले.

सोलापूरच्या पूर्वेस बेदर, कल्याणी व नलदुर्ग ह्या प्रांतांवरही अदिलशहाचाच अंमल कायम राहावा; मुलुकमैदान तोफ त्यानेंच आपल्याकडे ठेवावी; कोंकणपट्टींत विजापूरकरांच्या मुलखास लागून जो निजामशाहीचा प्रांत वसईच्या नदीपर्यंत होता तो अदिलशहाच्या स्वाधीन व्हावा; त्याप्रमाणेंच भीमा व नीरा ह्या नद्यांच्या दरम्यान चाकणच्या किल्ल्यापर्यंत जो मुलूख पूर्वी निजामशाहीच्या ताब्यांत होता तो अदिलशहास मिळावा, हा एवढा मुलूख मिळाल्याबद्दल अदिलशहानें मोगलबादशहास वर्षाला बारा लाख होन खंडणी द्यावी; शहाजीराजे आपल्या ताब्यांतील एकूणएक किल्ले सोडून देऊन, आपल्याजवळच्या सर्व तोफा व इतर सगळी युद्धसामुग्री मोगलांच्या स्वाधीन करतील तर त्यांना व त्यांच्या पदरच्या एकंदर लोकांना शहाजहान बादशहाने क्षमा करावी, नाहींतर विजापूरकरांनी त्याला आपल्या राज्यांत कोठेही थारा देऊं नये, ते जसे मोगलांचे शत्रू आहेत तसेच ते आपलेही आहेत असें अदिलशहानें मानावे. हा तह स. १६३६ त झाला.[१]

ह्याप्रमाणें विजापूरकर तह करून प्राप्त झालेल्या अरिष्टांतून स्वतः मुक्त झाले. ह्यामुळे शहाजीराजांचा एक मोठाच मदतगार नाहींसा होऊन ते एकटे पडले. पण अजूनही त्यांनी हिंमत सोडली नव्हती. शत्रूशी शेवटपर्यंत झुंजावयाचें अशी त्यांस धमक होती. विजापूरकरांशी समेट करून शहाजहानाची सगळी फौज मोकळी झाली. मग तिने एकट्या शहाजीराजांवर आपला मोर्चा फिरविला. अशी ही एकत्र झालेली मोठी सेना राजाच्या एकसारखी पिच्छास लागली. मध्ये थोडासा अवकाश सापडला तेवढ्यांत राजांनी कोंकणांत उतरून आपल्या राहिलेल्या किल्ल्याचा कडेकोट बंदोबस्त चालविला होता. पण इतक्यात मोगलांचा प्रचंड सेनासमुद्र त्यांच्यावर लोटला आणि त्यांस विजापूरकरही सहाय झाले. त्यांचा सरदार रणदुल्लाखान सैन्य घेऊन त्यांच्या मदतीस गेला. त्यामुळें एकंदर किल्ले शत्रूच्या हातीं जाऊन ते अगदीं जेरीस आले आणि माहुलीच्या[२] किल्ल्यांत जाऊन राहिले. मोगलांचा सरदार खानजमान हा त्याच्या पाठीवर होता. त्याने त्या किल्ल्यास गराडा घालून मोर्चे लावले. राजांनी तो किल्ला काहीं वेळ लढविला परंतु शेवटी निरुपाय होऊन शहाजहान बादशहास त्यानी असा नम्रतापूर्वक अर्ज केला कीं, 'माझ्या सर्व अपराधाची क्षमा करावी, व मला आपल्या नोकरीस ठेवावे.' बादशहाने ही राजांची विनंती मान्य केली नाही. त्याला त्याने असा जबाब पाठविला की, 'तुम्हांस पूर्वी मनसब दिली असतां तुम्ही दिल्लीपदपादशाहीशीं विरोध केला, व शेवटीं हे असें बंड करून आमची पुष्कळ खराबी केली. यास्तव तुम्हांस आमच्या पदरी पुनरपि नोकरी मिळणे नाहीं. तुम्हांस विजापूरकराच्या नोकरीस रहाण्याची मात्र परवानगी दिली आहे.' ह्याप्रमाणें जबाब मिळाल्यावर निजामशाही तक्तावर बसविलेल्या बालराजास बादशहाच्या स्वाधीन करून आपल्या उरलेल्या लोकांनिशी शहाजीराजे विजापुरास आले. हें वर्तमान स. १६३७ त घडले.[३]

---

१ प्रो. सरकार यांनी औरंगजेबाच्या चरित्रात ह्या तहाची कलमे दिली आहेत ती अशी – (१) अदिलशहाने मोगलबादशहाचे अंकित होऊन त्याचे हुकुमात राहावे; (२) निजामशाहीचा अंत झाला असें ठरवून तिचा मुलूख अदिलशहा व मोगल बादशहा यांनी आपसांत वाटून घ्यावा आणि हा वाटलेला मुलूख ताब्यात घेण्यात मोगल सरदारांना हरकत करू नये; (३) अदिलशहाचा सगळा मुलूख त्याच्याकडे कायम राहून आणखी सोलापूर, वांगणी, परंडा, भाळकी, चिदगुप, पुणे, सुपे व कोंकण प्रांत वगैरे पन्नास परगणे निजामशाहीच्या सत्तेतले त्याने घ्यावे; (४) अदिलशहाने वीस लाख रुपये द्यावे; (५) गोवळकोंड्याच्या कुतुबशहाशी कोणत्याही प्रकारची कलागत अदिलशहाने करू नये. त्याच्याशी वडीलबंधूच्या नात्याने वर्तावे. (६) उभय पक्षांनी एकमेकांच्या सरदारास फितवू नये व फिसाद केलेल्या सरदारांस नोकरीस ठेवू नये. (७) शहाजी भोसले यांनी निजामशाही घराण्यातला एक राजपुत्र उभा केला होता. तरी त्यांनी आपल्या ताब्यातले जुन्नर, त्रिंबक वगैरे किल्ले मोगलांच्या हवाली केले नाहीत तर त्यांस अदिलशहाने आश्रय देऊ नये, किंबहुना विजापूर सरकारच्या मुलखात कोठेही थारा देऊ नये.

२ हे ठिकाण मुंबईच्या ईशान्येस सुमारे ३२ मैलावर आहे.

३ प्रो. सरकार तारीख-इ-शिवाजी नामक ग्रंथाच्या आधाराने स. १६३६ च्या ऑक्टोबर महिन्यात राजे विजापूर सरकारच्या नोकरीस राहिले असे म्हणतात.

शहाजीराजांची अदिलशाहींतील नोकरी

शहाजीराजे विजापुरास आले तेव्हां त्यांचा अदिलशहानें व रणदुल्लाखान, मुरारपंत वगैरे मुत्सद्यांनी बहुमान केला व त्यास आपल्या पदरी मोठ्या इतमामाने ठेवून घेतलें. असा कर्तृत्ववान– बलाढ्य व शूर सरदार आपणांस लाभला म्हणून त्यांस अतिशयित आनंद झाला. मोगलांशी नुकताच तह झाला होता त्या अन्वयें शहाजीराजांची पूर्वीची सगळी जहागीर अदिलशहाच्या हाती आली होती. तीपैकीं पुणे व सुपे हे परगणें[१] त्यानें राजाकडे जहागिरीदाखल कायम केले. ह्या जहागिरीची व्यवस्था पाहण्याचे काम राजांनी दादाजी कोंडदेव नामक एका हुशार व विश्वासू ब्राह्मणास[२] सांगितलें आणि त्या जहागिरीच्या रक्षणार्थ त्याच्या बरोबर एकहजार स्वार ठेविले. ह्या स्वारांवर सिद्दी हिलाल यास त्यांनीं प्रमुख नेमिलें.

मोगलांकडून अदिलशहास भीमा व नीरा ह्या नद्यांमधला प्रांत मिळाला होता, त्याची व्यवस्था लावण्याचे काम त्यानें मुरारपंतास[३] सांगितलें. ह्या मुत्सद्यानें त्या कामगिरीवर जातांना शहाजीराजांस बरोबर घेतलें. कारण ह्या मुलखाची माहिती राजांना चांगली होती. ह्या कामी राजांचे त्यास उत्कृष्ट साहाय्य झालें. ते जसे अप्रतिम योद्धे होते तसेच ते चतुर व बुद्धिमान मुत्सद्दी होते. त्यांच्या अंगच्या ह्या अलौकिक गुणांस्तव मुरारपंताच्या मनांत त्यांच्याविषयी अधिकच आदरबुद्धी उत्पन्न झाली व त्यांजवर त्यांचा पूर्ण लोभ जडला. सुलतानानें नेमून दिलेली कामगिरी बजावून मुरारपंत दरबारी आला तेव्हां त्यानें सुलतानापाशीं राजांची अतिशयित तारीफ केली व अशी शिफारस केली कीं, अशा शूर, युद्धकलानिपुण व राजकार्यधुरंधर पुरुषास सहसा सोडू नये; त्याची साधेल तेवढी बढती करून त्यास आपल्या पदरी कायम राहण्याविषयी उत्तेजन द्यावे. शहाजीराजांच्या अंगचे चातुर्य पाहून मुरारपंत थक्क झाल्याची एक गोष्ट कित्येक बखरींत येणेंप्रमाणें दिली आहे; राजांनी विजापूरकरास मथवून दौलताबादच्या किल्ल्यावर हल्ला करण्यासाठी त्यांची मदत मागितली, तेव्हां मुरारपंतास त्यांनीं त्या मोहिमेवर पाठविलें.[४] ही फौज कूच करीत असतां वाटेत सूर्यग्रहण[५] झालें. तेव्हां भीमाइंद्रायणीसंगमीं नागरगाव[६] येथें त्यांनीं सैन्याचा तळ दिला, व पुष्कळ दानधर्म केला. ह्या वेळीं मुरारपंताच्या मनांत असें आलें कीं, आपल्या स्वारीच्या हत्तीची रौप्यतुला करून तें रुपे ब्राह्मणांस दान करावे, पण हत्तीची तुला करावी कशी हा प्रश्न उद्भवला. याविषयी कोणास कांही युक्ती सुचेना. तेव्हा शहाजीराजांनी असे सुचविले कीं, हत्तीला होडींत चढवावे आणि त्याच्या भाराने ती जितकी दबेल तेथें खूण करावी. मग हत्तीला खाली उतरून तीत दगड भरावे व त्या खुणेपर्यंत ती पाण्यात बुडाली म्हणजे ते सगळे दगड काढून निरनिराळे तोलावे. अशा रीतीनें हत्तीचे एकंदर वजन कळेल. ही साधी पण कोणासही न सुचलेली युक्ती राजांनी सांगितल्यावरून मुरारपंतानें त्यांची फारच तारीफ केली आणि हत्तीची तुला झाली. तेवढ्या किंमतीचे गांव त्याने ब्राह्मणांस इनाम दिले.

---

१ हे परगणे मुरार जगदेव याने शहाजीराजांची हुशारी व योग्यता पाहून दौलताबादेच्या लढाईहून परत येताना त्यास दिले होते, असा रायरीच्या बखरींत उल्लेख आहे. तारीख-इ-शिवाजीनामक बखरीत चाकणपासून इंदापूरपर्यंतचा प्रांत व शिरवळ ही राजास जहागिरीदाखल मिळाली, असे आहे.

२ हा दादाजी-प्रांत पुणे, परगणा पाटस, मौजे मलठण येथला पटवारी होता. राजवाडे यांनी अठरा व एकूणीस या खंडात प्रसिद्ध केलेल्या त्या वेळच्या कागदपत्रात याच्या नावापुढे कोंडाणा किल्ल्याचा सुभेदार व जुन्नर सुभ्याचा मुजुमदार असा उल्लेख आहे.

३ प्रो. सरकार हे 'बसातीन -इ -सलातीन' यातील उल्लेखाच्या आधारावरून असे म्हणतात की, मुरार जगदेवाचा वध स. १६३५ च्या सुमारास झाला होता. हे खरे ठरल्यास शहाजीराजे दुसऱ्याच कोणा तरी सरदाराबरोबर सदरील मोहिमेवर गेले असावेत; परंतु मराठी बखरीत मुरारपंताचेच नाव दिलें आहे.

४ ह्या मोहिमेची हकीकत मागें दिली आहे.

५ हें ग्रहण शके १५५५ श्रीमुखनामसंवत्सरीं भाद्रपद महिन्याच्या अमावस्येस म्हणजे ता. २३ सप्टेंबर सन १६३३ रोजी झालें.

६ ह्या गावी हा असा हत्ती तोलल्यावरून त्यास तुळापूर असे नाव पडले. औरंगजेबाने ह्या गावास हे नाव दिल्याची गोष्ट सांगतात, ती अर्थात खरी नाही.

वर सांगितल्याप्रमाणें मुरारपंताबरोबर जाऊन सुलतानाची कामगिरी बजावून शहाजीराजे विजापुरास परत आल्यावर तेथें फार दिवस राहिले नाहींत. पुढल्यावर्षी अदिलशहाच्या मनात असें आलें कीं, कर्नाटकांतील हिंदू जमेदारांस जिंकून तिकडे आपली सत्ता वाढवावी. ह्या मोहिमेवर त्यानें रणदुल्लाखानाची योजना केली व त्यांस सरलष्कर असा किताब देऊन शहाजीराजांस त्याचा दुय्यम नेमिलें. ह्या मोहिमेत राजांनी रणदुल्लाखानास मनापासून मदत करावी म्हणून त्यांना त्या प्रांतांत कांहीं जहागीर देण्याचे वचन सुलतानानें दिलें. राजांनी रणदुल्लाखानास मोठ्या उत्साहाने साहाय्य केल्यामुळें सुलतानाचा उद्देश बराच सिद्धीस गेला. त्यांनीं तिकडच्या जमेदारांशी दोनतीन वर्षे युद्धप्रसंग करून त्यापैकीं पुष्काळांस पादाक्रांत केले. ह्या झटापटींपैकीं एकीचा उल्लेख एकदोन बखरींत आढळतो. रायारायल नामक[१] एक राजा कर्नाटकांत प्रबळ होऊन विजापूरकरांच्या तिकडील प्रांतास फार उपद्रव करीत होता. त्याच्याशी शहाजीराजांनी दोन वेळां मोठी निकराची लढाई करून त्याचा पराभव केला व अक्कलकोट, बागलकोट, कोल्हार, बेंगरूळ,[२] वासकोट, बाळापूर व शिरटें हे परगणे काबीज केले. ही अशीं पराक्रमाची कृत्ये केल्यामुळें रणदुल्लाखानाचे राजावर अतिशयित प्रेम जडले. विजापुरास परत आल्यावर हा खान सुलतानापाशीं राजांची वारंवार वाखाणणी करूं लागला. सुलतान त्यांच्यावर फारच खुष झाला आणि त्यांनीं कर्नाटकांत जे परगणे जिंकिले होते त्यांची जहागीर त्यांस त्यानें करून दिली. ह्या जहागिरीस आणखी रतनपूर, देवगड, कनकगिरी व राजदुर्ग हे तिकडील परगणे अदिलशहानें पुढें कांहीं दिवसांनीं जोडून दिले. त्याप्रमाणेंच महाराष्ट्रांत इंदापूर, बारामती व मावळप्रांत हे राजास जहागिरीदाखल आणखी मिळाले व कऱ्हाड प्रांतांतील बावीस गांवाच्या देशमुखीची सनद त्यांना प्राप्त झाली.

ह्याप्रमाणें शहाजीराजांच्या अंगच्या शौर्यवीर्यादी गुणांचे योग्य प्रदर्शन होऊन त्यांचें अदिलशहानें चांगले चीज केलें. ते मोठे हुशार व विश्वासू नोकर आहेत अशी त्याची खात्री झाली. कर्नाटक व द्रविड ह्या देशांतला जो मुख्य अदिलशाही सत्तेखाली आला होता त्याची योग्य व्यवस्था लावून त्याचें रक्षण करण्याचें काम अंमळ बिकट होतें. तें चांगल्या हुशार व भरवंशाच्या सरदारावांचून नीट तडीस जाणार नाहीं हें अदिलशहास कळून चुकले होतें. त्या कामगिरीवर शहाजीराजांची योजना झाली तर उत्तम, असा अभिप्राय सर्व मुत्सद्यांचा पडला. त्यावरून राजास त्या प्रांताची सुभेदारी देऊन तिकडे रवाना केलें. हा प्रांत विजापूरकरांच्या सत्तेत नवीनच आला असल्याकारणाने त्यांत चोहींकडे फारच बेबंदाई माजली होती. ती मोडून टाकून सरकारची सत्ता नीट स्थापित करावयाची होती. राजांनी सर्व घोटाळा व धामधूम नाहींशी करून जिकडेतिकडे चांगला बंदोबस्त केला. जमाबंदीची नवी पद्धत त्या प्रांतांत सुरू करून सर्व प्रजेला आबाद व सुखी केलें आणि सरकारी उत्पन्नही चांगले वाढविले. ही सगळी व्यवस्था नीट लावण्यासाठी राजांनी महाराष्ट्रातील पुष्कळ ब्राह्मण कारकून तिकडे नेले. हल्ली त्या प्रांतांत आढळणारे देशमुख, देशपांडे, कुळकर्णी, शिरस्तेदार इत्यादी उपनांवांचे लोक मूळचे महाराष्ट्रांतले असून त्यांना प्रथम शहाजीराजांनी तिकडे नेले होतें. राजे स्वतः मलिकंबराच्या तालमीतले असल्यामुळे त्यांना ही व्यवस्था लावण्यास मुळींच कठीण पडलें नाहीं आणि ती लावतांना तिकडील प्रजेला विनाकारण नाडले तर नाहींच, परंतु उलट त्या लोकांचा आपणांवर लोभ जडेल अशाच रीतीने वागण्यास ते सर्वदा झटत असत. विजापूरसरकारास प्रतिवर्षी पाठवावा लागणारा वसूल नियमानें पावता करून स्वतःपाशीही कांहीं अर्थसंचय व्हावा याविषयी ते सर्वदा खबरदारी घेत असत.

कर्नाटकात गेल्यावर शहाजीराजे पहिल्याने बेंगरुळास राहात असत; परंतु पुढे जिकडेतिकडे बरीच स्वस्थता झाल्यावर ते बाळापुरास राहू लागले. ह्या वेळी तंजावरास विजयराघव म्हणून एक बलाढ्य राजा राज्य करीत होता.

---

१ हा विजयनगरच्या राजघराण्यातला असावा असा तर्क आहे. याचे श्रीरंग रायल असेही नाव कित्येक ग्रंथात दिले आहे.

२ ह्यांचे सध्याचे नाव बेंगलोर असे आहे. मि. किंकेड म्हणतात की, केंप गौडा नावाच्या एका राजाचे हे शहर राजधानी होते. रणदुल्लाखान व शहाजीराजे स. १६३७ त कर्नाटकातल्या मोहिमेवर गेले तेव्हा त्यांनीं ह्या राजाशी युद्ध करून त्याला जिंकिलें. दुसऱ्या वर्षी रणदुल्लाखानास विजापूर सरकारास परत बोलाविले आणि कर्नाटकातली मोहीम शहाजीराजांवर सर्वस्वी सोपविली. त्यांनी कोल्हार, बाळापूर वगैरे प्रांत हस्तगत केले. हे हस्तगत केलेले प्रांत विजापूर सरकारने राजांस जहागीर म्हणून दिले.

त्याचें त्रिचनापल्लीच्या राजाशी वैमनस्य येऊन उभयतांमध्ये कलह सुरू झाला. त्रिचनापल्लीकरानें शहाजीराजांशी सख्य करून असें बोलणे लाविलें कीं, 'तुम्ही आम्ही एक होऊन, तंजावरच्या राजाचा पराभव करून त्याचा मुलूख काबीज करूं. तुमच्या स्वारीच्या खर्चास पांच लक्ष रुपये आम्ही देतो व जी कांहीं लूट मिळेल ती तुम्ही ठेवावी.' ह्यावरून राजांनी विजयराघवावर चालून जाऊन त्याच्याशी युद्ध केलें. त्यांत त्या राजाचा पराभव होऊन तो रणात पडला. तंजावर शहाजीराजांच्या कबजांत आलें. त्यात त्यांस पुष्कळ द्रव्य सापडले. हा प्रांत चांगला आहे असें पाहून राजांनीं तो आपल्या स्वाधीन ठेवण्याचा विचार केला व त्रिचनापल्लीकराची अशी समजूत केली कीं, तंजावर प्रांत आम्ही ठेवणार. तुम्ही आम्हांला स्वारीखर्चाबद्दल काहीएक देऊं नये.[१] परंतु त्याला हें न आवडून तो राजांबरोबर युद्धास उठला. त्याचाही राजांनी पराभव करून त्याचा मुलूख काबीज केला. हे जे दोन नवीन प्रांत राजांनी जिंकले ते विजापूरसरकारानें त्यांच्याकडे कायम केले.

येथपर्यंतचा शहाजीराजांचा चरित्रक्रम पाहिला असतां सहजी असा प्रश्न उद्भवतो की, असा तेजस्वी, महापराक्रमी व धैर्यशाली पुरुष विजापूरसरकारची ताबेदारी पतकरून स्वस्थ तरी कसा राहिला? मोगलांसारख्या प्रबळ शत्रूशी टक्कर देऊन त्यांच्या मोठमोठ्या सरदारांसही ज्याने कांहीं वेळपर्यंत बिलकुल दाद दिली नाहीं, तो पुरुषसिंह असा परवश होऊन राहिला हें कसें? ह्या प्रश्नाचें समाधान असें आहे कीं, शहाजीराजे मोठे धोरणी व धूर्त होते. केवळ आवेशादी वृत्तींस वश होऊन, अविचाराचे एकादे कृत्य करून आपला नाश करून घेणे हें खऱ्या शहाण्या पुरुषास उचित नव्हे. खरा धोरणी पुरुष असतो तो प्रसंग येईल तसें वर्तन करून, आपला इष्ट हेतू साध्य करण्यास झटत असतो. निजामशाही मोगलानी बुडविली असतां, शहाजीराजांनी तिची पुनः विजापूरकरांच्या साहाय्याने स्थापना केली. परंतु मोगलबादशहानें विजापूरकरांस मोठी लालूच दाखवून त्यांच्या कटांतून फोडले व सर्व निजामशाही मुलूख काबीज करून दोघां बादशहांनी वाटून घेतला. त्यामुळें शहाजीराजांचा निरुपाय झाला. त्यांना आतां कोणाचाच आधार राहिला नाहीं. हातचा गेलेला मुलूख पुनः मिळविण्याची खटपट करू म्हटलें तर दोन प्रबळ बादशहाचा आपल्यावर एकदम गिल्ला होऊन आपला पुरा नायनाट व्हावयाचा, हें त्यांस कळून चुकले होतें. यास्तव नुसते थोडेसे बंड उभारून धामधूम करीत राहून आपला पुरा नाश करून घेण्यापेक्षा कोठेतरी कायमची जहागीर मिळवून पुढें काय होईल तर पाहावे, असा विचार करून त्यांनीं ह्यावेळी विजापूरसरकारांत नोकरी पत्करली.

पुढें कर्नाटकांत सुभेदारी मिळून अदिलशहाची पुरी मेहरबानी व विश्वास संपादन केल्यावर शहाजीराजांनी आपलें पूर्वस्वरूप थोडेथोडे प्रगट करण्यास आरंभ केला. कर्नाटक प्रांतांत साधल्यास स्वतंत्र राज्य स्थापण्याचा इरादा शहाजीराजांचा होता, असे कित्येक इतिहासकारांचें म्हणणें आहे.[२] तिकडील लोकांची प्रीती संपादन करून द्रव्यसंग्रह करण्यांत त्यांचा मुख्य उद्देश अर्थात् हा होता कीं, स्वतंत्र व्हावयाचा योग आला असतां त्या लोकांचे साहाय्य मिळून वरिष्ठ सरकाराशी युद्धप्रसंग करण्याचें सामर्थ्य आपणांस यावें. हा त्यांचा उद्देश स्पष्ट होता यास एक पुरावा असा आहे कीं, त्यांच्या हातच्या कित्येक सनदा व इतर दस्तऐवज कर्नाटकांतल्या लोकांकडे सांपडतात. त्यांवर वरिष्ठ सरकारच्या वतीने आशयाचा जो मायना नेहमीच्या पद्धतीस अनुसरून असावयाचा तो नसून, 'शहाजीराजे भोसले यांच्या दरबारांतून', असा उल्लेख आढळतो. दुसरा पुरावा असा कीं, शिवाजीमहाराजांनी विजापूरकरांच्या मुलखात धामधूम सुरू केली तेव्हां त्या दरबारचे कित्येक लोक उघडपणे बोलू लागले कीं, शहाजीराजें यांचें आपल्या पुत्राशी गुप्त कारस्थान चालू असून, त्यांनींच त्याला ही अशी धामधूम करण्यास उत्तेजन दिलें असावें. त्यावरून अदिलशहानें राजांस असा हुकूम

१ स्कॉटवेरिंग व बुंदेले असें म्हणतात की, तंजावरचा राजा पंचीरंगू म्हणून होता. त्याचा व मुदगलचा पाळेगार जंजाप्पा नाईक ह्यांचा कलह लागला असतां, जंजाप्पास शहाजीराजांनीं मदत करून पंचीरंगूचा पराभव केला व त्याचा प्रांत आपल्याकडे ठेविला. हें जंजाप्पाला न आवडून त्याची व राजाची कलागत लागलीं. तींत तो ठार झाला व राजांनी त्याचाही प्रांत हस्तगत केला.

२ उल्किजकृत म्हैसूरचा इतिहास पाहा.

केला कीं, 'तुम्ही आपल्या पुत्राच्या बेकैद वर्तनास आळा घालून त्याचा योग्य बंदोबस्त करावा.' त्यावर राजांनीं दरबारची अशी समजूत केली कीं, 'मीं माझ्या पूर्वीच्या बायकोचा व तिच्या त्या मुलाचा कधींच त्याग केला असून दुसरें लग्नही केलें आहे. त्यांचा माझा आज पुष्कळ दिवस कोणत्याही प्रकारचा संबंध नाही. सरकारास वाटेल त्या रीतीने त्याचा बंदोबस्त करावा!' राजांच्या ह्या जबाबाने त्या वेळीं अदिलशहाचे समाधान झालें असावें असें दिसते. कारण त्यानें त्या प्रसंगी त्यांना काहीएक शासन केलें नाही. आतां ह्या उडवाउडवीच्या जबाबाचे खरें इंगित काय होतें हें कोणासही सांगावयास नको. आपला मुलगा जें हें धाडसाचें काम करीत आहे तें सर्वथा निषिद्ध आहे असें राजांना वाटलें असतें तर त्यांना त्यांच्या त्या अल्लड वर्तनास आळा घालून वाटेल तसा बंदोबस्त तेव्हांच करतां आला असता; परंतु आपला मुलगा करत आहे तें आपल्या इष्ट उद्देशाचे संवर्धकच आहे असें शहाजीराजांना वाटल्यावरून, पूर्वोक्त प्रकारचा जबाब देऊन व आपल्यावरचा वहीम कसाबसा उडवून ते नामा निराळे राहिले.

पुढें शिवाजीमहाराजांची बंडाळी अधिकच वाढली. ती विजापूरसरकारांस अगदीं असह्य होऊन त्यानें शहाजीराजांस चांगलीच तंबी देण्याचा विचार केला. वर निर्दिष्ट केल्याप्रमाणें राजांनी आपला आपल्या पुत्राशी काहीच संबंध नाहीं असें निक्षून सांगितले असतां, त्यांचा पुनः संशय येऊन त्यांना शिक्षा करण्याचा विचार विजापूरसरकारानें मनांत आणिला. यास मुख्य कारण असें झालें कीं, शहाजीराजांचे प्रस्थ कर्नाटकांत अतिशयित वाढून ते स्वतंत्र होण्याचा बेत करीत आहेत, आणि तत्सिद्ध्यर्थ साधनसामुग्री जमवीत आहेत, अशी दरबारची पूर्ण खात्री होऊन चुकली होती. हा असा राजांविषयी पक्का वहीम येण्यास कांहीं तरी सबळ कारणें अर्थात् त्या सरकारला दिसलीं असावीं यांत कांहीं संदेह नाहीं. विजापूरकरांनी शहाजीराजांस शासन करण्याचा निश्चय करून त्यांना पकडून आणण्यासाठी मुस्तफाखाननामक एका सरदाराला पाठविलें.[१] हा सरदार त्या वेळीं कर्नाटकांतल्या मोहिमेवर असून शहाजीराजे त्याच्या मदतीस होते. त्यांनीं त्या वेळीं जिंजीस वेढा घातला होता. मुस्तफाखानानें राजास युक्तीने पकडण्याची कामगिरी बाजी घोरपडे मुधोळकर यास सांगितली. राजांशीं उघडपणे समरांगणांत गांठ घालून त्यांचा पराभव करून त्यांस कैद करण्याचें काम अतिदुर्घट होतें. घोरपड्यासारख्या सरदारास तर तें केवळ अशक्यच होतें. जो वीरपुरुष मोगलांसारख्या प्रचंड शत्रूसही पुरून उरला व त्यांच्या मोठमोठ्या सरदारांनी पकडण्याचा खटाटोप केला असता जो त्यांच्या हाती लागला नाहीं, तो विजापूरकरांच्या यःकश्चित् सरदारांस कसला हार जावयाला? घोरपड्यानें राजांना पकडण्याची अशी कांही खटपट

---

१ कित्येक बखरकार असें म्हणतात की, अदिलशहानें ही कामगिरी घोरपडे यांस सागितली होती परंतु जेधे यांच्या शकावलींत मुस्तफाखानानें त्यांस पकडल्याचा उल्लेख आहे. मोडककृत विजापुराच्या इतिहासात असें आहे कीं, मुस्तफाखानाचें व शहाजीराजांचें काहीं कारणावरून वैमनस्य येऊन राजांनीं त्याच्याशी उघड शत्रुत्वच प्रगट केलें व ते स्वतंत्रपणें वागू लागले. हें त्यांचें बंड मोडण्याच्या इराद्याने त्या सरदाराने घोरपडे व यशवंतराव आसदखानी यास पाठविलें. प्रो. सरकार यवनी बखरींच्या आधाराने असेंच विधान करितात. ह्या यवनी बखरींत ह्या वैमनस्याचें कारण असें नमूद केलें आहे की, राजे जिंजीस बरेच दिवस वेढा घालून बसले असता मुस्तफाखानास त्यांनीं असा निरोप पाठविला की, मला व माझ्या लोकांस आपल्या प्रांती जाऊन विश्रांति घेऊं द्या. खानाने त्यांस असा उलट निरोप पाठविला की, अशा प्रसंगी तुम्ही परत जाल तर मोठा गोंधळ होईल. तेव्हां राजांनीं पुनः असें सांगून पाठविलें की, छावणीत दाण्यावैरणीची महर्गता झाली आहे, शिपायांचे फार हाल होऊ लागले आहेत, त्यांच्याकडून लढाईचे श्रम इतःपर होणार नाहींत, तरी तुमच्या परवानगीची वाट न पाहता मी स्वप्रांतीं निघून जाईन. ह्या निरोपावरून त्या सरदाराची खात्री झाली की, शहाजीच्या मनातून दगा करावयाचा आहे. प्रो. सरकार यवनी बखरी अधिक विश्वसनीय समजून शहाजीराजांस पकडून कैद करण्याचें हें कारण खरें आहे असें म्हणतात; परंतु शहाजीराजासारख्या धूर्त व धोरणी पुरुषाच्या हातून असला अविचार व शिरजोरपणा झाला असावा असें म्हणता येत नाहीं. काळवेळ पाहून वागण्यात व स्वसंरक्षण करून स्वसामर्थ्य वाढविण्यात त्यांचा हातखंडा होता. शहाजीराजे शिरजोर होऊन बंडाळी करण्यास प्रवृत्त झाले होते हें जर खरें तर ते असे हातीं लागल्यावर त्यांना तिकडल्यातिकडेच ठार करण्याचें सोडून विजापुरास आणण्याचे प्रयोजन नव्हतें. आता येथें एक मात्र तर्क संभवतो की, शिवाजीमहाराजांस धाक घालून त्याची बंडाळी मोडण्याच्या इराद्याने अदिलशहानें राजांस विजापुरास आणविलें असावें; परंतु त्यास मुस्तफाखानानें पकडल्यावर ही कल्पना अदिलशहास सुचली असें म्हणण्यापेक्षा अदिलशहाला ती अगोदरच सुचून त्यानें त्यांना पकडण्याचा हुकूम पाठविला असावा असें समजण्यास कोणती हरकत आहे?

अर्थात केली नाहीं. त्यानें त्यांना मेजवानीस म्हणून आपल्याकडे बोलाविले; त्यांचें आमंत्रण स्वीकारून राजे त्याच्या घरी गेले, तेंव्हा घोरपड्याने आपला वाडा दाखवण्याच्या मिषाने त्यांस आत नेले आणि ते एका खोलीत शिरले असता ती एकदम बंद करून त्यांस आत अडकविले, आणि तेथें अंधारांत हत्यारबंद लोक ठेविले होतें. त्यांनी त्यांस कैद केले.[१] त्याप्रमाणे त्यांस पकडून घोरपड्यानें विजापूरास पाठवून दिलें.[२] घोरपड्यानें राजांशी हा दगा केला त्या वेळीं ते चंदावराजवळ जिरावाडी येथें थोड्या लोकांनिशी तळ देऊन होते. ह्या विश्वासघाताबद्दल घोरपड्याचा सूड पुढें शिवाजीमहाराजांनीं राजांच्या सांगण्यावरून कोणत्या प्रकारे उगविला हें त्यांच्या चरित्रांत यथास्थलीं कथन केलें आहे.

शहाजीराजांस पकडून विजापुरास आणिलें तेव्हां त्यांस देहांतशासन करावे असा विचार दरबाराने केला. या संबंधाची वाटाघाट होतां होतां शेवटी असें ठरलें कीं, राजांस भिंतींत चिणून ठार मारण्याची दहशत घालावी, म्हणजे ते आपल्या पुत्राचा बंदोबस्त करून त्याला योग्य शिक्षा करतील. ह्या संबंधाची साद्यंत हकीगत पुढें यथास्थलीं द्यावयाची आहे.[३] येथें एवढेच सांगावयाचें कीं, शहाजीराजांसारख्या पराक्रमी व शूर सरदारास देहांतशासन देण्याचा विचार अदिलशहाने केला तो त्यांजविषयीं पुरा वहीम आल्यामुळेंच केला, यांत कांहीं संदेह नाही. पुढें शिवाजीमहाराजांनीं आपल्या पित्यास ह्या घोर मृत्यूपासून मोगलबादशहाशीं संधान बांधून सोडविले.[४] दिल्लीच्या बादशहाच्या मध्यस्थीस्तव राजास ठार मारितां येईना; तरी त्यांस पुनः कर्नाटकांत जाऊं देऊं नये, विजापुरासच नजरकैदेत ठेवावे, असा अदिलशहानें ठराव केला. शहाजीराजे ह्याप्रमाणें विजापुरास जवळजवळ चार वर्षे अडकून पडले होते. इतक्या अवकाशात शिवाजीमहाराजांनी विजापूरसरकारच्या मुलखात कांहींएक धामधूम केली नाही. शहाजीराजांनी अनेक उपायांनी दरबारच्या मुत्सद्यांस वळवून आपल्यावरचा वहीम नाहींसा केला, व आपल्यावर दरबारचा पुनः पूर्ववत् भरवसा बसवून कर्नाटकांतली सुभेदारी परत मिळविली व ते तिकडे निघून गेले.

ह्याप्रमाणें जिवावरच्या संकटांतून पार पडून कर्नाटकात गेल्यावर शहाजीराजांनी विजापूरसरकाराशीं उघड विरोध कधींही केला नाहीं; परंतु साधेल तेवढी स्वसत्ता वाढवून केव्हा तरी स्वतंत्र होण्याचा त्यांचा विचार शेवटपर्यंत कायम होता. ह्यानंतर शहाजीराजांनी कर्नाटकांत कोणकोणते युद्धप्रसंग केले याविषयीचा इतिहास उपलब्ध नाहीं. यास्तव ह्या

---

१ मि. किंकेड पृ., १४२

२ मोडक म्हणतात कीं, मुस्तफाखानाच्या हुकमावरून घोरपडे आणि आसदखान यानीं एके दिवशी प्रातःकाळी शहाजीराजाच्या छावणीवर अकस्मात् चाल केली. राजे रात्रभर ख्यालीखुशाली करून स्वस्थ झोपी गेले होते. शत्रु आपणांस पकडावयास एकाएकी चालून आला असें कळताच ते घाबरून उठले व त्यांच्या हातून सुटून जाण्याच्या इराद्याने घोड्यावर बसून एकटे कोणीकडे तरी जाऊ लागले. इतक्यात बाजी घोरपड्यानें लगट करून त्यांना पकडून कैद केलें आणि खानाकडे आणिलें. त्यानें त्यास अटकेत ठेविले, आणि त्यांच्या तीन हजार घोडदळाची दाणादाण करून टाकून त्यांच्या छावणींतली सारी चीजवस्तू लुटली. पुढे आदिलशहाला हा प्रकार कळल्यावर त्याने अफजुलखानास रवाना करून शहाजीराजास विजापुरास आणविले. आणि त्यांची कर्नाटकातली सगळी दौलत जप्त करविली.

३ आठवा भाग पाहा.

४ कित्येक बखरींत असा उल्लेख आहे की, रणदुल्लाखान शहाजीराजाचा जिवलग मित्र होता. त्यानें बादशहापाशी रदबदलीकरून त्यांस सोडविले. रायरीच्या बखरींत हा रदबदलीचा प्रकार येणेंप्रमाणें दिला आहे : शहाजीराजांस घोरपड्याने पकडल्यावर आदिलशहाने त्याला त्याला असा हुकूम पाठविला की, 'शहाजीराजांस विजापुरास आणू नये, तिकडेच त्यांला ठार मारावे.' हा हुकूम ऐकून रणदुल्लाखानाने संसार सोडल्याचे मिष करून फकिराचा वेष धारण केला व बादशहाकडे जाऊन मक्केस जाण्याची परवानगी तो मागू लागला. हा असा बलाढ्य सरदार आपणांस अंतरल्याने आपल्या राज्याचे मोठेच नुकसान होईल, असे बादशहास वाटून त्याने त्यास हाताशी धरून खाली बसविले व त्याला आपला बेत रहित करण्यासाठी अनेक प्रकारे सांगितले व शेवटी असें म्हटलें कीं, 'तुमची काही इच्छा असल्यास ती प्रगट करा, म्हणजे मी ती लागलीच तृप्त करतो' तेव्हा रणदुल्लाखान म्हणाला, 'आपल्या राज्यास अपाय जो कांहीं झाला आहे तो शिवाजीराजामुळें. शहाजीराजे कांहीं वाईट रीतीनें वागले नाहींत. कुराणांत असे आहे की, चांगल्यास इनाम द्यावे वाइटास शासन करावे. ह्या धर्माज्ञेप्रमाणें पाहता शहाजीराजास शिक्षा ठरविली आहे ती अन्यायाची आहे. हे बोलणे बादशहास मान्य होऊन त्याने शहाजीराजाची शिक्षा रद्द केली, व ते पुढें चांगल्या रीतीने वागतील ह्याविषयी खानास जामीन घेऊन राजाला आपल्या दरबारीं बोलाविले. व तेथें त्यांचा बहुमान होऊन त्यांस मोठ्या इतमामाने कर्नाटकात पाठविलें.

महापराक्रमी पुरुषाचे अखेरपर्यंतचें जीवनवृत्त येथें देता येत नाही. कर्नाटकांत विजापूरकरांच्या ज्या मोहिमा वेळोवेळी झाल्या त्यांची मुसलमान इतिहासकारांनीं अगदीं संक्षिप्त हकीगत दिली आहे; तींत कोठे कोठे शहाजीराजांचा त्रोटक उल्लेख केला असून, त्यांनीं विजापूरसरकाराच्या पक्षाने मोठ्या शौर्यानं युद्ध केलें असें म्हटलें आहे. विजापूरसरकाराने कर्नाटकांत त्यांना जी जहागीर दिली होती ती त्यांच्याकडे कायम असून तींत आणखी पुष्कळ भर त्यांनी घातली. तंजावर व त्रिचनापल्ली हे प्रांत त्यास कसे प्राप्त झाले हें पूर्वी सांगितलेंच आहे. याशिवाय आणखी आर्नीचा किल्ला, पार्तोनोवो वगैरे ठिकाणांवर त्यांची सत्ता होती.

शिवाजीमहाराजांनी चालविलेल्या स्वराज्यस्थापनेच्या उद्योगाविषयीचे वर्तमान राजांच्या कानीं वारंवार जात असून, त्याबद्दल त्यांस मोठे समाधान वाटे. ह्या अशा महापराक्रमी पुत्राची भेट घेण्याविषयी त्यांस मोठी उत्कंठा लागून राहिली होती; परंतु महाराजांची सगळी धामधूम विजापूरकरांच्या राज्यांत होत असल्याकारणानें राजांना ही आपली उत्कट इच्छा तृप्त करून घेण्याचा सुयोग पुष्कळ दिवस आला नाहीं. पुढें शिवाजीमहाराज व विजापूरसरकार यांच्यामध्ये कांही वेळ तह होऊन वैरभाव अंमळ नाहीसा होतांच राजांनीं स्वदेशी जाण्याची परवानगी विजापूरसरकाराकडून घेऊन आपल्या ह्या महाप्रतापी पुत्राची भेट घेतली.[१] ह्यावेळी शहाजीराजे स्वपुत्राच्या आग्रहास्तव महाराष्ट्रांतच राहिले असते. परंतु इकडे येण्याची परवानगी देताना विजापूरसरकारनें अशी अट घातली होती की, काम आटोपताच राजांनी कर्नाटकांत परत जावे, पुत्राशी मिलाफी करून इकडे राहू नये. ही अट मोडला असती तर त्यांची कर्नाटकांतली सारी दौलत अदिलशहानें जप केली असती. यास्तव इतके श्रम करून मिळविलेली दौलत घालवू नये म्हणून ते परत कर्नाटकांत गेले.

पुत्राची भेट घेऊन परत आल्यावर शहाजीराजे फार दिवस जगले नाहींत. नंतर दोन वर्षांनी त्यांचें देहावसान झालें. त्यांच्या मृत्यूची हकीगत येणेप्रमाणे आहे : बेदनूरचे पाळेगार भद्राप्पा नाईक व शिवाप्पा नाईक यांनीं पुंडावा करून विजापूरकरांच्या अंमलांतील मुलखास उपद्रव केला. यास्तव त्यांचें पारिपत्य करण्याची कामगिरी अदिलशहानें शहाजीराजे व सर्जाखान यांस सांगितली. शहाजीराजांनी भद्राप्पा नाईकाचा पराभव केला, व तो नाईक त्यांस शरण आला. त्यानें विजापूरकरांचे जे प्रांत हाताशी घातले होते ते सगळे सोडून दिले. मग त्याला थोडीशी जहागीर देऊन विजापूरकराचा अंकित केलें. ही शहाजीराजांची कामगिरी अदिलशहास कळली तेव्हां त्यानें फार खुष होऊन राजास मोठ्या गौरवाचे पत्र लिहिले व त्यांस वस्त्रे, अलंकार, हत्ती, घोडे वगैरे नजराण्यादाखल पाठविले. दरबारच्या सर्व मुत्सद्यांनी वेगळींवेगळीं पत्रे पाठवून राजांची फार तारीफ केली. ह्या मोहिमेवर शहाजीराजे गुतले असतां ते एके दिवशी बंदेकीर[२] नांवाच्या गांवीं शिकारीस गेले. तेथें सशाची पारध उठून शहाजीराजांनी आपला घोडा त्याच्या मागें लाविला. धावता धावता भंडोळींत घोड्याचा पाय अडकला. त्यासरसे घोडा व राजे खालीं पडलें व छातीवर घोड्याचा पाय पडून, त्या धक्क्याने त्यांचें तेथेंच प्राणोत्क्रमण झालें. बरोबरची माणसे शोध करीत तेथें आली. त्यांनी राजांची ती अवस्था पाहून व्यंकोजीराजांस तेथें आणिलें. त्यांनी त्यांची यथासांग उत्तरक्रिया केली. मरणसमयी राजांचे वय सत्तर वर्षांचे होतें. हे खेदजनक वर्तमान स. १६६४ च्या जानेवारी महिन्यांत घडले. अदिलशहाकडून व्यंकोजीराजांस दुखवटा येऊन मनसबदारीची वस्त्रे त्यांच्या नावे झालीं. शहाजीराजे ज्या जागीं वारले तेथें त्यांची छत्री बांधिली आणि विजापूरकरांकडून सनद आणून त्या गावचे उत्पन्न तिच्या खर्चास लावून दिलें.

शहाजीराजांस एकंदर तीन औरस पुत्र होते. वडील पुत्र संभाजी हा दौलताबादेस असता स. १६२३ त जिजाबाईच्या उदरी झाला. ह्याच्यावर राजांचे फारच प्रेम असे. हा त्यांच्याबरोबर नेहमी असे. हा स. १६५३ त कनकगिरीच्या लढाईत जंबिऱ्याचा गोळा लागून मरण पावला. ह्या लढाईची हकीगत अशी आहे कीं, शहाजीराजांच्या

---

१ ह्या भेटीची साद्यंत हकीगत पुढें चवदाव्या भागांत दिली आहे.

२ हा गाव तुंगभद्रेच्या तीरी असून त्याची बसवपाटण व वासवपट्टण अशी नावे इतरत्र दिली आहेत.

ताब्यातील बाळापूरनामक तालुक्यास कनकगिरीच्या संस्थानिकानें उपद्रव केल्याचे वर्तमान समजल्यावरून त्यांनी संभाजीस फौज देऊन त्या संस्थानिकाला शिक्षा करावयास पाठविलें. त्यानें कनकगिरीस वेढा देऊन किल्ल्यावर मारा चालविला असता, गोळा लागून तो समरांगणांत पतन पावला.[१] ह्यामुळे शहाजीराजांस पराकाष्ठेचें दुःख झालें. त्यांला त्या संस्थानिकाचा अतिशयित राग येऊन त्याच्यावर त्यांनीं जातीने हल्ला केला व त्याचा पुरा मोड करून कनकगिरी हस्तगत केला. ह्या कलहात अफझुलखानाकडून त्या संस्थानिकास आतून साहाय्य मिळाले होतें. ह्याबद्दल त्यालाही शासन करावे असें राजांच्या मनात आलें; परंतु त्याच्याशीं उघडपणे वैर करून युद्धास प्रवृत्त झाल्याने अदिलशहास क्रोध येऊन त्याची आपणावर चढाई होईल या भीतीनें राजे त्याच्या वाटेस गेले नाहींत परंतु पुढें लवकरच ह्या संभाजीचा धाकटा भाऊ त्याचा सूड घेणार होता हे शहाजीराजांच्या त्या वेळीं स्वप्नीही आलें नाही.

लुखजी जाधवरावानें पाठलाग केला तेव्हां राजांनीं जिजाबाईस शिवनेरी किल्ल्यांत ठेविले होतें हें मागें सांगितलेंच आहे. तेथें आमच्या महाप्रतापी चरित्रनायकाचा जन्म स. १६२७ त झाला. हा राजांना जिजाबाईच्या पोटी दुसरा मुलगा झाला. राजांनी स. १६३० त मोहित्यांची कन्या तुकाबाई हिजशीं दुसरा विवाह केला. तिजपासून त्यांस स. १६३१ त एक पुत्र झाला. त्याचें नांव व्यंकोजी असें होतें. शहाजीराजांनी चंदावरप्रांत काबीज केल्यावर तुकाबाई व व्यंकोजीराजे यांस तेथें नेऊन ठेविले. पुढें शहाजीराजांच्या पश्चात– व्यंकोजीराजे कर्नाटकातील सगळी जहागीर आटपून राहिले. ह्या दौलतीचा हिस्सा घेण्यासाठी पुढें शिवाजीमहाराजांनी कर्नाटकांत स्वारी केली, तिची हकीगत यथास्थलीं देऊं. महाराष्ट्रांत पुत्राचे भेटीस जाऊन, त्याचें वैभव पाहून कर्नाटकांत परत आल्यावर शहाजीराजांनी व्यंकोजीस जवळ बोलावून असा बोध केला कीं, ''तुमचे वडील बंधू शिवाजीराजे यांनीं जवामर्दी करून नवे राज्य संपादिलें आहे. तुम्ही आमच्या इकडील दौलतीचे मालक आहा. आमचे काका विठोजीराजे व आमचे बंधू शरीफजीराजे यांच्या कुटुंबांचें तुम्ही चालवावें. प्रजापालन यथान्याय करून राज्य करावे. तुमचे वडील बंधू शिवाजीराजे यांनीं तर सर्व पृथ्वी आक्रमण करण्याचा प्रचंड उद्योग आरंभिला आहे. ईश्वर त्यांचे मनोरथ परिपूर्ण झाले तर ते सर्वांचे संगोपन करतीलच, परंतु त्याच्यावर कदाचित् समय गुदरला तरी आम्ही इकडील दौलतीचा पादशहाकडून इतल्ला तोडून घेतला आहे. ही दौलत तुमची दोघांची आहे. परंतु सांप्रत ह्या दौलतींचे रक्षण तुम्ही हुशारीनें करावे. तुम्ही माझे आवडते पुत्र असून पराक्रमी शिवाजीराजांचे बंधू आहां, हे ध्यानांत ठेवा! पदरी चार विश्वासू माणसे आहेत त्यांच्या विचाराने चालल्यास तुमचे कल्याण होईल.''

***

---

१ एके ठिकाणी असें लिहिले आहे की, संभाजीला विजापूरसरकाराकडून निराळी दौलत मिळाली होती व ह्याला महंमद अदिलशहाची स्त्री बडी साहेबीण हिने विश्वासघात करून विषाची लुगदी दिली, तीमुळे तो मृत्यू पावला. शिवदिग्विजयात ह्या कनकगिरीच्या लढाईचे कारण असें सांगितले आहे की, कनकगिरी शहाजीराजास जाहगिरीदाखल मिळाला असून, तेथील सरदार आप्पाखान तो किल्ला सामोपचारानें देईना. म्हणून त्याच्याशी युद्ध करावे लागलें. प्रो. सरकार म्हणतात की, शहाजीराजे बंधमुक्त होऊन कर्नाटकात आल्यावर काही दिवस तुंगभद्रा नदीच्या आसपासच्या आपल्या जहागिरींतल्या सरदारानी बंडावा केला होता. तो मोडण्यात गुंतले असता संभाजी असा लढाईत पडला. मि. किंकेड म्हणतात की, शहाजीराजे विजापुरास चार वर्षे अडकून पडले असता त्याच्या पश्चात् कर्नाटकातल्या ज्या सरदारास त्यानी अंकित करून ठेविले होतें त्यांनी बंडाळी चालविली होती. ह्या गडबडींत मुसाफाखाननामक एका सरदाराने राजाच्या ताब्यातील कनकगिरिनामक किल्ल्यावर हक्क सागू हल्ला केला आणि तो हस्तगत केला. तेव्हा संभाजी सैन्य घेऊन त्या किल्ल्यापाशीं आला आणि त्यानें त्या सरदारास असें सांगून पाठविलें की, ह्या तुमच्या वादासंबंधानें प्रथम विजापूरसरकारास विचारावे. हें असें सामोपचाराचे बोलणे त्यानें लाविलें असता त्या सरदाराने आपल्या तोफखान्यावरच्या लोकास असा हुकूम केला की, साधल्यास संभाजी व त्याच्या भोवतालचे त्याचे कामदार यास गोळे सोडून ठार करावे त्या हुकमाप्रमाणें त्यांनीं केल्यावरून संभाजी ठार झाला. ही अशी कुरापत काढावयास त्या सरदाराला अफझुलखानाने प्रवृत्त केलें असें म्हणतात. शहाजीराजानीं पुढल्या वर्षी सुटून येऊन हा किल्ला पुनः सर केला.

भाग तिसरा

शिवाजीमहाराजांचें बालपण

शहाजीराजे निजामशाही सोडून निघाले असतां लुखजी जाधवराव मोगलसैन्यानिशीं त्यांच्या पाठीस लागला. त्या समयी जिजाबाई सात आठ महिन्यांची गरोदर असल्यामुळें तिला शिवनेरी किल्ल्यांत ठेवून राजे पुढें कूच करून गेले, हें मागील भागांत सांगितलें आहे. बाईच्या रक्षणासाठी जी माणसे ठेविली होती त्यांपैकी बाळकृष्णपंत हनुमंते[१], शामराव[२] नीलकंठ, व रघुनाथ बल्लाळ कोरडे[३] असे तीन विश्वासू कारकून होते. नंतर जाधवरावानेंही आपले कांही स्वार तिच्या रक्षणास ठेविले होते. शिवाय तिला जुन्नरच्या श्रीनिवासरावाचा आश्रय होता असें दिसते ह्याप्रमाणें ती काही अशी सुरक्षित स्थळी होती हें खरें, तरी आपल्या प्रिय पतीवर असें संकट गुदरले असून त्या धामधुमीत आपला तीनचार वर्षाचा मुलगा त्यांच्याबरोबर आहे, त्यांचें काय होईल ही चिंता तिला एकसारखी लागून राहिली. ह्या हृद्रोगानें ती दिवसेंदिवस कृश होत चालली. हा चिंताज्वर तिला लागला असतां तिने किल्ल्यांतील शिवाईदेवीस असा नवस केला कीं, राजांवरचे अरिष्ट टळून ते सुरक्षित राहून, माझे पोटीं पुत्र झाला तर त्याला तुझें नांव ठेवीन. पुढें दिवस पुरे होऊन त्या शके १५४९, प्रभव नाम संवत्सर, वैशाख शुद्ध पंचमी, सोमवार, ता. १० एप्रिल स. १६२७, ह्या दिवशी प्रसूत झाल्या.[४] ह्याप्रमाणें मराठी साम्राज्याचे संस्थापक शिवाजीमहाराज यांचा जन्म ह्या अशा ऐन धामधुमीच्या काळी पुण्यापासून सुमारें पन्नास मैलांवर शिवनेरी किल्ल्यांत झाला.[५] जिजाबाईस पुत्ररत्न झाल्यामुळें सर्व आश्रित मंडळींस परमानंद झाला. त्या ठिकाणी आणि त्या स्थितीत अनुकूल झाला तेवढा उत्सव त्यांनी केला. आसपासच्या गांवांतील

---

१ मल्हार रामरावकृत बखरींत हें नांव कृष्णाजीपत हनुमंते असें आहे. याचे नाव नारो त्रिंबक हनुमंते असे एक दोन ठिकाणी आढळतें.

२ काही ठिकाणी हें नाव शंकराजी नीलकंठ असें आहे.

३ मल्हार रामराव, सोनोपंत डबीर म्हणून आणखी एक कारकून होता, असें म्हणतो. सभासद म्हणतो की, हे कारकून राजांनी बेंगरुळास असता जिजाबाईबरोबर पाठविले होते. गोमाजी नाईक पाणसंबळ नावाचा एक माणूस जिजाबाईच्या लग्नापासून तिच्या तैनातीस जाधवरावाने दिला. तो ह्या वेळी तिच्या बरोबर होता असें म्हणतात.

४ मल्हार रामरावकृत बखरींत व शिवदिग्विजयात हा जन्मकाळ वैशाख शुद्ध द्वितीया गुरुवार असा दिला आहे, परंतु ह्या तिथीस गुरुवार येत नाही. रायरीच्या बखरीत शके १५४८, क्षयनामसंवत्सर, वैशाख शुद्ध पंचमी सोमवार ही तिथी दिली आहे. परंतु ह्या तिथीस सोमवार येत नाही. ह्यास्तव ह्या दोन्ही तिथी विश्वसनीय नव्हेत. दोन्ही तिथी विश्वसनीय नव्हेत. अलीकडे शेडगावकर भोसले यांच्या घराण्यात सापडलेली बखर प्रसिद्ध झाली आहे. तींत हा जन्मकाल शके १५५१ फाल्गुन वद्य ३ शुक्रवार असा दिला आहे. रा. बाळ गंगाधर टिळक यांनी १९०० साली, केसरीच्या ता. २४ एप्रिलच्या अंकात असें ठरविलें होतें की, शिवछत्रपतींची जन्मतिथी शके १५४९ प्रभवनाम संवत्सर, वैशाख शु. १, गुरुवार उत्तर रात्र, अश्विनी नक्षत्र, ता ६ एप्रिल, स. १६२७ अशी आहे. काव्येतिहाससंग्रहकाराकडे काशीनाथ कृष्ण लेले यांनी एक जंत्री पाठविली होती, तीत मूळातील तिथी दिली असून रोहिणी नक्षत्र दिलें आहे. हें नक्षत्र ह्या तिथीस असून ती एकंदरींत बरोबर दिसते. (रा. राजवाडेकृत म. इ. सा. खंड ४ पाहा) मराठी साम्राज्याची बखर व उक्लिजकृत म्हैसूरचा इतिहास ह्यामध्ये वैशाख शुद्ध पंचमीच दिली आहे.

५ जिजाबाई ह्या किल्ल्यावरच्या ज्या घरात राहत असे त्याची एक भिंत अजून शेष आहे. तींत नाशिकचे माजी कलेक्टर मि. जॅक्सन यानी मुंबईसरकारच्या हुकमावरून संगमरवरी दगडाची एक पाटी बसवून अखिल भरतवर्षातील अत्यंत थोर अशा ह्या प्रौढप्रताप राजमणीच्या जन्मस्थानाचे चिरकाल स्मरण राहीलसें केलें आहे.

हेलकरणी हेल घेऊन आल्या, तेवढ्यास बारातेरा दिवस भोजन घालून, लुगडी, चोळखण वगैरे बक्षिसें दिली. शहाजीराजे त्या वेळीं विजापुरास होते. त्यास हें पुत्रप्राप्तीचे वर्तमान हुजरे, कारकून वगैरे पाठवून कळविले. ही शुभवार्ता घेऊन गेले त्यांस राजांनी सोन्याचीं कडी, वस्त्रे वगैरे दिली व पुष्कळ दानधर्म केला. शिवाईदेवीच्या प्रसादाने हा पुत्र झाला असें मानून, त्यास नवसाप्रमाणें शिवाजी असें नाव ठेविले.[१]

जिजाबाई आपल्या पुत्रासह ह्या किल्ल्यांत तीन वर्षे होती. तेथून तिला शहाजीराजांनी बायझापुरास नेऊन ठेविले असावें. कारण स. १६३३ त तिला येथून पकडून नेल्याचे मागल्या भागांत सांगितलें आहे. मोगलांच्या तावडीतून सोडविल्यावर भोताजीराव ऊर्फ जगदेवराव जाधव याने तिला कोंडाणा किल्ल्यांत नेऊन ठेविले. येथून पुनः ती कांहीं दिवस शिवनेरी किल्ल्यांत व कांहीं दिवस माहुलीच्या किल्ल्यांत राहात होती असें दिसते.[२] शहाजीराजांनी मोगलांच्या ताब्यांतला निजामशाही मुलूख पुनः काबीज करण्याचा सपाटा चालविला, तेव्हा ती ह्या किल्ल्यांत राहात होती. पुढें मोगलाची व राजाची युद्धे होऊं लागून जिकडेतिकडे धुमाकूळ उडाला असतां त्यांनी तिला कोठे ठेविले होतें तें कळत नाही; परंतु एवढे मात्र खात्रीने सांगतां येतें कीं, ती आपल्या प्रिय पुत्राचा व आपला बचाव व्हावा यासाठी आपल्या माहेरच्या माणसांच्या आश्रयास कधीही जाऊन राहिली नाहीं. ती अशी जाऊन राहिली होती, असें जें कित्येकांचे म्हणणें आहे, त्याला मुळींच आधार नाही. गरोदर स्थितीमध्ये केवळ निराधार झाली असून, तिचा बाप तिला आपल्या गांवी नेऊन पोंचविण्यास तयार झाला असता, जी मानी स्त्री तिकडे जावयास कबूल झाली नाहीं, ती पुढें कधीं माहेरी जाऊन राहिली असावी, हें मुळींच संभवत नाहीं. त्यांत आणखी जाधवांचे घराणे मोगलांचा आश्रय धरून राहिलें होतें. त्यामुळे तर आपल्या माहेरी जाण्याचे तिच्या मनांत कधीही आलें नसावे कारण शहाजीराजांनी मोगलांशी स. १६३४ पासून युद्ध सुरू केल्यामुळें मोगलसरदारांचा आश्रय करणे फारच धोक्याचे होतें व तें तिच्या पतीसही मुळींच पसंत वाटलें नसतें. तेव्हां सारांश काय कीं, शिवाजीमहाराजांच्या जन्मापासून पुढली दहा वर्षे, शहाजीराजांनी चालविलेल्या धामधुमीच्या काळी, जिजाबाई आपल्या पुत्रासह राजांच्या ताब्यांतील कोणत्या ना कोणत्या तरी किल्ल्यांत राहात असे व तिचे साधेल तेवढे चांगले रक्षण व्हावें या विषयी राजे खबरदारी घेत असत. बायझापुरास असतां तिला एका किल्लदारानें पकडून मोगलांच्या हातीं दिले तेव्हां तिला जाधवाने सोडविले, हें मागें सांगितलेंच आहे. ह्या प्रसंगीं तिने खरें म्हटलें असतां माहेरी जाऊन सुखरूप राहावें; पण ती पुनः आपल्या पतीच्या ताब्यांतील कोंडाणा किल्ल्यांत येऊन राहिली. ह्यावरून तिचा मानी स्वभाव चांगलाच दिसून येतो. मोगलांच्या सैन्याची वावटळ जिकडून तिकडून सुटली असतां व राजांच्या ताब्यांतील एकएक किल्ला व ठाणें शत्रू सर करीत असतां, तिचा हा निर्धार कायम रहावा हें मोठेच नवल होय.

ह्या दहा वर्षांत तिच्या मनाची अवस्था कशी काय झाली असावी व तिला अहर्निश किती चिंता लागून राहिली असावी याची कल्पना सहज होण्यासारखी आहे. आज ह्या किल्ल्यांत तर उद्या त्या किल्ल्यांत, अशी तिची पळापळ होत असून, शत्रू केव्हा घाला घालून आपल्या परम प्रिय पुत्राचा व आपला नाश करील याचा नेम नाहीं, असा

---

१ मि. किंकेड दंतकथाप्रिय असल्याकारणानें शहाजीराजांस झालेल्या ह्या पुत्ररत्नासंबंधाच्या दोन कथा आपल्या ग्रंथात नमूद करितात. त्या अशा (१) एक गोसावी शहाजीराजांच्या स्वप्नात आला आणि त्यांच्या हातीं एक आम्रफल देऊन म्हणाला, 'हें तूं आणि तुझी बायको मिळून खा, म्हणजे तुमच्या पोटीं शिव अवतार घेईल. त्याला मुसलमानास मुजरा करावयास लावू नको आणि तो बारा वर्षांचा झाला म्हणजे त्यास स्वतंत्रपणें वागू दे!' हें स्वप्न पाहून राजे जागे झाले आणि पाहतात तो त्यांच्या हातीं तें फळ होतें. तें त्यानीं जिजाबाईकडे नेऊन उभयतांनीं खाल्ले. पुढें हें पुत्ररत्न झालें तेव्हा स्वप्नात प्रत्यक्ष शिवाने दर्शन दिलें ह्या भावनेने त्यांनीं त्याचें नाव शिवाजी असें ठेविले. (२) दुसरी दंतकथा अशी आहे की, शिवाजीमहाराजाचा जन्म झाला तेव्हा शिवाने शहाजीराजांस स्वप्नात दर्शन देऊन असें सांगितले की, ''तुझ्या पोटीं पुत्र झाला आहे तो माझा अवतार आहे.''

२ किंकेड म्हणतात की, शहाजीराजे यांस वश करून घेण्यासाठी बालशिवाजींना पकडून आणावे आणि अटकेत ठेवावे म्हणून मोगलांनीं तीन वर्षे प्रयत्न केला; परंतु जिजाबाईनी त्यास अशा तजविजीने लपवून ठेविले की, त्यांची सगळी खटपट व्यर्थ गेली.

तिला एकसारखा घोर राहिला होता. त्याप्रमाणेंच शहाजीराजांनी मोगलांसारख्या अत्यंत प्रबळ शत्रूशीं चालविलेल्या अतिघोर संग्रामाचा शेवट कसा काय होतो ह्याचा तिला हृद्रोग लागला होता; परंतु ती अत्यंत स्वाभिमानी व पतिनिष्ठ असल्यामुळें तिने ही दहा वर्षे मोठ्या धैर्याने व निश्चयानें कंठलीं. ह्या एवढ्या काळांत शिवाजी महाराजांचे संगोपन जिजाबाईने कोणत्या प्रकारे केले, व त्यांस सुशिक्षण देण्याविषयी कशी काय व्यवस्था केली, याचा उल्लेख कोणत्याही बखरींत नाहीं. तरी एवढ्या वयांत महाराजांनी घोड्यावर बसणे, तिरंदाजी करणें, बंदूक मारणे, पट्टा फिरविणे इत्यादी युद्धोपयोगी कलांचा बराच अभ्यास केला होता व त्यांस लिहिता वाचताही चांगले येऊ लागलें होतें.

पुढें शहाजीराजांस अदिलशाहींत आश्रय मिळून ते स. १६३७ त विजापुरास जाऊन राहिले, तेव्हां आपल्या ह्या गुणवान मुलास व जिजाबाईस त्यांनी आपल्या बरोबर तिकडे नेले.[१] मग विजापूरसरकाराकडून मिळालेल्या जाहगिरीची व्यवस्था दादाजी कोंडदेव यास सांगून शहाजीराजे रणदुल्लाखानाबरोबर कर्नाटकांत गेले त्यावेळीं त्यांनीं जिजाबाईस व शिवाजीमहाराजांस ह्या विश्वासू कारकुनाच्या स्वाधीन करून त्यास असें सांगितलें कीं, महाराजांस योग्य शिक्षण देऊन चांगले वळण लावावे. ह्यावरून दादाजी कोंडदेवानें ह्या मायलेंकरांस मोठ्या इतमानानें पुण्यास आणले आणि तेथें चांगला वाडा बांधून[२] त्यांत त्यांस ठेविले. तेथे महाराजांच्या नांवानें एक उत्कृष्ट बाग तयार करून त्यात नाना प्रकारची फळझाडे लावली. दुसरे वर्षी शहाजीराजे कर्नाटकप्रांतांत बेंगरूळ येथें असतां दादाजीस परगण्यांचा हिशोब घेऊन तिकडे जावे लागलें. त्या वेळी त्यानें शिवाजीमहाराजांस व जिजाबाईस राजांच्या भेटीस नेले व तीं पुनः लागलीच पुण्यास परत आली. त्या वेळीं राजांनीं त्यांच्याबरोबर शामराव नीलकंठ पेशवे, बाळकृष्णपंत मुजुमदार, सोनोपंत डबीर व रघुनाथ बल्लाळ कोरडे सबनीस यांस आपल्या जहागिरीची नीट व्यवस्था लावण्यासाठी पुण्यास पाठवून दिलें.[३]

शहाजीराजे कर्नाटकांतील मोहीम फत्ते करून विजापुरास परत आले तेव्हां त्यांच्या मनांत असें आलें कीं, शिवाजीमहाराजांस विजापुरास आणून त्यांचा तेथें विवाह करावा त्याप्रमाणें राजांनी दादाजीस लिहून कळविले. हा त्यांचा मनोदय महाराजांस कळला तेव्हा ते म्हणाले कीं, आपलें लग्न विजापुरास यवनांच्या वस्तींत न होतां पुण्यासच व्हावें. कारण तेथे कार्यात यवन येऊन धर्मलोप व्हावयाचा. ही महाराजांची इच्छा दादाजीने राजांस पत्रद्वारें विदित केली, व असें कळविले कीं, आम्ही इकडे चांगली मुलगी पाहून कार्य आटपून घेतो हा विचार पसंत वाटून त्यांनी त्यास संमती दिली. त्याप्रमाणें दादाजीने शिरके यांची कन्या सईबाई हिजशी स. १६४० त पुणे येथें महाराजांचा विवाह मोठ्या थाटाने केला.

पुढें स. १६४१ त शहाजीराजांनी महाराजांस व जिजाबाईस विजापुरास आणवून आपल्याजवळ ठेविले. येथें ती दोनतीन वर्षें होतीं असें दिसते यवनांच्या राजधानीत इतके दिवस राहावयास मिळाल्यामुळे तेथली स्थिती महाराजांस यथास्थित पाहावयास मिळाली व यवनद्वेष आधींच त्याच्या हृदयांत थोडाबहुत वास करीत होता, तो ह्या समयीं चांगलाच दृढ झाला. पुढें जें राजकीय संबंधाचे आटोकाट ज्ञान त्यांनी हरएक प्रसंगी प्रगट करून सर्व जगास थक्क करून सोडले, त्याचें संपादन त्यांस येथें घडले.

---

१ प्रो. सरकार तारीख-इ-शिवाजी या ग्रंथाच्या आधाराने म्हणतात की, शहाजीराजानीं दादाजी कोंडदेवाच्या हाती आपल्या जहागिरीची व्यवस्था इ. स. १६३६ त दिली. तेव्हा त्यांनी त्यास असे सांगितले की, माझी बायको जिजाबाई व पुत्र शिवाजी हे शिवनेरी किल्ल्यात आहेत. त्यांस पुण्यास आणून आपल्या देखरेखीखाली ठेव व त्यांस लागेल तेवढा पैसा खर्चासाठी दे!

२ ह्या वाड्याचे नाव त्याने राजमहाल असे ठेविले होते. हा वाडा शनिवारवाड्याच्या पूर्वेस मुठा नदीच्या उजव्या तीरावर होता. हल्ली ह्या जागी म्युनिसिपालिटीचा बाग आहे. – मि. किंकेड, पृ. १३०

३ दादाजी कोंडदेवाच्या मदतीसाठी ह्या कारभाऱ्यांना पाठविले होते. त्यांच्या आडनावावरून त्यांचे हुद्दे लक्षात येतात. खुद्द दादाजी कोंडदेव आपल्या नावापुढे 'सुभेदार नामजाद किल्ले कोंडणा' असें लिही. हा किल्ला राजांच्या जहागिरीच्या मध्यवर्ती असल्याकारणाने दादाजीने येथे लष्कराचे ठाणें केलें असून तेथे तो वेळोवेळी जाऊन राहात असे.

महाराज ह्या वेळीं केवळ चवदा वर्षांचे होते. तरी त्यांची सर्व युद्धकलांत चांगली प्रगती झाली होती. ते अंगाने बळकट व देखणे असून अतिशयित चपळ व चौकस होते. हत्ती, घोडे व नानाप्रकारचे कारखाने लक्षपूर्वक पाहून त्यासंबंधानें माहिती करून घेण्याचा त्याना पराकाष्ठेचा नाद होता. शहाण्या व थोर माणसांचा यथोचित सन्मान करून त्यांचें आपणांवर प्रेम जडेल असें त्यांनी करावे व त्यांस नानाप्रकारचे प्रश्न विचारून त्यांच्याकडून मिळवेल तितकी माहिती मिळवावी. हलकट माणसांच्या वाऱ्यासही ते उभे रहात नसत. व्यसनी व शौकीन मनुष्यांचा त्याना पुरा तिटकारा असे. वडिलांची अवज्ञा किंवा अमर्यादा त्यांच्या हातून यत्किंचितही कधीं होत नसे. हे असे गुण पाहून राजांकडे येणारे सरदार लोक महाराजांचे फार कौतुक करीत. राजांचा परम मित्र मुरार जगदेव हा तर महाराजांची ही चालचलणूक पाहून फारच खुष होत असे.

एके दिवशीं ह्या मुरारपंताने अदिलशहापाशीं शहाजीराजांच्या ह्या पुत्राची फारच तारीफ केलीं. ती ऐकून अशा गुणी मुलास पाहण्याची इच्छा बादशहास झाली, आणि त्याला आपल्या दर्शनास आणण्याविषयी त्यानें मुरारपंतास आज्ञा केली. ह्यावरून महाराजांस बादशहाच्या भेटीस न्यावयाचें ठरलें. परंतु हा बेत महाराजांस रुचला नाहीं. त्यांनी मोठ्या मर्यादेने व आर्जवाने राजांस असे कळविले कीं, 'हे यवन परम नीच; त्यांचें आर्जव करणें, त्यांस सलाम करणें हें माझ्या मनास मुळींच आवडत नाहीं. ह्या गोष्टींचा मला राग येतो. स्वधर्म व ब्राह्मण याची येथें सदोदित निंदा चालते, ती मला बिलकूल पाहवत नाहीं. रस्त्याने जाता येता गोवध होतो तो दृष्टीस पडला म्हणजे मला फारच वाईट वाटतें व असा त्वेष येतो कीं, गोवध करणाराचा शिरच्छेद करावा. परंतु वडील रागावतील व भलताच काहीतरी परिणाम होईल, हें मनात येऊन निरुपाय होतो. मुसलमानाचा मला मुळी संसर्ग नको असें वाटतें. अमीरउमरावांच्या घरीं जाणें व त्याच्याशी परिचय करणें, हे माझ्या चित्तास योग्य वाटत नाही. त्यांचा स्पर्श झाला असता मला वस्त्रे बदलावी लागतात.' हें महाराजांचे म्हणणें राजांस कळले तेव्हा त्यांनी कारभारी लोकांकडून त्यांस असा बोध करविला कीं, 'तुमचे वडील यवनांची सेवा करून एवढ्या वैभवास चढले आहेत. त्यांचा द्वेष किंवा तिरस्कार करणें बरोबर नाहीं. तुम्ही सुजाण आहा. तुम्हास असें बोलणे शोभत नाहीं. अशाने वडिलांची अवज्ञा होते.' समानवयस्कांकडूनही महाराजांस पुष्कळ सांगविले. प्रत्यक्ष जिजाबाईनेही अनेक प्रकारे समजूत घातली. तरी महाराज आपला हेका सोडीनात. तेव्हा खुद्द शहाजीराजांनी महाराजांस समक्ष बोलावून असा बोध केला कीं, 'यवन पृथ्वीपती आहेत; स्वधर्म रक्षण करून त्याची सेवा करण्यास काय हरकत आहे? ईश्वरी सूत्राप्रमाणें आम्हास सांप्रत त्यांची सेवा पत्करून योगक्षेम करणें भाग आहे. देवास असें करावयाचे नसतें तर हिंदूंचे राज्य त्यांच्या हाती कां जातें बरें? कालवर्तमानानुरूप वागून आम्ही हें वैभव संपादिले आहे. तें जतन करण्यास तुम्हास बादशहाची कृपा संपादन केली पाहिजे.' हा उपदेश ऐकून महाराजांनी समर्याद व सविनय असे उत्तर दिलें कीं, 'मला वडिलांची आज्ञा शिरसावंद्य आहे, परंतु गोहत्या व देवब्राह्मणाची विटंबना यवन करितात, ती माझ्याने बिलकूल पाहवत नाहीं.'

हा असा यवनद्वेष शिवाजीमहाराजांच्या ठायीं पूर्णपणे विकास पावलेला पाहून शहाजीराजांस अर्थात् वाईट वाटलें असावें. परंतु अशा हुशार व पाणीदार मुलास कडक रीतीनें वागविणे किंवा शिक्षा करणें त्यांस इष्ट वाटलें नाहीं. खरें म्हटले असता त्यांसही यवनाचा तिरस्कार वाटत नव्हता असें नाहीं; परंतु त्यांच्याशी सामोपचारानें वागून आपलें कार्य साधून घ्यावे असा त्याचा नेहमी मनसुबा असें. पुत्राचा असा निग्रह पाहून त्यांस फारसा राग आला नसावा असें दिसतें महाराजांशी या संबंधाने अनेक वेळां बोलून शेवटीं त्यांस त्यांनी मोठ्या आग्रहाने दरबारांत जाण्यास तयार केलें. दरबारात गेल्यावर बादशहास जमिनीस हात लावून मुजरा करावा, असें महाराजांस त्यांनीं सांगितले. परंतु महाराज दरबारात गेले ते नुसता सलाम करून वडिलांजवळ जाऊन बसले. बादशहाने राजाबरोबर कोणी मुलगा आला आहे. असें पाहून मुरारपंतास विचारले, शहाजीराजांचे पुत्र ते हेच काय? पंताने 'होय' म्हटलें आणि शिवाजीमहाराजांनी रीतीप्रमाणें कुरनिसात केला नाहीं याबद्दल बादशहाच्या मनात कांही विकल्प येऊ नये म्हणून त्यास त्यानें असें

सांगितलें कीं, 'ह्या मुलाने दरबार कधींच पाहिला नाहीं, हा याचा पहिलाच प्रसंग आहे. घरीं सर्वांस सलाम करण्याची संवय असल्यामुळें याने हजरतीस सलामच केला. मूल अज्ञान आहे.' ह्याप्रमाणें समजूत घातल्यावर बादशहाने शिवाजीमहाराजांस वस्त्रे, जवाहीर वगैरे देऊन निरोप दिला. घरीं आल्यावर महाराजांनी दरबारची वस्त्रे टाकून स्नान केलें.

ह्यानंतर महाराज राजांबरोबर वेळोवेळा दरबारांत जात. परंतु बादशहास नुसता सलाम करून ते आपल्या जागी जाऊन बसत. हा असा त्याचा नेहमींचा क्रम पाहून बादशहाच्या मनात संशय आला, आणि हा कुरनिसात मुद्दाम करीत नाही किंवा कसे याची शहानिशा करावी असे त्याच्या मनांत येऊन, त्याने महाराजांस जवळ बोलावून त्या संबंधाने प्रश्न केला. त्यासमयी महाराजांनी मोठ्या खुबीचे उत्तर देऊन वेळ मारून नेली. ते म्हणाले, 'मुजरा करावयास मला सांगतात. परंतु ऐन प्रसंगी विसरून जाऊन जोहार करतो, याची माफी असावी. लेकराच्या ह्या जोहारांतच कुरनिसात आहे असें हजरतीने मानून घ्यावे. दुसरें असें की, हजरत आणि माझे वडील हे मला सारखेच वाटतात. हजरत कोणी निराळे आहेत असें वाटल्यास मुजरा करावयास शिकेन.' हें प्रसंगोचित उत्तर ऐकून बादशहास हसू आलें.

दरबारात जातांना वाटेत कसायांची दुकाने लागत. त्यांत कच्चे गोमांस व गुरांच्या मुंड्या विकावयासाठी मांडून ठेविलेल्या असत. त्याप्रमाणेंच उदमी लोक राजवाड्यासमोर शिजविलेलें मांस विकावयास बसत. हा प्रकार पाहून शिवाजीमहाराजांस अतिशयित वाईट वाटे, व ते अगदी संतप्त होत. त्या उदम्यांस व खाटकास जिवे मारावे असा त्यांस त्वेष येई; परंतु करतात काय? त्यांस निरुपायास्तव त्या वाटेने मुकाट्यानं जावें-यावें लागे. एके दिवशी महाराज त्या रस्त्याने चालले असतां एक कसाई गाईचा वध करतांना त्याच्या दृष्टीस पडला त्याबरोबर ते त्याच्या अंगावर धावून गेले आणि त्याला चांगला मार देऊन त्यांनी ती गाय सोडविली. ह्या गोष्टीचा चोहींकडे बोभाटा झाला. परंतु शहाजीराजांचें वजन दरबारांत अतोनात असल्यामुळें त्यांच्या वाटेस कोणी गेला नाहीं व बादशहानेंही ती गोष्ट मनात आणिली नाही. हा गोवधाचा प्रकार नेहमी नजरेस पडून शिवाजीमहाराजांस अगदी वीट आला. त्यांना तो असह्य होऊन यवनांच्या राजधानींत इतःपर राहू नये असें वाटले व दरबारांत पुनः कधीही जाऊ नये असा त्यानी निश्चय केला. परंतु पित्याने आज्ञा केली म्हणजे तिचे उल्लंघन करणें महत्पाप आहे असें ते समजत. यास्तव त्यांनीं एके दिवशी तीर्थरूपांस असें सविनय कळविले की, 'मला आपल्याबरोबर दरबारात यावयाची आज्ञा करू नये. कारण वाटेत गोमांसाची दुकानं मांडिलेलीं असतात तीं माझ्याने पाहवत नाहींत. आपण बादशहाचे ताबेदार असल्यामुळें आपणांस ह्या गोष्टींकडे काणाडोळा करावा लागतो. बादशहाच्या मनास वाईट वाटेल असें काहींएक आपणांस बोलतां किंवा करता येत नाहीं. तरी रस्तोरस्तीं होणारा गोवध व गोमांसाची दुकाने बंद होईपर्यंत मी दरबारास यावयाचा नाहीं. हा प्रकार बंद होईल अशी कांहीं तजवीज केल्यावर मग मला दरबारास बरोबर येण्याची आज्ञा करावी.' हें पुत्राचे निकराचे बोल ऐकून शहाजीराजे पेंचांत पडलें. एकटे दरबारांत जावे तर बादशहा विचारणार मुलास कां आणिलें नाही म्हणून. त्यास काय उत्तर द्यावे? अशा फिकिरींत राजे पडले असता मिरजुमला नामेंकरून एक सरदार त्यांच्यापाशी कांही सल्लामसलत विचारावयासाठी आला. त्याच्याशी काही वेळ बोलणे झाल्यावर त्याला त्यांनी आपलें संकट निवेदन केलें. तेव्हां त्या सरदाराने राजांला असें म्हटले कीं, मुलास आज घरींच राहू द्या. आपण दोघे दरबारास जाऊं आणि हजरतीची मर्जी पाहून ह्या प्रकरणी गोष्ट काढूं.

ह्याप्रमाणें ते दरबारांस गेले व सरकारी कामकाज आटोपल्यावर बादशहाची खुशमर्जी पाहून त्या सरदाराने त्याच्यापाशी असा अर्ज केला कीं, 'खुदावंत, आपण सर्वाचे मायबाप आहां. आपली हिंदू व मुसलमान अशी प्रजा असून, आपली सर्वांवर सारखी कृपा आहे. आपल्या पदरी जसें मुसलमान नोकर आहेत, तसे हिंदूही पुष्कळ आहेत. त्यांस आपआपल्या धर्माप्रमाणें वागूं देणे हें खावंदांस उचित आहे. गोवध व गोमांससेवन ही हिंदूंस मोठी पातके वाटतात. आपल्या राजरस्त्यावर व राजवाड्याच्या आसपास गोमांसाची दुकाने असून सर्वांदेखत गोहत्या होत असते.

ती पाहून हिंदूस अतिशयित वाईट वाटणे साहजिक आहे. शहाजीराजांसारखे इभ्रतदार व वजनदार सरदार आपल्या पदरी आहेत. त्यांच्या मनास जेणेकरून वाईट वाटणार नाहीं असें करणें हें आपणांस उचित आहे. खावंदांपाशी ह्या प्रकरणी आपण होऊन बोलण्याचे धैर्य त्यांस होत नाही. शहाजीराजांचा पुत्र शिवाजी आज दरबारास आला नाहीं. याचे कारण हेंच होय. हा गोवधाचा व गोमांसविक्रयाचा देखावा त्याच्यानें मुळींच पाहवत नाहीं. तो आपल्या बापावर फारच रागावला आहे. ह्यासाठी हजरतीने ह्या गोष्टींचा चांगला विचार करावा.' हा त्याचा अर्ज बादशहाने शांतपणे ऐकून घेऊन त्याचा योग्य विचार केल्यावर त्यास असें वाटलें कीं, ह्या संबंधाचा बंदोबस्त अवश्य केला पाहिजे. मग त्यानें अशी ताकीद देवविली कीं, शहरात कोणीही गोवध करूं नये, किंवा गोमांसाची दुकाने मांडू नयेत. हा हुकूम मोडणारास मोठे शासन होईल. हिंदूंच्या धर्माविरुद्ध हा प्रकार असल्यामुळें त्यांच्या देखत कोणी गोहत्या केली किंवा वाटेत गोमांस विकावयास मांडले आणि त्यास कोणा हिंदूंने ठार मारिलें तरी त्याची दाद सरकारांत मिळणार नाही. असा सक्त हुकूम चोहींकडे जाहीर करून शहराच्या दक्षिणेस दूर एके बाजूस कसाईपुरा बसविला व तेथें सर्व कसायांस जाऊन राहावयास हुकूम केला. हा बंदोबस्त केल्यावर शिवाजीमहाराज पुनः आपल्या पित्याबरोबर दरबारांस जाऊं लागले. त्यांची हुशारी, तेज व चौकसपणा पाहून बादशहाची त्यांच्यावर मर्जी बसली तो त्यांस वेळोवेळी वस्त्रे, भूषणें, मेवामिठाई वगैरे देऊन संतुष्ट करी.

एके दिवशी एक कसाई गोमांस पाटींत भरून शहराच्या दरवाज्यानजीक आंत येऊन विकावयास बसला असतां तिकडून शिवाजीमहाराज आपल्या कांहीं समवयी मित्रांसह घोड्यावर बसून चालले होते. त्यांची नजर त्या कसायाकडे गेली. त्यासरशी त्यांनी तलवार उपसून त्याचा तेथेंच शिरच्छेद केला. तेव्हा त्या कसायाच्या बायकोने सरकारवाड्यात जाऊन बादशहापाशी गाऱ्हाणे केलें व त्या संबंधाचा पुरावा दरवाज्यावरच्या लोकांनीही केला. ती फिर्याद ऐकून बादशहाने म्हटलें कीं, शिवाजीराजे यांनी केले तें योग्य आहे. शहरात येऊन मांस विकावयास बसू नये अशी ताकीद तुम्हांस केली असून तिची तुम्ही परवा केली नाहीं; ह्याबद्दल तुम्हास शिक्षा झाली ती बरोबर आहे.' असें बोलून त्या कसायाच्या बायकोस चार रुपये दफणाईस दिले व चवाठ्यावर शेर रांडरोटी करून दिली.

ह्या गोष्टीचा शहरात फारच गवगवा झाला. जो तो म्हणू लागला कीं, 'आता मुसलमानांचा ह्या राजधानींत कांहीं बोज राहिला नाही. यवनी पादशाही आजच गारद झाली की काय? बादशहा कसलीच तक्रार कानावर घेत नाहीं शिवाजी तर असा उद्दाम आहे की, तो बादशहाला कुरनिसातसुद्धा करींत नाहीं. त्याला वाईट वाटतें म्हणून सगळ्या कसायांना शहराबाहेर हांकून काढून त्याची दुकाने वस्तीच्या बाहेर दूर नेली. त्यामुळे सगळ्या मुसलमानांची गैरसोय झाली आहे. ह्यावरून तो शहाजीराजांचा मुलगा फारच शेफारून गेला आहे. तो आतां भर रस्त्यात मुसलमानाचे बेधडक खून करू लागला आहे. हें काहीं बरोबर नाही.'

हा सगळा बोभाटा शहाजीराजांच्या कानी येऊन त्यांस मोठी चिंता उत्पन्न झाली. मुलगा चांगला हुशार, बुद्धिमान व गुणी निपजला आहे अशी तारीफ ऐकून त्याला जवळ आणून ठेविले, तें अशासाठी कीं, आपण कमाविलेली दौलत याने राखून तींत स्वपराक्रमाने भर घालावी. परंतु हा असा हूडपणा करितो याला काय करावे? याला कांही शिक्षा करावी तर याचा स्वभाव तापट आहे, भलताच कांही तरी परिणाम व्हावयाचा. मग दोन बोधाच्या गोष्टी सांगून तो ताळ्यावर येतो कीं काय तें पाहावे, असा विचार मनांत आणून त्यांनी महाराजांस आपल्याजवळ बोलावून जिजाबाईसमक्ष पुढीलप्रमाणे उपदेश केला: 'तुम्ही अद्यापि लहान आहां. तुम्हांस अजून जगाचा अनुभव नाहीं. भलत्याच गोष्टीचा विषाद मानून संतापून जाणें व काहीतरी हूडपणाचें कृत्य करणें हें तुमच्यासारख्या समजूतदार मुलास शोभत नाहीं. यवनांस मुजरा करावयाचा नाहीं, गोवध पाहतांच तरवार उपसावयाची, असा बाणा धरून ह्या मुसलमानशाहीत कसें चालेल बरें? त्यांची आपणांस नोकरी करावयाची तर हा अभिमान धरून बिलकूल उपयोगीं नाहीं. आम्ही अशा बाण्याने वागतो तर आम्हाला आज बसायाला जागाही मिळाली नसती. तुमचे वडील आजपर्यंत यवनाची चाकरी

करून स्वतःच्या कर्तबगारीच्या जोरावर प्याद्याचे फर्जी झाले. आम्ही आजपर्यंत किती कष्ट व दगदग सोसून ही दौलत संपादिली आहे हें आमचे आम्हांस ठाऊक. निजामशाहीत असता आम्हांला किती त्रास व संकटे सोसावी लागली व त्यांतून निभावून आम्ही ह्या दरबारी कसे मानमान्यता पावलो आहे याचा कांही विचार करा. आमच्याप्रमाणें तुम्हीही ह्या दरबारी राहून आर्जवाने व लीनतेनें वागावे आणि आमची दौलत पुढें चालवावी, अशी आमची फार इच्छा आहे. तुम्ही व्यवहार जाणून वडील वागत आले त्या रीतीनें वागाल व हरएक काम दक्षतेने व हुशारीने कराल तर तुमच्यासारखा मातबर व सुखी कोणी असणार नाहीं. परंतु सांप्रत जो उद्दामपणा तुम्ही दाखवीत आहां त्यास तुम्ही आळा घालणार नाहीं तर ते आम्हांस येथून घालवून देतील व सगळी दौलत जप्त करतील. दरबारांत आमचे वजन असून कांही अमीरउमराव आमचे दोस्त आहेत म्हणून बरें आहे. परंतु ज्याला आमचे वैभव पाहवत नाहीं त्यांनी बादशहाचे मन आम्हांविषयीं कलुषित केल्यास आमचा येथें एक क्षणभर टिकाव लागावयाचा नाहीं. याचा पुरा विचार करा आणि आपलें पुढील वर्तन सुधारा. नसती कलागत उत्पन करून स्वहितनाश करून घेण्यास प्रवृत्त व्हावें हें तुमच्यासारख्या समंजस मुलास मुळींच उचित नाहीं.' हा वडिलांचा उपदेश शिवाजीमहाराजांनी निमूटपणे ऐकून घेतला व त्यास प्रत्युत्तर मुळींच केलें नाहीं.

ह्याप्रमाणें शहाजीराजांनी महाराजांस स्वत: उपदेश करून आणखी जिजाबाईसही त्याला दोन गोष्टी एकांती बोलावयास सांगितले. त्याप्रमाणें तिने महाराजांस गोड, ममतेच्या शब्दांनी असा बोध केला की, 'तुम्ही आतां लहान नाही. वडिलांच्या मर्जीविरुद्ध वागून त्यांस कोणत्याही गोष्टीबद्दल विषाद वाटूं देणे हें तुमच्यासारख्या नीतिमान मुलास मुळींच शोभत नाहीं. तामसी वृत्ती टाकून नम्रतेने वागाल तर त्यात तुमचे कल्याण आहे. वडिलांनी इतका काळ परिश्रम करून व दगदग सोसून मिळविलेली दौलत तुम्ही राखावी हें योग्य होय. वडिलांस हरएक प्रकारे साहाय्य करण्याजोगे तुमचे वय झालें असून अंगी हुशारीही कांही कमी नाहीं. असें असून त्यांच्या मनास वाईट वाटेल किंवा दौलतीस धक्का येईल असें वर्तन तुम्ही करावे हें कांही ठीक नाही. वडिलांची अवज्ञा करून आपलें सर्वस्वी नुकसान करून घेणे तुमच्यासारख्या शहाण्या मुलास शोभत नाही. गैरचालीने चालून व अविचार करून आपला दुलौकिक करून घेऊं नका. तुमच्या कुलशीलाचा विचार करून वागा. त्यास बट्टा लागू देऊं नका.' हें आईचे ममतेचे भाषण ऐकून महाराजांनी असें उत्तर केलें कीं, 'तुमचा उपदेश मला शिरसावंद्य आहे. तुमच्या सांगण्याप्रमाणें वागण्यास मी सर्वदा तत्पर आहें; परंतु तुरकाला जमिनीस हात लावून मुजरा करणें, स्वधर्मविटंबना व गोवधादी अनन्वित कर्मे होत असलेली पाहणे मला बिलकूल आवडत नाहीं. तीं दृष्टीस पडलीं म्हणजे मला एवढा संताप येतो कीं; माझे देहभानही नाहीसे होते. ह्या गोष्टीस माझा निरुपाय आहे. ईश्वरी सत्ता काय असेल ती असो. तुरकांचे अन्न खाऊन राहण्यांत स्वधर्महानी आहे असें मला वाटतें. यानंतर माझ्या हातून काही अविचारी कृत्ये होऊ नयेत असें आपल्या मनांत असल्यास मला येथें ठेवू नका. यवनांच्या राज्याबाहेर कोठे तरी दूर ठेवा. हें असें मी आपणांस निक्षून सांगतो, तें आपली अवज्ञा किंवा उपमर्द करावा म्हणून सांगत नाहीं. ही माझी आपणांस करद्वय जोडून विनंती आहे.'

हें महाराजांचे म्हणणें जिजाबाईने राजांस कळविले, आणि अशी विनंती केली कीं, मुलगा चांगला हुशार, शहाणा व मर्यादशील असून असा हूडपणा करतो याबद्दल त्याजवर रोष करून त्यास कांहीतरी शासन करण्यास उद्युक्त होणें उचित नाहीं. त्याचा आणि यवनाचा जन्मांतरींचाच द्वेष असावा. एरवी तो असा वागता ना. काय असेल तें असो. त्याला कांही यवनांची ताबेदारी करून राहणे कधीही आवडणार नाहीं. आम्ही कितीही सांगितलें तरी तो ताळ्यावर यावयाचा नाहीं. ह्यासाठी त्याला येथें जवळ ठेवून नसती भानगड व दौलतीला संकट उत्पन्न करून घेण्यापेक्षां चार पावले दूर ठेवावा हें ठीक दिसते; मायाजाळास गुंतून त्याला जवळ ठेविल्यानें आपल्या प्रतिष्ठेची हानी होण्याचे भय आहे. यास्तव आपल्या चित्तास योग्य दिसेल तो विचार करावा.' हें ऐकून शहाजीराजांस फार वाईट वाटलें व त्यांनी दीर्घ श्वास टाकिला. मग मुरारपंत आदिकरून अमिरांचा सल्ला घेऊन महाराजांस आपल्यापासून दूर ठेवण्याचा विचार राजांनी केला. ह्या सुमारास दादाजी कोंडदेव दौलतीचा हिशोब घेऊन विजापुरास आला. त्याच्याबरोबर शिवाजीमहाराज व जिजाबाई यांस पुन: पुण्यास पाठवून दिले.

शिवाजीमहाराजांस पुण्यास रवाना करण्यापूर्वी त्यांचा विजापुरास आणखी एक विवाह झाला. हा दुसरा विवाह करण्याविषयी खुद्द अदिलशहाचा आग्रह पडला असें म्हणतात. शहाजीराजे महाराजांस घेऊन एके दिवशीं दरबारास गेले असता बादशहाने त्याला विचारले; 'याचा विवाह केला काय?' त्यावर राजांनी 'होय, पुण्यास असतां यांचा विवाह झाला.' बादशहाने म्हटलें; 'तुम्ही आम्ही नसतां विवाह झाला तो कसला विवाह?' येथें मोठ्या समारंभाने यांचा दुसरा विवाह करा असा बादशहाने आग्रह केल्यामुळें राजांनी एका मराठे सरदाराची सुलक्षण मुलगी पाहून तिजशी महाराजांचा विवाह मोठ्या थाटाने केला.' दरबारचे सर्व अमीरउमराव व खुद्द बादशहा लग्नसमारंभास आले होते. नजरनजराणा व अहेर किती झाला त्याची गणती नाहीं. राजांनी दानधर्म, भोजने, मेजवान्या इत्यादिकांत विपुल द्रव्य खर्चिलें. महाराजांच्या ह्या दुसऱ्या बायकोचे नांव सोयराबाई असें ठेविले.

वर सांगितल्याप्रमाणें शिवाजीमहाराज व जिजाबाई यांस दादाजी कोंडदेवाबरोबर पुण्यास पाठविल्यावर पुन: कधीं त्यांस शहाजीराजांपाशी राहण्याचा योग आला नाहीं. ह्यानंतर राजे कर्नाटकांत सुभेदारीवर गेले, ते पुनः विजापुरास किंवा पुण्यास कायमचे राहावयास असे कधींच आले नाहींत. तेव्हा अर्थात हा पितृसान्निध्याचा योग महाराजांस पुनरपि प्राप्त झाला नाहीं. ह्यावरून बहुतेक[१] इतिहासकार असा तर्क करतात की, शहाजीराजांचे जिजाबाईवर व तिच्या ह्या पुत्रावर अप्रीती झाली असल्याकारणानें त्यांना त्यांनी आपल्यापासून दूर ठेविले होते; आणि ह्या तर्काला प्रमाण काय तर श्वशुरजामाताचे वैमनस्य येऊन त्यांचे युद्धप्रसंगही झाले हें होय; परंतु शहाजीराजांचे आपल्या ह्या स्त्रीपुत्राशीं येथवर झालेलें आचरण पाहिले असतां ह्या तर्काला मुळींच आधार नाहीं असे म्हणावे लागतें. महाराजांच्या जन्मकाळीपासून सतत दहा वर्षे राजे कोणत्या धामधुमीत होते हें पाहिले म्हणजे एवढ्या अवकाशात त्यांस कौटुंबिक सौख्य अनुभवण्यास मुळींच स्वस्थता नव्हती असें दिसून येईल. राजांनी दुसरा विवाह केल्यावरून जिजाबाईवर त्यांची अप्रीती झाली होती असा कोणी तर्क करतील तर तोही निराधार आहे. कारण दोन-तीन बायका करण्याची चाल मराठे सरदारांत तेव्हां होती व अजूनही आहे. तेव्हां राजांनी दुसरा विवाह केला तो जिजाबाईवरचे प्रेम उडाल्यामुळें केला हें म्हणणे बरोबर नाहीं. पुढें महाराज विजापूरकरांच्या मुलखात धामधूम करू लागले तेव्हां राजांनी आपला ह्या स्त्रीपुत्रांशीं काहीएक संबंध नाही असा जबाब देऊन आपणावरचा वहीम उडवून दिला, त्यावरून कोणी सदरील तर्क करील तर तो सुद्धा बरोबर नाहीं. कारण हा त्यांचा जबाब केवळ कपटाचा होता, हें कोणालाही समजण्यासारखे आहे. जिजाबाईशीं त्यांचा खरोखर बेबनाव झाला असता तर त्यांनी विजापुरास जाऊन स्वस्थता प्राप्त झाल्याबरोबर तिला व महाराजाला तिकडे नेले नसतें. पुढें स. १६४३ च्या सुमारास महाराजांला व तिला पुण्यास दादाजी कोंडदेवापाशी कायमचे ठेवून दिलें, त्याचें कारण तरी तसेंच अपरिहार्य घडून आले म्हणून महाराजांच्या ठायीं यवनद्वेष पुरा बाणला असल्यामुळें त्यांस जवळ ठेवण्याची मुळीं सोयच नाही असें पाहून केवळ निरुपायास्तव त्यांस राजानी पुण्यास रवाना केलें. ह्या एवढ्या गोष्टींचा नीट विचार केला म्हणजे सदरी निर्दिष्ट केलेला तर्क केवळ निराधार आहे असें म्हणावे लागतें. जिजाबाईचा पहिला मुलगा संभाजी हा पित्याच्या अनुरोधानें वागून प्राप्त स्थितीमध्यें समाधान मानून राहणारा असल्यामुळें तो राजांबरोबर नेहमी असे. ह्यावरून शिवाजीमहाराज राजांस कमी प्रिय होते असें कोणी म्हणेल तर तें युक्त नव्हे.

***

१ प्रथम ग्रांट डफ यांनी हा तर्क आपल्या मराठ्यांच्या इतिहासाच्या तिसऱ्या भागात केला असून रानडे यांनी हाच तर्क आपल्या पुस्तकाच्या चौथ्या भागात नमूद केला आहे. रा. सरदेसाई आपल्या मराठी रियासतीत हा तर्क खरा मानून जिजाबाई आपल्या बापाच्या आश्रयास गेली नाही म्हणून तिची स्तुती करितात. (पृ.५९) प्रो. जदुनाथ सरकारांचा तर्क तर फारच विलक्षण आहे. ते म्हणतात की, जिजाबाईचे तारुण्य गेल्यामुळे शहाजीराजांचे तिजवरचे प्रेम उडून त्यांनी दुसरी तरुण व विशेष रुपवती बायको केली असावी!

भाग चौथा

शिवाजीमहाराजांचें शिक्षण

महापुरुष निर्माण होण्यास अनुकूल परिस्थिती व सुशिक्षण यांची अपेक्षा असते. ही शिवाजीमहाराजांस चांगली प्राप्त झाली होता असें म्हणण्यास चिंता नाहीं. त्यांची पहिली दहा वर्षे मातृसमागमेंच गेली. मनुष्याच्या मनावर बरावाईट परिणाम होण्यास हें वय अतिशयित महत्त्वाचें असतें. ह्या वयांत ज्या सद्‌सदवृत्तीचे बीजारोपण होतें त्या पुढे अनुकूल संस्कारांनी विकसित होण्याचा दृढ संभव असतो. हें वृत्ती विकासाचे काम फार नाजूक आहे. हें मुख्यत्वेकरून मातापितराच्या आचरणावर अवलंबून असतें. त्यांतून मातृशिक्षणाचा प्रभाव मोठाच असतो तिचा स्वभाव व आचरण ही जशी असतील तशी तीं तिच्या लेकरात उतरण्याचा संभव फार असतो. गर्भसंभवकालापासूनच ह्या शिक्षणास आरंभ होतो, असे कांही शास्त्रज्ञांचें म्हणणें आहे. तें खरें आहे असे मानिल्यास जिजाबाई गरोदर झाल्यापासून कोणत्या संकटावस्थेत होती व त्या अवस्थेंत तिच्या मनाची वृत्ती कशी झाली असावी हें कोणासही सांगावयास नको. यवनांविषयीं पराकाष्ठेचा द्वेष शिवाजीमहाराजांच्या हृदयात अगदी लहान वयांतच जो इतका विकास पावला त्याचें कारण पाहूं जाता त्यांच्या मातेचीच वृत्ती अशी पूर्ण बनलेली होती हें होय. बालराजांची पहिली दहा वर्षें तर केवळ घोर संकटांतच गेली. ही संकटपरंपरा ज्यांच्या पायी त्यांस प्राप्त झाली त्या यवनांविषयी द्वेष व तिरस्कार ह्या वृत्ती त्यांच्या हृदयात पूर्णपणे विकास पावल्या तर त्यांत कांही नवल नाहीं. त्यांत आणखी जिजाबाईसारखी अत्यंत स्वाभिमानी, महत्त्वाकांक्षी व बुद्धिमान माता त्यांस अहर्निश हाच बोध करणारी सर्वदा सन्निध असल्यावर मग हा वृत्तिविकास पाहिजे तसा व्हावयास हरकत कोणती?

जिजाबाईचा जन्म ज्या कुळांत झाला होता तें एक वेळ देवगिरीस राजवैभव भोगीत होतें, हें राजवैभव यवनांनी हरण केल्यामुळें त्यास हीन स्थिती व परवशता प्राप्त झाली. ह्या गोष्टीचा विसर त्या कुळातील माणसांला सहसा पडण्यासारखा नव्हता; आणि जिजाबाईसारख्या मानी स्त्रीला तर त्याची विस्मृति कदापि होणारी नव्हती. पुढें तिच्या पित्यास व बंधूस निजामशहानें विश्वासघात करून ठार मारिलें, त्यामुळें तर तिचा यवनद्वेष फारच वाढला होता. त्याप्रमाणेंच भोसल्यांच्या कुळाचे राजवैभव यवनाच्याच पायी नष्ट होऊन त्यातील पुरुषांस परागंदा व्हावें लागलें व अगदी हीन स्थितीमध्यें कालक्रमणा करावी लागली, हें ती कधींही विसरली नव्हती. पुढे शहाजीराजांनी स्वबाहुबलानें काहीं काळपर्यंत यवनांशी कलह करून त्यांस आपल्यास अंगचें अप्रतिम क्षात्रतेज व विलक्षण शौर्य दाखवून चकित करून सोडिलें. परंतु त्यांचे सैन्यबल प्रचंड असल्याकारणानें शहाजीराजांस हार खाऊन पुनरपि यवनांची ताबेदारी केवळ निरुपायास्तव पत्करावी लागली, हा स्वपतीचा अलौकिक पराक्रम पाहून, व ते काही वेळ समरविजयी होऊन एक यवनपादशाही केवळ त्याच्या मुठीत आली असून शेवटीं त्यास हतवीर्य व्हावे लागलें, हे लक्षांत येऊन तिच्या हृदयांत कोणत्या वृत्ती उद्भवल्या असतील बरें? भोसल्यांच्या कुळात शककर्ता पुरुष निर्माण होऊन तो सर्व हिंदू यवनत्रासापासून मुक्त करील, असा भवानीदेवीचा वर होता. तो आता लवकरच खरा होईल अशी आशा त्या माउलीच्या हृदयात कांही वेळ स्फुरण पावण्यासारखी कृती शहाजीराजांच्या हातून घडली होतीं. परंतु तिचे पर्यवसान निराळेच होऊन त्यांस पुनरपि यवनाची ताबेदारी स्वीकारावी लागली, हें पाहून तिची किती निराशा झाली व तिला किती वाईट वाटलें, हे येथें सांगावयास नको.

आपल्या पूर्वजांचे गतवैभव पुनरपि प्राप्त होऊन आपल्या कुळांत शककर्ता पुरुष खात्रीने निर्माण होईल असें त्या भाविक स्त्रीला नेहमी वाटत असे आणि शहाजीराजांनी केलेल्या पराक्रमावरून तर तिला ही गोष्ट असाध्य आहे असे मुळीच वाटत नसे. ह्या संबंधाच्या गोष्टी ती आपल्या प्रिय पुत्राशी नेहमी बोलत असे. उभय कुलांच्या राजवैभवाचें हरण यवनांनी केल्यामुळें आपणांस किती हीन स्थिती प्राप्त झाली आहे तें ती त्यास वेळोवेळी सांगत असे. शहाजीराजांनी नुकतेच जे पराक्रम केले होते त्यांचें वर्णन त्याजपाशी पुनःपुनः करून ह्याच्या हृदयांत तसे पराक्रम करण्याविषयीची इच्छा जागृत होईल असें करण्याविषयी ती झटत असे. गोहत्या करणाऱ्या, देवब्राह्मणाची विटंबना करणाऱ्या, क्रूर व विश्वासघातकी अशा यवनांची सेवा करून योगक्षेम चालविणे अत्यंत निंद्य व विपत्तिमूलक आहे असें ती त्याला अहर्निश करीत असे. जिजाबाई मोठी धर्मशील असल्यामुळें ती घरी नेहमी पोथ्यापुराणें वाचवी. त्यांतील कथा ऐकण्याचा नाद शिवाजीमहाराजांस लहानपणापासूनच लागला. ह्यामुळे स्वधर्माविषयींचा अभिमान व श्रद्धा ही त्यांच्या हृदयात अल्पवयातच उत्पन्न झाली. राम-रावण, कौरव-पांडव इत्यादिकांचे युद्धप्रसंग ऐकून त्यांच्या अंगांत स्फुरण येत असे व आपल्या वडिलांचे पराक्रम स्वमातेच्या तोंडून पुनःपुनः ऐकून, तसे आपण करून स्वजीविताचें सार्थक करूं असा हुरूप त्याच्या ठायीं, समजू लागल्यापासून, उत्पन्न होऊन तो दिवसेंदिवस वृद्धिंगत होत गेला.

शिवाजीमहाराज जात्याच मोठे बुद्धिमान व चपळ असल्यामुळें त्यास जें जें सांगावे तें तें चांगले समजत असून त्याची आठवण त्यास उत्तम रहात असे. जिजाबाई स्वभावाने फार गंभीर, धीर व अभिमानी होती. तिच्या सहवासाने व बोधाने तिचे हे गुण महाराजांत पूर्णपणे आले होते. त्यांच्या आचरणास चांगले वळण लावावे, त्यांस कुसंगती लागू नये, त्यांना कोणतेंही व्यसन किंवा ढंग लागू नये, ह्याविषयी ती फारच जपत असे. त्यांस युद्धोपयोगी कला शिकविण्यांची व्यवस्था तिने लहान वयापासूनच केली होती. ह्याप्रमाणें महाराजांच्या ठायी साहस, शौर्य, मुर्दुमकी, सदाचारप्रीती, स्वधर्मनिष्ठा इत्यादी गुणांचा विकास ह्या माउलीच्या सुशिक्षणानें चांगला झाला. परंतु ह्या सर्व वृत्तींहून विशेष महत्त्वाची अशी एक वृत्ती ह्या प्रेमळ मातेच्या बोधाने महाराजांच्या हृदयात उत्पन्न होऊन उत्तरोत्तर विकसित होत गेली व तिच्या प्रभावाने त्यांचे नांव जगाच्या इतिहासांत अजरामर होऊन राहिलें आहे. ती वृत्ती कोणती म्हणाल तर 'स्वातंत्र्यप्रीती' ही होय. यवनांचे ताबेदार होऊन परतंत्रतेत आयुष्यक्रमण करण्यांत काहींएक पुरुषार्थ नही. यवनांवर भरवसा ठेवून त्याची सेवा कितीही एकनिष्ठेने व इमानाने केली तरी तिचे कांहींएक चीज व्हावयाचे नाही, व खऱ्या सौख्याचा लाभ व्हावयाचा नाहीं. ह्या विचारांचें बाळकडू ह्या मातेने बालराजांस पाजले असून पारतंत्रतेमुळें किती हानी होते, किती हाल व विपत्ती भोगाव्या लागतात, व जीवितरक्षण होण्यास किती पंचाईत असते याचा प्रत्यक्ष अनुभव महाराजांस बालपणापासून चांगलाच आला होता. ह्याप्रमाणें स्वानुभव आणि मातृबोध याच्या योगाने महाराजांच्या हृदयांत 'स्वातंत्र्यप्रीती' पूर्णपणे बांधली असून यवनांची ताबेदारी प्राण गेला तरी करावयाची नाही, असा निर्धार त्यानी लहान वयांतच केला होता. पुढें ह्या निर्धाराप्रमाणें कार्यसिद्धी करण्यास ते प्रवृत्त झाले असतां दादाजी कोंडदेव याने त्यांस त्यापासून परावृत्त करण्याविषयी अनेक प्रकारे बोध केला व इतर उपाय योजिले; परंतु जिजाबाईने असा काही प्रयत्न केल्याचा उल्लेख कोणत्याही बखरींत नाहीं. ह्यावरून हें उघड होते कीं, यवनांची ताबेदारी झुगारून देऊन स्वतंत्र राज्यसत्ता स्थापित करण्याची स्फूर्ती, आवेश व उत्साह हीं त्यांच्या ठायीं मातृबोधानेच प्रथमतः उत्पन्न झालीं यांत काही शंका नाहीं. विजापुरास असतां महाराजांनी यवनांविषयींचा तिरस्कार प्रथम प्रकट केला तेव्हां जिजाबाईने पतीच्या आज्ञेवरून त्यांचा निषेध केल्याचा मागल्या भागांत उल्लेख केला आहे. त्यावरून कोणी म्हणतील कीं, यवनाची ताबेदारी पत्करून राहावें असाच जिजाबाईचा महाराजांला बोध होता, परंतु हे म्हणणें बरोबर नाहीं. कारण तिच्या अंतर्यामी कसेही विचार घोळत असले तरी पतीची आज्ञा शिरसावंद्य मानून तदनुसार वर्तन करणें हा साध्वी स्त्रीचा धर्म आहे, हें मनांत आणून तिने महाराजांस त्या प्रसंगी तसा बोध केला. त्यांत वावगे असें कांहींच झालें नाहीं. तेव्हां तात्पर्य काय कीं, जिजाबाईसारखी परम सात्विक, भाविक, स्वाभिमानी व स्वोत्कर्षप्रिय माता शिवाजीमहाराजांसारख्या परम मातृभक्त व अत्यंत बुद्धिमान पुरुषास सुदैवाने प्राप्त होऊन, तिच्या अतिप्रेमळ बोधाचा ठसा त्यांच्या चित्तावर उत्कृष्ठ उठून त्यांच्या हातून सर्व जगास थक्क करून सोडणारे व हिंदू प्रजेस यवनत्रासापासून सोडविणारे पराक्रम घडले.

येथवर जिजाबाईकडून कोणत्या प्रकारचे शिक्षण शिवाजीमहाराजांस प्राप्त झालें तें सांगितलें. आता स. १६३७ त शहाजीराजांनी दादाजी कोंडदेवास महाराष्ट्रातील आपल्या जहागिरीची व्यवस्था सांगून शिवाजीमहाराजांस त्याच्या हवाली केलें, व त्यास असें सांगितलें कीं, याला योग्य प्रकारचे शिक्षण द्यावे. तेव्हां अर्थात् ह्यानंतर महाराजांच्या शिक्षणाचे काम मुख्यतः दादाजीकडे आलें. तरी मातेच्या सुशिक्षणाचा शेवट येथें झाला असे मात्र समजता कामा नये. तिचा सर्व जीवप्राण महाराजांवर होता. सर्व आशेचा व भावी उत्कर्षाचा कंद केवळ हा आहे असें तिला वाटे. उभय कुळाचे गतवैभव यवनांपासून पुनरपि हिसकावून घेण्याचे सामर्थ्य ह्याच्या अंगी येईल असे तिला वाटूं लागलें होतें. फार काय, पण भवानीच्या वरप्रसादाने आपल्या कुळांत जो शककर्ता उत्पन्न होणार आहे असें त्या भावीक स्त्रीस वाटत होतें तो कदाचित् आपल्या ह्या पुत्राच्याच रूपाने प्रगट होईल असें तिला वाटण्याजोगी कांही चिन्हे महाराजांच्या ठायीं एव्हापासूनच दिसूं लागली होतीं. तेव्हां अर्थात महाराजांच्या ठायी सद्गुण व स्वधर्म यांविषयीची प्रीती उत्तरोत्तर वृद्धिंगत होईलसे करण्याविषयी ती सर्वदा झटत असे.

आतां दादाजी कोंडदेवाकडून महाराजांस कोणत्या प्रकारचे शिक्षण प्राप्त झालें तें सांगितलें पाहिजे. प्रथमतः ह्या पुरुषाची थोडीशी माहिती येथें दिल्यास अप्रासंगिक होणार नाही. दादाजी शहाजीराजांच्या नोकरीस केव्हांपासून होता तें कळत नाहीं.[१] परंतु तो फार हुशार, चाणाक्ष, प्रामाणिक व स्वामिनिष्ठ आहे अशी खात्री झाल्यावरून राजांनी पुणे, सुपे, बारामती, इंदापूर, मावळ वगैरे महाराष्ट्रांतील आपल्या जाहगिरीची व्यवस्था पाहण्याचे काम त्यास सांगितले. ही आपल्या धन्याची कामगिरी त्यानें उत्तम प्रकारे केली. हे प्रांत मोगल व मुसलमान याच्या दीर्घ काळ चाललेल्या कलहांमुळे बहुतेक उद्ध्वस्त झाले होते. ह्याशिवाय आणखी महाराष्ट्रात स. १६३०-३१ साली भयंकर दुष्काळ पडल्यामुळें हें प्रांत अगदीं बेचिराख झाले होते.[२] त्यांत पुनः वसती करून त्यानें ते चांगले लागवडीस आणिले; व शेतकऱ्यास उत्तेजन यावें म्हणून त्यांस कांही वर्षांचा सारा माफ केला. आसपासच्या गावचे शेतकरी ह्या प्रांतात येऊन जमिनी नांगरूं लागले. त्यामुळें उत्पन्न वाढून लोकही सुखी झाले. दादाजीने जमिनीची मोजणी व प्रतबंदी करून मलिकंबरी वसुलाची पद्धत इकडेतिकडे सुरू केली. ती अर्थात् अशी कीं, दरसाल जें पीक येईल त्याची अजमासपाहणी करून त्यावर वसूल ठरवावयाचा. ह्यामुळे लोकांस अधिकाधिक पिके काढण्याचा हुरूप आला. अशा रीतीनें शेतकऱ्यांशीं कौलकरार होऊन जमिनी आपल्याकडे कायमच्या राहतील त्यांची नांगरणीपेरणी करून होणाऱ्या उत्पन्नाचा योग्य अंश आपणांस निर्वेधपणे भोगावयास मिळण्याची शाश्वती आहे असें रयतेस वाटल्यावरून ती दादाजीच्या व्यवस्थेखालील प्रांतांत येऊन सुखाने राहू लागली.

ह्या वेळीं मावळातल्या मावळे लोकांची स्थिती फारच निकृष्ट होती. ते रात्रंदिवस कितीही कष्ट करीत तरी त्यांस खावयास पोटभर अन्न व जाडेभरडे वस्त्रही मिळण्याची पंचाईत असे. हे लोक मोठे कष्टाळू व विश्वासू आहेत असें पाहून दादाजींने त्यांची ती दीन स्थिती सुधारण्याविषयीं विशेष परिश्रम केले. त्यांस त्यानें साऱ्याची सूट देऊन जमिनीची लागवड करण्यास उत्तेजन दिलें. पुष्कळांस आपल्या पदरी शिपायांच्या नोकऱ्या देऊन वसूल जमा करण्याची वगैरे कामे त्यानें सांगितली. त्यांस एकदोन रुपये पगार व नाचणी वरी यांसारखे थोडेसे रुक्ष धान्य दिलें म्हणजे बस होत असे. त्या पहाडी मुलखात लांडग्यांचा, वाघाचा वगैरे उपद्रव फार असे. तो नाहींसा करण्यासाठी दादाजीने मावळे बरकंदाज ठेवून

---

१ प्रो. सरकार मुसलमानी बखरींच्या आधारावरून असें म्हणतात की, विजापूर सरकारचा सरदार मुरार जगदेव याला शहाजीराजांनी १६३३ त चांगलें साहाय्य केल्यावरून त्यास त्यानें त्या सरकाराकडून चाकणच्या किल्ल्यापासून पुणे, सुपे, इंदापूर व वाई हे परगणे जहागिरीदाखल देवविलें. तेंव्हा त्यांची व्यवस्था लावण्याचे काम राजांनी दादाजी कोंडदेवाकडे सोपविले. त्यापूर्वी हा गृहस्थ हिंगणी, बेरडी व देऊळगाव ह्या गावाचे कुलकर्ण्यांचे काम करीत होता. ह्या गावांच्या पाटीलक्या मालोजीराजांनी खरेदी केल्या असल्याकारणानें दादाजीचे सगळे आयुष्य भोसल्यांच्या नोकरींत गेलें असून शहाजीराजांना त्याची कर्तबगारी व इमान ही चांगलीच अवगत होती, म्हणून त्यांनी त्यास सदरील विश्वासाची कामगिरी सांगितली.

२ ह्या दुष्काळासंबंधाचा उल्लेख जेधे यांच्या शतकावलींत व पादशाहीनाम्यांत केला आहे.

त्यांस अशी लालूच दाखविली कीं, जो कोणी लांडगा किंवा वाघ मारून आणील त्यास बक्षीस मिळेल. ह्या बक्षिसाच्या आशेनें त्यांनी पुष्कळ हिंसक पशूंचा संहार करून त्यांचा त्या प्रांतातून बहुतेक त्रास नाहीसा केला.

ह्या मुलखात चोरवडा फारच माजला होता. यास्तव दादाजीने जागोजाग चौक्या पहारे ठेवून चोरांचा बंदोबस्त केला. चांगले उत्पन्नाचे वृक्ष लावण्यास व बागाईत वाढविण्यास लोकांना त्यानें उत्तेजन दिलें. ह्यामुळे जिकडे तिकडे बागबगीचे, आमराया इत्यादी निर्माण झाल्या. शहाजीराजांच्या ताब्यांतल्या किल्ल्यांची डागडूजी करून त्यांवर त्याने शिबंदी ठेवली, व मावळे लोकांची एक पलटण तयार केली. मावळांतल्या खोऱ्यात जागोजाग देशमुख व देशपांडे होते, ते निजामशाही, अदिलशाही व मोगलशाही यांच्यात धामधुमी माजल्यामुळें कोणासही न जुमानता बहुतेक स्वतंत्र होऊन बसले होते. त्यांस वठणीस आणून शहाजीराजांचे अंकित करण्याच्या कामी दादाजीस फारच प्रयास पडले. साम, दाम, दंड व भेद ह्या चारी प्रकारांची योजना त्यास प्रसंगानुसार करावी लागली. त्यांच्या आपसातल्या कलागती मिटविण्याचें काम त्यानें मोठ्या चातुर्यानें केलें. या त्याच्या कर्तृत्वाची कल्पना अलीकडे प्रसिद्ध झालेल्या कागदपत्रावरून[१] चांगली करता येते. अशा रीतीने शहाजीराजांच्या जाहगिरीची व्यवस्था दादाजी कोंडदेवाच्या परिश्रमानें उत्तम होऊन तिचे उत्पन्न पुष्कळ वाढलें. ह्या उत्पन्नांतून शिपाई, नोकर, कामदार, कारकून वगैरे लोकांस द्यावा लागणारा मुशाहिरा व इतर चिल्हर खर्च वजा जातां बाकीचा सगळा ऐवज दादाजी शहाजीराजांकडे वर्षाच्या वर्षास प्रामाणिकपणाने पावता करीत असे. ह्या विश्वासू कारभाऱ्याच्या सचोटीची अशी एक गोष्ट सांगतात की, एके दिवशीं शिवाजीमहाराजांस बरोबर घेऊन तो राजांच्या एका बागेतून चालला असतां एक पाडाचा आंबा त्याने आपल्या हाताने तोडला. पण आपण हे बेकायदा काम केलें असे मनात येऊन तो म्हणाला कीं आपणास, ह्याबद्दल शासन असावें आणि ज्या हाताने तो आंबा तोडिला तो हात तोडा, असे तो बरोबरच्या चाकरांस सांगू लागला. ते पाहून शिवाजीमहाराज म्हणाले. हे तुमचे करणें बरोबर नाहीं. ह्या बागेची लावणी तुम्हींच केली आहे. तुम्ही मालकच आहा. हें ऐकून त्यानें आपल्या अंगरख्याची एक अस्तनी लांडी केली व असा लांड्या अस्तनीचा अंगरखा तो आमरण वापरीत असे, असें म्हणतात.[२]

एकंदरीत पाहतां दादाजी मोठा इमानी व स्वामिकार्यदक्ष असा होता. शहाजीराजांनी आपल्या जहागिरीची व्यवस्था त्याला सांगितली त्या वेळीं तो चांगला पोक्त वयाचा असून मोठा अनुभविक होता. त्याचें वर्तन पवित्र असून स्वधर्मावर त्याची पूर्ण श्रद्धा असे. एकंदर धर्मकर्मे तो नियमानें करी. त्याच्या मनाची वृत्ती अशी असे कीं, स्वामिकार्यासाठी देह झिजवून व दक्षतेने व इमानाने वागून स्वोत्कर्ष साधावा. तेव्हा अशा ह्या प्रामाणिक, धर्मशील व पापभीरु पुरुषाच्या स्वाधीन आपल्या पुत्रास करण्यास शहाजीराजांस काहीएक दिक्कत वाटली नाहीं, हें साहजिक आहे. आणि दादाजीनेंही आपल्या धन्याच्या ह्या गुणी व हुशार मुलाचे संगोपन मोठ्या प्रेमाने व दक्षतेने केलें.

शिवाजीमहाराजांस व जिजाबाईस कोणत्याही गोष्टीचे उणे पडूं न देण्याविषयी तो मनापासून झटे. क्षत्रियाचा मुलगा क्षत्रियकर्म करण्यास चांगला योग्य व्हावा यासाठी त्यानें महाराजांस युद्धकला शिकविण्याची उत्तम व्यवस्था केली. त्यांचें शरीर बळकट व चपळ होण्यास लागणाऱ्या कसरती व व्यायाम त्यांच्याकडून तो नियमानें करवीत असे. जिजाबाईने ह्या प्रकारच्या शिक्षणास पूर्वीच आरंभ केला होता व हें शिक्षण दादाजीने पुढें दक्षतेने ठेविले. ह्या प्रकारच्या शिक्षणाशिवाय आणखी महाराजांकडून विद्याभ्यासही करविला होता. ह्या अभ्यासाची व्यवस्था प्रथम जिजाबाईने

---

१ रा. राजवाडे यांनी प्रसिद्ध केलेली १५,१६, १७, १८ व २० खंडे पाहा. छ.शि... ६

२ रायरीच्या बखरींत ही गोष्ट अंमळ दिली आहे. हा आंबा एका कुणब्याच्या बागेतला त्याने तोडला असून त्या कुणब्यांस आपला हात तोडावयास तो सांगू लागला. परंतु तो कुणबी काही केल्या ऐकेना. म्हणून तो त्या हातात चांबड्याचा मोजा घालू लागला. ही गोष्ट पुढें शहाजीराजांस कळली तेव्हा ते त्याच्या त्या प्रामाणिकपणानें फार संतोष पावले व त्यास सातशे होन व एक खिलात (झगा) त्यांनी बक्षीस पाठविला, आणि हातमोजा इतःपर वापरू नये असें त्यास सांगितले. त्याप्रमाणेंच त्यास लागेल तो खर्च आपल्या उत्पन्नातून करण्याची त्यांनी परवानगी दिली.

करविली असून[१] पुण्यास गेल्यावर दादाजीने तो पुढें चालविला होता. महाराजांस उर्दू व फारशी ह्या भाषा चांगल्या शिकविल्या होत्या. इतकेंच नव्हे तर त्यांस थोडेसे संस्कृतही शिकविले होतें. असें सांगतात की, त्यांनी कांही पदे व आरत्या केल्या असून त्यात उर्दू भाषेतील शब्द बरेच आहेत.[२] दादाजी स्वतः धर्मशील पुरुष असल्यामुळें महाराजांसही तें वळण लागले. कथा व पुराणे यांचे श्रवण त्याला नित्य घडूं लागलें व स्वधर्माभिमान त्यांच्या ठायीं विशेषच दृढ झाला.

हें जें शिक्षण महाराजांस दादाजीकडून प्राप्त झालें त्यांत काहीं विशेष नव्हतें. ह्या प्रकारचे शिक्षण देण्याची व्यवस्था जिजाबाईने पूर्वीच केली होती. दादाजीकडून त्यांस मिळालें शिक्षण याहून निराळें होतें. दादाजी जमाबंदीच्या कामांत मोठा हुशार होता. त्याच्या व्यवस्थेखालीं असलेल्या प्रांतांचें उत्पन्न वाढविण्याविषयीं व त्यांतील रयतेस खुष ठेवण्याविषयीं योग्य उपाय योजण्याच्या कामी तो पुरा वाकबगार होता. हाताखालील लोकांस उत्तम रीतीनें वागवून त्यांच्याकडून वाटतील तीं कामे करून घेण्यांत त्याचा हातखंडा होता. न्यायमनसुब्याच्या कामांतही तो पुरा हुशार असून निःपक्षपाती व निरपेक्ष असे. ताब्यातील प्रजेचे योग्य रक्षण होऊन ती आबाद राहील अशी शिस्त लावण्यास तो मनापासून झटे. स्वामिहिताचें हरएक काम तो मोठ्या दक्षतेने व निरलसपणे करीत असें. हा सगळा कारभार दादाजी कोणत्या रीतीने करतो हें महाराज नेहमी जवळ राहून पाहत असत. प्रत्येक गोष्टीची बारकाईने चौकशी करून उपयुक्त व्यवहारज्ञान संपादन करण्याची त्यांना पराकाष्ठेची हौस असे. त्यांचा चौकसपणा असा कांही अमर्याद असे कीं, प्रत्येक बाबतींत शेकडो प्रश्न करून जवळच्या माणसास ते पुरेपुरे करून सोडीत. ही अशी जिज्ञासा व चौकसपणा त्यांच्या अंगी असल्यामुळें दादाजीचे प्रत्येक काम नीट समजून घेण्यास ते सर्वदा उद्युक्त असत. एखाद्या प्रकरणाची माहिती आपणांस नीट झाली नाहीं असे आढळून आलें म्हणजे त्यांस फार वाईट वाटत असे. दादाजीस ते फार मान देत असत. त्याच्या सन्निध राहून त्याच्या सर्व अनुभवज्ञानाचा लाभ आपणांस घडावा असें त्यांस मनापासून वाटे. परंतु दादाजी सर्वच गोष्टी त्यांच्या विद्यमाने करीत नसे. हें लक्षांत येऊन ते त्याला एके दिवशी असें स्पष्टपणे बोलले की, 'आम्ही लहान असलो म्हणून काय झाले? प्रत्येक गोष्ट आम्हांस कळवून करावी. आपण आम्हांस वडिलांच्या जागी आहां. आम्हांस शहाणे करावयासाठी वडिलांनी आपल्या स्वाधीन केलें आहे. प्रत्येक कामाची व्यवस्था आम्हांस सांगून केली नाहीं तर आम्हीं शहाणे कोणत्या रीतीनें व्हावे?' ही अशी त्यांची उत्सुकता पाहून दादाजी हरएक कामांत त्यांची मसलत घेऊं लागला. महाराज प्रत्येक गोष्टीचा मनःपूर्वक विचार करीत व तीसंबंधानें त्या अनुभविक व पोक्त पुरुषाचे साधकबाधक विचार मनापासून ऐकून घेत. कधींकधीं मोठ्या बिकट बाबी व पंचायती उपस्थित होऊन त्यांवर अभिप्राय किंवा न्याय देणे कठीण पडे. अशा भानगडीच्या प्रश्नांचा निर्णय करून योग्य निवाडा देण्याचे शिक्षण दादाजीकडून महाराजांस अल्पवयातच प्राप्त झालें. त्यांची धारणाशक्ती व कुशाग्रबुद्धी अलौकिक असल्यामुळें कसेही बिकट प्रकरण असलें तरी त्याचें आकलन होण्यास व तें ध्यानांत ठेवून त्यापासून पुढें फायदा करून घेण्यास त्यांस मुळींच कठीण जात नसे.

---

१ चिटणीसकृत बखर पहा. शिवदिग्विजयातील अत्युक्तिरूप वर्णन खरें मानले तर पुराणांतरींच्या सर्वक्षत्रियांस सर्व विद्या व सर्व कला शिकविण्याचा परिपाठ असे, त्याप्रमाणें महाराजांस शिक्षण मिळाले होतें असें म्हणावे लागतें.

२ रा. राजवाडेकृत म. इ. सा. खं. ४ पृ. ७४ पाहा. ह्या विद्वान् इतिहाससंशोधकाने सरस्वतीमंदिर ब ५, अ. ५ यात 'शिवाजीची साक्षरता' ह्या नावाचा एक लेख लिहून ग्रांट डफचें महाराजांच्या निरक्षरतेसंबंधाचें विधान सर्वथा असत्य आहे असें सिद्ध केलें आहे. त्यांच्या वेळच्या, त्यांच्या पूर्वी होऊन गेलेल्या व पुढे झालेल्या बहुतेक मराठी सरदारांस लिहिता वाचता येत असे असें त्यांचें म्हणणें आहे, तें खरें आहे. असा पुरावा त्यांनी दिला असूनही प्रो. सरकार यांस तो न पटून महाराज निरक्षर होते असा हट्टाग्रह धरून बसले आहेत. रा. देव यांचे म्हणणें हें की, रामदासस्वामींस पाठविलेल्या पत्राच्या अखेरचा थोडासा मजकूर महाराजांच्या हातचा आहे, तें त्याना विश्वसनीय वाटत नाही! अलीकडे प्रसिद्ध झालेली पत्रे, याद्या इत्यादिकांवरून असें निर्विवाद सिद्ध झालें आहे की, शिवाजीमहाराजांसच काय पण त्याच्या मातुश्री जिजाबाई, त्याचे पणजे बाबाजी, त्याचे आजे मालोजी व त्याचे तीर्थरुप शहाजी यांसही लिहिता-वाचता येत असे. मराठे हे क्षत्रिय आहेत, शूद्र नव्हेत, हें ध्यानात ठेविले पाहिजे आणि सोळाव्या व सतराव्या शतकातल्या कुलीन मराठ्यांचा लिहिणें-वाचणें शिकण्याचा सार्वत्रिक परिपाठ होता. इतकेंच नव्हे तर त्याच्यापैकी काहीं कविही होते. द्रौपदीस्वयंवराचा कर्ता अवचितसुत काशी व सिद्धांतबोधाचा कर्ता शहामुनी हे मराठे होते; साधुवर्य तुकारामबावा यांचे अध्ययन व कवित्व ही तर सर्वश्रुत आहेत.

सारांश, जमाबंदीची व्यवस्था नीट लावून प्रजा आबाद कशी राखावी, शेतकऱ्यांस उत्तेजन देऊन उत्पन्न कसें वाढवावे, घोडे वगैरे जनावरांची जोपासना कशी करावी, शिपाई प्यादे वगैरे नोकर पदरी ठेवावयाचे ते कसे पारखून ठेवावे, नोकरांस राजी राखून त्यांच्याकडून इष्ट कामे कशी बिनबोभाट करून घ्यावी, पागा व लष्कर यांची शिस्त कशी राखावी, इत्यादी गोष्टींचे ज्ञान महाराजांस दादाजीकडून अल्प वयांतच चांगले प्राप्त झालें. ह्या अनुभवाचा व ज्ञानाचा परिपाक पुढें किती उत्तम प्रकारे झाला व त्यापासून कोणती कार्ये उद्भवली तें सर्व जगास विदित आहे.

परंतु यवनद्वेषाचे बाळकडू त्यास प्रिय मातेकडूनच पाजले गेले, हें वर निर्दिष्ट केलेंच आहे. यवनांची ताबेदारी प्राण गेल्याही करू नये. त्यांचे अन्न खाणे म्हणजे विष भक्षण करणें होय. स्वराज्य स्थापन करून हिंदू प्रजेस वनवासापासून मुक्त करण्याचा प्रयत्न मनःपूर्वक करावयाचा इत्यादी मर्दुमकीचे विचार त्यांच्या हृदयांत लहानपणीच उद्भवून ते उत्तरोत्तर दृढ होत गेले, ते त्यांच्या मातेच्या शिक्षणामुळेच मुख्यतः होत. ह्या संबंधाचे सगळे श्रेय जिजाबाईसच दिलें पाहिजे. दादाजी कोंडदेवाच्या मनांत असले विचार उत्पन्न होण्याचा मुळींच संभव नव्हता. त्याची दृष्टी इतकी दीर्घ नव्हती. ज्यांच्या कृपेने आपल्या धन्यास ही जहागीर प्राप्त झाली आहे त्याच्याशी नम्रतेनें वागून त्यांची इतराजी होऊ न देण्याविषयी कायावाचामनेंकरून झटावे व कसेही करून जहागिरीचे संरक्षण करावे एवढेच आपलें कर्तव्य आहे असे त्या विश्वासू व सरळ मनाच्या पुरुषास वाटत असे. धन्याची जहागीर वाढविण्याचे धाडस करून यवनांच्या कोपास पात्र होण्याचा विचार त्याच्या मनांत कधींही आला नाहीं, हे स्वाभाविकच होतें.

महाराजांस व जिजाबाईस विजापुराहून दादाजी कोंडदेवाबरोबर शेवटी रवाना केल्यावर लवकरच महाराजांनी आपला कृतसंकल्प येणेंप्रमाणें बोलून दाखविला : 'वडिलांनी यवनांची ताबेदारी पत्करून संपादिलेल्या दौलतीवर निर्वाह करून रहाणे मला योग्य वाटत नाहीं. स्वतःच्या पराक्रमानें नवीन दौलत संपादन करण्याचा माझा निर्धार झाला आहे. माझ्या हातून कांही तरी नवीन कमाई होईल तरच भोसल्यांच्या कुळांत जन्म घेतल्याचे सार्थक. पुरुषानं स्वतःच्या कमाईचे अन्न खावे यांतच पुरुषार्थ आहे. दैवावर भरंवसा ठेवून राहणे सर्वथा योग्य नव्हे. दैव पंगु आहे. पुरुषाने स्वप्रयत्नानें त्यास सबल केलें पाहिजे. यवनांनी आम्हां हिंदूंच्या स्वातंत्र्याचा अपहार करून गोब्राह्मणांस व क्षेत्रादिकांस अनेक प्रकारे त्रास दिला आहे, व हिंदूधर्माची चोहींकडे ग्लानी होत चालली आहे. हा अनिष्ट प्रकार बंद करून स्वातंत्र्याची पुनः स्थापना करण्याविषयी तनमनधनेंकरून उद्योग आरंभिण्याचा मीं निश्चय केला आहे. ह्या सत्कार्यसिद्धीसाठीं प्रयत्न करतांना सर्वस्वनाश होऊन स्वप्राण वेंचावे लागले तरी चिंता नाहीं. आजपर्यंत माझे वय व्यर्थ गेलें त्यास आतां उपाय नाही. इतःपर आयत्या पिठावर रेघा ओढीत बसून प्राप्त स्थितीत समाधान मानून राहण्यात मुळींच पुरुषार्थ नाहीं.' हा महाराजांचा संकल्प दादाजी कोंडदेव यास कळला तेव्हां त्यानें त्यास त्यापासून परावृत्त करण्याच्या उद्देशाने येणेंप्रमाणें बोध केला; 'तुम्ही मनांत योजिलेली गोष्ट साध्य होणें परम दुर्घट आहे. सर्व देश यवनांनी पादाक्रांत केला आहे. सर्व किल्लें व ठाणीं हस्तगत करून त्यांनी त्यावर आपल्या फौजा ठेविल्या आहेत. तुमच्या वडिलांनी संपादिलेल्या दौलतीचे रक्षण करून राहा म्हणजे पुरे आहे. नवी संपादण्यासाठीं खटपट करूं गेल्यास यवनांशी विरोध घडेल व आहे तीही गमावून आपल्या वडिलांस व स्वतःस तुम्ही प्राणसंकटांत पाडाल. आपले वडील कांही कमी पराक्रमी नाहींत परंतु प्रबल यवनांपुढें त्यांचें काहीएक न चालून अंती त्यांस यवनांची ताबेदारी स्वीकारावी लागली. याचा नीट विचार करा. भलताच अविचार करू नका!' ह्या बोधावरून दादाजीच्या बुद्धीचा पोंच कितपत होता व त्यास कोणत्या गोष्टींत इतिकर्तव्यता वाटत असे, हें स्पष्ट होतच आहे.

पुढें महाराजांनी कृतसंकल्पाप्रमाणें स्वराज्यस्थापनेच्या उद्योगास आरंभ करून विजापूरकरांच्या मुलखात धामधूम सुरू केली तेव्हां दादाजी अगदी घाबरून जाऊन महाराजांस म्हणाला कीं, 'तुम्ही जो हा प्रकार आरंभिला आहे तो सर्वथा अनिष्ट होय. येणेंकरून तुम्हांस व तुमच्या जहागिरीस मात्र खास धोका आहे. यवनांच्या चार पादशाहती चोहों बाजूंस प्रबल नांदत आहेत. त्यांच्यापुढे तुमचे सामर्थ्य तें किती? ह्या अशा उपद्व्यापामुळे तुमच्या वडिलांस मात्र तुम्ही

नाहक पेंचांत आणणार आहां. ते तिकडे त्यांच्या अंमलांत आहेत. तुमच्या ह्या कृतीमुळे त्यांजवर अदिलशहाचा कोप होऊन त्यांस तो मोठे शासन करील; व तुम्ही आपल्या जहागिरीस मुकून देशोधडीस लागाल, आणि वडिलांनी कमाविलेली दौलत अविचाराने गमाविल्याबद्दल तुमची अपकीर्ती होईल. यास्तव विजापूरसरकाराशीं इमानाने वागून आहे ती दौलत कायम राखाल तर त्यांत तुमचे कल्याण आहे.' हा असा अवसानघातकीपणाचा बोध दादाजीकडून त्यांस वेळोवेळी होई. तो ते निमूटपणे ऐकून घेत, त्यास उलट जाब असा बिलकूल करीत नसत. अशा ह्या नाउमेदीच्या बुद्धिवादाने महाराजांचे मन स्वसत्संकल्पापासून यत्किंचित्ही परावृत्त झालें नाहीं. हें आम्हां महाराष्ट्रीयांचे मोठेच भाग्य समजावयाचें.

असें सांगतात कीं, आपण एवढ्या कळकळीने खऱ्या हिताचा बोध केला असतां हा वाटेवर येत नाहीं, तेव्हां आता काय करावे असा त्या इमानी पुरुषास हृद्रोग लागून राहिला. धन्याने ह्या मुलास आपल्या स्वाधीन करून यास चांगले वळण लावण्यास सांगितलें आहे. पण हा असा बेकैदपणें वर्तन करून आपल्या धन्यावर नसतें संकट आणणार. तेव्हां अशा पेंचांत धन्यास आणिल्याचें अपयश पर्यायाने आपल्या माथीं येणार व तुम्ही जवळ असून झाला हे फंद कसे करू दिले? असा बोल आपणांस लागणार व आजपर्यंत इमानाने केलेल्या नोकरीवर पाणी पडणार. हे विचार दादाजीच्या मनात येऊन तो झुरणीस लागला, व प्रकृती क्षीण होऊन त्याचें लवकरच देहावसान झाले.[१]

ह्या प्रकरणी आपणावर कांही दोष येऊ नये म्हणून दादाजीने त्या संबंधाची कच्ची हकीगत शहाजीराजांस लिहून कळविली आणि अशी विनंती केली की, 'आजपर्यंत आपल्या इकडील जहागिरीची व्यवस्था व रक्षण आम्ही यथामती इमानाने केलें. सांप्रत आपले चिरंजीव आपढंगीपणानें मनास वाटेल तें करीत आहेत. त्यामुळें ओढवणाऱ्या दुष्परिणामाचे अपयश आमच्या माथी न यावें एतदर्थ आपणांस वेळींच लिहून कळविले आहे. तरी याचा आपणांस योग्य दिसेल तसा बंदोबस्त करावा. परंतु शहाजीराजे यांनी महाराजांचा ह्या बाबतीत करावा तसा काहींच बंदोबस्त केला नाहीं. कारण उघडच आहे की, शहाजीराजांच्या मनातही स्वराज्यस्थापनेचा विचार ह्या वेळी घोळत होता. ह्या संबंधाचा उल्लेख यथास्थली केलाच आहे. एकंदरीत तात्पर्य काय कीं, स्वराज्यस्थापनेचा विचार महाराजांच्या मनांत उत्पन्न व्हावयाला दादाजी कोंडदेवाचें शिक्षण यत्किंचितही कारण झालें नाहीं; तर ह्या विचाराविरुद्धच त्यानें त्यांस वेळोवेळी बोध केला होता आणि हा शिष्य लेचापेचा असता तर हा नेभळेपेणाचा उपदेश ऐकून तो प्राप्त स्थितीमध्यें समाधान मानून स्वस्थ राहिला असता. परंतु महाराजांचे तेज विलक्षण असून अंगीकृत कार्याचें महत्त्व व तें साध्य करण्यास लागणारी साधनसामुग्री यांचें ज्ञान त्यांच्या ठायीं पूर्णपणे वसत असल्याकारणानें ते त्यापासून अणुमात्र पराङ्मुख झाले नाहींत. हा मातृबोधाचा प्रभाव किती विलक्षण आहे पहा! मातृमुखानें निघालेला प्रेमळ व मधुर असा एक शब्द दशसहस्र उपदेशकांच्या बोधप्रचुर व्याख्यानांहून अधिक आहे, अशी एक उक्ती आहे तिचे सत्यत्व महाराजांच्या चरित्रांत चांगले प्रत्ययास येतें.

---

१ मराठी साम्राज्याच्या बखरींत असा उल्लेख आहे की, दादाजीस हा हृद्रोग असह्य होऊन त्यानें विषप्राशन करून स्वप्राणनाश केला. 'तारीख-इ-शिवाजी' यामध्येही असाच उल्लेख आहे. ह्या यवनी बखरींत शिवाजी महाराज सोळा वर्षांचे असता दादाजी मरण पावला असा उल्लेख आहे; परंतु अलीकडच्या शोधावरून असे निश्चितपणे कळते की, स. १६४७ च्या ऑक्टोबर महिन्यात मरण पावला, भा. इ. स. म. अ. शके १८३५ - अंक ५३ ह्यावरून असे म्हणावे लागते की, महाराजांनी तोरणा किल्ला घेतला (१६४६) व राजगडाच्या तीन माच्या बांधल्या (१६४५). त्या वेळीं दादाजी हयात होता. पण ह्या दोन्ही कारस्थानांत त्याचे अंग असल्याचा उल्लेख कोठेच नाही. आता ह्या कारस्थानापासूनच विजापूर सरकाराशी प्रत्यक्ष विरोध सुरू झाला आणि हेच दादाजीच्या चिंताज्वरास विशेष कारण झाल्याचा उल्लेख वर केलाच आहे.

वर दर्शविल्याप्रमाणें महाराज दादाजीच्या ह्या बोधाप्रमाणें वागले नाहींत, ह्यावरून कोणी असें समजू नये कीं, ते त्याच्याशी सर्वच बाबतींत हूडपणाने वागत असत. ते दादाजीस वडिलांसारखा मान देत असत. त्याच्याशी सर्वदा नम्रतेने वागून तो जें कांही सांगे तें मनापासून करीत. आपल्या पित्याचा हा परम विश्वासू नोकर आहे, हें जाणून त्याच्यावर ते लोभ करीत. महाराजांच्या हूडपणाच्या व धाडसाच्या कृत्यांस बोधाने आळा पडत नाहीं असें पाहून त्यांच्या अंगच्या लोकोत्तर चपलतेस व जोमास कांही तरी निराळ्या प्रकारचा व्यायाम मिळावा ह्यासाठी दादाजी त्याला आपल्या बरोबर गावोगाव हिंडवून जमीन महसुलाची वगैरे व्यवस्था दाखवू लागला. आपला बहुतेक कारभार त्यांच्या अंगावर टाकून त्यांचा बराच वेळ तिकडेच गुंतून राहील असें तो करूं लागला. हें काम महाराज मोठ्या उत्साहाने व हुशारीने करीत. पण अशा उपायाने ते कृतसंकल्पापासून यत्किंचित्ही परावृत्त झाले नाहींत. उलट एवढे मात्र झालें कीं, जाहगिरींतील देशमुख, देशपांडे, दरकदार, कामदार वगैरे लोकांच्या ओळखी होऊन त्यांच्याशीं महाराजांचा प्रत्यक्ष संबंध आला व स्वतंत्रपणें कारभार चालविण्याची धमक त्यांच्या अंगी अधिकच आली.

ह्याप्रमाणें आपण योजिलेली युक्ती निष्फळ झाली असें पाहून तर दादाजीस विशेषच वाईट वाटलें. पुढें कसें होईल याची चिंता त्यास फारच लागली. त्यामुळें त्याची प्रकृती बिघडून जाऊन तो अत्यवस्थ झाला. तो असा बिछान्यास खिळला तेव्हां जिजाबाईने व महाराजांनी त्याची शुश्रूषा उत्तम प्रकारे केलीं. महाराज नेहमी त्याच्या बिछान्यापाशीं बसून राहात. कोणी कांही उपाय सांगत तेवढे सगळे त्यांनी करून पाहिले; परंतु कांहीं एक गुण न येऊन दादाजीचा अंतसमय जवळ आला. तेव्हां त्यानें आपल्या ताब्यांत असलेला सर्व खजिना वगैरे महाराजांच्या हवाली केला. किल्ले, कोट, प्रांत, पागा, लष्कर इत्यादिकांची व्यवस्था कोणत्या प्रकारे ठेवावी, पदरच्या लहानमोठ्या माणसांशी कसें वागावे, व त्यांच्याकडून कोणकोणती कामे कसकशीं करून घ्यावी इत्यादी गोष्टी त्यानें त्यांस नीट समजून सांगितल्या. मग कारकून, दरकदार, कामदार व इतर नोकर यांस आपल्या जवळ बोलावून आणून शहाजीराजांची नोकरी इमानाने व दक्षतेने करावयास त्यानें सांगितलें व महाराजांचे व त्यांचे हातांत हात देऊन त्यांस असें सांगितलें कीं, इतउत्तर तुम्ही ह्यास धनी समजून ह्यांच्या हुकमांत वागा! ह्यांचें कोणत्याही प्रकारे उणे पडूं देऊं नका! ह्याप्रमाणें सर्व निरवानिरव करून मग स्वतःच्या मुलांमाणसांचें आपल्या पश्चात चालविण्याविषयीं महाराजांस त्यानें सांगितलें व शेवटी अशी इच्छा प्रगट केली म्हणतात कीं, तुम्ही स्वराज्यस्थापना करून गोब्राह्मण व स्वधर्म यांचें रक्षण करण्याचा सत्संकल्प केला आहे. त्यास ईश्वरकृपेने यश येऊन तुम्ही जगांत लौकिक व धन्यता मिळवाल अशी मला पूर्ण उमेद आहे. असें बोलून त्या अत्यंत प्रामाणिक पुरुषाने प्राण सोडिला. मरणसमयी त्याचें वय सत्तर वर्षांचे होतें.

येथवर जें निरूपण केलें आहे त्यावरून जिजाबाई व दादाजी कोंडदेव यांजपासून महाराजांस कोणत्या प्रकारचे शिक्षण प्राप्त झालें होतें हें वाचकांच्या लक्षांत येण्याजोगे आहे. आता महाराजांस मिळालेल्या आणखी एक प्रकारच्या शिक्षणाचा येथें उल्लेख करून हें प्रकरण आटपू. हें शिक्षण त्यांस विजापुरास पितृसमागमें प्राप्त झालें. शहाजीराजांचे विजापूरदरबारांत मनस्वी वजन असून बहुतेक मराठे व मुसलमान सरदारांशी त्यांचें दळणवळण असे. त्यामुळें दरबारचे रीतीरिवाज, अमीरउमरावांच्या चालीरीती, राज्यकारभाराची पद्धत, निरनिराळ्या सरकारी खात्यांची व्यवस्था इत्यादी गोष्टींचे ज्ञान महाराजांनी मोठ्या उत्साहाने व आस्थेने संपादन केलें. ह्या गोष्टींसंबंधानें जवळच्या लोकांस शेंकडो प्रश्न करून त्यास जी कांहीं माहिती असेल ती मिळविण्याचा क्रम त्यांचा नेहमी चालू असे. विजापुरास असतां त्यानी आपला काळ यत्किंचित्ही व्यर्थ दवडला नाहीं. केवळ चैनीखातर मोठ्या डौलाने इकडूनतिकडे मिरवण्यात जसा इतर सरदारांच्या मुलांचा वेळ जात असे तसा यांचा कधींही गेला नाहीं. लष्कराची व्यवस्था, पागेचा बंदोबस्त, दारूगोळ्याची व बंदुकातोफांची तरतूद कोणत्या प्रकारे ठेवितात हें ते पुनःपुनः जाऊन पाहत असत व मोठमोठ्या अनुभविक पुरुषांस त्यासबंधानें नाना प्रश्न विचारून आपल्या दिलदप्तरांत ही सर्व माहिती बेचूक नमूद करून ठेवीत असत. आपला पुत्र असा चौकस व हुशार असून त्यास चांगल्या गोष्टींचा नाद आहे हें पाहून शहाजीराजांस फार समाधान वाटे व

महाराजांचे ह्या संबंधाचे कोड पुरविण्यास ते बिलकुल कसर करीत नसत. दरबारच्या मुत्सद्यांशी कांही मसलती चालल्या म्हणजे राजे महाराजांस जवळ घेऊन बसत. दरबारी जाणें झालें म्हणजे ते त्यांस बरोबर घेऊन जात. ह्याप्रमाणें त्यांस पुष्कळ गोष्टी ऐकावयास व पाहावयास मिळत आणि त्यांची धारणाशक्ती व आकलनशक्ती अप्रतिम असल्यामुळें त्यांचा ह्या गोष्टींनी पुढें पुष्कळ फायदा झाला. पितृसमागमाने त्यांस हे अत्यंत उपयुक्त ज्ञान प्राप्त होऊन आणखी यवनद्वेषही त्यांच्या चित्तांत पूर्णपणे विकसित झाला. या विषयींचे निरूपण मागील भागांत केलेंच आहे.

येथपर्यंत महाराजांच्या शिक्षणाचा प्रकार सांगितला. तो बहुतेक व्यावहारिक व नैतिक शिक्षणाचाच केवळ होय. याशिवाय आणखी त्यांच्याकडून कांहीं ग्रंथाचे अध्ययन करविले होतें किंवा कसें या विषयीं विश्वसनीय अशी माहिती बखरींतून आढळत नाहीं. शिवदिग्विजयांत महाराजांच्या शिक्षणप्रकाराचें वर्णन केलें आहे तें अत्युक्तिरूप असून त्यास इतरत्र आधार नाहीं. वामन, तुकाराम, रामदास वगैरे साधूंनी महाराजांच्या स्तुतिपर उद्गार काढले आहेत. त्यांवरून असें अनुमान होतें कीं, त्यांचें अध्ययन बरेंच झालें असावें. परंतु महाराजांचे चरित्र लिहून ठेवणारांस ह्या प्रकारचे शिक्षण विशेष महत्त्वाचें वाटलें नाहीं हे निर्विवाद आहे. ग्रंथप्राप्त ज्ञानाहून व्यवहारज्ञानाचे तेज कधीकधी प्रखर असतें हें महाराजांच्या उज्ज्वल चरित्रावरून जगाच्या प्रत्ययास आलें आणि त्यांच्या ठायींच्या ह्या तेजाने दिपून जाऊन इतर बाबतींसंबंधानें इतिहासलेखक अंमळ मुग्ध राहिले यांत कांहीं नवल नाही.

***

भाग पाच

स्वराज्यस्थापनेची सिद्धता
(१६४३–४६)

महाराजांनी विजापुराहून परत आल्यावर असा सत्संकल्प केला कीं, यवनाची महाक्लेशप्रद ताबेदारी झुगारून देऊन स्वतंत्र राज्यस्थापना करावयाची, स्वधर्मीयांची यवनांच्या सत्तेतून मुक्तता करावयाची व स्वधर्मविडंबन करणाऱ्या यवनांस स्वदेशांतून हाकून द्यावयाचें. ह्या कृतसंकल्पास अनुसरून त्यानी आरंभी काय काय केलें त्याचें वर्णन उपलब्ध बखरींत म्हणण्यासारखे नाहीं. जें अल्पस्वल्प कोठे कोठे आढळतें त्याचें साधेल तेवढे सुसंगत निरूपण येथें करितो.

पुण्यास परत आल्यावर आपली सगळी जाहगिरी प्रत्यक्ष जाऊन पाहण्याच्या मिषाने आसपासच्या पाहाडी मुलखांत महाराज एकसारखे फिरू लागले. जवळच्या माहितगार लोकांस बरोबर घेऊन व निरनिराळ्या गांवी नवे स्नेही करून त्यांच्या साहाय्याने जवळपासच्या बहुतेक स्थलांचे व किल्ल्यांचे निरीक्षण त्यांनी मोठ्या उत्साहाने केलें. प्रत्येक किल्ल्याच्या चोरवाटा, दऱ्याखोऱ्यातील बिकट रस्ते त्यांनी एकूण एक स्वत: हिंडून पाहिले. त्यांस ह्या माहितीची एवढी उत्कंठा पाहून बरोबरच्या लोकांस मोठे कौतुक वाटे आणि ऊन किंवा पाऊस, बिकट चढाव किंवा हिंसक श्वापदे यांची भीती किंवा परवा मुळींच न करिता अशा अल्पवयी राजबिंड्या पुरुषाने साधारण कष्टाळू रांगड्या माणसाप्रमाणे रानावनातून अविश्रांतपणें भ्रमण करावे हें त्यांस अंमळ चमत्कारिक वाटणे साहजिक होतें. परंतु पुढे जो हुतुतू आमरण घालावयाचा होता त्याला ही तयारी अत्यावश्यक होती हें त्या बापड्यांच्या लक्षांत कोठून यावयाला? ह्याप्रमाणें ज्या प्रांतांत आपल्या चळवळीस आरंभ करावयाचा त्याची पाहणी यथास्थित करीत असतां ती बरोबरच त्यांनी दुसरीही एक तयारी अव्याहतपणे चालविली होती. ती कोणती म्हणाल तर मनुष्यांची अनुकूलता.

जो जो मनुष्य भेटे त्याशी स्नेह करून त्यास आपलासा करून घेण्याच्या कलेत महाराजांचा हातखंडा होता. कोणी कसाही असला तरी त्याच्याशी त्यांनी थोडा वेळ भाषण केले की, तो त्यांस अगदी भाळून जात असे. ही अप्रतिम कला त्यांस अगदी अल्प वयांत साध्य झाल्यामुळेंच मुख्यतः त्यांस अंगीकृत कार्यांत असें उज्ज्वल यश आलें. त्यांनी पदरच्या प्रत्येक मनुष्याशी मोठ्या प्रेमाने व रहसाळीनें बोलावे. आपण हलके व हे श्रेष्ठ असा भास त्यांच्या मनास बिलकूल होऊं नये अशी सावधगिरी महाराज त्यांच्याशी वागण्यांत सर्वदा घेत असत. त्यांस कांही संकट किंवा अडचण असल्यास ती मोठ्या स्नेहभावाने ऐकून घेऊन त्यांस आपल्याकडून होण्यासारखे असेल तेवढे साहाय्य करण्यास ते सर्वदा तयार असत. पदरच्या माणसास पैशाअडक्याची प्रसंगी मदत करण्यास ते मागेंपुढें पाहत नसत.

महाराजांच्या ह्या अशा औदार्यामुळे पैशाचा फार खर्च होऊं लागला. तेव्हां दादाजीने एके दिवशी अशी तक्रार केला कीं, ‘आपण धनीच आहां. आपण कोणास कांही द्या म्हटलें तर आम्हाला देणे प्राप्त. परंतु आपणांस जी नेमणूक करून दिली आहे तिच्या बाहेर खर्च होऊन आपल्या वडिलांच्या खर्चास जाणारी रक्कम कमी झाली असतां तिकडून आम्हांस नाहक दोष येईल. यासाठीं आपणांस जास्त खर्च करण्याची परवानगी आणून द्यावी, म्हणजे मग आमचे म्हणणें नाहीं.’ यावर महाराजांनी असें उत्तर केलें कीं, तुम्हाला त्याची पंचाईत कशाला? जो अधिक खर्च होईल त्याची

मंजुरी आम्ही वडिलांकडून आणवू!' हें ऐकून दादाजी कुंठित झाला. त्या बापड्याला महाराजांचे पुढील धोरण काय ठाऊक? पदरच्या मनुष्यांचे निःसीम प्रेम संपादून त्यांच्या हातून पुढें महत्कार्यसिद्धी करवावयाची हा विचार त्याला कोठून असणार? आपल्या धन्याच्या उत्पन्नाची जोगवण कसोशीने करून साधेल तेवढा मोठा ऐवज त्याच्याकडे वेळच्यावेळीं प्रामाणिकपणानें पावता करणें एवढीच आपली इतिकर्तव्यता असें त्यास वाटे, यांत कांही वावगें नव्हतें.

महाराज पदरच्या माणसांला राजी ठेवून त्यांशी ममतेने वागूं लागले. त्यामुळें ज्याला त्याला वाटू लागलें कीं, हा धनी परम दयाळू व उदार आहे. हा आपलें हित पाहणारा आहे; यार्शी इमानाने वागून याच्या आज्ञेत सर्वदा राहिलो तर आपले कल्याण होईल. असा महाराजांनी सर्वांस वेध लाविला. पदरच्या माणसांपैकी मावळे लोकांवर महाराजांची मेहरबानी फारच असे. ते अडाणी व बावळटसे दिसत. पण ते मोठे प्रामाणिक व इमानी असून सांगितले काम हुशारी व अनन्यभावानें करीत. कोणतेही अत्यंत विश्वासाचे काम त्यांच्यावर सोपविले असतां त्या संबंधाने त्यांच्याकडून दगा असा बिलकूल होत नसे. ते अगदी गरीब स्थितीतले असल्यामुळें त्यांस कोणी नोकरीस ठेवून अन्नवस्त्राची सोय केल्यास त्याचे ते मोठे उपकारी होत व आपल्या अन्नदात्यासाठी प्राणही द्यावयास तयार होत. प्रथमतः दादाजी कोंडदेवाने त्यांच्या अंगचे हे गुण पारखून त्यांस आपल्याकडे नोकरीस ठेविले. हे त्यांचे गुण महाराजांच्या लक्षांत यावयास विलंब लागला नाहीं. त्यांनी ह्या लोकांस ममतेने व उदारपणे अगदीं आपलेसे करून सोडले. ह्या लोकांचा महाराजांस पुढें किती उपयोग झाला, हा इतिहासप्रसिद्ध आहे. महाराजांच्या जाहगिरीच्या आसपासच्या पाहाडी मुलखांतले ते रहिवासी असून स्वचरितार्थासाठीं त्या अटव्य रानांतच त्यांचे नेहमी हिंडणेफिरणें असल्या कारणानें तिकडील सगळे रस्ते, चोरवाटा व पाऊलवाटा त्यांच्या नेहमी पायांखालच्या असत. वर सांगितल्याप्रमाणें महाराज गावोगाव हिंडू लागले तेव्हां ह्या मावळ्यांस ते बरोबर घेऊन जात आणि तेही आपल्या तरुण व प्रेमळ धन्याच्या उपयोगी हरप्रकारे पडून त्यास खूश राखण्यास अगदीं मनापासून झटत. केलेल्या कामगिरीबद्दल थोडेसे इनाम दिलें तरी तेवढ्यानंच संतुष्ट होऊन ते आपल्या धन्याशीं अधिकाधिक इतबारानें वागण्याचा प्रयत्न करीत. महाराजांचा स्वभाव उदार असून ते सर्वांशीच प्रेमभावानें वागत असल्यामुळें हे मावळे त्यांच्या अगदी भजनी लागले. आजपर्यंत लोकांनी आपणांस तुच्छ व हेंद्रे मानिले असतां हा दयाळू धनी आपणांशी प्रेमळपणानें वागतो व गोड बोलतो, हें पाहून ते महाराजांवर अतिशयित प्रीती करूं लागलें. त्यांच्या मनात महाराजांविषयी अत्यंत अभिमान व भक्ती ही उत्पन्न झाली आणि जेथे ह्या धन्याचे चरण तेथें आपलें शिर, त्याच्या इष्ट कार्यसिद्धीसाठी समयीं प्राणही देणे प्राप्त झालें तरी चिंता नाहीं असा त्याच्या मनाचा निर्धार झाला आणि हा त्याचा निर्धार कसाही बिकट प्रसंग आला तरी कधीं यत्किंचितही ढळला नाहीं. ह्या मावळ्यांचे पुढारी कांही देशमुख होते, त्यांशीं महाराजांनी पहिल्यापासून स्नेह संपादून त्यांना आपल्या इष्ट कार्यास अनुकूल करून घेतलें. ह्यांपैकी तीन नावे इतिहासांत प्रसिद्ध आहेत. तीं हीं : एसाजी कंक, तानाजी मालुसरे[१] व बाजी पासलकर[२] हे तिघेही पिढीजाद वतनदार असून मावळातले लोक त्यांस आपले पुढारी समजत. हे तिन्ही पुरुष महाराजांच्या प्रत्येक कारस्थानांत पहिल्यापासून होते व पुढें मोठमोठ्या कामगिऱ्या त्यांनीं अतिशयित इमानाने व मर्दुमकीने कशा पार पाडल्या व स्वामिकार्यी आपल्या प्राणांच्याही आहुती द्यावयास ते कसे प्रवृत्त झाले हें यथास्थली सांगू.

---

१ हा खुद्द मावळातला देशमुख नव्हता. मावळाखालच्या कोंकणपट्टीतला हा देशमुख होता.

२ हा मुसखोऱ्याचा देशमुख. मावळांत त्याचें मनस्वी वजन होतें. देशमुखाचे बखेडे मिटविण्याच्या व त्यांस वश करून घेण्याच्या कामीं दादाजी कोंडदेवास ह्या पासलकराचे पुष्कळ साहाय्य झालें. दादाजीच्या काहीं निकालांवर याची साक्ष आहे. कान्होजी जेधे देशमुख याचा हा जावई होता. संकटांत सापडलेल्या देशमुखांस यांचें नेहमीं चांगले साहाय्य होत असे. शिवाजीमहाराजांस अनुकूल होऊन त्यांच्या स्वराज्यसिद्धीच्या उपक्रमास तो साहाय्य करण्यास प्रवृत्त झाला तेव्हा तो चांगला पोक्त वयाचा होता.

महाराजांनी केलेला संकल्प दादाजीला पसंत वाटला नाहीं, हे मागें सांगितलेंच आहे. तो आपल्या उद्देशास उत्तेजन देत नाहीं हें पाहून त्यांनी त्याच्या हाताखालच्या इतर कारकुनमंडळींकडे आपला बेत बोलून दाखविला व त्यांस आपल्या मसलतीस अनुकूल करून घेतलें. गांवोगांवचे देशमुख कामानिमित्त पुण्यास आले म्हणजे त्यांस एकीकडे बोलावून त्यांजकडे त्यांनी आपली मसलत बोलावी व त्याचा तीसंबंधानें काय अभिप्राय आहे तें समजून घ्यावे, व त्यांच्याशीं अशा युक्तीने व मोहक रीतीनें भाषण करावे की तें त्यांच्या मसलतीस कायावाचामनेंकरून सामील होत. गावोगाव हिंडत असतां प्रत्येक देशमुखाची गाठ घेऊन त्याच्याशी सलोख्याचे भाषण करून व इतबार दाखवून त्याला आपलासा करून घेत. त्याप्रमाणेंच जे मराठे सरदार भेटत त्यांच्याशीही मोठ्या इतल्ल्यानें वागून त्यास वश करून घेण्याचा महाराज प्रयत्न करीत. त्यांचें वय लहान होतें तरी त्यांचें उत्साहजनक व मर्दुमकीचे भाषण ऐकून व योजलेल्या मसलतीची साध्यता कितपत आहे हें नीट लक्षांत घेऊन हे देशमुख व मराठे सरदार त्यांस तत्काळ वश होत व त्यांच्या मसलतींत शिरण्यास उद्युक्त होत. शिवाय त्यांचा आदरशीलपणा, त्याचा वीर्योत्साह, यवनांविषयीं त्यांच्या ठायीं वागत असणारा पराकाष्ठेचा द्वेष, स्वधर्मरक्षणाविषयींचा त्यांचा पूर्ण निर्धार व स्वराज्य स्थापनेने होणाऱ्या अनंत फायद्यांचें मनोवेधक रीतीनें प्रतिपादन करण्याची उत्कट शैली ही पाहून कोणी कसाही कुर्रेबाज, आपढंगी किंवा आपल्यापुरतें पाहणारा असला तरी तो महाराजांना अगदीं भाळून जात असे. दुसरें असें कीं, महाराजांच्या वीर्यशाली वडिलांनी केलेले पराक्रम व संपादिलेला लौकिक हे त्या प्रांतांत सर्वत्र महशूर होते आणि अशा प्रतापी पुरुषाचा पुत्र आपल्या पित्याप्रमाणेंच जवानमर्द निपजून मर्दुमकी करून आपणांस यवनांच्या मगरमिठींतून खास सोडवील असा उत्साहजनक विचार त्यांच्या मनांत उत्पन्न होऊन, महाराज अल्पवयी होते तरी त्यांस सामील होण्यास ते तयार झाले; आणि जे कोणी ह्या त्यांच्या महत्कार्यास साहाय्य झाले नाहींत त्यांस त्यांनी कोणत्या प्रकारे शासन केलें ह्याचा पुढें निर्देश होईल.

ह्याप्रमाणें महाराज आपल्या जाहगिरींतील व आसपासच्या गावातील देशमुखांस व सरदारांस वश करून घेण्याच्या उद्योगास लागले. आतां ह्या अंगीकृत दुर्घट कार्यांत त्याना यश येण्याचा संभव किती वाटला असावा, किंवा हें कार्य पुढलामागला पोंच न पाहता केवळ हूडपणाने व धाडसाने त्यांनी आरंभिलें कीं काय याचा निर्णय येथें अवश्य झाला पाहिजे.

महाराजांच्या ह्या उद्देशास पहिली अत्यंत प्रोत्साहक गोष्ट म्हटली म्हणजे त्यांच्या महापराक्रमी तीर्थरूपांचा येथवरचा चरित्रक्रम होय. निजामशाहीत नोकरीस असता त्यांनी जे पराक्रम केले, ती शाही बुडविण्यास मोगल प्रवृत्त झाले असतां त्यांच्याशी जे युद्धप्रसंग त्यांनी केले व पुढें निजामशाही मोगलांनी पार बुडवून टाकिली असता तिची स्थापना पुनरपि करण्यासाठी जो प्रचंड उद्योग त्यांनी केला त्याचा कित्ता महाराजांपुढे ढळढळीत होता. मोगलासारख्या जबरदस्त शत्रूशी झुंजण्यास देखील शहाजीराजे कचरले नाहींत. व पुढें त्या शत्रूनें त्यांस पराजित केलें तें त्याचें सैन्यबळ प्रचंड पडल्यामुळेंच केवळ होय; त्याप्रमाणेंच पुढें विजापूरसरकाराच्या पदरीं नोकरी धरिल्यावर त्यांच्या साहाय्यानें त्या सरकारास कर्नाटकांतील मोहिमांत यश येऊन त्यांची तिकडे दृढ सत्ता स्थापित झाली, ह्या गोष्टी महाराजांस चांगल्या विदित होत्या. ह्यावरून त्यांची अशी खात्री झाली कीं, आपण आपल्या लोकांचा चांगला जमाव करून त्यांस योग्य प्रकारें तयार केलें तर त्याच्या मदतीनें यवनांची सत्ता महाराष्ट्रातून हळूहळू निर्मूळ करता येईल. ह्याप्रमाणें प्रतापशाली वडिलांनीं घालून दिलेला अत्यंत उत्साहजनक कित्ता वळवून त्यांस साजे असें कांहीतरी कर्तृत्व करण्याचा हुरूप शिवाजीमहाराजांसारख्या सत्पुत्राच्या हृदयांत उत्पन्न झाला यांत कांहीं नवल नाहीं. सत्कृत्यांत 'बापसे बेटा सवाई' असें म्हणवून घेण्याचा सुयोग व सद्बुद्धी फारच थोड्या सत्पुत्रांस प्राप्त होते. निजामशाहीची पुनः स्थापना करून सर्व राज्यसूत्रें आपल्या हातांत वागविण्याची वडिलांची उत्कट आकांक्षा शत्रू अतिप्रबळ असल्यामुळें तृप्त झालीं नाहीं, व शेवटीं निरुपायास्तव यवनांचीच पुनरपि ताबेदारी त्यास पत्करावी लागली, हे चांगलें झालें नाहीं, असें महाराजांस नेहमी वाटत असें व हें ते वारंवार बोलूनही दाखवीत. विजापुरास असता तेथें जी स्थिती महाराजांच्या अवलोकनांत आली तीवरून तर त्याच्या मनांत यवनांच्या ताबेदारीचा पुरा वीट उत्पन्न झाला होता. हें मागें सांगितलेंच आहे. आपला पडता

काळ असल्यामुळें आपल्या वडिलांसारख्या पुरुषसिंहास ही हीन स्थिती पत्करून राहावें लागलें आहे, यास्तव ह्या अनिष्ट स्थितींतून साधेल त्या उपायानें सुटण्याचा उद्योग करावयाचा असा स्तुत्य निश्चय महाराजांनी अल्पवयातच केला. ह्यावरून त्यांच्या ठायीं तेजस्विता, स्वाभिमान व स्वातंत्र्यप्रीती ह्या वृत्ती लहानवयातच किती विकास पावल्या होत्या हें व्यक्त होतें.

आणखी असें कीं, पुणें, सुपें, मावळ वगैरे प्रांतांतले कित्येक देशमुख यवनी अमलास त्रासून त्या राज्यक्रांतीच्या समयीं पुंडावा करूं लागले होते, व त्यांचे आपआपसांतही सदा कलह चालू असत. तेव्हां अशा नाराज देशमुखांस एकीचें महत्त्व किती आहे तें समजून समजून स्वतंत्रता प्राप्त करून घेण्याचा योग्य उपाय सुचविला तर तो त्यास किती रुचण्याजोगा होता हें सांगावयास नकोच. हें काम महाराजांनी मोठ्या युक्तिप्रयुक्तीनें करून त्यांच्या आपआपसांतल्या कुरबुरी मिटवून टाकल्या व आपल्या इष्ट कार्यास त्यांस अनुकूल करून घेतलें.

महाराजांच्या इष्ट उद्देशाच्या सिद्धीस अनुकूल अशी आणखी एक गोष्ट ही होती कीं, पुणें, सुपें, मावळ वगैरे निजामशाही प्रांत विजापूरसरकाराच्या ताब्यांत नुकतेच आले असून त्या प्रांताची व्यवस्था त्या सरकारानें अद्यापि चांगलीशी लाविली नव्हती व आसपासच्या किल्ल्यांवर फौजफांटा वगैरे ठेवावा तसा ठेविला नव्हता शिवाय त्या सरकाराच्या दरबारांतील मुत्सद्दीमंडळींत बखेडे माजल्यामुळें तर हा बंदोबस्त पुष्कळच ढिला होता. त्यांत आणखी शहाजीराजांला इकडील प्रांतांत जाहगीर दिली असल्यामुळें ह्या प्राताचा बंदोबस्त आपोआप राहील असें विजापूरसरकारास वाटणे साहजिक होतें; मालोजीराजे व शहाजीराजे यांच्या ताब्यांत इकडील प्रांत पुष्कळ वर्षे असून दादाजी कोंडदेवासारखा उत्तम कारभारी ह्या वेळी त्यांस लाभल्यामुळें त्या प्रांतांची व्यवस्था अशी चांगली राहिली होती कीं तेथील प्रजाजन आबाद होऊन हिंदूंच्या राज्यांत आपण सुखी होऊ असें त्यांस वाटूं लागलें होतें व शहाजीराजासारख्या फौज बाळगून असणाऱ्या महापराक्रमी पुरुषाच्या तेजस्वी पुत्राच्या मनांत स्वराज्य स्थापनेची स्फूर्ती उत्पन्न होऊन तत्सिद्धर्थ उपाय योजनेतही तो परम कुशल आहे अशी त्यांची खात्री होऊन त्यास तनमनधनें करून साहाय्य करण्यास ते उद्युक्त झाले यांत नवल तें कोणते? मनुष्यांची ही अनुकूलता पाहून महाराजांस अधिकाधिक हुरूप येणे साहजिक होतें.

आतां हा स्वराज्यस्थापनेचा सदुद्देश सिद्ध झाला असता राज्य चालविण्यास लागणारी योग्यता व बुद्धिमत्ता महाराजांच्या अंगी किती होती हे पुढें सर्व जगाच्या प्रत्ययास आलेंच आहे. हें राजकीय शिक्षण महाराजांस घरचेच होतें. त्यांच्या घरीं नेहमी ह्याच गोष्टी जिजाबाई, दादाजी कोंडदेव व इतर कारभारी बोलत. त्यांच्या जाहगिरीची व्यवस्था ठेवण्याच्या कामी जो व्यवहार नित्य चालत असे तो महाराजांच्या सदोदित डोळ्यांसमोर होत असे. जमीन महसूल, शिबंदी, न्यायमनसोबा इत्यादी गोष्टींत महाराज लहानपणापासूनच मन घालू लागले होते हें मागे सांगितलेंच आहे. ह्या मिळालेल्या अल्पस्वल्प अनुभवांत आणखी विजापुरीं प्राप्त झालेल्या अनुभवाची भर पडली होती. हा दुसरा अनुभव त्यांस थोडाच वेळ मिळाला हें खरें. परंतु तेवढा महाराजांसारख्या तैलबुद्धीच्या तेजस्वी व उत्साही पुरुषास पुरण्याजोगा होता. विजापूरसरकाराची त्यावेळीं पूर्ण भरभराट असून हरएक राजकीय प्रकरण त्या काळच्या मानाने पूर्णावस्थेस आल्यासारखे होतें. अशा दरबारांत शहाजीराजांचे पूर्ण वजन असल्यामुळें दरबारातील प्रत्येक घडामोड महाराजांस समजण्यास मुळींच अडचण पडली नाही हें मागें सांगितलेंच आहे.

हें स्वराज्यसाधनसाहित्य महाराजांसारख्या अलौकिक पुरुषास आरंभी अनुकूल झाले तेवढे बस झाले आणि जिजाबाई मातुश्रीनें त्यांच्या सुपीक मनोभूमींत लावले स्वराज्यसाधनप्रीतीचें सद्बीज उत्तम प्रकारे अंकुरित होऊन त्या माउलीच्याच हातीं त्याचें यथास्थित सिंचन वारवार झालें व त्यास अनुकूल परिस्थितीचें व उत्साह, आवेश, स्वोत्कर्षप्रीती, यवनद्वेष, पित्याचे प्रोत्साहक चरित्र इत्यादी गोष्टींचे उत्कृष्ट खत मिळून त्या अंकुराचा सुंदर वृक्ष बनला आणि त्याचा शाखाविस्तार समग्र जगास चकित करून टाकणारा असा झाला. ह्या स्वराज्यरूप विशाल वृक्षाच्या मधुरतम फलांचा आस्वाद कांही काळ महाराष्ट्रीयांस घडून ते सुखी, संपन्न व कीर्तिमान झाले.

***

भाग सहावा

स्वराज्यस्थापनेला आरंभ
(१६४६–४७)

मागल्या भागांत सांगितल्याप्रमाणें महाराज पुण्यास आपल्या जहागिरीत येऊन राहिल्यावर एकाद्या संपन्न सरदाराच्या मुलाप्रमाणें ऐषआरामात मग्न होऊन न राहता माहीतगार लोकांस बरोबर घेऊन आपल्या जहागिरींतील व आसपासच्या प्रांतांतील एकूणएक महत्त्वाच्या जागा व किल्ले त्यांनी बारकाईने पाहिले, यवनांचा बंदोबस्त प्रत्येक किल्ल्यावर कितपत आहे त्याची माहिती मिळविली, सगळ्या चोरवाटा व हमरस्ते पाहिले, बहुतेक देशमुखांशी ओळखी व मसलती केल्या, कोणते लोक आपल्या उपयोगी पडतील व कोणते आपणांस हरकत करतील तें पाहून ठेविले, त्याप्रमाणेंच कोणत्या रीतीनें आपल्या इष्ट कार्यास आरंभ करावा, व तो केव्हांपासून केला असतां विशेष यशस्वी होईल याचा नीट विचार केला. जवळच्या लोकांबरोबर यासंबंधानें वारंवार खलबते केली आणि मग आपला कार्यक्रम ठरविला.

आतां हा स्वराज्यस्थापनेचा आरंभ महाराजांनी आपण होऊन केला नसून शहाजीराजांच्या सांगण्यावरून दादाजी कोंडदेव व त्याच्या बरोबर असलेले दुसरे कारकून यांनी महाराज केवळ अकरा बारा वर्षांचे असताच तो केला, असें एका इतिहाससंशोधकाचें[१] म्हणणें आहे; आणि ह्या आपल्या विधानास तो सभासदाच्या पुढील वचनाचा आधार घेतो. 'बेंगरूळाहून पुण्यास येतांच बारा मावळे काबीज केलीं. मावळे देशमुख बांधून दस्त करून पुंड होते त्यास मारिले.' परंतु ह्या एका वचनावरून स्वराज्यस्थापनेचा गुरुमंत्र शहाजीमहाराजांनींच आरंभी दिला असून हें कार्य दादाजी कोंडदेवाच्या सल्ल्याने साधावयाचे त्यांच्या मनात होतें असें म्हणणें सर्वथा युक्त नव्हे. सभासदाच्या ह्या वाक्याचा संदर्भ वास्तविक पाहता असा आहे कीं, शहाजीराजांनी कर्नाटकाच्या मोहिमेत उत्तम कामगिरी बजाविल्याबद्दल बारा मावळे, बारामती व इंदापूर ही त्यांस सरंजामासाठी दिली होतीं. हे नवीन मिळालेले प्रांत आपल्या ताब्यांत घेण्याविषयी दादाजी कोंडदेवास राजांनी सांगितल्यावरून त्यानें स. १६३८ त बेंगरुळाहून परत आल्यावर, सभासद म्हणतो त्याप्रमाणें, मावळे काबीज करून मावळे देशमुखांस अंकित केलें. शहाजीराजांचा ह्या वेळीं नुकता कोठे विजापूरकरांच्या दरबारी प्रवेश होऊन त्यांस स्थाईकपणा येऊ लागला होता. अशा समयी पुनः लागलीच बंड करण्याचा अविचार आरंभिल्याचा निराधार आरोप त्यांच्यावर करणें केवळ हास्यास्पद होय. शहाजीराजांस मावळांत राज्य स्थापण्याचा प्रयत्न दादाजी कोंडदेवाच्या मसलतीने करण्याची इच्छा का झाली याचे कारण सदरील इतिहाससंशोधक असें देतो कीं, 'कर्नाटकांत अफजलखान, मालोजी घोरपडे वगैरे विजापूरचे सरदार द्वेषाने शहाजीचे पाऊल स्थिर करूं देत ना.' हें कारण तर स. १६३८ त मुळींच संभवत नाहीं. अफजलखान वगैरे सरदार राजांचा द्वेष पुढें आठदहा वर्षांनी करू लागले. सदरील सालीं कर्नाटकाच्या इतिहासांत ह्या प्रतिस्पर्ध्यांच्या नावाचाही उल्लेख नाहीं. ह्या अप्रयोजक अनुमानास 'मूले कुठारः' या न्यायाने असा अपवाद आहे कीं, दादाजीने जर शहाजीराजांस मावळांत स्वराज्यस्थापनेची सल्ला दिली होती तर पुढें सातआठ वर्षांनी महाराजांनी त्या कामास सुरुवात केली तेव्हां त्यानें एवढे आकांडतांडव कां केले बरें?

१ रा. राजवाडेकृत खंड ४, पृष्ठ ७३.

व शिवाजीमहाराज त्याचा नेभळा बुद्धिवाद बिलकूल ऐकतनात तेव्हा झुरणीस लागून किंवा कित्येकांच्या मते विषप्राशन करून त्यानें स्वप्राणनाश कां केला? शहाजीराजांच्या मनात स्वराज्यस्थापनेचा विचार ह्यावेळी आला होता हें खरें मानिलें तर तें काम दादाजी कोंडदेवापाशीं त्या वेळीं असलेल्या हजारबाराशें लोकांच्या साहाय्याने सिद्ध होण्यासारखे आहे असें मानण्याइतकी मूढ बुद्धी त्यांची होती काय? बेंगरूळाहून परत येतांना दहावीस हजार लोक दादाजी कोंडदेवाबरोबर दिल्याचा पुरावा प्रकृत अनुमान करणाऱ्यास एखाद्या कोणत्या जुन्या चिटोऱ्यांत सापडला आहे काय?[१] पण एवढे भगीरथ काम एखाद्या दुसऱ्या शेंदाड शिपायास सांगण्यापेक्षा शहाजीराजेच स्वत: आपल्या सैन्यानिशी का नाहीं एकदम चढाई करून आले? कोणीकडूनही पाहता त्याचें हें अनुमान अत्यंत दुष्ट असून महाराजांस यामुळे नसतें लघुत्व येणारें आहे. ह्यावरून कोणी असे मात्र समजू नये कीं, शहाजीराजांच्या मनात स्वतंत्र राज्य स्थापण्याचा विचार कधींच आला नाहीं. या प्रकरणी मागें थोडासा उल्लेख झालाच[२] आहे. वाद मिळून इतकाच आहे कीं, शिवाजीमहाराजांनी स्वत: स्वराज्य स्थापनेस आरंभ करण्यापूर्वी सातआठ वर्षे शहाजीराजांच्या सांगण्यावरून महाराष्ट्रात स्वतंत्र राज्य स्थापण्याचा उद्योग सुरू झाला होता कीं काय? तो सुरू झाला होता हें खरें म्हणावे तर तो नंतर लागलीच बंद कां पडला? व दादाजी कोंडदेवाची मती पुढें कां पालटली? आता हें मात्र खरें आहे कीं, दादाजी कोंडदेवानें शहाजीराजांच्या जहागिरीची सुव्यवस्था लावून तीस लहानशा टुमदार स्वराज्याचें स्वरूप आणून देण्याचे काम उत्तम प्रकारे केलें आणि त्यांचा हा सगळा कारभार आमच्या अल्पवयी, कुशाग्रबुद्धि चरित्रनायकाच्या डोळ्यांसमोर झाला असल्याकारणानें हें त्यांस चांगलेच शिक्षण मिळाले. एवढ्यापुरता स्वराज्यस्थापनेस आरंभ झाला असें म्हणण्यास फारशी हरकत नाहीं. तथापि, ही जहागीर अदिलशहाच्या कृपेने मिळाली असून तीवर त्याचा पुरा शह व ताबा होता. ती झुगारून देण्याचे धाडस प्रथम शिवाजीमहाराजांनीच केलें. तें दादाजीने किंवा शहाजीराजांनी केले नाहीं.

आतां येथे कोणी असें म्हणेल कीं, शहाजीराजांच्या मनात महाराष्ट्रात स्वतंत्र राज्य स्थापण्याचा विचार नव्हता तर महाराजांसंबंधाची कागाळी दादाजी कोंडदेवाने त्यांच्याकडे केली असतां व विजापूर सरकाराकडून त्यांस या संबंधाने जरब मिळाली असतां, त्याचा बंदोबस्त करण्याचें किंवा त्यांस आपल्या जहागिरीतून हाकून देण्याचे राजांनी मनांत कां आणिलें नाहीं? ह्या प्रश्नाचें उत्तर सोपे आहे. महाराजांनी विजापूरसरकाराच्या अंमलांतील मुलखात धामधूम

---

१ रा. राजवाडे यांनी शिवकालीन कागदपत्रे पुष्कळ जमा करून त्यांचे पांच भाग प्रसिद्ध केले आहेत. हे बहुतेक कागद निवाड्याचे मेहजर आहेत. मावळातील देशमुख परस्परांशी कलह करीत. ते एकमेकांशीं मारहाण करून अनेक प्रकारे खराबीस येत. ते यवनी अमलाची फारशी परवा करीत नसत. अशा लोकांना आहारी आणून आपल्या धन्याची जहागीर सुरक्षित व सुव्यवस्थित राखण्याचे अतिबिकट काम दादाजी कोंडदेवासारख्या कर्तबगार व इमानी पुरुषाच्या हातून सिद्धीस गेलें. ह्या देशमुखाच्या एकमेकांतल्या कलागतीचे निवाडे दादाजी कोंडदेवानें कसे केले याचा मासला सदरील कागदपत्रात पुष्कळ पाहावयास मिळतो. ह्या कागदपत्रांवरून आणखी शिवाजीमहाराजानीं ह्या देशमुखास वश करून घेण्याच्या कामी कसकशी खटपट केली याचाही थोडासा उल्लेख सापडतो. रा. राजवाड्यानी जमविलेले काही कागद आपल्या पंधराव्या खंडात दिले आहेत, त्यातील तीन कागदांवर प्रतिपच्चंद्रलेखेव वर्धिष्णु विश्ववंदिता! शाहसूनो: शिवस्यैषा मुद्रा भद्राय राजते ह्या वचनाची मुद्रा छापिली आहे. या तिन्ही कागदातला मजकूर पाहिला तर तो चाकण कसब्यांतला कृष्णभट बिन मुरारिभट ब्रह्मे नावाच्या एका इसमाला काहीं जमीन इनाम दिल्याचा आहे. यांतल्या पहिल्या कागदाचा शक १५६१ (आश्विन शु. ८) असा आहे. यावरून हें इनामपत्र स. १६३९ तले असावें असें दिसते. ह्या सनांत शिवाजीमहाराजांचे वय बारातेरा वर्षांचे होतें. तेव्हा अर्थात हें इनामपत्र दादाजी कोंडदेवानें करून दिलें असून ब्राह्मणास दिलेली जमीन शहाजीराजांच्या जहागिरींतली असल्यामुळें त्यांच्या अल्पवयी पुत्राच्या नावाची वर दर्शविलेल्या वचनाची मुद्रा त्या पत्रावर त्यानें केली असावी. ह्या एवढ्या आधारावर रा. सरदेसाई आपल्या 'रियासतींत' (पृ. १६९) असा तर्क करितात की, दादाजीने शहाजीराजांच्या सांगण्यावरून शिवाजीमहाराजांच्या नावाने स्वराज्यस्थापनेस हा असा आरंभ कर्नाटकातून आल्यावर केला होता! असला बादरायणसंबंध जोडून देण्यात कांहींच अर्थ नाहीं. त्या काळचे देशमुख, वतनदार व इतर जमीनदार सरदार आपल्या नांवाच्या अशा मुद्रा आपल्या कागदपत्रांवर करीत असत. सदरील वचनाची मुद्रा शिवाजीमहाराजांनी आपल्या पुढील व्यवहारांत कायम केली हें खरें, पण एवढ्यावरून वादविषयक तर्कास काहीं बळकटी येते असें म्हणवत नाहीं.

२ पृ. ३६–३७ पाहा.

आरंभिली त्या सुमारास कर्नाटकांत शहाजीराजांचे बस्तान नीट बसून त्यांच्या हातीं बराच प्रांत जहागिरीच्या वगैरे रूपाने आला होता व ते तिकडे प्रबळ होऊन त्यांचें प्रस्थ बरेंच वाढलें होतें. शिवाय पुढें विजापूरदरबारांत दुफळी माजून त्या राज्यांत जिकडेतिकडे अव्यवस्था झाली होती. अशा संधीस राजे स्वत: कर्नाटकांत स्वतंत्र राज्य स्थापण्याच्या प्रयत्नांत होते हें मागें सांगितलेंच आहे. तेव्हां अशा समयी स्वपुत्रानें बेताबातानें आरंभिलेली चळवळ यशस्वी होण्याचा संभव आहे असें त्यांस वाटून, त्या कागाळ्यांसंबंधानें कानांवर हात ठेवून ते नांवानिराळे राहिले. स्वराज्य स्थापनेचा विचार त्यांच्या हृदयांत पूर्णपणे वागत होता, व त्यास यवनांची सेवा मनापासून आवडत नव्हती हें निर्विवाद आहे; परंतु सदरील इतिहाससंशोधक म्हणतो त्या वर्षीच त्यांनी ह्या कार्यास आरंभ केला हें म्हणणें मुळींच बरोबर नाहीं. कर्नाटकांत शहाजीराजांनी पुढें थोडीशी चळवळ केली हें खरे; परंतु शिवाजीमहाराजांप्रमाणे त्यानी विजापूरसरकाराशी उघडउघड विरोध केला असें कधींही घडले नाहीं. ते शेवटपर्यंत विजापूरसरकाराचे अंकितच राहिले.[१]

असो; तर ह्याप्रमाणें महाराष्ट्रांत स्वराज्य स्थापनेची कल्पना व आरंभ यांचें सर्व श्रेय केवळ जिजाबाईमातुश्रीस व शिवाजीमहाराजांस दिलें पाहिजे. आतां हा आरंभ महाराजांनी कोणत्या प्रकारे केला याचे सविस्तर निरूपण कोणत्याही बखरींत केले नाहीं. जी त्रोटक माहिती अव्यवस्थितपणें दिली आहे ती साधेल तेवढी जुळवून देण्याचा प्रयत्न केला आहे.

महाराजांनी एकंदर देशस्थितीचें अवलोकन करून व मुसलमान, मोगल व आपले हिंदू लोक यांच्या स्थितीचा पूर्ण विचार करून असें मनांत आणिलें कीं, मोगल व मुसलमान यांच्या ताब्यांत सह्याद्रिबांधारा आहे हें खरें; परंतु त्यावर त्यांचा अंमल व्हावा तितका दृढ झालेला नाहीं व तो आपल्या ताब्यांत कायमचा राहिल्यानें आपला मोठासा फायदा आहे असें त्यांस वाटत नसल्यामुळे तिकडील कोटकिल्ल्यांचा वगैरे बंदोबस्त त्यांनी चांगलासा ठेविला नाहीं; तेव्हां हाच प्रांत पहिल्याने आपल्या कबजात घ्यावा. येथील किल्ले आपल्या ताब्यांत असल्यास सभोवतालील मुलूख सहज जेरदस्तींत येईल. यवनानी कितीही खटपट केली तरी ह्या प्रांतांतील हिंदू प्रजा अनुकूल झाल्यावांचून तो त्याच्या हातीं कायमचा असा कधींही रहाणे नाहीं. यास्तव यवनांस सहसा साध्य न होणारा असा हा मुलूख आपल्या ताबीन झाल्याने येथील बिकट किल्ल्यांच्या आश्रयाने यवनांशी थोड्याशा लोकांच्या साहाय्यानें झुंजता येईल व प्रसंग पडेल त्यावेळी ह्या किल्ल्यांत छपून बसून स्वरक्षण करता येईल; त्याप्रमाणेंच आपल्या जाहगिरींतील व आसपासच्या प्रांतांतील देशमुखांवर जरब ठेवून त्यांस आपले कायमचे अंकित करण्यास हे डोंगरी किल्ले फारच उपयोगी पडतील; असा विचार करून पहिल्याने कांहीं किल्ले हस्तगत करण्याच्या उद्योगास महाराज लागले. त्या वेळा आसपासच्या बहुतेक किल्ल्यांवर विजापूरसरकारानें रखवालदार ठेविले होते. त्यांच्याशी युद्ध करून त्या सरकाराशी उघड विरोध प्रकट करण्याचें सामर्थ्य महाराजांस त्या काळी मुळींच नव्हतें. यास्तव दुसऱ्याच कांहीं तरी युक्तीनं किल्ले हस्तगत

---

१ जेधे याच्या शकावलींत शहाजीराजांस शिवाजीमहाराजांच्या आगळिकीस्तव विजापुरसरकारच्या हुकमावरून कैद करून कनकगिरी येथें स. १६४८ त अटकेत ठेविल्याचें नमूद करून पुढें त्यास व त्याच्याबरोबर कानोजीनाईक जेधे यास स. १६४९ त सोडिल्याचें लिहिले आहे. त्या समयी शहाजीराजानीं कानोजीनायकास असें सांगितले कीं, 'आम्हांस कर्नाटकात बेंगरूळ प्रांताची पाच लक्ष होनाची जहागीर मिळाली आहे. आम्हांस तिकडे जाणें भाग आहे. तुमचे वतन मावळांत आहे. आमचे चिरंजीव राजश्री शिवबा पुणे येथें आहेत. त्यांच्याजवळ तुम्ही आपल्या लोकांनिशीं राहावें. तुमचे त्या प्रांतात प्राबल्य आहे. तरी मावळचे अवघे देशमुख त्यास रुजू होऊन त्यांच्या आज्ञेत वर्ततील असें करा. मोगलाकडील किंवा अदिलशहाकडील फौज आली तरी इमान राखून तिशीं लढाई करा!' हा असा करार त्या नायकाकडून बेलरोटीवर हात ठेववून शपथपूर्वक करविला आणि त्यास पत्र देऊन शिवाजीमहाराजांकडे पाठविलें. ह्या मजकुरावरून रा. बा. गं. टिळक असें अनुमान करितात की, ''दादाजी कोंडदेव व शिवाजीमहाराज यांनी पुणे प्रांतांत रचू घातलेल्या व्यूहास व धोरणास शहाजींची पूर्ण अनुमति होती. कदाचित् शहाजीमहाराजांचीच ही मसलत असावी.'' हें अनुमान १६३८ – ३९ तल्या परिस्थितीशी कसें जुळत नाहीं हें वर सांगितले आहेच. १६४९ नंतर शिवाजीमहाराजांच्या (दादाजी कोंडदेवाच्या नव्हे) व्यूहास शहाजीराजांचीं पूर्ण अनुमति होती असें म्हणण्यास मात्र हरकत नाहीं.

करण्याचा बेत त्यांनी केला. पुण्याच्या नैॠत्येस सुमारें वीस मैलांवर तोरणा नांवाचा किल्ला आहे. त्या किल्ल्यावरील अंमलदाराशीं बोलणे लावण्याकरता महाराजांनी येसाजी कंक, तानाजी मालुसरे व बाजी पासलकर ह्यास पाठविलें. त्या किल्लेदारास त्यांनी असें सांगितलें कीं, हा किल्ला तूर्त आमच्या स्वाधीन करा. तो आम्ही पातशहापासून आपल्याकडे करून घेणार आहो. ह्याप्रमाणें त्याच्याशी सामोपचारानें बोलून व त्यास काहीं लाच वगैरे देऊं करून हा किल्ला स. १६४६ त महाराजांनी आपल्या ताब्यांत घेतला.[१]

ही विजापूरसरकाराची केलेली पहिलीच आगळीक आपणांस पचावी म्हणून महाराजांनी विजापूरदरबारांत लागलीच वकील पाठवून असें कळविले की, 'हा किल्ला आम्हीं घेतला तो सरकारच्या फायद्यासाठींच केवळ होय. ह्या एकीकडच्या मुलखात आमच्यासारखा विश्वासू नोकर असल्यानें पातशहाचें पुष्कळ प्रकारे हित होण्याजोगें आहें. इकडील मुलखातील जमीनमहसूल देशमुख जमवीत असल्यामुळें त्याची आकारणी व्हावी तशी बरोबर झालेली नाहीं व देशमुख खरी आकारणी काय आहे तें कळू देत नाहींत. अशाने त्यांचा फायदा होऊन सरकारचे नाहक नुकसान होतें. तेव्हा आमच्या ताब्यांत मुलूख आल्याने त्याची धारेबंदी यथास्थित होईल.' ह्या म्हणण्याचें प्रत्यंतर यावें म्हणून विजापूरसरकारास गेल्या दहा वर्षांत जो वसूल मिळाला होता त्याहून पुष्कळ अधिक देण्याचे महाराजांनी कबूल केलें. त्यांच्या ह्या अर्जाचा जबाब मिळण्यास बरेंच दिवस लागले. महाराजांना तरी हेंच हवें होतें. त्यांच्या वकिलाने दरबारच्या लोकांस अवदानें चारून अर्जाचा निकाल अनुकूल करून घेतला. इकडे महाराजांनी मावळे लोक जमवून तोरणा किल्ल्याची डागडुजी केली व तो चांगला मजबूत करून त्यास प्रचंडगड असें नाव दिलें. ह्या किल्ल्यांत खणीत असता महाराजांस पुष्कळ द्रव्य सापडले. हा धनलाभ आपणांस भवानीच्या प्रसादाने झाला असून आपल्या सत्कृत्यास तिची पूर्ण अनुकूलता आहे असा प्रवाद भाविक लोकांत त्यांनी पसरविला. यामुळे तर त्यांची महाराजांवर अधिकच निष्ठा बसून ते त्यांस विशेष उत्साहाने साहाय्य करू लागले. ह्या प्राप्त झालेल्या द्रव्याचा विनियोग दारूगोळ्याचा व इतर युद्धोपयोगी सामुग्रीचा मुबलक संग्रह करण्याकडे व एक नवीन किल्ला बांधण्याकडे केला.

तोरणा किल्ल्याच्या आग्नेयेस तीन मैलांवर मुरबाद[२] नावाचा डोंगर चांगला आहे असें पाहून तेथें वस्ती करून किल्ला बाधण्याचें काम महाराजांनी मोठ्या झपाट्याने सुरू केलें. त्या डोंगरास तीन सोंडा किंवा माच्या होत्या, त्यासही तटबंदी केली. मुख्य किल्ल्यास राजगड असे नांव देऊन तेथें एक मोठी इमारत उभारली[३] व तीन माच्यांस सुवेळा, संजीविनी व पद्मावती अशीं नांवे दिलीं. ह्याप्रमाणें हे चार नवेच किल्ले तयार केले. शिरवळानजीक खेडबेर नांवाचा गांव होता तेथें रान फार होतें. ह्या ठिकाणीं फर्माशी आंब्यांची झाडे लावून त्यानजीक पेठ बसविली व तिचे नांव शिवापूर असें ठेविले येथें मावळे व कोंकणे लोक जमवून महाराज राजकारणें करू लागले.

---

१ खाफीखान म्हणतो की, शिवाजीमहाराजांनी प्रथम चंदनवंदन हा किल्ला काबीज केला. रा. राजवाडे म्हणतात की, 'तोरणा व राजगड हे किल्ले ताब्यात घेण्याचे कारण असें होते की, दक्षिणेस रोहीडखोऱ्यांत बांदल देशमुख राहात होते. ते महाराजांस अनुकूल नव्हते. त्यांना कबज्यात आणण्यासाठी हे दोन किल्ले त्यांनीं हस्तगत केले. ह्यायोगें स. १६४६ त महाराष्ट्र राज्याची मुहूर्तमेढ भक्कम रोवली गेली.' हें त्यांचें शेवटले विधान स्वराज्य स्थापनेचा आरंभ दादाजी कोंडदेवानें शहाजीमहाराजांच्या सांगणीवरून केला असें जें त्याचें स्वतःचें व रियासतकाराचे म्हणणें आहे त्यास विरुद्ध आहे. हा किल्ला घेतल्याचा प्रकार कित्येक बखरींत असा सांगितला आहे की, पावसाच्या दिवसांत किल्लेदार आपले लोक घेऊन किल्ल्याखालीं येऊन खोऱ्यात राहत असे. ही संधि साधून महाराज हजारबाराशें लोक घेऊन किल्ल्यावर गेले आणि तो त्यांनी हस्तगत केला. किल्लेदारानें विजापूरसरकारकडे त्यासंबंधाची कागाळी केली. तेव्हा महाराजांनी उलट अशी कागाळी केली की, किल्लेदार आपलें ठाणे सोडून गेल्यामुळें आम्हांला त्याच्या रक्षणार्थ लोक ठेवावे लागले.

२ यास कोणी मुद्रोदेव व कोणी दुरजादेवीचा डोंगर म्हणतात. शेडगावकरांच्या बखरीत याचे मुसलदेव असें नाव दिलें आहे.

३ शिवदिग्विजयांत म्हटलें आहे कीं, हा किल्ला मूळचाच असून तो महाराजांनी राजकारण करून घेतला व त्याला तीन सोंडा होत्या त्या मात्र नव्या बांधिल्या. महाराजांनी हा असा उपक्रम केल्याची वार्ता अदिलशहाच्या अधिकाऱ्यास कळली तेव्हा त्यांनी रोहिडखोऱ्याचा देशपांडे दादाजी नरस (गुप्ते) यास असें जरबेचे पत्र लिहिले की, रोहिडेश्वराच्या डोंगराच्या आश्रयाने शिवाजीमहाराजांनी मावळे वगैरे लोक जमवून पुंडावा मांडला आहे. किल्ल्यावरील ठाणे उठवून तो काबीज केला आहे व त्यास राजगड असें नांव दिलें.

ह्या किल्ल्याचे बांधकाम चालले असतां त्या संबंधाची कागाळी अदिलशहाच्या कानावर गेली. तेव्हा हें काम बंद करण्याविषयी त्यानें महाराजांस हुकूम पाठविला, व कर्नाटकांत शहाजीराजे होते त्यांस खलिता पाठवून याबद्दलचा जाब विचारिला. तेव्हां त्यांनी असा जबाब लिहून पाठविला की, 'ह्या प्रकरणी शिवाजीने मला काहीएक विचारिलें नाहीं व मीही त्यास कांहीं सांगितलें नाहीं. परंतु मी स्वतः व माझें सारे कुटुंब पातशहाचे इमानी नोकर आहो यास्तव शिवाजी कांही करीत असल्यास तें आमच्या जहागिरीच्या सुधारणेसाठी किंवा सुरक्षितपणासाठी करीत असावा. आमच्या जहागिरीच्या लगत्यास आमचा असा चांगलासा किल्ला नाहीं म्हणून हा किल्ला आमचा मुलगा बांधीत असावा. याबद्दल सरकाराने मनांत विकल्प आणू नये. सरकाराविरुद्ध तो काहीएक करीत नसावा.' हा असा जबाब पातशहास पाठवून त्यांनी दादाजीस व महाराजांस या प्रकरणी एक पत्र पाठविलें व त्यांत ह्या गोष्टीबद्दल महाराजांचा निषेध करून असें का केलें म्हणून विचारिलें, व पुढें तसें न करण्याविषयी त्यांस निक्षून सांगितलें. दादाजीने ह्यापूर्वीच राजांना एक पत्र पाठवून सविस्तर वर्तमान कळविले होते, व ह्या संबंधाने शिवाजीमहाराजांसही पुष्कळ प्रकारीं बोध केला होता; पण त्याचा काहीएक उपयोग झाला नाहीं, हें मागें सांगितलेंच आहे.

ह्यानंतर लवकरच दादाजी कोंडदेव मरण पावला व जहागिरीची सगळी व्यवस्था महाराज स्वतः आपल्या वडिलांच्या नांवे पाहू लागले. ह्या सुमारास जहागिरीच्या वसुलाची मागील बाकी मागण्याकरता शहाजीराजांकडून लोक आलें. त्यांस महाराजांनी असा निरोप देऊन रवाना केलें कीं, दादाजीपंत वारले. येथला खर्च वाढला असून इकडील भिकार जमिनीचे उत्पन्न जहागिरीच्या खर्चास पुरत नाहींसे झालें आहे. कर्नाटकांत आपल्या ताब्यांत मोठा मुलूख असून तो सुपीक आहे. यास्तव आपण तिकडील उत्पन्नावरच इतःपर निर्वाह करावा हें बरें.' ह्या जबाबाने शहाजीराजांस मुळींच राग आला नाहीं असें दिसते. उलट आपला मुलगा कर्तृत्ववान निपजून अचाट कृत्ये करून स्वोत्कर्ष साधण्यास उद्युक्त झाला आहे हें पाहून त्यांस मोठे समाधान वाटलें. यानंतर त्यांनी आपल्या जहागिरीची एकंदर व्यवस्था पाहण्याचा कुलअखत्यार महाराजांस मोठ्या आनंदाने दिला व 'तुमची हुशारी व कर्तबगारी ऐकून मी फार खूष झालो आहें,' असा निरोप त्यांनी त्यांस पाठविला. ह्यावेळी विजापूरदरबारांत दुफळी माजली असून फारच घोटाळा झाला होता. यास्तव शहाजीराजांनी असा विचार केला कीं, कर्नाटकांत आपणांस मिळालेल्या जहागिरीचे रक्षण करून स्वस्थ राहावें हें बरें. शिवाय शिवाजीमहाराजांनी चालविलेल्या धामधुमीमुळे आपल्यावर कांहीं किटाळ

आहे, त्यास तू सामील आहेस; उत्पन्न वगैरे पोचते करीत नाहीस; तरीहा प्रकार तू सोडला नाहींस तर तुला विजापुरास नेऊन तुझी गरदन मारण्यात येईल. ही गोष्ट ह्या देशपांड्यानें शिवाजीमहाराजांस कळविली, तेव्हा त्यांनी त्यास लागलीच पत्र लिहिले, त्यातील आशय असा होता की, ''विजापुराहून तुम्हांस हुकूम आला तो समजला. शहाशीं बेमानगिरी तुम्ही व आम्ही, करीत नाही. तुमचे कुलदेव रोहिडेश्वर यानीं आम्हांस हें यश दिलें आहे. पुढें तो 'हिंदवी' स्वराज्य करून सर्व मनोरथ पुरविणार आहे. राजश्री दादाजीपंताच्या विद्यमाने तुमच्या वडिलांचे, तुमचे व आमचे श्रीपाशीं इमान झाले ते कायम आहे, त्यात अंतर पडणार नाही. तुम्ही आमच्याकडे निघून यावें.'' सदरील आशयाची पत्रे रा. राजवाड्यांच्या पंधराव्या खंडांत लेखांक २६७ व २६८ यात प्रसिद्ध झाली आहेत. ही स. १६४५ तली आहेत. तेव्हा अर्थात् ज्याला राजगड हें नाव दिलें तो मूळचाच असून तोरणा किल्ला हस्तगत करण्यापूर्वी त्याच्या माच्या बांधण्याचें काम चालू झालें असावें. आता शिवाजीमहाराजांनी पाठविलेल्या पत्रात दादाजी कोंडदेवाच्या विद्यमाने आणभाक झाल्याचा उल्लेख आहे. त्यावरून रियासतकार म्हणतात की, ह्या उद्योगात दादाजीच आरंभी सूत्रचालक व प्रोत्साहक होता; पण ह्या गोष्टीने त्याच्या ह्या म्हणण्यास मुळींच बळकटी येत नाही. मावळातील काहीं देशमुख व देशपांडे शहाजीराजांच्या जाहगिरींत असून कोणासच जुमानीत नसत. त्यास वश करून घेण्याचा हा एक उपाय दादाजीने योजला होता, असें दिसते. शहाजीराजांची जहागीर विजापूरकरांच्या अंमलात असून तिच्या सीमा काहीं स्पष्ट ठरल्या नव्हत्या. तेव्हा अर्थात् आपल्या धन्याच्या काबूत जेवढा प्रांत येईल तेवढा घेण्याचा हा दादाजीचा उपक्रम होय. त्यात त्याचें याहून विशेष धोरण नव्हतें; असतें तर सदरील पत्रव्यवहार सतरा-अठरा वर्षांच्या मुलाने आपण होऊन करण्याऐवजी तो दादाजीसारख्या वयोवृद्ध व अनुभववृद्ध कारकुनाकडूनच झाला असता. पण शिवाजीमहाराजांनी दादाजीचा बुद्धिवाद न जुमानता आपल्याच जबाबदारीवर हा उपक्रम केला असल्याकारणानें सदरील पत्रव्यवहार दादाजीच्या विद्यमाने झाला नाही हें उघड होतें. ही गोष्ट आपल्या अनुमानास सर्वस्वी प्रतिकूल आहे हे रियासतकारांच्या लक्षांत कसे आलें नाहीं नकळे.

येण्याचा संभव आहे. तेव्हां आपण चार पावले दूर राहावें म्हणजे त्याचा आपला काहीं संबंध नाहीं असे सांगतां येईल. ह्याप्रमाणें इतउत्तर शहाजीराजे कर्नाटकांत कायमचे जाऊन राहिले.

शहाजीराजांच्या जहागिरीपैकीं सुपेंप्रांताची व्यवस्था बाजी मोहिते याजकडे होती. हा बाजी शहाजीचा मेहुणा म्हणजे तुकाबाईचा बंधू होता. ह्याच्या ताब्यांत सुप्याचे ठाणे असून तीनशे घोड्यांची पागा होती. दादाजी मरण पावल्यावर महाराजांनी त्यास पत्र लिहिले की, 'तुम्ही आपल्याकडील वसुलाचा हिशोब व एकंदर पागा घेऊन पुण्यास यावें.' हें त्यानें मानिले नाहीं. ह्या पत्राचें उत्तर काहीएक न देता पत्र घेऊन जाणारांपाशीं त्याने असे उद्गार काढिले कीं, 'शहाजीराजे समक्ष असता हे मालक कोठून झाले? याला असा हुकूम पाठविण्याचा अधिकार काय? हे अदिलशहाच्या राज्यांत पुंडावा करून किल्ले हस्तगत करीत आहेत याबद्दल झाला शासन व्हावयाचें. पण तें वडिलांच्या जोरावर खपून जात आहे. यामुळे हे शेफारले आहेत. आपली फंदफितुरी हे अशीच पुढें चालवितील तर ह्यांच्या वडिलांची शोभा न राहून यांचाही प्राण धोक्यांत पडेल. याचे यांना कांही वाटतच नाहीं. आपणांस तोलण्यासारख्या गोष्टी कराव्या; असल्या फंदात यांनी पडूं नये.' मामा काय बोलला तें जासुदांनी महाराजांस सविस्तर कळविले. तें ऐकून त्यांस फार राग आला व शिमग्याच्या दिवसांत पोस्त मागण्याच्या बहाण्याने कांही मावळे बरोबर घेऊन ते ह्या मामाच्या भेटीस गेले व त्यांनीं त्यास अचानक पकडून कैद[१] केलें आणि त्याच्या ताब्यांतला प्रांत व पागाहीं हस्तगत केलीं. ह्याशिवाय त्याच्या खजिन्यांत पुष्कळ द्रव्य, जवाहीर, उंची वस्त्रे वगैरे मोलवान वस्तु सापडल्या. हा मोहिते आपल्या वडिलांचा मेहुणा आहे हे लक्षांत आणून महाराजांनी त्याचा मोठा आदर केला व त्यास आपल्यापाशी राहून आपण आरंभिलेल्या कार्यास साहाय्य करावयास सांगितलें; परंतु तो कांही केल्या कबूल होईना. तेव्हां त्यास व त्याच्या पक्षाच्या लोकांस मोठ्या इतमामाने कर्नाटकांत शहाजीराजे बेंगरूळ येथे होते तिकडे पाठवून दिलें.

ह्या एका कृत्याने पदरच्या सर्व माणसांवर व इतर लोकांवरही महाराजांची चांगली जरब बसली. वडिलांचा खुद्द मेहुणा असता त्याची सुद्धा यांनी मर्यादा ठेविली नाहीं, तेव्हां यांच्याशी फारच संभाळून वागले पाहिजे; यांची आज्ञा मोडली किंवा यांच्या विरुद्ध कांही खटपट केली तर पाहिजे त्यास शासन करावयास हे मागेपुढे पाहणार नाहीत, असे विचार त्यांच्या मनात येऊन ते महाराजांस फार वचकूं लागले.

पुण्याच्या पूर्वेस चाकणचा किल्ला आहे. हा किल्ला पुण्यास जाण्यायेण्याच्या मार्गात असल्यामुळें तो आपल्या ताब्यांत असल्यास फारच सोईचे होईल असें महाराजांस वाटलें. ह्या किल्ल्याची हकीगत अशी होती कीं, निजामशाही सरकाराकडून हा पहिल्यानं शहाजीराजांस मिळाला होता. पुढे त्यांस जाधवरावाच्या पाठलागामुळे विजापुराकडे पळून जावे लागलें तेव्हां त्या धामधुमीत मार्तंडदेव व होनापा देशपांडे नांवाच्या पुंडांनी तो बळकाविला होता. नंतर मुरार जगदेवाच्या दिवाणाने ह्या पुंडांस कैद करून हा किल्ला ताब्यांत घेतला, व मुरारराव‌ानें तो राजांच्या स्वाधीन केला. दादाजी कोंडदेवाने राजांच्या जहागिरीची व्यवस्था लावतांना ह्या किल्ल्यावर फिरंगोजी नरसाला यास हवालदार नेमिलें होतें. दादाजी मरण पावल्यावर हा फिरंगोजी ह्या किल्ल्यांत स्वतंत्र होऊन बसला होता. त्याच्याशी युद्ध न करता तो सामोपचारानें वश होतो कीं कसें तें पाहण्यासाठी महाराजांनी त्याच्याकडे आपला वकील पाठवून किल्ला ताबीन करून देण्याविषयी बोलणे लाविलें. हें त्या किल्लेदारास मान्य होऊन त्यानें किल्ला स्वाधीन करून दिला व महाराजांच्या भेटीस येऊन त्यांची ताबेदारी पतकरून नोकरी करण्यास तो कबूल झाला. हें त्याचें गरिबीचे वर्तन पाहून महाराज खूष झाले व त्या किल्ल्यावर त्यालाच पुनः हवालदार नेमून आसपासच्या खेड्यांचा वसूल जमा करण्याचें काम त्यांनी त्याला सांगितले. ह्या किल्ल्यावर बिलालपाग्या म्हणून एक जुना कामदार होता. त्याला महाराजांपाशीं राहणे प्रशस्त न

---

१ कित्येक बखरींत असें आहे की, महाराज काही मावळे घेऊन मोहित्याला नकळत त्याच्या ताब्यातील प्रांतात शिरले व मध्यरात्रीस सुप्याच्या ठाण्यावर छापा घालून त्यांनी ते सर केलें व मोहित्यास व त्याच्या पक्षाच्या लोकांस बंदिवान केलें. महाराजांनी तीनशें निवडक लोकांनिशी त्याच्या किल्ल्यावर जाऊन तो निजला असता त्याला गाठून कैद केलें असें एकदोन बखरींत आहे.

वाटल्यावरून त्यास शहाजीराजांकडे जाऊं दिलें. बाकीचे पूर्वीचे जुने कामगार होते ते महाराजांच्या नोकरीस राहण्यास तयार झाल्यावरून त्यास त्याच्या कामावर कायम केलें. चाकण किल्ला पुरा ताब्यांत आल्यावर बारामती व इंदापूर येथले ठाणेदार महाराजांस वश होऊन त्यांचा अंमल मानू लागले.

फिरंगोजी नरसाल्यानें महाराजांच्या आज्ञेवरून पुढें शिवनेरी किल्ला हस्तगत केला. ह्या किल्ल्याचीही देखरेख महाराजांनी त्यालाच सांगितली व ह्या दोन्ही किल्ल्यांच्या आसपास असलेल्या गांवांत दादाजी कोंडदेवानें चालू केलेली जमाबंदीची पद्धत अमलांत आणण्याची कामगिरी त्याजकडे सोंपविलीं.

ह्यानंतर महाराजांचे लक्ष पुण्याजवळील कोंडाणा नांवाच्या किल्ल्यावर गेलें. पुण्यांत सुरक्षितपणे नांदावयाचें तर हा मजबूत किल्ला आपल्या हाती अवश्य आला पाहिजे असें त्यांस वाटलें. हा किल्ला स्वाधीन झाल्याने महाराजांच्या सगळ्या पुणे प्रांताच्या जहागिरीस बळकटी येणार होती; परंतु हा हस्तगत होतो कसा याची त्यांस मोठी पंचाईत पडली. विजापूरसरकारानें या किल्ल्यावर एक मुसलमान हवालदार नेमिला होता. त्याच्याशी उघडपणे युद्ध करून किल्ला सर करण्याचें सामर्थ्य महाराजांस त्या वेळी आलें नव्हतें व यदाकदाचित् त्याच्याशी युद्ध करण्यास महाराज प्रवृत्त झाले असते तर विजापूरसरकाराशीं उघड वैर केल्यासारखे होऊन आपला नाश होण्यास विलंब लागणार नाहीं हें त्यांस पक्के ठाऊक होतें. यास्तव त्यांनी त्या किल्लेदारास लाच देऊन वश करून घेण्याचा बेत केला आणि हा त्यांचा बेत सहज सिद्धीस गेला. कोंडाणा किल्ला हाती आल्यावर त्याची नीट व्यवस्था करून त्यास सिंहगड असें नांव दिले.

ह्या सुमारास पुरंदरनामक किल्ल्यावर नीलकंठ हैबतराव नामेंकरून एक हुशार ब्राह्मण होता. त्याच्या ताब्यांत हा किल्ला व आसपासचा प्रांत होता. हा त्यास निजामशाही सरकाराकडून इनाम मिळाला होता. पुढें निजामशाही मुलूख मोगलांच्या ताब्यांत गेल्यावर हा नीलकंठराव स्वतंत्र होऊन बसला होता. शहाजीराजे व दादाजी कोंडदेव ह्यांच्याशी हा मित्रभावानें वागत असे. दादाजी मरण पावला त्या सुमारास हा नीलकंठराव मरण पावला. त्याला तीन पुत्र होते. त्यांपैकीं वडील मुलगा निळोपंत[१] हा सगळा कारभार आटपून आपल्या धाकट्या भावांस मोजीनासा झाला. ह्या भावांची नांवे पिलाजी व संक्राजी अशीं होतीं. त्यांचे म्हणणे अर्थात् असे होतें कीं, किल्ल्याची मालकी तिघा भावांच्या हाती सारखी असावी. हा असा त्या तिघा भावांत कलह जुंपून राहिला होता. शिवाजीमहाराज पराक्रमी निपजून आपल्या जहागिरीची वृद्धी करण्याच्या प्रयत्नांत आहेत हें पाहून निळोपंत त्यांच्याशी स्नेहभावाने वागत असे.

आता हा किल्ला आपल्या कबजांत येतो कसा हा विचार महाराजांस उत्पन्न झाला. किल्ल्याच्या मालकांशी उघडउघड वैर करावे तर ते पडले पिढीजाद मित्र. तेव्हां हें करणें लोकोपचारास अंमळ विरुद्ध तर खरेंच. परंतु बारामती, इंदापूर व सुपे ह्या आपल्या तिन्ही परगण्यांचें संरक्षण व बंदोबस्त यथास्थितपणें व्हावयास ह्या किल्ल्याचे साहाय्य अवश्य हवें असें महाराजांस कळून चुकले होतें. वर सांगितल्याप्रमाणें त्या भावांमध्ये कलह लागला आहे असें पाहून महाराज सुपे प्रांतांत जाण्याच्या मिषाने[२] राजगडावरून[३] काही निवडक मावळे बरोबर घेऊन निघाले. ते जवळ आले असें कळल्यावरून धाकट्या भावांनी आपल्या भांडणाचा निवाडा करण्यासाठी महाराजांस पुरंदरास बोलाविले. त्यावरून महाराज त्या किल्ल्याच्या पायथ्याशी नारायणाच्या देवालयांत तळ देऊन राहिले. किल्ल्यावर एकदम चढून गेल्यास निळोपंतास संशय येईल असें त्यांस वाटलें. इकडे त्या धाकट्या भावांसही उघडपणे शिवाजीमहाराजांस जाऊन मिळण्याचे धैर्य होईना. अशा बुचकळ्यांत उभय पक्ष पडले असतां किल्ल्यावरील लोकांनी असा विचार केला कीं, हे

---

१ मि. किंकेड व रा. ब. पासरनीस याचे नाव पिलो असें देतात.

२ फलटणच्या निंबाळकरांवर हल्ला करण्याच्या मिषाने जाऊन ते त्या किल्ल्यापासून सहा मैलांवर सासवड येथें मुक्काम करून राहिले होते असें शिवदिग्विजयांत आहे.

३ रायरीची बखर लिहिणारा म्हणतो की, महाराजांनी आपणांस एक पावसाळा तुमच्या किल्ल्याच्या आश्रयाने राहूं द्यावे असे बोलणे निळोपंतापाशीं केलें; ते त्यांस मान्य झाल्यावरून जिजाबाईस बरोबर घेऊन त्यानी पुरंदर किल्ल्याखाली मुक्काम केला.

तिघे बंधू परस्परांशी भांडत असल्यामुळें परिणामी किल्ला कोणाच्या हातीं लागेल याचा नेम नाहीं. त्यापेक्षा तो शिवाजीमहाराजांच्या हाती गेला तर फार बरे होईल. कारण आसपासच्या मुलखावर त्यांची सत्ता असून ते आणखी मुलूख व किल्ले काबीज करण्याच्या उद्योगांत आहेत. तेव्हां आपण त्यांच्यासारख्या पराक्रमी व थोर पुरुषाच्या पदरी पडावें हें बरें. असें मनांत आणून त्यांनी महाराजांस किल्ल्यावर आणण्याची एक युक्ती योजिली. ती अशी : त्यांनी त्या तिघा भावांस असें सांगितले कीं, शिवाजीमहाराजांचा व तुमचा स्नेहभाव आहेच. ते आज किल्ल्याखालीं मुक्काम करून आहेत. त्यांस जाऊन भेटा व त्यांचा आदरमान करून त्यांस किल्ल्यांवर घेऊन या. त्यांत आणखी हे दिपवाळीचे दिवस आहेत. तेव्हां त्यांस स्नानास आमंत्रण करावे. ते वरती आल्यावर आपल्या गृहकलहाचे कारण त्यांस सांगावे व ते सांगतील तसें वागावे ही त्यांची सूचना त्या तिघाही बंधूस मान्य होऊन ते गडाखाली महाराजांच्या भेटीस गेले व त्यांस त्यांनी वरती स्नानास येण्याविषयी आदरपूर्वक आमंत्रण केलें. तेव्हां महाराज म्हणाले 'मजबरोबर चार मातबर लोक आहेत त्यांस येथें सोडून मीच एकटा वर कसा येऊ?' त्यावर ते म्हणाले कीं, सर्वांस घेऊन वर यावें. मग महाराजांनी आपल्या बरोबरच्या काही लोकांसह वर जाऊन त्यांचा तीन दिवस पाहुणचार घेतला. तेवढ्या अवकाशांत त्या भावाचे भांडण ऐकून घेऊन व त्यांची समजूत घालून कलह मिटविण्याचा प्रयत्न महाराजांनी केला; पण त्यांचा एकोपा कांही केल्या होईना. धाकट्या भावांनी महाराजांपाशी अशी विनंती केली कीं, आमचा वडील बंधू आम्हांस कांही देत नाहीं, यास्तव आपण आम्हांला आपल्या पदरी घ्यावे. तिसरे दिवशी रात्री महाराज तिघा भावांशी बोलत बसले असतां निळोपंत झोप येऊ लागली म्हणून उठून निजावयास गेला. ही संधी पाहून महाराजांनी धाकट्या भावास असा उपाय सुचविला की, तुमचा बंधू सामोपचाराने ऐकत नाहीं. तरी त्यास ताळ्यावर आणण्याचा एक उपाय मला दिसतो. तो असा कीं, तो आता निजला आहे तेथें त्यास कैद करावे. ही युक्ती त्यांस लागलीच कबूल झाली. मग महाराजांनी किल्ल्याखालील आपल्या मावळे लोकांस वर बोलावून व किल्ल्यावरील जे लोक अनुकूल होते त्यांस सामील करून घेऊन त्यांच्या साहाय्याने निळोपंतास निजल्या ठिकाणी कैद केलें, आणि त्या तिघा भावांस किल्ल्याखालीं आणून किल्ला हस्तगत केला.[१] मग त्यांचे इनाम गांव त्यांस यथाविभाग वाटून देऊन त्यांस किल्ल्याच्या खालच्या माचीवर राहण्याची परवानगी दिली.[२] पुढें महाराजांनी त्यांस आपल्या पदरी नोकऱ्या देऊन वाढविले. ह्याप्रमाणें त्यांनी पुरंदर किल्ला रक्तपात होऊ न देता बिनबोभाट काबीज करून आपल्या सुपे, इंदापूर वगैरे परगण्यास बळकटी आणिली.

ह्यानंतर महाराजांच्या आज्ञेवरून माणकोजी दहातोंडे याने विसापूरचा किल्ला हस्तगत केला. तेथें शहाजीराजांच्या हाताखालचा एक सरदार शिद्दी बिलाल हबशी म्हणून होता; त्याच्याकडे त्या किल्ल्याचा हवाला द्यावा असा महाराजांचा मनोदय होता. परंतु त्या संबंधाने त्यास विचारितां त्याचें असें म्हणणें पडलें की, 'महाराज पुंडावा करीत आहेत; त्यांचें आचरण केवळ बेकैद आहे; हा त्यांचा स्वप्राणनाशाचा उद्योग आहे. अशांच्या पदरी मी राहू इच्छीत नाहीं.' हे त्याचें उत्तर ऐकून महाराजांस मुळींच राग आला नाहीं. कारण तो शहाजीराजांच्या पदरचा जुना नोकर होता. त्याची यत्किंचितही बेअदबी होऊ न देता उलट चांगली बिदागी करून त्यास महाराजांनी शहाजीराजांकडे रवाना केलें. ह्यानंतर तिकोना, लोहगड व राजमाची हे पुणेपरगण्याच्या वायव्येकडील किल्ले त्यांनी हस्तगत केले.

---

१ मि. किंकेड म्हणतात कीं, गडावर गेल्यावर दुसरे दिवशीं महाराजांनी त्या तिघा बंधूंस म्हटलें की, आपण सासवडाजवळच्या नदींत स्नानास जाऊ या. तें त्यास पसंत वाटून ते तिकडे प्रातःकाळीं स्नानास गेले आणि तेथून परत येतात तो किल्ला महाराजांच्या लोकांनी हस्तगत करून त्यावर आपलें निशाण लावले आहे असें त्यांस दिसलें.

२ कित्येक बखरींत असा उल्लेख आहे कीं, वडील बंधूकडे पूर्वीचे वंशपरंपरेचे वतन चालविले आणि दुसऱ्या दोघा बंधूंस दुसरीकडे इनामी वतनें करून दिलीं. मि. किंकेड म्हणतात की, यांतल्या वडील बंधूंचे नांव पिलो नीलकंठ असें असून त्याला महाराजांनी त्या किल्ल्याखाली व पुरंदर गावाच्या आसपास मोठी जमीन इनाम करून दिली; मधला शंकररावजी नीलकंठ याला त्यांनी आपला तोफखाना व पिलाखाना यांवर नेमिलें आणि धाकट्यालाही आपल्या पदरी ठेवून घेतलें.

ह्याप्रमाणें शिवाजीमहाराजांनी आपल्या जहागिरीच्या आसपासचे मुख्य मुख्य किल्ले आरंभी स्वाधीन करून घेऊन तिला चांगली बळकटी आणिली. हा वेळपावेतो त्यांनी विजापूरसरकाराशी साक्षात् विरोध असा फारसा प्रकट केला नव्हता. त्या सरकाराचे तोरणा, कोंडाणा वगैरे दोनतीन किल्ले घेतले. ते यत्किंचितही रक्तपात होऊं न देता हाताखाली घातले असून त्यासंबंधानें त्यांस असें निमित्त होतें की, ते आपल्या जहागिरीच्या आसपास असल्यामुळें त्यांची व्यवस्था आपल्या हातून नीट ठेविली जाऊन आपल्या जहागिरीसही त्यापासून सुरक्षितपणा येईल व आसपासचे देशमुख पुंडावा करीत त्याजवर चांगली जरब ठेवितां येऊन सरकारी सारा देण्यासंबंधानें देशमुख टंगळमंगळ करितात त्यांच्याकडून तो जेव्हांचा तेव्हा वसूल करता येईल. आतां चाकण, पुरंदर वगैरे इतर किल्ले घेतले ते पुंडांनी बळकाविले असून ते सरकाराला मुळींच मोजीत नसत. तेव्हा अशा पाळेगारांला अंकित करण्यात आपण विजापूरसरकारचें हितच करीत आहों असें त्याला भासवितां आलें. असो; तर ह्या क्षुल्लक वाटणाऱ्या चळवळीचे विजापूरदरबारास त्या वेळी फारसे काही वाटलें नाहीं हें ठीकच होतें. कारण त्याची समजूत अशी होणें साहजिक होते कीं, शहाजीराजे आपल्याशी इमानाने वागून आपली नोकरी मोठ्या हुशारीने करीत आहेत, तेव्हां त्यांचा हा अल्पवयी मुलगा आपल्या सत्तेविरुद्ध कांही खटपट करीत नसावा. तो जें काही करीत आहे तें आपल्या हिताचेच असावें. दुसरें असें कीं, अदिलशहा स्वत: मोठमोठ्या इमारती बांधण्यात गर्क झाला असून कर्नाटकांत स्वसत्तावृद्धी करण्याकडेच त्याचें लक्ष विशेषतः लागलें होते आणि शहाजीराजांसारख्या शूर व हुशार सरदाराच्या साहाय्याने त्यानें ही सत्ता त्या मुलखात पुष्कळ बसविली असल्यामुळें त्यांच्यावर अदिलशहाची अतिशयित मेहरबानी होती. तेव्हां त्यांच्या ह्या अल्पवयी मुलाची महाराष्ट्रातील चळवळ बंद करून त्याच्या ताब्यातली जहागीर खालसा करण्याचा विचार मनांत आणिल्यास त्यांस दुखविल्यासारखे होईल असेही पातशहास वाटलें असावें.

परंतु महाराजांचा उद्देश व धोरण केवढे होतें हें काही येथें सांगण्याचें प्रयोजन नाहीं. स्वसत्तावृद्धी करून स्वराज्य स्थापना करण्याचा जो बिकट व दीर्घ उद्योग पुढें आमरण करावयाचा होता त्याचा हा खंबीर पाया ते रचीत होते. मजबूत किल्ल्यांचा आश्रय मिळाल्यानें आपल्या ताब्यातील मुलखाचे चांगले रक्षण करता येतें व शत्रूच्या मुलखात अकस्मात चालून जाऊन त्याचा मोड करून पुनः किल्ल्यांत सुरक्षितपणें ठाणे धरून रहाता येतें हें त्यांच्या लक्षांत येऊन हे पहाडी किल्ले बळकावण्याच्या उद्योगास त्यांनी पहिल्याने आरंभ केला.

ह्याप्रमाणें महाराजांनी ह्या वेळीं चाकणकिल्ल्यापासून नीरा नदीपर्यंतचा सगळा प्रांत स्वसत्तेत आणिला. काबीज केलेल्या प्रत्येक किल्ल्याची दागदुजी वगैरे करून त्यावर मावळे लोक रखवालीस ठेविले व त्यांचा साधेल तेवढा उत्तम बंदोबस्त राखिला. त्यामुळें आसपासचे देशमुख जमीनमहसूल बिनतक्रार देऊं लागले. दादाजी कोंडदेवाने चालू केलेली वसुलाची शिस्त सर्वत्र सुरू केली. शेतकरी लोकांस कौल देऊन राजी राखून त्यांच्याकडून वेळच्या वेळीं उत्पन्न येईल असें केलें. रयतेस सुरक्षितपणा वाटून ती जमिनींचे उत्पन्न वाढविण्यास मनापासून झटेल असें करण्याविषयी महाराज नेहमी तत्पर असत. त्यामुळें ती त्यांस फारच चाहू लागली. सर्व हिंदू प्रजेस हा आपला राजा असावा असें वाटूं लागलें. महाराजांचा हा स्वसत्तावृद्धीचा अजब उपाय पाहून पदरच्या लोकांस अतिशयित कौतुक वाटूं लागलें. त्यांची ही युक्तिमत्ता व कुशलता पाहून त्यांच्याविषयी त्या लोकांच्या मनांत पूज्यताबुद्धी उत्पन्न झाली व ते महाराजांच्या अधिकच भजनी लागले. मावळे लोकांना तर महाराज केवळ मायबाप वाटूं लागले. ते त्यांच्या जिवास जीव देण्यास तयार झाले. स्वप्राणांची परवा न करता महाराज सांगतील तें एकनिष्ठेनें करावयाचें असा त्यांनी निर्धार केला.

वर सांगितल्याप्रमाणें जमीनमहसुलाची वगैरे व्यवस्था यथायोग्य लाविल्यावर महाराजांनी आपल्या पदरी साधतील तेवढे लोक ठेवण्याचा क्रम चालविला. त्यांच्या नोकरीस राहण्याची उत्कंठा ज्यास त्यास वाटून पुष्कळ लोक त्यांच्याकडे येऊ लागले. हा धनी आपणांस लाभला तर आपलें मोठेच भाग्य होय असें त्यांस वाटू लागलें. मनुष्याची योग्य पारख करण्याच्या कामांत तर महाराज अतिशयित निष्णात असत. कोणी कसाही मनुष्य आला तरी त्याची पारख

जातीने करून तो कोणत्या कामास लायक आहे हें नीट ठरवून त्यास तें काम महाराज सांगत असत. शूर शिपाई व हुशार कारकून जेवढा सापडेल तेवढा नोकरीस ठेवावयाचा असा त्यांचा क्रम असे. अशा प्रकारे हुशार व इमानी माणसांची जमाजम करून त्यांच्या अंगी चांगली वाकबगारी येऊन पुढील महत्कार्यास ते उपयोगी पडतील अशी खबरदारी घ्यावयास महाराजांनी मुळींच आळस केला नाहीं.

हा असा लोकांचा जमाव करितां करितां मावळे लोक दहा हजारांपर्यंत जमले व शहाजीराजांची पागा जागोजाग होती ती एकत्र करून व तींत नवी भर घालून ती तीन हजारांपर्यंत नेली. शहाजीमहाराजांनी तैनातीस दिलेले व दादाजी कोंडदेवाने आपल्या पसंतीने नोकरीस लाविलेले कांही कारकून होते. ते अद्यापि महाराजांपाशी कायम असून त्यांचें त्यांस हरएक प्रसंगी उत्तम साहाय्य मिळू लागलें. आपल्या तरुण धन्याची स्वराज्यस्थापनेविषयींची अशी स्तुत्य हाव व हिंमत पाहून त्यांच्याही अंगीं स्फुरण चढले ते महाराजांस प्रत्येक प्रकरणी योग्य दिसे ती सल्लामसलत इमानाने देऊं लागलें. त्यांचे वय लहान होते तरी त्यांच्या अंगी अचाट कर्तबगारी व अलौकिक व्यक्तिमत्त्व होतें हें पाहून ते त्यांस अतिशयित मान देऊं लागलें व त्यांच्या केवळ अर्ध्या वचनांत वागू लागलें. महाराजांनीही त्यांच्या अंगचे गुणांचे योग्य चीज करून त्यांस साजतील असे हुद्दे देऊन वाढवले. स्वराज्याचा पाया आपल्या जहागिरीपुरताच तूर्त घालावा व पदरच्या लोकांच्या मनांत ह्या कल्पनेचे बीजारोपण करावे असा विचार करून महाराजांनी ह्या वेळीं शामराज नीलकंठ रांझेकर यास[१] पेशवा केलें, बाळकृष्णपंत दीक्षित यास मुजुमदारी दिली, सोनोपंतास डबिरी सांगितली व रघुनाथ बल्लाळ बोकील यास सबनीस नेमिलें. ह्याशिवाय येसाजी कंक, तानाजी मालसुरे व बाजी पासलकर यांस मावळ्यांच्या लष्करावर सरदार केले व एकंदर सेनेचे नायक स्वत: झाले. सरनोबत हा हुद्दा अजून कोणास दिला नव्हता.[२] ह्या रीतीनें स्वतःच्या जहागिरीच्या बाहेर स्वसत्तेचा विस्तार फारसा झाला नव्हता तरी तेवढ्यापुरता स्वराज्याचा पाया घालून तो कायम राखण्याचा व त्यावर भव्य इमारत उभारण्याचा उद्योग महाराजांनी पुढें कसकसा केला तो आतां यथाक्रम सांगूं.

***

१ यास १६४३ त पेशवाईचा हुद्दा मिळाला असें शि. दि. यात म्हटले आहे, तें राजवाडे खरें समजून चालतात; परंतु हे संभवनीय दिसत नाहीं. ह्याचे नांव चित्रगुप्त संक्राजी असें देतो.

२ सभासद व चित्रगुप्त म्हणतात की, सुपें प्रांताचा देशाधिकारी तुकोजी चोर मराठा सरलष्कर होता, त्याला सरनौबत केलें; परंतु हाच हुद्दा माणकोजी दहातोंडे (दुतोंडे, दातवडा) यास दिल्याचा त्यांत उल्लेख आहे.

भाग सातवा

स्वसत्तावृद्धी
(१६४८–४९)

पूर्वोक्त प्रकारे स्वराज्यस्थापनेस आरंभ करून त्यास आवश्यक अशी थोडीबहुत व्यवस्था लावून महाराज स्वसत्ता वाढविण्याच्या उद्योगास लागले. हा उद्योग त्यांनी आरंभी कसकसा केला तें कथन करण्यापूर्वी त्यांच्या जहागिरीच्या सभोंवतालील मुलखाची व्यवस्था कशी काय होती त्याचें दिग्दर्शन करणें उचित होय.

नीरानदीच्या दक्षिणतीरींचा मुलूख पूर्वेस शिरवळपर्यत व दक्षिणेस कृष्णानदीच्या उत्तरेकडील डोंगरांपर्यंत हिरडस मावळचा कृष्णाजी नाईक बांदल नामक देशमुख याच्या ताब्यांत असून तो त्याचा वसूल जमा करीत असे व रोहिडा किल्ला त्याच्या स्वाधीन होता. ह्या देशमुखाच्या मनांत शिवाजीमहाराजाविषयी पहिल्यापासून अढी असून तो त्यांचा द्वेष करीत असे.[१] त्यानें आपल्या किल्ल्याचा बंदोबस्त उत्तम प्रकारे ठेविला असून त्याच्या रक्षणार्थ लोकही पुष्कळ ठेविले होते. महाराज जवळपासचे किल्ले हस्तगत करूं लागले तेव्हां हा किल्ला त्यांच्या हातीं न जाऊं देण्याविषयी त्याचा पूर्ण निर्धार झाला होता. पुरंदर किल्ल्याच्या आसपासच्या मुलखावरही ह्या बांदलाचा पुरा डोळा होता. पुढें हा किल्ला महाराजांनी हस्तगत केला तेव्हां त्याला आपल्या किल्ल्याविषयी मोठी काळजी लागणे साहजिक होतें

कृष्णानदीपासून वारणा नदीपर्यंतचा घाटमाथा चंद्रराव मोरे याच्या हातीं होता जावळीप्रांतावर याची सत्ता व हशमगड येथें याचे ठाणे होतें. हा तर महाराजांस सामोपचारानें सहसा वश होण्यासारखा नव्हता. ह्याच्या लोकांचा मोठा जमाव असून त्यांच्या बळावर हा कोणासच मोजीत नसे

वाई येथें विजापूरसरकारानें नेमलेला एक मोकासदार होता. पांडवगड, कमळगड वगैरे आसपासचे किल्ले त्याच्या हवाली होते. कोल्हापूरप्रांत एका मुसलमान अधिकाऱ्याच्या व्यवस्थेखाली होता व तेथला पन्हाळा किल्ला त्याच्या ताब्यांत होता.

कल्याणप्रांत पूर्वी निजामशाहीच्या सत्तेखाली होता. तो स. १६३६ त मोगलांशी झालेल्या तहानें विजापूरसरकाराच्या ताब्यांत आला होता. ह्या प्रांताचे दोन भाग करून त्यांवर दोन अधिकारी नेमिले होते. कल्याण–भिवंडी पासून

---

१ हा बांदल पुण्याखालील बारा मावळांत मोठा जोरावर असून तेथले बइते (दाईत) घेत असे. दादाजी कोंडदेवास तो मुळीं जुमानीना तेंव्हा दादाजी शिवापुराहून त्याच्यावर चालून गेला; पण बांदलाने त्याचा पराभव करून त्याच्या लोकांस पिटून काढलें. पुढें कान्होजी नाईक जेधे याने त्याला चार गोष्टी सांगून दादाजींच्या भेटीस आणिलें; परंतु हा देशमुख शिवाजी महाराजांस अनुकूल झाला नाहीं. असाच एका खोपडे आडनावाचा देशमुख होता; तोही महाराजांशी विरोध करीत असे. त्यानीं तोरणा वगैरे किल्ले हस्तगत केले तेंव्हा ह्या दोघां देशमुखांनी विजापूरकरांच्या सरदाराकडे कागाळी केली होती.

नागोठण्यापर्यंतच्या उत्तरेकडील प्रांतावर मुल्ला अहमद[१] नांवाचा एक कुलीन मुसलमान सरदार नेमिला होता. त्याचें मुख्य ठाणे कल्याण-भिवंडी येथें होतें. त्याच्या ताब्यांतला मुलूख मोठा विस्तीर्ण असून घाटावरचे व घांटाखालचे पुष्कळ किल्ले त्याच्या स्वाधीन होते. ह्या किल्ल्यावर चांगलासा बंदोबस्त नव्हता. दक्षिणेकडील भागावर एका हबशी सरदाराची नेमणूक केली असून त्याच्याकडे तो केवळ जहागिरीदाखल होता. ही जहागीर त्याच्या पूर्वजांस निजामशाही सरकाराकडून मिळाली होती. ही जहागीर त्यास अशासाठी दिली होती कीं, त्यानें आरमार ठेवून व्यापाराचे रक्षण करावे आणि मक्केस जाणाऱ्या यात्रेकरूंस तांबड्या समुद्रांत नेऊन पोहोचवावे. ही जहागीर प्रथमतः वंशपरंपरा चालत आलेली नसे. जो कोणी हबशी सरदार आरमारावरील कामगिरी उत्कृष्ट प्रकारे बजावीत असे त्यास ही जहागीर प्राप्त होत असे. अशा रीतीनें निवडलेल्या सरदारास वजीर ही पदवी मिळत असे. ह्या शिद्दीपाशीं खलाशी वगैरे आरमारावरील लोक बहुतेक हबशीच असत. ह्यामुळे अफ्रिकेतील ह्या लोकांची कोंकणांत एक लहानशी वसाहतच झाली होती. ह्या शिद्दीच्या सर्व आरमाराचा जमाव दंडाराजपुरीच्या बंदरांत असे. ह्या बंदरापाशीं एक लहानसे बेट असून त्याला मजबूत तटबंदी केली होती. ह्या बेटास जंजिरा असें नांव आहे. ह्या वेळी हबशांचा मुख्य सरदार फत्तेखान होता. त्याच्या ताब्यांत बरेच किल्ले असत. त्यांमध्यें तळे, घोसाळे व रायरी हे मुख्य होत. हे सगळे किल्ले मराठे सरदारांच्या हवाली केलेले होते.

कोकणपट्टींत विजापूरकरांचा अंमल पुष्कळ काळापासून होता. त्या प्रांतांतले परगणे त्या सरकाराने जहागिरीदाखल दिले असून तेथले देशमुख त्या जहागिऱ्यांचा उपभोग वंशपरंपरा घेत असत व जमिनीचा वसूल तेच आटपीत. दाभोळ, अंजनवेल, रत्नागिरी व राजापूर ह्या बंदरांची व्यवस्था मात्र सरकारी अधिकाऱ्यांकडे असे, व त्या शहरांच्या आसपासच्या प्रांताचा वसूल तेच गोळा करीत. सदरी सांगितलेल्या देशमुखांपैकी अंमळ प्रबळ असे वाडीचे सावंत होते. फिरंग्यांच्या ताब्यांतील गोवे प्रांताच्या लगतचा मजबूत पाहाडी प्रांत ह्या देशमुखांच्या ताब्यांत जहागिरीदाखल असे. ह्या सावंताच्या खालोखाल योग्यतेचे देशमुख म्हटले म्हणजे शृंगारपूरचे सुर्वे होत.[२] त्यांच्या ताब्यांतला प्रांत अंमळ एकीकडचा असल्यामुळे ते जावळीच्या मोऱ्यांप्रमाणें बहुतेक स्वतंत्र होऊन बसले होते.

येणेंप्रमाणें शिवाजीमहाराज स्वसत्तावृद्धी करण्यास सिद्ध झाले तेव्हा त्यांच्या जाहगिरीच्या सभोंवतालील प्रांताची व्यवस्था होती आणि ह्याच प्रांतावर त्याचा रोख पहिल्यानें व्हावा हें स्वाभाविक होते. घाटमाथ्यावरील व त्या खालील प्रांताची माहिती मावळ्यांच्या साहाय्यानें महाराजांनी मिळविली होतीच, व तिकडील काही देशमुखास वश करून घेतलें होतें. त्याप्रमाणेंच कोकणातील देशस्थिती पाहण्यासाठी व तिकडील देशमुखांस व किल्लेदारांस भेटून आपला यवनी अंमल झुगारून देण्याचा संकल्प जाहीर करून ते आपल्या बेतास अनुकूल होतात किंवा कसें हें पाहण्यासाठी आपल्या पदरच्या ब्राह्मण व प्रभू कामदारांस महाराजांनी तिकडे पाठविलें. त्यांनी सर्वत्र हिंडून महाराजांच्या सत्संकल्पास बरेच देशमुख व मराठे सरदार अनुकूल करून घेतले.

महाराजांपाशी ह्या वेळीं मनुष्यसंग्रह पुष्कळ झाला होता व आणखी लोक त्यांच्या नोकरीस राहावयास तयार होते. परंतु इतक्या लोकांस मुशाहिरा कोठून द्यावा ही अडचण त्यांस प्राप्त झाली. ताब्यात आलेल्या मुलखाचे उत्पन्न ह्या एकसारख्या वाढत जाणाऱ्या खर्चास पुरणें मुळींच शक्य नव्हतें. लोकांस वेळच्या वेळीं वेतन मिळाले तर ते मनापासून कोणतीही कामगिरी करण्यास सिद्ध असतात. लष्कर व पागा वाढवेल तेवढी वाढविल्यांवाचून आरंभिले कार्य सिद्ध होण्याची आशा बिलकूल नव्हती. त्याप्रमाणेंच हस्तगत केलेल्या किल्ल्यांची व्यवस्था नीट लावून त्यांवर अन्नादी सामुग्री मुबलक ठेविल्यावांचून शत्रूच्या भावी हल्ल्यांपासून त्यांचें रक्षण होणें शक्य नव्हतें. तेव्हा कोणत्या तरी उपायाने द्रव्य मिळविल्यावांचून गत्यंतर नाहीं हे महाराजांच्या लक्षात येऊन त्या उद्योगास ते लागले. जे कोणी धनाढ्य

१ कित्येक बखरकार याचें नाव मुलाणा असें देतात.

२ यांचे नाव दळवी असें ग्रांट डफ देतो, आणि चिटणीस, सभासद व चित्रगुप्त सुर्वे असे नांव देतात.

सावकार आढळत त्यांच्याकडून उसने द्रव्य घेण्याचा क्रम त्यांनी चालविला व जे सावकार सामोपचारानें द्रव्य द्यावयास राजी नसत त्यांजपासून तें बळजबरीने घ्यावयास उद्युक्त होत. हा क्रम अन्यायाचा तर खराच. परंतु ज्या देशकार्यास ते प्रवृत्त झाले होते तें अत्यंत महत्त्वाचें असून सिद्ध झाल्यानें सर्वांचेच कल्याण होण्याजोगे होतें. यास्तव मनुष्यांची व द्रव्याची अनुकूलता साधेल त्या उपायाने करणें प्राप्त होते. मनुष्यांस द्रव्याच्या लालचीने अनुकूल करता येई. परंतु ज्याच्यापाशीं द्रव्य असे त्यास मोहक वाणीने बोलून वश करण्याचा उपाय हरला असतां दुसरा उपाय म्हटला म्हणजे जुलमाचाच होता.

एके समयी त्यांना अशी बातमी लागली की, कल्याणचा सुभेदार मुल्ला अहमद याच्याकडून मोठा खजिना विजापूर दरबारी जात आहे. हा खजिना कोंकणातून वाईच्या मार्गानं चालला होता. तो लुटण्याचे मनांत आणून महाराजांनी तीनशे स्वार व कांही मावळे बरोबर घेऊन खजिना घेऊन जाणारांवर हल्ला केला[१] व त्यांस उधळून लावून सगळा ऐवज तत्काळ राजगडावर नेऊन ठेविला. ह्या खजिन्याबरोबर चांगलाच सरंजाम होता. कारण शिवाजी महाराज किंवा दुसरा कोणी तरी पुंड तो लुटील अशी भीती त्या सरदारास होतीच. ह्या झटापटीत महाराजांकडचे दहापांच लोक ठार झाले व पाचपंचवीस जखमी झाले. मुल्लाचे पाचपंचवीस लोक पडले व शेपन्नास जायबंदी झाले. आपले जे लोक प्राणास मुकले त्यांच्या कुटुंबांचा निर्वाह महाराजांनी चालविला व ज्यांनीं चांगली कामगिरी बजाविली त्यांस त्याच्या योग्यतेप्रमाणें इनामें वगैरे देऊन उत्तेजन दिलें. त्यामुळे सर्वांस असें वाटूं लागलें कीं, हा प्रभू दयाळू व उदार असून गुणांची बूज अवश्य करावयाचा. याची सेवा इमानाने केल्यास ती व्यर्थ व्हावयाची नाहीं. ह्या रीतीनें महाराजांच्या पदरच्या लोकांचा हुरूप व उत्साह हे अधिकाधिक वाढत चालले.

हा खजिना लुटल्यामुळे कल्याणच्या मुल्लाशी उघड वैर उपस्थित झालें. तेव्हा महाराजांनी आबाजी सोनदेव यास त्याच्यावर पाठविले. त्यानें जाऊन कल्याणावर एकाएकीं छापा घातला व तें सर करून मुल्ला हयातीस[२] बंदिवान केलें, व त्याच्या ताब्यांतले सगळे किल्ले आपल्या कबजात घेतले. ह्या विजयाचे वर्तमान महाराजांस कळले तेव्हां त्यांस मोठा आनंद झाला व ते जातीने कल्याणास गेले. मुल्लास कैद केलें होतें, त्यास सोडवून त्याचा बहुमान केला, व त्यास आदरपूर्वक विजापुरास रवाना केलें. आबाजीपंतानें ह्या मुल्लाची सून[३] लढाईच्या गर्दीत पकडून ठेविली होती. महाराज कल्याणास आल्यावर त्यांच्यापाशी आबाजीने असा अर्ज केला कीं, ह्या लढाईत एक अतिलावण्यसंपन्न तरुण स्त्री सापडली आहे. ती महाराजांच्या सेवेस योग्य आहे असें वाटल्यावरून ठेवून दिली आहे. हें ऐकून महाराजांनी त्यास आज्ञा केली कीं, तुम्ही जी सुंदर स्त्री ठेविली आहे ती सभेस घेऊन या!' अशी आज्ञा होतांच त्या कारभाऱ्यानें तिला चांगली नटवून सजवून सभेस आणिलें. तिला पाहून महाराज हसले आणि म्हणाले कीं, 'ह्या बाईच्या लावण्यासारखे आमच्या मातुश्रीचे लावण्य असतें तर आमचेही रूप हिच्यासारखे झालें असतें.' हें ऐकून सगळ्या लोकांस अचंबा वाटला. त्यांच्या त्या निग्रही वृत्तीचे त्यांना मोठे नवल वाटलें. मग महाराज आबाजी सोनदेवास म्हणाले; 'ज्यास यश पाहिजे त्यानें परस्त्रीचा अभिलाष कदापि करूं नये. राजाने उच्छिष्ट स्त्रीचा अंगीकार करूं नये.

१ शि. दि. म्हणतो की, येसाजी कंक व तानाजी मालसुरे यानी काहीं मावळ्यांनिशीं जाऊन हा खजिना महाराजांच्या आज्ञेवरून लुटला.

२ प्रो. सरकार हें आडनाव नवैयत असें देतात. ते आणखी असें म्हणतात की, महंमद अदिलशहा ह्या वेळीं फार आजारी असल्यामुळें हा मुल्ला विजापुरास बरेच दिवस होता; आणि त्याच्या पश्चात त्याच्या ह्या कल्याण प्रांताच्या जहागिरीची अव्यवस्था झाल्यामुळें महाराजांच्या हातीं हा प्रांत असा सहज आला.

३ शि. दि. म्हणतो कीं, ही त्या मुल्लाची कन्या असून तिला आबाजी सोनदेवाने त्याजपासून राजीखुषीनें पैसा देऊन घेतलें होतें. तारीख-ए-शिवाजी नामक यवनी बखरींत मुळातल्यासारखाच मजकूर आहे. ही कोणातरी दुसऱ्याच मुसलमानाची मुलगी होती असे कित्येकाचे म्हणणे आहे.

परस्त्रीचा अभिलाष केल्याने रावणासारखे बलाढ्य पुरुष नाश पावले आहेत. मग आमच्यासारख्याची कथा काय? राजास सर्व प्रजा अपत्यासमान आहे.' हें असें बोधाचे भाषण ऐकून सर्वांच्या चित्तावर असा परिणाम झाला कीं, महाराज महापुरुष आहेत. यांच्या हातून अनाचार कदापि व्हावयाचा नाहीं. पदरच्या माणसांनी तो केल्यास यांना तो मुळीच खपावयाचा नाहीं. मग महाराजांनी त्या स्त्रीस वस्त्रालंकार देऊन मोठ्या इतमानानें तिचा सासरा विजापुरास गेला होता तिकडे पाठवून दिलें.[१]

कल्याणप्रांत जिंकल्याबद्दल आबाजी सोनदेवाची फार तारीफ करून महाराजांनी त्याला त्या प्रांताचा सुभेदार नेमिलें व तिकडे जमीनमहसुलाची व्यवस्थित पद्धत लागलीच सुरू केली. यवनी अंमलांत प्रजा अगदी टेंकीस आली होती तीस आश्वासन देऊन हुशार केले. त्या प्रांतांत ज्या प्राचीन संस्था लुप्तप्राय झाल्या होत्या त्यांचें पुनरुजीवन केलें. देवस्थानांस व ब्राह्मणांस जी वर्षासनें पूर्वकाळीं चालू होतीं तीं पुनः सुरू केली व जी त्या काळी चालू होतीं तीं तशींच कायम ठेविली. ह्यामुळे सर्व हिंदू प्रजा संतोष पावून महाराजांची कीर्ती सर्वत्र प्रसृत झाली.

ह्या विजयाने महाराजांना व पदरच्या लोकांना मोठाच हुरूप आला. मुल्लाचा वसवसा मोडून काढिल्यावर त्यांनी आसपासचे किल्ले सर करण्याचा धूम सपाटा चालविला. किल्लेदारांशी प्रथम सामोपचाराचें बोलणे लावा, व रक्तपात न होतां ते किल्ले ताबीन करून देतात कीं कसें ते पाहावे; तसे ते करारास न आले तर त्यांच्यावर अकस्मात छापे घालून किल्ले घ्यावे, असा क्रम त्यांनी चालविला. मावळे व धारकरी यांस किल्ल्यांची बारीकसारीक माहिती असे. ज्या किल्ल्यांची माहिती नसे तेथले माहितगार मिळवावे. इतकेही करून एखाद्या किल्ल्यावर प्रवेश नच झाला तर त्यावरील रखवालदारांपैकी कांही जणांशी भेद करावा व त्याच्या कोटघेऱ्यांच्या आतील घरे शाखरण्यासाठीं आगोटीस गवत वगैरे पुरविण्याचा करार किल्ल्याखालच्या गांवकऱ्यांनी केलेला असे, त्यांपैकीं कांही जणांस लाच देऊन आपलेसे करावे व आपल्या धारकऱ्यांच्या माथ्यांवर गवताच्या मोळ्या देऊन त्यांत तरवारी घालाव्या. अशा बहाण्याने किल्ल्यावर जावे व भेद करून वश केलेल्या रखवालदारांच्या मदतीने बाकीच्या रखवालदारांवर एकदम घाला घालून किल्ला सर करावा. ह्याप्रमाणें त्यांनी कांगारी (कांगुरी), तुंग, तिकोनी, लोहगड, राजमाची, कुवारी, भोरप, घनगड, केलना, माहुली आदिकरून किल्ले घेतले. ह्या प्रांतांत कित्येक देशमुख पुंडावा करीत व पाळेगार रयतेस फारच उपद्रव करीत. त्यांस जेरीस आणून किंवा ममता दाखवून आपले अंकित करून महाराजांनी सगळा मावळप्रांत त्यांच्या त्रासापासून मुक्त केला व तेथील प्रजा सुखी केली. यवनांचा सुळसुळाट अगदीं मोडला; आपला हिंदू राजा झाला असून कोणत्याही बाबतींत कोणावर जुलुमजबरी होतनाशी झाली, हें पाहून सर्व हिंदू प्रजा महाराजांस दुवा देऊं लागली. स्वधर्मरक्षण होऊन स्वराज्याचा अनुभव घडूं लागल्याने सर्वांस सुख झालें.

ह्याप्रमाणें कल्याणप्रांताच्या उत्तर भागांतील प्रजा आबाद व सुखी झाली हें ऐकून दक्षिण भाग जो शिद्दीच्या कबजांत होता तेथल्या हिंदू प्रजेसही शिवाजी महाराजांची सत्ता आपल्यावर व्हावी अशी इच्छा होऊं लागली. त्या वेळीं हबश्यांच्या नोकरीस सोडवळेकर व कोडवळेकर असे दोन मराठे जमेदार होते. त्यांनी महाराजांस असें सांगून पाठविलें कीं, 'आम्हांस हबश्यांच्या ताबेदारीचा अगदी वीट आला आहे. तो आम्हांस अनेक प्रकारे छळतो. आपली स्वारी कोकणांत यावी, म्हणजे आम्ही तळा व घोसाळा हे किल्ले आपणांस घेऊन देतो हे किल्ले हाती आल्याने आपणांस पुष्कळ प्रांत साधण्यासारखा आहे व यवनांची ताबेदारी जाऊन आम्ही आपल्या पदरी पडूं' ही अशी तिकडील लोकांची अनुकूलता पाहून महाराज कांही लोकांनिशी तिकडे गेले व ते किल्ले त्यांनी स्वाधीन करून घेतले. ह्या किल्ल्यांनजीक सुरगड आहे तोही त्यांनी हस्तगत केला व आसपासच्या प्रांतांत आपला अंमल बसविला.

१ कल्याण शहरांत शिवाजी महाराजांस पुष्कळ पुरलेले द्रव्य सांपडलें असें त्या वेळचा टावर्निअर नावाचा एक युरोपिअन प्रवासी लिहितो.

हबश्यांचा हा प्रांत हाती आला खरा, परंतु तो कायमचा स्वाधीन राहणे अंमळ कठीण होतें. कारण शिद्दी मोठा प्रबळ होता. ह्यासाठी महाराजांनी बीरवाडीस चांगली मेट पाहून तेथें किल्ला बांधिला आणि रायरीच्या[१] बळकट डोंगरावर लिंगाणा नांवाचा किल्ला बांधिला. हाच किल्ला पुढें विशेष मजबूत करून त्यास रायगड असें नांव दिलें. ह्या सर्व किल्ल्यांवर आपले लोक ठेवून त्यांचा चांगला बंदोबस्त केला. ह्याप्रमाणें हबश्यांच्या ताब्यांतून कुलाबा प्रांताचा पूर्वभाग महाराजांच्या सत्तेखाली आला.

ह्या मोहिमेत महाराजांना प्रसिद्ध भवानी तरवारीचा लाभ झाला. महाराज हरिहरेश्वराच्या दर्शनास जाऊन परत येत असतां त्यांस कोणीं असें सांगितलें कीं, गोवलकर सावंतांच्या घरीं एक नामी धोप तरवार आहे. तिची किंमत तीनशे होन आहे. ही तरवार त्यांजकडून आपण घ्यावी असें जवळच्या लोकांनी महाराजांस सुचविले. त्यांस महाराज म्हणाले कीं, 'खऱ्या मर्द पुरुषाने कोणा संभावित मनुष्यापाशीं एकादी वस्तू असली तर तिचा अभिलाष धरू नये. स्यमंतकमण्याची गोष्ट पुराणांतरी आहे ती तुमच्या लक्षांत असेलच. त्यामुळें उपस्थित झालेले वैर भगवंतांसच निभावितां आलें. आपण मानवांनी असल्या क्षुल्लक वस्तूसाठी नसतें वैर माजवू नये.' हा असा त्यांचा निस्पृहपणा पाहून लोक उगीच राहिले. इकडे सावंतांच्या कारभाऱ्यांनी त्यांस असा सल्ला दिला कीं, शिवाजीमहाराजांसारख्या प्रतापी पुरुषाशी सख्य करण्याची अमोल संधी आली आहे ती व्यर्थ दवडू नका. त्यांस तुमच्याकडची तरवार नजर करून त्यांचें मित्रत्व संपादा. ही मसलत त्या सावंतांला रुचून त्यांनी महाराजांची भेट घेऊन ती तरवार त्यांस नजर केली. त्यामुळें खूष होऊन महाराजांनी त्यांना तिजबद्दल तीनशे होन व पोषाख दिला व त्यांस आपल्या नोकरीस ठेविले. ह्या तलवारीवर महाराजांची फार प्रीती असे. कोणत्याही मोहिमेस निघावयाचें झालें तरी ती घेतल्यावांचून ते निघत नसत. ह्या तलवारीचे नांव त्यांनी भवानी असें ठेविले. ती हाती आल्यावर महाराजांस प्रत्येक मोहिमेत यश येत गेलें म्हणून तिची ते नित्य पूजा करीत. नवरात्रांत घटाजवळ ठेवून तिची पूजा-अर्चा करून दसऱ्याच्या दिवशीं ती पुनः हाती धरून नव्या मोहिमेस निघावे असा त्यांचा क्रम असें.

ह्या मोहिमेंत महाराजांनीं राजापूर शहरावर हल्ला केला. हें शहर शिद्दीच्या ताब्यात होतें. तेथें मोठा व्यापार चालत असल्यामुळे तें मोठे श्रीमान होतें. त्या शहराची नाकेबंदी करून तें लुटण्याचा बेत महाराजांनी केला. तेथल्या कमावीसदारानें त्यांशी सामना करण्याचा घाट घातला, पण त्यास चांगले शासन केल्यामुळें तो शरण आला. मग शहरांतील व्यापाऱ्यांकडून व श्रीमंत लोकांकडून काढवेल तेवढे द्रव्य काढिलें. त्या शहरांत महाराजांस एक मोठा हुशार व लायक मनुष्य प्राप्त झाला. त्याचें नांव बाळाजी आवजी असें होतें. ह्याचा बाप आबाजी हरि चित्रे हा जंजिऱ्याच्या शिद्दीच्या पदरीं दिवाण होता. त्याजवर शिद्दीची इतराजी होऊन त्याला व त्याच्या भावाला त्यानें ठार मारिलें व त्याच्या बायकामुलांस मस्कत येथें नेऊन गुलाम म्हणून विकण्यासाठी तारवात घालून रवाना केलें. बाळाजीची आई मोठी हुशार व धूर्त बायको होती. तिने खलाशांचे मन वळवून आपणांस राजापुरास नेऊन विकावयास सांगितले. तेथें तिचा भाऊ विसाजी शंकर हा मोठा व्यापारी होता. त्यानें त्यांस त्या खलाशांकडून विकत घेतलें. तीं आपली नातलग आहेत हे त्यांस त्यानें कळू दिलें नाही. तिचे तीन मुलगे होते. वडील मुलगा हा बाळाजी आवजी व दुसऱ्या दोघांची नांवे चिमणाजी व शामजी अशीं होतीं. ह्या तिघा मुलांस विसाजीने चांगले शिक्षण दिलें होते. बाळाजी एका कसबेदाराच्या हाताखाली कारकून होता. शिवाजी महाराजांची स्वारी कोंकणांत आली आहे असें ऐकून त्याने आपल्या दैन्यावस्थेच्या हकीगतीचे एक पत्र त्यांस पाठविले. महाराज त्या पत्राचें अक्षर पाहून फार खूष झाले व त्यांनी त्याला आपल्या पदरी कारकुनीची नोकरी पतकरून राहावें असा त्या पत्राचा जबाब पाठविला. त्यास बाळाजीने असें प्रत्युत्तर पाठविलें की, 'मामाचे कर्ज आहे ते फिटल्यावांचून मला येववत नाही.' पुढें महाराज राजापुरास गेले तेव्हां तेथल्या लोकांस त्यांनी असें सांगितलें कीं, येथे बाळाजी आवजी म्हणून कोणी गृहस्थ आहे त्यास आमच्याकडे घेऊन या. त्याप्रमाणें त्यास

१ रायरी व लिंगाणा हे किल्ले निराळे असून रायरीच्या किल्ल्यास पुढें रायगड असें नाव दिलें असें कित्येकांचे म्हणणें आहे.

महाराजांकडे आणिलें. हे वर्तमान त्याच्या आईला कळताच ती घाबरून धांवत आली व महाराजांच्या चरणी लोटांगण घालून आपली सगळी हकीगत तिने त्यांस निवेदन केली. ती ऐकून महाराजांना फार गहिवर आला, व तिच्या दुसऱ्या दोघां मुलासही बोलावून आणून तिचे त्यांनी असे सांत्वन केले कीं, जसे हे तुझे तिघे मुलगे तसाच मी तुझा चवथा मुलगा आहें असें समज व ह्या तिघा मुलांस मजबरोबर पाठीव; मी त्यांचे कल्याण करीन. बाळाजी आवजीचें अक्षर पाहून महाराज अगोदरच संतुष्ट झाले होते, त्यांत आणखी त्याची प्रत्यक्ष भेट होऊन त्याची इभ्रत व हुशारी पाहून तर त्यांस फारच आनंद झाला व त्यांनी त्यास आपला चिटणीस नेमिलें. चिमणाजी हा जमाखर्ची लिहिण्यांत मोठा कुशाल आहे असें पाहून त्यास दप्तरदार केलें व शामजीस रायगडाची कारखानविशी दिली.

ह्या बाळाजी आवजीवर महाराजांची अतिशयित कृपा असे. हरएक गुप्त कारस्थान महाराज पहिल्याने त्याच्याकडे बोलत. तो अतिशयित प्रामाणिक व स्वामिनिष्ठ असल्यामुळें महाराजांचा त्याच्यावर पूर्ण विश्वास असे. मोठमोठी महत्त्वाची पर्वे, खलिते वगैरे महाराज हमेशा त्याच्याचकडून लिहवून घेत. तो उत्तम लेखक व मजकूर जुळविणारा असल्यामुळें त्याला कोणत्याही प्रकरणाविषयी थोडीशी समजूत दिली म्हणजे पुरत असे. त्याच्या आधाराने सुसंगत व मुद्देसूद मजकूर लिहिण्याच्या कामांत तो पुरा वाकबगार असे. असें सांगतात कीं, एके प्रसंगी स्वारींत असतां महाराजांनी त्याला एक खलिता लिहावयास सांगितला. परंतु सगळा दिवस कांहींना काही काम निघाल्यामुळे त्याला रात्र होईपर्यंत तो खलिता लिहावयास अवकाश मिळाला नाहीं. रात्री महाराजांनी त्यास जवळ बोलावून, सांगितलेला खलिता लिहिला काय? असा प्रश्न केला. तेंव्हा बाळाजी अगदीं घाबरून गेला. लिहिला नाहीं म्हटलें तर हुकूम तोडल्याबद्दल शिक्षा खात्रीने व्हावयाची हें त्यास पक्के माहीत होतें. मग कशी तरी वेळ मारून नेली पाहिजे असें मनांत आणून त्यानें न कचरता होय असा जबाब दिला. तेव्हा तो कसा काय लिहिला आहे तो आम्हाला वाचून दाखवा, अशी महाराजांची आज्ञा झाली. तेव्हा बाळाजीने दप्तर सोडून एक कोरा कागद काढून पुढें धरून न अडखळता सर्व खलिता बोलून दाखविला. तो ऐकून महाराज फार खूष झाले व असा नामी मसुदा लिहिल्याबद्दल त्यांनी त्याची तारीफ केली. जवळ दिवटीवाला दिवटी घेऊन उभा होता. त्याच्या नजरेस बाळाजीचे हें सारे कृत्रिम पडून तो हसला. तेव्हा महाराजांनी त्याला दरडावून हसण्याचे कारण विचारले. तेव्हां त्याचा निरुपाय होऊन त्यानें महाराजांस सांगितलें कीं, बाळाजी बाबांनी जो कागद आतां महाराजांस वाचून दाखविला तो कोरा होता, त्यावर कांहींएक लिहिले नव्हतें. ह्याप्रमाणें लबाडी उघडकीस आली तेव्हा बाळाजीने आपला अपराध कबूल केला व तो खलिता लिहिण्यास फुरसद कशी झाली नाही ते सांगितले. त्याची अशी धारणाशक्ती पाहून अर्थात महाराज फार संतोष पावले.

***

भाग आठवा

पितृसंकटनिवारण
(१६४९–५३)

एथवर सांगितल्याप्रमाणें शिवाजीमहाराजांनी विजापूरकरांच्या मुलखांत दोन तीन वर्षे धुमाकूळ उडवून दिला, त्याचें वर्तमान त्या दरबारांत वेळोवेळी पोहोचे. परंतु त्याजकडे त्या सरकाराने फारसे लक्ष पुरविले नाहीं. कल्याणचा सुभेदार मुल्ला याचें समूळ उच्चाटन होऊन तो रडत विजापूरच्या दरबारांत गेल्यावर त्याच्या तोंडून कच्ची हकीगत कळली तेव्हां मात्र पातशहास वाटलें की, यापुढें शिवाजीमहाराजांच्या धामधुमीकडे दुर्लक्ष करून उपयोग नाही. शिवाजीमहाराजांनी सरकारी खजिना लुटला, कल्याण प्रांत काबीज केला, जवळपासचे बहुतेक किल्ले हस्तगत केले व आणखी किल्ले घेण्याच्या व सरदार बुडविण्याच्या उद्योगांत ते आहेत असें वर्तमान विजापुरांत सर्वत्र पसरून खळबळ उडून गेली. पातशहा महंमद अदिलशहा यास असा संशय आला कीं, हें सारें शहाजीराजे यांचेंच गुप्त कारस्थान असावें. त्यांनी आपल्या मुलास आतून सांगितल्यावरून त्यानें हें असें उघड बंड आरंभिलें आहे. हा संशय येण्यास आणखी असेही कारण असावें कीं, रणदुल्लाखान कर्नाटकांतून परत आल्यावर तिकडील सगळा बंदोबस्त शहाजीराजांस सांगितला असून तिकडील सुभेदारीही त्यांसच दिली होती. ह्याप्रमाणें बहुतेक स्वतंत्र व्यवस्था हातीं आल्यावर व तिकडील लोकांचा विश्वास व प्रीती ही संपादन केल्यावर राजांच्या मनांत तिकडे स्वतंत्र राज्य स्थापण्याचा विचार घोळू लागला होता. याविषयी मागें सांगितलेंच आहे. शिवाजीमहाराजांनी ज्या मुलखात धामधूम चालविली होती तो शहाजीराजांच्या हातचा नुकताच गेला असल्यामुळें तो परत आपल्या कबजांत यावा ह्यासाठींच त्यांनी ही खटपट आपल्या पुत्राकरवी चालविली असावी असा वहीम पातशहाला येणे साहजिक होतें.

असा संशय पातशहास आला खरा; परंतु शहाजीराजांचें एकदम उघडपणे पारिपत्य करण्याचें साध्य नव्हतें. बरें, शिवाजीमहाराजांवर फौज पाठवावी तर तिकडे कर्नाटकांत शहाजीराजे गडबड करून दौलतीस अपाय आणतील. तेव्हां हा काटा युक्तीनें काढण्याचा विचार पातशहाने केला. त्यानें प्रथमतः शहाजीराजांस असे पत्र पाठविलें कीं, ''तुम्ही आमचे इतबारी अमीर असतां तुमचा पुत्र जो तुम्ही पुणेंप्रांती ठेविला आहे तो बदलला आहे. त्यानें हरामखोरी करून आमच्या ताब्यांतले किल्ले घेतले व कल्याणप्रांतही काबीज केला. ही गोष्ट बरी नाही. यांत स्वहित काय पाहिले? याकरिता तुम्हांस असें फर्माविण्यांत येत आहे कीं, शिवाजीने असा गाफीलपणा व पुंडावा करूं नये अशी त्यांस तुम्ही ताकीद द्यावी. त्यानें ताब्यात राहून मेहरबानी संपादन करावी. ह्याप्रमाणें वागण्यास तो राजी नसल्यास तुमच्यावर इतराजी होऊन जहागीर काढून घेतली जाईल व त्यास व तुम्हांस शासन करण्यांत येईल. तुमच्या हातून त्याचा बंदोबस्त किंवा पारिपत्य होत नसल्यास त्याला हुजुरास आणावे.''

शहाजीराजांनी ह्या पत्राचा जबाब असा पाठविला की, 'शिवाजी माझा पुत्र खरा; परंतु तो माझ्या हुकमात नाहीं. तो बिघडला आहे. माझा त्यास कांही इलाज नाहीं. मी पातशहाचा एकनिष्ठ नोकर आहें. यांत माझी तकशीर

बिलकूल नाहीं. माझा गुन्हा असेल तर मी मनोभावे हुजुरास हजर रहातो. हजरतींनी शिवाजीवर स्वारी करून त्यास जीवंत धरून आणावे, किंवा काय मन मानेल तें करावे त्यास मी आड आलों तर माझा मुलाहिजा ठेवू नये. शिवाजीला तंबी देऊन हुकूमांत आणावे, एवढाच माझा अर्ज आहे. मला दुसरें कांही कळत नाहीं. ह्याप्रमाणें शहाजीराजांचे उत्तर आलें तरी बादशहाची खात्री होईना.[१] म्हणून त्यानें आपला सरदार मुस्तफाखान हा कर्नाटकांत मोहिमेवर गेला होता त्यास असा गुप्त हुकूम पाठविला कीं, शहाजीराजांस युक्तीनें पकडून विजापुरास पाठवावें. असें केल्याने शिवाजीमहाराज सहज वठणीवर येतील असें त्यास वाटलें. मुस्तफाखानानें ही कामगिरी बाजी घोरपडे यांस सांगितली.

ह्या घोरपड्यानें राजांस कसें दग्याने पकडले हें मागें सांगितलेंच आहे.[२] त्यानें त्यांस विजापुरीं आणिल्यावर पातशहानें पुनः असें निक्षून सांगितलें कीं, तुम्ही आपल्या मुलाचे बंड मोडून टाका. दुसऱ्या सरदारांकडूनही त्यांस पुष्कळ सांगविलें; परंतु त्या सर्वास त्यांचा एकच जबाब होता. तो हा कीं, 'शिवाजीचा आणि आपला काहीएक संबंध नाहीं. तो सरकाराशी बंड करीत आहे. त्याचप्रमाणें तो माझ्याशीही बंडखोरासारखे वर्तन करत आहे.' मग पातशहानें राजांकडून आपल्या समक्ष शिवाजीमहाराजांना अशा आशयाचे पत्र लिहविले कीं, तुम्ही एकदम विजापुरास निघून यावें व पातशहाचे जे किल्ले, कोट वगैरे बळकाविले असतील ते त्यांच्या स्वाधीन करावे. तुमच्यामुळें त्यांची आमच्यावर अतिशयित इतराजी झाली आहे.

हें असें वडिलांचे पत्र आलें तेव्हां महाराजांना मोठा विचार पडला. आपल्यामुळे वडिलांवर संकट आलें. आतां कसें करावे? त्यांची आज्ञा शिरसावंद्य करून आजपर्यंत मिळविलेले किल्ले व प्रांत सोडून देऊन यवनांचे अंकित होऊन राहावें तर आपण आरंभिलेले स्तुत्य कार्य असिद्ध राहाते आणि ज्या स्थितीविषयीं आपणांस अतिशयित तिटकारा वाटत आहे तीच स्वीकारून राहाणे भाग पडणार, असे विचार त्यांच्या मनांत येऊन ते चिंताग्रस्त होऊन बसले. ही त्यांची उदासीन अवस्था पाहून सईबाईनें चिंतेचे कारण विचारले. तेव्हां त्यांनी तिला वडिलांच्या पत्रातला मजकूर कळविला व पुढें काय करावे म्हणून विचारिलें. तिने उत्तर केलें; 'आम्ही स्त्रिया. आमची बुद्धी ती किती? साहेबांपाशी मोठमोठे विचारकर्ते कारकून व सरदार आहेत त्यांचा सल्ला घ्यावा. विचारिलेंच त्या अर्थी मला असें वाटतें कीं, राज्य साधावे, स्वधर्माचे व गोब्राह्मणांचे रक्षण करावे अशी इच्छा धरिली आहे ती योग्य आहे. देवावर भार घालून चालावे. यश देणार तो समर्थ आहे. राज्य साधावयाचे तर मोह काय उपयोगाचा? थोरले महाराज पडले दूरदेशी. नाहींतर त्यासही ह्या गोष्टीचा संतोष वाटतो.'' हें सईबाईचें भाषण ऐकून महाराज संतोष पावले. आपल्यासारखेंच तिचे मत आहे हें पाहून त्यांस समाधान वाटलें. नंतर मातुश्री, कारकून व सरदार यांस विचारितां त्यानीही अशीच मसलत दिली मग त्यांनी शहाजीमहाराजांस पत्राचा जबाब असा पाठविला की, 'आम्ही तिकडे आल्याने कांही एक उपयोग होणार नाहीं. घेतलेले किल्ले, कोट व प्रांत सोडून द्या म्हणून सांगू लागले तर आम्ही कांही सोडण्यास राजी होणार नाहीं यास्तव आपल्या दैवी असेल तसें आपणांस होईल व आमच्या दैवी असेल तसें आम्ही करू. '

हे महाराजांकडचें गेले पत्र पातशहास दाखवून शहाजीराजांनी पुन: अशी विनंती केली की, 'मुलगा आपल्या स्वाधीन बिलकूल नाहीं, त्याचें पारिपत्य हजरतीस वाटेल त्या रीतीनें करावे. मजवर विनाकारण दोषारोप करून कोपायमान होऊं नये.' परंतु इतक्यानें पातशहाचे समाधान झाले नाहीं. त्याला वाटलें की, यांत शहाजीराजांचीच सगळी लबाडी आहे. त्यांना शिक्षा केल्यावांचून मुलगा ताळ्यावर यावयाचा नाही. मग त्याने भिंतीस दगडाचा एक कोनाडा करून त्यात बसण्यापुरती थोडीशी जागा ठेविली, व तींत राजास चिणून एक चिरा मात्र लावावयाचा ठेविला

---

१ शिवदिग्विजयात सांगितले आहे कीं, ह्या वेळीं अदिलशहानें शिवाजी महाराजांसही एक जरबेचे पत्र पाठवून ह्या शिरजोरपणाच्या कृत्याबद्दल त्यांचा निषेध केला, व त्यांस विजापुरास हुजुरास येण्याविषयी हुकूम केला. महाराजांनी त्यास असा जबाब पाठविला की, माझ्या ताब्यात आलेला सगळा प्रांत जहागिरीदाखल द्याल तर मी विजापुरास येतो.

२ भाग दुसरा, पृ. २६.

आणि त्यांना असें सांगितले की, अमुक मुदतींत तुमचा मुलगा आम्हांस शरण आला नाही तर हा चिरा कायमचा बसवून टाकू. ह्या कोनाड्यांतून त्यांना दिवसांतून एक दोनवेळा काढीत व पुनः आत ठेवून देत.

असा हा अतिभयंकर प्राणांत प्रसंग वडिलांवर आल्याचे महाराजांस कळले तेव्हा त्यांना पराकाष्ठेचे दुःख झालें व आता पुढें काय करावे याचा विचार पडला. आपल्या पायी वडिलांचा प्राणनाश खचित होतो असें मनात येऊन त्यांचें हृदय शोकविव्हल झालें. अशा महापराक्रमी नरपुंगवाचा असा परम उद्वेगकारक रीतीनें अंत व्हावा व तो मुलाच्या बेतालपणामुळें व्हावा हें खरोखरीच सुशील पितृभक्ताच्या हृदयास अत्यंत दुःख देणारे होय. आजपर्यंत ज्या गोष्टी आपण केल्या त्या वडिलांच्या कानांवर गेल्या असून त्यांनी त्याबद्दल आपणांस शासन केलें नाहीं, तेव्हां त्या त्यांस संमत असाव्या असे महाराजांस वाटून त्यांनी आपला योजिलेला हा क्रम निश्चयानें पुढें चालविला होता. आपण हा एवढा उपद्व्याप केला त्याचा परिणाम असा घोर होईल असें त्यांस वाटलें नव्हतें; कारण त्यांस हें माहीत होतें कीं, कर्नाटकांत आपल्या वडिलांचे वर्चस्व अतिशयित वाढलें असल्यामुळें ते पातशहास एकाएकी दाद देणार नाहींत परंतु घोरपड्यानें त्यांस दग्याने पकडून विजापुरास आणिले म्हणून हा दुर्धर प्रसंग त्यांजवर ओढवला.

खऱ्या वीर्यशाली व दृढनिश्चयी पुरुषाची परीक्षा अशाच बिकट प्रसंगी होत असते. महाराजांच्या अंगचे अनेक गुण ह्या भयंकर प्रसंगानें चांगले कसास लागले. एक तर त्याची पितृभक्ती किती निःसीम होती हें दिसून आलें. ते केवळ स्वार्थसाधु व राज्यलोभी असते तर त्यानी स्वपित्याच्या जिवाची परवा केली नसती. राज्यतृष्णेस वश होऊन पितृहत्या करण्यासही औरंगजेबासारखे नराधम प्रवृत्त होतात, तर स्वकष्टानें संपादिलेलें राज्य स्वपित्याच्या प्राणरक्षणासाठीं कोण सोडण्यास तयार होईल? परंतु महाराज ह्या कोटीतले मानव नव्हतें. दुसरा मोठा गुण म्हटला म्हणजे आरंभिले सत्कार्य कसेही संकट प्राप्त झालें तरी कदापि असिद्ध सोडावयाचे नाहीं, असा अढळ निश्चय हा होय. यवनांच्या सत्तेतून स्वदेश सोडवून स्वतंत्र करण्याचा जो निर्धार एक वेळ केला तो ह्या वेळी पितृ मोहास्तव चळण्याचा समय प्राप्त झाला होता. कृतसंकल्प सोडला नाहीं तर पितृहत्येस आपण कारण होतों व पितृरक्षण करावयासाठीं यवनांस शरण जावे तर केलेला संकल्प असिद्ध राहून जगांत आपलें हसें होतें; ह्याप्रमाणें 'इकडे आड आणि इकडे विहीर' अशी महाराजांची स्थिती ह्या वेळी होऊन गेली; परंतु महाराजांनी ह्या प्रसंगी स्वसंकल्प कायम राखून पितृसंकटनिवारणाची जी अजब युक्ती योजिली तीवरून त्यांच्या अंगची कल्पकता व धूर्तता चांगलीच प्रत्ययास आली.

हा काळपावेतो त्यांनी मोगलांच्या मुलखास यत्किंचित्ही उपद्रव केला नव्हता. याचे एक कारण तर उघडच होते कीं, दोन्ही पातशाहतींशीं एकदम विरोध करणें इष्ट नव्हतें. शिवाय मोगलांचा बंदोबस्त सरहद्दीच्या मुलखात विशेष चांगला होता. दुसरें असेही कारण असावे कीं, विजापूरसरकाराची सत्ता दुर्बळ करून टाकणारा रिपु उत्पन्न व्हावा व शहाजीराजासारख्या शूर व बलाढ्य सरदाराने किंवा त्यांच्या वीर्यशाली पुत्राने फिसाद करावी हें मोगल बादशहास इष्टच वाटण्यासारखे होतें. यास्तव विजापूरसरकाराशी युद्धप्रसंग करावे लागून यदाकदाचित् आपला पाडाव होऊं लागला तर मोगलांचा आश्रय स्वीकारून आपणांस सावरता येईल असें महाराजांस वाटल्यावरून त्यांनी त्या सरकारास मुळींच दुखविलें नव्हतें.

मोगल बादशहाचा उद्देश महाराजांस पक्का माहीत असल्यावरून त्यांना ह्या वेळीं अशी खात्री वाटली कीं, आपण त्याच्यापाशी मदत मागितली असतां ती तो तत्काळ देईल. मग त्यांनी शहाजहान बादशहास त्याचा मुलगा मुरादबक्ष जो ह्या वेळीं दक्षिणेत सुभेदार होता, त्याच्याद्वारे असा अर्ज केला कीं, 'आमचे वडील शहाजीराजे यांवर विजापूरसरकाराची इतराजी होऊन त्यांस भिंतींत चिणून मारण्याचा ठराव त्या सरकारने केला आहे, तरी त्यांस ह्या प्राणसकटांतून सोडविण्याची मेहरबानी करावी व त्यांस आपल्या पदरी घ्यावे. त्याप्रमाणेंच आम्हीही आपल्या नोकरीस राहावयास तयार आहों. निजामशाहीच्या संबंधाने झालेला लढा मनांत न आणितां अशा शूर व इमानी सरदारास जीवदान दिलें असतां दक्षिणेत मोगली अंमल वृद्धिंगत व दृढ करण्यास त्याच्याकडून व आम्हांकडून पुष्कळ साहाय्य होईल.' अशा

आशयाचा अर्ज रघुनाथपंत मुरादबक्षाकडे घेऊन गेला तेव्हां अर्थातच त्याच्या तोंडास पाणी सुटले असावें. शहाजीराजांनी निजामशाहीस हस्तालंब देऊन विलक्षण शौर्य व पराक्रम प्रकट केला होता, त्याचा विसर त्यास पडला नव्हता. त्याप्रमाणेंच शिवाजीमहाराजांनी स्वराज्यस्थापनेच्या कामी प्रदर्शित केलेली अचाट कर्तबगारी व युक्तिमत्ता त्याच्या कानी वेळोवेळी गेलीच असावी. तेव्हां असे पराक्रमी व शूर सरदार आपणांस अनुकूल झाले तर निजामशाहीप्रमाणें अदिलशाही व कुतुबशाही बुडविण्यास आपणांस विलंब लागणार नाहीं असें त्यास वाटणे साहजिक होतें.

महाराजांच्या ह्या नम्रतेच्या अर्जाचा जबाब मुरादबक्ष याने सन १६४८ च्या मार्च महिन्यांत असा पाठविला कीं, 'तुमचे काय मागणे आहे तें कळविण्यासाठी तुम्ही आपला एखादा विश्वासू वकील इकडे पाठवावा. त्याप्रमाणे महाराजांनी वकील पाठविला. मुरादबक्षाने शहाजहान बादशहास ही गोष्ट कळवून महाराजांचा अर्ज मान्य करण्याविषयी रदबदली केली, तेव्हां त्या बादशहाचे मन वळून त्यानें विजापूरसरकारांस असा खलिता पाठविला कीं, शहाजीराजे भोसले यांस कोणत्याही प्रकारचे शासन न करिता सोडून द्यावे व महाराजांस स. १६४९ च्या ऑगस्ट महिन्यांत मुरादाच्याद्वारे असा जबाब लिहिला कीं, शहाजीराजांचे पूर्वीचें गैरवर्तन मनात न आणितां त्यांना आमच्याकडे नोकरीस ठेवण्यास आम्ही राजी आहो व तुम्हांसही पाच हजार स्वारांची मनसब देण्यास तयार आहे. तरी तुम्ही आपल्या वडिलांस व इतर नातलगांस घेऊन दरबारी रुजू व्हावें.' ह्यानंतर दोन महिन्यांनीं मुरादाने शहाजीराजांसही अशा आशयाचे पत्र पाठविलें कीं, 'तुमचे पुत्र शिवाजी यांनी तुमच्या सुटकेविषयीं अर्ज करून आपण हुजूरची नोकरी पतकरण्याची इच्छा प्रदर्शित केली हें पाहून आम्हांस समाधान वाटलें व तुमचे मागील अपराध मनास न आणता तुमची सुटका करण्याविषयी लिहिले आहे. आम्ही बादशहाकडे जाणार आहो. त्यांच्याकडे तुमच्यासंबंधानें रदबदली करून तुमची पुनरपि नोकरीस राहण्याविषयींची विनंती मान्य करावयास लावू. तुम्ही आपला एक इतबारी वकील मात्र पाठवा म्हणजे त्याच्याबरोबर कौलाचे फर्मान व तुमचे पुत्र संभाजी वगैरे यांस पूर्वीप्रमाणे मनसबा देण्यांत येतील. मोगल दरबाराशीं मात्र तुम्ही इतःपर इमानाने वागले पाहिजे. तुमच्यावर ह्या दरबाराची पूर्ण कृपा आहे याचा सूचक म्हणून तुम्हांकरितां पोशाख पाठविला आहे. त्याचा स्वीकार करावा.'

शहाजहानाचा खलिता अदिलशहास अमान्य करण्याची छाती नव्हती. कारण त्याचा मागें तह झाला असून मोगलबादशहास नाखुष केल्यास आपलें मोठेच नुकसान होईल ही दहशत अदिलशहास होती. त्यानें शहाजीराजांस जामिनावर खुले केलें.[१] परंतु त्यांस विजापूर शहर सोडून जाण्याची सक्त मनाई केली. तेथें त्यांस नजरकैदेत ठेविले.

---

१ कित्येक बखरकारांचे असें म्हणणें आहे की, रणदुल्लाखान व मुरारपंत याच्या रदबदलीने शहाजीराजे मुक्त झाले. त्यांनी पातशहास असें सांगितले म्हणतात की, अशा थोर व शूर सरदाराचा अशा निंद्य रीतीनें वध केल्याने आपला दुर्लौकिक होईल व सर्व मराठे सरदार आपणांवर बिथरतील; परंतु हें खरें नसावे; कारण हे दोघेही मुत्सद्दी व ह्या वेळीं हयात नव्हते असें दिसते. रणदुल्लाखानाच्या रदबदलीचा चमत्कारिक प्रकार मागें दुसऱ्या भागातील एका टीपेत दिला आहे. प्रो. सरकार म्हणतात की, शहाजहानानें अदिलशहास खलिता पाठविला असावा असें वाटत नाही; तर रणदुल्लाखानाने रदबदली केल्यामुळेंच शहाजीराजाची सुटका झाली असावी; परंतु मुरादबक्षाकडून शिवाजीमहाराजांस व शहाजीराजांस आलेली पत्रे त्यांनी रा. ब. पारसनीस यांजकडे मूळ पारशी भाषेतली आहेत तीं खरी मानून त्यांचा अनुवाद केला आहे. त्यांतले तिसरे पत्र मुरादबक्षानें शिवाजीमहाराजांच्या मार्च महिन्यातल्या अर्जानंतर सहा महिन्यानी खुद्द शहाजीराजांस लिहिले असून त्यांना त्याबरोबर पोषाखही पाठविला होता, आणि मोगलांच्या नोकरीस राहण्यासंबंधाचें बोलणे करण्यास वकील पाठवावा असें त्यानें लिहिले होतें आणि ऑगस्ट महिन्यात त्यानें शिवाजीमहाराजांस लिहिलेल्या पत्रात शहाजीराजांस वगैरे घेऊन हुजुरास येण्याविषयीं लिहिले होतें. जेधे यांची शकावली खरी मानिली तर शहाजीराजे जून महिन्याच्या सुमारास (ज्ये. शु. पौर्णिमेस) मुक्त झाले असावे. मि. किंकेड म्हणतात की, शहाजीराजांस शहाजहान बादशहाकडून वर दिलेल्या आशयाचे पत्र विजापुरास आलें तें पाहून अदिलशहाला मोठी चिंता उत्पन्न झाली असावी. शहाजीराजाचा वध केला तर शिवाजीमहाराज मोगल बादशहाचे अंकित होऊन त्यांनी जिंकलेले मुलूख मोगलांच्या सत्तेखाली जातील आणि शहाजीराजे आता त्याचे अंकित झाल्यामुळे त्यांचा आपण वध केला तर त्याबद्दल मोगल बादशहा आपणाकडे जाब मागेल, असा विचार त्याला पडला. मग शहाजीराजांचे मित्र मुरार जगदेव व रणदुल्लाखान यांनी रदबदली केल्यावरून त्यानें त्यांस सोडून दिलें.

ह्यानंतर शहाजीराजे विजापुरास सुमारें चार वर्षे अडकून राहिले होते. तेथून सुटून जाण्याचे त्यांनी नाना प्रयत्न केले परंतु अदिलशहा त्यांस आपल्या कर्नाटकातील जाहगिरींत कांहीं केल्या जाऊं देईना. त्यांच्या वतीने बड्याबड्या सरदारांनी पातशहाची पुष्कळ समजूत केली, पण त्याने आपला ठराव पालटला नाही. चार वर्षांनंतर राजांस कर्नाटकांत जाऊ देण्यास मुख्यतः असें कारण झालें की, त्या मुलखात जिकडेतिकडे धुमाळी सुरू होऊन पातशहाचा तिकडील अंमल नाहींसा होण्याचा रंग आला. तेव्हां तिकडील पुंडांचा बंदोबस्त लावण्याचे काम अत्यंत कठीण असून तें शहाजीराजांसारख्या हुशार व शूर सरदाराच्या हातूनच पार पडण्यासारखे होतें. हें जाणून अदिलशहास राजाला तिकडे रवाना करणें भाग पडलें; परंतु त्यास तिकडे पाठविण्यापूर्वी त्यानें त्यांच्याकडून अशी आणभाक करून घेतली की, त्यांनी मुधोळकरास व त्याच्या जाहगिरीस कदापि उपद्रव करूं नये. पातशहा इतकेंच करून थांबला नाहीं तर त्यानी झालेली गोष्ट विसरून जाऊन परस्परांमध्ये सलोखा व्हावा म्हणून त्यानें त्यांस असें सांगितलें कीं, तुम्ही आपआपल्या इनामाची अदलाबदल करावी. घोरपड्याने कर्नाटकातील सगळी जहागीर शहाजीराजांस द्यावी व त्यानी कऱ्हाड प्रांतावरील आपले हक्क घोरपड्यास द्यावे. पातशहाच्या ह्या हुकमावरून त्यांनी ही अशी अदलाबदल केली.

परंतु शहाजीराजांच्या मनातला घोरपड्यांविषयींचा दंश किमपि गेला नाहीं. नजरकैदेतून सुटून कर्नाटकांत पाऊल पडताच राजांनी शिवाजीमहाराजांना असें पत्र लिहिले कीं, 'तुम्ही आमचे खरे पुत्र असाल तर बाजी घोरपड्यास शिक्षा कराल.' खरे म्हटलें असता हा राजांकडचा निरोप त्यांस हवा होता असें नाही. त्यांच्या मनात घोरपड्यांविषयीं पुरा द्वेष उत्पन्न होऊन ते त्यांस शिक्षा करण्याची योग्य संधी पाहतच होते. ही संधी त्यांस पुढें आठनऊ वर्षांनी आली. शहाजीराजांनी मनावर घेतलें असतें तर त्याचा सूड उगविण्यास त्यांना उशीर लागला नसता, परंतु त्यास पातशहाचा आश्रय असल्यामुळें त्याशीं उघड वैर करवेना. पुढें स. १६६१ च्या सुमारास वाडीचे खेमसावंत व लखमसावंत देसाई यांनी विजापूरकरांची मदत घेऊन शिवाजीमहाराजांशी लढाई करण्याचा बेत केला, तेव्हा त्यांच्या मदतीस ह्या बाजी घोरपड्यास दिले. त्यावरून घोरपडे विजापूरकरांच्या सैन्यासह कोंकणात यावयास निघाला. तो तिकडे जाण्यापूर्वी पहिल्याने आपलें गाव मुधोळ येथें गेला. महाराजांना घोरपडे आल्याची खबर लागतांच त्यांनी विशाळगडवरून मोठ्या वेगाने कूच करून जाऊन मुधोळावर अकस्मात छापा घातला. घोरपड्याची व त्यांची मोठ्या निकराची लढाई झाली. तींत घोरपडे पडला. मग महाराजांनी सगळे मुधोळ शहर लुटून जाळून उद्ध्वस्त करून टाकले व घोरपड्यांचे सगळे नातलग व हाती लागले तितके लोक पकडून ठार मारिले. असें सांगतात की, ह्या वेळी सुमारें तीन हजार लोकांचा संहार महाराजांनी केला! एवढे भयंकर कृत्य ह्यापूर्वी किंवा ह्यानंतर त्यांच्या हातून कधीही झालें नाही. परंतु यवनांचा पक्ष धरून केवळ आपला तळिराम गार करण्यासाठी ह्या घोरपड्याने[१] शहाजीराजांचा जीव धोक्यात घातला ह्याबद्दल महाराजांच्या मनांत केवढा प्रखर दंश होता हें यावरून दिसून येतें व पितृभक्ती त्यांच्या ठायी किती उज्ज्वल होती हेही चांगले व्यक्त होतें.

शहाजीराजे विजापुरास १६४९ पासून १६५३ पर्यंत नजरकैदेत होते. तितक्या अवकाशांत महाराजांनी विजापूरसरकारच्या मुलखास काहींएक उपद्रव केला नाही. कारण उघडच होतें की, आपल्या पूर्वक्रमास अनुसरून यत्किंचित् गडबड त्या सरकारच्या प्रांतांत केली असतां आपल्या प्रिय पित्याच्या जिवास धोका आहे हें ते जाणून होते. बरें मोगलाच्या मुलखात कांही धामधूम करूं म्हटलें तर तिकडून मोगल बादशहाचा रोष होऊन आपल्या पित्यावर पुनः प्राणसंकट यावयाचे हे त्यास पक्के माहीत होतें. यास्तव हा एवढा काळ त्यास जागच्या जागीं स्वस्थ बसून काढावा

१ बाजी घोरपड्याचा मालोजी नांवाचा एक मुलगा ह्या गडबडींत बचवला असून तो पुढे आपल्या बापाच्या जहागिरीचा मालक झाला. हा मालोजी मोठा पराक्रमी निघाला. असा बलाढ्य सरदार आपणांस वश झाल्याने आपलें मोठे कार्य होईल असे वाटून महाराजांनी त्याला भागानगराकडून एक पत्र पाठविलें व त्यांत असे दर्शविले की, घोरपडे व भोसलें ह्या घराण्यांतील कलह नाहीसा होऊन परस्पराचे सख्य व्हावे व उभयतां मिळून यवनांस पादाक्रांत करून मराठ्यांचे राज्य स्थापावें असे आमच्या मनात आहे; परंतु ह्या सलोख्याच्या पत्राने हा मालोजी वळला नाही तो शेवटपर्यंत विजापूरकरांच्या नोकरीस राहिला.

लागला. त्यात सुख मानण्यासारखी गोष्ट एवढीच होती कीं, विजापूरसरकारानें मोगलबादशहाच्या भीतीस्तव महाराजांपाशी अशी अट घातली नाहीं की, आमचे जे किल्ले व प्रांत तुम्ही घेतले आहेत ते आमचे आम्हांस परत दिले नाहींत तर आम्ही शहाजीराजांस देहांतशासन करूं. महाराजांनी ह्या एवढ्या अवकाशांत काबीज केलेल्या किल्ल्यांची दागदुजी व व्यवस्था नीट केली व हातीं आलेल्या प्रांतांत जमाबंदीची वगैरे शिस्त लाविलीं.

आतां विजापूरसरकारानें तरी शिवाजीमहाराजांचे पारिपत्य करण्याचा प्रयत्न एवढ्या अवकाशांत केला नाहीं, याचे कारण असें असावें कीं, त्यांनी मोगल बादशहास शरण जाऊन त्या सरकारास शह दिला होता, व ते मोगलांच्या पदरीं नोकरी करण्यास तयार झाले होते हें अदिलशहास कळून चुकले होतें. यास्तव त्यांच्या वाटेस ह्या वेळीं गेलें असतां काबीज केलेले किल्ले व प्रांत मोगलांच्या स्वाधीन करून त्यास शरण जाऊन ते त्यांस आपणावर स्वारी करण्यास चिथावून देतील, आणि मग आपली धडगत राहणार नाहीं अशी दहशत अदिलशहास वाटणे साहजिक होतें.

***

भाग नववा

मोगलांशी संबंध
(१६५०–५७)

पितृसंकटनिवारणार्थ व आरंभिलेले कार्य सिद्धीस न्यावयास आलेला जबरदस्त प्रत्यवाय नाहींसा करण्यासाठीं महाराजांनी केवळ निरुपायास्तव शहाजहान बादशहास पूर्वोक्त प्रकारे शरण जाऊन त्याची नोकरी पतकरण्याचा हेतू केवळ बाह्यात्कारी दर्शविला. त्याच्या साहाय्याने पित्याची मुक्तता झाल्यावर त्याच्याशीं केलेला करार पाळण्यास महाराज टंगळमंगळ करूं लागले. खरें म्हटलें असता ही त्यांनीं त्या बादशहास केवळ हुलकावणी दाखविली. यवनांची ताबेदारी प्राण गेल्याही करावयाची नाहीं असा दृढसंकल्प महाराजांनी केला होता तो अशा संकटाने ढळणारा नव्हता.

पुढें दिल्लीपतीकडून महाराजांस असा तगादा वारंवार येऊ लागला कीं, तुम्ही आपल्या कराराप्रमाणे वागावे व आमच्याकडे नोकरीस येऊन आम्ही देऊं केलेली मनसब स्वीकारावी. हा तगादा महाराजांनी मोठ्या युक्तीने टाळला. त्यांनी मुरादाकडे आपला वकील रघुनाथपंत यास पाठवून अशी मागणी केली कीं, 'जुन्नर व अहमदनगर ह्या प्रांतांत आमचे वडिलोपार्जित सरदेशमुखीचे हक्क अलीकडे वसूल झालेले नाहींत, ते आमचे हक्क ह्या प्रांतांत मंजूर व्हावे.' त्यानें महाराजांना असे उत्तर पाठविलें कीं, आम्ही बादशहाच्या हुजुरास गेल्यावर तुमच्या मागणीचा अनुकूल विचार होईल; परंतु आपणांकडील एक वकील मात्र पाठवून द्यावा, त्यास विचारू तो मजकूर समजावून देता आला पाहिजे. म्हणजे काम होण्यास दिरंगाई लागणार नाही. असे पत्र त्या शहाजाद्याकडून स. १६४९ सालच्या अखेरीस आले होते. ह्याप्रमाणें शहाजहानाचा नोकरी धरण्याविषयींचा आग्रह महाराजांनी काही ना काही निमित्त करून पुढें चालढकलीवर टाकला.

सन १६५७ त शहाजहानानें आपला पुत्र औरंगजेब व मीरजुमला यांस विजापूरचें राज्य काबीज करण्यासाठी मोठे सैन्य देऊन रवाना केलें.[१] त्यांनीं सरहद्दीवरचे कल्याण, बेदर वगैरे किल्ले सर करण्याचा सपाटा चालविला. तेव्हा महाराजांनी औरंगजेबापाशी स्नेहभावाचे बोल लावून असें कळविले कीं, 'आम्ही दिल्लीपतीचे नोकर आहो आम्ही तुम्हाला ह्या मोहिमेत लागेल तें साहाय्य करण्यास तयार आहो. आम्हीं विजापूरकरांचे जे किल्ले व प्रांत हस्तगत केले आहेत ते आमच्याकडे राहू द्यावे. विजापूरकरांचे समुद्रकिनाऱ्याचे दाभोळ वगैरे प्रांत आम्ही तुमच्यासाठी काबीज करतो.' हे महाराजांचे बोल त्या शहाजाद्यास मान्य होणें साहजिक होतें. कारण त्याला महाराजांची योग्यता चांगली महशूर होतीं. त्यानें त्यास पत्र लिहून कळविले कीं, 'तुमच्या ताब्यात विजापूरसरकाराचा जो प्रांत आहे त्यास आम्ही इतःपर हात लावणार नाहीं. तुमच्या मनांत समुद्रकिनाऱ्याचा मुलूख काबीज करण्याचें आहे त्याप्रमाणें तुम्ही अवश्य करावें.'

---

१ प्रो. सरकार म्हणतात की, औरंगजेब स. १६५३ पासून दक्षिणेतील सुभ्यावर आला असून स. १६५६ त गोवळकोंड्याच्या शहाशी लढत होता. स. १६५६ च्या नोव्हेंबर महिन्यात महंमद अदिलशहा वारला तेव्हा त्याने विजापुरावर स्वारी करण्याची तयारी करून त्या दरबारच्या सरदारास व मांडलिकास वश करून घेण्याचा प्रयत्न चालविला. तेव्हा शिवाजी महाराजांनी अहमदनगरचा मोगल सुभेदार मुलताफातखान यांच्याद्वारे औरंगजेबापाशी स्नेहभावाचे बोलणे लाविले.

ह्या वेळीं औरंगजेबाच्या मनात शिवाजीमहाराजांची मुलाखत घेऊन त्यांना असें प्रत्यक्ष सांगावयाचें होतें कीं, 'ह्या मोहिमेत तुमचा आमचा हितसंबंध सारखाच आहे. तुम्ही आम्हांला सामील होऊन मनापासून मदत कराल तर त्यांत तुमचे पुष्कळ कल्याण होणार आहे.' अशा आशयाचे त्यानें महाराजांना पुढें पत्रही पाठविलें होतें. ह्याप्रमाणें आमीष दाखवून महाराजांना वश करून घेण्याचा शहाजाद्यानें बराच प्रयत्न केला. परंतु महाराज कसले वस्ताद! त्याच्या गुलकावणीला ते मुळीच फसले नाहींत. आपण दिल्लीपतीचे ताबेदार आहों असे निरोप ते त्याला वारंवार पाठवीत, एवढेच ह्याप्रमाणें औरंगजेबाला नम्रता दाखवून त्याच्या सैन्याची वावटळ आपल्या मुलखास काहीएक उपद्रव न होऊ देता त्यांनी दूर घालविली. मोगलाचे सैन्य लांब जाऊन विजापूरकराशी लढण्यांत गुंतले आहे असें पाहून महाराजांनी आपले सामर्थ्य साधेल त्या उपायाने वाढविण्याचा निर्धार केला.

यवनी बखरींच्या आधाराने प्रो. सरकार म्हणतात कीं, मोगलांनी अदिलशाही मुलखात धुमाकूळ मांडला तेव्हा त्या दरबाराने शिवाजीमहाराजांस फार मोठी लालूच दाखवून मोगलांच्या नैऋत्येकडील प्रांतावर हल्ला करावयास सांगितलें. तें अर्थात् अशा हेतूनें कीं, मोगल अदिलशहाच्या ईशान्येकडील प्रांतावर चालून येऊन बेदरास त्यांनीं वेढा दिला होता, तो उठवून ते आपल्या प्रांताच्या रक्षणार्थ परत जातील. ह्याप्रमाणें त्यांनीं मिनाजी भोसले व काशी यांस तिकडे स्वारी करावयास पाठविलें. त्यांनीं स. १६५७ च्या मार्च महिन्यांत भिमानदी ओलांडून चामारगोंद्याचा प्रांत लुटण्याचा धूमधडाका चालविला; अशी लुटालूट करीत ते थेट अहमदनगराच्या वेशीपर्यंत जाऊन थडकले.

येणेप्रमाणें मिनाजीस पूर्वेकडे अहमदनगर प्रांतांत पाठवून महाराज स्वतः जुन्नर शहरावर चालून गेले. हें शहर या वेळी चांगले संपन्न असून महाराज त्या शहरासंबंधाने व अहमदनगरासंबंधानें दिल्लीपतीपाशी हक्क सांगत होते. परंतु तो त्यांचा हक्क त्यानें मुळींच कानांवर घेतला नव्हता. यास्तव ह्या गोष्टीचा सूड उगविण्याच्या इराद्याने त्यांनी तीं शहरे लुटण्याचा विचार मनांत आणिला होता. जुन्नर शहरावर त्यांनी रात्रीचा छापा घातला आणि तटाला दोऱ्या लावून आत उतरून तेथल्या ठाण्यावरील लोकांची कत्तल उडविली आणि तें शहर यथेच्छ लुटले. त्यात त्यांस तीन लाख होन, दोनशे घोडे व इतर पुष्कळ मौल्यवान चीजवस्तू सापडली. ही लूट त्यांनीं लागोलाग पुण्यापर्यंत नेऊन पोचविली. तेथें कांही लोक पूर्वीच ठेवून दिले होते. त्यांच्या हवाली ती करून त्यांस ती राजगडास ताबडतोब न्यावयास सांगितलें.

औरंगजेबास ही गोष्ट कळली तेव्हां त्यानें तेथल्या ठाणेदारास मोठा ठपका देऊन त्याच्या मदतीस कांहीं सैन्य रवाना केलें. त्यानें नसिरीखान इराजखान व दुसऱ्या कांहीं सरदारांस तीन हजार लोक देऊन अहमदनगर प्रांताचे रक्षण करण्यास व शिवाजीमहाराजांच्या मुलखावर स्वारी करण्यास पाठविलें. त्याप्रमाणेंच रावकर्णनामा सरदार औरंगाबादेकडून शहाजाद्याच्या मदतीस येत होता. त्यासही त्यानें अहमदनगर प्रांतांत शिवाजीमहाराजांवर जावयास सांगितलें, आणि शास्ताखानास आपल्याकडचे एक हजार लोक तिकडे घेऊन जाण्याचा हुकूम केला. इकडे मराठे अहमदनगरापर्यंत लुटालूट करीत आले, हें ऐकून अहमदनगरचा किल्लेदार मुलताफातखान त्यांच्यावर चालून गेला; आणि त्यानें चामारगोंद्याचा हल्ला उठवून मिनाजीचा पाठलाग केला. पण त्यानें त्यांस दाद दिली नाहीं. तो त्या प्रांतांत एकसारखा धुमाकूळ उडवीत होता. जुन्नर शहर लुटल्यावर महाराज त्याच्या आसपास प्रांत लुटीत असतां रावकर्ण व शास्ताखान त्यांच्यावर चालून आले. तेव्हां ते जुन्नरपरगण्यातून निसटून जाऊन अहमदनगर परगण्यांत शिरले आणि तिकडे लुटालूट करूं लागले आणि अहमदनगरापाशीं कांहीं लोकांनिशीं ते अकस्मात् आले आणि शहराच्या पेठा लुटू लागले. ही बातमी किल्ल्यावर पोचताच तेथून मुलतफातखानानें कांही लोक शहराच्या बचावासाठी रवाना केले. त्यामुळें त्यांस तें शहर हवे तसें लुटावयास सापडले नाहीं. तरी ह्या हल्ल्यांत त्यास बरेंच द्रव्य मिळाले[१] सातशे घोडे व चार हत्ती

१ प्रो. सरकार म्हणतात की, मुलतफातखानानें शहरांतल्या लोकांचा व त्यांच्या चीजवस्तूंचा बचाव व्हावा म्हणून त्यांस किल्ल्यात नेऊन ठेविले.

त्याच्या हाती लागले. हे घेऊन महाराज शत्रूच्या तावडीतून पार निघून गेले. ह्या झटापटींत त्यांचे कित्येक लोक प्राणास मुकले. ह्या वेळीं आणखी वर सांगितलेल्या नसिरीखानानेंही त्यांच्याशी लगट केली होती. ह्या सरदाराबरोबर मोठे सैन्य असल्यामुळें महाराजांचा निभाव न लागून ते शत्रूस झुंकाडी देऊन पार निघून गेले. मोगलाचे घोडदळ अगदी थकून गेल्यामुळें त्यांचा पाठलाग करण्याचें त्यास त्राण उरले नव्हतें.

ही लूट मिळाल्यावर महाराजांनी आपलें घोडदळ वाढविण्याचा सपाटा चालविला. वर सांगितल्याप्रमाणें त्यांस जुन्नर व अहमदनगर ह्या शहरांत पुष्कळ घोडे मिळाले होते. त्याशिवाय आणखी जिकडून घोडा मिळेल तिकडून तो खरेदी करून आणिला. त्यांवर आपले बारगीर स्वार केले व मराठे शिलेदार मिळाले तेवढे चाकरीस ठेविले. ह्यापूर्वी जे घोडदळ महाराजांपाशी होतें त्यावर माणकोजी दहातोंडे यास मुख्य नेमिलें असून त्यास सरनोबत हा किताब दिला होता. हा माणकोजी पूर्वी शहाजीराजांच्या नोकरीस असून मोठा अनुभवशीर होता. त्यानें ह्या घोडदळाची व्यवस्था उत्तम ठेविली होती. तो वारला तेव्हा त्याच्या जागी नेताजी पालकर नामक एका शूर सरदाराची नेमणूक महाराजांनी केली. हा पालकर मोठा हुशार व धाडसी होता. त्याचा मराठे शिलेदारांत मोठा लौकिक होता. त्याच्या वशिल्याने पुष्कळ शिलेदार महाराजांच्या नोकरीस येऊन राहिले.

शिवाजीमहाराजांनीं मोगलांच्या जुन्नर व अहमदनगर परगण्यांत धुमाकूळ उडवून देऊन पाठीवर मोगलाचे सैन्य असूनही ही दोन्ही शहरें लुटली आणि शेवटी त्याच्या सरदारांस दाद न देता आपल्या सुरक्षित किल्ल्यांत परत गेले हें पाहून औरंगजेब संतप्त झाला आणि त्यानें नसिरीखान वगैरे सरदारांस असा एकसहा हुकूम दिला कीं, मराठे सापडतील तेथें त्यांची कत्तल उडवावी. शिवाजीमहाराजांच्या प्रांतात शिरून तेथल्या लोकाचा संहार करावा किंवा त्यांस गुलाम करावे, त्याची पुणे, चाकण वगैरे ठाणी सर करून साफ उद्ध्वस्त करुन टाकावी. मोगली अमलांतल्या ज्या देशमुखांनीं किंवा इतर शेतकऱ्यांनी मराठ्यांस भर दिली असेल त्यांचा वध करावा. त्यांची कीव अशी मुळीं करूं नये.' विजापूरकरांशीं युद्ध जुंपले होतें तोपर्यत आपला नैऋत्येकडचा प्रांत मराठ्यांच्या हातीं लागू नये म्हणून त्यानें त्या बाजूच्या चारपाच ठिकाणी आपल्या लष्कराची ठाणीं करून त्यांस अशी ताकीद दिली कीं, मराठ्यांचा मोगली मुलखात बिलकूल शिरकाव होऊं देऊं नये आणि त्यांच्या मुलखात वारंवार छापे घालून तो उद्ध्वस्त करावा. परंतु औरंगजेबाच्या हुकूमाची अंमलबजावणी करण्यास त्याच्या सरदारांस महाराजांनी बिलकूल सवड दिली नाहीं.

पुढें मोगलांनी विजापूरकरांचा जिकडून तिकडून मोड करून त्यांस अगदी जेरीस आणिलें, हें वर्तमान महाराजांच्या कानी आलें तेंव्हा आतां आपली वाट काय होते याची धास्ती त्यांस उत्पन्न झाली. विजापूरकरांचा पुरा पराभव केल्यावर औरंगजेब आपल्यावर उलटला असतां त्याच्याशीं टक्कर देण्याचे सामर्थ्य आपणांस अद्यापि आले नाहीं हें त्यांस माहीत होतें. यास्तव हें संकट सामोपचारानें टळते तर पाहावे असा विचार करून महाराजांनी औरंगजेबास अगदी नम्रतापूर्वक अर्ज[१] केला कीं, मीं आपल्या दोन शहरांस उपद्रव दिला त्याबद्दल मला क्षमा करावी. अशी आगळीक मी पुनः कधीं करणार नाहीं. इतःपर मी आपल्या सेवेत हजर राहून अगदीं इमानाने वागेन. आपला पक्ष मी कदापि सोडणार नाहीं. ह्या आशयाचे पत्र लिहून आणखी ह्या आपल्या म्हणण्याची खातरजमा करण्याकरितां आपला विश्वासू व हुशार वकील रघुनाथ बल्लाळ कोर्डे यांस त्यानी शहाजाद्याकडे पाठविलें.

---

१ प्रो. सरकार म्हणतात की, हा अर्ज त्यानीं नसिरीखानास केल्यावरून त्याने त्यांस असा निरोप पाठविला की, तुम्ही आपला वकील आमच्याकडे पाठवून काय मागणी करावयाची असेल ती करा. त्यावरून महाराजांनी रघुनाथपंतास प्रथम त्या सरदाराकडे पाठविले. तेव्हा त्याने औरंगजेबास ही गोष्ट कळविली; परंतु त्यानें काहींएक निश्चित जबाब दिला नाही. त्यावरून त्यांनी पुनः खुद्द औरंगजेबाला विनंती अर्ज लिहिला.

परंतु इतक्यात शहाजहान आजारी पडल्याचे पत्र औरंगजेबाची बहीण रोशनार हिजकडून आल्यामुळे व विजापूरकराशीं तह होऊन दक्षिणेंतली कामगिरी बहुतेक आटोपल्यासारखीच झाल्यावरून तो आपली फौज घेऊन दिल्लीकडे लगबगीने गेला. तो उत्तरेकडे चालला आहे असें पाहून महाराजांनी त्याच्याकडे कृष्णाजी भास्कर[१] ह्या नांवाचा दुसरा एक वकील पाठविला, व त्यास असें कळविले कीं, 'आम्ही जो दिल्लीपतीचा अपराध केला आहे त्याबद्दल आम्हांस आतां फारच पस्तावा वाटत आहे. आम्ही इकडे पुष्कळ घोडेस्वार जमा केले आहेत. प्रस्तुतसारख्या प्रसंगी आपणांस जरूरी असल्यास साहाय्य करण्यास आम्ही तयार आहों आणि दक्षिणेंतील तुमच्या मुलखाचे रक्षण तुमच्या पश्चात करण्याचें काम आमच्यावर सोपविले असतां आम्ही तें मोठ्या खुषीनें पतकरूं. परंतु आपल्या हातीं गेलेल्या प्रांतांत आमचे कांही वंशपरंपरागत आलेले हक्क आहेत ते आपण चालू करावे; आमच्या घराण्याच्या जाहगिरीचा काही भाग आपल्या कबजांत गेला आहे तो आम्हांस परत मिळावा तसेच जुन्नर आणि अहमदनगर ह्या प्रांतांतील आमची देशमुखी आम्हांस परत मिळावी म्हणजे आम्ही आपल्या लोकांनिशीं दिल्लीपतीची जी नोकरी बजावूं तीबद्दलचा मोबदला आम्हांस मिळाल्यासारखे होईल. त्याप्रमाणेंच कोंकणांत अदिलखानाच्या ताब्यांत दिला आहे त्याची व्यवस्था त्याच्याकडून चांगलीशी लागलेली नाहीं. हा प्रांत आमच्याकडे दिल्यास पुष्कळ फायदा होणार आहे.'

ह्या आशयाचे पत्र घेऊन महाराजांचा वकील औरंगजेबाकडे गेला त्यावेळीं तो अगदीं गडबडीत होता. यास्तव त्या पत्रातील फाजील मागण्या पाहून त्याला राग तर आला नाहींच पण त्यानें असें मनांत आणिलें कीं, आपल्या प्रांतांत ज्या हक्कांच्या वगैरे मागण्या शिवाजीमहाराज करीत आहेत ते त्यांस मिळण्याची आशा तूर्त लावून ठेवावी व विजापूरच्या राज्यात जो त्यांनी धुमाकूळ मांडला आहे तो तसाच चालविण्यास त्यांना उत्तेजन द्यावे, यातच आपल्या ताब्यातील मुलखाचा बचाव आहे. मग महाराजांच्या सदरील पत्रास त्यानें असा युक्तीनें जबाब दिला की, 'तुम्ही केलेल्या अपराधाबद्दल तुम्हास क्षमा केली आहे. कोकणातला प्रांत तुम्ही खुशाल कबजांत घ्यावा. सोनोपंतास (आबाजी सोनदेवास) आमच्याकडे पाठवून द्यावे, म्हणजे तुमच्या वडिलोपार्जित हक्कांसंबंधानें वाटाघाट करितां येईल. तुमच्या आमच्यामध्ये शेवटचे करार नक्की झाले म्हणजे तुम्ही पाचशे स्वार आमच्या कुमकेस पाठवून द्यावे, व आमच्या मुलखात बंदोबस्त व शांतता ठेवण्यासाठीं तुमचे बाकीचे सैन्य सर्वदा तयारींत ठेवावे.'

ह्या उभयपक्षाच्या पत्रव्यवहारापासून काहीएक निष्पन्न झालें नाहीं. उभयतांनी परस्परास मधाचे बोट दाखविले एवढेच. त्यांच्यामध्ये कायमचा असा करार कांहींच झाला नाहीं. कारण उघडच होते कीं, औरंगजेब ह्यानंतर आपल्या बंधूंशी लढण्यांत व बापास कैदेत टाकून गादी बळकावण्याच्या धामधुमीत गुंतला होता. महाराजांना तरी हेंच हवें होतें. त्यांना हे ठाऊक होते कीं, आपण केलेल्या मागण्या औरंगजेब कधीही मान्य करणार नाहीं. परंतु त्यास अशा रीतीनें झुलविल्यानें तात्कालिक अनर्थ टळून आपला कार्यभाग साधून घेण्यास चांगला अवकाश सापडावा म्हणून त्यांनी ह्या वेळीं त्यास अशी नम्रता दाखविली. औरंगजेब तरी कांहीं कमी धूर्त नव्हता. शिवाजीमहाराजांची ही नम्रता केवळ मानभावीपणाची असून आपली पाठ वळताच ते आपल्या मुलखास त्रास देण्यास कमी करणार नाहीत हें त्यास पक्के कळून चुकले होतें. म्हणून उत्तरेस जातांना त्यानें आपला सरदार मीरजुमला यास अशी ताकीद दिली कीं, नैऋत्येकडील प्रांतावर चांगले लक्ष ठेव. तो 'कुत्र्याचा पोर' टपून राहिला आहे; त्याप्रमाणेच अदिलशहाला त्यानें असा निरोप पाठविला कीं, शिवा कांहीं किल्ल्यांत लपून छपून आहे, त्याला हाकून द्या! तुम्हांला त्यास आपल्या पदरी ठेवावयाचे असेल तर त्याला दूर कर्नाटकांत जहागीर देऊन ठेवा, म्हणजे त्याचा आमच्या मुलखास उपद्रव होणार नाही.

---

१ प्रो. सरकार ह्या वकिलाचे नाव रघुनाथपंत असें देतात.

असें सांगतात कीं, औरंगजेबाने दिल्लीस जाऊन आपल्या बापास बंदींत घालून दिल्लीचे तक्त बळकावण्याचा इरादा मनांत आणिला व आपल्या साहाय्यास दक्षिणेतील सरदारांस पत्रे पाठवून बोलाविले. इतरांबरोबर शिवाजीमहाराजांसही ह्या आशयाचे पत्र आलें. ते वाचून पाहतांच त्यांच्या अंगावर शहारे आले. स्वपित्याविरुद्ध उठून पुत्राने बंड करावे हें त्यांस मुळींच आवडले नाहीं. त्यांनी त्याचा धिक्कार केला व तें पत्र घेऊन येणाऱ्यास आपल्या समोरून हाकून दिलें. इतकेंच करून महाराज थाबले नाहींत, तर त्यांनी तें पत्र कुत्र्याच्या शेपटास बांधून पुणे शहरांतील रस्त्यांत फिरविले व औरंगजेबाच्या ह्या कुकर्माबद्दल सर्व लोकांत उपहास केला. औरंगजेबाला आपल्या पत्राचा हा असा अनादर झालेला कळला तेव्हां त्याला फार राग आला व त्यानें अशी प्रतिज्ञा केली कीं, ह्याबद्दल महाराजांचा लवकरच सूड उगवावयाचा. परंतु हा दिवस त्याला कधींच उगविता आला नाहीं. फार काय पण हा महाराजांविषयींचा त्याचा रागही लवकर नाहीसा झाला असावा. कारण असें कीं, पुढें स. १६५९ त महाराजांनी अफझुलखानास नामोहरम केल्याचे वर्तमान त्या बादशहास कळले तेव्हां त्यानें महाराजांस मोठ्या गौरवाचे व शाबासकीचे पत्र पाठविलें व ह्या त्यांच्या पराक्रमाबद्दल पारितोषिक म्हणून त्यांस त्यानें विजापूरकरांच्या सरहद्दीवरील दोनतीन किल्ले दिले. इतकेंच करून तो राहिला नाहीं, तर त्यानें महाराजांस हा स्तुत्य क्रम पुढें चालविण्यास आग्रहपूर्वक सांगून असें वचन दिलें कीं, तुम्ही विजापूरकरांचे जे प्रांत काबीज कराल त्यांवरची खंडणी तुम्हांस माफ करण्यांत येईल. हें असें उत्तेजन औरंगजेबाने महाराजांस दिलें यांत त्याचा मतलब अर्थात् असा होता कीं, शिवाजीमहाराजांच्या हातून अदिलशाही बरीच कमजोर झाली म्हणजे ती बुडविण्यास आपणाला सोपे जाईल व शिवाजीसारख्या बांडगुळासही तत्काळ छाटून टाकितां येईल. परंतु हें शेवटले काम पुढें किती जड होणार होतें हें त्या धूर्त बादशहाच्या ध्यानींमनीही त्यावेळी नव्हतें.

***

भाग दहावा

विजापूरकरांचा आणखी मुलूख काबीज करितात (१६५४–५८)

शहाजीराजांची विजापुराहून सुटका होऊन ते कर्नाटकांत सुखरूपपणे जाऊन पोहोचल्यावर महाराजांनी विजापूरसरकारच्या राज्यांत पुनः धामधूम सुरू केली. सगळा घाटमाथा व कोंकणपट्टी आपल्या हाताशी घालण्याचा त्यांनीं बेत केला व आणखी किल्ले सर करण्याचा क्रम सुरू केला. हें वर्तमान विजापूर दरबारास कळलें तेव्हां त्यास मोठी चिंता पडलीं. सैन्य पाठवून त्यांच्याशी युद्ध करण्यास प्रवृत्त व्हावें तर ते मोगलांचा आश्रय करून उद्यांचे विघ्न आज उभें करितील? कारण अदिलशाही बुडविण्याचा विचार मोगल बादशहाच्या मनांत पुष्कळ दिवस होता. यास्तव महाराजांशी समोरासमोर सामना न करता त्यांस युक्तीनें पकडून आणावे असा विचार त्या दरबारांत होऊन त्या कामगिरीवर बाजी शामराज नांवाच्या एका सरदारास बरोबर दहा हजार लोक देऊन पाठविलें. महाराज त्या वेळी महाड प्रांतांत होते. बाजी शामराज वाईच्या वाटेने आला तो जावळीच्या चंद्रराव मोऱ्याच्या आश्रयाने पारघाटाजवळ दबा धरून बसला. मनात हेतु कीं, महाराज त्या वाटेने आले म्हणजे त्यास अचानक पकडावे; परंतु महाराजांचे हेर नेहमीं चोहोंकडे अनेक वेषांनी फिरत. त्यांनी येऊन त्याच्याविषयीची बातमी दिली. त्यावरून महाराज सावध होऊन आपल्या लोकांनिशी पारघाटाच्या पायथ्याशीं त्या बाजीवर एकाएकीं जाऊन तुटून पडले, व त्याच्या लोकांची दाणादाण करून त्यास रानोमाळ पळावयास लाविलें.[१] त्याचा पराजय झाल्यावर तो निरुत्साही होऊन रडत माघारी विजापुरास गेला.

ह्या बाजी शामराजाला जावळीच्या कृष्णाजी बाजी[२] चंद्रराव मोरे याने आपल्या प्रांतांतून येऊ देऊन प्रसंगी मदतही केली, हें पाहून महाराजांस त्याचा मोठा राग आला आणि त्याचा काटा काढून टाकिल्यावांचून त्याच्या प्रांतास लागून असलेला आपला मुलूख सुरक्षित होत नाहीं असें त्यांस वाटलें. ह्या मोऱ्याच्या ताब्यांत कृष्णा व वारणा ह्या नद्यांच्या दरम्यानचा घाटमाथ्यावरील प्रांत होता. ह्याच्या पदरी दहाबारा हजार मावळे वगैरे होते. तो आपणांस राजा म्हणवीत असे. सोळाव्या शतकांत याच्या पूर्वजांस विजापूरच्या अदिलशहानें ही जहागीर दिली होती. त्या सरकारास नियमित कारभार देऊन बाकीच्या उत्पन्नाचा उपभोग तो स्वतः घेत असे, व जवळपासच्या मुलखात लुटालूट करून गब्बर झाला होता. हशमगड येथें त्याचें ठाणे असे. बरेच किल्ले व खोरी त्याच्या ताब्यांत होती. महाराजांनी ह्यापूर्वी

---

१ चिटणीस म्हणतो की, बाजी शामरांज महाडास जाऊन पोचला तेव्हा शिवाजीमहाराज चेऊल बंदर लुटून हस्तगत करण्यात गुंतले होते. तेथून ते थेट राजगडावर गेले; आणि महाराजांच्या एका तुकडीने बाजी शामराजावर हल्ला करून त्याचा अगदी मोड केला. शेडगावकराच्या बखरींत असा उल्लेख आहे की, महाराजांना पकडण्यासाठी रहिमतपूरचा रणदुल्लाखान व दतवडचा बाजी घोरपडे यांस ८००० लोकांसह पाठविले होते. त्याजवर महाराजांनी व नेताजी पालकराने दोहोंकडून हल्ला करून त्यांचा पराभव केला.

२ मि. किंकेड व रा. ब. पारसनीस याचे नाव बाळाजी कृष्णाजी असें देतात; परंतु रा. ब. पारसनीस यांनी 'इतिहाससंग्रहा'च्या पहिल्या वर्षाच्या दहाव्या व अकराव्या अंकात प्रसिद्ध केलेल्या मोऱ्यांच्या हकीकतनाम्यांत कृष्णाजी बाजी असें याचे नाव दिलें आहे.

अनेक वेळां त्याच्याशी सलोख्याचे बोलणे लावून आपल्या मसलतीने राहावयास त्याला सांगून पाहिले होते.[१] महाराजांनी त्यास असें सांगून पाठविलें कीं, 'तुम्ही आपणांस राजे म्हणविता तें केवळ व्यर्थ होय. आम्ही खरे राजे. आम्हांस श्रीशंभूनें राज्य दिलें आहे. तुम्ही विजापूरकरांस कर देता तो देण्याचे बंद करून आम्हांस देत जावा, व आमचे अंकित व्हावें. हें मान्य होत नसल्यास सगळेच उत्पन्न तुम्ही भोगावे व आम्हांस जरूर लागेल तेव्हां पांच हजार लोक मदतीस देत जावे. तुम्हांवर कसेही संकट आलें तरी आम्ही तुमची कुमक करूं. आमचे अंकित न होतां बदफैल व्हाल तर तुमची जावळी हस्तगत करून तुम्हांस कैद करून ठेवू.' हें त्याला मुळीच मान्य झालें नाही.

त्यानें महाराजांस असा कुऱ्याचा जबाब पाठविला कीं, 'तुम्ही काल राजे झाला[२] तुम्हांला राज्य कोणी दिलें? आपल्या घरीं आपणांस फुकटचे राजे म्हणवून घेतलें तर तें कोण मानील? जावळीला याल तर तुमचा एक माणूसही परत जाणार नाहीं. तुमच्यांत पुरुषार्थ असेल तर उद्या येणार ते आजच यावें. आम्ही कोकणचे राजे आहो, श्रीमहाबळेश्वराच्या कृपेने आम्ही राज्य करीत आहो. श्रींच्या कृपेने आम्हांस पातशहाने राजे हा किताब दिला आहे. मोरचेल व सिंहासन ही आम्हांस त्यानें दिली आहेत. आम्ही कैक पिढ्या जावळी येथें राज्य करीत आहो. आमच्याशी कटकट कराल ती विचार करून करा. तुम्हांला वरकड मुलूख आहे. येथें उपाय कराल तर तो अपाय होईल. यश न घेता अपयशास पात्र होऊन जाल!' महाराजांनीं त्यास असा धमकीचा निरोप पाठविला कीं, तुम्ही आपणांस राजे म्हणावयाचे सोडून देऊन व मोरचेल वगैरे राजचिन्हे एकीकडे ठेवून रुमालाने हात बांधून भेटीस याल व आमची चाकरी कराल तर ठीक आहे. बदफैली कराल तर प्राणास मुकाल!' ही धमकी मोऱ्यानें जुमानली नाहीं.

हा मोऱ्याच्या ताब्यांतला डोंगराळ व बिकट मुलूख आपल्या हातीं आल्यावांचून सगळा घाटमाथा आपल्या कबजांत येत नाही व त्यावर राहून यवनांस शह देण्याचा जो आपला विचार तो चांगलासा साधत नाही व कोंकणपट्टीत आपली सत्ता निर्वेध स्थापित होत नाही असे ध्यानांत येऊन त्या मोऱ्याचें अजीबात उच्चाटन करण्याचा महाराजांनी विचार केला; परंतु त्याच्या पदरी आपल्याप्रमाणेंच शूर मावळे वगैरे लोकांचा भरणा असून त्याचा भाऊ सूर्यराव व कारभारी हणमंतराव हे मोठे योद्धे आहेत, तेव्हां त्याच्यावर एकदम चालून गेलों असता आपल्या लोकांची पुष्कळ खराबी होईल व आपणांस हटकून यश येण्याचा संभव फार कमी आहे असें त्यांस वाटून त्यास युक्तीने जेर करण्याचा त्यांनी बेत केला. मग त्याच्या मुलखांतील किल्ल्यांची वगैरे वास्तविक स्थिती कशी काय आहे तें पाहून येण्यासाठी महाराजांनी रघुनाथ बल्लाळ यांस कांहीं लोकांनिशीं पाठविलें. त्याच्या मुलखात युक्तीने प्रवेश करून[३] तेथली सगळी हालहवाल पाहून त्यानें महाराजांस असें लिहून कळविले कीं, 'आपण कांहीं निमित्तानें ह्या प्रांताकडे सैन्यानिशीं यावे व आम्ही सूचना पाठवू तेव्हां घाटाखाली उतरावे ह्यावरून काहीं लोक तिकडे पाठवून महाराज स्वतः राजगडावरून निघाले व मोठ्या त्वरेने पुरंदरास जाऊन तेथून महाबळेश्वरास देवदर्शनाच्या निमित्ताने गेले. तेथल्या जंगलांत आपल्या लोकांची जमाजम करून ते तेथें तयारीने राहिले व आपण जवळ आल्याचे रघुनाथ बल्लाळ यास त्यांनी कळविले. तेव्हां

१ असें सांगतात की, महाराजांनी स्वतः ह्या मोऱ्याच्या भेटीस जाऊन त्याच्याशी बोलून त्याला वश करून घेण्याचा प्रयत्न केला; पण तो काहीं केल्या वळला नाहीं. उलट त्याने त्यांस पकडून कैद करण्याचा घाट घातला; पण असा दगा घडण्याचा संभव वाटून ते ह्या बाबतींत पूर्वीपासूनच सावध होते. ते तेथून लागलेच निसटून गेले. (रा. ब. पारसनीसांचे महाबळेश्वर वर्णन पाहा.)

२ असें सांगतात की, पूर्वी जिजाबाई शिवाजीमहाराजांस घेऊन महाबळेश्वरास देवदर्शनाला आल्या होत्या. त्या वेळीं ह्या मोऱ्याच्या तीन सुदंर मुली पाहून जिजाबाईंनी आपल्या ह्या पुत्रास मागितली. तेव्हा भोंसल्यांचें घराणे आपल्याहून हीन आहे अशा सबबीवर ही त्याची मागणी त्यानें कबूल केली नाही. (किंकेड, पृ. १४७)

३ शि. दि. म्हणतो की, चंद्ररावाचा कारभारी हणमंतराव याच्याशी प्रथमतः लग्नसंबंध जुळविण्याचे बोलणे करण्याच्या मिषाने रघुनाथ बल्लाळ त्याच्याकडे गेला होता व तो बेफाम पाहून त्याचा त्यानें दयाने वध केला; व नंतर महाराजांनी चंद्ररावाशीं युद्ध करून त्यास रणात ठार केले व जावळी काबीज केली. रायरीच्या बखरींतही बहुतेक असाच मजकूर आहे. त्यात असें सांगितले आहे की, हणमंतरावाला महाबळेश्वरी गाठून तेथें त्यांचा वध केला व मग महाराजांनी महाबळेश्वर व जावळी मोऱ्याशीं लढून काबीज केली.

तो जावळीहून निघून महाराजांपाशी गेला. नंतर महाराज महाबळेश्वरावरून निसणीच्या घाटाने उतरून जावळीस गेले व हशमगडास वेढा घालून मोऱ्याशी लढू लागले. एक महिनाभर तेथे[१] रण माजून राहिलें. शेवटी कृष्णाजी चंद्रराव आपल्या लोकांनिशी जावळी सोडून पळाला आणि रायगडावर जाऊन राहिला. त्याचा पाठलाग करून महाराजांनी रायगडावर चढाई केली. मोऱ्यांनी तो किल्ला तीन महिने लढविला; पण शेवटीं त्यास हार खावी लागून तो महाराजांस शरण आला, आणि रायगड त्यांनी सर केला. महाराजांनी कृष्णाजी बाजीचा बहुमान केला आणि त्याला आपल्याबरोबर चाकणास नेले. मोऱ्यांची पुनः जावळी येथें स्थापना करून हा आपला अंकित होऊन राहील असें करावे व त्याच्याकडे थोडेसे लोक ठेवून प्रसंग पडेल तेव्हां आपणांस मदत करावयास येण्याविषयीं याच्याकडून करार करून घ्यावा असें महाराजांच्या मनांत होतें; परंतु चाकणच्या किल्ल्यावर असतां ह्या मोऱ्यानें मुधोळच्या व्यंकाजी घोरपड्याशी संधान बांधून आपली सुटका त्याच्या साहाय्यानें करून घेण्यासाठी त्याला त्यानें पत्रें पाठविलीं. तीं महाराजांच्या हाती लागलीं तेव्हां त्यांनी मोऱ्यांस म्हटलें कीं, 'तुम्ही रायगड येथें आमच्याशी इमानाने वागण्याची आणभाक केली असून व्यंकाजी घोरपड्यास हे फितुरीचे कागद पाठविलें तर तुम्ही मोरे बेईमान आहां,' असा त्याच्यावर ठपका ठेवून त्याचा शिरच्छेद केला. मोऱ्याच्या बायकामुलांस महाराजांनीं पुरंदरास नेऊन ठेविले होतें. त्याचे दोघे मुलगे होते त्यांस थोडीशी जहागीर देऊन त्याच्या कुटुंबाची व्यवस्था लावावी असें त्यांच्या मनांत होतें; परंतु ह्या मुलांनीही विजापूरकरांकडे गुप्त पत्रव्यवहार केला, तो महाराजांच्या हाती आल्यामुळे त्यांनीं त्यांस पुण्यास नेऊन त्यांचा वध केला[२] आणि मोऱ्याच्या बायकांस व मुलींस सोडून दिलें.

---

१ मोरे घराण्याचा हकीकतनामा.

२ ह्या मुलांची नावे कृष्णाजी व बाजी अशीं कित्येक बखरींत दिलीं आहेत; परंतु ती बरोबर नाहींत; कारण त्याच्या बापाचे नांव कृष्णाजी बाजी असें होतें. महाराजांनी कृष्णाजी याचा अशाच कारणानें वध केला होता ही गोष्ट दग्याच्या प्रकाराशी जुळेना म्हणून त्याच्या नावाचा असा विग्रह केला असावा. रायरीच्या बखरींत असें आहे की, हल्ला करून जावळी हस्तगत केली व बाजीराव कृष्णराजे (कृष्णाजी बाजी) सापडले त्यास स्त्रियासुद्धा कैद केलें व त्यास पुण्यास नेऊन अभ्यंत भोजन घालून त्यांचा पुण्याच्या दक्षिणभागीं शिरच्छेद केला. कित्येक बखरींत असें म्हटलें आहे की, महाराजांनीं रघुनाथ बल्लाळ व संभाजी कावजी यांस चंद्रराव मोऱ्याकडे सोयरीक जुळविण्याच्या मिषाने पाठवून त्याच्या करवी त्याचा दग्याने वध करविला आणि मग जावळीवर हल्ला करून ती काबीज केली. ह्या झटापटींत चंद्ररावाचा शूर कारभारी रणात पडला आणि त्याचे दोघे मुलगे बाजी व कृष्णाजी यांस पाडाव करून महाराजांनी पुण्यास नेले. त्यास थोडीशी जहागीर देऊन त्याची चांगली व्यवस्था लावण्याचा महाराजांचा इरादा होता; परंतु त्यानी विजापूरकरांशी गुप्त पत्रव्यवहार करून कारस्थान केले व तेथून पळून जाण्याचा विचार केला. हे त्याचे कागदपत्र मुद्देदस्त करून महाराजांनी त्याच्यापाशी रुजवात केली व त्याचा वध केला. कृष्णाजी बाजी चंद्रराव मोरे याला पहिल्याने दग्याने मारवून मग महाराजांनी जावळीवर चढाई करून त्याच्या लोकांशी लढून ती घेतली असा मजकूर कित्येक बखरींमध्ये आहे. तो खरा मानून आम्ही तो ह्या चरित्रग्रंथाच्या पहिल्या आवृत्तीत दिला होता. परंतु रा. ब. पारसनीस यांनी 'इतिहाससंग्रहा'च्या पहिल्या पुस्तकाच्या दहाव्या व अकराव्या अंकात चंद्रराव मोरे याचा 'हकीकतनामा' प्रसिद्ध केला आहे. तो जेधेदेशमुखाची 'शकावली' इ.स. मंडळाच्या चतुर्थ संमेलनाच्या अहवालात प्रसिद्ध केली आहे. ती व रा. राजवाडे यांनी आपल्या १८ व्या खंडाच्या पाचव्या लेखांकात एका त्रुटित शकावलीचे काहीं बंद प्रसिद्ध केले आहेत ते आमच्या पाहण्यात आले. त्यांवरून ह्या दग्याच्या प्रकाराविषयी आम्हास जो संशय वाटत होता तो दृढ होऊन प्रकृत मुळात दिलेली हकीकत आम्हांस खरी आहे असें वाटतें. ही हकीकत अर्थात् बहुतेक चंद्रराव मोरे याच्या उपरिनिर्दिष्ट हकीकतनाम्याच्या आधाराने लिहिलेली आहे आणि ती जेधे याच्या शकावलींतील संक्षिप्त टिप्पणांशी जुळते. तींत असें म्हटलें आहे की, शके १५७७ त पौष चतुर्दशीस जावळी लढून घेतली आणि हा मोरे रायरी येथें जमाव करून होता त्यास जेर करून तो किल्ला शके १५७८ च्या वैशाख महिन्यात घेतला व काहीं देशमुखाच्या मध्यस्थीनें चंद्रराव मोरे महाराजांस शरण आला. हा शेवटला उल्लेख रा. राजवाड्यानी छापलेल्या शकावलींतही आढळतो. ही त्यानीं छापलेली त्रुटित शकावली जेधे याच्या शकावलीशी बहुतेक जुळते. रायरीच्या बखरींतला व शिवदिग्विजयातला उल्लेख वर एका टिपेत दिलाच आहे. त्यावरूनही असें दिसते कीं, कृष्णाजी बाजी चंद्रराव मोरे याचा दग्याने वध झाला नव्हता. आतां येथें सहजी असा प्रश्न उद्भवतो की, सभासद जो, बहुतेक पहिला बखरकार व ज्याला खरी हकीकत माहीत असण्याचा विशेष संभव. त्याच्या लेखात हा दग्याचा भ्रामक मजकूर नमूद झाला कसा? याचे एक सबळ कारण असें दिसते की, चंद्रराव हें नाव नसून मोरे घराण्याच्या मूळपुरुषास हा यवनाकडून किताब मिळाला होता. तो त्या घराण्यातले पुरुष आपल्या नावापुढे लावीत असत. कृष्णाजी बाजी नामोहरम झाल्यावर त्याचा बंधू हणमंतराव, जो तळकोकणात राजा

ह्या मोऱ्याचा हणमंतराव म्हणून एक मोठा पराक्रमी बंधू होता, तो सदरील धामधुमीतून निसटून गेला होता. जावळी महाराजांच्या हातीं गेल्यावर तो तळकोकणांत राजा होऊन बसला होता. तो मोठा शूर व हिंमती असल्यामुळें जावळी परत घेण्याची खटपट तो करील या भीतीनें महाराजांनी त्याच्याशी कांहीं राजकारण करण्याच्या मिषाने संभाजी कावजीस त्याच्याकडे रवाना केलें. त्यानें हणमंतरावाकडे जाऊन त्याच्याशीं मोठ्या स्नेहभावाचे बोलणे लाविलें. तो म्हणाला : ''होणार तें घडून आलें. तें तुम्ही मनांत ठेवू नका. तुमचे कल्याण करावे असें महाराजांच्या मनांत आहे. तुमचा त्यांचा शरीरसंबंध घडावा ह्यासाठी त्यांनीं मला तुमच्याकडे पाठविलें आहे. तुमच्या केसासही धक्का लागणार नाहीं असें अभय महाराजांनी तुम्हांस दिलें आहे. तरी झाल्या गोष्टीबद्दल अणुमात्र संशय न धरितां महाराजांचा मनोरथ तुम्ही सिद्धीस न्यावा. असें केल्याने महाराज संतोष पावतील.'' ह्याप्रमाणें संभाजीने कृत्रिमभाव बिलकूल न दाखविता त्याच्याशी एकांती भाषण करितां करितां त्याच्या पोटांत कटारीचे वार चालवून त्याला जिवे मारले.[१]

ह्याप्रमाणें जावळीप्रांत काबीज करून मोऱ्याच्या ताब्यांतले सगळे कोटकिल्ले महाराजांनी हस्तगत केले व तिकडील प्रांतांत आपला अंमल बसविला. मोऱ्यानें आपल्या गडावर द्रव्यादिकांचा संग्रह पुष्कळ केला होता. तो सगळा महाराजांस आयतच लाभला. मोऱ्यांच्या आश्रयाने शिवतर खोऱ्यात बाबाजी कोंडदेव[२] ह्या नांवाचा एक ब्राह्मण होता. मोऱ्याचा नायनाट करून महाराज त्या प्रांतांत अंमल बसवू लागले तेव्हां हा ब्राह्मण शिरजोर होऊन त्यांस मुळींच जुमानीना. त्यानें आसपासच्या प्रांतांत पुंडावा आरंभिला. त्यावरून त्यास पकडून कैद केलें. ब्राह्मणास जिवे मारू नये असा महाराजांचा भोळा समज असल्यामुळें त्याचे डोळे काढण्याचा हुकूम त्यांनी दिला.

ह्या मोऱ्याच्या प्रांतांत वाईजवळ गोळेवाडी म्हणून एक गाव आहे. तो गोळे नांवाच्या एका मराठे सरदाराच्या ताब्यांत होता. मोरे नामोहरम झाल्यावर हा सरदार स्वतंत्र होऊन बसला. महाराजांनी त्याच्यावर चालून जाऊन त्याचा मोड केला आणि गोळेवाडी काबीज केली. ह्या धामधुमीत महाराजांच्या एका ब्राह्मण सरदाराने ह्या गोळ्याची सून कैद

होऊन बसला होता, त्यानेही हा किताब धारण केला असावा; आणि सोयरिकीचे बोलणे करण्याच्या मिषाने संभाजी कावजी याने त्याला एकांतीं गाठून त्याचा वध केला असें सभासद म्हणतो आणि कृष्णाजी बाजी चंद्रराव याचाही घात अशाच उपायाने केला असें तो म्हणतो; पण आपला बघू. ज्या युक्तीला बळी पडला तिचाच आपल्यावरही प्रयोग करावयास संभाजी कावजी आला असतां त्याजवर हणमंतरावानें भरवसा ठेवला कसा याचा चमत्कार वाटतो. तेव्हा अवातर पुराव्यावरून कृष्णाजी बाजी याचा असा दग्याने वध झाला नसून हणमंतरावाचाच झाला हें खरें असावें; आणि ह्या हणमंतरावानें चंद्रराव हा किताब धारण केला असल्यामुळे सभासदाने दोघेही वादविषयक दग्याला बळी पडले असें लिहिले असावें; आणि त्याच्या नंतरच्या काही बखरकारानी हाच प्रवाद अंधपरंपरान्यायानें खरा मानून आपआपल्या लेखात नमूद करून ठेवला असावा. हणमंतराव मोऱ्याकडे संभाजी कावजी सोयरिकीचे बोलणे करण्याच्या मिषाने गेल्याचा उल्लेख बऱ्याच बखरींत आहे. हा अर्थात खरा असावा; पण कृष्णाजी बाजीसारखा कुर्रेबाज व धूर्त राजा जो शिवाजीमहाराजांस तुच्छ लेखीत असें त्यानें महाराजांकडच्या सोयरिकीचे बोलणे करावयास आलेल्या ब्राह्मणावर विश्वास ठेवून त्याशीं एकांतात गोष्टी केल्या असाव्या हें मुळीच संभवत नाहीं, आणि रघुनाथ बल्लाळाला एकट्याला हें असें साहस करण्याचें धाडस झालें असावें असेही म्हणवत नाहीं. त्या हुशार ब्राह्मणाला जावळीच्या प्रांताची स्थिती कशी काय आहे, हें पाहून यावयास महाराजांनी पाठविले होतें एवढ्याच एका गोष्टीवरून त्या ब्राह्मणावर असा दगा केल्याचा आरोप केला आहे. खरें पाहता जावळी काहीं अशा दग्याने सहज हातीं आली नाहीं. महाराजांस तेथें चारपाच महिने लढाई करावी लागली. ह्या वादात आणखी एक मुद्द्याची गोष्ट ही ध्यानात ठेवण्यासारखी आहे की, वादविषयक दग्याचा प्रकार नमूद करणारे कित्येक बखरकार म्हणतात की, ह्या मोऱ्याचे बाजी व कृष्णाजी असे दोन मुलगे महाराजांनी पाडाव करून पुण्यास नेले होते. त्यांनी घोरपड्यांशी पत्रव्यवहार केल्यावरून त्याचा महाराजांनी शिरच्छेद केला. ही जी त्याच्या मुलाची नावे दिलीं आहेत तीं खरी नसावी; कारण ह्या मोऱ्याचें नाव कृष्णाजी बाजी असें होतें. यावरून पाहता पुण्यास शिरच्छेद केला तो त्याचा, त्याच्या मुलाचा नव्हे असें म्हणावे लागतें.

१ हा मजकूर सभासदाच्या बखरींतून घेतला आहे. चिटणीस एवढेच म्हणतो कीं, हणमंतरावास संभाजी कावजीने मारले. शेडगावकरांच्या बखरींतही असाच मजकूर आहे.

२ सभासद ह्याचे नांव बाजी कोडणे राऊ असें देतो.

करून महाराजांपुढे आणून उभी केली. ती अतिशयित सुंदर असल्याकारणानें महाराज तिचा अंगीकार करतील असें ह्या ब्राह्मणांस वाटलें होतें; परंतु महाराज पापभीरु असल्याकारणानें त्यांनी कल्याणच्या मोहिमेत सांपडलेल्या सुंदर यवनीस पाहून जे उद्गार काढले तेच ह्या समयी काढिले असें म्हणतात.[१]

हिरडस मावळांत बांदल देशमुख होता. त्यास आपला अंकित करण्याचा प्रयत्न महाराजांनी त्याच्याशी सामोपचाराचें बोलणे लावून केला. परंतु तो असल्या सौम्य उपायाने वश होईना. तो रोहिडानामक किल्ल्यांत प्रबळ होऊन बसला होता. त्या किल्ल्यावर महाराजांनी रात्रीचा अकस्मात् छापा घालून त्यास गाठले. आपल्यावर प्रत्यक्ष शिवाजीमहाराज पुष्कळ लोकांनिशीं चालून आले आहेत, त्यांच्यापुढे आपला निभाव लागणार नाहीं, हें त्या बांदलास पक्के ठाऊक होतें. तरी शेवटपर्यंत लढण्याचा निर्धार करून तो आपल्या लोकांसह महाराजांवर तुटून पडला. उभय पक्षाकडील लोक मोठ्या शौर्याने लढले. खुद्द बांदल हाती शस्त्र घेऊन रणात लढत होता. अखेरीस त्याचा मोड होऊन तो समरांगणांत पडला. तेव्हां त्याचे उरलेले लोक निरुपाय होऊन महाराजांस शरण आले. त्यांत बांदलाचा दिवाण बाजीप्रभू देशपांडे हा प्रमुख होता.[२] ह्या देशपांड्याची मर्दुमकी पाहून महाराज फार खूष झाले. त्याला त्यांनी मोठ्या औदार्याने व ममतेने वागवून त्याची वतनवाडी त्याच्याकडे कायम केली. पुढें हा देशपांडे महाराजांशी मोठ्या इमानाने वागूं लागल्यावरून त्यास त्यांनी आपल्या नोकरीस ठेविले. त्याला एका पायदळ तुकडीचा सरदार केलें. हा हुषार व शूर पुरुष पुढें महाराजांच्या उपयोगी कसा पडला हें यथास्थलीं सांगू.

बांदलास नाहीसा केल्यावर सगळ्या मावळप्रांतांत महाराजांचा अंमल निर्वेधपणे बसला. त्यांतला सगळा पुंडावा नाहींसा करून रयतेस निर्भय केलें. त्या प्रांतात सर्वत्र जमीनमहसुलाची चांगली शिस्त लावून दिली. प्रजेला हितावह असे कौल देऊन सर्व जमीन लागवडींत येईल असें केलें. आपल्या लष्करांत नोकरी धरावयास जे लोक राजी असत त्यांस ती देऊन आपलें सैन्यबळ वाढविण्याचा क्रम महाराजांनी एकसारखा चालविला होताच. जावळीच्या मोऱ्याच्या पदरचे पुष्कळ उमदे लोक महाराजांस आयते सापडले, त्यांचा संग्रह महाराजांनी मोठ्या खुषीनें केला.

जावळीचा व त्याच्या आसपासचा जो मुलूख सर केला तो आपल्या हाती सुरक्षित राहावा ह्यासाठी कृष्णानदीच्या उगमासन्निध बिकट व खडकाळ जागा पाहून तेथें एक भक्कम किल्ला बांधावा असें महाराजांच्या मनांत आलें. हें काम त्यांनी मोरो त्रिंबक पिंगळे यास सांगितलें. हा पिंगळे मोठा हुशार पुरुष होता. त्याचा बाप शहाजीराजांच्या नोकरीस असून राजे कर्नाटकांत गेले तेव्हा त्यांच्याबरोबर हा तिकडे गेला होता. तेथें त्यास आपल्या बापाच्या व शहाजीराजाच्या हाताखाली त्या धामधुमीच्या काळास योग्य असें शिक्षण व अनुभव ही प्राप्त झाली होती. तो स. १६५३ च्या सुमारास महाराष्ट्रात परत येऊन महाराजापाशी नोकरीस राहिला होता. त्याला जी जी कामगिरी सांगावी ती तो मनःपूर्वक इतबाराने व हुशारीने करी, हे पाहून महाराजांचा त्याच्यावर भरवसा बसला होता. त्याच्या हातून हें किल्ला बांधण्याचें काम चांगले होईल असें महाराजांस पक्के ठाऊक होते. त्याप्रमाणें त्यानें तें काम उत्तम प्रकारे बजाविले व महाराजांची त्याच्यावर विशेषच मेहेरबानी बसली. ह्या किल्ल्याचे नांव प्रतापगड असें ठेवले. ह्या वेळी महाबळेश्वराच्या देवालयाचा जीर्णोद्धार महाराजांनी करून कृष्णानदीच्या उगमापाशी एक देवालय व पोवळी बांधिली.

---

१ मि. किंकेड, पृ. १५३.

२. महाराष्ट्र साहित्य नावाचे एक मासिक पुस्तक अलीकडे प्रसिद्ध होऊ लागलें आहे. त्यातील ऐतिहासिक साहित्य ह्या सदराखाली पहिल्या अंकात ह्या देशपांड्यांच्या वंशजांकडे सापडलेलीं तीन पत्रे प्रसिद्ध केलीं आहेत, त्यातल्या पहिल्या पत्रावरून असें दिसते की, ह्या कृष्णाजी नाईक बांदलाचा पराभव दादाजी कोंडदेवाने पूर्वी एक वेळ केला असून त्यास कैद केलें होतें. दादाजी कोंडदेवाचा या बांदलाने एक वेळ पराभव केला असून जेधे याने त्यास दादाजीच्या भेटीस आणून त्याचा समेट केल्याची हकीकत मागे सातव्या भागाच्या आरंभीच्या एका टीपेत रा. राजवाडे यांच्या पंधराव्या खंडातील ३०२ लेखांकाच्या आधाराने दिली आहे. जावळीच्या चंद्रराव मोऱ्याशीं महाराजांनी लढाई केली तेव्हा हा बांदल महाराजांच्या पक्षाने लढल्याचा उल्लेख जेधे शकावलीत केला आहे. तो खरा मानला तर हा बांदल पुढे पुनः महाराजांस जुमानीनासा झाला असावा, किंवा बांदल ह्या आडनावाचे अनेक देशमुख असावे, असे मानावे लागते.

ह्यानंतर औरंगजेबाने विजापूरसरकारावर स्वारी करून त्याचा पराभव केला, व त्याच्याशी तह करून पुनः दिल्लीकडे कूच केलें. ह्या मोगलांच्या मोहिमेमुळे आपल्या ताब्यातील मुलखास उपद्रव होऊं नये म्हणून महाराजांनी कोणती युक्ती केली हें मागल्या भागात सांगितलेंच आहे. औरंगजेबासारख्या धूर्त व क्रूर पुरुषाला हुलकावण्या दाखवून अजीबात फसविले, व त्यास नम्रता दाखवून विजापूरकरांच्या अंमलांत हवा तसा धिंगाणा घालण्याची मुभा त्याजकडून मिळविली. पुढें तो उत्तरेकडे निघून गेल्यावर महाराजांनी कोकणप्रांत काबीज करण्याचा क्रम पुनः सुरू केला. समुद्रकिनाऱ्याची रत्नागिरी, विजयदुर्ग, सुवर्णदुर्ग, साळशी, खारेपाटण वगैरे ठाणी त्यांनी हस्तगत केली.

ह्या वेळी सातशे पठाण महाराजांकडे नोकरी मागावयास आले. मोगलांशी चालू असलेले युद्ध आटोपल्यावर विजापूरसरकारानें ह्या पठाणांस आपल्या नोकरीवरून दूर केलें होतें. ते भटकत भटकत पुण्यास महाराजांपाशी येऊन म्हणाले कीं, ''आम्हांस आपल्या लष्करांत नोकरीस ठेवा. आपली कीर्ती ऐकून व आपण शहाजीराजे भोसले यांचे प्रतापशाली पुत्र आहां हें जाणून आपणांकडे आश्रय मिळेल ह्या आशेनें आम्ही आलों आहो. आम्हांस नकार सांगू नये. अशी गळ त्या पठाणांनी घातली असता ह्या यवनांस नोकरीस ठेवावे कीं कसें याचा विचार महाराजांस पडला. जवळच्या कित्येक लोकांचे म्हणणे असे पडलें कीं, 'हे दुष्ट यवन असून दिल्लीच्या किंवा विजापूरच्या बादशहाने यांना भेदमंत्र देऊन पाठविलें असावें. हे पहिल्याने विश्वास दाखवून संधी पाहून आपला घात करतील. यांना कोठेच कशी नोकरी मिळाली नाही? त्यांच्या गुणस्वभावांविषयींची माहिती आपणांस कांहीच नाही, यास्तव यांस नोकरीस ठेवणे बरोबर नाही.' महाराजांच्या पदरी गोमाजी नाईक पानसंबळ या नांवाचा एक हवालदार होता. हा जाधवांकडचा नोकर जिजाबाईचे लग्न झालें तेव्हा सेवेसाठी म्हणून दिला होता. जिजाबाईवर जें पुढे अनेक सुखदुःखांचे प्रसंग आले त्यांत तिच्या जवळ राहून त्यानें तिची व आपल्या या छोट्या धन्याची सेवा अत्यंत इमानाने व हुशारी केली होती. शिवाजीमहाराजांनी स्वराज्य स्थापनेचा घाट घालून तत्सिद्ध्यर्थ उद्योग आरंभिला तेव्हां हा परम विश्वासू आहे असे पाहून त्यांनी त्याची योग्यता वाढवून त्यास हवालदार केलें होतें. ह्या गोमाजीनें ह्या समयीं महाराजांस अशी मसलत दिली कीं, ''आपण धनी आहां. आपला लौकिक ऐकून हे आले आहेत. यांना विमुख पाठविणे बरोबर नाही. आपण स्वराज्यवृद्धी करणार आहां ती पदरी सर्व प्रकारची शूर माणसे असल्यावांचून कशी साध्य होईल? फक्त हिंदू तेवढे नोकरीस ठेवावयाचे असा निर्धार केल्यास कसें चालेल? ज्याने राज्य करावयाचें त्यानें सर्व जातींच्या लोकांवर सारखी नजर ठेविली पाहिजे. सर्वांस आपआपल्या धर्माप्रमाणे वागूं दिलें पाहिजे. कोणत्याही जातींत गुणी व योग्य माणसे सापडली तरी त्यांचा संग्रह राजाने अवश्य केला पाहिजे. तेव्हां ह्या गोष्टीचा पुरा विचार करून महाराजांनी उचित दिसेल ते करावे.'' गोमाजी नायकाची ही मसलत महाराजांस पसंत वाटून त्यांनी त्या पठाणांस समक्ष बोलावून आणिलें, व त्याजकडें नीट बारकाईने पाहून व त्यांस पुष्कळ उलटसुलट प्रश्न विचारून त्यांचे हृद्गत ताडले आणि त्यांस आपल्या नोकरीस ठेविल्याने काहीएक दगा होणार नाही अशी पुरी खात्री झाल्यावर त्यांस ठेवून घेतले. ह्या पठाणांच्या पथकावर राघो बल्लाळ अत्रे यास सरदार नेमले. ह्यानंतर महाराज आपल्या नोकरीस मुसलमान लोक ठेवू लागले. ह्या मुसलमान नोकरांपैकीं कांहीं जणांनी त्यांच्या लष्करांत मोठ्या योग्यतेस चढून त्यांची मोठ्या हुशारीने व इमानाने नोकरी केल्याचे इतिहासांत आढळतें.

महाराज सगळी कोंकणपट्टी हस्तगत करण्याचा निर्धार करून त्या उद्योगास लागले तेव्हां त्यांस जंजिऱ्याच्या शिद्दीपासून फारच त्रास होऊं लागला. तो महाराजांनी काबीज केलेल्या किनाऱ्यावरील प्रांतास आपल्या आरमाराच्या साहाय्याने वारंवार उपद्रव देऊं लागला. तेव्हां ह्या प्रबळ रिपूस जिंकल्यावाचून आपला उद्देश सिद्धीस जात नाहीं असें लक्षांत येऊन महाराजांनी शामराजपंत पेशव्याबरोबर पुष्कळ लोक देऊन त्यास त्याच्यावर पाठविलें. त्या वेळी फत्तेखान ह्या नावाचा सिद्दी जंजिऱ्यास राज्य करीत होता. त्याला हें पक्के ठाऊक होतें कीं, आपणांवर शिवाजीमहाराजांचा डोळा असून त्यांची स्वारी आपणांवर लवकरच होणार आहे. म्हणून तो जय्यत तयारी करून होता. शामराजपंताचे व

त्याचे दंडाराजपुरीजवळ अनेक सामने झाले. त्यांत पेशव्यास हार खावी लागली. त्याच्या त्या तयारीपुढें महाराजांच्या लोकांचे कांहीं एक न चालून त्यांस मागें हटावे लागलें. त्यांचे पुष्कळ लोक नाश पावले. हें अपयश आपल्या सैन्यास आलेलें पाहून महाराजांस फार वाईट वाटलें. शामराजपंतावर त्यांची इतराजी झाली. त्यास परत बोलावून त्याच्याकडचा पेशवाईचा हुद्दा काढून घेतला व त्या मोहिमेवर रघुनाथपंतास पाठविलें. मोड होऊन मागें हटलेल्या सैन्याच्या कुमकेस आणखी लोक रवाना केले. शामराजपंताकडील पेशवाईचा अधिकार काढून घेतला तो मोरो त्रिंबक पिंगळे यास सांगितला. ह्या मोरोपंताकडे हा अधिकार आमरण राहिला. ह्याच वेळी निळो सोनदेव ह्याने चांगली कामगिरी बजाविली म्हणून त्याला बाळकृष्णपंताकडची मुजुमदारी काढून दिली. गंगो मंगाजी यास वाकनिशी सांगितली व येसाजी कंक यास पायदळाची सरनोबती दिली.

वर सांगितल्याप्रमाणें सिद्दीशीं युद्ध चालले असतां वाडीचे सावंत देशमुख यांस असें कळले कीं, शिवाजीमहाराजांनी कोंकणपट्टी काबीज करण्याचा संकल्प करून मोठे सैन्य रवाना केलें आहे, अशा प्रबळ सैन्याशी लढण्याचे त्राण त्यांस त्या वेळा मुळींच नव्हतें. ते विजापूरसरकारचे अंकित असून त्यांस त्या सरकाराचा आश्रय असल्यामुळें ते महाराजांस मुळींच जुमानीत नसत; परंतु महाराजांनी जावळीचा मोरे नामोहरम केला. आसपासचे सगळे पुंडपाळेगार हतवीर्य केले. एकंदर मोठमोठे किल्लेकोट कबजांत घेतले व इतका धुमाकूळ त्यांनी चालविला असतां विजापूरकरांच्यानें त्यांचें पारिपत्य करवले नाहीं. त्यांत आणखी मोगलाशी नुकताच जो संग्राम झाला त्यांत विजापूरसरकाराची हाडें चागलींच नरम झाली आहेत व हल्ली तर त्या दरबारांत दुफळी माजून कोणाचा पायपोस कोणाच्या पायांत नाहीं अशी अवस्था झाली आहे. तेव्हां अशा समयी त्या सरकाराकडून आपणांस कुमक मिळून शिवाजीमहाराजांशी टक्कर देण्यास आपणांस सामर्थ्य येईल याची आशा मुळींच नाहीं, असे विचार त्या सावंतांच्या मनांत येऊन महाराजांशीं स्नेह करण्यांतच आपला तरणोपाय आहे असें त्यांस वाटलें. त्यांनीं महाराजांकडे वकील पाठवून तहाचे बोल लाविलें. तें त्यांस तत्काळ मान्य झालें. ह्या तहात असें ठरलें कीं, सावंतांनी आपल्या जहागिरीच्या उत्पन्नाचा अर्धा हिस्सा शिवाजीमहाराजांस द्यावा व हा वसूल महाराजांनी आपले लोक नेमून वेळच्या वेळी करीत जावा. बाकीचे अर्धे उत्पन्न व देशमुखीचे सगळे हक्क सावंतांनी बिनतक्रार भोगावे; त्यांनी इतःपर विजापूरकरांस कर देऊं नये व आपल्या प्रांतांतील एकंदर किल्ल्यांवर आपल्या खर्चाने लोक ठेवून त्यांचा योग्य बंदोबस्त राखावा; आणि जरूर पडेल तेव्हां शिवाजीमहाराजांस तीन हजार पायदळानिशीं मदत करावी.

ह्याप्रमाणें केवळ निरुपायास्तव सावंतांनी महाराजांशी तह केला; परंतु त्या मानी देशमुखांस त्याबद्दल लवकरच पस्तावा वाटला. तहात ठरलेल्या कलमांप्रमाणें वागण्यास ते तयार नव्हते. शिवाजीमहाराजांचा आपल्याकडील ताबा उडवून देऊन ते पुनरपि विजापूरसरकाराचे अंकित झाले. ह्याबद्दल महाराजांनी कशी खोड मोडली तें पुढें यथास्थलीं सांगूं.

इकडे शिद्दीवर पाठविलेल्या सैन्याने बराच वेळ झुंज केलें; परंतु शिद्दी काही केल्या जेरीस येईना. इतक्यांत पावसाळा सुरू होऊन उभय पक्षांस लढाई तहकूब करणें भाग पडलें. पावसाळा संपताच शिद्दीची खोड चांगलीच जिरवावयाची असा निश्चय करून महाराजांनी त्याच्यावर पाठविण्यासाठी मोठे सैन्य तयार केलें व त्याजवर मोरोपंत पेशवा व नेताजी पालकर ह्या सरदारांची नेमणूक केली. त्या वर्षी पावसाळा नेहमींपेक्षां अमळ जोराचा असल्यामुळें ही नव्या दमाची मोहीम व्हावयास विलंब लागला. इतक्यांत महाराजांवर विजापूरसरकारच्या एका मोठ्या सरदाराची मोहीम झाली. तेव्हां अर्थात् तिकडे त्यांचें सगळे लक्ष लागून ही शिद्दीवरची मोहीम लांबणीवर पडली. आता हें नवे अरिष्ट महाराजांवर कोणतें आलें व त्यांतून ते कसे पार पडले त्याचें निरूपण पुढील भागांत करूं.

***

भाग अकरावा

अफझुलखानाचा वध

मागील भागांत सांगितल्याप्रमाणें शिवाजीमहाराजांनी विजापूरसरकाराचा बराच मुलूख व पुष्कळ किल्ले काबीज केले. चंद्रराव मोऱ्यासारख्या बलाढ्य सरदारास जिंकून नाहींसा केला. वाडीच्या सावंतांस आपले ताबेदार करण्याचा घाट घातला. कल्याणचा सुभा तर कायमचा काबीज केला. शिद्दीला शह देऊन सगळी कोंकणपट्टी हस्तगत करण्याचा बेत मांडला. असे सांगतात कीं, ह्या वेळीं महाराजांनी विजापूरसरकाराचे चाळीस किल्ले काबीज केले होते. हें सगळे वर्तमान विजापुरास वेळोवेळी जात होतेंच. त्यांस वठणीस आणण्याचा एक उपाय तर विजापूरसरकार करून चुकलेच होतें. तो अर्थात शहाजीराजांस पकडून आणून देहांत शासन करण्याचें भय घालण्याचा होय; परंतु ह्या उपायाचा भलताच परिणाम झाला. महाराजांनी मोगलांशी संधान करून उलटा त्या सरकारासच शह आणिला. पुढें शहाजीराजांस सोडून दिल्यावर महाराजांना पकडून आणण्यासाठी बाजी शामराज यास पाठविलें. परंतु तोही पराभूत होवून परत गेला. ह्यानंतर मोगलांशी युद्ध करावे लागल्यामुळें महाराजांस शिक्षा करण्याचा बेत त्या सरकारास कांहीं वेळ तहकूब करावा लागला. नंतर मोगलांशी तह केल्यावर व औरंगजेब राज्याधिकार बळकाविण्याच्या खटपटींत गुंतल्यामुळें त्याच्या मोहिमेची धास्ती नाहींशी झाल्यावर महाराजांना शिक्षा करण्याचा विचार त्यांच्या मनांत आला. अशा बंडखोरास होईल तितके लवकर शासन केलें पाहिजे, त्याच्याकडे इतःपर दुर्लक्ष करून चालणार नाहीं असें त्यांना वाटू लागलें.

ह्या वेळीं अल्ली अदिलशहा विजापूरच्या गादीवर बसला होता. त्याचें वय वीस-एकवीस वर्षांचे असल्यामुळें त्याची आई सगळा कारभार खवासखान नामक एक हुशार मुत्सद्द्याच्या साहाय्याने पहात असे. ही बडी साहेबीण ह्या नांवानें इतिहासांत प्रसिद्ध आहे.[१] हिने आपले एकंदर सरदार व अमीर यांना बोलावून आणून असा हुकूम केला कीं, हरामखोर शिवाजी पातशाहतीमध्यें फारच पुंडावा करीत आहे. त्याच्यावर मोहीम करून त्याला जीवंत धरून आणावा; असें बोलून ह्या कामगिरीवर कोण जाण्यास तयार आहे असें ती त्यांस विचारू लागली; परंतु ही कामगिरी पत्करण्यास कोणीही पुढें सरसावेना. कारण त्यांच्या कानी शिवाजीमहाराजांचे पराक्रम वारंवार आले असल्यामुळें त्यांचें त्यांना पराकाष्ठेचें भय वाटू लागलें होतें. त्यांच्याशी सामना करण्यास कोणीही कबूल होईना. त्या सभेस अफझलखान नामक एक सरदार होता,[२] त्यास ईर्षा चढून तो उठून उभा राहिला व कुरनिसात करून म्हणाला कीं, मला त्या पुंडावर स्वारी करण्याचा हुकूम झाल्यास त्याला चढेघोड्यानिशी जाऊन पकडून आणितो, व ह्या सिंहासनाच्या पायथ्याशी बांधून ठेवितों. त्याची मी तमा धरीत नाहीं. माझ्या भीतीनें शिवा बिल्लीसारखा होईल.' हें त्याचें वीरश्रीचे भाषण ऐकून बडीसाहेबीण खूष झाली, व त्यास पुष्कळ नजरनजराणा देऊन शिवाजीमहाराजांवर जाण्यास तिने हुकूम दिला.

---

१ मोडककृत विजापूरचा इतिहास

२ हा मोगलांशी नुकत्याच झालेल्या युद्धात शौर्य दाखवून व कर्नाटकातल्या मोहिमेत चांगली कामगिरी करून मोठी योग्यता पावला होता. वाई प्रांताची सुभेदारी याच्याकडे असून यानेच दरबारात येऊन यासंबंधाची कागाळी केली होती, असे म्हणतात. हा जातीचा भटारी असून पुढें स्वपराक्रमानें सरदारपद पावला होता. याचे मूळचे नाव अब्दुल्लखान असें होतें. ह्याच नावाने त्याचा कित्येक बखरींत व पोवाड्यात उल्लेख आहे. प्रो. सरकार ह्याचे मूळ नाव अब्दुल्ला भटारी व उपनाव अफझलखान असे देतात.

त्याच्याबरोबर बारा हजार स्वार व पुष्कळ पायदळ दिले होते.[१] शिवाय चांगला भक्कम तोफखाना, पुष्कळ अग्निबाण, उंटांवर लादलेल्या जेजाला वगैरे मुबलक युद्धोपयोगी सामान होतें. असें सांगतात कीं, हें सामान तीन वर्षेपर्यंत युद्ध करीत राहिलें तरी पुरण्यासारखे होतें. अफझुलखानानें ह्या सैन्याशिवाय आणखी दोनतीन हजार मावळे आपल्या लष्करांत नोकरीस ठेविले. कारण त्याला मावळप्रांतात स्वारी करावयाची असून ज्यांच्याशी सामना करावयाचा होता त्यांच्याजवळ मावळे लोकांचाच जमाव मोठा होता; परंतु त्या बापड्याला ठाऊक नव्हतें की, शिवाजीमहाराजांनी नोकरीस ठेवलेल्या मावळ्यांचें इमान, स्वामिनिष्ठा व हुशारी ही ह्या वेठीस धरलेल्या मावळ्यांत कदापि येणारी नव्हती.

अफझलखान ही अशी फौज घेऊन कृष्णानदीच्या अलीकडे आला, व कूचदरकूच करीत बालाघाट चढून तुळजापूर येथील भवानीच्या देवालयापाशीं त्यानें मुक्काम केला. हे मराठ्यांचें व विशेषतः भोसले घराण्याचे कुलदैवत आहे, हें जाणून त्यानें त्या देवस्थानाची नासधूस केली. देवीची गंडकी मूर्ती होती ती भोपे यांनी पाण्यांत लपवून ठेविली. देवीची मोठी मूर्ती होती ती फोडून जात्यांत भरडून तिचे त्यानें पीठ केले.[२] नंतर येथून आपला मुक्काम हलवून त्यानें पंढरपुराकडे कूच केलें, व वाटेत माणकेश्वराच्या देवालयाची नासाडी केली. त्यानें असा आडवा रस्ता धरण्याचे कारण असें सांगतात कीं, त्या वेळी पाऊस फार असल्यामुळें डोंगराळ प्रदेशांतून सैन्य नेणे अंमळ कठीण होतें. भीमातीरीं मुक्काम करून पंढरपूरच्या देवस्थानाचा नाश करण्याचें त्यानें मनांत आणिलें. हें अरिष्ट पाहून बडव्यांनी पांडुरंगाची मूर्ती लपवून ठेविली, व गावांतले सगळे लोक घरेदारे सोडून रानोमाळ पळाले.[३] त्या गांवाची व आसपासच्या इतर गांवांची खराबी करून तो पुण्याकडे वळला व वाटेत महाराजांचे जे जे किल्ले व प्रांत लागले ते ते हस्तगत करीत चालला.

इकडे हेरांनी येऊन महाराजांना अफझुलखानाच्या स्वारीची वार्ता कळविली. त्या वेळीं ते राजगडावर होते. आपणांस जीवंत धरून नेण्यासाठी खान येत आहे, त्याच्याशीं सामना करण्याची व्यवस्था कशी काय करावी, याविषयी आपल्या सरदाराची त्यांनी मसलत घेतली. तेव्हां सर्वांचा असा विचार पडला कीं, त्याच्याशी युद्ध करण्यास चांगली अडचणीची जागा पाहावी. ही अशी बिकट जागा कोणती आहे तें पाहता जावळीस जाऊन प्रतापगडावर तयारीनिशी राहावें असें ठरलें; परंतु कांही जणांचे म्हणणें असें पडलें कीं, त्याची सेना मोठी प्रबळ आहे. त्याच्याशी लढाई करून आपला निभाव लागणार नाही. यास्तव त्याच्याशी सख्य करावे हें बरें. ही मसलत ऐकून महाराज बोललेः ''यवन बेइमान आहेत. त्यांच्याशी सख्य करणें ही अनुचित गोष्ट होय. ते केव्हा घात करितील याचा नेम नाहीं. ते दुर्बुद्धी कपटी लोक विश्वास दाखवून आपला नाश करावयास चुकणार नाहीत. खरें सख्य करण्याची गोष्ट त्यांच्या स्वप्नीही यावयाची नाहीं. त्यांच्याशीं समर करून आपली खरी मर्दुमकी त्यांस दाखवून त्यांचा पराभव करण्याची मला उमेद आहे. ह्या यवनांशी सल्ला करणें नाही असा माझा कृतसंकल्प आहे. ते प्रबळ आहेत तर त्यांचा हरयुक्तीनें संहार केला पाहिजे!''

हें अरिष्ट कसें टाळावे ह्याविषयी चित्त चिंतातूर होऊन महाराज रात्रीं निद्रिस्त झाले असता त्यांना स्वप्नात तुळजापूरच्या भवानीने दर्शन देऊन म्हटलें; 'तूं कांही चिंता करूं नको. तुझ्या हाती अफझुलखानाचा वध करवून तुला

---

१ ग्रांट डफ म्हणतो कीं, याच्याबरोबर पाच हजार स्वार व सात हजार पायदळ होते. चिटणीसाच्या मते तीस हजार सैन्य होते. चित्रगुप्त म्हणतो कीं, एकंदर सत्तर हजार सैन्य होतें. पोवाड्यात बारा हजार स्वार होते असें म्हटलें आहे. राजापूर येथे इंग्रज लोकांची त्यावेळी वखार होती, तिच्या हकीकतीच्या कागदपत्रावरून असे दिसते की, अफझुलखानाबरोबर दहा हजार सैन्य होते. हे असे थोडे सैन्य असल्याकारणाने बडी साहेबीण हिने अफझुलखानास अशी मसलत दिली होती की, शिवाजीमहाराजांशी सख्य करण्याचे मिष करावे व त्यांस क्षमेची लालूच दाखवून दग्यानें पकडावें किंवा ठार मारावें.

२ पोवाड्यात म्हटलें आहे की : फोडिली तुळजा। वरती मसुदच बांधली।। मसूद बांधुनी पुढें गाय जब केली।।

३ वेगीं पंढरपुरा आला। फोडिला विठोबा। पाण्यात पुंडलीक टाकिला।। पोवाडा.

मी यशस्वी करिते. हें स्वप्न पडल्यावर महाराज जागृत झाले व उठून मुखप्रक्षालन करून त्यांनी मातुःश्रीस उठविलें आणि तें तिला निवेदन केलें. नंतर प्रातःकाळीं पदरचे कारकून व सरदार यांस बोलावून आणून स्वप्नवृत्त कथन केलें; आणि ते त्यांस म्हणाले कीं, प्रत्यक्ष जगदंबा आम्हास प्रसन्न झाली आहे. आता अफझलखानाची ती कथा काय? त्याच्याशी युद्ध करून त्याला गर्दीस मिळविण्याची हिंमत मला जगदंबेच्या प्रसादाने आली आहे.' हें ऐकून पदरचे लोक म्हणाले कीं, 'हे साहसकर्म सिद्धीस गेलें तर फारच उत्तम; नाहीं तर मात्र परम कठीण प्रसंग आहे!' असे त्यांचे सचिंत उद्गार ऐकून महाराजांनी निक्षून म्हटलें कीं, 'खानाशी सख्य केलें तरी प्राणनाश व्हावयाचा. त्यापेक्षा युद्ध करावें हेंच उत्तम. जय आला तरी उत्तम व प्राण गेला तरी उत्तम. त्रिभुवनांत कीर्ती होईल. समरांगणांत पराक्रम करून मरावे हें मला श्रेयस्कर वाटतें. शत्रूस शरण जाऊन त्याच्या हातून प्राणनाश व्हावा हें अत्यंत अनुचित होय. यास्तव खानाशी युद्ध करण्याचाच माझा निर्धार झाला आहे. त्याच्याशी लढून यश मिळाले तर ठीकच होईल, परंतु जर मी लढाईत पडलो तर माझ्या मागें माझ्या कमाईचे रक्षण करून मिळविलेल्या स्वराज्याची व्यवस्था नीट ठेवा, व माझ्या मातुश्रीच्या आज्ञेत वागून माझें नांव मागें राखा!''

ह्याप्रमाणें स्वनिश्चय कथन करून महाराजांनी तत्काळ प्रतापगडावर जावयास निघण्याची तयारी करण्याचा हुकूम दिला व आपला झालेला बेत मातुश्रीस विदित करण्यासाठी ते महालांत गेले. जिजाबाईच्या चरणांवर मस्तक ठेवून आपला काय विचार झाला आहे तो तिला सांगितला. त्या वेळी त्या दोघांसही गहिवर आला. संकट किती बिकट आहे व त्यांतून निभावण्याचा संभव किती अल्प आहे हें त्यांस कळतच होतें, तरी ह्या वेळी त्या वीरमातेनें त्या संकटातून मुक्त होण्यास दुसरा मार्गच नाही असा पोक्त विचार करून सर्व मायाजाळ एकीकडे ठेवून त्यांना अतिकष्टानें निरोप दिला. तिने त्यांच्या मस्तकी हात ठेवून असा आशीर्वाद दिला कीं, 'तू ह्या युद्धांत यशस्वी होशील. शत्रूशी मोठ्या शौर्यानं व हुशारीने लढून मला वीरमाता म्हणीव!' ह्याप्रमाणें स्वमातेची संमती घेऊन महाराज आपल्या लोकांसह प्रतापगडावर गेले.

हें वर्तमान अफझुलखानास कळले तेव्हां तो पुण्याकडचा रोख फिरवून वाईस आला व तेथें तळ देऊन मोठ्या हुशारीनें राहिला. महाराज अशा डोंगराळ व बिकट जागी जाऊन राहिलें हे पाहून खानाला फार वाईट वाटलें. तो प्रांत किती खडतर आहे हें त्यास पक्के ठाऊक होतें. तेव्हां अशा अडचणीच्या जागी शिवाजीमहाराजांशी सामना करणें आपणांस फार जड जाईल हें त्याच्या लक्षांत येऊन तो विचारांत पडला. मग त्यानें असें मनांत आणले कीं, त्यांना तिकडून हरयुक्तीने काढावे, त्यांना स्नेहभाव दाखवून व इतबार वाटेल असें करून इकडें आणावे आणि जिवंत धरून मतलब साधावा. ह्या हेतूने त्याने मावळातल्या कित्येक देशमुखांना पत्रे लिहून अनेक प्रकारे लालूच दाखवून आपआपल्या लोकांनिशी आपल्या मदतीस येण्याविषयी लिहिले. त्याप्रमाणे खंडोजी खोपडे आपले मावळे घेऊन अफझुलखानास जाऊन मिळाला. ह्या खोपड्याचे आणि कानोजी जेधे यांचे देशमुखीसंबंधाने भांडण होते. जेधे महाराजांस शरण गेल्यामुळे त्याजकडें हिरडस मावळाची देशमुखी कायम झाली होता. ह्या रागाने खोपड्याने महाराजांशी विरोध करून यवनांची ताबेदारी स्वीकारली होती. त्याने ह्यावेळी शिवाजीमहाराजांना पकडून आणतो असा लेखी करार रोहिडखोऱ्याची देशमुखी परत मिळण्याच्या आशेने अफझुलखानाशी केला होता! ह्या खोपड्याप्रमाणेच गुंजन मावळचा देशमुख विठोजी हैबतराव यास अफझलखानाने आपणांस येऊन मिळण्याविषयी लिहिले होते. अफझुलखानास खोपडे जाऊन मिळाल्यामुळे आपले वतन जाण्याची भीती आहे व आपणासही अफझुलखान बोलावीत आहे अशा आशयाचे पत्र कानोजी जेध्याने महाराजांस लिहिल्यावरून त्यांनी त्यास असा जबाब लिहिला की, तुमच्या वतनाची तुम्हास परवा असल्यास तुम्ही त्याच्याकडे जावे; पण चांगला विचार करून जावे.' ह्यावर जेधे महाराजांकडे जाऊन म्हणाला की, 'मी आपले वतन तुमच्या पायी अर्पिले आहे. तुमचे बरे ते माझे बरे.' असे म्हणून आपली मुलेमाणसे व चीजवस्तू तळेगावास पोहोचती करून तो आपले लोक घेऊन प्रतापगडावर गेला.[१]

---

१ रा. राजवोडकृत खंड १५, लेखांक ३३४, ३३५, ३३८ व ३६४ आणि खंड १७ , पृ. ३१ पहा.

अफझुलखान वाईस येऊन भिडला, तेव्हां त्याच्या गोटातील एकंदर हालचाल कशी काय आहे व त्याच्याबरोबर सैन्याची वगैरे सिद्धता कितपत आहे तें पाहण्यासाठी महाराजांनी त्या कामगिरीवर विश्वासराव नाना प्रभू[१] याची नेमणूक केली. हा विश्वासराव फकिराचा वेश घेऊन दररोज रात्रीं त्याच्या गोटात हिंडे व एकंदर बातमी महाराजांस पोचवी. त्यावरून महाराजांला कळून आलें कीं, खानाबरोबर मोठी फौज असून त्याची तयारी भक्कम आहे. आपले लोक घेऊन त्यांस समरांगणांत गांठले असतां पुष्कळ माणसांची खराबी होऊन यश हटकून येईल याची वानवा आहे. यास्तव त्याला युक्तीनें नामोहरम करून आपले लोक राखावे असा विचार महाराजांनी केला व ह्या विचारास पदरच्या लोकांचीही संमती मिळाली. मग त्यांनी अफझुलखानास असा नम्रतेचा निरोप पाठविला कीं, ''आपल्यासारख्या बलाढ्य व शूरसरदाराशी सामना करण्याचें माझ्या मनांत कदापि यावयाचे नाही. विजापूरसरकाराशी होईल त्या उपायाने सल्ला करावा अशी माझी उत्कट इच्छा आहे. मी अदिलशहाची मोठीच आगळीक केली आहे. मी सर्वस्वीं अपराधी आहें. मला बादशाहाकडून क्षमा होईल कीं नाही याची शंका वाटतें. यास्तव आपण मध्यस्थी करून मजवर हजरतीची कृपा होईल व कृतापराधाबद्दल माफी होईल असें कराल तर माझें मोठेच भाग्य होय असें मी समजेन. मी आजपर्यंत जें कांही केलें आहे त्याजबद्दल मला पराकाष्ठेचा खेद वाटत आहे. आपल्या आश्रयाने व शिफारशींने तरी माझ्या गुन्ह्याची माफी मला सरकाराकडून होईल कीं नाही कोण जाणे. तरी पण मी माझ्या ताब्यांतला सगळा मुलूख आपल्या हवाली करण्यास तयार आहें एवढेच मात्र कीं, हजरतीची मजवर कृपादृष्टी अवश्य होईल अशी खातरजमा आपण करावी.''

हा असा अगदीं गरिबीचा व भित्रेपणाचा निरोप अफझुलखानास आला तो खराच आहे असें त्या गर्विष्ठ व डौली खानास वाटलें. त्यांतील कपट त्याच्या ध्यानात आले नाहीं. शिवाजीमहाराज आतां आपल्या सगळ्या गोष्टी कबूल करून आपल्या कबजात यावयास विलंब लागत नाही असा पक्का भरवसा त्यास वाटला. तेव्हां त्यांना पुरा विश्वास दाखवून त्या बिकट जागेतून काढण्याचा आपला पूर्वोक्त बेत त्यानें कायम केला, आणि कृष्णाजी भास्कर[२] नांवाच्या हुशार ब्राह्मणास त्यांच्याकडे वकिलीस पाठविलें. खानाने ह्या वकिलास एकांती नेऊन आपलें सर्व मनोगत कळवून असें सांगितलें कीं, तुम्ही शिवाजीमहाराजांकडे जाऊन त्यांना पक्का स्नेहभाव दाखवून येणेंप्रमाणें बोध करा: ''तुमचे तीर्थरूप शहाजीराजे व आम्ही कांहीं निराळे नाहीं. त्याचा आमचा घरोबा असून बंधुत्वाचें नातें आहे. तेव्हां तुम्ही आम्हांला काही परके नाहीं. तुम्ही आमच्याविषयी यत्किंचित्ही किल्मिष मनांत बाळगू नका. तुमचे वडील शहाजीराजे यांनी महापराक्रम करून मुलूख काबीज केल्यामुळें पातशहाची त्यांच्यावर पूर्ण मर्जी आहे. ह्यासाठी तुमचे सर्वतोपरी कल्याण करून तुम्हांस तळकोंकणचें संपूर्ण राज्य आम्ही देववितो. तुम्ही घेतलेले किल्ले तुमच्याकडेच कायम राहतील असें करितो. तुमच्या मर्दुमकीबद्दल पातशहापाशी तुमची शिफारस करून तुमच्या मनासारखा सरंजाम तुम्हांला देववितो. तुमची त्यांची भेट करून देऊन तुमचे ते अतिशयित गौरव करितील असे करतो.'' खानाने हा निरोप महाराजांस देऊन वकिलास असा कानमंत्र सांगितला कीं, 'त्यास संतोष व उत्तेजन वाटेल असें बोलून ते आमच्या भेटीस बिनदिक्कत येतील असें करा. इतकेही करून ते आमच्या भेटीस यावयास तयार होत नसल्यास आम्ही त्यांच्या भेटीस येतो असें त्यांस सांगा.'

---

१ हा मावळात मुसेखोरे येथला वतनदार होता.

२ कित्येक बखरींत असे आहे कीं, अफझुलखानानेच प्रथम महाराजांकडे वकील पाठविला. महाराजांनी काही पूर्वी निरोप वगैरे पाठविला नव्हता. खानाकडील वकिलाचें नांव ग्रांट डफ 'पंताजी गोपीनाथ' असें देतो. चित्रगुप्त दत्ताजी गोपीनाथ असे देतो व शिवदिग्विजयात गोविंदपंत म्हणून आणखी एक वकील खानाकडून आला होता असे आहे. सभासदकृत बखरीच्या महाडच्या प्रतीत पंताजीपंत असे नाव आहे. शेडगावकरांच्या बखरीत खानाकडील वकिलाचे नाव दत्ताजी भास्कर असे दिले आहे. वाई प्रांतातल्या अफझुलखानाच्या जहागिरीची व्यवस्था पाहण्याचे काम ह्या कृष्णाजी भास्कराकडे असून त्याचा त्याच्यावर मोठा विश्वास होता. असे प्रो. सरकार म्हणतात.

खानाचा हा वकील आपल्याकडे येत आहे असें कळले तेव्हां महाराज गडाखालीं उतरून त्याला सामोरे गेले व वर घेऊन आले. आलेल्या मनुष्यांची व्यवस्था उत्तम प्रकारे ठेवून वकिलांचें बोलणें ऐकून घेण्यासाठी महाराजांनी कचेरी भरविली. कृष्णाजी भास्कराने खानाचा निरोप इत्थंभूत निवेदन केला. तो ऐकून घेऊन ते म्हणाले, ''ह्या मेहरबानीबद्दल खानाचे आम्ही फार आभारी आहों. आम्ही काबीज केलेल्या मुलखापैकीं थोडासा जरी आम्हांस जहागिरीदाखल मिळाला तरी तेवढ्यानेंच आम्हांला संतोष होईल. कसेही झालें तरी आम्ही पातशहाचे नोकर आहो. ह्या इकडच्या प्रांतात पुंडपाळेगार होते, त्यांचा संहार करून आम्ही सगळा मुलूख मोकळा केला आहे. सरकारी मुलखाचा नीट बंदोबस्त करून आबादानी केली आहे. जुन्या किल्ल्यांची डागडुजी करून कांही नवेही बांधिले आहेत. फौजही चांगली नामी जमा केली आहे. याप्रमाणे पातशहाची दौलत वाढविली आहे. ही सगळी आयतीच त्यांस मिळाल्यानें आम्ही त्याची मोठीच कामगिरी केली असें होणार आहे. खान आम्हांस आमच्या वडिलांप्रमाणें पूज्य आहेत. त्यांच्या भेटीस आम्ही मोठ्या प्रीतीने येऊ.'' ह्याप्रमाणें लौकिकांत जें कांही बोलावयाचें होते तें बोलून कचेरी बरखास्त केली व खानाचे लोक आपआपल्या नेमून दिलेल्या बिऱ्हाडास गेले.

महाराजांनी खानाकडील लोकांस बिऱ्हाडास जागा देतांना अशी तजवीज केली होती कीं, कृष्णाजी भास्कराचे बिऱ्हाड इतरांपासून अमळ दूर एकीकडे असावें. याचे कारण अर्थात् असे कीं, त्याला एकांती गाठून फितविण्याचा त्यांचा बेत होता. रात्री जिकडेतिकडे निजानीज होऊन सामसूम झाल्यावर मध्यरात्रीच्या सुमारास महाराज त्या वकिलाच्या डेऱ्यांत हळूच गेले, व त्यास उठवून त्याच्याशी येणेंप्रमाणें बोलले, ''तुम्ही जातीचे ब्राह्मण वर्णश्रेष्ठ आहां. आजपर्यंत मी जें कांही केलें आहे तें हिंदुधर्म व हिंदुलोक यांचे रक्षण करण्यासाठीच केवळ आहे. प्रत्यक्ष भवानीने मला अशी आज्ञा केली आहे कीं, गोब्राह्मणांचें रक्षण कर. हिंदूंची देवालये व हिंदूंचे देव यांची नासधूस करणारांचे पारिपत्य कर. हिंदूधर्मद्वेष्ट्यांचा संहार कर. जगदंबेच्या ह्या आज्ञेप्रमाणें मी जे कार्य आरंभिले आहे त्यास आपल्यासारख्या श्रेष्ठ ब्राह्मणाचे साहाय्य अवश्य हवें. आपला धर्म बुडत चालला. देवब्राह्मणांस पीडा होत आहे. सर्व भरतखंड म्लेंच्छमय होण्याचा समय आला आहे. याबद्दल तुम्हांला अवश्य खेद वाटला पाहिजे. आम्ही ही दुःस्थिती नाहीशी करण्याचा उद्योग आरंभिला आहे. तो आपल्यासारख्याच थोर पुरुषांच्या साहाय्यानें सिद्धीस जाणार आहे.'' ह्याप्रमाणे अत्यंत गोड व मोहक शब्दांनी त्याच्याशीं भाषण केल्यामुळें त्याची वृत्ती लागलीच पालटली. त्याच्या ठायी धर्माभिमान जागृत झाला. महाराजांचें असें गौरवाचे व उत्तेजनपर भाषण ऐकून तो अगदी भाळून गेला. त्यानें पाहिले कीं, हा पुरुष स्वधर्मरक्षण व स्वराज्यस्थापन करण्याच्या स्तुत्य कार्यास उद्युक्त झाला असून याच्या अंगी ह्या कार्यसिद्धीस आवश्यक असे धैर्य, शौर्य, वीर्य आदिकरून गुण उत्तम आहेत व आजपर्यंतचे याचे पराक्रम तारीफ करण्यासारखे आहेत. यास्तव याला साहाय्य होऊन याच्या यशाचा वाटेकरी होण्यातच पुण्य आहे, असा विचार करून त्यानें महाराजांपाशी शपथ घेऊन असें म्हटलें कीं, ''तुमची नोकरी इमानाने करून रहावे असा माझा निर्धार झाला आहे.'' अशी आणभाक केल्यावर त्यानें महाराजांस असें कळविले की, 'खानाचा वास्तविक उद्देश तुम्हाला पकडून विजापुरास नेण्याचा आहे. तो तुम्हांला विश्वास दाखवून भेटीस बोलावणार आहे व पकडून विजापुरास घेऊन जाणार आहे. हा त्याचा बेत कदापि फिरणार नाही.' ह्याप्रमाणें खानाच्या वकिलास वश करून घेतल्यावर पुढें काय करावे ह्याविषयी उभयतांचे काही वेळ खलबत झालें व असें ठरलें कीं, कृष्णाजी भास्कराने खानास विश्वास दाखवून तोच स्वत: गडाजवळ भेटीस येईल असें करावे; व तो असा आपल्या काबूत आल्यावर त्याचा घात करावा म्हणजे मग त्याच्या सैन्यांत गडबड उडून त्याचा हवा तसा मोड करता येईल. हे असें गुप्त कारस्थान करून महाराज स्वस्थानी गेले.

मग कांही दिवस प्रसिद्धपणें वकिलाशीं वरकरणी बोलणे झाल्यावर असें ठरलें कीं, खानाने जावळीस यावें व तेथें परस्परांच्या भेटी होऊन एकंदर करारमदार व्हावे. ह्या भेटीची व्यवस्था मुक्रर करण्याकरितां महाराजांनी आपल्याकडून

पंताजी गोपीनाथ[१] यास खानाकडे वकील म्हणून पाठविलें. हा ब्राह्मण महाराजांच्या अगदीं विश्वासांतला होता. त्याला रवाना करण्यापूर्वी एकांती नेऊन कृष्णाजी भास्कराबरोबर झालेलें सगळे खलबत त्यांनी सांगितलें आणि म्हटलें कीं, तुम्ही खानास असा निरोप द्या कीं, 'आम्हीच तुमच्या भेटीस यावें, पण आम्हांला अतिशयित भीती वाटत आहे. वाईस भेटीला यावयास आम्हांला धैर्य होत नाहीं. तुम्ही आम्हांस वडिलांसमान आहां. यास्तव मेहरबानी करून तुम्हीच जावळीस याल तर आम्ही तुमच्या मुलाखतीस अवश्य येतो. आम्हांला धीर देऊन पातशहाच्या दर्शनास घेऊन जाल व आमची त्याजपाशी शिफारस कराल तर त्यांत तुमचा थोरपणा आहे. खरा विश्वास असेल तर तुम्ही जावळीस यावयास अनमान करूं नयें. ह्याप्रमाणें त्याला पुष्कळ गौरवून सांगावे, कांहीं एक अंदेशा येऊ देऊं नये. त्याचा एकंदर रोख काय आहे व त्याच्या सैन्याची वगैरे व्यवस्था कशी काय आहे ती पाहून या.' खानाच्या वकिलास निरोप देतांना त्याजवर सुप्रसन्न होऊन महाराजांनी त्याला भरजरी वस्त्रे, मोत्यांचा चौकडा, सुवर्णाची कडी व पदके, एक अरबी घोडा, व पांच हजार होन एवढे बक्षीस दिलें व आपल्या वकिलासही वस्त्रालंकार देऊन त्याच्याबरोबर चांगला लवाजमा दिला.

कृष्णाजी भास्कराने परत जाऊन खानास असें कळविले कीं, 'शिवाजीमहाराज आपणांस शरण येऊन भेटावयास सिद्ध आहेत; परंतु त्यांना वाईस यावयास धैर्य होत नाहीं. येथें आल्याने आपला कांही तरी विश्वासघात खास होईल असें त्यांच्या मनाने घेतलें आहे. त्यांचा वकील आपल्याकडे आला आहे. त्याला आपल्या मुलाखतीस बोलवाल तर तो स्वतः शिवाजीमहाराजांचा निरोप काय आहे तो सांगेल.' मग पंताजी गोपीनाथास भेटीस बोलावून खानाने त्याच्या तोंडून महाराजांचा निरोप साद्यंत ऐकून घेतला. कृष्णाजी भास्कराने त्यावर अशी छान युक्ती केली कीं, 'जावळीस ते बोलावीत आहेत त्यापेक्षा तेथपर्यंत जाऊन कार्य साधते आहे तर का सोडा? तुम्ही होऊन जावळीस गेल्याने तुमच्या मनांत काही एक कपट नाही असें त्यांना वाटून ते तुमच्या भेटीस अवश्य येतील, व ते असे आले म्हणजे तुमचा कार्यभाग सहज साधेल.' यावर खानाने अशी हरकत घेतली कीं, 'तो जावळीसारख्या बिकट जागीं मला भेटावयास बोलावीत आहे; परंतु तेथें कांही दगा होणार नाहीं हें तुम्ही शपथेवर सांगू शकता काय?' कृष्णाजी भास्कर बोलला: 'शिवाजीमहाराजांच्या मनांत तुमच्याविषयी काहीएक कपट नाहीं अशी माझी पूर्ण खात्री आहे. या संबंधाने तुम्ही काहींएक संदेह मनांत आणूं नका. ही संधी आली आहे ती व्यर्थ दवडू नका. जावळीस जाऊन त्यांना भेटण्यास मुळींच हरकत नाहीं. तेथें आपले लष्कर घेऊन चला. त्याला तळ देण्यास पुरेशी जागा तिकडे असून गवतपाण्याचीही मुबलक सोय होण्यासारखी आहे?' ह्याप्रमाणें त्यानें खानाच्या सर्व हरकती मोडून काढून त्याच्या मनांत जावळीस जाऊन महाराजांस भेटावे व तेथें त्यास पकडून कैद करावे हा बेत चांगला भरविला. ही आपल्या वकिलाची खातरजमा खानास खरी वाटून त्यानें जावळीस जाण्याची तयारी केली व तो सांगेल तसें वागून आपला इष्ट उद्देश सिद्धीस नेण्याचा निश्चय केला. मग महाराजांचा वकील पंताजी गोपीनाथ याने अफझुलखानाचा वास्तविक बेत काय आहे त्याचा बारीक तपास काढून येऊन महाराजांस असे कळविले की, खान जावळीस येत आहे, त्यास भेटण्याची तयारी करून तुम्ही गडाखाली जावे आणि त्याला एकांती गाठून ठार करावे आणि मग त्याच्या सैन्यावर छापा घालावा.

ह्याप्रमाणें खान जावळीस यावयास सिद्ध झाला हें पाहून महाराजांनी आपल्या जवळच्या सर्व सरदारांस बोलावून पुढें काय करावे म्हणून विचारिलें. त्यांनी महाराजांस हुरूप देऊन म्हटलें कीं, 'याप्रसंगी आपण आम्हांस जी कांही कामगिरी सांगाल ती शिरसावंद्य करून तदनुरूप वर्तण्यास प्राणांपरती मेहनत करूं, व आपला उद्देश शेवटास नेऊ. आपण मुळींच चिंता करूं नये!' मग मातुश्रीस आपला उद्देश कळवून तिची मसलत विचारली. तिनेही त्यांचें आश्वासन करून म्हटलें कीं, 'तुझ्या पदरच्या विश्वासू माणसांच्या मसलतीने ठरेल तसें कर. ह्या कामांत तुला यश देण्यास

---

१ रा. राजवाडे म्हणतात की, हा पंताजी गोपीनाथ महाराजाचा जुना नोकर होता. जिजाबाईबरोबर व महाराजाबरोबर सोंगट्या खेळण्याचा याचा अधिकार होता.

श्रीजगदंबा समर्थ आहे. तुला आजपर्यंत कोणत्याच मसलतींत अपयश आले नाहीं. यास्तव ही मसलतही तूं धैर्याने व हुशारीने पार पाडशील असा मला पक्का भरवसा आहे.' ह्याप्रमाणें सर्वांचा सल्ला घेऊन महाराज पुढील कार्यास लागले.

खानास आपला पुरा विश्वास यावा म्हणून त्याच्या सोईसाठी जेवढी व्यवस्था करणें शक्य होतें तेवढी निरलसपणे करण्याचा सपाटा चालविला. त्याच्या सैन्यास घाट चढून वर येताना अडचण पडूं नये म्हणून जागोजाग असलेली दाट झाडी तोडून वाटा केल्या; त्याच्या सैन्यास तळ देण्यास प्रशस्त जागा व्हावी ह्यासाठी झाडेंझुडपें तोडून चांगले विस्तीर्ण व खुले मैदान केलें. वाटेत जागोजागी धारकऱ्यांच्या गुप्त व प्रकट चौक्या ठेवून त्यांवर कारकून नेमिले व त्यांस असा हुकूम केला कीं, खानाच्या सैन्यास ज्या कोणत्या गोष्टीची उणीव पडेल ती पुरवावी व प्रत्येक मुक्कामास मेजवानीची उत्कृष्ट व्यवस्था ठेवावी. आतां खानाच्या सैन्याच्या सोईसाठीं जी ही वाट महाराजांनी केली होती ती अशा युक्तीने केली होती कीं, त्या वाटेच्या आसपास किर्र झाडी असून तींतून पलीकडे काय आहे तें दिसूं नये. कोठेकोठे आडव्या वाटा होत्या त्यांत मोठमोठीं झाडे तोडून टाकून त्या साफ बुजवून टाकल्या होत्या.

महाराजांनी हा आपला गुप्त बेत नेताजी पालकर, मोरोपंत पेशवे व तानाजी मालसुरे यांस कळवून नेताजी पालकरास सैन्य घेऊन कोंकणांतून घाटमाथ्यावर लागोलाग बोलाविले व त्यास किल्ल्याच्या पूर्वभागी अमळ दूर दाट झाडींत दबा धरून बसावयास सांगितलें. तें अशाकरितां कीं, खानाचे लोक त्या बाजूला चढून येण्याचा संभव होता. मोरोपंताबरोबर जुने कसलेले योद्धे होते. त्याला अशी वर्दी दिली कीं, 'खानाचे बहुतेक सैन्य खालीं जावळीस तळ देऊन राहावयाचे आहे. त्याच्या आसपासच्या झाडींत तुम्ही आपल्या लोकांनिशीं लपून राहावें. नेताजीच्या साहाय्यास रघुनाथ बल्लाळ व मोरोपंताच्या साहाय्यास त्रिंबक भास्कर यांस दिलें. ह्या सर्वांस असा हुकूम केला कीं, खानाचा समाचार घेऊन फत्ते झाल्यास शिंगाचा आवाज होईल. त्याबरोबर नेताजीने पुढें चाल करून येऊन शत्रूचे जें सैन्य वर येईल त्यावर हल्ला करावा आणि गडावरून पांच तोफा झाल्या म्हणजे मोरोपंतानें जावळी येथील खानाच्या लष्करावर तुटून पडावे. कोणीही बेफाम राहू नये व लुटीवर नजर ठेवू नये.' ही अशी बाहेरील व्यवस्था करून गडावर जेथे जितके लोक व तोफा वगैरे सामुग्री हवीशी वाटली तेथें तितकी स्वत: पाहून ठेविली. जागोजाग नाकेबंदी केली. किल्ल्याच्या मागल्या बाजूच्या प्रत्येक बुरुजावर पन्नास मनुष्य व पुढल्या बाजूच्या प्रत्येक बुरुजावर शंभर मनुष्य ठेविले, शिवाय किल्ल्याच्या दरवाज्यावरून आत सदरेपर्यंत जागोजाग पुष्कळ लोक ठेवून दिलें व त्यावरील प्रमुखास अशी वर्दी दिली कीं, 'आम्ही गडावरून खालीं उतरूं लागलों म्हणजे करणा वाजेल, त्या वेळीं तुम्ही हळूहळू पुढें सरकत यावें आणि भेटीसाठी केलेल्या जागेपासून बाणाच्या टप्प्यांत राहावें.' ह्याप्रमाणे, किल्ल्याच्या दरवाजापासून भेटीच्या जागेपर्यंत टप्प्याटप्प्यांनी हजार दोन हजार लोक उभे रहातील अशी व्यवस्था केली व शेवटपर्यंत थोडेसे निवडक लोक बरोबर असावे असें ठरविलें.

गडाखाली बुरजानजीक मोकळी जागा होती तेथें खानाची मुलाखत घेण्याचे ठरवून त्या जागी सुंदर व भव्य मंडप तयार करविला. त्यांत एक मुख्य बैठकीची व दोनतीन लहान बैठकीच्या जागा करविल्या. मुख्य बैठकीची सदर फारच उत्कृष्ट करविली. वर सुंदर छत लावून त्याला मोत्यांच्या झालरी लाविल्या व जिकडेतिकडे गाद्या, पडगाद्या, लोड, गिर्द्या वगैरे सुरेख लावून ठेविली. ह्याप्रमाणें ह्या सदरा एकीहून एक उत्तम करून सर्व मंडप चांगला शृंगारिला.

ही अशी सगळी व्यवस्था करून त्यांनी खानास येण्याविषयी निरोप पाठविला. त्यावरून तो आपल्या लोकांनिशी रडतोंडीच्या घाटाचा रस्ता नीट केला होता त्यानें यावयास निघाला. ह्यावेळी त्यानें आपलें तोफा वगैरे अवजड सामान वर आणिलें नाहीं असें म्हणतात.[१] खान रडतोंडीच्या घाटाने उतरून पारानजीक कोयनेच्या काठी मुक्काम करून राहिला. ह्या वाटेनें वर येतांना त्याच्या लष्कराचे फारच हाल झाले व त्याच्या सैन्यातले पठाणलोक म्हणू लागले कीं,

---

१ काही बखरकरांचे असें म्हणणे आहे की, खानाने आपला तोफखानाही वर आणला होता.

'शिवाजी मोठा हरामखोर आहे. त्याची करामत व हिकमत कोणाला कळावयाची नाही. ह्या प्रसंगी अशा बिकट ठिकाणी चढून गेल्यावर आपली कांही धडगत दिसत नाहीं.' हे उद्गार अफझुलखानाच्या कानीं जात; परंतु त्याच्या बुद्धीस पक्का भ्रम पडल्यासारखा झाला होता. शिवाजीमहाराज अशा युक्तीने आपल्या हातीं खचीत लागतील अशी बळकट आशा त्यांस वाटल्यावरून त्यानें हें धाडस केलें. खानाच्या मुक्कामाच्या जागी तंबू राहुट्या, मंडप इत्यादिकांची तयारी करून त्याच्या लष्करास लागणाऱ्या सामानासुमानाची तरतूद चांगली करून ठेविली होती. ही सगळी व्यवस्था पाहून खान बहुत खूष झाला. त्याला आतां खास वाटूं लागलें कीं, शिवाजीमहाराजांचे दिल आपल्याविषयी साफ आहे, ते आपणांस बिनदिक्कत भेटतील व मग आपला हेतू सिद्धीस जाईल.

जावळीस जाऊन पोचल्यावर खानाने कृष्णाजी भास्करास[१] गडावर पाठवून महाराजांस असा निरोप दिला कीं, 'आम्ही खाली येऊन दाखल झालो आहो. भेटीस सत्वर यावें. विलंब लावू नये.' हा निरोप घेऊन वकील गडावर गेला. त्याच्याशी लौकिकांत कांही बोलावयाचें होतें तें बोलून मग त्याला महाराज एकांती घेऊन गेले व त्याच्याशी हितगुजाच्या गोष्टी करूं लागले. तेव्हां तो वकील म्हणाला कीं, 'आपल्याशी कबूल केल्याप्रमाणें खानास जावळीस तर आणिलें आहे. आतां खाशाखाशांची मुलाखत एकांती करवितो. ह्या समयी आपण आपला पराक्रम व आपले शौर्य यांची पराकाष्ठा करून स्वकार्य सिद्धीस न्यावे.' नंतर असें ठरलें कीं, नेमलेल्या ठिकाणीं खानाची व महाराजांची भेट आजपासून तिसऱ्या दिवशीं व्हावी. कृष्णाजी भास्कराने मात्र खानाकडून असें कबूल करवावे कीं, मुलाखतीस येताना त्यानें आपल्याबरोबर फक्त एक शिपाई सदरेस आणावा; व महाराजांनीही एकच शिपाई बरोबर न्यावा. वरकड सगळे लोक उभयतांनी दूर ठेवावे. ही व्यवस्था खानाकडून मान्य करवितो असें अभिवचन देऊन कृष्णाजी भास्कर गडाखाली आला. खानाकडे जाऊन त्यानें भेटीच्या अटी त्यास कळविल्या व वरती आणखी अशी सफाई केली कीं, शिवाजीमहाराजांना तुमचा भरवसा अद्यापि येत नाहीं. यास्तव आपला मतलब साधण्यासाठी ते म्हणतात त्या अटी मान्य करण्यास आपणांला काहीएक हरकत नाहीं. खानाला शिवाजीमहाराज केव्हा हाती लागतात असें होऊन गेलें होतें. त्यानें ह्या अटी मान्य करण्यास मुळींच आढेवेढे घेतले नाहींत. त्या त्याला तत्काळ मान्य झाल्या. भेटीची जागा तयार केली होती ती कशी काय आहे हें पाहून येण्यासाठी त्यानें आपल्या भरवंशाचे लोक पाठविले. त्यांनी ती पाहून येऊन खानास अशी बातमी दिली की, जागा चांगली मोकळी असून जवळपास फौज वगैरे कांही ठेविलेली नाहीं.

शेवटी भेटीचा समय समीप आला. खान पंधराशे निवडक लोक बरोबर घेऊन निघाला. हे पाहून कृष्णाजी भास्कर[२] म्हणाला कीं, 'एवढे लोक भेटीच्या जागी घेऊन गेला तर शिवाजीमहाराजांस तुमचा विश्वास वाटणार नाहीं व ते कदाचित गडाखालींही येणार नाहींत. तुम्ही पातशाही वजीर असून नामांकित वीर आहां. शिवाजीमहाराज आपणापुढे केवळ तृणवत आहेत. त्यांना पकडावयाला एवढी तयारी कशाला? ते कराराप्रमाणें एक शिपाई घेऊन येणार[३] तेव्हां आपणही एकच मनुष्य बरोबर घेऊन सदरेस जावे हें ठीक दिसते.' हें त्या गर्विष्ठ खानास पसंत वाटून त्यानें आपले लोक वाटेत जागोजाग ठेविले व काही जणांस भेटीच्या ठिकाणापासून बाणाच्या टप्प्यांत ठेवून तो पालखीत बसून पुढें चालला. त्याच्याबरोबर दोन हुजरे, सैदबंडा ह्या नांवाचा एक पटाईत शिपाई व कृष्णाजी भास्कर एवढेच लोक तो सदरेस आला त्या वेळी होते. त्याची अशी पक्की खात्री होती कीं, करारावरहुकूम शिवाजीमहाराज भेटावयास आले म्हणजे बस आहे. त्यांना आपण तत्क्षणीं कैद करून घेऊन जाऊं. त्याचें आपल्यापुढे तें बळ किती? ह्याप्रमाणें त्याला स्वबलाचा पूर्ण भरवसा असल्याकारणाने त्यानें आपला जामानिमा एकाद्या कचेरीस जावयाच्या वेळी करितात तसा

---

१ प्रो. सरकार म्हणतात कीं, त्याने गोपीनाथपंतास पाठविले

२ प्रो. सरकार म्हणतात की, गोपीनाथपंताने त्याला असे म्हटले.

३ पोवाड्यात म्हटलें आहे की, मोरोपंत व शामराजपंत यांस खानाला आणावयास पाठविलें असून खान चार हजार लोक घेऊन पालखीत बसून येऊ लागला तेव्हा त्यांनी त्याला ते लोक दूर ठेवावयास लावून पालखीही लांबच ठेवावयास सांगितले.

केला होता. त्याच्या अंगांत मझलीनचा झिरझिरीत अंगरखा असून एका हातांत नुसती एक तरवार होती. खान महाराजांच्या पूर्वीच सदरेस जाऊन बसला व त्यांना लवकर खाली घेऊन येण्यासाठी त्यानें आपल्या वकिलास गडावर पाठविलें. त्यानें सांगितल्यावरून महाराजांस कळले कीं, खान एका शूर शिपायास बरोबर घेऊन सदरेस आला आहे. तेव्हां महाराजांनी खानाला असा निरोप पाठविला कीं, तुम्ही फक्त एका हुजऱ्यानिशीं सदरेस बसाल तर मी खालीं येईन. त्यावरून खानाने सैदबंडास दूर जाऊन राहावयास सांगितलें.

इकडे महाराजांनी पूर्वोक्त प्रकारे सगळा कडेकोट बंदोबस्त केल्यावर स्नान, देवपूजा आदिकरून नित्यविधी उरकले. नंतर त्यांनी श्रीभवानीचे स्मरण केलें व हा आणीबाणीचा व केवळ जिवावरचा प्रसंग पार पाडण्याविषयी तिची मनोभावे प्रार्थना केली. ती इतकी सोत्कंठ होऊन केली कीं, भवानी त्यांच्या अंगांत संचरून येणेंप्रमाणें बोलली. 'अरे मुला, चिंता करूं नको, या समयी तुझ्या पाठीवर मी उभी आहें. खानास मोह घालून मी तुझ्या सन्मुख आणले आहे. तरी तूं निर्भय चित्ते अवसान धरून त्याचा वध कर! त्याचें शिर कापून माझ्या पुढें ठेव! त्याच्या रुधिराचा टिकला ललाटी लावून म्हैसा बळी देऊन मला संतुष्ट कर!' जवळच्या कारभाऱ्यांनी देवीचे हे शब्द टिपून ठेविले व अंगातले वारे जाऊन ते सावध झाले तेव्हां त्यांस ते निवेदन केले. ते ऐकून त्यांस अधिकच हुरूप आला. नंतर त्यांनी आपल्या एकंदर सरदारांस उद्देशून असें भाषण केले. ''आम्ही तर जीवित तृणप्राय समजून शत्रूच्या अंगावर चालून जात आहों यात यश आलें तर ठीकच आहे; परंतु कांही भलताच प्रकार घडला तर तुम्ही घाबरून जाऊ नका. ठरविलेल्या बेताप्रमाणें शत्रूवर चालून जाऊन त्याचा मोड करा व राज्याचे रक्षण करा. तुम्ही सर्व शूर व पराक्रमी आहां. आमची सगळी मदार तुमच्यावर आहे. तुमच्यासारखे इमानी व वीर्यशाली पुरुष साहाय्य आहेत म्हणून आम्हांस यवनांची पर्वा वाटत नाही. या समयी सर्वांनी आपआपल्या शौर्याची व पराक्रमाची पराकाष्ठा करावी. तुमची अनुकूलता आहे म्हणून मला अफझुलखानाचा मुळींच हिशोब वाटत नाहीं. आजपर्यंत केलेली कमाई आपल्या साहाय्याचें व शौर्याचे फळ आहे. ती आपली कमाई कायम राखण्यास जिवाची परवा न करता ह्या कठीण प्रसंगी झटाल तर तुमची कीर्ती अधिकच वाढेल!'' हें असें वीर्योत्साहाचें उद्दीपन करणारे भाषण ऐकून सर्व लोकांच्या अंगांत स्फुरण आलें. ते म्हणाले ''आपण आम्हांस जी जी आज्ञा कराल तदनुसार वागण्यांत आम्ही यत्किंचितही कसूर करणार नाहीं. त्यासाठी आमचे प्राणही बळी पडलें तरी त्याची आम्हांला क्षिती नाहीं. हे प्राण आपल्या चरणी एकवार वाहिले आहेत. ते आतां आमचे नव्हेत. ते स्वामिकार्यी गत झाले तर तें आम्ही मोठेच भूषण समजू.''

ह्याप्रमाणें पदरच्या लोकांत उत्साह व अभिमानही जागृत करून व त्यांच्याशीं आणखी काही निरवानिरवीच्या गोष्टी बोलून महाराज खाली जाण्याच्या तयारीस लागले. त्यांनी अंगांत जिरें घालून त्यावर झगा चढविला; तशीच डोकीस जिरेटोपी घालून वरती पागोटे घातले; चोळणा व काचा कसला; उजव्या हातांत बिचवा घेऊन तो अस्तनीत छपविला; व डाव्या हाताच्या पंजाला वाघनख चढविले. हा असा पोषाख केल्यावर महाराज पुन: देवीच्या दर्शनास गेले व मातुश्रीच्या चरणी मस्तक ठेवून गडाखाली खानाच्या भेटीस जाण्याविषयी तिजपाशीं निरोप मागू लागले. त्या समयीं त्या माउलीस गहिवर येऊन ती म्हणाली, 'बाळा जगदंबेच्या कृपेने जय पावशील. माझा तुला पूर्ण आशीर्वाद आहे. कुंतीचे पुत्र भीम व अर्जुन हे जसे महापराक्रमी निपजले तसा तूं भोसल्यांच्या कुळांत निर्माण झाला आहेस. ह्या कुळाचे नांव जगांत गाजीव! अफझुलखानास रणात ठार करून राज्याची अभिवृद्धी कर! शिवबा, मला आज कुंतीच्या पंक्तीस बशीव. खानाला जीवंत सोडू नको, त्याचे शिर तोडून आण! तुझा वडील बंधू संभाजी ह्या खानामुळे प्राणास मुकला आहे, त्याचें उसने घे!''[१]

१ रायरीच्या बखरींत असे आहे की, ह्यावेळी आपणांस जय मिळेल की नाही याची शंका वाटून महाराजांनी काही ब्राह्मणांस पुष्कळ द्रव्य देऊन काशी व गया येथे पाठविले व आपल्या जिवास धोका आल्यास आपले उत्तरकार्य त्या पुण्यक्षेत्रांत करावयास त्यांला सांगितले. त्याप्रमाणेंच त्यांनी ब्राह्मणांस पुष्कळ गोप्रदाने केली व आपली दाढी काढिली. हे सारे पाहून जिजाबाईस फार दु:ख होऊन ती रडू लागली. तेव्हा तिला महाराजांनी दूर नेऊन ठेविले. आता ह्या खानामुळे संभाजीचा वध झाल्याचा जो उल्लेख आहे त्याचा खुलासा दुसऱ्या भागातल्या एका टीपेवरून होण्याजोगा आहे. शहाजीराजांच्या कर्नाटकातल्या जहागिरीत जो बंडावा झाला होता तो ह्या खानाच्या चिथावणीमुळे झाला होता असे म्हणतात.

ह्याप्रमाणें मातुश्रीचा आशीर्वाद घेऊन महाराज गडाखाली हळूहळू उतरू लागले. त्यांच्याबरोबर तानाजी मालसुरे, येसाजी कंक, हिरोजी फरजंद, पंताजी गोपीनाथ वगैरे पाचपन्नास लोक होते. सदरेपाशी आल्यावर पालखीतून उतरून महाराज जिवा महाल्या व संभाजी कावजी यांस[१] बरोबर घेऊन आत गेले. राजे खानाला घाबरत असल्यासारखे करून मध्ये मध्ये थबकूं लागले. कृष्णाजी भास्कर खानापाशीं होताच. त्यानें त्याला असें सांगितले कीं, आपली धिप्पाड मूर्ती पाहून शिवाजीमहाराज घाबरत आहेत म्हणून ते असें करीत आहेत. यास्तव हा तुमचा हुजरेही येथून जाऊं द्या, म्हणजे त्यांना पुढें यावयाला धीर होईल. खानाला तें खरेंच वाटून त्यानें त्या हुजऱ्यालाही दूर जावयास सांगितलें. मग महाराज खानाजवळ गेले. त्यांच्याबरोबरच्या हुजऱ्याच्या दोन हातांत दोन तरवारी होत्या. तरी त्याच्या संबंधाने खानाने हरकत घेतली नाहीं.[२] महाराज जवळ आले असें पाहून खान उभा राहून त्यांस भेटावयासाठी म्हणून दोनतीन पावले पुढें सरसावला. खान ह्या वेळी अगदीं उतावळा झाला होता. त्याला आतां अशी पक्की खात्री वाटली कीं, महाराज निःशस्त्र असून आपल्या तावडींत सहज सापडतील. कारण उघडच होतें कीं, त्याचें धूड मोठे विशाल असून महाराजांचा बांधा अंमळ ठेंगणा व सडपातळ होता. कृष्णाजी भास्कराने रीतीप्रमाणें उभयतांची ओळख करून दिल्यावर ते एकमेकांस आलिंगन करावयास सरसावले, तो खानाने महाराजांची मुंडी कवटाळून[३] डाव्या काखेखाली घट्ट धरिली व हातात कट्यार होती तिचे मेण टाकून ती त्यांच्या कुशीत चालविली; परंतु त्यांच्या अंगांत जिरें होतें त्यास ती लागून खरखरलीं, अंगास लागली नाहीं. खानानेच पहिल्याने दगा करण्याचा प्रयत्न केला तेव्हां आतां आपणांस पाहिजे तें करण्यास हरकत नाहीं असें मनांत आणून महाराजांनी डाव्या हातांत वाघनख होतें ते खानाच्या पोटांत चालविले व दुसऱ्या हातांतल्या बिचव्याचाही मारा केला व त्याच्या काखेंतून आपली मुंडी चपळाई काढून घेतली. वाघनखाचा मारा होतांच खानाचे पोट फाटून आतडी बाहेर आलीं. तीं एका हाताने सावरून धरून त्यानें आपल्या हातच्या तरवारीचा एक सज्जड वार महाराजांवर केला. तो त्यांनी चपळाईने उडी मारून चुकविला. तरी तो शिरस्त्राणास निसटता लागून तें तुटून जवाइतकी जखम झालीं. इतक्यांत महाराजांनी डोळ्याचे पाते लवते न लवते तो खानावर आणखी एक वार करून त्यास अगदी घायाळ केलें व त्याच्या हातातली तरवार ते हिसकावून घेऊं लागले. तेव्हा खान मोठ्याने

---

१ जिवा महाल्या व संभाजी कावजी असें दोघे बरोबर होते असें सभासद, चित्रगुप्त व शेडगांवकर म्हणतात. मि. किंकेड व प्रो. सरकार हेंच म्हणणे खरें मानितात. पोवाड्यांत असें आहे की, जिवाजी महालदार याजपाशीं आपली तरवार देऊन त्यासच बरोबर घेतलें होतें. ग्रांट डफ म्हणतो कीं, महाराजांबरोबर तानाजी मालुसरे होता.

२ प्रो. सरकार म्हणतात की, ह्या भेटीच्या वेळी एकंदर आठ पुरुष सदरेस होते. अफझुलखान, त्याचा वकील व त्याचे दोन हुजरे आणि शिवाजीमहाराज, त्यांचा वकील आणि त्यांचे दोन हुजरे. ते आणखी असे म्हणतात कीं, एखादा पाडाव केलेला बंडखोर जसा निःशस्त्र होऊन शरण येतो, तसे महाराज खानापुढे जाताना दिसले. अफझुलखानापाशी मात्र तलवार होती. खाफीखान म्हणतो की, दोघेही अशस्त्र होते.

३ ग्रांट डफ म्हणतो की, परस्परांस अलिंगन करितांना शिवाजी महाराजांनीच प्रथम खानाच्या पोटांत वाघनख खुपसले. एकंदर मराठी बखरींतील मजकूर मुळांतल्यासारखा आहे. मोडककृत अदिलशाहीच्या इतिहासांत अफझुलखानाच्या वधाचा प्रकार निराळाच दिला आहे. तो असा – अफझुलखानापुढे आपलें काही चालणार नाही असें पाहून महाराजांनी त्याच्याशी सख्य करण्याचा घाट घातला, व त्यास पराकाष्ठेची गरिबी दाखवून व त्याच्या डेऱ्यात जाऊन गोडगोड बोलून त्याला प्रतापगडावर मेजवानीस बोलाविले. तो महाराजांवर विश्वास ठेवून गाफीलपणाने दहाबारा लोकांनिशी गडावर आला असता त्याच्यावर महाराजांच्या हत्यारबंद लोकांनी गर्दी करून त्यास ठार केलें. बुसातीनुस्सलातीन नामक बखरींतहि असाच मजकूर आहे. पृ. ५६९ पाहा. चित्रगुप्ताची बखर व पोवाडा यांत त्यांचे परस्परांशी रागारागाचे भाषण होऊन मग हें द्वंद्वयुद्ध झाले असें म्हटले आहे. महाराजांनी भेटीसाठी असा भपक्याचा तंबू उभारण्याबद्दल खान त्यांजवर रागावल्यावरून त्यांची परस्परांशी बोलाचाली झाली. असें कित्येकाचें म्हणणें आहे. शेडगांवकर म्हणतो कीं, महाराजांनी आपल्या वैभवाचे असे प्रदर्शन केल्याबद्दल त्यांच्या वकीलापाशीं खानाने नाखुशी प्रदर्शित केली. तेव्हा त्या वकिलानें त्याची अशी समजूत केलीं की, ह्या सगळ्या बहुमोल वस्तू अखेरीस विजापूर सरकारच्या ताब्यांत जावयाच्या आहेत. तारीख-इ-शिवाजी ह्या यवनीं बखरींत असें आहे की, उभयतांची थोडीशी बोलाचाली झाल्यावर गोपीनाथपंतानी महाराजांस खानाची माफी मागावयास सांगितल्यावरून त्यांनीं पुढें होऊन खानाच्या पोटावर डोकें टेंकले. त्याबरोबर खानानें त्याला दाबून धरून त्याच्यावर तरवार चालविली. तेव्हा महाराजांनी त्याच्या पोटात वाघनख खुपसले.

ओरडला कीं, 'मारले, मारले, दगा, दगा, लवकर धावा!' हे शब्द कानी पडताच उभय पक्षाकडील जे लोक दूर उभे होते ते तेथें येऊन पोहचण्यापूर्वीच सैदबंडा तेथें धावत आला व त्याने महाराजांवर पट्ट्याचे वार चालविले. तेव्हा महाराज जिवा महालियाजवळील पट्टा उजव्या हातात चढवून डाव्या हातात बिचवा घेऊन त्याचे वार चुकवू लागले. इतक्यांत जिवा महालियानें सैदबंडाच्या खांद्यावर फिरंगीचा वार करून त्याच्या पट्ट्याचा हात तोडून टाकला व शेवटी तो जेर होऊन पडला.[१] मग उभय पक्षांकडील लोकांचे रणकंदन माजलें. ह्या गर्दीत खानाच्या लोकांनी शिताफी करून त्याला पालखींत घालून चालविले.[२] इकडे येसाजी कंक व तानाजी मालसुरे यांनी शिवाजी महाराजांस त्या गर्दीतून सुखरूप बाहेर काढिल्यावर ते खानाच्या पालखीमागून धावले व भोयांचे पाय तोडून त्यांनी पालखी खाली पाडिली आणि खानाचे डोके कापून रुमालांत बांधून आणिले.[३] ह्या घालमेलींत कृष्णाजी नांवाचा एक कारभारी अफझुलखानाबरोबर होता. तो खानाची अशी दशा पाहून तरवार उपसून महाराजांवर चालून आला. त्याचे दोनतीन वार महाराजांनी चुकविलें, व त्याला सांगितले की, 'ब्राह्मणास मारू नये अशी मला माझ्या वडिलांची आज्ञा आहे, यास्तव तू बऱ्या गोष्टीने निघून जा!' असें बोलून त्याला सोडून दिलें.[४]

ह्या सर्व गडबडींतून महाराज सुटून किल्ल्याच्या दरवाज्यावर सुखरूप जाऊन पोहोचले. त्या वेळीं दोनचार घटका दिवस उरला होता. पूर्वसंकेताप्रमाणे इशारतीच्या तोफा सुटल्या व शिंग वाजले. ह्या तोफा खानाच्या तळावरील लोकांच्या कानी पडल्या तेव्हां त्यांस असें वाटलें की, ह्या तोफा भेट झाल्या बद्दलच्या होत. ह्याप्रमाणें ते गाफील राहिले असतां इकडे नेताजी पालकर पूर्वी ठरल्याप्रमाणें खानाबरोबर वर आलेल्या पंधराशे लोकांवर तुटून पडला. इतक्यांत खानाचा वध होऊन त्याचें शिर कापून गडावर नेल्याचे वर्तमान त्या लोकांस कळून त्यांची धांदल उडाली. नेताजी पालकराच्या लोकांनी त्यांच्यावर हल्ला केला तेव्हा तर त्यांची केवळ त्रेधा झाली. तरी ते फार शूर व रणात कसलेले असे निवडक लढवय्ये असल्यामुळें त्यानी मावळ्यांशी बराच वेळ युद्ध केलें परंतु शेवटीं त्यांचा पुरा मोड झाला. मावळ्यांच्या हातीं जितका पठाण लागला तितका त्यांनी कापून काढिला. तिकडे मोरोपंत पिंगळ्यानेंही संकेताप्रमाणें खानाच्या जावळी येथील लष्करावर घाला घातला. शत्रूचा आपणांवर असा हल्ला येईल हें त्याच्या ध्यानींमनींही नव्हतें. ते अगदी बेफाम होते. म्हणून हा असा त्यांच्यावर अकस्मात हल्ला झाला तेव्हां त्यांची तर पुरी गडबड उडाली. तरी तेही मोठ्या नेटाने लढले. शेवटी त्यांची दाणादाण होऊन ते सैरावैरा पळत सुटले. महाराजांचा आपल्या सरदारांस नेहमीं असा हुकूम असे कीं, जे कोणी हातांतले शस्त्र ठेवून शरण येतील त्यांस ठार मारू नये. ह्यामुळे पुष्कळ लोक पाडाव झाले. कित्येक लोक आसपासच्या रानांत कैक दिवस पळत-छपत होते. त्यांना त्यांतून निघून जाण्यास वाटच मुळीं सापडेना. अशा रीतीनें दीन व हैराण झालेले पुष्कळ लोक महाराजांच्या लोकांनी धरून आणिले.[५]

---

१ येसाजी कंकाने त्याला ठार केलें, असे चिटणीस म्हणतो. तानाजी मालसुरे व शिवाजी महाराज या दोघांनी मिळून त्याला मारिलें असें डफ म्हणतो.

२ सभासद व चित्रगुप्त म्हणतात की, खान स्वतः चबुत्र्यावरून उडी टाकून पळत सुटला व 'दगा दगा!' असें मोठ्याने ओरडला. तेव्हा त्याचे लोक धावून येऊन त्याला पालखीत घालून घेऊन जाऊ लागले.

३ डफ म्हणतो कीं, हे शिर खंडू माले यानें व दुसऱ्या कोणी कापून आणिलें. चित्रगुप्त व सभासद हे म्हणतात कीं, महाराजांच्या आज्ञेवरून संभाजी कावजी यानें तें आणिलें. पोवाड्यांत म्हटलें आहे कीं, संभाजी कावजीने भोयांचे पाय तोडले आणि महाराजांनी स्वतः खानाचे शिर कापिलें. प्रो. सरकार म्हणतात कीं, संभाजी कावजीनें हें काम केलें.

४ यवनी बखरीच्या व राजापूरच्या इंग्रज वखारवाल्यांचा लेखाच्या आधारवरून प्रो. सरकार म्हणतात कीं, अफझुलखान हा असा आपल्याच दगेखोरपणास बळी पडला. तो असा महाराजांस दग्याने पकडून न्यावयास किंवा ठार मारावयास आला असतां त्यांनी त्याच्या हातीं न सापडण्याची खबरदारी घेतली नसती तर त्यांस वेडें म्हटलें असतें. मि. करकरिआ व न्यायमूर्ती रानडे यांनीं मराठी बखरीत दिलेला एतत्संबंधाचा वृत्तांत बरोबर आहे. असें प्रतिपादन केलें आहे. ह्या वादांत एवढी गोष्ट निर्विवाद आहे कीं, महाराजांस पकडण्याची किंवा ठार मारण्याची प्रतिज्ञा खानाने केली होती आणि त्याच्या तावडीत न सांपडण्यासाठी महाराजांस युक्ती योजणे प्राप्त होतें. त्यानें मावळातल्या खोपडे वगैरे देशमुखांशी केलेल्या कारस्थानावरूनही त्याचा सदरील हेतू स्पष्ट दिसतो.

५ ह्या लढाईत खानाकडचे तीन हजार लोक गारद झाल्याचे वर्तमान राजापूरच्या इंग्रज व्यापाऱ्यांना मिळाल्याचे त्यांच्या कागदपत्रांत नमूद केलें आहे, असे प्रो. सरकार म्हणतात.

ह्याप्रमाणें हातीं लागलेल्या शत्रूच्या लोकांस[१] महाराजांनी आपल्या नेहमींच्या क्रमास अनुसरून मोठ्या औदार्याने व ममतेने वागविले. त्यांचा योग्य परामर्ष घेऊन व त्यांस वाटखर्च वगैरे देऊन सोडून दिलें. जे अमीरउमराव पाडाव झाले होते त्यांचा योग्य मानमरातब करून, त्यांस वस्त्रे घोडी वगैरे देऊन व त्यांचें गौरव करून विजापुरास जावयास निरोप दिला. महाराजाचा हा असा मनाचा थोरपणा पाहून पाडाव केलेले कित्येक मराठी शिपाई त्यांच्या नोकरीस राहावयास तयार झाले. अशा लोकांस त्यांनी ठेवून घेतलें. ह्या वेळी झुंजारराव घाटगे ह्या नांवाचा एक मोठा सरदार महाराजांच्या हातीं लागला होता. त्याच्या बापाचा व शहाजीराजांचा परम स्नेह होता, हें महाराजांस ठाऊक होतें. यास्तव त्यांनी त्याला आपल्या जवळ राहाण्याविषयीं पुष्कळ आग्रह केला; पण तो कांहीं केल्या ऐकेना. तेव्हां त्याला वस्त्रालंकार वगैरे देऊन मोठ्या सन्मानाने विजापुरास परत पाठविलें.

ह्या गर्दीत अफझुलखानाचा मुलगा फाजलखान हा रणात घायाळ होऊन पळाला. तो आपल्या जखमी झालेल्या पायास चिरगुटें बांधून झाडींतून लपत छपत चालला होता. त्यास व अफझुलखानाच्या कुटुंबांतील इतर माणसांला खंडुजी काकडे याने पकडले.[२] तेव्हां त्यांनीं त्यास लाच देऊं केली पण काकडेने त्यांना कोयनेच्या तीराने कऱ्हाडास सुरक्षित नेऊन पोचविले. महाराजांपुढे त्यांस आणिलें नाहीं. ह्याबद्दल महाराजांनी त्याला देहांतशासन केलें.

ह्या लढाईत महाराजांस पुष्कळ लूट मिळाली. शेपाऊणशें हत्ती, सात आठ हजार घोडी,[३] हजारबाराशे उंट, सगळा तोफखाना, दोन-तीन हजार बैल, मोहरा, होन वगैरे रोख नाणे दहाबारालक्षांचें, सोने, रत्ने, मोत्ये वगैरे जडजवाहीर दोनतीन लक्ष किंमतीचे, कापड सुमारें दोन हजार ओझा, डेरे, राहूट्या, पालें वगैरे स्वारीच्या उपयोगांचे मुबलक सामान, इतकी लूट त्यांस मिळाली. याशिवाय आणखी खानाच्या लष्करातले पुष्कळ मराठे शिपाई महाराजांची मर्दुमकी व औदार्य पाहून चकित झाले व त्यांच्या नोकरीस मोठ्या खुषीनें राहिले. यामुळे त्यांच्या लष्करांत पुष्कळच भरती झाली.

खानाचे शिर कापून आणिले तें महाराजांनी भवानीस वाहिले. भवानीचे दर्शन घेतल्यावर ते मातुश्रीच्या दर्शनास गेले. आपला परम प्रिय पुत्र विजयी होऊन सुखरूपपणे गडावर येऊन आपल्या दृष्टीस पडला म्हणून तिला अतिशयित हर्ष झाला. तिने त्याला पोटाशी धरून म्हटलें 'संभाजीचा सूड उगवून तू माझ्या डोळ्यांचे पारणे फेडिलेंस, शिपाईगिरीची शर्थ केलीस, हे यश तुला मिळाले हें तुझे मोठेच भाग्य समजले पाहिजे. शत्रूला मारून सुखरूपपणे मला येऊन भेटलास हा सोन्याचा दिवस उगवला!' असें बोलून तिने महाराजांवरून निंबलोण केलें; त्याच्या समागमें जे होते त्यास मोठमोठी बक्षिसे, वस्त्रे, भूषणें देऊन त्याची बढती करविली. 'तुम्ही होतां म्हणून हा विजयी होऊन आला!' अशी त्यांची तारीफ तिने केली.

मग आपल्या सैन्याची हालहवाल कशी काय आहे तें पाहण्यासाठी महाराज गडाखाली गेले. युद्धात घायाळ होऊन जे बेजार झाले होते. त्यांची शुश्रूषा योग्य प्रकारे व्हावी अशी त्यांनी चांगली तजवीज केली व प्रत्येकाकडे स्वत: जाऊन त्याचा परामर्ष घेतला व त्याच्याशी मधूर व उत्तेजनपर भाषण करून त्याच्या वेदनांचे त्यांस फारसे कांहीं न

---

१ प्रो. सरकार म्हणतात की, खानाचे दोघे मुलगे, एक मोठा सरदार लिंबाजी भोंसले व झुंझारराव घाटगे असे ह्या पाडाव केलेल्या लोकांत होते.

२ चिटणीस व शिवदिग्विजयकार हे म्हणतात की, खंडोजी खोपडा ह्या नावाचा एक अफझुलखानाकडील मावळ्यांचा मुख्य सरदार होता; त्यानें फाजलखान व खानाचा कबिला यांस दोनशे लोकांच्या मदतीने कऱ्हाडास नेऊन पोंचतें केले. हा खोपडा पुढे महाराजांच्या लोकांच्या हाती लागून त्याचा त्यानी शिरच्छेद केला. कानोजी जेध्याचा प्रतिस्पर्धी जो खोपडे तोच हा असावा. सभासद म्हणतो की, फाजलखानास इतर सरदाराप्रमाणें पकडून आणिलें असतां त्याचा महाराजांनी योग्य मान करून त्यास सोडून दिले.

३ प्रो. सरकार म्हणतात की, पासष्ट हत्ती, चार हजार घोडे, बाराशे उंट, दोन हजार ओझी कापड आणि दहा लक्षांचा ऐवज महाराजांच्या हाती लागला.

वाटेल असें केलें. रणामध्यें पडलेल्या एकूणएक शिपायांची यादी करविली व त्यांच्या बायकामुलांचें समाधान व आश्वासन करून त्याच्या निर्वाहासाठी त्यास वेतने करून दिली. समरभूमीवर प्राणास मुकलेल्या ज्या अंमलदारांस पूर्वी वतनें वगैरे दिलीं होतीं तीं त्यांच्या मागें त्यांच्या कुटुंबांत वंशपरपरेनें चालू ठेविलीं. लढाईत जखमी झालेल्या लोकांच्या जखमा प्रत्यक्ष डोळ्यांनी पाहून त्या जखमांच्या मानानें कोणास दोनशे, कोणास शंभर, कोणास पाऊणशे असे होन बक्षीस दिले; शिवाय ज्याच्या त्याच्या योग्यतेप्रमाणे कोणास पागोटीं, कोणास कडी वगैरे इनामें दिली. जे वरच्या दर्जाचे जुमले व सरदार होते त्यांस मंदिलें, झगे, सोन्याची कडी, कंठमाला, शिरपेच, मोत्याचे तुरे, आगड्या, घोडी इत्यादी इनामें दिली. कित्येकांस गांव, मोकासे आदिकरून बक्षीस दिले, ज्यांची जशी मर्दुमकी नजरेस आली तिच्या मानानें त्यांची बढती केली. कोणी पायचे होते त्यांस घोडी दिली, कोणास सरदाऱ्या दिल्या, कोणास पालख्या, अबदागिरे दिली; युद्धांत पडलेल्या कित्येक पुरुषांचे मुलगे जवान होते त्यांस बोलावून आणून आपल्या नोकरीस ठेविले. लोकांस इनामें व बढत्या देण्याचा हा समारंभ महाराजांनी पदरच्या सर्व लोकांस जमवून त्याच्या समक्ष केला व ज्यांनी मर्दुमकी केली होती त्यांची तारीफ प्रसिद्धपणें केली. ह्यामुळें सर्वांस अतिशयित उत्तेजन व उत्साह प्राप्त झाला. महाराजांच्या अंगचें हें औदार्य, दयाळूपणा व गुंणाची बूज करण्याची ही उत्कृष्ट पद्धत पाहून त्यांची नोकरी विशेषच जोमाने, उत्साहाने व इमानाने करण्याचा हुरूप प्रत्येकास आला. ह्या वेळी महाराज पंताजी गोपिनाथास विसरले नाहींत. त्याने खानाकडे जाऊन वकिलीचे काम मोठ्या शिताफीने केल्याबद्दल हिवरेंगाव इनाम देऊन पुष्कळ मोठे बक्षीस दिलें.[१] त्याप्रमाणेंच विश्वासरावानें हेराचे काम उत्तम प्रकारे केल्याबद्दल त्यालाही मोठे बक्षीस दिलें.

ही मोठी फत्ते झाल्याबद्दल प्रतापगडावर व इतर ठिकाणीही आनंदोत्सव केला. जिकडेतिकडे वाद्यांचा एकच गजर होऊन राहिला. घरोघरी विजयगुढ्या उभारिल्या. हत्तीवरून शर्करा वाटल्या. ब्राह्मणांस दक्षिणा दिल्या. गोरगरिबांस खैरात केली. ब्राह्मणभोजनें घातली. महास्थलींचे सिद्ध, साधु, गोसावी यांस पूजोपचारार्थ द्रव्य पाठविलें. अफझुलखानाच्या वधाचे वृत्त आपल्या एकंदर इष्टमित्रांस कळविले शहाजीराजांस कर्नाटकांत ते वार्तिकांबरोबर लिहून कळविले. हा जो विजय मिळाला तो सगळ्या हिंदुराष्ट्राचा झाला असें मानून त्याप्रीत्यर्थ चोहींकडे मोठा उत्सव करण्यांत आला. तुळजापूर, पंढरपूर व शिंगणापूर येथील देवस्थाने भ्रष्ट करणाऱ्या माणसाचा हा असा वध झाला तो पुराणांतरींच्या एखाद्या राक्षसाच्या वधासारखा होता, असें सर्व लोक मानू लागले आणि त्याचा नाश झाला यांत कांहीं तरी ईश्वरी सूत्र आहे असें त्यांस वाटूं लागले. सर्वांच्या हृदयांत स्वदेशाभिमानाचें वारे संचारले. अशा वृत्तीचा त्यांस कैक शतकें बिलकूल गंधही नव्हता. त्या समयी लोकांच्या मनांत कोणत्या भावना उद्भवल्या त्यांचें दिग्दर्शन एका पवाड्यांत झालें आहे. अफझुलखानाच्या वधाच्या हकीकतीचे वर्णन ह्या पवाड्याच्या रूपाने करावे असा हुकूम प्रत्यक्ष जिजाबाईंनीं दरबारच्या एका शाहिरास केला असून त्याबद्दल त्यास एक शेर सोने व एक घोडा इनाम दिला असे म्हणतात.

अफझुलखानाचा वध ज्या ठिकाणी केला तेथें त्याचें डोके पुरून त्यावर एक बुरूज बांधिला व त्याचे नांव अफझुलबुरूज असें ठेविले. खानाच्या हातची तरवार हिसकावून घेतली होती ती जयाचे स्मारक म्हणून जतन करून ठेविलीं. हा विजय आपणांस तुळजापूरच्या भवानीच्या प्रसादाने प्राप्त झाला असें मानून तिची स्थापना प्रतापगडावर करावी असा विचार महाराजांनी केला. गंडकीनदीस हुशार ब्राह्मण पाठवून एक शिळा पैदा केली व कारागीर तुळजापुरास पाठवून तेथल्या मूर्तीच्या नमुन्यावर नवी मुर्ती घडविली. बालेकिल्ल्यावरील कोटांत चांगली प्रशस्त जागा पाहून तेथें सुंदर देवालय बांधविलें आणि त्यांत ह्या मूर्तीची स्थापना सुमुहूर्तीं यथाविधी करविली. ह्या देवालयांत

---

१ रायरीच्या बखरींत म्हटलें आहे कीं, दत्ताजी गोपीनाथ हा महाराजाचा वकील असून त्यानें उत्कृष्ट कामगिरी बजावल्याबद्दल त्याला महाराजांनी एक लाख होन बक्षीस देऊन हिवरेंगाव इनाम दिला. शि. दि. म्हणतो की, पंताजीपंतास हिवरेंगाव इनाम दिला. कित्येकांचें असें म्हणणें आहे की, खानाचा वकील कृष्णाजी भास्कर ह्यास महाराजांनी इनामाची लालूच दाखवून आपलासा करून घेतलें व त्यास पुढें हिवरेंगांव इनाम देऊन आपल्या नोकरीस ठेवून घेतलें.

नित्यपूजा, नैवेद्य व ब्राह्मणभोजनें करण्यासाठीं त्या त्या कामावर कारभारी नेमून त्यांस तनखा लावून दिला. देवालयांत उत्सवादी करण्यास लागणाऱ्या खर्चासाठीं नेमणूक करून दिली. शिवाय देवीस शृंगारण्यासाठीं दागदागिने व उंची वस्त्रे मुबलक दिली. येथें तुळजापुराप्रमाणें उत्सव, नवस, यात्रा वगैरे व्हाव्या अशी व्यवस्था केली.[१]

अफझुलखानाचा वध होऊन त्याजबरोबर दिलेल्या फौजेचा पुरा नाश झाला ही खेदकारक वार्ता अदिलशहास व बडे-साहेबिणीस कळली तेव्हा त्यांस पराकाष्ठेचे दुःख झालें. असें सांगतात कीं, जासुदांनी हें भयंकर वर्तमान पातशहास कळविले तेव्हां तो अत्यंत दिलगीर होऊन तक्तावरून उतरून महालांत जाऊन पलंगावर निजला. तसेंच बडे साहेबिणीच्या कानीं हें वर्तमान पडतोच ती 'अल्ला अल्ला! खुदा! म्हणून पलंगावर अंग टाकून शोक करीत पडली. अफझुलखानासारख्या शूर व बलाढ्य सरदारास नामोहरम करून त्याचें शिर कापून नेले; एवढी मोठी फौज गेली असतां तिचा पुरा फडशा उडाला; एकंदर चीजवस्तू लुटीस गेली, असें जबर नुकसान होऊन शिवाजीमहाराजांचे सामर्थ्य फारच वाढलें. ते आतां मुसलमानी पातशाहत बुडवून टाकून हिंदुपातशाहीची स्थापना करितात असा सर्व अमीरउमरावांस धाक पडून ते चिंताक्रांत झाले. आतां अदिलशाहीची धडगत दिसत नाही. शिवाजीमहाराज आपल्या विजयी फौज घेऊन विजापूर शहर हस्तगत करितात, अशी चर्चा घरोघरी होऊं लागली. पातशाही नौबत तीन दिवस बंद पडून पातशहा व त्याची आई यांनी तीन दिवस अन्न सेवन केलें नाहीं असें म्हणतात.[२]

***

---

१ कित्येकांचें असें म्हणणें आहे की हें देवालय चंद्रराव मोऱ्यास जिंकिल्यावर बांधिलें. मि. किंकेड या देवालयासंबंधाचीं एक दंतकथा शेडगांवकराच्या बखरीच्या आधाराने अशी देतात की, महाराजांनी विजापूरसरकाराशी विरोध आरंभिल्याकारणानें त्यांना आपली कुलस्वामिनी तुळजापूरची भवानी तिच्या दर्शनास प्रतिवर्षी जाणें दुर्घट झाल्याकारणानें त्यांनी रायरीच्या किल्ल्यावर भवानीचे देवालय बांधण्याचा बेत केला व मूर्तीसाठी संगमरवरी दगड पाहून आणावयास लोक पाठविले; पण देवीने त्यांच्या स्वप्नात येऊन त्यांस सांगितले की, माझें देवालय महाबळेश्वरासन्निध बांधावें अशी माझी इच्छा आहे. तरी भोरप्या नावाच्या टेकडीचा शोध लावून तेथें माझी स्थापना कर व तेथेंच तुझ्यासाठी एक किल्ला बांध. स्वप्नातल्या ह्या तिच्या आज्ञेप्रमाणें हा भोरप्या डोंगर महाबळेश्वरापासून बारा मैलावर सापडला. तेथें त्यांनी हें देवालय व प्रतापगडहीं बांधिलीं देवीचे देऊळ ह्या गडावर अफझलखानाच्या वधापूर्वी होतें याबद्दल एक पुरावा ते असा देतात की, महाराजांनी अफझलखानाच्या मुलाखतीस जाताना व त्याचा वध करून परत आल्यावर देवीचे दर्शन घेतलें असा उल्लेख आहे. या उल्लेखावरून फार तर एवढेच सिद्ध होतें की, हा नवा गड बांधिला तेव्हा त्यावर आपल्या उपास्यदेवतेचें एखादे लहानसे देवालय महाराजांनी अगोदर बांधिलें असून सदरील विजयानंतर तें विशेष मोठ्या प्रमाणावर बांधिले असावें.

२ अफझुलखानाच्या वधासंबंधाच्या अनेक दंतकथा प्रचलित आहेत. मार्शाल यानें विजापुराचा वृत्तांत लिहिला आहे त्यात तो असें म्हणतो की, आपल्या मोहिमेचा वाईट शेवट होऊन आपला तीत नाश होणार हें अफझुलखानाला पूर्वीच समजून आलें होतें. म्हणून त्यानें आपल्या ६३ बायकांना बोलावून आणून ठार मारिलें. हें अत्यंत क्रूर कर्म करण्याचें कारण असें सांगतात की, आपल्या पश्चात त्यांचा परपुरुषाशीं संबंध होऊ नये म्हणून त्याने ही अशी अमानुष खबरदारी घेतली! ह्या अफझलखानाचा वाडा ज्या जागी होता त्याच्या आसपास ह्या त्याच्या वधलेल्या बायकांच्या कबरा अजून दाखवितात. शेडगावकराच्या बखरींत ह्या दंतकथेचा उल्लेख आहे. तेथें आणखी असें म्हटलें आहे की, हा अफझलखान मोहिमेस निघताना आपल्या गुरुच्या दर्शनास गेला तेव्हा त्या गुरुला तो शिरावाचून नुसता धड आहेसा दिसला. प्रो. सरकारानी अफझलखानाचा वाडा ज्या ठिकाणी होता तें ठिकाण प्रत्यक्ष पाहिले असून तेथें हल्ली रान माजलें आहे. काही मोडक्या इमारतींचे शेष तेथें दिसतात आणि ज्या डोहात अफझुलखानानें आपल्या ६३ बायका लोटून देऊन बुडवून ठार मारल्या तो त्यानी पाहिला, असें ते म्हणतात.

भाग बारावा

विजापूरसरकाराच्या दुसऱ्या सरदारांचा पराभव (१६५९–६०)

अफझुलखानाचा वध करून त्याच्या मोठ्या सैन्याचा पुरा नाश केल्यावर महाराजांचा धाक चोहींकडे बसून त्यांना पुढील स्वराज्यविस्ताराचें काम सुलभ झालें. त्या सरकाराचे आणखी किल्ले व प्रांत काबीज करण्यास त्यांना फारसे कठीण गेलें नाही. अफझुलखानानें शिवाजीमहाराजांवर स्वारी केल्याचे वर्तमान शिद्दीस कळल्याबरोबर त्यानें तळा व घोसाळा ह्या किल्ल्यांस वेढा दिला; परंतु इतक्यांत त्याच्या कानी असें आलें की, खानाचा वध होऊन सगळे सैन्य गारद झालें. त्याबरोबर त्यानें वेढा उठवून पीछेहाट केली. त्याच्यावर स्वारी करण्याच्या इराद्याने महाराजांनी आपलें सैन्य तयार केलें; परंतु त्या वेळीं पन्हाळा हातीं येण्याचा सुमार दिसल्यावरून तें तिकडे वळले.

ह्या किल्ल्यावर विजापूरसरकारानें नेमलेला किल्लेदार होता. तो आपण होऊन किल्ला स्वाधीन करून देण्यास तयार झाला. त्यावरून त्याच्याशी बोलणे चालविले. हा उत्तम किल्ला असा अनायासे हाती येत आहे हें पाहून महाराजांना पहिल्याने अंमळ संशय आला. राजांना वाटलें कीं, असा लोभ दाखवून आपणांला कचाटीत धरण्याचा विजापूरसरकाराचा गुप्त बेत असावा; तरी पण गड आपल्या हातीं आल्यास फार बरें होईल. असें वाटल्यावरून आपला एक परम विश्वासू सरदार बरोबर पुष्कळ मावळे देऊन त्या किल्ल्यावर पाठवावा असा त्यांनी विचार केला. मग अण्णाजी दत्तो याची त्या कामगिरीवर नेमणूक केली आणि आपण स्वतः बरोबर पुष्कळ स्वार व पायदळ घेऊन जवळपास तयारींत राहिले. ते अर्थात् अशाकरितां कीं, कांही दगा आहे असें आढळून आल्यास शत्रूचे तत्काळ पारिपत्य करितां यावें; परंतु लढाईचा प्रसंग मुळीं आलाच नाहीं, किल्लेदारानें कबूल केल्याप्रमाणें किल्ला बिनहरकत स्वाधीन केला.[१] (ऑक्टोबर १६५९). असाच पावनगडही त्यांच्या कबजांत आला. हे किल्ले ताब्यांत आल्यावर महाराजांनी वसंतगड छापा घालून घेतला. कृष्णानदीच्या दोन्ही तीरावरील प्रांतांत आपला अंमल बसवून तेथला वसूल बिनबोभाट जमा व्हावा यासाठी तिकडील सर्व गडांवर आपली ठाणी महाराजांनी बसविलीं ही अशी ठाणी बत्तीसशिराळाच्या गढीपर्यंत बसवीत जाऊन तिकडील वसूल जमा करण्यासाठीं त्यांनी कामदार नेमिले.

---

१ हा किल्ला हस्तगत केल्याची हकीगत इतरत्र दिली आहे ती अशी : किल्ला अतिशयित मजबूत असून सहज हस्तगत होण्यासारखा नाहीं असें पाहून तो घेण्याची महाराजांनी पुढील युक्ती योजिली. काही सरदारांस शिक्षा करण्याचें मिष केलें. तेव्हा त्या सरदारांनी आपल्या सातआठशे लोकांसह महाराजांची नोकरी सोडल्याचा बहाणा करून पन्हाळ्यावरीत किल्लेदारास अशी विनंती केली की, आम्ही शिवाजीमहाराजांवर नाखुष होऊन त्याची नोकरी सोडून आलों आहों. आम्हांस तुमच्या चाकरीस ठेवा. हें त्यांचे म्हणणें त्या किल्लेदारास खरें वाटून त्यानें त्यांस किल्ल्यावर घेतले. इकडे महाराजांनी किल्ल्यास वेढा दिला. मग एके दिवशी रात्री संकेताप्रमाणें वर गेलेल्या लोकांनी खालील काही लोकांस जेथे दाट झाडी होती अशा जागी वर घेतले. महाराजांच्या लोकांनी एकवट होऊन रखवालदारांवर हल्ला केला व त्यांचा मोड करून किल्ला हस्तगत केला.

पन्हाळा कबजांत आल्यावर महाराज त्या गडावर जाऊन राहिले व सह्याद्रीच्या माथ्यावरील व त्याखालील किल्ले हस्तगत करण्याचें त्यांनी मनांत आणून तिकडे आपले लोक पाठविले. हे बहुतेक किल्ले त्यांस बिनहरकत मिळाले, लढाई वगैरे फारशी करावी लागली नाही. मात्र रांगणा व खेळणा हे किल्ले छापा घालून घ्यावे लागले. खेळणा किल्ला घ्यावयास बरेच प्रयास पडले म्हणून त्यास त्यांनी विशाळगड असें नांव दिलें ते अद्यापि चालत आहे. हा एवढा मुलूख महाराजांनी अफझुलखानाचा वध केल्यावर दोन-तीन महिन्यांच्या अवधींत हस्तगत केला. ह्याप्रमाणें सगळा कोल्हापूर प्रांत व त्यांतील किल्लेमहाराजांनी घेतले.

ह्या वेळी मिरज येथें विजापूरकरांचे ठाणे असून त्यावर रूस्तुमजमान नांवाचा सरदार मुख्य होता. याच्या ताब्यांत कोल्हापुरापासून रत्नागिरीपर्यंत मुलूख असून आणखी कानडा प्रांतही त्याच्या हवाली होता. त्यानें महाराजांच्या ह्या धामधुमीस मुळींच हरकत केली नाहीं. ह्याचे कारण एक तर असें असावे कीं, तो त्याला भिऊन जागच्या जागी थबकून राहिला असावा किंवा त्या वेळचे राजापूर येथले इंग्रज व्यापारी संशय घेतात त्याप्रमाणें त्याला महाराजांनी लाच देऊन गुपचुप बसविले असावें; परंतु पुढें त्याला असा हुकूम आला कीं, त्यानें शिवाजीमहाराजांवर चालून जाऊन कोल्हापूरप्रांताचें रक्षण करावे. त्याच्याजवळ त्या वेळी तीन हजार स्वार व थोडेसे पायदळ होतें. इतक्या लोकांसह तो पन्हाळ्याजवळ चालून गेला. (ऑक्टोबर स. १६५९) तो जवळ आला असें पाहून महाराजांनी त्याच्यावर आपल्या स्वारांनिशी हल्ला केला. त्याचा पुरा मोड करून त्यास कृष्णेपार हाकून दिलें व त्याचा शेवटपर्यंत सारखा पिच्छा पुरविला. त्याचा पाठलाग करीत करीत महाराज थेट विजापुरापर्यंत गेले.[१] वाटेतील मोठमोठे गांव लुटून त्यांनी उद्ध्वस्त केले. व पेठा होत्या त्यांवर दस्त बसविला. हा असा सारखा धुमाकूळ उडवून देऊन ते तिकडून मोठ्या वेगाने परतले, ते इतके कीं, त्यांचा पाठलाग करणें शत्रूला दुरापास्त झाले आणि त्यांचा तो विलक्षण वेग पाहून विजापूरकरांनी हा प्रयत्न केलाही नाहीं.

ह्याप्रमाणें थेट विजापूरशहरापर्यंत जाऊन सगळा प्रांत लुटून उद्ध्वस्त करून महाराज विशाळगडास येऊन दाखल झाले. येथें त्यांच्या आज्ञेवरून अण्णाजी दत्तो याने पायदळसैन्य जमा करून अगदी सिद्ध ठेविले होतें. तें घेऊन ते लागलीच रत्नागिरी प्रांतात शिरले आणि तिकडची बंदरे व शहरे काबीज करण्याचा त्यांनी सपाटा चालविला. ह्या मोहिमेत त्यांनी राजापुरावर मात्र हल्ला केला नाही, याचे कारण राजापूरच्या व्यापाऱ्यांनी असे नमूद करून ठेविले आहे कीं, हे शहर रुस्तुमजमान याचे असून महाराजांशी त्यानें सलोखा केला होता. बडी साहेबीण त्यांचा द्वेष करीत असे म्हणून त्याला स्वसंरक्षणार्थ महाराजांशी स्नेह करावा लागला.[२] ह्या वेळी त्यांनी दाभोळ शहर आणि त्याखालील सगळी ठाणी हस्तगत केली. ह्या ठाण्यांवरचे अदिलशहाचे सुभेदार राजापुरास पळून गेले. तेथून रायगडावर येऊन पुनः फौजेची चांगली तयारी करून त्यांनी चेऊल शहरावर हल्ला केला. त्या शहरात त्यांनी तीन दिवस मुक्काम करून तें येथेंष्ट लुटले. हें शहर त्या वेळीं मोठे सधन होते. त्यांत महाराजांस पुष्कळ द्रव्य सापडले. तेथला ठाणेदार खोजोजी यास कैद करून ते शहर त्यांनी हस्तगत केले व ही सगळी लूट राजगडावर सुरक्षित नेली.

ह्या धामधुमीत दाभोळचा सुभेदार पराभव पावल्यामुळें अफझुलखानाची मालाचीं तीन जहाजे त्या बंदरांत होतीं तीं घेऊन तो राजापुरास गेला. तेथे रुस्तुमजमानाच्या हुकुमावरून त्या जहाजांवरचा माल बंदरावर उतरला. ही बातमी महाराजांच्या एका सरदाराला लागताच त्यानें राजापुराकडे आपल्या लोकांनिशीं दौड केली. मराठे जवळ आले असें कळताच राजापूर येथला रुस्तुमजमानाचा सुभेदार वरील एका जहाजांत बसून जाऊ लागला. तेव्हां तेथल्या इंग्रज व्यापाऱ्यांचा एक दलाल मि. हेन्री रिव्हिंगटन नामक एका इंग्रज कामदाराकडे येऊन म्हणाला कीं, मी तुमच्या नावाने

---

१ राजापूरच्या इंग्रज व्यापाऱ्यांचा ह्या वेळचा असा लेख आहे की, अफझुलखानाचा मुलगा फाजलखान हा रुस्तुमजमानाबरोबर होता. फाजलखानाचे बहुतेक लोक पडले आणि रुस्तुमजमान जेमतेम हुक्री येथे जाऊन स्वस्थ बसला. प्रो. -सरकार, पृ. २९४.

२ प्रो. सरकार, पृ. २९४.

रुस्तुमजमान याला कांहीं रक्कम कर्जी दिली आहे. ती ह्या सुभेदाराकडून वसूल करून घ्या. यावरून त्या कामदाराने आपलें एक जहाज त्या जहाजाच्या मागें लावून त्या सुभेदाराला अटकाव केला. तेव्हा त्यांनीं कांहीं रक्कमेच्या मोबदल्यादाखल त्या जहाजांतला माल दिला. ही अशी त्याची गडबड चालली असतां महाराजांचे वर सांगितलें लोक त्या बंदरावर येऊन थडकले आणि त्यांनीं राजापूरचा सुभेदार ज्या जहाजांतून पळून जात होता तें पकडून देण्याविषयी वरील इंग्रज कामदारास सांगितले. पण तो तें ऐकेना, इतकेंच नव्हे तर त्या सुभेदाराच्या सांगण्यावरून त्यानें अफझुलखानाच्या वर सांगितलेल्या दोन जहाजांपैकी एक आपल्या कबजांत घेऊन त्यास निराळें नाव दिलें आणि त्यांची बोलाचाली होत असतां तिसरे जहाज निसटून गेलें. तेव्हां महाराजांचा सरदार सुभेदाराजवळून घेतलेला माल त्याच्याकडे मागू लागला तोही तो देईना. तो म्हणाला कीं, आमची रक्कम शहराच्या महसुलातून घेण्याची आम्हांला परवानगी देत असाल तर जप्त केलेल्या मालाची तुम्हांस किंमत देतो. ह्याप्रमाणे निराशा झाल्यावर त्या सरदाराने इंग्रजांचे दोन दलाल पकडून नेले आणि आमचे दलाल सोडून द्या असें सांगण्यासाठी त्याच्याकडे फिलिप गिफर्ड नावाचा एक कामदार गेला होता त्यालाही त्याने अटकेत ठेविले आणि इंग्रजांस असें सांगून पाठविलें कीं, अफझुलखानाची तिन्ही जहाजे व सुभेदाराकडून घेतलेला माल आमच्या स्वाधीन होईपर्यंत कैद केलेल्या इसमास आम्ही सोडून देणार नाहीं. त्यानें हे तिघे कैदी खारेपाटणास नेऊन ठेविले. इकडे रिव्हिंगटन याने शिवाजीमहाराजांना पत्र लिहून अशी विनंती केली की, 'आमचे कैद केलेले इसम सोडून देण्याचा हुकूम करावा. तुम्ही दंडाराजपुरीवर हल्ला कराल त्या वेळीं आम्ही तुम्हांस मदत करूं. तुमच्या लोकांनी आम्हांस मुसलमानांची जहाजे पकडून द्यावयास सांगितले; परंतु आम्ही तें केलें नाही कारण त्यांच्याशी वैर करणें आम्हांस इष्ट वाटलें नाही.' ह्या आशयाच्या पत्रावरून महाराजांनी आपल्या सरदारास असा हुकूम पाठविला कीं, इंग्रजांच्या कैदीस सोडून द्यावे, रूस्तुमजमानाच्या मुखत्यारांच्या ताब्यांत राजापूर शहर पुनः द्यावे, आणि त्या शहरांतल्या लोकांची जी कांही चीजवस्तू लुटली असेल ती त्यांची त्यांना परत करावी. असें सांगतात कीं, आपला दोस्त रूस्तुमजमान याच्या शहरावर असा हल्ला केल्याकारणानें महाराजांनी आपल्या त्या सरदाराला[१] नोकरीवरून दूर केलें. हा हुकूम पोचताच दलालांस सोडले; परंतु गिफर्ड याची सुटका एका ब्राह्मणानें लबाडी केल्यामुळे लौकर झाली नाहीं. त्यावरून रिव्हिंगटन याने महाराजांकडे पुनः तक्रार केली; पण त्यांच्याकडून पुनः हुकूम येण्यापूर्वी ह्या इंग्रज कैद्याला खारेपाटणाहून विशाळगडाकडे महाराजांचे लोक घेऊन जात असता इंग्रजांच्या शिपायांनी त्यांच्यावर हल्ला करून त्यांना सोडविले असें म्हणतात.[२]

अफझुलखान व रूस्तुमजमान अशा बलाढ्य सरदारांचा शिवाजीमहाराजांपुढें कांहीच उपाय न चालून एक तर प्राणास मुकला व दुसरा जीव घेऊन जेमतेम विजापुरांत जाऊन पडला व महाराजांच्या लोकांनी त्या राजधानीपर्यंत दौड करून सर्व देश लुटून जाळून टाकला. ह्यामुळे विजापूरसरकारच्या अमलातील एकूणएक गांवांतल्या लोकांस महाराजांची मोठीच दहशत वाटूं लागली. लहानसान मुसलमान सरदार व किल्लेदार महाराजांचे नांव ऐकतांच थरथरां कापू लागलें; मग त्यांच्यावर चालून जाण्याचे धैर्य होणार कोणाला? हें पाहून कित्येक मराठे पुंड गावांत शिरून शिवाजीमहाराजांचे नाव सांगून खंडणी व लूट जमवून यथेष्ट मजा मारू लागले. विजापूरसरकारास तर महाराजांची फारच धास्ती वाटूं लागली. त्या दरबारातील अमीरउमरावांमध्यें यादवी माजली होती तीसुद्धा ह्या वेळीं अंशतः बंद पडून जो तो शिवाजीचे बंड कसे मोडावे ह्या फिकिरींत पडला. शिवाजीमहाराजांवर आतां कोणास पाठवावे ही चिंता अदिलशहास प्राप्त झाली. कोणी नामांकित सरदार पुढें होऊन दंड ठोकून मी शिवाजीवर जातो असें म्हणण्यास तयार होईना. असें सांगतात कीं, अफझलखानाचा मुलगा फाजलखान याची बादशहापाशी नेहमी आपल्या बापाच्या घाताबद्दल सूड उगविण्यासाठी महाराजांवर मोहीम करावी अशी सारखी अजीजी असे. परंतु त्यास एकट्यास त्यांच्यावर मोहीम करण्याची छाती नव्हती.

---

१ ह्या सरदाराचे नाव दोरोजी होतें असे म्हणतात.

२ हा सगळा मजकूर प्रो. सरकार यांनी आपल्या ग्रंथात राजापूर येथील इंग्रज व्यापाऱ्याच्या स. १६६० तल्या कागदपत्रांच्या आधारानें नमूद केला आहे. त्यावरून जुळविला आहे.

कित्येक सरदारांचें असें मत पडलें कीं, अदिलशहानें स्वत: या मोहिमेवर जावे; पदरच्या कोणत्याही सरदारावर या बाबतींत भरवसा ठेवणे बरोबर नाहीं; परंतु कित्येकांनी उलट असा अभिप्राय दिला कीं, बादशहाने स्वतः अशा बंडखोरांवर चालून जाणें कमीपणाचे आहे. शिवाय शिवाजीमहाराज अतिशयित धाडसी व हुशार असल्यामुळें केव्हा काय करतील याचा नेम नाहीं आणि बादशहाचा जीव ह्या अविचाराने धोक्यांत पडेल.[१]

ही अशी विजापूरदरबारांत भवति न भवति चालली असतां ह्या वेळीं शिद्दी जोहार नामक एक सरदार पुढें आला. हा जातीचा हबशी असून मोठा पराक्रमी होता. हा कर्नाटकातील मोहिमांत पुष्कळ चांगली कामगिरी करून मोठ्या योग्यतेस चढला होता. पुढें याचा आणि बादशहाचा बेबनाव येऊन हा कुर्नूळप्रांतात स्वतंत्र होऊन राहिला होता. ह्या त्याच्या शिरजोरपणाबद्दल बादशहाच्या मनांत त्यास शिक्षा करावयाची होती; परंतु पुढें त्यानें कुकर्माबद्दल माफी मागून बादशहाची आपणावर पुनः कृपादृष्टी व्हावी असा प्रयत्न चालविला होता. बादशहाने त्यास ह्या वेळीं असें सांगू पाठविलें कीं, तू शिवाजीमहाराजांवर स्वारी करून त्यांची खोड मोडून येशील तर तुला आम्ही क्षमा करून मोठ्या योग्यतेस चढवू. ही अट त्या सरदारास पसंत होऊन तो ह्या मोहिमेवर निघाला. तेव्हां त्याच्याबरोबर फाजलखानही बापाच्या मृत्यूबद्दल सूड उगविण्याच्या हेतूनें निघाला.[२]

शिद्दीजोहाराबरोबर बादशहाने फारच मोठी फौज दिली होती. अफझुलखानाबरोबर दिलेल्या फौजेच्या दुप्पट ती होती असें म्हणतात. हा शिद्दी ह्या मोहिमेस निघण्यापूर्वी त्यास बादशहाने सलाबतखान अशी नवी पदवी देऊन त्याचा गौरव केला. मनांत कीं, कोठून तरी त्यास आपली कामगिरी उत्साहपूर्वक व इमानाने करण्याचा हुरूप यावा. फाजलखानास अशी उत्कंठा लागून गेली होती कीं, शिवाजीमहाराजांशी मोठ्या निकराचा सामना करून त्याचा पुरा मोड करून आपल्या बापाचे उसने आपणांस केव्हा घ्यावयास मिळतें. ह्याप्रमाणें इकडून ह्या दोन सरदारांना महाराजांवर पाठवून तिकडून जंजिऱ्याच्या शिद्दीला वाडीच्या देशमुखाच्या मदतीने महाराजांच्या ताब्यांतील कोंकणपट्टीवर स्वारी करण्यास अदिलशहानें फर्माविलें. शिद्दीजोहार व फाजलखान यांनी पहिल्याने पन्हाळ्यावर हल्ला करण्याचें ठरवून त्या गडाकडे कूच केले व तो किल्ला घेण्याचे काम शिद्दीजोहारानें करावे आणि फाजलखानानें घाटावरून कोंकणात शिवाजीमहाराजांच्या मुलखात शिरावे असें ठरले.

महाराजांचे हेर सर्वदा चोहींकडे हिंडत. त्यांनी ही सगळी हकीगत त्यांला लागलीच कळविली. आपणांवर शत्रूची अशी जिकडूनतिकडून गर्दी होणार आहे हे आगाऊ समजताच प्रत्येक किल्ल्यांवर उत्तम बंदोबस्त करून आपल्या लोकांस हुशार राहावयाची वर्दी महाराजांनी दिली. शत्रूंच्या चोहोकडून होणाऱ्या हल्यास टक्कर देण्याची त्यांनी कडेकोट तयारी केली. रघुनाथपंतास कोंकणांत फत्तेखान शिद्दीशीं झुंजण्यास सांगितलें. कल्याणभिंवडीप्रांताचें रक्षण करण्याचें काम आबाजी सोनदेव यास सांगितले; बाजी पासलकर यास वाडीच्या लखम सावंतांशी टक्कर द्यावयास पाठविलें. घाटावर मोरोपंतास पुरंदर, सिंहगड, प्रतापगड इत्यादी किल्ले व त्यांच्या आसपासचा मुलूख याचे रक्षण करावयास सांगितलें, आणि आपण स्वत: पन्हाळ्याचा बचाव करावयाचा असा निश्चय करून त्या किल्ल्यावर कडेकोट बंदोबस्तानें राहिले, व नेताजी पालकराला आपल्या स्वारांनिशीं शिद्दीजोहाराच्या सैन्यावर लावून लांबून छापे घालून हैराण करावयास सांगितले. महाराज स्वत: पन्हाळ्यावर जाऊन राहिले. याचे कारण असें कीं, विजापुराकडून येणाऱ्या

---

१ असे म्हणतात की, ह्या सुमारास औरंगजेब आपल्या भावांस नामोहरम करून व बापास अटकेंत ठेवून दिल्लीच्या तक्तावर बसल्यानंतर त्यानें दक्षिणेत आपली सत्ता कायम करून वाढविण्याचें मनांत आणिले आणि याच्या अंमलातल्या मुलखांत शिवाजीमहाराज धामधूम करीत होते. त्यांचा नाश करण्यासाठी शास्ताखाननामक एका सरदाराबरोबर मोठी सेना देऊन पाठविलें (१६६०) आणि विजापूरच्या आदिलशहासही महाराजांवर स्वारी करावयास सांगितले. म्हणून अदिलशहानें ही अशी मोहिमेची घाई चालविली होती. शास्ताखानाच्या मोहिमेची हकीगत पुढें सोळाव्या भागांत निराळी दिली आहे.

२ चिटणीस व शि. दि. हे सरजाखाननामक आणखी एक सरदार यांच्याबरोबर दिला होता असें म्हणतात.

सैन्याचा रोख प्रथमतः कोल्हापूर प्रांतावर असून पन्हाळा किल्ला घेण्याचा बेत त्यानें केला होता हें महाराजांस कळून तो त्यांच्या हातीं सहसा जाऊं देऊं नये असें त्यांनी मनात आणिलें; परंतु त्या किल्ल्याचे रक्षण स्वत: करण्याचें त्यानी मनात आणिलें हें बरोबर नव्हतें असें पुढें प्रत्ययास आलें.

शिद्दीजोहार आपल्या सैन्यानिशी पन्हाळाकडे येऊ लागला तेव्हा त्यास महाराजांनी प्रथम मुळीच हरकत केली नाहीं. त्यास चांगला अंगावर येऊ देऊन मग त्याची खोड मोडावी असा त्याचा इरादा होता. पन्हाळ्यापाशीं शत्रुसैन्यानें ठाणे दिलें तेव्हां नेताजीने आपली हालचाल सुरू केली. तो त्या सैन्यावर रात्रीचे छापे घालू लागला; त्याची रसद बंद करून त्यास दाणावैरण मिळेनासे करूं लागला. शत्रूशी उघड सामना करण्याचें तो टाळी. आसपासच्या दऱ्यांतून हळूच नकळत मावळ्यांच्या टोळ्या शत्रूच्या ठाण्याजवळ येत व ज्या बाजूला बंदोबस्त अमळ ढिला असे तिकडून आंत तरवारी घेऊन घुसत व कापाकापी करीत व शत्रूचे लोक अंगावर चालून आले म्हणजे त्यांवर गरनाळा सोडून पार निघून जात. ह्याप्रमाणें नेताजीने शत्रूच्या सैन्यास पुष्कळ हैराण केलें व स्वतःचे फारसे नुकसान होऊं न देता त्याचे पुष्कळ लोक ठार केले. शिद्दीजोहाराने पाहिले कीं; असले छापे घालणारे पार नाहींतसे केले पाहिजेत, त्याशिवाय काहीएक करिता यावयाचे नाही. यास्तव तो स्वतः त्याच्यावर आपल्या लोकांनिशी हल्ला करूं लागला व जे लोक सापडतील त्यांचा संहार करण्याचा त्यानें सपाटा चालविला, परंतु त्या डोंगरी मुलखात मराठ्यांचा पाठलाग करण्याचे काम अतिशयित कठीण आहे व तें करण्यापासून काहीएक फायदा नाहीं, असें पाहून त्यानें आपले लोक दूरदूर ठाणी करून त्यांवर ठेविले होते ते सगळे एकवट करून किल्ल्यास विशेषच मजबूत वेढा दिला. त्या वेळीं हवा फारच प्रतिकूल होती तरी त्यानें किल्ल्यावर मोठ्या जोराचा मारा चालविला; किल्ल्यांतून बाहेर व बाहेरून किल्ल्यांत कोणाही मनुष्यास जाऊं देऊ नये असा कडेकोट बंदोबस्त त्याने केला व आपल्या सैन्यास असा एकसहा हुकूम फर्माविला कीं, कोणीही मराठा हाती लागल्यास त्यास जिवंत सोडू नये. आपले लोक रात्रंदिवस सावध व जागृत राहावे ह्यासाठी रात्री निराळे व दिवसा निराळे असे अधिकारी व शिपाई पहाऱ्यावर असावे अशी त्यानें व्यवस्था केली; आणि सर्व फौजेवर आपण स्वतः देखरेख करूं लागला.

ह्याप्रमाणें महाराज त्या किल्ल्यावर चार महिने अडकून पडले. शत्रूचा वेढा उठण्याचा रंग मुळींच दिसेना. कारण त्याचें सैन्य फारच मोठे असून त्याचा बंदोबस्त नामी होता. नेताजी पालकराने बाहेरून कितीही छापे घातले तरी तें सैन्य म्हणण्यासारखे कमी झालें नसतें. वरून तोफांचा मारा कितीही केला तरी त्यापासून त्याचें फारसे नुकसान होण्यासारखे नव्हतें. दुसरें असें कीं, खुद्द महाराज ह्या किल्ल्यांत अडकून पडले आहेत असें शत्रूस कळून आल्यावरून तो आतां ह्या किल्ल्याचा वेढा उठवून दुसरीकडे जाईल हें स्वप्नीही आणावयाला नको. किल्ला सर करण्यासाठीं आपल्याकडून तो शिकस्त केल्यावांचून राहाणार नव्हता हें उघड होतें. शिद्दीजोहाराला आतां अशी खात्री वाटूं लागली होती कीं, हा किल्ला वेळा उशिरा आपल्या स्वाधीन होऊन शिवाजीमहाराज हाती खास लागतील आणि जें काम आजपर्यंत कोणाच्याही हातून झालें नाहीं तें केल्याचे यश आपणांस मिळून आपली विजापूरदरबारांत मोठी बढती होईल; हे विचार मनांत येऊन त्याला मोठाच आवेश व उत्साह प्राप्त झाला होता. इकडे महाराजांनी तरी किल्ल्यावर सर्व प्रकारचा बंदोबस्त असा उत्तम राखिला होता की, शत्रू त्याखाली एकदोन वर्षे सारखा गराडा देऊन बसला तरी त्याच्या हातीं तो कदापि गेला नसता व त्या किल्ल्यावरील लोकांस दोन वर्षें पुरेल इतकी अन्नसामुग्री व दारूगोळा भरून ठेविला असल्यामुळें बाहेरून ही सामुग्री येण्याची बंद झाली तरी काहीएक अडण्यासारखे नव्हतें. असें होतें तरी हा असा आपला कोंडमारा होऊन आपण एकेच जागी अडकून पडलो, आपले लोक बाहेर काय करीत आहेत तें कळण्याचा मार्ग मुळींच उरला नाहीं. आपल्या लोकांस प्रसंगानुरूप जे कांहीं हुकूम द्यावयाचे ते देण्याची सोय आतां राहिली नाहीं, हें लक्षांत येऊन त्यांस अतिशयित वाईट वाटूं लागलें. येथून आपली सुटका होते कशी ही चिंता त्यांस उत्पन्न झाली. किल्ल्यासभोंवार शत्रूचा पक्का गराडा पडला असून कोणत्याही ठिकाणीं त्याचा बंदोबस्त अगदी लेचापेचा नव्हता.

तेव्हां त्यांतून निसटून जाण्याचा बेत साधण्यासारखा नव्हता. बरें, शत्रूवर एकदम तुटून पडून सामना द्यावा तर तेही साध्य नव्हतें; कारण त्याचें सैन्य फार मोठे होतें व असें धाडस केल्यास आपले सर्व लोक खात्रीने नाश पावतील असें महाराजांस वाटत होतें. तेव्हां त्याच्या तावडींतून सुटून जाण्याचा दुसराच काहीं तरी उपाय योजला पाहिजे असें मनांत आणून त्यांनीं शिद्दीजोहाराला असा निरोप पाठविला कीं, 'आम्ही किल्ला स्वाधीन करून देण्यास राजी आहो व आमच्या जिवास काहीएक धोका नाहीं असें अभय दिल्यास आम्ही स्वतः किल्ल्याच्या खालच्या माचीवर तहाचे बोलणे करण्याकरितां येतो' हा निरोप ऐकून शिद्दीस मोठा आनंद झाला व त्यानें त्यास अभयवचन दिलें. त्यावरून महाराज आपल्या बरोबर थोडेसे लोक घेऊन शिद्दीच्या छावणींत संध्याकाळच्या सुमारास दाखल झाले. त्यांस हें माहींत होतें कीं, शिद्दीच्या शब्दावर विश्वास ठेवण्यास मुळींच हरकत नाहीं. उभयतांची गांठ पडल्यावर महाराजांनी असा बेमालूम बहाणा केला की, तो त्या शिद्दीस खराच वाटला. किल्ला स्वाधीन करून देण्यासंबंधाच्या बहुतेक मुख्यमुख्य कलमांचा विचार होऊन तीं नक्की केली; पण इतक्यांत रात्र पडली म्हणून कांहीं किरकोळ बाबींचा निकाल उदयीक करूं असें वचन देऊन महाराज त्याचा निरोप घेऊन परत किल्ल्यावर गेलें.[१] शिवाजीमहाराज अगदी दीन होऊन आपणांस शरण आले. आतां ते आपण सांगू तसें बिनतक्रार ऐकतील असें शिद्दीस वाटून तो निश्चित झाला. ते आता युद्ध करीत नाहींत, किल्ला आपल्या हाती आल्यांतच जमा असें समजून शिद्दीच्या लोकांनी किल्ल्यावरचा मारा बंद केला. पाहाऱ्यांवरचे लोक बेसावध राहून मजा करूं लागले.

ह्याप्रमाणें शिद्दीच्या लोकांस गाफील करून महाराजांनी किल्ल्यांतून निसटून जाण्याचा बेत केला. आपले निवडक मावळे एकवट करून रात्रीच्या काळोखांत ते किल्ल्याखाली उतरून शत्रूच्या पाहारेकऱ्यांच्या अंगावरून बेलाशक निघून गेले.[२] ते सगळे बेफाम असल्यामुळें शिवाजीमहाराज पळून जात आहेत हें त्यांच्या लक्षातही आलें नाहीं; पण नंतर लवकरच त्यांना महाराज पळून गेल्याचे कळले व ते त्यांच्या पाठलागाची तयारी करूं लागले; तो इकडे महाराज आपल्या लोकांसह अतिशयित वेगाने विशाळगडाकडे[३] पार निघून गेले. फाजलखान व शिद्दीजोहाराचा मुलगा शिद्दी उजीज[४] हे घोडदळ घेऊन महाराजांच्या पाठलागास निघाले व त्यांच्या मागोमाग मोठे पायदळही निघाले; परंतु उजाडून दिवस बराच वर येईपर्यंत महाराजांचे लोक त्यांच्या दृष्टीस पडले नाहींत. ते त्यांच्या नजरेस पडले तेव्हां ते विशाळगडापासून सहा मैलांवर घाट चढत होते. आपल्या मागून शत्रूने येऊ नये तर त्यास मध्येंच अडवून धरावे म्हणून त्यांनी घाटाच्या खिंडींत पांढऱ्या पाण्याजवळ काही मावळे ठेवून त्यांच्यावर बाजी देशपांडे ह्यास मुख्य नेमिलें

---

१ ही हकीगत मोडककृत अदिलशाहीच्या इतिहासांत येणेंप्रमाणें आहे : महाराजांनी शिद्दीस मोठ्या नम्रतेचे पत्र पाठवून कळविले कीं, 'आम्ही तुम्हांस मित्र या नात्यानें भेटूं इच्छितो. आमचे अपराध क्षमा करून आम्हांला आश्वासन दिल्यास व भेटीची परवानगी मिळाल्यास दोनतीन लोकांनिशीं आपल्या डेऱ्यास येऊन आमचा सगळा हेतू प्रत्यक्ष कळवू.' शिद्दी एवढ्यानें खुलून गेला व तो जात्याच बेइमान असल्यामुळें त्यानें महाराजांना असें कळविले की, मी बाह्यात्कारी बादशहाकडून आलों आहें, तरी माझ्या मनांतून तुमचे नुकसार करण्याचें नाही, तुमच्या भेटीची आम्हांस फार उमेद आहे. हा असा धीर मिळाल्यावर महाराज मध्यरात्रीच्या सुमारास दोनतीनच माणसें बरोबर घेऊन किल्ल्याखालीं उतरून त्याला जाऊन भेटले. त्या वेळी शिद्दीनें त्यांची फारच बरदास्त ठेविली, व काही करारमदार ठरून महाराज परत किल्ल्यावर गेले. ही गोष्ट बादशहास कळतांच तो संतापून स्वतः शिवाजीमहाराजांवर चालून जाण्यास सिद्ध झाला. पृ. २०२.

२ रायरीच्या बखरींत असें आहे कीं, महाराज वीस हजार मावळ्यांनिशीं मुसलमानांच्या फौजेवर एकाएकी तुटून पडून त्यांच्याशी लढतलढत विशाळगडाकडे निघून गेले व फाजलखान त्यांच्या पाठीस लागला. तहाच्या बोलण्याचें मिष करून त्यांस अगोदर बेसावध केले नव्हतें.

३ ते रांगणा नावाच्या किल्ल्याकडे पळत गेले असें कित्येक बखरींत म्हटलें आहे; व तें ग्रांट डफ व न्या. मू. रानडे खरें समजले व आम्हीही पहिल्या आवृत्तींत असेंच म्हटलें होतें; परंतु रांगणा किल्ला पन्हाळ्यापासून पाऊणशें मैलांवर आहे; व पांढरें पाणी विशाळगडापासून सहा मैलांवर आहे. जेध्यांच्या शकावलींत महाराज खेळणा किल्ल्याकडे पळून गेले असें आहे. खेळणा तोच विशाळगड होय.

४ 'तारीख-इ-शिवाजी' मध्ये यांचे नांव शिद्दी हलाल असें आहे.

व त्यास असें सांगितले कीं, आम्ही किल्ल्यांत जाऊन पोचल्यावर पाच तोफा मारून इशारा करूं. तोपर्यंत ह्या खिंडींत राहून शत्रूला अटकाव करावा. हा बाजी देशपांडे मोठा शूर व इमानी आहे अशी महाराजांची पूर्ण खात्री होती. कोणत्याही बिकट प्रसंगी त्याच्यावर बिनदिक्कत भरवसा ठेवण्यास कांही एक हरकत नाही असें त्यांस वाटे. ह्या आणीबाणीच्या प्रसंगी त्यास सांगितलेली कामगिरी तो उत्तम प्रकारे पार पाडील असें महाराजांस वाटल्यावरून त्यांनी त्याचीच ह्या वेळीं निवड केलीं. ती अगदी यथायोग्य होता. त्याच्याबरोबर पाच हजार मावळे दिले होते. त्यानें ह्या खिंडींत जागोजाग मोर्चे बांधून झाडींतून लोक उभे केले. मुसलमानांचे स्वार पुढें चालून आले त्यांवर त्यांनीं गोळ्या व जेजालांचे दुरटे चालविले. त्यामुळें त्यांना खिंडींतून वर चढता येईना. मागाहून पायदळ येऊन पोहचल्यावर मुसलमानांनी खिंडीतल्या मावळ्यांवर मोठ्या आवेशाने हल्ला केला; परंतु त्यांनी जिवावर उदार होऊन मोठ्या जोमाने युद्ध करून हा हल्ला मागें सारला. मग पुनः त्यांनी मोठ्या जमावाने त्यांच्यावर हल्ला केला; परंतु तोही देशपांड्यानें मागें हटविला. ह्या वेळी उभयपक्षांकडील लोक मोठ्या आवेशाने व शौर्याने लढले. ह्याप्रमाणें बाजी प्रभूने दोनप्रहर दिवस येईपर्यंत शत्रूच्या एवढ्या मोठ्या सैन्याला मोठ्या शौर्याने झुलविले त्याला खिंडींतून वर येऊ दिलें नाहीं. हें पाहून फाजलखानास अतिशयित चेव आला. त्यानें आपल्या कर्नाटकातील पायदळानिशी पुन: तिसऱ्याने मावळ्यांवर मोठ्या नेटाचा हल्ला केला व त्यांवर तोफांचा सारखा भडिमार चालविला. ह्या वेळी निमे शिम्मे मावळे खलास झाले होते व शत्रूकडचे जवळजवळ पाच हजार लोक ठार झाले होते. तरी बाजी देशपांड्याने धैर्य न सोडितां हा तिसरा हल्ला मागें हटविण्याचा प्रयत्न केला. इतक्यांत त्याला तोफेचा गोळा लागून तो रणात पडला. पण प्राण जाण्यापूर्वी त्याच्या कानी पाच तोफांची सरबत्ती पडून महाराज किल्ल्यावर जाऊन पोचल्याचा इशारा मिळाला. तेव्हा तो इमानी देशपांडे मरणवेदना लागल्या होत्या तरी आनंद पावला. आपणावर सोपविलेली कामगिरी आपण मर्दुमकीने पार पाडली व स्वामिकार्यीं आपला प्राण खर्ची पडला याबद्दल त्यास पूर्ण समाधान वाटलें. आपला सरदार पडला हें पाहून मावळ्यांचा पुढें धीर निघेना व महाराजही किल्ल्यावर जाऊन पोचले, तेव्हा आपली कामगिरी आतां आटोपली असें समजून ते रानांत वाट सापडेल तिकडे पांगले आणि सगळे किल्ल्यावर चढून गेले; जाताना त्यांनी आपल्या शूर सरदाराचे प्रेत वाहून नेले ते शत्रूच्या हाती लागू दिलें नाहीं. मुसलमानांच्यानें त्यांचा त्या बिकट रानांतून पाठलाग करवला नाही.[१]

खिंडीवरील मावळे पसार होऊन ती मोकळी झाली तेव्हा शत्रू वर चढून किल्ल्याखाली आला; पण त्या वेळी त्या प्रांतांतली हवा रखरखीत झाली होती. उन्हाळा जबर असल्यामुळें नद्यांस व नाल्यांस पाणी नाहीसे झालें होतें. शिवाय किल्ल्याखालची जागा अगदी अडचणीची असल्यामुळें तेथें ठाणे ठेऊन किल्ल्यास मोर्चे लावून वेढा घालणें कठीण होतें. फाजलखानास तर अशी भीती वाटूं लागली कीं, शिवाजीमहाराज हरहुन्नरें आपली फौज बुडवून बापासारखीच आपलीही दशा करितील. ह्या दहशतीमुळे त्यानें वेढा देण्याचा विचार सोडून दिला. त्यांत आणखी शिद्दीजोहार पन्हाळ्याजवळचा तळ हलवून विशाळगडाकडे येण्यास काकू करूं लागला. म्हणून फाजलखानाचा निरुपाय होऊन तो विशाळगडाखालचे आपलें ठाणे उठवून पन्हाळ्याकडे आला; परंतु पन्हाळ्यावरही वेढा घालून बसणे त्यांस फायद्याचे दिसलें नाहीं. याचे एक कारण तर उघडच होतें कीं, महाराज आतां मोकळे झाल्यामुळे केव्हा काय करितील व आपला धुव्वा उडवून देतील याचा नेम नाहीं असें भय त्यांस वाटूं लागलें. दुसरें असें कीं, पावसाळा नजीक आला असल्यामुळें ह्यापुढे वेढा घालून बसल्यास आपला ह्या डोंगरी मुलखात निभाव लागणे नाहीं असें त्यांस वाटणे साहजिक होतें. त्यांत आणखी महाराज विशाळगडास निघून गेल्यावर पन्हाळा किल्ला त्यांनी राघोबा बल्लाळ अत्रे याच्या स्वाधीन केला होता. तो शिद्दीजोहाराशीं मोठ्या शौर्याने लढत होता. त्यानें ह्या वेळीं फारच हुशारी व हिकमतीने किल्ल्याचे रक्षण केलें. महाराजांनी त्यास बाहेरून साहाय्य करण्यास फौज पाठविली होती. मुसलमानांनी

१ मि. किंकेड म्हणतात की, शिद्दीजोहार विशाळगडाजवळ गजपुरी म्हणून एक गांव आहे, तेथें येऊन कांही दिवस तळ देऊन राहिला आणि मग त्यानें विशाळगडाच्या पूर्वभागीं जाऊन गडास सुरुंग लाविला; त्याबरोबर महाराजांनी दुसरीकडून सुरुंग लावून जोहाराच्या पुष्कळ लोकांचा सप्पा उडविला.

किल्ल्यास मोर्चे लावून शह दिला म्हणजे मागून तळावरील लोकांवर ह्या फौजेने हल्ला करावा व कापाकापी करून सापडेल तें सामानसुमान लुटून पळून जावे. किल्ल्याशी लगट करणारे लोक मागला बंदोबस्त करण्यासाठी परत तळावर धावले म्हणजे किल्ल्यावरच्या लोकांनी त्यांचे मोर्चे मारून काढावे. असा दुहेरी मारा महाराजांच्या लोकांनी सुरू ठेविला. तेव्हा शिद्दीजोहारानें व फाजलखानानें किल्लेदारास फितूर करण्याचा घाट घातला. त्यांनी रघुनाथ बल्लाळास असें सांगून पाठविलें कीं, 'तुम्ही किल्ला आमच्या स्वाधीन करून देऊन आमच्या पक्षाकडे याल तर तुमची बादशहाकडे शिफारस करून तुम्हांला योग्यतेस चढवू व चांगली जाहगीर करून देववू.' त्यास त्या इमानी पुरुषानें असा जबाब पाठविला कीं, 'आम्हांस धनलोभ बिलकूल नाही. आम्ही आमच्या धन्याशी कदापि निमकहराम होणार नाहीं!' असा त्याजकडून निक्षून जबाब मिळून त्यांचा तो बेत फसला. शेवटी चोहोंकडून निरुपाय होऊन त्यांनी असा विचार केला कीं, तूर्त विजापुरास निघून जावे व पावसाळा संपताच पुनः नव्या दमाची मोहीम करावी. परंतु बादशहाची एवढी मोठी फौज इकडे आणून तिची बरीच खराबी मात्र केली, आपल्या हातून कांहींच पराक्रम झाला नाहीं; अशा स्थितींत आपण परत गेलों तर आपली फजिती होईल, लोक आपणांस नामर्द म्हणतील व बादशहाची आपणांवर फारच इतराजी होईल; त्यापेक्षा विजापुरास न जाता पावसाळा ह्याच प्रांतांत काढावा आणि मग पुनः लढाई सुरू करावी, असा त्यांनी बेत केला. हा त्यांचा बेत त्याच्या लष्करातील लोकांस कळला तेव्हां त्यांस तो न रुचून ते बेदिल झाले आणि स्वदेशी जावयास रजा मागू लागले. त्यांची समजूत कांही केल्या पडेना व ते आपला हट्ट सोडिनात. ह्याप्रमाणें सारी फौज नाराज झाली असतां तेथें राहणे निर्भय वाटेना. यास्तव त्याला आपला तळ उठवून विजापुरास जावे लागलें.

हे सरदार असे हतवीर्य होऊन परत आलेले पाहून अल्ली अदिलशहास अतिशयित वाईट वाटलें. एवढे मोठे सैन्य घेऊन जाऊन काहीएक न करितां शिद्दीजोहार परत आला व आपले लोक मात्र पुष्कळ कमी झाले हें पाहून त्याला त्याचा फार राग आला. हा अदिलशहा मोठा तापट व उतावळ्या स्वभावाचा होता. त्यात आणखी शिद्दीचा मत्सर करणाऱ्या सरदारांनी बादशहाच्या मनात असें भरवून दिलें कीं, शिवाजीमहाराजांनी शिद्दीस लाच दिल्यामुळे त्यानें त्यांस पन्हाळ्यावरून सुटून जाण्यास सवड दिली, एरवी तें त्याच्या हाती सहज लागण्यासारखे होते. बरें, पुढें ते विशाळगडावर जाऊन राहिले तेव्हां त्या किल्ल्यास वेढा देण्याचे सोडून तो पन्हाळ्यासच राहिला व त्याही किल्ल्याचा वेढा नेटाने चालविण्याचे सोडून निमकहरामी करून परत आला. हें त्या सरदारांचें म्हणणें त्या पितळ्या कानाच्या बादशहास खरें वाटून त्यानें शिद्दीवर फितुरीचा आरोप केला. तो ऐकून शिद्दीस मोठाच राग आला व त्या संतापासरशीं अद्वातद्वा बोलून आपल्यावरचा आरोप त्यानें उडविण्याचा प्रयत्न केला. ह्या त्याच्या सक्रोध भाषणाचा असा अर्थ केला गेला कीं, तो बादशहाची बेअदबी करण्यास प्रवृत्त झाला असून त्याच्या ठायीं राजनिष्ठा मुळींच नाही असें स्पष्ट दिसत आहे.

इकडे आपण शत्रूच्या तावडीतून सुटलो व त्याचें सैन्यही बरेंच खराब होऊन परत गेलें हें आपल्यावरचें मोठेच अरिष्ट टळले, हें पाहून महाराज परम हर्ष पावले. ज्याच्या अद्वितीय पराक्रमानें व प्राणांच्या आहुतीने स्वसंकटाचें निवारण झालें त्या बाजी देशपांड्याचा मुलगा बाळाजी बाजी यास महाराजांनी बोलावून आणून त्याचें समाधान केलें. त्याच्या बापाच्या मर्दुमकीची व इमानाची फारच तारीफ केली व त्याची सरदारी त्याला दिली. त्याच्या ताब्यात जे किल्ले होते त्यांचें काम बाळाजीस सांगितलें व त्यास बक्षीचा हुद्दा देऊन कांहीं जहागीरही करून दिली. त्याचे सात भाऊ होते त्यांस आणून महाराजांनी पालख्या व तैनाती दिल्या व त्यांस मावळे लोकांची सबनिशी सांगितली.

ह्या समयी रघुनाथ बल्लाळ अत्रे याने मोठ्या हिंमतीने शत्रूशी टक्कर देऊन पन्हाळगडाचें रक्षण केलें, यामुळे महाराज फार खूष झालें. त्याचीही तारीफ करून त्यास योग्यतेस चढविले व त्यास पन्हाळा व त्याखालील प्रांत यांचा सुभा सांगितला. त्यानें हें काम मोठ्या हुशारीने केलें. त्यानें त्या नवीन ताब्यांत आलेल्या प्रांताची व्यवस्था चांगली लाविली. लढाईच्या धामधुमीमुळे शेतकरी लोक शेते सोडून वाट मिळेल तिकडे पळून गेले होते त्यांस कौल व आश्वासन देऊन परत आणिले व त्यांच्याकडून जमिनीची लागवड करवून उत्पन्न वाढविले.

वर सांगितल्याप्रमाणें महाराजांनी शिद्दीजोहाराला व फाजलखानाला घाटावरच अडकवून त्यांनी निकराचे युद्धप्रसंग केले व त्यांच्या सैन्याची पुष्कळ नासाडी केली आणि पुढें युद्ध चालविण्याचा जोम व धमक नाहींशी होऊन त्यांस नामोहरम होऊन परत जावे लागलें. इकडे कोंकणांत जंजिऱ्याच्या शिद्दीने संकेताप्रमाणें आरमार तयार करून समुद्रकिनाऱ्यावरील महाराजांच्या ताब्यांतील कित्येक ठाण्यांवर हल्ला करून ती हस्तगत केली. रघुनाथपंतास त्याच्याशी युद्ध करावयास पाठविलें होतें. त्याचा शिद्दीनें बरेच वेळां पराभव केला. खैरातखान व याकूबखान यांनी महाराजांच्या ताब्यांतल्या तळागडास वेढा घातला होता. इतक्यांत त्यास कळले कीं, शिवाजीमहाराज यवनांच्या तावडीतून सुटून व त्यांस मागें जावयास लावून रायगडावर जाण्याकरितां इकडून येत आहेत. तेव्हां ते सरदार घाबरून जाऊन वेढा उठवून जंजिऱ्यास परत गेले. शत्रूचे हें वर्तन पाहून रघुनाथपंताला नवा दम आला आणि त्यानें शिद्दीचा पुरा पिच्छा पुरविला. त्याच्या लोकांस त्यानें कोठेच थारा नाहींसा करून सोडिला व त्याच्या ताव्यांतील दंडाराजपुरीचा सगळा प्रांत काबीज केला. ह्याप्रमाणें अगदी जेरीस आल्यामुळे शिद्दीने रघुनाथपंताशीं तहाचे बोलणे लाविलें. त्यानें आपला वकील रघुनाथपंताकडे पाठविला. मग उभय पक्षांमध्यें सल्ला होऊन लढाई बंद झाली. शिद्दीने रघुनाथपंताचा बहुमान करून त्यास बहुमोल पोषाख व घोडा नजर केला.[१]

मागे सांगितलें आहेच की, विजापूरसरकारानें महाराजांवर शिद्दीजोहाराला पाठवून जंजिऱ्याच्या शिद्दीला व वाडीच्या सावंतांला महाराजांच्या ताब्यांतील कोंकणपट्टीवर स्वारी करून ती हस्तगत करण्यास सांगितलें होतें. त्या दोघांनी परस्परांस साहाय्य करावे असें ठरलें होतें. त्याप्रमाणें सावंतांनीही ह्या वेळी महाराजांशी शत्रुत्व प्रगट केलें. यास्तव त्यांस शिक्षा करण्याची कामगिरी महाराजांनी बाजी पासलकरास सागितली होतीं.[२] सावंतांशी त्याच्या पुष्कळ झटापटी झाल्या, त्यांत त्यास बरेंच यश आलें. शेवटी कायसावंत शिद्दीच्या साहाय्याने पाच हजार लोकांनिशी बाजी पासलकरावर चालून आला. उभय पक्षांचे राजापुरानजीक तुमुल युद्ध झालें. पासलकर स्वत: हातांत फिरंग घेऊन रणात शत्रूशी मोठ्या आवेशाने लढत होता त्याची कायसावंताशीं गांठ पडून दोघाचें द्वंद्वयुद्ध झालें. दोघेही वीर मोठे बलवान व युद्धकुशल असल्यामुळें त्यांची झटापट मोठ्या निकराची झाली. एकमेकांनी एकमेकांस पुष्कळ जखमा केल्या, तरी त्यांचा जोम कांही कमी झाला नाही. शेवटीं ते परस्परांच्या वारांनी एकाच वेळी रणात पडून गतप्राण झाले.[३] महाराजांचा हा शूर सरदार पडला तरी त्याच्या लोकांनी धीर न सोडता शत्रूशी शेवटपर्यंत लढून त्याचा पुरा मोड केला. बाजी पासलकर रणात पडल्याचे वर्तमान कळले तेव्हा महाराजांस अतिशय दु:ख झालें. आपला अत्यंत इमानी व जिवलग मित्र व मोठा शूर सरदार आपणांस शिद्दीच्या व सावंतांच्या वैरामुळे अंतरला हें मनांत येऊन महाराजांनी त्यांस चांगलीच शिक्षा करावयाची असा निर्धार केला.

***

---

१ ऑर्मी म्हणतो कीं, शिवाजीमहाराज पन्हाळ्यावरून निघाले ते दंडाराजपुरीवर मोठ्या सैन्यासह आले व तेथल्या शिद्दीला शिद्दी जोहाराच्या हातचा हुकूम म्हणून एक खलिता त्यांनी दाखविला. त्यात असा मजकूर होता की, दंडाराजपुरी शिवाजीमहाराजांच्या स्वाधीन करा म्हणजे ते पन्हाळा किल्ला सोडून देणार आहेत. हा हुकूम त्या शिद्दीस खरा वाटून त्याने दंडाराजपुरी महाराजांच्या स्वाधीन केली. कारण त्याला वाटलें की, शिवाजीमहाराज पन्हाळगडावरून निघाले आहेत. ते शिद्दीजोहाराच्या परवानगीवाचून निघाले नसावे; परंतु पुढें शिद्दीला वहीम येऊन त्यानें जंजिरा मात्र महाराजांच्या स्वाधीन केला नाही.

२ हा महाराजाचा बालमित्र असून अतिशयित इमानी व शूर होता. हा युद्धकर्मांत पुरा निष्णात असून अंगाने मोठा धिप्पाड होता. ह्यास मावळ्याच्या पायदळाची सरनोबती दिली होती. हा मूळचा मुसेखोरे येथे राहाणारा असून आठ गावाचा देशमुख होता. हा प्रथम रायगडाखाली छत्रीनिझामपुराजवळ कुरडू नावाच्या गावात राहात असून खिंडीचे नाके संभाळीत असे. ह्याच्यापाशीं यशवंता घोडी, गजली फिरंग व अजगर ढाल ह्या तीन उत्तम वस्तु होत्या. त्याची घोडी तर एक अपूर्व रत्नच होती. ती आपणांस प्राप्त व्हावी असें विजापूरसरकारास वाटून त्यानें सोन दळव्यास ती त्याच्याकडून जबरीने आणावयास पाठविलें. त्याचा पासलकराने पराभव केला. (पोवाडा)

३ प्रो. सरकारानी २९८ व्या पृष्ठावर डच व्यापारांच्या त्या वेळच्या कागदपत्रांवरून असा मजकूर घेतला आहे की, शिवाजीमहाराज ह्या वेळी वेंगुर्ल्यापासून चार दिवसांच्या वाटेवर सैन्य घेऊन आले असून त्यांचा कुडाळच्या देसायानी पराभव करून त्यांस मागे पिटाळून लाविले. हे वर्तमान अर्थात त्या व्यापाऱ्यांनी कर्णोपकर्णी ऐकिले असून तें बाजी पासलकरांच्या सदरील मोहिमेस अनुलक्षून असावें.

भाग तेरावा

विजापूरसरकारास हतवीर्य केले (१६६१–६२)

मागल्या भागांत सांगितल्याप्रमाणें शिद्दीजोहार व फाजलखान हे मोठी प्रबळ सेना घेऊन महाराजांवर चालून आले असतां त्यांच्या त्या मोठ्या आवेशाच्या मोहिमेचा शेवट वाईट झाला हें पाहून अल्ली अदिलशहा फार दिलगीर झाला व त्यास अतिशयित राग येऊन त्या आवेशासरशीं त्यानें शिवाजीमहाराजांवर आपण जातीने स्वारी करावयाची असा निर्धार केला. मग पुनः मोठ्या सैन्याची जमवाजमव करून हा बादशहा कऱ्हाडप्रांतांत गेला. बादशहा प्रत्यक्ष मोहिमेस निघाला हें पाहून आसपासच्या प्रांतांतले जे जमेदार शिवाजीमहाराजांस करभार देण्याचे कबूल करून त्यांचे अंकित झाले होते ते गडबडून जाऊन बादशहाच्या छावणींत येऊन आम्ही आपले ताबेदार व नोकर आहों असें कबूल करूं लागले. शिद्दीजोहारानें ह्या वेळीं बादशहापाशी क्षमा होण्याविषयी रदबदली केली, परंतु तो बादशहाबरोबर पुनः मोहिमेस जावयास सिद्ध झाला नाहीं. कारण त्याला दरबारच्या अमीरउमरावांच्या हेवेखोरपणाचा चांगलाच अनुभव येऊन चुकला होता. तो आपल्या जाहगिरीस निघून गेला.

बादशहाने पन्हाळ्यांस वेढा देऊन तो घेतला. त्याप्रमाणेंच त्यानें पावनगडही काबीज केला. नंतर आसपासचे बहुतेक किल्ले जे महाराजांनी हस्तगत केले होते ते एकामागून एक सर करण्याचा सपाटा त्यानें चालविला. रांगणा व विशाळगड हे दोन किल्ले मात्र त्याच्या हातीं गेले नाहींत. इतक्यांत पावसाळा सुरू झाला. तेव्हां सह्याद्रीच्या घांटमाथ्यावर बरसादीच्या दिवसांत रहाणे नीट न वाटून तो परतला व कृष्णानदीच्या तीरी चिमलगें येथें छावणी करून राहिला.

इकडे महाराजांनी असा बेत केला होता कीं, बादशहाच्या फौजेशीं सामना इतक्यांत करू नये. कारण त्यांना कळून आलें होतें कीं, त्याच्याबरोबर प्रचंड सेना असल्यामुळें त्याच्याशी एकदम युद्ध करण्यास प्रवृत्त झालें असतां आपल्या लोकांची फार खराबी होऊन आपलें सैन्यबल कमी होईल. नुकतीच शिद्दीजोहाराशीं लढाई करावी लागल्यामुळें त्यांचे बरेच लोक कमी झाले होते. त्याची वावटळ निघून गेली न गेली तो ही दुसरी तीहून प्रबळ अशी प्राप्त झाली होती. बादशहा किल्ले काबीज करण्याच्या खटपटींत गुंतल्यानें त्याची बरीच फौज खलास होईल; असें झालें म्हणजे त्याच्याशीं सामना करण्यास कठीण जाणार नाहीं, आणि तो पराभव पावून परत गेला म्हणजे मग त्यानें घेतले किल्ले आपणांस पुनरपि सर करता येतील असें महाराजांनी त्यावेळीं मनांत आणिलें.

परंतु इतक्या अवकाशांत महाराज कांही स्वस्थ बसले नव्हते. त्यांनी राजापूर शहरावर पुनः हल्ला करून तें ह्या वेळीं हस्तगत केलें. ह्या शहरांत इंग्रज लोकांची वखार होती ह्याविषयीं मागें उल्लेख केलाच आहे. त्यांचें ह्या वेळीं बरेंच नुकसान झालें. वखारीवरच्या रिव्हिंगटन, जिफर्ड वगैरे चार इंग्रज व्यापाऱ्यांस कैद करून प्रथम वैसती येथे ठेविले; मग तेथून त्यांना काढून सोनगडावर ठेविले आणि शेवटी काहीं दिवस रायगडावर ठेविले हा असा त्यांच्यावर राग

काढण्याचे कारण असें कीं, शिद्दीजोहारानें पन्हाळ्यास वेढा घातला होता तेव्हां त्याला त्यांनी दारूगोळा पुरवून मदत केली होती. इतकेच नव्हे तर त्यांच्या कित्येक लोकांनी द्रव्याच्या लोभाने शिद्दीजोहाराच्या छावणीत जाऊन एकप्रकारचे कुलपी गोळे सोडण्याचे काम केले होतें.[१] तीन वर्षांनंतर त्यांच्याकडून खंड घेऊन त्यांस बंधमुक्त केलें.

राजापूर हस्तगत केल्यावर महाराजांनी शृंगारपुरावर आपला मोर्चा फिरविला. तेथें सुरवे[२] ह्या आडनावाचा एक मराठा सरदार स्वतंत्रपणें राज्य करत होता. तो कोणासच मोजीत नसे. त्याच्यापाशीं दहा हजार लोकांचा जमाव होता. तो नेहमी आसपासच्या मुलखात पुंडावा करून त्यास उपद्रव देत असे. त्याचे मुख्य कारभारी पिलाजी व तानाजी असे दोघे शिरके ह्या आडनावाचे मराठे सरदार होते. पिलाजी शिरके महाराजांपाशी सुरव्याचा वकील ह्या नात्याने होता. परंतु हा सुरवे नीट वागेना म्हणून महाराजांनी ह्या वकिलास कैदेत ठेविले होते. सुरव्याचा उपद्रव नाहींसा करून टाकण्याच्या इराद्याने महाराजांनी त्याचें मुख्य शहर जे शृंगारपूर त्याजवर अकस्मात छापा घालून तें सर केलें. शृंगारपूर हातचे गेलें तरी हा सुरवे कांही हार आला नाहीं. तो आपल्या लोकांस धीर देऊन महाराजांच्या सैन्याशीं एकसारखा लढत राहिला. शेवटी महाराजांनी स्वतः त्याच्यावर चालून जाऊन त्याला समरांगणांत गाडून त्याच्याशी दारुण युद्ध केले. त्यांत सुरवे पडला व शिरके पळून गेला. सुरव्याचा असा नाश झाला तेव्हां त्याच्या अंमलांतले कांही सरदार पळून जाऊन शिद्दीच्या मुलखात आश्रय धरून राहिले. हे महाराजांस मुळींच आवडले नाहीं. शिरके वगैरे सरदार लोकांची पुनः जमाजम करून व शिद्दीचे साहाय्य घेऊन हा काबीज केलेला प्रांत परत घेण्याचा प्रयत्न करतील तो त्यांनी करूं नये म्हणून महाराजांनी तानाजी शिरक्यास आपलासा करून शृंगारपूर शहर व दुसरे काही गाव इनाम करून दिले. ह्याप्रमाणें स्वतः शिरके महाराजांची ताबेदारी स्वीकारून राहिला तेव्हा दुसरेही कांही सरदार शिद्दीच्या आश्रयास गेले होते ते परत आपआपल्या गावी आले. त्यांस महाराजांनी त्यांची वतनें परत देऊन संतुष्ट केलें. त्यांपैकीं जे कोणी नोकरी करण्यास राजी व लायक होते त्यांस महाराजांनी आपल्या पदरी ठेविले. ह्या शिरक्याची कन्या पुढें महाराजांनी आपल्या ज्येष्ठ पुत्रास केली.[३]

नंतर पावसाळा सुरू झाला. तरी महाराज स्वस्थ राहिले नाहींत. कारण विजापूरच्या बादशहाने त्यांच्यावर स्वारी केली तेव्हां शिद्दीनें केलेला तह मोडून पुनः उचल घेऊन त्यांच्या प्रांतास उपद्रव केला होता. त्यामुळें महाराजांस त्याचा अतिशय राग आला आणि पावसाळा संपून विजापूरकरांस किंवा वाडीच्या सावंतांस त्याला मदत करता येण्यापूर्वी त्याचें अजिबात उच्चाटन करण्याचा त्यांनी निश्चय केला. महाराजांनी व्यंकाजीपंतास त्याच्यावर पाठविलें. उभय पक्षांच्या पुष्कळ झटापटी होऊन शेवटी व्यंकाजीने दंडाराजपुरी व सभोवतालचा आणखी बराच प्रांत काबीज केला. त्या हस्तगत झालेल्या प्रांतांत आणखी किल्ले बांधून व त्यांवर पाचसहा हजार लोक ठेवून तो प्रांत कायमचा हातीं राहील असें केलें. शिद्दीच्या ताब्यांत काय तो एक जंजिरा राहिला. तोही हस्तगत करण्याचा निश्चय करून त्यावर महाराजांच्या लोकांनी तोफांचा भडिमार चालविला. परंतु हा प्रयत्न त्यांस लवकरच सोडून द्यावा लागला. कारण त्यांच्यापाशी हव्या तितक्या तोफा नसून त्यांची सरबत्ती करण्यास लागणारी हुशार माणसेही हाताशी नव्हती. पुढें लवकरच पावसाळा संपून विजापूरसरकाराच्या सैन्याची हालचाल सुरू झाली तेव्हां महाराजांस तिकडे लक्ष पुरवावे लागल्यामुळें शिद्दीवरचा हल्ला ढिला पडला.

---

१ प्रो. सरकार, पृ. २९९

२ डफ ह्याचे नाव दळवी असें देतो, व सुरवे त्याचा दिवाण होता असें म्हणतो. शिरक्याचे तर तो नावही देत नाही. मुळांतील मजकूर मराठी बखरींवरून घेतला आहे.

३ महाराजांच्या ह्या स्वारीचा उल्लेख सोनगड येथे ठेवलेल्या इंग्रज कैद्यांनी आपल्या एका पत्रात स. १६६१ त केला होता. तो असा : शिवाजीने दळवी राजे व शृंगारपूरचे राजे यांना जिंकून आपली सत्ता वाढविली आहे. दंडराजपुरीपासून खारेपाटणापर्यंतचा समुद्र किनारा त्यांच्या हातीं गेला आहे. (प्रो. सरकार, पृ. ५६)

वर सांगितल्याप्रमाणें अल्ली अदिलशहा पावसाळा सुरू झाल्यामुळे मोहीम बंद करून चिमलगे येथें तळ देऊन राहिला होता. तेथें असता त्याला अशी बातमी आली कीं, कर्नाटकात फारच बंडाळी माजली आहे. तेव्हा त्यानें शिद्दी जोहारास तिकडे पाठविण्याचा विचार करून आपल्याकडे मोठ्या आदराने बोलावून आणिलें व त्याचा चांगला मानसन्मान करून त्यास कर्नाटकांत जावयास सांगितलें. परंतु तो कांहीं केल्या कबूल होईना. त्याला त्या बादशहाचा मुळींच विश्वास येईना. कारण त्याचा मुख्य वजीर इब्राहीमखान हा शिद्दीचा फार द्वेष करीत असे आणि बादशहापाशीं त्याचें अतिशयित वजन असे. यास्तव शिद्दी जोहार – लागलीच आपल्या जाहगिरीस परत गेला. त्यावरून बादशहाचा असा पक्का समज झाला कीं, हा कर्नाटकांतील बंडवाल्यांस सामील असून शिवाजी महाराजांशींही त्याचें संगनमत असावें.

शिद्दीजोहार कर्नाटकांतील बंड मोडण्यास जाण्याचे कबूल करीना तेव्हां आतां पुढें काय करावे असा अदिलशहास विचार पडला. त्याचा ह्या वेळी असा पक्का निर्धार झाला होता कीं, शिवाजीमहाराजांचे पारिपत्य केल्यावांचून परत जावयाचें नाहीं. त्याच्या जवळच्या कित्येक मसलतगारांचाही अभिप्राय असाच होता; परंतु दुसऱ्या कित्येकांचें म्हणणें असें पडलें कीं, आधी कर्नाटकांतली बंडाळी मोडली पाहिजे. शिवाजीमहाराजांस शोधून काढण्यासाठी, रान, दऱ्या, डोंगर धुंडीत राहून लष्कराची खराबी करावी आणि शेवटी डोंगर पोखरून उंदीर काढल्यासारखे होईल! अशी बादशहाची द्विधा वृत्ती होऊन पुढें काय करावे तें त्याला सुचेना. इतक्यांत वाडीचे देशमुख लखमसावंत व खेमसावंत यांनी त्याजपाशीं असा अर्ज केला कीं, आपणांस पुरेसे साहाय्य मिळाल्यास आपण शिवाजीमहाराजांचे पारिपत्य करून सर्व कोंकणप्रांत सोडवितों. हा त्यांचा अर्ज मंजूर होऊन असें ठरलें कीं, बहिलोलखान व मुधोळचा बाजी घोरपडे यांनी सैन्य जमवून सावंतास मदत करावी, व त्या तिघांनी मिळून शिवाजीमहाराजांवर स्वारी करावी आणि बादशहाने सैन्य घेऊन कर्नाटकांत जावे.

ह्याप्रमाणें महाराजांवर नव्या दमाची मोहीम तयार होत असतां बाजी घोरपडे ह्या तयारीसाठी मुधोळास आला. हें वर्तमान महाराजांस कळतांच[१] त्यांच्यावर अकस्मात् घाला घालून त्याला व त्याच्या पुष्कळ नातलगांस व लोकांस ठार मारिलें. आपल्या तीर्थरूपांस त्यानें विश्वासघात करून पकडल्याबद्दल त्याचा त्यांनी असा भयंकर रीतीनें सूड उगवला. याविषयी पूर्वी सांगितलेंच आहे. हा असा घोरपड्याचा नाश झाला तेव्हां त्याच्या जागी खवासखानाची रवानगी झाली. ह्या सरदारांनी कोकणच्या घांटापर्यंत कूच केलें न केलें तो त्यांस आपल्या सैन्यानिशीं ताबडतोब कर्नाटकांत निघून येण्याचा बादशाहाकडून हुकूम आला. त्यावरून ते तिकडे निघून गेले. कर्नाटकातले बंडखोर लोक प्रबळ असल्यामुळें त्यांचा मोड करण्यास मोठ्या सैन्याची जरूर पडल्याकारणानें बादशहास त्याला तिकडे निरुपायास्तव बोलवावे लागलें.

---

१ मि. किंकेड व रा. ब. पारसनीस आपल्या पुस्तकात शहाजीराजांचा व महाराजांचा ह्याप्रकरणी झालेला पत्रव्यवहार देतात, त्यावरून असे कळते की, हा घोरपडे वाडीचे सावंत व खवासखान यांसह महाराजांवर स्वारी करणार हे वर्तमान शहाजीराजांनी महाराजांस पत्र लिहून कळविले. ह्या पत्रात त्यांनी असे लिहिले होते की, 'ह्या बाजी घोरपड्याने स्वधर्मरक्षणाच्या कार्यास साहाय्य करावयाचे सोडून मुसलमान व तुर्क यांच्या कारस्थानास सामील होऊन आमच्याशी दगा केला आणि आम्हांस विजापूरास नेले. तेथे आमच्यावर कोणता प्रसंग ओढावला होता हे तुम्हांस विदित आहेच. मराठ्यांची सत्ता स्थापित करून स्वधर्मरक्षण करण्याचा जो तुमचा मनोरथ तो सिद्धीस न्यावा असा सर्वज्ञ प्रभूचा संकल्प आहे असे आता दिसून येत आहे. म्हणूनच आमच्यावरचा त्या समयीचा घोर प्रसंग टळला. तुमच्यावर आता खवासखान घोरपड्याच्या साहाय्याने चालून येत आहे, यात शिव आणि भवानी तुम्हांस यश देवो! ह्या दोघांचा चांगला सूड घ्यावा अशी आमची इच्छा आहे. पित्याची इच्छा पूर्ण करण्यास तत्पर असा तुमच्यासारखा आज्ञाधारक पुत्र आम्हाला सुदैवाने प्राप्त झाला आहे. यास्तव एवढी कामगिरी करण्याची मी तुम्हांस आज्ञा करितो. बाजी घोरपडे आपले लोक घेऊन मुधोळास गेला आहे.' ह्या आशयाचे पत्र आल्यावर मुधोळावर हल्ला करून महाराजांनी त्याचा सूड घेतल्यावर शहाजीराजांस आपण कोणत्या रीतीने ही कामगिरी बजाविली ते लिहून कळविले.

ह्याप्रमाणें कर्नाटकांतील बंडवाल्यांशी झगडण्यात बादशहाचे सगळे सैन्य गुंतून पुष्कळ दिवस तिकडेच राहिलें. त्यामुळें महाराजांस चांगलेच फावले. बादशहाने जे किल्ले काबीज केले होते ते सगळे त्यांनी भराभर हस्तगत केलें; इतकेंच नव्हे तर आणखीही बराच प्रांत त्यांनी ह्यावेळी जिंकला.

वाडीच्या सावंतांनी आपल्या राजनिष्ठेचें प्रदर्शन करून शिवाजीमहाराजांशी लढण्यासाठी आपण होऊन बादशहापाशी मदत मागितली व ह्याप्रमाणें महाराजांवर आपला किती दांत आहे तें प्रकट केलें, ह्याबद्दल त्यास चांगलीच शिक्षा करावयाची असा महाराजांनी निश्चय केला व त्यांच्या ताब्यातील प्रांतावर लागलीच स्वारी करून त्यांच्याशी युद्ध आरंभिलें. सावंत अगदी घाबरून गेले. बादशाही फौजेच्या साहाय्यावांचून त्यांस महाराजांशी लढण्याचे त्राण मुळीच नव्हतें, व हें साहाय्य मिळण्याची आशा ह्या प्रसंगी अगदीं नव्हती. महाराजांनी त्यांचे कुडाळ, बांदे वगैरे प्रांत काबीज केले. सावंत फिरंगणांत पळून जाऊन गोव्याच्या सुभेदाराचा आश्रय धरून राहिले. फिरंग्यांनी त्यांस आश्रय दिला हें पाहून महाराजांनी त्या सरकारास धमकीचा निरोप पाठविला. त्यासरशी त्यांचे डोळे उघडून त्यांनी सावंतांस आपल्या राज्यांतून निघून जावयास सांगितलें. तेव्हां त्यांचा निरुपाय होऊन ते महाराजांस शरण आले. त्यांनी प्रथम पितांबर शेणव्यास महाराजांपाशीं वकिलीस पाठविलें व अशी विज्ञप्ति केली कीं, 'आम्ही सावंत असून भोंसलेघराण्याशी आमचे नाते आहे. यास्तव आम्ही आपलेच आहों. आपले ताबेदार होऊन आपल्याशी इतःपर इमानाने वागावे असा आमचा निश्चय झाला आहे. तरी आमची आगळीक मनास न आणितां आमच्यावर कृपा व्हावी.' हें त्यांचें नम्रतेचे म्हणणें कळल्यावर महाराजांनी त्यांस अभय देऊन भेटीस आणविलें. वाडीप्रांताची देशमुखी त्यांच्याकडे कायम केली, व त्यांनीं प्रतिवर्षी खंडणी द्यावी असें ठरविलें.[१] महाराजांनी त्यांच्या पायदळ सैन्यास आपल्या नोकरीस ठेवून दूरच्या कामगिरीवर रवाना केलें व आपल्या पदरचे लोक त्यांच्या प्रांताच्या रक्षणासाठी ठेविले

ह्या सावंतांच्या पदरी नानसावंत[२] व राम दळवी असे दोघे सरदार होते. ते चांगले हुशार व जवानमर्द आहेत असें पाहून त्यांस महाराजांनी आपल्या नोकरीस ठेविले. राम दळवी फारच शूर आहे असें महाराजांच्या नजरेस आल्यावरून त्याच्या स्वाधीन काही फौज केली व त्यास कोकणातील कांही प्रांताचा बंदोबस्त ठेवण्याची कामगिरी सांगितली. ह्याप्रमाणें महाराजांनी सावंतांची व त्यांच्या ह्या दोघां शूर सरदारांची कायमची तुटातूट केली.

ह्या मोहिमेत महाराजांनी पंचमहाल, मर्दनगड, बारदेश वगैरे प्रांत काबीज केले व खुद्द गोव्यावर रोख धरिला. तेव्हां फिरंगी घाबरून गेले. शिवाजीमहाराजांचा आपणांवर शह बसू नये व त्यांच्यापासून आपणांस काहीएक उपद्रव होऊं नये ह्या हेतूनें त्यांच्याकडे कुडाळकर देसायांचा सबनीस अनंत शेणवी यास पाठवून त्यांनी तहाचे बोलणे लाविलें. परंतु ह्या शेणव्याने हितशत्रुत्व दाखवून महाराजांचा विश्वासघात करण्याचा घाट घातला. फिरंग्यांकडून तहाचे बोलणे आलें तेव्हां ते बेफाम राहतील असें त्यास वाटून त्यानें फिरंग्यांस अशी मसलत दिली कीं, त्यांच्या छावणीवर रात्रीचा एकाएकी छापा घालून त्यांचा नाश करावा. परंतु ही गुप्त मसलत गणोजी नांवाच्या एका तांडेलास समजून त्याने ती महाराजांस कळविली. तेव्हा अर्थात् ते सावध राहिले. सदरील मसलतीप्रमाणे अनंत शेणवी दहा हजार फिरंगी बरोबर घेऊन मध्यरात्रीच्या सुमारास महाराजांच्या गोटावर हलकेच चालून आला. तो इकडे महाराज आपले ठाणे सोडून अर्ध कोस मागें हटून तयारीने उभे राहिले होते. फिरंगी सैन्य गोटापाशी येऊन तोफाबंदुकांची सरबत्ती करत राहिलें. महाराजांनी उजाडेपर्यंत काहीएक हालचाल केली नाहीं. प्रातःकाळ होतांच त्यांच्या घोडेस्वारांनी फिरंग्यांच्या सैन्यावर एकदम चाल करून कापाकापी सुरू केली. फिरंग्यांचा पुरा मोड झाला. त्यांचे फारतर हजार बाराशे लोक जीव घेऊन माघारी पळून गेले असतील. बाकीच्यांपैकी कांही समरभूमीवर पडले, कांही पाण्यांत उड्या टाकून बुडून मेले व कांही

---

१ सभासद म्हणतो की, त्यांस तनख्यादाखल सहा हजार होन द्यावे असा करार करून ठेविले. त्यांनी कसबा कुडाळ येथें राहावें व वाडा, हुड, ठाणें, कोट वगैरे कांहींएक बांधू नयेंत व लोकांचा जमाव करूं नये असें ठरविलें.

२ सभासद ह्याचे नाव तानाजी सावंत असें देतो.

पाडाव झालें. ह्याप्रमाणें एवढी फौज गारद झालेली पाहून फिरंगी अगदीं घाबरून गेले. त्यांचा बारदेश सगळा महाराजांनी लुटून जाळून उद्ध्वस्त केला. फिरंगी सापडेल तेवढा ठार मारण्याचा सपाटा चालविला. फिरंगी सावकार सापडले तेवढे पकडून आणून त्यांच्यावर जबर खंड बसविला. कुडाळ. बांदे, साकळी, मणेरी, तुचाळी वगैरे ठिकाणीं महाराजांनी ठाणी घातली होती; त्याप्रमाणेंच त्यांनी बारदेशांतही तीं जागोजाग घातली. चोहोंकडून गोवेंप्रांतास जशी काय चौकीच बसविली. आतां गोवे आपल्या हातचे जातें अशी दहशत फिरंग्यांस पडली. अनंत शेणव्याची कपटाची मसलत ऐकिल्यांमुळें आपल्यावर असें घोर संकट ओढवले ह्याबद्दल त्यांस अनुताप झाला. मग त्यांनी महाराजांस आपल्या वकिलाबरोबर पत्र पाठवून झाल्या गोष्टीबद्दल क्षमा मागितली. त्याच्याबरोबर महाराजांस वीस हजार पुतळ्या, उंची वस्त्रे व इतर नजराणा त्यांनीं पाठविला व तहाचे बोलणे केलें. तें महाराजांस मान्य होऊन असा तह ठरला कीं, फिरंग्यांनी दरसाल नव्या तोफा पुरवाव्या, कांही जवाहीर प्रतिवर्षी द्यावे व आपल्या जहाजांस कौल महाराजांकडून घ्यावे.

वर सांगितल्याप्रमाणें सावंतांचा मोड होऊन त्यांस महाराजांचे अंकित व्हावें लागलें, ही हकीगत विजापूरसरकारास कळली तेव्हां त्यांस फार वाईट वाटलें. कोंकणाच्या बाजूस एवढाच एक सरदार नांव घेण्यासारखा उरला होता. तोही शिवाजीमहाराजांचा ताबेदार झाला तेव्हां कोंकणपट्टी परत मिळविण्याची त्या सरकाराची आशा बहुतेक नाहींशी झाली. जंजिऱ्याच्या शिद्दीचे त्यास थोडेसे पाठबळ होतें, त्यालाही महाराजांनी बराच निर्बळ करून सोडले होतें व तो ह्या वेळीं विजापूरसरकाराच्या आश्रयाने राहून आपला इतःपर निभाव लागणे नाहीं असें समजून त्या सरकाराशी अंमळ बेपरवाईनंच वागू लागला होता. तेव्हां आतां पुढें शिवाजीमहाराजांशी लढाई करावयास कोणास उभे करावे हा विचार त्या सरकारास येऊन पडला. दरबारातील कोणीही सरदार तयार होईना; आणि त्यांचा उपद्रव तर कांही केल्या कमी होईना. तेव्हां निरुपाय होऊन अल्ली अदिलशहाचा वजीर अबदूल महमद याने त्यांचा त्रास नाहींसा करण्याच्या हेतूनें त्यांच्याशीं गुप्तपणे तह केला. हा तह असा गुप्तपणे करण्याचें कारण अर्थात् असें होतें कीं, दरबारच्या अमिरांस तह केल्याचे वर्तमान कळले असतें तर त्यांना ती गोष्ट मुळींच आवडली नसती व त्यांनी त्या वजिरास दोष देऊन कामावरून दूर करविण्याची खटपट केली असती; इतकेंच नव्हे तर बादशहास भलतीच मसलत दिल्याबद्दल त्याला जबर शिक्षा करविली असती. असो. महाराजांबरोबर त्या वजिरानें केलेल्या तहात असें ठरलें कीं, शिवाजी महाराजांचा उपद्रव नाहींसा करण्यासाठीं त्यांनी जिंकिलेला मुलूख त्यांच्याकडेच राहू द्यावा. तो परत घेण्याची खटपट विजापूरसरकारानें करूं नये. याशिवाय त्यांस आणखी कांही मुलूख तोडून द्यावा. शिवाजीमहाराज आपले अंकित आहेत असें विजापूरसरकारानें इतःपर मानू नये; त्या सरकाराने त्यांस प्रतिवर्षी सात लक्ष होन खंडणीदाखल द्यावे; परस्परांनीं परस्परांस प्रसंग पडेल तेव्हां साहाय्य करावे; आणि महाराजांचा शामजी नाईक पुंडे विजापूरदरबारांत वकील असावा.

हा तह झाल्यावर महाराजांनी विजापूरसरकाराच्या उरलेल्या मुलखास उपद्रव देण्याचे बंद केलें. पुढें शहाजीराजे महाराष्ट्रांत यावयास निघाले. त्यांस विजापूरसरकारानें परवानगी देतांना असें सांगितलें कीं, तुम्ही आपल्या पुत्रास भेटून आमच्याशी ते इतःपर सलोख्याने वागतील असें करा. त्याप्रमाणें शहाजीराजांनी महाराजांस सांगितल्यावरून त्यानंतर त्यांनी विजापूरसरकाराशी आपण होऊन विरोध केला नाहीं. ह्या पितापुत्रांच्या भेटीचे वर्णन पुढील स्वतंत्र भागात करू.

ह्याप्रमाणें महाराजांच्या अंगच्या शौर्यवीर्यादी गुणांचे अलौकिक तेज प्रगट होऊन, प्रारंभी जी गोष्ट दादाजी कोंडदेवप्रभृती जनांस असंभाव्य व घोरपरिणामी अशी वाटली होती ती सुसाध्य आहे, एवढेच नव्हे तर बरीच साध्य झाली आहे हें त्यांनी स्वतःच्या कर्तबगारीनें सर्वांच्या प्रत्ययास आणून दिलें आणि विजापूरसरकाराचा हा एक लहानसा जहागिरदार आहे असें पंधरा सोळा वर्षापूर्वी कित्येक देशमुखांस व मराठे सरदारांस वाटे, तो आतां इतका प्रबळ झाला कीं, त्या सरकारास अगदी हतवीर्य करून त्याच्याकडून प्रतिवर्षी खंडणी घेऊं लागला, हें पाहून त्यांस केवढे नवल वाटलें असावें?

आतां ह्या वेळीं म्हणजे स. १६६२ पर्यंत महाराजांच्या ताब्यांत किती मुलूख आला होता याचे येथें दिग्दर्शन करू. एवढ्या अवकाशांत त्यांच्या ताब्यांत कल्याणापासून गोव्यापर्यंत सगळी कोंकणपट्टी आली होती. ह्या एवढ्या मुलखाची लांबी सुमारें तीनशे मैल होती. भीमानदीपासून वारणानदीपर्यंत सगळा कोंकणघांटमाथा त्यांच्या कबजांत आला होता. ह्या प्रांताची लांबी सुमारें एकशे साठ मैल होती व ह्या सगळ्या मुलखाची रुंदी सरासरी शंभर मैल होती. त्याप्रमाणेंच त्यांच्या जवळ ह्यावेळी पन्नास हजार पायदळ व सात हजार घोडेस्वार होते. हें सैन्य त्यांच्या ताब्यातल्या मुलखाच्या मानानें अंमळ अधिक होतें; परंतु एवढे सैन्य ठेवणे त्यांना अवश्य होतें कारण त्यांना स्वराज्यस्थापना दोन प्रबळ पातशाहतींशी वैर करून करावयाची होती. त्यापैकीं एका पातशाहतीस तर त्यांनी पूर्वोक्त प्रकारे चीत केलें. आतां दुसरी जी मोगल पातशाहत तिजशीं कसकसें वैर आरंभिलें, हा वृत्तांत यथाक्रम सांगूं.

***

भाग चौदावा

पितृदर्शन
(१६६२)

महाराजांनी विजापूरसरकारास हतवीर्य करून त्याच्याकडून आपलें स्वातंत्र्य कबूल करविले व त्याजवर वार्षिक खंड बसविला, हें वर्तमान शहाजीराजांस कळले तेव्हां त्यास परम हर्ष झाला असावा यात कांहीं शंका नाहीं. अशा अद्वितीय पराक्रमी पुत्राची भेट घेण्याची उत्कंठा त्यांस पुष्कळ दिवस लागून राहिली होती. महाराज आपणांकडील हकीकत त्यांस वारंवार पत्रे पाठवून कळवीत असत व तेही वेळोवेळी पत्रे पाठवून त्यांचा गौरव व पुरस्कार करीत असत; परंतु हा सगळा पत्रव्यवहार अत्यंत गुप्तपणे होत असे. कारण महाराजांच्या एकंदर कर्तृत्वांत आपलें अंग आहे असें विजापूरसरकारास कळू न देण्याविषयी शहाजीराजे फारच सावधगिरी घेत असत. आपली कर्नाटकांतील दौलत कायम राखून साधल्यास तिकडे स्वतंत्र राज्य स्थापण्याचा त्यांचा इरादा होता, हें मागें सांगितलेंच आहे. यास्तव विजापूरसरकारास आपला वहीम पुन: न येऊ देण्याविषयी ते फारच जपत. पुढें त्या सरकाराचा आणि शिवाजीमहाराजांचा सलोखा झाला तेव्हां आपणांस महाराष्ट्रात जाऊन येण्याची परवानगी सहज मिळेल असें वाटल्यावरून त्यांनी त्या सरकारापाशीं असा अर्ज केला कीं, आमच्या आराध्य देवतांस आम्ही काही नवस वगैरे केले आहेत ते फेडण्यासाठीं व त्या देवतांचे दर्शन फार दिवस घडले नाहीं तें घ्यावयासाठी आम्हांस महाराष्ट्रांत एक वेळ जाऊन यावयाचे आहे. तरी आम्हांस तिकडे जाण्याची परवानगी मिळावी. हा आपला अर्ज मंजूर व्हावा म्हणून त्यांनी आतून खटपटही केली होती. दरबाराने हा त्यांचा अर्ज मंजूर करून त्यांस असें फरमाविले कीं, 'तुम्ही स्वदेशी जाता आहां तरी तुमचा पुत्र मोठा पुंड झाला आहे, त्याला बहुत प्रकारीं बोध करून व युक्तीप्रयुक्तीनें समजावून पादशहाचे भेटीस आणावे त्यानें तुमच्याप्रमाणे पातशहाची अमिरी स्वीकारून राहावें. तुमचा बोध ऐकून तो आमच्या दरबारी येईल तर त्यास वजिरी सांगून सर्व पातशाहत त्याच्या स्वाधीन करू. कसेही करून तो आमचा अंकित होईल असें राजकारण करा.' यास शहाजीराजांनी एवढाच जबाब पाठविला कीं, 'माझा पुत्र माझ्या स्वाधीन आहे किंवा कसें तें सरकारास विदित आहेच. तरी पण मजकडून होईल तितका प्रयत्न मी करून पाहतों. मला सरकाराच्या हिताचे तेंच करणें आहे. श्रीकुलस्वामिनीचें दर्शन घेऊन नंतर आपल्या कार्यासाठी पुत्राचीही भेट घेतो त्याला बोधाच्या चार गोष्टी सांगून पाहतों.' असें उत्तर शहाजीराजांकडून गेल्यावर त्यांस पुनः असें सांगणे आलें कीं, 'तुमच्याकडून होईल तो यत्न करून पाहा. न जमल्यास तुम्ही तरी परत आमच्याकडे या, त्यास मिलाफी होऊं नका ! पुत्रलोभास वश होऊन तिकडेच राहू नका!'

ह्याप्रमाणें पादशहाची परवानगी मिळाल्यावर राजे कर्नाटकांतून स्वदेशी यावयास निघाले, येताना आपलें द्वितीय कुटुंब व त्याच्या पोटीं झालेला पुत्र व्यंकोजी यास बरोबर आणिलें. आपण येत आहो हें महाराजांस पत्र पाठवून त्यांनी कळविले होतें. ते प्रथम तुळजापुरास आले. तेथें भवानीचे दर्शन घेऊन त्यांनी पुष्कळ दानधर्म केला. असें सांगतात कीं, स्वराज्यस्थापना करून गोब्राह्मणांच्या पीडेचा परिहार करावा व स्वधर्मरक्षण करावे असा सदुद्देश धरून आपल्या पराक्रमी पुत्राने चालविलेल्या खटपटीस यश आल्यास लक्ष रुपयाचे सोने घेऊन त्याच्या मूर्ती वगैरे घडवून भवानीस

अर्पण करूं, असा नवस शहाजीराजांनी केला होता. त्याप्रमाणें महाराजांस बरेंच यश आलें असें पाहून राजांनी सोने खरेदी करून त्याच्या चांगल्या मूर्ती कर्नाटकांतील कारागिरांकडून तयार करवून ह्या वेळीं बरोबर आणिल्या होत्या. त्या देवीस यथाविधी अर्पण केल्या. नंतर त्यांनी सिंगणापूरचा महादेव, पंढरपूरचा विठोबा व शिखरशंभु महादेव यांचें दर्शन घेतलें. प्रत्येक देवस्थानीं पुष्कळ दानधर्म केला, ब्राह्मणभोजनें घातली व गोरगरिबांस खैरात केली.

शहाजीराजे महाराष्ट्रांत आल्याची खबर महाराजांस कळताच त्यांनी त्यांच्या प्रत्येक मजलेस सर्व कांहीं तरतूद यथास्थित ठेविली. शहाजीराजांस जशी पुत्राच्या भेटीची रात्रंदिवस उत्कंठा लागली होती तशी महाराजांसही पितृदर्शनाची उत्कट इच्छा झाली होती. जिजाबाईस तर हा सोन्याचा दिवस वाटला. आतां ही भेट पुष्कळ वर्षांनी व्हावयाची तेव्हां अर्थात् चालीप्रमाणें ती देवालयांत व्हावी असें ब्राह्मणांच्या विचाराने ठरलें. हें देवालय जेजुरीचे नेमून तेथें उभयतांनी यावें असा बेत झाला. राजे जवळ आले असें पाहून महाराजांनी आपली फौज, हत्ती, घोडेस्वार, कारकून वगैरे बरोबर देऊन सरनौबत यास सामोरा पाठविलें. आपण स्वत: जेजुरीस जाऊन त्यांची वाट पाहत राहिले. त्यांची स्वारी वाजतगाजत सामोरे गेलेल्या लोकांसमवेत देवळांत येऊन दाखल झाली. मग देवाची यथासांग पूजा करून शहाजीराजांनी जिजाबाई, शिवाजीमहाराज व त्यांच्या दोन स्त्रिया यांची विधिपूर्वक भेट घेतली. तो विधी असा कीं, एक मोठे काशाचें ताट आणून त्यांत तूप घातले होतें. ह्या तुपात त्या चौघांची मुखे शहाजीराजांनी एकसमयावच्छेदेकरून अवलोकन केली. हा विधी आटोपल्यावर महाराजांनी परम प्रिय पित्याच्या चरणीं मस्तक ठेविले. त्यांनी त्यांस उचलून धरून प्रेमालिंगन दिलें. दोघांच्याही नेत्रांतून प्रेमाश्रू चालले. मग राजांस पालखीत बसवून महाराज स्वत: त्यांचे जोडे हातांत धरून मोठ्या मर्यादेनें पालखीबरोबर अनवाणी चालले. ह्याप्रमाणें अत्यंत आदराने त्यांस डेऱ्यास आणून बिछायतीवर बसविले आणि महाराज त्यांचे जोडे तसेच हाती धरून त्यांच्या समोर मोठ्या मयदिनें उभे राहिले, व अतिनम्रतापूर्वक येणेंप्रमाणें बोलले, ‘महाराजांच्या आज्ञेचा भंग करून विजापूरकरांशीं वैर केलें, त्यामुळें महाराजांस फार क्लेश झाले. हें अतिशयित अनुचित होय. पुत्राच्या करणीमुळे पित्यास प्राणसंकट प्राप्त व्हावें हें खरोखरच अगदीं वाईट. याबद्दल मला मोठे दु:ख वाटतें. हा मजकडून मोठा अपराध घडला आहे. त्याबद्दल महाराजांनी मला वाटेल तें शासन करावे!'' हें त्यांचें भाषण ऐकून राजांस अतिशयित गहिवर आला. ते सद्गदित होऊन त्यांच्या नेत्रांतून अश्रुधारा चालल्या. मग राजांनी महाराजांस पुनः आलिंगन देऊन मोठ्या आग्रहाने जवळ बसविले व त्यांची अनेक प्रकारीं प्रशंसा करून ते येणेंप्रमाणें बोलले, ‘तुम्ही शिसोदे क्षत्रियकुलांत निर्माण होऊन त्या कुलास अनुरूप असा अप्रतिम पराक्रम केला व हिंदू प्रजेस यवनांच्या क्लेशप्रद सत्तेतून सोडवून स्वराज्यस्थापन व स्वधर्मरक्षण करण्यासाठीं भगीरथ प्रयत्न करून त्यात यशस्वी झाला हें पाहून मला पराकाष्ठेचें समाधान व धन्यता वाटत आहे. आमच्या वडिलांस असा दृष्टांत झाला होता कीं, ‘तुमच्या कुळांत शककर्ता उत्पन्न होऊन तो हिंदुप्रजेचे व हिंदुधर्माचे यवनांपासून रक्षण करील! हा दृष्टांत खरा होता हें तुम्ही आपल्या अलौकिक कर्तृत्वानें प्रत्ययास आणून दिले. तुमच्या ठायींच्या शौर्यवीर्यादी अनुपम गुणाच्या योगाने आमच्या कुलाचा पुनरपि भाग्योदय झाला आहे. असा प्रतापशाली पुत्र आमच्या उदरी निर्माण झाला म्हणून आम्ही त्रैलोक्यांत धन्य झालो आहों’ प्रिय पित्याचे असें स्तुतिपर व प्रोत्साहनपर भाषण ऐकून महाराजांनी उठून त्यांच्या चरणांवर पुनः मस्तक ठेवले, आणि हात जोडून मोठ्या विनयाने असें म्हटलें कीं, ‘मजकडून जें कांहीं यत्किंचित् झालें आहे तो सगळा महाराजांच्या चरणाच्या पुण्याईचा प्रताप आहे. महाराजांचा पूर्ण आशीर्वाद होता म्हणून मला माझ्या कार्यात थोडेसे यश आलें आहे.’

ह्याप्रमाणें त्या महाप्रतापी पितापुत्राचा प्रेमसंवाद झाल्यावर महाराजांनी तेथें आलेल्या आपल्या पदरच्या सर्व सरदारांच्या व कारभाऱ्यांच्या भेटी करविल्या. नंतर त्यांनी तुकाबाईचे मोठ्या आदराने व सन्मानाने दर्शन घेतलें. व्यंकोजीसही मोठ्या प्रेमाने आलिंगन दिलें. शहाजीराजांबरोबर आलेल्या सरदारांच्या व कारभाऱ्याच्या महाराजांनी भेटी घेतल्या. ह्याप्रमाणें सगळ्यांच्या भेटी होऊन त्यांची हृदये प्रेमरसाने उचंबळू लागली. महाराजांच्या ठायींची अशी

निःसीम व अलौकिक पितृभक्ती पाहून सर्वांस पराकाष्ठेचे नवल वाटून ते त्यांची अतिशयित वाखाणणी करूं लागले. महाराजांनी ह्या आनंदोत्सवाप्रीत्यर्थ तेथें पुष्कळ दानधर्म केला. ब्राह्मणभोजनें घातली व गरीबगुरिबांस खैरात केली. येथून पुढें त्यांनी पुण्यास प्रयाण केलें.

शहाजीराजांनी पुण्यास दोन महिने मुक्काम केला. तेथें त्यांचे व त्यांच्या बरोबर आलेल्या सर्व लहानथोर लोकांचे महाराजांनी बहुत प्रकारे प्रेमपूर्वक आदरातिथ्य व पाहुणचार केला. राजांच्या सेवेंत सर्वकाळ तत्पर राहून त्यांस कोणत्याही गोष्टीचे उणे पडूं दिलें नाहीं. स्वराज्यस्थापनेस आरंभ केल्यापासून घडलेल्या एकंदर गोष्टींचे निरूपण स्वत: केलें. नित्यशः जो कांही राज्यकारभार पाहणे तो त्यांच्या विचारे व त्यांच्या नांवे चालविला. शहाजीराजांस हें वर्तन पाहून अतिशयित समाधान वाटे. असा शूर, पराक्रमी व शहाणा पुत्र आपल्याशी अतिनम्रतेनें वागून आपल्या अर्ध्या वचनांत रहाण्यांस सर्वदा तत्पर आहे असें पाहून त्यांस किती तरी आनंद व धन्यता वाटली असावी! महाराजांनी आपली सर्व दौलत राजांस दाखविली, ती पाहून तर ते अतिशयित थक्क झाले! एवढ्या अल्प अवकाशांत एखाद्या सार्वभौम नृपतीस शोभेशी संपत्ती मिळविल्याबद्दल त्यांची राजांनी तारीफ केली.

शहाजीराजांनी कर्नाटकांतून येतांना कांहीं उत्कृष्ट तरवारी तयार करवून आणिल्या होत्या. त्या त्यांनी महाराजांस दिल्या व त्यांच्या अप्रतिम पराक्रमानें स्वतःस परम संतोष झाल्याचे सूचक म्हणून आपल्या हातांतील एक बहुमोल तरवार खुद्द त्यांस दिली. तिचा महाराजांनी परमपूज्य बुद्धीने स्वीकार करून ती आपल्या प्रिय व महाप्रतापी पित्याच्या हातची यशस्वी तरवार जाणून तिचे नांव तुळजा असें ठेविले व ती भवानीतरवारीजवळ नित्य पूजेस ठेविली.

महाराज आपल्या वडिलांच्याच बरदास्तींत नेहमी निमग्न असत. त्यांनी एवढ्या अवकाशांत कोणत्याही प्रकारच्या राजकारणांत किंवा मोहिमेत बिलकूल मन घातले नाहीं. एकाद्या सामान्य सेवकाप्रमाणें ते त्यांच्या सेवेत सर्वदा तत्पर असत. आतां ते आपल्या पित्याचीच तेवढी बरदास्त करून राहिले नाहींत, तर आपली सावत्र माता तुकाबाई हिचीही सेवा त्यांनी मोठ्या आदराने केली. जिजाबाई मातुश्रीशी जसे त्यांचें प्रेमाचे व आदरशीलतेंचें वर्तन असे तसेंच तुकाबाईशीही ते वर्तन करीत. तिच्या तैनातीस चांगली हुशार माणसे ठेवून तीस सर्व गोष्टींची अनुकूलता करून दिली. तिला व व्यंकोजीला जें जें कांही हवें असे तें तें त्यांस तत्काळ मिळण्याची व्यवस्था नीटपणे होत आहे की कसें याची ते नित्य चौकशी ठेवीत व आपण स्वतः तुकाबाईपार्शी वारंवार जाऊन तिच्यापुढे हात जोडून उभे रहात आणि 'कांहीं आज्ञा आहे काय?' म्हणून विचारीत.

नंतर महाराजांनी राजांस अशी सविनय विनंती केली कीं, 'महाराजांनी थोडी तसदी घेऊन मुख्य मुख्य किल्ल्यांची व्यवस्था कोणत्या प्रकारे ठेविली आहे ती प्रत्यक्ष पाहावी.' त्याप्रमाणें राजे कांही किल्ले पाहावयास गेले. अर्थात् महाराजांनी त्यांच्याबरोबर जाऊन त्यांस प्रत्येक किल्ल्याची व्यवस्था दाखविली व तो कसा प्राप्त झाला ती हकीगत निवेदन केली. कांही नवे किल्ले बांधिले होते त्यांची रचना कोणत्या प्रकारे केली होती ते त्यास दाखविले. प्रत्येक ठिकाणची व्यवस्था पाहून राजांनी ज्या काही सूचना वगैरे केल्या त्या महाराजांनी चित्त देऊन ऐकून घेतल्या. शहाजीराजांस प्रतापगडावर नेऊन तो किल्ला, भवानीचे देवालय व ज्या बुरुजापाशी अफझुलखानाचा वध केला होता, तें स्थल महाराजांनी त्यांस दाखविले. व त्या वेळीं कोणकोणत्या हिकमती योजिल्या होत्या त्यांचें त्यास सविस्तर कथन केलें. ह्याप्रमाणें किल्ल्यांची पाहणी करित असता प्रत्येक किल्लेदार, सरदार व कामदार यांच्या राजांशी भेटी करविल्या. शेवटीं पन्हाळगडावर गेल्यावर शहाजीराजांनी परत कर्नाटकांत जावयाचा आपला मानस महाराजांस कळविला. तो समजून त्यांस फार वाईट वाटलें. त्यांनी महाराष्ट्रातच राहून संपादिलेल्या राज्याची व्यवस्था पाहावी अशी महाराजांची इच्छा होती व ती त्यांनी त्यांस अनेक वेळां बोलूनही दाखविली होती. त्यावर राजांचे म्हणणें असें पडलें कीं, 'मी तुमच्या मायेस गुंतून इकडे राहिलो तर तिकडे संपादिलेली दौलत सारी यवनाच्या हाती नाहक

जावयाची. दुसरें असें कीं, मी कर्नाटकांतील जाहगीर सांभाळून राहिल्यानें तुमच्या पुढील क्रमास अनेक प्रकारे साहाय्य होऊन सर्व भरतभूमी आक्रमण करण्याचा व यवनांस स्वदेशांतून हाकून देण्याचा तुमचा संकल्प शेवटास जाण्याचा संभव विशेष आहे.' हें संयुक्तिक कारण ऐकून महाराजांनी आपला आग्रह सोडिला आणि वडिलांची रवानगी करण्याच्या तयारीस ते लागले. पन्हाळ्यावर पुनः राजांबरोबर आलेल्या एकंदर लोकांस मोठ्या थाटाच्या मेजवान्या केल्या. निरनिराळ्या ठिकाणच्या गुणी जनांस बोलावून आणून त्यांची करमणूक करविली. त्यास त्यांच्या दरज्याप्रमाणें जवाहीर, वस्त्रे वगैरे दिलीं. त्यांचा मुख्य कारभारी त्र्यंबक नारायण हणमंते यास उंची पोषाख व जवाहीर देऊन ढालतलवार बक्षीस दिली. खुद्द शहाजीराजे, तुकाबाई व व्यंकोजी यांस नाना परीच्या अपरूप चिजा नजर केल्या. याशिवाय त्यांस कोणत्या वस्तू हव्या तें विचारून त्या त्यांस आणून दिल्या. पोषाख, जवाहीर, हत्ती, घोडे वगैरे पुष्कळ देऊन आणखी वाटखर्चासाठीं पुरेसा खजिना व सरंजाम त्यांच्याबरोबर दिला.

ह्याप्रमाणें जाण्याची तयारी झाली तेव्हां ह्या परम योग्य पितापुत्रांस अतिशयित गहिवर आला. महाराज तर फारच कष्टी झाले. यवनांच्या ताबेदारीत किती क्लेश व संकटे आहेत याचा पुनः पुन्हा प्रत्यय आल्यामुळे तिचा त्याग करण्यातच वास्तविक सौख्य आहे असा त्यांचा अभिप्राय झाला असल्यामुळें आपल्या प्रतापशाली पित्याने तिचा अखंड स्वीकार करून राहावें हें त्यांस मनापासून आवडत नव्हतें; परंतु ह्या ताबेदारीचा अंगीकार करून राहण्यात आपला कोणता हेतू आहे तें राजांनी दर्शविल्यावरून महाराज निरूत्तर झाले. तरी त्यांच्या तावडीत त्यांनी अशा वृद्धापकाळी आपण होऊन जाऊन पडावे हें त्यांस कसेंच वाटले, परंतु नाइलाजास्तव त्यांस वडिलांची पाठवणी करणें भाग पडलें. राजे निघतेवेळीं महाराजांनी त्याच्या पदरच्या लोकांस पुनः पुन्हा विनवून सांगितले कीं, ''थोरले महाराज वयोवृद्ध झाले आहेत. त्यांच्या जीवास मनापासून जपा! मी तिकडे लवकरच यांच्या दर्शनास येणार आहें. त्या वेळीं तुमच्या नोकरीबद्दल तुम्हांस मी योग्य पारितोषिक देईन!''

असें सांगतात कीं, महाराजांनी ह्या वेळी आपल्या तीर्थरूपांपाशी असें कबूल केलें कीं, आपण हयात आहां तोपर्यंत विजापूरसरकाराच्या उरलेल्या मुलखास उपद्रव करणार नाहीं! शहाजीराजांनी विजापुरास जाऊन बादशहाची मुलाखत घेतली व शिवाजीमहाराजांकडून स्वतःस मिळालेले हत्ती, घोडे व जवाहीर ही त्यांनी पाठविलेला नजराणा म्हणून, बादशहास अर्पण केली व हजरतीने फरमाविलेलें काम फत्ते करून आलों असें सांगून त्यांचा निरोप घेऊन ते कर्नाटकांत निघून गेले.

ह्यानंतर शहाजीराजे आपल्या प्रिय व सुशील पुत्राचे आणखी पराक्रम व कीर्ती ऐकावयास फार दिवस जगले नाहींत. ही त्यांची भेटही शेवटचीच झाली. महाराष्ट्रांतून परत गेल्यावर दोन वर्षांनी त्यांचे देहावसान झालें. हा मृत्यू त्यांस कसा अवचित प्राप्त झाला हें मागें त्यांच्या वृत्तांत कथन केलें आहे. ही पितृनिधनवार्ता ऐकून महाराज शोकसागरात बुडाले. 'आजपर्यंत आपल्या शिरावर वडील असून त्यांच्या हिमायतीवर यवनांशी वैर आरंभिलें. ते हा लोक सोडून गेल्याने आपण केवळ निराधार झालो. आपण केलेले पराक्रम ऐकून ज्यास खरा अभिमान व संतोष वाटावयाचा, व ज्यांच्या तोंडून गौरवाचे शब्द आल्याने आपल्या चित्तास समाधान, उत्साह व धन्यता ही वाटावयाचीं, ते आपले परम प्रिय वडील आपणांस सोडून गेले!' असे खेदोद्गार काढून ते परम कष्टी झाले. जिजाबाई मातुश्रीस अनावर शोक झाला. ती सती जावयास सिद्ध झाली, तेव्हां तर महाराजांस आकाशपाताळ एक झालें. तीर्थरूप गेले आणि मातुश्रीही सोडून चालल्या हें पाहून त्यांस अतोनात दुःख झालें. तिच्यापाशीं अगदी दीनपणें बसून तिची त्यांनीं नाना प्रकारे समजूत घातली. तरी ती साध्वी ऐकेना. तेव्हां तिचे पाय घट्ट धरून ते एकसारखे रडत बसले. कांही केल्या पाय सोडीनात. हा आकांत पाहून मोरोपंत, निराजीपंत, दत्ताजीपंत वगैरे कारभारी जवळ होते, त्यांनी पदर पसरून मातुश्रीची अशी विनवणी केली कीं, 'आपण अग्निप्रवेश केल्यावर महाराज काही प्राण ठेवणार नाहींत. संपादिलेलें

राज्य आजच लयास जाण्याचा प्रसंग आला. शिवाजीमहाराज व थोरले महाराज यांचें नांव मागें राहात नाहीं. ह्या गोष्टीकडे नजर देऊन महाराजांस ओसंगी घ्यावे. मन घट्ट करून राहावें. हेका धरून सती गेला, तर वंशक्षय केला ही अपकीर्ती जगात होईल!' ह्याप्रमाणें सर्वांनी सांत्वन करून आग्रह केल्यामुळें केवळ पुत्रप्रेमास्तव तिने आपला विचार सोडला.

संप्रदायाप्रमाणे तीर्थरूपांची उत्तरक्रिया करून लक्षावधी रुपयांचा दानधर्म महाराजांनी केला. शहाजीराजांचा अंत जेथे झाला त्या बंदेकीर[१] गांवी पुष्कळ पैसा खर्चून छत्री बांधली व तिची पूजाअर्चा नियमानें चालावी म्हणून पारिपत्यगार नेमून विजापूरसरकाराकडून कांही गांव घेऊन त्यांचें उत्पन्न तेथल्या खर्चास लावून दिलें, हें मागें सांगितलेच आहे.

***

१ बेदिकरे, बेदगिरी असे ह्या नांवाचे आणखी पाठ इतरत्र आढळतात. पृ. ३६-३७ पाहा.

भाग पंधरावा

आरमार व समुद्रांतील किल्ले

कोंकणपट्टी काबीज केली ती आपल्या हातीं निर्वेधपणें राहावी यासाठीं महाराजांनी त्या प्रांतास उपद्रव करणाऱ्या बहुतेक पुंडांचा नायनाट केला किंवा त्यांस आपले अंकित करून ठेवले; परंतु एका यवन सरदाराच्या उपसर्गास त्यांस अद्यापि आळा घालितां आला नव्हता. जंजिऱ्याच्या शिद्दीशीं अनेक वेळां युद्धप्रसंग करून त्याचा बराच मुलूख त्यांनी हस्तगत केला होता. व तेथें नवे किल्ले बांधून त्यांत आपली कायमची ठाणी बसविली होतीं. परंतु त्याचा जंजिरा फार मजबूत असून त्यास त्याच्या आरमाराचा आश्रय असल्यामुळें तो महाराजांच्या हातीं देईना. त्याचें आरमार नेहमी समुद्रांत फिरत असून संधी साधेल तेव्हां महाराजांच्या ताब्यातील किनाऱ्यावरच्या गावांस वारंवार त्रास देत असे. जमिनीवरून त्याच्या किल्ल्यांत दाणावैरण वगैरे सामुग्री जाण्याचे बंद करून त्यावर हवे तितके दिवस मारा करीत राहिलें तरी त्यास तो जुमानीत नसे. आरमाराच्या साहाय्यानें त्याला दूरच्या बंदरांतून लागेल ती सामुग्री आणवितां येत असें. ह्यामुळे किल्ला हवे तितके दिवस लढविण्याचें सामर्थ्य त्यास प्राप्त झालें होतें. जंजिरा हातीं आल्यावांचून त्याचा त्या किनाऱ्यावरील उपद्रव नाहींसा होत नाहीं हें लक्षांत येऊन महाराजांनी असा विचार केला कीं, शिद्दीचें सगळें बळ काय तें आरमारांत आहे, तेव्हां त्याच्या सारखे आपलेही आरमार असावें, म्हणजे त्याच्याशीं आपणांस पाण्यांतून युद्ध करितां येऊन जंजिरा सहज हस्तगत होईल व त्याचें आरमार आपल्या प्रांतास उपद्रव द्यावयास आलें असतां त्यास आपल्या आरमाराच्या साहाय्याने हुसकून लावितां येईल. त्याप्रमाणेंच शिद्दी जो आज इतका गबर झाला आहे तो समुद्रांतून होणाऱ्या व्यापारावर आरमाराच्या साहाय्याने त्यास शह ठेवता येतो म्हणून होय. व्यापाऱ्यांची जहाजे लुटून त्यास महापूर धन मिळविता येते व नवे लोक व नवी जहाजे त्यास मिळविता येतात. यास्तव अशा प्रबळ शत्रूशी आपणांस लढावयाचें म्हणजे त्याच्यासारखे आपलेही आरमार अवश्य असलें पाहिजे.

असा विचार करून त्यांनी चोहोकडून कारागीर आणविले व लहानमोठी चारपाचशे जहाजे तयार करविलीं. त्यांची नावे त्यांच्या आकारमानाप्रमाणें निरनिराळी ठेविलीं. तीं नावे येणेंप्रमाणें होतीं: गुराबा, तरांडीं, गलबतें, दुबारें, शिबाडें, महागिऱ्या, पडाव, मचवे, बाथोर, तिरकटी, पाल इ. ही तयार करावयास सुमारें दहा लाख रुपये खर्च झाला. त्यांवर तोफा वगैरे लढाऊ सामान चढवून ती सज्ज केली व त्यांवर राहून लढणारे लोक पुष्कळ तयार केले. कोळी, चांचे,[१] भंडारी वगैरे जे लोक जहाजे चालविण्याच्या कलेत निष्णात असून ज्यास पश्चिम किनाऱ्याची माहिती चांगली होती असे लोक जिकडून तिकडून आणवून त्यांस ह्या जहाजांवर ठेविले. ह्या आरमाराचे सेनाधिपत्य मायनाक[२] भंडारी व दर्यासारंग अशा दोन सरदारांस दिलें होतें. पुढें काही मुसलमान खलाशीही त्यांनी आपल्या जहाजांवर ठेविले. हबसाणच्या शिद्दीवर नाराज होऊन मिस्त्री व दौलतखान असे दोघे सरदार महाराजांच्या आरमारावर नोकरीस राहिलें.

---

१ हे चांचे बहुशः कोळी व भंडारी असत. यांचा इंग्रज वगैरे युरोपीय व्यापाऱ्यांस मोठा धाक असे. यांची वस्ती पश्चिम समुद्राच्या तीरावरील खेड्यांतून बहुतकरून आढळते.

२ मायनायक म्हणजे पाण्यावरचा नायक. माय हा अरबी भाषेत पाण्याला शब्द आहे. दर्या हा पर्शियन भाषेत समुद्राला शब्द आहे. आणि सारंग म्हणजे कप्तान किंवा सरदार. कोणी म्हणतात की, दर्यासारंग मुसलमान होता; परंतु तो हिंदूच असावा असे दुसऱ्यांचे म्हणणे आहे. (राजवाड्यांचे आठवे खंड. पृ. २७ व तारीख-इ-शिवाजी पाहा.)

ह्याप्रमाणें आरमार तयार होऊन ते समुद्रांत जिकडेतिकडे फिरू लागलें आणि त्यानें मोगलाई, फिरंगी, वलंदेजी, फराशीस व इंग्रज तारवांवर हल्ले करून तीं लुटण्याचा सपाटा चालविला. ह्यामुळे महाराजांस नाना प्रकारच्या वस्तू मुबलक मिळू लागल्या व आरमाराचा अवाढव्य खर्च बाहेरच्या बाहेर भागू लागला. हबशाला चांगलीच दहशत पोहचली. तो आपणांस इतके दिवस समुद्राचा राजा म्हणवी, त्याला असा जबरदस्त रिपु निर्माण झाला. त्याच्या व महाराजांच्या आरमाराच्या चकमकी वारंवार झडू लागल्या. फिरंगी, इंग्रज वगैरे व्यापाऱ्यांस मोठी दहशत वाटून आपली जहाजे समुद्रांतून सुरक्षितपणे जावीं-यावीं ह्यासाठी ते महाराजांस वार्षिक खंड देऊं लागले. ह्याप्रमाणें महाराजांची सत्ता पश्चिम समुद्रावर हळूहळू बसत चालली व शिद्दीचें महत्त्व कमी होत गेलें.

आपल्या आरमारास निवाऱ्याच्या जागा मिळाव्या म्हणून त्यांनी समुद्रकिनाऱ्यांच्या कित्येक किल्ल्यांची डागडुजी करण्याचें मनांत आणिलें. कुलाबा किल्ला पूर्वीचा होता तो ताब्यांत घेऊन त्याची चांगली दुरुस्ती केली व हें आरमाराचे मुख्य ठाणे केलें. सर्व ठिकाणच्या जहाजांची झडती येथें होत असे. त्याप्रमाणेंच सुवर्णदुर्ग, विजयदुर्ग वगैरे किल्ल्यांची डागडुजी करून ते चांगले मजबूत केले. ह्या सर्व ठिकाणच्या आश्रयाने त्यांनी आपले आरमार नेहमी जय्यत ठेवले. ह्या सर्व ठिकाणच्या आरमाराने व्यापाऱ्यांच्या किंवा मक्केस जाणाऱ्या यात्रेकरूंच्या जहाजांवर हल्ले करून मिळविलेल्या लूटीचा जाऊन हिशोब कुलाबा किल्ल्यापाशीं मुख्य ठाण्यास जाऊन द्यावा अशी व्यवस्था केली.

फिरंग्यांनी जेव्हां पाहिले कीं, महाराजांच्या आरमारापुढें आपला निभाव न लागून येथून उठावा होतो, तेव्हां त्यांनी महाराजांकडे आपला वकील पाठवून स्नेहाचे बोलणे लाविलें. त्यावरून महाराजांनी त्यांच्याकडून कांही तोफा, दारूगोळा व इतर लढाऊ सामान प्रतिवर्षी देण्याचे कबूल करून घेऊन त्यांस उपद्रव द्यावयाचा नाही असा करार केला. हा करार ते त्यांजकडून प्रतिवर्षी नवा करून घेत असत. इंग्रजांशींही त्यांचा असाच करार झाला होता असें कित्येक ठिकाणी लिहिले आढळतें.

महाराजांनी स्वत: ह्या आरमारावर मुख्य होऊन कधी मोहिमा केल्या नाहींत. एकदां मात्र बार्सिलोर शहर लुटावयास जातांना ते जहाजात बसून गेले व तसेच जलमार्गानें परत आले परंतु हा प्रवास त्यांना फारच त्रासदायक वाटला. एक तर त्यांस व त्यांच्या फौजेतील पुष्कळ लोकांस समुद्र लागला व ते त्यामुळें फार हैराण झाले व दुसरें असें कीं, तुफानांत सापडून केव्हा काय प्रसंग गुदरेल याचा नेम नाहीं व पाण्यातला प्रवास कांही हुकमी नाहीं; वारा जसा अनुकूल किंवा प्रतिकूल लागेल तसा तो कमीजास्त दिवसांनी संपावयाचा; ह्याप्रमाणें अफाट समुद्रांत अडकून राहिल्यानें आपल्या राज्यांतील हालहवाल कळण्याचा मार्ग अजीबात खुंटतो हें महाराजांच्या चांगले प्रत्ययास आलें आणि त्यांनी पुनः कधींही जलप्रवास केला नाही.

महाराजांच्या आरमाराची यादी चित्रगुप्तानें दिली आहे. ती खरी मानिल्यास त्यांत थोर गुराबा ३०, गलबतें १००, महागिऱ्या १५०, लहान गुराबा ५०, होड्या १०, लहान होड्या १५०, तारवें ६०, पाल २५, जूग १५, मचवे ५०, एवढी होतीं. इंग्रज लोकांनी त्यांच्या आरमाराच्या याद्या वेळोवेळी लिहून ठेविलेल्या आढळतात. त्यावरून पाहता महाराजांचें आरमार कारवारापाशीं गेलें तेव्हा त्यांत एका डोलकाठीची तीसपासून एकशे पन्नास टनपर्यंत वजनाची ८५ जहाजे, व तीन मोठी जहाजे होतीं. पुढें मुंबईचे इंग्रज शिद्दीशी सलोख्याने वागू लागल्यावरून त्यांस दहशत वाटावी म्हणून महाराजांनी एकशे साठ जहाजे मुंबईच्या बॅकबेसमोर नेऊन उभी करविली होतीं असा तेथील इंग्रजांचा लेख आहे.

हें असे आरमार तयार करून मोगल, शिद्दी, फिरंगी, इंग्रज, डच वगैरे लोकांच्या पश्चिम किनाऱ्याजवळून जाणाऱ्यायेणाऱ्या जहाजांना शह देऊनच महाराज राहिले नाहीत, तर त्यांच्यासारखा आपणही परदेशांशी स्वतंत्रपणें व्यापार सुरु करण्याचा त्याचा इरादा होता असें त्यावेळच्या सुरत, कारवार वगैरे ठिकाणच्या इंग्रज व्यापाऱ्यांच्या

लेखांवरून स्पष्ट दिसते. उत्तर कोकणच्या किनाऱ्यावरील बंदरे त्यांच्या ताब्यात आल्यावर त्यांनीं हा व्यापार सुरु केला असें दिसून येते. राजापूर येथे अफझुलखानाची जी जहाजे त्यांनी हस्तगत केली. त्यांचा उपयोग त्यांनीं ह्याच कामाकडे केला. सुरतच्या इंग्लिश व्यापारांचा स. १६६३ तला असा लेख आहे कीं, शिवाजीमहाराज अरबस्थानच्या पश्चिम किनाऱ्यावरील मोका बंदरास पाठविण्यासाठी दोन मोठी जहाजे जैतापूरच्या बंदरांत सज्ज करवीत होतें. पुढें स. १६६५ तला त्या व्यापाऱ्यांचा असा उल्लेख आहे कीं, महाराज आपल्या ताब्यांतल्या आठ-नऊ मोठ्या बंदरांतून प्रतिवर्षी दोनदोन तीनतीन जहाजे इराण, बसरा, मोका वगैरे बंदरांशी व्यापार करावयास पाठवून लागले. ह्याच व्यापारांचा स. १६६९ सालचा असा लेख आहे कीं, महाराजांची तांदूळ वगैरे भरलेली कित्येक व्यापाराची जहाजे कारवारच्या किनाऱ्यापाशी वादळात सापडून नाश पावली.[१]

हें आरमार मुख्यतः शिद्दीच्या आरमाराशी टक्कर देऊन त्यास हतवीर्य करण्यासाठींच तयार केलें होतें व त्याच्याशीं समुद्रात अनेक वेळा युद्धप्रसंग झाले असावे; परंतु त्यांचें वर्णन केलेले कोही आढळत नाहीं. शिद्दीचा जंजिरा काबीज करण्याचा जो उद्देश तो मात्र बहुतेक सिद्ध झाल्यासारखा होता; परंतु पुढें त्यानें विजापूरकरांची ताबेदारी सोडून मोगलांचा आश्रय केल्यामुळें त्यास बरेंच साहाय्य होऊन तो उद्देश शेवटीं असिद्धच राहिला. शिद्दीचा जंजिरा आपल्या ताब्यांत येत नाहीं तर त्या सारखा आपण एक जंजिरा बांधावा असें मनात येऊन महाराजांनी आपल्या ताब्यांतील समुद्र किनाऱ्याची पाहणी केली व मालवणचा किनारा अशा किल्ल्यास सोईचा आहे असें पाहून तेथें बांधण्याचा निश्चय केला. हा जंजिरा तेथें बांधण्याचा आणखी असा उद्देश होता कीं, गोव्याच्या फिरंग्यांनीं काही गडबड केल्यास त्यांच्यावर जरब ठेवणे सोपे जावे, त्याचप्रमाणें वाडीच्या सावंताचींही कांहीं जहाजे असून ते व्यापाऱ्यांची जहाजे लुटीत. तेव्हां ह्या सावंतांनींही कांही गडबड केल्यास त्यांच्यावरही हवा तसा दाब ठेवता यावा.

वर सांगितल्याप्रमाणें पाण्यांत किल्ला बांधावयाचे ठरल्यावर जेथे तो बांधावयाचा तेथला तळ कसा काय आहे व आसपास पाण्यातला मार्ग कोठून कसा आहे याचा तपास करण्याचें काम महाराजांनी कांही कोळ्यांस सांगितलें. त्यांनी मोठी मेहनत घेऊन व जिवाची परवा न करून एकंदर जागा नीट पाहिली व ही माहिती महाराजांस मोठ्या इमानाने दिली. ह्या त्याच्या कामगिरीबद्दल त्यास महाराजांनी मोठे बक्षीस दिलें, त्यांस आपल्या जहाजांवर तांडेलांच्या नोकऱ्या दिल्या व एका गावाचे वतन त्यांस वंशपरंपरा करून दिलें.

नंतर उत्तम मुहूर्त पाहून गणेशपूजन व समुद्रपूजन केलें, ब्राह्मणभोजनें घातली, समुद्रास शंभर होनांची दक्षिणा, पंचखाद्ये, फळफळावळ, सुवर्णाचे श्रीफळ, वस्त्रे, मंदिल व चादर ही अर्पण केली. ह्याप्रमाणें पूर्वविधी करून किल्ल्याच्या कामास आरंभ केला. पाचशे पाथरवट व दोन लोहार जमा करून आणले. दोन खंडी लोखंड खरेदी करून टांक्या, हातोडे, पहारा, अडू वगैरे विखणें घडविलीं. चिरे काढून ते टांकी लावून तयार करविले. पाच खंडी शिसें खरेदी करून किल्ल्याचा पाया भक्कम घातला. चुना चांगला पक्का करावयासाठीं चांगले हुशार पाथरवट, कामाठी, कोळी वगैरे लोक जमविले. एकंदर तीन हजार माणसांचा जमाव झाला. ह्यास जहाजांत घालून व सर्व मालमसाला बरोबर देऊन समुद्रांत नेऊन ठेविले. आपलें बरेंच आरमार ह्या जागेच्या आसपास ठेवून त्यावर तोफा, दारूगोळा वगैरे युद्धोपयोगी सामानाची मुबलक तरतूद केली. किनाऱ्यावर पाचहजार मावळे लोकांची चौकी ठेवली. गोवेकर फिरंग्यांशीं ह्या वेळीं तह झाला असून त्यांस ह्या कामांत हरकत करण्याचें धैर्य मुळींच नव्हतें. त्याप्रमाणेंच सावंतही ह्या वेळीं महाराजांचे अंकित झाले होते, यास्तव त्यांच्याकडूनही कांही अडथळा होण्यासारखा नव्हता. जी कांहीं भीती होती ती शिद्दीच्या व मोगलांच्या जहाजांची; परंतु हा किल्ला बांधून होईपर्यंत त्यांच्याकडून काहींही हरकत झाली नाहीं असें दिसते.

---

१ प्रो. सरकार पृ. ३३८.

महाराज स्वत: आपल्या हाताने येथें कांही दिवस काम करीत होते असें म्हणतात. एकंदर कामावर पहिल्यापहिल्याने त्यांची देखरेख होती व किल्ला कसा बांधावा आणि तो पाण्यांत पक्का पायाशुद्ध उभारण्यास काय युक्त्या योजाव्या ह्या संबंधाची सगळी कल्पना त्यांची स्वतःचीच होती. इमारतीचा पाया मजबूत होऊन वरील भिंतीचे काम चालू झालें तेव्हां महाराजांनी पुढल्या कामावर देखरेख करण्यास गोविंद विश्वनाथ प्रभू सुभेदार यास ठेवले व आपण रायगडावर निघून गेले. हा किल्ला पुरा व्हावयास तीन वर्षे लागली. सर्व काम पुरे झाल्यावर महाराज ही इमारत पाहावयास पन्हाळ्यावरून बावड्याच्या घाटाने मालवणास आले. प्रवेशविधी सुमुहूर्तावर केला. पाच हजार ब्राह्मणांचे भोजनादिकेकरून तर्पण केलें. सर्व लोकांस शर्करा वाटली. प्रवेश करतांना आरमारावरच्या तोफांची सरबत्ती झाली. पाथरवटांच्या मुकादमांस वस्त्रे व सोन्याची कडीं इनाम दिली. ह्या कामासाठीं गोवेकरांनी शंभर कसबी लोक दिले होते. त्यांस नांवाजून त्यांच्या कप्तानांस भरजरी वस्त्रे व सोन्याची कडी दिली. गोविंद विश्वनाथ प्रभू यास शाबासकी देऊन झगा, मंदिल, भरजरी चादर, मोत्यांचा तुरा, चौकडा, सोन्याचीं कडी व तलवार ही इनाम दिलीं.

ह्या जंजिऱ्याचें नांव महाराजांनी सिंधुदुर्ग असें ठेवले. हा दुर्ग बांधावयाला एक कोटी होन खर्च झाले असें म्हणतात. ह्या किल्ल्यावर तीन हजार मावळे लोक ठेवून त्यांवर एक मामलेदार नेमला. त्या मावळ्यांपैकीं जे हुशार होते त्यांस नाईक, सरनाईक व तटसरनोबत असे हुद्दे दिले. किल्ल्यावर पाण्याचा मारा होऊ नये म्हणून पाण्यांत एक मोठा बुरूज बांधवून त्याचें नांव दर्याबुरूज असें ठेविले.[१] याशिवाय आणखी अंजनवेली, रत्नागिरी, पद्मदुर्ग, सरजाकोट, गहनदुर्ग, खाकेरी व राजकोट असे जंजिरे महाराजांनी बांधले असें म्हणतात.

हा जंजिरा बांधूनही शिद्दीस म्हणण्यासारखा शह बसेना व मुंबईच्या बंदरानजीक असलेल्या महाराजांच्या ताब्यातील प्रांतास शिद्दीचा फार त्रास होऊं लागला व त्यास इंग्रजांचीही थोडीबहुत अनुकूलता दिसूं लागली. तेव्हां मुंबई बेटापासून बारा मैलांच्या अंतरावर खांदेरी व उंदेरी अशी दोन खडकाळ बेटे आहेत ती कबजांत घेऊन त्यांवर किल्ले बांधण्याचा बेत महाराजांनी केला. हा बेत त्यांनी कोणत्या प्रकारे सिद्धीस नेला याची सविस्तर हकीकत पुढें एका स्वतंत्र भागांत द्यावयाची आहे.[२]

ह्याप्रमाणें आरमार तयार करून व पाण्यांत किल्ले बांधून शिद्दी, फिरंगी, इंग्रज, मोगल व मुसलमान यांच्यावर पुरा शह बसविण्याचा व मुसलमान आणि मोगल यांच्या सत्तेवर चोहोकडून घाला घालण्याचा महाराजांचा संकल्प ते अल्पायू झाल्यामुळें तसाच असिद्ध राहिला. समुद्रावर पुरी सत्ता बसवून सर्व व्यापाराची किल्ली आपल्या हातांत ठेवावयाची व आपल्या ताब्यांतील मुलखास शत्रूकडून कोणत्याही बाजूने त्रास होऊं द्यावयाचा नाहीं असा त्यांचा इरादा होता; परंतु त्यांच्या पश्चात् हें धोरण कोणालाही न कळून हें आरमार पुढें हळूहळू नष्टप्राय झालें.

***

१ ह्या किल्ल्यांत एके ठिकाणीं महाराजांची पावले उमटली होतीं असें मानून त्यावर एक देऊळ बांधिलें आहे. त्यांत महाराजांची मूर्ती ठेविली असून तिची पूजा करणारांस हल्ली कोल्हापूर सरकाराकडून नेमणूक आहे.

२ अठ्ठाविसावा भाग पाहा.

भाग सोळावा

मोगलांच्या राज्यांत स्वाऱ्या व शास्ताखानाची मोहीम (१६६०–६३)

औरंगजेब दक्षिणेंतल्या सुभ्यावर असतां महाराजांनीं त्यांच्या ताब्यातील जुन्नर, औरंगाबाद वगैरे प्रांतांत धामधूम केली होती; परंतु पुढें विजापूरकराशीं तह करून औरंगजेब त्यांच्यावरील मोहिमेतून मोकळा झाला तेव्हां त्याचा मोरचा आपणावर फिरेल ह्या भीतीने महाराजांनी आपल्या अपराधाबद्दल त्याजकडे क्षमा मागून त्याचा अंकित होण्याची त्याला लालूच दाखविली. इतक्यात शहाजहान आजारी पडल्याची वार्ता ऐकून तो दिल्लीकडे जावयास निघाला. तेव्हां महाराजांनी शहाजीराजांस पूर्वी मिळालेल्या जहागिरीचा कांहीं भाग मोगलांनी हस्तगत केला होता. त्यांची त्याजकडे मागणी केली आणि अदिलशहाच्या ताब्यातील कोंकण प्रांत काबीज करण्याची मुभा मागितली. ह्या त्यांच्या मागण्यांचा स्पष्ट जबाब औरंगजेबाने न देता आबाजी सोनदेवास आपल्या दरबारी पाठवावयास सांगितलें. पुढें औरंगजेबानें स्वबंधूशी विरोध करून स्वपित्यास बंदिंत टाकून दिल्लीचे तक्त बळकाविल्यावर तिकडे अनेक राजकारणे उपस्थित होऊन त्यांतच तो गुंतून पडल्यांमुळें त्याला दक्षिणेकडे लक्ष द्यावयास मुळींच फावले नाही. तरी महाराजांनी अफझुलखानाचा वध करून विजापूरकरांच्या सेनेचा पुरा धुव्वा उडविला, हें वर्तमान औरंगजेबाला पोचले तेव्हां त्यानें ह्या विजयाबद्दल त्यांस अभिनंदनपर पत्र पाठविलें असें म्हणतात, परंतु ह्याच समयी त्या कावेबाज बादशहाने अदिलशहाला पत्र पाठवून असें फर्माविले होतें कीं, शिवाजीची चांगली खोड मोडावयास आळस करू नका! औरंगजेबाने आपल्या राज्यारोहणाचा पहिला वार्षिक उत्सव केला त्यासमयीं महाराजांनी त्यांचें अभिनंदन करण्यासाठीं आपला वकील त्याच्या दरबारीं पाठविला व आपली पूर्वोक्त मागणी पुनरपि केली. तीस त्यानें असा जबाब दिला म्हणतात कीं, देवाच्या कृपेने मी आतां आपल्या शत्रूस जिंकून आपले सगळे मनोरथ सिद्धीस नेले आहेत. मी शाहस्ताखानास दक्षिणेचा सुभेदार नेमिलें आहें. तो तुमच्या मागणीची व्यवस्था करील. असें सांगतात कीं, त्यानें महाराजांना ह्या समयी सन्मानसूचक शिरपाव पाठविला.[१]

ह्याप्रमाणें शास्ताखानास औरंगजेबाने सन १६५९ च्या जुलै महिन्यात दक्षिणच्या सुभ्यावर पाठविलें. त्याला त्यानें अमिर-उल-उमराव असा बहुमानाचा किताब दिला. हा सरदार औरंगजेबाचा मामा होता. हा पूर्वी गोवळकोंड्यांच्या मोहिमेंत औरंगजेबाबरोबर होता. त्यानंतर तो माळवाप्रांताचा सुभेदार झाला होता. विजापूरकरांचा जो प्रांत शिवाजीमहाराजांनी हस्तगत केला होता तो त्यांच्याकडून घ्यावयाची कामगिरी त्यांस सांगितली होती. ह्याप्रमाणें दिल्लीच्या तक्तावर आपली स्थिरस्थापना होई पर्यंत त्यानें महाराजांना स्नेहभाव दाखवून दक्षिणेतील आपल्या सत्तेतल्या मुलखास त्यांच्याकडून उपद्रव होऊ दिला नाहीं आणि त्यांच्याशीं करारमदार करण्याचें आमिष दाखविले. परंतु आतून विजापूरकरांस भर देऊन महाराजांशी निकराचा सामना करण्यास प्रवृत्त केलें आणि त्याच वेळीं शास्ताखानाबरोबर जय्यत सेना देऊन महाराजांवर पाठविलें. विजापूरकरांनी शिद्दीजोहाराला सलाबतखान हा किताब देऊन महाराजांवर पाठविलें आणि कोंकणांतून

१ रा. राजवाडेकृत आठवें खंड पाहा.

हबसाणचा शिद्दी व वाडीचे सावंत यांसही महाराजांवर उठविलें. यांच्याशी झालेल्या युद्धप्रसंगाचे वर्णन मागे तेराव्या भागांत केलेच आहे. आता शास्ताखानाशीं केलेल्या युद्धप्रसंगांचे वर्णन करूं[१] ह्या प्रसंगी महाराजांस प्रथम बरीच हार खावी लागली यांत कांहीं नवल नाहीं. एकाच वेळी दोन प्रबळ शत्रूंनी चोहोकडून घेरले असून हबशी व सावंत हेही कोंकणात आपला डाव साधण्यास टपले असता एवढ्यांना टक्कर देऊन त्यांच्या कचाटींतून निभावणे कांहीं सोपे नव्हते.

शास्ताखानानें दिल्लीहून निघतांना अशी प्रतिज्ञा केली होती कीं, शिवाजीमहाराजांस विलंब न लागता मारून गर्दीस मिळवितों, व त्यांच्या ताब्यांतला सगळा मुलूख हस्तगत करितो. असे सांगतात कीं, त्याच्याबरोबर एक लाख फौज, पाचसातशे हत्ती, चारपाच हजार उंट, तीन हजार दारूगोळ्यांचे छकडे, दोन हजार घोड्यांचे छकडे व बत्तीस कोटींचा खजिना एवढी सामुग्री होती. हें अवाढव्य सैन्य मुक्काम करी तेव्हा दोन गाव लांब व दीड गांव रूंद पसरे. दिल्लीहून दक्षिणेत यावयास ह्या बादशाही फौजेला तीन महिने लागले.

शास्ताखानानें पहिल्याने औरंगाबादेस जाऊन तेथील सुभ्याचा बंदोबस्त केला व विजापूरकरांस दक्षिणेकडून शिवाजीमहाराजांवर चालून यावयास सूचना पाठविली. त्याप्रमाणें त्यांनीं महाराजांवर मोहीम केली. तिची हकीकत तेराव्या भागात दिलीच आहे. शास्ताखान स्वतः सन १६६० च्या जानेवारी महिन्यांत स्वसैन्यानिशी त्यांच्यावर मोहिम करावयास निघाला. तो अहमदनगराहून पुणे प्रांताच्या पूर्वभागीं चालून आला. वाटेत जे जे किल्ले लागले ते तो काबीज करीत चालला. ह्याप्रमाणें सोनवडी, सुपे, बारामती इत्यादी प्रांत काबीज करीत तो निरानदीच्या खोऱ्यातून होळगावच्या वाटेने शिरवळास आला; आणि तेथून कांही लोक पाठवून राजगडाच्या आसपासची खेडी त्यानें उद्ध्वस्त करविली. तेथून कुच करून तो सासवडास येऊन छावणी करून राहिला. असे सांगतात कीं, सिंधखेडचा जाधवराव शास्ताखानाबरोबर होता. त्यांस तिकडील प्रांताची चांगली माहिती असल्याकारणाने खानाला त्याचा चांगला उपयोग झाला. सुपे प्रांत काबीज केला तो ह्या जाधवरावाच्या ताब्यात दिला. त्याने जे जे किल्ले व ठाणी काबीज केली त्यावर आपले लोक ठेवून दिले. सासवडास तळ देऊन राहिल्यावर (ता. १ ली मे सन १६६०) त्यानें आसपासचे किल्ले पाहून येण्यासाठी लोक पाठविलें. मनात कीं, ही पहाणी करून झाल्यावर एका मागून एक किल्ले घेण्याचा सपाटा सुरू करावयाचा.

ही एवढी मोहिम होईपर्यंत महाराजाच्या लोकांना शास्ताखानाच्या प्रचंड सेनेशी सामना करण्याचा आवाका मुळीच नव्हता हे उघड आहे. शत्रू ज्या-ज्या ठाण्यांवर चालून येईल तें तें, ते सोडून देऊन पळ काढीत. तरी मोंगल सैन्याच्या पिछाडीवर महाराजाचे स्वार वेळोवेळी छापे घालून त्यांस हैराण करीत, त्यांस दानावैरण मिळू देत नसत व त्यांची घोडी व इतर चीजवस्तू हाती लागे ती ते लुटत नेत. पुढें खानाने शिवापूर व कात्रजचा घाट काबीज करावयासाठी काही लोक पाठविलें. त्यांच्यावर महाराजांच्या तीन हजार स्वारांनी हल्ला केला. त्यांची मोठी निकराची लढाई झाली; पण खानाचे लोक पुष्कळ असल्यामुळे त्यांचे कांहीं चालले नाही आणि त्यास माघार घ्यावी लागली. ह्यानंतर पुनः खानाने कांहीं लोक पुरंदर किल्ल्याच्या आसपासची खेडी उद्ध्वस्त करावयास पाठविलें. त्यांवर महाराजांच्या तीन हजार लोकांनी हल्ला केला, त्यांचा तेथें घोर संग्राम झाला. त्यात मोंगलांच्या सैन्यांचा बहुतेक मोड होण्याचा समय प्राप्त झाला होता; परंतु इतक्यात खानाकडून आणखी पुष्कळ लोक त्यांच्या कुमकेस आले. ह्या ताज्या दमाच्या

१ आम्ही पहिल्या आवृत्तींत शास्ताखानाची ही मोहीम स. १६६२ -६३ त झाली असें मराठी बखरींच्या व ग्रँट डफ यांच्या आधाराने लिहिले असून ती तेराव्या भागात वर्णिलेल्या विजापूरकरांशी घडलेल्या समरप्रसंगांपासून अलग केली होती व महाराजांनी आपल्या आरमाराच्या उभारणीची सुरुवात मोंगलाच्या या मोहिमेपूर्वी केल्याचे लिहिले होते. त्याप्रमाणेच महाराजांस पितृदर्शनही पूर्वीच घडले असे मानिले होते, परंतु खाफीखान व प्रो. सरकार हे औरंगजेबाच्या कारकिर्दीच्या पहिल्या दहा वर्षांचा इत्थंभूत इतिहास 'अलमगिरीनामा' नावाच्या मोगलदरबारी ठेवलेल्या बखरींत नमूद केला आहे. त्याच्या आधाराने असे म्हणतात कीं, शास्ताखान सन १६५९ त दक्षिणेत येऊन सन १६६० च्या आरंभी शिवाजीमहाराजांच्या मुलुखावर स्वारी केली. हे त्यांचे म्हणणे खरें मानण्यास दुसरा आणखी असा आधार आहे की, जेध्यांच्या शकावलींत शास्ताखानाच्या मोहिमेसंबंधाच्या सदरील यवनी बखरीतील तारखांशी जुळतात.

लोकांपुढे महाराजांच्या लोकांचा निभाव न निघून ते पुरंदराच्या खिंडीकडे पळत सुटले. तेव्हां किल्ल्यावरून शत्रूंवर तोफांचा बडीमार झाला, त्यामुळे त्याची आणखी बरीच खराबी झाली. तरी त्यानें दम धरून महाराजांच्या लोकांस पुरंदराजवळून पिटाळून लाविलें. ह्यानंतर खानाने सासवडचा तळ हलवून पुण्याकडे मोरचा फिरविला आणि त्यांत बिनहरकत छावणी केली (ता. ९ मे सन १६६०). येथे त्याने पावसाळा घालवावयाचें ठरविले; परंतु मोगल सैन्याचा प्रवेश पुण्यांत व्हावयाच्या पूर्वीच महाराजांच्या लोकांनी त्या शहराच्या आसपासच्या गावांतील दाणावैरण वगैरे अगदी नाहीशी करून तेथली वस्ती साफ उठवून लाविली होती आणि दूरच्या गावांतून मोंगलांच्या छावणीत ती मुळीं पोंहचेनासे केले. मोगली अंमलांतून दाणावैरण आणण्याची तर यावेळी मुळीं सोय नव्हती. कारण पावसाळा सुरु होऊन नद्यानाल्यांस पूर आले होते. त्यामुळे खानाच्या सैन्याचे पराकाष्ठेचे हाल होऊ लागले, तेव्हां त्याने असा बेत केला कीं, पुण्याच्या उत्तरेस अठरा मैलांवर चाकण किल्ला आहे. तो हस्तगत करून तेथे आपले ठाणे करावे म्हणजे अहमदनगराकडून दाणावैरण आणविणें सोयीचे होईल.

हा असा बेत करून भर पावसात चाकण किल्ल्यास त्याने जातीने वेढा दिला. त्याच्या सभोवार त्याने मोरचे लावून निरनिराळ्या किल्ल्यांवरून आणलेल्या मोठमोठ्या तोफा त्यावर चढविल्या आणि किल्ल्यावर भडीमार सुरु केला; परंतु पाऊस सारखा कोसळत असल्यामुळे त्याचे दारू सामान बरेच खराब झाले. किल्ल्यावरून होणाऱ्या तोफांच्या सरबत्तीमुळे त्याचे लोक भराभर पडू लागले. खानाचा हिशोब असा होता कीं, हे ठाणे लहान आहे, हे आपल्या हाती तत्काळ लागेल. त्या किल्ल्यावर फिरंगोजी नरसाला हा हवालदार होता. त्याने तो किल्ला मोठ्या शौर्याने दोन महिने लढविला. मोगल सैन्याने आपली शिकस्त केली; परंतु कांहीं इलाज चालेना. किल्ल्यातले लोक रात्रीच्या वेळीं आकस्मात खाली येऊन खानाच्या मोरच्यावर वारवार हल्ले करीत; त्याप्रमाणेच महाराजांचे घोडेस्वार बाहेरून खानाच्या फौजेवर वरचेवर छापा घालून तिची पुष्कळ खराबी करीत. हे त्यांचे अचाट धैर्य व धमक पाहून खान अगदी थक्क झाला; पण त्याच्याकडे लोकांचा भरणा मनस्वी असल्याकारणाने त्याला असा नेट धरितां आला. वेढा पडल्यापासून छप्पन्नावे दिवशीं शास्ताखानानें सुरुंग लावून किल्ल्याच्या ईशान्य दिशेचा बुरुज उडविला. त्यामुळें किल्ल्यांस मोठे भगदाड पडलें. किल्ल्यावरील कित्येक लोक ह्या बुरुजावर होते ते ठार झाले. मोगल त्या भगदाडातून किल्ल्यावर चढून जाऊ लागले. त्यासमयी तो शूर किल्लेदार आपल्या उरलेल्या लोकांसह शत्रूवर तुटून पडला. त्यामुळे त्यांना वर जाता येईना. रात्रभर फिरंगोजीने मोठ्या शौर्याने लढून किल्ल्यात शत्रूचा प्रवेश होऊ दिला नाही. दुसरेदिवशी निरुपाय होऊन फिरंगोजी शत्रूच्या हाती लागून किल्ला सर झाला.[१] शास्ताखानानें त्याचें तें शौर्य पाहून त्याला फार वाखाणिलें, व त्याचा मोठा सन्मान करून तो त्यास म्हणाला कीं, 'तुम्ही बादशाही फौजेत नोकरी पत्करात तर तुम्हास मी मोठ्या योग्यतेस चढवितो.' खानाच्या ह्या लालचावणीस फिरंगोजी मुळींच भुलला नाही; परंतु ह्याबद्दल खानास वाईट न वाटून त्याने त्याचा बहुमान करून त्यास सोडून दिले. तो महाराजांकडे आला तेव्हां त्यांनी त्यास त्याच्या मर्दुमकीबद्दल व इमानाबद्दल नावाजून मोठे इनाम दिले आणि पुढें भूपालगडावर हवालदार नेमिलें.[२]

असे सांगतात कीं, पुण्यास बाबाजीराम व होनाप्पा देशपांड्ये[३] असे दोघे देशमुख होते. ते कांहीं कारणावरून नाराज होऊन शास्ताखानास बऱ्हाणपुराजवळ जाऊन मिळाले. शास्ताखानाने चाकणचा किल्ला काबीज करून पुन:

१ हा असा शत्रूचा निखराचा वेढा चाकण किल्ल्यास पडला असता महाराज स्वतः पन्हाळा किल्ल्यावर अडकून पडल्यामुळे त्यांना त्यास कुमक पाठविता आली नाही. त्याचे फिरंगोजीस असे सांगणे होते की, किल्ला लढवेल तेवढे दिवस लढवून निरुपाय झाल्यास शत्रूच्या स्वाधीन करावा.

२ दिग्विजय म्हणतो की, हा किल्लेदार महाराजांकडे असा नामोहरम होऊन आला तेव्हा किल्ला शत्रूच्या स्वाधीन केल्याबद्दल त्याच्यावर रागावून आपल्या नोकरीवरून दूर केल्यावर तो शास्ताखानास जाऊन मिळाला त्याने त्याला मालकूर नावाचा ठाणेदार केले; परंतु पुढे महाराजांनी नेताजी पालकराला पाठवून त्यांस आपल्याकडे आणविले ही त्या बखरकाराची चूक आहे. मोंगलांकडे जो गेला तो संभाजी नावाचा एक सरदार फिरंगोजी नव्हे हे पुढील मजकूरावरून त्याला ध्यानात येईल.

३ चिटणीस यांची नावे संभूजी कावजी व बाबाजीराम होनाप्पा देशपांडे अशी देतो. आलमगिरनाम्यात ही नावे बाबाजी भोसले व रघुनाथ अशी आहेत.

पुण्यास येऊन कांहीं दिवस स्वस्थ राहिल्यावर ह्या मराठे सरदारांच्या मदतीस आपले सैन्य देऊन महाराजांच्या ताब्यांतला उत्तर कोंकणांचा कांहीं भाग काबीज केला. ह्या वेळी कल्याण व भिवंडी ही मोंगलांच्या हाती गेली (सन १६६१). हे वर्तमान ऐकून महाराजांस त्या सरदाराचा फार राग आला. त्यांचा संभाजी नावाचा एक नातलग महाराजांच्या पदरी सरदार होता. त्याला ते भर दरबारामध्ये त्याबद्दल टाकून बोलले कीं, तुमचे हे दोघे आश्रित असून आम्हांस सोडून आमच्या शत्रूस जाऊन मिळाले. तेव्हां आता तुमचाही आम्हांस भरवसा येत नाही. हे टोचून बोलणे संभाजीला मुळींच सहन झाले नाही. तो फारच रागावला आणि शास्ताखानास जाऊन मिळाला. हा संभाजी ज्वान असून मोठा बळकट होता. त्याने शास्ताखानाची प्रथम मुलाखत घेतली. तेव्हां त्याने त्याला आपल्या अंगच्या बळाचा प्रत्यय एक घोडा चार पायास धरून उचलून दाखविला. खान हे त्याचे अचाट बळ पाहून खूष झाला आणि त्याने त्याला पाचशे स्वारांची सरदारी देऊन आपल्या लष्करात नोकरीस ठेविले. पुढें हा संभाजी मोंगलांच्यातर्फे मालकूर येथे ठाणबंदी करून राहिला असता त्याच्यावर महाराजांनी त्याच्या गावचा नतोजी म्हणून एक सरदार पदरी होता. त्यास फौज देऊन पाठविले. त्याने संभाजीवर हल्ला करून त्याचा मोड केला व त्यास रणात ठार केले आणि मालकूरगांव जाळून टाकिला.

चाकणचा किल्ला हस्तगत करण्यास खानाचे बरेच लोक खलास झाल्यामुळें पुढें आणखी मुलूख काबीज करण्याचे सोडून तो परत पुण्यास येऊन राहिला. त्याची पहिल्याने अशी धमक होती कीं, शिवाजीमहाराजांच्या ताब्यातले किल्ले आपण हां हां म्हणता काबीज करूं; परंतु ह्या एका किल्ल्याखाली दोन महिने झटापट करावी लागून हजारो लोकांचे बळी द्यावे लागले, हे पाहून त्याचा तो भ्रम नाहींसा झाला. त्याची आता अशी खात्री झाली कीं, शिवाजीमहाराजांच्या ताब्यातील किल्ले घेण्याचे काम मोठे बिकट आहे. औरंगजेबाचा तरी समज पहिल्याने असाच होता. त्याला वाटे कीं, हे पहाडी किल्ले काबीज करण्यास आपणांस मुळींच अवकाश लागणार नाही व मराठे लोकांसारख्या शत्रूस जिंकण्याचे काम फार सोपे आहे, परंतु शिवाजीमहाराजांचे व त्याच्या पदरच्या एकेका सरदाराचे पराक्रम व शौर्य यांची वार्ता जसजशी त्यांच्या कानी जाऊं लागली. तसतसा त्याचा हा समज पालटत गेला. त्याने जोधपूरचा राजा यशवंतसिंग यास शास्ताखानाच्या मदतीस आणखी दहाहजार लोक देऊन रवाना केले.

खानाचे सगळे सैन्य कांहीं एक हालचाल न करितां पुण्याजवळ तळ देऊन दोन वर्षे स्वस्थ राहिले होते. हस्तगत केलेली ठाणी परत महाराजांच्या हाती न जाण्याविषयी मात्र बरीच चांगली खबरदारी त्याने घेतली होती. इकडे नेताजी पालकराने आपल्या स्वारांनिशी अहमदनगर व औरंगाबाद ह्या शहरांपर्यंत स्वाऱ्या करून मोगली मुलूख उद्ध्वस्त करण्याचा धुमधडाका चालविला होता आणि मोगली फौजेचे कहिकवाड व रसद बंद करून व त्यावर आकस्मात छापे घालून तीस त्राहित्राहि करून सोडले. त्याच्यावर हल्ला करावयास जावे तर त्याचा वेग इतका कांहीं विलक्षण असें कीं, तो शत्रूच्या तावडीतून सहज निसटून जात असें व त्याचा पाठलाग करण्यात कांहीं एक अर्थ नाही असे शत्रूच्या लोकांस वाटून ते जागच्याजागी राहत. शास्ताखानाने नेताजीचा हा उपसर्ग नाहीसा करण्याचा निश्चय करुन त्याच्यावर आपले सात हजार स्वार पाठविलें. त्यांनी त्यास गाठून उभय पक्षांचे घनघोर युद्ध झाले. शत्रू सैन्याचा जमाव फारच मोठा असल्याकारणाने नेताजीचा ह्या युद्धात पराभव झाला. त्याने ह्या प्रसंगी आपली अगदी शिकस्त केली. त्यास पुष्कळ जखमा लागून तो बहुतेक घायाळ झाला, अशा स्थितीत तो शत्रूच्या हातून निसटून दक्षिणेकडे पळत सुटला आणि मोंगलांचे स्वार त्याच्या पाठीस लागले. अशा आणीबाणीच्याप्रसंगी महाराजाचा मित्र रुस्तुमजमान याने मोगल सरदाराला भेटून असे सांगितले कीं, 'तुमच्या सैन्याला इकडचा मुलूख माहित नसल्याकारणाने तुमचा सिद्धीस जावयाचा नाही तर माघारी जा मी नेताजीचा पाठलाग करून त्याला पकडतो.' हे त्याचे म्हणणे मोगल सरदारास पटून तो परत गेला आणि नेताजी शत्रूच्या तावडीतून सुटला.[१]

---

१ ही हकीकत प्रो. सरकार सूरत येथील इंग्रज वखारवाल्यांच्या त्या काळच्या कागदपत्रांच्या आधाराने देतात. पृ. ९७

शास्ताखान वर्ष-सव्वावर्ष धामधूम करून पुणे येथे छावणी करुन पुढे दोन वर्षे स्वस्थ राहिला, याची कारणे मुख्यतः दोन असावीत. एक तर वर सांगितले आहेच कीं, महाराजांच्या ताब्यांतले दुसरे किल्ले काबीज करण्याच्या भरीस आपण पडलो तर आपले सैन्य खलास होऊन आपणांस रडत माघारी जावे लागेल, किंवा प्राणास मुकावे लागेल असे त्यांस वाटले असावें. दुसरे कारण अर्थात् असे दिसते कीं, महाराज विजापूरकरांना खडे चारून त्यांच्या उपसर्गापासून मुक्त होऊन ह्या वेळी पुण्याच्या आसपास आलें होते. त्यांच्याशी सामना करण्याची छाती खानाला झाली नसावी. खरें म्हटलें असतां महाराजांचे सगळे कोट, किल्ले व मुलूख काबीज करून त्यांना गर्दीस मिळवण्याची प्रतिज्ञा करून तो दक्षिणेत आला होता. तेव्हा महाराज स्वत: कोंकणातील मोहिम करून वर आले असतां त्याच्यावर त्याने चालून जावयास हवे होते; परंतु तसे त्याने कांहींच केले नाही. मोगल सैन्याची हालचाल ही अशी बंद पडलेली पाहून महाराजांनी स्वतः मोगलाच्या मुलूखांत धामधूम सुरु केली. मोगलांनी कल्याण भिवंडी सन १६६१ त काबीज केली. ती प्रथम परत घ्यावी असा विचार करुन त्यांनी ह्या कामगिरीवर मोरोपंतास पाठविले, त्याने ही फत्ते मिळवून आणखी जुन्नरच्या उत्तरेकडील मोगलांची सगळी ठाणी हस्तगत केली. त्याप्रमाणेच नेताजी पालकराने आपला पुर्वीचा क्रम मोठ्या जोमाने चालू ठेऊन आपल्या स्वारांनिशी त्यानें मोंगलांच्या मुलूखांत लांबपर्यंत मोहिम केली व गावचे गांव लुटून व शहरांवर व पेठांवर खंड बसवून पुष्कळ द्रव्य मिळविले. ही त्याची दौड इतकी वेगाची असें कीं, आज येथे तर उद्या दूर कोठे तरी दुसऱ्याच ठिकाणी प्रगट होत असे ह्याप्रमाणे तो बालेघाट, परंडे, हवेली, कलबुर्गे, आवसे, उद्गीर वगैरे गांवे तुटीत, मुलूख मारीत व खंडण्या घेत गोदावरी नदीच्या तीरापर्यंत गेला. थेट औरंगाबादेपर्यंत दौड करून त्याने त्या शहराच्या आसपासचा मुलूख लुटला.[१] मोगलांचा सुभेदार महकूबसिंग म्हणून औरंगाबादेस होता, तो ही अंदाधुंद ऐकून दहा हजार लोकानिशी नेताजी पालकरावर चालून आला. त्याच्याशी नगरानजीक युद्ध करुन नेताजी पालकराने त्याचा पुरा मोड केला. त्याचे हत्ती, घोडे व दुसरे युद्धोपयोगी सामान नेताजीच्या हाती पुष्कळ लागले.[२] ह्याप्रमाणे मोंगलांच्या मुलूखांत सारखा धुमाकूळ उडवून देऊन मिळविलेल्या लुटीची रुजवात तो महाराजांकडे करी.

प्रबळगड म्हणून एक बळकट किल्ला मोंगलांच्या हाती होता. त्यावर केशरसिंग नामेंकरून एक रजपूत सरदार होता. त्याच्याशी भेद करून किल्ला हाती येत नाही असे पाहून महाराजांनी स्वतः त्याच्यावर हल्ला केला. केशरसिंगाने किल्ला बरेच दिवस लढविला; परंतु महाराजांपुढे आपले कांहींच चालावयाचे नाही असे पाहून त्या रजपूत सरदाराने आपल्या कबिल्याचे जोहार केले व आपल्या पदरच्या लोकांसह तो महाराजांवर तुटून पडला व त्यांशी मोठ्या निकराने लढून आपल्या एकंदर लोकांनिशी समरभूमीवर पतन पावला. मग महाराजांनी रजपूतांची प्रेते ओळखून त्यांस अग्नी देवविला. केशरसिंगाची आई व मुलगी ह्या चुकून किल्ल्यावर राहिल्या होत्या, त्यांस महाराजांनी मोठ्या अदबीने वागवून आपल्याकडे ठेऊन घेतले. पुढें त्या बायांनी आपली अशी इच्छा प्रगट केली कीं, आम्हांस आमच्या देशी जावयाचे आहे; तर तिकडे जाण्याविषयी आम्हांस परवानगी असावी. त्यावरून त्यांस वस्त्रे, भूषणे, द्रव्य आदि करून देऊन त्यांनी त्यांस मोठ्या इतमामाने पाठवून दिले.

असें सांगतात कीं, महाराज पालखीत बसून हा किल्ला पहावयास चालले असतां त्यांच्या शेल्यास बोरीची फांदी लागून तो खाली पडला. तेव्हां पालखी उभी करून ते म्हणाले कीं, 'ह्या ठिकाणी आम्हांस उभे केले त्यापेक्षा येथे भुईखाली द्रव्य असावें' मग त्यांनी तेथे खणविले तो जमिनीत खरेच द्रव्य लागले. तेथे त्यांस चार लाख मोहरांचा चबुत्रा सापडला.

---

१ चिटणीस म्हणतो की, ह्या वेळीं नेताजी पालकराकडची सरनोबती काढून प्रतापराव गुजराला दिली, व ह्या गुजराने सदर ही मोहीम केली; परंतु हे अधिकारांतर जयसिंगाच्या मोहिमेच्यावेळी झाले असे दिसते.

२ रायरीच्या बखरींत असे म्हटले आहे की; महकूबसिंग जागच्याजागी स्वस्थ बसला होता. त्यास औरंगजेबाने जरबेचा हुकूम केल्यावरून तो आपल्या सैन्यानिशी चालून आला. त्याला अहमदनगरापाशी गाठून त्याचा पराभव प्रतापराव गुजर याने केला, व तो सुभेदार ह्या लढाईत पडला. खाफीखान म्हणतो की, शास्ताखान औरंगाबाद सोडून निघाला तेव्हा मुमताजखान यास तेथला सुभेदार नेमिलें होते.

इतकी धामधूम मोंगलांच्या मुलूखांत केली तरी शास्ताखान पुण्याहून आपला तळ उठवून महाराजांशी सामना करावयास आला नाही. त्याने पुण्याजवळ आपल्या सगळ्या लष्कराची कायमची छावणी देऊन महाराजांची घेतलेली ठाणी सहसा सोडून द्यावयाची नाहीत असा त्याचा निर्धार होता. त्याला तेथून कसा हलवावा या विचारांत महाराज होते. ते सिंहगडावर अनुकूल संधीची वाट पहात बसले. इकडे शास्ताखान पुण्यास दादाजी कोंडदेवाने महाराजांसाठी बांधलेल्या वाड्यात जाऊन राहिला होता. ह्या वाड्याचे नाव लालमहाल[१] असे होते. ह्या वेळी शिवाजीमहाराज सिंहगडावर होते ते खानास माहित होते. ते केंव्हा काय युक्ती करून आपणांवर आकस्मात छापा घालतील याचा नेम नाही हे तो पूर्णपणे जाणून होता. आता खरे म्हटलें असतां ह्या संधीस त्याने सिंहगडास वेढा देऊन त्यांस आत कोंडावे व किल्ला हस्तगत करून त्यांस पकडण्याचा प्रयत्न करावा; परंतु चाकण किल्ल्यापाशी त्याला जो अनुभव आला होता त्यावरून त्याने हा विचार मनात आणिला नाही. दुसरे असे कीं, ज्या किल्ल्यांत खुद्द शिवाजीमहाराज राहात आहेत त्याचा बंदोबस्त बिलकूल लेचापेचा नसावयाचा हे त्यांस पक्के ठाऊक होते. पुण्याचा आपला मुक्काम सुरक्षित राहावा यासाठी त्याने आपल्याकडून होईल तितकी सावधगिरी राखिली होती. त्यानें आपल्या लोकांस असा एकसहा हुकूम देऊन ठेविला होता कीं, 'कोणाही सशस्त्र मराठ्यास परवान्यावाचून शहरात प्रवेश करू देऊं नये व कोणत्याही मराठे शिलेदारास आपल्या गोटात येऊ देऊं नये.' जे मराठे सरदार बादशाहचे ताबेदार होते त्यांस मात्र तो आपल्या जवळ येऊ देत असे[२] दुसऱ्या कोणाही मराठ्यांची तो मुलाखत घेत नसे ह्याप्रमाणे सर्व शहरभर जिकडेतिकडे चौकी पहारे ठेऊन कडेकोट बंदोबस्त ठेऊन खान राहिला. पुढें शिवाजीमहाराजांशी सामना कसा करावा ह्या विचारात तो ह्या वेळीं असावासे दिसते.

महाराज सिंहगडावरून शत्रूंची सर्व हालचाल पहात होते.[३] तो अशी प्रचंड सेना घेऊन आपल्या पारिपत्याचा विडा उचलून दक्षिणेत येऊन पुणे, सुपे वगैरे प्रांत बळकावून बसला तेव्हा त्याला तेथून कसा हुसकून लावावा याविषयी मसलत करण्यासाठी महाराजांनी आपल्या पदरच्या सरदारांस व कारभाऱ्यांस हुजूर बोलाविले. सर्वांचे मत असे पडले कीं, त्यांच्याशी युद्ध करून आपला निभाव लागणार नाही. आपली फौज ती किती आणि त्याची फौज केवढी मोठी! यास्तव त्याच्याशी सल्ला करुन त्याची भेट घ्यावी हे उत्तम; परंतु हा सल्ला होतो कसा याची पंचाईत पडली. कारण खानाच्या लष्करात असा कोणी नामांकित रजपूत सरदार नव्हता की जो हिंदुधर्म व हिंदुस्वराज्य यांचा अभिमान धरून खानाशी हरयुक्तीने सल्ला करून देईल. शास्ताखान प्रत्यक्ष बादशाहचा मामा असल्यामुळे त्यास लाचलुचपतीने वश करून घेण्याचा मार्ग नव्हता. त्याचे अभय वचन घेऊन व त्याच्या भेटीस जाऊन सल्ला करण्याच्या गोष्टी तर बोलावयास नको होती कारण त्याची अशी दृढ प्रतिज्ञा होती कीं, शिवाजीमहाराजांस पुरे शासन करावयाचे. म्हणून महाराजांनी ह्या प्रसंगी असा निश्चय केला कीं, शत्रूशी समोरासमोर युद्ध करून आपले लोक विनाकारण खराब करावयाचे नाहीत. दुसऱ्या उपायांनी शत्रूस साधेल तेवढे जेर करावयाचे ते उपाय अर्थात हेच की, त्याचे कहीकवाड सामान व रसद बंद करून त्याला घाबरा करावा; कोठे अडचणीत धरून त्याचे लोक मारून काढावे; एखाद्या किल्ल्यास तो मोर्चे देऊन बसले असता त्याच्या फौजेवर चोहोंकडून छापे घालून त्यास हैराण करावे.

हे असे जबरदस्त काहूर येऊन त्या विचारांत महाराज गुंग होऊन बसले असता त्यांच्या अंगात भवानी संचारून बोलली कीं, ''माझ्या लेकरास म्हणावे कीं, शास्ताखानाची फिकीर किमपि न करणे. जसा अफझुलखान प्रतापाने मारिला, तसाच हा दुष्ट यवन तुझ्या हस्ते शिक्षास्पद करिते याविषयी तू चिंता करू नये.'' ही देवीची वाक्ये,

---

१ कोणी याचे नाव राजमहाल असे देतात.

२ मि. किंकेड म्हणतात कीं, त्याने आपल्या घोडदळातला एकूण एक शिलेदार काढून टाकला होता; पण त्याने पायदळातले मराठे काढून टाकले नव्हते.

३ मि. किंकेड म्हणतात कीं, महाराज ह्या वेळी सिंहगडावरून राजगडास गेले होते.

जवळ होती त्यांनी लिहून ठेविली. ती महाराजांनी सावध होऊन पाहिली तेव्हां त्यांस संतोष झाला व आपणांवर जगदंबेचा प्रसाद आहे असे मानून आपली फत्ते होईल अशी शकुनगांठ त्यांनी बांधिली व पराक्रमेकरून शत्रू पराभव करण्याची हिंमत धरिलीं.

लाल महालात राहत असता शास्ताखानाने बाबाजीराम याच्या मदतीने संस्कृत जाणणाऱ्या एका ब्राह्मणास बोलावून आणिलें व त्यांस कांहीं द्रव्य देऊ करून शिवाजीमहाराजांस एक पत्र लिहविले.[१] त्यांतील आशय असा कीं, 'तू मर्कटासारखा डोंगरात राहणारा आहेस. तू आपल्या किल्ल्यांच्या आश्रयास राहून वाटेल तशी बंडाळी करीत आहेस. युद्धाचा प्रसंग आला म्हणजे तू किल्ल्यात दडी मारून बसतोस. तू किल्ल्यात छपून कितीही दिवस बसलास तरी तुझा पिच्छा मी सोडणार नाही. मी राजा इंद्र आहे, तुला मजबरोबर युद्ध करण्यास धैर्य नाही. तू माझ्या समोरून पळून जातोस.' ह्या पत्राचे उत्तर महाराजांनी असे पाठविले कीं, 'मी मर्कटासमान आहे म्हणतोस तर ज्या मर्कटांनी रावणाचा नाश करून लंका हस्तगत केली त्याच्यासारखा मी आहे. मी तुला पळताभुई थोडी करून सोडीन.'[२]

शास्ताखानाच्या पुणे येथील छावणीवर आकस्मात घाला घालून त्यांस जेर करण्याचे त्या वेळी साध्य नव्हते. त्याचा बंदोबस्त उत्कृष्ट होता व त्याचे सैन्य बळही मोठे होते. यास्तव त्याच्या ह्या उद्दामपणाबद्दल व गर्विष्ठपणाबद्दल त्यास कसेही करून देहांतशासन दिले म्हणजे त्याच्या फौजेचा मोड सहज करितां येईल असे मनात आणून महाराज हा बेत सिद्धीस नेण्याच्या उद्योगास लागले. त्यांनी दोन ब्राह्मण पुण्यास पाठवून त्यांच्याकरवी खानाच्या लष्करातील एक मराठा शिलेदार फितूर केला. त्याला असा बहाणा करावयास सांगितले कीं, आपण लग्न समारंभ करणार आहों यास्तव आपणांस शहरांतून वाजतगाजत वरात काढण्याची परवानगी मिळावी, असा त्याने खानापाशी अर्ज करावा. त्याप्रमाणे त्या शिलेदाराने अर्ज करून परवानगी मिळविली. मग त्याने आपल्या कांही मित्रांस सामील करून घेऊन ही वरात काढण्याचे त्या ब्राह्मणांस वचन दिले. इतकी तयारी झाल्यावर महाराज सिंहगडावरून हजार, दीडहजार निवडक मावळे घेऊन निघाले. येताना कात्रजच्या घाटात झाडास जागोजाग पोत बांधविले व तेथे काहीं बैल ठेऊन त्यांच्याही शिंगांस पोत बांधविले. आणखी तेथे डोंगरात बिकट जागी वीस-पंचवीस कणेकरी व सिंगाडे ठेऊन दिले. खानाच्या गोटावर हल्ला करून फत्ते मिळवून सिंहगडाकडे जाताना इशारतीचा करणा वाजेल तेव्हा ह्या ठिकाणी ठेवलेल्या मावळ्यांनी झाडांचे व बैलांच्या शिंगांचे पोत उजळावे व करणे आणि शिंगे एकदम वाजवू लागावे व तेथून सर्वांनी चालते व्हावे, असे त्यास सांगून ठेविले. ह्या युक्तीचा उद्देश अर्थात असा होता कीं, खानाचे लोक पाठलागास निघाले म्हणजे त्यांनी कात्रजच्या घाटात उजेड पाहून व वाद्याचा गजर ऐकून तिकडे चाल करावी व आपण सिंहगडावर सुरक्षित जाऊन पोहोचावे. महाराज गडावरून उतरून पुण्याकडे जातांना वाटेत जागोजाग थोडेथोडे लोक ठेवित गेले व ह्या सर्व लोकांस असे सांगून ठेविले कीं, करण्यातील बारीक नळीची इशारत होताच सर्वांनी येऊन मिळावे. आंबेओहोळापाशी आल्यावर तेथे पाचसातशे लोक त्यांनी ठेऊन दिले व खानाच्या छावणीबाहेर कांहीं अंतरांवर दोनतीनशे लोक ठेविले.[३] पूर्व संकेताप्रमाणे फितूर केलेल्या शिलेदाराची वरात मिरवित-मिरवित शहराच्या वेशीपाशी आली. तोच महाराज आपल्याबरोबर फक्त पंचवीस असामी घेऊन तींत जाऊन मिळाले.[४] ह्या प्रसंगी महाराजांबरोबर येसाजी कंक, तानाजी मालुसरे, दादाजी बापुजी देशपांड्ये व चिमणाजी बापुजी देशपांड्ये हे होते. मराठे लोकांचा त्याकाळी असा रिवाज असे कीं, वरातीस वगैरे निघताना ते आपली शस्त्रे बरोबर घेत. यास्तव त्यांच्या हातात शस्त्रे असल्याबद्दल कोणासही शंका आली नाही.

---

१ मि. किंकेड म्हणतात कीं, हे पत्र त्याने फारशी भाषेत लिहिले, आणि महाराजांनी त्याचा जबाब संस्कृत भाषेत पाठविला.

२ रायरीची बखर जेध्यांच्या शकावलींत असा मजकूर आहे की, सोनाजी पंडीत नावाच्या एका ब्राह्मणाने हा खानाचा निरोप राजगडावर महाराजांकडे आणिला!

३ सभासद म्हणतो की, नेताजी पालकर व मोरोपंत यांस सैन्यासह छावणीबाहेर काही अंतरावर राहावयास सांगितले होते. प्रो. सरकारही असेच म्हणतात.

४ महाराजांचे दोनशे लोक मोंगलांच्या पायदळातल्या मराठे शिपायांचा वेश घेऊन नवरा मुलगा सजवून घेऊन शहरात शिरले. ह्या तोतया नवऱ्याबरोबर महाराज चालले होते आणि छावणीच्या दुसऱ्या बाजूकडून त्यांचे आणखी दोनशे लोक तसाच वेश घेऊन आपल्यातलेच कांही कैदी म्हणून धरून त्यांस मारहाण करीत आंत शिरले, असे खाफीखान म्हणतो.

याप्रसंगी महाराजांनी अंगात चिलखत चढवून वरून झगा घातला होता व डोकीस शिरस्त्राण घालून वरून मंदिल बांधिले होते. त्यांच्या एका हातात तरवार असून दुसऱ्या हातात वाघनखे व बिचवा अशी होती. मिरवणूकीच्या साहाय्याने खानाच्या गोटात महाराजांचा व त्यांच्या बरोबरच्या माणसांचा प्रवेश झाल्यावर काहीं वेळाने जिकडेतिकडे सामसूम झाले. रात्र फार झाल्यामुळे सगळे लोक झोपी जाऊन कांहीं चौक्यावरचे लोक तेवढे अर्धवट जागे होते. गोटाबाहेर सक्त पहारा असल्याकारणाने आतल्या चौक्यावरचे लोक अंमळ बेफाम असत. खान राहत होता तो वाडा खुद्द महाराजांचा असल्यामुळे त्यात कोठून कसा प्रवेश होईल हे त्यांस चांगले ठाऊक होते. महाराज आपल्या लोकांनिशी थेट त्या वाड्यापाशी गेले आणि स्वयंपाक घराच्या भिंतीला एक खिडकी होती. ती बुजविली होती, ती त्यांनी खणून आत उतरावयास वाट केली व त्या वाटेने महाराज दोनतीन असामी बरोबर घेऊन आत उतरले. त्यांची चाहूल लागताच खानाच्या जनान खाण्यातील बायका जाग्या झाल्या व त्यांनी आपल्या धन्यास जागे केले. त्यासरशी तो घाबरून उठून एका खिडकीवाटे खाली उतरू लागला. इतक्यात महाराजांची त्यांच्यावर नजर पडून त्याच्याकडे धावत जाऊन त्यांनी त्याच्या अंगावर आपल्या तरवारीचा वार केला. त्या वाराने त्याच्या हाताचे एक बोट तुटले. इकडे त्यांचा मुलगा अबदुल फतेखान व त्याच्या खास तैनातीचे शिपाई महाराजांवर चालून आले. त्या सर्वांची कत्तल उडवून महाराज आपल्या लोकांसह सुरक्षित बाहेर पडले. गलीमानें छापा घातल्याचा पुकारा खानाच्या लष्करात होऊन सर्व लोक गलबलून गेले. जिकडेतिकडे एकच गोंधळ माजत राहिला. गलीम कोठे आहे म्हणून जो तो शोधू लागला. महाराजही या गर्दीतून 'गलीम कोठे आहे' असे ओरडत आपल्या लोकांसह धावत सुटून शहराबाहेर आले.[१] जागोजाग ठेवलेल्या लोकांस एकत्र करून ते सिंहगडाकडे चालले. तेव्हां इशाराचा करणा वाजला. त्याचबरोबर कात्रजच्या

---

१ चिटणीस ही छाप्याची हकीगत निराळी देतो ती अशी : खान वाड्यात राहत नसून बागेलगत डेरा देऊन राहिला होता. ह्या डेऱ्यात महाराज एक-दोन असामीसह शिरले व तो निजला होता तेथे जाऊन त्याच्या उरावर बसले व आता वार करणार तो खानाची स्त्री जागी झाली व तीने तो प्रकार पाहून महाराजांचे पाय घट्ट धरून आपल्या पतीस जीवनदान द्यावे अशी बहुत गयावया करून प्रार्थना केली. तेव्हा महाराजांचे हृदय द्रवून त्यांनी असा विचार केला की, हा जिवंत राहून आपल्याशी युद्ध करावयास आला तर ह्याला समरांगणात गाठून शासन करूया याला ह्या वेळीं मारू नये. मग खानास मोठ्या खबरदारीने दाबून धरून त्याच्या छातीवरून उठून त्याच्या मानेवर तरवार त्यानी ठेविली व दुसऱ्या हातातले वाघ नखे त्याच्या पोटास रोवून त्याला म्हटले; 'उठ, आणि मी जेथपर्यंत नेईन तेथपर्यंत माझ्याबरोबर चल आम्ही बाहेर पडेपर्यंत गलबला केल्यास ठार करीन!' असे बोलून त्याच्या हाताची दोन बोटे कापून त्याला त्याच्या बायकोसह हाती धरून महाराज आल्या वाटेने आपल्या बाहेरच्या लोकांस जाऊन मिळाले. बाहेर पडण्यापूर्वी ते त्यास म्हणाले की, 'शिवाजी तो मी. तू मजवर मोहिम करून आलास; पण तुझे पारिपत्य करून तुला ठार मारावयास मला उशीर लागणार नाही. तुला आपला जीव प्यारा असल्यास आमच्याशी युद्ध करण्याचा बेत सोडून तू ह्या प्रांतातून चालता हो!' सभासद व चित्रगुप्त हीच हकीकत निराळ्यारितीने देतात. ते म्हणतात कीं, खान ज्या डेऱ्यात रहात असें त्या डेऱ्यात महाराज शिरले तेंव्हा काहीं बायका जाग्या होत्या, त्यांनी गलबला केला. त्याबरोबर खान जागा झाला व गलिमाने आपणावर आकस्मात छापा घातला असे समजून बायकांत शिरला. महाराज त्यास शोधू लागले इतक्यात खान आपली तलवार घेऊन आपणावर वार करण्याच्या बेतात आहे असे महाराजाच्या दृष्टीस पडून त्यांनी त्याच्यावर आपल्या तलवारीचा प्रहार केला. तो चुकविता चुकविता त्याच्या हाताची तीन बोटे तुटली. इकडे खानाचे लोक गलबला ऐकताच डेऱ्यात शिरू लागले हे पाहून महाराज आपल्या लोकांसह डेऱ्यातून बाहेर पडून पार निघून गेले. रायरीच्या बखरीत ही छाप्याची हकीकत येणेंप्रमाणे दिली आहे. खान लालमहालात उतरला होता. त्या महालापाशी एक माळी राहत असे त्यास त्याच्या मेहुण्याच्याद्वारे फितूर करून असे ठरविले कीं, त्याने महाराजांस शास्ताखान निजे त्या खोलीत रात्रीच्या प्रहरी येऊन जावे, व या कामगिरीबद्दल पाचशे होन महाराजांनी त्याला द्यावे. ह्याप्रमाणे व्यवस्था केल्यावर महाराज राजगडावरून रात्रीचे निघून मोठ्या वेगाने पुण्यास प्राप्त झाले, व काही विश्वासू लोकांसह माळ्याच्या मदतीने वाड्यात शिरले. दाराशी पंचवीस पहारेकरी होते. त्याना व एक खोजा जागा होता त्याला त्यानी कापून काढीले. माळ्याने चुकून महाराजांस खानाच्या मुलाच्या खोलीत नेले. त्याला महाराजांनी तेथेच ठार केले व एका दासीला धमकी देऊन शास्ताखानाची खोली दाखविण्यास सांगितली. जिवाच्या भितीस्तव ती तिने दाखविली इतक्यांत गलबला होऊन खान उठला आणि घाबरून जाऊन खिडकीवाटे उडी टाकू लागला. त्याबरोबर महाराजांनी त्याच्यावर तरवारीचा वार केला. तो निसटता लागून त्याच्या एका हाताचा अंगठा तुटला. मग अतिशयित गलबला होऊन खानाचे लोक मशाली पेटवून जिकडून तिकडून जमा झाले. तेव्हा महाराज आल्या वाटेने निघून गेले. पण बागेची प्रत्येक बाजू खानाच्या लोकांनी वेढलेली पाहून त्यांच्या अंगावर आपल्या लोकांनिशी मोठ्या आवेशाने हल्ला करून त्यांस कापून काढून महाराज शहराबाहेर सुरक्षित पोहोचले व घोड्यावर बसून राजगडास निघून गेले.

घाटात मशाली पेटवून करणे व शिंगे वारं लागली. तेव्हां छापा घालणारे लोक त्या वाटेने निघून गेले असे खानाच्या लोकांस वाटून ते त्यांचा पाठलाग करित तिकडे धावत सुटले.[१] इकडे महाराज आपल्या सर्व लोकांसह सिंहगडावर सुखरूप जाऊन पोचले खानाचे लोक कात्रजच्या घाटाकडे दौड करीत गेले. ते प्रातःकाळी तेथें पाहतात तो झाडास व बैलांच्या शिंगांस पोत बांधलेले त्यांच्या दृष्टीस पडले. तेव्हां निराश होऊन ते तिकडून माघारी फिरले व गलिमाने हा सुद्धा कावा केला असून तो सिंहगडावरच परत गेला. अशी खात्री होऊन ते सिंहगडाखाली जमा झाले. अगदी किल्ल्यापाशी येत तोपर्यंत त्यांस महाराजांनी काहीएक अटकाव केला नाही. ते लोक मोठ्या आवेशाने आपल्या तरवारी परजित व रणवाद्ये वाजवित गडापाशी भिडले. त्यांचा असा निश्चय झाला होता कीं, कांही झाले तरी किल्ला सर करून शिवाजीमहाराजांस पकडून ठार करू; परंतु ते किल्ल्यावरील तोफांच्या माऱ्यात येऊन त्यावर सरबती होऊ लागली तेव्हां त्यांची धांदल उडून ते सैरावैरा पळत सुटले. शेकडो लोक तेथल्या तेथे मरून पडले. निशाणाच्या हत्तीस

शिवदिग्विजयात याहून निराळाच मजकूर आहे. तो असा : महाराज रंगमहालात शिरून शास्ताखानाचा मुलगा निजला होता त्या खोलीत शिरले व खान तो हाच असे समजून त्याच्यावर फिरंगेचा वार करून त्यास ठार केले. फिरंगेचा आवाज ऐकून त्याची बायको जवळ निजली होती ती जागी झाली. तिला महाराज बोलले की, 'ओरडशील तर प्राणास मुकशील! शास्ताखान तो हाच काय? बोल!' ती म्हणाली, 'हा त्याचा बेटा.' मग तिला शास्ताखानाची खोली दाखवावयास सांगितल्यावरून तिने जीवाच्या भीतीस्तव त्याची खोली दाखविली. तीत शिरून महाराजांनी खानावर तरवार उगारली. ती दिव्याच्या उजेडाने चमकली त्या सरशी खानाची बायको किंचित जागी होती ती उठून बसली व आपल्या पतीस मारावयास मारेकरी आला आहे असे पाहून महाराजांच्या चरणी तिने मस्तक ठेविले व परम लिनतेने अशी प्रार्थना केली की, 'यांस मारू नये इतक्यात खान जागा झाला पण शस्त्र घेऊन त्याच्याशी युद्ध करण्याचे त्यांस धैर्य न होऊन तो तोंड झाकून घेऊन बिछान्यावर पडून राहिला मग तिच्या त्या विनवणीने महाराजांचे हृदय द्रवले आणि ते तीस म्हणाले कीं, 'ह्यास मी जीवंत सोडितो; पण आम्ही बाहेर निघून जावू तोपर्यंत काहीं एक गडबड करणार नाहीत अशी आणभाक तू आणि याने करावी!' ही अट त्या स्त्रीस मान्य होऊन तिने आपल्या पतीस उठवून केलेला करार सांगितला. तो त्यासही मान्य झाला. मग त्याच्या उजव्या हाताची एक करंगळी कापून त्यांस हातात धरून वाड्याच्या दिंडीपर्यंत नेले व म्हटले की, 'उद्या माझ्या वाड्यातून निघून जा नाहीतर प्राणास मुकशील!' प्रो. सरकार यवनी बखरींच्या आधाराने असे म्हणतात कीं, महाराजांनी नेताजी पालकर व मोरोपंत पिंगळे यांच्याबरोबर प्रत्येकी एक-एक हजार लोक देऊन त्यांस खानाच्या प्रचंड छावणीच्या दोन बाजूस एका मैलाच्या अंतरावर राहावयास सांगितलें आणि आपण स्वतः चारशे निवडक लोक घेऊन त्याच्या छावणीजवळ आले. पहारेकऱ्यांनी त्यास हटकले तेंव्हा त्यांनी त्यास असे सांगितले की, आम्ही बादशाहच्या लष्करातले लोक असून आम्हांस नेमून दिलेल्या जागी जावयाचे आहे. असा बहाणा करून त्यांनी छावणीत प्रवेश केला आणि रात्र पडेपर्यंत ते एकेबाजूस थांबून राहिले. नंतर महाराज दोनशे लोक बरोबर घेऊन खान राहत होता तेथे गेले. ते दिवस रमजानचे असल्याकारणाने खानाचे नोकर सगळा दिवस उपास काढून रात्री चापून जेवून स्वस्थ घोरत पडले होते. खानाचे स्वयंपाकी पहाटेचे जेवण तयार करावयास उठले होते, त्यास काहीं एक गलबला न करिता कापून काढून शय्यागृहाचे दार बुजविले होते ते खणून काढू लागले. त्या खणण्याचा आवाज व ठार केलेल्या लोकांचे कण्हणे यांनी खानाच्या कित्येक दासी जाग्या झाल्या आणि कांहीं गडबड आहे असा संशय येऊन खानास उठवू लागल्या; पण आपली झोप मोडल्याबद्दल खान त्यांच्यावर रागावला आणि पुन्हा झोपी गेला. दाराला माणूस आत शिरेल इतके भगदाड पडताच महाराज चिमणाजी बापूजी यांस बरोबर घेऊन आत शिरले आणि थेट शास्ताखान निजला होता त्या खोलीत गेले. त्याबरोबर खानाच्या बायका जाग्या होऊन त्यांनी खानास उठविले. तेव्हां महाराजांनी त्यांच्यावर वार केला त्याने त्याचा अंगठा तुटला. इतक्यात बायकांनी दिवे विझविले, आणि त्या गर्दीतून त्यांनी खानास पळविले. इकडे महाराजांचे बाहेरचे लोक आत शिरले व कत्तल सुरु झाली. तींत खानाचा एक मुलगा पडला व दुसरे दोघे जखमी झाले. खानाच्या सहा बायका व दोन दासी प्राणास मुकल्या. ही अशी ओरड होताच महाराज निसटून गेले. मि. किंकेड म्हणतात की, महाराज पहिल्याने त्या महालाच्या दरवाजापाशी गेले; पण खानाच्या जनानखान्यात खोजे जागे असून आत दिवे होते म्हणून ते पिछाडीस स्वयंपाक घरातील खिडकी बुजविली होती ती खणू लागले, तेव्हां खानाच्या दासीने भिंतीला भोक पडलेले पाहून धावत जाऊन खानास उठविले. त्याने आत शिरलेल्या पहिल्या माणसाच्या छातीत बाण मारून त्याला खाली पाडले; पण त्याने पडता पडता खानावर तरवारीचा वार केला. त्यामुळे खानाचा अंगठा तुटला. इतक्यात महाराजांचे दुसरे लोक पुढल्या दरवाजावरील खोजांना ठार करून आत शिरले आणि खानाच्या नोकरांची आणि त्यांची मारामारी सुरु झाली. त्या गर्दीत खानाला दासीने लपविले. खानाचा मुलगा पडला आणि खानाचा एक सरदार त्याचासारखाच दिसला त्याला त्यांनी ठार केले. तो खानच पडला असे समजून महाराज आपले लोक घेऊन त्या गर्दीतून निसटून पार गेले.

१ महाराजांनी असली काही युक्ती योजल्याचे किंवा सिंहगडास मोगलांनी वेढा घातल्याचे प्रो. सरकार सांगत नाहीत.

गोळा लागून तो पडला. हा कहर पाहून किल्ल्याजवळ राहण्याचे कोणास धैर्य होईना. 'सबसे जीव प्यारा' या न्यायाने जो तो आपला प्राण वाचवतो कसा तो पाहू लागला. ह्याप्रमाणे मोगलांची दाणादाण होऊन ते वेढा उठवून माघारी पळत सुटले. तो दुसरीकडून नेताजी पालकराने आपल्या स्वारांची एक टोळी कर्तोजी गुजरांच्या हाताखाली देऊन त्यांच्यावर हल्ला करावयास पाठविला. ह्या टोळीने त्यांच्यावर आकस्मात घाला घालून त्यांची पुरी धुळधाण केली. मोंगलांच्या पुष्कळ टोळ्या गुजराने कापून काढील्या. हे वर्तमान ता. ५ एप्रिल स. १६६३ त घडले.

हा असा आपल्या लोकांचा पुरा मोड झाला हे पाहून शास्ताखान अगदी बेदिल झाला. आधीच मुलाच्या मृत्यूमुळे त्याचे चित्त शोकाकुल झाले होते. त्यात आणखी आपल्या लोकांचा असा धुव्वा उडून बरेच सैन्य खलास झाले. हे पाहून त्याची हिंमत अगदीच खचली. पुढें मोहिम चालविण्याचा दम त्यास बिलकुल उरला नाही. त्याला आता असे वाटू लागले कीं, शिवाजीमहाराज मोठे दगेखोर असल्यामुळे ते केंव्हा काय करतील याचा नेम नाही आपला प्राण जाण्याची पाळी आली होती ती सुदैवाने चुकली. सिंहगडास वेढा देऊन बसावे तर पावसाचे दिवस आले. तशात आपल्या लोकांचा सगळा वकूबही नाहीसा झाला ते आता शिवाजीमहाराजांशी सामना करण्याची गोष्टीही बोलू देणार नाहीत. बादशाहच्या आग्रहास्तव मराठ्यांशी लढत राहिल्याने फौजेची नाहक खराबी होऊन ते काही हार जाणार नाहीत. शास्ताखानाच्या मनात आणखी असा विचार आला कीं, आपण इतक्या कडेकोट बंदोबस्ताने राहिलो असता तेथे शिवाजीमहाराजांनी प्रवेश करून आपला प्राण घेण्याचा घाट घातला. तेव्हां आपल्या गोटात फितुरी झाली आहे असे दिसते. यास्तव अशा फितूर झालेल्या लोकांचा इतबार धरून पुढे लढाई चालविण्यात कांहीं अर्थ नाही. अफझुलखानासारखी आपलीही दशा व्हावयास चुकणार नाही, असा विचार करून शास्ताखानाने सिंहगडास पुन्हा वेढा घालण्याचा बेत सोडून व शिवाजीमहाराज जवळ असता पुण्यास तळ देऊन राहणे धोक्याचे आहे अशी त्याच्या मनाची पक्की खात्री होऊन तो तेथली छावणी उठवून पेडगावास जाऊन राहिला.[१]

त्याला ह्या वेळी यशवंतसिंगाचा पूरा वहिम आला. तो त्यास गाफीलगिरीबद्दल उघडउघड दोष देऊ लागला. त्याने औरंगजेबास पत्र लिहून असे कळविले कीं, 'आपल्या सैन्यात फितुरी झाली असून यशवंतसिंगास शिवाजीमहाराजांनी लाच देऊन वश करून घेतले आहे.[२] म्हणून आपली ही दशा त्यांनी केली.' हे वर्तमान बादशाहास कळले तेव्हां तो पराकाष्टेचा खिन्न झाला. त्याच्या घराण्यातल्या सर्व माणसांना दुःख झाले. त्याच्या दरबारच्या सगळ्या लोकांच्या मुद्रा उदास झाल्या. शिवाजीमहाराजांसारख्या यकश्चित् बंडखोराने आपणांस असे खाली पहावयास लावले याची त्याला मोठी शरम झाली. त्याची आता अशी खात्री झाली कीं, शिवाजी मोठा सैतान पैदा झाला आहे. कोणाच्या कधी ध्यानीमनी येणार नाही असे अचाट कर्म करून मोठमोठ्या शूरसरदारांचाही नाश करण्यास तो चुकत नाही. आपण एवढी मोठी सेना त्याच्यावर पाठविली असता तिचा कांहींच उपयोग झाला नाही. मोगल बादशहाचाही आब मात्र दवडीला. असे मनात येऊन यापुढे दक्षिणेतील मुलूखाचे रक्षण कसे करावे ही चिंता त्यांस उत्पन्न झाली. शास्ताखान व यशवंतसिंग यांच्यामध्ये बेबनाव आला आहे. हे पाहून त्यांच्या हाती दक्षिणेतील व्यवस्था सोपविणे बरोबर नाही असा विचार करून त्याने त्यांस माघारी बोलाविले, आणि सुलतान मोअझिम ह्यास दक्षिणेचा सुभेदार नेमिलें. शास्ताखानासारख्या बड्या सरदाराचा असा एकदम उपमर्द करू नये म्हणून त्याला बंगालचा सुभेदार केले व यशवंतसिंग नाराज होऊन [३] कदाचित मराठ्यास जाऊन मिळेल या भितीने त्यास सुलतानाचा दुय्यम नेमून दक्षिणेतच ठेविले. खरे

---

१ प्रो. सरकार म्हणतात कीं, तो पुण्याची छावणी उठवून औरंगाबादेस गेला.

२ प्रो. सरकार म्हणतात की, हा यशवंतसिंग महाराज ज्या वाटेने आले त्या वाटेजवळच आपल्या दहा हजार लोकांचा तळ देऊन होता. त्याने महाराजांस येतेवेळी व परत जातेवेळी मुळीं अटकाव केला नाही किंवा त्यांचा पाठलाग केला नाही, असा आरोप शास्ताखानाने त्याच्यावर ठेवला; परंतु ह्या यशवंतसिंगास महाराजांनी त्या वेळी वश करून घेतल्याचे कोणत्याही बखरीत आढळत नाही.

३ बर्निअर म्हणतो की, ह्या रजपूत सरदाराला बादशहाने दिल्लीस परत बोलाविले असता तो तिकडे निघून न जाता आपल्या संस्थानास निघून गेला.

म्हटले असता ह्या समयी खुद्द औरंगजेबानेच दक्षिणेत स्वारी करून शिवाजीमहाराजांचे पारिपत्य करण्याचा निश्चय करावा. परंतु काश्मीराकडे कांहीं राजकारण उपस्थित होऊन तो ह्या वेळीं तिकडे जावयास निघाला होता.

औरंगजेबाच्या आज्ञेमुळे शास्ताखान दक्षिणेतून निघून गेल्यावर यशवंतसिंगाने आपले इमान व शौर्य यांचे प्रदर्शन करण्याच्या इराद्याने सिंहगडास पुनः वेढा दिला; परंतु महाराजांच्या लोकांनी त्याच्यावर चोहोकडून घाले घालून त्याला असा काही घाबरवून सोडला कीं, त्याच्याने त्या किल्ल्यापाशी फार वेळ नेट धरवला नाही. त्याचे पुष्कळ लोक मेले. त्यात आणखी त्याच्या छावणीतील दारू सामानाला आग लागून एकदम मोठा स्फोट झाल्यामुळे त्याचे बरेच लोक दगावले. तो थोड्याच दिवसांत वेढा उठवून जेमतेम औरंगाबादेस जाऊन पोचला.[१]

ह्याप्रमाणे शास्ताखानाची वावटळ उडवून दिल्यावर महाराजांनी लागलीच दक्षिण कोंकणाकडे आपला मोरचा पुन: फिरविला. ह्या वेळी अदिलशहा कानडा प्रांतात मोहिमेवर गेला असून बेदनूरचा राजा शिवाप्पा नायक हा तिकडे प्रबळ झाला होता, त्याच्याशी लढत होता. ही संधी साधून ते कोल्हापूरावरून व कुडाळावरून वेंगुर्ल्यापर्यंत आले (मे स. १६६३). ह्या वेळच्या इंग्रजांच्या लेखात असे नमूद केले आहे कीं, महाराज ज्या ज्या गावावरून गेले. त्या त्या गावच्या लोकांस आपण किंवा आपले लोक मुळीं उपद्रव करणार नाहीत असे कौल देत गेले. वेंगुर्ल्याचे लोक ह्या वेळी महाराजांच्या तेथल्या ठाणेदारावर उठले होते. ही बातमी लागताच ते त्या गावी गेले आणि तेथल्या लोकांस चांगली शिक्षा देऊन तेथल्या व्यापाऱ्यांस लुटून तेथे आपले दोन हजार लोक त्यांनी ठेविले. महाराज कोकणच्या बंदरापाशी परत आले असे कळताच सांकळी, दिवली वगैरे ठाण्यांवरचे मुसलमान सुभेदार पळून गेले. ही त्यांची धामधूम ऐकून अदिलशहाने फोंडे येथील सुभेदाराला असा हुकूम पाठविला कीं, त्याने वाडीच्या सावंतांस आपल्या लोकांनिशी मदत करून राजापूर वगैरे ठिकाणच्या महाराजांच्या लोकांस हाकून द्यावे; परंतु त्याला ह्या हुकमाप्रमाणे वागण्याचा आवाका नव्हता. वेंगुर्ल्याचा बंदोबस्त करून महाराज लगबगीने माघारी गेले.

***

१ जेध्यांच्या शकावलीवरून असे दिसते की, यशवंतसिंगाने स. १६६३ च्या डिसेंबर महिन्यात वेढा घातला असून सन १६६४ च्या जून महिन्यात त्याला तो उठवून माघारी जावे लागले. ह्या तारखा खऱ्या मानल्या तर हा वेढा सहा महिने पडला होता असे म्हणावे लागते.

भाग सतरावा

सुरत, बार्सिलोर वगैरे शहरांची लूट (१६६४–६५)

लढाईचा विचार सोडून यशवंतसिंग औरंगाबादेस परत जाऊन स्वस्थ बसल्यावर महाराजांनीं कल्याण व दंडाराजपुरी ह्या दोन ठिकाणी आपल्या फौजेची जमाजम केली आणि हें सैन्य जमा करण्याचा उद्देश लोकांत असा खोटाच जाहीर केला कीं, वसई व चेऊल येथील फिरंगी लोकांवर स्वारी करावयाची आहे व शिद्दीस जेर करण्याचा पुनः एक वेळ जोराचा प्रयत्न करावयाचा आहे; परंतु हें सैन्य एकत्र करण्याचा वास्तविक हेतू सुरतशहरावर हल्ला करून तें लुटण्याचा होता. ह्या वेळीं हिंदुस्थानांत जी थोडी धनाढ्य शहरे होतीं त्यांत सुरतशहराची गणना होत असे. देशोदेशींचे व्यापारी ह्या शहरी येऊन हिंदुस्थानाशी व्यापार करीत असत. त्यामुळें तेथें मोठमोठे व्यापारी पुष्कळ असत व त्यांपैकीं कांहीं फारच सधन असत. महाराजांच्या पदरी बहिरजी नाईक ह्या नांवाचा एक अतिशयित हुशार मनुष्य होता. त्यास हेराचे काम सांगितलें होते. तो नाना प्रकारचे वेश घेऊन सर्वत्र हिंडत असे, व आपल्या धन्याला सर्व प्रकारची खरी माहिती नेहमी आणून देत असे. त्यानें सुरत शहराची टेहळणी करून व तेथला बंदोबस्त वगैरे कसा काय आहे तें नीट बारकाईनें पाहून येऊन महाराजांस असें सांगितलें कीं, ह्या वेळीं सुरतेवर हल्ला करून ती सुटल्यास अगणित द्रव्य मिळण्यासारखे आहे. [१]

हेराने ही माहिती दिल्यावर महाराजांनी पूर्वोक्त प्रकारे आपल्या सैन्याची तयारी करून त्या शहरावर स्वतः मोहीम करण्याचें मनांत आणिलें; कारण त्यांनीं ह्यापूर्वी अनेक वेळां पाहिले होतें कीं, कोणातरी सरदारास असली मोहीम सांगितल्यानें व्हावा तसा उपयोग होत नाहीं. ह्या विचाराप्रमाणें ते दहा हजार निवडक मावळे बरोबर घेऊन ह्या स्वारीस निघाले. त्यांच्याबरोबर मोरोपंत, प्रतापराव गुजर, व्यंकाजीपंत, मकाजी आनंदराव, निळोपंत, अण्णाजीपंत, दत्ताजीपंत, मानसिंग मोरे व रुपाजी भोसले हे होते. एवढ्या लोकांनिशीं त्यांनी कोंकणांतून नीट सुरतेची वाट धरिलीं.[२] 'परंतु आपण सुरतेवर हल्ला करावयास जात आहों असा संशय मोगलांस येऊ नये म्हणून त्यांनी असा बहाणा केला कीं, आपण नाशिकतीर्थास जाऊन तेथून पुढें मोरोपंतानें नुकत्याच घेतलेल्या किल्ल्याची पाहणी करावयास चाललो आहो. हा खोटा बहाणा करून ते उत्तरेकडे कूच करून गेले व मोठमोठ्या मजला करून अचानक सुरतेपाशी येऊन दाखल झाले. सुरतेपासून २८ मैलांवर गनदेवी म्हणून एक गाव आहे. तेथपर्यंत महाराज येऊन पोहोचले असून तें शहर लुटावयास येत आहेत अशी वार्ता शहरांत येऊन पोचताच तेथले सगळे लोक अगदीं घाबरून गेले आणि आपली बायकामुले घेऊन तापी नदीच्या पैलतीरी पळून जाऊं लागले. कांहीं श्रीमंत लोक किल्लेदारास लाच देऊन किल्ल्याच्या

१ कित्येक इतिहासकारांचे असें म्हणणें आहे कीं, शिवाजीमहाराजांनी स्वतः वेश पालटून सुरत शहरांत प्रवेश केला आणि तेथें तीन दिवस राहून अवश्य तेवढी माहिती मिळविली व श्रीमंत सावकारांची घरं पाहून ठेविली.

२ ऑर्मी म्हणतो की, हा आपला बेत कोणास कळू नये म्हणून त्यांनी चेऊल व वसई ह्या शहरांपुढें दोन छावण्या केल्या व असें भासविलें कीं, ह्या दोन शहरांवर आपणांस हल्ला करावयाचा आहे; पण वसईसमोरील छावणीतून चार हजार स्वार घेऊन ते निघाले व त्या छावणीत पूर्वीप्रमाणे बंदोबस्त ठेवावयास व रणवाद्ये वगैरे वाजवावयास त्यांनी सांगितले.

आश्रयास जाऊन राहिले. महाराज पाच मैलांच्या टप्प्यांत आले तेंव्हा शहराचा मोगल सुभेदार इनायतखान याने त्यांच्याकडे एक माणूस खंडाचे बोलणें करण्यास पाठविला. त्याला त्यांनीं अटकेत ठेविले हें पाहून इनायतखान घाबरून गेला आणि शहरांतील लोकांचें काय होईल तें होवो, आपला जीव वाचवावा, अशा बुद्धीनें हा भ्याड सुभेदार किल्ल्यावर जाऊन राहिला. शहराचे रक्षण करण्याचा त्याने काहींच उपाय योजिला नाहीं.[१]

महाराज ता. ६ जानेवारी स. १६६४ रोजी सुरतेजवळ येऊन बऱ्हाणपूर वेशीच्या बाहेरच्या बागेत उतरले. आदल्या रात्रीं त्यांनीं दोन जासूद पत्र देऊन शहरांत पाठविले. त्यांत त्यांनीं असें लिहिले होतें की, शहराच्या सुभेदारानें आणि हाजी सय्यद बेग, बहारजी भोरा व हाजीकासम अशा तिघा अतिधनाढ्य सावकारांनी आपल्याकडे येऊन शहराचा खंड ठरवावा, नाहीं तर आपण सगळे शहर जाळूनपोळून उद्ध्वस्त करूं; पण ह्या पत्राचा कांहींच जबाब आला नाही. तेव्हां महाराजांचे घोडेस्वार शहरांत घुसले. असें सांगतात कीं, सुरतेजवळ आल्यावर त्यांनीं असें जाहीर केलें होतें कीं, शहरांतील कोणाही व्यापाऱ्यास उपद्रव करण्याचा आपला इरादा नाहीं. तर औरंगजेबाने आपल्या राज्यावर स्वारी करून आपली बरीच खराबी केली, व आपले कांही संबंधी जन मारले, त्यांचा सूड उगविण्यासाठी मी आलों आहें. महाराजांचे लोक आंत शिरू लागले तेव्हां किल्ल्यावरच्या लोकांनी त्यांच्यावर तोफांचा भडिमार चालविला पण त्याची त्यांनी मुळीं परवा केली नाहीं. त्या लोकांनी किल्ल्यावरून खालीं उतरून आपल्या लुटीच्या कामास व्यत्यय आणू नये म्हणून त्यांनीं किल्ल्यास मोरचे लावून त्यांच्यावर खालून बंदुका वगैरे सोडीत राहून त्यांस तेथेंच अडकवून ठेवण्यासाठी महाराजांनीं आपले कांहीं लोक ठेवून दिले. तो किल्ला मोठा बळकट होता. तो सर होण्यासारखा नव्हता. किल्ल्यावरून तोफा सुटत त्यामुळे महाराजाच्या लोकांची फारशी खराबी झाली नाहीं; पण त्यामुळें शहरांतल्या घरादारांची मात्र पुष्कळ नासाडी झाली.

आंत शिरून सावकारांचे वाडे काबीज करून महाराजांनी चार दिवस तें शहर सावकाश लुटले. जे श्रीमंत लोक आपली लपवून ठेवलेली संपत्ती दाखवीनात त्यांस मृत्यूची भीती घालून त्यांजपासून ती हिरावून घेतली. ह्या धामधुमीत महाराजांच्या तडाख्यांत एक यहुदी सापडला. तो कॉन्स्टॅन्टिनोपलचा व्यापारी असून याने औरंगजेब बादशहास विकण्याकरितां अति मोलवान जवाहीर आणिलें होतें. महाराजांस हें वर्तमान लागून त्यांनी त्यांस आपल्यापुढे आणविले, व जवाहीर कोठे ठेविले आहे ते आणून द्यावयास सांगितलें. तो कांहीं केल्या कबूल होईना. तेव्हां त्याला खाली पाडून त्याच्या मानेवर तीनवेळा तरवार ठेविली व ठार मारण्याची त्यास भीती घातली; परंतू तो यहुधी व्यापारी बिलकूल डगमगला नाहीं. त्याला आपल्या जीवापेक्षा द्रव्य प्यारे वाटलें. दुसरा एक व्यापारी चाळीस बैलांवर कापड लादून आग्र्याकडून सुरतेस आला होता. त्याला पकडून आणून त्याच्याकडे नगदी नाणे मागू लागले. तो म्हणाला, 'माझ्याकडे हे कापड आहे हें अजून मी मुळीच विकले नाहीं. हें घेऊन मला सोडा' पण त्याचें तें म्हणणे महाराजांना खरें न वाटून त्याचा उजवा हात छाटला आणि त्याचें कापड महाराजांच्या लोकांनी जाळून टाकले. कारण असली अडगळ बरोबर वागविणें सोईचे नव्हते. सोने, रुपे व जवाहीर जेवढे सापडेल तेवढेच ते लुटीत असत.

---

१ कित्येक मराठी बखरकार म्हणतात की, हा सुभेदार आपले लोक घेऊन महाराजांच्या लोकांवर चालून आला. प्रो. सरकार त्या वेळच्या सुरतेच्या इंग्रज वगैरे व्यापाऱ्यांच्या लेखाच्या आधाराने असे म्हणतात कीं, ह्या सुभेदाराला शहराच्या रक्षणासाठी पाचशे लोक ठेवण्याचा खर्च मिळे. पण त्याने बहुतेक पैसे दाबून इतके लोक कधीही ठेवले नव्हते आणि शहरात मोठमोठे व्यापारी होते, पण आपल्या दौलतीच्या रक्षणासाठी त्यांनीं आपल्या पदरी मुळीं लोक ठेविले नव्हते. बर्निअर व व्हालेन्टीन हे त्या काळचे प्रवासी असें म्हणतात की, हा सुभेदार शिवाजीमहाराजांना आडवा आला तेव्हा त्याची त्यांनी अशी समजूत केली की, आपण काही शहरात प्रवेश करणार नाहीं, असेच पुढे कूच करून जाणार. ऑर्मी म्हणतो की, शहराचा सुभेदार व किल्ल्याचा सुभेदार असे दोघे घाबरून स्वरक्षणासाठी किल्ल्यात जाऊन राहिले आणि जितक्या लोकांचा समावेश होण्याजोगा होता तितक्यांस त्यांनी आंत घेतलें.

डच लोकांच्या वखारीजवळ वर सांगितलेला बहरजी भोरा याचा वाडा होता. ह्या व्यापाऱ्याची अपार संपत्ती होती असा सर्वत्र लौकिक होता. त्याचा वाडा महाराजांचे लोक एक सबंध अहोरात्र लुटीत होते. तेथून त्यांनी २८ शेर मोठी मोत्ये, हिरे, पाचू माणिक वगैरे पुष्कळ जवाहिर व अगणित द्रव्य लुटून नेले असें म्हणतात. तसाच इंग्रजांच्या वखारीपाशी वर सांगितलेला हाजी सय्यद बेग याचा वाडा व मोठमोठ्या वखारी होत्या. त्याच्या वाड्यात शिरून त्यांनी पुष्कळ द्रव्य लुटलें. ही या वाड्याची लूट चालली असतां इंग्रजांच्या वखारांच्या लगत्यास असलेल्या दुसऱ्या एका व्यापाराचा वाडा लुटून त्यांस आग लावून देण्याच्या बेतात महाराजांचे लोक होते. ह्या त्यांच्या कृतीमुळे आपल्या वखारीला धोका आहे असे पाहून इंग्रज वखारवाल्यांचे काहीं लोक त्यांस प्रतिबंध करावयास बाहेर पडले. त्यांची व महाराजांच्या लोकांची कांहीं वेळ चकमक होऊन ते तेथून निघून गेले. सय्यद बेग त्या वेळीं आपला वाडा सोडून किल्ल्यावर जीव घेऊन पळाला होता. त्याच्या वाड्याच्या रक्षणार्थ इंग्रजांनी आपले कांहीं लोक ठेवून दिले. त्यामुळे त्याच्या राहिलेल्या संपत्तीचा बचाव झाला असें म्हणतात. सुरत येथील इंग्रज वखारवाल्यांचा मुख्य सर ऑक्झेन्डन याने शिवाजीमहाराज सुरत शहर लुटावयास येत आहेत असें ऐकताच आपल्या मत्तेचे रक्षण करावयाचे, ती सोडून पळून जावयाचें नाहीं असा निश्चय केला. त्यानें स्वाली येथील आपल्या जहाजांवरचे खलाशी वगैरे मिळून एकंदर दीडशे युरोपियन व साठ देशी शिपाई यांस बंदुका वगैरे देऊन सज्ज केले आणि तारवावरच्या तोफा आणून त्या आपल्या वखारीच्या आसपास माऱ्याच्या जागा पाहून रोखून ठेविल्या. त्या अशा की, मराठे वखारीवर हल्ला करावयास आले तर त्यांना तोफांच्या भडीमारामुळे पुढें येतां येऊ नये. त्यानें हे आपले लोक महाराज शहरांपाशी येण्यापूर्वी चोहींकडे फिरवून असे जाहीर केले होते कीं, मराठ्यांशी टक्कर देण्याची आपली तयारी आहे. पुढें वर सांगितल्याप्रमाणे सय्यद बेग याच्या घराचा इंग्रजांनी बचाव करण्याचा घाट घातला आणि त्याचा वाडा लुटण्यास आपल्या लोकांना हरकत केली असे पाहून महाराजांस त्याचा राग आला आणि त्यांनी ऑक्झेन्डन यास सांगून पाठविले कीं, 'आमच्याकडे तीन लाख रूपये पाठवून द्या अगर सय्यद बेग याचा वाडा आम्हांस लुटू द्या. दोहोंतली एकही गोष्ट न कराल तर मी स्वतः तुमच्यावर चालून येऊन तुमच्या एकूणएक माणसांची कत्तल करीन!' ह्या त्यांच्या निरोपास त्याने असा जबाब पाठविला की, 'यांतली कोणतीही गोष्ट करण्यास आम्ही तयार नाहीं. तुम्ही आमच्यावर वाटेल तेव्हां चालून या!' ह्या त्याच्या धिटाईच्या जबाबावरून इंग्रजांस शासन करावयास महाराज चुकले नसते; परंतु त्यांना माहीत होते कीं, त्यांच्याशी भांडणाच्या नादास लागून आपले लोक खराब केल्यासारखी त्यांच्याकडून आपल्या लुटींत कांहीं फारशी भर पडणार नाहीं. शिवाय मोगलांची फौज तेथे येऊन पोचण्यापूर्वी शहरांतून आपला पाया काढून मिळालेली मुबलक लूट सुरक्षितपणे आपल्या मुलखात होईल तितकी लवकर न्यावी हें बरें. असा विचार त्यांच्या मनात आला नसता तर त्यांना शेदोनशें इंग्रजांचा समाचार घ्यावयाचे मुळीं कठीण गेलें नसतें. दुसरे असेही म्हणावयास हरकत नाही कीं, ह्या इंग्रज व्यापाऱ्यांना होता होईतो आपण होऊन त्रास देऊं नये असें महाराजांना वाटत असे. याचे एक उदाहरण येथे देतो. महाराज सुरत शहरांत शिरलें तेव्हां ॲन्टनी स्मिथ नावाचा ईस्ट इंडिया कंपनीचा एक नोकर डच लोकांच्या जहाजांतून उतरून किनाऱ्यावर येत होता. त्याला महाराजांच्या लोकांनी पकडून कैद केलें. हा इंग्रज गृहस्थ मराठ्यांच्या छावणीत तीन दिवस इतर कैद्यांबरोबर बंदीत होता. तिसरे दिवशीं त्याचा हात छाटण्याचा हुकूम महाराजांनी केला, तेव्हां तो हिंदुस्थानी भाषेत म्हणाला, 'माझा हात छाटण्याऐवजी शिरच कापा.' त्यावरून त्याच्या डोक्याची टोपी काढली. त्याचे उघडे डोके पाहतांच तो इंग्रज आहे असें ओळखून महाराजांनी त्याला मारू नका म्हणून सांगितलें आणि त्याला ऑक्झेन्डन यांच्याकडे कांहीं निरोप देऊन पाठविलें. ऑक्झेन्डन याने त्याला उलट निरोप देऊन पाठविलें नाही. ह्या इंग्रज गृहस्थाने महाराजांच्या छावणींत घडणारा सगळा प्रकार प्रत्यक्ष डोळ्यांनी पाहिला होता. तो म्हणतो कीं, महाराज एका तंबूत बसत आणि पकडून आणलेल्या ज्या माणसांवर असा आरोप होई की, ह्यांनी आपले द्रव्य लपवून ठेविले आहे, दाखवित नाहीत, त्यांचें हात किंवा डोकी तोडण्याचे हुकूम ते भराभर देत असत.[१]

१ हा सगळा मजकूर मुख्यतः प्रो. सरकारांच्या पुस्तकाच्या आधारे दिला आहे. तो अर्थात त्यांनी त्या वेळच्या इंग्रज व्यापाऱ्यांच्या लेखांवरून जुळविला आहे.

ह्या शहराची लूट चालविली असतां महाराजांनी सर्वच लोकांस आपलें उग्र स्वरूप दाखविले नाही असें एकदोन गोष्टींवरून दिसून येतें. एक गोष्ट अशी कीं, सुरतेस ह्या वेळीं रेवरेन्ड फादर आंब्रोज ह्या नांवाचा एक कापुशिअन पाद्री राहात असे. त्याचें घर कोणी दाखविले असतां महाराजांनी त्याच्यावर हल्ला केला नाहीं. त्यावेळीं ते असें म्हणाले कीं, हे पाद्री लोक पवित्र आचरणाचे असतात, त्यांस उपद्रव देणे बरोबर नाहीं. दुसरी गोष्ट अशी कीं, त्या शहरांत मोहनदास पारख या नांवाचा एक डच लोकांचा दलाल होता. हा चांगला नीतिमान असून मोठा धर्मशील होता. हा कांहीं वर्षांपूर्वी मरण पावला असून त्याचें कुटुंब मागें होतें. ह्याच्या घरी पुष्कळ संपत्ती आहे, असें लोकांनी महाराजांना सांगितलें; परंतु त्या सत्पुरुषाची कीर्ती महाराजांस विदित झाल्यामुळें त्यांनी त्याच्या घरास बिलकूल हात लाविला नाही.

ह्याप्रमाणें सुरत शहर लुटून झाल्यावर सगळी लूट धोकट्यांत भरून त्या घोड्यांवर लादून महाराज रायगडावर सुरक्षित येऊन पचले. त्यांस अटकाव करण्याचें धैर्य कोणाही मोगल सरदारास झालें नाहीं. ह्या मोहिमेत मिळालेल्या मालाचा हिशेब आकारून पाहता साडेआठ कोट होनांची रक्कम झाली असें म्हणतात. ह्या मोहिमेत मोगलांची व इतर सावकारांची पुष्कळ घोडी आणिलीं होतीं, त्यांच्या डाव्या टिरीवर चौकडीचे डाग देऊन खूण केली, व तेवढ्या घोड्यांची नवी पागा केली. सुरत शहर लुटून आल्यावर त्यांनी औरंगजेब बादशहास अशा आशयाचे पत्र पाठविलें कीं, ''तुझा मामा शास्ताखान याला मीं शासन केलें, तुझ्या सुरत शहराची सुरत बिघडून टाकिली. हिंदुस्थान हिंदूंचे आहे, त्याजवर तुझा हक्क नाहीं. दक्षिणेवरही तुझा हक्क नाहीं. ती निजामसरकाराची असून त्या सरकाराचा मी वजीर आहें.'' ह्या पत्रास त्या बादशाहाकडून काहीएक उत्तर आलें नाहीं. असे सांगतात कीं, इनायतखानाने महाराजांचा दग्याने खून करण्याचा घाट घालून एका इसमास सलोख्याचे बोलणे करण्याच्या मिषाने पाठवून त्यांचा खून करावयास सांगितलें. ह्या इसमाने महाराजांकडे जाऊन सुभेदाराकडच्या तहाच्या कांहीं अटी सांगितल्या. त्या ऐकून महाराज त्यास म्हणाले, ''तुझा धनी बायकासारखा किल्ल्यात लपून बसला आहे, त्याच्यासारख्या आम्ही बायका आहो काय कीं, त्याच्या असल्या अटी आम्ही मान्य कराव्या?'' त्यावर तो माणूस म्हणाला, ''आम्ही कांहीं बायका नाही.'' तुम्हांस आणखी कांहीं सांगावयाचे आहे असे बोलून तो लपवून आणलेला खंजीर चटकन् बाहेर काढून महाराजांच्या उरात खुपसावयाला धावला. त्याबरोबर महाराजांजवळ नागवी तरवार घेऊन एक शिलेदार उभा होता त्याने त्याचा तो खंजीर धरलेला हात छाटून टाकला. तरी तो आवेशाने पुढें सरसावला असल्याकारणाने त्याच्या बुटक्या हाताचा महाराजांवर असा जोराचा आघात झाला कीं, ते व तो असे दोघेहीं जमिनीवर पडले. त्या मारेकऱ्याला अर्थात् महाराजांच्या लोकांनी छाटून पुरा केला आणि त्या रागाच्या आवेशात ते कैद करून आणलेल्या लोकांची कत्तल करू लागलें. इतक्यांत महाराजांनी वर उठून त्यास त्या क्रूर कृत्यापासून परावृत्त केले.

महाराज सुरत शहर सोडून परत गेल्यावर सात-आठ दिवसांनी मोगलांचे सैन्य तेथे येऊन दाखल झाले. तोपर्यंत महाराज परत येतील या धाकाने शहरांतून पळून गेलेले लोक परत आले नव्हते. ते आता हळूहळू येऊ लागले. इनायतखान किल्ल्यात लपून राहिला होता तो शहरांत आला तेव्हा लोकांनीं त्याची छिथू केली व त्याला शेणमार केला. इंग्रज व्यापाऱ्यांनी ह्या वेळी चांगली मर्दुमकी दाखविल्यावरुन सर ऑक्झेन्डन याची सगळे लोक तारीफ करू लागले. असे सांगतात कीं, इंग्रज लोकांच्या धैर्यशालीपणामुळे त्यांच्या वखारीच्या आसपासचा शहराचा बराच भाग शिवाजीमहाराजांच्या हातून सुटला. मोगल सेनापती शहरांत आला तेव्हां सर ऑक्झेन्डन त्याच्या भेटीस गेला आणि त्याच्या पुढें आपल्या हातची बल ठेवून म्हणाला, ''मी हे माझ्या हातचे शस्त्र आतां खालीं ठेविले आहे. आता ह्या शहराचे रक्षण करणें तुमच्याकडे आहे!'' तो सेनापती त्याची वाखाणणी करून म्हणाला, ''तुम्हाला शिरपाव व घोडा देवून तुमच्या कमरेला तरवार बांधून तुमचे गौरव करणे मला उचित आहे.'' तो म्हणाला, 'हा जामानिमा योद्ध्याला उचित आहे. मी कांहीं योद्धा नव्हे, आम्ही व्यापारी आहों. आमच्या व्यापाराला सवलती तुमच्या बादशहाकडून मिळाव्या एवढीच आमची अपेक्षा आहे.' औरंगजेबाने सुरतेतील व्यापाऱ्यांचे हे असे भयंकर नुकसान झाले ह्याबद्दल

आपली सहानुभूती त्यांना सर्वाना आयात मालावर एक वर्षपर्यंत जकात माफ करून प्रकट केली आणि डच व इंग्रज व्यापाऱ्यांनी मर्दुमकी दाखविल्याबद्दल त्यांच्या मालावर एक टक्का जकात माफ केली.[१] ईस्ट इंडिया कंपनीच्या व्यवस्थापकांनी सर ऑक्झिंग्डन यास ह्या शौर्याच्या कामगिरीबद्दल एक सुवर्णपदक दिले.

सुरतेहून परत आल्यावर शहाजीराजे मरण पावल्याची अत्यंत शोकजनक वार्ता महाराजांस कळली. त्यामुळें त्यांचे कांही दिवस दुःखांत व पित्याचे और्ध्वदेहिक करण्यांत गेले. ह्या वेळीं महाराज सिंहगडावर होते. सर्व विधी आटोपल्यावर ते पुनः रायगडावर गेले, व तेथें राहून आपल्या एकंदर कारभाराची व निरनिराळ्या खात्याची सुव्यवस्था त्यांनी लाविली. शहाजीराजे वारल्यावर त्यांनीं आपल्या नावास राजे हा किताब जोडला व आपल्या नावाचे नाणे पाडलें.

ह्या वेळीं महाराज अंमळ स्वस्थ होते तरी त्यांच्या लोकांचा मोगलांच्या मुलखात सारखा धुमाकूळ सुरू होता. नेताजी पालकर आपल्या स्वारांनिशीं वर्षाचे आठ महिने मुलूखगिरी करून वर्षाकाळाच्या आरंभी पुष्कळ लूट घेऊन परत येत असे. महाराजांचे आरमारही स्वस्थ राहिलें नव्हतें. समुद्रांतून जाणारीं येणारी व्यापाऱ्याची तार्वे लुटून किंवा धरून आणण्याचा क्रम त्यांचा सर्व काळ चालू असे. मोगलांची जहाजे मक्केस जाणाऱ्या यात्रेकऱ्यांस घेऊन जात, तीं पकडून श्रीमंत यात्रेकरूंकडून तें दंड घेत असत. खुद्द महाराजांनी नंतर लवकरच अहमदनगरावर हल्ला करून तेथील पेठ लुटली व औरंगाबादेपर्यंतचा मुलूख पुनः लुटून उद्ध्वस्त केला. ह्याप्रमाणें महाराज इकडे गुंतले आहेत असें पाहून, पन्हाळ्यावर विजापूर सरकारचे दोन सरदार होते, त्यांनी महाराजांशी झालेला तह मोडून कोंकणपट्टी परत घेण्याचा मोठ्या जोराचा प्रयत्न केला. कित्येक ठाणीं त्यांनी सर केली. ही त्यांची धामधूम कानी येतांच महाराज अति वेगाने त्या प्रांतांत येऊन दाखल झाले. इतक्या लवकर ते त्या मुलखात येऊन पोचतील असें त्या सरदारास वाटलें नव्हतें. त्यांनी त्या सरदारांशी सामना करून त्यांचा पराभव केला, व त्यांच्या हजारों सैनिकांची कत्तल उडविलीं. जवळजवळ सहा हजार लोक ह्या युद्धांत समरभूमीवर पतन पावले. असा कारवार व विजापूर येथील इंग्रज व्यापाऱ्यांचा लेख आहे.[२] (नवेंबर सन १६६४).

विजापूरकरांच्या सरदारांचा वर सांगितल्याप्रमाणे पुरा पराभव करून ते पुन्हा सिंहगडावर लगबगीने आले. कारण जुन्नर येथे मोगलांच्या सैन्यांची छावणी होती. तेथें आणखी लोक औरंगाबादेहून रवाना होऊन ते महाराजांच्या ताब्यातील ठाण्यांवर हल्ले करण्याच्या तयारीत आहेत असे वर्तमान महाराजांच्या कानी आले होते. महाराज पुन्हा सिंहगडावर येऊन दाखल झाले असे पाहून मोगलांनी आपली हालचाल बंद केली.

ह्याप्रमाणें मोगल जागच्याजागीं स्वस्थ बसले असें पाहून महाराजांनी आपले कांहीं स्वार कृष्णानदीच्या दक्षिणेस विजापूरकरांच्या मुलखात लुटालूट करावयासाठी रवाना केले. असे सांगतात की, महाराजांच्या तीनशे घोडेस्वारांनी सन १६६४ सालच्या डिसेंबर महिन्यात हुबळी शहरावर घाला घालून ते यथेच्छ लुटले. शहरांतले लोक पळून गेले. मराठे शहर लुटून परत गेल्यावर कित्येक दिवस ते पुनः स्वस्थानी आले नाहींत. ह्या शहराची लूट करावयास

---

१ प्रो. सरकार पृ.११८. कोणी म्हणतात की औरंगजेबाने ह्या वेळी इंग्रजांच्या मालावर अडीच टक्के जकात माफ केली.

२ ह्या लढाईत महाराजांचा पराभव होऊन ते एका किल्ल्यात पळून गेले आणि तेथे त्यांस मुसलमान सरदारांनी घेरले असे इंग्रज व्यापारी म्हणतात; परंतु मराठी बखरकार म्हणतात कीं, महाराजांनी त्यांचा पराभव केला. बसातीन-इ-सलातिन नामक बखरींत या लढाईच्या संबंधाने असा उल्लेख आहे कीं, औरंगजेबाने महाराजांवर जयसिंगास पाठविण्याची तयारी करून अदिलशहाकडे वकील पाठवून त्याला शिवाजीवर दक्षिणेकडून स्वारी करावयास सांगितल्यावरून त्याने जयसिंग दक्षिणेत येऊन पोचण्यापूर्वीच खवासखानास मोठे सैन्य देऊन महाराजांवर पाठविले. तो आपणांवर चालून येत आहे असे कळताच महाराजांनी त्याला एका अडचणीच्या ठिकाणी गाठून अगदी जेर केले. ह्या युद्धात मुसलमानांचे तीन-चार सरदार पडले. हा असा आपला मोड होतो हे पाहून खवासखान जिवावर उदार होऊन, हाती तरवार घेऊन रणकंदणात घुसला. हे त्याचे धाडस पाहून त्याचे लोक त्याच्या मागून मराठ्यांवर तुटून पडले आणि महाराज पराभव पावून पळून गेले.

रुस्तमजमानाच्या[१] लोकांनी मराठ्यांस मदत केली असा इंग्रज व्यापाऱ्यांचा त्यावेळचा लेख आहे. हुबळीशिवाय आणखी बरीच शहरे महाराजांच्या लोकांनी लुटली. हा असा त्यांस तिकडून शह देऊन इकडून त्या सरकाराचीं बार्सिलोर वगैरे धनाढ्य शहरे स्वतः जाऊन लुटण्याचा बेत त्यांनी केला. बार्सिलोर शहरास जलमागनिं जाण्याचे ठरवून मालवणास सिंधुदुर्गपाशीं आपलें मोठे आरमार महाराजांनी सज्ज करावयास लाविलें.[२] हा आपला बेत अगदीं गुप्त ठेवण्यासाठी त्यांनी बाहेर अशी बातमी पसरविली कीं, मोगलांच्या जुन्नर येथील छावणीवर हल्ला करण्याच्या तयारीने आपण चाललो आहो. अशी गुलकावणी दाखवून ते एकाएकी मालवणास प्राप्त झाले आणि जहाजांत बसून गोव्यावरून बार्सिलोर शहरास गेले.[३] (फेबुवारी स. १६६५) त्या शहरापाशीं पोचून सूर्योदयाच्या सुमारास ते शहरांत शिरले. तेथले लोक अर्थात अगदीं बेसावध होते. समुद्रांतून कोणी शत्रू आपल्या शहरावर चालून येईल हें त्यांच्या ध्यानींमनींही नव्हतें. एक दिवस तेथें राहून त्यांनी सगळे शहर लुटून फस्त केलें. सुरत शहराप्रमाणेंच ह्या शहरांत पुष्कळ लूट मिळाली असें म्हणतात. लुटीचा एकंदर ऐवज दोनतीन कोटींचा होता.

हें शहर लुटल्यावर तेथून पुढें कूच करून कडवाल, सिद्धेश्वर, मिर्जान, अकोला, कोद्रे, हुमाऊद वगैरे ठिकाणे त्यांनी सर करून तेथें आपला अंमल बसविला. त्यांनी गोकर्ण महाबळेश्वर हस्तगत करून तेथल्या देवस्थानाचें दर्शन घेतलें व तेथें पुष्कळ दानधर्म केला. शिवाप्पा नाईक[४] नामेंकरून एक जहागीरदार बेदनूरप्रांतात स्वतंत्र होऊन बसला होता. त्याला तिकडे जाण्यापूर्वी महाराजांनी असा निरोप पाठविला होता कीं, तुम्ही आम्हांस प्रतिवर्षी कांहीं पेशखूश देऊं करून तुमचा वकील आमच्याकडे ठेवावा. ह्यास त्या मगरूर राजाने असा जबाब दिला होता कीं, 'आम्हाकडून पेशखूश घेण्याची असल्यास ते येऊन घ्या!' हा उद्दामपणाचा जबाब महाराजांस सहन झाला नाही. पुढें तिकडील प्रांतांत वर सांगितल्याप्रमाणें स्वारी करून एकएक ठाणे ते सर करीत चालले, तेव्हां तो नाईक अगदी घाबरून गेला. त्यानें आपला वकील तत्काळ महाराजांकडे पाठविला. त्याच्याबरोबर त्यांस मोठा उंची पोषाख व एक लाख रुपयांचे जवाहीर त्यानें नजर पाठविलें. ह्याप्रमाणें अतिशयित नम्रता व स्नेहभाव दाखवून तो स्वत: महाराजांच्या भेटीस आला, आणि त्यानें त्यांच्यापाशी असा करार केला कीं, आपण दरसाल तीस लक्ष रुपये खंडणीदाखल देत जाऊं. ह्या त्याच्या कराराने व नम्रतेने महाराज खूष झाले, व त्यास अभय देऊन त्यांनी त्याच्यापाशी उमाजीपंतास वकील म्हणून ठेविले. ह्या वेळीं सोमराणीचें ठाणे एका जमेदाराच्या हवाली होतें तें त्यांने महाराजांच्या स्वाधीन केलें.

गोकर्णास आल्यावर महाराजांनी फक्त बारा जहाजे ठेवून बाकीचे आरमार परत पाठविलें व चार हजार लोकांसह पुढें कूच करून आणखी कित्येक व्यापाराची शहरे लुटून ते कारवारास आलें. ते तिकडे येत आहेत असें ऐकून तेथल्या इंग्रज व्यापाऱ्यांनीं आपली सगळी रोकड व इतर वाहून नेण्यासारखीं चीजवस्तू तेथल्या नदीत मस्कतच्या इमामाचे लहानसे गलबत होतें त्यांत नेऊन भरली, आणि आपणही त्यात जाऊन राहिलें. त्या शहरात त्या वेळीं शेरखान आपल्या पाचशे लोकांसह अवचित आला होता. त्यानें महाराजांस सांगून पाठविलें कीं, 'तुम्ही शहरात प्रवेश करावयास याल तर आम्ही त्याचें रक्षण करण्यास बिलकूल कसूर करणार नाहीं.' महाराजांनी काळा नदीच्या मुखाशी आपल्या सैन्याचा तळ देऊन शेरखानास असा निरोप पाठविला कीं, 'इंग्रज लोक आमचे कट्टे दुष्मन आहेत. त्यांचा मला सूड घ्यावयाचा आहे.' शेरखानानें हा त्यांचा निरोप इंग्रज व्यापाऱ्यांस कळविला तेव्हां त्यांनीं असें सांगून

---

१ मागल्या भागांत सांगिल्याप्रमाणें रुस्तमजमान याने मोगलांस भूलथाप देऊन नेताजी पालकरास त्यांच्या तावडीतून सोडविले; ह्या त्याच्या गुन्ह्यास्तव अदिलशहानें त्याला आपल्या नोकरीतून दूर केलें होतें.

२ ह्या वेळी त्यांनी ८५ साधारण जहाजे व तीन मोठी जहाजे सज्ज करविली असे म्हणतात. (प्रो. सरकार, पृ.३०८)

३ ह्या शहराचे नांव कांहीं बखरींत बसनूर असें आहे. शि. दि. यांत त्याचें नांव हरहसनूर असें आहें. रायरीच्या बखरीत नुसते हसनूर असें आहे. प्रो. सरकार याचे नांव वसरूर असें देतात.

४ पारसी बखरींत याचे नाव भद्राप्पा असे दिले आहे. ह्या राजास स. १६६३ त अदिलशहानें आपला अंकित केलें असून तो त्याच वर्षी मरण पावला असे इंग्रज व्यापाऱ्यांच्या लेखावरून दिसून येते; परंतु तो सन १६७० त मृत्यू पावला असा इतरत्र उल्लेख आहे.

पाठविलें कीं, आमच्याकडून तुम्हास द्रव्याच्या ऐवजी दारूगोळ्यांची बिदागी मिळेल. हें ऐकून महाराज पराकाष्ठेचे संतापले आणि त्यांनीं इंग्रजास पकडल्यावांचून जावयाचे नाहीं असा निश्चय केला. हा त्यांचा बेत ऐकून शेरखानानें कारवारच्या सगळ्या व्यापाऱ्यांकडून कांहीं द्रव्य घेऊन व इंग्रजांकडून एकशे बारा पौंड घेऊन ते महाराजांस दिलें. ते हातीं पडल्यावर तें तेथून निघून गेले. कारवाराजवळ असतां जयसिंग दक्षिणेत येऊन आपल्या मुलखावर स्वारी करण्याच्या बेतात आहे, असें वर्तमान महाराजांच्या कानी पडताच ते वर सांगितल्याप्रमाणें कारवारच्या व्यापाऱ्यांकडून जें कांहीं द्रव्य मिळाले तेवढ्याने समाधान मानून ते स्वराज्यांत परत जावयास निघाले. त्यांनी आपलें सारे लष्कर खुष्कीच्या मार्गानें रवाना केले व आपण स्वतः एका मोठ्या पालांत बसून जलमार्गानें निघाले. मनांत असे आले कीं, अनुकूल वारा लागल्यास कोकणच्या किनाऱ्यावर लवकर जाऊन पोहचत येऊन तिकडे शिद्दीची हालचाल काय आहे तें लागलीच कळेल; परंतु वारा प्रतिकूल लागून जहाजे चालतनाशी झाली. त्यामुळें त्यांस बरेच दिवस पाण्यांत खोळंबून रहावे लागलें. अशा रीतीनें अफाट समुद्रांत रखडत राहिल्यानें आपल्या राज्यांतील हालहवाल व शत्रूची हालचाल कांहींएक कळतनाशी होते हें कांहीं ठीक नव्हे, असा विचार करून महाराज पुनः कधीं आरमार घेऊन जलमार्गानं मोहिमेस गेले नाहींत. कारण उघडच आहे कीं, ज्या पुरुषास क्षणभर स्वस्थ बसवत नसे व प्रत्येक दिवशी हेरांच्या व वार्तिकांच्या द्वारे चोहोंकडची माहिती कळल्यावांचून चैन पडत नसे, त्यास दिवसांचे दिवस पाण्यांत डुंबत राहून जमिनीवरील माहिती मुळींच कळण्याचा मार्ग नसावा हें कसें आवडेल.[१]

***

१ ह्या त्यांच्या पराक्रमाचे वर्णन करिताना इंग्रज व्यापाऱ्यांना महाराजांच्या रणवेगाचा अत्यंत अचंबा वाटून ते असे लिहितात की, शिवाजीमहाराजांचा देह वायुरूप असून त्याला पंख असावें असें ज्याला त्याला वाटू लागले आहे. कारण ते कोणत्या वेळी कोठे प्रगट होतील याचा काहींच नेम नाही. ते आज एका जागी आहेत तर उद्या दूर कोठे गेल्याची बातमी येते. ज्या ठिकाणी कडोकोट बंदोबस्त असतो, त्यावर हल्ला करून आपल्या लोकांची खराबी करावयास ते कधीही उद्युक्त होत नाहीत. ज्या शहरास व गावास तटबंदी वगैरे कांहीं नाही व जेथे लष्करी बंदोबस्त वगैरे फारसा नाही अशाच ठिकाणांवर हल्ला करून ती लुटतात. त्यांच्या ठायी उद्योगशीलता, श्रमसहिष्णुता, जोम व चपलता ही विलक्षण लक्षणे आहेत असे जो तो बोलत असतो. (प्रो. सरकार पृष्ठ ११९). दक्षिण कोंकण, उत्तर कानडा प्रांतातील त्यांच्या मोहिमांसंबंधानें ह्या इंग्रज व्यापाऱ्यांनी आणखी असें लिहून ठेवले आहे कीं, दक्षिणेत व सगळ्या दक्षिण किनाऱ्यावरील प्रांतांत सारख्या लढाया सुरू आहेत. येथले राजे परस्परांशी सारखे भांडत आहेत. शिवाजीचा जिकडे-तिकडे विजय होत आहे. त्याला आवरण्याचा आवाका कोणालाही नाही. त्याचा सगळ्या लहान-मोठ्या राजांना पराकाष्ठेचा धाक वाटत आहे (प्रो. सरकार ३०६).

भाग अठरावा

मिर्झाराजा जयसिंग यांची स्वारी (१६६५-६६)

दक्षिणेकडील मोहिमेवर असतां जयपूरचा मिर्झाराजा जयसिंग व दिलेरखान अशा दोन सरदारांस बरोबर मोठें सैन्य आणि युद्धोपयोगी सामान व सरंजाम मुबलक देऊन औरंगजेबानें आपलें पारिपत्य करण्यास रवाना केल्याचें कळताच महाराज मोठ्या त्वरेने रायगडावर येऊन दाखल झाले. शास्ताखानाचा मोड होऊन तो परत गेल्यावर व यशवंतसिंग हतपराक्रम होऊन जागच्या जागी स्वस्थ बसल्यावर महाराजांवर औरंगजेब अतिशयित रुष्ट झाला असून त्यांचा नाश करण्याचा पुनः प्रयत्न करण्याचें त्यानें इतकें लांबणीवर टाकिलें याचे मुख्य कारण असे होतें कीं, त्याला ह्या वेळीं स्वतःचीच सुरक्षितता वाटत नव्हती. त्यानें आपल्या बापास कैदेत टाकून व भावांस खडे चारून गादी बळकाविली असल्याकारणानें त्याच्यावर केव्हा कोणता प्रसंग येईल याचा नेम नव्हता. मोअझीम यास दक्षिणेंतील सुभ्यावर त्यानें पाठविण्याचें त्यानें ठरविलें होतें पण त्याच्या हवाली मोठी फौज करून त्यास शिवाजीमहाराजांबरोबर युद्ध करावयास सांगावे तर तो काय करील याचा नेम नव्हता. कारण असें आपण आपल्या बापाशी वर्तन केलें तसेंच आपला मुलगा आपल्याशीं करण्यास चुकणार नाहीं अशी औरंगजेबाला नेहमी भीती असे. यास्तव त्यानें असा बेत केला होता कीं, उत्तरेकडे एकंदर स्थिरस्थावर झाल्यावर व आपली सत्ता निर्वेधपणें स्थापित झाल्यावर दक्षिणेवर आपण स्वतः मोठ्या सैन्यानिशीं स्वारी करून शिवाजीमहाराजांचा व विजापूरच्या अदिलशाहीचा एकदम नाश करून टाकावयाचा. शिवाजीमहाराजांनी शास्ताखानाला अवचित गाठून घाबरा केला तरी त्यात त्यांनीं कांहीं पुरुषार्थ केला नाहीं, विजापूरकरास तें भारी झाले होते तें तरी त्या सरकारच्या दुर्बलतेमुळे संभविले. खरें म्हटलें असतां ते आपल्यापुढे केवळ कःपदार्थ आहेत; त्यांना चिरडून टाकण्यास उशीर लागणार नाही असें औरंगजेबाला वाटत होते. तो महाराजांना 'पहाडका चुवा' म्हणत असे. महाराजांच्या वास्तविक सामर्थ्याची ही अशी कल्पना औरंगजेबाच्या मनात बरेच दिवस वागत होती.

महाराजांनी मोगलांच्या मुलखात सारखा धुमाकूळ उडवून देऊन बरीच ठाणी सर केली, सुरत शहर लुटले, आपल्या नावास राजा हें पद जोडून आपल्या नावाचे नाणे पाडलें, इत्यादी गोष्टींनी औरंगजेबास त्यांचा विशेषच राग आला होता. त्यांत त्यांनी आरमार तयार करून मक्केस जाणाऱ्या मोगल व मुसलमान यात्रेकरूंची जहाजे पकडून लुटण्याचा धुमधडाका चालविला. तेव्हां आपल्या धर्माविरुद्ध अशीं आगळीक करणाऱ्या काफराचा एकदम नाश करून टाकावा असा निश्चय करून त्यानें वर सांगितल्याप्रमाणें मिर्झाराजा जयसिंग व दिलेरखान यांस बरोबर मोठी फौज देऊन रवाना केलें.[१] आता हे असे दोन सरदार पाठविण्यांत औरंगजेबाचा मतलब अर्थात असा होता कीं, त्यापैकीं एक कोणी फितूर झाला तर दुसरा तरी आपल्याशी इमानाने वागेल. कारण शिवाजीमहाराज शत्रूच्या सरदारांस फितूर करण्याच्या कलेत मोठे प्रवीण होते हें त्याला कळून आलें होतें. दिलेरखानास औरंगजेबानें असा कानमंत्र दिला होता कीं, जयसिंग

१ ह्या सरदारांबरोबर आणखी दाऊदखान, राजा रायसिंग, राजा सुजनसिंग बुंदेल, किरतसिंग (हा जयसिंगाचा मुलगा), मुल्ला याहियन वैती (पूर्वीचा विजापूरकरांचा सरदार) वगैरे इतर सरदार होते असे प्रो. सरकार म्हणतात. (पृ. १२०)

हिंदू असल्याकारणानें तो शिवाजीमहाराजांशी मिलाफी होऊन कांही फितवाफितवी करील तर ती त्यास करूं देऊं नको! सावध राहून बारीक बातमी ठेव व दगा खाऊ नको.' खरें म्हटलें असतां ह्या दोन्ही सरदारांवर औरंगजेबाचा इतबार नव्हता; परंतु तूर्त दक्षिणेंतील शत्रूस कमकुवत करण्याच्या कामी त्यांचा उपयोग होईल असें समजून त्यांस त्यानें रवाना केलें होतें.

ह्या कामी अदिलशहाची मदत मिळावी ह्या इराद्याने औरंगजेबानें एका वकिलासमागमें त्या सरकारास पुढील आशयाचे पत्र पाठविलें : ''शिवाजी फार दंगा करून फंदफितूर व बंड करीत आहे, मुसलमानांस फार पीडा देत आहे, व सर्व रयतेस अत्यंत दुःख देऊन उपद्रव करण्यास मागेपुढे पाहात नाही. याकरिता त्याचें पारिपत्य करण्याविषयी ढिलाई करून चालढकल केल्यास मुसलमानी राज्य बुडून जाईल. याकरिता सर्व मुसलमानांत व आम्हा उभयता मुसलमान बादशहास ह्या सर्व फंदफितुरीचे व बंडाचे मूळ कारण जो शिवाजी त्याचा सख्य नाश करून गोरगरीब रयतेस त्याच्या जाचातून सोडविणे प्राप्त आहे. याविषयी यत्न करण्यास यत्किंचितही आळस करून उपयोग नाही. यास्तव आमची मनिषा अशी आहे कीं, इकडून त्या खराब शिवाजीच्या पारिपत्यावर मोठे शूर योद्धे व शिपाई रवाना होत आहेत, असेच आपणांकडूनही रवाना व्हावे आणि उभयतांनी त्या शिवरूपी सर्पाचे मस्तक फोडून त्याच्या गैररहा वागणुकीचा सूड घ्यावा. या सर्व फंदफितुरीचा काटा मार्गातून उपटून काढावा. असे केल्याशिवाय तो कधीही वठणीस यावयाचा नाही आणि हा जबरदस्त उपद्रव देऊ पाहणारा कांटा फार बळावला नाही तोच काढून टाकल्याशिवाय स्वस्थता प्राप्त होणार नाही. हे आपणांस पसंत पडल्यास आपण व आम्ही ह्या उभयतां बादशहांमध्ये साफी व मित्रता राहील; कांही एक कपट किंवा वैर राहणार नाही.''[१] हा औरंगजेबाचा निरोप पसंत वाटून अदिलशहाने मदत करण्याचे वचन दिले व त्याने खवासखानाला महाराजांवर जंगी फौजेनिशी पाठविले. ह्या सरदारास महाराजांनी बिकट ठिकाणी गाठून त्यांशी मोठ्या निकराचा सामना केला व त्याचा पराभव करून त्यास विजापुराकडे पिटाळून लाविलें, हे मागल्या भागात सांगितले आहे.

मिर्झाराजा जयसिंग व दिलेरखान यांस दक्षिणेत पाठविलें तेव्हां मोअझिम व यशवंतसिंग यांस दिल्लीस परत जावे लागलें. त्यांस परत बोलाविण्याचें कारण अर्थात असें होतें कीं, त्यांच्या हातून कांहींच पराक्रम झाला नव्हता; शिवाजीमहाराजांस दाबांत ठेवण्याचा वकूब त्यांच्यांत मुळींच नव्हता व ते कदाचित् शिवाजीमहाराजांशी मिलाफी होऊन त्यांस हवा तसा धुडगूस घालू देत असावे, असाही वहीम त्या बादशहास आला असावा. ह्या नवीन पाठविलेल्या सरदारांस औरंगाबादेचा सुभा सांगून मुख्य दोन कामगिऱ्या सांगितल्या होत्या. एक अशी कीं, त्यांनी शिवाजीमहाराजांचा नायनाट करावा व दुसरी अशी कीं, विजापूर सरकारकडून खंडणी वेळच्या वेळीं पोचत नसे ती त्यांच्याकडून वसूल करावी व त्यांनीं पुनः मोगलांशी विरोध प्रकट केला होता, यास्तव शिवाजीमहाराजांचा समाचार घेतल्यावर त्या सरकाराचे पारिपत्य करावे.

जयसिंग मोठ्या जय्यत फौजेनिशी महाराजांचे पारिपत्य करावयास दक्षिणेत मोठ्या उत्साहाने आला खरा; परंतु महाराजांचे पराक्रम त्याच्या कानी वेळोवेळी गेले होते आणि त्यांची युक्तिमत्ता, साहस, शौर्य व धमक अप्रतिम असून त्यांच्या पदरचे लोक हातावर शिर घेऊन लढण्यास सर्वदा तयार असत, हे त्यांस चांगले कळून आले होते. अशा प्रतापशाली पुरुषाशी सामना करण्याचें काम काहीं सोपे नव्हते हे तो जाणून होता. यास्तव आपली मोहीम कशी यशस्वी करावी या चिंतेत तो रात्रंदिवस पडला होता असे त्यावेळी त्याने औरंगजेबास पाठविलेल्या पत्रावरून दिसून येते. त्याने ह्या वेळी महाराजांच्या सगळ्या शत्रूंस उठवून त्यांच्यावर चोहोंकडून एकदम गिल्ला करविण्याचे योजिले त्याने विजापूरकरांस असे आमिष दाखविले कीं, ते शिवाजीमहाराजांवर दक्षिणेकडून फौज पाठवून त्यांस हैराण करितील तर त्या सरकाराला मोगल बादशाहला जी खंडणी प्रतिवर्षी द्यावी लागत असे ती बरीच कमी करण्यात येईल. शिवाय बादशाहची त्या

१ मोडककृत अदिलशाहीचा इतिहास, पृ. २१२.

सरकारावरची वक्रदृष्टी नाहीशी होईल. त्याने फ्रान्सिस व डिक अशा दोन युरोपियन गृहस्थांच्या हाती युरोपियन व्यापाऱ्यांच्या पश्चिम किनाऱ्यावरील निरनिराळ्या ठाण्यांच्या प्रमुखांस अशी पत्रे पाठविली कीं, शिवाजीच्या पारिपत्यासाठी बादशाही फौज दक्षिणेत आली आहे तिला तुम्ही मदत करावी. शिवाजीने आरमार तयार करून पश्चिम किनारा सगळा काबीज करण्याचा क्रम चालविला आहे, तरी त्याच्या आरमारास साधेल तेवढा शह द्यावा. असेच पत्र त्याने जंजिऱ्याच्या शिद्दीला लिहिले आणि औरंगजेबास असे लिहून कळविले कीं, गुजरातेकडून बादशाही आरमार दक्षिणेकडे येऊन शिवाजीच्या आरमारावर हल्ला करावयाची ही संधी उत्तम आहे. दक्षिणेतील ज्या-ज्या मराठे सरदारांशी व राजांशी महाराजांनी विरोध केला होता, त्यांस महाराजांवर उठविण्यासाठी जयसिंगाने कांहीं ब्राह्मण वकील चोहींकडे पाठविले. त्याने कर्नाटकातल्या जहागिरदारांस व राजांसही पत्रे पाठवून बादशाही फौजेस येऊन मिळावे व विजापूरकरांस व शिवाजीमहाराजांस शह द्यावा असे सांगितले. ह्या त्यांच्या पत्रावरून बेदनूरचा शिवा नाईक व बसवनपट्टणचा जहागिरदार हे आपल्या लोकांनिशी जयसिंगाच्या मदतीस गेले. जव्हारच्या राजांनी जयसिंगाकडे आपला वकील पाठवून बादशहाची मोहीम यशस्वी होण्यासाठी मदत करण्याचे अभिवचन दिले. त्यावरून जयसिंगाने त्या राजांना असे सांगून पाठविले कीं, तुम्ही आपल्या भावाबरोबर किंवा मुलाबरोबर आपले लोक देऊन इकडे पाठवावे म्हणजेच तुम्हास बादशाहाकडून मोठी मनसब देववितों. जावळीच्या मोऱ्याचे दोघे मुलगे बाजी आणि अंबाजी यांनी जयसिंगाकडे एक ब्राह्मण पाठवून असे कळविले कीं, आम्हांस द्रव्यांचे साहाय्य देऊन मोंगलांच्या छावणीपर्यंत सुरक्षितपणे न्याल तर तुमच्या लष्करात नोकरीस राहण्याची आमची तयारी आहे, त्याप्रमाणे त्यांस जयसिंगाने आपल्याकडे आणविलें. त्यांच्याबरोबर आणखी माणकोजी धनगर गेला. अफझुलखानाचा मुलगा फाजलखान आपल्या बापाच्या मृत्यूबद्दल शिवाजीमहाराजांचा सूड उगविण्यास एकसारखा पाहत होता, तो जयसिंगास जाऊन मिळाला. कल्याणप्रांताच्या उत्तरेस कित्येक कोळी राजे होते, ते जयसिंगाच्या तोफखान्यावर एक युरोपियन होता त्याच्या मध्यस्थीने मोगलांस जाऊन मिळाले. जयसिंगाने महाराजांच्या पदरच्याही कांहीं अंमलदारांस द्रव्याची व मोठ्या हुद्याची लालूच दाखवून फितविण्याची खटपट केली. तीमुळें पुरंदर किल्ल्यापाशी महाराजांचे तीन हजार घोडदळ होते. त्यावरील अंमलदार आत्माजी व कहर कोळी यांनी जयसिंगाकडे आपला माणूस पाठवून महाराजांस सोडून मोगलांकडे येण्याची आपली तयारी आहे असे कळविले. सुपें परगण्याच्या मूळच्या जहागिरदाराचे दोन वंशज राम व हनुमंत हे चांदाच्या राजाचे सरदार होते त्यांना तिकडील मुलखाची चांगली माहिती असल्याकारणाने जयसिंगाने त्यांस आपल्याकडे बोलावून घेतले. ब्राह्मण हेर पाठवून महाराजांच्या संबंधाने ज्यांच्या मनात द्वेष किंवा मत्सर होता त्या सर्वांस वर सांगितल्याप्रमाणे जयसिंगाने आपल्या पक्षाचे करून घेतले.[१]

हे दोघे सरदार स. १६६५ च्या फेब्रुवारी महिन्यात दिल्लीहून निघून नर्मदा नदी उतरून अलीकडे आले. महाराजांस त्यांच्या स्वारीची खबर मिळताच परत लवकर यावयास मिळावे ह्या हेतूनें ते जलमार्गाने येत असतां त्यांचा प्रतिकूल वाऱ्यामुळे कसा खोळंबा झाला ते मागल्या भागात सांगितले आहे. ह्या मोगल सरदारांनी प्रथम औरंगाबादेस जाऊन सुभ्याची व्यवस्था लावली व नंतर ते महाराजाच्या मुलखात शिरले. जयसिंगाने सासवडास आपल्या सैन्याची छावणी केली. कारण हे ठिकाण महाराजांच्या ताब्यांतल्या मुख्यमुख्य किल्ल्यांच्या व प्रांतांच्या बहुतेक मध्यभागी असून तेथून हव्या त्या दिशेस आपले लोक सहज पाठविता येतील असे त्याला आढळून आले होते. शिवाय येथून विजापूरकरांच्या मुलखावर स्वारी करावयास सोपे असून तिकडून महाराजांना साहाय्य आलें असता त्यांस अटकाव करितां येण्याजोगा होता. सासवडास सैन्याचा तळ देऊन त्याने पुरंदर किल्ला काबीज करण्याचा बेत केला. त्याने पुण्यास बरेच लोक ठेवून दिले. लोहगडासमोर त्याने ठाणे करून तेथें तीन हजार लोक ठेवून त्यांस तिकडून महाराजांचे लोक येऊ देऊं नये

---

१ हा मजकूर प्रो. सरकार यांच्या ग्रंथातून घेतला आहे. जयसिंगाने औरंगजेबास छावणीतून वेळोवेळी पाठविलेल्या पत्रांच्या आधाराने हा त्यांनी आपल्या ग्रंथात नमूद केला आहे, पृ. १२५, १२६ व १२७.

किंवा जुन्नराकडे त्यांस जाऊ देऊं नये असे सांगितले. कुतुबखान याच्या हाताखाली सात हजार घोडदळ देऊन पैनघाटापासून जुन्नरापर्यंतचा रस्ता राखावयास ठेविले. तळेगावाच्या रस्त्याने मराठ्यांनी मोगली अंमलांतल्या मुलखावर हल्ला करू नये म्हणून तिकडेही त्याने जागोजाग ठाणी केली. पुणे व आसपासचा प्रांत महाराजांच्या हाती जाऊ नये म्हणून इतिशामखानाला त्याने चार हजार घोडेस्वारांनिशीं पुण्यास ठेविले. लोहगड व पुणे यांच्यादरम्यान दोन हजार घोडदळ त्याने ठेवून दिले. शिरवळच्या ठाण्यावर तीन हजार घोडदळ ठेवून दक्षिणेकडून पुरंदर किल्ल्यास कुमक पोचू न देण्याची व्यवस्था त्यानें केली. ही कामगिरी सय्यद अब्दूल अझिज यास सांगितली असून त्याच्याबरोबर बाजीचंद्र मोरे, आबाजी गोविंदराव व माणकोजी धनगर हे होते. सुपे येथें मजबूत ठाणे करून पुष्कळ लोक त्याने ठेवून दिले. ह्याप्रमाणे चोहोंकडून कडेकोट बंदोबस्त करून जयसिंग ता. १४ मार्च सन १६६५ रोजी पुण्याहून निघाला. सासवडाजवळ आल्यावर त्याने दिलेरखानास तोफा वगैरे सामुग्री देऊन पुरंदराकडे पाठविले आणि पुणे व सासवड यांच्या दरम्यान कांही लोक ठेवून दिले. दिलेरखान पुरंदराजवळ आला तेव्हां महाराजाच्या कांहीं लोकांनी त्याच्यावर हल्ला केला, पण त्यांचे कांहीं एक चालले नाही. पुरंदरापाशी पोचल्यावर जयसिंगाने त्याच्या मदतीस आणखीन तीन हजार लोक व वेढा घालण्यास लागणारी सामुग्री रवाना केली आणि आपल्या जवळच्या सैन्याचा तळ सासवड व पुरंदर यांच्या दरम्यान देऊन स्वत: सिंहगडास वेढा घातला. शिवाय त्याने सहा-सात हजार स्वार राजगड, सिंहगड, रोहिडा वगैरे किल्ल्याच्या आसपासचा सगळा प्रांत लुटून, जाळून पोळून बेचिराख करण्यासाठी पाठविले. त्यांनी शेकडो गांव लुटून जाळून उद्ध्वस्त केलें. हजारों गुरे व शेतकरी धरून आणण्याचा सपाटा त्यांनी सुरू केला. ह्या कामगिरीवर जयसिंगाने दाऊदखान वगैरे सरदारांस[१] नेमिलें. ह्या टोळ्यांच्या व महाराजांच्या लोकांच्या दररोज चकमकी झडू लागल्या. त्यापैकी चिंचवडाजवळ झालेल्या एका चकमकीचे थोडेसे विशेष वर्णन यवनी बखरींत आढळते. महाराजांचे पाचशे घोडेस्वार व एक हजार पायदळ लोहगडाकडून पुण्याकडे चालून येत आहे असे कळताच जयसिंगाने त्यांवर दोन सरदार मोठे सैन्य देऊन पाठवून त्यांचा मोड केला.[२]

इकडे महाराज किनाऱ्यास लागून तत्काळ रायगडावर येऊन पोहचले, व प्राप्त झालेल्या प्रबल शत्रूशी कोणत्या रीतीनें सामना करावा या विषयीं मसलत करण्यासाठी त्यांनी आपल्या मुख्यमुख्य सरदारांस रायगडावर बोलाविले. ह्या वेळी नेताजी पालकरावर महाराजांची इतराजी झाली. कारण शत्रू आपल्या मुलखात चालून आला तेव्हां त्याच्यावर नजर ठेवून त्यास साधेल तेवढा त्रास द्यावा हें त्याचें काम असता तो आपल्या स्वारांसह लांबच्या प्रांतांत निघून गेला होता. कोणी म्हणतात कीं, त्यास जयसिंगाने अवदानें चारल्यावरून त्यानें आपल्या कामाची अशी हेळसांड[३] केली. महाराजांनी त्याला तत्काळ परत येण्याविषयी हुकूम पाठविला. तरी तो लागलीच परत आला नाहीं. त्यामुळें महाराजांस त्याचा अतिशयित राग येऊन त्यांनी त्याचा सर नौबताचा हुद्दा कमी केला व तो कर्तोजी गुजर यास दिला.[४] ह्या गुजरास प्रतापराव गुजर असें पुढें नांव दिलें. ह्या सरदाराने ह्या वेळीं फारच चपळाई दाखविली. त्यानें शत्रूच्या सैन्याची रसद बंद करून त्यास दाणावैरण मिळेनाशी केली व त्याच्या हालचालींवर पुरी नजर ठेवून त्या संबंधाची एकंदर बातमी महाराजांस एकसारखी पोचविण्याची व्यवस्था केली.

---

१ हे सरदार शिवाजीमहाराजांस अनुकूल झाल्याचा वहीम ह्या वेळीं आला होता. कारण त्यांनी महाराजांच्या लोकांच्या हालचालींवर करडी नजर न ठेवल्यामुळे त्यांस पुरंदर किल्ल्यावर कुमक वगैरे पोचती करावयास व मोगल सैन्यावर हल्ले करावयास चांगले फावले होते. शिवाय कुतुबखान वारंवार असें म्हणें की, पुरंदर किल्ला घेण्याच्या नादास लागू नये, कारण तो केवळ अभेद्य आहे. आपल्या सैन्याची मात्र व्यर्थ खराबी होणार. (प्रो. सरकार, पृ. १३९)

२ हा सगळा मजकूर प्रो. सरकाराच्या पुस्तकावरून घेतला आहे.

३ यवनी बखरींवरून असे दिसते की, नेताजी पालकराने मोगलांच्या सैन्यावर वारंवार छापे घालून तीस बरेच हैराण केली होती. एप्रिल महिन्यात त्याने परेंड्याच्या किल्ल्यावर हल्ला केला असता मोगल सैन्यानी त्यास पिटाळून लाविलें होते.

४ सभासद म्हणतो की, पन्हाळा किल्ल्यास शिद्दी जोहारानें वेढा दिला त्या वेळी गड नवाच हातीं आला असल्यामुळें त्यावर सामुग्री वगैरे ठेवून त्याची मजबुती करण्यास अवकाश झाला नव्हता. यास्तव नेताजी पालकरास लष्कर घेऊन उपराळ्यास यावें असा महाराजांनी हुकूम पाठविला; पण तो दूर गेल्यामुळे वेळेवर आला नाहीं म्हणून त्याचा हुद्दा कमी केला.

जयसिंगाबरोबर ऐंशी हजार फौज असून तींत चांगले कडवे व कसलेले शिपाई पुष्कळ होते. त्यांची व्यवस्था फारच नामी होती व तो मोठा हुशार योद्धा व सेनापती असल्याकारणानें त्याच्या हातून गाफिलगिरी किंवा गैदीपणा मुळींच होण्यासारखा नव्हता. शिवाय त्याने महाराजांच्या सगळ्या शत्रूंस उठविले होते. त्यानें महाराष्ट्रांत प्रवेश करितांच एकदम दोन किल्ल्यांस गराडा घातला आणि चोहीकडून ठाणेबंदी करून प्रत्येक ठाण्यावर मोठेमोठ्या सरदारांस मोठी फौज देऊन ठेवले. युद्ध मोठ्या जोमाने व आवेशाने करून बादशाहाकडून बहादुरी मिळविण्याचा त्याचा पूर्ण निर्धार दिसला. अशा बलाढ्य, शूर व फौजबंद सरदारांशी सामना करून आपला निभाव लागेल कीं नाहीं हा विचार महाराजांस प्राप्त झाला. अफझुलखान व शास्ताखान ह्या सरदारांस हरहुन्नरें नामोहरम केलें, तसा कांहीं प्रकार ह्या मोगलसरदारांसंबंधानें करणें शक्य नव्हतें. कारण ते आपणांवर कोणत्याही प्रकारे विश्वास ठेवणार नाहींत हें महाराजांस पक्के माहीत होतें. जयसिंगासारख्या चाणाक्ष, दक्ष व युद्धकर्मांत कसलेल्या वीरापुढें आपला काहीएक हुन्नर चालणार नाही अशी महाराजांची पूर्ण खात्री होती.[१] बरें, त्यास स्वधर्म व स्वदेशस्वातंत्र्य ह्यासंबंधानें बोलून फितविण्याचा प्रयत्न करावा तर दिलेरखान त्याच्याबरोबर आहे, तो आपली फंदफितुर कांहींच चालू देणार नाहीं, असा महाराजांस चोहोकडून पेंच येऊन पडला. पदरच्या लोकांची मसलत घेतली त्यांचेही असेच उदासीनतेचे विचार निघाले. पुढें काय करावे अशा विचारांत महाराज अगदी मग्न असतां त्यांच्या अंगांत देवी संचारली व तिने असें सांगितलें कीं, ''अरे बाळा, ह्या वेळी प्रसंग मोठा दुर्धर आहे. जयसिंगराजाचा पराभव तुझ्या हातून होत नाही. त्यास तुला भेटावे लागेल. दिल्लीस बादशहाचे भेटीस जावे लागेल. तेथें कठीण प्रसंग प्राप्त होईल; पण मी तुजसमागमें संरक्षणास येतें. तुला संकटांतून सोडवून पुनः स्वराज्यास घेऊन येतें; राजा, तुला विजयी करीन. याविषयी तूं अणुमात्र चिंता करूं नकोस.'' ही सगळी वाक्यें चिटणीस व वाकनीस यांनी लिहून ठेविली, व महाराज सावध झाल्यावर त्यांना वाचून दाखविली. तीं ऐकू त्यांस मोठे समाधान वाटलें.

वर सांगितल्याप्रमाणें जयसिंग सिंहगड व पुरंदर ह्या किल्ल्यांस वेढा दिल्यावर त्या किल्ल्यांच्या दरम्यान आपल्या सैन्याचा तळ देऊन राहिला होता. त्याला महाराजांचे येथपर्यंतचे सर्व कर्तृत्व महशूर होतें. स्वधर्मरक्षण व स्वराज्यस्थापना यांप्रीत्यर्थ ते अहर्निश उद्योग करीत आहेत, तो चांगला आहे असें त्यास वाटत असे. अशा पवित्र कार्यास उद्युक्त झालेल्या तेजस्वी पुरुषाशी युद्ध करून आपणांस जय मिळेल अशी त्याला खात्री नव्हती. कारण त्याच्या सद्हेतूच्या सिद्ध्यर्थ कायावाचामनेंकरून झटणारी माणसे त्याच्या पदरी असून सर्व योद्धे त्याच्याशीं इमानाने व हुशारीनें वागून स्वप्राणांचें बळी द्यावयास सर्वदा सिद्ध असत, हें त्या रजपूत सरदाराला पूर्णपणे माहीत होतें. तेव्हां अशा प्रबळ पुरुषाशी युद्धप्रसंग करण्याचें टाळून त्यास अन्य उपायांनी वश करून घ्यावे व आपली अब्रू बचावून बादशहाचीही कामगिरी बजाविल्यासारखे करावे असा विचार त्याने मनांत आणिला. दुसरें असें कीं, अफझुलखान, शास्ताखान वगैरे सरदारांची जशी दशा झाली तशीच आपलीही व्हावयास चुकणार नाही अशी दहशत त्याला दक्षिणेत पाय ठेवल्यापासून वाटूं लागली होती. तेव्हा आपली कामगिरी कशी तरी एकदाची उरकून महाराष्ट्रांतून निसटता पाय घ्यावा असें त्याच्या मनाने घेतलें होतें.[२] म्हणून त्यानें महाराजांस जासुदाबरोबर पत्र पाठवून असें कळविले कीं, ''औरंगजेब अतिबलाढ्य पातशहा आहे. त्याशीं तुम्ही सख्य करावे हें उत्तम. त्याच्याशी शत्रुत्व करून परिणाम लागणार नाही. आम्ही जसे जयपूरचे राजे, त्याप्रमाणें तुम्ही उदेपूरच्या घराण्यांतील शिसोदे. तुम्ही थोर वंशांत निपजला असून हिंदुधर्माचा तुम्हास पूर्ण अभिमान आहे हें पाहून आम्हांस संतोष वाटतो. स्वधर्मरक्षणार्थ व स्वसत्तास्थापनार्थ जो उद्योग तुम्ही चालविला आहे त्यास आमची पूर्ण अनुकूलता आहे. तुमचा बचाव करून तुमची सत्ता कायम राखावी असें आमच्या मनांत आहे. या प्रकरणी तुमचा मानस कसा काय आहे तें कळवावे.''

---

१ स्कॉटवेरिंग म्हणतो की, जयसिंगास ठार मारण्यासाठी प्रतापराव गुजरास महाराजांनी पाठविले होतें. प्रतापरावानें जयसिंगापाशी जाऊन मला नोकरीस ठेवा म्हटलें. त्यावरून त्यास त्या सरदाराने आपल्या तैनातीस ठेविले. तो त्याच्या जवळ नेहमी राहून त्याची पुढेपुढे होऊन सेवा करीत असे. एके दिवशी जवळ फारसे लोक नाहीत असें पाहून त्यानें जयसिंगावर हल्ला करण्याची संधी साधिली; परंतु जवळच्या लोकांनी त्याला तत्काळ पकडून निःशस्त्र केलें. जयसिंगाने त्याला एकही शिक्षा न करितां सोडून दिलें.

२ काही बखरकार म्हणतात की, आपणांस ह्या मोहिमेत यश मिळावे म्हणून जयसिंगाने व्रते, जप व अनुष्ठाने चालविली होती!

अशा आशयाचे पत्र जयसिंगाकडून आल्याने महाराजांची चिंता बरीच दूर झाली. देवीच्या आज्ञेप्रमाणें आपल्या मनांत त्याच्याशीं युद्ध करावयाचें नाहीं, व त्याच्याकडूनही सख्य करण्याविषयीचे पत्र आलें; तेव्हां आता त्याच्याशी साधेल त्या रीतीनें स्नेह करावा असें महाराजांच्या मनांत आलें. पदरच्या माणसांचाही असाच अभिप्राय पडला. मग त्याच्याशीं सख्याचे बोलणे करण्यास कोणतरी हुशार वकिलास पाठवावे असें ठरून ती कामगिरी रघुनाथपंतास सांगितली.[१] जयसिंगराजास दिव्य वस्त्रे, अमूल्य अलंकार, उमदे घोडे व हत्ती ही नजर पाठवून त्यास एक पत्रही दिलें. त्या पत्रातील आशय येणेप्रमाणे होता : ''आपण वार्तिकाबरोबर पत्र पाठविलें तें पाहून अत्यानंद झाला. तें दोन्ही हातात घेऊन पितृदर्शनतुल्य समजून मी हृदयाशी धरिलें. आपणाकडून पत्र येण्याचा किमपि भास नसता तें आलें याबद्दल परम समाधान वाटलें. चिंता दूर झाली. पत्रींचा भाव समजून तें ममतेने भरले आहे असे वाटलें. पत्र पावतांक्षणींच दर्शनास बिनदिक्कत यावें. कोणत्याही गोष्टीचा मनात अणुमात्र आक्षेप न आणितां व हे परकी आहेत अशी चिंता मनांत अल्पही न करितां आपल्यावर अवलंबून राहिल्यानें वांच्छिक हेतू परिपूर्ण होऊन माझें सर्व प्रकारे कल्याण होईल असें मला वाटलें. जसे आपले चिरंजीव रामसिंगराजे तद्वत् मला समजून आपण ममतापूर्वक पत्र लिहिले. तेणेंकरून चित्त अतिसंतोष पावले. ही अशी वृत्ती माझी झाली आहे कीं कसें तें एक जगदंबा जाणे. तुमचे दिल्लीहून दक्षिणेत आगमन झाले ही उत्तम गोष्ट घडून आली. मनातील सर्व मनोरथ सिद्ध होतील अशी माझ्या दिलाची खात्री झाली. माझें सारे भय नष्ट होऊन मन आनंदातिशय पावले आपण वडील क्षात्रधर्मसंरक्षणकर्ते. बादशहाची आम्हांवर इतराजी तर बहुत झाली आहे पुढें कांही तरणोपाय दिसत नाहीं. ही विवंचना आम्हांस लागून राहिली आहे. बादशहा सर्वांचे खावंद हें प्रमाण, परंतु क्षात्रधर्मास अवरोध झाला. म्लेंच्छमय धरा झाली. अविंध उन्मत्त होऊन हिंदुधर्म बुडवीत चालले. संपूर्ण पुण्यक्षेत्र भ्रष्ट करून त्या स्थळी ते गोवध करूं लागले. देवालये पाडून तेथें त्यांनी मशिदी बांधिल्या. त्यांचा हेतू असा कीं, हिंदुधर्मरहित धरा करावी. हा सर्व प्रकार असह्य वाटून वडिलांच्या प्रतापाने व श्रीजगदंबेच्या अनुग्रहानें यवनांशी आजपर्यंत मीं यथाशक्ती विरोध केला. हिंदुधर्माचा अभिमान हिंदुराजांनी टाकिला हें कांही चांगले नाही. ह्या भूमीचे राज्य हिंदुराजे पुरातन काळापासून करीत आले असून सांप्रत ते पदभ्रष्ट होऊन यवनांचे अंकित झाले आहेत हें पाहून मन उद्विग्न होतें. ह्या गोष्टीसंबंधानें आपणांस पूर्ण ईर्षा असावी. आतां बादशहाची मीं अनेक प्रकारीं आगळीक केल्यामुळें त्यास क्रोध येऊन त्यानें आपणांस मजवर पाठविलें आहे, तरी पादशहाचे दरबंदगीस मी अंतर करणार नाहीं. मजकडे जे किल्ले व प्रांत आहेत ते मी आपल्या बाहुबळें परराज्यांतून काबीज केले आहेत. त्यांस बादशहाकडून उपद्रव न होतां त्याचें मन माझ्याविषयी स्वच्छ व्हावें हें मला इष्ट आहे. त्याच्या मनात दक्षिण काबीज करावयाची आहे. त्यास मी मनापासून मदत करीन.'' ह्या अशा मजकुराचे पत्र त्यांनी रघुनाथपंताच्या हाती दिलें व त्याला तोंडींही पुष्कळ गोष्टी कळविण्यास सांगितलें.

जयसिंगाने रघुनाथपंताची भेट आदरपूर्वक घेतली, महाराजांकडून आलेल्या नजराण्याचा प्रीतिपूर्वक स्वीकार केला व मोठ्या प्रेमानें कुशल पुसलें. मग तें पत्र वाचून व तोंडचा निरोप ऐकून तो फार संतोष पावला व म्हणाला, 'दिल्लीपती औरंगजेबबादशहा कांही सामान्य नव्हे. तो सार्वभौम असून अतिबलाढ्य आहे. त्याशीं स्पर्धा केल्याने कोणत्याही प्रकारे बरें होणार नाहीं. अशाने परिणाम लागतो की काय? यात स्वहित काय पाहिले? याउपर राजे यांनी अनमान न करितां आमच्या समागमें बादशहाच्या दर्शनास दिल्लीस चलावें. आम्ही स्वत: त्यांस घेऊन जाऊन मुलाखत करवितो. ह्या संबंधाने सर्व प्रकारचे साहाय्य त्यांस करितो त्यांनी अणुमात्र भय चित्तांत वागवू नये. जसे आमचे पुत्र रामसिंग तसेच शिवाजीराजे आम्हांस आहेत. आम्ही रजपूत सत्यवक्ते आहों. आमच्यापासून बेइमानपणा होणार नाहीं, अशी निशा मानून राजे यांनी उदयिक प्रांजलचित्ते आमच्या भेटीस यावें. मनांत काहीएक दिक्कत धरू नये. बादशहापाशीं राजे यांची सर्व गोष्टींनी शिफारस करून त्यांस स्वराज्यास यावयास निरोप देववितों. तेथें त्यांचा यथायोग्य बहुमान होईल असें करितो.' हा असा उलट निरोप देऊन व आलेल्या वकिलास वस्त्रालंकार देऊन त्यानें गौरविले व महाराजांस नजराणा पाठविला.

---

१ ह्यापूर्वी महाराजांनी जयसिंगाकडे समेटाचे बोलणे करण्याकरिता अनेक वेळा पत्रे पाठविली होती; परंतु त्यात त्याचे कपट आहे असे मानून जयसिंगाने त्याच्या लोकांस परत लाविले होते; जयसिंगाकडून महाराजांना पत्र गेले नव्हते असे प्रो. सरकार म्हणतात.

निघते वेळीं रघुनाथपंतानें जयसिंगास एकांती गाठून त्याच्याशी येणेंप्रमाणें भाषण केलें : ''तुम्ही शहाणे हिंदुराजे आहां. क्षात्रधर्म शास्त्रमर्यादेनुरूप रक्षण केल्यास त्यांत भूषण आहे. असें केल्यानें ठाकूरजी तुमचे कल्याण पुत्रपौत्रादि वंशपरंपरेने करील. अवधांनी स्वधर्मावरोध केला. श्रीकाशी, यमुना, सरस्वती इत्यादी महातीर्थे अविंधभयानें संपूर्ण जनांची राहिली. दुष्ट यवन दुष्कर्मास प्रवर्तले आहेत. यासंबंधाची ईर्षा तुम्ही अगदीं टाकिली. अशा यवनांस वंद्य मानून तुम्ही सेवाधर्मास प्रवृत्त झाला, ही केवळ भ्रष्टता होय. ह्या गोष्टीचा तुम्हांस अभिमान नाहीसा झाला आहे. अशा स्थितीमध्यें जीवितरक्षण केल्याचा पुरुषार्थ तो कोणता? शिवाजीमहाराज तुमचे लेकरू आहे. त्यांच्याकडून हिंदुधर्माचे रक्षण करविणें आपल्या हातीं आहे. तरी त्यांच्या कर्तृत्वाबद्दल योग्य अभिमान धरून त्यांचें साधेल त्या मार्गानं कल्याण करणें हें आपलें कर्तव्य आहे, असें मी समजतो. हिंदुराजांच्या कुळांत तुम्ही प्रतिसूर्य उदय पावला आहां. शिवाजीमहाराजांचा नाश केल्याची अपकीर्ती आपल्या वाट्यास येऊ देऊं नका. त्यांच्या जिवास दगा झाल्यानं आपला दुलौकिक होईल. त्यांनी तुमच्या चरणी मस्तक ठेविले आहे. प्राणदातेपणाचें यश तुम्ही घ्यावे.'' हे भाषण ऐकून जयसिंगास त्याचा राग तर मुळींच आला नाहीं, पण उलटा तो अगदी प्रेमळपणानें म्हणाला कीं, 'माझ्याकडून राजांना काहीएक दगा होणार नाहीं.' व याबद्दल त्याच्यापाशीं त्यानें आणभाकही केली.

मग जयसिंगाने रघुनाथपंतांची दिलेरखानाशी भेट करविली. महाराजांनी त्याच्यासाठी पाठविलेला निराळा नजराणा त्याला दिला, व उभयतांच्या सल्ल्याने असें ठरलें कीं, शिवाजीमहाराजांनी औरंगजेबापासून कोणत्या गोष्टी ठरवून घ्यावयाच्या त्या नीट खुलासेवार कळवाव्या, म्हणजे त्यासारखा विचार करितां येईल. रघुनाथपंत त्याचा निरोप घेऊन परत रायगडावर आला व महाराजांस सविस्तर हकीगत त्यानें निवेदन केली. त्यावरून महाराजांनी आपल्या करारांची एक यादी तयार केली. तीतील आशय असा होता कीं, 'आम्ही जे प्रांत व किल्ले काबीज केले आहेत ते दरोबस्त आमचे आम्हांकडे राहावे, आणि वरकड दक्षिणप्रांताची चौथाई व सरदेशमुखी आमच्याकडे चालावी. अशा अटींवर आपलें व बादशहाचे सख्य व्हावें.' ही यादी घेऊन तो वकील पुनः जयसिंगाकडे गेला. त्यानें ती यादी पाहिली तेव्हां त्याची बहुतेक खात्री झाली कीं, शिवाजीमहाराजांचा तह करण्याचा इरादा मनापासून आहे, यांत काही फसवणुकीचा प्रकार नाहीं. त्यासंबंधानें त्या वकिलाकडूनही त्यानें शपथक्रियेवर खात्री घेतली, आणि त्यास असें सांगितलें कीं, ''राजे आमच्या भेटीस आल्यावर तहाच्या अटी नीटपणे ठरवू.''

जयसिंग शिवाजीमहाराजांची भेट घेऊन त्यांशी तह करण्याच्या विचारांत आहे हें दिलेरखानास कळले तेव्हां त्याला स्वाभाविकपणे असा वहीम आला कीं, हे हिंदूहिंदू एक होऊन बादशाही कामगिरीस अडथळा येणार. मग तो जयसिंगाकडे येऊन म्हणाला : ''शिवाजीची भेट घेऊन तहाची कलमे लागलीच ठरवू नका. तो म्हणत आहे त्या अटींवर तह होतां कामा नये. सर्व गोष्टी खुलासेवार लिहून बादशहाकडे पाठवाव्या व तिकडून जसा हुकूम येईल तसें वर्तन करावे तूर्त आपण त्याच्या दोन किल्ल्यांस वेढा घातलाच आहे, तो पुढें नेटाने चालवावा. मी पुरंदर घेतो आणि तुम्ही सिंहगड घ्यावा.'' असा आग्रह त्यानें धरिला. जयसिंगाने त्याला असें सांगितले कीं, ''शिवाजी आमच्याशी तह करून मोगल बादशहाचा अंकित होत आहे हें फारच चांगलें आहे. निजामशाहीपैकीं जे किल्ले व प्रांत त्यानें काबीज केले आहेत तेवढे आपणांस ह्या तहानें सोडवून घेता आले म्हणजे आमच्या मोहिमेचे काम झालें. हे किल्ले घेणे फार कठीण काम आहे. प्रत्येक किल्ल्यापुढें हजारों माणसे खराब करावीं लागतील, व इतकेही करून ते हातीं येतील कीं नाहीं याची शंकाच आहे. यास्तव हे किल्ले काबीज करण्याचा नाद सोडून देऊन तूर्त सभोवतालच्या प्रांतांतून किल्ल्यांवर दाणावैरण जाण्याचे फार तर बंद करावे याहून जास्त गडबड करण्याचें कारण नाहीं.'' अशा रीतीने जयसिंगाने त्याला पुष्कळ समजावून सांगितलें; परंतु तो आपला आग्रह सोडीना. तो जयसिंगास इतकेंच म्हणाला कीं, ''तुम्ही सिंहगड घेणार असलां तर द्या, मी जाऊन पुरंदर सर करणार. कांही झालें तरी बादशहाची मंजुरी घेतल्यावांचून कोणत्याही प्रकारचा तह ठरता कामा नये.''

इतकें बोलून तो पुरंदरचा वेढा विशेष निकराने चालविण्यासाठी तिकडे निघून गेला. त्याने किल्ल्यास चोहोकडून मोर्चेबंदी केली. या किल्ल्याचा हवाला मुरारबाजी प्रभू नांवाच्या एका सरदाराकडे होता. शत्रूचे सैन्य जवळ येत आहे असें पाहून त्यानें त्यास दाणावैरण मिळू नये अशी तजवीज करून व त्यावर पुनः पुनः छापे घालून त्यास बरेंच हैराण केले होतें. शत्रूचा दारूगोळा पेटवून देऊन त्याची युद्धसामुग्री लंबे करण्याचा धूमधडाका त्यानें चालविला होता. शत्रू पाठीस लागला म्हणजे फरारी होऊन किल्ल्यांत येऊन बसावयाचे असा क्रम त्यानें कांही दिवस ठेविला होता; परंतु अखेरीस त्याला पुरंदर किल्ल्यांत कोंडून त्याच्यासभोंवतीं शत्रूने प्रचंड सैन्याचा वेढा दिला. हा मुरारबाजी अतिशयित शूर व हुशार होता. त्याच्या हाताखाली त्या वेळीं अवघे दोन हजार मावळे व हेटकरी होते. किल्ल्यांत दारूगोळा व धान्यादी सामुग्री पुष्कळ करून ठेविली होती. मुरारबाजी व त्याच्या लोकांनी किल्ल्याचे रक्षण बरेच दिवस मोठ्या शौर्याने केलें; शत्रूचे सैन्य एवढे मोठे होतें तरी त्यास मुळींच दाद दिली नाही. किल्ल्याखाली हजारो मोगल धडपड करून प्राणास मुकले. त्यांस किल्ल्याजवळ जातां येईना. महाराजांनी राजगडावरून केदारदरवाजाकडून रसद पोचविली व लोकांची भरती केली. किल्ल्याच्या एका माचीवर बुरुजाखालील खडकाला सुरुंग लावून तो पाडून आंत शिरण्याचा बेत दिलेरखानानें करून त्या कामाला आपले लोक लाविले. हें किल्ल्यावरच्या लोकांनी पाहून त्या माणसांवर पुनः पुनः छापे घालून त्यांस नको जीव असें केलें. त्या कामीं शत्रूकडील शेकडो माणसांचे बळी पडले; परंतु त्यांचा जमाव फारच मोठा असून त्यास आणखी वारंवार कुमक पोहचत असल्याकारणानें हें सुरूंग लावण्याचे काम शेवटास जाऊन बुरूज जमीनदोस्त झाला, व शत्रूच्या लोकांचा किल्ल्याच्या त्या माचीवर प्रवेश झाला. त्यांनी आत शिरताच घरे लुटून जाळून टाकण्याचा झपाटा चालविला. तो इकडे हेटकरी लोकांनी आपला अचूक गोळीबार असा झपाट्याने सुरू केला कीं, त्यासरशी शत्रूच्या लोकांची अगदी धांदल उडाली. ते सैरावैरा पळत सुटले. जो तो आपला जीव बचावण्यासाठी कोठे तरी छपून राहण्यास जागा पाहूं लागला. ह्याप्रमाणें त्यांची दाणादाण झाली असतां खानाचे आणखी पाच-सहा हजार लोक मोठ्या जमावाने किल्ल्यावर चढून येऊ लागले. त्यांच्यावर मुरारबाजी आपल्या सातशे निवडक मावळ्यांसह एकदम चालून गेला. उभय पक्षांकडच्या लोकांचे मोठ्या निकराचे युद्ध झालें. मावळ्यांच्या तरवारींच्या सपाट्याखाली दोन हजार मोगल व पठाण रणात पडले. मावळेही बरेच धारातीर्थी पतन पावले. तरी त्यांनीं शत्रूचा हल्ला डोंगराखालीं मोठ्या नेटाने पिटून लाविला. खानाचे लोक वाट मिळेल तिकडे पळत सुटले. खान स्वत: खाली नारायणाच्या देवळापाशी हत्तीवर स्वार होऊन उभा होता. आपल्या लोकांची दाणादाण झालेली पाहून त्यास अतिशयित चेव आला आणि त्यानें आपला तिरकमठा सज्ज केला व पुढें सरसावून आपल्या पठाणांस मुरारबाजीवर चालून जावयास हुकूम केला. लोक पळत सुटले होते त्यांस मागें परतवून त्यासह तो स्वतः मावळ्यांवर तुटून पडला. ह्या समयीं मुरारबाजीने आपल्या शौर्याची अगदी शिकस्त केली. त्यानें दिलेरखानाचें पाऊल जरासुद्धा पुढें पडूं दिलें नाहीं. त्याच्या पदरचे पठाण एवढे कडवे होते तरी आवेशाचे वारे अंगांत पुरे संचरलेल्या मावळ्यांच्या तरवारीपुढें त्यांचें काही एक चालेना. मुरारबाजी तर अगदीं जिवावर उदार झाला होता. खानाचे लोक फार, त्यांनी आपल्या किल्ल्याच्या एका माचीला सुरुंग लावून ती कमजोर केली आहे; आपला ह्या रणकंदनांत मोड होऊन किल्ला हातचा जाणार, तेव्हां महाराजांचे शेकडो लोक व्यर्थ खर्ची घातल्याचे अपयश घेऊन त्यांस काय तोंड दाखवावे असा विचार करून तो स्वतः ढालफिरंग घेऊन आपल्या लोकांपुढे होऊन त्यास धीर व उत्तेजन देत मोठ्या आवेशाने लढत होता. लढता लढता त्याला समोर खानाचा हत्ती दिसला. त्यासरसा तो पुरुषसिंह त्याच्यावर चालून गेला. त्यावेळी त्याची ढाल तुटून तो शत्रूचे प्रहार हातास शेला गुंडाळून त्यावर घेत होता. तो अगदी जवळ आला असें पाहून खानाने त्याला हाक मारून म्हटलें, ''तू मोठा शूर शिपाई आहेस. तुझा हा आजचा अडत पराक्रम पाहून मी केवळ चकित झालो आहें. तूं ह्या समयी कौल घेऊन माझ्या स्वाधीन हो. मी तुला मोठ्या योग्यतेस चढवितो!'' हे त्याचे शब्द ऐकून मुरारबाजी त्याचा धिक्कार करून बोलला, ''तुम्ही तुरुकडे, तुमचा हिसाब काय! मी शिवाजीमहाराजांचा नोकर आहें. मी तुझा कौल घेतो कीं काय? मी ह्या रणांत आपला देहपात करीन, परंतु तुम्हास सहसा शरण येणार नाही!'' असें बोलून खानावर आपल्या तरवारीचा वार

करण्याच्या बेतात तो होता. इतक्यात खानाने तीर मारून त्याचे शिर उडविले.[१] ह्याप्रमाणें आपला सरदार पडला हें पाहून मावळ्यांनी माघार घेतली व लढतालढता चढून किल्ल्याचे दरवाजे लावून घेतले. इतक्यात महाराजांकडून त्यांस कुमक येऊन पोचली. त्याबरोबर त्यांस नवा दम येऊन खानाच्या लोकांशी पुनः लढण्यास ते तयार झाले. किल्ल्यावर नगारे, कर्णे, वगैरे रणवाद्ये वाजवू लागून त्यांनी शत्रूच्या लोकांवर पूर्ववत् तोफांचा भडिमार सुरू केला. खानाच्या लोकांचा असा मोड होऊन पुष्कळ शिपाई प्राणास मुकले तरी किल्ला सर केल्यावांचून येथून जावयाचें नाहीं असा हट्ट त्यानें धरिला. असें सांगतात कीं, त्यानें आपल्या डोकीची पगडी उतरून अशी प्रतिज्ञा केली कीं, 'हा गड घेईन तेव्हा पगडी परत घालीन.' असा नियम करून त्याने खालची माची पुनः काबीज केली आणि किल्ल्याचा उत्तरेकडचा भाग अभेद्य आहे असें वाटून त्यानें वायव्येस रुद्रमाळ[२] नांवाचा एक लहानसा किल्ला आहे तो हस्तगत करावा आणि त्याच्यावर दमदमे रचून मुख्य किल्ल्यावर तोफांचा मारा चालवावा असा बेत केला. ह्या किल्ल्यावर बाबाजी बोवाजी व यशवंतराव बोवाजी हे दोघे बंधू हवालदार होते. त्याच्याजवळ फारशी फौज नव्हती. दिलेरखानानें त्या किल्ल्यावर हल्ला केला तेव्हां मुरारबाजी आपल्या मदतीस कांहीं लोक पाठवील ह्या भरवशावर त्या दोघा बंधूंनी आपल्या थोड्या लोकांनिशी शत्रूशी मोठ्या निकराची लढाई चालविली. त्यांनी बराच वेळ टिकाव धरिला. शेवटी हे उभय बंधू रणात पडले आणि किल्ला शत्रूच्या स्वाधीन झाला. दिलेरखानानें ह्या किल्ल्यावरून मुख्य किल्ल्यावर तोफांचा भडिमार चालविला. इतक्यांत पाऊस सुरू झाला. तेणेंकरून त्याचा मारा चालावा तसा चालेना. किल्ल्यावरच्या लोकांनी आपला मोहरा पडला म्हणून यत्किंचित् नाउमेद न होता त्याच्यासारखेच आम्ही सर्व शूर असून स्वामिकार्यी स्वप्राणांची आहुती देण्यास उद्युक्त आहे हे दाखविण्याचा हुरूप त्यांच्या अंगांत पुरा संचारला होता; परंतु खानाने किल्ल्यावर दोहोकडून सारखा मारा चालविला. तेव्हां त्याची हिंमत अंमळ खचली. खरें पहाता अशा दुहेरी माऱ्याखाली तो किल्ला जमीनदोस्त व्हावा; परंतु कर्मधर्मसंयोगानें खानाचा तोफखाना असावा तसा मजबूत नव्हता; व तशात आणखी पाऊस पडल्यामुळें त्याचा बराच दारूगोळा भिजून खराब झाला होता. शत्रू असा अट्टीस पडून पुरंदर किल्ल्यावर गर्दी करून राहिला आहें असें पाहून महाराजांनी आपल्या तेथील लोकांस साधेल तेवढी मदत करून आणखी कांही दिवस असाच दम धरून राहावयास सागू पाठविलें. मोंगलांनीही आणखी तोफा, दारुगोळा वगैरे सामान मागवून किल्ल्यावर मोठ्या जोराचा भडीमार चालविला.

ह्याप्रमाणें पुरंदर किल्ल्याखाली दिलेरखानानें धडपड चालविली असता तिकडे सिंहगड घेण्यासाठीं एका सरदारास फौज देऊन जयसिंगाने पाठविलें होतें, तो सरदार त्या किल्ल्यापाशी जाऊन त्यास मोर्चे लावण्याच्या उद्योगास लागला असतां त्याच्यावर महाराजांच्या लोकांनी पहाटेच्या सुमारास अकस्मात् छापा घालून त्यांची फौज उधळून लाविली व सामानसुमान सारे लुटून नेले. तेव्हां तो मोगलसरदार रडत माघारी गेला. मराठ्यांचा हा असा सपाटा पाहून जयसिंग अगदीं चकित झाला. महाराजांचे लोक मोगलांच्या छावण्यांवर रात्रीचे छापे घालीत, सर्व रस्ते, नाकी व चोरवाटा यात दबा धरून पाळतीवर राहात, त्यांस दाणावैरण कोठूनही मिळू नये असें करीत, त्यांचे ओझ्याचे बैल, उंट वगैरे हातास लागतील तेवढी घेऊन जात व सभोवतालच्या रानास आग लावून त्यास घाबरवून सोडित. असा त्यांचा हुतुतू चाललेला पाहून जयसिंगास येथून आपण केव्हां निसटून जाऊं असें झालें. त्याप्रमाणेंच दिलेरखानाचे लोक पुरंदर किल्ल्यापाशी अगदीं जिकिरीस आले आहेत असें त्याला कळलें तेव्हां त्यानें खानास असें सांगून पाठविलें की, 'तुमचा हा हटाग्रह कांही चांगला नव्हे. शिवाजी महाराजांची माणसे एकाहून एक अधिक आहेत. किल्ला हातीं येणे कठीण आहे. एका किल्ल्यास इतकी माणसे खराब केली तर कोंकणबंधारीचे व सह्याद्रीच्या दाट झाडींतील व रानातील बिकट किले घ्यावयाचे झाल्यास तेथें कसें कराल? शिवाजीमहाराज आपण होऊन शरण येऊन भेटत होते व तह

---

१ मुरारबाजीचे शीर तुटल्यावर त्याच्या नुसत्या कबंधानें कित्येक यवनांची कत्तल उडविली अशी आख्यायिका आहे.

२ ह्याला ग्रांट डफ वज्रगड म्हणतो.

करण्यास राजी झाले होते. ती संधी व्यर्थ दवडून आपला विश्वास मात्र गमाविला. हें काहीं चांगले झालें नाहीं.' हें जयसिंगाचे म्हणणें खानास ह्या वेळीं सयुक्तिक वाटूं लागलें. कारण त्यास पुरंदर किल्ल्यापाशी जो थोडासा अनुभव आला त्यावरून त्यास असें वाटूं लागलें होतें कीं, शिवाजीमहाराजांचे किल्ले काबीज करण्याचें काम अतिबिकट आहे. मग त्यानें जयसिंगास असा उलट निरोप पाठविला कीं, 'पुन: एक वेळ राजकारण करून विश्वास दाखवून शिवाजीराजे भेटीस येऊन तह करतील असे करावे. आम्ही अशी प्रतिज्ञा केली आहे कीं, किल्ला घेऊं तेव्हां उतरलेली पगडी परत डोकीस घालू तरी त्यांनी आमचे निशाण त्या किल्ल्यावर नेऊन लावू द्यावे आणि मग तहात पाहिजे तर तो किल्ला त्यांनी आपल्याकडे ठेवावा.'

दिलेरखानाच्या दुराग्रहास्तव जयसिंगाने महाराजांच्या वकिलास निरोप दिला होता; परंतु त्याची आतां बरीच रग जिरून तो आपण होऊन तहाची गोष्ट बोलत आहे असें पाहून त्यानें महाराजांकडे आपला वकील पाठवून असें बोलणे लाविले कीं, 'तुमचे म्हणणें आम्हांस मान्य आहे. मात्र पुरंदर किल्ल्यावर खानाच्या आग्रहास्तव आमचे निशाण लावू द्यावे. मग तहात तो किल्ला हवा असल्यास परत घ्यावा. तुम्ही आम्हांस भेटून जे कांही करार करावयाचे ते करावे. त्यांची यादी बादशहाकडे पाठवून त्यांस मंजुरी आणवितों. तुम्हांला जो त्रास पोंचला आहे तो मनास आणू नये. आमच्यावर पूर्ण भरवसा ठेवून बिनदिक्कत आमच्या भेटीस यावें.' हा निरोप महाराजांस आला तेव्हां त्यांस अंमळ बरें वाटलें. हें महत्संकट कसें दूर होतें याची त्यांस चिंता लागून राहिली होती. तरी ह्या वेळी त्यांनी बाह्यात्कारी थोडेसे आढेवेढे घेतले. त्यांनी जयसिंगास असा उलट जबाब पाठविला कीं, 'तुमच्याकडून विश्वास राखला गेला नाहीं. आम्ही तह करण्यास तयार असतां तुम्हींच तो बिघडवला. पुरंदर किल्ल्यावर तुमचे निशाण लावू देणे तर दूरच राहिलें; परंतु त्या किल्ल्यापुढची खानाची फौज उठवून रुद्रमाळ (वज्रगड) त्यानें घेतला आहे तो परत द्यावा, म्हणजे मग भेटीस येऊन तह करण्याचा विचार पाहूं.' हे त्यांच्याकडचे बोलणे आल्यावर जयसिंगाने त्यांची अट कबूल करून त्यांस पुनः विश्वास वाटेल असा निरोप पाठविला.

ह्याप्रमाणें जयसिंगाने खातरजमा करून पुरा इतबार दाखविला[१] तेव्हां महाराजांनी त्याच्या भेटीस जाण्याचे मनांत आणिलें. आपले बडेबडे सरदार व मुत्सद्दी बरोबर घेऊन व महालदार, चोपदार वगैरे सर्व राजचिन्हांनिशीं ते जयसिंगाच्या भेटीस निघाले.[२] त्यांनी खास सेवेसाठी घेतलेल्या नोकरांच्या अंगावर बहुमोल अलंकार व वस्त्रे होतीं. सरदार व

---

१ मनुस्सी म्हणून एक युरोपियन अंमलदार जयसिंगाच्या तोफखान्यावर होता. तो आपल्या पुस्तकात म्हणतो की, महाराजांचा आपल्यावर भरवंसा बसावा म्हणून जयसिंगाने हरप्रयत्न केला. आणि त्यांस असे आश्वासन दिलें की, तुम्ही मजवर पूर्ण विश्वास ठेवाल तर बादशहाकरवी तुमचे सर्व हेतू पूर्ण करवितो. हा युरोपियन आणखीन असें म्हणतो कीं, शिवाजीमहाराजांचे आणि आपले अनेक वेळा भाषण झाले. त्या वेळी त्यांच्या अंगी चौकसपणाचा गुण अप्रतिम दिसून आला. त्यांनी युरोपियन लोकांसंबंधाने वगैरे आपणांस शेकडो प्रश्न केले.

२ बुंदेले व ग्रांट डफ हे म्हणतात की मोगलांचे सैन्य पुरंदर किल्ल्यावर गर्दी करून राहिल्यामुळे शिवाजीमहाराज घाबरून जाऊन काही लोकांनिशी जयसिंगाच्या छावणीत आले, व बाहेरील एका चौकीदारास जयसिंगाकडे पाठवून त्यांनी असे असें कळविले की, आपण तुमच्या भेटीस आलो आहोंत. जयसिंगाने आपला मुलगा किरतसिंग यास त्यांना सामोरा पाठविला व त्यांना मोठ्या इतमामाने आपल्या जवळ आणिलें. जयसिंग स्वतः आपल्या तंबूच्या दारापर्यंत त्यास भेटावयास आला व मोठ्या आदराने आलिंगन देऊन, 'अशा रीतीनें आमच्या स्वाधीन होण्याचे कारण काय?' असें त्यानें त्यांस विचारिलें. ह्या शूर व पराक्रमी पुरुषास पाहावयास छावणींतील लोकांची तंबूच्या दारापाशी एकच गर्दी झाली. खाफीखान म्हणतो की, शिवाजीमहाराजांची बायको व इतर कित्येक नातलग सिंहगडावर होती. मोगलांनी त्या किल्ल्यास वेढा घातला होता तो उठवावयास लावून किंवा अन्य प्रकारे त्यास तेथून सोडविणे शक्य नाही असे पाहून केवळ त्यांच्या बचावासाठी त्याने जयसिंगास शरण जाण्याचे मनात आणून त्याची प्रत्यक्ष मुलाखत घेण्याची आपली इच्छा त्यास कळविली. तेंव्हा त्या सरदाराने एका मुनशीच्याद्वारे असा उलट निरोप पाठविला की, 'तुम्ही निष्कपटपणे शरण येणार असून तुमचे किल्ले आमच्या स्वाधीन कराल तर तुमची विनंती मान्य करू. नाहीतर तुम्ही आल्या वाटेने परत जाऊन लढाई सुरू ठेवा!' ह्यावर महाराजांनी त्याला असे कळविले की, 'आपण अगदी खऱ्या दिलाने तुम्हास शरण आलो आहों.' मग जयसिंगाने महाराजांस आणावयास एक मोठ्या दरजाचा सरदार सामोरा पाठविला.

मुत्सद्दी यांच्या अंगावर भरगच्ची पोषाख व जवाहीर होतें. बरोबर बरेच निवडक मावळे व हेटकरी घेतले होते. त्यांनाही उत्तम पेहराव दिले होते. हत्ती व घोडे चांगले शृंगारले असून त्यांवर मुत्सद्दी व सरदार आरूढ झाले होते. खुद्द महाराजांचा पेहराव अगदीं साधा होता. ते हातीं तीरकमान घेऊन हत्तीवर बसले होते. अशा थाटाने ते जयसिंगाच्या भेटीस आले. आपण येत आहों हें कळविण्यासाठी त्यांनी रघुनाथपंतास पुढें पाठविले होतें. ते जवळ आले असें कळताच जयसिंग बरोबर कांहीं लोक घेऊन त्यांस सामोरा गेला. जयसिंग आपणांस सामोरा आला असें पाहून महाराज हत्तीवरून खाली उतरून पुढें पायी चालत गेले. जयसिंगही आपल्या हत्तीवरून उतरून पुढें चालत आला. त्यांनी एकमेकांस प्रेमालिंगन दिलें. त्याबरोबर उभयपक्षांची वाद्ये वाजू लागली. मोगलांच्या लष्करातील अमीरउमराव सगळे आपआपल्या तंबूतून बाहेर पडून महाराजांस पाहावयास लगबगीने धावले. त्यांचे तें तेज व ऐश्वर्य पाहून ते केवळ चकित झाले. हा दक्षिणचा राजा फार चांगला शोभतो असें ते आपसांत बोलू लागले.

जयसिंगाने महाराजांस आपल्या अंबारींत बसवून वाजतगाजत डेऱ्यास नेलें. तेथें गेल्यावर ते एका आसनावर बसले. सरदारांसरदारांच्या ओळखी करून दिल्या. महाराजांची ती इभ्रत पाहून जयसिंग अगदी दंग होऊन गेला. तो त्यांची बहुत तारीफ करून म्हणाला : ''तुम्ही स्वप्रतापानें हिंदू धर्माचें रक्षण करीत आहां. दक्षिणेंतील मुसलमानबादशहांस तुम्ही जेर करून औरंगजेब बादशहासही चिंतेत पाडिलें आहे. याबद्दल तुमची जितकी वाखाणणी करावी तितकी थोडीच आहे. आम्ही तुम्हांस सर्व प्रकारे अनुकूल आहां. आम्हांस तुमचा पूर्ण अभिमान आहे. तुम्ही-आम्ही कांही निराळें नाहीं. आमचा पुत्र रामसिंग तसे तुम्ही मला आहां. इतःपर कांहीं एक चिंता करू नका. तुमच्या इच्छेप्रमाणें बादशाहाकडून सर्व कांहीं व्यवस्था करवितो.'' जयसिंगाचे असें प्रेमाचे व आदराचे भाषण ऐकून महाराज म्हणाले : ''तुम्ही मला वडिलांसमान आहां. तुमच्या ठायीं माझा पूर्ण भाव आहे. मी मिळविलें राज्य सारे तुमचे आहे. मीही तुमचाच आहें. वडिलांच्या मांडीवर माझें लेकराचे उसे आहे. तुमच्या आज्ञेप्रमाणें मी दर्शनास आलों आहें. या गोष्टीचा अभिमान धरून जें योग्य दिसेल तें करण्यास वडील समर्थ आहेत. तुम्हास जे किल्ले पाहिजेत ते देण्यास मी तयार आहें.'' हें अतिनम्रतेचें भाषण ऐकून जयसिंगराजा संतोष पावला. मग तो त्यास म्हणाला : 'दिलेरखान हा मोठा डौली अरब उमराव आहे. तो बादशहाच्या मोठ्या मेहरबानींतला आहे. त्यास आधी अनुकूल करून घेतलें पाहिजे. तुम्हांस त्याच्या भेटीस जाणें प्राप्त आहे. तुमच्याबरोबर माझे रजपूत नोकर व एक मोठा शूर व इभ्रतदार सरदार देतो.' महाराज म्हणाले, 'मी तुमच्या सांगण्याबाहेर नाहीं. त्याच्या भेटीस जाण्यास मला हरकत नाहीं. तुमचे अभय असल्यास मला त्याची भीती बिलकूल वाटत नाहीं. मग जयसिंगाने आपला मामा सुभानसिंग यास बरोबर देऊन व महाराजांस एका हत्तीवर बसवून दिलेरखानाकडे पाठविलें. हा खान त्यावेळी पुरंदर किल्ल्याच्या दरवाज्यापाशी होता. महाराज जयसिंगराजाच्या छावणींत येऊन त्याला भेटून आपल्याकडे येत आहेत हें ऐकून त्याला बरें वाटलें नाहीं. किल्ला सर करण्याची प्रतिज्ञा आपण केली ती आतां व्यर्थ जाते हें मनांत येऊन तो मानी पुरुष फारच खजील झाला व शेवटीं ह्या मोहिमेचे सगळे यश रजपूत सरदारास प्राप्त होतें हें पाहून त्यास मत्सरही वाटला. हे हिंदूहिंदू एक होऊन आपल्या मोहिमेस यांनी खो आणिला, आणि जयसिंगाने आपला विचार घेतल्यावांचून वाटेल तसा तह केला ह्याबद्दल त्यास राग व वहीम आला. परंतु महाराज जवळ आले असें कळताच केवळ सामोपचारार्थ तो त्यांस सामोरा गेला व त्यांस आपल्या गोटात आणून दोघेही एका बिछायतीवर लोडाशी टेकून बसले. खानास महाराजांचा इतबार बिलकूल नव्हता. तो आपली शस्त्रे जवळ अगदीं सज्ज ठेवून मोठ्या सावधगिरीने बसला. तहासंबंधानें बोलणे सुरू होऊन सुभानसिंगानें महाराजांचें म्हणणें खानास समजून सांगितलें. तेव्हां खानाने थोडासा नसता आव दाखवून म्हटलें कीं, 'मी हा किल्ला हस्तगत करून आतील एकूणएक मनुष्यांची कत्तल उडवीपर्यंत तुमचे काहीएक ऐकणार नाहीं!' महाराजांनी त्यास म्हटलें की, 'किल्ला आपलाच आहे. तो घेण्याची तसदी विनाकारण कशाला? ह्या किल्ल्याच्या दरवाजाच्या चाव्या आपणांस द्यावयास आणिल्या आहेत. ह्या घ्या! माझे सगळे किल्ले व प्रांत आपल्या ताब्यांत आज आले आहेत असें समजा. मला माझ्या अपराधांबद्दल क्षमा करावी अशी माझी विनंती आहे. बादशहाच्या पदरच्या आपल्यासारख्या शूर

सरदाराशी झुंजण्याचे धाडस करणें हा शुद्ध वेडेपणा आहे. तरी माझें आजपर्यंतचे वर्तन मनास न आणितां माझी बादशहापाशीं रदबदली करून तो मला आपल्या पदरी नोकरीस ठेवील असें करा. आपण शिफारस कराल तर माझें उर्जित होण्यासारखे आहे.' हें नम्रतेचे भाषण ऐकून व किल्ल्याच्या चाव्या आपल्या हातीं दिलेल्या पाहून खान अगदीं खूष झाला आणि म्हणाला, ''जयसिंगराजे वडील आहेत. ते बादशहाच्या विश्वासांतले आहेत. आम्ही त्यांचे केवळ अंकित आहों ते जें काही करितील तें आम्हांस मान्य आहे.'' असें बोलून खानानेच महाराजांस दोन घोडे, एक तरवार, एक रत्नखचित खंजीर व दोन भरजरी वस्त्रे नजर केली. मग त्यांच्यासोबत तो जयसिंगाच्या छावणीत आला आणि त्याचा हात धरून त्यांना जयसिंगाच्या हाती दिले. मग त्याने पुरंदर किल्ल्याचा वेढा उठविला.[१] महाराजांनी जयसिंगास, खानास व त्यांच्या बड्याबड्या सरदारांस मोठ्या थाटाची मेजवानी दिली. त्यांनीही महाराजांस व त्यांच्या निवडक लोकांस मेजवानी दिली.

महाराजांस निरोप देताना जयसिंगाने त्यांस एक झगा, एक घोडा, एक हत्ती व शिरपेच एवढे नजर केले. महाराज ह्या वेळी जयसिंगाच्या भेटीस निःशस्त्र आले होते. खानाने दिलेली तलवार त्यांनी थोड वेळ कमरेस अडकवून पुनः काढून ठेवली आणि म्हटले की, 'मी निःशस्त्र सेवकाप्रमाणे बादशहाची एकनिष्ठपणे सेवा करीन!' ही अशी लीनता दाखवून त्यानी पुरंदर किल्ल्याचा वेढा उठवावयास लावून त्यात सात हजार माणसे अडकून पडली होती त्यांस सोडविले.

ह्याप्रमाणें त्यांच्याशी समेट करून महाराज परत रायगडास आले. पुढें आणखी थोडी भवती न भवती होऊन उभयतांच्या विचाराने असा तह ठरला कीं, शिवाजीमहाराजांनी मोगलांचे जे किल्ले व प्रांत काबीज केले होते ते सगळे त्यांनी सोडून द्यावे; निजामशाही प्रांतांत त्यांनी सर केलेले किंवा नवीन बांधलेले एकंदर बत्तीस किल्ले होते, त्यांपैकीं वीस किल्ले[२] व त्यांच्या आसपासचा प्रांत त्यांनी जयसिंगाच्या स्वाधीन करावा; बाकीचे बारा किल्ले व त्यालगतचा प्रांत महाराजांनी आपणांकडे जाहगिरीदाखल ठेवावा; ह्याशिवाय विजापूरकरांच्या राज्यांतील जे प्रांत व किल्ले महाराजांनी काबीज केले होते ते त्यांच्याकडे निर्वेध राहावे; आणि ही सगळी आपणांस दिल्लीच्या बादशाहाकडून जहागीर मिळाली आहे असें समजून त्याचें अंकितत्व स्वीकारून महाराजांनी राहावें; त्याचा मुलगा संभाजी, जो ह्या वेळीं केवळ आठ वर्षांचा होता, त्याला बादशाहाकडून पाच हजार स्वारांची मनसब मिळावी; निजामशाहीतील आपले वडिलोपार्जित हक्क महाराज सोडून देतील. त्यांच्या मोबदल्यादाखल विजापूरसरकारच्या अंमलांतील प्रांताचा जो मुलूख मोगल जिंकतील त्यातून घाटावरचा पाच लाख होन उत्पन्नाचा व कोकणातला चार लाख होन उत्पन्नाचा प्रांत महाराजांना द्यावा; अदिलशहाच्या अंमलांतील घाटावरच्या प्रांताची चौथाई व सरदेशमुखी वसूल करण्याचा हक्क महाराजांना द्यावा व जंजिरा त्यांच्या स्वाधीन करावा.[३] ह्या शेवटल्या तीन अटी औरंगजेबास मान्य होऊन त्याबद्दलचे त्याच्याकडून फरमान आले तर महाराजांनी त्यास चाळीस लाख होन पेशखुष म्हणून द्यावे; ही रक्कम वर्षास तीन लाख

---

१ प्रो. सरकार म्हणतात की, पुरंदर किल्ल्यासभोवतालचे सगळे बुरुज व माच्या मोगलांनी सर करून तेथून मुख्य किल्ल्यांवर तोफांचा मारा चालविला. तेव्हा किल्ला शत्रूच्या हाती जाऊन आतल्या आपल्या उरलेल्या शूर शिपायांची कत्तल उडते व त्यांची बायका मुले त्याच्या हाती लागून त्यांची विटंबना होते ती टाळावी म्हणून महाराज फक्त सहा ब्राह्मण बरोबर घेऊन जयसिंगाच्या तंबूत तहाचे बोलणे करण्यासाठी गेले. ह्या वेळी जयसिंग त्या किल्ल्यापाशीच होता. तहाच्या अटी ठरत असतां त्याने किल्ल्यावर सारखा भडीमार चालविण्याचा हुकूम दिला होता. तो बंद करून किल्ल्यावरच्या लोकांस वाचवावे म्हणून महाराजांनी आपला एक कामदार खानाच्या सरदाराबरोबर पाठवून आतल्या लोकांस लढण्याचे बंद करून किल्ला खानाच्या स्वाधीन करावयास सांगितले.

२ कोणी म्हणतात, पंचवीस किल्ले व कोणी म्हणतात सत्तावीस किल्ले सोडून द्यावे असें ठरलें होतें. प्रो. सरकार म्हणतात कीं, तेवीस किल्ले सोडून देण्याचे त्यांनी कबूल केले. रा. राजवाडे यांनी आपल्या आठव्या खंडात मोंगलाकडील एक यादी प्रसिद्ध केली आहे. तीत ही संख्या वीस आहे. प्रो. सरकार तर तेवीस किल्ल्यांची नावेदेखील देतात. ह्या सगळ्या प्रांतांचे उत्पन्न चाळीस लाखांचे होतें. असें खाफीखान म्हणतो. ह्या प्रांताचे उत्पन्न दहा लाख रुपये होते असे म्हणतात. प्रो. सरकार वरील तेवीस किल्ल्यांचे उत्पन्न चार लाख होन म्हणजे वीस लाख रूपये व बारा किल्ल्याचे उत्पन्न एक लाख होन म्हणजे चार लाख रूपये होते असें म्हणतात.

३ प्रो. सरकार ह्या शेवटल्या दोन अटी देत नाहीत.

रुपयांच्या हप्त्याने भरावी व मोगलास साहाय्य करण्यासाठी महाराजांनी आणखी स्वार चाकरीस ठेवावे. महाराजांनी जयसिंगापाशी अशी अजिजी केली कीं, मी बादशहाचे अनेक अपराध केले आहेत, त्यांच्यापुढे दाखवायला मला तोंड नाही, तरी मला इतर सरदारांप्रमाणे बादशहाच्या दरबारात हजर राहण्याची सक्ती होऊ नये. माझा संभाजी त्यांच्या दरबारी राहील आणि तुम्ही दक्षिणेत मोहिम कराल तेव्हां मला सांगाल ती नोकरी बजावण्यास मी तत्पर राहीन!'

ह्या अशा कलमांची यादी जयसिंगाने अर्जाच्या रूपाने औरंगजेबाकडे पाठविली व अशी शिफारस केली कीं, 'शिवाजीमहाराज बादशहाच्या फार उपयोगीं पडतील. ते दक्षिण देशाचे केवळ किल्ली आहेत. त्यांची विजापूरकरांशी अशाने पुरी फारकत होण्याचा संभव आहे. शिवाय विजापूरकराचे इकडच्या डोंगरावरील व जंगलातील किल्ले व प्रांत काबीज करण्याचे काम अतिबिकट आहे, ते त्यांच्या मदतीने सहज साध्य होईल. हे आपल्या सेवकवर्गात सामील होतील तेव्हांच दक्षिणदेश जिंकता येईल.' या अर्जात महाराजांनी जयसिंगाच्या सूचनेवरून कृतापराधाची क्षमा मागून बादशहाचे दर्शन घेण्याची इच्छा दर्शविली होती.

हा अर्ज औरंगजेबाकडे गेल्यावर त्यानें महाराजांस एक मोठे पत्र लिहून त्यांच्या अर्जातील बहुतेक कलमे कबूल केलीं. विजापूरच्या राज्यात चौथाई व सरदेशमुखी हे हक्क वसूल करण्याचा अधिकार महाराजांनी मागितला होता, तो त्यानें त्यांस अशा अटीवर देण्याचे कबूल केलें कीं, जयसिंगास विजापूरकरांवरील मोहिमेत महाराजांनी आपल्या सैन्यानिशीं मदत करावी व ती शाही बुडविण्याच्या कामीं मनापासून झटावे व जें पेशखुष त्यांनी द्यावयाचे केलें होतें त्याचा पहिला हप्ता भरावा. जंजिऱ्यासंबंधाचें कलम मात्र त्यानें कबूल केलें नाही. जयसिंगाच्या विनंतीवरून औरंगजेबाने शिवाजीमहाराजांस फरमान व खिलात (शिरपाव) ही पाठविली. वर सांगितल्याप्रमाणे त्यांनी पुरंदर मोंगलांच्या स्वाधीन करून आणखी सिंहगड त्याचा सरदार किरतसिंग याच्या स्वाधीन केला आणि संभाजीला मोंगलांच्या उग्रसेननामक रजपूत सरदाराबरोबर जयसिंगाच्या छावणीत पाठवून दिलें.

कराराप्रमाणें महाराजांनी जयसिंगास विजापूरकरांवरच्या मोहिमेत दोन हजार स्वार व आठ हजार पायदळ एवढ्या सैन्यानिशीं मदत केली. पहिल्याने त्यांनी फलटणच्या बजाजीराव निंबाळकराशीं युद्ध करून त्याचा पुरा मोड केला व फलटण हस्तगत केलें. हा निंबाळकर महाराजांचा नातलग[१] असून त्यांच्यांशीं सलोख्याने कधींही वागला नव्हता. तो विजापूरसरकाराचा एकनिष्ठ सेवक म्हणविण्यांतच मोठे गौरव मानीत असे. ह्या निंबाळकराच्या ताब्यांत तत्तोरा नांवाचा किल्ला होता तोही महाराजांच्या मावळ्यांनी छापा घालून घेतला. ह्याप्रमाणें मार्गांत जे जे किल्ले लागले ते ते महाराज काबीज करीत चालले.

अल्ली अदिलशहा मोगलांशी झुंजण्याची कडेकोट तयारी करीत होता; परंतु मोगलांच्या मागण्यांचा कसाबसा निकाल लावून त्यांची मोहीम मागें परतून लावण्याचीही खटपट त्यानें चालविली होती. पण तीत त्यास यश मिळाले नाहीं. जयसिंग व दिलेरखान यांनी आपल्या फौजेसह विजापूरकरांच्या मुलखात प्रवेश करून प्रांत व किल्ले काबीज करण्याचा सपाटा चालविला. शेवटी मंगळवेढे येथें मोगलांची व विजापूरकरांची गांठ पडून मोठ्या निकराची लढाई झाली.

---

१ बजाजी निंबाळकराची बहीण सईबाई ही महाराजांस दिली होती आणि त्यांची मुलगी सखुबाई ही बजाजीचा मुलगा महादजी यांस दिली होती. असे सांगतात की, ह्या बजाजीला विजापूरास नेऊन अदिलशहाने अटकेत ठेविले आणि त्यांस असे सांगितले की, तुला जिवानिशी सुटून जावयाचे असेल तर मुसलमान हो! हे असे प्राणसंकट प्राप्त झाल्याकारणाने त्याने मुसलमानी धर्म नाईलाजास्तव स्वीकारला. तेणेकरून त्याच्या घराण्यात शेकडो वर्षे चालत आलेली जहागीर त्याच्याकडे कायम राहिली आणि अदिलशहाच्या मुलगीने त्याच्याशी विवाह केला. पण पुढें त्याला शिवाजीमहाराजांच्या मातुश्री जिजाबाई यांनीं मराठा मंडळ जमवून व प्राणान्त संकट ओढावल्यामुळे हे धर्मांतर त्याला करणें प्राप्त झाले ह्या सबबीवर त्याला शुद्ध करून घेण्यासाठी शास्त्राधार काढवून त्याला पुनः हिंदुधर्मात घेतले आणि तो असा पावन झाला. याविषयी कोणाच्या मनात किंतु राहू नये म्हणून त्यांनी शिवाजीमहाराजांची कन्या सखुबाई ही त्याचा मुलगा महादजी यास दिली असे म्हणतात.

त्यावेळीं विजापूरकरांच्या सैन्यात पुष्कळ मराठे सरदार होते. त्यांत महाराजांचे सावत्र भाऊ व्यंकोजीराजे हे प्रमुख होते. ह्या मराठे सरदारांनी ह्या युद्धांत आपल्या शौर्याची व युद्धकौशल्याची अगदी पराकाष्ठा केली. त्यांतून विशेषतः व्यंकोजीराजांनी फारच पराक्रम केला. इकडे मोगलांच्या तर्फेनें महाराज आणि प्रतापराव गुजर हे लढत होते. त्यांनी तर केवळ अचाट शौर्य व कुशलता प्रगट करून जयसिंगादी मोगलसरदारांस अगदी थक्क करून सोडिलें. जी जी कामगिरी त्यांस सांगितली ती ती त्यांनी उत्तम प्रकारे बजावून तींत पूर्ण यश संपादिलें. ह्या लढाईत विजापूरकरांचा अर्थात पराभव झाला. पुनः आणखी एक वेळ महाराजांनी किरतसिंगाबरोबर विजापूकरांच्या सैन्यावर हल्ला करून त्यांचा पुरा मोड केला.

महाराजांच्या अंगचे असें अलौकिक धैर्य, शौर्य व युद्धचापल्य पाहून जयसिंगराजा अगदीं दंग होऊन गेला. त्यानें त्यांची अतिशयित वाहवा करून औरंगजेबास लढाईच्या हकीगतीचे एक पत्र पाठविलें. त्यांत महाराजांची व त्यांच्या लोकांची अतिशयित स्तुती केली. त्यावरून त्या बादशहाने महाराजांस पुनः एक पत्र पाठवून त्याची त्यांत फारच तारीफ केली. आपल्या फौजेस असें उत्तम साहाय्य केल्याबद्दल त्याचें यथोचित गौरव केलें आणि आपल्या मेहरबानीचे सूचक म्हणून त्यास शिरपाव आणि रत्नखचित खंजीरही पाठवून दिली.

जयसिंगाने विजापूरापर्यंत शत्रूच्या लोकांस पिटाळीत नेले खरे; परंतु विजापूरास वेढा घालण्यास लागणारी तोफांची वगैरे सामुग्री त्याने बरोबर घेतली नसल्याकारणाने त्याला माघार घ्यावी लागली. दुसरे असे कीं, अदिलशहाने मोगलांशी टक्कर देण्याची जय्यत तयारी केली असून विजापूरच्या किल्ल्यात अन्नसामुग्री, लोक व तोफा वगैरे याची उत्तम तरतूद करून ठेविलीं होती. यास्तव ह्या वेळी त्यांच्याशी सामना केल्याने यशःप्राप्ती होण्याचा संभव त्याला फारसा दिसला नाही. तो आपले लोक घेऊन मागे फिरला तेंव्हा त्याच्यावर विजापूरकरांनी वारंवार हल्ले करून त्यास हैराण करण्याचा प्रयत्न केला; पण महाराजांच्या लोकांनी त्यांचे फारसे कांहीं चालू दिले नाही. ह्यावेळी नेताजी पालकर, ज्यास मोगल लोक प्रतिशिवाजी म्हणत, त्याने अतिशयित मर्दुमकी दाखविली असे म्हणतात. ह्याप्रमाणे पिछेहाट करावी लागली ती केवळ शिवाजीमहाराजांनी मनापासून साहाय्य केले नाही म्हणून करावी लागली असे दिलेरखान वगैरे सरदार म्हणू लागले आणि त्यांस अटकेत ठेवावे असे जयसिंगास सांगू लागले.[१] इकडे महाराजांनी जयसिंगाला असे सुचविले कीं, आपल्याबरोबर काही लोक दिल्यास आपण जाऊन विजापूरकरांकडचा पन्हाळा किल्ला सर करितो. हे त्यांचे म्हणणे कबूल करून त्याने त्यांस ह्या मोहिमेवर रवाना केले; परंतु त्या किल्ल्यावर विजापूरकरांचा बंदोबस्त उत्तमप्रकारचा असल्याकारणाने तीत त्यांस यश आले नाही. शिवाय नेताजी पालकर ह्या वेळीं महाराजांवर रुष्ट होऊन विजापूरकरांस जाऊन मिळाला होता. महाराजांचे हजार लोक ह्या किल्ल्यापुढे ठार झाले. तेव्हां निराश होऊन ते स्वतः विशाळगडाकडे निघून गेले आणि त्यांचे कांही लोक पन्हाळा किल्ल्याच्या आसपास धामधूम करीत राहिले. त्यामुळे त्या किल्ल्यावर सहा हजार लोक होते. त्यांस महाराजांचा किंवा मोगलांचा पाठलाग करिता आला नाही.

विशाळगडास आल्यावर महाराजांनी दोन हजार लोक एका मुसलमान सरदाराबरोबर देऊन फोंड्यास वेढा देण्यासाठी पाठविले. आतल्या विजापूरच्या लोकांनी दोन महिने किल्ला लढविला; पण शेवटी ते हार खाण्याच्या बेतात आले. इकडे अदिलशहाने रुस्तुमजमान, शिद्दीमसाऊद वगैरे सरादारांस बरोबर पाच हजार घोडेस्वार व एक हजार

---

१ मनुस्सी म्हणतो की, शिवाजीचा वध करावा अशी मसलत दिलेरखानाने जयसिंगाला अनेक वेळा दिली आणि तो ही गोष्ट करावयास धजत नसेल आपणाला ती करावयास परवानगी द्यावी. इंग्रज व्यापाऱ्यांच्या त्या वेळच्या लेखांवरून असे कळते की, शिवाजी महाराजांनी दिलेरखानास असे सांगितले की, आपण दोन दिवसांत विजापूर सर करू. ही अशी त्यांनी त्यास भर दिल्यावरून वीस हजार स्वार घेऊन तो विजापूरावर चालून गेला; परंतु त्याला या मोहिमेत यश आले नाही. यावरून दिलेरखान आपला प्राणघात करील ह्या भितीने महाराज पळून गेले. जेध्यांच्या शकावलीत म्हटले आहे की, महाराज जयसिंगाचा निरोप घेऊन रायगडास आले.

पायदळ देऊन फोंड्याचा वेढा उठविण्यास पाठविले. हे लोक तिकडे चालले असता वाटेत एका टेकडीवर शिवाजीमहाराज आपल्या थोड्या लोकांनिशी तळ देऊन आहेत अशी बातमी त्यांस लागल्यावरून त्याच्यावर एकदम घाला घालण्याचा त्यांनी बेत केला आणि त्या दिशेकडे त्यांनी आपला मोरचा फिरविला. बिनीच्या फौजेत महाराजांचा मित्र रुस्तुमजमान होता. त्याने रणवाद्ये वाजवून त्यांना शत्रूंजवळ आल्याचा इशारा दिला. त्याबरोबर त्यांनी तेथून पळ काढला. मसाऊदखानाने त्यांचा पाठलाग केला व त्यांचे दोनशे लोक ठार केले, पण ते त्याच्या तावडीतून निसटून गेले. शत्रूचे लोक पुष्कळ असल्याकारणाने त्यांनी त्यांच्याशी सामना केला नाही. त्यांचा पाठलाग करण्याचे सोडून मसाऊद परत येत असता महाराजांनी रुस्तुमजमानास स्नेहभावाची पत्रे पाठविली. ती त्याच्या हाती लागली ती त्याने अदिलशहाकडे पाठवून दिली. ती पाहून अदिलशहाने रुस्तुमखानास असे धमकीचे पत्र लिहिले कीं, 'तुमच्या ह्या निमकहरामीबद्दल तुम्हांस नोकरीवरून दूर करण्याची पाळी न यावीं असे तुम्हांस वाटत असल्यास फोंड्याचा वेढा उठविण्याची व्यवस्था करा!' त्यावरून रुस्तुमजमानाने आपल्या तिकडील एका अंमलदारास असा निरोप पाठविला कीं, साधेल तो उपाय करून फोंड्याचा वेढा उठवा. ह्या अंमलदाराने महाराजांच्या सरदारास वरून स्नेहभाव दाखवून त्यांच्या छावणीवर आकस्मात घाला घातला आणि त्यांच्या लोकांस फोंड्याजवळून उधळून लाविलें. हा असा दगा केल्यामुळे रुस्तुमजमानाविषयी महाराजांच्या मनांत वितुष्ट आले. रुस्तुमजमान इतकेच करून राहिला नाही. त्याने मोहिम पुढें चालवून फोंडे, कुडाळ, बांदे, डिचोली, साकळी वगैरे लहान मोठे गावं हस्तगत केले. ह्यानंतर महाराजांना औरंगजेबाच्या भेटीस जावे लागले म्हणून विजापूरांच्या मुलूखांत त्यांना पुनरपि लागलीच मोहिम करण्यास अवसर सापडला नाही.

ह्याप्रमाणे महाराज आपल्या मुलखात परत गेले आणि नेताजी पालकरासारखा शूर योद्धा विजापूरकरास जाऊन मिळाला हे कांही ठिक नाही, असे मनात आणून जयसिंगाने नेताजीस पाच हजारांची मनसब व आडतीस हजार रुपये रोख देऊ करून आपल्याकडे आणिलें.[१] ह्या वेळी आणखी कुतुबशाही अदिलशहाच्या मदतीस आल्याचे वर्तमान जयसिंगाला लागले. तेव्हां शिवाजीमहाराज त्यांस जाऊन मिळाले तर आपले कार्य मुळीच साधावयाचे नाही, असे त्यांस वाटून त्याने औरंगजेबास असे लिहिले कीं, ह्या प्रसंगी शिवाजीला कसेही करून अगदी आपलासा करून घेतले पाहिजे, तर त्यांस तुमच्या भेटीस पाठवून देतो. ह्या सूचनेवरून औरंगजेबाने महाराजांस एक पत्र पाठवून त्यांत त्यांचा पुष्कळ गौरव करून त्यांना दिल्लीस आपल्या दरबारी बोलाविले व असे आश्वासन दिलें कीं, तुम्ही इकडे आल्यावर तुमच्या सर्व अटींचा पुनः योग्य विचार करू. तुम्हांस मोठ्या योग्यतेस चढवू व मोठा किताब देऊन दक्षिणेत परत जाण्यास रजा देऊ. ह्याप्रमाणे महाराजांस पत्र पाठवून जयसिंगास असा हुकूम पाठविला कीं, 'शिवाजीराजे यांस वाटखर्चास एक लाख रूपये तिकडील तिजोरीतील देऊन आमच्या दरबारी जरूर पाठवून द्यावे.' हे पत्र आल्यावर जयसिंगाने महाराजांस अशी मसलत दिली कीं, तुम्ही दिल्लीस अवश्य जावे, मनात काहींएक किंतू धरू नये. तेथे माझा मुलगा रामसिंग आहे, तो तुमची सर्व तरतूद ठेवील. तो तुम्हाला कोणत्याही प्रकारचा दगाफटका होऊ देणार नाही. हा असा जयसिंगराजाचा आग्रह पडल्यामुळे महाराजांनी औरंगजेबाच्या भेटीस जाण्याचा निश्चय केला.

***

१ हा नेताजी पुढें काहीं दिवस जयसिंगाच्या लष्करात होता. शिवाजीमहाराज आग्रा येथे औरंगजेबाच्या भेटीस जाऊन त्याच्या अटकेतून सुटून आल्यावर औरंगजेबाने नेताजीस कैद करून आग्र्यास नेले. तेव्हा आपली सुटका व्हावी म्हणून त्याने मुसलमानी धर्म स्वीकारला आणि तेथे तो लहानशी मनसब मिळवून राहिला; पण पुढें १६७६ त तो तेथून पळून दक्षिणेत आला आणि मुसलमानी धर्माचा त्याग करून महाराजांकडे पुनः नोकरीस राहिला (खाफीखान).

भाग एकुणिसावा

आग्ऱ्यास प्रयाण
(१६६६–६७)

जयसिंगराजाचा अत्याग्रह पडल्यामुळें व औरंगजेबाचेही मोठे उत्तेजनप्रद पत्र आल्यावरून महाराजांनी दिल्लीस जाण्याचा ठराव केला व जयसिंगाच्या छावणीतून निघून ते रायगडावर आले. आपल्या मुख्य मुख्य सरदारांस व अंमलदारांस आपल्याकडे बोलावून आणून त्यांनी त्यास आपला दिल्लीस जाण्याचा विचार कळविला. त्यावर कित्येकांचा अभिप्राय असा पडला कीं, 'औरंगजेब केवळ दैत्य आहे. तो मोठा कपटी असून आपला हाडवैरी आहे. त्याचा विश्वास धरणे योग्य नाहीं. शिवाय दिल्ली येथून दोन महिन्यांच्या वाटेवर आहे. मार्गांत काय संकटे येतील याचा नेम नाहीं!' महाराज म्हणाले : 'आतां दिल्लीस जाणें प्राप्तच आहे. श्रीभवानीनेंही म्हटलें आहे कीं, 'दिल्लीस जाणें पडेल, पण तेथून मी निभावून आणीन.' तिकडे गेल्याने उत्तरेकडील मुलुख व दिल्लीदरबार ही पाहावयास मिळतील. आमच्या पूर्वजांनी उत्तरदेशीं राज्यें केलीं. त्या जगाचे आम्हांस अवलोकन घडेल व भागीरथी, यमुना आदिकरून महातीर्थांचें दर्शन घडेल. जयसिंगराजांनी आश्वासन दिलें आहे व आपणांस अनुकूल असा तहनामा बादशाहाकडून ठरून आला आहे. तेव्हां आतां भीतीचे काही कारण उरले नाहीं. इतकेही करून एखादा बिकट प्रसंग आला असतां त्यांतून आम्ही श्रींच्या कृपेने निभावून येऊ अशी आम्हांस धमक आहे!' ह्याप्रमाणें त्यांची हरकत मोडून काढून त्यांनीं संभाजीसह दिल्लीस जाण्याचा विचार कायम केला.

मग मोरोपंत पेशवे, अण्णाजी दत्तो सुरनीस व निळो सोनदेव मुजुमदार ह्या तिघांस सर्वाध्यक्ष नेमून त्यांनी त्यांच्या स्वाधीन सगळा राज्यकारभार केला, त्यांस रायगडावर रहावयास सांगितलें आणि एकंदर सरदारांस व कारकुनांस त्यांच्या हुकमांप्रमाणें वागण्याची ताकीद दिली. प्रतापराव वगैरे कांही जिव्हाळ्याच्या सरदारांस मातुश्री व राजाराम यांस संभाळावयास सांगून ते म्हणाले : ''एकंदर मुलखाची व्यवस्था व बंदोबस्त आजपर्यंत ठेवला आहे तसाच पुढें इमानाने व हुशारीनें ठेवा! राहिलेले गड, कोट, किल्ले व प्रांत यांचें जतन करा व संपादिलेल्या राज्यांत साधल्यास भर घाला. आम्ही दिल्लीस गेल्यावर आम्हांकडील बातमी हमेशा काढीत राहा. तिकडे कसाही प्रसंग आला तरी आम्ही डगमगणार नाहीं. हरयुक्तीनें त्यांतून पार पडून स्वदेशी येऊ. आम्हांस जयसिंगासारखे हिंदुराजे अनुकूल आहेत. आम्हांस कांही दगाफटका झाल्यास ते आमच्या वतीने भांडण्यास तयार होतील अशी आमची पूर्ण खात्री आहे. आम्ही तिकडे मोठ्या सावधगिरीने राहू, आमची चिंता तुम्ही करूं नये. मातुश्रीसाहेबांचें समाधान मात्र तुम्ही वरचेवर करीत राहा. आमच्यावर तिकडे यदाकदाचित् अस्मानीसुलमानी गुदरली तरी तुम्ही बिलकूल न घाबरता स्वराज्याचें रक्षण करा. राजारामाच्या नावे राज्यकारभार चालवा. तुमच्या इमानावर, हुशारीवर व हिंमतीवर पूर्ण विश्वास ठेवून सर्व राज्य तुम्हांस निरवून मी उत्तरेस जात आहें!''

ह्याप्रमाणें मागली सगळी व्यवस्था लावून महाराजांनी दिल्लीस जाण्याची सर्व तयारी केली. आपल्याबरोबर अगदीं निवडक लोक घेतले, ते असे कीं, कसाही प्रसंग आला असता बिलकूल न कचरता महाराजांप्रीत्यर्थ प्राणही देण्यास

ते सिद्ध होतील. त्यांच्याबरोबर निराजी रावजी शहाणे, त्रिंबकजी सोनदेव डबीर, दत्ताजी त्रिंबक, माणको हरि सबनीस[१] हे कारकून होते;[२] हिरोजी फर्जंद, राघो मित्र, दावलजी गाडगे[३], जिवा महाल्या हे हुजरे होते. शिवाय महाराजांनी आपल्याबरोबर धारकरी व मावळे मिळून सरासरी चार हजार चांगले निवडून घेतले होते.[४] निघतेसमयीं पुनः सर्व सरदारांच्या भेटी घेऊन महाराजांनी त्यांस नीट हुशारीनें राहावयास सांगितलें व श्रीभवानीचें दर्शन घेऊन ते मातुःश्रीचा निरोप घ्यावयास गेले. तिने त्याला परमप्रीतीनें पोटाशी धरून मस्तकी दयाहस्त ठेवला व डोळ्यांत आसवे आणून सद्गदित वाणीने असा आशीर्वाद दिला कीं, 'बाळा, तूं श्रीशंभू व श्रीजगदंबा यांच्या प्रसादाने यशस्वी होऊन परत सुरक्षित येशील. अविंध परम कृतघ्न, दुरात्मे व करुणाहीन आहेत. त्यांच्या दरबारी संभाजीबाळास घेऊन जात आहेस, ही गोष्ट काही सामान्य नव्हे. शिवबा, प्रवासांत मोठ्या सावधपणे वाग. संभाजीबाळाच्या प्रकृतीस जप. बादशहाची अदब रक्षून समयोचित वर्तन कर व स्वकार्य सिद्धीस नेऊन लवकर स्वदेशी ये! जयसिंगराजा सत्यवचनी आहे. तो मोठा धर्मशील व क्रियावंत हिंदुराजा आहे. त्याच्या मसलतीप्रमाणें वागून इष्ट उद्देश सिद्धीस ने! तू सुशील, सदाचारी व स्वधर्माभिमानी आहेस. जसे पंडुसुतांस श्रीकृष्णप्रसादानें भारतीय युद्धांत यश आलें, तशी तुला तुझ्या वडिलांच्या पुण्याई व श्रीजगदंबेच्या वरप्रसादानें यशःप्राप्ती होईल!' ह्याप्रमाणें मातुःश्रींचा आशीर्वाद घेऊन तिचे चरण वंदून महाराजांनी सईबाईचा निरोप घेतला.

मग पुन्हा एक वेळ औरंगाबादेस जाऊन जयसिंगराजाची भेट महाराजांनी घेतली. त्या वेळी जयसिंगाने त्यांस व त्यांच्या लोकांस मोठ्या थाटाची मेजवानी दिली व दिल्लीस गेल्यावर कोणत्या रीतीनें वागावे तें त्यास सांगितलें. त्याचा पुत्र रामसिंग हा बादशहाच्या दरबारांत होता.[५] त्यास एक पत्र देऊन त्यात त्यानें असें लिहिले की, 'महाराजांची बरदास्त उत्तम प्रकारे ठेवून त्यांस लागेल तें साहाय्य करण्यास बिलकूल कसूर करूं नये!' शेवटीं जयसिंगाने महाराजांची अशी खातरजमा केली कीं, 'तुम्ही दिल्लीहून परत येईपर्यंत मी दक्षिणेत राहतो व इकडे तुमच्या ताब्यातील प्रांतांस व किल्ल्यांस मोगलांकडून कांही एक उपद्रव होणार नाहीं असा बंदोबस्त ठेवतो. तिकडे गेल्यावर औरंगजेबानें तुमच्याशी कांहीं दगाबाजी केल्यास माझा पुत्र रामसिंग तर तुमचा बचाव करण्यास अवश्य झटेल. इतकेंच नव्हे तर, तो त्याबद्दल बादशहाशी विरोध करण्यास चुकणार नाहीं व मीही इकडून त्याची खोड मोडण्यास तयार होईन.'

येणेंप्रमाणें जयसिंगराजाचें पुनरपि आश्वासन घेऊन महाराज दिल्लीस जावयास निघाले. जयसिंगाने गाझीखाननामक एक सरदार महाराजांबरोबर मार्गदर्शक म्हणून दिला. आपण येत आहों हें कळविण्यासाठी त्यांनी आपला वकील पूर्वीच पाठविला होता. आपल्या भेटीस शिवाजीमहाराज येत आहेत असें कळले तेव्हां त्यानें त्यांस एक पत्र पाठविले कीं, 'तुम्ही मनात किमपि किंतू न धरता आमच्या दरबारी या. आम्ही तुमचा बहुमान करून तुम्हांस दक्षिणेत स्वदेशी जावयास निरोप देऊ. ह्यासोबत तुम्हास खिलात पाठविला आहे.' अशा आशयाचे त्यास पत्र पाठवून आणखी त्याने औरंगाबादेच्या तिजोरीतून त्याच्या वाटखर्चास एक लाख रुपये देण्याचा हुकूम पाठविला आणि आपले सर्व महालकरी व मोकासदार यांस अशीं ताकीदपत्रे पाठविली कीं, शिवाजीमहाराज आमच्या भेटीस येत आहेत. यास्तव त्यांचा जेथे जेथे फौजेसह मुक्काम होईल तेथील फौजदारांनी त्यांना भेटून त्यांस लागणाऱ्या घासदाणा वगैरे सामुग्रीची उत्तम तरतूद ठेवावी. शहाजाद्याप्रमाणें त्याची अदब सर्वांनी चालवावी. ही अशी आगाऊ सूचना गावोगाव गेल्यामुळें महाराजांचा

---

१ चिटणीस याचे नाव जीवनराम माणको असें देतो.

२ याशिवाय आणखी बाळाजी आवजी चिटणीस व नरहर बल्लाळ सबनीस हे होते असे चिटणीस म्हणतो.

३ याची नावे सभासद देत नाही. शि. दि. रघुनाथराव कोरडे, येसाजी कंक, तानाजी मालसुरे व बाळाजी आवजी यांची नावे देतो. जेध्यांच्या शकावलीत असे सांगितले आहे की, त्रिंबकपंत डबीर व रघुनाथपंत कोरडे शिवाजीमहाराजांबरोबर गेले होते आणि महाराज सुटून गेले तेव्हा त्यांस कैद केले होते.

४ ह्या लष्कराबरोबर प्रतापराव गुजर सरनोबत हा होता असें कित्येक बखरींत म्हटले आहे.

५ काहीं बखरकार म्हणतात की, हा रामसिंग दक्षिणेत आपल्या बापाबरोबर आला असून तेथून त्याला महाराजांबरोबर पाठविलें.

मुक्काम जेथे जेथे होई तेथे तेथे आसपासच्या गावातले लोक ह्या अशा वीर्यशाली व प्रौढप्रताप पुरुषाचे दर्शन घ्यावयास उत्सुक होऊन लोटत असत. महाराज स्वतः अत्यंत स्वाभिमानी व इभ्रतदार असल्याकारणानें त्यांस आपला यत्किंचितही अपमान सहन होत नाही हें गांवोगांवच्या महालकऱ्यांच्या व मोकासदारांच्या कानांवर पूर्वीच गेलें होतें. असा एक प्रकार महाराज औरंगाबादेस जयसिंगाच्या भेटीस दिल्लीकडे जावयास निघतांना गेले तेव्हां घडला होता. तो असाः महाराज शहरापाशीं आले असें ऐकून तेथील लोक त्यांची मोठ्या थाटाची स्वारी पाहावयास शहराबाहेर लोटले. शहरचा नायब सुभेदार साफशीखान हा ृमहाराजांचा द्वेष करत असल्याकारणाने त्यांना स्वतः सामोरा न जाता त्याने आपल्या पुतण्यास त्यांना सामोरा पाठविला. ही बेपरवाई पाहून त्यांस राग आला व ते जयसिंगाच्या गोटाकडे जावयास निघाले. ते पाहून तो अमीर म्हणाला, 'सुभेदारसाहेब दरबार भरवून आपली वाट पाहात आहेत, तिकडे पहिल्याने चलावें.' हें ऐकून महाराज म्हणाले : तुमच्या सुभेदारांच्या मनांतून आमचा बहुमान करावयाचे होतें तर ते स्वत: आम्हास कां नाही सामोरे आले?' असें बोलून त्याला व त्याच्या बरोबरच्या लोकांना परत जावयास सांगून ते स्वतः आपल्या लोकांनिशीं जयसिंगाच्या वाड्यांत गेले. मग तो सुभेदार आपल्या हाताखालच्या सर्व अंमलदारांसह महाराजांच्या भेटीस आला व त्यानें झालेल्या गोष्टीबद्दल क्षमा मागून त्यांचें समाधान केलें व त्यांस मोठी मेजवानी दिली. त्याप्रमाणेंच इतर उमरावांनीही महाराजांस मेजवान्या वगैरे करून त्यांचा बहुमान केला.[१]

स्वराज्य सोडून जाण्यापूर्वी आपल्या किल्ल्यांचा बंदोबस्त आपले लोक आपण लावून दिलेल्या शिस्तीप्रमाणें आपल्या मागें कसा काय ठेवितात हें पाहण्यासाठीं महाराज एका किल्ल्यावर रात्रीच्या प्रहरीं अकस्मात् गेले आणि आतील हवालदारास हाक मारून म्हणाले कीं, 'किल्ल्याच्या दरवाजाशी शिवाजीमहाराज आले आहेत. गनिमांची झड मागें आहे. त्यांस दरवाजा उघडून आत घ्या!' हें ऐकून त्या किल्लेदारानें आपले लोक तटावर जमवून उत्तर दिलें कीं, रात्रीस दरवाजा कदापि उघडू नये अशी महाराजांनी कैद करून दिली आहे. यास्तव दरवाजा ह्या वेळीं उघडता येत नाहीं. शत्रू आला असल्यास घेऱ्याच्या लोकांकडून त्यास रोखून धरितो आपण तटालगत दरवाजानजीक असावें. शत्रू पुढें चालून न येईल असा बंदोबस्त करितो!' यावर महाराजांनी असें म्हटलें कीं, 'आज्ञाही आमचीच, व दरवाजा उघडण्यास परवानगीही आमचीच ! आम्ही खुद्द सांगत आहों मग तुम्हांला काय हरकत? दरवाजा उघडणार नाहीं तर तुम्हांस शिक्षा होईल. तुम्ही इतबारी चाकर. तुम्ही आमच्या हुकमाप्रमाणें वागलेंच पाहिजे!' असें दरडावून सांगितलें तरी किल्लेदार न घाबरतां म्हणला, 'आता रात्र थोडी उरली आहे. मागून येणाऱ्या गनिमांचे काहीएक चालू देत नाही.' असें बोलून त्यानें महाराजांस रात्रभर बाहेरच थोपवून धरिलें. प्रातःकाळ झाला तेव्हां हवालदार वगैरे किल्ल्यांतील अंमलदार हात बांधून दरवाजाजवळ आले आणि कुलपे काढून महाराजांस आत घेऊन म्हणाले, 'आम्ही अन्यायी आहों पारिपत्य करणें असेल तें करावे.' हें त्यांचें वर्तन पाहून महाराज फार संतोष पावले व त्यास नांवाजून त्यांनी त्यांची बढती केली. ह्याप्रमाणें आपल्यामागे आपल्या किल्ल्यांचा बंदोबस्त नीट राहील अशी खात्री वाटून महाराज आपल्या लोकांसह दिल्लीस निघून गेले.

ह्या समयी औरंगजेब आग्र्यास जाऊन राहिला असून तेथेच त्याचा सगळा दरबार असे यास्तव महाराज दिल्लीस न जाता आग्र्यास[२] गेले. ते जवळ आले असे कळले तेव्हा औरंगजेबाने रामसिंग व दुसरा एक अंमळ कमी दरजाचा सरदार असे त्यांना सामोरे पाठविले. अशा सामान्य सरदारास आपणाला सामोरे पाठविले हा आपला अपमान झाला असे महाराजांस वाटले; परंतु त्या वेळी हा अपमान त्यांनी मुकाट्याने सहन केला. त्यांच्यासाठी जी हावेली ठरविली होती तींत त्यांनी आपल्या लोकांनिशी मुक्काम केला व बादशहाच्या भेटीचा दिवस ठरविण्याविषयी रामसिंगास सांगितले.

---

१ स्कॉटवेरिग व बुंदेले यांच्या इतिहासातून हा मजकूर घेतला आहे.

२ मराठी बखरी व ग्रांट डफ यांच्या आधारावरून प्रथमावृत्तीत औरंगजेबाचा दरबार दिल्लीस असून महाराज त्या शहरी गेले असे लिहिले होते; परंतु शहाजहान सन १६६६ च्या जानेवारी महिन्यात मरण पावल्यावर औरंगजेबाने आपला दरबार आग्र्यास नेला व तेथेच तो बहुतेक कायमचा राहिला. यावरून हे स्पष्ट होते की, महाराज रायगडावरून निघाले ते दिल्लीस जावयास म्हणून गेले असावें; परंतु औरंगजेबाचा दरबार आग्र्यास गेल्यामुळे ते तिकडे गेले. खाफीखानाच्या बखरीत व जेध्यांच्या शकावलीत बादशहाची मुलाखत आग्र्यासच झाली असे. रा. राजवाडे आठव्या खंडात असेच म्हणतात.

ह्या वेळीं महाराजांनी रामसिंगापाशी असा आग्रह धरला कीं, बादशहाची व आपली भेट बरोबरीच्या नात्याने होईल अशी व्यवस्था करावी.' परंतु त्याच्यावर रामसिंगाचे म्हणणें असे पडलें कीं, 'बादशहा सार्वभौम आहे. तो आपल्यासारख्या छोट्या राजास बरोबरीचा मान देणार नाहीं. यासाठीं असली अट त्याला कळविणे प्रशस्त दिसत नाही.'

इकडे औरंगजेबाने महाराजांच्या व त्यांच्याबरोबर आलेल्या लोकांच्या खर्चाची वगैरे तरतूद चांगली ठेवली होती; परंतु त्यांच्या मनांत ह्या वेळीं महाराजांविषयीं अंमळ वैरभाव जागृत होऊन त्यांचा नाश करण्याची बुद्धी त्याला सुचण्यास एक मोठे कारण झालें. शास्ताखानाची बायको ह्या प्रसंगीं दिल्लीत होती. तिच्या मनांत अर्थात् महाराजांविषयी पराकाष्ठेची द्वेषबुद्धी वागत होती; कारण तिच्या पुत्राचा वध महाराजांच्या हातून झाला असून तिच्या नवऱ्याच्या फजितीला तेच कारण झाले होते. तिने बादशहाच्या जनानखान्यांत आपला वशिला लावून त्यातील स्त्रियांची मनें महाराजांसबंधानें कलुषित केली व त्यांच्याकडून बादशहास अशी विनंती करविली कीं, शिवाजीमहाराज हातीं सांपडले आहेत; त्यांचा काहीएक गौरव न करता त्याचा वध करावा. ह्यामुळे त्याचें मन फिरून तो महाराजाचा घात करण्यास उद्युक्त झाला. हा त्याचा बेत दरबारच्या अमीरउमरावांस कळला तेव्हां त्यांनी त्याला असा अर्ज केला कीं, हजरतीच्या शब्दांवर आमच्यासारख्यांचे जीवित अवलंबून आहे. असा विश्वासघात केल्याने जयसिंगराजांसारखे बलाढ्य हिंदुसरदार आपल्या पदरी आहेत ते बेदिल होऊन बंड करतील. ही मसलत ऐकून त्यानें आपला बेत रहित केला.

रामसिंगानें बादशहापाशीं जाऊन भेटीचा दिवस ठरविला. बादशहाचा पन्नासावा वाढदिवस ता. १२ मे सन १६६६ रोजी होता. त्या दिवशीं मोठा दरबार भरावयाचा असून सर्व अमीरउमराव त्याला मुजरा करावयास व नजरनजराणा द्यावयास येणार होते. ह्या दिवशी शिवाजीमहाराजांस दरबारास घेऊन यावें असे बादशहाने रामसिंगास फर्माविले. बादशहाने त्या दिवशी मोठ्या तरतुदीने दरबार भरविला. मोठमोठ्या इमानी सरदारांस व पठाणांस चांगले सज्ज करून आपल्या तक्ताच्या आसपास जागोजागी नंग्या तरवारीनिशीं उभे केले. कारण त्यास अशी दहशत होती कीं, शिवाजी महाराज कांहीं सामान्य पुरुष नव्हे; तो केवळ सैतान आहे! प्रसंग पडल्यास तो पंचवीस-पंचवीस हात उडी मारितो! बादशहाने असा कडेकोट बंदोबस्त करून आपल्या आसनाजवळ पाच हत्यारे अगदी तयार ठेविली असून अंगांत चिलखत चढविले होतें व वरून मझलीनचा झगा घातला होता. त्या दिवशी दरबारास एकंदर सरदार व शेटसावकार आले होते. महाराजांस पाहण्याची सर्वांस उत्कंठा लागून राहिली होती. जनानखान्यांतील स्त्रियांनाही त्यांस पाहण्याची उत्कट इच्छा झाल्यावरून त्यांची पडद्याआड बसावयाची व्यवस्था केली होती.

दरबाराची वेळ झाली तेव्हां महाराज आपल्याबरोबर थोडेसे निवडक लोक घेऊन रामसिंगासमवेत कचेरीस आले. त्यांनी रीतीप्रमाणें कुरनिसात करून[१] बादशहाच्या तक्तापुढें नजराणा ठेविला[२], त्याची रामसिंगानें नेहमींच्या रिवाजाप्रमाणें रुजवात केली. औरंगजेबाने त्यांना कुशल प्रश्न विचारले. त्यांची समर्पक उत्तरे महाराजांनी दिल्यावर त्यांना उजव्या हातास साधारण प्रतीचे अमीर उभे होते त्यांत जाऊन उभे राहावयास त्यानें हाताने खूण केली. त्याप्रमाणें महाराजांस त्या बाजूस रामसिंगानें नेले त्याना त्याच्याबरोबर तिकडे निरुपायास्तव जावे लागले; पण तेथें जाऊन बाकीच्याबरोबर उभे न राहता ते खाली बसले आणि रामसिंगास त्यांनी विचारिलें कीं, ह्या अमिरांचा दर्जा काय आहे?[३] ते पंचहजारी मनसबदार आहेत, असा जबाब त्याच्याकडून मिळाला तेव्हा त्यांस अतिशयित राग आला, आणि ते त्याला म्हणाले कीं, 'बादशहाने माझी गणना अशा साधारण अमिरांत केली हा माझा मोठा अपमान

१ चिटणीस म्हणतो कीं, त्यांनी कुरनिसात केला नाहीं व रामसिंगानें तो प्रसंग मारून नेला. सभासद म्हणतो की, त्यांनी तीन वेळां भुईस हात लावून सलाम केला; पण तो मनांत असा अर्थ आणून केला की, एक सलाम शंबुमहादेवास, दुसरा श्रीजगदंबेस आणि तिसरा शहाजीराजांस.

२ पंधराशे मोहरा नजर म्हणून व सहा हजार रुपये निसार म्हणून बादशहापुढें ठेविले असे प्रो. सरकार म्हणतात.

३ कित्येक मराठी बखरींत व बुंदेल्याच्या बखरीत असा उल्लेख आहे की, महाराजांनी आपल्या पुढे उभ्या असलेल्या एका रजपूत सरदाराचे नाव रामसिंगास विचारिले. त्याने त्यांचे नाव रायारायसिंग शिसोदे म्हणून सांगितल्याबरोबर महाराज रागाने बोलले. 'माझी रायसिंगाशी बरोबरी केली काय? माझा सात वर्षांचा मुलगा व माझा नोकर नेताजी पालकर यांस पाच पाच हजारांच्या मनसबी दिल्या. मी बादशहाची एवढी कामगिरी बजावली असून मला असा हलका दरजा द्यावा काय? मी ह्या दरबारात आलो तो असा हलका दरजा स्वीकारण्यास काय?' प्रो. सरकार, (पृ. १७५). सभासद व चिटणीस म्हणतात की, या सरदाराचे नाव जसवंतसिंग असे होते. पण तो सात हजारी मनसबदार असल्याकारणाने पुढल्या रांगेत बादशहापुढे उभा असावा असे प्रो. सरकार म्हणतात.

झाला आहे ! मी यांच्याबरोबर उभा राहण्यास राजी नाहीं!' असें बोलून त्यांनी रामसिंगापाशी कट्यार मागितली.[१] हा प्रकार बादशाहाने पाहून काय गडबड आहे म्हणून विचारले. तेव्हां जवळच्या अमिरांनी महाराजांचे म्हणणे त्याला कळविले.[२] त्याबरोबर बादशहा दचकला, व ह्या समयी हा काय करील कोण जाणे अशी दहशत वाटून त्यानें रामसिंगास हुकूम केला कीं, शिवाजीराजांस निरोपाचे विडे देऊन डेऱ्यास घेऊन जावे. उदयिक पुनः मुलाखत होईल. त्यावरून रामसिंगानें महाराजांस दरबारांतून बिऱ्हाडी नेले.[३]

ह्यानंतर पुनः महाराजांस औरंगजेबाच्या मुलाखतीचा प्रसंग आला नाहीं. कारण बादशहा त्यांस पुनः भेटण्यास राजी नव्हता. हा त्याचा ठराव कळला तेव्हां त्यांस फार वाईट वाटलें, व बादशहाच्या मनांत आपणाविषयी पुरें कपट वसत आहे अशी त्यांची खात्री होऊन त्यांस अंमळ भीतीही वाटली. मग त्यांनी बादशहाचा मानस तरी काय आहे तें समजण्यासाठी रामसिंगास त्याच्याकडे पाठविलें. औरंगजेबाने त्यास असें सांगितलें कीं, शिवाजीमहाराजांस आमच्याच दरबारींच ठेवून घेऊन मोठमोठी कामे सांगावी असें आमच्या मनांत आहे. दक्षिणेंतील त्यांची जहागीर आहे तीसंबंधानें त्यांच्या इच्छेप्रमाणें करार होऊन चुकलेच आहेत. ही जहागीर त्यांनी आपल्या पुत्राच्या नावे चालवावी. इकडे त्यांना करोडो रुपयांची नवी जहागीर करून देऊं. लाख पन्नास हजार फौज हाताखाली घेऊन त्यांनी ह्या प्रांतीच मोठमोठ्या कामगिऱ्या कराव्या. त्यांच्यासारख्या शूर, चतुर व कर्तबगार पुरुषाच्या गुणांचे चीज ह्या दरबारी उत्तम होईल.

हा बादशहाचा विचार महाराजांना मुळींच आवडला नाहीं. शिवाय हा विचार प्रांजलपणाचा आहे असें तर त्यांस बिलकूल वाटलें नाहीं. तो कपटी व धूर्त असून, आपणांस इकडे गुंतवून टाकून आपला दक्षिणेतील काटा अजीबात काढून टाकण्याचा त्याचा इरादा आहे, हें त्यांस कळून चुकले होतें मग त्यांनी आपला वकील रघुनाथपंत यास त्याच्याकडे पाठवून असा अर्ज केला कीं, 'बादशहानें मला विशेष बढतीची आशा दाखवून इकडे बोलाविले.[४] त्यावरून मी येथें आलों. मीं त्याची कोणती कामगिरी केली आहे ती त्यास महशूर आहेच. जयसिंगराजाच्या विद्यमाने जे करारमदार झाले आहेत त्याबरहुकूम वागण्यास मजकडून लवमात्रही कसूर व्हावयाची नाहीं. अदिलशाही व कुतुबशाही खालसा करण्याचा बादशहाचा इरादा आहे, तो सिद्धीस नेण्यास मी मनापासून साहाय्य करीन.[५] त्याच्या सैन्यास दक्षिणेत लागेल ती मदत करीन.

---

१ ह्यावरून असे अनुमान होतें की, महाराजांस दरबारात निःशस्त्र येण्यास सांगितले होते. आता त्यांनी कट्यार कशासाठी मागितली, तें समजत नाही. बुंदेले म्हणतो की, शिवाजी महाराजांना ह्या अपमानाबद्दल फार वाईट वाटून त्या दुःखाच्या झटक्यासरशी ते मूर्च्छित झाले. तेव्हा त्यांस स्नानगृहात न्यावयास सांगितले. तेथे त्यांस वारा घालून व गुलाबपाणी अंगावर शिंपडून सावध केलें. दरबाराचा थाटमाट व चकचकाट पाहून ते असे घाबरून बेशुद्ध झाले असा ह्या इतिहासकाराचा तर्क आहे! तो आणखी म्हणतो की, शुद्धीवर आल्यानंतर त्यांनी आपणांस आपल्या बिऱ्हाडी न्यावयास सांगितले. तेथे गेल्यावर ते वेड्यासारखे चाळे करून बरळू लागले. ते मोठमोठ्याने ओरडून म्हणतात की, मी वेडा ह्या गरुडाच्या नखीत सापडलो. तो मला लवकर ठार का मारीत नाही?

२ ऑर्मी म्हणतो की, महाराजांस बादशहाच्या भेटीस नेले तेव्हा त्यांच्या अंतस्थ हेतूबद्दल त्यांनी त्यास दोष दिला व ते म्हणाले की, शास्ताखानावरील प्रसंग व सुरतेची लूट ह्या दोन गोष्टींवरून माझी योग्यता तुम्हांस कळलीच असेल, असें बोलून ते आपला खंजीर काढून आपल्या उरात खुपसून घेऊ लागले; पण त्यांचा हात जवळच्या लोकांनी धरला व बादशहाने त्यांचें समाधान करून असें आश्वासन दिलें की, तुमच्या जीवास जरासुद्धा धक्का लागणार नाहीं. तुम्ही आमच्या पदरी राहून आम्हांस कंदाहारच्या स्वारीत मदत करावी.

३ त्यांना शिरपाव, जवाहीर व हत्ती देण्यासाठी बादशहाने तयार ठेविले होते, ते अर्थात् या गडबडीमुळे त्यानें त्यास दिले नाहींत. असें खाफीखान म्हणतो.

४ मनुस्सी म्हणतो कीं, महाराज मोंगलदरबारी गेले म्हणजे त्यास बादशहाच्या सरदारमडळांत पहिली जागा देण्याचे कलम जयसिंग व बादशहा यानी शपथेवर केलेल्या करारात होते. हा करार त्यांनी पाळला नाही. महाराज आग्र्याहून परत आल्यावर त्यांस मोंगलांच्या दक्षिणेतील प्रांताचे सुभेदार नेमण्यात येईल, असे जयसिंगाने त्यांस अभिवचन दिले होते. असे कित्येक मराठी बखरकाराचे म्हणणे आहे ते प्रो. सरकार विश्वसनीय असावें असे म्हणतात. खाफीखान म्हणतो की, महाराजांस फार तर मोंगल दरबारातून सात हजाराची मनसब मिळाली असती. कारण त्यांचा पुत्र संभाजी व त्यांचा सरदार नेताजी यास प्रत्येक पाच-पाच हजारांची मनसब अगोदर मिळाली होती. तो आणखी म्हणतो की, महाराजांशी केलेले करार जयसिंगाने बादशहास कळविले नव्हते.

५ सभासद म्हणतो कीं, आपणांस बादशहाने दक्षिणचा मुख्य सेनापती नेमिले तर आपण विजापूर व गोवळकोंडे जिंकून देतो असे महाराजांनी जयसिंगास सांगितले होते आणि जयसिंग ह्या गोष्टीस कबूल झाला होता. यावेळी कंदाहार जिंकून देतो असे महाराजांनी बादशहास कळविल्याचे एका यवनी बखरींत आहे.

इकडे परक्या मुलखात राहून बादशहाची नोकरी मजकडून जितकी होण्यासारखी आहे, तिजहून पुष्कळ चांगली नोकरी मी दक्षिणेत राहिल्यानें होणार आहे. यास्तव मला इकडे राहण्याचा आग्रह करणें बादशहाच्या हिताचे नाहीं व तें माझ्याही हिताचे नाहीं. या शिवाय मला माझ्याबरोबर आलेल्या माझ्या लहान मुलास व माणसांस ह्या देशाची हवा मुळींच मानवणार नाहीं. ह्यासाठी मला माझ्या लोकांसह दक्षिणेत परत जाण्याची परवानगी द्यावी.'

ह्या अर्जास बादशहाने निश्चित असें कांहींच उत्तर दिलें नाहीं. महाराजांना दिल्लीसच ठेवून घेतलें म्हणजे दक्षिणेंतील बहुतेक त्रास कमी होऊन आपला उद्देश बिनधोक शेवटास नेता येईल असें त्यांच्या मनाने पूर्णपणे घेतले होतें. त्याला तेथें अडकवून ठेवल्याने ते आज नाहीं उद्या वठणीस येऊन आपले पुरे ताबेदार होतील असें त्यास वाटलें होतें. खरें म्हटले असतां महाराज त्याच्या तावडीत सापडले असल्यामुळें त्यांचा पुरा नाश करण्याची उत्तम संधी ह्या समयी प्राप्त झाली होती. परंतु जयसिंगराजाच्या मध्यस्थीनें त्यांच्याशी करार झाले असल्याने दगा करण्याचें धैर्य त्याला झालें नाहीं.[१] शिवाय अशा वीर्यशाली व तेजस्वी पुरुषाचा साधल्यास योग्य उपयोग करून घ्यावा असेही त्याच्या मनांत आलें असावें. मग बादशहाने रामसिंगाच्या मध्यस्थीनें महाराजांस आपल्या दरबारी राहण्याविषयीं अनेक प्रकारीं लालूच दाखवून पाहिले; परंतु ते त्याच्या त्या म्हणण्यास बिलकूल कबूल होईनात.

जाफरखाननामक[२] एक अमीर बादशहाच्या मोठ्या मर्जीतला होता. त्याचें शास्ताखानाशीं मेहुण्याचे नाते होतें. त्यानें बादशहाला अशी मसलत दिली कीं, शिवाजीमहाराज सामोपचारानें दरबारी सरदारी पतकरून राहण्यास कबूल होत नसल्यास त्यांना वाटेल ती जरब दाखवून आपल्या काबूत ठेवावे, सोडून देऊं नये. ही मसलत त्यास पसंत वाटून त्यानें त्याप्रमाणे करण्याचें मनांत आणिलें. हें वर्तमान महाराजांस कळले तेव्हां ते जाफरखानाच्या मुलाखतीस गेले व त्यास भेटून म्हणाले कीं, 'आपण बादशहाच्या कृपेंतले आहां. आम्हास वचने दिल्याप्रमाणें सरंजाम वगैरे देऊन परत दक्षिणेत पाठविण्याची व्यवस्था आपण बादशाहाकडून करविण्याचें यश घ्यावे.' ह्या विनंतीस त्या कपटी खानाने वरवरून हुकार दिला. त्याचें असें बोलणे चालले असतां त्या खानाची बायको, जी शास्ताखानाची बहीण होती, तिने अंतर्गृहातून बाहेर खानास असें गुप्तपणे सांगून पाठविलें कीं, 'शिवाजीमहाराजांबरोबर फार वेळ बोलत बसू नका. त्यांना लवकर निरोप द्या. ते केव्हा काय करितील याचा नेम नाहीं!' ही सूचना येताच खानाने त्यांना निरोपाचे विडे दिले. हा वजीर वळत नाही असे पाहून आपणांस एकांत भेटीचा लाभ दिल्यास आपणाला बादशहाशी कांहीं गोष्टी बोलता येतील असा अर्ज महाराजांनी केला; परंतु जाफरखानाला शास्ताखानाकडून असे पत्र आले होते कीं, शिवाजीमहाराज मोठे चेटकी आहेत, त्यांच्याशी एकांत भेटीचा योग आणून बादशहांनी आपला जीव धोक्यात घालू नये. हे पत्र बादशहाला दाखवून त्या वजिराने त्यास शिवाजीमहाराजांची मुलाखत पुनरपि घेऊ नये अशी मसलत दिली. खरें म्हटलें असतां ह्या अशा सूचनेची त्याला मुळीं गरज नव्हती. ज्याने अफझुलखानास त्याच्या दहा हजार लोकांदेखत भर दिवसा पुरा केला, व शास्ताखान वीस हजार सैन्याच्या मध्यभागी आपल्या जनानखान्यात कडेकोट बंदोबस्ताने निजला असता त्याला गाडून जखमी करून तो सहज निसटून गेला, त्याचा असा भरवसा औरंगजेबासारख्या मोठ्या धूर्त व कपटी मनुष्याला वाटणे शक्य नव्हते; शिवाजीमहाराज मोठा पंचाक्षरी आहे. त्याचा वायुमय देह असून त्याला पंख आहेत आणि तो आपल्या शत्रूवर चाळीसपन्नास हातांवरून झडप घालतो असा प्रवाद सर्वत्र पसरला होता. तेव्हां अर्थात त्यांची सदरील विनंती बादशहाने मनास आणिली नाही.

---

१ मुसलमान बखरकार म्हणतात की, महाराजांस पाहावयास जनानखान्यांतील स्त्रियांमध्यें बादशहाची निसाबेगम नांवाची एक मुलगी होती. तिनें महाराजांची कीर्ती व पराक्रम पूर्वी ऐकलेच होते. त्यांचें स्वरूप व तेज ह्या वेळी प्रत्यक्ष पाहून व त्यांचा स्वाभिमान व वीरपुरुषास अनुरूप असें उद्धत आचरण पाहून ती मोहित व चकित झाली आणि तिने आपल्या बापापाशी त्यांच्या संबंधानें रदबदली करून त्याच्या दुष्ट उद्देशापासून परावृत्त केलें.

२ हा त्याचा वजीर होता असे प्रो. सरकार म्हणतात.

औरंगजेबानें महाराजांस जरब दाखवून आपल्या म्हणण्यास अनुकूल करून घेण्याचा इरादा कायम करून शहराचा कोतवाल पोलादखान यास असा हुकूम केला कीं, शिवाजी महाराजांच्या हवेलीस पाचहजार लोकांनिशीं चौकी द्यावी.[१] कोणास आतबाहेर परवान्यावांचून जाऊं देऊं नये. शिवाजीमहाराजांस कोठे जाणें झाल्यास आपल्या लोकांचा सक्त पाहारा त्याच्याबरोबर असावा. ही अशी सक्त चौकी ठेवण्याविषयींचा हुकूम सुटला तेव्हां महाराजांनी रामसिंगाकडून बादशहास असें सांगविलें कीं, 'मी तुमची ताबेदारी स्वीकारून सर्व दक्षिण हस्तगत करून देण्यास तयार झालो असतां मजवर भरवंसा पटत नाही, व मला दक्षिणेत जावयास कराराप्रमाणें हुकूम मिळत नाहीं, त्यापेक्षा बादशहाच्या मर्जीप्रमाणें येथेंच सरदारी पतकरून राहाण्यास मी सिद्ध आहे.' ह्यावर बादशहाचे असें म्हणणें पडलें कीं, राजांचे अंतःकरण शुद्ध आहे असें वाटत नाहीं. हुजूरची चाकरी पत्करून राहावयास सांगितलें असतां ते ऐकताना यास्तव आम्हांस असा बंदोबस्त करणें प्राप्त झालें आहे. त्यांच्या मनातील एकंदर किल्मिष जाऊन त्यांचें दिल आमच्याविषयी साफ होईपर्यंत त्यास अशा अटकावांत ठेवावयाचे आहे. बाकी म्हणाल तर जयसिंगराजे व दिलेरखान याच्या विद्यमाने झालेल्या करारनाम्यानें आम्ही गुंतलो आहो. तेव्हां त्यांस शिक्षा करण्याचें आम्हांला काय प्रयोजन आहे? जसे तुम्ही आमचे विश्वासू सरदार आहा तसेच ते आमचे सरदार होऊन आमच्या आज्ञेत निखालसपणे वागतील असें करा, म्हणजे सर्व काही ठीक होईल!'

बादशहाचे हें म्हणणें रामसिंगानें महाराजांस कळविले तें ऐकून त्यांचा निरुपाय झाला. त्यांच्या सभोवती बादशहाच्या लोकांचे चौक्यापहारे कायमचे बसले. यांतून सुटून जावें कसें हा विचार आतां त्यांस प्राप्त झाला; परंतु आपल्या शत्रूस किंवा आपल्या पदरच्या लोकांस आपण घाबरलो आहों असें बिलकूल न दाखविता त्यांनी असा विचार केला कीं, आपल्याबरोबर आलेले लोक शत्रूच्या तावडीतून सुटून जाण्याची युक्ती निर्विघ्नपणें पार पडावी. यास्तव त्यांनी बादशहापाशीं असा अर्ज केला की, 'आमच्या बरोबर आलेल्या लोकांस उत्तरदेशाची हवा मानवत नाही, तें वारंवार आजारी पडतात. ह्याकरता त्यांस तरी स्वदेशी निघून जाण्याची परवानगी मिळावी. जेवढी माणसे आवश्यक लागतील तेवढीच ठेवून घेतो. असें केल्याने सरकारास विनाकारण होणारा खर्चही टळेल.' बादशहाला हा त्यांचा विचार पसंत पडला. आणि त्यानें त्यांस निघून जाण्याचे परवाने दिले; मग महाराजांनी कांहीं निवडक लोक व थोडी कारकून मंडळी मागें ठेवून इतरांस रवाना केलें. हे लोक महाराजांस शत्रूच्या कचाट्यात सोडून जाण्यास राजी होईनात. तेव्हा त्यांनी त्यांची अनेक प्रकारीं समजूत करून असें आश्वासन दिलें कीं, 'तुम्ही माझ्याविषयी काहीएक काळजी करू नका. मी शत्रूच्या तावडीतून सुटून लवकरच परत येतो तुम्ही बेलाशक निघून जा. तुम्ही येथें राहिल्यानें माझी युक्ती साधणे दुरापास्त होईल.' असें निक्षून सांगितल्यावरून ते विश्वासू व स्वामिनिष्ठ सेवक निरुपायास्तव त्यांना सोडून स्वदेशी निघून गेले.

इकडे औरंगजेबाने जयसिंगास पत्र पाठवून शिवाजीमहाराजांस कोणती अभिवचने दिली होती म्हणून विचारले असता जयसिंगाने पुरंदरच्या तहाच्या कलमांखेरीज आणखी कोणत्याही प्रकारचा करार महाराजांशी केला नव्हता असा जबाब पाठविला; परंतु महाराजांस बंदीत ठेवल्याचे त्याला कळले तेंव्हा त्यांस मोठा विचार पडला. आपली दक्षिणेतील मोहीम यशस्वी व्हावयास महाराजांमुळे जबरदस्त प्रत्यवाय येणार हें जाणून त्याने त्यास हरयुक्तीनें उत्तरेस पाठवून देऊन त्यांच्या जिवास यत्किंचित्ही धक्का न पोहोचता त्यांस परत स्वदेशी यावयास मिळेल असे आश्वासन दिलें होते. हे आपले वचन आता खोटे होऊ पाहते हें मनात येऊन तो फार खिन्न झाला आणि त्याने बादशहास पुनपुनः पत्रे पाठवून अशी विनवणी केली कीं, शिवाजीमहाराजांच्या जिवास अपाय झाल्याने परिणाम चांगला होणार नाही; बादशहाच्या एका सरदाराने केलेली आणभाक खोटी ठरून आमच्यावर कोणीही कसल्याहींबाबतीत विश्वास ठेवणार नाहीत.

---

१ शहराच्या तटाबाहेर जयपूरवाडा होता. त्यात त्यांस नेऊन ठेवावे असा हुकूम बादशहाने रामसिंगास केला आणि त्यांच्या अटकेची सारी जबाबंदारी त्याच्यावर टाकली असे प्रो. सरकार म्हणतात.

अशाने आमची बेअब्रू होईल. शिवाजीमहाराजांचा प्राणघात केला तरी त्यांच्या राज्याचा असा कटेकोट बंदोबस्त आहे कीं, ते आमच्या हाती येणे अतिशयित कठीण आहे. त्यांचा नाश करण्याऐवजी त्यांस आपला दोस्त केल्याने दक्षिणेत आपला राज्यविस्तार करण्यास पुष्कळ मदत होणार आहे. ह्या आशयाची पत्रे जयसिंगांकडून औरंगजेबाला गेली तरी तो जात्या महाकपटी असल्याकारणाने त्याने महाराजांस स्वदेशी जाऊ देण्याचा विचार लांबणीवर टाकला. इतकेच नव्हे तर, त्यांना मुळींच पळून जाता येऊ नये म्हणून त्यांना अफगाणिस्तानांत पाठविण्याचे त्याने मनात आणले होते असे म्हणतात; परंतु जयसिंगासारख्या थोर सरदारांस व इतर रजपूत सरदारांस हे करणे मुळींच पसंत न वाटून ते नाराज होतील म्हणून त्याने हा बेत रहित केला असावा. त्याने रामसिंगाला असे मात्र बजावले होते कीं, शिवाजीमहाराजांस नीट बंदोबस्ताने अटकेत ठेवण्याची सगळी जबाबदारी तुजवर आहे. ही कामगिरी धोक्याची आहे असे जयसिंगास वाटून त्याने रामसिंगास ती कसेही करून आपल्यावरची दूर करावी म्हणून पत्र लिहिले. पुढे दक्षिणेतल्या मोहिमेवर स्वतः जावे असे औरंगजेबाच्या मनात आले तेंव्हा जयसिंगाने त्यांस असे पत्र लिहून सुचविले कीं, दक्षिणेतली आपली मोहीम यशस्वी होण्याचा संभव सांप्रत फारच कमी दिसत आहे. अशा प्रसंगी शिवाजीमहाराजांस दक्षिणेत मुळींच येऊ देऊ नये, दिले तर आपल्या मोहिमेची अखेर अपयशाची होण्याचा दृढ संभव आहे. तरी त्यांचा प्राणघात केल्यास त्यांचे लोक बिथरून अदिलशहास जाऊन मिळतील असे झाल्याने आमचे अतोनात नुकसान होणार आहे. त्याप्रमाणेच त्यांस अशा रीतीने अटकेत ठेवावे की, ते सुटून स्वदेशी खास येतील अशी त्यांच्या लोकांस आशा वाटावी.[१]

वर सांगितल्याप्रमाणें आपल्या लोकांस पाठवून दिल्यावर महाराजांनी बादशहापाशीं पुनः असा अर्ज केला कीं, 'मला ह्या दरबारी राहणे प्राप्त आहे त्यापेक्षा येथील अमीर उमरावांच्या व माझ्या ओळखी मुलाखती व्हाव्या हें इष्ट आहे. ह्यासाठी मला त्यांस यथावकाश भेटून त्यांशी परिचय करण्याची परवानगी असावी.' ह्या अर्जास बादशाहाकडून मंजुरी मिळण्यास अडचण आली नाहीं. मग ते रामसिंगाला बरोबर घेऊन सरदारांच्या भेटीस जाऊं लागले. महाराजांचे बोलणेंचालणें अतिमोहक असल्याकारणानें त्या सरदारांचा स्नेह संपादन करण्यास त्यांना बिलकूल विलंब लागला नाहीं. त्यांशी बोलतांना त्यांनी म्हणावे कीं, बादशहाची नोकरी इमानेंइतबारें करून बहादुरी व बढती मिळविण्याचा आपला पूर्ण निर्धार झाला आहे. हें त्यांचें मानभावीपणाचें बोलणे त्या सरदारांस खरें वाटून ते त्यांच्याशी विशेष रहसाळीनें वागू लागले, व महाराजांचे हें म्हणणें बादशहाच्याही कानावर वारंवार जाऊं लागलें.

नंतर आपण गुरुवारचे व्रत करून मोठा उत्सव करितों असा बहाणा महाराजांनी केला व त्यानिमित्त आपल्या नूतन दोस्त उमरावांच्या घरी मेवामिठाई पाठविण्याचा क्रम आरंभिला. ती मिठाई नेण्याआणण्यासाठी त्यांनी वेळवाचे मोठेमोठे दहा पेटारे केले. त्यांत मिठाई भरली म्हणजे ते इतके जड होत असत कीं, त्यांस दोऱ्या बांधून मध्ये वासे घालून दोनदोन माणसांला ते वाहून न्यावे लागत. ह्या पेटाऱ्यांतून मिठाई जाऊं लागली म्हणजे चौक्यांवरील लोक ती उघडून पाहत व मग पुढें जाऊं देत. हा असा क्रम प्रतिगुरुवारीं चालू असल्यामुळें पहारेकऱ्यांस सहजी असें वाटू लागलें कीं, हे सगळे पेटारे उघडून पाहण्याचे कारण नाहीं, एक दोन पाहिले म्हणजे पुरे. ह्या चौक्यांवरच्या लोकांस वेळोवेळी इनामें व बक्षिसे देऊन महाराजांनी खूष ठेविले होतें. त्यांस त्यांनी जवळ बोलवावे, त्यांच्याशी मोठ्या प्रेमळपणानें बोलावे, त्यांची सुखदुःखे ऐकून घ्यावी व त्यांस लागेल ती मदत सढळ हाताने करावी. त्याप्रमाणेंच त्यांच्यावरच्या अंमलदारांपाशी बादशहाविषयींची आपली निष्ठा बोलून दाखवावी. अशा गोड वर्तनामुळे ते लोक अंमळ गाफील राहू लागले.

ह्याप्रमाणें आपली सुटून जाण्याची युक्ती सिद्धीस जाण्याचा दृढ संभव दिसूं लागला तेव्हां त्यांनी आपल्याजवळ बाकी राहिलेल्या लोकांसही हळूहळू निघून जावयास सांगितलें. कोणी आपणांस हवाच मानवत नसून आपण आजारी पडलो असें मिष करून निघाले; कोणी चाकरीस कंटाळून ती सोडून जाण्याचा बहाणा करून निघाले. ह्याप्रमाणें कोणी

१ हा मजकूर प्रो. सरकार याच्या ग्रंथावरून घेतला आहे.

कांही कोणी कांहीं सबब सांगून परवाने मिळवून तेथून निघून गेले. त्यांपैकीं कांही जणांस अमुक ठिकाणी आपली वाट पाहत राहावें असें महाराजांनी सांगितलें. ह्याप्रमाणें जवळच्या बहुतेक लोकांस तेथून रवाना केल्यावर महाराजांनी आपल्या तैनातीस तेथीलच हुजरे व चाकर ठेवून दिले. शेवटी पुत्र संभाजी, हिरोजी फर्जंद व दुसरे एकदोन चाकर एवढेच काय ते महाराजांपाशी राहिले. आपले सर्व लोक बरेपणीं निभावून गेल्यावर महाराजांनी आपण आजारी आहों असा बहाणा करून वैद्यांस बोलावणे पाठविलें व त्याच्याकडून कांही औषधोपचार चालविला. आपल्या प्रकृतीस आराम नाहीं, आपणांजवळ कोणी फारसे येऊ नये, काय कामकाज करणें असेल तें दुरूनच करावे, असें त्यांनी सर्वांस फर्माविले. असा गैरराबता राखून त्यांनी आणखी थोडे दिवस तेथें काढिले. मग आपल्या प्रकृतीस अंमळ आराम पडला असें दाखवून वैद्यांस व अमीरउमरावांस खुशालीदाखल ते मेवामिठाई पाठवू लागले, ब्राह्मणांस व गोरगरिबांस पुष्कळ दानधर्म करूं लागले व मशिदींतून फकिरांस खैरात करण्यासाठी मेवामिठाईचे पेटारे एकसारखे पाठवू लागले. असा नेहमींचा पाठ चालला असतां एके दिवशीं संध्याकाळी त्यांनी चारपाच पेटारे भरून तयार करविले, एका पेटाऱ्यात आपण बसले व एका पेटाऱ्यात संभाजीस बसविले आणि हे सगळे पेटारे[१] चौक्यांवरून चालविले. तेव्हा नित्याच्या परिपाठाप्रमाणें रखवालदारांनी एकदोन पेटारे उघडून पाहून सगळे पेटारे बिनदिक्कत जाऊं दिलें. ह्या रीतीने महाराज शहराबाहेर पडून आपल्या लोकांस जाऊन मिळाले.[२]

महाराज आपल्या मुक्कामावरून निघाले तेव्हां त्यांनी आपल्या जागी हिरोजी फरजंद यास ठेवून त्यास आपला पेहराव घालून आपल्या बिछान्यावर निजावयास सांगितलें व संधी साधून त्यानेही आपल्या मागोमाग निसटून यावें असें ठरविलें. त्या विश्वासू सेवकाने ही गोष्ट कबूल केली. तो म्हणाला : ''आपण बेलाशक निघून जावे. मजवर कसाही प्रसंग आला तरी मी डगमगत नाहीं. आपल्या कृपेने मीही येथून सुटून येईन!'' मग तो महाराजांच्या बिछान्यावर निजून राहिला. त्यानें आपलें सर्व अंग पांघरुणांत झाकून घेऊन एका हातांत महाराजांची अंगठी घातली होती. तो अंमळ उघडा ठेवला व जवळ एका मुलास पाय चेपीत बसविले. ह्या रीतीनें त्यानें सर्व रात्र काढली. प्रातःकाळ झाला, चार घटका दिवस आला, तरी महाराजांची खोली उघडत नाहीं असें पाहून पहारेकरी दाराशी येऊन त्या मुलास विचारू लागले कीं, महाराज आज फार वेळ कां निजले? त्या मुलास शिकवून ठेविले होतेंच त्यानें उत्तर केलें, 'महाराजांचे शिर फार दुखत आहे.' हें ऐकून ते तेथून निघून गेले. मग कांही वेळाने हिरोजी उठून आपला चोळणा-मुंडासें चढवून त्या मुलास घेऊन बाहेर पडला आणि बाहेर नोकर व हुजरे होते त्यांस अशी ताकीद दिली कीं, महाराजांची प्रकृती गेल्या रात्री फारच बिघडली असून आता अंमळ डोळा लागला आहे. कोणी गडबड करूं नये व आंत जाऊं नये. मी कांही औषध आणावयास वैद्यांकडे जातो.' अशी वर्दी देऊन तो निघाला. तो चालला असतां त्यास चौकीवरच्या लोकांनी महाराज फार वेळ निजण्याचें कारण विचारले. त्यांस प्रकृती बिघडल्याचें निमित्त सांगून व आपण औषध आणावयास जात आहो असें बोलून तो मोठ्या लगबगीने निघाला. तेथून तो रामसिंगापाशी गेला व त्यास महाराज सुखरूपपणे पार पडल्याची हकीगत गुप्तपणे सांगून त्याचा निरोप घेऊन स्वदेशी चालता झाला.

---

१ ही मिठाई मथुरेस ब्राह्मणांना व फकिरांना वाटावयासाठी नेत आहोत असा बहाणा केला, असे एका बखरींत म्हटलें आहे.

२ बुंदेले म्हणतो कीं, शिवाजीमहाराजांनी प्रत्येक गुरुवारी परिपाठ ठेविला होता. त्यामुळें हजारो गरीब लोक त्यांच्या दारापाशी त्या वारीं जमूं लागले. एवढ्या लोकांस पुरेशी मिठाई आणण्यासाठी मोठमोठे हारे तयार करून ते भरून आणूं लागले. हारे रिकामे झाले म्हणजे अर्थात ते पुनः मिठाई भरून आणण्यासाठी हलवायांच्या दुकानीं नेत. अशा दोन रिकाम्या हाऱ्यांत महाराज व संभाजी बसून पळून गेले. खाफीखान म्हणतो की, महाराजांनी तीन उत्तम घोडे खरेदी करून ते ब्राह्मणांस दान करावयास म्हणून शहराबाहेर नेवविले व तेथून चौदा कोसांवर एका गांवी सज्ज करून ठेवावयास सांगितले. अलमगीरनामक एका बखरींत असें आहे कीं, शिवाजीमहाराजांना अटकेंत ठेवल्याचें वर्तमान जयसिंगाला कळले तेव्हा त्यानें असे करणें ठीक नाही असे बादशहास पत्र कळविले. त्यावरून महाराजांच्या हवेलीजवळची चौकी उठविली होती.

इकडे महाराज शहराबाहेर पडले ते, दूर एका जागी त्यांच्यासाठी घोडा तयार ठेवला होता, त्यावर स्वार होऊन व संभाजीला आपल्यापुढे घेऊन[१] भरधाव घोडा काढून आपल्या कारकून वगैरे काही मंडळींना ज्या गांवीं जाऊन राहावयास सांगितलें होतें तेथें जाऊन पोहचले.[२] आपल्या लोकांना मिळाल्यावर पुढें कोठच्या मार्गाने कोठे कसें जावयाचें तें त्यांनी ठरविलें. तेथून एकदम सरळ मार्गाने स्वदेशी जाणें सुरक्षित नव्हतें. चोहोंकडून चौकशी चालली असल्यामुळें पुन: शत्रूच्या हाती लागण्याची भीती होती. यास्तव त्यांनी आपल्याबरोबरच्या आणखी कांही लोकांस वेष पालटून स्वदेशी जावयास सांगून आपल्याबरोबर चारपाच कारकून व दोनतीन हुजरे ठेवून घेतले. मग त्यांनी बैराग्याचा वेष धारण करून तीर्थयात्रा करीत करीत सावकाश स्वदेशी जावे असा विचार केला. ते पहिल्याने मथुरेस आले. तेथें मोरो त्रिंबक पिंगळे यांचे मेहुणे कृष्णाजीपंत, काशीपंत व विसाजीपंत असे तिघे बंधू ओळखीचे भेटले. त्यांस महाराजांनी आपलें सगळे वृत्त कथन करून संभाजीस तुमच्यापाशी ठेवता काय असें विचारले. त्यांनीं ती गोष्ट मोठ्या खुशीने कबूल केली.[३] महाराजांनी त्यांस असें सांगून ठेवले कीं, ''आम्ही स्वदेशी जाऊन पोहोचल्यावर तुम्हांस पत्र पाठवू, मग तुम्ही आपलें सारे कुटुंब घेऊन संभाजीसहवर्तमान आमच्या राज्यात यावें. तेथें आल्यावर तुमचे आम्ही बरें करूं.'' अशी व्यवस्था केल्यावर त्या बंधुत्रयांपैकी कृष्णाजीपंतांस आपल्या समागमें काशीपर्यंत नेले. तेथें महाराज दाढी, मिशी व शेंडी यांचें मुंडन करून पुरे गोसावी बनले. त्यांनी आपल्या हाती संन्यासी वागवितात तसला एक मोठा दंड ठेवून त्यात बहुमोल रत्ने व सोन्याची नाणी भरून ठेविली. काही नाणी जोड्यात शिवून भरली आणि कांही जवाहीर मेणाने मढवून आपल्याबरोबरच्या लोकांच्या पेहरावात शिवून ठेवले.

मधुरेस असता महाराज नित्य नदीवर स्नानास जात. एके दिवशी तेथला घाट पाहून ते सहज बोलले कीं, हें एवढे मोठे तीर्थ असून ह्या घाटाची व्यवस्था कोणींच कशी नीट केली नाहीं? असें बोलून त्यांनी त्या घाटाच्या रचनेवर टीका करून ती कशी असावी तें सुचविले. ही चर्चा ऐकून एक चोबा म्हणाला : 'तुम्ही इमारतीची कामे जाणता तुम्ही बैरागी नाहीं, कोणी तरी वेषधारी आहां!' हे ऐकून कृष्णाजीपंताने त्याचा हात दाबला, त्यास पुष्कळ द्रव्य देऊन आपल्याबरोबर तीर्थयात्रेस नेले व तेथून स्वदेशी आणून महाराजांनी त्याला नेमणूक करून दिली.

इकडे महाराज पळून गेल्यावर आग्र्यास काय वर्तमान झालें तें पाहूं. चौकीवरच्या लोकांच्या नजरेस लवकरच असें आलें कीं, महाराजांच्या चाकरमाणसांची हालचाल कांहींच दिसत नाही; त्यांची प्रकृती बेआराम आहे असें त्यांच्या एका नोकराने बाहेर जातांना सांगितलें आणि औषध आणावयाला जात असें बोलून तो गेला, तो ही अद्यापि परत आला नाहीं. तेव्हां हें काय वर्तमान आहे तें पाहण्यासाठी चौकीवरचे अंमलदार महाराजांच्या निजावयाच्या खोलीच्या दारापाशी आले व आंत डोकावून पाहतात तो पलंगावर महाराज नाहींत व जवळपास कोणी नोकरही नाहींत. हा प्रकार पाहून ते घाबरून गेले. त्यांनी एकच गूल केली. जिकडेतिकडे धावपळ करून ते शोध तपास करूं

---

१ संभाजीला घोड्यावर बसवून आपण त्याची लगाम धरून महाराज मथुरेकडे गेले असें बुंदेले म्हणतो.

२ रायरीच्या बखरींत असें आहे की, शहराबाहेर एक दक्षिणी कुंभार रहात असे, त्याच्याशी हिरोजी फर्जंदानें संधान बांधिलें होतें. महाराज शहराबाहेर पडल्यावर त्या कुंभाराच्या घरी गेले व तेथे वेश पालटून एक महिना छपून राहिले होते. औरंगजेबानें त्याच्या शोधासाठी चोहींकडे पाठविलेल्या माणसाची निराशा होऊन ते माघारी आल्यावर महाराज बैराग्याचा वेश घेऊन तीर्थयात्रा करीत गेले. ऑर्मी म्हणतो की, शहराच्या एका शेवटास यमुनानदीच्या तीरी एक होडी महाराजांना पलीकडे घेऊन जाण्यासाठी तयार ठेविली होती. तीत बसून ते पैलतीरीं गेले व होडीवाल्यास त्यांनी काही द्रव्य देऊन असें सांगितले की, 'औरंगजेबास जाऊन सांग की, मी शिवाजीराजांस नदीच्या पलीकडे नेऊन सोडले!' महाराज तेथून भरधाव घोडा काढून नदीच्या तीराने बरेच खाली गेले व पुनः अलीकडच्या तीरी येऊन तेथून एका आडवाटेनें डोंगरदऱ्या ओलांडून पार निघून गेले.

३ रायरीच्या बखरींत असे म्हटलें आहे कीं, काशीस कोणी नानाजी विश्वासराव म्हणून होता, त्याच्या घरी संभाजीस ठेविले. कारण तो त्या दौडीच्या दगदगीनें वारंवार आजारी पडूं लागला. विश्वासराव हा किताब सदरील ब्राह्मणास महाराजांनी आपण व संभाजी स्वदेशी सुखरूप पोहोचल्यावर दिला.

लागले; पण त्यांस महाराज किंवा महाराजांचा एक मनुष्यही सापडेना. तेथलेच जे नोकर त्यांनी सेवेस ठेविले होते त्यांस विचारता ते म्हणाले कीं, महाराज ह्या खोलींत निजले असून त्यांचे पाय एक पोर रगडीत होता एवढे काय तें आम्ही सकाळी पाहिले. त्यानंतर ते खोलींतून बाहेर केव्हा आले व कोठे निघून गेले हें आम्ही कांहींच पाहिले नाहीं. ही सगळी बिना त्या पहारेकऱ्यांनी पोलादखानास जाऊन कळविली. तेव्हां तो घाबरून जाऊन बादशहाकडे धावत गेला व शिवाजीमहाराज कोठे गडप झाले असे त्यानें त्यास कळविले. तो म्हणाला, 'माझे पहाऱ्यावरचे लोक अतिशय विश्वासू व हुशार असून त्यांच्या हातावर तुरी देऊन तो गुप्त झाला. तो त्यास फितवून पळून जाण्याची तर गोष्टच बोलावयास नको! तेव्हां एक तर तो जमिनींत गडप झाला असावा किंवा अस्मानांत उडून गेला असावा. त्याला गौडबंगालविद्या अवगत असावी. कारण माझे लोक त्याच्या हवेलीसभोवतीं अहोरात्र सक्त पाहारा करीत असतां तो फरारी झाला आहे. यांत माझ्या लोकांची तकशीर मुळींच नाही.' हें वर्तमान ऐकून बादशहास पराकाष्ठेचें आश्चर्य वाटलें. पोलादखान जात्या अत्यंत इमानी असून त्यानें चौकीपहाऱ्यास अगदी निवडक लोक ठेविले होते हें त्यास माहीत होतें, तरी तो त्या कोतवालावर फारच रागावला. मग शिवाजीमहाराजांचा शोध लावण्यास त्यानें सर्व दिशांस स्वार पाठविलें. प्रत्येक प्रांतांतील सुभेदारास व तालुकदारास पत्रे पाठवून असा हुकूम सोडला कीं, शिवाजीराजे आग्ऱ्यास अटकेत होते ते पळून गेले आहेत. ते कोणाच्या हद्दींतून जातांना सापडले असतां त्यानें त्यांना एकदम पकडून कैद करून हुजुरास पाठवावे. त्याप्रमाणेंच त्यानें जयसिंगाला असें पत्र पाठविलें की, शिवाजीमहाराजांचा जो सरदार तुमच्या लष्करांत तुम्हांला साहाय्य करण्यास म्हणून ठेवला आहे त्याला पकडून आमच्या दरबारी पाठवून द्यावे आणि हा पक्षी आमच्या पिंजऱ्यांतून उडून गेला आहे त्याच्यावर नीट नजर ठेवावी व त्याला आपल्या जागी पुनः जाऊन गडबड करू देऊं नये.

महाराज बिनहरकत शहराबाहेर निघून गेल्यावर हिरोजी फरजंदानें रामसिंगास झालेली हकीगत कळविली तेव्हां त्यानें बादशहाकडे ताबडतोब जाऊन त्यास असा अर्ज केला की, 'आमच्या तीर्थरूपांच्या व आमच्या मार्फतीने शिवाजीमहाराज आपल्या दरबारात येऊन दाखल झाले असून त्यांच्याशीं कराराप्रमाणें वर्तन न होतां त्यांस अटकेत ठेविले. तेव्हां अर्थात् त्यांच्या संबंधाचे हरएक प्रकारचे जोखीम आमच्या शिरींचे नाहींसे झालें आहे. आतां त्यांचें आपणांस काय वाटेल तें करावे' त्यावर बादशहाने असा जबाब दिला कीं, 'शिवाजीराजे आमच्या मर्जीप्रमाणें वागू लागल्यास त्यांची सर्फराजी करण्यास आम्हांला विलंब लागणार नाहीं. त्याबद्दल तुम्हांस किंवा तुमच्या वडिलांस काळजी नको!' ह्या प्रमाणें रामसिंगानें आपल्यावरचा वहीम उडविण्याची खटपट केली खरी, परंतु पुढे महाराज कोणती युक्ती योजून पळून गेलें याचा सुगावा औरंगजेबास लागला तेव्हां त्याचा अंदेशा त्यास आल्यावांचून राहिला नाहीं. त्याची रामसिंगावर इतराजी होऊन त्यास दरबार बंद झाला व त्याची मनसब काढून घेतली.[१]

पोलादखानासारख्या परम विश्वासू कोतवालाने असा कडेकोट चौकीपहारा ठेविला असून त्यांतून कोणास न कळत अचानक शिवाजीमहाराज निसटून गेल्याचे वर्तमान तेथील अमीरउमरावांस समजले तेव्हां जो तो तोंडांत बोट

---

१ चिटणीस म्हणतो कीं, रामसिंगाला महाराजांची ही कपटयुक्ती ठाऊक होती; पण त्याने ती उघडकीस आणली नाही. काही दक्षिणी ब्राह्मणांस शिवाजीमहाराज पळून गेल्यावर पकडून कैद केले होते. त्यांना पुष्कळ मारहाण केल्यामुळे त्यांनी असे कबूल केले की, महाराज पळून गेले हे रामसिंगास ठाऊक होते. जयसिंगाला आपल्या पुत्रावर बादशहाने हा आरोप केल्याचे समजले तेव्हां त्याने बादशहास पत्र लिहिले की, माझा पुत्र रामसिंग केवळ निरापराध आहे. तो बादशहाशी अशी निमकहरामी कदापि करणार नाही. ब्राह्मणास पकडून कैद केल्याचा उल्लेख जेध्यांच्या शकावलीत आहे. जयसिंग एवढेच करून राहिला नाही, तर त्याने बादशहाच्या वजिरास असे लिहिले की, शिवाजीमहाराजांशी शरीर संबंधाचे बोलणे करण्याचे मिष करून त्यांची मुलगी माझ्या मुलास मागतो. अशा रितीने त्यास माझ्या छावणीत आणून ठार मारितों म्हणजे मी बादशहाचा किती एकनिष्ठ सेवक आहे हे प्रत्ययास येईल. (हाफ्त-अंजुमान नामक ग्रंथात जयसिंगाचे अशा आशयाचे पत्र दिलें आहे असे प्रो. सरकार म्हणतात). परंतु असा काहीं प्रयत्न जयसिंगाने केल्याचे दिसत नाही. पुढे अकरा महिन्यांनी जयसिंग मरण पावल्यावर रामसिंगास पुनः चार हजारी मनसब देऊन आसाम प्रांताकडे मोहिमवर पाठविले. तिकडे तो निवर्तला.

घालून राहिला आणि चोहींकडे अशी चर्चा सुरू झाली कीं, जयसिंगराजासारख्या थोर व विश्वासू सरदारानें शिवाजीराजांना पुरे इमान दाखवून व आश्वासन देऊन आपलेसे करून घेतलें आणि बादशहाच्या हुकमावरून विशेष बढतीची आशा दाखवून इकडे रवाना केलें. असें असतां त्यांशीं केलेला करार मोडून व जयसिंगराजास खाली पाहावयास लावून बादशहाने त्याच्याशीं दग्याचे वर्तन केलें, हें काही ठीक झालें नाही. अशा शूर, हुशार व वीर्यशाली पुरुषाचा गौरव करून व त्याच्याशीं कराराप्रमाणें वागून त्याला आपलासा करण्याची अमूल्य संधी आली असतां बादशहाने ती व्यर्थ घालविली. हा कांहीं शहाणपणा झाला नाहीं. दक्षिणदेश काबीज करण्याच्या कामी अशा पराक्रमी व कुशल पुरुषाचे साहाय्य केवळ अमोल होतें; परंतु बादशहाच्या दुर्बुद्धीने त्यास तें लाभले नाहीं. शिवाजीमहाराज पक्के हुन्नरी असून त्यांजवर देवाची मेहर आहे. असा प्रबळ रिपु बादशहास दक्षिणेत असल्यावर त्याचें तिकडे काय चालणार? जयसिंगाच्या भाकेस गुंतून त्यानें स्वपराक्रमानें हस्तगत केलेले कोटकिल्ले व प्रांत बादशहाच्या हवाली केले व आपण स्वत: त्याचा ताबेदार होऊन राहाण्यास तयार झाला. असें असतां बादशहाच्या कपटी वर्तनामुळे तो अगदीं बिथरून गेला आहे. तो आता पुनः काबूत येणे शक्य नाहीं. हा लोकप्रवाद बादशहाच्या कानी जाऊन तो फारच खिन्न झाला. महाराजांच्या शोधास पाठविलेले लोक निराश होऊन परत आले. सुभेदार व तालुकदार यांसही ते कोठे आढळतना. तेव्हा त्यास अशी दहशत वाटूं लागली कीं, महाराज शहरांतच कोठे तरी लपून राहिले असून संधी साधून आपणांस केव्हा कसा दगा करितील याचा नेम नाहीं. ह्या भीतीनें तो फारच जपून व बंदोबस्तानें राहू लागला. त्याला रात्रीची झोपही स्वस्थ लागू नये अशी त्याची अवस्था होऊन गेली.

महाराज आपल्या लोकांसह मथुरेहून गोसाव्याच्या वेशाने बैराग्याच्या तांड्यांत मिसळून तीर्थाटन करावयास निघाले. ते प्रत्येक तीर्थाच्या ठिकाणी सर्व विधी यथासांग करून दानधर्म वगैरे बेताबातानें करीत गेले. उत्तरेस हरिद्वारापासून तहत खालपर्यंत मुख्यमुख्य तीर्थे व देवस्थाने यांचे दर्शन घेतघेत ते दक्षिणेत आले. ह्या प्रवासांत त्यांस फार त्रास झाला. ते आल्याहून निघाले तेव्हां पावसाळा सुरू झाला होता. नद्यांस पूर येऊन कोठेंकोठें मुळीच उतार मिळत नसे. अशा ठिकाणी त्यांना कित्येक प्रसंगी पोहून पलीकडच्या तीरास जावे लागे. कित्येक प्रांतांत बिकट अरण्ये व डोंगर लागत. त्यांतून पायांनी मजला करणें फार कठीण असे; परंतु ह्या सर्व श्रमांस व अडचणींस न जुमानता ते मोठ्या धीराने मार्गक्रमण करीत गेले. एका गावच्या फौजदाराने त्यांस कांहीं वहिमावरून अटकेत ठेविले असता त्यांस आपण कोण, कोठचे हें सांगितले तेव्हां तो दचकला व क्षमा मागू लागला. महाराजांनी त्यास थोडे द्रव्य देऊन म्हटलें कीं, 'आम्ही ह्या वाटेने गेलों असें कोणा मोगल अंमलदारास कळवू नका.'[१] एके समयीं एका तीर्थावर स्नानास जाऊन महाराज पाण्यांत उतरले व ब्राह्मणांस मंत्र म्हणावयास सांगितले इतक्यात तेथें दुसऱ्या एका ब्राह्मणानें म्हटलें कीं, 'दक्षिणेचा राजा शिवाजी हा आग्ऱ्यास अटकेत होता, तेथून तो सुटून फरारी झाला आहे. तें ऐकतांच महाराज लगबगीने स्नान करून तेथून लागलीच निघून गेले.[२] महाराज कटक प्रांतांतून प्रवास करीत असता फार थकले. म्हणून त्यांनी एक साधारणसा घोडा विकत घ्यावयाचे मनांत आणून एक घोडा ठरविला. परंतु त्यास द्यावयास जवळ रुप्याचे नाणे नसल्यामुळें त्यांनी होनांची थैली बेसावधपणे घोडा विकणाराच्या समक्ष उघडली. तें पाहून तो घोड्याचा मालक म्हणालाः 'तूं अशा घोड्यास इतके पैसे देऊं करीत आहेस यावरून असें वाटतें कीं, तू शिवाजीराजा असावास!' त्यासरशी ते पैसे त्याच्या अंगावर टाकून महाराजांनी तेथून निसटता पाय घेतला.[३]

---

१ खाफीखान म्हणतो की, ह्या फौजदाराने महाराजांना व बरोबरच्या लोकांना पकडून कैद केले व त्यांचा तपास चालविला, तेव्हा महाराजांनी त्याला मध्यरात्रीच्या सुमारास गाठून आपण कोण ते कळविले आणि त्याच्या हातात एक हिरा ठेविला. तेव्हां त्याने त्यांना सोडून दिले.

२ खाफीखानाच्या ग्रंथातून ह्या दोन गोष्टी घेतल्या आहेत. हा ग्रंथकार म्हणतो की, महाराजांस मंत्र सांगणारा हा ब्राह्मण त्यांस सुरतेच्या बंदरात पुढें भेटला. हा तेथे त्यावेळी वैद्यकीचा धंदा करी. त्याने खाफीखानास असे सांगितले कीं, मी काशीस एका ब्राह्मणाच्या घरी नोकरीस होतो. तेथे शिवाजीमहाराजांना मी मंत्र सांगितल्याबद्दल मला त्यांनी जी दक्षिणा दिली ती घेऊन मी स्वदेशी आलो आणि त्या द्रव्याने ह्या माझ्या हवेल्या बांधून मी येथे सुखवस्तू राहात आहे.

३ ही गोष्ट बुंदेले देतो.

हें असें तीर्थाटन करीत महाराज दक्षिणेत आले. ते एकदम स्वराज्यांत न जातां गोंडवण, भागानगर, विजापूर ह्या प्रांतांतून पन्हाळ्यास आले व आपण स्वदेशी आलों अशी आपल्या लोकांस सूचना देऊन त्याच वेशाने रायगडास दाखल झाले. ह्याप्रमाणें स्वराज्य सोडून गेल्यापासून नऊ महिन्यांनी ते स्वदेशी आले. रायगडकिल्ल्याच्या दरवाजापाशी गोसाव्याच्या वेशाने जाऊन ते तेथील रखवालदारांस म्हणाले कीं, 'आम्हांस जिजाबाईसाहेबांची भेट घ्यावयाची आहे.' तेव्हां त्यांनी 'कोणी बैरागी आपणांस भेटू इच्छीत आहेत' अशी वर्दी तिला दिली. तिने त्यांस आत घेऊन यावयास सांगितलें. ते तिच्या सन्निध गेले तेव्हां निराजीपंतानें तिला बैराग्याच्या भाषेने आशीर्वाद दिला; परंतु महाराजांनी एकदम पुढें सरसावून तिच्या पायांशी दंडवत घातला. तिने त्यांना ओळखले नाहीं. इतकी त्यांची चर्या बदलून गेली होती. गोसाव्याच्या ह्या वर्तनाबद्दल तिला आश्चर्य वाटलें. महाराजांनी आपल्या डोकीची टोपी काढून तिच्या मांडीवर शिर ठेविले. तेव्हां कांही खुणा पटून तिने त्यांना ओळखून आलिंगन दिलें व प्रेमाश्रूंनी त्यास न्हाणिलें. माताच ती! तिच्या आनंदास पारावार नाहींसा झाला. महाराजांचा तो केवळ नवाच जन्म झाला असें तिला वाटलें.

ह्याप्रमाणें प्रथम आपल्या प्रिय मातेचे दर्शन घेऊन मग त्यांनी आपल्या सर्व सरदारांच्या, कारभाऱ्यांच्या व इतर मातबर लोकांच्या भेटी घेतल्या. जिकडेतिकडे आनंद झाला. जो तो महाराजांच्या दर्शनास येऊ लागला. महाराजांनी मोठा उत्सव करून ब्राह्मणांस पुष्कळ दानधर्म केला, गोरगरिबांस अन्नवस्त्र मुबलक दिलें. श्रीभवानीचा उत्सव करून तिला मुक्ताफळांचा अभिषेक केला. हत्तीवरून साखर वाटली. सर्व सरदारांस व किल्लेदारांस साखर पाठविली. राज्यांतील मोठमोठी देवस्थानें, ब्राह्मण, तपस्वी, संत व साधु यांस दक्षिणा व शर्करा पाठविली. गडोगडीं तोफांची सरबत्ती करविली. महाराज परत सुखरूप आल्याची वार्ता एकंदर राज्यांत पसरून सर्व प्रजेस अत्यानंद झाला. शत्रूच्या चित्तांत पुनरपि दहशत उत्पन्न झाली व शिवाजी महाराज केवळ अजिंक्य असून त्यांच्यापुढें कोणाचे कांही चालणार नाहीं, ते आतां यवनांच्या सर्व पादशाहती बुडवितात असें त्यांना वाटूं लागलें. त्यांच्या अलौकिक युक्तिमत्तेची व अप्रतिम धैर्याची कीर्ती सर्वत्र अधिकच पसरली.

ह्या आनंदभरात महाराज आपल्याबरोबर गेलेल्या लोकांस विसरले नाहींत. ज्यांनी ज्या मानानें श्रमसाहस केलें होतें त्यांस त्या मानानें इनामें व बढती देऊन गौरविले. कोणांची तैनात वाढविली; कोणास वस्त्रालंकार, कोणास हत्तीघोडे, कोणास गांव व महाल असे ज्याच्या त्याच्या योग्यतेप्रमाणें दिले. हिरोजी फरजंद याचे साहाय्य ह्या संकटमय प्रवासात अतिशयित झालें म्हणून महाराजांनी त्याला पागेवर सरदारी देऊन पालखी अबदागिरी दिली. बरोबर गेलेल्या कारकुनांनी मोठ्या हुशारीने व इमानाने वागून प्राप्त झालेल्या संकटातून निभावण्यास मनःपूर्वक साहाय्य केलें म्हणून त्यांच्यावर महाराजांचा इतबार अधिकच बसला.

यात्रेहून परत येत असतां महाराज एका कुणब्याच्या घरी एके रात्रीं वस्तीस राहिले आणि त्याच्याकडे शिधासामुग्री मागू लागले. तेव्हां त्या कुणब्याची वृद्ध आई होती ती त्यांस म्हणाली, तुम्हा बैराग्यास काही शिधासामुग्री दिली असती पण नुकताच शिवाजीराजाच्या लोकांनी आमचा गांव लुटला. त्यांत आमचाही बराच माल लुटीस गेला. शिवाजीराजा दिल्लीस गेला आहे, तेथें त्याचें औरंगजेबबादशहा अद्यापि पारिपत्य का करीत नाहीं न कळे. त्याच्यापासून आम्हां गरिबास बहुत उपद्रव होतो.' हे तिचे बोलणे ऐकून महाराजांच्या लक्षांत येऊन चुकले कीं, आपल्या मागें आपले लोक स्वस्थ न बसता त्यांनी पूर्ववत् मुलुखगिऱ्या करण्याचा क्रम चालू ठेवला आहे, ह्याबद्दल त्यांस अर्थात् संतोष वाटला. महाराजांनी या म्हातारीला तुमचे कल्याण होईल!' असा आशीर्वाद देऊन त्या कुणब्याचे नांवगांव विचारून घेतलें. पुढें स्वराज्यांत येऊन पोहोचल्यावर महाराजांनी ह्या कुणब्यास सहकुटुंब बोलावून आणले व त्याचा किती माल लुटीस गेला तें विचारून घेऊन त्याची त्यास भरपाई करून दिली व त्यास आपल्या नोकरीस ठेवले.

मग पूर्वसंकेताप्रमाणें मथुरेस काशीपंताला पत्र पाठवून कळविले कीं, आम्ही स्वराज्यास येऊन पोहोचलो. तुम्ही सगळे बंधू सहकुटुंब संभाजीस घेऊन इकडे यावें. हें पत्र पावताच तो ब्राह्मण संभाजीस घेऊन निघाला. वाटेत एक

मोगल अंमलदार त्यास भेटला. संभाजीचें ते तेज व स्वरूप पाहून त्याला असा संशय आला की, हा शिवाजीमहाराजांचा पुत्र असावा.[१] त्यावरून त्याने त्यांस अटकाव केला. ते दोघे बंधू म्हणाले कीं, 'आम्ही मथुरेस राहाणारे ब्राह्मण असून हा आमचा मुलगा आहे. तेव्हा तो अंमलदार म्हणाला, हा तुमचा मुलगा आहे हें खरें तर तुम्ही त्याला घेऊन एका पात्री भोजन करावे काशीपंतास ती अट मान्य करणें प्राप्त झालें. त्यानें दह्यांत पोहे कालवून ते केळीच्या पानावर वाढले व ते संभाजीसह भक्षण केले. हें पाहून त्या यवनाने त्याला सोडून दिलें.[२] ते ब्राह्मण संभाजीस घेऊन रायगडावर सुखरूप येऊन पोहोचले. संभाजीस पाहून सर्वांस आनंद झाला. काशीपंतानें आपल्या पुत्राचे संगोपन करून त्यास मोठ्या युक्तीने संभाळून आणले म्हणून त्यास महाराजांनी पुष्कळ द्रव्य दिलें व 'विश्वासराव' असा किताब देऊन गौरविले. त्याला व त्याच्या दुसऱ्या दोघां बंधूंना चांगले हुद्दे देऊन आपल्या पदरी ठेवून घेतलें.[३]

ह्याप्रमाणे महाराज अटकेतून सुटून सुखरूपपणे स्वदेशी जाऊन पोहोचल्याचे ऐकून औरंगजेबास पराकाष्ठेचे दुःख वाटले. आपल्या तावडीत पक्का सापडलेला हा शत्रू व युक्तीमान् पुरुष असा सहज सुटून गेला याबद्दल त्याला आमरण खेद वाटत होता असे त्याच्या शेवटल्या मृत्युपत्रातल्या उल्लेखावरून लक्षात येते. त्यात तो असे लिहितो कीं, ''कोणतेही राज्य कायम राहावयाचे असेल तर त्याला सर्वात मोठा आधार म्हटला म्हणजे राज्यात काय काय चालले आहे त्याची बातमी सर्वदा उत्तम प्रकारे ठेवण्याची व्यवस्था करावी हा होय. ह्या बाबतीत एक क्षण हलगरजीपणा केला तर त्याचा परिणाम लज्जास्पद होऊन तो पुढे कैक वर्षेपर्यंत भोगावा लागतो. त्या हरामखोर शिवाजीला माझ्या गाफीलपणामुळे माझ्या हातून सुटून जाता आले आणि त्यामुळे मला माझ्या सगळ्या मोहिमात आमरण अपयश आले!''[४]

ह्या आग्ऱ्याच्या प्रयाणांत आणखी एक गोष्ट घडल्याचे कांहीं मुसलमान बखरकार लिहितात. ती अशी : महाराज बादशहाच्या भेटीस दरबारात गेले तेव्हां जनानखान्यांतील स्त्रियांस त्यांना पाहण्याची इच्छा होऊन त्या पडद्याआड बसून त्यांना पाहात होत्या. ह्या स्त्रियांमध्ये औरंगजेबाची निसाबेगम ह्या नांवाची एक अविवाहित मुलगी होती. तिचे वय त्या वेळीं सत्तावीस वर्षाचे होतें. ती महाराजांस पाहून मोहित झाली व तिची त्यांजवर पराकाष्ठेची प्रीती जडली. हा वेळपावेतो ती महाराजांची कीर्ती कर्णोपकर्णी ऐकत होती. ते मोठे शूर, पराक्रमी, धाडसी व हुशार असून स्वदेश स्वतंत्र करण्याविषयी जिवापाड परिश्रम करीत आहेत असें तिने ऐकले होतें. त्याच्या अचाट कृत्याच्या गोष्टी ऐकून तिला नेहमी कौतुक वाटत असे. त्याप्रमाणेंच त्यांचें पाडाव झालेल्या शत्रूशी मोठ्या औदार्याचे वर्तन, मातापितरांशी अत्यंत प्रेमाची वागणूक, स्वधर्मातील देवांवर त्यांची अतिशयित भक्ती ह्यांविषयींच्या गोष्टी ऐकून तिला ते फार प्रिय झाले होते. शिवाय तिचा बाप एवढा सार्वभौम बादशहा असून व त्याच्या पदरी शूर सरदार व प्रचंड सेना असून त्याची ते अगदीं परवा न करता स्वराज्यवृद्धी एकसारखी करीत आहेत, हें कळून ती त्यांची तारीफ करीत असे. असा वीर्यशाली व तेजस्वी पुरुष तिच्या बापाचा दोस्त होऊन तिच्या दरबारी पाहुणा म्हणून आल्यावर जेव्हां तिच्या दृष्टीस पडला तेव्हां त्याचें तें तेज व रूप पाहून व दरबारातील स्वाभिमानाचें वर्तन पाहून ती तत्काळ मोहित झाली आणि विवाह करावयाचा तर अशाच योग्य व अप्रतिम पुरुषाशी करावयाचा, नाही तर जन्मभर अविवाहित राहावयाचे असा तिने आपल्या मनाशी संकल्प केला.

---

१ बुंदेले म्हणतो की, संभाजीचे केस चांगले लांब असल्यावरून त्यास मुलीचा वेष देऊन काशीपंत आपल्या स्त्रीसह निघाला होता.

२ कांही बखरींत असें आहे की, काशीपंताच्या घरी संभाजी आहे असे औरंगजेबास कळल्यावरून त्यानें त्याच्या घरास चौकी बसविली. तेव्हा त्या ब्राह्मणानें वर सांगितल्याप्रमाणें मोंगल अंमलदारांची खात्री करून आपल्यावरचा वहीम नाहीसा केला.

३ शि. दि. म्हणतो की, सर्वच भावांस विश्वासराव हा किताब दिला. यांस महाराजांनी दिलेली सनद रा. राजवाडे यानी आपल्या आठव्या खंडात प्रसिद्ध केली आहे. ह्या सनदेवरूनही असे सिद्ध होते की, महाराज आग्ऱ्यासच गेले होते.

४ प्रो. सरकार पृ. १९३.

असें सांगतात कीं, महाराजांस हें तिचे प्रेम आपल्यावर जडल्याचे कळले असून तिच्या वतीने कोणी त्यांच्याशी असेही बोलणे केलें कीं, तुम्ही मुसलमानी धर्माचा स्वीकार कराल तर शहाजादी तुमच्याशी विवाह करण्यास तयार आहे; परंतु महाराज ह्या गोष्टीला मुळींच कबूल झाले नाहींत. अशा मोठ्या सार्वभौम बादशहाचा जावई होऊन राहण्यापेक्षां स्वधर्म व स्वजाती ही त्यांस विशेष प्रिय वाटलीं. नुसत्या राज्यतृष्णेनेच जर ते प्रोत्साहित झाले असते तर हा संबंध जुळवून ते कदाचित् नर्मदानदीच्या अलीकडे एकंदर दक्षिणेचे पादशहा होऊन राहिले असते; परंतु राज्यतृष्णा व विषयवासना यांपेक्षा स्वातंत्र्यप्रीती, स्वधर्माभिमान व स्वकुलाभिमान ह्या वृत्ती त्यांच्या ठायीं प्रबल होत्या, हें ह्या एका गोष्टीवरून चांगले निदर्शनास येतें.

पुढें ही बेगम स्वनिर्धाराप्रमाणें आमरण अविवाहित राहिली. औरंगजेब दक्षिणेत आला तेव्हां त्याच्याबरोबर ती इकडे आली होती, ती स. १७०२ त ब्रह्मपुरी येथें आपल्या बापाच्या छावणींत मरण पावली. तिचा देह जेथे दफन केला तेथें तिच्या बापाने एक सुंदर कबर बांधून त्या गावास बेगमपूर असें नांव दिलें. ही निसाबेगम चांगली शिकलेली होती असें म्हणतात.[१] ह्या बेगमेच्या हृदयांत महाराजांविषयी शेवटपर्यंत केवढी आदरबुद्धी वसत होती याचे एक ऐतिहासिक उदाहरण आहे. तें असेंः औरंगजेबानें संभाजीस पकडून हाल करून ठार मारल्यावर रायगड किल्ला हस्तगत केला. त्या किल्ल्यांतून जी माणसे कैद करून आणली त्यांत संभाजीराजाचा एक लहान मुलगा होता. त्यास निसाबेगम हिने आपल्याकडे मागून घेतलें, व तो आपला नातू मानून त्याचें लालनपालन मोठ्या प्रेमाने आमरण केलें. हाच मुलगा पुढें शाहूराजा झाला हें सर्वांस विदित आहेच.

***

१ तिला तिच्या बापाप्रमाणें कुराण मुखोद्गत होतें व तिने काही कविताही केली होती असें म्हणतात. (मासीर -इ- अलमगीर, एलिअट भा. ७, पृ. १९६ व प्रो. सरकारकृत औरंगजेबाचे चरित्र, भाग -१ पाहा)

भाग विसावा

गेलेले किल्ले व प्रांत परत घेतले (१६६७–६९)

महाराज दिल्लीस अटकेंत पडले हें वर्तमान दक्षिणेत कळताच त्यांच्या लोकांनी मोगलांच्या प्रांतांत पुनः धामधूम सुरू केली, व पुढें ते अटकेंतून सुटून स्वदेशीं यावयास निघाले हें समजले तेव्हां त्यांच्या सरदारांस अधिकच चेव येऊन ते मोगलांस चोहोकडून त्रास देऊं लागलें. तो इतका कीं, त्या वेळच्या इंग्रज व्यापाऱ्यांचा असा लेख आहे कीं, 'शिवाजीमहाराज औरंगजेबाच्या अटकेंतून सुटून पळाले हें खरें असेल तर आता ते त्या बादशहास त्राहित्राहि करून सोडितील. आपण हा काय प्रकार केला असें त्याला होऊन जाईल!' हें त्यांचें म्हणणें पुढें खरें झालें.

महाराज दक्षिणेत येऊन पोंचण्यापूर्वी मोगलांची आणि विजापूरकरांची लढाई पुनः जुंपून मोगलांच्या सैन्याची पुष्कळ खराबी झाली. जयसिंगाने विजापुरास वेढा घातला असतां त्याच्या सैन्यास दक्षिणेंतील शिलेदारानी चांगलाच हात दाखविला. त्यास दाणावैरण कोठूनही मिळेनाशी होऊन त्याच्या सैन्याची पुरी उपासमार झाली. शिवाय त्या वर्षी अवर्षण झाल्यामुळें लोकांस पाणीही मिळेनासे झालें. विजापूरकरांच्या मदतीस गोवळकोंड्याच्या कुतुबशहानें फौज पाठविल्यामुळें तर मोगलांचा त्यांच्यापुढे मुळींच दम निघेना आणि औरंगजेब कांहीं आणखी फौज जयसिंगाच्या मदतीस पाठविना. कारण त्याला असा वहीम आला होता कीं, जयसिंग शिवाजीराजांना आतून वश झाला असून मागेपुढे आपणांस तो डोईजड होईल व शिवाजीमहाराजांशी तो एक होऊन आपल्या सत्तेस धक्का पोहोचण्यास उशीर लागणार नाही. ह्याप्रमाणें औरंगजेब दक्षिणेंतील मोहिमेविषयीं अंमळ बेपरवाई दाखवू लागला तेव्हां अर्थात् जयसिंगाने असा विचार केला कीं, आपले उमदे रजपूत शिपाई विनाकारण बळी देऊन अपयशाचा वाटा पदरी घ्यावा त्यापेक्षा ही लढाई सोडून परत जावे हेंच नीट दिसते. मग तो शत्रूशी युद्ध करण्याचें सोडून औरंगाबादेकडे पिच्छेहाट करूं लागला. तेव्हा अर्थात् शत्रूनें त्याचा पाठलाग केला; पण तो शूर सरदार त्यांच्या तावडीतून जेमतेम निभावून औरंगाबादेस जाऊन पोहोचला.

शिवाजीमहाराजांकडून जे किल्ले त्याच्या हातीं आले होते व जे त्यानें त्यांच्या मदतीनें पूर्वी काबीज केले होते त्यांचा योग्य बंदोबस्त ठेवण्यास देखील पुरेसे लोक त्याच्यापाशी उरले नव्हते व त्या कामी लागणारा खर्चही करण्यापुरतें द्रव्य त्याच्या हाती नव्हतें. यास्तव त्यानें घाटावर लोहगड, सिंहगड व पुरंदर आणि कोंकणात माहुली व कर्नाळा अशा मुख्य पाच किल्ल्यांवर बरेच लोक ठेवून देऊन त्यांचा बंदोबस्त नीट राखिला. यांशिवाय ज्या कित्येक गडांस अन्नादिकांची सामुग्री मिळण्यासारखी होती त्यांवर त्यानें थोडेसे लोक ठेविले आणि बाकीच्या किल्ल्यांचे दरवाजे जाळून टाकून व तटांचे सहज पडण्यासारखे भाग होते ते पाडून टाकून त्यांवर लोक ठेवून बंदोबस्त करण्याची मुळीं गरजच उरू दिली नाहीं. ह्याप्रमाणें जिकडील तिकडील व्यवस्था लावून जयसिंग औरंगाबादेस जाऊन स्वस्थ बसला असतां त्याच्यावर औरंगजेबाची इतराजी होऊन त्यानें त्याला परत बोलाविले व दक्षिणेच्या सुभ्यावर यशवंतसिंग व शहाजादा मोअझीम यांची नेमणूक केली. हा उमदा व शूर रजपूत सरदार खिन्न होऊन परत चालला असतां वाटेत आजारी पडून बऱ्हाणपूर येथे स. १६६७ च्या जुलै महिन्यांत मरण पावला.

इकडे मोरोपंत पिंगळ्यानें मोगलांनी अजीबात सोडून दिलेल्या किल्ल्यांची पुनः डागडुजी करून त्यांवर आपली ठाणी बसविली व त्यांच्या आसपासच्या मुलखावर आपला अंमल पुनः स्थापित केला. ज्या किल्ल्यांवर मोगलांचा बंदोबस्त अंमळ बेताचाच होता तेथल्या लोकांस हुसकून लावून ते पुनरपि हस्तगत करण्याचा क्रम त्यानें निरलसपणे चालविला. ह्याप्रमाणें महाराज परत दक्षिणेत येऊन दाखल होण्यापूर्वी मोगलांकडे गेलेले बरेच किल्ले त्यांच्या सरदारांनीं पुनः हस्तगत केले व ते परत आल्यावर सगळा कल्याण प्रांत त्यांनी पुनरपि काबीज केला.[१]

जयसिंग व दिलेरखान यांच्याबरोबर एवढी मोठी फौज देऊन दक्षिणदेश काबीज करण्याकरिता त्यांस पाठविलें असून तिचा कांही एक उपयोग झाला नाहीं, शिवाजीमहाराज हातीं सापडले होते तेही सुटून गेले. विजापूर व भागानगर एक झाले असून त्यांस आणखी शिवाजीमहाराज जाऊन मिळाले म्हणजे दक्षिणेंतील मोगली सत्तेचे समूळ उत्पाटन होण्यास विलंब लागणार नाहीं, असे विचार औरंगजेबाच्या मनांत येऊन त्यानें स्वतः दक्षिणेत स्वारी करण्याचा बेत केला होता. इतक्यांत उत्तरेकडे कांही कुरबूर उपस्थित झाल्यामुळे त्याला तिकडे जावे लागून हा बेत रहित करावा लागला. शिवाजीमहाराजांसारखा महापराक्रमी पुरुष आपण आपला कट्टा शत्रू करून सोडिला याची त्याला मोठीच धास्ती लागून राहिली. बरें, शहाजाद्याला व यशवंतसिंगाला ही दक्षिणेंतील मोहीम सांगून त्यांच्या ताब्यांत मोठी फौज द्यावी तर त्यांत आपल्या मुलाचा पराजय झाल्याने आपला सगळा आब जाणार व त्याला यदाकदाचित् जय आला तर तोच तिकडे फंदफितुरी करून आपणांस मोजीनासा होईल, ह्या वहिमानें त्यानें त्यांस ही मोहीम सांगितली नाहीं. ह्या अशा वहीमखोरपणाचा व दिरंगाईचा पुरा फायदा आमच्या प्रतापशाली चरित्रनायकानें हवा तसा घेण्यास बिलकूल आळस केला नाही.

सुलतान मोअझीम व यशवंतसिंग यांची दक्षिणच्या सुभ्यावर नेमणूक झाली. ती महाराजांना पुष्कळ अनुकूल झाली. त्यांनी दिल्लीस असतां यशवंतसिंगाशीं स्नेह केला होता. हा रजपूत सरदार मोठा बाणेदार व स्वधर्माभिमानी होता. औरंगजेबाने आपल्या बापाविरुद्ध बंड केलें तेव्हां हा पहिल्याने त्याच्याविरुद्ध होता; परंतु पुढें त्याची सरशी होण्याचा रंग दिसला तेव्हां हा त्यास सामील झाला होता. तरी हा औरंगजेबाच्या फारसा विश्वासांतला होता असें नाहीं. त्याचा मोठा दोष काय तो द्रव्यलोभ हा होता; परंतु हा त्याचा दोष महाराजाच्या पथ्यावर चांगला पडला 'हें द्रव्याचे लालची पेंढीचे ढोर आहे', असा महाराजांचा त्याच्याविषयी अभिप्राय होता. त्यांनी त्याला मुबलक अवदानें चारून अगदी आपलासा करून घेतलें. शहाजादाही स्वभावाने फार चांगला असून मनाचा थोर व शूर होता. बापाचा वहीमखोरपणा त्याच्यांत बिलकूल नव्हता. तो हाताचा सढळ असून ऐषआरामी त्याला फार आवडत असे. त्याला कोणी कांही सांगितलें असता त्याचें मन सहज फिरत असे. यशवंतसिंगाचें त्याच्यावर फारच वजन असे. त्याच्या सांगण्याबाहेर तो फारसा जात नसे. ह्याला दक्षिणेत पाठवितांना बादशहाने असें बजावून सांगितलें होतें कीं, 'तुम्ही शिवाजीराजांच्या गळां पडूं नका. तुमच्या हातून त्यांच्याशी मसलत निभावणार नाहीं. त्यांच्याशी होतां होईतों द्वेष करूं नका. त्यांनी आजपर्यंत पुष्कळ सरदारांस बुडविले आहे. तशी तुमची दशा झाल्यास दुलौकिक होऊन पातशाहीस अपाय होईल. यास्तव त्यांच्याशी सलोखा करून आपला तिकडील प्रांत राखा!' बादशहाच्या ह्या सूचनेप्रमाणें शहाजाद्याच्या मनांत शिवाजीमहाराजांशी तह करण्याचें होतें. ते दिल्लीस गेले तेव्हा त्यांस अटकेत ठेवण्याचा प्रयत्न बादशहाने केला होता तो ह्या शहाजाद्यास मुळीच पसंत वाटला नव्हता. शिवाजीमहाराजांसारखा शूर व हुशार अमीर हातीं राखण्यांतच हित आहे असें त्याचें मत होतें.

असें सांगतात कीं, हा शहाजादा दक्षिणेत येत आहे असें कळले तेव्हां महाराजांनी गरीब शेतकऱ्याचा वेश धारण करून त्यास ब्रम्हपुरीजवळील एका गांवी गाठून कांही दही नजर केलें. तें उत्कृष्ट आहे असें पाहून शहाजाद्यानें त्याचा स्वीकार केला व तें आपणांस भोजनाच्या वेळीं वाढावयास सांगितलें. त्या दह्यांत एक मेणाची गोळी त्याला सापडली.

---

१ कल्याण-भिवंडी मोगलांच्या हाती पुढें बरेच दिवस होती असे प्रो. सरकार म्हणतात.

ह्या गोळींत एक चिट्ठी होती. तींत महाराजांनी असा मजकूर लिहिला होता कीं, 'माझ्याशी युद्ध करून विजय संपादण्यास पराक्रमी शहाजादा येत आहे तो कसा आहे हें स्वत: डोळ्यांनी पाहावे म्हणून मी ही युक्ती योजिली.' यावरून शहाजाद्याच्या मनात महाराजांविषयी कोणती वृत्ती उत्पन्न झाली असेल याची कल्पना सहज होण्यासारखी आहे. अशा युक्तिमान् व साहसी पुरुषाशी विरोध करणें मोठे धोक्याचे आहे अशी त्याची पुरी खात्री झाली. औरंगाबादेस येऊन पोहोचल्यावर त्यानें यशवंतसिंगाकरवीं महाराजांशी तहाचे बोलणे लाविले.[१] महाराजांनी यशवंतसिंगास द्रव्याची लालूच दाखवून पूर्वीच आपलासा करून घेतलें होतें. यास्तव आपणांस अनुकूल असा तह करून घेण्यास त्यांना मुळींच कठीण गेले नाही. मोगल बादशहाशीं एवढ्यांत पुरा विरोध करणें हिताचे नाहीं असें त्यांस वाटत होतें व तशात शहाजाद्यासारख्या उमद्या पुरुषाशी स्नेह जुळवून ठेविल्यानें आपला डाव मागेपुढे साधणे सुलभ होईल, असें त्यांचें धोरण होतें. तेव्हां शहाजादा आपण होऊन सलोखा करण्यास उद्युक्त आहे असें कळल्यावर महाराजांनी बाळाजी आवजी चिटणीस यास मोठा लवाजमा देऊन यशवंतसिंगाकडे पाठविलें. त्यांत त्यांचा हेतु अर्थात् असा होता कीं, शहाजाद्याचा वास्तविक मनसोबा काय आहे तो नीट कळावा. त्यांनी त्याला नजराणा म्हणून बहुमोल वस्त्रे, जवाहीर व हत्ती अशी पाठविली. यशवंतसिंगानें चिटणिसाला शहाजाद्याकडे नेले तेव्हां तो त्याला म्हणाला, 'आमचे महाराज जयसिंगाच्या विद्यमाने तहनामा ठरवून बादशहाच्या मुलाखतीस दिल्लीदरबारी गेले. तेथें समक्ष मुलाखत झाल्यावर कित्येक मुद्यांचा पक्का ठराव करून घेऊन बादशहाची नोकरी पतकरून राहावयाचे असा त्यांचा इरादा होता. जयसिंग, रामसिंग वगैरे मातबर सरदारानी मध्यस्थी केली असून बादशहास त्यांचा विश्वास न वाटून त्यानें त्यास अटकेत ठेविले. हें काही नीट झालें नाही.' त्यावर शहाजाद्यानें येणेप्रमाणे उत्तर केलें: 'बादशहाच्या मनात शिवाजीमहाराजांविषयीं कांही एक विपरीत भाव नव्हता व हल्लींही नाहीं. त्याचा मानस एवढाच होता कीं, उभयतांमधील प्रपंच मुळीच नाहीसा व्हावा व राजांनी त्यांच्या पदरी सरदारी पतकरून राहावें; परंतु त्यांस ते पसंत झाले नाही. तेव्हां त्यास दपटशहा देऊन आपल्याकडे ठेवून घ्यावे अशा विचाराने त्यानें त्यांस प्रतिबंधांत ठेविले. राजांस अर्थात् ते न मानून ते तेथून निसटून आले. आम्हांस बादशहाने येते वेळीं अशी आज्ञा केली आहे कीं, 'राजांशी विरोध करूं नये. त्यांच्यासारखे पुरुष मागें झाले नाहींत व पुढें होणार नाहींत. म्हणून ते आमच्या पदरी राहावे ह्यासाठी आम्ही प्रयत्न केला; पण तो विफल झाला. आता झालें तें ठीकच झालें. त्याची मर्जी तिकडेच राहावें अशी आहे. त्यापेक्षा त्यांच्याशी पूर्वी झालेले करार कायम करून त्यांच्याकडून कामगिऱ्या करवून घ्याव्या व त्याच्या विचारे वागावे; आम्हास कांही वाकडे करणे असतें तर त्याच समयी करतो.' हें असें बादशहाचे म्हणणें आहे. त्यावर आपला काय मनसोबा आहे तो कळवावा.'

हें असें शहाजाद्यांशी भाषण झाल्यावर त्याचा हेतू कसा काय आहे तें चिटणिसानें महाराजांस लिहून कळविले. तेव्हां महाराजांनी त्याच्याशीं तह करण्यास राजी होऊन तहाची कलमे कशीं असावीं हें उभयतांच्या विचाराने ठरलें. ती कलमे अशी होती १) परस्परांनी परस्परांशी इतःपर स्नेहभावानें वागावें; (२) पूर्वी झालेला तह कायम करावा; (३) उभय पक्षाचे परस्परांविषयी दिल साफ झाल्याखेरीज महाराजांनी आपली सगळी फौज मोगलांच्या कुमकेस पाठवू

---

१ प्रो. सरकार अखबरात नावाच्या यवनी बखरीच्या आधाराने असे म्हणतात की, शिवाजीमहाराजांस आपल्या राजसत्तेची नीट व्यवस्था लावावयाची होती. आपल्या किल्ल्यांची डागडुजी करून त्यांवरील बंदोबस्त नीट करावयाचा होता आणि पश्चिम किनाऱ्यावर शिद्दी व आदिलशहा यांस पुरा शह देऊन तिकडील आपली सत्ता वाढवून दृढ करावयाची होती, म्हणून त्यांना ह्या वेळीं मोंगलांशी सलोखा राखावयाचा होता. या हेतूने त्यांनी औरंगजेबास असे पत्र लिहिले कीं, 'बादशाही सैन्य मजवर पाठविल्याची खबर मला लागली आहे, ही ऐकून माझी पाचावर धारण बसली आहे. मी पुनरपि बादशहाचा अंकित होण्यास तयार आहे आणि माझा मुलगा संभाजी याच्याबरोबर चारशे लोक देऊन मोंगलांच्या लष्करात त्याला पाठवितो.' हे त्यांचे म्हणणे बादशहाने मनास आणिलें नाहीं. तेव्हां महाराजांनी यशवंतसिंगास शहाजाद्यापाशी मध्यस्थी करण्याविषयीं असे पत्र लिहिले कीं, बादशहाने माझा अव्हेर केला आहे. नाही तर मी त्यांस कंदाहार प्रांत पुनरपि जिंकून दिला असतां. माझा जीव बचावण्याकरितां मी आग्ऱ्याहून पळून आलो. माझा साहाय्यकर्ता मिर्झाराजा जयसिंग तर मरण पावला. तुम्ही माझ्यासाठी रदबदली करून मला माफी करावयास लावा, म्हणजे मी माझा मुलगा संभाजी यांस माझे लोक देऊन शहाजाद्याच्या नोकरीस पाठवितो.

नये व परस्परांच्या भेटीमुलाखती होऊं नयेत; (४) फौजेच्या खर्चास कांही मुलूख लावून दिल्यास तूर्त पाच हजार फौज महाराजांनी मोगलांच्या कुमकेस पाठवावी (५) पूर्वीच्या तहात ठरल्याप्रमाणें संभाजीस पाचहजार स्वारांची मनसब द्यावयाची, तिच्या सरंजामासाठी वऱ्हाडप्रांतांतील आवढें व बालापूर हे तालुके लावून द्यावे; (६) पूर्वीच्या कराराप्रमाणें चौथाई व सरदेशमुखी हे हक्क वसूल करण्याची महाराजांस पूर्ण मुभा असावी (७) आणि निजामशाहींतील व अदिलशाहींतील जे किल्ले व प्रांत महाराजांपाशीं सध्या आहेत ते त्याच्याकडे राहू द्यावे.[१] हा असा तहनामा होऊन त्यावर शहाजाद्यानें आपली सही केली आणि महाराजांस असें सांगितलें कीं, 'तुम्ही तहाच्या अटी नमूद करून एक अर्ज आम्हांस केवळ बाह्योपचारार्थ करावा, म्हणजे आम्ही तो बादशहाकडे स्वतःची शिफारस करून पाठवून देऊं.' ह्या सूचनेप्रमाणें अर्ज तयार करून तो शहाजाद्यानें औरंगजेबाकडे पाठवून दिला व त्यावर अशी मोठ्या जोराची शिफारस लिहिली की, शिवाजीमहाराजांसारखा महाप्रतापी पुरुष आपणांस पुनरपि असा अल्प सायासाने वश होत आहे तर त्याच्या अटी कबूल करून त्याच्याशी स्नेहभाव जोडावा.' हा शहाजाद्याच्या शिफारशीसह गेलेला अर्ज बादशहास त्या वेळीं मंजूर करणें सोईचे वाटलें व त्यानें महाराजांस 'राजा' हा किताब देऊन संभाजीस देऊं केलेली मनसब कायम केली आणि वऱ्हाडप्रांतांत त्याला जी जहागीर करून द्यावी असें सुचविले होतें, तिची सनद पाठवून दिली.[२]

ह्या नवीन मिळालेल्या जहागिरीची व्यवस्था लावण्यासाठीं रावजी सोमनाथ नांवाच्या एका ब्राह्मण कारकुनास मोकासदार असा नवा किताब देऊन योग्य सरंजामानिशीं महाराजांनी रवाना केलें. संभाजी मोगलांचा मनसबदार झाल्यावरून त्याच्याबरोबर प्रतापराव गुजरास पांच हजार स्वारांनिशीं देऊन औरंगाबादेस पाठविलें (स. १६६७ ऑक्टोबर). त्याची शहाजाद्यानें मोठ्या सन्मानाने भेट घेऊन त्याला राहावयास स्वतंत्र जागा नेमून दिली व तो एक नवाच पुरा बसविला; परंतु संभाजीचे वय ह्या वेळीं अगदीं अल्प असल्यामुळें त्याला शहाजाद्यानें परत पाठविलें व प्रतापराव गुजरास आपल्यापाशी स्वारांसह ठेवून घेतलें. महाराजांनी स्वतः मनसबदारी स्वीकारून मोगलांची ताबेदारी पतकरण्याचा प्रसंग मोठ्या युक्तीने टाळला.

ह्या सलोख्यामुळें पुणे, सुपे वगैरे प्रांत महाराजांच्या कबजांत पुनरपि बिनतक्रार येऊन पूर्वीच्या तहानें हातचा गेलेला बहुतेक मुलूख त्यांस मिळाला. मात्र पुरंदर व सिंहगड हे किल्लेत्यांच्या हातीं अद्यापि आले नव्हते.[३] ही अशी लालूच महाराजांस दाखविण्यांत त्या कपटी बादशहाचा मतलब अर्थात् हा होता कीं, त्यांना असे फूस लावून पुनरपि आपल्या काबूत आणून त्यांचा पुरा घात करावा; परंतु शहाजाद्याचा उद्देश असा बिलकूल नव्हता. तो जात्या उदार व मनाचा निष्कपटी होता.

असें सांगतात कीं, ह्या शहाजाद्याला आपल्या बापाचा कपटी स्वभाव व वहीमखोरपणा सहन न होऊन त्यानें त्याच्याविरुद्ध बंड करण्याचा घाट घातला व शिवाजीमहाराजांपाशी मदत मागितली. ह्या गोष्टीचा त्यांस अंदेशा येऊन त्यांनी शहाजाद्यास असा निरोप पाठविला कीं, 'तुमची व बादशहाची खरीखुरी लढाई सुरू झाली म्हणजे मी आपल्या फौजेनिशीं तुमच्या लष्करास येऊन मिळतो. महाराजांस आपला संशय आला असें लक्षांत येऊन शहाजाद्यानें त्यांची खात्री होण्यासाठी आपल्या सैन्यासहवर्तमान उत्तरेकडे कूच केलें व पुनः महाराजांना निकडीचा निरोप पाठविला व त्यांचा संशय दूर व्हावा म्हणून आपल्या वतीचे मोठमोठे हुद्देदार नेमिले. त्यावर महाराजांनी असा जबाब पाठविला कीं, दक्षिणेंतील तुमच्या मुलखाचे रक्षण तुमच्या पश्चात् मी इकडे राहून करितों. तुमचे सैन्य बादशहाशीं लढण्यास पुरेसे आहे. इतकेही करून तुमचा पराभव झाल्यास माझ्या अंमलांतील प्रांतांत तुम्ही खुशाल येऊन राहावें. ह्यानंतर शहाजाद्यानें महाराजांस 'आपल्या सर्व सैन्यांचे आधिपत्य तुमच्याकडे देतो' असें आमिष दाखविले; परंतु त्यासही ते

---

१ चिटणीस म्हणतो कीं, ह्या तहनाम्याअन्वये पूर्वी सोडून दिलेले सत्तावीस किल्ले पुनः मोगलांच्या स्वाधीन करावे लागले.

२ रा. राजवाड्यांचा आठवा खंड, पृ. १७ पाहा.

३ प्रो. सरकार म्हणतात की, चाकण खेरीज करून कोणतेच किल्ले त्यांच्या हाती परत आले नव्हते, असे दिसते.

लुब्ध झाले नाहींत. शेवटीं त्यांचें साहाय्य न मिळाल्यामुळे शहाजादा हताश होऊन माघारी फिरला व आपल्या बापाची क्षमा मागून पुनः औरंगाबादेस येऊन राहिला. महाराजांनी त्याला ह्या प्रसंगी साहाय्य केलें नाहीं ह्या गोष्टीचा राग तर त्या थोर मनाच्या शहाजाद्यास आला नाहींच, परंतु उलट तो त्यांच्याशीं अधिकाधिक स्नेह वाढविण्याचा प्रयत्न करूं लागला.[१]

औरंगजेबानें शहाजाद्यांस असें सांगून पाठविलें कीं, 'शिवाजीमहाराजांस अदिलशाही व कुतुबशाही प्रांतांवर स्वाऱ्या करण्यास उत्तेजन द्यावे. त्या अशा रीतीनें कमजोर झाल्या म्हणजे आपणांस त्या बुडविण्यास कठीण जाणार नाही. त्या प्रांतांवर स्वाऱ्या करून जो मुलूख ते काबीज करतील त्यांतला काहीं त्यांच्या सरंजामास म्हणून लावून द्यावा', बादशहाच्या ह्या सूचनेप्रमाणें महाराज त्या मुलखात वारंवार स्वाऱ्या करूं लागले. मोगल सैन्याच्या मदतीने शिवाजीमहाराज आपला उरलेला मुलूख काबीज करूं लागले आहेत असें पाहून विजापूरकरांनी मोगलांशी तह करण्याचा मानस दर्शविला. त्याप्रमाणें उभय पक्षांमध्यें तह होऊन असें ठरलें कीं, सोलापूरचा किल्ला व त्यालगतचा अठरा हजार होन वसुलाचा मुलूख विजापूरकरांनी मोगलांस द्यावा. ह्या तहाची हकीगत महाराजांस कळताच त्यांनी यशवंतसिंग व शहाजादा यांस भेटून त्यांच्याकडून असें कबूल करून घेतलें कीं, त्यांनी विजापूरकरांच्या व भागानगरकरांच्या राज्यांत वाटेल तशी धामधूम केली तरी त्याकडे मोगल सरदारांनी कानाडोळा करावा. असा बंदोबस्त करून महाराजांनी अदिलशहाच्या मुलखात चौथाई व सरदेशमुखी हे हक्क वसूल करण्याचा धूमधडाका चालविला. ह्या त्यांच्या सतत होणाऱ्या त्रासापासून आपला मुलूख सोडविण्याच्या इराद्याने अदिलशहाचा वजीर अब्दुल महंमद याने महाराजांशींही तह करून त्यांस वर्षास तीन लाख होन खंडणी देण्याचे पुनः कबूल केले[२] व त्यांनी अदिलशाही मुलखात कोणत्याही निमित्तानें गडबड करूं नये असें ठरलें. हाही तह त्या वजिरानें गुप्तपणे केला. कारण हिंदूंशी तह करून त्यांस खंडणी देण्याचे कबूल केल्यास यवनी बादशाहीचा पाणउतारा केला असें दरबारच्या अमीर-उमरावांस वाटून त्यांनी नसता गोंधळ मांडला असता, परंतु खुद्द अदिलशहास हा तह पसंत होऊन त्यानें महाराजांचा वकील विजापूरच्या दरबारांत ठेवून घेतला. ह्या वकिलीच्या कामगिरीवर शामजी नाईक पांडे ह्याची महाराजांनी नेमणूक केली.'[३]

हा असा अदिलशहाशी तह होऊन त्याच्या राज्यांत मोहिमा करण्याचें बंद पडलें तेव्हां महाराज कुतुबशहाच्या मुलखाकडे वळले व त्यांत वेळोवेळा स्वाऱ्या करून देश लुटून उद्ध्वस्त करूं लागलें. त्या बादशहाला महाराजांचे पारिपत्य करण्याचें सामर्थ्य मुळींच नव्हतें. त्यांत आणखी त्यांना मोगलांचे पाठबळ आहे असें कळल्यावर तर त्यांच्याशी युद्ध करण्याचे त्यांना धैर्य होईना. तेव्हां त्यांची ही आपल्या राज्यावरील झडप बंद करण्यासाठी त्याला

---

१ मनुस्सी म्हणतो की, औरंगजेबाने शहाजादा मोअझीम याचे हे खोटेच बंड उपस्थित करावयास फर्माविले होते, यात त्या कपटी बादशहाचा तिहेरी हेतू होता. एक तर शिवाजीमहाराजांस पुनरपि फसवून गिरफ्तार करावे; दुसरा हेतू असा कीं, आपल्या सेनापतीचे इमान कसास लावावे आणि तिसरा हेतू असा की, पुढें कधी मोअझीम याने बादशहा विरूद्ध खरेखुरे बंड उभारले तर त्याचा कोणास विश्वास येऊ नये. प्रो. सरकार (पृ. २१२ ते २१९) म्हणतात की, औरंगजेबाने स. १६७० त दिलेरखानास शहाजाद्याच्या मदतीस पाठवून महाराजांवर चढाई करावयास फर्माविले असतां त्या दोघाचे भांडण होऊन ते इतके विकोपास गेले की, उभयतांमध्ये लढाई सुरू झाली आणि तिला बहुतेक बंडाचे स्वरूप आले. ह्या लढाईच्या वेळीं शहाजादा व यशवंतसिंग यांनी दिलेरखानाचा खानदेशात पाठलाग केला आणि त्यांनी शिवाजीमहाराजांना मदतीस बोलाविले. महाराजांशी त्यांनी ह्या वेळीं उगीच नावाला लढाई सुरू केली होती.

२ कित्येक बखरकारांच्या मते ही खंडणी सात लाख होन ठरली होती असें आहे. हा खंडणी देण्याचा करार विजापूरकरांनी अर्थात दुसऱ्यांदा केला होता.

३ हा असा विजापूरकरांशी तह झाल्याचे प्रो. सरकार लिहीत नाहीत. तथापि, त्या वेळच्या सुरत वगैरे ठिकाणच्या इंग्रज व्यापाऱ्यांच्या लेखांचे उतारे त्यांनी दिले आहेत त्यावरून असें दिसते की, महाराजांचा ह्या वेळीं विजापूरकरांशी कोणत्याही प्रकारचा बखेडा चालू नव्हता (पृ. २०४ व ३१६). जेध्यांच्या शकावलीत हा तह १६६७ च्या मे महिन्यात झाल्याचा उल्लेख आहे. ह्या शकावलीत बाबाजी नाईक पांडे यास वकील नेमल्याचे नमूद केले आहे. मागे तेराव्या भागात अदिलशहाचा वजीर अबदुल महंमद याने महाराजांशी गुप्त तह केल्याचा उल्लेख आहे. त्या वेळी हा शामजी नाईकच वकील होता.

सामोपचाराचाच उपाय योजणे भाग पडलें आणि त्याचे दिवाण मादण्णा व आकण्णा यांनीही त्याला अशीच मसलत दिली. मग ह्या हिंदू दिवाणांच्या मध्यस्थीनें कुतुबशहानें महाराजांशी संधी करून असें ठरविलें कीं, त्याने त्यांना प्रतिवर्षी पांच लाख रुपये खंडणी द्यावी, परस्परांनी परस्परांशी इतःपर स्नेहभावाने वागावे व परस्परांचे वकील परस्परांच्या दरबारी राहावे. ह्या करारान्वयें महाराजांनी निराजी रावजी नांवाचा वकील तानशहा झ्यबशहाच्या दरबारी ठेवून दिला.[१]

ह्याप्रमाणें ह्या दोन्ही पातशाहतींस दीन करून त्यांच्यावर वार्षिक खंड बसविल्यावर महाराज कोंकणपट्टीकडे वळले. तेथें अजून फिरंगी व शिद्दी यांचा सुळसुळाट चालू होता. तो मोडून काढून सर्व कोंकणप्रांतावर आपली सत्ता निर्वेध बसवावी असा त्यांचा हेतू होता. मग त्यांनी गोव्यावर अकस्मात् घाला घालून तेथील फिरंग्यांस हाकून देण्याचा बेत केला; परंतु तो सिद्धीस गेला नाही असें दिसते. त्यांच्या व महाराजांच्या ह्या समयीं झालेल्या युद्धप्रसंगाचे वर्णन कोठेही आढळत नाहीं. त्यावरून ते मुळी झालेच नसावे असें वाटते. नंतर त्यांनी शिद्दीचा जंजिरा हस्तगत करण्याचा पुनः एकवार मोठ्या जोराचा प्रयत्न केला. परंतु त्याचा कांही एक उपयोग झाला नाहीं. असें सांगतात कीं, शिद्दी ह्या वेळीं बराच जेरीस येऊन त्यानें मुंबईच्या इंग्रज व्यापाऱ्यांपाशीं मदतही मागितली होती. ह्याप्रमाणें महाराजांचे हे दोन्ही बेत ह्या वेळीं असिद्ध राहिले.

वर सांगितल्याप्रमाणें अदिलशहा, कुतुबशहा व मोगल यांच्याशी तह होऊन जिकडेतिकडे स्थिरस्थावर झाल्यावर महाराजांना एकदोन वर्षे थोडीशी विश्रांती मिळाली. ह्या विश्रांतीचा उपयोग त्यांनी संपादिलेल्या राज्याची व्यवस्था नीट लावण्याकडे केला. ही व्यवस्था कशी काय लाविली तें पुढें एका स्वतंत्र भागांत सविस्तर कथन करू.[२] येथें पूर्वकथानुषंगानें पुढें काय घडले त्याचें निवेदन करू.

कोणाच्याच प्रांतावर स्वाऱ्याशिकाऱ्या करण्याची सोय न राहून महाराज ह्या वेळीं स्वस्थ बसले तेव्हां पुष्कळांचा असा समज झाला होता कीं, त्यांस त्यांच्या हेतूप्रमाणें स्वराज्यप्राप्ती होऊन त्यांच्या सर्व इच्छा, झाल्या. आतां ते संपादित राज्याचा नीट बंदोबस्त राखून स्वस्थ राहतील. मोगलांशी लढण्याचा त्यांच्यात वकूब असता तर ते पुन: त्यांच्याशीं तह करून त्याचे अंकित झाले नसते. ह्यापुढे ते मोगल सुभेदाराला नजरनजराणे पाठवून त्यांस खूष राखून त्यांच्या तंत्राने वागतील व फार तर स्वसंपादित दौलत कांही दिवस कायम राखितील; परंतु हा लोकांचा समज अगदीं चुकीचा होता असें त्यांच्या पुढील चरित्रक्रमावरून सहज ध्यानांत येईल. मोगलांशी टक्कर द्यावयास सध्यां आपली तयारी असावी तशी नाहीं हें महाराज पूर्णपणे जाणून होते. तेव्हां त्यांच्याशी तूर्त स्नेहभावच राखावा असें त्यांस वाटले. बरें, विजापूरकर व भागानगरकर यांच्याशी केलेला तह मोडून त्यांच्या राज्यांत पुनरपि धामधूम करूं लागल्यास दोन्ही पादशहा एक होऊन आपल्याशी संग्राम करण्यास सिद्ध होतील, हें त्यांस आतां पक्के कळून आलें होतें. कारण नुकतेच

---

१ खाफीखान (इलिअट, सातवा भाग पृ. २८६-८७) म्हणतो की, शिवाजीमहाराजांनी आग्ऱ्याहून परत आल्यावर गोवळकोंड्याचा सुलतान अबदुल कुतुबशहा याची भेट घेऊन त्याच्याशी संगनमत केले आणि त्याचे जे किल्ले विजापूरकरांनी काबीज केले होते ते परत घेऊन देण्याचे वचन त्यास दिलें. त्याप्रमाणे त्यानी हे किल्ले जिंकून त्यातले कांही कुतुबशहास दिले व काही आपल्या ताब्यात ठेविले; परंतु ज्या किल्ल्यांची नावे खाफीखान देतो त्यातले कित्येक पुढे काही दिवसांनी महाराजांनी जिंकिले असे दिसते. शिवाय हाच बखरकार पुढें म्हणतो की, महाराज सुलतान अबुलहसन गादीवर बसल्यावर दोन-तीन वर्षांनी पहिल्याने हैद्राबादेस (भागानगरीस) गेले. सदरील तहाची हकीगत मराठी बखरीच्या व स्कॉटकृत दक्षिणेच्या इतिहासाच्या आधाराने दिली आहे. ग्रांट डफही ह्या तहाचा उल्लेख करितो. जेध्यांच्या शकावलीत असा उल्लेख आहे कीं, निराजी रावजी याने कुतुबशहाशी सन १६७२ च्या जून महिन्यात तह करून एक लाख होन खंडणी त्या सुलतानाने द्यावी असा करार केला असून त्यांपैकी ६६ हजार होन महाराजांकडे आणून दिले. ही खंडणी सुलतान अबुल हासन गादीवर बसल्यावर पुनरपि आणखी घेतली असावी असे दिसते. सन १६६९ च्या सुमारास निराजी औरंगाबादेस मोंगलांजवळ प्रतापराव गुजराबरोबर होता असा जेध्यांच्या शकावलीत उल्लेख आहे.

२ भाग चोविसावा पाहा.

विजापूरकरांचें मोगलाशी युद्ध जुंपले होतें त्यांत कुतुबशहाच्या मदतीने अदिलशहानें मोगलांच्या सरदारांचें कांही एक चालू दिलें नव्हते. तेव्हां असाच एकोपा ते पुनः करतील असा दृढ संभव होता. यास्तव मोगलांचाच आश्रय धरून रहाणे आपल्या हिताचे आहे असें महाराजांच्या लक्षांत पूर्णपणे येऊन चुकले होतें. शिवाय त्या पादशहातींशीं विरोध प्रकट करून युद्धास सिद्ध झाल्यास मोगल सुभेदार आपणांस साहाय्य करतील अशी आशा महाराजांस मुळींच नव्हती. कारण, एक तर मोगलांचा विजापूरकरांशी नुकताच तह झाला होता, व दुसरें असे कीं, काफर यवनपादशाह्या बुडविण्यास उद्युक्त झाला असतां त्यास औरंगजेबासारखा कट्टा स्वधर्माभिमानी बादशहा साहाय्य करील हें सहसा संभवनीय नव्हतें. हें सर्व ध्यानात आणून महाराजांनी ह्या वेळीं मोगलाच्याच तंत्राने वागून कुतुबशाही व अदिलशाही हळूहळू कमजोर करण्याचा विचार मनात आणला. आणखी असें कीं, औरंगजेबाच्या मनात दक्षिणेतील ह्या दोन्ही पातशाहती बुडवून टाकून तेथें आपली सत्ता स्थापित करण्याचा विचार पुष्कळ दिवस वागत होता व तत्सिद्ध्यर्थ त्यानें हा काळपावेतों अनेक प्रयत्नही केले होते. असाच उद्देश महाराजांचाही होता. तेव्हां एका भक्ष्याच्या प्राप्तीसाठी दोन सिंह जेथे टपलेले असतात तेथें जो सिंह अद्यापि बाल्यदशेंत आहे त्यानें दुसऱ्या जरठ सिंहाशी एकदम स्पर्धा करू जाणें अविचाराचे होणार असून अपेक्षित भक्ष्यलाभ न होता जवळ असेल नसेल तेही सर्व जावयाचें, हें महाराजांस समजत असे. यास्तव आपले स्नायू मजबूत होऊन आपल्या दाढा व पंजे सुदृढ होत तोपर्यंत त्या बड्या सिंहाशी सलोखा राखून त्याच्या तंत्राने जो कांही अपेक्षित भक्ष्याचा अंश प्राप्त होईल तो ग्रहण करावा व हा आधीच जरठ झालेला सिंह सृष्टिक्रमानुसार अशक्त व रोड झाल्यावर त्यानें मिळविलेलें हें सबंध भक्ष्य व त्याचें पूर्वीचें कांही असेल तेही हळूहळू हाताशी घालावे असें त्यांचें धोरण होतें. हें अगदी योग्य होतें व हें साधण्याचा रंगही थोडाथोडा दिसू लागला होता. मोगलांशी सख्य केल्यामुळें कुतुबशहा व अदिलशहा यांच्यावर महाराजांचा पुरा शह बसून ते त्याना पूर्वोक्त प्रकारे वार्षिक खंड देण्यास तयार झाले.

पण हे मोगलांशी केले सख्य फार दिवस टिकले नाहीं. त्या वहीमखोर मोगल बादशहाला लवकरच असें वाटूं लागलें कीं, शिवाजीमहाराजांनी आपणांस मानभावी नम्रता दाखवून केवळ भुरळ घातली आहे. शहाजादा व यशवंतसिंग यांस अनेक प्रकारे लालूच दाखवून हे आपला डाव साधणार आहेत. असा संशय त्याच्या मनांत पुरा भरून त्यानें शहाजाद्यास असा हुकूम पाठविला कीं, शिवाजीमहाराजांशी अशा सलोख्याने वागणे ठीक नाहीं. ते अधिकच बळावत चालले आहेत. त्यांचा दक्षिणेंतील यवनी पातशाहतींवर पुरा डोळा असून ते त्या घेण्याच्या उद्योगांत आहेत. त्या हस्तगत करून ते प्रबळ झाले म्हणजे आपल्याही पातशाहतीवर उलटतील. मग त्यांस आटोपणें कठीण जाईल. त्या यवनी शाहींतील जे कोट, किल्ले व प्रांत त्यांनी आमच्या साहाय्यानें घेतले त्यांचें उत्पन्न त्यांनी आमच्या पोत्यास जमा करावे तें न करता त्याचा उपभोग ते आपणच घेत आहेत, हें कांहीं ठीक नाहीं. यास्तव त्यांच्याशीं केलेला तह मोडून त्यांस दिलेले किल्ले व प्रांत माघारी घ्यावे, त्यांची फौज आपल्या मदतीस म्हणून ठेवून घेतली आहे ती माघारी पाठवावी किंवा साधल्यास तिचा नाश करावा आणि प्रतापराव गुजर, शिवाजीमहाराज व इतर बडेबडे सरदार यांस ताबडतोब कैद करावे ह्या हुकमाप्रमाणें तुम्ही वागणार नाहीं तर तुमच्यावर माझी फार इतराजी होईल.[१] हा असा हुकमाचा खलिता दिल्लीहून निघाल्याचें वर्तमान शहाजाद्याच्या गुप्त बातमीदारांनी त्याला आगाऊ कळविताच त्यानें ही बातमी प्रतापराव गुजराला गुप्त रीतीनें कळविली व 'आताच्या आता येथून पळून जा'. असा त्यास इशारा केला. त्याबरोबर प्रतापराव आपले स्वार घेऊन महाराजांचा औरंगाबादेस असलेला निराजी रामजी नांवाचा वकील यासह रातोरात मोगलांची छावणी सोडून औरंगाबादेहून निघाला व सुखरूपपणे पुण्यास येऊन दाखल झाला. तिकडे बादशहाचा

१ बुंदेले म्हणतो की, बादशहाने संभाजीला दिलेली जहागीर काढून घेतली ती अशा निमित्तानें की, शिवाजी महाराजांस दिल्लीस जातांना एक लाख रुपये खर्चासाठी म्हणून दिले होते, त्याच्या मोबदल्यादाखल ही जहागीर खालसा करावी असें बादशहाने ठरविलें. त्याप्रमाणें ती जहागीर मोंगलानी परत घेतल्याचे वर्तमान कळताच महाराजांनी प्रतापराव गुजरास स्वसेनेसह लगोलग परत बोलाविले व त्यांचे लोक वऱ्हाडातील जहागिरीवर होते ते सापडला तेवढा माल लुटून स्वराज्यास परत आले.

सदरीं निर्दिष्ट केलेला हुकूम शहाजाद्याच्या हातीं पडताच त्यानें मराठे पळून जात होते त्याचा पाठलाग करण्यासाठीं कांहीं लोक पाठविलें, ते अर्थात् अशा उद्देशाने कीं, आपल्या मसलतीने ते पळून गेले असा अंदेशा बादशहास येऊं नये; परंतु ह्या पाठलागास पाठविलेल्या सैन्याच्या हातून काहीएक न होऊन तें परत औरंगाबादेस गेलें. मग शहाजाद्यानें त्या बादशाही फरमानास असा जबाब पाठविला कीं, 'मराठे हरामजादे, मोठे लबाड! ते आपले फरमान येण्यापूर्वीच आमच्या लष्करातून फरारी झाले. त्यामुळें त्यांस पकडून कैद करण्याचें साधलें नाहीं. हे वर्तमान ऐकताच औरंगजेबाने शहाजाद्याच्या मदतीला दिलेरखान व दाऊदखान यांस दुसरीकडल्या मोहिमा सोडून औरंगाबादेस पाठविलें. त्याशिवाय आणखीं कित्येक सरदार उत्तरेकडून पाठविलें.

प्रतापराव गुजर सर्व फौज व चीजवस्तू घेऊन व शहाजाद्यानें गुप्तपणें दिलेला पुष्कळ नजरनजराणा घेऊन सुरक्षितपणे परत आल्याने महाराजांस आनंद वाटला. मोगलांशी झालेला तह अशा रीतीने एकाएकीं मोडल्याबद्दल त्यास वाईट वाटलें नाहीं. कारण त्यांस आतां स्वस्थ बसून राहणे बरें वाटत नव्हतें. दोन वर्षांची स्वस्थता मिळून आपल्या राज्याची व्यवस्था नीट लागली व आपल्या एवढ्या फौजेचे दोन वर्षे बिनघोर पोट भरले यांतच त्यांस समाधान वाटलें.

***

भाग एकविसावा

मोगलांच्या मुलखांत पुनः स्वाऱ्या (१६७०–७२)

मोगलांशी केलेला सलोखा मोडला तेव्हां महाराजांनी त्यांस आपलें उग्र स्वरूप पुनः दाखविण्यास सुरुवात केली. त्यांच्या प्रांतांत त्यांनी जिकडून तिकडून धामधूम आरंभिली. ह्या समयीं त्यांनी व त्यांच्या लोकांनी असा कांही विलक्षण जोम व शौर्य ही प्रगट केली कीं, तशी त्यांनी पूर्वी कधींही दाखविली नव्हती असे म्हटले असता चालेल. सिंहगड व पुरंदर हे किल्ले शत्रूच्या ताब्यांत होते ते हस्तगत करण्याचा निर्धार महाराजांनी प्रथमतः केला. याचे कारण असे कीं, ते किल्ले शत्रूच्या हातीं असल्यामुळें पुणे, चाकण वगैरे प्रांतांत जाणेयेणें निर्भयपणें होणें अंमळ कठीण असे. ह्या किल्ल्यांवर जयसिंगराजाने ठेवून दिलेले रजपूत लोक सर्वदा हुशार राहून किल्ल्याचे रक्षण करण्यात चांगले दक्ष असत. प्रथम सिंहगड काबीज करावा असा विचार महाराजांनी केला.[१] ह्या किल्ल्यावर उदयभानू नांवाचा मोठा शूर व बलाढ्य सरदार मुख्य होता. तो मोगलसरकाराशीं पुरा इमानी असल्याकारणानें तो कोणत्याही उपायाने वश होण्यासारखा नव्हता. त्याच्या हाताखालील रजपूत शिपाई अगदीं निवडक व शूर योद्धे होते. तेव्हां असा हा सर्व प्रकारे अभेद्य गड आपल्या हातीं येतो कसा, हा विचार महाराजांस प्राप्त झाला. तेव्हां तानाजी मालुसरे[२] पुढे होऊन म्हणाला कीं, मजबरोबर माझा धाकटा भाऊ सूर्याजी यास द्यावें व मी निवडीन ते एक हजार. मावळे मजबरोबर द्यावे, म्हणजे मी हा किल्ला हस्तगत करून येतो.[३] त्याचें हे म्हणणें त्यांनी कबूल केलें.

सिंहगड हा किल्ला सह्याद्रीच्या पूर्वेकडील बाजूस आहे. पुरंदर किल्ल्याच्या टेकड्या ह्या किल्ल्यापर्यंत आलेल्या असून त्यावर जावयास एका उंच व अरुंद कड्यावरून वाट आहे. हा कडा पूर्वपश्चिम आहे आणि उत्तरेकडून व दक्षिणेकडून हा किल्ला एखाद्या विशाल व खडकाळ डोंगरासारखा दिसतो. ह्याचा चढाव अर्ध्या मैलाचा आहे. हा कित्येक भागी केवळ उभा सुळासारखा आहे. इतकें उंच चढून गेल्यावर मग काळ्याभोर खडकाचा प्रचंड कडा आहे. हा चाळीस फूट उंच आहे. ह्या भव्य कड्यावर दगडाचा भक्कम तट बांधलेला असून त्यावर मोठमोठे बुरूज आहेत.

---

१ जिजाबाईच्या आग्रहास्तव महाराजांनी हा किल्ला हस्तगत करण्याचे मनात आणले असें पोवाड्यावरून दिसते. एके दिवशी जिजाबाई महाराजांशी सोंगट्या खेळावयास बसली असता डाव महाराजांवर आला तेव्हा तिने ह्याबद्दल सिंहगड किल्ला मागितला. म्हणून अर्थात् महाराजांना तो मोगलांच्या हातचा कसा तरी काबीज करणे प्राप्त झाले. तेव्हा ही कामगिरी तानाजी मालुसरे यांस सांगावयाचे ठरून तो आपला मुलगा रायबा याच्या लग्नासाठी स्वग्रामी गेला होता, त्याला आपले मावळे घेऊन ताबडतोब परत येण्याविषयी हुकूम पाठविला. त्यावरून तो शूर पुरुष लग्न समारंभ तहकूब ठेऊन लगोलग राजगडावर महाराजांपाशी आला असे पवाड्यात म्हटलें आहे.

२ ह्याचे वर्णन बखरींतून येणेंप्रमाणें केलें आहे तो अंगाने अतिशयित धिप्पाड व सुदृढ होता. त्याचें रूप भयानक दिसे. त्याचे श्मश्रू पिंगट व नेत्र आरक्त असत. त्याच्या मिशा हस्तदंडप्राय मोठ्या व लांब असून उभय भागीं लिंबें ठेवली असता ती अचल राहात. त्याचें मस्तक विशाल होतें. तो हत्तीसारखा पुरुष असून त्यानें हत्तीला सुळ्यास धरून जागच्या जागी उभा करून ठेवावा, असें त्याचें प्रचंड बळ असे. समरांगणात त्याच्यापुढे कोणाचाही टिकाव लागत नसे. त्याच्या तोडीचा पुरुष महाराजांच्या साऱ्या लष्करांत एकही नव्हता. तो सराईत, दांडाईत व पटाईत असा असून सर्व शस्त्रांच्या कारवीत अत्यंत प्रवीण होता.

३ पवाड्यात म्हटलें आहे की, तो बारा हजार फौज घेऊन किल्ल्यापाशीं गेला.

किल्ल्याचा आकार तिकोनी आहे. आतील घेर अजमासे दोन मैलांचा आहे. किल्ल्यांत दरवाजावाचून दुसऱ्या कोठूनही प्रवेश होणें शक्य नाहीं, असें पाहणारास वाटतें. ह्या किल्ल्यावरून पाहिले असतां पूर्वेस नीरानदीचें अरुंद पण सुंदर पात्र दृष्टीस पडते, उत्तरेस विस्तीर्ण मैदानप्रदेश व पुणे शहर नजरेस पडते व दक्षिणेस आणि पश्चिमेस पर्वताच्या उंच रांगा दिसतात. त्या दुरून पाहिल्या म्हणजे जशा काय त्या गगनास जाऊन मिळाल्या आहेतशा भासतात. ह्याच दिशेला रायगड किल्ला आहे.

तानाजी मालुसरे हा किल्ला हस्तगत करण्याची प्रतिज्ञा करून रायगडावरून एक हजार मावळ्यांनिशी निघाला.[१] हे मावळें सिंहगडाकडे एका जमावानें गेले नाहींत. डोंगरांतून व खोऱ्यातून निरनिराळ्या वाटांनी जाऊन ते ठरलेल्या ठिकाणीं काळोख्या रात्रीं एकवट झाले. ही माघ महिन्यांतील कृष्णपक्षाची अष्टमी होती. सर्वजण जमा झाल्यावर तानाजींनें त्यातल्या अध्र्या लोकांस कांहीं अंतरावर राहावयास सांगितलें व इशारा होतांच त्यांनी पुढें चालून यावें असें ठरविलें. बाकीचे लोक किल्ल्याच्या तटापाशी जाऊन गुपचूप उभे राहिले. मग तटाच्या ज्या भागी शत्रूचा प्रवेश होण्याचा संभव नाहीं असें गडावरील रखवालदारांस वाटण्यासारखे असून विशेष बंदोबस्त ठेवण्याची खबरदारी घेतली नसावी असे वाटले, त्या भागी एका हुशार मावळ्यास घोरपडीच्या साहाय्याने चढवून दोरीची शिडी एका खडकास बांधविली.[२] ह्या शिडीवरून एक एक असे तीनशे मावळे तटावर चढून गेलें.[३] ते तेथें दबून छपून जिकडे तिकडे राहिले. इतक्यांत त्यांची चाहूल लागून ते वर चढून येत होते त्या बाजूस किल्ल्याचे रखवालदार धावत आले व त्यापैकीं एक जण काय आहे तें पाहण्यासाठी अंमळ धीर करून पुढें आला. त्याच्यावर एका मावळ्याने लगेच बाण मारून त्याला तेथल्या तेथें पुरा केला. तेव्हां किल्ल्यावरच्या रखवालदारांत एकच कल्ला होऊन जो तो आपआपलीं शस्त्रे घेण्यास धावला.[४] ही अशी त्यांची गडबड उडाली आहे तोच त्यांच्यावर हल्ला केल्यास आपला डाव साधेल असें तानाजीस वाटून तो आपल्याबरोबर वर आले होते, तेवढ्याच लोकांनिशी पुढें सरसावला. जिकडून गडबड ऐकू येत होती तिकडे मावळ्यांनी बाणांचा मारा सुरू केला. रखवालदारांनी दिवट्यामशाली पेटवून उजेड केला तेव्हा त्यांस आपल्यावर कोण चालून आले आहेत तें स्पष्ट दिसलें व त्यांची एकच धांदल उडाली. कित्येकांस तर आपली शस्त्रें घ्यावयासही अवकाश मिळाला नाहीं. उभय पक्षांचे तत्काळ युद्ध सुरू होऊन दोहोंकडचे योद्धे मोठ्या आवेशाने लढू लागले. किल्ल्यावरील लोकांची संख्या वर आलेल्या मावळ्यांहून फारच मोठी होती. तरी तानाजीचे कसलेले योद्धे बिलकूल न डगमगता मोठ्या शौर्यानें रजपुतांस सारखे चेपीत पुढें चालले. किल्ल्यावरील लोकांचा मोड होण्याचा रंग दिसू लागला. इतक्यात उदयभानू व तानाजी यांची त्या युद्धाच्या गर्दीत दृष्टादृष्ट होऊन त्यांचें द्वंद्वयुद्ध जुंपले. दोघेही वीर मोठे शूर, युद्धकुशल व बलवान असल्याकारणानें त्यांची झटापट बराच वेळ मोठ्या निकराची झाली. दोघांसही पुष्कळ जखमा झाल्या आणि शेवटी परस्परांचे वार परस्परांच्या वर्मी लागून ते दोघेही एकेच वेळीं समरभूमीवर चीत होऊन गतप्राण झाले. आपला मोहरप्या पडला असून शत्रूचा जमावही फार मोठा आहे, तेव्हां आतां आपली येथें धडगत नाहीं असें वाटून मावळ्यांनी माघार घेतली. ते जेथून वर चढून आले होते तिकडे ते पळत सुटले. इकडे तानाजीचा भाऊ सूर्याजी वर काय प्रकार झाला आहे तो पाहण्यासाठी खाली जे लोक उरले होते त्यांस घेऊन तटावर येऊन पोहोचला होता. त्यास आपला भाऊ रणात पडला असून मावळे पळत सुटले आहेत असें कळताच तो पुढें सरसावून त्या पळणाऱ्या मावळ्यांस म्हणाला, 'तुमच्या बापाचे प्रेत महाराजांनी उचलून टाकावे हें तुम्हांपैकीं कोणास बरें वाटेल तें सांगा! खाली उतरून जाण्याची आशा मुळींच धरू नका! कारण दोऱ्या मी केव्हांच तोडून नाहींतशा करून टाकल्या आहेत! तुम्ही शिवाजीमहाराजांचे कट्टे इमानी व शूर शिपाई आहां हें सिद्ध करून दाखविण्याचा हा समय आहे. शत्रूस

---

१ तीनशे निवडक मावळे घेऊन तो गेला, असे मुसलमानी बखरींत आहे.

२ कल्याण दरवाजापाशी. अशी शिडी लावली असे मुसलमान इतिहासकार म्हणतात.

३ पन्नास मावळे तटावर चढल्यावर सोल तुटला असें पवाड्यांत म्हटलें आहे.

४ अफूच्या नशेत असल्यामुळे त्यांना युद्धास सिद्ध व्हावयास विलंब लागला असे म्हणतात.

पाठ दाखवून मरणभीतीस्तव रणस्तीवरून पलायन करणें हें खऱ्या वीरांस शोभत नाहीं. तर चला, मागें फिरा आणि शत्रूला आपलें शौर्य दाखवा!' हें वीर्योत्साह प्रदीप्त करणारे भाषण ऐकून व आपले नव्या दमाचे सोबती वर आले असून[१] आपणांस सूर्याजीसारखा मोहरप्या अद्यापि आहे हें त्यांच्या मनांत येऊन त्यांस पुन: हुरूप चढला. व आपला अतिशूर व प्रिय मोहरा रणात पडला त्याचा वचपा घ्यावयाचा असा त्यांनी निश्चय केला व शत्रूवर पुन्हा मोठ्या आवेशाने हल्ला करण्यास सगळे सिद्ध झाले. मावळे लोकांच्या अंगांत एकदा आवेशाचे वारे शिरले म्हणजे ते जिवाची परवा न करता आपल्या समोरचा शत्रू कितीही प्रबळ असला तरी त्याच्याशी झगडण्यास तयार होत. त्यांत आणखी तानाजीने निवडून काढलेले ते लोक. मग काय विचारता? त्यांनी 'हर हर महादेव!' अशी गर्जना करीत शत्रूवर एकच गर्दी केली व त्याचा पुरा मोड करून किल्ला कबजात घेतला. ह्या घोर संग्रामांत सुमारे तीनशे मावळे रणांत पडले. अजमासे पाचशे रजपुतांची प्रेते समरभूमीवर सापडली आणि थोडेसे लोक छपून राहिले होते ते शरण आले. पुष्कळांनी तटाखालीं उड्या टाकून प्राणत्याग केला.

आपली फत्ते होऊन गड काबीज झाला ही आनंदाची बातमी आपल्या धन्यास कळविण्यासाठीं पूर्वसंकेताप्रमाणें किल्ल्यांतील एका केंबळ्याच्या घरास सूर्याजीने आग लावली. महाराजांस ह्या छाप्याचा परिणाम काय होतो तें कळण्याची उत्कंठा लागून राहिली होती. त्यांनी ही आग पाहिली तेव्हां त्यांस हर्ष झाला; परंतु ह्या जिवावरच्या कामगिरीत आपल्या अत्यंत इमानी व जिवलग मित्राची प्राणाहुति पडली हें कळले तेव्हां त्यांना पराकाष्ठेचें दु:ख वाटलें. त्यांनी ह्या वेळा असा दु:खोद्गार काढला म्हणतात कीं, 'गड हाती आला; पण सिंह गेला!'[२] मग ज्या मावळे लोकांनी ही बहादुरी केली त्यांस महाराजांनी इनामें दिलीं. प्रत्येकास एकएक रुप्याचे कडे बक्षीस दिलें व त्यांच्यावरच्या अंमलदारांस त्यांच्या त्यांच्या योग्यतेप्रमाणें इनामें दिली. सूर्याजीने ह्या प्रसंगी अप्रतिम पराक्रम करून आपली सरशी केली म्हणून त्याची पुष्कळ तारीफ करून त्याला सिंहगडावर मुख्य अधिकारी नेमले.

सिंहगड हातीं आल्यावर पुरंदर किल्ला हस्तगत व्हावयास विलंब लागला नाहीं. हा गड घेतल्यावर सुमारें एका महिन्याने सूर्याजी आपल्या मावळ्यांनिशीं त्या किल्ल्यावर रात्रीचा एकाएकीं चढून गेला व वरील लोकांस कापून काढून तेथें त्यानें महाराजांचे निशाण उभारले. ह्या किल्ल्यावरील रजपुतांस, सिंहगडावर मावळ्यांनी छापा घालून आपल्या बंधूंची कशी धुळधाण करून सोडली होती, हें पूर्वीच कळले असल्यावरून ते ह्या छाप्याच्या वेळी अगदीं घाबरून गेले. त्यांचा समुदाय फार मोठा होता तरी त्यांस मावळ्यांशीं संग्राम करण्याचा आवाका मुळींच राहिला नाहीं, म्हणून येथें महाराजांच्या लोकांची फारशी खराबी झाली नाहीं. नंतर काही दिवसांनी चांदोर शहरावर चालून जाऊन महाराजांनी तेथला चाळीस हजार रुपयांचा बादशाही खजिना, एक हत्ती व बारा घोडे हस्तगत केले व ते शहर लुटले.

ह्यानंतर माहुलीचा किल्ला मोगलांच्या ताब्यांत होता, तो सर करण्याचा विचार करून महाराजांनी ही कामगिरी मोरोपंतास सांगितली. त्यानें त्या किल्ल्यास वेढा घालून त्यावर एकदम चाल केली. तेव्हा उभय पक्षाकडील लोकांनी मोठ्या आवेशाने युद्ध केलें. मोरोपंताचे एक हजार लोक रणांगणात पडले व त्याचा मोड होऊन त्यास मागें हटावें लागलें; परंतु तो बिलकूल नाउमेद झाला नाहीं. त्यानें किल्ल्याचा वेढा मोठ्या नेटाने चालविला. किल्ल्यातील लोकही इरेस चढून किल्ला मोठ्या शौर्याने लढवीत राहिले. पेशव्याने थोडासा दम खाऊन पुन: किल्ल्यावर छापा घातला; पण ह्या वेळीही किल्ल्यावरच्या लोकांनी त्यास मागें हटविले. ह्याप्रमाणें दोन वेळां मागें परतावे लागलें तरी पेशव्याचे लोक हताश झाले नाहींत. किल्ल्यावरच्या लोकांस जुन्नरहून मदत मिळण्याची आशा होती, म्हणून त्यांनीही शेवटपर्यंत हिंमत सोडली नव्हती. ही अशी उभय पक्षांकडील योद्ध्यांची झटापट सारखी दोन महिने चालली होती.

---

१ ह्या वेळीं सूर्याजीने कल्याण दरवाजा उघडून आपले आणखी लोक आत घेतले.

२ कित्येक इतिहासकाराचे असे म्हणणें आहे की, हा वेळपावेतों ह्या किल्ल्याचे नाव कोंडाणा असे असून महाराजांच्या ह्या खेदोद्गारावरून त्यास सिंहगड असे नाव पडले.

दोन्हीकडील योद्धे ईर्षेने लढत होते; परंतु शेवटी शत्रूचे लोक हतवीर्य होऊन किल्ला पेशव्यांच्या हातीं आला.[१] ह्यानंतर कर्नाळा किल्लाही महाराजांच्या लोकांनी छापा घालून सर केला व पावसाळा सुरू होण्यापूर्वी सगळा कल्याणप्रांत पुनः काबीज केला. लोहगड, शिवनेरी, त्रिंबक, रोहिडा, अहिवंत, रावळाजावळा, मकरंदगड वगैरे कांही किल्ले मोगलांच्या हातीं अद्यापि राहिले होते ते छापे घालून सर केले. स. १६७० च्या एप्रिल अखेरपर्यंत अहमदनगर, जुन्नर व परेंडा यांच्या आसपासचे मोगलांची एकावन्न गांवे महाराजांच्या लोकांनी लुटली.[२]

मोगलांच्या प्रांतात महाराजांच्या लोकांनी हा धुमाकूळ चालविला तेव्हां खानदेशात दाऊदखान होता. तो आपले घोडदळ घेऊन अहमदनगरास आला; आणि त्याने त्यांच्यावर सात हजार घोडेस्वार रवाना केले. ह्या वेळी महाराजांच्या लोकांनी त्या प्रांतातल्या तीन किल्ल्यांना वेढा घातला होता. तो त्यांस उठवावा लागला. ही अशी ह्या मोगल सरदाराकडून त्यांस हरकत आली तरी ह्या वेळीं औरंगाबादेस मोअझीम व दिलेरखान यांच्यामध्ये कलह सुरु झाला असून औरंगजेबास आपल्या ह्या मुलाचा संशय आला असल्याकारणाने तिकडील मोगल सैन्याकडून महाराजांस फारशी हरकत झाली नाही. ह्यामुळे त्यांना मोगलांच्या प्रांतात हवा तसा धुडगूस घालता आला.[३]

ह्या सुमारास महाराजांनी आपले कांही लोक जंजिऱ्याच्या शिद्दीवर रवाना केले होते. त्यांनी त्याच्या मुलखावर एकसारखे हल्ले करून त्यास अगदी हैराण करून सोडले. तेव्हां त्याने मोगलांची मदत मागितली असावी असे दिसते; कारण स. १६६९ त औरंगजेबाने महाराजांस एक पत्र लिहून असे फर्माविले होते कीं, त्यांनी शिद्दीच्या वाटेस जाऊ नये. ह्या शिद्दीने ह्याप्रसंगी सुरतेच्या व्यापाऱ्यांना असे लिहून कळविले होते कीं, मराठ्यांशी शेवटपर्यंत लढत राहावयाचा आपला संकल्प आहे व शेवटी उपासमार होऊन जेरीस आल्यावर किल्ला मोगलांच्या हवाली करावा असा आपला बेत आहे. हा त्यांचा बेत महाराजांना चांगला ठाऊक होता. शिवाय विजापूरकरांवर जयसिंगाने स्वारी केली होती तेव्हां हा शिद्दी अदिलशहाचा अंकित म्हणवीत असूनही त्याने जयसिंगाच्या लालचीस भुलून त्याला त्यावेळी साहाय्य केले होते. पुढें महाराजांनी पुरंदर येथे जयसिंगाशी तह केला. त्यावेळी त्यांनी जंजिरा आपल्या स्वाधीन करावा अशी अट घातली होती; पण ती त्याने मान्य केली नव्हती. तेव्हां अर्थात् हा जंजिरा मोगलांच्या ताब्यांत गेल्यास पश्चिम किनारा आपल्या हाती निर्वेध राहणार नाही व आरमार तयार करण्याचा आपला जो उद्देश तो असिद्ध राहील असे त्यांस वाटले आणि त्यांनी शिद्दीला नाहींसा करण्याचा दृढ संकल्प केला. म्हणून त्यांनी स. १६७० त स्वतः जंजिऱ्यावर स्वारी करून त्यास जमिनीवरून वेढा घालून त्यावर तोफांचा सारखा मारा चालविला. पावसाळा सुरू झाला तरी हा वेढा त्यांनी उठविला नाहीं व तोफांचा भडिमार कांही कमी केला नाहीं. पावसाळा संपण्यापूर्वी तो किल्ला हस्तगत करण्याचा त्यांचा कृतसंकल्प होऊन त्यांनी आपली शिकस्त चालविली होती. त्या किल्ल्यास नुसता वेढा देऊनच ते राहिले नाहींत, तर त्याचा मालक फत्तेखान ह्याला तो सोडून दिल्यास मोठी रक्कम व जहागीर देण्याची त्यांनी

---

१ बुंदेले म्हणतो की, ह्या किल्ल्यास महाराजांनी स्वतः वेढा घातला होता. किल्लेदार मनोहरदास नामेंकरून एक रजपूत सरदार होता. त्यास अन्नसामुग्रीची टंचाई पडून तो अगदीं टेकीस आला आणि त्यानें महाराजांस असा निरोप पाठविला की, 'आम्ही जातीचे रजपूत आहों, एकूणएक माणूस रणात पडेपर्यंत किल्ला सोडून देणार नाहीं !' महाराजांना त्या किल्ल्याच्या चोरवाटा ठाऊक होत्या. त्यापैकी एका वाटेने ते आपले काही लोक घेऊन वर चढू लागले; परंतु शत्रूचे लोक चोहोंकडे सावध असल्यामुळें त्यांस त्याची चाहूल लागून ते त्यांच्यावर तुटून पडले व त्या हातघाईत महाराजांचे पुष्कळ लोक जायबंदी झाले. ही अशी त्याच्या लोकांची खराबी झाल्यामुळे त्यांस त्या वेळीं वेढा उठवून जावे लागलें; परंतु पुढे मनोहरदास आपल्या मदतीस लोक मिळत नाहीत असें पाहून निराश झाला आणि आपल्या हुद्द्याचा राजीनामा देऊन किल्ला सोडून गेला. तेव्हा महाराजांनी त्यावर छापा घालून तो सर केला.

२ सभासद म्हणतो की, मोगलांस दिलेले २७ किल्ले महाराजांनी चार महिन्यांच्या अवधीत पुनरपि काबीज केले ही अत्युक्ती आहे असे प्रो. सरकार म्हणतात.

३ ह्या वेळीं सुरतेचे व्यापारी लिहितात कीं, शिवाजी काही आता चोरासारखे छापे घालीत नाही. तो बरोबर तीस हजार लोक घेऊन मोगलांच्या प्रांतात स्वाऱ्या करून विजय मिळवीत चालला आहे. औरंगाबादेस शहाजादा बसला आहे; पण त्याची त्याला मुळीच परवा वाटत नाही.

लालूच दाखविली. ह्या लालचावणीस फत्तेखान पहिल्याने भुलला नाहीं; उलट आपणांला अशी लालूच त्यांनी दाखविली म्हणून त्याला मोठा रागही आला; पण पुढें महाराज मोठ्या नेटाने एकसारखा मारा करूं लागले तेव्हां त्याचा धीर निघेना. शिवाय आपला धनी अदिलशहा यांजकडून मदत मिळवण्याचीही त्याला यावेळी मुळी आशा नव्हती. ह्याप्रमाणे तो निरुपाय होऊन, महाराजांस शरण येऊन त्यांच्या आश्रयाने राहावयास सिद्ध झाला; परंतु त्याच्या हाताखाली दुसरे तिघे सरदार होते, त्याचा महाराजांवर पुरा दांत होता. त्यांना हा फत्तेखानाचा बेत मुळींच पसंत पडला नाहीं. त्यांना स्वधर्माचा मोठा अभिमान असून हिंदूंचा व त्यांतून विशेषतः मराठ्यांचा ते अतिशयित तिरस्कार करीत. काफरास शरण जाऊन त्याचे अंकित होऊन राहणे त्यांस बिलकूल रुचले नाहीं. फत्तेखान हार खाऊन महाराजांचा अंकित झाला असता आपली धडगत लागणार नाहीं अशी दहशत त्यांना पडून त्यांनी त्याचा हा बेत साधेल त्या उपायाने हाणून पाडावयाचा असा निर्धार केला. मग त्यांनी आपल्या सर्व स्वदेशीयांशी संगनमत करून त्यांच्या मदतीने फत्तेखानास कैद केले व किल्ला लढविण्याचे काम नेटाने चालू ठेवले. इतकेही करून शिवाजीमहाराजांपुढे ह्या समयीं आपला निभाव लागणे कठीण आहे असें वाटून त्यांनी सुरत येथील मोगल सरदाराशीं[१] असें बोलणे लावले कीं, 'आम्हांस ह्या प्रसंगी अवश्य तेवढे साहाय्य कराल व पुढेही प्रसंगानुसार मदत करण्याचें अभिवचन द्याल तर विजापूरसरकाराचें अंकितत्व झुगारून देऊन आमच्या ताब्यातील आरमारासह आम्ही मोगलबादशहाची सेवा करण्यास राजी होऊं व जंजिरा किल्ला आम्हांस मोगलबादशहाकडून जहागीर मिळाला आहे असें मानून चालू.' हें त्यांचें बोलणे त्या सुभेदारास पसंत वाटून त्यानें त्याबद्दल औरंजेबापाशीं शिफारस केली. त्यानें तो त्यांचा अर्ज मंजूर करून त्यापैकीं एकास इतरांच्या सल्ल्याने त्या किल्ल्याचा मालक ठरविलें व त्यास याकूतखान असा नवा किताब दिला.[२]

ही अशी मोगलांची मदत शिद्दींला मिळाल्यामुळे महाराजांच्या माऱ्यास त्यांनी मुळींच जुमानले नाहीं. तेव्हां ह्या एका किल्ल्यापाशीं इतके दिवस धडपड करीत राहून इतर महत्त्वाच्या कामगिऱ्यांकडे दुर्लक्ष करणें नीट न वाटून त्यांनीं आपला संकल्प असिद्ध ठेवून तेथला तळ हलविला व पुढें अनुकूल संधी साधून ह्या शिद्दींची पुरी खोड मोडावयाची असा निश्चय केला.

आता सुरतेच्या सुभेदाराने शिद्दींस मदत करून आपला बहुतेक सिद्धीस गेलेला उद्देश हाणून पाडला, तरी त्याच्या शहरावर पुनः एक वेळ हल्ला करून त्याची रग जिरवावी असा महाराजांनी विचार करून पावसाळा संपतो न संपतो तो पंधरा हजार स्वारांनिशीं त्या शहरावर अकस्मात घाला घातला; पण ह्या सुमारास तो सुभेदार एकाएकी काहीं उपद्रव होऊन मरण पावला होता व त्या शहराच्या रक्षणास ठेवलेल्या बऱ्याच लोकांस यशवंतसिंगानें किंवा शहाजाद्यानें काढून नेले होतें. हा प्रकार त्यांनी केवळ यदृच्छेने केला असावा किंवा शिवाजीमहाराजांचा डाव नीट साधावा म्हणून केला असावा. कसेही असो, महाराजांना ते शहर पुनः एक वेळ यथेच्छ लुटावयास सापडले. किल्ला सर[३] करून त्यात आपले थोडेसे लोक ठेवून देऊन त्यांनी ते शहर तीन दिवस सावकाश लागेल तसें लुटले.

सुरत शहरावर महाराजांचा हल्ला होणार अशी भीती गुजराथच्या मोगल सुभेदारास वाटून त्यांच्याशी युद्ध करण्याची त्यांने तयारी चालविली. त्याने विजापूरकरांस बारा हजार लोक आपल्या कुमकेस पाठवावयास लिहिले. तसेच मुंबईच्या इंग्रज व्यापाऱ्याकडे दारूगोळ्याची त्याने मागणी केली; परंतु ही सगळी जमावाजमव होण्यापूर्वीच

---

१ प्रो. सरकार म्हणतात की, हें बोलणे त्यांनी मोगलांच्या दक्षिणेतील सुभेदारांशी लावले; परंतु ह्या शिद्दींना सुरतेकडूनच मदत मिळाली असली पाहिजे. आणि त्यांना सुरतेच्या सुभेदाराशीच पत्रव्यवहार करता आला असावा.

२ प्रो. सरकार म्हणतात की, ह्या तिघां सरदारांपैकी एकाचे नाव शिद्दी संबळ असे होते. त्याला मोगल आरमाराचा सेनापती नेमून त्याला तीन लाखांची जहागिरी करून दिली आणि शिद्दी कासीम व शिद्दी खैरात यांस जंजिरा व त्याला लागून असलेला मुलूख याची व्यवस्था सांगितली. ह्याप्रमाणे शिद्दीचे सगळे आरमार मोंगलांच्या ताब्यात गेले.

३ त्या काळचा इंग्रज प्रवासी डॉ. फ्रिअर म्हणतो कीं, हा किल्ला सुरुंग लावून जमीनदोस्त करण्याचा प्रयत्न महाराजांनी चालविला असतां मोगल फौजेने त्यांस पिटाळून लावले.

महाराजांचा सुरत शहरावर ता. ३ ऑक्टोबर १६७० साली अचानक हल्ला आला. सप्टेंबर महिन्यापासून त्यांनी कल्याणजवळ आपल्या लोकांची जमवाजमव केली असून त्यांची गुजरातेवर स्वारी होणार हे सुरतेच्या इंग्रज व्यापाऱ्यांना अगोदरच कळले होते आणि त्यांचा पहिला हल्ला सुरत शहरावर खात्रीने व्हावयाचा असे वाटून इंग्रज, फ्रेंच, डच वगैरे व्यापाऱ्यांनी सुरत येथील आपल्या वखारीतला सगळा माल दहा-बारा मैलावर स्वाली नावाचे बेट आहे त्यात भरून ठेऊन त्याच्या सभोवार फळ्यांच्या भिंती केल्या व त्यावर तोफा चढवून ठेवल्या. इग्रजांनी सुरत येथील आपल्या वखारीची नासधूस होऊ नये म्हणून कांही लोक त्यांच्या रक्षणासाठी ठेऊन दिले. शहरातले मोठमोठे व्यापारी व अंमलदार सगळे पळून गेले. ह्या वेळी औरंगजेबाच्या हुकूमावरून सुरत शहरास तटबंदी केली होती; पण शहरात ह्या प्रसंगी अवघे तीनशे मोगल सैन्य होते. त्यांचा महाराजांच्या सेनेपुढे टिकाव न निघून ते किल्ल्यात पळून गेले आणि महाराजांचे लोक शहरात शिरले. त्यांनी शहरात सगळ्या घरांवर चौक्या ठेऊन त्यातला माल तुटला. इंग्रज, फ्रेंच व डच लोकांच्या वखारीस मात्र त्यांनी उपद्रव दिला नाही. इंग्रज वखारींच्या रखवालीस ठेवलेल्या लोकांनी महाराजांच्या लोकांवर तोफा, बंदुकांचा थोडासा भडीमार केल्याने त्यांचे काही लोक दगावले. तिसरे दिवशी पुनः ते इंग्रजांच्या वखारीवर हल्ला करावयास आले. तेव्हां इंग्रजांकडून दोन असामींनी नजरनजराणा घेऊन महाराजांच्या शहराबाहेरील तंबूत जाऊन त्यांशी स्नेहभावाचे बोलणे लावले. तेव्हां महाराजांनी त्यांच्या हातात हात घालून त्यांस असे आश्वासन दिले कीं, 'इंग्रज आमचे दोस्त आहेत, त्यांचे आम्ही मुळी नुकसान करणार नाही!' महाराजांनी डच लोकांना पहिल्याच दिवशी असा निरोप पाठविला होता कीं, 'तुम्ही कांही एक गडबड न करता आपल्या ठिकाणी स्वस्थ राहाल, तर तुम्हास आम्ही उपद्रव करणार नाही!' ह्या निरोपाप्रमाणे वागण्यास ते करू झाल्यामुळे अर्थात् त्याच्या वाटेस महाराजांचे लोक गेले नाहीत. फ्रेंच वखारवाल्यांनी महाराजांशी प्रथमपासून नम्रतेने वागून व त्यास कांही खंड देऊन आपला बचाव करून घेतला. त्या वेळी कास्कारचा तारतार जातीचा राजा सुरतेस येऊन राहिला होता. त्याला त्याच्या पुत्राने पदच्युत केल्यावरून तो मक्केची यात्रा करून येऊन येथें औरंगजेब बादशहाच्या आश्रयाने राहिला होता. त्याच्या वाड्यावर हल्ला केला असतां पुष्कळ द्रव्य सापडेल असें वाटल्यावरून महाराजांच्या मनांत तिकडे जावे असें आलें. त्याच्या वाड्यास जावयाची वाट फ्रेंच लोकांच्या वखारीवरून होती; परंतु त्यास फ्रेंचांनी तिकडून बिनहरकत जाऊं दिलें. ह्या वाड्याच्या लुटींत महाराजांस सोने, रूपे, जवाहीर वगैरे बहुमोल माल पुष्कळच सापडला.

शहर लुटून झाल्यावर स्वाली बेटावर महाराजांचा मोरचा फिरणार व तेथे पळून गेलेले व्यापारी आपल्या स्वाधीन करावे व आपणांस खंड द्यावा अशी मागणी ते युरोपियन व्यापाऱ्यांकडे करणार अशी दहशत पडल्यावरून त्या व्यापाऱ्यांनी आपला तेथला सगळा माल तारवावर चढविला; पण तो दिवस उधाणाचा असल्याकारणाने मराठ्यांस तेथवर चाल करून जाता आले नाही असें म्हणतात.

तिसऱ्या दिवशीं बऱ्हाणपुराहून महाराजांना असें वर्तमान कळले कीं, मोगलांचे सैन्य सुरत शहराच्या रक्षणास येत आहे. त्यावरून त्यांनी आपल्या फौजेचा तळ लगबगीने हलवून सर्व लुटीसह स्वदेशाकडे कूच केलें. तेथून निघतेवेळी त्या शहराच्या रहिवाशांस त्यांनीं असें पत्र लिहून ठेवले कीं, 'तुम्ही प्रतिवर्षी बारा लाख रुपये खंडणी बिनबोभाट पावती केल्यास तुमच्या शहरास पुनः लुटीची भीती उरणार नाही!' ह्या वेळीं महाराजांनी ६६ लक्षांची लूट नेली असें म्हणतात.

शिवाजीमहाराजांनी सुरत शहर लुटून जाळून टाकले अशी वार्ता औरंगाबादेस पोचताच तेथील सुभेदारानें मोहबतखान व दाऊदखान अशा दोन सरदारांस बरोबर आठदहा हजार फौज देऊन सुरतेच्या कुमकेस रवाना केलें. महाराज साल्हेरच्या मोठ्या रस्त्यानें माघारी यावयास निघून चांदोराजवळ कंचनमंचनावरून गेले न गेले तों ह्या मोगल सरदारांनी त्यांना वणीदिंडोरीजवळ गाठले. नाशकाजवळील खिंडींतून कोळवणांत उतरावें असा महाराजांचा बेत होता. इतक्यांत मोगल सरदारांची बरीच फौज त्या घाटापाशीं येऊन पोहोचली. शत्रूने असा मार्ग अडविला तेव्हां आपली सगळी लूट खिंडींतून सुरक्षित जाते कशी हा विचार महाराजांस प्राप्त झाला. मग त्यांनी आपल्या फौजेच्या चारपाच

तुकड्या करून एकीला शत्रूच्या तोंडावर राहून ताशेरे झाडावयास सांगितलें; दुसऱ्या दोन तुकड्यांस शत्रूच्या दोन्ही बाजूवर चालून जावयास हुकूम केला व एका तुकडीच्या स्वाधीन लुटीचा सगळा ऐवज करून तीस असें सांगितलें कीं, शत्रूवर तीन बाजूंनी हल्ला होऊन त्याचे लोक तिकडे गुंतले असतां तिने त्याच्या तळावरून झपाट्याने निघून जाऊन पहाड उतरून पलीकडे जावे. त्याप्रमाणें ही तुकडी घेऊन महाराज मोठ्या वेगानें चालले असतां दाऊदखानानें त्यांचा पाठलाग केला. त्यासरशीं महाराज स्वत: कांही लोकांनिशीं त्यांच्यावर उलटून पडले व त्यास थोपवून धरून आपली लूट सुरक्षितपणे खिंडींतून खालीं पाठविली. महाराजांच्या लोकांचा असा चोहोंकडून हल्ला झाला तेव्हां मोगल सरदारांनी आपल्या एकंदर फौजेस एका तळ्यापाशी एकवट करून महाराजांच्या सैन्याशी सामना सुरू केला. महाराज स्वत: ह्या वेळी अंगांत चिलखत चढवून, डोकीस शिरस्त्राण घालून, दोन हातांत दोन पट्टे चढवून व घोड्यावर स्वार होऊन लढत होते. प्रतापराव सरनोबत वगैरे सरदारांस पिछाडीचे रक्षण करावयास सांगून ते स्वतः शत्रूसैन्यावर चालून गेले. तेव्हा दोन्ही सैन्यांचे घोर रणकंदन माजलें. उभय पक्षाकडचे लोक मोठ्या त्वेषाने लढले. आपल्या लोकांस उत्तेजन यावें म्हणून महाराज स्वतः आघाडीस राहून शत्रूशी लढत होते. त्यामुळें त्यांस पराकाष्ठेचा आवेश चढून त्यांनी आपल्या शूरत्वाची अगदीं सीमा केली. हे तुंबळ युद्ध सारखे दोन प्रहर चालले होतें. तीन हजार मोगल रणात पडले व मोगल सरदार जखमी होऊन रणांतून पळून गेले. ह्याप्रमाणें मोगलांच्या फौजेचा फडशा उडून ती सैरावैरा पळत सुटली. तेव्हां तिचा पाठलाग न करता त्यांच्या तळावर सापडले तेवढे सामानसुमान, हत्ती, घोडे वगैरे बुचाडून महाराज खिंडीकडे निघाले, तो त्यांस रायबागीण नांवाच्या एका शूर बाईने आपला मुलगा जगजीवन यासह कांही फौजेनिशीं अडविले. ही रायबागीण माहूरचा देशमुख उदाराम याची बायको होती. एका लढाईत हिचा नवरा पडला असतां हिने पुढें होऊन आपल्या लोकांस धीर देऊन लढाई जिंकल्यावरून औरंगजेबाने हिची तारीफ करून हिला रायबागीण असा किताब दिला होता. ती आडवी आली तेव्हां महाराजांच्या फौजेने तिला चोहोंकडून घेरून अगदीं जेरीस आणले. तेव्हा ती दाती तृण धरून महाराजांस शरण आली. त्यांनी तिचा मोठा आदरमान करून व तिला वस्त्रालंकार देऊन परत पाठविलें.

सुरतेहून परत आल्यावर महाराजांनी आपलें आरमार व फौज यांची जय्यत तयारी केली व प्रतापराव गुजराच्या हाताखाली दहा हजार स्वार व मोरोपंतांबरोबर वीस हजार पायदळ देऊन त्यांस मोगलांस उत्तरेकडील प्रांतांत स्वाऱ्या करावयास पाठविलें. ह्या प्रांतांतील लोक धनत्तर असून तिकडील बंदोबस्त चांगला नव्हता. यास्तव तिकडे स्वारी केल्याने पुष्कळ धनलाभ होईल असा त्यांचा अंदाज होता, आणि हा अगदीं बरोबर ठरला. प्रतापराव गुजराने खानदेशांत स्वारी केली. हा प्रांत त्या काळी सधन असून त्यात लोकवस्तीही पुष्कळ होती. प्रतापरावानें बऱ्हाणपुरापर्यंत दौड करून त्या शहराजवळचा बहादूरपूर नावाचा गाव लुटला. यावेळी तो बऱ्हाणपुरावरही चालून गेला असता; परंतु तेथे यशवंतसिंग होता.[१] त्याने त्याला त्या शहरावर चाल करू नको असा निरोप पाठविल्यावरून त्याने तिकडचा मोरचा फिरविला आणि इतर मोठमोठी शहरे लुटून त्यांवर वार्षिक खंड बसविला. प्रत्येक गांवाच्या प्रमुखांकडून त्यानें असे लेखी ठराव करून घेतले कीं, मोगल सरकारास जो वार्षिक वसूल द्यावयाचा त्याचा चौथा हिस्सा शिवाजीमहाराजांना किंवा त्यांच्या अंमलदारांना प्रतिवर्षी द्यावा. ही अशी चौथाई ते दरवर्षी देत गेल्यास त्यांच्या गांवांची लूट होण्याची भीती उरणार नाहीं, इतकेंच नव्हे तर त्यांस कोणी उपद्रव दिल्यास त्यांचें महाराजांचे लोक रक्षण करतील. मराठ्यांनी मोगलांच्या मुलखात चौथाई वसविली. ती पहिल्याने ह्याच वेळीं होय. ह्या मुलुखगिरींत प्रतापरावानें कारंजे शहर तुटून

१ बऱ्हाणपूर हे खाणदेशाचे मुख्य शहर. हे दाऊदखानाच्या ताब्यात होते; पण तो ह्या वेळीं अहमदनगराजवळ लढाईच्या कामात गुंतला होता. त्याचा मुलगा अहमदखान हा त्याचे काम पाहात होता. यशवंतसिंग ह्या वेळीं तेथे येऊन शाहाजादा मोअझीम याच्या खर्चासाठी पाच लाख रुपयांची मागणी करित होता. त्याला अहमदखानाने सांगितले की, बादशहाचा हुकूम घेऊन या म्हणजे तुम्हाला पाचाच्या ठिकाणी वीस लाख रुपये देतो. हा असा जबाब मिळाला तेव्हा यशवंतसिंगाने क्रोधाविष्ट होऊन ते शहर लुटण्याची भिती घातली. या अशा खटपटीत यशवंतसिंग असल्याकारणाने त्याने प्रतापरावाला वरच्यासारखा निरोप पाठविला असावा.

तेथें तीन दिवस मुक्काम केला. तिकडचे लोक आपल्या घरांत द्रव्य पुरून ठेवीत असत. हें प्रतापरावाला कळल्यावरून त्यानें मोठमोठ्या लोकांचे वाडे पाडून खणती लावून द्रव्य काढले व तेथील बड्या लोकांस कैद करून आणले. जे कोणी स्त्रीवेष धारण करून लपून छपून राहिले तेवढे काय ते त्यांच्या हातून सुटले. कारण महाराजांची आपल्या लोकांस अशी एकसहा ताकीद असे कीं, कोठेही व केव्हांही स्त्रीजातीस कसल्याही प्रकारचा उपद्रव करूं नये.[१] ह्या शहरात प्रतापरावाला अगणित लूट मिळाली ती त्याने चार हजार बैलांवर व उंटांवर लादून नेली. ह्या लुटीत उंची कपडा, सोनेरुपें व इतर जडजवाहिर मिळून एकंदर एक कोटींचा ऐवज त्याने ह्या एका शहरातून नेला असे म्हणतात. हा असा कहर प्रतापरावानें शत्रूच्या मुलखात करून सोडला असतां मोरोपंतानें आपल्या पायदळानिशीं मोगलांच्या मुलखात शिरून औंध, पट्टा, साल्हेरी[२] मुल्हेरी, त्रिंबकगड, रामनगर वगैरे ठिकाणे काबीज केली व जागोजाग नवे गड बांधले.

महाराजांनी आरमार तयार केलें त्यांत एकशे साठ जहाजे होतीं. महाराजांच्या लोकांनी भडोच शहरावर जमिनीवरून हल्ला केला म्हणजे त्यास पाण्यातून ह्या आरमाराने कुमक करावी असें ठरून तें तिकडे रवाना झाले. त्याप्रमाणें तें मुंबई सोडून पलीकडे गेलें असतां त्यास महाराजांनी मागें बोलाविले. त्यावरून तें माघारी येत असतो त्यास वाटेत दमनजवळ फिरंगी लोकांचे एक मोठे जहाज सापडले तें पकडून त्यानें दाभोळच्या खाडीत आणले. ह्याच सुमारास फिरंग्यांनी महाराजांची दहाबारा जहाजे पकडून वसईच्या खाडीत नेली होती असें म्हणतात. ह्यावरून असें दिसते कीं, महाराजांच्या आरमाराचे व फिरंग्यांच्या आरमाराचे दमण व मुंबई यांच्या दरम्यान कोठे तरी युद्ध झालें असावें.

ही अशी धामधूम मोगलांच्या राज्यांत महाराजांनी चोहोकडून चालविली असतां मोगलांकडून त्यांना म्हणण्यासारखा कांहीच प्रतिकार होऊं नये याचा चमत्कार वाटतो; पण ह्या गोष्टीचे मुख्य कारण असें असावें कीं, मोगलबादशहाच्या दक्षिणेतील सुभेदारापाशी ह्या वेळीं सैन्यबळ बेताचेच होतें आणि त्यांच्या मदतीस आणखी फौज पाठविणे अमळ जोखमीचे आहे असें औरंगजेबाच्या वहीमखोर मनाने घेतलें होतें. माहुली किल्ल्यावर पेशव्याने गर्दी केली तेव्हां जुन्नर येथें आणखी फौज ठेवणे इष्ट वाटून तेथें लोकांची भरती केली होती व आसपासच्या मुलुखास उपयोग व्हावा म्हणून सुरत येथें पाच हजार लोक जादा ठेवले होते. त्याप्रमाणेंच औरंगाबादेसही कांहीं फौज होती; परंतु ही सगळी फौज महाराजांच्या फौजेशी ताडून पाहता कांहीच नव्हती. हें सगळे मोगलसैन्य एकवट होऊन महाराजांशी लढण्यास आलें असतें तर त्याच्याशी सामना करण्यास हा हा म्हणता चाळीस हजार फौज जमा करण्याचें त्यास अनुकूलता होती. याशिवाय प्रत्येक गडावर व ठाण्यावर पुरेसे लोक रखवालीस ठेवले होते ते निराळेच. ह्याप्रमाणें सैन्याची कमतरता हें एक कारण असून आणखी चोहींकडे अशी अफवा पसरली होती कीं, सुलतान मोअझीम याचे महाराजांशीं गुप्त कारस्थान असून तो त्यांस हरएक बाबतींत अनुकूल आहे आणि यशवंतसिंगाशीं तर त्याचा चांगलाच स्नेह आहे. शहाजाद्यानें औरंगजेबाकडे जेव्हां तेव्हां आणखी लोक मदतीस पाठवून देण्याविषयीं अर्ज करावा; परंतु तो वहीमखोर बादशहा त्याचें मुळींच ऐकत नसे. शहाजाद्याचा वास्तविक इरादा असा होता कीं, दक्षिण हिंदुस्थानांत आपला पक्ष होईल तितका सबळ करून ठेवावा. कारण बादशहा मरण पावल्यावर आपणाला गादी मिळावी असें त्यास वाटणे साहजिक होतें. दुसऱ्या कोणी गादी बळकावली तर त्यास तुरुंगवास प्राप्त होण्याचा दृढ संभव होता. शिवाजीमहाराज चोहोकडून धामधूम करून दिवसेंदिवस प्रबळ होत चालले तेव्हां त्यास बादशहाकडून अधिकाधिक फौज मागून घेण्याचे निमित्त सापडले. इकडील हालहवाल बादशहाला तो वेळोवेळा लिहून पाठवी व हवी तितकी फौज हाताशी

---

१ सभासद म्हणतो की, ही कारंजे शहराची लूट खुद्द महाराजांनी केली. जेध्यांच्या शकावलीत असा उल्लेख आहे की, वणीदिंडोरीच्या लढाईनंतर महाराज कुंजर गडास गेले आणि पुढल्या महिन्यात करंज्याकडे गेले व अहिवंत, रावळा-जावळा आणि मार्कंडगड जे मोगलांनी काबीज केले होते ते त्यांनी परत घेतले. सुरत येथील इंग्रज व्यापाऱ्यांचाही असाच उल्लेख आहे.

२ हा किल्ला महाराजांनी स्वतः लढून सर केला होता असे म्हणतात. ह्या किल्ल्याला त्यांनी वीस हजारसैन्यानिशी वेढा घातला होता व तेथला मोगल सुभेदार लढाईत पडल्यावर त्या किल्ल्यास सोलाच्या शिड्या लावून ते वर गेले आणि तो त्यांनी हस्तगत केला, असे प्रो. सरकार म्हणतात.

नसल्यामुळें शत्रूचा मोड करण्याचें साधत नाहीं असें कळवी. असा तगादा एकसारखा लावल्याने बादशहा केव्हा ना केव्हा तरी वळून आपली मागणी कबूल करून आणखी फौज आपल्या मदतीस पाठवील व ही अशी फौज आपल्याकडे जमत चालली म्हणजे अर्थात् आपला पक्ष प्रबळ होईल असें शहाजाद्याचें धोरण होतें. ह्याच कारणास्तव त्यानें जवळ असलेल्या फौजेनिशीं शिवाजीमहाराजांशी सामना करण्याचा विचार मनात आणला नाहीं. त्यांच्यासारख्या महाप्रतापी पुरुषांशी साधेल तेवढा सलोखा ठेवल्याने पुढें त्याचें आपणांस पुष्कळ साहाय्य होईल असें त्यास वाटे. त्यानें एकदोन वेळां महाराजांवर आपलें सैन्य पाठविलें हें खरें; परंतु तें केवळ बादशहाच्या डोळ्यास पाणी लावण्यापुरतें. महाराजांची सरशी होईल अशा बेताची फौज तो त्यांच्यावर पाठवी.

परंतु औरंगजेबाने हे शहाजाद्याचें धोरण मुळींच चालू दिलें नाहीं. त्यानें यशवंतसिंगाला परत बोलावून त्याच्या जागी मोहबतखानाला चाळीस हजार लोकांनिशी दक्षिणेत रवाना केलें. ह्या सरदाराला स्वतंत्र अधिकार दिला व त्याच्यावर शहाजाद्याची काहीएक हुकमत चालू नयें असें ठरविलें. औरंगाबादेस शहाजाद्याकडे अवघे एक हजार लोक राहू देऊन बाकीची सर्व फौज मोहबतखानाच्या ताब्यात दिली. त्याप्रमाणेंच सुरतेच्या सुभेदारावर बादशहाची इतराजी होऊन त्यावर कामाची हेळसांड केल्याचा आरोप त्यानें ठेवला. तो सहन न होऊन त्या मानी सुभेदारानें विष प्राशन करून आत्मघात केला. तेव्हां त्याच्या जागी बादशहाने दुसरा सुभेदार नेमून सुरत व खंबायत येथें पुष्कळ लढाऊ जहाजे बांधण्याचा हुकूम दिला. हें असें आरमार वाढविण्याचा हेतू अर्थात् असा होता कीं, महाराजांच्या आरमाराचा उपद्रव नाहीसा करण्याच्या कामी जंजिऱ्याच्या शिद्दीला चांगले साहाय्य व्हावें.

मोहबतखानानें दक्षिणेत येतांच महाराजांशी युद्ध आरंभिलें. औंध व पट्टा हे किल्ले त्यानें त्यांच्या हातचे प्रथम घेतले. इतक्यांत पावसाळा सुरू झाल्यामुळे त्याला आपली मोहीम बंद राखून छावणीस परत जावे लागलें. पावसाळा संपल्यावर त्यानें आपल्या फौजेचे दोन भाग केले. एका सैन्यभागावर दिलेरखानास मुख्य करून चाकणच्या किल्ल्यावर हल्ला करावयास त्यानें पाठविलें. त्यानें तो तत्काळ काबीज करून आतील नऊ वर्षांहून अधिक वयाच्या सर्व माणसांची कत्तल उडविली. ही फत्ते त्यास मिळाल्यावर त्याला रावळाजावळा व अहिवंत हे किल्ले घ्यावयास मोहबतखानानें पाठविलें. पहिल्या किल्ल्यावर त्यानें हल्ला केला असतां गडकरी यांनी मोठ्या शौर्याने गडाचे रक्षण करून शत्रूचा हल्ला मागें हटविला. इतक्यांत मोरोपंतानें त्यांच्या कुमकेस बारा हजार लोक पाठविले. तेव्हां दिलेरखानानें ते किल्ले घेण्याचा बेत सोडून कणेरगडाकडे[१] कूच केलें व तो गड सर केला. तो परत घ्यावा ह्या इराद्याने रामाजी पांगारे[२] म्हणून एक शूर सरदार हशमांचा नाईक होता, त्यानें दोन हजार[३] मावळ्यांनिशीं त्यावर छापा घातला. हे लोक थोडे आहेत असें पाहून दिलेरखान आपल्या लोकांनिशीं त्याच्यावर चालून आला. शत्रूचे पुष्कळ लोक आहेत हें पाहून तो पांगारे गडबडला नाहीं. त्याने आपल्या लोकांस म्हटलें कीं, 'तुमच्यांत जे कोणी निदान करावयास माझ्याबरोबर येण्याला तयार असतील त्यांनी पुढें व्हावें. तें ऐकून सातशें मावळे दंड ठोकून पुढें झाले. त्यांनी शत्रूसैन्यावर एकदम तुटून पडून मोठ्या आवेशाने युद्ध चालविले. दोन हजार पठाण रणात पडले आणि हे सातशें वीर आपल्या मोहरप्यासह मोठमोठ्या जखमा लागून धारातीर्थी पतन पावले. हे त्यांचें अलौकिक शौर्य पाहून दिलेरखान अगदीं चकित झाला. बाकीच्या लोकांसही चेव येऊन ते मोगलांशी कांहीं वेळ लढत राहिले; परंतु अखेरीस त्यांचा मोड होऊन ते पळत सुटले. मोहबतखान व दाऊदखान या दोघांनी मिळून अहिवंत किल्ल्यास वेढा दिला. आतल्या लोकांनी एक महिन्यापर्यंत शत्रूस दाद दिली नाही. शेवटी दाऊदखानाने सुरुंग लावून किल्ल्यात प्रवेश केला, तेव्हा आतल्या लोकांचा निरूपाय होऊन ते शत्रूंच्या स्वाधीन[४] झाले. ह्या लढाईचे यश दाऊदखानास मिळाले म्हणून मोहबतखानास पराकाष्ठेचा राग आला आणि त्या

१ चिटणीस कोणारगड असें नांव देता.

२ चिटणीस याचे नांव रुमाजी नलगे असें देतो.

३ कित्येकांच्या मते हे लोक एक हजारच होते. ही लढाई साल्हेरच्या युद्धानंतर झाली असे प्रो. सरकार याचे म्हणणें आहे.

४ प्रो. सरकार, पृ.२४१.

दोघांचे मुळीच जमेना म्हणून औरंगजेबाने दाऊदखानास परत बोलाविले. पुढे पावसाळा सुरु झाला तेव्हां मोहबतखानाने पारनीर येथे आपली छावणी केली. पाऊस अतिशय पडू लागल्यामुळे त्याच्या छावणीतली जनावरे व माणसे साथीच्या रोगाने पटापट मरू लागले; पण त्याची कांही एक परवा न करता मोहबतखानाने ते दिवस ख्यालीखुशालीत व सरदारांच्या घरी मेजवाण्या झोडण्यात घालविले. ह्या वेळी मोगलांच्या छावणीत अफगाणिस्थान व पंजाब येथल्या चारशे नृत्यांगना होत्या असे म्हणतात.

मोहबतखानानें पहिल्याने थोडीशी धडपड करून पुढे बरेच महिने कांही एक काम न करता घालविल्यावरून बादशहाला त्याचाही वहीम आला. शिवाजीमहाराजांनी त्याला अवदाने चारून वश करून घेतले असावें असें त्याला वाटले. म्हणून त्याने बहादूरशहा व दिलेरखान यांस गुजराथेतून बागलाणप्रांतात पाठवून शिवाजीमहाराजांचा तेथला अमल उठवावयास सांगितले. त्यांनी येऊन साल्हेरीस वेढा दिला आणि त्या वेढ्याचे काम इखलासखान, राव अमरसिंह वगैरे सरदारांवर सोपवून ते अहमदनगराकडे गेले. तेथून बहादूरखान सुपेंप्रांतावर चाल करून गेला आणि दिलेरखान पुण्यावर उतरला. त्याने पुणे शहर काबीज करून तेथल्या नऊ वर्षांवरच्या सगळ्या रहिवाशांची कत्तल उडवली! आपल्या प्रांतावर आलेली ही मोगलांची वावटळ घालवून देण्यासाठी महाराजांनी आपल्या किल्ल्यांवरील लोक महाड येथे जमवून मोठ्या सैन्यानिशी त्यांच्याशी सामना करण्याचा बेत केला. इतक्यांत साल्हेरीस वेढा पडल्याचे वर्तमान आले. हें ठाणे विशेष महत्त्वाचें असल्याकारणानें महाराजांनी त्याचें रक्षण साधेल त्या उपायाने करण्याचा निश्चय केला. त्या किल्ल्यांत अन्नसामुग्री अंमळ कमी आहे असें कळताच त्यांनीं ती पुरविण्याचे मनात आणले; परंतु शत्रूच्या लोकांचा त्या किल्ल्यास चोहोंकडून गराडा पडल्यामुळें हा बेत साधतो कसा याचा विचार प्राप्त झाला. मग त्यांनी आपल्याबरोबर मोठी फौज घेऊन दिलेरखानाशीं युद्ध करण्यासाठी म्हणून त्या दिशेला कूच केले. हा त्यांचा बेत खानास कळतांच तो आपले लोक एकवट करून त्यांच्याशी सामना करावयास अगदीं सिद्ध होऊन राहिला; परंतु ह्या वेळीं महाराजांनी त्याला पुरे फसविले. साल्हेरीच्या किल्ल्याभोवतालील त्याचा गराडा कमी होताच त्यानी उत्तरेकडून त्या किल्ल्यांत अन्नसामुग्री व दारूगोळा यांचा पुरवठा करून दिला. महाराजांनी दिलेरखानाच्या फौजेवर बाहेरून छापा घालण्याकरिता दोन हजार लोक पाठविले. परंतु दिलेरखानानें त्यांच्यावर हल्ला करून त्यास कापून काढले. ही अशी आपल्या लोकांची खराबी झालेली ऐकून महाराजांनी मोरोपंतास कोंकणांतून हशमांनिशी तिकडे रवाना केले व प्रतापरावास आपल्या स्वारांनिशीं साल्हेरच्या रक्षणासाठी तत्काळ तिकडे निघून जावे असें पत्र पाठविलें. ह्याप्रमाणें महाराजांची वीस हजार फौज मोगल सैन्यावर चालून गेली. ही फौज जवळ आल्याचे कळताच मोगल सेनापतीने तिला पुढें येऊ न देण्यासाठी आपले बरेच लोक तिजवर पाठविले. ह्या मोगल सैन्यावर इखलासखान ह्या नांवाचा सरदार मुख्य नेमला होता. ही मोगलांची फौज आपल्या अंगावर चालून येत आहे असें पाहून प्रतापरावानें पुढें कूच करावयाचें बंद करून आपली सगळी फौज लढाईस तयार ठेवली. मोगलांनी त्यांच्यावर मोठ्या आवेशाने हल्ला केला. तेव्हां काही वेळ त्याच्याशी युद्ध केलेंसें करून आपल्या लोकांस प्रतापरावानें पळण्याचा इशारा केला. त्यासरशी ते जिकडेतिकडे पांगून धावत सुटले. हें पाहून मोगलसैन्यानें जयानंदभरात त्यांचा पाठलाग आरंभिला. हा पाठलाग करताना अर्थात् त्यांच्या रांगा फुटून ते जिकडेतिकडे पसरले. इतक्यांत प्रतापरावानें अकस्मात् उलट खाऊन आपल्या लोकांस एकवट होण्याचा इशारा केला. त्याबरोबर ते जमून शत्रूवर तुटून पडले. ही अशी त्यांची झटापट चालली असता मोरोपंत आपल्या लोकांनिशी तेथे प्राप्त झाला व त्याच्या मदतीने मोगलांच्या त्या सैन्याचा पुरा फडशा उडाला. इतक्याने इखलासखानाची रग जिरली नाही. त्यानें आपल्या लोकांची जमावाजमव करून व आणखी पुष्कळ लोक मदतीला मागवून मराठ्यांवर पुनः निकराचा हल्ला केला; परंतु ह्या वेळीही महाराजांच्या शूर लोकांनी त्याचा पुरा धुव्वा उडविला. पाच हजार मोगल रणात पडले. त्याचे मोठमोठे तीस अमलदार प्राणास मुकले. इखलासखान वगैरे कित्येक सरदार जायबंदी होऊन मराठ्यांच्या हातीं लागले. राव अमरसिंह लढाईत पडला. मोगलांच्या छावणीचे एकूणएक सामान

मराठ्यांच्या हाती लागले. महाराजाचेही हजार-दीडहजार लोक प्राणास मुकले. त्याचा सुरराव काकडे[१] या नावाचा शूरसमशेरबहादर सरदार ह्या घनघोर संग्रामांत जंबिऱ्याचा गोळा लागून पतन पावला. हा काकडे महाराजांच्या अगदीं जुन्या मदतगारांपैकीं असून पाच हजार मावळ्यांचा सरदार होता. महाराजांनी जावळीवर हल्ला केला त्या वेळीं चांगला पराक्रम करून हा प्रसिद्धीस आला होता. रोहिडा किल्ला ह्यानेच छापा घालून घेतला होता. महाराजांस तो रणात पडल्याचे कळले तेव्हां फार वाईट वाटलें व 'माझा एक जुना, इमानी व शूरसरदार मला सोडून गेला!' असा खेदोद्‌गार त्यांनी काढला. इखलासखानाचा असा पुरा पराभव होऊन पुष्कळ फौज गारद झाली हे पाहून बहादूरखानाचा सगळा आवाका नष्ट झाला. त्याला उरलेल्या लोकांनिशीं मराठ्यांबरोबर लढण्याचे धैर्य न होऊन, साल्हेरीचा वेढा उठवून त्यानें औरंगाबादेकडे एकसारखी धूम ठोकली. मराठ्यांनी त्याचा पिच्छा शेवटपर्यंत सोडला नाही. हे साल्हेरीचे युद्ध स. १६७२ त झालें.

ह्या युद्धांत १२५ हत्ती, ७०० उंट, ६००० घोडे, पुष्कळ जडजवाहीर, शेकडो बैल व इतर युद्धोपयोगी सामान महाराजांस मिळाले. ह्या प्रसंगी आनंदराव, व्यंकोजी दत्तो, रुपाजी भोसले, खंडोजी जगताप, संताजी जगताप, मानसिंग मोरे, विसाजी बल्लाळ, मोरो रंगनाथ, मुकुंद बल्लाळ वगैरे सरदारांनी बहुत शर्त केली म्हणून त्यांस महाराजांनी नावाजून वस्त्रेभूषणे दिलीं. लढाईत पाडाव केलेल्या लोकांपैकी जे मोगलसरदार व बडेबडे अंमलदार रायगडावर पाठवून दिले होते त्यांचा महाराजांनी चांगला परामर्ष घेतला व त्याच्या जखमा बऱ्या झाल्यावर त्यांचा बहुमान करून व त्यास नजरनजराणा देऊन सोडून दिलें. बंदिवान केलेल्या लोकांपैकीं ज्याची इच्छा आपल्या पदरी राहाण्याची दिसली त्यांस महाराजांनी ठेवून घेतलें. अशा रीतीनें त्यांच्या लष्करात पुष्कळच भरती झाली.[२]

मोगलांच्या सैन्याशीं समोरासमोर संग्राम करून हा वेळपावेतो महाराजांस जे विजय प्राप्त झाले त्यामध्ये साल्हेरीजवळील ह्या विजयाची गणना पहिली आहे. असा मोठा विजय त्यांस पूर्वी कधींच प्राप्त झाला नव्हता. ह्या घनघोर संग्रामांत महाराजांच्या लोकांनी दाखविलेल्या शौर्याची व युद्धकौशल्याची कीर्ती चोहोंकडे पसरून त्याचा दरारा पूर्वीपेक्षा पुष्कळ वाढला. मराठ्यांच्या ठायींच्या शौर्यवीर्यादी उज्ज्वल गुणांचे हे अप्रतिम प्रदर्शन पाहून मोगलसरदार अगदी थक्क होऊन गेले. त्यांना महाराजांच्या लोकांची विशेषच दहशत वाटूं लागली. मराठे शिपाई विजापूरकरांची व मोगलांची नोकरी सोडून महाराजांपांशी येऊ लागले. त्यांना त्यांच्या योग्यतेप्रमाणें महाराज आपल्या लष्करांत नोकरी देऊन ठेवीत. साल्हेरी घेतल्यावर त्या किल्ल्यासमोरील मुल्हेरी नावाचा किल्ला त्यांनी हस्तगत करून सगळ्या बागलाण प्रांतावर आपला शह बसविला. तेणेंकरून सुरत शहरास कायमची दहशत बसली.

ह्या सुमारास बुंदेलखंडाचा राजा छत्रसाल हा महाराजांच्या भेटीस आला. हा चंपतराय बुंदेले याचा मुलगा. हा जयसिंगाच्या शिफारशीवरून मोंगल बादशहाच्या लष्करात राहिला होता; परंतु तेथे त्यास त्याच्या कर्तबगारीप्रमाणे बढती मिळेना म्हणून तो नाराज झाला आणि एकेदिवशी शिकारीस जाण्याच्या मिषाने गोंडप्रांतात मोगलांची छावणी होती तेथून निसटून आपल्या पत्नीसह महाराष्ट्रात आला. महाराजांनी त्याचा बहुत आदरमान केला. तो म्हणाला कीं, 'आपल्या पदरी राहून औरंगजेबाशी युद्ध करावे अशी माझी इच्छा आहे ती आपण पूरी करावी!' महाराजांनी त्याच्या ह्या हिंमतीची व मर्दपणाची तारीफ करून म्हटलें, हे प्रतापी राजा, तू स्वदेशी जा आणि तेथून औरंगजेबावर उठ!

---

१ सभासद याचे नाव सूर्यराव असें देतो. शेडगावकरांच्या बखरींत सुरेराव असें याचे नाव दिले आहे.

२ युद्धात कैद केलेल्या शत्रूच्या लोकांस त्याकाळी अशा रितीने वागविणाराच्या अंगी किती भूतदया असली पाहिजे हे स्पष्टच आहे. अशा महामनस्क पुरुषास क्रूर म्हणणाऱ्यांस काय म्हणावे कळत नाही. रणात कैद केलेले लोक, शत्रूकडील बायका मुले, निरनिराळ्या धर्मांचे धर्मगुरु, मशिदी व देवळे याच्या संबंधाने महाराजाचे जें वर्तन असे त्याची अलीकडे युरोपातल्या युद्धाच्यावेळी घडलेल्या घोर कर्मांशी तुलना केली असता सुधारणेच्या शिखरास जाऊन पोचल्याचा गर्व वाहणाऱ्या ख्रिस्ती जनांस लज्जेने खाली मान घालावी लागेल.

आपल्या शत्रूशी लढून त्याजवर विजय संपादन कर, आपला देश शत्रूच्या हातून सोडवून त्यावर राज्य कर! तू आपल्या देशात राहून शत्रूंशी लढण्यास सिद्ध होशील तर तुझ्या किर्तीप्रमाणे तुला पुष्कळ लोक साहाय्य होतील. जेंव्हा जेंव्हा मोगल तुझवर चढाई करावयास तयार होतील तेंव्हा तेंव्हा मी त्यांचे लक्ष दुसरीकडे वेधेलसे करीन व त्यांचे बेत आणि योजना हाणून पाडीन!' असा हुरूप देऊन महाराजांनी त्यास निरोप दिला. त्याकाळचा इतिहासकार भीमसेन म्हणतो कीं, छत्रसाल निराश होऊन रायगडावरून परत गेला. कारण उत्तर हिंदुस्थानातील लोकांवर भरवसा ठेऊन त्यांस जबाबदारीचे हुद्दे देणे बरोबर नाही असे महाराजांचे मत होतें.

मोगलांच्या मोठमोठ्या सरदारांनी जय्यत सेना घेऊन महाराजांवर ह्या वेळीं स्वारी केली असता त्यांचा पूरा मोड करून त्यांची दाणादाण केल्यामुळे महाराजांचा वचक चोहोंकडे बसला. त्यांचे प्राबल्य पुष्कळ वाढले आणि आता मोगलांची किंवा इतर कोणत्याही यवनी पादशाहतीची त्यांना तमा वाटेनाशी झाली. त्यावेळच्या इंग्लिश व्यापारांचा असा लेख आहे कीं, मोंगलांचे दोन मोठे सरदार मोठ्या सैन्यानिशी शिवाजीच्या मुलखात शिरले होते; परंतु त्यांची मोठी फजिती व नुकसान होऊन त्यांस परत जावे लागले. प्रो. सरकार म्हणतात की, ह्या सुमारास सतनामी लोकांनी व खैबर येथील अफगाण लोकांनी बंडे केल्यामुळे मोगल बादशहाला दक्षिणेतील आपली झालेली फजिती दूर करण्याचा प्रयत्न सुरु करण्यास सवड नव्हती. थोड्याच दिवसांनी मोहबतखान व शहाजादा मोअझीम यांस उत्तरेकडे जावे लागले. आणि बहादूरखानाला दक्षिणेचा सुभेदार नेमले; परंतु तो जागच्याजागी स्वस्थ राहिला.

ह्यानंतर महाराजांनी मोरोपंतास दहा हजार लोक देऊन सुरतेकडे पाठविलें. मागें सांगितल्याप्रमाणें औरंगजेबाने सुरतशहरापाशी आरमार तयार करवून तें शिद्दीच्या साहाय्यास देऊन महाराजांच्या कोंकणपट्टीवर समुद्रांतून स्वाऱ्या करण्याचा व त्यांच्या आरमाराचा नाश करण्याचा बेत केला होता. हें मोगलांचे आरमार तयार होऊन शिद्दीच्या आरमारास मिळून आपल्या प्रांतास उपद्रव देण्यास तयार होण्यापूर्वी तें जाळून टाकण्याची कामगिरी त्यांनी मोरोपंतास सांगितली; परंतु ही कामगिरी त्याच्या हातून सिद्धीस गेली नाहीं. कारण तो तिकडे जाऊन पोचण्यापूर्वीच मोगलांचे आरमार त्या बंदरांतून निघून शिद्दीच्या जंजिऱ्यापाशी जाऊन राहिलें. हा बेत फसला तरी त्यानें सुरतशहरास वेढा दिला, आत जाणारी अन्नसामुग्री व इतर व्यापार त्यानें अजीबात बंद केला व तो जबरदस्त खंड मागू लागला. त्याने त्या शहरास वेढा घालण्यापूर्वी तेथल्या सुभेदारास तीन पत्रे महाराजांच्या नावाने पाठविली. त्यातल्या शेवटल्या पत्राचा आशय येणेप्रमाणे होता : 'तुझ्या ताब्यातल्या प्रांताचा जो वसूल तू बादशहास प्रतिवर्षी देत असतोस त्याचा चौथा हिस्सा तू आमच्याकडे पावता केला पाहिजे. ह्या संबंधीची दोन पत्रे आम्ही तुला लिहिली. आता हे पत्र शेवटले आहे. माझा मुलूख व माझे लोक यांच्या रक्षणासाठी आम्हाला मोठे सैन्य ठेवणे तुझ्या बादशहामुळे भाग पडत आहे. तरी ह्या सैन्याचा खर्च त्याच्याच प्रजेकडून मिळाला पाहिजे. ही रक्कम त्वरीत पाठवून देणार नाहीस तर आमच्यासाठी तेथे एक घर तयार ठेव! आम्ही तेथे बसून सरकार देणे व जकात स्वतः वसूल करू. आम्हांस तुझ्या शहरात वाटेल तेव्हां यावयास हरकत करणारा कोणीही उरला नाही!' ही पत्रे आल्यावर सुरतच्या सुभेदाराने तेथल्या मोठमोठ्या मुसलमान व हिंदू व्यापाऱ्यास जमवून त्यांच्याशी असे बोलणे केले कीं, शहराचे रक्षण करण्यासाठी दोन महिनेपर्यंत तीन हजार पायदळ व पाचशें घोडेस्वार ठेवावे लागतील; तरी त्यांच्या खर्चासाठी ४५ हजार रूपये आपसात वर्गणी करून आम्हांस द्यावे. मग त्याने शहरांतल्या घरांची यादी करून त्यांच्याकडून सदरील निमित्ताने बराच पैसा गोळा केला; पण त्याने त्या पैशाचा वचनाप्रमाणे उपयोग न करता तो आपल्या खाजगी तिजोरीत जमा केला. सदरी नमूद केलेले मोरोपंतांचे तिसरे जरबेचे पत्र आले. तेव्हां व्यापारी वगैरे लोक घाबरून जाऊन शहर सोडून पळून जाण्याची परवानगी त्या सुभेदाराकडे मागू लागले; पण तो त्यांस ती देईना. त्याने खंडाची रक्कम जमविण्यासाठी व्यापारांकडे एक लाख रूपयांची व जमिनदार-देसायांकडे साठ हजार रुपयांची मागणी केली; परंतु त्यांना त्याचा विश्वास न येऊन त्यांनी त्याच्या मागणीप्रमाणे रक्कमा देण्याचे नाकारले. तरी त्याने श्रीमंत रहिवाशांकडून पुष्कळ पैका गोळा केला व त्यांतील कांही खंड म्हणून मोरोपंतास देऊन संतुष्ट केलें व बाकीचा आपल्या खासगी तिजोरीत ठेवून दिला.

इकडे महाराजांनी असा विचार केला कीं, सुरतेजवळचा साधेल तेवढा प्रांत काबीज करून त्या शहरास पक्का शह बसवावा. ह्या उद्देशाने त्यांनी[१] आपल्या फौजेनिशीं जव्हार (घोडबंदर) व रामनगर ह्या प्रांतांत दोन छोटे कोळी राजे राज्य करीत होते त्यांच्या राज्यांत स्वारी केली. महाराज दोन वेळां सुरतेवर हल्ला करावयास गेले तेव्हां त्यांस ह्या राजांनी आपल्या डोंगरी मुलखांतून जाऊं दिलें होते. मोगल अंमलदारांस आपण सुरतेवर चाल करून जात आहों याचा सुगावा लागून त्यांच्याकडून आपणांस हरकत होऊं नये ह्या उद्देशाने महाराजांनी ही त्यांच्या राज्यांतून आडवाट काढली होती. ह्याप्रमाणें त्या राजांनी आपणांस बिनहरकत जाऊं दिल्याबद्दल महाराजांनी त्यांस पुष्कळ द्रव्य देऊन त्यांच्याशी स्नेह केला होता. ह्यावेळी तरी त्यांच्या राज्यांत त्यांनी मित्रभावानेंच प्रवेश केला. जव्हारचा राजा विक्रमशहा[२] यास अंकित करून जव्हार हस्तगत केले आणि त्यांच्या तिजोरीतील सतरा लाख रुपये जप्त केले. तेथून ते रामनगरावर[३] चालून गेले. तेथल्या राजाने त्यांस आपल्या किल्ल्यांत घेताच ते म्हणाले कीं, हा किल्ला आमच्या हातीं असणें इष्ट आहे. आमच्या खजिन्याची म्हणजे अर्थात् सुरतेची किल्ली तुमच्या हातीं असणें सोईचे नाहीं!' हें त्यांचें म्हणणें त्या राजाला मान्य करणें भाग पडलें. ह्या राजाच्या ताब्यांत थोडेसे डोंगरी किल्ले काय ते होते व सभोवतालचा मुलूख फिरंग्यांच्या ताब्यांत होता. आपल्या प्रांतांत ह्या राजाने लुटालूट करूं नये म्हणून फिरंगी त्यांस प्रतिवर्षी कांही खंडणी देत असत. त्याचे सगळे किल्ले कबजांत घेतल्यावर महाराजांनी फिरंग्यांच्या दमण येथील किल्ल्यावर कांही लोक रवाना केले. ते आपल्यावर चालून येत आहेत हें पाहून फिरंग्यांची पाचावर धारण बसली. किल्ल्यास तटबंदी केली होती; पण त्यावर तोफा वगैरे ठेवण्याची व्यवस्था चांगलीशी केली नव्हती. त्यांनी काही तोफा किल्ल्याच्या बुरजावर चढवून जेमतेम तयारी करून आपला एक अंमलदार महाराजांचे लोक चाल करून येत होते त्यांच्याकडे पाठवून ते कां येत आहेत तें विचारले. त्यानी महाराजांच्या सांगण्यावरून असा जबाब दिला कीं, तुम्ही रामनगरच्या राजास जी खंडणी देत असतां ती यापुढें कायम करण्यासाठीं आम्ही आलों आहे. हें अरिष्ट एवढ्यानेच टळत आहे हें पाहून त्यांनी वार्षिक खंडणी नेमाने देण्याचा करार मोठ्या आनंदाने केला.

औरंगाबादेस पुनः अधिकारांतर झाल्याचे वर सांगितलेच आहें. मोहबतखानाचा पूर्वोक्त प्रकारे पराभव होऊन पुष्कळ सेनेची खराबी झाली हें औरंगजेबास कळलें तेव्हा त्याचा त्यास फार राग येऊन त्यानें त्याला व शहाजाद्याला परत बोलाविले आणि गुजराथेचा सुभेदार बहादूरखान यास दक्षिणेचा सुभेदार नेमले व त्याच्या ताब्यांत सत्तर हजार फौज देऊन त्याला मराठ्यांशी युद्ध करावयास सांगितलें; परंतु त्याचीही कशी फजिती कशी झाली तें वर सांगितले आहे. तो दक्षिणेंतील सुभ्यावर आला तेव्हां तिकडील सगळी स्थिती त्याच्या लक्षांत येऊन त्यानें असा विचार केला की, आपल्या जवळ असलेली फौज मराठ्यांशी टक्कर देण्यास पुरेशी नाहीं. यास्तव त्यांच्याशी युद्ध करण्याच्या भानगडींत न पडता आपल्या मुलखात त्यांच्या वारंवार स्वाऱ्या होऊन रयतेस उपद्रव होतो तो नाहींसा करण्यास तूर्त झटावे.

वर सांगितल्याप्रमाणे कोळी राजांची संस्थाने काबीज केल्यामुळे मोरोपंत पिंगळ्यास मोंगलांच्या नाशिक प्रांतात सहज शिरता आले. त्याने सन १६७२ च्या जुलै महिन्यात तिकडचा घाट ओलांडून त्या प्रांतात स्वारी केली.

---

१ ही कामगिरी मोरो त्रिंबक पिंगळे यांस सांगितली होती आणि ती त्याने सुरतेवर मोहिम करताना बजावली असे प्रो. सरकार म्हणतात. (पृ. २४४).

२ हा विक्रमशहा राज्यभ्रष्ट झाला तेव्हा तो मोगलांच्या अमलातील नाशिक प्रांतात पळून गेला. तिकडे राहून तो आपल्या लोकांनिशी महाराजांच्या ठाणे प्रांतातील उत्तरभागी वेळोवेळी लुटालूट करीत असे. पुढें मोरोपंताने स. १६७८ त नाशिक प्रांतावर स्वारी केली. तेव्हा तेथल्या फौजदाराच्या सैन्यास मिळून तो मराठ्यांशी मोठ्या आवेशाने लढला; परंतु शेवटी तो पराभव पाहून रणात पडला. (प्रो.सरकार पृ.१४८)

३ हे संस्थान आता धरमपूर या नावाने नांदत आहे आणि रामनगर आता नगर या नावाने प्रसिद्ध असून ते धरमपुरापासून चोवीस मैलांवर आहे.

नाशिक-त्रिंबकचे ठाणे लुखजी जाधवाच्या पणतूच्या स्वाधीन होते. त्याच्याजवळ चार हजार लोक होते, परंतु त्याचे काहीएक चालले नाही. मोरोपंताने त्याचा पराभव करून तिकडचा प्रांत हस्तगत केला. त्याप्रमाणेच वणीदिंडोरीच्या ठाण्यावर शिद्दी हिलाल होता. त्याचाही त्याने पराभव करून त्या प्रांतांवर आपला ताबा बसविला. ह्याप्रमाणें हे सरदार नामोहरम झाल्यामुळे औरंगजेबाचा त्याजवर मोठा रोष झाला. तेव्हां हे दोघे सरदार व तसेच आणखी दोघे मोगल सरदार बादशहाची नोकरी सोडून आपल्या मोठ्या घोडदळानिशी महाराजांस येऊन मिळाले. ह्यामुळे दिलेरखानाचे धाबे दणाणले. आता गुजराथेचे रक्षण कसे होते याची त्याला मोठी फिकीर पडली. इकडे महाराजांची मोठी फौज रामनगरपाशी पुनः येऊन थडकली. तेव्हां सुरतकरांची पुनरपि पाचावर धारण बसली; परंतु ह्या फौजेने तेथून मोरचा फिरवून वराडाकडे दौड केली आणि तो प्रांत व तेलंगण लुटण्याचा सपाटा चालविला. तेव्हां बहादूरखानाने तिचा पाठलाग चालविला; पण त्याला झुकांडी देऊन ती तेथून निसटली ती भागानगरकडे गेली. परत येताना ती दोन भाग करून दोन दिशांनी दौड करीत सुटली. त्यातल्या एका भागाच्या मागे बहादूरखान लागला व दुसऱ्याच्या मागे दिलेरखान लागला; परंतु त्यांना त्यांनी दाद दिली नाही. एकेठिकाणी महाराजांच्या ७५० घोडदळाने मोगलांच्या दहा हजार लोकांवर हल्ला केला आणि त्यांची अगदी धांदल उडवून दिली; परंतु मोगलांस आणखी कुमक येऊन पोहोचल्यामुळे मराठ्यांना शेवटी हार खावी लागली. त्यांचे चारशे लोक रणात पडले.

मग ज्या घाटातून मराठे लोक स्वाऱ्या करण्यासाठीं येतात त्या घाटांवर आपले लोक ठेवून देऊन त्यांस प्रतिबंध करावा व पहाडातील खिंडींतून तोफा रचून ठेवाव्या असा बहादूरखानाने बेत केला. हा बेत दिलेरखानास पसंत पडला नाहीं. चाकणचा किल्ला वेढा घालून घेतल्यामुळे त्याचें पारडे अंमळ जड झालें होतें. तो मोठा हुशार सरदार आहे असा औरंगजेबाचा अभिप्राय झाला होता. ह्या सरदाराची रग अद्यापि चांगलीशी जिरली नव्हती. मराठ्यांशी युद्ध करण्याची धमक त्याच्या अंगी अद्यापि कायम होती. त्यानें खानजहानास असा सल्ला दिला कीं, अशा रीतीनें पहाडांतून फौज अडकवून ठेवण्यात काही हाशील नाही. जवळ असलेल्या फौजेनिशी शिवाजीमहाराजांच्या ताब्यातील किल्ल्यांवर हल्ले करून ते घेण्याचा उद्योग नेटाने चालवावा; परंतु हा सल्ला त्या सरदारास पसंत न पडून त्यानें आपला पूर्वोक्त बेतच अंमलात आणला. ह्या व्यवस्थेचा परिणाम असा झाला कीं, महाराजांचे लोक खानदेशांत स्वाऱ्या करण्याचें सोडून निरनिराळ्या टोळ्या करून अहमदनगर व औरंगाबाद ह्या शहरांच्या आसपास घिरट्या घालू लागले. ह्या नव्या सुभेदारानें त्याचा जिकडूनतिकडून पाठलाग करून मोड करण्याचा प्रयत्न करावा; पण त्यांत त्यास मुळींच यश येईना. शेवटी पावसाळा सुरू होऊन त्याला भीमातीरी पेडगांवास छावणी करून राहावें लागलें. येथे असतां त्यानें आपल्या रक्षणासाठीं एक भुईकोट किल्ला उभारून त्यास बहादूरगड असें नांव दिलें. हे ठिकाण मराठ्यांवर चोहोकडून हल्ला करण्यास सोयीचे असल्याकारणाने बहादूरशहाने आपली छावणी येथे बरीच वर्षे केली होती.

ह्या वेळी शिवनेरी किल्ला मोगलांच्या ताब्यात गेला असून यावर त्यांचे बरेच लोक होते. हा किल्ला आपल्या हाती यावा अशी महाराजांस उत्कट इच्छा झाली. कारण एक तर हे ठिकाण मोंगलांच्या ताब्यातल्या प्रांतांच्या सरहद्दीवर असल्यामुळे त्याच्या योगाने त्या प्रांताचे चांगले रक्षण होत असून उत्तर कोंकणातून मोगलांच्या प्रांतात शिरण्यास यामुळे मोठीच अडचण असे. दुसरे असे कीं, हा किल्ला महाराजांचे जन्मस्थान असल्याकारणाने तो शत्रूच्या हाती असणे इष्ट नाही असे त्यांस वाटे. म्हणून त्यांनी हा किल्ला हस्तगत करण्याचा विचार केला. हा अबदुल अझिजखान ह्या नावाच्या एका सरदाराच्या हाती होता. हा पूर्वी ब्राह्मण असून त्याने मुसलमानी धर्माचा स्विकार केला होता. हा औरंगजेबाचा मोठा विश्वासू सरदार होता. याला महाराजांनी पुष्कळ द्रव्य देऊ करून किल्ला आपल्या ताब्यात देण्याविषयी निरोप पाठविला. त्या सरदाराने त्यांनी देऊ केलेले द्रव्य हाताखाली घालून किल्ला स्वाधीन करून देण्याचे वचन दिले. आणि महाराजांनी सात हजार घोडेस्वार अमुक दिवशी किल्ला ताब्यांत घ्यावयास पाठवावे असे सांगून पाठविलें. त्याप्रमाणे त्यांनी आपले घोडदळ तिकडे पाठविले, परंतु त्या सरदाराने दगा केला. त्याने

बहादूरशहाला आपला दग्याचा बेत कळवून पुष्कळ मोगल सैन्य किल्ल्यापाशी आणविलें आणि महाराजांचे लोक किल्ल्यापाशी आले तेव्हां त्यांच्यावर एकदम हल्ला केला. ह्या झटापटीत महाराजांच्या लोकांचा मोड होऊन त्यांस मागे पाय घ्यावा लागला.

ह्याप्रमाणें हा मोगल सरदार निरुपाय होऊन जागच्या जागी बसून राहिला असतां महाराजांनी एक दूरची मोहीम केली. गोवळकोंड्याच्या कुतुबशहाच्या राज्यांत फ्रेंच लोकांनी कांही गडबड केल्यावरून[१] तो शहा तिकडे मोठ्या सैन्यानिशीं जाण्याच्या विचारांत आहे असें त्याच्या दरबारांत महाराजाचा वकील होता त्यानें त्यांस कळविल्यावरून ते रायगडावरून दहा हजार लोक घेऊन तिकडे मोहीम करण्यास निघाले. आपल्या नेहमीच्या पद्धतीप्रमाणें त्यांनी आपण कोठे चाललो आहों हे कोणासही कळू दिलें नाहीं. तें औरंगाबादेवर, कीं अहमदनगरावर, की विजापूरावर निघाले आहेंत हें त्यांच्या पहिल्या रोखावरून कोणास कांहींच कळेना; पण ते मोठमोठ्या मजला करून एकदम कुतुबशहाच्या मुलखात शिरले व हैदराबाद शहरापाशी अकस्मात जाऊन थडकले. हा एकाएकीं आलेला घाला पाहून शहरातले लोक गडबडून गेले. महाराजांनी शहरच्या पुढाऱ्यास व अंमलदारांस असा धाक घातला की, 'वीस लाख होन खंड बिनतक्रार पावता करा, नाहींतर तुमचे शहर जाळून उदध्वस्त करतो!' त्यांस ती अट मान्य होऊन त्यांनी तेवढा ऐवज जमा करून त्यांच्याकडे नेला व त्यांच्या कचाट्यातून तें शहर सोडविले. महाराज एवढ्या रकमेनें तृप्त होऊन त्या किंवा दुसऱ्या कोणत्याही शहरास बिलकूल उपद्रव न करता परत मोठ्या वेगाने रायगडास येऊन दाखल झाले.

ह्या मोहिमेवर महाराज गेले असतां मागें मोगलांच्या सुरत येथील आरमाराने व शिद्याच्या आरमाराने एकवट होऊन कोकणपट्टींतील समुद्रकिनाऱ्यांच्या गांवांवर स्वाऱ्या करून त्यांची फारच नासाडी केली. दंडाराजपुरीस महाराजांनी जे कोट उभारले होते, त्यांवर छापा घालून त्यांचा त्यांनी नाश केला. राघो बल्लाळाच्या ताब्यांत हे कोट होते. तो मोगलांशी मोठ्या निकराने लढला; परंतु शेवटीं त्याचा पराभव होऊन तो रणात पडला. दंडाराजपुरीवर शिद्दीनी हा हल्ला होळीच्या सणात केला. कोटावरील रखवालदार झोपी गेले असतां रात्रीच्यावेळी हा त्यांचा हल्ला अकस्मात् आला. शिद्दी खैरात जमिनीवरून चाल करून येत आहे असे पाहून मराठे त्यांच्याशी सामना करावयास तिकडे गेले असता, याकूबखानाने समुद्राच्या बाजूने चाळीस तारवांनिशी हल्ला करून तट सर केला आणि त्याच्या लोकांनी आत शिरून कत्तल चालविली. या धामधुमीत तेथल्या दारूच्या कोठारास आग लागून त्याचा भडका उडाला. लोक प्राणास मुकले. असे सांगतात कीं, महाराज त्या वेळी चाळीस मैलांवर होते. त्यांच्या कानी ह्या भडक्याचा आवाज जाऊन ते खडबडून जागे झाले आणि म्हणाले कीं, 'दंडाराजपुरीस काहीतरी घात झाला असावा!' हा काय प्रकार आहे त्याची चौकशी करण्याकरता त्यांनी तिकडे माणसेही पाठविली. असे म्हणतात; दंडाराजपुरीच्या लगत्यास महाराजांचे सात किल्ले होते. त्यावर याकूबखानाने हल्ला केला त्यातले लोक दोन-तीन दिवस लढले, परंतु शेवटी त्यांचा नाईलाज होऊन त्यातले सहा किल्ले याकूबखानाने सर केले. एका किल्ल्यावरच्या लोकांनी मात्र सात-आठ दिवस टिकाव धरला. एवढ्या अवधीत महाराजांकडून कुमक येईल अशी त्यांना आशा होती पण ती व्यर्थ आहे असे पाहून शेवटी त्याला तो किल्ला शत्रूच्या स्वाधीन करावा लागला. याकूबखानाने आतल्या लोकांस अभय दिल्यावरून ते किल्ल्याबाहेर आले. ही एकंदर सातशे माणसे होती; परंतु किल्ला हाती आल्याबरोबर याकूबखानाने दगा करून त्यातल्या देखण्या बायका व मुले त्यांस पकडून गुलाम केले. त्यांस मुसलमानी धर्माची दिक्षा दिली. ज्या म्हाताऱ्या व कुरूप बायका होत्या त्यांस त्यांनी सोडून दिले आणि सगळ्या पुरुषांची कत्तल केली व आपल्या अत्यंत अधमपणाची व क्रूरकर्माची हकीगत त्याने मोगल सेनापतीला लिहून कळविली. त्यांनी त्याच्या ह्या दुष्कर्माची तारीफ करून त्याची मनसब वाढविली आणि त्याला शिरपाव नजर केला.[२] पुढे महाराजांनी गोवळकोंड्याहून परत आल्यावर याचा चांगलाच वचपा घेतला.

---

१ फ्रेंचांच्या गव्हर्नराने सेंट थॉमी नावाच्या ठाण्यातील कुतुबशहाच्या लोकांस हाकून देऊन तें हस्तगत केल्यावरून ह्या शहाने तें परत घेण्यासाठी तिकडे आपलें सैन्य पाठविलें होते.

२ ही हकीकत खाफीखानाच्या बखरीच्या आधाराने दिली आहे.

शिद्दीने केलेल्या भयंकर क्रूरकर्माबद्दल त्यांस चांगले शासन करण्याचा महाराजांनी दृढ संकल्प करून त्याच्या प्रांतात सारखा धुमाकूळ मांडला. दंडाराजपुरी काबीज करण्यासाठी त्यांनी मुंबईच्या इंग्रजांकडे मदत मागितली; परंतु सुरतेच्या काउन्सिलानें व अध्यक्षाने मुंबईच्या व्यापाऱ्यास असा सल्ला दिला कीं, 'शिवाजीस साहाय्य केले असता आपल्यावर मोगलांची इतराजी होऊन आपला ह्या देशातून उठाव होईल, शिवाजी दारूगोळा वगैरे मागत आहे त्यास तो देऊ नये व देत नाही असेही स्पष्ट सांगून त्याचाही आपणावर रोष होऊ देऊ नये असे त्यास झुलवीत राहावे. दंडाराजपुरी शिवाजीच्या हाती गेली तर त्यात आपले नुकसान आहे. कारण त्यामुळे मुंबई बंदराला त्याच्याकडून नेहमीचा उपद्रव होण्याचा संभव आहे.' ह्या सल्ल्याप्रमाणे वागून मुंबईच्या इंग्रज व्यापाऱ्यांनी तटस्थ वृत्ती धरली. तरी पुढें औरंगजेबाने छत्तीस तारवानचे आरमार महाराजांच्या कोंकण किनाऱ्यावरील शहरांवर हल्ला करावयासाठी पाठविलें. ह्या आरमाराने महाराजांच्या बऱ्याच लहान-सहान व्यापारी जहाजांचा नाश केला. ह्या आरमाराच्या भितीने महाराजांनी आपली सहा जहाजे मुंबईच्या बंदरात ठेवली होती. त्याचा सुगावा मोगल आरमारास लागला तेव्हां ती काबीज करण्याचा त्याने बेत केला, परंतु इंग्रज व्यापारांनी त्यांजकडे असा बहाणा केला की, शिवाजीने स. १६६० त राजापूर येथील आपली वखार लुटली होती. तिचा बदला घेण्यासाठी ही त्याची तारवे आपण काबीज केली आहेत. हे त्यांचे म्हणणें खरें वाटून मोगल आरमार त्या तारवाच्या वाटेस गेले नाहीत. मुंबईच्या इंग्रजांनी शिवाजीमहाराजांस राजी ठेऊन मोगलाचा आपणावर कोप होऊ न देण्याविषयी ही अशी हिकमत लढविली. फ्रेंच व्यापारीही महाराजांस राजी ठेवण्याविषयी झटत असत. फ्रेंच लोक मोगलांना कळू न देता महाराजांस दारूगोळा व बंदुका तोफा पुरवित असत. महाराजांच्या आरमाराचा व मोगलांचा आश्रय धरलेल्या शिद्दीच्या आरमाराच्या लढाया वर सांगितल्याप्रमाणे चालल्या असता एका फ्रेंच जहाजाने राजापुरास ओरवा करून महाराजांच्या आरमाराला ८० लहान तोफा व दोन हजार मण गोळे गुप्तपणे विकले असे म्हणतात. मोगलांच्या व शिद्दीच्या आरमारावरील सरदारांनी ह्या वेळीं मुंबईच्या बंदरांत शिरून महाराजांच्या ताब्यांतला कुर्ला प्रांत उद्ध्वस्त करण्याचा घाट घातला व त्या बेटातील इंग्रज गवर्नर आंगिअर याजपाशीं बंदरांत प्रवेश करण्याविषयी परवानगी मागितली. ती त्यानें दिली नाहीं. पुढें वर सांगितल्याप्रमाणें किनाऱ्यावरील कांहीं गांवांची खराबी करून शिद्दी मागें परतला व इंग्रजांची परवानगी न घेता मुंबईच्या बंदरांत शिरला. तेथे गेल्यावर त्यानें त्यांच्यापाशी असें बोलणे लावले कीं, 'तुम्ही-आम्ही मिलाफी होऊन शिवाजीमहाराजांवर शस्त्र धरू.' हा प्रकार तेथे महाराजांचा वकील होता त्यास कळला तेव्हां त्यानें इंग्रजांस अशी दहशत घातली कीं, तुम्ही शिद्दीस मिलाफी व्हाल तर आमचा धनी तुमच्यावर खास स्वारी करील!' तेव्हां अर्थात् हें प्रचंड अरिष्ट टाळण्यासाठी आंगिअर याने ह्या प्रसंगी तिऱ्हाईतपणा स्वीकारून राहणे विशेष सोईचे व हिताचे आहे असें मनांत आणून शिद्दीच्या बोलण्यास रुकार दिला नाही. तरी त्याने मुंबई बंदरातून कांही तारवे पेण व नागोटना येथील खाड्यांत पाठवून त्या बाजूच्या महाराजांच्या अंमलातील गावांची नासधूस चालविली आणि तेथले लोक पकडून नेण्याचा क्रम चालविला. तेव्हां महाराजांच्या लोकांनी रायगडावर उतरून शिद्दीच्या लोकांवर हल्ला केला व त्यांची कत्तल उडविली. त्यांच्या कित्येक अंमलदारांची डोकी कापून महाराजांकडे नेली असे म्हणतात.[१]

ह्या सुमारास डच लोकांचे इंग्रजांशी वैर वाढून ते एकमेकांशी युद्धे करूं लागले. डच लोकांचा एक सेनापती बावीस तारवांचे आरमार घेऊन मलबारकिनाऱ्याजवळून उत्तरेस आला. त्याच्या मनात मुंबई बेटावर हल्ला करून तें हस्तगत करावें असें होतें. त्याच्या कानीं महाराजांची कीर्ती अगोदरच गेली होती. त्यांस त्याने असा निरोप पाठविला कीं, 'तुम्ही आम्हांस तीन हजार लोकांची कुमक जमिनीवरून करून मुंबईबेट घेण्यास मदत कराल तर दंडाराजपुरी व जंजिरा घेण्यास तुम्हांला आम्ही आमच्या आरमाराची मदत देऊं!' ह्या निरोपास महाराजांकडून काय जबाब मिळतो याची तो सरदार वाट पाहत राहिला; परंतु महाराज ह्यावेळी दुसऱ्याच एका महत्त्वाच्या बेतात गुंतले असल्यामुळें व ह्या डच सेनापतीवर भरवसा ठेऊन इंग्रजांशी विरोध करणे बरोबर नाही असे त्यांना वाटल्यामुळे त्यांनी त्याचें म्हणणें मनास आणले नाही. त्यांच्याकडून मदत मिळाली नाही असे पाहून तो डच सरदार हताश होऊन माघारी गेला.

***

१ प्रो. सरकार, पृ. ३४९

भाग बाविसावा

विजापूरकरांशी पुनः युद्धप्रसंग (१६७३–७४)

मागें सांगितलें आहे कीं, अदिलशहाचा मुख्य वजीर अब्दुल महंमद यानें महाराजांशी गुप्त तह करून दरसाल तीन लक्ष रुपये खंडणी त्यांस देण्याचे कबूल केले होतें. त्याप्रमाणें महाराजांस प्रतिवर्षी खंडणीचा ऐवज पावता होत असे. ह्यामुळे त्यांनीं विजापूरकरांच्या ताब्यांतील मुलखात अलीकडे गडबड करण्याचें सोडून दिलें होतें; परंतु स. १६७३ मध्ये अदिलशहा मरण पावला[१] व त्याचा एक पाच वर्षांचा मुलगा गादीवर बसून त्याचा मुख्य कारभारी खवासखान हा झाला. त्यामुळें अबदुल महंमदाच्या हातचा कारभार जाऊन महाराजांशी केलेला तह बिघडला. खवासखान अधिकारारूढ होतांच कोणालाही मोजीनासा झाला. इतर सरदार त्याची स्पर्धा करूं लागले. ते आपआपला पक्ष सबळ करून परस्परांशीं कलह करूं लागले. हे त्यांचे आपआपसातले वैमनस्य महाराजांस त्याच्या ब्राह्मण कारभाऱ्यांकडून इत्थंभूत कळत असे. तेव्हां त्यांनीं पाहिले कीं, विजापूरकरांच्या राज्यांत पुनः गडबड करण्यास हा समय उत्कृष्ट आहे. मग त्यानी विशाळगडांवर मोठी फौज जमा करून अदिलशाही मुलखात पुनः मोहीम करण्याची तयारी केली. इकडे त्या सरकारचा मुख्य सेनापती अबदुल करीम बहिलोलखान हा मोगलांशी सख्य करून महाराजांशी युद्ध करण्यास सिद्ध झाला.

जमा केलेल्या फौजेपैकीं पंधरा हजार लोक पन्हाळा परत घ्यावयास महाराजांनी पाठविले. त्यांनी त्या किल्ल्यास वेढा घातला असतां हा अबदुलकरीम मोठ्या सैन्यानिशीं त्याच्यावर चालून आला. उभय पक्षांचें घनघोर युद्ध झालें. त्यात खानास पहिल्याने जय आला. तेव्हां तो आपल्या थकलेल्या सेनेस विश्रांती मिळावी म्हणून तिकोट्यास कांहीं वेळ तळ ठोकून राहिला. इतक्यांत महाराजांच्या फौजेस वेळींच कुमक येऊन पावताच त्यांनी पुनः शत्रूवर मोठ्या आवेशाने चाल करून त्याचा पुरा मोड केला.[२] ह्या प्रमाणें पन्हाळा किल्ला हस्तगत झाल्यावर महाराजांनी सातारा किल्ला त्यावरील रखवालदारास लाचेने वश करून घेऊन हाताखाली घातला.[३] (सप्टेंबर स. १६७३)

महाराजांस प्राप्त झालेल्या ह्या विजयाची वार्ता इंग्रज व्यापारांस कळली तेव्हां त्यांचा अध्यक्ष आंगिअर याने ता. १६ सप्टेंबर १६७३ त असे लिहून ठेवले आहे कीं, ''शिवाजी आता आपल्या सगळ्या शत्रूंशी टक्कर देण्यास समर्थ झाला आहे. आता तो त्यांस मुळीच जुमानीत नाही. मोगलांचे सैन्य त्याच्या मुलखात उतरण्याचा संभव आहे आणि दुसरीकडून विजापूरकरांचा सरदार बहिलोलखान त्याच्यावर चालून येईल असेही वाटते; परंतु त्यांस दाणावैरण

१ प्रो. सरकार – यांच्या मृत्यूची तारीख स. १६७२ नोव्हेंबर २४ अशी देतात.

२ मोडककृत इतिहासात ह्या लढाईसंबंधानें असा उल्लेख आहे कीं, महाराजांनी आपले जे लोक लढाई सोडून गेले त्यापैकी काहीं जणांस देहांत शासन दिलें. जेध्यांच्या शकावलींत असा उल्लेख आहे की, अन्नाजी दत्तो याने पन्हाळा किल्ल्यावरील लोकांस वश करून घेऊन तो हस्तगत केला. प्रो. सरकारही असे म्हणतात की, ता.५ मे स. १६७३ रोजी पन्हाळा किल्ल्याच्या रखवालदारास लाच देऊन महाराजांनी किल्ला परत आपल्या स्वाधीन करून घेतला.

३ ही मोहिम प्रतापरावाने केली असे प्रो. सरकार म्हणतात.

मिळण्याची पंचाईत पडून त्यांना फार दिवस नेट धरून त्यांच्याशी लढता यावयाचे नाहीं. विजापूरच्या सरदारांचा असा कांहीं कावा दिसतो कीं, शिवाजीशी नेटाने युद्ध करून त्याचा सफाई नाश करण्यास ते तयार नाहीत.'' महाराज दक्षिणेकडे वळले तेव्हां त्यांच्या पाठीवर जाण्याचे सोडून बहिलोलखानाने कोल्हापुरास तळ दिला. तो अशा निमित्ताने कीं, ते कानडा प्रांतांतून परत येऊ लागले कीं, त्यांस अटकाव करावा. हा विजय प्राप्त झाल्यावर महाराजांनी पुढें कूच करून विजापूरकरांची कित्येक गावे व शहरे लुटीत जाऊन हुबळी शहरावर हल्ला केला.[१] हें शहर त्या काळी मोठे धनाढ्य असून तेथें मोठा व्यापार चाले. नाना देशींचे सावकार ह्या शहरी व्यापारासाठी येऊन राहिले होते. ह्या शहराची लूट त्यांनी बिनहरकत यथेच्छ केली. ह्या लुटीत जेवढे द्रव्य त्यांना मिळाले तेवढे दुसऱ्या कोणत्याही शहराच्या लुटींत मिळाले नव्हतें असे म्हणतात. ह्या शहरात इंग्रज व्यापारी होते त्यांनाही महाराजांनी लुटले. त्यामुळें त्यांचें सात-आठ हजार होनांचे नुकसान झालें, असा त्यांचा लेख आहे.[२] त्या वेळचा मुंबईचा गव्हर्नर आंगिअर याने महाराजांशीं मोठ्या अदबीने वागून त्याचा सलोखा राखला होता. त्यानें त्यांना कधींही नाखूष करण्याचा प्रसंग येऊ दिला नव्हता. हुबळी येथील इंग्रज व्यापाऱ्यांचें झालेलें नुकसान भरून देण्याविषयी त्यानें महाराजांपाशी अनुकूल संधी साधून मागणी केली. त्यास त्यांनी असा जबाब दिला कीं, 'त्या शहरी असलेल्या तुमच्या व्यापाऱ्यांस माझ्या लोकांकडून मुळींच उपद्रव झाला नाहीं व तुम्ही म्हणता तितके त्यांचें नुकसान झालें नाहीं.' ह्या गोष्टीसंबंधानें त्याची खात्री करण्यासाठीं महाराजांनी आपल्या अंमलदारांकडून लुटीच्या याद्या आणविल्या व त्यांवरून त्यास असें दाखवून दिलें कीं, फक्त दोनशे होन किंमतीचा माल इंग्रजांच्या वखारींतून लुटला होता. एवढ्या नुकसानाची व मागें राजापुरास झालेल्या नुकसानीची भरपाई करून देण्यास आपण तयार असून ती सवडीनुसार करून देऊं असें त्यांस महाराजांनी कळविले. हें मित्रभावाचें बोलणे चालले असता महाराजांनी इंग्रजांस राजापूर येथें पुनः वखार घालण्याविषयी आग्रह केला. ही सूचना त्यांस मान्य झाली; परंतु ते आंगिअर याजपाशीं आपले आरमार चांगले सज्ज करण्यासाठीं कांही तोफा मागू लागले. त्या देण्यास तो राजी होईना. कारण त्याला मोगलांची व शिद्दीची भीती होती. हा असा इंग्रजांशी सलोखा राखून त्यांच्या नुकसानीची भरपाई करून देण्यास महाराज तयार झाले याचे कारण अर्थात् असें कीं, त्यांजकडून आपणांस शिद्दीशीं व मोगलांच्या आरमाराशीं झगडताना मदत मिळण्याचा संभव आहे असें त्यांस वाटे. त्यांनी आंगिअर यास असेही सांगून पाठविलें कीं, 'तुमच्याशी सलोख्याचा तह करण्याची आमची इच्छा आहे. तुम्ही शिद्दीला आपला शत्रू समजून त्याचा जंजिरा काबीज करण्यास आम्हांला मदत कराल तर तुमचे सर्व नुकसान आम्ही भरून देऊं!' ही अट त्या गव्हर्नरास मान्य झाली नाहीं. कारण सुरतेस इंग्रजांचा व्यापार उत्तम चालला होता आणि तें शहर मोगलांच्या ताब्यांत असल्यामुळें त्याचें बरेवाईट मोगल बादशहाच्या हाती होतें. यास्तव त्याला यत्किंचितही दुखविणे त्यांस हिताचे न वाटणे साहजिक होते. शिवाजीमहाराजांस इंग्रज मदत करतात असें त्या बादशहाला समजल्यास तो त्यांचा सुरतेहून उठावा करण्यास चुकणार नाहीं हें त्यास पक्के माहीत होतें. शिवाय शिद्दी मोगलांचा अंकित झाला असल्याकारणानें त्याच्याविरुद्ध शिवाजीमहाराजांशीं त्यांनी संगनमत केलें असता तें औरंगजेबाला मुळींच आवडले नसतें. बरें, शिवाजीमहाराजांशी विरोध करून शिद्दीशीं स्नेह करावा तर तिकडूनही त्यास भीतीच होती. कारण महाराजांचा अंमल मुंबई बेटाच्या आसपास सर्वत्र स्थापित झाला असून त्यांच्या मुलखात इंग्रजांचा पुष्कळ व्यापार चालत असे. तेव्हां त्यांचा आपणांवर कोप झाला असता आपणांस मुंबई बेटांत बिलकूल थारा

---

१ प्रो. सरकार पृ. २५५.

२ ह्या शहरात मराठे शिरून लुटालूट करू लागल्याचे वर्तमान मुजफरखान यास कळले तेव्हा तो पाच हजार घोडदळ घेऊन त्याच्या रक्षणासाठी आला. तो येत आहे अशी बातमी कळताच मराठे लुटीचा ऐवज घेऊन तेथून निसटले. त्या घाईत लुटीचा काहीं माल ते रस्त्यात टाकून गेले. ते गेल्यावर दुसऱ्या दिवशी मुजफरखान तेथें येऊन पोचला हा सरदार महाराजांशी मिलाफी झाल्यामुळे त्याने अशी दिरंगाई मुद्दाम केल्याचा वहीम त्याजवर येऊन त्याच्या हाताखालच्या सरदारांनी व लोकांनी त्याला सोडिले. आणि कानडा प्रांताच्या सुभेदारीवरून त्याला विजापूर सरकारने दूर केले असे म्हणतात. प्रो. सरकार पृ. ३१९.

मिळावयाचा नाहीं अशी त्यांना सदोदित धास्ती असे. यास्तव आंगिअर कोणत्याही पक्षास सामील न होता केवळ तिऱ्हाईताप्रमाणें वागे. शिद्दी त्याच्यापाशीं वेळोवेळी साहाय्य मागत असे; परंतु तो त्यास नेहमीं नकार सांगे. शिद्दी मुंबईच्या बंदरांत आपली जहाजे जाऊं देण्याविषयी त्याच्यापाशी परवानगी मागत असे; परंतु तो कोणत्याच पक्षाच्या आरमारास आपल्या बंदरांत येऊ देत नसे. मोगलांची मात्र चार जहाजे आपल्या बंदरांत त्यानें राहू दिली होतीं; पण त्यावरील माणसास जमिनीवर कोणत्याही निमित्तानें उतरण्याची त्याजकडून सक्त मनाई असे. ह्या त्याच्या तिऱ्हाईतपणाबद्दल उभय पक्ष त्याला मोठा मान देत.[१] असो, आतां इंग्रज व महाराज यांच्यामध्ये घडलेल्या ह्यापुढील खटपटींचे निरूपण पुढें एका स्वतंत्र भागांत करूं. येथें आतां पूर्वकथानुषंगानें विजापूरकरांशी त्यांनी ह्या समयी केलेल्या आणखी युद्धप्रसंगांचे वर्णन करूं.

महाराजांच्या मनात असें होतें कीं, सर्व पश्चिमकिनारा आपल्या ताब्यांत निर्वेधपणे यावा. ह्या हेतूच्या सिद्ध्यर्थ त्यांनी आपलें आरमार चांगले सज्ज करून कारवार, अकोला वगैरे शहरांवर पुनः हल्ले करण्यासाठीं तिकडे पाठविलें व आतील प्रांतांतल्या देशमुखांस विजापूरसरकाराविरुद्ध बंड उभारण्याची फूस दिली. ह्या देशमुखांनी आपल्या प्रांतांतील मुसलमान ठाणेदारांस आपआपली ठाणीं सोडून पळून जावयास लावले.

विजापूरकरांशीं आरंभिललेले युद्ध आपणांस निर्वेधपणे व निश्चयानें चालविता यावें ह्यासाठी मोगलांस हुलकावण्या दाखवून कांही दिवस तरी जागच्या जागी स्वस्थ बसावयास लावावे ह्या उद्देशाने त्यांनी खानजहानापाशीं असें सामोपचाराचे बोलणे लावले की, 'आमचे अपराध क्षमा करून आमच्यातर्फे बादशहापाशीं रदबदली करावी व आम्हांस दक्षिणेतील देशमुखी देऊं केली आहे ती देऊन बादशहाने आपल्या पदरी घ्यावे. आमचा मुलगा संभाजी यास जी मनसब देण्याचे ठरविलें आहे ती पुनः द्यावी, म्हणजे इतउत्तर बादशहाच्या सेवेत आम्ही अंतर पडू न देता सर्व काळ इमानाने वागू!' ह्या आशयाचा अर्ज त्या खानाने औरंगजेबाकडे रवाना केला व तो मंजूर करण्याविषयी त्यास आग्रहपूर्वक विनंती केली. ह्यातला वास्तविक प्रकार असा होता कीं, खानजहानानें निरुपाय होऊन महाराजांशी गुप्त रीतीनें सलोखा केला होता. कारण दक्षिणेत आल्यावर त्याला लवकरच असें कळून आलें होतें कीं, महाराजांशी युद्ध करून त्यांस जेरीस आणण्याचे काम मोठे कठीण आहे. शिवाय त्याची फौजही ह्या वेळीं बरीच कमी होत आली होती आणि बादशहा कांहीं नवी फौज पाठविण्यास राजी नव्हता. अशा स्थितींत त्यानें असा पोक्त विचार केला कीं, महाराजांशी विरोध करण्याचें सोडून त्यांच्या तंत्राने वागावे व त्याचा आपल्या मुलखास उपद्रव न होईल तर पाहावे. पुढें महाराज विजापूरसरकारांशीं पुनः युद्ध करण्यात गुंतले असता त्यांच्या मुलखावर ह्या मोगल सरदाराने खरें म्हटलें असता स्वारी करावी; परंतु ती तो न करता जागच्याजागी स्वस्थ राहिला. ह्याबद्दल औरंगजेबाचा आपणांस टपका येईल ह्या भीतीनें त्यानेंच महाराजांस ही अशी शक्कल सुचविली असावी. कसेही असो, पण महाराजांनी विजापूरकरांशी युद्ध चालविले असता मोगलांनी त्यांच्या मुलखास काहीएक उपद्रव केला नाहीं आणि मराठ्यांनीही मोगली अंमलात मुळींच धामधूम केली नाही.

ह्या सुमारास कारवारचा फौजदार मियानसाहेब याने बंड करून आपल्या हाताखालच्या मुसलमान अंमलदारास कैद केलें व जे देशमुख त्याच्या बंडास सामील होईनात त्यांस त्यानें जेर केलें. गोव्याच्या फिरंगी प्रजेला व मालमत्तेलाही तो उपद्रव देऊं लागला. कारवारास इंग्रजांची वखार होती. त्यांजपाशीं तो बंदुका व दारूगोळा मागू लागला. तो ते त्याला देईनात. म्हणून त्याने त्यांची वखार लुटली. असा त्यानें तिकडे पुंडावा मांडला, हे विजापूरसरकारास कळून त्यानें त्याच्या पारिपत्यासाठी आठ हजार लोक रवाना केले. हें वर्तमान महाराजांस कळण्यास विलंब लागला नाहीं. त्यांनी ही संधी साधून त्या सरकारच्या मुलखात उघडपणे स्वारी केली. पुढें मियान राजूच्या ताब्यातली कारवार, अकोला व शिवेश्वर ही ठाणी सर करून त्यास त्यांनी जेर केले. ह्या समयी महाराज तिकडे चाल करून कारवारपासून

१ प्रो. सरकार पृ.३४५,३४७ पाहा.

एका दिवसाच्या टप्प्यावर तळ देऊन राहिले. ते ह्या वेळीं तेथल्या एका उंच टेकडीवर किल्ला बांधण्याच्या विचारात होते असा इंग्रज व्यापारांचा लेख आहे. आणि कारवारच्या फौजदारास त्यांनीच बंड करावयास उत्तेजन दिले होते असे त्यांचे म्हणणें आहे.

परळीचा किल्ला त्या वेळीं विजापूरकरांच्या ताब्यांत होता; तो कांहीं मावळे पाठवून त्यांनी छापा घालून घेतला व त्याजवळील साताऱ्याचा किल्लाही ते छापा घालून सर करण्याच्या बेतांत होते, पण त्या किल्ल्यावरचे लोक मोठ्या बंदोबस्ताने राहिल्यामुळें तो असा सहज हातीं लागेना. तेव्हां महाराजांच्या लोकांनी त्याला वेढा दिला. त्यावर अन्नसामुग्रीचा वगैरे पुरवठा चांगला असल्यामुळें त्यावरच्या लोकांनी तो चारपाच महिने मोठ्या निकराने लढविला, पण शेवटी तो महाराजांच्या हाती आला. यांत त्यांस पुष्कळ लूट मिळाली. ती त्यांनी रायगडावर पाठवून दिली. नंतर चंदनवंदन, पांडवगड, नंदगिरी, ताटोरा वगैरे किल्ले त्यांनी हस्तगत केले. त्याप्रमाणेंच वाई, कऱ्हाड, शिरोळ व कोल्हापूर ही गावे काबीज करून हुकेरी-रायबागपर्यंत आपली सत्ता त्यांनी बसविली. ह्या मोहिमेत त्यांस पुष्कळ लूट मिळाली. ती सगळी घेऊन ते रायगडास आले. मग ते पुनः आपल्या लोकांची तयारी करून वीस हजार पडशा तयार करवीत आहेत अशी वदंता मोगलांस कळली. ही तयारी ते कोणतें तरी शहर तूटण्याच्या इराद्याने करीत आहेत असें त्यांस वाटून त्यांनीं सुरत शहराचा बंदोबस्त उत्तम ठेवला. इकडें विजापूरकरांस असें वाटलें कीं, कारवारच्या बंडखोर फौजदारास मदत करावयास ते चालले आहेत; परंतु तिकडे मोगलांनी आपल्या शहराचा कडेकोट बंदोबस्त केल्याचे कळले तेव्हां विजापूरकरांची ती दहशत अंमळ कमी झाली; परंतु महाराजांनी त्या दोघांसही फसविले. त्यांच्या पंचवीस हजार लोकांनी घाटांतून निरनिराळ्या वाटांनी खालीं उतरून एकवट होऊन अकस्मात् फोंड्याच्या किल्ल्यावर हल्ला केला व ते त्यास वेढा देऊन बसले. गलीम अगदीं नजीक येऊन ठेपला असें पाहून कारवारच्या बंडखोराचे पारिपत्य करावयास आलेली विजापूरकरांची फौज घाबरून गेली व त्याच्याशी लढण्याचे सोडून घाटावर निघून गेली.

हा असा धुमाकूळ महाराजांच्या लोकांनी विजापूरसरकारच्या मुलखात मांडिल्यामुळें खवासखानानें बहिलोलखान[१] ह्यास मोठी फौज बरोबर देऊन त्यांच्यावर पाठविलें. त्यानें एकदम पन्हाळ्याकडे चाल करून जाऊन आसपासचा प्रांत काबीज केला व त्या किल्ल्यास वेढा दिला. हें वर्तमान कानी पडताच महाराजांनी प्रतापराव गुजरास त्याच्यावर पाठविलें; पण पन्हाळ्याच्या किल्लेदारास कुमक करावयास जाऊन शत्रूशी लढत राहिलें असता आपल्या लोकांची विनाकारण खराबी व्हावयाची, ती न होतां पन्हाळ्याचा वेढा तर उठावा, अशी युक्ती त्या वेळीं योजिली पाहिजे असा विचार प्रतापरावाच्या मनात येऊन त्यानें त्या सरदारावर चालून न जातां विजापुराकडे आपल्या फौजेचा रोख फिरविला व तिकडील प्रांत लुटीत लुटीत तो थेट विजापूरशहरापाशीं जाऊन थडकला. गलीम असा आपल्या वेशीपाशीं येऊन भिडला हें पाहून खवासखान घाबरून गेला. प्रतापरावाशी सामना करण्यास पुरेशी फौज शहरात नव्हती. यास्तव बहिलोलखान यास पन्हाळ्याचा वेढा उठवून राजधानीच्या रक्षणासाठी लगोलग परत यावें असा निरोप पाठविणे खवासखानास भाग पडलें. ह्याप्रमाणें तो सरदार परत येत असता त्याला मिरज व विजापूर यांच्या दरम्यान उमराणी येथे गाठून प्रतापरावानें त्याची वाटच बंद केली. त्यानें मुसलमानांच्या फौजेस चोहोंकडून गराडा घालून अगदी जेरीस आणले. तिला दाणा, पाणी, वैरण वगैरे कांही एक मिळेनासे होऊन तिची उपासमार होऊ लागली. छावणी सोडून कोणी मुसलमान अंमळ इकडे तिकडे फिरताना आढळला की, त्यास कापून काढावे, असा क्रम महाराजांच्या लोकांनी चालविला व समोरून तर मोठ्या जोराचा हल्ला करण्याचा धाक घातला. त्यामुळें तो खान अगदीं जिकिरीस येऊन दाती तृण धरून शरण आला व तहाचे बोलणे लावून तेथून बिनहरकत जाऊं देण्याविषयी अजिजी करू लागला, तेव्हां प्रतापरावानें त्याला कांही एक उपद्रव न करता विजापुरास जाऊ दिले. त्यांचा तह कसा काय ठरला होता तें काही कळत नाहीं; परंतु हें प्रतापरावाचें करणें महाराजांस मुळींच पसंत वाटलें नाहीं. त्यांनी त्याला ह्याबद्दल मोठा दोष दिला

१ मराठी बखरींत याचे नाव अबदूल करीम असे दिले आहे. मुळातले नाव प्रो. सरकार यांच्या आधारावरून घेतले आहे.

व तत्प्रदर्शक एक पत्रही त्याला पाठविलें. हें त्या मानी सरदारास सहन न होऊन तो तेथून निघून दूरचे मोहिमेस गेला. ही त्याची मोहीम त्या वेळीं वऱ्हाडप्रांतातील पैनघाटात झाली असें म्हणतात.[१] ही मोहीम ह्या वेळी त्यानें करणें बरोबर नव्हतें. कारण महाराज स्वत: फोंड्यास वेढा घालून तो घेण्याच्या प्रयत्नांत गुंतले होते. यास्तव शत्रूने दुसरीकडून गडबड केल्यास त्याला दाबात ठेवण्यास त्यांना प्रतापरावाचें साहाय्य अवश्य हवें होतें.

ह्याप्रमाणें प्रतापराव महाराजांवर रुसून दूरच्या मोहिमेस निघून गेला असें पाहून बहिलोलखान ह्याने आपल्या फौजेची जमाजम करून व विजापुराकडून आणखी एक कुमक मागवून पन्हाळा किल्ला सर करण्याची खटपट पुनः चालविली आहे असें महाराजांस कळले. हा त्या मुसलमान सरदाराचा बेत हाणून पाडण्याची कामगिरी करण्यास कोणीही सरदार जवळ नाहीं हें पाहून त्यांना अंमळ संकट वाटलें. कारण दक्षिणेत नुकता मिळविलेला मुलूख व आपला जुना मुलूख ह्यामध्ये फोंडे वगैरे जी ठाणी होतीं तीं हस्तगत करून आपला ताबा एकसंधी करण्याविषयीचा जो त्यांचा संकल्प तो तेथून निघून गेल्याने असिद्ध राहतो असें त्यांस वाटलें. इकडे बहिलोलखान मोठ्या सैन्यानिशी पन्हाळ्यापर्यंत तर चालून गेलाच. इतक्यांत प्रतापराव गुजरास तें वर्तमान लागून तो आपल्या घोडदळासह त्या प्रांतांत अतिवेगाने येऊन दाखल झाला व शत्रूवर हल्ला करण्याच्या तयारींत होता, इतक्यांत महाराजांकडून त्याला असा हुकूम आला कीं, 'तुम्ही आपल्या बेकैद वर्तनाने आम्हांस नाखूष केलें आहे. तुम्ही ज्याला तह करून सोडले तोच पुन: फौज घेऊन आमच्या मुलखात शिरला आहे. तेव्हां अशा मनुष्याचा इतबार तुम्ही कोणत्या आधाराने धरला होता? त्याचा त्याच वेळीं नाश केला असता तर त्याच्यापासून आज आम्हांस त्रास झाला नसता. ह्या तुमच्या कृत्याबद्दल आम्ही तुम्हांस दोष लाविला आहे. आतां विजापूरकरांची फौज सफई बुडविल्याखेरीज आमच्या समोर कदापि येऊ नका,' ह्या निरोपामुळें प्रतापरावास पराकाष्ठेचा त्वेष आला. तो शत्रूवर एकदम मोठ्या आवेशाने चालून गेला. शत्रूचे सैन्य फार मोठे होते याचा त्यानें विचारही केला नाहीं. त्याची नेहमींची लढण्याची पद्धत अशी असे कीं, शत्रूसैन्य प्रबळ असलें म्हणजे त्याला आपल्या अंगावर चांगले घेऊन त्याच्यापुढे आपला मोड झाला असें दर्शवून पळून जाण्याचे मिष करावे आणि शत्रूचे सैन्य विस्कळून पाठीस लागलें म्हणजे त्यावर अकस्मात् उलटून एकवट होऊन त्याचा सप्पा उडवून द्यावा. हा गनिमी कावा प्रतापरावानें ह्या वेळीं केला नाहीं व एकदम रागाच्या आवेशांत शत्रूवर हल्ला केला.[२] त्यामुळें मराठ्यांचा मोड होऊन शेकडो लोक रणात पडले. ह्या हातघाईत स्वत: प्रतापराव धारातीर्थी पतन पावला. आपला सेनापती पडला हें पाहून मराठ्यांचे धैर्य सुटून ते पळत सुटले. बहिलोलखान याने त्यांचा पाठलाग करून आणखी पुष्कळ लोकांची कत्तल उडविली. मराठे पळाले ते थेट पन्हाळा किल्ल्याच्या आश्रयास गेले. मागून शत्रू चालून आला त्याच्यावर किल्ल्यावरून तोफांचा भडिमार सुरू झाला. तो इकडे हंसाजी मोहिते म्हणून एक पंचहजारी सरदार आपल्या लोकांनिशीं मागें होता, त्याला प्रतापरावाबरोबर हल्ला करावयास गेलेल्या लोकांची ही अशी धांदल उडालेली कळताच तो तेथें मोठ्या वेगाने धावत आला आणि शत्रूचे लोक पन्हाळ्यापाशीं गर्दी करून होते त्यांच्यावर निकराचा हल्ला करून त्यांचा त्यानें पुरा फडशा उडविला व विजय संपादन केला. ह्याप्रमाणें मुसलमान आपणांस विजय प्राप्त झाला ह्या हर्षाने मराठ्यांच्या पाठीस लागले होते, त्यांचाच उलट मोड होऊन त्यांस सैरावैरा पळण्याची पाळी आली आणि मराठे पूर्वी पळत सुटले होते ते उलटून त्यांच्या पाठीस लागले. त्यांच्या त्या वेगापुढें मुसलमानांचा टिकाव न लागून त्यांच्या हजारो लोकांचा नाश झाला. बहिलोलखान अगदीं नामोहरम व खिन्न होऊन विजापुरास जेमतेम जाऊन पोहोचला. ही जेसरीची लढाई १६७४ सालीं झाली.

---

१ सभासद म्हणतो की, तो भागानगराचा देश, चांदे, देवगड, रामगिरी, बाजेदेश हे लुटींत दूर निघून गेला. प्रो. सरकारही असेच म्हणतात.

२ महाराजांच्या सदरील निरोपामुळे अतिशयित दु:ख होऊन तो अगदी जिवावर उदार झाला आणि त्याचे देहभान सुटून तो सहा घोडेस्वारांनिशी एकदम बहिलोलखानावर चालून गेला असे म्हणतात. सरकार पृ. २५९.

हंसाजी मोहित्यानें ह्या[१] प्रसंगी विलक्षण पराक्रम करून शत्रूवर विजय मिळविला, त्यामुळें महाराजांस मोठा संतोष वाटला. त्यांनी त्याची पुष्कळ तारीफ करून त्याला सरनोबत केलें व 'हंबीरराव' असा किताब दिला. ह्या समरप्रसंगी हंसाजीच्या हाताखाली आणखी दोन मराठे सरदारांनी अतिशयित शौर्याने लढून मोठा वर्णनीय पराक्रम केला होता. त्यांची नावे संताजी घोरपडे व धनाजी जाधव अशीं होतीं. ह्या सरदारांची महाराजांनी पाठ थोपटून त्यांचा बहुमान केला व त्यांस मोठ्या अधिकाराच्या जागा दिल्या. प्रतापराव गुजर केवळ आपल्या टपक्यामुळें रागास चढून असा आवेशाने शत्रूशी लढून समरभूमीवर पडला, हें आपलें मोठेच नुकसान झालें असें महाराजांना वाटलें. असा शूर व पराक्रमी पुरुष आपणांस अंतरला म्हणून त्यांनी पुष्कळ खेद केला. इतकेच करून महाराज राहिलें नाहींत, तर त्यानें आपली सेवा मोठ्या इमानाने व शौर्याने केली तिचे चीज करण्याकरिता त्यांनी त्याच्या नातलगांस व पदरच्या सर्व लोकांस चांगल्या नेमणुका करून दिल्या व त्याच्या एका मुलीशी आपला पुत्र राजाराम ह्याचे लग्न करून त्याच्या कुटुंबास आपलें नातलग केलें.

ह्या हंबीररावाला महाराजांनी अशी आज्ञा केली कीं, शत्रूचा पुरा पराभव केल्यावाचून परत जिवंत येऊ नको! ही अशी निकराची आज्ञा होताच तो आपले घोडदळ घेऊन विजापूरकरांच्या मुलखात शिरून बहिलोलखानाच्या पाठीवर गेला. इकडे बहिलोलखानाचा मराठ्यांनी असा पिच्छा पुरविल्याचे ऐकून मोगल सरदार दिलेरखान आपले सैन्य घेऊन त्याच्या मदतीस आला. तेव्हां ह्या दोघां सरदारांशी टक्कर देऊन आपला निभाव लागणार नाही असा विचार करून हंबीररावाने त्यांस झुकांडी देऊन कानडा प्रांताकडे भरारी मारली. सदरील दोन सरदारांनी त्याचा पाठलाग करण्याचा आव काही वेळ घातला; परंतु तो दिवसाला पंचेचाळीस मैलांची मजल मारीत होता, त्यामुळें त्यांच्या हाती तो लागणे मुळीच शक्य नव्हते. म्हणून ते निराश झाले आणि दिलेरखान परत आपल्या ठाण्यावर गेला आणि बहिलोलखान कोल्हापुरास गेला. हंबीररावानें कानडा प्रांतात शिरून बहिलोलखानाच्या जहागिरीतील पेंच नावाचे शहर लुटले. ह्या लुटीत येथे त्याला दीड लाख होनांचा ऐवज मिळाला असे म्हणतात. ही लूट घेऊन तो परत येत असता त्याला बहिलोलखान व खिजरखान यांनी बंकापुरापाशी गाठले. त्यांची तेथे मोठ्या निकराची लढाई झाली. तींत मुसलमानांचा पुरा पराभव होऊन ते पळून गेले. ह्या लढाईत हंबीररावाला शत्रूकडचे पाचशे घोडे, दोन हत्ती व इतर पुष्कळ युद्धोपयोगी सामान मिळाले. ही लढाई स. १६७४ च्या मार्चमध्ये झाली.[२] ह्या पराभवाबद्दल बहिलोलखानास अतिशय खेद वाटून त्याने पुनः आपल्या मदतीला आणखी लोक घेतले आणि हंबीररावावर हल्ला केला; पण त्याच्याशी लढाई करण्याचे सोडून मिळविलेली लूट हंबीररावाने कशीबशी एकदाची स्वराज्यात पोहोचती केली. तरी मुसलमानांच्या ह्या पाठलागामुळे त्याचे बरेच नुकसान झाले. सदरील लूट सुरक्षित स्थानी पोहोचती केल्यावर त्याने बालेघाटाकडे भरारी मारली. या वेळी त्याने खाणदेश, बागलाण, बऱ्हाणपूर, वऱ्हाड, गुजरात ह्या मोगलांच्या प्रांतांवर मोहीम करून तिकडची शहरे लुटली. मोगलांचे सैन्य त्याच्या पाठीस लागले; परंतु त्याची दौड अशी वेगाची असे कीं, मोगल सैन्यास तो तीस-चाळीस मैल मागे टाकू लागला. त्यामुळे ते निराश होऊन माघारी गेले.

वर सांगितल्याप्रमाणे मराठे विजापूरकरांशी लढण्यात गुंतले असता दिलेरखानाने ही संधी साधून महाराजांच्या कोंकणातील प्रांतात उतरण्याचा प्रयत्न केला; परंतु महाराजांनी निरनिराळ्या घाटांत लोक ठेवून त्याला अडविण्याची तयारी केली होती. त्यांच्या लोकांनी त्याला एके ठिकाणी गाठून त्याचा पुरा मोड केला. ह्या लढाईत त्याचे हजार

---

१ यांचे नाव प्रो. सरकार आनंदराव असे देतात.

२ सभासद म्हणतो की, हंबीरराव मोठे सैन्य घेऊन संपगावावर चालून गेला. त्याच्यावर विजापूरकरांनी हुसेनखान मिआना यास पाच हजार पठाण देऊन पाठविलें. त्यांची तेथे दीड दिवस लढाई झाली. हुसेनखान पराभव पावून पाडाव झाला. विजापूरकरांचे चार हजार घोडे, बारा हत्ती आणि पुष्कळ उंटे हंबीररावाच्या हाती लागली. जेध्यांच्या शकावलीत संपगाव लुटल्याचाच उल्लेख आहे. चिटणीस व दिग्विजयकारही असेच म्हणतात. मुळातला मजकूर प्रो. सरकार यांनी नारायण शेणवी नांवाच्या रायगडावरील वकिलाच्या पत्राच्या आधाराने दिलेल्या माहितीवरून घेतला आहे. (पृ. २६१)

पठाण पडले आणि महाराजांचेही पाचसहाशे लोक मेले. हा असा पराभव झाल्यामुळे तो परत आपल्या ठाण्यावर गेला. पुढें उत्तरेस खैबरी अफगाणांनी बंड केल्यामुळे औरंगजेबास तिकडे लक्ष पुरवावे लागून दक्षिणेतून दिलेरखान वगैरे सरदारांस तिकडे बोलवावे लागले आणि औरंगाबादेच्या ठाण्यावर एकटा बहादूरखान थोड्याशा लोकांनिशी राहिला. ह्यामुळे महाराजांस मोगलांकडून कांही काळपर्यंत तरी उपद्रव होण्याची भीती राहिली नाही. शिवाय विजापूरकरांचीही या वेळी चांगलीच रग जिरली होती; म्हणून ते त्यांच्याशी सामना करावयास पुनः लवकर तयार होतीलसे वाटत नव्हते. ही अनुकूल संधी साधून त्यांनी आपणांस मोठ्या थाटाने राज्याभिषेक करवून घेण्याचा बेत करून तो सिद्धीस नेला. त्याची हकीकत पुढील भागात सविस्तर दिलेली आहे.

महाराजांनी फोंड्यास वेढा घातल्याचें वर सांगितलें आहे. हा वेढा बरेच दिवस घालून ते तेथें नेट धरून राहिले; परंतु कांहीं केल्या किल्ला हातीं लागेना. तेव्हा एवढ्याशा एका किल्ल्यापाशी आपली फौज अडवून ठेवावी हें ठीक न वाटून त्यांनी तो वेढा उठविला व तो उठविते वेळीं त्या किल्ल्याच्या सुभेदाराकडून असा करार करून घेतला कीं, विजापूरसरकाराचें सैन्य घाटातून खाली उतरू न देण्यासाठी आपले कांही लोक तिकडे ठेवूं, त्यांस त्यानें काहीएक हरकत करूं नये. हा करार पाळल्यास आपण त्याच्या किल्ल्यास किंवा त्याच्या ताब्यातील प्रांतास मुळींच उपद्रव करणार नाही. ह्या किल्ल्यास महाराजांनी वेढा घातला, तेव्हां सुरत येथील फ्रेंच लोकांपासून पुष्कळ दारूगोळा व ऐंशी तोफा विकत घेऊन ही युद्धसामुग्री राजापुरास नेऊन ठेवली होती, असें म्हणतात. ह्या मोहिमेत महाराजांनी राजापुरापासून बारदेशापर्यंत सगळा किनारा आपल्या ताब्यांत घेतला व तिकडील बंदोबस्त करण्याकरिता कांही लोक ठेवून ते रायगडास परत आले. ह्या वर्षी घाटावर अवर्षण होऊन लष्कराला दाणावैरण व पाणी मिळण्याची पंचाईत पडूं लागली. म्हणून महाराजांनी आपलें घोडदळ चिपळुणास आणून ठेवले.

वर सांगितल्याप्रमाणें महाराज फोंड्याच्या किल्ल्यास वेढा घालून तिकडे गुंतून राहिले असतां इकडे मोगलांच्या व शिद्दीच्या आरमाराने जूट करून त्यांच्या कोंकणकिनाऱ्यास पुनः उपद्रव देण्यास सुरुवात केली. महाराजांच्या व त्यांच्या आरमाराच्या पुष्कळ झटापटी झाल्या, परंतु त्यांत महाराजांच्या आरमारास फारसे यश आलें नाहीं. त्यांची पुष्कळ जहाजे शत्रूंनी पकडून नेली. ही मोगलांची व शिद्दीची एकवट झालेली आरमारें इंग्रजांच्या परवानगीची दरकार न करता मुंबईच्या बंदरात शिरली व त्याच्या लोकांनी महाराजांच्या ताब्यातील कुर्ला प्रांतात उतरून पुष्कळ गांव लुटून उद्ध्वस्त करून टाकिले. त्यांनी पुष्कळ प्रजेची कत्तल केली व पुरुष, बायका व मुले पकडून त्यांस गुलाम म्हणून विकले. हें त्यांचें करणें मुंबईचा इंग्रज गव्हर्नर आंगिअर यास मुळींच आवडले नाहीं. त्याने त्यांच्या वरिष्ठांपाशीं त्याबद्दल तक्रार केली व तो म्हणाला कीं, तुमच्या अशा कृत्याने शिवाजीमहाराज आपणांवर नाहक आग पाखडतील; परंतु ह्या त्याच्या तक्रारीचा काहीएक उपयोग झाला नाहीं. शिद्दी त्याच्या हाकाटीकडे मुळींच लक्ष न पुरविता आपली जहाजे मुंबई बंदरांत नांगरून ठेवून कुर्ला प्रांतावर एकसारखे हल्ले करीत राहिला. त्याच्या पारिपत्यास रायगडाहून तीन हजार लोक रवाना झाले. त्यांनी शिद्दीच्या लोकांशी संग्राम करून त्यांचा पराभव केला व त्यास पिटाळून लावले. हा असा मराठ्यांकडून सज्जड मार त्यास मिळून त्याचे पुष्कळ लोक प्राणास मुकले. तेव्हां त्यानें आपली जहाजे गलीम जाळून टाकतील ह्या भीतीनें मुंबईच्या बंदरातून काढून नेली. स. १६७४ च्या मार्च महिन्यात शिद्दी संबळ याने महाराजांचे आरमार सातवलीच्या खाडीत असता त्यावर हल्ला केला. महाराजांच्या आरमारावर दौलतखान मुख्य होता. उभय आरमारांची मोठी निकराची लढाई झाली. तींत शिद्दी संबळ व दौलतखान या दोघांसही मोठमोठ्या जखमा झाल्या; पण शेवटी महाराजांचे आरमार विजयी होऊन शत्रूच्या आरमाराला पळ काढावा लागला. पुढें कारवाराकडून परत आल्यावर महाराजांनी असा निश्चय केला कीं, कितीही लोक खर्ची पडले व केवढाही खर्च झाला तरी शिद्दीची दंडाराजपुरी काबीज करून त्याची पुरी खोड मोडावयाची ह्या उद्देशाने ते तिकडे दारुगोळा, तोफा व फौज स. १६७४ च्या मे महिन्याच्या सुमारास एकसारखी पाठवीत राहिले.

***

भाग तेविसावा

राज्याभिषेक
(१६७४)

हंबीरराव मोहित्यानें बहिलोलखान याचा पराभव केला. त्यात विजापूरसरकारची पुष्कळ सेना गारद झाली. त्यामुळें त्यास शिवाजीमहाराजांशी लढण्यास पुरेशी फौज पुनः जमविण्याचे त्राण राहिले नाहीं व दुसरा कोणीही सरदार मराठ्यांवर स्वारी करण्यास तयार होईना. अशा स्थितीमध्ये त्या सरकारचा मुख्य वजीर खवासखान यानें असा विचार केला कीं, तूर्त महाराजाच्या वाटेस जाऊ नये; पुढें चांगली तयारी करून त्यांच्यावर स्वारी करावी. हें वर्तमान महाराजांस कळून ते त्या सरकाराविषयी अंमळ निर्धास्त झाले आता औरंगाबाद येथील मोगलसुभेदारास तर त्यांनी पूर्वोक्त प्रकारे पुरा भारून टाकला होता. तोही आपला सुभा संभाळून स्वस्थ होता. आपल्या मुलखावर मराठ्यांनी स्वाऱ्याशिकाऱ्या करण्याचें सोडून दिलें एवढेच मिळविल्यानें तो आपणांस कृतकृत्य समजून महाराजाच्या तंत्राने वागू लागला. बरें, औरंगजेबाने तरी कांही हालचाल करावी, तर तो उत्तरेस कांही गडबडी चालल्या होत्या त्यांचा बंदोबस्त करण्यात गुंतला होता. शिवाय त्याला आता महाराजांची अंमळ दहशतही वाटूं लागली असावी असें मानण्यास हरकत नाहीं. तो जात्या मानी असल्यामुळें महाराजांचे पारिपत्य करण्यास दक्षिणेत स्वतः स्वारी करावी तर तीत आपणांस यश आल्यास बरें, आणि जरकरिता आपला पराभव झाला तर त्यासारखी दुसरी फजिती नाहीं, असें त्यास वाटे. त्याच्या मनांत आणखी हाही विचार येई कीं, आपण शिवाजीमहाराजांशी अनेक वेळा विश्वासघाताचे वर्तन केले आहे, यास्तव दक्षिणेत आपण त्यांच्या तावडींत सापडल्यावर ते मागील अपकारांबद्दल केव्हा कसा वचपा घेतील याचा नेम नाही. दुसरें असें कीं, महाराजांच्या पदरच्या एकाहून एक शूर व इमानी सरदारांचे पराक्रम त्याच्या कानी जाऊन तो थक्क होत असे. आणि अशा सरदारांपुढें आपल्या रडतराव घोड्यावर बसणाऱ्या सेनापतींचा कसला निभाव लागतो, असें त्यास आतां वाटूं लागलें होतें. बरें, भागानगरकर व विजापूरकर त्याला मदत करून शिवाजीमहाराजांस जेर करण्यास उद्युक्त होतील म्हणावे तर त्यांचीही आशा नव्हती. कारण त्या पादशाहती बुडविण्याचा संकल्प मोगल बादशहाचा झाला असून त्याचा रोख त्यांवर नेहमीं असे. औरंगजेबाने तर ह्या दोन्ही सरकारांस पुष्कळच घाबरवून सोडले होते. तेव्हा अर्थात् हे मुसलमान लोक मोगलास नेहमी पाण्यात पाहात. ह्या दोन्ही पादशाहतींची सत्ता शिवाजीमहाराज हळूहळू कमी करीत चालले आहेत, ही गोष्ट आपणांस अनुकूल अशीच घडत आहे असें औरंगजेबाला वाटे. कारण त्याचा बेत असा होता कीं, योग्य संधी प्राप्त होताच दक्षिणेवर मोठ्या सैन्यानिशीं स्वारी करून पहिल्याने ह्या कमजोर झालेल्या पादशाहती बुडवाव्या आणि मग मराठ्यांची खबर घ्यावी. असा त्याचा निर्धार झाल्यामुळे त्यानें ह्या वेळी दक्षिणेतील आपल्या सुभेदारास महाराजांशी कोणत्याही प्रकारचा विरोध करण्याची निकड लावली नाहीं किंवा कुमक पाठविली नाहीं. मागें त्या सुभेदारानें महाराजांचा एक अर्ज त्याच्याकडे पाठविला होता, त्याचाही विचार करण्याचें त्यानें लांबणीवर टाकले. खरें म्हटले असतां हा अर्ज निव्वळ लबाडीचा होता हें त्या धूर्त बादशहास तेव्हाच कळून आलें होतें. असो, तर अशी ही मोगल बादशहाच्या मनाची स्थिती झाली असल्याकारणानें तो महाराजांविषयी अंमळ बेफिकीरच राहिला होता. शिवाय महाराजांनीही अलीकडे त्याच्या मुलखात स्वाऱ्या करण्याचे सोडून दिलें होतें.

त्यामुळें त्यास राग येण्यासारखे काही कारण ह्या वेळा तरी निदान उपस्थित झालें नव्हतें. कोणीकडूनही पाहता मोगल ह्या वेळी स्वस्थ बसले आहेत अशी महाराजांची खात्री होऊन चुकली होती. आता भागानगरच्या कुतुबशहाकडून आपणांस कांही भय आहे असें महाराजांस मुळींच वाटत नव्हतें. त्या सरकार कडून त्यांस वार्षिक खंडणी नियमानें येत असून तेथला मुख्य प्रधान मादण्णा हा त्यांस सर्व प्रकारे अनुकूल होता.

ह्याप्रमाणें सर्व यवन पादशहांस जागच्या जागी तटस्थ केल्यावर महाराजांनीं स्वतःस राज्याभिषेक करवून घेण्याचा विचार मनात आणला. शहाजीराजे मृत्यु पावल्यापासून महाराज आपणांस राजा तर म्हणवीत असतच. त्याप्रमाणेंच ते आपल्या नावाचे नाणेही पाडू लागले होते. महाराजांस ह्या वेळी असें वाटू लागले की, शास्त्र विधीप्रमाणें राज्याभिषेक होऊन छत्रसिंहासनादी राजचिन्हे धारण केल्यावाचून आपल्याविषयी लोकांच्या मनात पूज्य भाव उत्पन्न व्हावयाचा नाहीं. शत्रू आपणांस नेहमी पुंडपाळेगारांतच लेखतील, इतर राजे व पादशहा आपणांस द्यावा तसा मान देणार नाहींत व आपल्याशी ते जे करारमदार व तह करतील ते ते आपला धाक आहे तोपर्यंत फार तर पाळतील. आपण केवळ बंडखोर आहे असें त्यांस वाटून अनुकूल संधी येतांच ते मोडण्यास ते प्रवृत्त होतील; यांत कांहीं राजनीतीचा भंग झाला असें त्यास वाटणार नाही. तसेच जे कांही परस्थ लोक ह्या देशांत येऊन राहिले आहेत ते सुद्धा आपणांस केवळ लुटारू समजून आपला तिरस्कार करतील; शिवाय जे मराठे सरदार अद्यापि यवन पादशहांच्या आश्रयाने आहेत किंवा स्वतंत्रपणें पुंडावा करीत आहेत त्याच्या मनात आपणाविषयी मान्यताबुद्धी उत्पन्न व्हावयाची नाहीं व आपल्या सत्तेचा कांही स्थायिकपणा नाहीं असें समजून ते आपणांस आपल्यासारखाच एक पुंडावा करणारा बडा सरदार आहे असें मानून आपल्या पक्षास येऊन मिळणार नाहीं. इतकेंच नव्हे तर, खुद्द आपले प्रजाजन आपल्या सत्तेला योग्य मान देऊन आपल्याशी राजनिष्ठेने वर्तण्यास सहसा तयार होणार नाहींत आणि आपण त्यांस दिलेले कौल व लावलेली शिस्त ते योग्यप्रकारे मानण्यास प्रवृत्त होणार नाहींत. आपण अजून मोगलाचे किंवा मुसलमानांचे प्रजाजन आहो, आपला असा कोणी राजा नाहीं ही समजूत हिंदू जणांच्या ठायी कायम राहणार व ते आपल्या सत्तेविषयीं बेदरकार राहणार आणि महाराष्ट्रराज्य संस्थापना करून व सर्व मराठ्यांस एकवट करून त्यास स्वराज्य आणि स्वातंत्र्य यांची किंमत व गोडी लावून देण्याचा जो आपला आज तीस वर्षांचा सत्संकल्प त्यास यावे तसें यश येणार नाही, हे विचार त्यांच्या मनात नेहमी घोळत असत.

सतत तीस वर्षे स्वराज्यस्थापनेची जिवापाड खटपट करून तींत असें उत्तम यश संपादून व सभोवतालच्या यवनपादशाहतींस सर्व प्रकारे कमजोर करून त्यांजवर त्यानी आपलें तेज पाडलें व छाप बसविली. असें असता स्वतःस राजचिन्हांनी शास्त्ररित्या मंडित करण्याचा विचार अद्यापि त्याच्या मनात आला नव्हता याचेच एखाद्यास नवल वाटण्यासारखे होतें; परंतु शहाजीराजे जीवंत होते तोपर्यंत ही गोष्ट महाराजांना मुळीं करणेंच नव्हती आणि ते महाराष्ट्रांत आले तेव्हां इकडेच राहिले असते तर त्यांच्याच हाती सर्व राज्यकारभार त्यांनी दिला असता व त्यांच्या नांवानें गादी स्थापिली असती. पुढें ते मरण पावल्यानंतरची दहा वर्षे मोगलाशी व मुसलमानांशी रणसंग्राम करण्यात नेहमी जय्यत ठेवाव्या लागणाऱ्या प्रचंड सैन्याच्या खर्चासाठी व काबीज केलेल्या शेकडो किल्ल्यांच्या डागडुजीकडे व व्यवस्थेकडे होणाऱ्या उदंड खर्चासाठी साधेल तिकडून द्रव्य मिळविण्याच्या उद्योगांत कशी अगदीं गुंतून गेली होतीं हें येथवर वाचलेंच आहे. यास्तव यथाशास्त्र सिंहासनारूढ होण्याची ही कल्पना त्यांच्या मनांत पुनःपुनः आली असूनही ती त्यांना हा काळपावेतो स्वास्थ्याभावास्तव असिद्धच ठेवावी लागली होती, परंतु आरंभी निर्दिष्ट केल्याप्रमाणें त्यांस अंमळ स्वस्थता व निर्भयता प्राप्त होतांच त्यानी हा स्तुत्य उद्देश सिद्धीस नेण्याचे मनात आणले.

हा उद्देश त्वरित सिद्धीस नेण्यास आणखी एका गोष्टीमुळे कारण झालें. एके समयी महाराजांच्या वाड्यांत एक प्रयोजन झालें. त्यानिमित्त सर्व मानकरी व सरदार यांस आमंत्रणे केली. भोजनसमारंभाची व्यवस्था होऊन कारभारी मंडळींनी सदरेस मोठा चौरंग ठेवून त्यावर गादी घातली. हें उंच आसन त्यांनी अर्थात् महाराजांसाठीं केलें व दुतर्फा

वरकड मंडळींनी बसावे अशी व्यवस्था केली. समारंभास आलेल्या मडळींत मोहिते, महाडिक, शिरके, निंबाळकर, घाडगे, जाधव आदिकरून मराठे सरदार होते. महाराजांसाठी असें उंच आसन केलेले पाहून त्यास विषाद वाटला व ते म्हणू लागले कीं, 'शिवाजीमहाराजांकडे आता थोरपणा आला काय? आम्ही कदीम, तालेवार सरदार, आम्ही मोरचेलाचे अधिकारी. ह्यांच्या वडिलांस हा अधिकार कधींही प्राप्त झाला नव्हता. असें असतां आमची मानखंडणा करून हे उच्च स्थानीं बसणार व आम्ही त्यांच्याजवळ खालीं बसणार, हें आम्हांस कमीपणा आणणारे आहे. अशी अमर्यादा करून घेण्यापेक्षा ह्या सदरेस आम्ही बसूच नये हें उत्तम!' असें बोलून ते उठून चालले. तेव्हां कारभाऱ्यांनीं त्यांची समजूत करून त्यांस असे सांगितलें कीं, 'ह्या प्रकरणी तुम्ही महाराजांपाशी प्रत्यक्ष बोला. ह्यासमयी त्यांचा रोष होईल असें करू नका!' महाराजांच्या कानी हा गवगवा गेला तेव्हां त्यांस मोठा विचार पडला. मग त्यांनी त्यांतल्या कांही सामान्य दरजांच्या मराठे सरदारांस एकांती आणून त्यांची त्या सदरेस भोजनास बसण्याविषयी मान्यता घेतली. नंतर घोरपडे, निंबाळकर वगैरे कांही बड्या मानाच्या सरदारांस एकांती बोलावून, तुमची हरकत कोणती आहे असें त्यांस त्यांनी विचारले. त्यावर त्या मानी सरदारानी असा जबाब दिला कीं, 'आम्ही यवनपादशहांचे पुरातन नोकर, चारपाचशे वर्षांचे जुने सरदार. आम्हांला ही अमर्यादा सहन होणार नाहीं! तरी याचा विचार तुम्हीच पाहावा!' हा त्याचा जबाब ऐकून महाराजांनी त्यास म्हटलें कीं, 'ज्यास आपल्या प्रतिष्ठितपणाचा एवढा अभिमान वाटत असेल त्यांनी आमच्या कचेरीस येऊ नये. कारण पडेल त्या वेळी त्यास बोलावून आणू उगाच बखेडा माजविण्याचें कारण नाहीं. ज्यास ही व्यवस्था रुचत नाहीं त्यांनी ह्या समयी येथून निघून जावे!' असें म्हणून बखेडेखोर मंडळीस निरोपाचे विडे देऊन कचेरी बरखास्त केली. ह्यावरून महाराजांच्या लक्षांत हें येऊन चुकले कीं, आपल्या पदरच्या मराठे सरदारांसही आपल्याविषयी विशेष मान्यताबुद्धी नाहीं, याचे कारण आपण अभिषिक्त सत्ताधीश नाहीं हें होय.

ह्याप्रमाणें स्वराज्याभिषेक करून घेण्याचा निर्धार करून त्या विचारांत गुंग होऊन महाराज निद्रिस्त झाले असतां भवानी स्वप्नात येऊन त्यांस म्हणाली कीं, 'तूं स्वधर्मरक्षणार्थ इतका उद्योग केलास त्यापेक्षां तूं सिंहासनाधीश होण्यास योग्य आहेस. तुझा हा हेतु माझ्या प्रसादाने पूर्ण होईल!' असें देवीकडून आश्वासन मिळाल्यावर त्यांनी आपल्या प्रिय मातुश्रीकडे ही गोष्टी पहिल्याने काढली. तिला हा त्यांचा हेतु पसंत पडला. मग रामदासस्वामींकडे कारकून पाठवून त्यांस हा उद्देश कळविला. त्यांनीही महाराजांस आपली संमती दिली. त्याचप्रमाणें चिंचवडचे देव वगैरे जे साधुसंत स्वराज्यात होते त्यांचेही अनुमत त्यांनी कारकून पाठवून घेतलें. नंतर त्यांनी स्वराज्यातील मोठमोठे पंडित, विद्वान व प्रतिष्ठित ब्राह्मण यांस पालख्या-मेणे पाठवून मोठ्या सन्मानाने आणले, मुख्यमुख्य सर्व कारभारी व सरदार यांस जमा केले व आपले इष्टमित्र व सुहृत्संबंधी यांस बोलावून आणले. ह्या सर्वांची सभा करून त्यांस हें आपलें मनोगत कळविले व त्यांचा त्याबद्दल सल्ला विचारला. तेव्हा ह्या गोष्टीचा त्यांस मोठा आनंद वाटून सर्वानुमते असें ठरलें कीं, त्यांनी राजोचित छत्रसिंहासनादि चिन्हे यथासांग शास्त्ररित्या धारण करावी.

मग हा राज्याभिषेकविधी सशास्त्र करावयाचा असल्यास कोणकोणत्या गोष्टींची अनुकूलता व सिद्धता पाहिजे या संबंधाने शिष्ट जनांचे मत घेता, महाराजांस असें समजले कीं, व्रतबंध ज्याचा झाला आहे त्यालाच राज्याभिषेकविधी शास्त्रानुसार करता येतो. महाराजांचा हा व्रतबंध झाला नसल्यामुळें त्यांची पंडितजनमतें शूद्रांत गणना होत असे. म्हणून त्यांचा हा हेतू सिद्धीस जाणें कठीण आहे असें महाराष्ट्रातील पंडित म्हणूं लागले. महाराज ह्या वेळी सेहेचाळीस वर्षांचे असून त्यांचे अनेक विवाह होऊन त्यास संततीही झाली होती. अशा वयातीत पुरुषाचा व्रतबंध शास्त्रोक्त प्रकारे होणें शक्य नाहीं असा त्या पंडितांचा अभिप्राय पडला. ह्या पंडिताच्या मतामुळे हा एक नवीनच प्रत्यवाय उपस्थित झाला. त्यांतून कसें पार पडावे हा विचार महाराजांस प्राप्त झाला.

ह्या समयी महाराजांच्या पदरी असलेल्या एका अत्यंत हुशार, प्रामाणिक व स्वामिनिष्ठ सेवकाने त्यांस ह्या पेचातून सुटण्याची मसलत दिली. हा सेवक कोण म्हणाल तर बाळाजी आवजी चिटणीस हा होय. त्यानें महाराजांस

अशी विनंती केली कीं, महाराष्ट्रातील पंडितांच्या ह्या अभिप्रायानें महाराजांनी निरुत्साह होऊं नये. स्वामींनी आजपर्यंत जे जे दुर्घट मनोरथ चित्ती आणले ते सगळे ईशकृपेनें सिद्धीस गेले. तेव्हा हाच मनोरथ तेवढा कां असिद्ध राहावा? काशीक्षेत्रांत गागाभट्ट[१] म्हणून एक महापंडित आहे. तो चार वेद, सहा शास्त्रे व स्मृत्यादी ग्रंथ यांचें सांगोपांग अध्ययन करून मोठा लौकिक पावला आहे. त्यानें सांगितलेले शास्त्रार्थ इतर स्थलींच्या मोठमोठ्या पडितांस शिरसावंद्य होतात असा त्याचा महान अधिकार आहे. त्यास ह्या प्रकरणी शास्त्रार्थ विचारावा हें युक्त दिसते हल्ली हा पंडित पैठणास आला आहे. तरी त्याला व पैठणच्या इतर महापंडितांना स्वामींनी बोलावून आणावे. स्वामींची उज्वल कीर्ती त्यास विश्रुत आहेच. यास्तव तो आपल्या निमंत्रणास नकार सांगणार नाही!' ही तोड ऐकून महाराजांस मोठे समाधान वाटलें व इतर कारभाऱ्यांसही ती योग्य वाटली. मग त्या पंडितांस बोलावून आणण्याची कामगिरी बाळाजी आवजीस सांगून केशव पंडित, भालचंद्र भट्ट पुरोहित व सोमनाथ कात्रे यास त्याच्याबरोबर दिली गागाभट्टास व पैठणच्या महापंडितांस आणण्यासाठी त्यांच्याबरोबर पालख्या-मेणे वगैरे इतमाम व दहा हजार रुपये खर्चासाठी म्हणून दिलें.[२]

बाळाजी आवजी पैठणास जाऊन गागाभट्टास भेटला व त्यास महाराजांचा हेतू कळवून तेथल्या इतर पंडिताची सभा त्यानें भरविली आणि तीपुढें हा प्रश्न विचारला. ह्या सभेत पंडितांचा कांही वेळ वादविवाद होऊन शेवटीं सर्वाची अशी एकवाक्यता झाली कीं, जयपूर, उदेपूर वगैरे ठिकाणी रजपूतराजांस जसा राज्याभिषेक होतो तद्वत् तो शिवाजीमहाराजांसही होण्यास काही प्रत्यवाय नसावा. ह्याप्रमाणें त्या पंडितांची अनुकूलता झाल्यावर त्यास बाळाजी आवजीने रायगडावर आणले. हे पंडित येत आहेत असें कळताच महाराजांनी त्यांस मोठ्या आदराने सामोरे जाऊन गडावर वाजतगाजत मोठ्या थाटाने आणले. त्याचा त्यांनी बहुमान करून त्यांस राहावयास उत्तम स्थळ नेमून दिले, व त्याची बरदास्त उत्कृष्ट प्रकारे ठेवली.

मग महाराजांनी आपल्या पदरचे कारभारी व पंडित आणि इतर शिष्टजन यांची सभा पुनरपि भरवून तिला गागाभट्ट व पैठणचे पंडित यांस आणले आणि आपल्या राज्याभिषेकाच्या युक्तायुक्ततेविषयीचा प्रश्न त्या सभेला पुनः केला. त्या संबंधाने पंडितजनात भवति न भवति होऊन अखेरीस गागाभट्टानें असा निर्णय दिला की, 'शिवाजीमहाराज शिसोदेराजवंशात उत्पन्न झाले असून मूळचे क्षत्रिय आहेत. त्यांचे पूर्वज नर्मदानदीच्या अलीकडे येऊन आपणांस मराठे म्हणवू लागले व व्रतबंधादि कित्येक संस्कारांस त्यांनी फाटा दिला तरी त्यांचें क्षत्रियत्व कांहीं नष्ट होत नाहीं. उदेपूर, जयपूर इत्यादी

---

१ याचे खरे नाव विश्वेश्वरभट्ट असे असून त्याच्या बापाने त्याचे गागा असे लाडके नाव ठेवले होते. याच नावाने तो पुढें प्रसिद्धी पावला. याचे घराणे मूळचे पैठणचे असून तेथे त्याचे पूर्वज विद्यापीठ स्थापित करून त्यात वेदशास्त्रादिकांचे पठण ते विद्यार्थ्यांकडून करवित. त्याच्या पूर्वजांनी अनेक टीकात्मक आणि स्वतंत्र शास्त्र ग्रंथ रचून पैठणास व काशीस पंडीत मंडळात अग्रणित्व संपादिले होते. त्याचा रामेश्वरभट्ट नावाचा विख्यात पूर्वज काशीस जाऊन राहिला. गागाभट्टही आपल्या पूर्वज परंपरेप्रमाणे विद्याप्रवीण झाला असून न्याय, अलंकार व वेदांत ह्या विषयात त्याची पारंगतता विशेषच होती. त्याने अनेक ग्रंथ लिहिले. त्यात जैमिनी सूत्रावरील त्याची टिका, न्यायशास्त्रावरील त्याचा भट्टचिंतामणी नावाचा ग्रंथ व कायस्थधर्मप्रदीप हे प्रसिद्ध आहेत.

२ सभासद व चित्रगुप्त असें म्हणतात की, गागाभट्टास कोणी बोलावयास गेलें नव्हतें; तर तो आपण होऊनच महाराजांची कीर्ती ऐकून त्याच्या भेटीस आला. त्या वेळीं त्याचा त्यांनी यथायोग्य आदरसत्कार केल्यावरून तो पंडित खूष झाला आणि महाराजांची पुष्कळ स्तुती करून येणेंप्रमाणें बोलला : 'ह्या कलियुगी क्षात्रधर्म अगदी बुडाला. संपूर्ण पृथ्वी यवनमय होऊन यवन सिंहासनारूढ झाले. सूर्यवंश व चंद्रवंश यात त्राण उरले नाहीं. यजनयाजन बंद पडलें. सर्वत्र अनाचार माजला ब्राह्मणधर्म अगदी लोपला. महाक्षेत्रे कुंठित झाली. तुम्ही स्वपराक्रमानें दक्षिणेतल्या पादशहास हतवीर्य केलें, दिल्लीच्या औरंगजेब बादशहास ठायीं बसविले, त्याचे मोठमोठे सुभेदार चालून आले त्यांचा पराभव केला. एवढे राज्य तुम्ही संपादिलें. लक्ष घोडा व तीनशेंसाठ किल्लेतुमच्या ताब्यात असून धनसंपदाही बहुत आहे. असें असता तुम्हास तख्त नाहीं. यास्तव तुम्हांस सिंहासनारूढ करून सर्व राज्याधिपतींकडून छत्रपती म्हणवावें ही इच्छा माझ्या व इतर हिंदूंच्या मनांत उत्पन्न झाली आहे. राजा सिंहासनारूढ झाल्याविना त्यास जगीं भूषण नाहीं. तुम्ही सिंहासनस्थ झाल्याने औरंगजेबादी यवनपादशहांच्या नाकास चुना लावल्यासारखे होईल. हा आमचा हेतू तुम्ही पूर्ण करावा! ह्या त्याच्या भाषणाने महाराजांच्या मनात ती गोष्ट भरली.

ठिकाणी जसे रजपूतराजांचे व्रतबंध होऊन मग राज्याभिषेक होतात, तसा महाराजांचा व्हावयास कोणत्याही प्रकारचा प्रत्यवाय नाहीं. यास शास्त्र किंवा रूढी मुळींच आड येणार नाहीं. यांच्या उदेपूर येथील कुलांत जर अद्यापि छत्रसिंहासनाचा अधिकार चालू आहे, तर मग यांसच तेवढा प्रतिरोध कां असावा, हें समजत नाहीं. आता महाराजांचे वय मोठे झालें असून त्याचे अनेक विवाह होऊन पुत्रसंततिही झाली आहे, तेव्हा त्यांचा व्रतबंध व्हावा कसा? असा जो प्रश्न आहे त्याचें समाधान एवढेच आहे की, ह्या प्रसंगी आपद्धर्माचा अवलंब करून व्रतबंध हा राज्याभिषेकविधींचें एक अंग आहे म्हणून समजावे व तो मुख्य विधीच्या अनुषंगाने बेलाशक करावा!' हा गागाभट्टाचा निर्णय पैठणच्या व महाराष्ट्रातील पंडितांस मान्य होऊन, व्रतबंध करून राज्याभिषेक करावा असें सर्वानुमतें ठरलें.

महाराजांस आपल्या इच्छेप्रमाणें शास्त्र निर्णय मिळाल्यानें बहुत संतोष झाला. मग गागाभट्टादी पंडितांनी जे जे साहित्य ह्या विधिप्रीत्यर्थ जमवावयास सांगितलें तें विलंब न लावता महाराजांनी जमविले. महानद्यांची पुण्योदकें, समुद्रोदके, सुलक्षणी अश्व व गज, व्याघ्रचर्मे, मृगचर्मे इत्यादी आणवली. सिंहासन, पीठ, सुवर्णादिकांचे कलश व इतर पात्रे तयार करविली. मोठमोठ्या विद्वान ज्योतिषांस सशास्त्र सुमुहूर्त पाहावयास सांगितलें. त्यांच्या अनुमतानें ज्येष्ठ शुद्ध त्रयोदशी (आनंदनाम संवत्सर) सिद्ध केली.

मग संपूर्ण क्षेत्रांतील व इतर स्थळींचे प्रतिष्ठित व विद्वान ब्राह्मण, एकंदर मांडलिक व इतर राजे, सर्व सुहृत्संबंधी, स्वराज्यांतील सगळे मातबर लोक व सेवकजन यांस आमंत्रणपत्रे पाठविलीं. जेथे सिंहासन स्थापावयाचें तें राजधानीचे स्थल पुण्यभूमी असून त्याच्या आसमंतात्भागीं पुण्यक्षेत्रे व महानदी असावी. तेथें विपुल उदक असून पुष्करिण्यादी कृत्रिम जलाशय अनेक असावे, त्याच्या सभोवतालील प्रदेशांत नाना तऱ्हांची धान्ये उत्पन्न होत असावी. तें स्थल शत्रूस दुःसाध्य असावें. असें शिष्टजनांनी सुचविल्यावरून रायगड किल्ला ह्यापैकी बहुतेक लक्षणानी युक्त असून, शत्रूस दुःसाध्य असे स्थल स्वराज्यात दुसरें कोणतेंही नाहीं असें ठरलें व ह्या गडावर राज्याभिषेकसमारंभ करण्याचा निश्चय झाला.

महाराजांनी ह्या गडावर आपणांस राहावयासाठी उत्तम वाडा बांधला होता. त्याप्रमाणेंच अठरा कारखान्यांची स्थलें व प्रधान, सरकारकून वगैरे अधिकाऱ्यांस राहावयासाठीं घरे बांधली होतीं. सिंहासनासाठी सभागृह करविले होतें.[१] ते एवढे मोठे होतें कीं, त्यात हजारो माणसांचा समावेश व्हावा. त्याची रचना अशी चांगली केली होती कीं, आत बसणारास शीतोष्ण बाधा सहसा होऊं नये. ह्या सर्व व्यवस्थेवरून असें स्पष्ट दिसते कीं, ह्याच गडावर आपली गादी स्थापण्याचा महाराजांचा इरादा मुळापासूनच होता. त्यास पंडितजनांची संमती मिळाल्यावर तेथील वाड्याच्या भिंती वगैरे रंगवून व त्यांवर चित्रे काढवून त्या परम रमणीय केल्या. ज्या मुख्य सदरेस सिंहासन मांडावयाचें तेथें उंची वस्त्रांचे चांदवे, पडदे वगैरे लावून ती अतिमनोहर केली. सिंहासन जेथे ठेवावयाचे तेथें सोन्याने मढविलेले चार स्तंभ रोवून त्यास अमूल्य जरीचा चांदवा लावला व त्यास मुक्ताफळांच्या गेंदांचे घोस लटकविले. त्याप्रमाणेंच गडावरील इतर जागा व इमारती रंगवून व साफसूफ करवून सुशोभित केल्या. राज्याभिषेकानिमित्त येणाऱ्या थोरथोर ब्राह्मणांस व मांडलिक राजांस उतरावयासाठीं चांगल्या सोईच्या जागा पाहून तेथें सर्व व्यवस्था उत्तम ठेवली. भोजनाच्या पंक्ती बसण्यासाठी व सभादिकांसाठी मोठमोठे विस्तीर्ण मंडप निरनिराळ्या स्थलीं उभारून दिले. सर्व राज्यांतील मोठमोठे गुणिजन, गवय्ये, बजवय्ये, कलावंतिणी वगैरे बोलावून आणवून आलेल्या पाहुण्यांची करमणूक होईल अशी व्यवस्था केली. ब्राह्मणभोजनांसाठी एकएके जागी पाचपाच हजार ब्राह्मणाच्या पंक्ती बसाव्या अशी दहापाच स्थलें करविली.

---

१ या सभेशिवाय आणखी विवेकसभा (जेथे पंडिताचे पूर्वोत्तरपक्ष व्हावे), न्यायसभा (जेथे लोकाचे खटले ऐकावे), प्रगट सभा (जेथे गोरगरीबांच्या फिर्यादी ऐकाव्या), प्रबोधसभा (जेथे कीर्तनपुराणादि श्रवण व्हावें), रत्नागरसभा (जेथे अलंकारवस्त्रादिकाच्या किंमती व्हाव्या), नीतिसभा (जेथे परकीयांचा आदरसत्कार व भेटी व्हाव्या) इत्यादी सभांच्या जागा वाड्यात निरनिराळ्या करून आणखी अंतर्गृहे, देवागारें, भोजनगृहे इत्यादी केली होती. शि. दि.

ह्या प्रत्येक स्थली भोजन तयार करण्यासाठी पाककर्ते, वाढणारे व पारिपत्यागार नेमून सर्व प्रकारची तरतूद उत्तम करविली. जेवढे ब्राह्मण येतील तेवढ्यांसाठी नित्य नूतन पक्वान्ने तयार करावी अशी व्यवस्था केली. सुहृद्, आप्त, व सेवकजन येतील त्यांच्या बिऱ्हाडाची सोय यथास्थित करून त्यास कोणत्याही गोष्टीचे उणे पडूं न देण्याची ताकीद दिली. त्यांच्या भोजनासाठीही मोठमोठे मंडप तयार केले.

ह्याप्रमाणें किल्ल्यावर व किल्ल्याच्या खालच्या माचीवर जिकडेतिकडे मंडप, तंबू राहुट्या यांची एकच गर्दी होऊन राहिली. समारंभास येणाऱ्या एकंदर लहानथोर मंडळींस कोणत्याही प्रकारची केव्हांही न्यूनता पडूं नये ह्यासाठी धान्यादिकांची पर्वतप्राय कोठारे करवून त्यावर अधिकारी नेमले व त्या सर्वांवर अध्यक्ष नेमला. एकएक पदार्थ एकएका अधिकाऱ्याच्या हवालीं असून त्याच्या हाताखाली इतर कारकून व नोकर ठेवले. त्यांनी ज्याला जो जिनस लागेल तो तात्काळ पुरवावा, त्या जिनसेची उणीव कोणत्याही प्रसंगी पडूं देऊं नये व कोणालाही कधी नाहीं म्हणूं नये, असा एकसहा हुकूम देऊन ठेवला. तसेंच सर्व दर्जाच्या लोकांची त्यांच्या योग्यतेप्रमाणें व इतमामाप्रमाणें यथास्थित सोय होत आहे कीं कसें यावर देखरेख ठेवण्यासाठीं जागोजाग कामगार नेमले. सर्वांस अशी निक्षून ताकीद होती कीं, सर्व लहानथोर लोकांचा यथोचित आदरसत्कार करण्यात कोणी यत्किंचित्‌ही कसूर करूं नये. ह्या आदरसत्काराच्या कामावर चांगल्या इमानी व स्वामिकार्यनिष्ठ अशा कामगारांची निवड करून समारंभाच्या पहिल्या दिवसापासून शेवटल्या दिवसापर्यंत प्रत्येक दिवशीं प्रातःकालापासून सायंकाळपावेतों प्रत्येकानें कोणकोणती कामे करावी, कसकसे साहित्य मिळवावे व तयार करावे, कोणकोणास कायकाय द्यावे याचे नियम करून जाबते लिहून ज्यांचे त्यांजपाशीं देऊन ठेवले. पुनः घ्या घ्या म्हणण्याची किंवा आम्हांला अमुक कांही मिळाले नाहीं असें म्हणण्याची पाळी न येऊन सर्व व्यवहार बिनबोभाट व अगदी घोटाळा न होता व्हावा असा बंदोबस्त करून ठेविला. त्यामुळें गडावर व गडाखाली हजारो लोकांचा जमाव जमला असूनही त्या सर्वांची बरदास्त नेमलेल्या कामगारांनी उत्तम प्रकारे ठेवली. ज्यांनी त्यांनी आपणांस नेमून दिलेली कामे ठरविलेल्या नियमानुसार मोठ्या उत्साहाने व निरलसपणे केलीं.

ह्याप्रमाणें समारंभास लागणारी एकंदर सामुग्री सिद्ध होऊन येणाऱ्या पाहुण्यांची सर्व सोय यथास्थित केल्यावर पहिल्याने ज्येष्ठ शुद्ध चतुर्थीस व्रतबंध समारंभ सुरू झाला.[१] हा विधी दोन दिवसांत उरकून घेतला. ह्या दोन दिवसांत एक लक्ष ब्राह्मणभोजन झालें. सर्व ब्राह्मणांस एकएक रुपया दक्षिणा दिली. पंडित, वैदिक व इतर शिष्ट ब्राह्मण यांची संभावना यथायोग्य केली. एकट्या गागाभट्टास सात हजार होन ह्या वेळी मिळाले व इतर ब्राह्मणांस १७००० होन मिळाले. व्रतबंध केल्यावर महाराजांस गायत्री मंत्र शिकविला आणि क्षत्रियांनी पाळावयाच्या शास्त्र विहीत नियमांचे त्यांजकडून पठण करविले असे म्हणतात.[२] नंतर षष्टीस प्रथमपटबंधनविधी करून पुण्याहवाचनपूर्वक यज्ञास आरंभ झाला.

---

१ ह्या समारंभापूर्वी महाराजांनी मे महिन्यात चिपळूणास जाऊन तेथल्या परशूरामाचे दर्शन घेतले आणि परत रायगडावर आल्यावर चार दिवसांनी प्रतापगडावर जाऊन तेथे स्वतः प्रतिष्ठापित केलेल्या भवानीचे दर्शन घेतले. ह्या वेळी ह्या देवीला त्यानी सवा मण सोन्याची छत्री व इतर बहुमोल वस्तू वाहिल्या. तिकडून आल्यावर त्यांनी आपल्या घराण्याचा उपाध्याय बाळभट्ट याच्या साहाय्याने महादेव व भवानी यांची बरेच दिवस एकसारखी पूजाअर्चा केली.

२ ह्या वेळीं महाराजांनी असा आग्रह धरला म्हणतात की, 'माझे क्षत्रियत्व ज्या अर्थी आता सिद्ध व मान्य झालें आहे त्या अर्थी माझ्या राज्याभिषेकविषयक पुढील कार्यात वेदोक्त मंत्र म्हणावे; इतर द्विजाप्रमाणे मलाही ते श्रवण करण्याचा अधिकार आता प्राप्त झाला आहे.' हें त्यांचे म्हणणें जमलेल्या ब्रह्मवृदांस बिलकूल मान्य झालें नाही. त्यांची सारखी खळबळ उडाली. ते म्हणू लागले की, 'कलियुगात फक्त ब्राह्मण तेवढे द्विज उरले आहेत!' ह्या त्यांच्या अट्टाहासामुळे प्रत्यक्ष गागाभट्टसुद्धा गांगरून गेला आणि त्यानें वैदिक मंत्रांचा उच्चार त्या समारंभात मुळीं केला नाही असे म्हणतात! सगळे विधी पुराणोक्त मंत्र म्हणून उरकून घेतले! कोणी म्हणतात की, त्या वेळच्या द्रव्यलोभी ब्राह्मणांनी वेदमंत्र म्हटले असावें; पण ते महाराजांच्या कानी न पडतील अशा बेताने उच्चारले असावें. तारीख-ई-शिवाजी नामक यवनी बखरींत असा उल्लेख आहे की, आपल्या कार्यांत वेदमंत्र म्हणण्यास हरकत घेणाऱ्या ब्राह्मणास आपल्या दिवाणी व लष्करी खात्यातून काढून टाकावे व धर्मकर्म विधी व देवपूजा करण्याच्याच कामास ते लायक आहेत असे ठरवावे, असें महाराजांनी मनात आणून आपल्या पदरच्या पुष्कळ ब्राह्मणांस कामावरून दूर करून त्यांच्या जागी कायस्थास नेमले; परंतु मोरोपंत पिंगळ्याने ब्राह्मणांच्यातर्फे रदबदली केल्यामुळे महाराजांनी असे करण्याचें रहित केलें.

विनायकशांती, नक्षत्रशांती, ग्रहशांती आदिकरून राज्याभिषेकांगभूत सर्व शास्त्र विधी यथासांग केले.[१] ऋत्विज व यजमान (महाराज) इतके दिवस दुधाफलादिकांचा आहार करून व्रतस्थ राहिले. ह्या सहा-सात दिवसात नित्य पन्नास हजार ब्राह्मणभोजन झालें. समारंभास आलेल्या पाहुण्यास दररोज निरनिराळ्या प्रकारचे मिष्टान्न भोजन घातले व त्यांच्या जागोजाग सभा करवून गायनवादनादिकेंकरून त्यांचें मनोरंजन केलें. नाना प्रकारच्या मंगलवाद्यांनी तो गड जसा काय दणाणून गेला.[२]

शेवटीं त्रयोदशीचा सुमंगल दिवस प्राप्त झाला. इष्टमित्रांची व स्वामिनिष्ठ सेवकजनांचीं हृदये आनंदोर्मींनीं उचंबळू लागली. अभिषेकसमारंभ अवलोकन करण्याची सर्वांस उत्कंठा लागून राहिली. मग महाराजांनी अष्ट प्रधानांची योजना केली. लेखकद्वय-एक पत्रलेखक व दुसरा गणकलेखक असे नेमले. द्वादशकोश (बारा महाल) अष्टादश शाला (अठरा कारखाने) इत्यादिकांवरील अधिकारी, देशाधिकारी, नगराधिकारी असे पृथक्पृथक् नेमले. ह्या सर्वांस मंगलस्नान करावयास सांगून महाराजांनी स्वतः मंगलस्नान केलें. मृत्तिकास्नान, पंचगव्यस्नान, गंगादिपुण्यतीर्थोदकस्नान, पंचामृतस्नान ही त्यांनी विधियुक्त केलीं. सर्वांनी शुभ्र वस्त्रे, गंध, पुष्पे व अलंकारहीं धारण केली. क्षीरवृक्षाचें आसन सव्वा हात उंच व तितकेच रूंद करून तें सुवर्णानें मढविलें होतें. त्यावर महाराजांनी आरोहण केलें. पट्टराणी सोयराबाई पटबंधन करून जवळ बसली व संभाजीही सन्निध बसला. पूर्वेस मुख्य प्रधान मोरोपंत पिंगळे हातीं धृतपूर्ण सुवर्णकलश घेऊन उभा राहिला. दक्षिणेस सेनापती हंबीरराव मोहिते दुग्धपूर्ण रौप्यकलश घेऊन उभा राहिला. पश्चिमेस रामचंद्र निलकंठ पंडित[३] अमात्य दधिपूर्ण ताम्रकलश घेऊन उभा राहिला. उत्तरेस छंदोगामात्य प्रधान रघुनाथ पंडितराव मधुपूर्ण सुवर्णकलश घेऊन उभा राहिला. ह्यांजपाशीं मृत्तिकामय कुंभांत समुद्रजल व महानद्यांचें[४] जल भरून ठेवले. उपदिशांच्या ठायीं क्रमेकरून आग्नेयीस दत्तो पंडित सचिव छत्र घेऊन उभा राहिला. नैऋत्य भागी जनार्दन पंडित हणमंते[५] सुमंत व्यजन घेऊन उभा राहिला. वायव्यदिशेस दत्ताजी पंडित मंत्री[६] चामर घेऊन उभा राहिला. ईशान्य भागीं बाळाजी पंडित[७] न्यायाधीश दुसरें चामर घेऊन उभा राहिला. सन्मुख सव्यभागीं पत्रलेखक बाळाजी आवजी लेखनपात्र घेऊन उभा राहिला. वाम भागीं गणकलेखक चिमणाजी आवजी लेखनपात्र घेऊन उभा राहिला. आसमंताद्भागीं सर्व कोश व शाला यांचे अधिकारी उभे राहिले. सुहृदजन व मांडलिक राजे सभोवते उभे राहिले. याप्रमाणे सर्व जण उभे राहिल्यावर अभिषेकास आरंभ झाला. सुवर्णपात्र शतछिद्र करून त्यांत उदक घालून त्याचा, व प्रधान जे कलश घेऊन उभे राहिले होते त्यांतील द्रव्याचा महाराजांस यथाशास्त्र मंत्रोच्चारपूर्वक अभिषेक केला. त्या समयी सर्व शाल वाद्यांचा व कलावंतिणी, गवय्ये इत्यादिकांच्या नृत्यगायनाचा एकच घोष सुरू झाला. हा विधी आटोपल्यावर महाराजांस पुनः मंगलस्नान घालून सुवासिनींनी आरत्या केल्या. कांस्यपात्र घृतपूरित करून त्यात व आदर्शांत त्यांस स्वमुख पाहावयास सांगितलें. एवढा विधी झाल्यावर ब्राह्मणांस दक्षिणा दिल्या. नंतर पुनः शुभ्र वस्त्रे परिधान करून तें सिंहासनावर आरोहण करण्याच्या मुहूर्ताची वाट पाहात राहिले.

---

१ ह्या वेळीं कित्येक ब्राह्मण म्हणू लागले की, महाराजांनी आजपर्यंत अनेक शहरे लुटून जाळूनपोळून टाकली आहेत, त्यामुळें पुष्कळ ब्राह्मण, गाई, स्त्रिया व मुले यांचा नाश झाला आहे. याचे त्यास मोठे पातक लागलें आहे. ह्या पातकाचे क्षालन झाल्यावाचून त्यांची शुद्धी होऊन ते प्रस्तूत विधीस पात्र व्हावयाचे नाहीत. ही पातक मुक्ती होण्याचा सोपा उपाय त्यांनी असा सुचविला कीं, त्याबद्दल ब्राह्मणास आठ हजार रुपये दक्षिणा म्हणून वाटावे. ही रक्कम अर्थात् महाराजांनी ब्राह्मणांस तत्काळ दिली. प्रो. सरकार पृ. २७४.

२ इंग्रज व डच व्यापाऱ्यांच्या ह्या वेळच्या लेखांवरून असें कळतें कीं, महाराजांनी व्रतबंधविधी आटोपल्यावर लागलीच आपला आणखीन एक विवाह करविला. हा अर्थात् त्यांचा तिसरा विवाह होय. हा विवाह त्यांनीं वेदमंत्र म्हणावयास लावून करविला असा जेध्यांच्या शकावलींत उल्लेख आहे. अभिषेक समारंभ झाल्यावर त्यानी आपला आणखीन एक विवाह करविला, असेही ह्या व्यापाऱ्याच्या लेखांवरून कळते.

३ सभासद याचे नाव नारो नीलकंठ असें देतो.

४ ह्या महानद्या म्हटल्या म्हणजे कृष्णा, गोदावरी, यमुना, गंगा व कावेरी ह्या होत.

५ चिटणीस याचे नांव त्रिंबक सोनदेव असे देतो व सभासद त्रिंबक सोनदेवाचा पुत्र रामचंद्रपंत असे नाव देतो

६ सभासद याचे नाव निराजीपंत असें देतो.

७ चिटणीस याचे नाव निराजी रावजी असे देतो.

महाराजांनी सिंहासनही शास्त्रोक्त प्रकारे तयार केलें होतें. तो प्रकार असा: प्रथम क्षीर, वट व औदुंबर ह्या वृक्षाच्या लाकडाची वेदी करून ती सुवर्णाच्या तगटांनीं मढवून रत्नखचित केली होती. त्या तगटावर वृषभ, मार्जार, तरस, सिंह व व्याघ यांची चित्रे अनुक्रमे एकावर एक अशीं चोहों बाजूंस कोरली होती. याला सोन्याचे आठ स्तंभ असून त्या प्रत्येकावर एक एक सिंह सोन्याचा बसविला होता आणि त्यांवर चित्रविचित्र वृक्ष, फले, पुष्पे, वेली, पक्षी व मच्छकूर्मादी जलचर याची चित्रे दाखवली होती. त्याप्रमाणेंच नृत्यांगना तंतुवाद्ये हाती घेऊन नाचताहेत अशीं चित्रे त्यांवर कोरली होती.[१] अशा सशास्त्र सिद्ध केलेल्या सिंहासनावर प्रथम मृगचर्म घालून त्याच्यावर कांहीं सुवर्णद्रव्य घातले होतें. मग त्यावर व्याघ्रचर्म घालून त्याच्यावर मृदु कार्पास आसन घातले होतें व ते मखमालीने मढविलें होतें. त्यावर लोड व तक्के ठेवले होते. त्यांस बादली जरीवस्त्रांची आच्छादने घातली होतीं. सिंहासनास मागें प्रभावळ करून त्यास छत्र लावले होते. हें छत्र जडावाचे असून त्याला मोत्यांच्या झालरी होत्या. त्यावर मंडप असून त्यास सुवर्णमय वस्त्राचा चांदवा लावला होता व त्यास मुक्ताफळांचे घोस अडकवले होते. ही अशी सिंहासनाची व्यवस्था करून उत्तम लक्षणांचे गज व अश्व चांगले सजवून व सुवर्णाच्या अलंकारानी सुशोभित करून सभामंडपासमोर उभे केले होते. सिंहासनारोहणमुहूर्त समीप आला तेव्हां श्रीविष्णूची सुवर्णमय प्रतिमा तयार केली होती, तिची षोडशोपचारें पूजा करून महाराजांनीं ती सव्य हस्ताच्या ठायीं स्थापन केली व मुहूर्तघटिका भरताच सर्व ब्रह्मवृंदांस नमस्कार करून त्यांचा वेदमंत्रोच्चारपूर्वक आशीर्वाद घेतला आणि मातुश्रीस नमस्कार करून तिचा प्रेमपुरःसर आशीर्वाद घेतला व ती विष्णुमूर्ती तशीच हातांत धारण करून ते सिंहासनारूढ व्हावयास गेले. महाराजांनी सिंहासनाच्या सव्य अंगास पहिल्याने जाऊन सव्य जानु टेकून नमस्कार करून पाय न लावता पूर्वेकडे मुख करून आरोहण केलें व सिंहासनाच्या अष्टस्तंभी अष्टप्रधान बद्धांजली उभे राहिले. ते येणेंप्रमाणें; पहिल्याने उजवे बाजूस धर्माध्यक्ष पंडितराव, डावे बाजूस मुख्य प्रधान (पेशवे), त्यांच्या मागें उजवे बाजूस सेनापती (सरनोबत) डावे बाजूस अमात्य (मुजुमदार), त्यांच्या मागें उजवे बाजूस सुमंत (डबीर). डावे बाजूस सचिव (सुरनीस), त्यांच्या मागें उजवे बाजूस मंत्री (वाकनीस) व डावे बाजूस न्यायाधीश. युवराज संभाजी, महामहोपाध्याय गागाभट्ट व मुख्यप्रधान मोरो त्रिंबक पिंगळे हे सिंहासनासन्निध उच्चासनावर बसले, आणि इतर दरबारचे लोक व आमंत्रित महाजन, आपआपल्या दर्जाप्रमाणें आपल्या नेमलेल्या जागी उभे राहिले. सिंहासनारोहण झाल्याबरोबर नौबती, चौघडे वगैरे एकंदर मंगलवाद्यांचा एकच गजर होऊन राहिला; नृत्यगायनादी सुरू झाली. सर्व प्रेक्षकांनीं एकच जयघोष केला. त्या नादाने सर्व दिशा दणाणून गेल्या. एकंदर ब्रह्मवृंदानें आशिर्वाद वचनांचा दिर्घस्वराने उच्चार केला. महामहोपाध्याय गागाभट्ट पुढें सरसावून सोन्यामोत्यांच्या झालरी लावले छत्र स्वहस्ते उचलून महाराजांच्या मस्तकावर धरून दिर्घस्वराने म्हणाला. ''शिवछत्रपती सदा विजयी होवो!'' तोफांची सरबत्ती सुरू झाली. स्वराज्यांतील प्रत्येक किल्ल्यास अशीं सूचना केली होती कीं, एका किल्ल्यावरच्या तोफा दुसऱ्या किल्ल्यावर ऐकू जातांच तेथें त्या सुरू कराव्या. ह्याप्रमाणें राज्यांतील एकंदर किल्ल्यांवर एकदम तोफांची सरबत्ती सुरू झाली.

सिंहासनारूढ झाल्यावर महाराजांनी पूर्वीचा शुभ्र पेहराव उतरून लाल वस्त्रे परिधान केली. चौकडे, कंठ्या, माळा, शिरपेच, तुरा, झगा, पोंच्या असे अलंकार अंगावर घातले व धनुष्यबाण व तलवार यांचे पूजन मंत्रविधिपूर्वक करून तीं शस्त्रें हातांत घेतली. त्या समयी त्यांजवर लोकांनी सोन्यारुप्याच्या पुष्पांची वृष्टी केली. ब्राह्मणांच्या सोळा सुवासिनींनी त्यांना आरत्या केल्या, त्यांस वस्त्रे भूषणे दिली. सिंहासनावर बसल्यावर जे कांही आणखी मंत्रविधी करावयाचे होते ते करून महाराजांनी ब्राह्मणांचे आशीर्वाद घेतले. ऋत्विज्, आचार्य व ब्राह्मण यांची पूजा करून त्यांस मुबलक दक्षिणा दिल्या. ह्या वेळीं गागाभट्टास एक लक्ष रुपये दक्षिणा व बहुमोल वस्त्रभूषणादिक देऊन गौरविले. सर्व ऋत्विजांस पाच पाच हजार रुपये दक्षिणा दिली. पुरोहितास चोवीस हजार रुपये दक्षिणा दिली. शिष्ट ब्राह्मणमंडळींपैकी

---

१ ह्या सगळ्यांस एकंदर तीन खंडी बत्तीस शेर व बत्तीस मासे सोनें लागले होते, असे काही बखरकार म्हणतात.

जे जसे न्यूनाधिक विद्वान होते त्या मानानें त्यांस हजार हजार, पाचपाचशें, दोनदोनशें रुपये दक्षिणा दिल्या. इतर झाडून साऱ्या ब्राह्मणास पंचवीसपंचवीस रुपये सरसकट दिले. शिवाय गोसावी, तडीतापसी, गोरगरीब, भिकारी वगैरे लोकांस पांचपांच, चारचार, दोनदोन असे रुपये वाटले. मोठमोठ्या साधुसंतांस व धर्मपरायण ब्राह्मणांस गांव व वतनें इनाम करून दिली. महाराजांनी ह्यावेळी आपली सुवर्णतुला केली. तिचे सोळा हजार होन वजन भरले हे होन अर्थात् ब्राह्मणांस वाटून दिलें.[१]

ह्यानंतर अष्टप्रधान, सुभेदार, दरखदार, महालदार, कारखानदार व इतर अधिकारी यांस अधिकारांची वस्त्रे दिली मुख्य प्रधान व सेनापती यास बादली वस्त्रें पाच, सणगें व शिरपेंच, मोत्यांचे तुरे, कंठ्या, चौकडे , झगे, शिकेकटार, ढालतलवार, चौघडे, नौबती, जरीपटके, हत्ती, घोडे, सोन्याच्या दांडीच्या चवऱ्या इत्यादी देऊन, करारपत्रें करून पदे दिली. अमात्यास बादली वस्त्रे, पोषाख, ढालतलवार, चौकडा, कंठी, तुरा, शिरपेंच, शिकेकटार, रुप्याचें कलमदान, चवरी, हत्ती, घोडा अशी दिलीं. असेच सचिव, सुमंत, मंत्री, पंडितराव व न्यायाधीश यांस वस्त्रालंकार दिले. ही दिलेली पदे अष्टप्रधानांनी बहुमानपुरःसर घेऊन महाराजांस नजरा करून मुजरे केले. प्रत्येक प्रधानास महाराजांनी एकएक लक्ष होन बक्षीस दिले. मग बाळाजी आवजी यास चिटणिशीचीं वस्त्रे दिली. त्यास मंदील, दुमजला दुपेटा, झगा, विजार, कंठी, शिरपेंच, चौकडा, रुप्याचें कलमदान, चवरी, घोडा अशी दिलीं. अशींच चिमणाजी आवजीस गणकलेखकाची वस्त्रे दिलीं. त्यांनीही नजरा करून मुजरे केले. अष्टप्रधानांस मुतालिक करून दिले. ह्या मुतालिकांसही वस्त्रे दिली राजाज्ञापद शक्राजी नीलकंठ महागावकर यास दिलें. शामजी नाईक पुंडे यास फौजेच्या बक्षीगिरीचीं वस्त्रे देऊन ढालतलवार व ताडीचे कलमदान अशीं दिली वरकड सुभेदार, महालदार, कारखानदार, फौजेचे सरदार व मानकरी यांस अधिकारांची वस्त्रे दिली.

याप्रमाणे सर्व अधिकाऱ्यांस वस्त्रे देऊन व त्यांच्या नजरा व मुजरे घेऊन महाराज चांगला सुलक्षणी घोडा सोन्याचे व जडावाचें सामान घालून सज्ज करून आणला होता त्यावर बसून राजे रणांगणांत आले व येथें सोन्याची अंबारी, मोत्यांचे अलंकार, जरीबाब गाशे व झालरा अशीं घालून सुशोभित करून एक हत्ती उभा केला होता त्यावर आरूढ झाले. ह्या हत्तीच्या मस्तकी सेनापती एका हातांत मोरचेल व एका हातांत अंकुश घेऊन बसला. पाठीमागे खवासींत मुख्य प्रधान मोरचेल घेऊन बसला. वरकड प्रधान व मुतालिक दुसऱ्या हत्तीवर बसले. नंतर खाशांमागून चालणारे तेवढे सरदार हत्तीवर व घोड्यावर बसले आणि स्वारी देवदर्शनास चालली. ह्या स्वारीची रचना येणेंप्रमाणें केली होती. आघाडीस जरीपटका व भगवे निशाण याचे दोन हत्ती चालले; त्यांच्यामागे प्रधान व सेनापती यांचे जरीपटक्याचे हत्ती व सर्व फौजेतील निशाणे चालली; ह्या निशाणांबरोबर हुजूरपागेचे व करोल लोकाचे अंमलदार आपआपले घोडे सोन्यारुप्याच्या सामानाने शृंगारून, उत्तम वस्त्राभरणें लेवून व हाती बंदुका घेऊन बिनीच्या संरक्षणासाठी चालले; त्यांच्या मागून गाड्यांवरून तोफा चालविल्या; त्यांच्या मागून घोड्यांच्या गाड्या चालविल्या; त्यांच्या मागून शूरयोद्धे कोणी हत्तींवर व कोणी घोड्यांवर बसून चालले त्यांच्या मागून विटेकरी, पट्टेकरी, सांगबर्चीवाले, बाणेकरी व बंदूकवाले असे निरनिराळे पायदळाचे लोक चालले; त्यांच्या मागून खासबारदार व बंदुकवाले लोक चालले; त्यांच्या मागून तासे, मर्फे, हलग्या वगैरे रणवाद्ये वाजवीत वाजंत्री चालले; त्याच्या मागून पन्नास कोतवाल हत्ती, शंभर सांडणीस्वार व उंटावरून बाणांच्या केच्या चालल्या; त्यांच्यामागून पन्नास कोतवाल-घोडे चालले. त्यांच्या मागून शहाबाजे वाजविणारे, काळूसनया वाजविणारे, घोड्यांवरून नगारे वाजविणारें, करणेकरी, शिंगाडे इत्यादी मंगलवाद्ये वाजवीत चालले, त्याच्या मागून धाडीगाणारे, भाट, बंदीजन प्रताप वर्णन करीत चालले, त्यांच्यामागून

---

१ ह्या सोळा हजार होनांचे वजन सरासरी एकशे चाळीस रत्तल म्हणजे मुंबईचे पाच मण होतें. नुसती सुवर्णतुला करवूनच ब्राह्मण तृप्त झाले नाहीत. त्यास सुवर्णादी सप्तधातूंशी तोलले. आणि तलमताग, रेशीम, करपूर, लवण, जायफळ वगैरे मसाले, धृत, शर्करा, नाना प्रकारची फळे, मद्यें, तांबूल व इतर खाद्यपदार्थ यांच्याशीही त्यांस निरनिराळे तोलले आणि ह्या सगळ्या तोललेल्या वस्तू ब्राह्मणांस वाटून दिल्या.

लग्या, निशाणे, भाले व बोथाट्या घेतलेले लोक, चोपदार व वेत्रधारी हे चालले, त्यांच्या मागून मोठमोठे शूर मल्ल व जेठीलोक हत्तीवर बसून चालले, त्यांच्या मागें महाराजांचा हत्ती चालला असून त्यांच्या सभोंवर्ती मावळे सरदार मोठमोठे अलंकार व पोषाख लेवून दुरून चालले, त्यांच्या मागून प्रधानमुत्सद्दी व इतर बडे अधिकारी यांचे हत्ती चालले व ह्या सर्वांच्या मागून आणखी काही फौज चालली. अशा थाटाने स्वारी देवदर्शनास गेली.

सर्व रस्ते झाडून साफ करून शृंगारले होते. मार्गांत जागोजाग सडे घालून रांगोळ्या घातल्या होत्या. सर्व घरे सुशोभित केली होतीं. जिकडेतिकडे ध्वज, पताका, तोरणे लावली होती. सर्व नगरदेवतांच्या पूजा यथासांग करून त्यांस नैवेद्यादिकाचें अर्पण करविले होतें. स्वारी मिरवत मिरवत निघून देवतांचे दर्शन करून, त्यांस वस्त्रालंकार अर्पण करून व ब्राह्मणादी पुजाऱ्यांस दक्षिणादिकांनी संतुष्ट करून माघारी फिरली. परत येतांना रस्त्यांतून सुवासिनींनी मंगल आरत्या केल्या व माड्यांवरून दही, लाह्या, पुष्पे, दुर्वा यांची महाराजांवर दृष्टि केली. ह्याप्रमाणे परत राजद्वारी आल्यावर महाराज रथात बसून राजांगणांत गेले. तेथून शिबिकेंत बसून सभाद्वारी आले. तेथें पोहोचल्यावर त्यांच्या वरून भरलेला कलश व निंबलोणही उतरून टाकली. असें करणारांस वस्त्रालंकार देऊन त्यांनी गृहप्रवेश केला.

वाड्यांत आल्यावर प्रथम महाराजांनी कुलदेवतेचें दर्शन घेतले, व मग प्रिय मातेस नमस्कार केला. राण्यांनी आरत्या ओवाळल्या, त्यांस अमूल्य वस्त्राभरणें दिली. मग पुनः माघारी येऊन ते सिंहासनावर बसले व सर्वांच्या नजरा[१] व मुजरे घेऊन त्यास पान, गुलाब अत्तर वगैरे देऊन त्यानी निरोप दिला. मग ब्राह्मणभोजनें झाली. महाराजांनी सर्व सुहृजन व इष्टमित्र यांसमवेत बसून भोजन केलें. मांडलिक राजे व इतर आप्तजन यांचा बहुमान करून व त्यांस वस्त्रालंकारादिकांनी गौरवून निरोप दिला. गुणिजन आले होते त्यांस मोठमोठ्या बिदाग्या देऊन संतुष्ट केलें. ह्याप्रमाणें हा राज्याभिषेकसमारंभ मोठ्या थाटाने व निर्विघ्नपणें पार पडला. समारंभास आलेले एकंदर लोक मोठा संतोष पावून महाराजांच्या ऐश्वर्यसंपन्नतेची व औदार्याची वाखाणणी करीत स्वस्थानी गेले. ह्या समारंभास लागलेल्या एकदर खर्चाचा आकडा एक कोटी बेचाळीस लक्ष होन एवढा झाला असें म्हणतात.

महाराजांनी 'क्षत्रियकुलावतंस श्रीराजाशिवछत्रपती' असा किताब धारण केला. कागदोपत्री आपल्या राज्याभिषेकापासून नवा शक लावू लागले व स्वराज्यातील एकंदर लोकास हा शक चालू करण्याची ताकीद दिली. राज्याभिषेक शके १५९६ ज्येष्ठ शुद्ध त्रयोदशीस झाला. ह्या दिवशीं इंग्रजी तारीख ६ जून स. १६७४ ही होती. ह्याप्रमाणें अगदी लहान वयांत जो अत्यंत स्तुत्य हेतू मनांत धरून इतकी वर्षे तत्सिद्धयर्थ अव्याहत परिश्रम केले तो पूर्ण होऊन त्यानी स्वराज्यसंस्थापना व सशास्त्र सिंहासनारोहण करून महाराष्ट्रांत स्वतःचा नूतन शक चालू केला.[२]

त्यांचा हा अभिषेकसमारंभ असा थाटाचा झाल्याचे वर्तमान यवनपादशहास कळले तेव्हा ते किती खिन्न झाले असतील हें कांही सांगावयास नको. त्यांचा हा वेळपावेतो असा समज होता की, शिवाजीमहाराज किती झाले तरी एक मोठेसे पुंड किंवा पाळेगार म्हणतां येतील. ते काही आपल्यासारखे राजपदाधिकारी पादशहा नव्हेत. यास्तव त्यांच्याविषयी भाविक प्रजाजनाच्या ठायीं वास्तविक पूज्यभाव वसावयाचा नाही. त्यांचें बड मोडून टाकले म्हणजे ते होते की नव्हते

१ ह्या वेळीं कित्येक राजे रजवाड्यांकडून महाराजांस नजराणे आले असे म्हणतात. परंतु त्यांची नावे कोठेही दिलेली नाहीत. गोवळकोंड्याच्या कुतुबशहाचा वकील हत्ती, घोडे, जवाहीर वगैरे नजराणे घेऊन आल्याचा मात्र स्पष्ट उल्लेख आहे.

२ ह्यास राज्याभिषेक-शक अशी संज्ञा दिली. ह्या एका गोष्टीवरून महाराजांच्या ठायी निरभिमानता किती वसत होती हें व्यक्त होते. विक्रमशक, शालिवाहनशक हे जसे त्या-त्या राज्यसंस्थापकांच्या नावांनी प्रवृत्त झाले, तद्वत् महाराजांनी हा नवा शक स्वनामाने चालू करणे पूर्वक्रमसिद्ध होते. तथापि स्वनामाचा बडेजाव वाढविणे त्यांस युक्त दिसले नाही. हा राज्याभिषेक शक महाराष्ट्रात जवळजवळ १०४ वर्षे चालला. स. १७७७ त पेशव्यांच्या हाती राज्यसुत्रे सर्वस्वी जाऊन सातारचे छत्रपती त्यांच्या हाती केवळ बाहुल्यासारखे झाले. तेव्हां नाना फडणीस व सखारामबापू यांनी दुसरा शाहू स. १७७७ - त गादीवर बसल्यावर महाराजांनी सुरु केलेला शक बंद करुन त्यांच्याविषयीच्या कृतज्ञतेचा व पूज्यताबुद्धीचा होम आत्मपरता व स्वयंमान्यता एतद्रूप अग्निकुंडात केला!

असें होऊन त्यांची कोणाला आठवण सुद्धा उरणार नाहीं परंतु हा त्यांचा हिशोब अगदीं चुकला. ज्या महावीर्यशाली पुरुषाचा स्वराज्य स्थापनेविषयीचा दृढ संकल्प पहिल्यापासून झाला होता तो नुसते यवनांचे प्रांत व किल्ले काबीज करूनच राहील व सर्व प्रजेच्या चित्ताच्या ठायीं स्वतःविषयी वास्तविक पूज्यत्वबुद्धी उत्पन्न होईल असें करण्याचा एक मोठा उपाय जो सशास्त्र राज्याभिषेकविधी त्याचा अवलंब करण्यास तो चुकेल हें कालत्रयी घडणे नाहीं. महाराष्ट्रातील ब्राह्मणांनी महाराजांच्या ह्या विचारास शास्त्राच्या हरकती दाखविल्या तरी यत्किंचितही निरुत्साह न होता त्यांनी काशीच्या व पैठणच्या महापंडिताच्या साहाय्यानें हा विधी यथासांग करविला. खरें म्हटले असतां महाराज क्षत्रियकुलोत्पन्न असल्याविषयी त्या वेळच्या कोणत्याही पंडितास व ब्राह्मणास संशय नव्हता; परंतु संस्कारलोपास्तव त्यांच्या पदरी शूद्रत्व बांधण्याचा कित्येकांचा प्रयत्न होता अशा पंडितांची तोंडे बंद करण्यासाठीं त्यांस गागाभट्टादि परस्थ पंडिताचे साहाय्य घ्यावे लागलें. कसेही असो. परंतु खऱ्या क्षत्रियास उत्तम प्रकारे शोभणारे महापराक्रम करून ज्या महापुरुषाने महाराष्ट्रीयांस यवनांच्या ताबेदारीतून सोडवून स्वराज्य व स्वातंत्र्य यांचा अनुभव घडविला त्यांचें क्षत्रियत्व त्या वेळच्या सर्व समंजस व कृतज्ञ जनांस अमान्य होणें शक्य नव्हतें. संपादिलेलें स्वराज्य चिरायु करण्याचा व हिंदुपदपादशाहीचा खंबीर पाया घालण्याचा हा राजपदारोहणरूप उपाय योजण्यांत महाराजांनी मोठीच दीर्घदृष्टी दर्शवली यांत काही शंका नाहीं. ह्यानंतर सर्व रजपूतराजे व इंग्रज, डच, फ्रेंच, फिरंगी वगैरे परदेशस्थ[१] लोक महाराजांस विशेष मान देऊं लागले हें उघडच आहे. पण अदिलशहा, कुतुबशहा व मोगल बादशहा यांसही आतां महाराजांना बरोबरीचा मान देणे प्राप्त झालें. ह्यापूर्वी एकंदर लोकांस त्यांचा धाकच विशेष वाटत असे; परंतु आतां धाक व मान ह्या दोन वृत्ती त्यांच्या ठायीं उत्पन्न झाल्या.

राज्यारोहणानिमित्त महाराजांच्या राज्यांत सर्वत्र आनंदोत्सव चालला असतां एक अत्यंत खेदजनक गोष्ट घडून आली. ती अर्थात् जिजाबाई मातुश्रींचे देहावसान ही होय! ज्या परमपूज्य व अत्यंत प्रेमळ मातेच्या शिक्षणानें, उपदेशाने व सतत प्रोत्साहनानें हा एवढा प्रचंड उद्योग महाराजांनी हातीं घेऊन असा यशोलाभास आणला व स्वपुत्र सर्वत्र विजयी होऊन व राजपदारूढ होऊन नूतन शककर्ता झाल्याने जिच्या आनंदास पारावार नाहींसा झाला होता, ती हा सुखसोहळा पाहावयास फार दिवस जिवंत राहिली नाहीं. राज्याभिषेकसमारंभ आटोपल्यावर दहाबारा दिवस झाले नाहींत तोच एकाएकी कांहीं विकार होऊन तिचा त्यांत अंत झाला! ह्या ऐन आनंदभरांत असा अकस्मात् मातृवियोग झाल्यामुळें महाराजांना अतोनात दुःख झालें. आपली ऐश्वर्यवृद्धी पाहून जिला वास्तविक समाधान व उत्साह वाटावयाचा ती आपली अत्यंत प्रिय जननी आपणांस सोडून गेल्यामुळे त्यांस सर्व ऐश्वर्य शून्यवत् वाटू लागलें. महाराजांच्या ठायीं मातृभक्ती किती निःसीम होती हें ह्या समयी लोकांच्या नजरेस उत्तमप्रकारे आलें. मातेची उत्तरक्रिया त्यांनी लक्षावधी रुपये खर्चून यथासांग केली व ते पर्जन्याचे चार महिने त्यांनी रायगडावरच राहून मातृशोकांत घालविले.[२] एवढ्या दिवसांत सिंहासनारोहण बिलकूल केलें नाहीं. मग आश्विन शुद्ध पंचमीच्या सुमुहूर्तावर पुनरपि सिंहासनारोहणसभा केली. ह्यानंतर अष्टप्रधान व फौजफाटा बरोबर घेऊन ते रायगडावरून निघून प्रतापगडावर देवीच्या दर्शनास गेले. तेथून रामदासस्वामींच्या दर्शनास गेले आणि मग शिखरचा महादेव व जेजुरीचा खडोबा यांचें दर्शन घेऊन ते परत रायगडावर आले.

***

---

१ ह्या परस्थ व्यापाऱ्याचे प्रतिनिधी राज्यारोहण समारंभाच्यासमयी रायगडावर गेले असून त्यांनी प्रत्यक्ष डोळ्यांनी पाहून त्याचे वर्णन आपल्या लेखात नमूद करून ठेवले आहे. ते बहुतेक सदरील वृत्तांताशी बरेच जुळते आहे. मुंबईचा इंग्रज व्यापाऱ्यांचा अध्यक्ष हेन्री ऑक्झेन्डन व त्याचा दुभाषा नारायण शेणवी व वेंगुर्ले येथील डच व्यापारी आब्राहम यांचे एतत्संबंधाचे लेख आहेत. ऑक्झेंडन याने एक हिऱ्याची अंगठी महाराजांस नजर करावयास नेली होती. महाराज सिंहासनारूढ होऊन लोकांचे नजराने स्वीकारू लागले तेव्हा नारोजीपंताने ऑक्झेन्डन व नारायण शेणवी यांस महाराजांपुढे नेले त्यांनी दूरूनच मस्तक लववून मुजरा केला आणि नजराणा पुढें केला. महाराजांनी त्यांचा मुजरा घेऊन व नजराणा स्वीकारुन त्यांस सिंहासनापाशी बोलाविले आणि शिरपाव नजर करुन निरोप दिला.

२ जिजाबाई ता. १८ जून रोजी मरण पावली. तिची पाच लाख होन किंमतीची खाजगी मत्ता होती, ती अर्थात् तिने मरणसमयी महाराजांच्या स्वाधीन केली.

भाग चोविसावा

राज्यव्यवस्था

राज्याभिषेकविधीनें स्वराज्यस्थापनेची पूर्तता करून महाराजांनी हिंदुपदपादशाहीची इमारत खंबीर पायावर उभारली व सतत तीस वर्षे केलेल्या अविश्रांत परिश्रमांची सार्थकता केली. आतां ही पातशाहत सुघटित व चिरायु व्हावी एतदर्थ जे उत्कट नियम व निर्बंध त्यांनी केले त्यांचें यथोपलब्ध वर्णन प्रस्तुत भागांत करून, मग सिंहासनारूढ झाल्यानंतरच्या चरित्रभागाचें निरूपण करणें इष्ट दिसतें. ही राज्यव्यवस्था त्यांनी राज्यारोहण-विधीनंतर केली असें मात्र कोणी समजू नये. ती त्यांनी पूर्वीपासूनच प्रसंगोपात लावून ठेवली होती, किंबहुना तिचा आरंभ सैन्य जमवून किल्ले व प्रांत काबीज करूं लागल्यापासूनच झाला असें म्हणण्यास हरकत नाही.

त्या काळी प्रचलित असलेल्या हिंदू व यवनी राज्यपद्धतींची माहिती त्यांस उत्कृष्ट होती. तीशिवाय आणखी प्राचीन राज्यपद्धतींचें वर्णन ग्रंथांतरी आढळतें त्याचें पर्यालोचन त्यांनी यथावकाश केलें होतें. ह्या सर्व राज्यपद्धतींतील गुणदोषांचें मनन त्यांनी दीर्घकाल करून कालदेश वर्तमानास अनुरूप व रयतेस अत्यंत सुखावह अशी राज्यपद्धती कोणती असावी हें त्यांनी आपल्या मनाशी ठरवून तिची स्थापना यथाप्रसंगी केली. यांत त्यांनी जें धोरण व जी बुद्धिमत्ता प्रगट केली तीस अर्वाचीन किंवा प्राचीन काळच्या इतिहासांत जोड मिळणे नाहीं असें म्हटलें असता अतिशयोक्ती होणार नाहीं. राज्य संपादण्यास लागणारे वीर्य, शौर्य, युक्तिमत्ता इत्यादी गुण महाराजांच्या ठायीं परिपूर्ण बसत असून आणखी संपादित राज्याची सुव्यवस्था लावण्यास लागणारे राज्यव्यवहारचातुर्य, प्रजापालनपटुत्व इत्यादी गुणही त्यांच्या अंगी अप्रतिम वसत होते हें ह्यावरून सिद्ध होतें.

राजा एखाद्या दिवाणाच्या मसलतीने किंवा स्वतःच्याच बुद्धीने राज्यकारभार चालवू लागल्याने सर्व व्यवस्था यथान्याय व यथायोग्य होत नाहीं, व प्रजाजनास सुख प्राप्त होत नाही. याचें कारण उघडच आहे कीं, कोणी कसाही बुद्धिमान पुरुष असला तरी त्याला एकट्याला राज्यांतील एकूणएक घडामोडींचें इत्यंभूत ज्ञान असणें शक्य नसतें; त्याप्रमाणेंच तो कितीही नीतिमान असला तरी त्याच्या हातून सर्व कारभार निःपक्षपातानें व निरपेक्षबुद्धीनें होईल हें सहसा शक्य नव्हे. आणखी असें कीं, निरनिराळ्या खात्यांची व्यवस्था लावताना एकापासून दुसऱ्यास हरकत किंवा अडचण कोणती आहे तें एकट्यादुकट्याच्या लक्षांत येण्याजोगे नसतें, आणि सगळ्या खात्यांची व्यवस्था सुयंत्र लागल्यावाचून ती सर्व जनांस हितकर होणें नाही आणि प्रजाजन नाराज झाल्याने राज्याच्या बळकटीस अपाय होतो, हें तत्त्व महाराजांच्या लक्षांत पूर्णपणे येऊन त्यांनी सर्व राज्यसूत्रे स्वतःच्या हातींच न ठेवता तीं वागविण्याच्या कामी अष्टप्रधानांचे साहाय्य घेतलें. ही अष्टप्रधानमंडळाची संस्था त्या काळच्या कोणत्याही राज्यांत नसून तिचे अवलंबन महाराजांच्या मागें कोणीही करावे तसे केलें नाहीं. पेशव्यांच्या हाती सर्व राज्यसूत्रे जाऊन राजा केवळ नामधारी झाला. तेव्हांपासून तर तिचा सर्वस्वी लोप झाला. सांप्रत परकीयांच्या सुधारलेल्या राज्यपद्धतींत मात्र हें प्रधानमंडळाचें तत्त्व आढळतें.

राज्याभिषेकाच्या वेळीं हे अष्टप्रधान कोण कोण होते हें मागल्या भागांत सांगितलेंच आहे. आता त्यांच्या कामांच्या संबंधाने येथे थोडेसे दिग्दर्शन करतो.

(१) मुख्य प्रधान म्हणजे पेशवा, ह्याची पदवी अर्थात् राजाच्या खालोखाल असून त्याची देखरेख मुलकी व लष्करी अशा दोन्ही खात्यांवर असे. राज्याची एकंदर व्यवस्था सुयंत्र चालते कीं कसें ते हा पाही. राजांच्या गैरहजेरीत त्याच्या जागी याने व्यवस्था पाहावयाची असें. राज्यातील इतर कामदार व अंमलदार हे एकदिलाने चालून राज्यव्यवस्थेला योग्य मदत करतील असा बंदोबस्त हा ठेवी. एकंदर खलित्यांवर व फर्मानांवर राजाच्या शिक्कामोर्तबाखाली ह्याचा मोर्तब असे.

(२) सेनापती म्हणजे सरनौबत. ह्याचा अधिकार सर्व लष्करावर असून त्या संबंधीची सगळी व्यवस्था त्यानें पाहावी असें असे. हे सेनापती दोन असत–एक घोडदळावरचा व एक पायदळावरचा. घोडदळावरील सेनापतीचा हुद्दा मोठा असून पायदळावरचा सेनापती त्याच्या हुकमतींत असें असे दिसते. कारण पायदळावरच्या सेनापतीस प्रधानमंडळांत जागा नसे.

(३) पंतअमात्य म्हणजे मुजुमदार. ह्याची देखरेख स्वराज्यांतील एकदर जमाखर्चावर असे. सर्व लष्करी व मुलकी खात्यांचे व किल्ल्यांचे हिशोब ह्यानें पाहावे असें असे. सर्व प्रांतांतील जमाखर्चाचे तक्ते ह्याच्याकडे तपासावयास येत. त्यामुळें सर्व अधिकाऱ्यांच्या जमाखर्चावर दाब राहून कांही चूक किंवा अफरातफर झाल्यास ती लागलींच उघडकीस येत असे. फाजील खर्चाला मंजुरी किंवा कोठलाही खर्च कमी करण्यासंबंधाचा हुकूम हुजुरातून मिळावयाचा तो ह्या प्रधानाच्या अनुमतीने व शिफारशीने मिळत असे. ह्या कारणास्तव ह्या प्रधानाच्या हाताखाली पुष्कळ कारकून असत व निरनिराळ्या प्रांतांचे, लष्कराचे व किल्ल्यांचे हिशोब तपासावयास निरनिराळे सरकारकून नेमलेले असत

(४) पंतसचिव म्हणजे सुरनीस. याची देखरेख सरकारी दफ्तरावर असे. स्वराज्यांतील निरनिराळ्या प्रांतांतील अधिकारी, लष्करी अंमलदार व किल्लेदार यांच्याकडून येणारीं पत्रें व सरकारांतून त्यास जाणारे खलिते यांची पाहणी करून त्यांतील मतलब तपासून पाहण्याचे काम ह्याच्याकडे असे. किल्लेदारांस द्यावयाची हवालपत्रें, इनामपत्रें, सनदा इत्यादिकांची नोंद ह्याने ठेवावी असें असे. एकंदर सरकारी खात्यांच्या दप्तरांची व्यवस्था नीट शिस्तवार ठेवली आहे किंवा कसें ते ह्याने पाहावे. ह्या प्रधानाच्याही हाताखाली पुष्कळ कारकून असत. त्याच्या शिक्क्यावाचून कोणताही सरकारी कागद किंवा खलिता मुलकी किंवा लष्करी अंमलदारांस जात नसे. पंत अमात्य व पंतसचिव हे आपल्या वतीने वर्षाच्या वर्षास आपल्या हाताखालच्या कारकुनांस प्रांतोप्रांतीच्या अधिकाऱ्यांच्या व किल्लेदारांच्या हिशोबाची व दप्तरांची व्यवस्था नीट आहे कीं कसें तें तपासण्यास पाठवीत असत. हिशोबांचे वगैरे ताळेबंद पाहून कांही चुका आढळून आल्यास कारकुनांस शिक्षा करण्याचा अधिकार त्यांस असे. कधींकधीं हे प्रधान स्वत: जाऊन एखाद्या दुसऱ्या खात्याची तपासणी करीत असत.

(५) मंत्री म्हणजे वाकनीस. याच्याकडे खासगीकडील व्यवस्था असे. अठरा कारखाने, बारा महाल, हुजूरपागा व जिलेबीचे पायदळ यांचा बंदोबस्त नीट राहातो किंवा कसें तें यानें पाहावें खासगीकडील दप्तर व पत्रव्यवहार यांच्यावरही ह्या प्रधानाची देखरेख असे. हा आणखी राजाची दररोजची कृत्ये व राज्यात होणाऱ्या घडामोडी यांची नोंद ठेवी. शिवाय राजांचे आमंत्रित पाहुणे किंवा भेटीस येणारे लोक यांच्या तैनातीचे लोक व मानकरी यांच्यावर त्याची सक्त नजर असे. यामुळे राजाचा घात करण्यास कोणाला सवड मिळत नसे.

(६) सुमंत म्हणजे डबीर. ह्याच्याकडे परमुलखाशीं होणाऱ्या एकंदर व्यवहाराची देखरेख असे. अन्य राजांशी साम किंवा युद्ध करण्याच्या वगैरे बाबतीत राजाला योग्य सल्ला हा देत असे. परराष्ट्रातील बातमी काढण्याचे व परराष्ट्रांच्या वकिलांशी बोलणे वगैरे करण्याचे काम याचे असे. परराजांकडून येणारे खलिते व जासूद व त्यांस सरकारातून जाणारे खलिते व जासूद यांची व्यवस्था लावण्याचे काम याजकडे असे.

(७) न्यायशास्त्री किंवा पंडितराव. ह्याने राजास प्रसंगोपात्त शास्त्रार्थ सांगावे, जातीजातींचे बखेडे निवडावें आणि देवस्थाने व सत्पुरुष यांस दिलेल्या नेमणूकांची व्यवस्था पाहावी. त्याचप्रमाणें सरकारांतून होणारे धर्मादाय व धर्मविधी यांची व्यवस्था याने पाहावी. फौजदारी खटल्यांत प्रजेस धर्मशास्त्रानुसार न्याय मिळतो कीं कसें हें पाहावे आणि कोणी धर्मबाह्य आचरण केले किंवा कांहीं अत्याचार केला तर त्यास शासन करावे व प्रायश्चित्त सांगावे.

(८) न्यायाधीश. याच्याकडे हरएक मुलकी व दिवाणी खटल्यांसंबंधानें लोकांस योग्य न्याय मिळत आहे कीं कसें तें पाहण्याचे काम असें. पंचांच्या किंवा मुलकी अधिकाऱ्यांच्या हातून मिळालेला न्याय कोणास बरोबर न वाटल्यास त्यानें हुजुरास अर्ज करावा व त्याचा निकाल ह्या प्रधानाने पुरावा पाहून द्यावा, असें असे. जमिनीचे हक्क, ग्रामाध्यक्षत्वाचे हक्क इत्यादिकांसंबंधाचे निकाल ह्या प्रधानाच्या सहीने जाहीर होत.

ही अशी स्वराज्यांतील सर्व खात्यांची व्यवस्था निरनिराळ्या प्रधानांकडे सोपविलेली असे.[१] त्यामुळें जो तो आपआपले काम नीट हुशारीने करण्यास झटत असे. एखादे तसेंच बिकट प्रकरण असलें तर त्याची सुनावणी ह्या प्रधानांनी महाराजांपाशीं पहिल्याने एकांती करावी. त्या प्रकरणाचा ज्या अधिकाऱ्यांशी संबंध असे त्यासही हुजूर बोलवावें. ह्याप्रमाणें एकांती खलबत झाल्यावर इष्ट दिसल्यास त्याचा खल पुनः प्रधानमंडळांत व्हावा. ज्यांत सर्व राज्याचा संबंध असे अशा बाबींची वाटाघाट प्रधानमंडळांत होऊन त्यांची शहानिशा सर्वानुमतें होत असे. असा त्यांच्यावर विश्वास टाकल्यामुळें व त्यांच्या मसलतीस योग्य मान दिल्यामुळे जो तो आपआपले कर्तव्य हुशारीने व दक्षतेने करण्यास झटून स्वराज्याचें व छत्रपतींचें मनापासून हित व उत्कर्ष इच्छीत असे.

ह्या प्रधानमंडळापैकीं सेनापतीखेरीज इतर सारे ब्राह्मण असत आणि पंडितराव व न्यायाधीश ह्या प्रधानद्वयाखेरीज बाकीच्यांस लष्करी नोकरीतही निष्णात असावें लागे. त्या धामधुमीच्या काळांत सतत संगरावस्था असल्यामुळें सर्वांसच युद्धकलानिपुण असणें प्राप्त असे. प्रसंग येईल त्या प्रमाणें ह्या सरदारांस तलवार बांधून युद्धास जावे लागे. राजाकडून जाणाऱ्या प्रत्येक खलित्यावर, आज्ञापत्रावर व तहनाम्यावर महाराज व मुख्यप्रधान यांचे शिक्केमोर्तब होऊन आणखी चार प्रधानांच्या सह्या व्हाव्या असें असे. हा मान सेनापती, पंडितराव व न्यायाधीश याखेरीज बाकीच्या प्रधानांस असे. ह्या सर्व प्रधानांस एक एक मुतालिक दिलेला असे. प्रधान स्वारीवर गेले म्हणजे त्यांच्या मागें त्यांच्या सगळ्या कामांची व्यवस्था ह्या मुतालिकांनी प्रमुखपणें पाहावी असें असे. त्यांच्या धन्यांचे शिक्केमोर्तब त्यांच्या हातीं असत परंतु एखादे तसेच महत्त्वाचें काम असलें तर त्याचा निकाल त्यांनी आपल्या वरिष्ठांच्या अनुमतीवाचून लावू नये असें असे. ह्या मुतालिकांच्या हाताखालीं दुसरे सात कामदार असत. त्यांची नावे येणेंप्रमाणें (१) मुजुमदार. ह्यांच्यापाशीं जमाखर्चाचे काम असे. (२) फडणीस. हा मुजुमदाराचा दुय्यम असे. (३) सबनीस किंवा दफ्तरदार. ह्याजपाशीं दफ्तर ठेवण्याचे काम असे. (४) चिटणीस. ह्याच्यापाशीं सर्व पत्रव्यवहाराचे काम असे. (५) कारखानीस. ह्याच्यापाशीं सगळ्या कोठीची व दाण्यागल्यांची व्यवस्था पाहण्याचे काम असे. (६) जामदार. यांजकडे नगदी खेरीज करून एकदर चीजवस्तूंचा संग्रह करण्याचे काम असे आणि (७) पोतनीस. याच्या ताब्यात सर्व रोकड असे. ह्या सर्व कामदाराच्या हाताखाली अर्थात् कामाच्या मानाने कमीजास्त कारकून असत. खुद्द खाशांच्या तैनातीस एक चिटणीस, एक फडणीस, एक पारसनीस व एक पोतनीस असे असत. चिटणीस बाळाजी आबाजी हा विश्वासू प्रभू गृहस्थ होता हे मागें सांगितलेच आहे. फडणीस बाळकृष्णपंत हणुमंते हा होता. हा शहाजीराजांचा मुख्य कारभारी जो हणमंते त्याचा निकट संबंधी होता. पारसनीस कोण होता हें कळत नाहीं. तरी हा पारशी भाषेतील पत्रे व खलिते वाचून त्याचा अर्थ सांगण्याकरिता, कोणास त्या भाषेत पत्रे वगैरे पाठविणे झाल्यास तीं लिहिण्याकरितां नेमलेला होता. त्याचा पोतनीस श्रीगोंद्याचा शेशावा नाईक पुंडे याचा नातू होता. मालोजी राजांनी वारुळात मिळालेले द्रव्य ह्या शेशावा नाइकाच्या घरी ठेवले तेव्हां त्यानें त्यांजपासून असें वचन घेतलें होतें कीं, 'आम्हांस राज्यप्राप्ती झाली असता आम्ही तुम्हाला पोतनीस करू. ह्या वचनाची पूर्तता महाराजांनी त्याच्या नातवास आपली पोतनिशी देऊन केली.

---

१ ह्या प्रधानांची वार्षिक वेतने येणेंप्रमाणें होतीं. मुख्य प्रधान, पंत अमात्य आणि पंतसचिव यांस प्रत्येकी पंधरा हजार होन आणि मंत्री, सुमंत, सेनापती, न्यायाधीश व पंडीतराव यांस प्रत्येकी दहा हजार होन देत असत.

ही अशी स्वराज्यातील एकंदर खात्यांची व्यवस्था निरनिराळ्या प्रधानांच्या हातीं देऊन आपल्या खासगत दौलतीची व्यवस्था नीट लागावी म्हणून महाराजांनी द्वादश कोश (बारा महाल) व अष्टादश शाला (अठरा कारखाने) स्थापिल्या. द्वादश कोशाची नावें येणेंप्रमाणें होती : अंतःपुर (दरुनी महाल), द्रव्यभांडार (महाल पोतें), धान्यागार (महाल कोठी), अश्वधन (महाल पागा) गोधन (महाल थटी), आरामक्षेत्रे (महाल शेरीबाग), महाल टंकशाला, महाल शिबिकादी याने, महाल इमारत, महाल सौदागिरी, महाल छबिना आणि वसनागर (जामदारखाना) अष्टादश शालांची नावे येणेंप्रमाणें होती गजशाला (पीलखाना). मल्लशाला (तालीमखाना), धान्यसंग्रह (आंबारखाना), भेरिदुदंभी (नगारखाना), यंत्रशाला(तोफखाना).वैद्यशाला(शरबतखाना), पानीयशाला (आंबदारखाना), उष्ट्रशाला (शुतरखाना). शिबिरशाला (फरासखाना), खटकशाला (शिकारखाना), रत्नशाला (जवाहिरखाना), पाकशाला (मुदपाकखाना), शस्त्रशाला (शिलेखाना), तांबूलशाला (शराफखाना). रथशाला (गाडीखाना). लेखनशाला (दफ्तरखाना), नाटकशाला (नटखाना) आणि जिनसखाना. ह्या सर्व कोशांवर व शालांवर दरोगे, कारकून, हवालदार इत्यादिकांची यथायोग्य नेमणूक केलेली असे.

ही जशी आपली खासगी संबंधाची व्यवस्था महाराजांनी लावली असे तशीच जिजाबाई मातुश्रीच्या संबंधाची व्यवस्था त्यांनी नीट लावून दिली होती. तिच्या सेवेस हुशार माणूस व बायका ठेवून दिल्या होत्या. तिच्या चौकीस शिपाई, प्यादे व बायका नेमल्या होत्या. पुजारी, पुराणिक वगैरे ब्राह्मण तिच्यासाठी वेगळे नेमून दिले असून त्यांनी देवपूजा, पुराणपठण, अनुष्ठानें वगैरे करावी असें असे. तिच्या दानधर्मास पुष्कळ तनखा लावून दिला होता. एक दिवाण, एक चिटणीस, एक फडणीस, एक पोतनीस असे कामगार व इतर कारकून मंडळी तिच्या एकंदर व्यवहाराची व्यवस्था लावण्यासाठीं नेमली होती. तिला कोणत्याही गोष्टीची उणीव वाटूं नये व तिच्या सुखासमाधानांत यत्किंचितही अंतर पडूं नये ह्याविषयी महाराज मनःपूर्वक जपत.

येथे कथानुषंगाने महाराजांच्या दरबाराच्या रचनेची थोडीशी माहिती देणे इष्ट दिसते. दरबारात मध्यभागी मांडलेल्या सिंहासनावर छत्रपती शिवराय अधिष्ठीत झाले म्हणजे त्यांच्या मागे हुजरे, मोर्चेले चांमरे, पंखे, पानदाने इत्यादी घेऊन उभे राहात असत. सिंहासनाच्या पार्श्वभागी अत्यंत विश्वासू असे कित्येक आप्तजन उभे राहात. सिंहासनाजवळ खाली उजव्या रांगेत मुख्यप्रधान, पंतअमात्य, पंतसचिव, मंत्री, चिटणीस व पर‌राज्यातील वकील अनुक्रमे बसत असत आणि डाव्या रांगेत सेनापती, सुमंत, न्यायाधीश, पंडितराव, फडणीस, सेनाधिकारी, सरदार व नामांकित शूरपुरुष बसत असत. प्रधानमंडळाचे मुतालिक व कारकून आपापल्या मालकांच्या मागे बसत आणि महाराजांच्या द्वादशकोशांचे व अष्टादश कारखान्यांचे अधिकारी सिंहासनाच्या दोन्ही बाजूस मागे उभे असत. इतर कारभारी, तालुकादार, मामलतदार, किल्लेदार वगैरे आमदारांच्या जागा दरबारांत ठरलेल्या असत. दरबारांत राजदर्शनास कोणाला जावयाचे असल्यास त्यांची वर्दी आत पोहोचवून त्यांस त्याच्या योग्यतेप्रमाणे बसविण्याचे काम चोपदार दरबाराच्या द्वारापाशी उभे राहून करीत.

आतां त्यांनीं आपल्या लष्कराची व्यवस्था कशी केली होती तें पाहूं पायदळात मुख्य दोन प्रकारचे लोक असत– एक घाटमाथ्यावरचे मावळे आणि दुसरे घाटाखालील कोंकणांतले हेटकरी. मावळे तरवारबहाद्दर असत व हेटकरी अचूक नेम मारण्यांत कुशल असत. प्रत्येकापाशी ढालतलवार व बंदूक ही शस्त्रे असत. ही हत्यारे त्यांनी स्वतःची आणावी असा बहुतेक नियम असे. त्यांस लागणारा दारूगोळा मात्र सरकारांतून मिळत असे. त्यांचा पोषाख मुख्यतः म्हटला म्हणजे मांडचोळणा असून कंबरेला काचा कसलेला असे व त्यावरून एक उपरणे गुंडाळले असे. कित्येकांच्या अंगांत रूदार अंगरखा असे व डोक्यास पागोटे असे. हे मावळे व हेटकरी सर्वदा डोंगराळ प्रदेशांत राहणारे असल्याकारणानें अवघड डोंगरांवर व कड्यांवर चढण्यात ते अत्यंत कुशल असत. असे चपळ लोक कोणत्याही प्रांतांत किंवा देशांत आढळणे नाही असें म्हटल्यास अत्युक्ती होणार नाही.

पायदळांत दहा माणसांचा एक दाहिजा केलेला असे. त्यांत नऊ पाईक किंवा शिपाई व एक नाईक असे असत. अशा पाच दाहिज्यावर किंवा नायकावर एक हवालदार असे. दोन हवालदारांवर एक जुमलेदार असे. दहा जुमलेदारांवर एक हजारी असे.[१] ह्याशिवाय कांहीं पाच हजारी[२] सरदार असत. हे सगळे हजारी व पंचहजारी सरदार सरनोबताच्या हुकमांत असत. पायदळांतील कांही शिपायांच्या हाती तिरकमठे, पट्टे, इटे, बरच्या व सांग असत व कांही खास बारदार असत. ह्याप्रमाणें जो ज्या शस्त्राच्या कारवींत कुशल असे त्यानें तें शस्त्र वागवावें असा नियम असे. ही हत्यारे त्यांनी आपल्या खर्चाने घ्यावी असे असे. दारूगोळा मात्र त्यांना सरकारातून पुरवीत असत. शिपायांस व नायकास दरमहा एक, दोन किंवा तीन होन पगार असे. जुमलेदारास वर्षाची शंभर होन तैनात असे. आणि हजारी सरदारास पाचशे होन तैनात असे आणि पाच हजारीस सालीना अडीच हजार होन तैनात असून त्याला सरकारांतून पालखी, अबदागीर वगैरे नेमणूक असे.

घोडदळांत दोन प्रकारचे लोक असत–एक बारगीर व दुसरे शिलेदार. बारगिरांच्या घोडदळास पागा अशी संज्ञा असे. पागेंतील सगळीं घोडीं सरकारी असत व त्यांची निगा सरकारामार्फत होत असे. शिलेदारांच्या घोडदळातील घोडी प्रत्येक शिलेदाराने आपआपली आणावीं व त्यांची जोपासना ज्याची त्यानें करावी असें असे. त्याबद्दल त्याला सरकारांतून जादा तैनात मिळत असे. हें शिलेदारांचे घोडदळ ठेवण्याची पद्धत यवनी पादशाहतींतील होती. ही महाराजांस फारशी आवडत नसे. कारण अशाने घोडी राहावी तशी हुशार राहत नसत व कोणी शिलेदार चाकरीस कंटाळला असतां तो आपल्या घोड्यासकट निघून जाण्याचा संभव असे. यास्तव ह्या शिलेदारांची संख्या कमी करण्याचे धोरण महाराजांचे नेहमी असे. अशी शिलेदारी करून उदरनिर्वाह करणाऱ्या लोकांचीच संख्या त्या काळी पुष्कळ असल्याकारणानें महाराजांस त्याला ह्या अटीवर नोकरीस ठेवणे प्राप्त असे. कोणी शिलेदार आपलीं घोडी सरकारास देण्यास राजी झाले असतां त्यांच्या योग्य किंमती ठरवून त्या त्यांस देऊन ती घोडी पागेस लावीत व अशा शिलेदारांस खासपागेंत नोकरीस ठेवीत. सरकारी घोड्यांच्या मागल्या चौकांवर ओळखीसाठी शिक्के मारीत असत. घोडेस्वारांच्या पायांत तंग तुमान असून अंगांत रूदार अंगरखा असे. कंबरेस शेला गुंडाळलेला असे व डोकीस पागोटे असून तें दौडीच्या कामांत पडूं नये म्हणून त्याचा एक लपा हनवटीखालून घेतलेला असे. तरवार कंबरेच्या शेल्यांत अडकवलेली असे व पाठीस ढाल लटकावलेली असे. सर्वांच्या हातांत भाले असत व कांहींकांच्या हातांत बंदुका असत. ही सगळी शस्त्रे ज्यांची त्यांनी आणावी असा बहुतेक नियम असे. बारगिरांस दारूगोळा सरकारांतून मिळत असे व शिलेदारांनी तो आपल्या पदरचा आणावा असें असे.

पंचवीस बारगीर किंवा शिलेदार यांजवर एक हवालदार असे. पाच हवालदारावर एक जुमलेदार असे. पाच जुमलेदारांवर एक सुभेदार असे.[३] अशा दहा सुभेदारांवर एक पाच हजारी असे. हे सगळे सुभेदार व पांच हजारी सरनोबताच्या हुकमांत असत. घोडदळाचा सरनोबत अर्थात् निराळा असे. पचवीस घोड्यांस एक पखाली व एक नालबंद असे. हवालदाराने आपल्या ताव्यांतील घोड्यांस दाणावैरण वगैरे नीट मिळून त्यांची चाकरीचुकरी बरोबर होते किंवा कसें तें पाहावे व त्याच्या सामानासुमानाचा बंदोबस्त ठेवावा असें असे. घोडदळातील प्रत्येक बारगिरास त्याच्या दर्जाप्रमाणें दोनपासून पाच होनपर्यंत पगार असे. शिलेदारास सहापासून बारा होनपर्यंत पगार असे. जुमलेदारास[४] वीस होन पगार असे. सुभेदारास वर्षाची एक हजार होन तैनात असे व त्याला पालखीबद्दल नेमणूक असे.

---

१ चिटणीस म्हणतो कीं, मावळ्यांच्या पायदळात पाच हवालदारावर एक जुमलेदार असे व पाच जुमलेदारांवर एक हजारी सरदार असे.

२ महाराजाच्या लष्करात पाच हजारी कोणी नसून सात हजारी मात्र असत, असें कित्येकांचे म्हणणे आहे.

३ कित्येकांच्या मते दहा जुमल्यांस एक हजारी असे, व अशा पाच हजारांवर एक पाच हजारी असे.

४ सभासद म्हणतो की, जुमलेदारास पाचशे होन तैनात व पालखी यांची नेमणूक असे.

पांच हजारीस वर्षाची दोन हजार होन तैनात असून पालखी आणि अबदागिरी यांची नेमणूक असे. शिलेदारांचे सुभेदार अर्थात् निराळे असून ते सगळे सरनोबताच्या हुकमांत असत. प्रत्येक सुभेदार, पांच हजारी व सरनोबत यांच्यापाशी जारू व हरकारे असत.

ह्या लष्कराशिवाय आणखी महाराजांनी आपल्या स्वारीबरोबर जिलबीचे पाच हजार लोक ठेवलेले असत. हे असे निराळे नेमण्याचे कारण अर्थात् असें होतें कीं, महाराज यवनपादशाहांचे दावेदार असल्यामुळें त्यांच्यावर केव्हा काय प्रसंग येईल याचा नेम नसे. यास्तव खाशाच्या रक्षणासाठी नेहमी जय्यत असे लोक ठेवणे इष्ट असे. महाराजांनी मावळ्यांची पाहणी करून त्यांची निवडक पथके केलीं. त्यांचे तीस, चाळीस, साठ, शंभर असे जेथे करून त्यांजवर चांगले शूर, मर्द व इमानी सरदार नेमले. ह्या जिलबीच्या पायदळास सरकारातून उंची पोषाख मिळत. तें त्यांनी स्वारीच्या वेळेस घालावे असें असे. त्यांच्या डोकीस मंदील, अंगांत घालावयास सकलादी अंगरखे व अंगावर घ्यावयास ताडपदरी किंवा पैठणी पासोडे दिलेले असत. कोणास सोन्याचीं कडी, रुप्याच्या मोहनमाला, कोणास कंठ्या असे अलंकार घालावयास दिलेले असत. त्यांच्या हत्यारांस कट, अबनाल, तहनाल वगैरे सोन्याचे करून दिले असत. ह्या हुजूरपायदळाप्रमाणेंच हुजूरपागाही केली होती. तींत पाच हजार घोडी असत. त्यांचें जीनसामान सोन्यारुप्याचे असें व त्यावरील करोल किंवा स्वार चांगले हुशार व शूर बारगीर पाहून ठेवलेले असत ह्याशिवाय आणखी दोन उमदी घोडी खाशांसाठी म्हणून निराळी ठेवलेलीं असत. ह्या घोड्यांवरील जीनसामान फारच उंची असे. खाशांची स्वारी निघाली म्हणजे ह्या उभय प्रकारच्या हुजूरसेनेंतील लोकांनी ठरलेल्या पद्धतीने मागें, पुढें व दोन्ही बाजूंस अंतराअंतरानें चालावे असें असे.

घोडदळांतील व पायदळांतील प्रत्येक माणूस महाराज स्वत: पाहून पारखून ठेवीत. लष्करांत नवीन नोकरीस लागणाऱ्या प्रत्येक मनुष्याने जुन्या शिपायाची खात्री द्यावी लागत असे. अशा खात्री देणाऱ्या शिपायाकडून जामीनपत्र लिहून घेत असत. जुमलेदार, सुभेदार, हजारी व पांच हजारी सरदार नेमावयाचे ते चांगले शूर, मर्द, कुलीन व युद्धाच्या कामांत पुरे कसलेले मराठे पाहून नेमत असत. प्रत्येक सुभेदाराच्या व हजारी सरदाराच्या हाताखालीं एक ब्राह्मण सबनीस व एक प्रभू कारखानीस किंवा ब्राह्मण मुजुमदार व प्रभू जाबनीस असे हुद्देदार दिले असत. त्याप्रमाणेंच पांच हजारी सरदारांस एक दिवाण, एक सबनीस व एक कारखानीस असे हुद्देदार दिलेले असत. ह्या हुद्देदारांच्या हाताखाली कमीजास्त कारकून असत. ह्याशिवाय आणखी लागतील तेवढे कारकून हे सरदार आपल्या खर्चाने ठेवत. सुभेदारांस व हजारी सरदारांस अशी सक्त ताकीद असे कीं, त्यांनीं आपल्या हाताखालच्या लोकांस वेतन वगैरे वेळच्यावेळी मिळतात की कसें तें पाहावे.

आता स्वराज्यांतील किल्ल्यांचा बंदोबस्त कसा केला होता तें पाहूं. महाराजांच्या ताब्यांत सुमारे २८० किल्ले होते असें बखरकारांनीं दिलेल्या याद्यांवरून दिसून येतें. ह्या किल्ल्यांचे व विशेषत: डोंगरी किल्ले, ज्यांना गड म्हणत त्यांचे महत्त्व महाराजांस विशेष वाटे. कारण काबीज केलेल्या प्रांताचे रक्षण यथास्थित व्हावयास ह्या किल्ल्यांची आवश्यकता त्या धामधुमीच्या काळांत अतिशयित होती. कसाही मोठा शत्रू आला तरी त्यास न जुमानता ह्या किल्ल्याच्या आश्रयाने त्याच्याशीं महिन्यांचे महिने व वर्षांचीं वर्षे लढत राहण्याचे सामर्थ्य येत असे. कारण किल्ले बहुश: अवघड डोंगरावर बांधले असून त्यावर जावयास एखादी दुसरी वाट असे आणि बाकीचे चढाव सोपे असल्यामुळे ते सगळे सुरुंग वगैरे लावून तासून काढून उभ्या सुळासारखे केलेले असल्यामुळे ते निखालस बेलाग असत. गलीम जवळ आला असता वाट बंद केली म्हणजे किल्ल्यावर फार थोडे लोक असले तरी त्यांचे काहीएक चालत नसे आणि प्रत्येक किल्ल्यावर दाणागोटा, दारुगोळा व इतर निर्वाहाच्या व उपयोगाच्या वस्तू यांचा साठा नेहमी भरपूर असे. शत्रूवर मैदान-प्रदेशांत हल्ला करून तो जेरीस न येई तर त्याच्या हातातून निसटून ह्या किल्ल्यांत सुरक्षित येऊन राहण्याची उत्तम सोय असे. ह्या किल्ल्यांच्या आसपास असलेल्या प्रांतांवर शत्रूचा अंमल कदापि बसण्याचा संभव नसे.

कारण त्याच्यावर वाटेल त्या रीतीनें हल्ले करून त्याचा उठावा करण्यास ह्या किल्ल्यांच्या आश्रयाने चांगले साधत असे. इतकेंच नव्हे तर थोड्या लोकांच्या साहाय्याने शत्रूच्या मोठमोठ्या सैन्यांशी टक्कर देण्याचे सामर्थ्य ह्या किल्ल्यांच्या योगाने चांगले येत असे. सारांश, हे किल्लेस्वराज्याचे केवळ जीवप्राण आहेत असें महाराजांस वाटणे साहजिक असे. म्हणूनच ह्या किल्ल्यांची डागडुजी करण्यास व नवे किल्ले योग्य जागी बांधण्यास कितीही पैका लागला तरी तो खर्चण्यास महाराज सर्वदा तत्पर असत. पदरच्या कित्येक लोकांनी एकदा महाराजांस असा अर्ज केला कीं, 'किल्ले'[१] बहुत झाले. त्यांच्यामागे पैका विनाकारण खर्च होत आहे!' त्यांस त्यांनी असा जबाब दिला कीं, 'जसा कुळंबी शेतास माळा घालून ते राखतो तसे किल्ले राज्याच्या रक्षणासाठी आहेत तारवांस खिळे मारुन बळकट करतात तशी राज्यास बळकटी किल्ल्यांची आहे. किल्ल्यांच्या योगाने औरंगशहासारख्याची उमर गुजरून जाईल. आम्हाला धर्मसंस्थापना व राज्यसंस्थापना करणे आहे. सर्वांस अन्नास लावून त्यांचा बचाव करावयाचा आहे. दिल्लीचा बादशहा आमच्या स्वराज्याचा नाश करावयास टपला आहे. त्याची स्वारी आमच्यावर झाली तर त्याला जुनेनवे ३६० किल्ले आहेत. एकएक किल्ला तो वर्ष वर्ष लढला तरी त्यास ३६० वर्षे लागतील!' हे असे किल्ल्याचे महत्त्व त्यांस वाटत असल्याकारणाने त्यांनी त्यांची व्यवस्था फार बारकाईने लावून दिली होती.

प्रत्येक किल्ल्यावर चांगला इतबारी, घरंदाज, कुलीन, मर्द व शहाणा असा मराठा पाहून त्यास हवालदार नेमीत. त्याच्या हाताखाली एक सरनोबत, एक किंवा अनेक तटसरनोबत[२] असे अंमलदार चांगले हुशार मराठे पाहून ठेवीत. ह्याशिवाय आणखी एक सुभेदार, एक सबनीस, एक फडणीस व एक कारखानीस असे हुद्देदार असत. सुभेदार, फडणीस व सबनीस हे बहुतकरून ब्राह्मण जातीचे असत व कारखानीस जातीचा प्रभू असे. हे सगळे कामगार चांगले विश्वासू, शहाणे व स्वामी सेवातत्पर असे पाहून ठेवीत. त्यांची खात्री हुजुरच्या कारभाऱ्यांनी किंवा कोणीं मोठ्या दर्ज्याच्या सरदाराने द्यावी लागत असे. हवालदाराकडे किल्ल्याचा एकंदर कारभार असे. त्याच्या हुकूमात इतर हुद्देदारांनी वागावे असें असे. किल्ल्याच्या दरवाजाच्या चाव्या त्याच्यापाशीं असत. किल्ल्यास लागणारे सामानसुमान, दारूगोळा व दाणागल्ला ही त्याच्या विद्यमाने आणीत. शिक्कामोर्तब त्याच्या नावे असे. किल्ल्यावर ठेवलेल्या लष्कराचा एकंदर बंदोबस्त त्याच्याकडे असे. रोखापत्र करणें, सरकारी खलिते येणे ते सगळे त्याच्या नांवे होत. सुभेदाराकडे मुलकी कारभार असे. आसपासच्या गांवांच्या वसुलाची व्यवस्था त्याजकडे असे. हा सगळा कारभार त्यानें हवालदाराच्या अनुमतें करावा असे असे. सबनिसाकडे किल्ल्यासंबंधाचें लिहिणें करण्याचें काम असे. किल्ल्यावरील लोकांची हजिरी व चौकशी त्यानें करावी असें असे. कारखाननिसाकडे कोठीची व दारूगोळ्याची व्यवस्था असे. त्यांचा सगळा हिशोब तो ठेवी. लोकांस रोजमुरा त्याने वाटावा व किल्ल्याच्या इमारतींची देखरेख व दुरुस्ती ठेवावी असें असे. ह्याप्रमाणें प्रत्येक किल्ल्यासंबंधाची कामे निरनिराळ्या मुख्य जातींच्या हातीं ठेवल्यामुळे दगाफटका होण्याची फारशी भीती नसे. किल्ल्यावर लष्कर ठेवावयाचे तें त्याचें महत्त्व पाहून कमीजास्त ठेवीत. याशिवाय आणखी त्यावर कायमची वस्ती असे ह्याप्रमाणे एक किल्ला म्हणजे एक लहानसा स्वतंत्र राज्यविभाग मानीत. किल्ल्यातील फौज बाहेर लढाईवर गेली म्हणजे सुभेदार व कारखानीस हे किल्ल्याची डागडुजी करून त्यावर सामनसुमानाचा व पैशाचा पुरवठा करण्यात गुंतले असत. कारण बाहेरील फौजेस सामानसुमान पुरविण्याची पाळी कोणत्या किल्ल्यास केंव्हा येईल याचा नेम नसे. एकंदरीत पाहता किल्ल्याच्या व्यवस्थेसंबंधाचे सगळे नियम अगदी बारकाईने ठरविलेले असून प्रत्येक कामदाराने ते पाळण्याविषयी त्यांची अगदी कडक शिस्त असे. किल्ल्यांच्या बंदोबस्ताकडे त्याचा खर्च फारच काटकसरीचा असे. प्रत्येक किल्ल्याच्या मगदुराप्रमाणे त्यात अन्नादी सामुग्री, दारूगोळा वगैरेची तरतूद नीट आहे की कसे त्याची तपासणी ते वेळोवेळी करत.

---

१ पुढे एकतिसाव्या भागात ही यादी दिलेली आहे.

२ पुरंदर, सिंहगड, प्रतापगड वगैरे कांहीं किल्ल्यांच्या प्रत्येक बाजूला एक-एक तट सरनोबत नेमिला असून त्यांना तट वाटून दिलेला असे.

हा झाला किल्ल्यावरील बंदोबस्त. आतां किल्ल्याच्या तटाखालील डोंगराचा व त्यांच्या पायथ्यांचा बंदोबस्त कसा काय ठेविलेला असे तें पाहूं. तटाखालीं किल्ल्यांच्या माचीमाचीला मेठें असत. तीं राखण्यासाठी जागोजागी मेठकरी ठेवलेले असत. त्यांनी आपआपल्या चौक्यांवर रात्रंदिवस राहून आसपास शत्रूची काही हालचाल होत असल्यास तिच्यावर नजर ठेवावी व तेथलें रान राखावें असें असे. किल्ल्याच्या पायथ्याशी वाटावर नाक्यानाक्यांनी रामोशी, परवारी, महार, मांग, बेरड वगैरे लोकांच्या चौक्या असत. त्यांनी हरएक प्रकारची बातमी ठेवून काही कमीजास्त असल्यास त्याची वर्दी तत्काळ किल्लेदारास द्यावी व त्यास सावध करावे, किल्ल्यासंबंधानें कोणी भेद काढावयास आलें असतां त्यास भलतेच काहीं तरी सांगून चकवावें व शत्रूचे लोक किल्ल्याच्या आसपास घिरट्या घालू लागले असतां ते थोडे असल्यास त्यांच्यावर अकस्मात् घाले घालून त्यांस कापून काढावे.

संध्याकाळ झाली म्हणजे किल्ल्याचा दरवाजा बंद करून त्यास कुलूप लावावे, हवालदाराने जातीनें येऊन तें ओढून पाहावें व किल्ल्या घेऊन जाऊन आपल्या उशास ठेवाव्या. किल्ल्यावरील अंमलदारांनी रात्रीची सर्व किल्ल्यासभोंवतीं पाळीपाळीनें गस्त घालावी. जागोजाग पाहारे बरोबर आहेत कीं कसें ते हवालदाराने रात्रीस एकदोन वेळा स्वत: येऊन पाहावे. सरनोबतानें गस्तीच्या लोकांची देखरेख ठेवावी. किल्ल्याच्या दोनचार नाजूक जागी ठेवलेल्या रखवालदारांची चौकशी तटसरनोबतांने करावी. हवालदाराने रात्रंदिवस सदरेस हत्यारबंद लोकांसह जागरूक राहावें. विशेषत: रात्रीच्या वेळीं बिलकूल गाफील राहू नये. ह्या सगळ्या हुद्देदाराच्या व अमलदारांच्या वागणुकीचे जाबतेकानू करून ठेवलेले असत. त्याबरहुकूम सर्वांनी वागण्यात बिलकूल कसूर करूं नये असें असे. एकमेकांनी एकमेकांच्या कामांत सहसा हात घालू नये; ज्यास जीं कामे नेमून दिली असत तीं त्यानें दक्षतेने व हुशारीने करावी असें असे. कोणी कांहीं बाचाबाची केल्यास किंवा आपल्या कामांत ढिलाई केल्यास त्याला मोठे शासन होत असे.

किल्ल्यावरील लोकांस अडिस्त्री, नगदी वगैरे वेतन वेळच्या वेळीं पावतें व्हावें, त्यांची नाराजी कोणत्याही कारणानें होऊं नये, असा सक्त बंदोबस्त ठेवलेला असे. किल्ल्यावर दाणागल्ला, लाकूडफाटे, दारूगोळा, कुटलेला चुना वगैरे नेहमीं लागणाऱ्या जिनसांची बेगमी दोन चार वर्षे पुरेल इतकी करून ठेवीत. अमक्या किल्ल्यास अमके सामान किल्ल्यावर पोहोचावे असे धारे बांधून दिलेले असत. किल्ल्यांचे चढाव जेथे सोपे होते तेथें ते तासून, सुरूंग लावून व इमारती करून बेलाग करविलेले असत. ह्या संबंधाची एक चमत्कारिक गोष्ट सांगतात ती अशी : आपले राजधानीचे स्थान सुरक्षित असावें व त्यावर शत्रूचा गिल्ला सहसा होऊ नये, यासाठी महाराजांनी रायगड किल्ल्याची चांगली मजबूती करून तें ठिकाण आपली राजधानी केलें. हा किल्ला सर्व बाजूनी बेलाग करून त्यावर जावयास एकच वाट ठेवली आणि असें जाहीर केलें कीं, ह्या वाटेखेरीज दुसऱ्या वाटेने जो कोणी किल्ल्यावर चढून जाऊन तेथे निशाण लावील त्यास शंभर होन व एक सोन्याचे कडे बक्षीस देण्यात येईल. ह्या जाहिरातीवरून एका धेडानें किल्ल्यावर एका अती कठीण वाटनें चढून जाऊन निशाण लावले. त्यावरून त्यास ठरले बक्षीस दिले; पण त्याचे पाय तोडले आणि ती वाट साफ बुजवून टाकली. आतां ह्या हवालदार, सुभेदार, तटसरनोबत वगैरे कामगारास तैनाती काय असत हें कळत नाहीं. हवालदारास पालखी व दिवटी यांची नेमणूक असे. किल्ल्यावर लष्कर असे त्यास इतर लष्कराप्रमाणेंच वेतनें मिळत असत. प्रत्येक किल्ल्याच्या रक्षणासाठीं लष्कराशिवाय आणखी जे कांहीं मेठकरी, रामोशी, परवारी, महार, मांग, बेरड वगैरे लोक ठेवलेले असत, त्यांस नियमित वेतने करून दिलेलीं नसत तर किल्ल्याच्या आसपासच्या जमिनी त्यांस लावून दिल्या होत्या. त्यांची नांगरणी, पेरणी करून त्यांनी उदारनिर्वाह करावा व त्याच जागी घरेदारे करून राहावें असें असे. ह्या अशा सर्व लोकांस गडकरी अशी संज्ञा असे. ह्या शहाणपणाच्या व्यवस्थेमुळें ह्या गडकऱ्यांस असें वाटे कीं, ह्या गडाचे आपण मोठ्या इमानाने रक्षण केलें पाहिजे, कारण ही आपली दूध पाजणारी आई आहे, ती शत्रूच्या हातीं गेली असतां आपल्या उत्पन्नावर गदा येऊन आपला नाश होईल. अशा समजुतीमुळे प्रत्येक गडावर पुष्कळ इमानी व शूर पुरुषांची वाढ होत गेली. जुन्या कसलेल्या वृद्ध शिपायाच्या चाकरीबद्दल त्यांस योग्य पारितोषिक द्यावयाचे म्हटलें म्हणजे त्यास गडावरील अंमलदारी द्यावी असा महाराजांचा परिपाठ असे.

प्रत्येक किल्ला आसपासच्या तालुक्याच्या निसबतीत लावून दिला असून त्यावर सामानासुमानाची भरती करण्याचें काम तालुकदारानें किंवा मामलतदारानें सुभेदाराच्या सल्ल्याने करावे असें असे. किल्ल्यावरील लोकांपैकी कोणाची तगिरी, बहाली किंवा गयाळी करणे ती हुजूरच्या आज्ञापत्राने करीत. त्याचा इतल्ला दुसऱ्या कोणाकडेही नसे.

आता तोफखान्याची व्यवस्था कशी केली होती तें पाहूं. ह्याच्या बंदोबस्ताकडे योग्य कामगार नेमलेले असत. त्यांच्या नांवांचा किंवा दर्जाचा उल्लेख कोठेंही आढळत नाहीं. निरनिराळ्या किल्ल्यांवर योग्य जागी तोफा लावून ठेवलेल्या असत. लष्कराबरोबर जाणाऱ्या तोफांसाठी मोठमोठे गाडे तयार करविलेले असत. त्याप्रमाणेंच दारूगोळ्यासाठी छकडे तयार करविले असत. हे गाडे व छकडे ओढण्यास लागणारे बैल पाळलेले असत. प्रसंगी अडचण पडू नये म्हणून प्रत्येक गाड्यास बैलांच्या दुहेरी जोड्या लष्कराबरोबर चालवीत. सुतार, लोहार, चांभार, रस्सीदार, तलफदार, गोलंदाज वगैरे कामकऱ्यांचा भरणा केला असे. कांही फारच जड तोफा असत त्या ओढण्याकडे हत्तींची योजना करीत. प्रत्येक तोफेस अमके गारदी पायदळ असावें असा नियम केलेला असे. तोफखान्याकडील अधिकाऱ्यांनी त्यास लागणाऱ्या दारूगोळा वगैरे सामानाची तरतूद नेहमी दक्षतेने ठेवावी असें असे. तोफा लावणें, काढणें वगैरे कामें करण्यास फारच जमावर्दी लागत असे; यास्तव ह्या कामात पुरे वाकबगार असेच लोक पाहून ठेवीत. निरनिराळ्या किल्ल्यांवर ठेवलेल्या तोफांखेरीज लष्कराबरोबर चालविण्यासाठीं सुमारें दोनशे तोफा गाड्यांवर घातलेल्या असत. ह्या फिरंगी, फ्रेंच, इंग्रज वगैरे परस्थ व्यापाऱ्यांकडून विकत घेऊन किंवा तहाच्या मिषाने घेऊन त्यांचा संग्रह करीत.

ह्याशिवाय आणखी महाराजांनी आरमार तयार केले होते. शेकडो लहानमोठी जहाजे बांधून त्यावर लढाऊ सामानाची चांगली व्यवस्था केली होती. ह्या आरमाराचे महाराजांस मोठे महत्त्व वाटत असे; परंतु त्याची व्यवस्था कशी काय लावली होती ते कोणत्याही बखरींत नमूद केलेले नाही. बारदेशापासून अलिबागपर्यंतच्या पश्चिम किनाऱ्यावर त्यांनी अनेक किल्ले व जंजिरे हस्तगत केले व नवीन बांधले आणि शिद्दी, मोगल, पोर्तुगीज, डच व इंग्रज यांच्या जहाजांवर आपला शह ठेऊन त्यांच्याकडून आपल्या सत्तेतील मुलखांस उपसर्ग लागू नये म्हणून त्यांनी हे आरमार तयार केले होते. शिवाय इतर दर्यावर्दी व्यापाऱ्यांप्रमाणे आपलाही व्यापार चालवावा अशी त्यांची इच्छा होता व तीस अनुसरून त्यांनी थोडासा आरंभही केला होता.

येथवर लष्कराच्या किल्ल्यांच्या व आरमाराच्या व्यवस्थेचें यथोपलब्ध वर्णन केले. आता काबीज केलेल्या मुलखाचा बंदोबस्त कसा केला होता ते पाहूं. स्वराज्यांतील मुलखाचे महाल व प्रांत असे विभाग केले होते. लाख, पाऊणलाख किंवा सवालाख रुपये उत्पन्न होई एवढे गांव एका महालांत मोडत. असे दोन किंवा तीन महाल मिळून एक प्रांत किंवा सुभा होत असे. प्रत्येक महालावर एक महालकरी असे. यासच तरफदार किंवा तालुकदार म्हणत. हा अधिकारी जातीचा ब्राह्मण किंवा प्रभू असे. प्रत्येक महालास एक मराठा हवालदार नेमलेला असे. प्रत्येक प्रांतावर किंवा सुभ्यावर एक सुभेदार नेमलेला असे. यासच मामलतदार म्हणत. सुभेदाराच्या ताब्यांत एकदोन किल्लेही असत. दोन किंवा तीन खेड्यावर एक कमावीसदार नेमलेला असे. त्यानें सरकारी वसूल महालकऱ्याच्या किंवा तालुकदाराच्या संमतीने जमा करून त्याचा हिशोब सुभेदाराच्या कचेरीस गुजरावा असें असे. सुभेदाराच्या हाताखाली एक मुजुमदार, एक चिटणीस, एक फडणीस, एक दफ्तरदार असे हुद्देदार हुजुरांतून नेमून दिले असत. ह्याशिवाय आणखी प्रत्येकाच्या हाताखाली कामाच्या मानानें कमीजास्त कारकून नेमलेले असत. महालकऱ्यांनीं कमावीसदारांच्या कामावर देखरेख ठेवावी व सुभेदारानें महालकऱ्यांवर हुकमत चालवावी असें असे. कोणाच्या कांही तक्रारी असल्यास त्याचा निकाल सुभेदारानें लावावा; फौजदारी खटले त्यानें निवडावे; दिवाणी खटले उपस्थित झाले असता त्यांचा निकाल गावपंचा कडून लावावा. पंचांच्या अशा निकालाबरहुकम लोकांकडून वागणूक करवावी. सरहद्दीच्या मुलखांत नेहमी धामधूम होण्याचा संभव असे. यास्तव त्या मुलखांतील महालकरी व सुभेदार यांच्या जिमेस पायदळ व स्वार दिलेले असत. वसूल केलेला दाणागल्ला व नगदी नाणे सुभेदारानें आपल्या हद्दींतील एखाद्या किल्ल्यांत सुरक्षित राहाण्यासाठी ठेवून

द्यावें असें असे. सुभेदारास चारशें होनांची वार्षिक तैनात असे. ह्याच मानानें इतर हुद्देदारांस कमीजास्त पगार असे. महालकरी व कमावीसदार यांस किती पगार मिळे तें कळत नाहीं.

स्वराज्यांतील एकंदर जमिनीची मोजणी करून ती लागवड करणाऱ्यांच्या नांवे लावून तिची नोंद महालकऱ्यांच्या दफ्तरीं असे. जमीन मापण्यासाठीं काठी केलेली असे. ती पाच हात पाच मुठी लांब असे. एका हाताची लांबी चौदा तसू असून एका काठीची लांबी ८२ तसू असे. वीस काड्यांचा एक बिघा व एकशेवीस बिघ्यांचा एक चावर असें मोजणीचें प्रमाण धरलेले असे. प्रत्येक बिघ्यास किती पीक व्हावें हें उभ्या पिकाची पाहणी करून ठरवीत. ह्या उत्पनाच्या पाच तक्षिमा करून तीन तक्षिमा जमिनीची लागवड करणाऱ्या शेतकऱ्यानें भोगाव्या व दोन तक्षिमा सरकारास द्याव्या असा करार असे. हें सरकारदेणें शेतकऱ्यानें धान्याच्या किंवा नगदीच्या रूपाने द्यावे असे असे. ह्या सरकार देण्याबद्दल रयतेकडून प्रतिवर्षी कबुलायती घेत.[१] अवर्षणादी संकटसमयी शेतकऱ्यांस सढळ हाताने तगाई देत. ही तगाईची रक्कम त्यांनी चारपाच वर्षांच्या हप्त्यांनी फेडावी असें असे. लागवडीस न आलेल्या जमिनी नव्या रयतेस द्यावयाच्या झाल्या म्हणजे तिच्यापाशीं गुरेंढोरें नसल्यास तीं तिला सरकारांतून द्यावी, तिला बीजास दाणा द्यावा, व पीक होईपर्यंत निर्वाहासाठीं धान्य व पैका द्यावा. दोनचार वर्षांनी हा ऐवज उगवून घ्यावा. ह्याप्रमाणें रयतेस कौल करून देऊन जमिनी इस्ताव्यानें दिल्या व बहुतेक सुपीक जमीन लागवडीस आणली. उत्पन्नाचा अजमास बरोबर पाहून रयतेवर कर बसवावा, जुलूम असा कोणावर करूं नये, अशी अधिकाऱ्यांस सक्त ताकीद असे.

ह्या जमीनमहसुलाच्या बंदोबस्तांत एक मोठी रयतेच्या हिताची गोष्ट महाराजांनी केली. तिचा निर्देश ह्या स्थलीं अवश्य केला पाहिजे. महाराजांनी काबीज केलेल्या यवनी मुलखात अशी पुरातन वहिवाट होती कीं, महालोमहालीं व गांवगना देशमुख, देशपांडे, देसाई, पाटील, कुळकरणी, खोत, मिरासदार, जमीनदार वगैरे असत. त्यांच्या ताब्यांत महाल व गांव असून रयतेकडून जमिनीचा वसूल त्यांनी करावा असें असे. सरकारी अधिकारी रयतेकडून प्रत्यक्ष वसूल घेत नसत. त्याची सर्व जबाबदारी देशमुख वगैरे जमीनदारांकडे असे. त्यामुळें असें होई कीं, सर्व रयत ह्या मिरासदारांच्या ताब्यांत सर्वस्वी असे. त्यांना वाटेल तसा ते रयतेकडून वसूल चोपून घेत. एखाद्या गांवाचे सरकार देणे दोनशे किंवा तीनशे रुपये असलें तर हे मिरासदार त्या गावच्या रयतेकडून दोनहजार किंवा तीनहजार रुपये वसूल उगवीत असत. ह्या रीतीनें आपला तळीराम गार करण्यासाठीं ते रयतेस नाहक त्रास देत व सरकारासही बेसुमार फसवीत. ते आपल्या वसतीच्या गांवास हुडे, वाडे, कोट वगैरे बांधून शिपाई, प्यादे व बंदुका, तरवारी बाळगून बळावत असत. त्यांचा हा बेकायदेशीर कारभार सरकारी अधिकाऱ्यांच्या कानी गेला म्हणजे ते त्यांच्याकडे सरकारदेणें अधिक मागत, परंतु त्यांस कित्येक देशमुख वगैरे प्रबळ जमीनदार दाद देत नसत. प्रसंग पडल्यास त्यांच्याशी भांडावयासही तयार होत. अशा व्यवस्थेमुळें जिकडेतिकडे पुंडपाळेगारांचा सुळसुळाट झाला होता.

ही अव्यवस्था महाराजांनी अजीबात मोडून टाकली. रयतेकडून वसुलाची कमाविशी करण्यासाठी आपले वेतनी कामगार सर्वत्र नेमून दिले. पूर्वीच्या मिरासदारांनी व जमीनदारांनी रयतेस कोणत्याही बाबतींत काडीइतका त्रास देऊं नये. त्यांस पूर्वीच्या अंमलांत जे टक्के मिळत असत त्यांचें योग्य प्रमाण ठरवून त्यांस ते सरकारी कामगारांकडून प्रतिवर्षी मिळत जावे, त्यांनी तें रयतेकडून प्रत्यक्ष वसूल करूं नयेत, असें ठरविलें. हा जो सरकारी उत्पन्नाचा ठरीव अंश त्यांस कोणतेही जोखीम शिरी न बसता मिळत असे, त्यास सरकारातून प्रतिवर्षी मंजुरी मिळवावी लागे. ह्यामुळे त्यांच्या वर्तनावर पुरा दाब बसून रयत त्यांच्या कचाट्यातून साफ सुटली. ह्यामुळे ती सुखी व स्वतंत्र झाली. पूर्वी ती ह्या जमीनदारांची व मिरासदारांची केवळ गुलाम बनलेली असे. ह्या देशमुख, देसाई, देशपांडे वगैरे ग्रामाधिकाऱ्यांचे वाडे, हुडे व कोट महाराजांनी पाडून जमीनदोस्त केले. त्यांनी इतःपर असले फंद करू नयेत, इतर रयतेसारखीं साधी घरे

१ रा. राजवाडेकृत खंड १५, लेखांक ३४० यावरुन जमिनीचा वसूल ठरविण्याच्या बाबतींत महाराजांनी कशी उत्तम शिस्त लावून दिली होती हे दिसून येते.

बांधून राहावें, असा एकसहा हुकूम सोडला. कमावीसदार, महालकरी व सुभेदार यांस त्यांच्यावर करडी नजर ठेवावयास सांगितलें. ह्याप्रमाणें ह्या जमीनदारांची अरेरावी बंद झाल्यामुळे ते महाराजांच्या अंमलास अमळ त्रासत हें साहजिक आहे; परंतु अशा लोकांस लष्करी व मुलखी खात्यांत भराभर नोकऱ्या मिळून त्यांची बढती व उत्कर्ष अंगच्या पराक्रमानुसार होऊं लागला. त्यामुळें ही त्यांची नाराजी केवळ अल्पकालिक असे. कारण असें पाहा कीं, नोकरीबद्दल वेतनें मिळून शिवाय वंशपरंपरागत चालत आलेले मिराशीचे हक्क व्यवस्थित बांधून दिले होते त्याप्रमाणें आणखी उत्पन्न त्यास बिनबोभाट पावतें होत असे. ह्याप्रमाणे महाराजांनी रयतेस अक्षयींची सुखी करून ह्या मिरासदारांसही खूष राखले.

जमीनमहसुलाच्या बाबतींत आणखी एक महत्त्वाची गोष्ट येथे नमूद करणे इष्ट आहे. तीवरून महाराजांचे धोरण केवढे दूरदृष्टीचे होते ते दिसून येते. ती गोष्ट अशीः प्रत्येक प्रांताचा म्हणजे सुभ्याचा जो वसूल होई तो सगळाच खर्चून टाकू नये तर त्यातून कांही शिल्लक टाकावा, असा त्यांनी नियम लावून दिला होता. या शिलकेस खजाना म्हणत. ह्या खजान्यास तसाच प्रसंग आला तर हात लावावा; नाही तर तो वाढत जावा किंवा निदान जशाच्या तसा राखून ठेवावा असें असे. मोगलांचा हल्ला येऊन फाजील खर्च करावा लागला तर तो आधी साधेल तेवढा बाहेरल्याबाहेर वारावा आणि तो नच भागला तर ह्या राखून ठेवलेल्या खजान्यातून तो भागवावा असें असे. कोणत्याही बाबीसंबधाने विशेष खर्च करावयाचा झाल्यास त्या संबंधाची आगाऊ मंजुरी घ्यावी असें असे. या प्रत्येक प्रांताच्या सुभेदारापाशी अशी शिल्लक कायमची ठेवण्यात येत असे. कोणत्या प्रांतात किती शिल्लक राखावीं ते त्या-त्या प्रांताच्या मगदुराप्रमाणे ठरविलेले असे. ह्याप्रमाणे महाराजांच्या ताब्यातील एकंदर मुलखातल्या खजिन्यांची गोळाबेरीज सव्वा लाख होनाची असे.[१]

आतां मुलूखगिरी करावयाची तीसंबंधानें महाराजांनी कोणते नियम केले होते ते येथें सांगूं, आसपास यवनांचा अंमल असून त्यांच्या दाढेतून सोडविलेला मुलूख आपल्या कबजांत कायमचा राखावयाचा म्हणजे त्यांस त्या काळी पुष्कळ फौज बाळगून राहणे प्राप्त असे. महाराज फौजेच्या वास्तविक खर्चासंबंधानें अतिशयित काटकसर करीत. तरी तिची संख्या नेहमी वाढत्या प्रमाणावर ठेवण्यांतच स्वराज्याचें संरक्षण व वर्धन होण्याचा संभव असे. शिवाय प्रत्येक किल्ल्यावर काही लष्कर कायमचे ठेवून त्याचा निर्वाह आसपासच्या गांवांच्या उत्पन्नावर भागवावा लागे. ह्यामुळे जमीनमहसूल जमा होई तेवढ्यानें एवढ्या लष्कराचें पोषण होणें केवळ दुरापास्त होतें. दुसरें असें कीं, मोगल व विजापूरकर अशा सधन पादशहाच्या मोठमोठ्या सेनांशी सतत युद्ध करावे लागल्यामुळें द्रव्यव्यय अतोनात होत असे. यास्तव महाराजांस प्रतिवर्षी आपल्या कांही फौजेस मुलुखगिरीवर पाठवावे लागे. यांत अर्थात् त्यांचा दुहेरी हेतू असे. लष्कराचे पोट बाहेरच्या बाहेर भरून आणखी आपल्या खजिन्यांतही कांही भर पडावी हा एक हेतू व दुसरा विशेष महत्त्वाचा हेतू असा कीं, यवनी अंमलास असा सर्वदा त्रास देत राहिल्यानें तो हळूहळू कमकुवत होऊन त्यांचा इष्ट उद्देश जो भरतभूमी यवनांच्या सत्तेतून सोडविण्याचा तो सुसाध्य व्हावा.

सरनोबताने आपलें घोडदळ घेऊन प्रतिवर्षी आठ महिने मुलूखगिरीस जावे. त्यानें विजापूरकरांच्या व मोगलांच्या मुलखांत चौथाई व सरदेशमुखी हे हक्क वसूल करावे व शत्रूच्या मुलखांतील सधन शहरे लुटावीं. स्वारीस जातांना प्रत्येक शिपायाच्या बिशादीची तपशीलवार यादी करून तिची किंमत त्यांत नमूद करावी. ती अशाकरितां की, स्वारीहून परत आल्यावर त्याच्यापाशीं असलेल्या सामानाचा झाडा घेऊन तें ह्या यादीशी ताडून पाहावे. त्याच्याजवळ कांही अधिक माल आढळल्यास तो त्यानें कोठून आणला हें त्यास विचारावे. तो लुटीचा आहे असें ठरल्यास तो जप्त करावा किंवा तेवढ्या मालाची किंमत ठरवून ती त्याच्या पगारांतून वसूल करून घ्यावी; परंतु त्याच्या बिशादीपैकीं एकादादुसरा जिनस गहाळ झाला असतां त्याची भरपाई सरकारांतून व्हावी. सरकारी कामगिरींत अपरिहार्य कारणामुळें एखाद्या

१ रा. राजवाडेकृत खंड ८, लेखांक २१ व २२ पाहा.

शिलेदाराचा घोडा मेला किंवा निरुपयोगी झाला असतां त्याची जी किंमत यादींत नमूद केली असे तेवढा त्यास तत्काळ मिळे. स्वारीस जाणाऱ्या लष्करापैकीं कोणीही इसमाने आपली बायको, बटीक किंवा कलावंतीण बरोबर नेऊं नये व त्याप्रमाणेंच स्वारी बरोबर कलाल नसावे अशी सक्त ताकीद असे. जो कोणी हा नियम मोडी त्यास देहांत शासन होई. हा नियम करण्याचें कारण अर्थात् असें होतें कीं, प्रत्येक माणूस निर्व्यसनी असल्यावाचून त्याच्या हातून सरकारचाकरी हुशारीने व जोमाने होत नाहीं, हें महाराजांस चांगले कळून आलें होतें.

मुलूखगिरीत ब्राह्मणवस्तीस व देवस्थानांस उपद्रव देऊ नये, गाई लुटींत पकडू नयेत, ओझ्यास हवे असतील तर बैल मात्र लागतील तेवढे धरावे. शेतकऱ्यांस व स्त्रियांस कदापि लुटूं नये. श्रीमंत मुसलमान किंवा त्यांच्या पदरच्या श्रीमंत हिंदूंस खंड देण्याचे सामर्थ्य आहे असें पाहून त्यासच फक्त पकडावे व ठरविलेला खंड देताच त्यांस सोडून द्यावे. इतर प्रजेस सहसा त्रास देऊ नये. अशा पकडापकडीत मुले व बायका ह्यांस कधींही हात लावू नये. खंड बसवितांना ब्राह्मणांस ओल घेऊं नये, यवनांस घेत जावे.

पावसाळा सुरू होऊन नद्यानाले भरले नाहींत तो स्वारीस गेलेल्या सगळ्या लष्कराने स्वदेशी छावणीस यावें. स्वदेशाच्या सरहद्दीपाशीं येतांच लष्करातील एकंदर लोकांचे झाडे घ्यावे व पूर्वीचे बिशादीचे जाबते रुजू घालावे. कोणापाशीं कांहीं अधिक माल सापडल्यास त्याची यादी किंवा जप्ती व्हावी. एखादा मोठ्या किंमतीचा जिनस सापडल्यास तो सरकारी लुटींत सामील करावा. एकंदर लुटीची तपशीलवार यादी करावी. सरकारी लुटीची अफरातफर कोणी कधींही करूं नये, केल्यास त्याला शिक्षा होत असे. स्वराज्यांत आल्यावर पागा नेमलेल्या जागी छावणीस न्यावी. ह्या छावण्या मुख्य दोनतीन ठिकाणी असत. येथें घोड्यांसाठी तबेले व स्वारांस राहावयासाठी घरे बांधलेली असत. छावणीस गेल्यावर सुभेदारांनी आपआपल्या ताब्यांतील घोड्यांच्या दाणावैरणीची, औषधपाण्याची वगैरे व्यवस्था करावी, माणसांची हजिरी-गैरहजिरी पाहावी व त्यांच्या पगारांचे हिशोब तयार करवावे.

सरकारी तुटीची यादी तयार झाल्यावर सरनोबताने ती सगळी लूट घेऊन राजदर्शनास जावे. तेथें सगळा हिशोब समजावून सांगून लूट सरकार-पोत्यास जमा करावी. वस्त्रे, दागिने वगैरे असतील ते धुववून दुरुस्त करून त्यांस अदमासाने किंमती घालून ठेवाव्या. कोणा शिपायांस किंवा अंमलदारास ह्या लुटीतील एखादा जिनस हवा असल्यास त्याची किंमत त्याच्या वेतनांत बाद करून त्यास तो द्यावा. ज्यांनी स्वारीत चांगल्या कामगिऱ्या केल्या असतील त्यांची हुजुरास शिफारस करून त्यांना इनाम किंवा बढती सरनोबताने सुभेदारांच्या इतल्ल्यानें देववावी. कोणी लढाईत मरण पावले असतील त्यांच्या बायकामुलांस सरकारांतून नेमणुका मिळत. कोणास जबर जखमा लागून ते पुढें नोकरीस नालायक ठरल्यास त्यांना तहाहयात वेतन सरकारांतून मिळत असे. कोणी स्वारीच्या कामांत जखमा लागून किंवा दुसऱ्या कारणानें आजारी झाल्यास त्याच्या औषधपाण्यास पैसा मिळे. कोणास कशा, कोठे जखमा झाल्या त्यांची पाहणी करून त्या मानानें त्यांच्या नुकसानीच्या भरपाईदाखल त्यांस बढती किंवा मानाची पदवी देत असत. ज्याला ज्या कामावर नेमलें असे त्याला तो नालायक आहे असें समजून आल्यास त्याला त्या कामावरून काढून दुसरें काम देत किंवा त्यास लष्करांतून कमी करून दुसऱ्या एखाद्या खात्यांत नोकरी देत. सरकारी नोकरीवरून त्यास सहसा दूर करीत नसत. स्वारींत कोणी बेकैद वर्तणूक केली किंवा नामर्दी केली तर त्याची चौकशी करून त्यास शासन करीत व तो असा गुन्हा वारंवार करूं लागल्यास त्याला नोकरीवरून दूर करीत. लूटीच्या मालापैकीं एखाद्या जिनसाची अफरातफर कोणी केल्यास त्याला फारच कडक शिक्षा करीत. ह्या सर्व गोष्टी सरनोबताने हुजुराच्या हुकुमानें कराव्या, आपण होऊन करूं नयेत असें असे. पावसाळा संपताच दसऱ्याच्या मुहूर्ताने पुन: स्वारीस निघण्याविषयीं घोडदळाला सूचना होत असे.

पावसाळा सपतांच हा दसऱ्याचा सण येतो. ह्या सणांत महाराज मोठा उत्सव करीत असत. ज्या शिलेदारांना, बारगिरांना किंवा शिपायांना लष्करांत नोकरी धरावयाची असे त्यांनी विजयादशमीला हुजुरास येऊन आपलें कसब व

बळ दाखवावे. त्यांची योग्य परीक्षा महाराज स्वत: जातीने करीत व जे ज्या कामाला लायक असत त्यांस त्या कामावर नेमीत. मुलूखगिरीस जावयास सिद्ध झालेल्या एकंदर लष्कराची पाहणी ते स्वत: करीत. त्यावेळीं प्रत्येक घोडा ते निरखून पाहात असत. मग पुनः ह्या लष्करांतल्या नोकरांच्या खासगी सामानाच्या याद्या होत असत. सरनोबत व इतर सरदार ह्या वेळीं महाराजांच्या दर्शनास येत व ज्या मुलखात स्वारीस जाण्याची आज्ञा त्यांजकडून होई. तिकडे ते आपल्या हाताखालचें लष्कर घेऊन निघत.

स्वारीस जाणाऱ्या सरदारांचे व इतर बड्याबड्या अंमलदारांचे पगार आगाऊ देत असत व लष्करातील शिपायांचा व इतर नोकरांचा पगार स्वारीहून परत आल्यावर लागलीच देत असत. ह्याप्रमाणें एकदम मिळालेल्या पगारांत त्यांनी आपल्या कुटुंबांची उभ्या वर्षाची तरतूद करून ठेवावी असें असे. पावसाळ्याच्या चार महिन्यांचा पगार त्यांना दसऱ्यास मिळत असें असे दिसते. स्वारीस गेल्यावर त्यांना आठ महिनेपर्यंत पदरमोड सहसा करावी लागत नसे. त्यांचें पोट बाहेरल्या बाहेर भरत असे. लष्करांतल्या प्रत्येक नोकरास राजी राखण्याची खबरदारी महाराज घेत असत. त्यामुळें त्यांच्या सैन्यांत फितुरी किंवा नाराजी अशी बिलकूल होत नसे. जो तो बहादुरी करून महाराजांकडून शाबासकी व बढती मिळविण्यास मनापासून झटे. ह्या बाबतीत लष्करांतील लोकांची जशी काय परस्परांशी स्पर्धा लागून राहिलेली असे.

इतर खात्यांतील नोकरांचे पगार, वेतने व तैनाती वेळच्या वेळी देण्याची व्यवस्था महाराज मोठ्या दक्षतेने ठेवीत. वर्षाच्या वर्षास सर्वांच्या वेतनांचा हिशोब पावता होऊन सरकाराकडे कोणाचे येणे शिल्लक राहू देऊं नये अशी त्यांची ताकीद असे. नोकरांस मुशाहिरा वेळच्या वेळीं पावल्याने ते राजी राहतात, त्यांच्या गैरहजिरींत त्यांच्या कुटुंबांचे हाल होत नाहींत व ते कर्जबाजारी होत नाहींत, हें ते पूर्णपणे जाणून असत. माणूस दिलगीर असल्यास फितवाफितवी करून राज्यास अजय करतो कामचोरपणा करतो व सोपविलेंले काम हुशारी व इमानाने बजावीत नाहीं, हें त्यांच्या लक्षांत येऊन चुकले होतें. आपले लष्करी व मुलखी खात्यांतील नोकर कर्जबाजारी होऊं नयेत ह्याविषयी ते फारच खबरदारी घेत असत. कर्जबाजारीपणामुळे मनुष्य लाचार व निरुत्साह होतो व एखादें अनन्वित कर्म करण्यास तयार होतो. हें जाणून त्यांनी असा नियम केला होता कीं, कोणी कर्ज करूं नये. लग्नकार्यादी प्रसंगीं गरीबगुरिबास व तालेवारांसही कर्ज काढणें प्राप्त होत असतें. यास्तव अशा कार्यास कोणाला मदत हवी असल्यास त्यानें सरकारास अर्ज करावा. मग त्याची जशी योग्यता असेल त्या मानानें त्यास मदत मिळत असे. इतकेही करून कोणी उत्पन्नापेक्षा अधिक खर्च करून किंवा दुसऱ्या प्रकारे उधळपट्टी करून कर्जबाजारी झाला असतां त्यास सरकार नोकरीवरून तत्काळ दूर करीत.

मोठमोठ्या अंमलदाराचा पगार रोख देत असत किंवा वसुलावरील अधिकाऱ्यांस त्यांच्या नावे वराता देत. ह्या अधिकाऱ्यानीं त्या वरातांबरहुकूम दाणा किंवा नगदी नाणे ज्यांचे त्यांस वेळच्या वेळीं देत जावे असें असे. अशा वरातांनी मिळणाऱ्या वेतनांचा हिशोब वर्षाच्या वर्षास होऊन सालझाडा होत असे. कोणाची बाकी अशी कधींही ठेवीत नसत. एखादा पगारी नोकर शेतकरी असला तर त्याच्या ताब्यांतील जमिनींचा धारा इतर शेतकऱ्यांप्रमाणें ठरवून तो त्याच्या वेतनांत धरीत असत. तो असा बाद होऊन जें कांही देणे निघे ते त्यास वराता देऊन गल्ला व नगदी यांच्या रूपाने वेळच्या वेळी पावते होत असे. कोणा लष्करी अमलदारास किंवा इतर खात्यांतील हुद्देदारास त्याच्या तैनातीदाखल एखाद्यादुसऱ्या गांवाचे उत्पन्न लावून देत नसत. अशा देण्याला मोकासा म्हणत. हे असे मोकाशे लावून देण्याची चाल यवनी अंमलांत जिकडे तिकडे असे. ह्या चालीमुळे मोकासदार लोक गावातील रयतेस हवा तसा त्रास देत. जमीनदार व ते एक होऊन रयतेस खुशाल नागवीत. सरकारी अमलाच्या जोरावर ते रयतेकडून हवीं तीं कामे करून घेत. हा प्रकार अगदीं अनिष्ट वाटल्यावरून गांवगन्ना वसुलावर सरकारी कारकून नेमून देऊन जें कांहीं वरातांनी देणे तें ह्या वसूल करणाऱ्या अधिकाऱ्यांनी सरकारी उत्पन्नांतून द्यावे. ज्यास वराता मिळत असे त्यांची मालकी कोणत्याही गावावर किंवा महालावर कोणत्याही प्रकारे चालू नये, असा सक्त बंदोबस्त केला.

त्याप्रमाणेंच जहागिरी देण्याची पद्धत महाराजांनी अगदी बंद केली. यवनी अंमलांत बड्याबड्या सरदाराना व कामगारांना सरकारी कामगिरी चांगली केल्याबद्दल जहागिरी देत असत. ह्या जहागिरींतील गावाचे उत्पन्न जहागीरदारांनी आपल्या वतीनें लोक ठेवून जमा करावे आणि त्याचा कांही अश खंडादाखल भरावा किंवा युद्धादी प्रसंगी अमुक इतक्या सैन्याची सरकारास मदत करावी असें असे. ह्यांप्रमाणें जहागीरदार केवळ मांडलिक राजाप्रमाणेंच होऊन बसत. त्यांच्या जहागिरींतील रयतेवर त्यांचा ताबा सर्व प्रकारे चाले. त्यामुळें रयतेस असें वाटे कीं, हेच आपले सत्ताधीश. जहागीरदार फौजफाटा ठेवीत व आपल्या जहागिरीत कोटकिल्लेबांधून मोठ्या बंदोबस्तानें राहात. दुसरें असें की, ह्या जहागिरी वंशपरपरा चालत. त्यामुळें ज्यांनी पहिल्याने ह्या जहागिरी कमाविल्या असत त्यांचें वरिष्ठ सरकाराविषयींचें प्रेम व इमान त्यांच्या वंशजांत कायम राहाणे शक्य नसे व मूळ पुरुषांची कर्तबगारी त्यांच्या वंशजांत असण्याचा संभव नसे. यास्तव वरिष्ठ सरकाराशी जहागिरदार अंमळ बेपरवाईनेंच वागू लागत इतकेंच नव्हे तर, त्या सरकारविरुद्ध बंडें उभारण्यासही ते तयार होत आणि परचक्रादी अरिष्टामुळे मुख्य सरकार कमजोर होण्याचा किंवा अजीबात नष्ट होण्याचा समय आला असतां ह्या जहागिरदारांकडून त्यांस मदत मिळण्याचे एकीकडेच राहून हे स्वतंत्र होऊन बसत. हा अनिष्ट प्रकार महाराजांनी आपल्या राज्यांत मुळींच चालू दिला नाहीं. काबीज केलेल्या मुलखात कोणी असे जहागिरदार आढळल्यास त्यांच्या जहागिरी त्यांजकडे पूर्वीप्रमाणें मालकी हक्काने महाराज ठेवीत नसत. त्यांस फार तर त्यांच्या ताब्यांतील गांवांच्या उत्पनाचा अमुकएक अंश हक्कादाखल मिळावा असें ठरवीत व त्या गावातील रयतेकडून वसूल जमा करण्याचें काम सरकारी कारकुनांकडून करवीत. जहागिरदारांचा कोणत्याही प्रकारचा ताबा रयतेवर चालू देत नसत. ह्या जहागिरदारांपैकीं जे सरदार हुशार व कर्तबगार असत त्यांस अर्थात् ते आपल्या लष्करांत किंवा इतर खात्यांत त्यांच्या योग्यतेप्रमाणें नोकऱ्या देऊन ठेवीत. अशा खालसा केलेल्या जहागिरीत जहागिरदारांनी वाडे, हुडे, कोट, किल्ले वगैरे बांधले असत ते सगळे महाराजांनी जमीनदोस्त केले. त्यांनी सामान्य रयतेप्रमाणें घरे बांधून राहावें असें ठरविलें. जे किल्ले मजबूत असत त्यांवर अर्थात आपली ठाणी बसवून ते आपल्या कबजांत महाराज घेत असत.

ह्याप्रमाणें महाराजांनी पाटील, कुळकर्णी, खोत, देशमुख, देसाई, देशपांडे, जमीनदार, मोकासदार, मिरासदार, जाहगीरदार वगैरे लोकांच्या तावडीतून रयत सोडवून तिला सुखी केलें. आतां अशा हक्कदारांसही महाराजांनी नाखुष न करण्याविषयी शक्य दिसले तेवढे उपाय केले. जहागिरीच्या पद्धतीस आपल्या राज्यांत थारा न दिल्यामुळेंच महाराजांच्या कारकिर्दीत मोठमोठे पराक्रम करून प्रसिद्धी पावलेल्या सरदारांस व अधिकाऱ्यांस जहागिरी वगैरे न मिळून त्यांच्या घराण्यांची फारशी कोठे नांवेही ऐकू येत नाहींत. मोरोपंत पिंगळे, आबाजी सोनदेव, तानाजी मालुसरे, येसाजी कंक, बाजी पासलकर, बाजी प्रभू, नेताजी पालकर, प्रतापराव गुजर, हंबीरराव मोहिते वगैरे सरदारांची घराणी, ही जहागिरीची पद्धत महाराजांनी चालू ठेवली असती तर आज कदाचित् हयातही असतीं.

आणखी एका महत्त्वाच्या गोष्टीसंबंधाने महाराजांनी उत्तम शिस्त घालून ठेवली होती, तिचे दिग्दर्शन ह्या ठिकाणीं करणें उचित होय. ती अशी कीं, कोणताही सरकारी हुद्दा वंशपरपरा कोणाच्याही कुळांत चालू ठेवूं नये. बाप कितीही हुशार व कर्तबगार असला तरी त्याच्या कामगिरीबद्दल त्याच्या पश्चात त्याच्या मुलास मोबदला द्यावयाचा झाल्यास त्याची वास्तविक योग्यता किती आहे तें पाहून द्यावा, केवळ बडे बाप का बेटा असें समजून त्याच्या बापाचा हुद्दा त्यास अंगी कर्तबगारी नसल्यास सांगूं नये किंवा दुसरा कोणताही मोठा हुद्दा त्याच्या अंगी तो वहिवाटावयास लागणारी अक्कल व हुशारी नसल्यास देऊं नये असा त्यांचा नियम असे. ह्यामुळे ज्याच्या त्याच्या अंगच्या वास्तविक गुणांची बूज होऊन सरकारी काम हुशारी व योग्य प्रकारे बजावण्यात येत असे. महाराजांच्या पदरी पेशवा, सेनापती वगैरे प्रधान व सुभेदार, हवालदार वगैरे अंमलदार हुशार व कर्तबगार असून त्यांच्या हातून स्वराज्यसाधनास इतकें मोठे साहाय्य झालें असूनही त्यांचा हुद्दा त्यांच्या वंशात कायम राखण्याचा अविचार त्यांनी कोणाच्याही बाबतींत केला नाहीं. इतकेंच नव्हे तर, कोणी केवढाही मोठा हुद्देदार असला तरी त्याच्या हातून आपल्या कामांत कसूर झाली असता किंवा त्याच्याकडून

बेकैद वर्तन होऊं लागलें असतां त्याला त्याच्या हुद्द्यावरून दूर करण्यास महाराज कधींही चुकत नसत आणि अशा हुद्देदारास किंवा सरदारास जहागिरी दिल्या नसल्यामुळें त्यास ह्याप्रमाणें वाटेल तेव्हां दूर करण्यास अडचण पडत नसे. ही शिस्त अर्थात् अगदीं नवी होती. कारण पुरातन राज्य पद्धतींत किंवा यवनी राज्यपद्धतींत हिच्या उलट प्रकार आढळतो. शाहूराजांच्या वेळेपासून पेशवाई माजून ह्या शिस्तीस पुरा खो मिळाल्यामुळे मराठी साम्राज्याचें कसें वाटोळे झालें हें सर्वांस महशूर आहेच.

येथपर्यंत महाराजांनी आपल्या लष्करी व मुलकी खात्यांची व्यवस्था कशी लावली होती त्याचें दिग्दर्शन केलें. आतां स्वराज्यात नेमलेले अधिकारी आपआपलीं कामें लावून दिलेल्या शिस्तीप्रमाणें वेळच्या वेळीं इमानाने करतात किंवा नाहीं याची देखरेख प्रधानमंडळ व महाराज आपण स्वतः फुरसतीप्रमाणे ठेवीत असत; परंतु प्रत्येक किल्ला, प्रत्येक महाल, प्रत्येक सुभा व प्रत्येक छावणी व स्वारी यातील अधिकाऱ्यांच्या हालचालींवर वेळोवेळी नजर ठेवण्याचे प्रमुख अधिकाऱ्यांस साधण्यासारखे नसे. म्हणून त्यानी हेर व बातमीदार ठेविलेले असत. ह्या सर्वांचा नाईक बहिरजी हा होता. त्याजवर महाराजांचा पूर्ण इतबार असे. मुलूखगिरीवर पाठविलेल्या लष्करांतील अंमलदार केलेल्या लुटींचा व मिळविलेल्या खंडाचा हिशोब बरोबर देतात किंवा कांहीं अफरातफर करतात, हें पाहण्यासाठी महाराज प्रत्येक स्वारीबरोबर हेर पाठवीत. प्रत्येक किल्ल्यावरील अंमलदार आपली कामें शिस्तवार करतात किंवा कसे ते पाहण्यासाठी हे हेर जिकडेतिकडे फिरत असत. त्याप्रमाणेंच महालकरी, सुभेदार वगैरे मुलकी खात्यांतील अधिकारी रयतेस त्रास देतात की काय व वसूल केलेल्या उत्पन्नाचा ऐवज सरकारात इमानाने जमा करतात किंवा कसें हें पाहण्यासाठी प्रत्येक प्रांतातून व महालातून महाराजांचे हेर फिरत. ह्या हेरांचे व जासुदांचें एवढेच काम नसे. त्यांस आणखी परमुलखातील हालहवाल काय आहे, शत्रूची हालचाल काय आहे, अदिलशाही, कुतुबशाही, मोगली वगैरे दरबारात काय मसलती चालल्या आहेत, त्यांची माहिती वेळोवेळी मिळवावी लागे. हे महाराजांचे हेर जिकडेतिकडे अनेक वेशांनीं सर्वदा फिरत असत. जी काही माहिती त्यांस मिळे ती तपशीलवार लिहून ते महाराजांस जेव्हाची तेव्हां कळवीत. हीं हेरांकडून आलेलीं पत्रें महाराज एकांती बाळाजी आवजी चिटणीस याजकडून वाचवीत. स्वराज्यांतील एखाद्या अंमलदारानें किंवा अधिकाऱ्यानें कांहीं बेकैद वर्तन केल्याचे ह्या बातमीदाराकडून कळल्यास त्याची बारीक चौकशी करून तो खरोखरीच गुन्हेगार ठरल्यास त्याला लागलीच शिक्षा होत असे. त्यामुळें सर्व नोकरावर सारखी जरब राहून तो तो आपल्या कामांत दक्ष राही.

महाराजांना त्या वेळीं न्यायखातें स्वतंत्र नेमण्याची आवश्यकता फारशी वाटली नाहीं. जमिनींसंबंधाचे व देवघेवीसंबंधाचे खटले उपस्थित झाले असतां त्यांचा निकाल लावण्याचे काम प्रांतांच्या किंवा महालांच्या अधिकाऱ्यांनीं पंचांकडे सोपवावे असें असे. त्या काळी ग्रामपंचायतीची पद्धत चोहींकडे चालू असे. तीच रयतेच्या सोयीची वाटल्यावरून महाराजांनी कायम ठेवली. आपल्या खटल्याच्या निकालासाठी रयतेला लांब कोठे जावे लागू नये, तिचा न्याय जेथला तेथें, वस्तुस्थिती प्रत्यक्ष डोळ्यांनी पाहणाऱ्या पंचांनी फुकट करावा हें त्यांस इष्ट वाटे. पंचांनी दिलेले निकाल अर्थात् महालकरी व सुभेदार कायम करून त्यास हुकूम अंमलबजावणी करीत असत. इतकेही करून हा पंचांचा निकाल कोणास पसंत न वाटल्यास त्यानें हुजुरास त्या संबधाने अर्ज करावा व त्या खटल्याची चौकशी, न्यायाधिशानें करावी असें असे. आतां फौजदारी खटले उपस्थित झाले असतां त्यांचा निकाल प्रांताच्या सुभेदारानें द्यावा असें असे. ह्या सुभेदाराच्या निकालावर कोणास तक्रार करणे असल्यास त्यानें हुजुरांत अर्ज करावा व त्या निकालासबंधाची फेरतपासणी पंडितरावानें करावी असें असे. लष्करांत कांहीं तंटेबखेडे किंवा गुन्हे झाल्यास त्यांची चौकशी लष्करी सुभेदारानें किंवा दुसऱ्या वरिष्ठ अंमलदारानें करावी. व त्यानें दिलेल्या निकालावर तक्रार करणे असल्यास त्यानें हुजुरात अर्ज करावा व त्याची तपासणी सरनोबत यानें करावी असें असे.

स्वराज्यांत चोरभय फार असे, तें महाराजांनी अगदी नाहींसे करून टाकले. जागोजाग चोर व बेरड असत. त्यांस धरून आणून कित्येकांचे शिरच्छेद करीत. कित्येकांस शेते लागवडीस देऊन एखाद्या किल्ल्याच्या आश्रयानें ठेवात. तेथील गडकऱ्यांची त्यांच्यावर करडी नजर असावी असें असे. कित्येकांस गडकऱ्यांत नोकरीस ठेवून त्यांची उपजीविका चाले असें करीत. ज्या गांवांत चोरवडा फार असे त्या गांवाच्या रखवालीस एकादादुसरा बेरड ठेवून देत. त्यानें स्वतः चोरी केली असतां त्याचा तत्काळ शिरच्छेद होई व त्याच्या रखवालीच्या गांवांत दुसऱ्या कोणीं चोरी केली असतां तिचा त्यानें पत्ता लावून द्यावा किंवा ती भरून द्यावी असें केले.

स्वराज्यांतील मोठमोठीं देवस्थाने व तीर्थस्थानें होतीं. त्यांस प्राचीन धर्मादाय चालत आले होते. ते महाराजांनी पुन: यथास्थित चालू केले. ज्या कित्येक देवस्थानांस पुरेशा नेमणूका नव्हत्या, त्यांस त्या भरपूर लावून दिल्या. कित्येक नव्या देवस्थानास मुळींच नेमणूका नव्हत्या, त्यांची पूजाअर्चा, नैवेद्य, उत्सव, अभिषेक, नंदादीप वगैरे यस्थास्थित चालावीं म्हणून त्यांस जमिनींचे उत्पन्न लावून दिलें. ह्या सर्व देवस्थानांची व्यवस्था नीट चालावी म्हणून त्यांस पारिपत्यगार नेमून दिले. लावून दिलेल्या उत्पन्नाचा व्यय ब्राह्मणांनी व पुजाऱ्यांनी वाटेल तसा करूं नये, त्यांनी सर्व खर्चाचा हिशेब तपशीलवार ठेवावा असें असे. हे हिशेब प्रतिवर्षी सरकारी अधिकारी तपासून पाहत असत. मोठमोठ्या क्षेत्रांतील कित्येक सत्पात्र ब्राह्मणांस वर्षासनें देऊन त्यांनी स्नानसंध्या करून सुखाने कालक्रमणा करावी असें केलें. त्याप्रमाणेंच थोर सत्पुरुषांचा योगक्षेम यथास्थित चालून त्यांचे उत्सव वगैरे चांगले व्हावे म्हणून त्यांस गांव किंवा जमिनी लावून दिलेल्या असत.

महाराज केवळ आपल्या धर्माच्या देवस्थानांसच नेमणुका करून देत असत असें नाहीं, तर स्वराज्यात मुसलमानांच्या कबरी, मशिदी, पीर वगैरे असत, त्यांस यवनी अंमलांच्या वेळी लावून दिलेल्या नेमणुका तें पुढें चालवीत, त्या कदापि खालसा करीत नसत. इतकेंच नव्हे तर, कित्येकांस पुरेशा नेमणुका नसल्या तर त्या भरपूर करून देत असत. ह्यावरून यवनांच्या पूज्यस्थानांसंबधांनें त्यांच्या मनांत तिरस्कार किंवा द्वेष बिलकूल वसत नसे हें सिद्ध होतें. महाराजांनी किंवा महाराजांच्या सरदारांनी इतक्या स्वाऱ्या, लढाया केल्या; पण एकाही प्रसंगीं मुसलमानांच्या पवित्र स्थानाला उपद्रव दिल्याचें कोठेंही आढळत नाहीं. खरें म्हटलें असतां यवन जसे हिंदूंच्या देवस्थानांची वेळोवेळी नासधूस करीत असत, तसा प्रकार त्यांनी त्यांच्या मशिदी वगैरे पूज्य स्थानांचा केला असता तर त्यांस कोणी दोष लावला नसता, परंतु महाराजांची धर्मसंबंधानें उदारबुद्धी असून धर्मवेड त्यांच्या ठायीं बिलकूल नव्हतें.

यवनी अंमल सर्वत्र स्थापित होऊन महाराष्ट्रातील वेदशास्त्राचें अध्ययन अगदीं लोपल्यासारखे झालें होतें. त्यास उत्तेजन यावें म्हणून महाराजांनी अशी व्यवस्था केली होती कीं, पढलेल्या ब्राह्मणांनी प्रतिवर्षी श्रावण मासांत हुजुरांस यावें, व त्यांची परीक्षा पंडितरावानें घ्यावी. ज्यानें एका ग्रंथाचे अध्ययन केलें असेल त्याला एक मण धान्य, दोन ग्रंथांचे अध्ययन केलें असेल त्याला दोन मण धान्य, पंचग्रंथी व दशग्रंथी यांस पाच-पाच दहा-दहा मण धान्य प्रतिवर्षी देत जावे. कोणी मोठे पंडित, वैदिक, ज्योतिषी वगैरे आले असतां त्यांच्या योग्यतेप्रमाणें त्यांचा सत्कार करून त्यांस शंभरशंभर, पन्नास पन्नास रुपये दक्षिणा देत असत. ब्राह्मण परमुलखांतला असल्यास त्याची संभावना द्रव्य देऊन करावी व स्वराज्यांतला असल्यास त्याला धान्य देण्याविषयी, ज्या गांवीं त्याची वसती असे त्या गांवच्या अधिकाऱ्यावर वरात देत जावी. ह्याप्रमाणें संस्कृत धर्मग्रंथांच्या अध्ययनास महाराजांनी उत्तेजन दिलें. ह्याशिवाय जे ब्राह्मण अग्निहोत्र घ्यावयास सिद्ध होत किंवा कांही अनुष्ठान किंवा यज्ञ करण्याचें मनांत आणत त्यांस द्रव्यादिकांचें यथोचित साहाय्य महाराज करीत. आपल्या राज्यांतील सत्पात्र ब्राह्मणांनी व सत्पुरुषांनीं दुसरीकडे कोठे याचना करावयास जाऊं नये किंवा त्यांचा योगक्षेम चालण्यास अडचण पडूं नये, अशी खबरदारी महाराज सर्वदा घेत असत.

राज्यांत जागोजाग अन्नछत्रे घालून गरीबगुरिबांच्या निर्वाहाची सोय केली व मोठमोठ्या देवस्थानांत वेळोवेळी ब्राह्मणभोजन घालण्याची व्यवस्था केली. ह्याशिवाय नित्यनैमित्तिक दाने मुबलक करण्याचा परिपाठ महाराजांनी घातला.

महाराजांनी गाईची खिल्लारे मानदेश, भीमथडी, वगैरे गवताचीं कुरणे पाहून जागोजाग ठेवली होतीं. गाईची जोपासना करण्यासाठी गवळी व चाकर ठेवले होते. लष्करास बैल हवे असत ते ह्या खिल्लारांत तयार होत असत. त्यांप्रमाणेंच कोणा शेतकऱ्यांस बैल सरकारांतून देण्याचे ठरल्यास ते ह्या खिल्लारातून देत असत. गाईच्या खिल्लारांप्रमाणेंच महिषींचीही खिल्लारे जागोजाग ठेवली होतीं. ती धनगर व गवळी यांच्या स्वाधीन केली असून त्यांनी देशांत किंवा डोंगरांत चाऱ्याच्या जागा असतील तेथें राहावें असें असे. ह्या खिल्लारांची मोजदाद वर्षाच्या वर्षास होऊन अमुकाकडून अमुक लोणी किंवा तूप यावें व ब्राह्मणभोजनांस लागणारे दूध अमक्याने अमके पुरवावे असें ठरवून ठेवले. ह्यांप्रमाणेंच वीसपंचवीस हजार शेळ्या, मेंढरांचे कळप धनगरांकडे राखणीस दिलेले असत. त्यांचीही मोजदाद प्रतिवर्षी होऊन अमुकाने अमुक इतकी मेंढरे दसऱ्याच्या प्रयोजनांस व सरकारी खर्चास पाठवावी असें ठरविलेले असे.

ह्यांप्रमाणें सर्व दौलतीचा बंदोबस्त शक्य तितका चांगला करून त्याचे नियम बांधून दिले. तसेंच त्यांनी आपल्या स्वतःच्या दिनचर्येचे नियम करून ठेवले. ते उषःकाली उठत. पहाटेची नौबत व्हावी, व गायकांनी वीणामृदंगादी मंजुळ वाद्यांच्या साजासह भगवंताचे स्तुतिपाठ गावे व ह्या नादाने त्यांनी उठून कांहीं वेळ प्रातःस्मरण करावे नंतर शौचादी विधी उरकून गोदर्शन व मंगलालंभन करावे व गंगादी महानद्यांच्या तीर्थाने युक्त अशा उदकांनी स्नान करून जप व देवार्चन करावे नंतर कांही वेळ पुराण श्रवण करावे. ह्या सगळ्या गोष्टी चार घटका दिवस आला नाहीं तों आटपाव्या. मग वस्त्रालंकार लेवून तिरंदाजी व निशाण मारणें यांचा व्यायाम एक घटका करून सभेस जावे. तेथें कारभारी आपआपल्या कामांची सुनावणी करून हुकूम किंवा मंजुरी घ्यावयाची ती घेत. कोणी दर्शनास येत त्यांचे मुजरे घ्यावे व त्यांजकडे कृपादृष्टीने पाहावे. कोणाकडे नुसते अवलोकन करून स्मितहास्य करावे, कोणाशीं दोन शब्द बोलावे, कोणाला कांहीं कामगिरी सांगावी, अशी सर्वांची अंतःकरणे वेधून घ्यावीं. त्यावरून सगळ्यांस वाटे कीं, आपल्यावर महाराजांची कृपा आहे. कोणी गुणिजन आले असता त्यांच्या गुणांच्या मानानें त्यांचा गौरव करून त्यांस इनामें देऊन खूष करावे. ह्याप्रमाणें दहा घटका दिवस येईपर्यंत सभेस बसून मग कोणाशी कांही मसलती करावयाच्या असल्यास त्या निरनिराळ्या ठिकाणीं बसून कराव्या. मग बारा घटका दिवसास ब्राह्मणभोजनाचें उदक सोडून नैवेद्य करून पंक्तीभोजन करणारांस बरोबर घेऊन भोजन करावे तांबूल सेवन केल्यावर पुनः येऊन मंत्रसभेस बसावे आणि पत्रें आली असतील तीं चिटणीसाकडून वाचवाची, त्यास त्या पत्रांचें जबाब लिहावयास सांगावे व कोणास पाठवावयासाठीं लिहून तयार केलेले पत्रांचे मसुदे चिटणिसानें वाचून दाखवावे. नंतर कांही कार्ययोजना करावयाची असल्यास ती करावी आणि मागल्या दिवशीं आयव्यय झाला असेल तो व पुढल्या दिवशीं करावयाचा तो पाहावा. इतके काम आटोपल्यावर अंतःपुरांत जाऊन दोनतीन घटका वामकुक्षी करावी. नंतर पुनः मुखप्रक्षालन करून सभेस यावें व कारखाने व महाल यांची व्यवस्था कशी काय ठेवण्यात येत असे ती जातीने पाहावी, अधिकाऱ्यांनी न्यायमनसोबा केला असेल तो पाहावा व त्यास यथोचित मंजुरी द्यावी. कोणाची काही फिर्याद किंवा अर्ज असल्यास तो मनास आणावा. चार घटका दिवस उरला म्हणजे स्वारी बाहेर फिरावयास निघे. कारखाने, महाल वगैरे पाहावयाचे असल्यास ते जातीने जाऊन पाहावे. देवदर्शन करावे मग बागबगीच्यांत किंवा आरामवाटिकेंत जाऊन तेथें घोडी फेरणें, बोथाट्या फिरविणे, इत्यादी मर्दानीचे खेळ खेळून सायंकाळ झाली म्हणजे पुनः परत येऊन सभेस बसावे. तेथे पुनः लोकांचे मुजरे व भेटी घेऊन दोन घटका रात्रीस जपध्यान करून पुराणादिकांचे श्रवण करावे आणि मग भोजन करावे तांबूल सेवन केल्यावर पुनः सदरेस येऊन राज्यकारभाराचा विचार करीत एकदोन कारभाऱ्यांसह एकांती बसावे. तदनंतर हेरांकडून आलेल्या बातम्या, नाजूक कामे व पत्रे पाहावी व धान्यादिकांचे निरख ऐकून अंतःपुरांत जावे. ह्याप्रमाणें आपल्या दिनचर्येचें नियमन करून प्रत्येक घटकेस जें काम करावयाचें तें त्या घटकेस करावे. ह्या घटकेचे त्या घटकेस असें कदापि होऊं नये याची खबरदारी महाराज घेत असत. आपण आपली कामें वक्तशीर केली तर आपले नोकरही आपली कामें वेळच्या वेळीं करण्यास झटतात व तीं त्यांजकडून तशी झाली नाहींत तर त्यास बोल लावण्यास आपणांला जोर येतो;

हें तत्त्व महाराजांस चांगले कळत असे. काम वेळच्या वेळीं नियमितपणे करावे; आजचे उद्यांवर टाकू नये व यत्किंचितही आळस करूं नये; ही गोष्ट महाराज स्वतःच्या वर्तनानें आपल्या सेवकांच्या चित्तांत अहर्निश ठसविण्याचा प्रयत्न करीत.

आपल्या आयुष्याचा एक क्षणही व्यर्थ जाऊं नये अशी महाराजांची नेहमी उत्कट इच्छा असे. त्याप्रमाणेंच आपल्या सेवकांनींही आपआपलीं कामे निरलसपणे व दक्षतेने वेळच्या वेळी करावी अशी त्यांची फार इच्छा असे. जो मनुष्य मेहनती व हुशार असून आपल्या कामांत दक्ष असे तो महाराजांस आवडत असे. कोणास बढती किंवा मान द्यावयाचा त्याच्या अंगीं मुख्यत: हे गुण आहेत किंवा कसें तें महाराज पाहात असत. गुणांची नीट पारख करून व हुशारी पाहून कोणास बढत्या द्यावयाच्या त्या ते देत. केवळ कोणी मर्जीतला असला किंवा स्नेहीसंबंधी असला किंवा कोणी त्याची शिफारस केली असली तर तेवढ्यावरून त्यास एखादा हुद्दा किंवा बढती महाराज देत नसत. प्रत्येकाची शिफारस महाराजांपाशीं व्हावयाची म्हटली म्हणजे त्याच्या अंगच्या वास्तविक गुणांवरूनच फक्त व्हावी असें असे. येणेकरून गुणांची खरी बूज व चाह होऊन लायक माणसांस उत्तेजन मिळे. आळशी, खुशालचंद नातेवाईकांची डाळ महाराजांकडे बिलकूल शिजत नसे.

महाराज सभेस बसले म्हणजे तेथें हास्यविनोदादी प्रकार कोणी बिलकूल करूं नयेत असा त्यांचा दरारा असे. खुषमस्करे, नकले, खुशामते यांचा महाराजांस पुरा तिटकारा असे. बीभत्स व अश्लील गोष्टी त्यांस कधींही आवडत नसत. त्याप्रमाणेंच कोणाही व्यसनी किंवा छंदी मनुष्यास ते आपल्या जवळ कधींही येऊ देत नसत. सर्वदा युद्धप्रसंग, घोडीं, शस्त्रें व परराज्यसाधन यांच्या चर्चेत त्यांचा काळ जात असे. कधीं काहीं करमणूक करण्यास सवड मिळाली असतां निर्व्यसनी व निष्कपट अशा दोनचार कृपेंतल्या मनुष्यांबरोबर एकांती बसून हास्यविनोद करावा किंवा भूषणकवीसारख्या कवींच्या वाग्प्रत्नांचें श्रवण करून मन रिझवावें, असा त्यांचा परिपाठ असे. कोणी उत्तम गायक किंवा विद्वान पुरुष आला असतां त्याचें गायन किंवा वाक्चातुर्य श्रवण करून त्याची यथोचित बिदागी किंवा संभावना करावी. नृत्यगायनादी कलांचा महाराजांस वीट होता असें नाहीं. त्यांच्या श्रवणावलोकनादिकेंकरून ते आपलें मनोरंजन कधीकधी करीत असत; परंतु त्यात ते आसक्त होऊन जात नसत. त्याप्रमाणेंच त्यांस शिकारीचा म्हणजे फारसा नाद होता असें नाहीं, परंतु मृगया करण्याचा मुख्य उद्देश जो हिंसक पशूंचा संहार करण्याचा तो क्षात्रधर्मास अनुसरून आहे असें मनांत आणून ते फुरसत मिळाल्यास एकदोन महिन्यांनी एकदां शिकारीस जात. त्यावेळी हरिणादी गरीब पशूंचा ते सहसा वध करीत नसत. श्राद्धादी विधींस त्यांची आवश्यकता असल्यास क्वचित प्रसंगीं ते मृगया करीत.

आपल्या नोकरांनी एकमेकांशी सलोख्याने वागावे, कोणी कोणांचा द्वेषमत्सर करूं नये अशी त्यांची सक्त ताकीद असे. ज्यानें त्यानें आपआपलीं कामे करावी, दुसऱ्यांच्या कामात ढवळाढवळ करूं नये व कोणत्याही गोष्टीचा आग्रह धरून एकमेकांशी स्पर्धा किंवा द्वेष करू नये असा निर्बंध असे. कोणाही नोकराने दुसऱ्याची नालस्ती सांगण्याचा प्रयत्न केला असतां महाराज त्याला ती आपल्याकडे बोलूं देत नसत. कोणी अधिकारी दुसऱ्या अधिकाऱ्याचा द्वेष करूं लागून परस्परांमध्यें वैरभाव उत्पन्न झाला असतां त्यांच्यांत मध्यस्थी करून महाराजांनी त्यांचें वैमनस्य नाहींसे करावे. इतकेही करून हा त्यांचा वैराग्नी नच शमला तर ते एका जातीचे असल्यास त्यांच्यामध्यें त्यांनी शरीरसंबंध जुळवून देऊन तो कायमचा मिटवावा. लहान हुद्देदारांनी मोठ्या हुद्देदारांची अमर्यादा सहसा करूं नये. महाराजांच्या तैनातीस असलेले माणूस निकट संबंधास्तव कितीही कृपेंतले असले तरी त्यांनी त्याच्या जोरावर कोणाही मोठ्या हुद्देदाराची बेअदबी किंवा मानखंडणा करूं नये. त्यांनी कारभाराविषयीं कांही एक बोलू नये. त्यांनी महाराजाशी सलगी करून आपल्या संबंधाने किंवा आपल्या इष्टमित्रांसंबंधानें कांही एक बोलू नये. जें कांही बोलणे असेल तें योग्य अधिकाऱ्यांच्या द्वारे बोलावे. महाराजांच्या अगदीं जवळच्या नातलगांनी किंवा कृपेंतल्या सरदारांनी सुद्धा जें कांही महाराजांपाशीं बोलावयाचें तें प्रत्यक्ष न बोलता योग्य अधिकाऱ्यांच्या द्वारे बोलावे. असें असतांही कोणी कांहीं विनंती महाराजांस प्रत्यक्ष केली

असता तिचा जबाब अमुक अधिकाऱ्यापाशीं सांगतो असें बोलून त्यास ते निरोप देत असत. एखाद्या अधिकाऱ्याविरुद्ध कोणी कांहीं सांगावयास आला असतां ते मनास आणीत नसत. तशात त्या अधिकाऱ्याचा खरोखरीच बाक आहे असें लक्षांत आल्यास त्याची योग्य चौकशी करून खात्री झाल्यावाचून त्यास ठपका किंवा शिक्षा देत नसत. राजा कानाचा हलका किंवा चलबुद्धी असला म्हणजे त्याचें मन मत्सरी, कपटी व लबाड लोक एखाद्या सेवकाविषयी कलुषित करण्यास चुकत नाहींत व तेणेंकरून चांगल्या सेवकाविषयीं विनाकारण संशय येऊन त्याचें तो राजा अन्यायाने नुकसान करतो. ही गोष्ट महाराजांस चांगली कळत असे व लबाडांची पावले ओळखण्यास त्यांना विलंब लागत नसे. ह्या वृत्तीमुळे सेवकजनांस असा पक्का भरंवसा असे कीं, आपल्या हातून एखादा मोठा अपराध झाल्यावाचून किंवा आपल्या कामांत आपल्याकडून कसूर झाल्यावाचून महाराजांची आपणांवर कदापि इतराजी व्हावयाची नाहीं.

आतां महाराजांनी आपला दरबार भरण्यासंबंधाची व स्वारी निघण्यासंबंधाची शिस्त कशी काय लावून दिली होती तिचे येथें दिग्दर्शन करणें उचित होय. पहिल्याने दरबार भरण्याची रीत सांगूं. दरबारच्या ठिकाणी मध्यभागी सिंहासन मांडले असून त्यावर छत्रपती बसत. पाठीमागे हुजरे मोरचेलें, चामरे, पंखे, पानदानें वगैरे घेऊन उभे राहात. सिंहासनाच्या दोन्ही बाजूंस आप्त व विश्वासू असे दहाबारा मानकरी उभे राहात. सिंहासनाच्या उजवे बाजूस खालीं अनुक्रमें मुख्य प्रधान, पंत अमात्य, पंत सचिव, मंत्री, चिटणीस, परराज्यांतील वकील, मामलतदार व किल्लेदार आपआपल्या योग्यतेप्रमाणें बसत. डावे बाजूस पंडितराव, सेनापती, सुमंत, न्यायाधीश, फडणीस, सेनाधिकारी, सरदार व शूर शिलेदार आपआपल्या योग्यतेप्रमाणें क्रमवार बसत असत. प्रधानांचे, सरदारांचे व इतर अधिकाऱ्यांचे मुतालिक व कारकून आपआपल्या वरिष्ठांच्या मागें बसत. त्यांच्या पाठीमागे दोन्हीं बाजूंस कारखान्यांचे व महालांचे दरोगे बसत व हवालदार, नाईक वगैरे उभे राहात. अग्रभागी दोन चोपदार उभे राहात. आलेल्या सभासदांकडून मुजरे करविणें, त्यांस योग्यतेप्रमाणें बसविणे, कोणी परकी आल्यास त्याची वर्दी लावणे ही कामे ह्या चोपदारांची असत. दरबारच्या देवडीची चौकी चोपदारांच्या ताब्यांत असे. कोणा इसमास दरबारास बोलवावयाचें झाल्यास ह्या देवडीवरचे चोपदार शिपायास किंवा स्वारास पाठवीत.

आता स्वारीची शिस्त कशी ठरविली होती तें पाहूं. महाराजांची स्वारी निघाली म्हणजे तिच्यापुढे पहिल्याने जरीपटका व भगवे निशाण यांचे दोन हत्ती चालत. त्यांच्या मागून मुख्य प्रधान व सेनापती यांचे जरीपटक्याचे दोन हत्ती चालत. त्यांच्या मागून लष्करातील एकंदर निशाणे चालत आणि त्यांच्या बरोबर पागेचे व शिलेदारांचे सरदार आपल्या कांहीं लोकांसह बिनीच्या रक्षणार्थ घोड्यांवर बसून चालत. त्यांच्या मागून तोफखाना व दारूगोळ्याचे छकडे व गाड्या चालत. त्यांच्या मागून शूर सरदार घोड्यांवर व हत्तींवर बसून चालत. त्यांच्या मागून पायदळ लष्करातील पट्टेकरी, विटेकरी, सागबर्चीवाले, तीरकमानवालें, खासबारदार व बंदुकवाले रांगारांगांनी चालत. त्यांच्या मागून ताशे, मार्फे, हलक्या, शिंगे, करणे वगैरे रणवाद्ये चालत. त्यांच्या मागून कोतवाल-हत्ती व बाणाच्या कैच्या उंटावरून चालत. त्यांच्या मागून खासे घोडे व कोतवाल-घोडे चालत. त्यांच्या मागून शाहाबाजे, काळूसनया वगैरे मंगलवाद्ये व घोड्यांवरील नगारे चालत. त्यांच्या मागून भाट व बंदिजन चालत. त्यांच्या मागून लग्या, निशाणें, जरित्वतोमर, भाले, बोथाट्या घेतलेले लोक, बाणदार, चोपदार, भालदार व वेत्रधारी हे चालत. त्यांच्या मागून जेठी, मल्ल वगैरे पायांनी चालत. इतके लोक पुढें चालत व मग त्यांच्या मागून महाराज हत्तीवर अंबारीत बसून निघत व त्यांच्या सभोवताली हुजरे व विश्वासू मावळे व त्यांचे सरदार चालत. महाराजांच्या हत्तीच्या मागोमाग जनानखाना चाले. त्यामागें अंतराने अष्टप्रधान दरबारात ज्या क्रमानें बसत त्या क्रमानें हत्तीवर बसून चालत; त्यांच्या मागें चिटणीस, फडणीस, कोटणीस, मानकरी व इतर सरदार घोड्यांवर बसून चालत. सगळ्यांच्या मागून साहेबी नौबत असून तीबरोबर सरलष्कर व इतर सरदार चालत.

महाराज गुणीजनांचा परामर्ष घेण्यांत व त्यांचा संग्रह करण्यांत किती तत्पर असत याचे एक इतिहासप्रसिद्ध उदाहरण बखरींतून दिलें आहे. त्याचा येथें उल्लेख करून ह्या लांबलेल्या प्रकरणाचा समारोप करूं. दिल्लीस बादशहाच्या पदरीं चिंतामणी नांवाचा एक कवी होता.[१] तो आपली कवने गाऊन बादशहाचें मनोरंजन करीत असे. ह्या कवीचा भूषणनामा एक बंधू होता. हाही मोठा कवी होता. तरी त्यास कांही प्राप्ती नसे, तो आपल्या भावाच्या आश्रयाने असे. हा घरांतच बसून राहतो असें कोणी म्हटल्यावरून ह्या कवीस मोठा राग आला आणि यवनांचे अन्न भक्षून राहावयाचें नाहीं असा निर्धार करून तो दिल्लीहून निघाला. तो फिरत फिरत कमाहूंच्या पाहाडांतील एका राजापाशीं गेला.[२] त्यानें त्याला आपल्या पदरी ठेवून घेतलें. कांही वर्षे तेथें राहिल्यावर ह्या कवीस स्वदेशी जाण्याची इच्छा झाली. त्यावरून त्या राजाने त्याला एक लाख रुपये देऊन जावयास निरोप दिला. निरोप देतांना तो म्हणाला कीं, असा दाता तुला पृथ्वीवर दुसरा कोणीही आढळणार नाहीं! ही गर्वोक्ती त्या स्वाभिमानी कवीस रुचली नाहीं. त्यानें त्यास तत्क्षणींच असा जबाब दिला कीं, 'तुझ्यासारखे किंबहुना तुझ्याहून मोठे दाते पृथ्वीवर सहस्रावधी असतील; परंतु अशी गर्वोक्ती बोलून दिलेले लाख रुपये तुच्छ मानून जाणारा याचक मात्र कोणी नसेल!' असें म्हणून तो निस्पृह कवी तें द्रव्य न घेता निघून गेला. मग पुनः भ्रमण करीत करीत तो शिवाजीमहाराजांची कीर्ती ऐकून दक्षिणेंत आला. महाराजांचे दर्शन घेऊन तो म्हणाला, 'जो यवनांचा द्वेष्टा आहे अशाच्या पदरी राहाण्याचा माझा मानस आहे.' त्यावरून त्यांनी त्याला आपल्यापाशी ठेवून घेऊन चांगली तैनात करून दिली. तो नाना विषयांवर सुंदर कविता ब्रज भाषेंत करून महाराजांचे मनोरंजन वेळोवेळा करीत असे. त्यानें महाराजांच्या प्रतापाचे वर्णन काव्यरूपानें केले आणि ह्या काव्यास शिवराजभूषणकाव्य असें नांव दिलें.'[३] हें सुरस काव्य पाहून महाराज फार खूष झाले. त्यांच्या पदरी कांहीं वर्षे राहिल्यावर तो स्वदेशी जावयास निघाला. जाते समयीं त्यांनी त्यास पुष्कळ द्रव्य देऊन परत येण्याविषयीं आग्रहपूर्वक सांगितलें व त्यानेही परत येण्याचे कबूल केलें.

भूषणकवी शिवाजीमहाराजांकडून सन्मान पावून व पुष्कळ द्रव्य घेऊन परत दिल्लीस आल्याचे वर्तमान औरंगजेबबादशहास कळले तेव्हां त्याला आपल्या भेटीस आणावें असें त्यानें चिंतामणिकवीस सांगितलें. बादशहाची ही इच्छा त्यानें आपल्या बंधूस कळविली. तेव्हां तो म्हणाला, 'बादशहा आमच्या यजमानाचा शत्रू आहे. त्याचें दर्शन आम्हांस कशाला हवे? कारण आमच्या मुखांतून शिवाजीमहाराजाच्या प्रतापावाचून दुसरें कांही निघावयाचे नाहीं. त्यामुळें त्याला क्रोध मात्र येईल!' परंतु चिंतामणिकवीनें आपल्या बंधूस फारच आग्रह केल्यावरून तो बादशहाच्या दरबारास जावयास कबूल झाला, पण त्यानें अशी अट सांगितली कीं, 'आम्हांला दरबारांत कांही कविता म्हणावयास सांगितली असतां आम्ही फक्त शिवाजीमहाराजांचे प्रताप गाऊं. ही अट बादशहास कबूल झाल्यास आम्ही दरबारास येऊं!' चिंतामणिकवीनें आपल्या बंधूची ही अट बादशहास कळविली. ती त्यास मान्य होऊन भूषणकवी दरबारास गेला व बादशहाने त्याला कांहीं वर्णन करावयास सांगितले. तेव्हां हा कवी त्याला म्हणाला कीं, 'आपण हात धुऊन बसा. कारण माझा बंधू शृंगाररसपर कविता म्हणून आपलें मन रिझवितो, त्या वेळीं आपला हात वारंवार विजारीस लागतो. मी वीररसपर कविता म्हणणार, तेव्हां तो हात मिशांवर जाणार आहे!' हें ऐकून बादशहा बोलला कीं, 'आमचा हात तुझें काव्य ऐकून मिशांवर गेला नाहीं तर तुझा शिरच्छेद होईल!' अशी धमकी देऊन त्यास कविता

---

१ हा प्रथम नागपूरचा राजा भोंसला मकरंदशहा याच्या पदरीं बहुत वर्षे होता, असें म्हणतात.

२ हा कवी प्रथम पन्नाचा राजा छत्रसाल ह्याच्या पदरी सहा महिने होता व तेथून महाराजांपाशी स. १६६४ त आला असें काव्येतिहाससंग्रहकार म्हणतात.

३ हें काव्य काव्येतिहाससंग्रहनामक मासिक पुस्तकात पुष्कळ वर्षांपूर्वी छापून निघाले आहे. हें त्यानें राज्याभिषेकाच्या आदल्या वर्षी पुरे केलें असून त्यांत काव्यातील अलंकारांचें वर्णन केलें आहे, व त्यांच्या उदाहरणार्थ जी पद्यें त्यानें रचिली आहेत त्यांत शिवाजीमहाराजांचे वर्णन केलें आहे.

म्हणण्याचा हुकूम त्यानें केला. त्यावरून तो महाराजांचे प्रताप वर्णू लागला. ते ऐकून बादशहाने त्याला असा हुकूम केला कीं,'आम्ही सार्वभौम राजे असून व आम्हांस सर्व राजे कारभार देतात असें वर्णन कर!' तेव्हां ह्या कवीने सर्व राजास वृक्षांची उपमा देऊन बादशहास भ्रमराची उपमा दिली व तो सर्व वृक्षांच्या पुष्पांतील मधु सेवन करीत असतो, असें वर्णन केलें. ह्या वर्णनात त्यानें शिवाजीमहाराजांस चंपकवृक्षाची उपमा दिली. याचे कारण उघडच होतें कीं, जसा चंपकपुष्पास मात्र भ्रमर स्पर्श करीत नाहीं, तसें बादशहाचें शहाणपण एका शिवाजीराजापुढें मात्र चालत नाहीं, हा भाव कवीस व्यक्त करावयाचा होता. मग बादशहाने त्याला विचारले कीं, 'आम्हांला हात धुऊन बसावयास सांगितले तें कशाला?' तेव्हां कवीने आणखी फक्त सहा पद्ये म्हटली. त्यांत त्यानें असें कांही उत्कट वर्णन केलें कीं, सहाव्या पद्यांच्या अंती बादशहास पुरा आवेश चढून त्याचा हात त्या झटक्यासरशीं अकस्मात मिशांवर गेला. तें पाहून कवीने आपले कवन आटोपले बादशहा त्याचें तें चातुर्य व कवित्वशक्ती पाहून अतिशयित खूष झाला व त्यानें त्याचा यथोचित सन्मान करून चांगली संभावना केली. त्या दरबारी महाराजांचा वकील होता, त्यानें ही इत्यंभूत हकीकत त्यांस लिहून कळविली. ती ऐकून महाराज परम संतोष पावले व त्या कवीस त्वरित पाठवून देण्याविषयी त्या वकिलास त्यांनी पत्र लिहिले. तें पत्र पाहतांच भूषणकवी पुनरपि महाराजांपाशीं येऊन राहिला होता असें म्हणतात.

***

भाग पंचविसावा

मोगलांशीं व विजापूरकरांशीं पुनःकलह (१६७४–७६)

मोगलांचा सुभेदार खानजहान याच्याशी सलोखा करून औरंगजेब बादशहाकडे त्याच्या द्वारें एक अर्ज महाराजांनी पाठवून, त्यास मधाचें बोट दाखविण्याचा प्रयत्न केला होता व मोगल सैन्याची हालचाल आपल्याविरुद्ध होऊं नये असें केलें होतें, हें मागें सांगितलेंच आहे; परंतु हा सलोखा फार दिवस टिकला नाहीं. महाराजांनी स्वतःस मोठ्या थाटाने राज्याभिषेक करून घेतला व चिरवांच्छित हिंदुपदपादशाहीची पुनः स्थापना केली, हें वर्तमान औरंगजेबास कळले तेव्हां त्यास अतिशयित वाईट वाटलें. आपला दक्षिणेताल सुभेदार त्याला मिलाफी आहे असा त्याला वहीम आला आणि स्वस्थ बसून राहिल्याबद्दल त्यानें त्याला टपका दिला. ह्या वेळीं हा खान आपल्या पेडगाव येथील छावणीत स्वस्थपणे चैन करीत राहिला होता. राज्याभिषेकाची गडबड आटोपल्यावर दुसऱ्या महिन्यात त्याची छावणी लुटण्याचा बेत महाराजांनी केला आणि दोन हजार घोडदळ तिकडे पाठवून देऊन मोंगलांचा प्रांत लुटण्याचा घाट घातला. तेव्हां अर्थात् हा खान ह्या घोडदळाला हाकून देण्याकरिता त्याच्यावर चालून गेला. त्याने त्याला गलकावण्या दाखवीत त्याच्या छावणीपासून बरेच दूर नेले. खान असा छावणी सोडून दूर गेला तेव्हां महाराजांनी सात हजार लोकांनिशी त्याच्या छावणीवर अकस्मात् हल्ला करून तेथल्या लोकांस उधळून लाविले आणि त्यांची छावणी येथेष्ठ लुटली. ह्या लुटीत त्यांना एक कोटी रुपये व इतर बरीच चीजवस्तू सापडली. बादशहाला नजर करण्याकरिता खानाने दोनशे उत्तम घोडे मिळविले होते. हे सगळे महाराजांच्या हाती लागले, मोंगलांचे तंबू वगैरे सामान जाळून टाकले.[१] मग दिलेरखानानें आपल्या फौजेनिशीं महाराजांच्या मुलखांत शिरून लढाई आरंभिली. महाराजांनी मोरोपंतास त्याच्यावर पाठविले. त्यानें खानाशी समोरासमोर सामना करण्याचें सोडून मोगलांच्या मुलखात प्रवेश करून त्यांची ठाणी सर करण्याचा सपाटा चालविला. मोगलांनी परत घेतलेलीं औंध व पट्टा ही ठाणीं त्यानें पुनरपि काबीज केलीं. शिवनेरी किल्ला ह्या वेळीं मोगलांच्या ताब्यांत होता, तो परत घेण्याचा मोरोपंतानें पुष्कळ प्रयत्न केला. पण तो सिद्धीस गेला नाहीं. ह्याप्रमाणें मोरोपंत तिकडे गुंतला असतां हंबीरराव सेनापती सुरतेजवळील घाटांतून वर चढून गेला. त्यानें आपल्या फौजेच्या अनेक टोळ्या करून त्या चोहोंकडे सोडल्या व मोगलांच्या ताब्यांतला तिकडील सगळा मुलूख लुटून उद्ध्वस्त केला. त्यांच्या फौजेची एक टोळी तर नर्मदा नदी ओलांडून भडोच प्रांतांत शिरली व तिने तिकडील लोकांवर जबरदस्त खंड बसविले. ह्या धामधुमीमुळे अर्थात् दिलेरखानास आपल्या सुभ्यांतील मुलखाचा बंदोबस्त नीट ठेवण्यासाठी महाराजांच्या मुलखांतून फौज काढून न्यावी लागली.

दिलेरखान माघारीं गेल्यावर मोरोपंत दहा हजार लोकांसह कल्याणास तळ देऊन राहिला. तेथून त्यानें वसईच्या फिरंग्यांकडे वकील पाठवून त्यांच्या ताब्यांतील सगळ्या प्रांतांच्या उत्पन्नाच्या चौथ्या हिश्शाची मागणी केली. ही चौथाईची मागणी फिरंगी लोकांकडे महाराजांनी पहिल्यानेच केली असें दिसते. फिरंग्यांनीं पूर्वी तह करून तोफा,

---

१ प्रो. सरकार, पृ. २८३.

दारूगोळा वगैरे प्रतिवर्षी महाराजांस पुरविण्याचे कबूल केलें होतें व त्या तहाबरहुकूम ते वागतही असत. ह्या वेळीं त्यांच्या प्रांतांवर चौथाईचा हक्क बसविण्याचें कारण असें झालें कीं, त्यांनी आपल्या प्रांतांतील पुष्कळ हिंदुकुटुंबांवर ख्रिस्तीधर्म स्वीकारण्याविषयीं जुलूम केला असून, जी कुटुंबें तो स्वीकारण्यास तयार झाली नाहींत त्यांचा त्यांनी भयंकर रीतीनें छळ चालविला होता. ह्याबद्दल महाराजांस फार वाईट वाटून त्यांनीं हा खंड त्यांच्यावर बसविण्याचे मनांत आणिलें. मोरोपंतानें पाठविलेल्या वकिलास त्यांनी बहुतकरून नकार सांगितला नसावा. कारण ह्या वेळीं त्यांचे युद्ध झाल्याचें कोठेंही लिहिलेलें आढळत नाहीं. फिरंग्यांनी कांहीतरी तोड करून मोरोपंताच्या कचाटींतून आपली मुक्तता अवश्य करून घेतली असावी. एरवीं त्यांस त्याच्याशी लढण्याचे सामर्थ्य मुळींच नव्हतें आणि मोरोपंतानेंही त्यांच्या प्रांतास उपद्रव केला नाहीं असें दिसते.

ह्याप्रमाणें साष्टी बेटासमोर मोरोपंताचा तळ पडला असून तो तेथें बरेच दिवस राहिला. ह्यामुळे शिद्दीला मोठीच दहशत वाटूं लागली. त्यांत आणखी त्याला असें कळले कीं, महाराजांची पुष्कळ फौज घाटावरून खालीं उतरत आहे. त्यांचें आरमार ह्या वेळीं मुंबईच्या बंदराजवळ होतें. त्याला हे मराठे आग लावून देण्यास कांहीं कमी करावयाचे नाहींत अशी शिद्दीला भीती वाटणे साहजिक होते. म्हणून त्यानें तें तेथून त्वरित काढून नेले. मोरोपंत सैन्यानिशीं घाट उतरून कल्याणास तळ देऊन राहिल्याचें वर्तमान सुरतेस पोंचतांच तेथील लोकांची पांचांवर धारण बसली. त्यांत आणखी हंबीरराव सेनापती भडोचपर्यंत पोंचून तिकडील मुलखांत धामधूम करीत होताच. असा दुहेरी हल्ला आपल्या शहरावर येऊन आपली काय दशा होईल कोण जाणे असें त्यांस वाटणे साहजिक होतें.

ह्याप्रमाणें हे दोन प्रधान इकडे गुंतले असतां स्वतः महाराज कांहीं स्वस्थ बसले नव्हते. घाटावरून एकसारखी फौज उतरत होती, ती सगळी मोरोपंताच्या छावणीत जमा झाली. ही एवढी फौज इकडे कां जमत आहे तें कोणासही कांही दिवस कळले नाहीं. मोरोपंतापाशी एकंदर पंचवीस हजार फौज जमा झाल्यावर त्याच्या छावणीची तयारी कशी काय आहे तें पाहण्याच्या मिषानें महाराज रायगडावरून निघून कोंकणांत आले. इतक्या लगबगीने तिकडे जाण्याचा हेतू काय तें कोणासच कळले नाहीं. ह्या वेळीं जुन्नरास मोगलाचे मोठे ठाणे असून तेथें त्यांची जवळजवळ चाळीस हजार फौज जमली होती. ह्या सर्व फौजेचा रोख महाराजांच्या मुलखांत शिरून युद्धप्रसंग करण्याचा होता. हे महाराजांस कळल्यावरून त्यांनी शत्रूस कळू न देता ही तयारी करविली व आपण स्वतः तें सैन्य घेऊन, जुन्नराकडे मोठ्या वेगानें कूच करून त्या मोठ्या फौजेवर अकस्मात हल्ला केला. उभय पक्षाचे मोठे घनघोर युद्ध झालें. त्यांत मोगलांच्या सैन्याचा पुरा मोड होऊन ते सैरावैरा पळत सुटले. ह्या लढाईत महाराजांचे जें नुकसान झालें त्याच्या दसपट मोगलांचे झालें. शत्रूचे सैन्य अष्टदिशांस उधळले होतें, त्याच्या मागें महाराजांचे लोक टोळ्या करून लागले. ह्या लढाईत शत्रूची पुष्कळ घोडी व दुसरें मुबलक युद्धोपयोगी सामान महाराजांच्या हातीं लागलें. शत्रूसैन्य पळत सुटले होतें त्याच्या पाठीस लागलेल्या टोळ्यांनी त्याची सारखी पाठ पुरविली. वाटेत मोगलांचा जितका मुलूख लागला तितका सगळा त्यांनी लुटून उद्ध्वस्त केला. एका टोळीने तर शत्रूच्या सैन्याचा ब्रह्मपुरीपर्यंत सारखा पिच्छा पुरविला. एकंदर पेठा लुटून खंडोगणती माल ह्या टोळ्यांनी आणिला. त्याप्रमाणेंच सुरतेस ज्या रस्त्याने व्यापाराचा माल जात असे त्या रस्त्यावर महाराजांचे लोक राहून सांपडला तेवढा माल लुटून आणूं लागलें. ह्या वेळा रामनगरच्या तीन-चार हजार कोळ्यांनी तिकडील रानातले व पहाडी रस्ते रोखून मराठ्यांचा पुढे प्रवेश होऊ न देण्याचा प्रयत्न केला, असें म्हणतात.

इकडे महाराजांनी जुन्नरचें ठाणे घेण्याचा निश्चय करून त्या किल्ल्यास वेढा दिला व त्यावर जोराचा मारा चालविला; परंतु कांही केल्या किल्ला हातीं येईना. महाराजांच्या दोघां मनुष्यांनी किल्ल्यावर चढून जाऊन त्याचा दरवाजा उघडण्याची युक्ती योजण्याचा बेत केला. परंतु ते किल्ल्यावरील लोकांच्या दृष्टीस पडून त्यांनी त्यांच्यावर मोठमोठे खडक लोटले त्यामुळें त्यांचा नाश झाला. खडक खाली लोटून वेढा घातलेल्या लोकांचा नाश करण्याची ही युक्ती बरी आहे असें वाटून त्यांनी मराठ्यांवर वरून खडक लोटून देण्याचा धूम धडाका चालविला. त्यामुळें

महाराजांच्या लोकांची पुष्कळ नासाडी होऊं लागली व त्यांचे धैर्य सुटून ते पळू लागले. गनीम पळताहेत असें पाहून मोगलांचे लोक त्यांच्या पाठीस लागले; परंतु त्यामुळें त्याचा फार नाश झाला. कारण शत्रूपुढून पळण्याची मराठ्यांची रीत फारच विलक्षण असे. ते पळत सुटले म्हणजे अंमळ दूर जाऊन पुनः अकस्मात् एकवट होऊन शत्रूवर तुटून पडत व शत्रू प्रबल असल्यास त्यांची पुनः दाणादाण झाली असतां ते परत कांहीं वेळ पळत सुटत आणि पुनः एकदम एकत्र होऊन शत्रूवर उलटत. अशा गनिमी काव्यामुळे त्यांचा पाठलाग करून पुरा मोड करू असें कोणा मनांत आणिल्यास त्याची पुरी फजिती होत असे. ह्या गनिमी काव्याने त्यांनी ह्या वेळी मोगलांची पुष्कळ फौज खराब केली, परंतु उलट खाऊन पुनः जुन्नरास वेढा देण्यांत कांहीं हाशील नाहीं असे महाराजांस वाटल्यावरून ते आपल्या लोकांसह रायगडास गेले.

रायगडावर येतांच त्यांना असें कळले कीं, फोंड्याच्या सुभेदारानें आपण दूरच्या मोहिमेत गुंतलो आहों असें पाहून आपणांशी केलेला तह मोडून पुनः विजापूरसरकाराची ताबेदारी स्वीकारिली व तो आपल्या तिकडील घाटातल्या ठाणेदारांस त्रास देऊ लागला. म्हणून महाराजांनी त्याची चांगली खोड मोडण्याचा निश्चय करून त्या किल्ल्यावर स्वारी करण्यासाठीं मोठी फौज तयार केली. ह्या स्वारीवर महाराज स्वतः गेले. मोहिमेसाठी पंधरा हजार घोडदळ, चौदा हजार पायदळ व इतर दहा हजार माणसे जमवून राजापूरास गेले. आणि तेथे तीन दिवस मुक्काम करुन चाळीस जहाजे तयार करुन त्यांस वेंगुर्ल्याच्या बंदरात जाऊन राहावयाचा हुकूम केला आणि मग कुडाळास जाऊन तेथून फोंड्याकडे वळून किल्ल्यास बळकट वेढा दिला. हा किल्ला अतिशयित मजबूत असून आतील लोक मोठ्या हिंमतीने लढले. किल्ला कांही केल्या हाती येईना तेव्हां किल्ल्यावरील लोकांस अन्नसामुग्री वगैरे पोचेनासे करून आतील लोकांची उपासमार करून त्यांस जेर करण्याचा त्यांनी बेत केला. आणि पावसाळा आला तरी किल्ल्याचा वेढा कायम राखण्याची तजवीज केली. किल्ल्याचा सुभेदार महंमदखान याच्यापाशी फक्त चार महिने पुरेल इतकी अन्नसामुग्री होती. विजापूरसरकाराकडून त्यांस मदत मिळण्याची मुळी आशा नव्हती; पोर्तुगीज लोकांकडून त्यास मदत मिळण्यासारखी होती. परंतु त्यास आपला गोवेंप्रांत कसा बचतो याचीच फिकीर पडल्यामुळे त्यांस महाराजांशी उघड विरोध करण्याचे धैर्य झाले नाही. तिकडचा सुभेदार रुस्तुम जमान याच्याकडे द्रव्य व माणसे फारशी नसल्यामुळे त्यालाही त्यांस या प्रसंगी मदत करण्याचे सामर्थ्य नव्हते. ह्या वेळी बहिलोलखान मिरज येथे पंधरा हजार लोकांनिशी तळ देऊन होता. त्याच्या मनात फोंड्याच्या किल्लेदाराच्या मदतीस जावयाचे होते; परंतु त्या किल्ल्याकडे जावयाच्या वाटांवर झाडे तोडून त्यांचे मेढेकोट महाराजांनी रचले होते, व त्यांवर आपले लोक ठेवून दिले होते. ह्या अडचणीतून पार पडणे अतिशयित धोक्याचे आहे व तिकडे जाण्याचा प्रयत्न केला तो निष्फळ होऊन आपल्या लोकांची पुष्कळ नासाडी होईल. असे त्यास वाटून त्याने आपला बेत रहित केला; पण त्याने फोंड्याच्या किल्लेदारास मदत न केल्याचे कारण दरबारचे लोक असे सांगू लागले की, बहिलोलखानास शिवाजीमहाराजांनी लाच दिल्यामुळे तो असा जागच्या जागी स्वस्थ राहिला. महंमदखानाची अशी चोहीकडून निराशा झाली तरी त्याने मोठ्या शौर्याने व हुशारीने किल्ला बरेच दिवस लढविला. महाराजांनीही मोठ्या नेटाने वेढ्याचे काम चालू ठेविले. त्यांनी किल्ल्याचा बाहेरला कोट हस्तगत करून त्याच्या सभोवतालचा खंदक बुजविला व पाचशे शिड्या तयार करविल्या आणि अर्धा-अर्धा शेर सोन्याची पाचशे कडी तयार करून आपल्या लोकांस असे सांगितले कीं, जे कोण शिड्या लावून किल्ल्यावर चढून जातील त्यांस ही कडी इनाम देण्यात येतील. ह्या झटापटींत महाराजांचे पुष्कळ लोक ठार झाले व शेकडो जायबंदी झाले. मग महाराजांनी त्या किल्ल्यास मोठमोठे सुरुंग लाविलें. ते उडाल्यामुळे त्यास मोठे थोरले भगदाड पडलें व त्यावरचे पुष्कळ लोक त्यांत सांपडून प्राणांस मुकले. ह्याप्रमाणें किल्ल्यांत प्रवेश होऊन उभय पक्षाकडील वीरांची झटापट मोठ्या आवेशाने झाली. किल्ल्यावरील लोकांचा पुरा पराभव झाला व किल्ला महाराजांच्या कबजांत आला. किल्ल्यावरील एकूणएक पुरुषांची कत्तल केली. ह्या गर्दीत महंमदखान व दुसरे पाच आसामी काय ते बचले. याचे कारण असे कीं, महंमदखानाने विजापूरकरांचा तिकडील सगळा प्रांत व किल्लेमहाराजांच्या स्वाधीन करण्याचे वचन दिले. आणि त्याने तिकडच्या

किल्लेदारास किल्ले मराठ्यांच्या स्वाधीन करण्याविषयी पत्रे लिहिली. ती त्यांनी जुमानली नाहीत, म्हणून खानास कैद करून ठेविले; इकडे आकोल्याचा फौजदार इनामतखान याने महंमदखानाच्या ताब्यांतला मुलूख आपल्या कबजांत घेऊन तिकडील किल्ल्यावर आपले लोक ठेवून दिले; परंतु महाराजांपुढे त्याचा निभाव लागणे शक्य नसल्यामुळे त्याने त्यांच्याकडून कांही पैसा घेऊन ते किल्ले व त्या सभोवतालचा प्रांत त्यांच्या स्वाधीन केला. पुढे थोडक्या अवकाशात अकोला, शिवेश्वर व काद्रा ही शहरे त्यांच्या हाती आली आणि दक्षिणेस गंगावती नदीपर्यंतचा विजापूरसरकाराच्या सगळ्या मुलूखावर त्यांचा ताबा बसला.

फोंड्याच्या किल्ल्यास वेढा घालून नेटाने लढण्याच्या कामी महाराजांच्या लष्करातल्या इब्राहीम नावाच्या एका शूर सरदाराने मोठा पराक्रम केल्यावरून त्यांस नावाजून त्याची त्या किल्ल्यावर नेमणूक केली. किल्ल्याची हवालदारी मुसलमानास दिली ती हीच पहिल्याने होय. एरवी तो मराठ्यांवाचून कोणास देऊ नये असा त्यांचा नेम असे. ह्यावरून हे स्पष्ट होते कीं, ह्या मुसलमान सरदाराच्या इमानीपणाविषयी महाराजांची पूर्ण खात्री झाली होती. नाही तर अशा सरहद्दीच्या किल्ल्यावर त्यास हवालदार नेमण्याचे धाडस त्यांनी सहसा केले नसते.

फोंडे किल्ल्यावर आपलें ठाणे बसविल्यानंतर आसपासचा प्रांत महाराजांनी हस्तगत केला आणि तो आपल्या हातीं कायमचा राहाण्यासाठी त्यांत भीमगड व पारगड असें आणखी दोन नवे किल्ले बांधिले व त्यांवर आपले लोक ठेवून दिले. नंतर त्यांनी सुंदा प्रांतांत शिरून तेथले पुष्कळ किल्लेकाबीज केले. कारवारचा किल्ला तेथील किल्लेदार सामोपचारानें स्वाधीन करून देईना. म्हणून त्या शहरास आग लावून देण्याचा हुकूम महाराजांनी आपल्या लोकांस दिला. ह्या शहरांत इंग्रज व्यापारी होते, त्यांशी मात्र ते चांगल्या रीतीनें वागले. त्यांच्या वखारीस त्यांनी उपद्रव दिला नाहीं. ह्यावेळीं महाराजांनी दक्षिण कोकण व कानडाप्रांतांचा उत्तरेकडील सगळा मुलूख काबीज केला. बेदनूर प्रांतांत एक स्त्री त्या वेळीं राज्य करीत होती.[१] यास्तव त्या प्रांतांस उपद्रव करणें बरोबर नाहीं असें महाराजांस वाटलें. ह्या राणीने महाराजांस पुष्कळ नजरनजराणा पाठवून अशी विनंती केली कीं, ‘माझे कांहीं कारभारी व नातलग मजवर उठले आहेत. त्यांचें पारिपत्य करण्यासाठीं मला आपण मदत करावी.’ ह्या तिच्या विनंतीस महाराजांनी मोठ्या संतोषानें मान देऊन तिच्या मदतीस आपले कांहीं लोक रवाना केले व तिचे संकट निवारण केलें. ह्या राणीने महाराजांस काही खंडणी देण्याचे कबुल करून त्यांचा एक वकील आपल्या दरबारांत ठेवून घेतला.

महाराज फोंडेप्रांतांत मोहिमेस गेल्याची बातमी कळतांच फलटणचे निंबाळकर व मलवाडीचे घाटगे अशा दोन विजापूरसरकाराच्या जहागीरदारांनी पन्हाळा व तातोरा ह्या दोन किल्ल्यांच्या दरम्यान असलेलीं सगळी ठाणीं महाराजांच्या लोकांकडून घेतली व त्यांचें तिकडील सर्व लष्कर हाकून दिलें. ह्या किल्ल्यांच्या आसपासचा एकंदर मुलूख त्यांनी हस्तगत करून विजापूरसरकारास दिला; परंतु दक्षिणेंतील मोहीम फत्ते करून महाराजांनी घाटावर येतांच हा प्रांत व ही ठाणी पुनः काबीज केलीं व यापुढें हा प्रांत पुनरपि विजापूरकरांच्या जहागीरदारांच्या हाती असा सहज जाऊं नये म्हणून पन्हाळा व तातोरा ह्या किल्ल्यांच्या दरम्यान त्यांनी किल्ल्यांची एक रांगच राग उभारून दिली. ह्या किल्ल्यांची नांवे वर्धनगड, भूषणगड व सदाशिवगड अशी होतीं. हे नवीन बांधलेले किल्ले कांही फारसे बळकट होते असें नाही; परंतु त्यांच्या योगाने आसपासच्या मुलखाचे रक्षण चांगले होऊ लागलें.

असें सांगतात कीं, दक्षिणेस फोंड्याकडे मोहिमेस गेल्यावर मोगलांनी आपल्या प्रांतास उपद्रव देऊ नये म्हणून ह्या वेळीं त्यांनी बहाकूखानाशीं पुनःतहाचे बोलणे लावले. त्यातील मुख्य कलमे अशीं होती कीं, महाराजांनी औरंगजेबास सतरा किल्ले द्यावे व आपला मुलगा संभाजी यास कांहीं लोकांनिशीं मोगल सुभेदाराच्या मदतीसाठी औरंगाबादेस पाठवावे. हा असा तह व्हावा हे इष्ट वाटून औरंगजेबाने फरमान पाठवून तहाची ही कलमे कबूल केली व त्यात

१ ही विधवा असून तिचा मुलगा अगदी लहान असल्यामुळे ती त्याच्यावतीने राज्यकारभार पाहात होती.

शिवाजीमहाराजांस मागील अपराधांबद्दल क्षमा केली आहे असें नमूद केले. ह्या बादशाही फरमानाचा स्वीकार करून किल्ला स्वाधीन करून द्यावे असा निरोप बहादूरखानानें महाराजांस पाठविला. एवढ्या अवधीत महाराजांची फोंड्याकडील मोहिमेत फत्ते होऊन ते तिकडून मोकळे झाले होते. म्हणून त्यांनी सदरील निरोप घेऊन येणाऱ्या लोकांकडे खानास असा उलट निरोप पाठविला कीं, 'तुम्ही आमच्यावर असा कोणता प्रसंग आणला आहे कीं, आम्हीं तुमच्याशी तह करावयास पाहावे?' हा जबाब ऐकून बहादूरखान चकित झाला. शिवाजीमहाराजांनी आपणांस खोट्या नादास लावून साफ फसविल्याबद्दल त्याला अतिशयित वाईट वाटलें आणि त्यांना शासन करण्याचा निश्चय करून त्याने विजापूरचा वजीर खवासखान यांशी संगनमत केले आणि दोघांनी दोहोंकडून महाराजांवर स्वारी करण्याचा बेत केला. औरंगजेबाला हा बेत पसंत वाटून विजापूरकरांनी शिवाजीमहाराजांना जेर करण्याच्या कामीं ही अशी मदत केल्यास त्याना एक वर्षांची खंडणी माफ करण्याचें त्याने वचन दिले; परंतु इतक्यांत विजापूरदरबारांत उलटापालट होऊन खवासखानाच्या हातचा कारभार गेला. त्यामुळे मोगलांचा सदरील बेत असिद्ध राहिला.

इकडे हंबीरराव सेनापती गुजराथेंत सर्वत्र एकसारखा धुमाकूळ उडवून देत होता. तो मोगलांच्या प्रांतांत यथेष्ट लुटालूट करून परत स्वदेशीं यावयास निघाला. त्याच्या हालचालीवर दिलेरखानाचें पुरें लक्ष होतें. हंबीरराव त्यास टाळा देऊन लुटीच्या ऐवजासह चालला असतां त्या खानानें त्याचा मोठ्या आवेशाने पाठलाग केला. तरी त्याच्या हातून पार निसटून जाऊन हा महाराजांचा महाप्रतापी सेनापती लुटीच्या एकंदर मालासह रायगडास सुरक्षित जाऊन पोचला व दिलेरखान चुरमुरे खात माघारीं गेला. पावसाळा संपतांच हंबीररावाने पुनः मोगलांच्या मुलखांत शिरून त्याची फारच खराबी केली. त्याला हरकत करावयास कोणीही मोगल सरदार आला नाहीं. कारण ह्यावेळी मोगलांचे व विजापूरकरांचें कांहीं कारणावरून युद्ध जुंपले असून दिलेरखान वगैरे सरदार तिकडे गुंतून राहिले होते. ह्यामुळे हंबीररावाला चांगलेच फावले.

ह्या वेळीं विजापूरसरकाराचा कारभार खवासखान पाहत होता. ह्याने मोगलांची आपणावर एकच गर्दी झालेली पाहून बहादूखानाशी असा तह करण्याचें योजिले कीं, विजापूरसरकार मोगलबादशहाचें मांडलिक आहे असें समजून चालावे व बालराजाची बहीण पादशाबिबी ही औरंगजेबाच्या एका मुलास द्यावी. परंतु हा तह दरबारच्या इतर सरदारांना पसंत न होऊन त्यानी खवासखानाचा खून केला. ह्या सरदारमंडळाचा प्रमुख अबदुल करीम[१] हा होता. ह्याने सर्व कारभार आपल्या हातीं घेऊन मोगलांशी लढण्याची तयारी केली. बहादूरखान स्वसैन्यानिशीं विजापुरावर चालून आला. उभय पक्षांच्या कित्येक चकमकी झाल्या. त्यांत विजापूरकरांची सरशीच झाली. हा असा मोगलसैन्याचा मोड होण्याचा रंग दिसू लागल्यावरून दिलेरखानानें मध्यस्थी करून लढाई बंद केली व उभय पक्षांमध्ये तह होऊन सलोखा झाला.

मोगलांनी विजापूरवर चढाई केली तेव्हां सदरील नव्या वजिराने गोवळकोंड्याचा दिवाण मादण्णा याच्या मध्यस्थीने शिवाजीमहाराजांशी तह केला. त्याची कलमे येणेप्रमाणे होती. विजापूरसरकाराने महाराजांना तीन लाख होन पेशखुष म्हणून द्यावे; मोंगलांच्या उपसर्गापासून बचाव करण्यासाठी त्यांस प्रतिवर्षी एक लाख होन खंडणीदाखल द्यावे. पूर्वेस कृष्णा नदीपासून पश्चिमेकडला सगळा मुलूख महाराजांच्या कबजात गेला आहे. तो त्यांच्याकडे कायमचा राहावा यात कोल्हापूर प्रांताचाही समावेश व्हावा; परंतु हा तह फार दिवस टिकला नाही. आणि तो मोडल्याबद्दल महाराजांना मुळीच पर्वा वाटली नाही. कारण ह्या वेळीं विजापूर दरबारात गोंधळ माजला असून कोणाच्याच हाती कायमची सत्ता राहणे अशक्य झाले होते.

घाटाखाली कोंकणांत महाराजांचा अंमल बहुतेक प्रांतावर कायमचा बसला होता. शिद्दीच्या व मोगलांच्या आरमाराने व सैन्याने त्यास वारंवार उपद्रव द्यावा; परंतु तो प्रांत त्यांस त्यांच्या हातचा हिसकावून घेण्याची ताकद

१ प्रो. सरकार याचे नाव बहिलोलखान असे देतात.

नव्हती. विशेषत: मोगलांच्या व फिरंग्यांच्या सरहद्दीला लागून जे कल्याण, कुर्ला वगैरे प्रांत महाराजांच्या ताब्यांत होते त्यांवर मोगलांचा डोळा विशेष असे. हे प्रांत काबीज करण्याचा घाट घालून खानजहान कोंकणांत उतरून धामधूम करूं लागला होता; परंतु हा त्याचा आपल्या प्रांतास होणारा त्रास नाहींसा करण्याची त्यांनी अशी सोपी युक्ती काढली कीं, ह्या मोगलसुभेदारास दहा हजार होन देऊन त्याची मूठ दाबली. एवढें आमीष मिळाल्यावर तो खान कोंकणांतली स्वारी रद्द करून परत घाटावर गेला; परंतु शिद्दी कांही उगी बसला नाहीं. त्यानें आपलें आरमार सज्ज करून महाराजांच्या ताब्यांतील कोंकणकिनाऱ्यावरील गांवांस त्रास देण्याचा तडाखा सुरू केला. त्यानें वेगुर्ल्यास उतरून तेथील लोकांस लुटून त्यांची घरेदारे जाळून टाकिली. ह्यावेळी येथें डच लोकांची एक वखार होती. तिच्यावर शिद्दीने हल्ला केला असता डच लोकांनी त्याच्याशीं लढून आपला मोठ्या शौर्याने बचाव केला, असें म्हणतात. महाराजांचे आरमार विजयदुर्ग व राजापूर येथें सज्ज होऊन शिद्दीच्या पाठलागास निघाले; परंतु त्याचे आरमार त्यांस कोठेच भेटले नाहीं. शेवटी मराठ्यांच्या आरमाराने त्याच्या जंजिऱ्यास समुद्रांतून वेढा दिला. तेव्हां तो त्याच्या रक्षणासाठीं तेथें प्राप्त झाला. उभय आरमारांची लढाई झाली. तींत कांहीएक निष्पन्न न होऊन मराठ्यांच्या आरमारास त्यावेळीं वेढा उठवून जावे लागलें.

वर सांगितल्याप्रमाणें मोगलांच्या सुभेदारास कोंकणांतून काढून लाविल्यावर महाराजांनी असा विचार केला कीं, साष्टीप्रांतांत फिरंग्यांस चांगला शह देण्यासारखे आपलें ठाणे नाहीं; तें निर्माण केल्याने त्यांच्या व इतर शत्रूंच्या तिकडील हालचालींवर आपणांस चांगली नजर ठेवितां येईल. ह्या इराद्याने त्यांनी वसईनजीक सिबोन नांवाचा एक किल्ला फिरंग्यांच्या ताब्यात होता त्याच्या समोरासमोर एक नवा किल्ला बांधण्याचें काम सुरू केलें. फिरंग्यांनीं तें बंद पाडण्याविषयीं पुष्कळ खटपट करून पाहिली; परंतु त्यांचा काहीएक उपाय न चालून किल्ल्याचे काम मराठ्यांनी मोठ्या झपाट्यानें चालविले.

ह्या सुमारास महाराजांची प्रकृती बेआराम होऊन ते साताऱ्यास सात-आठ महिने अडकून पडले. तेव्हां जिकडेतिकडे अशी अफवा उठली कीं, शिवाजीमहाराज आजारी पडले असतां त्यांस त्यांचा पुत्र संभाजी याने विषप्रयोग केल्यामुळें ते मृत्यू पावले; परंतु ही वदंता कोणास फारशी खरी वाटली नाहीं. कारण अशा खोट्या कंड्या पूर्वी अनेक वेळा उठल्या होत्या. महाराजांच्या तीसबत्तीस वर्षांच्या आयुष्यक्रमांत त्यांची ही पहिल्यानेंच प्रकृती बिघडली असावी असें वाटतें. कारण ती अशी पूर्वी नादुरुस्त झाल्याचा उल्लेख आणखी कोठेंही आढळत नाहीं. इतकीं वर्षे सतत परिश्रम करून व अनेक प्रसंग टाळून स्वराज्यसिद्धी केल्यावर त्यांस कांही विश्रांती अवश्य हवी होती; पण ती त्यांस प्राप्त होणें अशक्य होतें. कारण आसमंतात् असलेल्या प्रबळ शत्रूंचा रोख त्यांच्यावर सारखा असल्यामुळें त्यांच्याशी टक्कर द्यावयास सर्वदा उद्युक्त राहिल्यावांचून मुळी गतीच नव्हती. प्रकृती अतिश्रमामुळे नादुरुस्त झाल्याकारणानेंच केवळ ते एवढे महिने साताऱ्यास पडून राहिले; परंतु ह्या आजारपणातही त्यांनी एका मोठ्या मोहिमेस निघण्याचा बेत केला व प्रकृती नीट होतांच तीवर ते स्वत: निघाले. ही मोहीम त्यांनी कर्नाटकावर केली. तिचे वर्णन पुढील भागांत करूं.

ह्या कर्नाटकावरील मोहिमेचा विचार साताऱ्यास चालला असतां इकडे मोरोपंत पिंगळे दहा हजार लोकांनिशीं कल्याणकडे गेला. त्याने प्रथम रामनगरच्या कोळी राजाला हाकून देऊन त्याचे संस्थान काबीज केले आणि सुरतेपासून तीन दिवसांच्या वाटेवरील काही गावे काबीज करून तेथे आपली ठाणी बसविली. ह्या वेळी त्याने कांही लोक व मजूर पारनेल नांवाच्या मोडकळीस आलेल्या किल्ल्यावर पाठविले. त्या लोकांनी तो किल्ला ताब्यांत घेऊन त्याची दुरुस्ती करून तो चांगला मजबूत करण्याचें काम मोठ्या झपाट्याने चालविले. आतां हा किल्ला ताब्यांत घेण्यांत महाराजांचे धोरण अर्थात असें होतें कीं, तेणेंकरून दमण येथील फिरंग्यांवर चांगला वचक बसावा व सुरतेच्या रस्त्यालगत तो किल्ला असल्याकारणानें मोगलांच्या तिकडील हालचालींवर चांगली नजर ठेवितां यावी. फिरंग्यांच्यानें अर्थात ह्या कामासही मुळींच हरकत करवली नाहीं. किल्ला चांगला दुरुस्त झाल्यावर तो कसा काय मजबूत झाला आहे हें पाहण्यासाठी महाराज स्वत: प्रकृती बरी झाल्यावर पहिल्यानें तिकडे गेले आणि मग तेथून येऊन कर्नाटकच्या मोहिमेवर निघाले.

***

भाग सव्विसावा

कर्नाटकांतील मोहीम
(१६७६–७८)

महाराज साताऱ्यास प्रकृती बिघडल्यामुळें राहिले असतां व्यंकोजीराजांचा मुख्य कारभारी रघुनाथ नारायण हणमंते हा त्यांच्याकडे आला. हा रघुनाथपंत शहाजीराजांचा पहिला मुख्य कारभारी नारो त्रिमळ हणमंते याचा पुत्र. बाप निर्वतल्यावर शहाजीराजांचा कारभार हा रघुनाथपंत पाहत असे. शहाजीराजे मरण पावल्यावर व्यंकोजीराजे अर्थात कर्नाटकांतील जहागिरीचे मालक झाले व रघुनाथपंताकडेच सगळा कारभार राहिला परंतु पुढें काही वर्षांनी व्यंकोजीराजांच्या मनांत असें आलें कीं, सगळा कारभार आपल्या बुद्धीने चालवावा, वडिलांच्या वेळच्या ह्या कारभाऱ्याची कोणत्याही बाबतींत मसलत सुद्धा घेऊं नये. ह्याप्रमाणें व्यंकोजीराजांनीं कारभार आपल्या हातीं घेऊन रघुनाथपंताचें कांहीएक चालेनासें केलें. हलके व सामान्य लोक जवळ करून त्यांच्या तंत्राने ते वागू लागलें व रघुनाथपंताची पदोपदी मानखंडना करूं लागले. तेव्हां रघुनाथपंतानें पाहिले कीं, आतां आपला बोज येथें राहणें कठीण आहे. वडिलांनी मिळविलेली कीर्ती कायम राखण्याची आशा आता कांहीएक उरली नाहीं. तर आतां, तुम्ही जवळ असून दौलतीस अपाय कसा घडूं दिला, असा दोष यांचे वडील बंधू शिवाजीमहाराज यांचा आपणांवर येईल, तो न यावा ह्यासाठीं कारभारांतलें आपलें अंग अजिबात काढून घेऊन कोठे तरी क्षेत्रास जावे व तेथें स्नानसंध्या करून उरले आयुष्य घालवावे, असा बेत त्यानें मनांत आणिला परंतु पुनः त्यानें असा विचार केला कीं, आपल्या धन्याची दौलत आपण हयात असतां बुडालेली पाहणे बरोबर नाहीं. तर ह्या वेळीं कारभार सोडून न जातां साधेल तेवढी दौलतीची सेवा करीत राहावें व राजे कांहीं सुविचार ऐकतील तर पाहावे. असें मनांत आणून तो कांहीं दिवस आपल्या तरुण धन्याकडून होणारी मानखंडना सोशीत तसाच राहिला.

रघुनाथपंतानें एके समयीं व्यंकोजीराजांस येणेंप्रमाणें बोध केला : 'साहेब, आम्ही तुमचे पिढीजात सेवक. तुमचे साधेल तेवढे हित करणें हेंच आम्हांस श्रेयस्कर आहे असें मानून आम्ही तुमची सेवा करीत आहो; पण ती तुम्हांस रुचत नाहीं. हलक्या माणसांशी सहवास करून त्यांची मसलत ऐकत असतां हें कांहीं चांगले नव्हे! तुमच्या वडिलांनी स्वपराक्रमानें कशी कीर्ती मिळविली व तुमचे वडील बंधू शिवाजीराजे यांनी स्वराज्यस्थापना करून दिगंत लौकिक कसा संपादिला आहे याचा काहीं विचार मनांत आणा! तुम्हीही त्यांच्याप्रमाणेंच पराक्रम करावा अशी आमची मनापासून इच्छा आहे. आम्ही तुमच्या पदरीं सेवक असतां तुमच्या हातून नांव घेण्यासारखे कांहींच घडले नाहीं तर शिवाजीराजे आम्हांस दोष देतील. तुम्हीं आम्हांस वाटेल ती सेवा सांगावी व आम्हीं ती जीवेंभावें करावी, हेंच आम्हांस उचित होय. तुमच्या पदरी लोक व द्रव्य उदंड असतां त्यांचें कांहींच चीज होत नाहीं. हलक्या लोकांच्या नादी लागून द्रव्याचा मात्र व्यर्थ नाश तुम्ही करीत आहां. वडिलांनी मिळविलेल्या कीर्तीहून अधिक कीर्ती मिळवावी तरच त्यांच्या कुळांत जन्म घेतल्याचे सार्थक.' ह्याप्रमाणें त्या विश्वासू सेवकाने व्यंकोजीराजांशी अनेक वेळां बुद्धिवाद केला; पण ते काही केल्या वाटेवर येईनात. त्याचा तो बोध त्यांला विषतुल्य वाटूं लागला. त्याचा त्यांस अतिशयित कंटाळा येऊ लागला. ते त्याचा उघडउघड अनादर करूं लागले.

ही त्यांची अशी उद्दाम वृत्ती पाहून रघुनाथपंतानें त्यांच्या संबंधाने एक पत्र शिवाजी महाराजांस पाठविलें. तें वाचून महाराजांनी व्यंकोजीराजांस एक बोधपर पत्र लिहिले. त्यांतील आशय येणेप्रमाणें होता 'तुम्ही उदासीन राहून क्षुद्र लोकांच्या मसलतीप्रमाणें चालतां, असें ऐकतो. रिकाम्या, खुशालचंद लोकांस वाटेल तितके द्रव्य चारून त्यांची मिजास वाढविता. वडिलांनीं जी थोर, विश्वासू व योग्य माणसे जोडिलीं त्यांचा अनादर करून मनास वाटेल तसे वागतां हें कांहीं ठीक नव्हे. तरी इतःपर आपलें वर्तन सुधारून रघुनाथपंतांसारख्या थोर, अनुभविक व विश्वासू कारभाऱ्यांच्या मसलतीने वागून स्वहित साधाल व स्वसत्तावृद्धी कराल अशी आम्हांस पूर्ण उमेद आहे.' ह्या पत्रानेंही व्यंकोजीराजे शुद्धीवर आले नाहींत व त्यांनी आपला पूर्वक्रम सोडला नाहीं. त्यांच्या जवळ नेहमी असणाऱ्या नीच मनुष्यांनी त्यांच्या बुद्धीस पक्का भ्रंश केला असल्यामुळें त्यांना आपलें वास्तविक हित कशांत आहे तें समजेना. रघुनाथपंतानें आपल्या वडील बंधूंकडे ही आपल्या विरुद्ध कागाळी केल्यामुळें ते त्याचा पूर्वीहून अधिकच उपमर्द करूं लागले, तो त्या इमानी सेवकास असह्य होऊन त्याने तेथून बरेंपणी निघून शिवाजीमहाराजांकडे येण्याचा निर्धार केला. मग आपल्या कुटुंबास तिकडेच ठेवून तो महाराजांच्या भेटीस निघाला.

शिवाजीमहाराजांस नूतन राज्य संपादण्याचा हव्यास अमर्याद आहे हें जाणून त्यानें कर्नाटकांतून येतांना तिकडील कांही संस्थानिकांशी बरेंच राजकारण केलें व शिवाजी महाराजांस व्यंकोजीराजांच्या पारिपत्यासाठी कर्नाटकात न्यावें असा त्याचा बेत असल्यामुळें त्यांना वाटेत कोणाचीही अडचण राहू नये म्हणून भागानगरच्या कुतुबशहाशीं राजकारण करण्याचा विचार मनांत आणून तो तिकडे गेला.

कुतुबशाहीत ह्या वेळीं आकण्णा व मादण्णा असे दोन बंधू मुख्य वजीर होते. त्यांच्या हातीं त्या शाहीचा एकंदर कारभार होता. ह्या वजिरांस भेटण्याचा रघुनाथपंतानें विचार केला; पण त्यांस एकदम भेटून ओळख देऊन राजकारणाचा परिस्फोट करणें ठीक न वाटून त्यानें त्यांस पंडित ह्या नात्याने प्रथम भेटण्याचा बेत केला. कारण हे वजीर मोठे धर्मशील व दानशूर असून त्यांनी अन्नसत्रें घातलीं होतीं. रघुनाथपंत आपला लवाजमा दूर एका गांवी ठेवून एकटाच त्यांच्या राजधानींत गेला व त्यांच्या स्नानसंध्येच्या समयास त्यांची भेट घ्यावयास गेला. कोणी पंडित भेटीस आला असता त्याचा बहुमान करून यथोचित संभावना करावी असा त्याचा क्रम असे. त्यास अनुसरून त्यांनी रघुनाथपंताचें आदरातिथ्य उत्तम प्रकारे केलें. ह्या समयी त्यांच्या वाड्यांत दुसरें कांही पंडित आले होते. त्यांचा परस्परांत, शिव सर्वोत्तम कीं विष्णू सर्वोत्तम, असा वाद उपस्थित झाला. रघुनाथपंतही त्यांच्या ह्या वादांत पडला. तो स्वत: वैष्णव असतां त्यानें प्रथमतः शिव सर्वोत्तम होय असें प्रतिपादन करून प्रतिपक्षास अगदीं निरुत्तर केले. ह्याप्रमाणें विष्णुपक्ष निर्बल झाला असतां पुनः रघुनाथपंतानें विष्णुपक्षाचें समर्थन करून तो निर्विवाद स्थापित केला, हें त्याचें अप्रतिम वादपटुत्व पाहून मादण्णापंत अगदीं थक्क झाला व तो अतिशयित मोठा विद्वान आहे अशी त्याची पूर्ण खात्री झाली. मग तो रघुनाथपंतास म्हणाला : 'स्वामिराज, आपण थोर व सत्पात्र आहां. आपण आलां कोठून व आपलें अपेक्षित कार्य काय आहे तें निवेदन करा!' त्यावरून रघुनाथपंत म्हणाला, 'आम्हांस द्रव्याची किंवा भूमिग्रामजीविकेची अपेक्षा किमपि नाहीं. आपण सूज्ञ व धर्मनिष्ठ आहां. आपणांशी एकांतांत दोन घटका बोलावयाचें आहे.' मग ते बंधू रघुनाथपंतास एकांत स्थलीं घेऊन गेले. तेव्हां तो त्यांस म्हणाला, 'मी कांही याचक पंडित नव्हे. मी शिवाजीमहाराजांचा सेवक आहें. माझें नांव रघुनाथपंत. आमच्या महाराजांकडे कर्नाटकांतलीं कांहीं राजकारणें घेऊन मी चाललो आहें. त्यांस तीं साधावयास त्या मुलखांत जावयाचा प्रसंग येणार आहे; परंतु ह्या त्यांच्या मोहिमेस आपली अनुकूलता अवश्य हवी आहे. आपलें व आपल्या शहाचे त्यांस समयपरत्वे साहाय्य मिळावे व त्यांच्याकडूनही आपणांस साहाय्य व्हावें एतदर्थ आपल्या पातशहाशीं स्नेहभावाचे बोलणें करण्याविषयी त्यांची मला आज्ञा झाल्यावरून मी आपल्या दर्शनास आलों आहे. आपण धर्मशील आहां व शिवाजीमहाराज स्वधर्मरक्षणार्थ परिश्रम करीत आहेत. यास्तव आपले त्यांस अवश्य साहाय्य असावें. असें करण्यांत आपल्याकडून आपल्या धन्याशीं द्रोह घडावा असें माझें मुळींच म्हणणें नाहीं. तर आपण त्यांच्याविषयी आपल्या पातशहाचें मन स्नेहयुक्त करावे एवढीच अपेक्षा आहे!' हें त्याचें भाषण ऐकून

ते वजीर बहुत संतोष पावले. त्यांच्या मनांत महाराजांविषयीं पूर्वीपासूनच आदरबुद्धी वसत होती व त्यांच्या अतुल पराक्रमांची वार्ता त्यांच्या कानी एकसारखी दुमदुमत होती. शिवाय कुतुबशहाकडून त्यांस खंडणी देवविण्याच्या कामी त्यांनी पूर्वी पुष्कळ खटपट केलीच होती. रघुनाथपंताकडून असें मित्रभावाचें बोलणे आलेले त्यास सर्व प्रकारे मान्य होऊन त्यांनी त्यास कुतुबशहाच्या भेटीस नेले व त्याचें राजकारण कायम केलें. शिवाजीमहाराजांनी कर्नाटकांत जातांना भागानगरावरून जावे व परस्परांच्या भेटी व्हाव्या असें ठरलें. मग त्या वजिरांनीं रघुनाथपंतास मोठ्या थाटाची मेजवानी करून व वस्त्रालंकारांनी गौरवून प्रेमाने निरोप दिला. निघतेवेळीं त्यांच्या हातीं शिवाजीमहाराजांस पादशहाकडून एक पत्र देवविलें.

ह्याप्रमाणें भागानगरचें राजकारण सिद्ध करून रघुनाथपंत प्रारंभी सांगितल्याप्रमाणें शिवाजीमहाराजांस साताऱ्यास येऊन भेटला. हा आपल्या वडिलांचा विश्वासू व हुशार कारभारी आपल्या भेटीस येत आहे हें महाराजांस कळले तेव्हां ते त्याला स्वतः सामोरे गेले व त्यास त्यांनी मोठ्या सन्मानाने स्वस्थानीं आणिलें.[१] त्यानें कर्नाटकांतून अनेक अपरूप वस्तू महाराजांसाठी आणिल्या होत्या, त्या त्यानें त्यांस नजर केल्या. शिवाय बहुमोल जवाहीरही त्यानें पुष्कळ आणिलें होतें, तें सारे त्यानें त्यांच्या स्वाधीन केलें. हा नजराणा पाहून व त्याची आपल्या ठायीं एवढी निष्ठा आहे हें पाहून महाराज बहुत संतोष पावले आणि आपल्या वडिलाचा हा जुना, अनुभवशीर, हुशार व इमानी कारभारी आपणांस येऊन मिळाला हें आपलें मोठे हित झालें असें मानून त्यांनी त्याचा बहुत गौरव केला व त्याला अमात्यप्रधानाचा हुद्दा देऊन आपल्या पदरी ठेवून घेण्याचा विचार मनात आणिला. हा हुद्दा ह्यावेळी रामचंद्रपंत याजकडे होता. त्याला त्यावरून दूर करून तो रघुनाथपंतास सांगितला असें म्हणतात.[२]

रघुनाथपंत महाराजांकडे आला तेव्हां महाराजांची प्रकृती नादुरुस्त असल्यामुळें ते साताऱ्यास राहिले होते हें मागें सांगितलेंच आहे. त्यांत आणखी ते पावसाळ्याचे दिवस असल्याकारणानें चार महिने त्यांचा मुक्काम तेथेंच झाला. ह्या फुरसतीच्या वेळीं रघुनाथपंतानें महाराजांजवळ व्यंकोजीराजांसंबधानें जें कांहीं सांगावयाचे होतें तें सर्व सांगितलें व कर्नाटकांत मोहीम करून आपल्या वडिलांच्या तिकडील दौलतीचा योग्य बंदोबस्त करण्याचा विचार त्यांच्या मनांत पुरा भरवून दिला. ही मोहीम फत्ते व्हावी ह्यासाठीं आपण तिकडील संस्थानिकांशी राजकारणें करून आलों आहों असेही त्यानें त्यांस सांगितलें. त्याप्रमाणेंच भागानगरच्या कुतुबशहाशीं केलेले राजकारणही त्यानें महाराजांस निवेदन केलें. ह्या त्याच्या सांगण्यावरून महाराजांनी असा विचार मनांत आणिला कीं, आपणांस आपल्या वडिलांच्या तिकडील दौलतीच्या अर्ध्या हिश्शाचा हक्क हिंदुशास्त्राप्रमाणें आहेच. त्या अर्थी ह्या मिषानें तिकडे स्वारी करून व्यंकोजीराजांकडे ह्या हक्काची मागणी करावी. शिवाय तिकडे गेल्याने कांही नवीन मुलूखही हातीं येण्याचा संभव आहे व अशाने निदान वडिलांच्या तिकडील दौलतीची व्यवस्था तरी नीट लावता येईल.

हा समय ह्या मोहिमेस अनेक प्रकारें अनुकूल होता. कुतुबशहाच्या राज्यातून कर्नाटकांत जावयास काहीएक हरकत आता उरली नव्हती. त्या शाहींतून त्यांस खडणी मिळत असून तिचे वजीर जे मादण्णा व आकण्णा ते त्यांस सर्व प्रकारे अनुकूल होते. त्यात आणखी रघुनाथपंतानें ह्या स्नेहाची बळकटी महाराष्ट्रांत येते वेळीं चांगलीच केली होती. दुसरें असें

---

१ रायरीच्या बखरींत असें आहे की, रघुनाथपंत कर्नाटकांतून येताना विजापुरास गेला. तेव्हां त्यास अदिलशहानें आपल्या पदरी ठेवून वजिरी देतो असें म्हटलें हे वर्तमान महाराजांस कळताच त्यांनी रघुनाथपंतास असा निरोप पाठविला की, आम्ही जिवंत आहोत तोपर्यंत आमच्या विश्वासू सेवकाने यवनांची नोकरी पतकरणें ठीक नाहीं. तुम्ही बेलाशक आमच्याकडे निघून यावे. आम्ही तुमचा अव्हेर कदापि करणार नाहीं.

२ चिटणीस म्हणतो की, 'आपला मजमूचा धंदा परंपरागत असल्यामुळे तो आपणांस सांगावा,' अशी रघुनाथपंताने विनंती केल्यावरून तो हुद्दा महाराजांनी त्यास दिला. रायरीच्या बखरीत असे म्हटलें आहे की, निळू सोनदेव मुजुमदार हा ह्या सुमारास वारला होता. त्याचा हुद्दा महाराजांनी रघुनाथपंतास दिला.

कीं, विजापूरकर व मोगल यांचा ह्यावेळी सल्ला होऊन स्नेहभाव जुळल्यासारखा झाला होता, तो कुतुबशहास मुळींच पसंत नव्हता. विजापूरकरांचा मुख्य कारभारी व दिलेरखान यांचें कांहीं नाते असल्यामुळें हा त्याचा स्नेह जमला होता. आता हा दिलेरखान गोवळकोंड्याच्या कुतुबशाहीचा केवळ हाडवैरी होता व तो खान शिवाजीमहाराजांसही अगदीं पाण्यांत पाहत असे. यास्तव दोघांचाही वैरी एकच असल्यामुळें त्यांचा स्नेहभाव दृढ होण्यास मुळींच पंचाईत पडली नाही.[१]

आतां आपण आपला देश सोडून दूर गेल्यावर मागें मोगलांनी कांही गडबड करू नये व आपल्या सत्तेतील मुलखास उपसर्ग लावूं नये म्हणून महाराजांनी निराजीपंत न्यायाधिशाला मोगलांचा सुभेदार खानजहान बहादूर याजकडे सलोख्याचें बोलणे करावयास पाठविलें. तो खान लांचलुचपतीने वळणारा असल्यामुळें त्याला त्यांनी पुष्कळ द्रव्य व जवाहीर नजर पाठविलें. त्या विषयास भुलून त्या खानाने महाराजांच्या मुलखास आपण बिलकूल त्रास देणार नाहीं असें वचन दिलें. ह्यावेळी महाराजांनी आणखी असा कावा केला कीं, त्या खानास खासगी रीतीनें पुष्कळ द्रव्य देऊन आणखी मोगलबादशहासही मांडलिक ह्या नात्याने खंडादाखल पुष्कळ पैका दिला. असें सांगतात कीं, महाराजांनी ह्यावेळी चार लाख होन खंडणी मोगलबादशहास देऊं करून खानजहानास पाच हजार स्वारांनिशी साहाय्य करण्याचें वचन दिलें. ही खंडणी देतांना महाराज असें म्हणाले कीं, 'ही दुभत्या गाईला आपण पेंड देत आहों!' औरंगजेबाला हा तह मान्य झाला. तो त्या वेळीं सिंधुनदीच्या अलीकडे पठाणांशी लढण्यांत गुंतला होता. त्यानें आपल्या पुत्रास असें सांगनू पाठविलें कीं, शिवाजीराजांशीं युद्ध करण्याचें तूर्त तहकूब करून त्यांच्याशी तह करावा हें बरें. असें केल्याने आपल्या इभ्रतीस काही कमीपणा येईल हें मनांत आणूं नये!

ह्याप्रमाणें मोगलसुभेदाराची मूठ दाबून त्याचा उपसर्ग आपल्या सत्तेस न होईसें महाराजांनी केलें. आपल्या दक्षिणेकडील सरहद्दीवर किल्ले बांधण्याचें काम त्यांनी चालू केलें होतें. तें ह्या वेळीं पुरे होऊन त्यांवर लोक ठेवून तिकडील बंदोबस्त यथास्थित केला. त्यामुळें निंबाळकर, घाटगे वगैरे अदिलशाही जहागीरदारांनी तिकडून हल्ले केले असतां त्यांचें कांही एक चालू नये असें झालें. महाराजांस दुसरी काळजी आपल्या कोंकणपट्टीची होती. तिजवर शिद्दीचा पुरा डोळा असून त्याचा त्या प्रांतास सततचा त्रास होता. आपल्या पश्चात तो कांही गडबड करील तर ती वेळींच मोडून काढण्याचे काम त्यांनीं अण्णाजी दंत्तोपत सचिव ह्यास सांगितलें. ह्या प्रधानाच्या हाताखाली त्यांनी पुष्कळ सैन्य देऊन ठेविले. कल्याणापासून फोंड्यापर्यंत असलेल्या एकंदर किल्ल्यांची व प्रांतांची व्यवस्था ह्या सरदाराकडे दिली. इकडील किल्ल्यांवर त्यांनी असा नामी बंदोबस्त ठेविला होता कीं, शत्रू कोणत्याही किल्ल्यावर हल्ला केला असतां त्यास जिकडूनतिकडून लागोलाग कुमक होऊन तो त्याच्या हातीं सहसा जाऊं नये तो हवे तितके दिवस लढवितां यावा. ह्याप्रमाणें सर्व मुलखाचा बंदोबस्त उत्कृष्ट करून सगळा राज्यकारभार त्यांनी मोरोपंताकडे सोपविला व इतर सर्व प्रधानांनी व सरदारांनी त्याच्या आज्ञेत वागून त्याला लागेल ती मदत वेळच्या वेळी करीत जावें असा सर्वांस हुकूम देऊन ठेविला.[२]

---

१ प्रो. सरकार म्हणतात की, ह्यासमयी विजापूर दरबारात मोठी दुफळी झाली होती. तेथें अफगाण व दक्षिणी अशा दोन फळ्या झाल्या होत्या. अफगाण फळीचा प्रमुख बहिलोलखान याने गादीवर सिकंदर नावाचा लहान मुलगा बसविला होता. त्याच्यावतीने राज्यकारभार पाहण्याचे काम बळकावून खवासखान, जो अगोदर राज्यकारभार पाहात होता, त्याचा खून केला. दक्षिणी फळीने सदरील नवीन कारभाऱ्यांच्या खिजरखान नामक एका हुशार मदतगाराचा खून केला. ह्यानंतर ह्या दोन्ही फळ्यांमध्ये कलह सुरू होऊन बहिलोलखानानें मोगल सुभेदार बहादूरखान यास आपल्या पक्षाचा करून घेतला. या सुभेदाराने विजापूरावर स्वारी करण्याची तयारी ह्या वेळीं चालविली होती. ह्याप्रमाणे अदिलशाही दरबार कमकुवत झाले असल्याकारणानें शिवाजीमहाराजांच्या कर्नाटकातील मोहिमेस तिकडून हरकत होण्याचा संभव मुळी नव्हता.

२ प्रो. सरकार इंग्रज व्यापाऱ्यांच्या लेखांच्या आधारे म्हणतात की, ह्या वेळी महाराजांचा मोठा पराक्रमी सरदार नेताजी पालकर जो महाराजांवर रूसून मोगलांस जाऊन मिळाला होता. तो दिल्लीकडे दहा वर्षे राहून परत महाराष्ट्रात आला. तिकडे गेल्यावर त्याने मुसलमानी धर्माचा स्वीकार केला होता; परंतु दक्षिणेत आल्यावर त्याला पुनः हिंदू धर्मात घेऊन महाराजांनी कर्नाटकात जाताना कांहीतरी कामगिरी सांगितली असावी; पण ह्या गोष्टीचा कोणत्याही बखरींत उल्लेख नाही.

ह्याप्रमाणे सगळी व्यवस्था नीट लावून महाराज कर्नाटकात जावयास सन १६७६ सालच्या अखेरीस निघाले. त्यांनी आपल्याबरोबर तीस हजार स्वार[१] व चाळीस हजार पायदळ एवढी सेना घेतली. एवढ्या मोठ्या सेनेस इतकें दूर परमुलखांत न्यावयाचें म्हणजे हें खर्चाचें मोठेंच कलम होतें. हा एवढा खर्च आपल्या खजिन्यांतून न करितां तो बाहेरच्या बाहेर भागेल तर पाहावें असा विचार त्यांनी केला आणि भागानगरकरांच्या राज्यांत द्रव्य विपुल आहे, त्या दरबारांत द्रव्याची मागणी करावी असें त्यांनी मनांत आणिलें. ह्या बाबतींत त्या सरकारावर जुलूम करणें त्यांना नीट वाटलें नाही. कारण त्यांजकडून त्यांस करभार मिळत असे; शिवाय मादण्णा व आकण्णा यांस रघुनाथपंतानें अनुकूल करून घेतलें होतें. यास्तव महाराजांनी त्या दरबारातला आपला वकील प्रल्हाद[२] निराजी यास असें लिहून पाठविलें कीं, 'आमच्या मनांत कर्नाटकांत मोहीम करावयाची आहे. तेव्हां स्वारीखर्चास कांही द्रव्य तानशहा बादशहापाशीं मागावें व तिकडे जाते वेळीं त्याची प्रत्यक्ष भेट घ्यावी अशी आमची इच्छा आहे.' ही गोष्ट त्या वकिलानें तानशहास कळविली. तेव्हां तो अगदीं घाबरून गेला. शिवाजीमहाराज सैन्यासह आपल्या भेटीस येणें त्याला अंमळ धोक्याचें वाटलें व ही वावटळ बाहेरच्या बाहेर जावी म्हणून तो त्यांस लागेल तेवढे द्रव्य देण्यास कबूल झाला आणि शिवाजीमहाराजांनी आपल्या भेटीस मुद्दाम येण्याचें कांही कारण नाहीं असें त्यानें त्या वकिलास सांगितलें. ही बिना प्रल्हाद निराजीनें महाराजांस लिहून कळविली.

परंतु पूर्वी रघुनाथपंतानें मादण्णा व आकण्णा यांजपाशी ठराव केल्याप्रमाणें महाराज आपल्या लष्करासहवर्तमान भागानगराकडे जावयास निघाले. आपण भेटीच्या इच्छेनें जवळ आलों आहों हें तानशहास कळविण्यासाठी त्यांनी रघुनाथपंत व निराजी रावजी यांस पुढें पाठविलें. महाराज जवळ आले हें वर्तमान त्या बादशहास कळलें तेव्हां तो फारच घाबरला. त्या राज्यांतील एकंदर लोकांस मोठी दहशत पडली; परंतु रघुनाथपंतानें व प्रल्हाद निराजीनें त्याजपाशीं अशी शपथक्रिया केली कीं, शिवाजीमहाराज केवळ स्नेहभावानें आपल्या मुलाखतीस येत आहेत. यांत त्यांचा दुसरा कांहीएक उद्देश नाही.' मादण्णा व आकण्णा यांस त्यांचें म्हणणे अर्थात खरें वाटलें, व त्यांनी बादशहाची अशी समजूत केली कीं, 'शिवाजीमहाराजांशी स्नेह केल्याने आपलें पुष्कळ कल्याण होण्यासारखें आहे.' ही आपल्याही मुत्सद्यांची खात्री ऐकून त्या बादशहाची धास्ती अंमळ कमी झाली.

महाराजांनी आपल्या एकंदर सैन्यास अशी सक्त ताकीद देऊन ठेविली होती कीं, 'कुतुबशाही राज्याच्या सरहद्दींत पाय ठेवल्यावर त्या प्रांतांतील रयतेस तिलप्राय उपसर्ग करूं नये. जेथेंजेथें मुक्काम होईल तेथें दाणावैरण, लाकूडफाटे वगैरे लागणारा सगळा माल खुशखरेदीनें विकत घ्यावा. रयतेच्या एका काडीसही स्पर्श करूं नये. ही कैद मोडून कोणी लूटफाट केल्यास त्याला कडक शिक्षा होईल!' ह्या हुकुमाकडे दुर्लक्ष करून कोणी कुतुबशहाच्या रयतेस त्रास दिला असतां त्याच्या हाताची बोटे किंवा सबंध हात तोडावा व गुन्हा फारच मोठा असल्यास त्याचा शिरच्छेद करावा, असें करू लागल्यामुळे सर्व सैन्यास धाक लागून कुतुबशहाच्या रयतेस यत्किंचित्ही उपसर्ग लागेनासे झालें. ही हकीगत कुतुबशहाच्या कानी जाऊन त्यास मोठे समाधान वाटलें.

असे सांगतात कीं, शिवाजीमहाराजांची स्वारी जवळ आल्याचे कळले तेव्हां त्यांना सामोरे जाण्याची तयारी त्याने केली. हे महाराजांस कळले तेव्हा त्यांनी त्यांस असा निरोप पाठविला कीं, 'आपण माझे वडील बंधू आहां वडिलांनी धाकट्याला हा असा मान देणे उचित नाही!' ह्या वरून कुतुबशहाने स्वतः जाण्याचा बेत रहित करून आपले वजीर मादण्णा व आकण्णा यांस व इतर मातब्बर गृहस्थांस मोठ्या लवाजम्यानिशी नगराबाहेर कित्येक मैल पर्यंत सामोरे पाठविले. त्यांनी महाराजांस वाजत-गाजत नगरापाशी आणिलें. तेथे त्यांच्या सगळ्या सैन्याने तळ दिला.

---

१ ईस्ट इंडिया कंपनीचे येथील प्रतिनिधी म्हणतात की, त्यांच्याबरोबर वीस हजार घोडेस्वार व चाळीस हजार पायदळ होते.

२ हा निराजी रावजीचा पुत्र. ह्याला निराजी मरण पावल्यावर कुतुबशाहींत वकील नेमिलें होतें.

दुसरेदिवशी कुतुबशहाची मुलाखत घेण्याचे ठरले.[१] ह्या भेटीस जाण्याच्यावेळीं महाराजांनी आपल्या निवडक लोकांस मोठे उंची पोशाख दिले. त्यांना मोत्यांचे तुरे, सोन्याची कडी, नवीन झगझगीत चिलखते वगैरे लष्करी जामानिमा देऊन त्यास मोठ्या पिढीजाद उमरावांप्रमाणे सजविले. त्यांचे हत्तीघोडेही बहुमोल अलंकारादिकांनी शृंगारिले. ह्याप्रमाणे एखाद्या बादशहास शोभेशी मोठ्या थाटाची स्वारी तयार करून महाराजांनी पन्नास हजार सैन्यानिशी नगरप्रवेश केला. तिकडे कुतुबशहानेही सर्व नगर शृंगारावयास लावून गुढ्या, तोरणें व पताका जिकडेतिकडे उभारावयास व वाद्ये वाजवावयास सांगितले. नगरातील एकंदर लोकांना शिवाजीमहाराजांस व त्यांच्या एकाहूनएक शूर बलाढ्य व पराक्रमी सरदारांस पाहण्याची अत्यंत उत्कंठा वाटून सर्व रस्ते लोकांच्या गर्दीने अगदी भरून गेले. ज्यांनी उत्तरेकडील व दक्षिणेतील पादशहातीस हतवीर्य केले, ज्यांनी अदिलशहाच्या दरबारांस विलाप करावयास लाविले, ज्यांनी दिल्ली दरबाराच्या अमीरउमरावांस व खुद्द मोगल बादशहास घाबरवून सोडले. ते महाप्रतापी वीर डोळ्यांनी पाहून नागरिकांच्या हृदयात धाक व कौतुक ह्या वृत्ती उद्भवणें स्वाभाविक होते. सगळ्यांचे डोळे अर्थात महाराजांकडे लागले होते. त्यांच्या सभोवती त्यांचे मंत्री व सरदार होते. ते दृष्टीस पडले म्हणजे प्रेक्षकजण 'शिवछत्रपतींचा सदा विजय असो!' असे शब्द दीर्घ स्वराने उच्चारीत. रस्त्यातील घरांच्या गच्च्यांवरून वगैरे त्यांजवर सोन्यारुप्याच्या पुष्पांची वृष्टी होऊ लागली. मधून-मधून सुवासिनी बाया पुढें येऊन त्यांस आरत्या ओवाळीत व पुरुष मंडळी येऊन त्यांस पुष्पहारांनी मंडित करीत. महाराज ह्या सत्काराने परमसंतोष पाहून सोन्यारुप्याची नाणी मुठीनी रस्त्याच्या दोन्ही बाजूंस उधळीत चालले. जागोजाग सुवासिनी बायांस व गृहस्थांस ते वस्त्राभरणे नजर करीत गेले. महाराजांनी त्या दिवशी नगरातील एकंदर गोरगरीब व फकीर यांस मुबलक खैरात केली.

ही मुलाखत होण्याची जागा दादमहालावर ठरून तेथें बादशहाने बैठकीची वगैरे सुंदर व्यवस्था करविली होती. ह्या महालाजवळ महाराजांची स्वारी पोंचल्यावर आपला सगळा लवाजमा खालीं जय्यत उभा ठेवून महाराज स्वत: कांहीं कारभाऱ्यांनिशीं कुतुबशहाच्या महालांत गेले. बादशहा माडी उतरून खालीं येऊ लागला, त्यांनीं असें सांगून पाठविलें कीं, आपण महालाखाली येण्याची तसदी घेऊं नये. वर गेल्यावर उभयतांनी एकमेकांस क्षेमालिंगन दिलें व ते एकासनीं बसले. मादण्णा व आकण्णा हे जवळ बसले. इतर सारे अमीरउमराव उभेच राहिले. महाराजांबरोबर आलेले कारभारी हंबीरराव सरनोबत, रघुनाथपंत, निराजीपंत, दत्तोपंत वाकनीस व बाळाजी आवजी चिटणीस[२] एवढ्यांस मात्र बसावयास सांगितलें. कुतुबशहाच्या जनानखान्यातल्या बायांना महाराजांस पाहण्याची उत्कंठा लागली असल्याकारणाने दरबाराच्या सभोवतालील खिडक्यांस जाळ्या लावून त्यांतून त्या त्यांजकडे मोठ्या कौतुकाने टकमक पाहात होत्या. नंतर कांहीं वेळ बादशहाचें व महाराजांचें मोठ्या स्नेहभावाचें बोलणें झालें. बादशहानें महाराजांबरोबर आलेल्या एकंदर सरदारांच्या भेटी घेतल्या व त्यांचा यथोचित सन्मान केला. त्यांच्या सैन्याची शिस्त व वस्त्रालंकार पाहून बादशहा फार खूष झाला. मग त्यांस व त्यांच्या सगळ्या लवाजम्यास विडे व अत्तरगुलाब दिले. महाराजांस व त्यांच्या मुख्य कारभाऱ्यांस व सरदारांस बहुमोल जवाहीर, शिरपाव, हत्ती व घोडे बहुमानपुरस्सर नजर केले. ह्या वेळीं बादशहाने आपल्या हाताने महाराजांच्या अंगास अत्तर लाविलें व विडे दिले आणि महाराज जावयास निघाले तेव्हां त्यांस पोहचवीत माडीवरून जिन्याच्या तळापर्यंत तो स्वतः आला. ह्याप्रमाणें सुमारें प्रहरभर दादमहालांत राहून बादशहाचा अतिप्रेमाचा आदरोपचार अनुभवून महाराज आपल्या लोकांसह परत आपल्या मुक्कामासाठी तयार केलेल्या वाड्यात गेले. वाटेने जातांना त्यांनी पुन: रस्त्यातील गोरगरिबांस द्रव्य दान केले.

---

१ जेध्यांच्या शकावलीत ह्या भेटीची तारीख सन १६७७ चा मार्च महिना अशी दिली आहे.

२ सभासद महाराजांबरोबर दादमहालांत गेलेल्या कारभाऱ्यांपैकी सोमजी नाईक वसनागार व जनार्दनपंत यांची नावे आणखी देतो.

ह्याप्रमाणे शिवाजीमहाराज कुतुबशहाच्या आदरातिथ्याने पूर्ण संतोष पावून दादमहालांतून परत गेल्यावर त्या शहाचे चित्त अंमळ स्वस्थ झालें. अफझुलखानासारख्या बलाढ्य सरदारास ज्याने एकट्याने पुरा केला, शास्ताखान कडेकोट बंदोबस्ताने आपल्या जनानखान्यात निजला असता ज्याने त्याच्यावर झडप घातली, औरंगजेबासारख्या अतिप्रबळ बादशहाच्या भर दरबारात सभोवताली मोठे खंदे योद्धे नागव्या तलवारी घेऊन उभे राहिले असता ज्याने त्या बादशहाचा धिक्कार करण्यास मागे पुढे पाहिले नाही. ज्याने सुरतेसारखी मातब्बर शहरे बिनहरकत लुटून फस्त केली, तो महावीर ज्या नेभळ्या व ऐषआरामात आजन्म निमग्न असलेल्या शहाच्या मुलाखतीस आला असता त्याच्या मनाला केवढा धाक वाटला असावा हे कांही येथे सांगावयास नको, तरी ह्या भेटीच्या अंती त्याची अशी खात्री झाली कीं, शिवाजीमहाराज खऱ्या दिलाच्या मनुष्याशी खरेपणाने वागणारे असून आपल्याशी स्नेहसंबंध जोडावा अशी त्यांची वास्तविक इच्छा आहे. महाराजांचा जो वकील त्याच्या दरबारी होता. त्याने आपणांस फसविले नाही ह्याबद्दल त्याने त्याला चांगले पारितोषिक दिले.

महाराजांनी भागानगरास एक महिना मुक्काम केला असें म्हणतात. मादण्णाच्या विद्यमानें बादशहाशीं त्यांचे राजकारणीं पुष्कळ बोलणे झालें. मादण्णापंताने महाराजांस आपल्या घरीं मोठ्या थाटाची मेजवानी केली, त्यांच्या बरोबरच्या सरदारांस व कारभाऱ्यांस वस्त्रें दिली व खुद्द महाराजांस वस्त्रालंकार व हत्तीघोडे नजर केले. ह्या मेजवाणीच्या समयी मादण्णाच्या वृद्ध मातोश्रीने स्वतः आपल्या हाताने स्वयंपाक करून महाराजांस भोजन वाढले आणि ते जेवीपर्यंत मादण्णा व आकण्णा हे त्यांच्यापाशी मोठ्या अदबीने बसले होते असे म्हणतात. महाराजानींही त्या बंधुद्वयास मोठी मेजवानी दिली व त्यांस हत्तीघोडे देऊन व त्यांच्या बरोबरच्या मंडळीस वस्त्रे देऊन गौरविले. बादशहास व त्याच्या पदरच्या अमीरउमरावांस महाराजांनी एक मोठी टोलेजंग मेजवानी दिली व सर्वांस बहुमोल वस्त्रें व जवाहीर देऊन संतुष्ट केलें. नगरातील एकंदर अमीर व मनसबदार यांच्या भेटी घेऊन महाराजांनी त्यांच्याशी स्नेह संपादिला.

ह्या मुलाखतीच्या वेळीं एक मजेची गोष्ट घडल्याचे एका बखरींत लिहिले आहे.[१] ती अशी : कुतुबशहा एके समयीं सहज बोलतां बोलतां रघुनाथपंतास म्हणाला कीं, 'शिवाजी महाराजांच्या पदरच्या लोकांची शिपाईगिरीविषयीं मोठी आख्या ऐकतां तर त्यांची ती शिपाईगिरी प्रत्यक्ष पाहावी असें आमच्या मनांत आलें आहे.' रघुनाथपंत म्हणाला 'त्यांच्या पदरचा एकएक शिपाई हत्तीच्या बरोबरीचा आहे!' त्यावर बादशहा म्हणाला : 'ते हत्तीशीं झुंजतील काय?' रघुनाथपंत बोलला 'अशक्य काय? ते हत्तीची तमा धरीत नाहींत!' कुतुबशहा म्हणाला : 'हत्तीशी कसें लढतील? आज ही त्यांची लढाई पाहू. एक शिपाई घेऊन या!' बादशहाची ही मनीषा महाराजांस कळवून त्यांच्या हुकमानें येसाजी कंकास दहा चांगले मजबूत शिपाई निवडून काढून कुतुबशहाकडे न्यावयास सांगितलें. हे शिपाई निवडून घेऊन येसाजी कंक रघुनाथपंताबरोबर बादशहाच्या भेटीस गेला. त्या शिपायांस बादशहाने वस्त्रे देऊन गौरविले; आणि मग एक मदोन्मत्त हत्ती आणून त्यांच्या पुढें मोकळा सोडिला. तो नीट येसाजी कंकाच्या अंगावर धावत आला. तेव्हा त्यानें तिळभरही न कचरता आपली तलवार उपसून मोठ्या चपळाईने हत्तीच्या तोंडावर सज्जड वार केला. त्या सरशी त्या हत्तीची सोंड दातापासून पुरी उतरली. हें पाहून बादशहा अगदीं चकित झाला. येसाजीस जवळ बोलावून त्याची त्यानें फार तारीफ केली व त्यास सोन्याची कडी, तोडे व गळ्यातील गोफहीं बक्षीस दिली. बादशहा इतकेंच करून थांबला नाहीं, तर त्यानें येसाजीस पाच हजार रुपये उत्पन्नाचा गांव इनाम करून देण्याचे मनांत आणिलें. हा त्याचा मानस येसाजीस कळला तेव्हां तो बादशहास मोठ्या अदबीने मुजरा करून म्हणाला की, 'मी महाराजाचे अन्न खातो तें आपलेंच आहे. त्यांच्या आज्ञेने मी येथें येऊन माझी करामत आपण पाहिली. तरी आपलें हें बक्षिस मी घेणे नीट नव्हे.

---

१ शिवदिग्विजय. प्रो. सरकार म्हणतात की, ही गोष्ट हैद्राबादच्या अमीरउमरावांनी महाराजांस व त्यांच्या सरदारांस मोठी मेजवानी दिली त्या समयी घडली. एका बखरींत असें आहे की, 'तुमच्याकडे किती नामांकित हत्ती आहेत?' असा प्रश्न कुतुबशहाने केला तेव्हा त्यांनी आपल्या हजारो मावळे वीराकडे बोट दाखवून म्हटले की, 'हे सारे माझे हत्ती होत.'

आम्हांस महाराजांनी काय उणे केलें आहे कीं आपलें बक्षीस घेऊन मी निर्वाह करावा? आपलें बक्षीस घेऊन मी आपला ओशाळा झालों असता माझी बुद्धी भ्रष्ट होऊन महाराजांच्या सेवेत अंतर पडेल. यास्तव जें कांहीं देणे तें महाराजांकडे द्यावे ते धनी आहेत. चाकरी करणें हा आमचा धर्म आहे!' ही त्या इमानी पुरुषाची निस्पृहता व निःसीम स्वामिनिष्ठा पाहून बादशहास केवढे चोज वाटलें असेल हें येथें सांगणे न लगे.

ह्याप्रमाणें कुतुबशहाचा व त्याच्या वजिरांचा पाहुणचार घेऊन महाराजांनी तेथून पुढें निघून जाण्याचा संकल्प केला व बादशहाचा निरोप मागितला. त्यावेळीं त्यानें पुनः दरबार भरवून सर्वांच्या परस्पर भेटी झाल्या व निरोपास हत्ती, घोडे पाच व पोषाख पाच असे त्यानें महाराजांस अर्पण केले व त्यांच्या सरदारांस आणि कारभाऱ्यांसही वस्त्रेंभूषणे देऊन संतुष्ट केलें. परस्परांनी परस्परांस हरएक प्रसंगी साहाय्य करावे अशी उभय पक्षांची शपथक्रिया झाली.[१] महाराजांनी स्वारी खर्चासाठी मागितलेलें द्रव्य बादशहानें मोठ्या खुषीनें दिले.[२] उभयतांचा असा करार झाला कीं, कर्नाटकांत शहाजीराजांची जहागीर आहे तिच्या बाहेर आणखी मुलूख महाराज जिंकतील त्यांतला निम्मा कुतुबशहास द्यावा व कुतुबशहानें आपला तोफखाना महाराजांच्या सैन्याबरोबर पाठवावा. कुतुबशहाने आपली कांहीं फौजही मदतीस देतां म्हटलें; परंतु महाराजांनी ती घेतली नाहीं.[३] ह्या उभयतांच्या करारांत आणखी एक कलम असें होतें म्हणतात कीं, कर्नाटकांतला जो विजापूरकरांचा प्रांत शिवाजीमहाराज हस्तगत करतील त्यांतला कांहीं त्या सरकारास त्यांनी अशा अटीवर सोडून द्यावा कीं, अबदुल करीम याला अदिलशाहीच्या राज्यकारभारावरून दूर करून आकण्णा यास त्याच्या जागीं नेमावे.[४]

ह्याप्रमाणें मुबलक द्रव्य व भक्कम तोफखाना मिळवून महाराज कर्नाटकाकडे जावयास निघाले. वाटेत पहिल्याने तुंगभद्रातीरीं करनाळेंकडपें म्हणून एक संस्थान आहे तेथील संस्थानिकाने[५] पाच लाख होन खंडणी महाराजांस देण्याचे कबूल केलें. त्यावरून त्याच्या प्रांतास कांहींएक उपद्रव न करितां त्यांनी पुढें प्रयाण केलें. ह्या शहरापासून सुमारे पंचवीस मैलावर निवृत्तिसंगम लागतो. त्यावर स्नान करून कृष्णानदी उतरून महाराज पलीकडे गेले आणि पायदळ सैन्य कडप्याच्या वाटे पुढें रवाना करून ते स्वतः कांहीं घोडेस्वारांसह, पूर्वेस श्रीशैलमल्लिकार्जुनाचें देवालय[६] आहे,

---

१ ह्या मुलाखतीच्या वेळीं महाराज कुतुबशहास असें बोलले म्हणतात की, अदिलशहा आणि तुम्ही मला मदत कराल तर मी तुम्हास सर्व हिंदुस्थान जिंकून देईन.

२ ह्या वेळी कुतुबशहानें महाराजांस दहा लाख होन रोख व शिवाय काही जवाहीर दिलें होतें असें उल्कीज म्हणतो. पाच लाख होन दिले होते असें रायरीच्या बखरींत लिहिले आहे. प्रो. सरकार म्हणतात की, कुतुबशहाने महाराजाच्या स्वारीखर्चासाठी दररोज तीन हजार होन म्हणजे दरमहा साडेचार लाख रुपये देऊ केले होते.

३ प्रो. सरकार म्हणतात की, कुतुबशहाने आपला सरलष्कर मिर्झा मंहमद अमिन यास बरोबर आपले पाच हजार लोक देऊन महाराजांच्या मदतीस दिले.

४ शि.दी. ह्यावेळी आणखी असे एक कराराचे कलम ठरले की, कुतुबशहाने महाराजांस प्रतिवर्षी एक लाख होन खंडणी देत रहावे, म्हणजे मोगलांशी लढण्याचा प्रसंग आला असता महाराजांनी त्यास लागेल तें साहाय्य करावे.

५ याचे नाव आनंदराव देशमुख असें होतें. उल्किज.

६ याचे नाव ग्रांट डफ व उल्कीज 'पर्वतम' असें देतात व सभासद शैलपर्वत असें देतो. हे दक्षिण हिंदुस्थानातले अतिप्राचीन देवालय आहे. त्याठिकाणी कृष्णानदी सात-आठशे हात खोल खोऱ्यातून वाहते. ह्या खोऱ्यातून हजारबाराशें हात उंच चढाव आहे. तेथे एका निबिड व निर्जन अरण्याच्या मध्यभागी हे देवालय आहे. ह्या स्थलासभोंवार लहान टेकड्या आहेत आणि देवालयाच्या सभोवार चौदा-पंधरा हात उंच व भक्कम भिंतीचे आवार आहे. ह्या आवाराची लांबी सुमारे साडेचारशे हात व रुंदी सुमारे साडेतीनशे हात आहे. ह्या आवाराच्या भिती रुंद असून त्या करड्या रंगाच्या दगडांच्या आहेत. हे सगळे दगड चौरस असून सारख्या आकारमानाचे आहेत. आणि त्यावर हत्ती, घोडे, वाघ, पारधी, योद्धे, योगी इत्यादिकांच्या आकृत्या कोरल्या असून आणखी पुराणांतरीच्या कित्येक प्रसंगांची चित्रे कोरली आहेत. ह्या आवाराच्या मध्यभागी देवालय आहे. तें चौरस आहे. याच्या भिंती व छप्पर ही विजयनगरच्या कृष्णदेव राजाने पितळेच्या पत्र्याने मढवली आहेत. येथून खाली कृष्णेच्या पात्रापर्यंत घाट बांधून काढला आहे.

त्याच्या दर्शनास गेले. अंतरपुरीवर सर्व फौज ठेवून ते थोड्याशा लोकांनिशीं गंगास्नानास गेले. येथल्या पर्वताचा देखावा व वनश्री अत्युत्तम असून कृष्णानदीचें प्रशस्त पात्र घाट उतरून पूर्वसमुद्राकडे चाललें आहे. तें रमणीय व परमपूज्य स्थान पाहून महाराज अगदीं तल्लीन झाले. हा दुसरा कैलासच आहे असा त्यांस भास झाला. ते देवदर्शनास गेले असतां तेथें त्यांच्या ठायीं असा कांही विलक्षण भक्तिभाव प्रज्वलित झाला कीं, ह्या देवस्थानास आपल्या देहाचें अर्पण करून जीवित सार्थक करावे असें त्यांच्या मनाने घेतलें आणि त्या आवेशाच्या झटक्यासरशी तरवार उपसून ते आपलें शिरकमल देवास अर्पण करावयास सिद्ध झाले. परंतु हा आवेश अनावर होऊन त्यांच्या अंगी भवानी संचरली व बोलली कीं, 'तुला असें केल्याने मोक्ष प्राप्त होणें नाहीं. तुझ्या हातानें अद्यापि उदंड कर्तव्यता होणें आहे. स्वधर्मरक्षणासाठीं तूं निर्माण झाला आहेस, यास्तव असें साहस करूं नकोस!' महाराज सावध झाल्यावर त्यांना जवळच्या लोकांनी भवानीची ही आज्ञा निवेदन केली. ती ऐकून त्यांनी अशा प्रकारे आत्मयज्ञ करण्याचा विचार रहित केला, परंतु अशा पूज्य व रमणीय स्थानीं राहून तपस्व्याची वृत्ती धारण करावी व आमरण तपश्चरण करून शेष जीवित घालवावें अशी इच्छा त्यांस झाली. मग कारभारी व सरदार लोकांस ते म्हणाले कीं, 'आमचे सर्व मनोरथ श्रीजगदंबेच्या प्रसादाने पूर्ण झाले आहेत. आतां संसारापासून निवृत्त होऊन अशा पवित्र स्थानीं राहावें व उरलेलें आयुष्य मोक्षसाधनांत घालवावें असें आमच्या मनानें पूर्णपणें घेतलें आहे. तरी तुम्हीं ही मोहीम येथेंच पुरी करून स्वराज्यास परत जावें व माझ्या पुत्रास गादीवर बसवून त्याच्या नांवें राज्यकारभार चालवावा!' हें ऐकून जवळच्या लोकांस मोठे संकट पडलें. त्यांनी त्यांची अनेक प्रकारे समजूत घालण्याचा प्रयत्न केला व भवानीच्या आज्ञेप्रमाणें वर्तन करण्यांतच जीवितसार्थक आहे असें त्यांस म्हटलें; परंतु त्याचा कांहींएक उपयोग झाला नाही. त्यांनी तपस्वीवेष धारण करून सर्वांग भस्मचर्चित केलें. ते एकसारखे ध्यानमग्न होऊन बसूं लागले. एखाद्या परमहंसासारखे त्यांचें देहभान नष्ट होऊन ते ईश्वरचिंतनांत सर्व काळ घालवूं लागले. ही अशी त्यांची वृत्ती झालेली पाहून त्यांच्या पदरच्या लोकांस मोठी चिंता पडली. महाराजांसभोंवतीं अहर्निश पहारा ठेवून ते काय करितात तें ते पाहूं लागले. ध्यान विसर्जन करून तें अंमळ देहभानावर आले म्हणजे त्यांच्याशी रघुनाथपंतानें बोलावे. धर्मशास्त्रातील अनेक वचनांच्या आधाराने त्यांस असे सिद्ध करून दाखवावे कीं, ह्या वृत्तीचा अवलंब करणें क्षत्रियास उचित नव्हे. ही अशी विरक्तावस्था त्यांच्या ठायीं नऊ दिवस राहिलीं.[१] मग रघुनाथपंताच्या समयोचित बोधानें त्यांस हा असा स्वजीवितक्षय करणें नीट न वाटून ते पुढील क्रमास लागले. त्या देवस्थानीं त्यांनी एक लक्ष ब्राह्मणांस भोजन घालून दानधर्म अतोनात केला. तेथें एक उत्तम घाट बांधून त्याचे नाव श्रीगंगेश असे ठेवले. तपस्वीजनांस तपश्चरण करण्यासाठीं अनेक गुहा तयार करविल्या. व धर्मशाळा, मठही बांधले. ह्याप्रमाणें आणखी आठ-दहा दिवस त्या स्थळी मुक्काम करून त्यांनी पुढें प्रयाण केल.

इकडे त्याचें पायदळ व्यंकटरमणगिरीच्या खिंडीने उतरून कर्नाटकांत गेलें होतें. त्यास गाठून अवजड सामानासह हलक्या हलक्या मजला करीत यावयास सांगून महाराजांनी कांही मावळे व घोडदळ यांसह पुढें कूच केलें. ते मद्रास शहरापासून सात मैलावरील एका गावी सन १६७७ साली मे महिन्याच्या पहिल्या आठवड्यात पोहचून तेथे त्यांनी थोडे दिवस मुक्काम केला. महाराजांनी मद्रास येथील इंग्रज व्यापारांना तारीख १४ मे रोजी एक पत्र पाठवून त्यांच्याकडे कांही औषधी जिनसांची मागणी केली. तेव्हां त्या व्यापाऱ्यांनी आदमासे साठ होन किंमतीचा माल व कांही उंची कापड महाराजांस नजर केले. ह्या नजराण्याबद्दल आभारप्रदर्शक पत्र त्यांना मे च्या २५ तारखेला पाठवून आणखी तसाच माल आपणांस किंमत घेऊन देण्याविषयी कळविले. त्यावरून इंग्रज व्यापाऱ्यांनी त्यांस आणखी काही माल नजर केला त्याची किंमत बावन्न होन होती असे म्हणतात. ह्याप्रमाणे उभयपक्षी स्नेहभाव प्रकट झाला असताही महाराजांच्या लोकांनी पुढें काही दिवसांनी व्यंकोजीराजांच्या ताब्यांतील प्रांतात तिमरी येथे इंग्रजांची एक वखार होती ती लुटली. येथून पुढे कूच करून महाराज कर्नाटकातील कित्येक लहान मोठ्या सरदारांच्या ताब्यातले प्रांत रघुनाथपंतांच्या

---

१ उल्किजकृत म्हैसूरचा इतिहास पाहा.

कारस्थानाच्या योगाने काबीज करीत चालले. त्यांना त्यांच्याशी युद्धप्रसंग करण्याची पाळी आली नाही. चंदीचा[१] मोठा भक्कम किल्ला त्यांच्या हाती असाच बिनबोभाट आला. त्यांनी त्या किल्ल्यापाशी येऊन त्यास मोर्चेबंदी करून वेढा दिला. हे ठाणे विजापूरकरांच्या ताब्यातले असून अंबरखानाचे[२] पुत्र रूपखान व नासरखान ह्यांच्या हवाली होते. त्यांच्याशी रघुनाथपंताने पूर्वीच राजकारण करून ठेवले होते. यास्तव हा किल्ला हस्तगत व्हावयास मुळीच पंचाईत पडली नाही.[३] महाराजांनी किल्ल्यास मोर्चे लाविताच सदरील किल्लेदारांनी किल्ल्याचे दरवाजे खुले करून महाराजांच्या लोकांस आत घेतले. आणि किल्ला त्यांच्या स्वाधीन केला. हा किल्ला हाती आल्यावर त्याचा हवाला त्यांनी रामजी नलगे नावाच्या एका अत्यंत इमानी मावळे सरदारास दिला. तिमाजी केशव यास त्याचा सबनीस नेमिलें व रुद्राजी साळवी यास कारखानीस केले. त्या किल्ल्याची एकंदर व्यवस्था त्यांनी महाराष्ट्रातील आपल्या किल्ल्यासारखीच केली. त्या वेळी मथुरा येथे एक जेसुइटपंथाचा पाद्री होता. त्याचा असा लेख आहे कीं, शिवाजीमहाराजांनी ह्या किल्ल्यास नवीन तटबंदी करून सभोवताली मोठा खंदक खणला, किल्ल्यावर मोठमोठे बुरुज रचून माऱ्याच्या नवीन जागा केल्या. हे सगळे बांधकाम त्यांनी इतके उत्तम करविले कीं, युरोपातल्या मोठमोठ्या कुशल कारागिरांना ते पाहून खाली मान घालावी लागेल. ह्या ठाण्याच्या आसपासचा सगळा प्रांत काबीज करून त्यावर विठ्ठल पिळदेव गोराडकर[४] यास त्यांनी सुभेदार नेमिलें व त्यास स्वराज्यातील जमावबंदीची पद्धत तिकडे सुरू करावयास सांगितले. रूपखान व नासरखान यास कांही नेमणूक करून देऊन संतुष्ट केले.

ह्या मोहिमेत पहिल्यापहिल्यानें महाराजांनी असा बहाणा केला होता कीं, आपण गोवळकोंड्याच्या कुतुबशहाच्या तर्फे ही स्वारी करीत आहों हा बहाणा करण्याचें कारण अर्थात असें होतें कीं, त्यांना त्या सरकाराकडून पुष्कळ द्रव्यसाहाय्य झालें होतें व आणखी पुष्कळ होण्याची आशा होती. परंतु पुढें लवकरच हा बहाणा टाकून ते नवीन काबीज केलेल्या ठाण्यांवर आपले लोक ठेवून आपल्या नांवानेंच त्यांची व्यवस्था करूं लागले. हा प्रकार कुतुबशहाला कळला तेव्हां त्याचे डोळे साफ उघडून त्यानें त्यांस आणखी मदत करण्याचें बंद केलें. ह्याप्रमाणें स्वारीखर्चास

---

१ ह्या किल्ल्याचे नाव जिंजी असें डफ वगैरे काही ग्रंथकार देतात. व काहीं मराठी बखरकार चंजी असें नाव देतात.

२ कांही मराठी बखरकार याचे नांव खानखान असें देतात.

३ रायरीच्या बखरींत हा किल्ला घेतल्याची हकीगत येणेंप्रमाणें दिली आहे : किल्लेदार अंबरखान यास महाराजांनी असें सांगून पाठविलें की, 'आम्ही विजापूरकर व भागानगरकर यांच्याशी तह करून इकडे आलों आहो, तेव्हा तुम्ही आम्हास येऊन भेटावे'. हें त्या किल्लेदारास खरें वाटून तो आपल्या आठ पुत्रांसह महाराजांना भेटावयास आला असता त्यांना त्यांनी पकडून कैद केलें व किल्ला हस्तगत केला. शिवदिग्विजयकार म्हणतो की, अंबरखान महाराजांस नजरनजराणा घेऊन भेटावयास आला असता त्यास त्यानी सांगितले की, 'तुमच्या प्रांताचा बचाव व्हावा असा तुमचा मनोदय असल्यास चंदीचा किल्ला आम्हांस द्यावा; नाहीतर तुम्हीं आमच्या लष्करात राहावें, चंदीस जाऊ नये. आम्ही वाटेल त्या रीतीनें हा किल्ला सर करूं!' त्यावरून त्यानें तो किल्ला खाली करून देण्याचे कबूल केलें, व त्याच्या सोडचिठ्ठ्या दिल्या; महाराजांशी सलोख्याने राहाण्यातच आपला निभाव आहे असें त्यास वाटलें; परंतु अंबरखानाचे आठ पुत्र किल्ल्यावर होते, ते किल्ला स्वाधीन करून देण्यास राजी न होऊन ते महाराजांशी लढाई करण्यास सिद्ध झाले; परंतु रघुनाथपंतानें आतून राजकारण करून ठेविले असल्यामुळें त्यांच्या पक्षाकडे फार थोडे लोक होते. हा असा आपला पक्ष दुर्बल पाहून ते घाबरून गेले व किल्ला देण्यास कबूल झाले. मग त्यांस काहीं गावाचे वतन तोडून देऊन सरंजामानिशीं त्यांनी चाकरी करावी असें महाराजांनी ठरविलें. उत्कीज म्हणतो की जिंजीकडे जाताना वाटेत जो प्रांत लागला त्यातील प्रजेस महाराजांनी मुळीच उपद्रव दिला नाहीं व आपण विजापूरसरकाराचे दोस्त या नात्याने चाललो आहो असा त्या प्रजेचा समज करून दिला. अंबरखानानें त्यांच्याकडे वकील पाठविला असता त्यास त्यांनी असें सांगितले कीं, 'आपला व विजापूरसरकाराचा कलह मिटून समेट झालें आहे, व आपण त्या सरकाराचे ताबेदार झालो आहो' असा बेमालूम बहाणा करून त्यांनी त्या वृद्ध किल्लेदारास आपल्या पुत्रासह व नातलगासह भेटीसाठी आपल्या डेऱ्यात बोलाविले. ते असे हातीं आले असता महाराजांनी त्यास कैद करून किल्ला हस्तगत केला. प्रो. सरकार म्हणतात की, रूपखान व नजरखान हे खवासखानाचे मुलगे होते. सदरील किल्ला दग्याने घेतल्याची हकीकत त्यांस मुळीं खरी वाटत नाहीं. महाराजांनी किल्ल्यावर हल्ला करून पहिल्या सपाट्यास तो सर केला. याला पुरावा मदुरा येथील एका जेसुइट मिशनरीच्या लेखाचा ते देतात.

४ शिवदिग्विजयकार याचे उपनाव गरुड असें देतो.

लागणारी रक्कम मिळण्याची अडचण पडूं लागली तेव्हां महाराजांनी लूट करून पैसा मिळविण्यास सुरुवात केली. ही अशी त्यांनी त्या प्रांतांत धामधूम आरंभिली तेव्हा तिकडील लोकांची कशी गडबड उडून गेली होती हें मद्रासच्या इंग्रज व्यापाऱ्यांनी लिहून ठेवलें आहे. त्याचा आशय असा की, 'शिवाजीमहाराज द्रविडदेशांत शिरले हें वर्तमान चोहोंकडे पसरलें तेव्हा सर्व लोक पराकाष्ठेचे घाबरून गेले. तो मोठा भयंकर पुरुष असून त्याने पश्चिम किनाऱ्यावरील प्रांतचे प्रांत लुटून जाळून उद्ध्वस्त केले व यवनपादशहांस त्राहि त्राही करून सोडले अशी त्यांची ख्याती चोहींकडे पसरली होती. यास्तव त्या लोकांस त्यांची फारच दहशत वाटूं लागली. आपली आतां धडगत कशी लागते याचा ज्याला त्याला विचार पडला. शिवाजीमहाराजांना द्रव्य कोठे आहे व कोणावर हल्ला केला असतां खचित द्रव्यलाभ व्हावयाचा हें कांहीं दैवी शक्तीच्या योगाने कळत असून ते जातील तिकडे त्यांस हटकून यश प्राप्त व्हावयाचें, असा त्या लोकांचा समज होऊन गेला होता.

चंदी सर केल्यावर तेथून कूच करून महाराज त्रिनमल्ली[१] प्रांतांत गेले. ह्या प्रांताचा ताबा शेरखाननामक एका पाचहजारी सरदाराकडे होता. हा अर्थात् विजापूरकरांचा अंकित होता. महाराज आपल्या प्रांतांत शिरले असें पाहून तो सरदार आपल्या लोकांनिशीं त्यांच्यावर चालून आला. त्याच्याशीं महाराजांच्या लोकांनी सामना करून त्याला व त्याच्या सैन्याला चोहोंकडून गराडा घातला. ह्या युद्धात तो सरदार पराभव पाहून तो प्रांत महाराजांच्या हातीं आला. ह्या विजयांत त्यांस पुष्कळ द्रव्य व हत्तीघोडे मिळाले.

ह्या प्रांतात वेलूर, त्रिवादी, आर्नी वगैरे किल्ले होते. त्यावरचे अधिकारी महाराजांस सामोपचाराने वश होईनात. यास्तव महाराजांचे पायदळ सैन्य मागाहून कूच करून येत होते. त्याने वेलूरच्या[२] किल्ल्यास स. १६७७ च्या मे महिन्यात वेढा घातला. हा किल्ला मोठा बळकट असून त्याच्या सभोवती खंदक होता. त्याची रुंदी मोठी होती. इतकी कीं, त्यात मोठमोठ्या सुसरी असत. त्या किल्ल्याचा तट इतका रुंद होता कीं, त्याच्या फांजीवरून दोन गाड्या एकदम जात ह्या किल्ल्याच्या वेढ्याचे काम नरहरी बल्लाळ याने मोठ्या नेटाने व हुशारीने चालविले. त्या किल्ल्याच्या दोन बाजूस दोन टेकड्या होत्या त्यास त्याने साजरा व गोजरा अशी नांवे देऊन त्यांवर मोर्चे चढविले व तोफा लावून मुख्य किल्ल्यांवर जोराचा मारा चालविला. ह्या भडीमारापुढे किल्ल्यावरच्या लोकांचा निभाव न लागून त्यांनी तो मराठ्यांच्या स्वाधीन केला.[३]

ह्याच वेळीं आर्नी व त्रिवादी ह्या किल्ल्यास महाराजांच्या लोकांनी वेढा घातला हे किल्ले त्यांच्या हाती ऑक्टोंबर महिन्यात आले. त्रिवादी येथे शेरखान स्वतः जाऊन राहिला असून तो किल्ला त्याने थोडे दिवस लढविला परंतु मराठ्यांच्या माऱ्यापुढे निभाव न लागून तो आपल्या लोकांनिशी रात्रीच्यावेळी किल्ल्यातून निसटून पळू लागला. तेव्हां मराठ्यांनी त्याचा पाठलाग करून त्याच्या लोकांचा सप्पा उडविला आणि शेवटी हा खान शंभर घोडेस्वारांनिशी जेमतेम त्याच्या हातून सुटून भवनगिरी येथे जाऊन राहिला. इतके झाले तरी सदरील किल्ला महाराजांच्या हाती लागलीच आला नाही. ह्या खानाच्या सासऱ्याने आपल्या बाकीच्या लोकांनिशी हा किल्ला आणखी काही दिवस लढविला. हें वेढ्याचे काम आपल्या दोघां मुसलमान सरदारांस सांगून महाराज स्वतः आपले घोडदळ घेऊन शेरखानास पुरा करण्याकरिता भवनगीरीकडे गेले. येथे मद्रासच्या इंग्रज व्यापाऱ्यांनी त्यांच्याकडे आपला नेलूर रामण्णा

---

१ चिटणीस त्रिमल्ली असें ह्या प्रांताचे नांव देतो. सभासद त्रिवादी असें नांव देतो; पण त्रिवादी हा एक मोठा किल्ला त्रिनोमाली प्रांतात होता. काही बखरींत व जेध्यांच्या शकावलीत या किल्ल्याचे नाव त्रिपाटी असे दिले आहे.

२ ह्या किल्ल्याची वेल्लूर व येल्लूर अशी नांवे इतरत्र दिलेली आढळतात.

३ मुसलमान बखरकार म्हणतात की, ह्या किल्ल्याचा हवालदार अबदुलखान याने महाराजांकडून पन्नास हजार होन लाच घेऊन तो त्यांच्या स्वाधीन केला. जेध्यांच्या शकावलीवरून असे हे वेढ्याचे काम चौदा महिने चालले असून शेवटी तो रघुनाथपंत व आनंदराव यांनी सर केला. सेंट जॉर्ज येथील इंग्रज व्यापाऱ्यांच्या लेखावरून असे कळते की, अबदुलखानाने किल्ला लढववेल तितके दिवस लढवून शेवटी तो मराठ्यांच्या हाती गेल्यावाचून राहात नाही असे पाहून त्याच्याकडून तीस हजार होन लाच घेऊन तो त्यांच्या स्वाधीन केला.

नावाचा वकील पाठवून मद्रासेजवळ असताना महाराजांनी मागितलेल्या जिनसा पावत्या केल्या असे म्हणतात. त्यांनी कावेरीनदीच्या तीरी आरंदीनजीक त्रिवादी येथे आपल्या घोडदळाचा तळ देऊन तेथे पावसाळ्यामुळे मुक्काम केला. येथे असता मदुरा प्रांताच्या राजाचा वकील महाराजांकडे आला, ह्या राजाकडे त्यानी आपल्या स्वारीखर्चासाठी एक कोटी रुपयांची मागणी केली होती. हा राजा व्यंकोजीचा दोस्त होता त्याच्यापाशी येवढी मागणी करण्याचे कारण असे कीं, त्याची दौलत फार मोठी होती हे त्यास ठाऊक होते. त्याच्या वकिलाने महाराजांस असे सांगितले कीं, 'आमच्या धन्याचा काही मुलूख म्हैसूरच्या नायकाने व कांही मुलूख व्यंकोजीराजे याने बळकावला आहे. हा मुलूख आमच्या धन्यास परत घेऊन द्याल तर ते आपल्या खर्चासाठी सात लाख रूपये देतील!' इकडे सदरील राजा त्रिचिनापल्ली येथे राहत होता. तो आपल्या कुटुंबासह मदुरा येथे येऊन बंदोबस्ताने राहिला, महाराजांनी त्याच्या वकिलांबरोबर रघुनाथपंतास पाठवून त्याच्याकडून घ्यावयाच्या खंडणीची रक्कम ठरविली. त्याने सात लाख होन द्यावयाचे करून दीड लाख तत्काळ दिले. तेव्हां अर्थात त्याच्या प्रांतात त्यांनी उपद्रव दिला नाही. सदरील ठिकाणी छावणीस असता महाराजांनी व्यंकोजीराजांस असा निरोप पाठविला कीं, 'तुमच्या आमच्यामध्ये सामोपचाराचें बोलणे करण्याकरितां तुमच्याकडील कारभारी गोविंदभट गोसावी, काकाजीपंत व निळोनाईक[१] यास आमच्याकडे पाठवून द्यावे' त्यावरून व्यंकोजीराजानी ह्या गृहस्थास महाराजांकडे रवाना केलें. त्यांजपाशीं महाराजांनी असें बोलणे केलें कीं, 'थोरले महाराज यांनी कैलासवास केला त्यास आज तेरा वर्षे झाली. महाराजांची सर्व दौलत रघुनाथपंताने व्यंकोजीराजांच्या स्वाधीन करून त्यांस सत्ताधीश केलें; परंतु तें पितृधन आहे. आमचा त्यांत अर्धा वांटा आहे; ह्या वाड्याचा उपभोग त्यांनींच आजपर्यंत घेतला. हा आमचा वांटा आम्ही त्यांच्याकडे यापूर्वीच मागितला पाहिजे होता; परंतु आम्ही दूर असल्यामुळें आम्हांस आज दिनपावेतों तसें करण्यास सवड मिळाली नाहीं. ते महाराजांचे पुत्र आहेत, दौलतीचे मालकच आहेत. ते खातील तोंपावेतों खावोत, आम्हांस फावेल त्या वेळीं आपला भाग मागून घेऊं, असा विचार करून आम्ही आज तेरा वर्षे सबुरी केली. पुढें कांहीं राजकारणाच्या निमित्तानें कुतुबशहाच्या भेटीस आलों व तेथून कर्नाटकांत यावेंसें वाटल्यावरून इकडे आलों आहों. इकडे कोणकोणते प्रांत आम्हीं आतापर्यंत काबीज केले हें तुम्हांस महशूर आहेच. तर आतां आमचा अर्धा हिस्सा आम्हांस बिनतक्रार द्यावा असा त्याचा मनसोबा आहे किंवा कसें तें त्यांनी लवकर कळवावे. त्यांचा आमचा कलह लोकांनी पाहावा, मग चौघांनी त्यांस सांगावे व त्यांनी रीतीवर येऊन हिस्सा द्यावा व त्यांच्या आमच्यांत विनाकारण वितुष्ट व्हावें, हें योग्य नाहीं. तीर्थरूप कैलासवासी झाल्यामागे ते व आम्ही एका रक्ताचे भाऊ, एकोप्यानें वागूं, एकमेकांच्या सुखदुःखाचे विभागी होऊं, व्यर्थ कलह माजविल्यानें कोणाचे कधींही बरें होणें नाहीं!' असें त्यांस सांगून त्यांच्याबरोबर आपले कांहीं कारभारी देऊन त्यांस महाराजांनी व्यंकोजीराजांकडे पाठवून दिलें. त्यांनी व्यंकोजीराजांकडे जाऊन त्यांस महाराजांचा सर्व मनोदय कळविला.

व्यंकोजीराजांच्या मसलतगारांनी त्यांना ह्या वेळीं अशी सल्ला दिली होती कीं, 'शिवाजीमहाराज हिस्सा मागत आहेत तो त्यांस गुपचूप देऊं नका ! तुम्ही मर्द आहां. त्यांच्याशी युद्ध करण्यास सिद्ध व्हा!' महाराजांशी लढाई करण्यास त्यांना आणखी मदुरेच्या व म्हैसूरच्या राजांनी भर देऊन आपण मदत करितों असें सांगितले होते. म्हणून त्यांनी महाराजांच्या सदरील निरोपाचा कांहीएक विचार न करितां त्यांच्या कारकुनास मुळींच कांहीं जबाब दिला नाहीं. तेव्हां ते माघारी महाराजांकडे गेले. व्यंकोजीराजांनी लढाईचा घाट घालून कांही तयारीही केली. परंतु ज्या राजांनी मदत देण्याचे अभिवचन दिलें होतें, त्यांनीं आयत्या वेळीं नाहीं म्हटल्यावरून त्यांचा निरुपाय झाला. त्यांना एकट्यांला महाराजांशीं समरप्रसंग करण्याचें सामर्थ्य नव्हतें. असें सांगतात कीं, मदुरेच्या नायकांशीं रघुनाथपंतानें कारस्थान केल्यामुळें त्यानें व्यंकोजीराजांचा पक्ष असा ऐन प्रसंगीं सोडला. ही अशी व्यंकोजींची निराशा झाल्यावर ते महाराजांच्या भेटीस दोन हजार लोकांनिशी आले.[२]

---

१ शिवदिग्विजयकार रंगोनाईक व तिमाजीनाईक यांची नावे आणखी देतो.

२ रायरीच्या बखरींत असें आहे की, महाराजांनी व्यंकोजीराजास प्रथमतः असा निरोप पाठविला होता की, 'आमची तुमची भेट आज पुष्कळ वर्षे मुळींच झालेली नाही. ती व्हावी म्हणून इतके दूर आलों आहो तरी आम्हांस भेट देऊन आनंदित करावे. ह्यावरून व्यंकोजीराजे आपल्या फौजेसह त्यांच्या भेटीस आले. दोघां बंधूंची भेट महादेवाच्या देवळात होऊन त्यांनी एका ताटात भोजन केलें.

महाराजांनी व्यंकोजीराजांची मोठ्या प्रेमाने भेट घेऊन त्यांची बरदास्त उत्तमप्रकारे ठेविली.[१] व्यंकोजीराजांबरोबर शहाजीराजांच्या नाटकशाळांचे दुसरे तिघे पुत्र भिंवजीराजे, प्रतापजीराजे व रायभानराजे हे महाराजांच्या भेटीस आले होते. त्यांचाही यथोचित आदरमान त्यांनी केला. त्यांस कोणत्याही गोष्टीचे उणे पडूं नये व त्यांनी कांहीं सांगितलें असतां कारकून मंडळीनें तें तत्काळ ऐकावे अशी त्यांस ताकीद देऊन ठेविली. व्यंकोजीराजे महाराजांचा पाहुणचार घेत पंधरावीस दिवस छावणीत राहिले; परंतु ते आपण होऊन वडिलांच्या दौलतीच्या वांटणीसंबंधानें एवढ्या अवकाशांत कांहीएक बोलत ना. तेव्हां आपणच त्यांच्याशीं बोलावे असें मनांत आणून महाराजांनी त्यांना एकांती बोलाविले व पुढीलप्रमाणें बोध केला : 'तुम्ही आम्ही प्रत्यक्ष बंधू. थोरले महाराज निवर्तल्यास आज तेरा वर्षे झालीं. त्यांच्या मागें सर्व दौलतीचा उपभोग तुम्हींच एकट्यांनी घेतला. वडिलोपार्जित दौलतीचे आम्ही उभयतां विभागी. तुम्हीं आम्हांस काहीएक न कळविता आपल्या मनांस येईल तशी दौलतीची वहिवाट केली. आम्ही विभाग मागतां आहो तो तुम्हीं स्वपराक्रमानें संपादिलेल्या दौलतीचा नव्हे. तुम्हांस ईश्वरानें नवीन दौलत संपादावयाचें सामर्थ्य व बुद्धी द्यावी आणि आम्हीं ती पाहावी, अशी आमची फार इच्छा आहे; परंतु वडिलांच्या जोडीची व्यवस्था आमच्या विचाराशिवाय करणें तुम्हांस विहित नाहीं. काय काय दौलत आहे तिचे कागदपत्र वगैरे असतील ते आम्हांस दाखवा. तुम्ही आम्ही समजून चालू तुम्हांस जड पडेल तेथें आम्ही तुम्हास अवश्य मदत करूं. तुम्ही मनांत कोणत्याही प्रकारचा किंतू ठेवूं नये!' असें महाराजांनी त्यास अनेक प्रकारे समजून सांगितलें. त्यास व्यंकोजीराजे नुसतें हूं हूं म्हणाले; परंतु त्यांच्या म्हणण्यास त्यांनी कांही एक स्पष्ट जबाब दिला नाहीं. नंतर पुनःपुनः प्रसंग विशेषी महाराज त्यांच्याशी ह्या प्रकरणी बोलून त्यांच्या मनांत तरी काय आहें तें समजून घेण्याचा प्रयत्न करीत. पण व्यंकोजीराजे पुरें मौन धरून राहिले. त्यांनी आपल्या मनातला भाव त्यांस किंवा दुसऱ्या कोणास यत्किंचितही कळूं दिला नाहीं. जवळचे कारभारी व सरदार यांसही त्या प्रकरणी त्यांची समजूत घालावयास महाराजांनी सांगितलें; परंतु कांहींएक उपयोग झाला नाहीं. व्यंकोजीराजांनी ह्या कारभाऱ्यांपाशीं असे मात्र उद्गार काढले म्हणतात कीं, 'महाराजांनी काबीज केलेल्या मुलखाचा अर्धा हिस्सा द्यावा म्हणजे इकडील आमच्या ताब्यांतल्या मुलखाचा अर्धा हिस्सा आम्ही देण्यास कबूल होतों.' ह्या त्यांच्या म्हणण्यास महाराजांचा जबाब अर्थात असा होता कीं, 'आमच्या ताब्यांतला मुलूख बहुतेक आम्ही नवा संपादिला आहे. परंतु तुमच्या हातीं असलेला सगळा मुलूख आमच्या तीर्थरूपांच्या कमाईचा आहे. त्यांत तुम्ही कांहींएक भर घातलेली नाहीं. तेव्हां ह्या वडिलांच्या दौलतीचा अर्धा हिस्सा आम्हांस हिंदुशास्त्राप्रमाणें मिळणे रास्त आहे.'[२]

ह्याप्रमाणें पंधरा-वीस दिवसपर्यंत व्यंकोजीराजांचें मन वळविण्याचा प्रयत्न महाराजांनी केला. परंतु तो सगळा व्यर्थ गेला. हा त्यांचा असा हट्टाग्रह पाहून महाराजांस राग आला आणि त्यास कैद करून दौलतीचा अर्धा हिस्सा बळजबरीने घ्यावा असें एक वेळ त्यांच्या मनांत आलें परंतु त्यांनी पुन: असा पोक्त विचार केला कीं, 'हे आपले धाकटे बंधू आहेत. ह्यांच्याशी असें कठोरपणाचें वर्तन करणें उचित नव्हे. असें करणें आपल्या इभ्रतीस शोभणार नाहीं. सामोपचारानेंच हे वठणीस येतात किंवा कसें तें पाहावे' व्यंकोजीराजे आपल्या म्हणण्याप्रमाणें वागण्यास कबूल नाहींत असें पाहून त्यांनी त्यास आपल्या गोटातून जाण्यास निरोप दिला व त्यांस तंजावरापर्यंत[३] पोहोचविण्यास हंबीरराव

---

१ प्रो. सरकार म्हणतात की, व्यंकोजीराजे आपल्या मुलाखतीस येत आहेत असे ऐकून महाराज आपल्या मुक्कामावरून कित्येक मैल त्यांना समोर गेले.

२ मद्रास व सेंट जॉर्ज येथील इंग्रज व्यापाऱ्यांचे ह्या प्रकरणी जे लेख आहेत त्यांवरून असे दिसते की, महाराजांनी शहाजीराजांच्या तीन-चतुर्थांश दौलतीतला हक्क सांगितला व व्यंकोजींना त्या दौलतीचा एकच चतुर्थांश घेऊन स्वस्थ राहवयास सांगितले.

३ चंदावर व चंजावर अशी नांवे इतरत्र आढळतात.

मोहिते, रूपाजी भोसले, मानसिंग मोरे व अप्पाजी रंगनाथ केळकर यांस बरोबर दिलें.[१] तंजावरास सुखरूप पोहोचल्यावर व्यंकोजीराजांनी बरोबर आलेल्या लोकांची वस्त्रेंभूषणें देऊन संभावना केली व त्यांस परत रवाना केलें. ह्यानंतर पुनः एक वेळ महाराजांनी त्यांस आपल्या कारकुनाकडून असा निरोप पाठविला कीं, 'तंजावर प्रांताचा अर्धा भाग व दुसरे एकदोन किल्ले आम्हांस आमचा अर्धा भाग म्हणून द्यावे. एवढ्यानेंच आमचे समाधान होईल. तुम्हीं आम्हीं परस्पराशीं सलोख्याने राहावे हें उत्तम. गृहकलह वाढविण्यांत उभयतांचेंही नुकसान आहे. असें केल्याने व्यर्थ कष्ट मात्र भोगावे लागतील. पूर्वी कौरवपांडव यास कसे क्लेश सोसावे लागले तें ध्यानी आणा व व्यर्थ कलह वाढवूं नका! आजपर्यंत आमचा वाटा तुम्ही खाल्ला तो खाल्ला. यापुढें तरी त्याचा अभिलाष धरू नका! वांटा काही सुटणार नाहीं. तुम्हांस तो द्यावा लागेल. तुम्ही विचाराने वागून ह्या गोष्टीस कबूल व्हाल तर कमीजास्तीचा विचार अवश्य होईल.' व्यंकोजीराजांच्या पदरच्या काही यवनांनी त्यांस अशी मसलत दिली कीं, 'शिवाजीराजे वडील बंधू खरे. परंतु त्यांनीं तुमचे धनी जे अदिलशहा त्यांच्यांशी बंड केलें आहे. त्यांनी सरकाराचा पुष्कळ मुलूख काबीज केला आहे. ह्या त्यांच्या बंडखोरपणामुळें तुमच्या वडिलांस पुष्कळ दुःख सोसावे लागलें होतें. एकदा तर त्यांच्या जिवावरचा प्रसंग आला होता. तुम्ही नेहमी आपल्या वडिलांच्याच तंत्राने वागत राहिलां म्हणून अदिलशहानें त्यांच्या पश्चात त्याची दौलत तुमच्याकडे राहू दिली, नाहीं तर त्यानें ती खालसा केली असती. तेव्हां जी दौलत अदिलशहाच्या निवळ कृपेने कायम राहिली आहे, तिचा हिस्सा ह्या बंडखोरास तुम्ही काय म्हणून द्यावा? दुसरें असें कीं, ही केवळ चाकरीबद्दल मिळालेली दौलत आहे. तुम्ही अदिलशहाची ताबेदारी करितां म्हणून तुम्हांस ही मिळाली आहे. तींत ह्या बंडखोराचा संबंध काय?' ह्या मसलतीप्रमाणें त्यांनी निरोप घेऊन येणारास जबाब दिला, आणि असें सांगितलें कीं, 'वडिलांच्या वेळचे हत्तीघोडे, जवाहीर वगैरे जें कांही असेल त्याचा वाटा मागणे असल्यास रघुनाथपंत कागदोपत्री कांहीं याद्या असतील त्या समजावतील व जेवढा ऐवज आमच्या अंगी लावतील तेवढ्याचा हिस्सा द्यावयास आम्ही राजी आहो. रघुनाथपंत वडील आहेत. ते उचित दिसेल तें करतील. वडिलांस वांकडा जबाब द्यावयाचा नव्हता म्हणून इतके दिवस आम्ही कांहीं एक बोललो नाहीं!' ह्याप्रमाणें निक्षून जबाब देऊन व्यंकोजीराजांनी आलेल्या कारकुनांस वस्त्राभरणें देऊन रवाना केलें.

असें सांगतात कीं, ह्या समयी व्यंकोजीराजांनी अदिलशहास पत्र पाठवून कळविले कीं, 'वडील बंधू दौलतीचा वाटा मागत आहेत. ही दौलत चाकरीची आहे. आम्हीं तिचा वांटा त्यांस द्यावा कीं काय तें कळवावे.' त्यावर बादशहाचा असा जबाब आला कीं, 'शहाजीराजांनी ह्या सरकाराची नेकीनें चाकरी केली म्हणून इकडून त्यांस जहागिरीबद्दल वंशपरंपरेची सनद मिळाली. हा मुद्दा ध्यानांत आणून शिवाजीराजे हिस्सा मागत आहेत. ते हरामखोर झाले तरी त्यांस विचारणार आम्ही खबरदार आहो. तुम्ही गृहकलह करून सरकारांत दुश्मनी आणितां याचे कारण काय? वाटा न द्यावा असें आम्ही तुम्हांस लिहून कळविले असतां ते आमच्या अंमलास खलेल करितील व विनाकारण त्यांची आमची चुरस वाढेल. ह्यासाठी ते चाकरीच्या दौलतीचा हक्क मागत असतील तर तो त्यांस अवश्य द्यावा. ते हल्ली आमच्याशीं शत्रुत्वाने वागत आहेत. ते जर अशी चाकरीची दौलत विभागून घेऊन आमची चाकरी

---

१ प्रो. सरकार म्हणतात की, व्यंकोजीराजे महाराजांची मागणी मान्य करितांना तेव्हा त्यांनी त्यांचा कठोर शब्दांनी निषेध केला. म्हणून ते रात्री पाच घोडेस्वारांसह तंजावरास पळून गेले. ही अशी मसलत त्यांना त्यांच्या कारभाऱ्यांनी दिली. म्हणून महाराजांनी त्यांस काही दिवस कैदेत ठेऊन मग त्यांना शेलापागोटे देऊन तंजावरास रवाना केले. सभासद म्हणतो की, व्यंकोजीराजे महाराजांच्या गोटातून भिऊन पळून गेले. त्यावरून महाराजांनी दिलगिरी प्रदर्शित करून म्हटले की, 'आम्ही कांही त्याना अटकेत ठेवणार नव्हतो. आमचा लौकिक दिगंती पसरला आहे. आमचा वडिलांच्या दौलतीचा हिस्सा राखावा म्हणून आम्ही त्यांच्याकडे तो मागत होतो. तो त्यांना द्यावयाचा नाही तर त्यांच्यावर आम्ही जुलूम करीत नाही. त्यांनी असे पळून जावयाचे नव्हते, ते अजून लहान आहेत. त्यांनी हे असे मुलासारखे वर्तन केले आहे.' मग त्यांच्याबरोबर आलेल्या कारकुनास वस्त्रालंकार वगैरे देऊन गौरविले व आपल्या धन्याकडे जावयास निरोप दिला. जेध्यांच्या शकावलीत व शेडगावकराच्या बखरींतही व्यंकोजी पळून गेल्याचाच उल्लेख आहे.

करण्यास तयार होत असतील तर तें ठीकच आहे. अशाने त्यांचें आमचें मित्रत्व तरी होईल. ते वडील असल्यामुळें दौलतीचे मालकच आहेत!' हा असा अदिलशहाकडचा जबाब आला तरी देखील व्यंकोजीच्या पदरच्या मुसलमानांनी त्यांचे असे कान फुंकिले कीं, 'शिवाजीराजे दंडेलखोर आहेत. हजरत त्यांस भीत आहेत. तुम्ही दौलतीचे मुखत्यार खावंद आहां. तुम्ही त्यांच्याशीं लढाई करावयास माघार घेऊं नये. हारजीत पाहावी. आम्ही जिवंत आहों तोंपर्यंत तुम्हांस वाटा देऊं देणार नाहीं. तुम्हांस डर तो कसला? शिवाजीराजेच काय आईचें दूध प्याले आहेत?'

सदरीं निर्दिष्ट केल्याप्रमाणें व्यंकोजीराजांचा जबाब आल्यामुळें व ते यवनसरदारांच्या मसलतीने आपणांशी विरोध करावयास तयार झाले आहेंत हें कळल्यामुळे महाराजांस फारच संताप आला आणि त्यांनी व्यंकोजीराजांच्या ताब्यांतील मुलखावर स्वारी करण्याचा बेत मनांत आणिला परंतु त्यांनी पुनः असा विचार केला कीं, त्यांच्यावर स्वारी करून त्यांस जेर करण्यांत पुरुषार्थ तो कोणता? ते कसे झाले तरी आपले बंधू आहेत. वडिलांच्या दौलतींत असा धुमाकूळ उडवून देण्यापेक्षा दुसरे प्रांत काबीज करण्यास काय कमी आहेत? ते सर करून त्यावर आपली सत्ता बसविल्यानें तेवढा यवनी अंमल तरी कमी केलासें होईल. असें मनांत आणून त्यांनी व्यंकोजीराजांवर स्वारी करण्याचा बेत रहित केला.

व्यंकोजीराजे भेटून गेल्यावर महाराज त्रिवादीहून वेलुरास आले. तेथें आपलें ठाणें बसवून, त्याच्या आसपास असलेले महाराजगड, जगदेवगड, कर्नाटकगड आणखी किल्ले त्यांनी काबीज केले. नंतर तिकडील घाट चढून ते शहाजीराजांस पूर्वी अदिलशहाकडून मिळालेल्या जहागिरीच्या प्रांतांत आले. तिकडील कोल्हार, बालापूर, बेंगरूळ, शिरटें, वासकोट वगैरे तालुके जे पूर्वी शहाजीराजांस जहागिरीदाखल मिळाले होते ते सारे त्यांनी हस्तगत केले. ह्यांशिवाय आणखी तिकडील बरेच कोट व किल्ले काबीज करून कांही चांगल्या टेकड्यांवर त्यांनी आणखी नवे किल्ले बांधले. जिकडेतिकडे आपलीं ठाणीं घातली व तिकडील एकंदर पाळेगारांचा फडशा उडवून चोहींकडे स्वस्थता केली.[१] ज्यांनी सालाबाद खंडणी देण्याचा करार केला त्यांस मात्र त्यांनी त्रास दिला नाहीं. आरणीचा कोट शहाजीराजांनीं वेदोभास्करनामक एका ब्राह्मणाच्या हवाली केला होता. तो अद्यापि त्याच्या मुलांच्याच हातीं होता. ह्या त्याच्या मुलांनी शिवाजीमहाराजांना शरण येऊन किल्ल्याच्या चाव्या त्यांच्या स्वाधीन केल्या. ही त्याची नम्रता पाहून महाराज फार खूष झाले व तो कोट आणि त्याच्या आसपासचा तीन लक्ष होन उत्पन्नाचा मुलूख त्यांनी त्यांच्याकडे लावून देऊन त्यांस आपले अंकित केलें. ह्या प्रांताचा बंदोबस्त नीट राहावा म्हणून मानसिंग मोरे व रंगनाथ केळकर यांस कांहीं फौजेनिशीं तिकडे ठेवून दिलें. नंतर महाराज श्रीरंगपट्टण वगैरे प्रांतांतून खंडण्या घेत घेत गदगलक्ष्मेश्वर येथें आले. तेथील दोन कोट त्यांनी काबीज केले. त्या प्रांताचा अधिकारी खानगौड देसाई हा भिऊन पळून गेला. त्यामुळें तो प्रांत सहज त्यांच्या हातीं आला.

ह्या प्रांतात वृद्ध चालम नावाचे एक प्राचीन शिवदेवालय होते. ह्या देवस्थानाच्या दर्शनास महाराज कांही लोकांनिशी गेले असता तेथे तेबेनापटम येथील डच व्यापाऱ्याच्या एका प्रतिनिधीने महाराजांची मुलाखत घेतली. त्याने रेशमी वस्त्रे, चंदन, लवंगा, मालदिवी नारळ, तरवारींची पाने वगैरे वस्तूंचा नजराणा महाराजांस दिला. तेथून कूच करून महाराज वनिअमवाडी येथे मुक्कामास असता त्यांनी मद्रास येथील इंग्रज व्यापाऱ्यांच्या अध्यक्षास ता. २२ सप्टेंबर रोजी येणेप्रमाणे पत्र लिहिले कीं, 'कर्नाटकातील कित्येक किल्ल्यांत मला काही इमारती बांधावयाच्या आहेत तरी तोफांसाठी मोठे गाडे व सुरुंगाचे काम ज्यांना करिता येते असे लोक तुमच्याजवळ असल्यास ते आमच्याकडे पाठवून द्यावे. सुरुंग लावून दगडी कोट उडवून देण्याचे कसब ज्यांना अवगत आहे अशा लोकांची आम्हास फारच

१ प्रो. सरकार इंग्रज व्यापाऱ्यांच्या लेखाच्या आधारानें म्हणतात की, महाराजांनी व्यंकोजीराजांच्या तंजावर प्रांतात स्वारी करण्याचा बेत रहित केला. तरी कालेरून नदीच्या उत्तर भागातील शहाजीराजांच्या जहागिरीचा सगळा प्रांत व किल्ले आणि शेरखानाच्या ताब्यांतला सगळा मुलूख काबीज केला.

गरज आहे. असले वीस-पंचवीस किंवा निदान दहा-पाच तरी लोक आमच्याकडे पाठवावे. आम्ही त्यांस चांगले वेतन देऊ व आमच्या किल्ल्यांवर ठेवून देऊ.' या पत्राला सदरील इंग्रज व्यापाऱ्याने असा जबाब पाठविला कीं, 'आम्हाला कोणत्याही पक्षाला मिळून राहता कामा नये, म्हणून आपली मागणी मान्य करता येत नाही.' येथून पुढें कूच करून महाराजांनी पोर्तोनोवो शहर लुटून आर्काटचा दक्षिणेकडला सगळा प्रांत व उत्तरेकडलाही कांही प्रांत हस्तगत केला. ऑक्टोबरच्या तिसऱ्या तारखेला महाराज मद्रासेपासून दोन दिवसांच्या वाटेवर गेले होते असे म्हणतात.

ह्याप्रमाणें महाराज कर्नाटकांतील विजापूरकरांच्या अंमलांत सारखा धुमाकूळ उडवून देत व खंडण्या बसवीत चालले असतां, दिल्लीस त्यांचा वकील होता, त्याचकडून व इतर हेरांकडून अशीं पत्रे आली कीं, औरंगजेब बादशहा मोठ्या फौजेनिशीं दक्षिणेंत जातीने स्वारी करण्याच्या विचारांत आहे व ह्यासाठीं त्याच्या फौजेची दिल्लीस तयारीही चालली आहे. ही बातमी कळताच महाराज कर्नाटकांतून स्वदेशी जावयास मोठ्या लगबगीने निघाले. त्यांनी चंदीचा किल्ला व त्याच्या आसपासचा मुलूख संताजीराजाच्या ताब्यांत पूर्वी दिला होता. त्याची व इतर नवीन काबीज केलेल्या मुलखाची व्यवस्था व बंदोबस्त नीट राहावा म्हणून संताजीच्या मदतीस रघुनाथपंत व हंबीरराव सेनापती यांस कांहीं फौजेनिशीं मागें ठेवले व म्हैसूरच्या डोंगरी प्रदेशाच्या रक्षणास रंगो नारायण यास काही लोकानिशी ठेविले. ह्याप्रमाणे तिकडचा बंदोबस्त लावून महाराज बाकीच्या फौजेसह स्वदेशी यावयास निघाले. ह्या मोहिमेत रामेश्वरापर्यंतचा सगळा मुलूख काबीज करण्याचा त्यांचा बेत होता. पण वर सांगितलेल्या बातमीपत्रांमुळें त्यांस स्वदेशी येणे प्राप्त होऊन हा संकल्प असिद्ध राहिला.[१]

ह्या मोहिमेंत महाराजांनी वीसबावीस लाख होन उत्पन्नाचा मुलूख व शंभर किल्ले काबीज केले असें म्हणतात. त्या वेळच्या मद्रास येथील इंग्रज व्यापाऱ्यांचा असा लेख आहे कीं, 'शिवाजीमहाराजांनी ह्या वेळीं जिंजी व बेलोर ह्या दोन बळकट किल्ल्यांच्या आसपासचा बावीस लाख होन उत्पन्नाचा मुलूख काबीज केला व त्याच्या बंदोबस्तासाठी पुष्कळ पायदळ व घोडदळ ठेवून दिलें. त्यांनी १४ मोठे किल्ले व ७२ मजबूत टेकड्या काबीज केल्या. कर्नाटकातील बहुतेक सधन लोकांकडून अपार द्रव्य काढलें. ज्या ज्या प्रांतांतून जे जात तेथें कोणते लोक सधन आहेत याची त्यांना चांगली बारीक माहिती असे. इकडच्या सर्व श्रीमंत लोकांना पत्रे पाठवून त्यांच्याकडून स्वारीखर्चासाठी म्हणून कर्जाऊ रक्कमांची मागणी ते करीत. किनाऱ्यावरील प्रांतातून त्यांनीं असे दोन लाख होन काढले. खुद्द मद्रासेहून व पालिकत येथून त्यांनी पन्नास-पन्नास हजार होन काढले. स्पेन देशांत सीझर याने स्वारी केली तशी त्यांनी ह्या मुलखात स्वारी करून फारशा लढाया वगैरे न करिता मुलूख काबीज केला. त्यांनी ह्या प्रांतांतून सोने, हिरे, रत्ने, पांचू वगैरेंच्या रूपाने किती द्रव्य नेले याची गणती नाही. ह्या प्रकारे त्यांनी आपल्यापुढील स्वराज्यविस्ताराच्या कार्यास लागणारे द्रव्यसामर्थ्य उत्तम संपादिले.

आतां उत्तरेस वास्तविक प्रकार असा घडला होता कीं, खानजहानबहादूर याजशीं महाराजांनीं तह केला होता तो औरंगजेबास पसंत झाला नाहीं व त्या सुभेदाराविषयीं त्याच्या मनांत पुरा वहीम उत्पन्न झाला. दिलेरखानानें बादशहास असें सुचविलें कीं, विजापूरसरकाराचा मुख्य कारभारी अबदुलकरीमखान यास आपल्या पक्षाकडे घेऊन त्या सरकारच्या फौजेच्या मदतीने कुतुबशहाच्या राजधानीवर स्वारी करावी, म्हणजे शिवाजीमहाराज दक्षिणेंतून परत येण्यापूर्वी कुतुबशाही खालसा करतां येईल. ही त्याची सूचना बादशहास योग्य वाटून त्याप्रमाणें करण्याचा हुकूम त्यानें त्यास दिला व खानजहानबहादूर यास परत बोलाविले.

---

१ स्वदेशी निघून येताना त्यांनी आपल्या मागें ठेवलेल्या सरदारांस असें सांगितले होतें कीं, त्यांनी पालिआकोट, मद्रास व मद्रास येथील डच व इंग्रज लोकांच्या ठाण्यांवर छापे घालून तीं हस्तगत करावी. फ्रेंच लोक ह्या वेळीं पांदेचेरी येथें होतें, त्यांस मात्र उपद्रव देऊ नये, असे त्यांनी त्यास फर्माविलें होते.

दिलेरखानाचें व अबदुलकरीमखानाचें हें असें संगनमत होण्याचे कारण अर्थात असें होतें कीं, शिवाजीमहाराजांचा व कुतुबशहाचा मागें सांगितल्याप्रमाणें स्नेहभाव दृढ झाला याचे मोगलांस व विजापूरकरांस फारच वैषम्य वाटलें होतें. मोगल व विजापूरकर एक होऊन त्यांची संयुक्त सेना आपल्या राज्यावर येणार आहे असें मादण्णापंतास कळताच त्यानेही आपल्या सैन्याची कडेकोट तयारी केली. पुढें ह्या पक्षांचे तुंबल युद्ध होऊन मादण्णाने शत्रुसैन्याचा पुरा मोड करून त्यास मागें हटविलें. ह्यावेळीं विजापूरकरांच्या फौजेची तर अगदीं वाताहत होऊन गेली. त्यांच्या लष्करास अन्नाचा पुरवठा न होऊन लोक पटापट मरू लागले. शिपायांस मुशाहिरा न मिळाल्यामुळें त्यांच्यांत फिसाद होऊन ते चाकरी सोडून मन मानेल तिकडे निघून गेले. अंमलदारास व बड्या बड्या सरदारांसही कोणी जुमानीना. दुसरें असें झालें कीं, अबदुलकरीमखान ह्या धामधुमीच्या ऐन प्रसंगीं आजारी पडून लवकरच मरण पावला. त्यामुळें तर कोणाचा पायपोस कोणाच्या पायांत नाहीं अशी अवस्था होऊन गेली. तेव्हां दिलेरखानानें विजापूरदरबाराची सुव्यवस्था लावून लष्कराची नाराजी नाहींशी करण्याचें मनांत आणले मग त्यानें त्या दरबारच्या अमीरउमरावांत माजलेली दुफळी मोडून टाकून मसाऊदखान ह्या नांवाचा एक मोठा धनाढ्य जहागीरदार होता, त्यास इतरांच्या संमतीनें अदिलशाहीचा कुलकारभारी नेमिलें. हा मसाऊदखान शिद्दीजोहाराचा जावई असून मोठा श्रीमान होता. यानें दिलेरखानाशीं असा करार केला कीं, 'आपण अदिलशाही राज्यांत उत्तम बंदोबस्त राखून जिकडे तिकडे शांतता होईल असें करूं; तुम्हास झालेलें कर्ज वारूं; शिवाजीराजांशीं कोणत्याही प्रकारचा संबंध ठेवणार नाही व बेदिल झालेल्या लष्कराचा मुशाहिरा वगैरे देऊन तें कायम राहील असें करूं.' ह्यांतील शेवटली अट मात्र त्यानें बरोबर पाळली नाहीं. त्यानें आपल्या लष्करातील पुष्कळ घोडेस्वारांस रजा दिली. त्यामुळें हे शिलेदार देशांत चोहींकडे हिंडून प्रजेस त्रास देऊं लागले. मोरोपंत पिंगळ्यानें अशा बेकार झालेल्या पुष्कळ स्वारांस आपल्या लष्करांत नोकरीस ठेविलें.

हे सगळें वर्तमान महाराजांस वेळोवेळां कळतच होते विजापूरकर व मोगल एक होऊन कुतुबशहावर तर चालून गेलेच होते. त्याप्रमाणेंच ते आपल्या राज्यावरही हल्ला करितील अशी भीती वाटून ते मोठ्या लगबगीने स्वदेशी यावयास निघाले. ते मद्रास प्रांत सोडून म्हैसूर प्रांतात स. १६७७ च्या दिसेंबर महिन्यात आले. या प्रांतांचा पूर्व व मध्यभाग त्यांनी काबीज केला. तेथून पुढें कूच करून ते कोपल प्रांतात आले आणि तेथल्या किल्ल्यास त्यांनी वेढा देऊन तो पंधरा दिवसात सर केला आणि त्या किल्ल्याच्या आसपासचा सगळा प्रांत व लक्ष्मेश्वरचा कोटही काबीज करून तेथील पुंडपाळेगारांस अंकित करून ठेविले. ह्याप्रमाणे गदग, मालगुंड वगैरे ठाणी त्यांच्या हाती आली. तेथे आपली सत्ता कायमची बसविण्यासाठी त्यानी जनार्दनपंत सुमंत यांस थोड्या फौजेनिशी मागे ठेऊन दिले. येथून पुढें महाराज मजल दरमजल करीत मोठ्या वेगाने जात असता विजापूरकरांचे दोन सरदार हुसेनखान माइणा व लोदीखान हे दहा हजार स्वारांनिशी त्यांजवर चालून आले त्या सरदारांशी युद्ध करून त्यांचा त्यांनी मोड केला तसेच बावलीखान पठाण ह्या नावाच्या आणखीन एक सरदार महाराजांनी काबीज केलेल्या कोल्हापूर, तारळे वगैरे प्रांतात उत्पात करीत आहे असे कळताच त्याच्यावर निळोजी काटकर[१] यास महाराजांनी पाठविले. त्याने त्या पठाणास तुरुंबानजीक गाडून त्याचा पराभव करून त्याची फौज उधळून लाविली. ह्या लढाईत ज्यांनी ज्यांनी पराक्रम केला. त्यांस नावाजून महाराजांनी इनामे दिली व निळोजी काटकरास भरजरी वस्त्रे, सुवर्णपदक, मोत्यांचा तुरा, कडी, एक हत्ती व दोन घोडे अशी बक्षिसे दिली. येथून पुढें उत्तरेस संपगावाकडे महाराज कूच करीत असता बैलवाडीच्या किल्ल्याची मालकीण सावित्रीबाई[२] देसाईण म्हणून एक विधवा स्त्री होती. तिनें महाराजांच्या सैन्याच्या हकिवाडास उपसर्ग दिला. त्यावरून तिच्या किल्ल्यास त्यांच्या कांही लोकांनी वेढा दिला. सावित्रीबाईने न डगमगता किल्ला २७ दिवस लढविला. शेवटी तिची अन्नसामुग्री व दारूगोळाही संपला तेव्हां तिने आपल्या लोकांनिशी वेढा घातलेल्या लोकांवर तुटून पडून त्यांची

१ याचे उपनाव कोठे व कांटे असें इतरत्र आढळतें.

२ हिचे नाव कोणी मलवाई व कोणी लालबी असें देतात.

बरीच खराबी केली. ती त्यांच्याशी सगळा दिवस मोठ्या आवेशाने लढली; परंतु अखेरीस पराभव पाहून ती त्यांच्या हाती आली. तिला त्यांनी महाराजांपाशी आणिले. तिने त्यांचे मोठे नुकसान करून आणखी २७ दिवसांपर्यंत दाद न दिल्यामुळे त्यांची बरीच फजिती झाली, तरी स्त्रीजातीस शिक्षा करू नये असा त्याचा नियम असल्याकारणाने त्यांनी तिला वस्त्रेभूषणे देऊन गौरविले आणि दोन गाव इनाम करून देऊन सोडून दिले.[१]

महाराज तोरगलास मुक्काम करून राहिले असतां त्यांना रघुनाथपंताकडून एक पत्र आलें. त्यांत व्यंकोजीराजांनीं महाराजांच्या पश्चात गडबड केल्याची हकीगत होती. ती ऐकून महाराजांस ह्याच मुक्कामास तळ देऊन राहावें लागलें. आता व्यंकोजीराजांनी काय गडबड केली तें सांगू, महाराज कर्नाटकांतून स्वदेशी यावयास निघाले असें व्यंकोजीराजांस कळतांच तें तिकडील कांही मुसलमान सरदारांशी मिलाफ करून त्यांच्या साहाय्याने संताजी भोसले, रघुनाथपंत व हंबीरराव सरनोबत यांजवर फौजेनिशीं चालून आले.[२] महाराजांच्या छावणीतून पळून आल्यावर त्यांनी मदुरेच्या व म्हैसूरच्या नायकांशी संगनमत करण्याचा प्रयत्न केला. पण मदुरेचा नायक त्यास सामील झाला नाही. व्यंकोजींनीही यावेळी विजापूर सरकारचीही मदत मागितली पण ती त्यांना मिळाली नाही. तिकडील कांही पाळेगार व मुसलमान जहागिरदार यांनी मात्र त्यास ह्या वेळीं साहाय्य केले. व्यंकोजीराजांनी ह्या वेळीं स्वतःचे दहा हजार पायदळ, चार हजार घोडदळ सिद्ध केले असून आणखी मुसलमान सरदार व पाळेगार यांचेही बरेच लोक त्यांच्या साहाय्यास आले. व्यंकोजीराजे मोठी फौज घेऊन आपणांवर हल्ला करावयास येत आहेत असें पाहून रघुनाथपंत, संताजी भोसले व हंबीरराव यांनी आपली सेना त्याच्याशी सामना करण्यासाठीं तयार करून त्यांस बाळगोडापुरानजीक गांठले. रघुनाथपंतानें त्यांच्याशीं एकदम सामना न करितां त्यांना दोन समजुतीच्या गोष्टी सांगून पाहिल्या; परंतु ते कांहीं केल्या आपला हेका सोडीनात व त्यांच्या पक्षाकडचे मुसलमान सरदार तर अगदीं उतावीळ होऊन हातघाईवर आले. तेव्हां अर्थात निरुपायास्तव त्यांना त्यांच्यांशीं युद्ध करणें प्राप्त झालें. त्या युद्धांत व्यंकोजीराजांच्या पक्षाचा पुरा मोड झाला.[३] ह्या वेळीं शहाजीराजांच्या नाटकशाळेचे पुत्र प्रतापजी व भिंवजी हे पाडाव झाले. व्यंकोजीराजे शेंदोनशें लोकांसह पळत सुटले. तेही महाराजांच्या लोकांच्या हातीं सहज लागले असते परंतु त्यांस धरून पाडाव केलें असतां आपल्या धन्याचा उपमर्द केला असें होऊन आणखी शिवाजीमहाराजांसही कदाचित वाईट वाटेल असें मनांत येऊन रघुनाथपंतानें त्यांस जाऊं दिलें. ह्या लढाईत व्यंकोजीराजाचे एक हजार घोडे व तीन सरदार त्यांच्या हाती लागले असे म्हणतात.

---

१ तारीख–ए–शिवाजी ह्या यवनी बखरींत असे म्हटले आहे की, महाराजांच्या सखुजी गायकवाड नामक सरदाराने तिला पकडून वाईट रितीने वागविल्यावरून त्याचे दोन्ही डोळे काढून त्याला मानवली गावी कैदेत ठेविले. सावित्रीबाईशी झालेल्या ह्या युद्धप्रसंगासंबंधाचा इंग्रज व्यापाऱ्यांचा १६७८ सालच्या फेब्रुवारी महिन्यातला लेख येणेंप्रमाणे आहे 'त्यांनी सध्या एका किल्ल्यास वेढा घातला आहे. त्याची ह्या किल्ल्याशी जशी फजिती उडाली तशी मोगलांशी व विजापूरकरांशी एवढ्या लढाया झाल्या त्यांत कधी झाली नव्हती. ज्यांनी एवढी राज्ये जिंकिली त्याना ह्या देसाईणबाईला इतके दिवस जेर करता आले नाही!

२ रायरीच्या बखरींत असें आहे की, व्यंकोजीराजे स्वतः फौज घेऊन आले नाहींत तर त्यांनी आपला दिवाण जगन्नाथपंत व इतर सरदार यांस त्यांनी रघुनाथपंत व सरनोबत यांजवर पाठविलें.

३ उल्किज म्हणतो कीं, ह्या लढाईत पहिल्याने संताजी भोसल्याचा मोड झाला व त्याच्या सैन्याने माघार घेतली. तेव्हां त्यास अतिशयित वाईट वाटलें. समरभूमीवरून मागें हटलेल्या सर्व लोकांस रात्रीच्या वेळी जमा करून त्यानें असें ठरविलें की, अशा रीतीनें पराभव पावून मागें पळून जावे त्यांपेक्षा पुनः एक वेळ शत्रूवर अकस्मात घाला घालून मारावे किंवा मरावे हें चागलें. अशाने आपली अपकीर्ती टळून स्वामिकार्यी प्राण दिल्याचे श्रेय आपणांस प्राप्त होईल. हें त्याचें मोठ्या हुरुपाने बोलणे सर्वांस पसंत होऊन त्याच्या बेतास त्यांनी रुकार दिला आणि दिवसभर लढून थकले असताही ते शत्रूवर पुनः हल्ला करण्यास तयार झाले. मग त्यांनीं थोडीशी विश्रांती घेऊन व्यंकोजीराजाच्या सैन्यावर अकस्मात घाला घातला. हें त्याचें सैन्य ह्या वेळीं विजयानंदभरात स्वस्थ विश्रांती घेत पडलें होतें. यास्तव महाराजांच्या लोकांचा हा असा अवचित घाला आल्यामुळे त्यांची अगदीं गाळण झाली व संताजीच्या लोकांनी त्यांचा पार सप्पा उडवून दिला.

हें वर्तमान महाराजांस कळले तेव्हां त्यांनी रघुनाथपंतास लिहिले कीं, 'ते आमचे धाकटे भाऊ आहेत. त्यांनी पोरबुद्धी केली तरी ते बंधुच आहेत. त्याचें रक्षण करणें उचित होय. त्याचें राज्य बुडवूं नये!' त्याप्रमाणेंच व्यंकोजीराजांसही त्यांनी एक पत्र लिहिले, त्यांतील आशय येणेंप्रमाणें होता, 'तुम्ही तुरकांच्या नादी लागून आमच्या लोकांशी युद्ध केलें असें कळलें त्यांत तुमची खराबी होऊन प्रतापजीराजे व भिंवजीराजे यांस आमच्या लोकांनी पकडून कैद केलें व तुमचे पुष्कळ सरदार जखमी झाले, हें ऐकून आमच्या मनास फार वाईट वाटलें. तुम्ही आम्ही भाऊ, तुमचे नुकसान तें आमचें व तुमचा लौकिक तो आमचा असें आम्ही समजतो तुम्ही असा अविचार करून आपली अपकीर्ती दिगंत पसरली, हें काहीं नीट केलें नाहीं. हें तुम्ही केलें तें आपल्या बुद्धीने केलें नाहीं. ज्या लोकाच्या मसलतीने ही गोष्ट करण्यास तुम्ही प्रवृत्त झालां त्यांस ईश्वरसत्तेनें शिक्षा तर झालीच आहे. तुमच्या मनांत आमच्याविषयीं भलताच भाव उत्पन्न झाल्यामुळें ही गोष्ट तुमच्या हातून घडली आहे. यवनांची मसलत न ऐकतां तुम्ही आमच्यावर सर्व भार टाकला असता तर त्यांत तुमचे हितच झालें असतें. आता तुमची अपकीर्ती होऊन भाग देणें प्राप्त होणार आहे. वडिलांनी मिळविलेली दौलत चाकरीची आहे. तेव्हा तिचा वांटा आम्हांला कसा द्यावा असें तुमच्या मनांत आलें, हें बरोबर नाहीं. तुम्ही आम्हांला तिचा वाटा दिल्यावर मग विजापूरसरकार आहे आणि आम्ही आहो तें तुम्हांस विचारणार नाहीं. असें असता तुम्ही पोरपणा करीत आहां. यानंतर तरी वडिलांनी लावून दिलेल्या चालीप्रमाणें वागा. सन्मार्ग सोडूं नका. अनीति सोडा. विचाराने चाला. दुष्टदुर्मदांचा संहार करून प्रजानन सुखी करा. तुम्ही थोरले महाराजांचे पुत्र असून मोठे कुलीन आहां. असें असता धर्माधर्माचा विचार तुमच्या मनांत कांहींच येत नाहीं, परंतु अशाने तुम्ही कष्टी व्हाल. आजपर्यंत सर्व दौलतीचा तुम्ही एकट्यानीच उपभोग घेतला. आतां तरी आमचा अर्धा वाटा आम्हांस द्या. आमचा भाग आम्हांस देऊन तुम्ही सुखानें रहा. तुळजापूरच्या भवानीची आम्हांवर पूर्ण कृपा असल्यामुळें आम्हांस सदोदित विजयच प्राप्त व्हावयाचा, हें ध्यानांत ठेवून आमच्याशी युद्धप्रसंग करण्याचें धाडस यवनमसलतगारांच्या नादीं लागून करावयाचें नव्हतें. दुर्योधनासारखी बुद्धी धरून विनाकारण आपल्या शूर लोकांचा संहार करावयाचा नव्हता. तुम्ही आपल्या सेवकांच्या हातून पराभव पावलां त्यामुळें तुमचा दुलौकिक मात्र झाला आहे. लढाई झाली तींत जो नाश झाला तो आमचाच असें आम्ही समजतों यापुढें तरी असला प्रकार होऊं देऊं नका. तुम्ही पुरातन माणसांचा अव्हेर करून नवीन माणसांचा लोभ धरू नका. वडिलांच्या हातचीं वहिवाटलेलीं माणसें तुम्हीं वडिलांप्रमाणें मानली पाहिजेत. त्यांचा अनादर करून मनास वाटेल तसे वागता त्याचें हें फळ तुम्हांस प्राप्त झालें आहे व यापुढेंही तें भोगावे लागेल. रघुनाथपंत आम्हांकडे आले म्हणून हा बिघाड झाला असें समजूं नका. भाऊपणामुळें वाटा देणें घेणें आहेच. तें कधीं चुकावयाचें नाहीं. यांत दुसऱ्याच्या सांगण्या शिकविण्याचा कांहीं संबंध नाहीं. तुम्हांस तुमच्या बऱ्याचें सांगितलें ते तुम्हांस विपरीत वाटलें. ह्यामुळे ह्या थरास गोष्ट आली जुनी माणसें वडिलांच्या ठिकाणी मोजून त्याच्याकडून काम घ्याल तर यश पावाल व तुमची दौलत वाढेल. हें ध्यानांत पुरे ठेवून काय करणें तें करा. अरणी, बेंगरूळ, कोल्हार, वासकोट, शिरटें वगैरे तालुके आमच्या हातीं आलेच आहेत. चंदावरसुद्धा आमच्या लोकांच्या स्वाधीन करा. नगद जडजवाहीर वगैरे जी चीजवस्तू वडिलांच्या हातची आहे तिचा अर्धा वाटा आम्हांस द्या. तुम्ही आमच्याशी निर्मळपणानें वागल्यास तुंगभद्रेपलीकडे पन्हाळाप्रांतांतील आमच्या ताब्यांतला तीन लक्ष होनांचा मुलूख आम्ही तुम्हांस देऊं. हा प्रांत नको असल्यास कुतुबशहास सांगून त्याच्याकडून तुम्हांस तेवढ्याच उत्पन्नाचा मुलूख देववू. उगाच गृहकलह माजवून तुम्ही आम्ही कष्टी व्हावें यांत कांहीं अर्थ नाहीं. याउपर तरी तुमचा आमचा सलोखा राहावा. आम्ही तुमचे वडील बंधू या नात्याने जें सांगतो तें ऐकाल तर त्यांत तुमचें कल्याण होईल. आमच्याशीं विरोध कराल तर विनाकारण कष्ट पावाल!'[१]

---

१ महाराजांच्या ह्या पत्राची अस्सल नक्कल रा. ब. पारसनीस यांनी इतिहाससंग्रहात प्रसिद्ध केली आहे.

ह्याप्रमाणें व्यंकोजीराजांस पत्र पाठवून रघुनाथपंतासही असें लिहून कळविलें कीं, व्यंकोजीराजांशीं ह्याउपर कलह करून त्यांचा हिरमोड करूं नये व त्याचा आब जाईल असें कांहीं करूं नये. ते थोरल्या महाराजांचे पुत्र आहेत. त्यांनी दौलतीचा उपभोग घेतला तरी त्यांत कांही गैर झालें नाहीं. त्यांच्याशी होईल त्या रीतीचा तह करून सख्य करावें' ह्या अशा आशयाचा खलिता महाराजांकडून येतांच व्यंकोजीराजांच्या मागें फौज रवाना केली होती तिची हालचाल त्यानें बंद केली. तिकडे व्यंकोजीराजे सदरील आशयाचे पत्र आलें तें वाचून मोठ्या विचारांत पडले. त्यांनी मनांत असें आणिलें कीं, 'आपल्या फौजेचा मोड होऊन ती अष्ट दिशास उधळली. आपले हत्ती, घोडे, उंट वगैरे सर्व त्यांच्या हातीं लागले. आपले लोक पुष्कळ मेले, त्यांची रांडापोरें आपल्यापाशीं धरणें धरून बसली आहेत. पुष्कळ शिलेदार आपली पाडाव झालेलीं घोडां आम्हांस द्या म्हणत आहेत. जखमी झालेले लोक अन्न अन्न करीत आहेत. ह्या सगळ्यांची समजूत घालावी तरी कशी? वडील बंधू तर वाटा घेतल्यावांचून सोडणार नाहींत. एकंदर चीजवस्तीची माहिती देणारे रघुनाथपंत त्यांच्यापाशी आहेतच. आतां कोणता विचार करावा? लढाई पुनः चालवावी तर तींत आमचे अधिकच नुकसान होऊन विरोध मात्र वाढणार व सर्व दौलत हातची जाणार. आम्ही प्रारंभी विरोध केला तोच मूर्खपणा झाला. दादासाहेबांच्या भेटीस गेलों त्या समयीच लीनतेनें वागून ते सांगत तें ऐकिलें असतें तर आज आमची ही दशा झाली नसती. आमचे वडील बंधू मोठे भाग्यशाली आहेत. आम्ही वाईट लोकांच्या नादाने त्यांशीं कलह केला हें फार वाईट झालें!'

व्यंकोजीराजांस हा असा पश्चात्ताप होऊन ते चिंताग्रस्त झाले. त्यांस भोजन, शयन कांहीं सुचेना. ते असे चार प्रहर विचार करीत बसले. तेव्हां त्यांची स्त्री दीपाबाई त्यांच्या जवळ जाऊन चिंतेचे कारण विचारूं लागली. तेव्हां राजे म्हणाले, 'दादासाहेबांचे कामदार इकडे राहिले, त्यांनी पुंडपाळेगारांचा बंदोबस्त करून पादशाही अंमलांतील किल्लेकोट काबीज केले. त्यांच्या नित्य लढाया होतात. पण त्यांस अपयश असें कोठेंच येत नाहीं. पादशहाकडून त्यांचें पारिपत्य होईना, तेथें आमचा पाड काय? आम्ही त्यांशीं लढून फळ काय? लढाई झाली, तींत आमची खराबी मात्र पुष्कळ झाली! ' हें ऐकून ती म्हणाली, 'थोरले महाराज कैलासवासी झाले त्यांच्या मागें तेच आपणांस वडील आहेत. सोद्यांच्या नादास लागून अपकीर्ती मात्र करून घेतली. बंधुत्वांत विरोध आणिला. आतां त्याबद्दल खेद वाटतो. पहिल्यानेंच विचार करावा तो केला नाहीं. दादासाहेब पुण्यश्लोक अवतारी पुरुष आहेत. आपण सरळ रीतीनें चालल्यास ते आपला अनादर करणार नाहींत. आपल्या ह्या अशा वागणुकीमुळें मात्र त्यांच्याकडून भीती आहे. त्यांना म्हणजे ह्या दौलतीची परवा आहे असें नाही. त्यांनी अशा दौलती किती कमाविल्या असतील! व आपल्यासारखे दौलतदार त्यांच्या पदरीं किती तरी असतील. आपण त्यांच्याशी निरर्थक भांडता आहां. त्यांस शरण गेलो असतां तर त्यांत काय हानी होती? वडील वांटा मागतात तो कां देऊं नये? आपण नवीन दौलत तर नाहींना मिळविली? आपली कमाई तर ते नाहीं ना मागत? त्यांजकडून अमर्यादा ती काय झाली? आपल्या स्नेहांत त्यांनी अंतर केलें नसता त्यांच्याशी आपण विरोध करून विनाकारण कलह माजविला, तो कशाला? रघुनाथपंत वडिलांच्या वेळचे विश्वासू चाकर, ते आपणांस वडिलांचे ठिकाणी. असें असतां त्यांस नाराज केलें. ते सर्व व्यवस्था नीट राखते व आपणांस सुखासमाधानानें राहता आले असतें. आपण लुच्च्यांच्या नादास लागून विनाकारण हुर्मत गमाविली. आता तरी सर्व विरोध एकीकडे ठेवून रघुनाथपंतांस शरण जावे आणि ते सांगतील तसें वागावे, म्हणजे आपणांस ते काडीइतकें संकट पडूं देणार नाहींत. आपण ह्या वेळीं नसता अभिमान धरून भलत्याच रीतीनें वागाल तर नाहक फजिती मात्र होईल. रघुनाथपंतांची व आपली बाचाबाची झाली असल्यामुळें त्यांच्याकडे जाण्यास दिक्कत वाटत असेल तर खुद्द दादासाहेबास शरण जावे. त्यांशीं अजून तरी लीनतेनें वागल्यास ते आपला अवश्य सांभाळ करितील. हें सर्वांपरी चांगले. त्यास शरण गेल्याशिवाय परिणाम नाहीं!'

दीपाबाईचा हा सल्ला व्यंकोजीराजांस पसंत वाटून त्यांनी महाराजांशीं समेट करण्याचा निश्चय केला व तहाची कलमे ठरविण्यासाठी रघुनाथपंतांस आपल्या भेटीस बोलाविले. रघुनाथपंतानें त्यास असा जबाब पाठविला कीं, 'ह्या प्रकरणी महाराजांची आज्ञा होईल तसें आम्हांस वर्तन करणें आहे. यास्तव त्यांची परवानगी मिळाल्यावांचून मला तुमच्या भेटीस येववत नाहीं! मग महाराजांची आज्ञा घेऊन तो व्यंकोजीराजांकडे जावयास सिद्ध झाला आणि त्यानें त्यांस असें कळविले कीं, 'आम्ही शिवाजीमहाराजांचे सेवक व तुम्ही त्यांचे धाकटे बंधू यास्तव तुमची-आमची भेट होणें ती बरोबरीच्याहून अधिक नात्यानें व्हावीं.' ही अट व्यंकोजीराजांनी मान्य केली. मग भेटीचे स्थल नेमून तेथें डेरे दिले आणि दोहोंकडून दोघे हत्तीवर बसून डेऱ्यांनजीक आले.[१] व्यंकोजीराजे अंबारीतून खालीं उतरल्यावर रघुनाथपंत उतरला. ते एकमेकांचा हात धरून डेऱ्यांत गेले. तेथें दोन मसनदी करविल्या होत्या, त्यांपाशीं दोघे बरोबरीनें गेल्यावर रघुनाथपंत हात सोडून एकीकडे उभा राहिला आणि म्हणाला 'ह्या मसनदीचे आम्ही चाकर, हिजवर बसण्यास आपणच योग्य आहां!' असें म्हणून त्यांस मसनदीवर बसवून मुजरा करून तो स्वतः पूर्वमर्यादेप्रमाणे दूर बसला आणि बोलला कीं, 'जसे शिवाजीमहाराज तसेच तुम्ही मला आहां. तुमच्याकडून निघून जातांना मीं म्हटलें होतें कीं, मी तुमच्या अर्ध्यासनीं बसण्यास योग्य असा चाकर आहें. हें तुमच्या प्रत्ययास आणून द्यावे म्हणून एवढे करावे लागलें. वरकड चाकरांप्रमाणें मी नव्हे, म्हणूनच शिवाजीमहाराजांनी माझा अंगीकार केला आहे. तसाच तुम्हींही करावा. तुमच्या हिताविरुद्ध प्राणही गेल्या वागूं नये हा माझा संकल्प आहे; पण स्वामी वांकडे चालले असतां त्यांस योग्य विचार सांगण्यास मी चुकणार नाहीं! स्वराज्य व स्वसत्ता वाढविण्याविषयीं मी तुम्हास वारंवार विनंती करीत गेलों. परंतु मूर्ख माणसांचे ऐकून तुम्ही माझा उपमर्द केला. म्हणून मीं शिवाजीमहाराजांकडे जाऊन कर्नाटकांत राज्य साधण्यासारखे आहे असें त्यांस सुचविलें. ते महापराक्रमी असून स्वसत्ता व स्वधर्म यांची संस्थापना करण्यास व दुष्ट म्लेंच्छांचा संहार करण्यास प्रवृत्त झाले असल्याकारणानें त्यांना माझी सूचना पसंत होऊन ते इतके दूर कर्नाटकांत आले व इकडे त्यांनी तीनचार कोटींचे नवे राज्य संपादन केलें. तरी तुमच्या ठायीं त्यांचा लोभ बहुत आहे. त्यांची तुमच्यावर फारच ममता आहे. आम्हांसही त्यांची अशाच आशयाचीं पत्रें आलीं आहेत. या नंतर तुम्हीं त्यांच्याशीं स्वच्छपणें वर्तावें. जसा लक्ष्मण रामचंद्राच्या आज्ञेत सदैव वागला तसे तुम्ही त्यांचेशी वागावें हाच तुमचा धर्म आहे. असें कराल तरच तुमचा उत्कर्ष होईल. कोणताही कठीण प्रसंग आला असतां मला आज्ञा करीत जावी, म्हणजे मी सेनेसह येऊन तुम्हांस लागेल तें साहाय्य करीन. शिवाजीमहाराजांप्रमाणें कांहींतरी पराक्रम तुमच्या हातून व्हावा व तुमची कीर्ती वाढावी हीच माझी इच्छा आहे!' ह्याप्रमाणें अनेक प्रकारे व्यंकोजीराजांस बोध करून रघुनाथपंतानें त्यांच्याकडून असा करार करून घेतला कीं, 'त्यांनीं वडिलांच्या जाहगिरीचें अर्धे उत्पन्न शिवाजीमहाराजांस दरसाल देत जावे, वडिलार्जित जडजवाहिराचा अर्धा ऐवज त्यांस द्यावा व कांही रोख पैसा स्वारीखर्चासाठी म्हणून द्यावा.' ह्या अटी व्यंकोजीराजांनी कबूल केल्यावर महाराजांनी तंजावर प्रांत त्यांच्याकडेच राहू देऊन आणखी जाहगिरीचे जे दुसरे तालुके जप्त केले होते तेही सोडून दिले.[२]

रघुनाथपंताकडून ह्या संबंधाचे कागद महाराजांच्या हाती गेल्यावर त्यांनी त्यांस जबाब लिहिला त्यांतील मतलब येणेंप्रमाणें आहे, 'चिरंजीव राजश्री व्यंकोजीराजे यांस, सौभाग्यवती दीपाबाईंनी ध्यानावर आणून तुम्हांस नेऊन तह ठरविला हें ठीक झालें. चिरंजिवांस आम्ही समक्ष सांगत होतों तें त्यांनीं मनास आणिलें नाहीं. त्या वेळीं त्यांस धुंदी होती. ज्यांच्या फुसलावणी वरून त्यांनी आमचें बोलणें तुच्छ मानिलें होतें, त्यांचा कावा आतां त्यांस स्पष्ट दिसून

---

१ ही भेट चंदावरास झाली असे शिवदिग्विजयकार म्हणतो. रघुनाथपंतास व्यंकोजीराजे व दिपाबाई यांनी फारच आग्रह केल्यामुळे तो महाराजांच्या हुकमाची वाट न पाहतां चंदावरास गेला व त्यास पहिल्याने एकांती नेऊन उभयतांनी त्याचे चरण धरून 'शिरसुरी तुम्हांजवळ, तारा कीं मारा!' असें म्हटले, ही अशी त्यांची नम्रता व अनुताप पाहून रघुनाथपंतानें त्याच्याशीं तह केला.

२ ह्या वेळीं व्यंकोजीराजांनीं कोल्हार, बाळापूर, महाराजगड, जगदेवगड व कर्नाटक हे किल्ले महाराजांच्या स्वाधीन केले असें रायरीच्या बखरींत म्हटलें आहे. ही ठिकाणे महाराजांनी अगोदरच काबीज केली होती हें मागें सांगितलेंच आहे.

आला व त्यांची नजर खुली झाली हें ठीक झालें. ते स्थितीवर येऊन तुमच्याकडे बोलले आहेत त्याप्रमाणें वागण्याचा दृढ निश्चय त्यांच्याकडून करून घ्या. तुमची मर्जी असल्यास चिरंजिवांच्या संस्थानाचा बंदोबस्त ठेवण्यासाठी तुम्हीं तिकडे राहा. आमच्या चंदी वगैरे प्रांतांचें काम जनार्दन पंडितांकडे सोंपवावें व कमीजास्त कामाची चौकशी तुम्हीं वेळोवेळा ठेवून नीट बंदोबस्त राखावा. चिरंजिवांजवळ तुम्ही राहिलां तर तेथील बंदोबस्त पुढीलप्रमाणे राखून आम्हांस वरचेवर तिकडील हकीगत कळवीत जा. बंदोबस्ताच्या कलमांचा तपशील : –

१ सोयरे व मानकरी यांचा योग्य बंदोबस्त करावा. त्याचा अपमान होऊं न द्यावें. त्यांचा आदरमान करीत जावा. त्यांस खासगी कामे सांगून राबवू नये.

२ दरखदार व कामदार यांच्या इतल्ल्याशिवाय कोणतेंही कामकाज होऊ न द्या. बरीवाईट सल्ला त्यांस विचारीत जावे. इतबारी लोक असतील त्यांसच कामगिऱ्या सांगाव्या. दरखदारमंडळीशीं बखेडा करूं नये. त्यांच्या योग्यतेप्रमाणें त्यांस बढत्या देऊन वागवून घ्यावे.

३ शागीर्दपेशामंडळी चांगली कुलीन, इमानी, इतबारी अशी पाहून जामीन घेऊन जवळ बाळगावी व कृपेंत ठेवावी; सर्व ठिकाणची बातमी राखावी. परंतु हे अमक्याचे ऐकतात असें कोणास वाटूं न द्यावे. सर्वांस जरबेंत वागवावे.

४ आसपासचे संस्थानिक आपले मित्र असोत किंवा शत्रु असोत, त्यांच्याकडे आपले वकील व बातमीदार ठेवून, कोणास कळूं न देतां, सर्व ठिकाणची बातमी वरचेवर आपणांस कळेल अशी तजवीज ठेवावी.

५ पागा, शिलेदार व पथके यांचें काम नित्य पाहून तीं सुस्थितींत ठेवावी. घोडी व माणसे नेहमी हुशार राखावीं. शिलेदार असतील त्यांचे घोडे खरेदी करून पागेस लावावे व त्यास आपल्या पागेंत नोकरीस ठेवावें. लष्कराच्या चाकरीचा राबता नित्य ठेवावा म्हणजे तें सर्वदा हुशार राहतें; नाहीं तर गाफिली वाढून परचक्र आलें असता नाश होतो. यास्तव पागा व तोफखाना सर्वदा तयारींत ठेवावा.

६ दुष्ट, दुरात्मे, हिंदुद्वेष्टे, चोरटे, चहाड, सोदे, फितवेखोर, दरवडेखोर, मद्यपी इत्यादिकांस आपल्या राज्यांत थारा देऊं नये. त्यांना राहू दिलेंच तर त्यांच्याकडून जामीन किंवा दंड घ्यावा. त्यांच्याकडून प्रजेस पीडा न होण्याविषयीं खबरदारी घ्यावी. त्यांचा पक्का बंदोबस्त राखावा. गाफिली करूं नये.

७ लहानथोरांशीं केलेले हद्दनामे, तहनामे इत्यादिकांसंबंधानें तंटे उपस्थित होऊं न द्यावे गोरगरीब व अनाथ असतील त्यांचा योग्य परामर्ष घ्यावा व त्यांस यथोचित साहाय्य करावे त्यांस कोणी विनाकारण नाडतील किंवा त्रास देतील तर त्या संबंधाचा बंदोबस्त वेळच्या वेळीं लावावा.

८ धर्मादाय, देवस्थानांच्या नेमणुका, अग्राहार वगैरे चालत आले असतील तसेच पुढें चालू ठेवावे. त्यांचा उच्छेद होऊं न द्यावा. त्यांचा योग्य बंदोबस्त ठेवावा.

९ देणेंघेणें किंवा भाऊबंदकी यांच्यासंबंधानें उद्भवणारे तंटे व बखेडे यांची निवड करण्यासाठीं लायक पंचांची नेमणूक जेव्हांची तेव्हां करावी. प्रजेस न्याय मिळेल असे करावें. लांच न घेता इनसाफ मिळेल अशी तजवीज ठेवावी. सरकार गोरगरिबांचें अभिमानी मायबाप आहे असे समजून कोणाच्याही कवडीस न शिवतां न्यायमनसोबा करावा.

१० कोणास अभय देऊन त्याचें रक्षण करण्याचें वचन दिल्यावर मग पुनः त्याशीं निष्कारण दंडेली करावी, असा नीच प्रकार आमच्या कुळात झाला नाहीं व यापुढें होऊं नये.

११ किल्ला अरणी हा महाल वेदोभास्कर यास थोरले महाराजांनी दिला आहे. त्याचे हल्लीं आठ पुत्र हयात आहेत. त्यांच्याकडे तो कायम राखावा. ते सरकारचाकरीवर हजर राहिल्यास उत्तम, न राहिले तर त्याबद्दल त्यांच्या महालास उपद्रव देऊं नये.

१२ विजापूरकरांकडून कांहीं सनदी अंमल आहे. त्याप्रमाणेंच दौलताबादकरांकडून वडील इकडे आले तेव्हां कांही अंमल तहांत मिळाला. त्याशिवाय त्यांनी कित्येक पाळेगार काबूंत आणून खास अंमल केला. ह्या सर्व मुलखाचा हिशोब जमेंत बरोबर लागलेला नाहीं. तो नीट लावावा. तशीच थोरले महाराजांच्या वेळेपासून ह्या अंमलाबद्दल विजापूरकरांची पांच हजार फौजेनिशीं चाकरी करावी लागत आहे. हें चाकरीचे कलम आम्ही त्या सरकाराशी तह केला त्यांत काढून टाकून असें ठरविलें आहे की, आम्ही त्यांस प्रसंगोपात्त मदत करूं. हा करार तीर्थरूप जीवंत असतां झाला आहे. तेव्हां अर्थात ही चाकरी तुम्हांस इतःपर करण्याचें कारण नाही. ह्या चाकरीच्या ऐवजी त्यांस प्रसंग विशेषीं मदत करणें पडेल ती तुम्हीं आपल्या फौजेनिशीं करावी. ती न केल्यास त्याचा जाब तुम्हांस विचारूं. ही मदत आम्हांस देणें प्राप्त झाले असतां स्वारीखर्च तुम्हांस द्यावा लागेल.

१३ वरघाटीं हिंगणी, बेरडी, देऊळगांव वगैरे गांवांच्या पाटीलक्या, देशमुख्या वगैरे वडिलोपोर्जित वतनें आहेत. त्यांविषयीं तुम्ही बोलूं नये. तीं वतनें आम्ही वहिवाटूं.

१४ प्रसंगविशेषीं इकडील एखादा माणूस तिकडे गेला किंवा तिकडील इकडे आला तर परस्परांनी त्याचा योग्य परामर्ष किंवा चौकशी ठेवावी. कोणाची कांहीं समजूत करणें असल्यास किंवा खुलासा घेणे असल्यास तो घेऊन जिकडला माणूस तिकडे रवाना करावा. त्याविषयी हरकत करूं नये.

१५. आम्ही सोडविलेल्या प्रांतांपैकीं, बेंगरूळ, बासकोट व सिलेकोट अशा तीन महालांचे उत्पन्न आज तीन लाख शिवराई आहे. चांगली जमाबंदी केल्यास त्यांचें उत्पन्न पाच लाखांपर्यंत होईल. हे महाल आम्ही आमच्यातर्फे चिरंजीव सौभाग्यवती दीपाबाई हिला चोळीबांगडीसाठीं दिले आहेत. ह्या प्रांतांवर व्यंकोजीराजांनी किंवा त्यांच्या वंशजांनी हक्क सांगूं नये किंवा त्यांचें उत्पन्न घेऊं नये. मुलींनी परंपरेने आपल्या खासगी खर्चास हें उत्पन्न ठेवावें. ह्या प्रांताचा बंदोबस्त मात्र तुम्ही राखावा.

१६ चंदीप्रांताजवळ आम्ही जो प्रांत सोडविला आहे त्यापैकीं सात लाख होनांचे महाल चिरंजीव राजश्री व्यंकोजीराजे यास दूधभाताकीरता इनाम दिले आहेत. ते त्यांच्या वंशांत परंपरेने चालावे. ह्या महालांची यादी करून तुम्ही आमच्याकडे पाठवावी म्हणजे त्यांस मंजुरी देऊं व सनदा पाठवूं.

१७ तुम्ही (रघुनाथपंत) पिढीजाद इतवारी सेवक. तुमचे कुटुंब थोर व सत्पात्र. हें जाणून तंजावर प्रांतापैकीं एक लाख शिवराई उत्पनाचे गांव तुम्हांस तोडून द्यावयाचे आहेत. त्यांची यादी इकडे पाठवावी म्हणजे सनदा पाठवून देऊं. ह्या गावांचे उत्पन्न तुम्ही वंशपरंपरेने भोगत जावे.

१८ तुमच्या संस्थानांतला कोणी चोर वगैरे गुन्हेगार आमच्या राज्यांत आला किंवा आमच्याकडचा तुमच्या संस्थानांत गेला, तर तो परस्परांनीं परस्परांच्या स्वाधीन करावा, अनमान करूं नये.

१९ थोरले महाराजांच्या छत्रीकडे चौघडा वगैरेची दरमहाची नेमणूक तुम्हीं करावी. तिकडे घोडे, हत्ती, कारकून, शिपाई, प्यादे इत्यादिकांची नेमणूक नेहमी असावी. ह्याविषयी ढिलाई करूं नये.

ह्या एकुणीस कलमांबरहुकूम वागण्याविषयीं चिरंजिवांची मान्यता असल्याबद्दल त्यांचें पत्र घेऊन आमच्याकडे रवाना करावें म्हणजे आम्हांस मोठे समाधान वाटेल.

ह्याप्रमाणें आलेलें कलमबंदी पत्र रघुनाथपंतानें व्यंकोजीराजांस वाचून दाखविलें. ह्याशिवाय आणखी महाराजांनी व्यंकोजीराजांसही एक स्वतंत्र पत्र पाठवून त्यांचें आश्वासन केलें. मग रघुनाथपंतानें व्यंकोजीच्या जाहगिरीची व्यवस्था ठेवून आणखी महाराजांनी नवीन संपादन केलेल्या प्रांतावरही देखरेख ठेवावी असें ठरलें. हा असा व्यंकोजीराजांशीं सलोखा करून व कर्नाटकांत मिळविलेला प्रांत निर्वेध झाला असें पाहून महाराज तोरगलाहून पुढें कूच करून गेले व हंबीरराव सरनोबत यास सेनेसह स्वदेशीं निघून येण्याचा हुकूम त्यांनी पाठविला.

तिकडे निंबाळकर व घाटगे हे पन्हाळाप्रांतांत शिरून तो उद्‌ध्वस्त करून कऱ्हाडापर्यंत प्रांत लुटीत गेले. हें वर्तमान महाराजांस तोरगलमुक्कामीं कळलें तेव्हां त्यांनी निळाजी काटकर यांच्या बरोबर कांही लोक देऊन त्यास त्या सरदारांवर पाठविलें. त्यानें त्यांस कुर्ली येथें गाडून त्यांचा अगदीं धुव्वा उडवून दिला व त्यांच्याकडची बहुतेक लूट परत हस्तगत केली. ही लूट आपल्या प्रजेची असून ज्याची त्यांस मिळावी हें योग्य होय असें मनांत आणून, महाराजांनी नीट चौकशी करून ज्याचा जो माल असेल तो त्यास मिळावा अशी तजवीज केली. आपण त्या ऐवजातील एका तनसडीसही शिवले नाहींत.

महाराजांनी कोपलप्रांत काबीज करून[१] त्यावर जनार्दनपंत यास ठेविले होतें. त्याच्यावर विजापूरकरांच्या फौजेचा हल्ला होण्याचा रंग आहे असें कळताच त्यांनी त्याच्या मदतीस कांहीं लोक रवाना केले व स्वतः थोड्या लोकांनिशीं रायगडावर येऊन दाखल झाले. (मार्च स. १६७८).

कर्नाटकातून स्वदेशी येत असता महाराजांनी विजापूरचा किल्ला हस्तगत करून सिकंदर अदिलशहा याचा कारभार आपण पाहण्याचा घाट घातला होता. बहिलोलखान मृत्यू पावल्यावर जमशीदखान नावाच्या सरदाराने अदिलशहाचा कारभार चालविला होता; परंतु त्याला पुष्कळ विरोधी झाले असून त्यांच्यापुढे त्याचा निभाव लागणे कठिण झाले. तेव्हां त्याने शिवाजीमहाराजांशी असे बोलणे लाविले कीं, 'तुम्ही मला सहा लक्ष होन द्याल तर विजापूरचा किल्ला तुमच्या स्वाधीन करितो आणि अदिलशहाचा सगळा कारभार तुमच्या हाती देतो.' हे बोलणे त्यांस मान्य त्यांनी आपल्या स्वारीचा रोख विजापूराकडे फिरविला; पण त्यांना लवकरच असे कळले कीं, ह्या जमशिदखानास मसाऊदखानाने दग्याने कैद करून सगळा कारभार आपल्या हाती घेतला. तेव्हां अर्थात त्याची निराशा होऊन ते तिकडून माघारी फिरून पन्हाळ्याकडे गेले.[२]

महाराजांच्या हुकमाप्रमाणें हंबीरराव स्वदेशीं यावयास निघाला हें वर सांगितलेच आहे. तो जवळ आला असें ऐकून जनार्दनपंतानें त्याच्या मदतीने विजापूरकराच्या सैन्यावर हल्ला करण्याचा बेत केला व हंबीरराव त्या गोष्टीस मान्य झाल्यावर त्यांनी आपल्या फौजेनिशीं तुंगभद्रा व कृष्णा ह्या नद्यांच्या मधल्या प्रदेशांत शत्रूच्या सैन्यास गांठलें व त्याचा पराभव करून त्यास अष्ट दिशांस उधळून लाविलें. त्याचे पाचशे घोडे, पाच हत्ती व एक मोठा सरदार एवढे त्यांनी पाडाव केले व तिकडील सगळा प्रांत पादाक्रांत करून तेथें आपला अंमल बसविला. कोपल व बेलवाडी ह्या प्रांतांतील देशमुख विजापूरसरकारास वसूल देत नसून आपणच सगळा प्रांत बळकावून पुंड होऊन बसले होते. त्या सगळ्यांस जनार्दनपंतानें जेरीस आणून त्यांच्याकडून शिवाजीमहाराजांचा ताबा कबूल करविला. हे जे प्रांत त्यांनी काबीज केले त्यांचे महत्व मोठे होते. कोपल तर दक्षिणेचे केवळ नाके असून म्हैसुराकडील जो प्रांत महाराजांच्या सत्तेखाली आला होता त्याच्यामध्ये व पन्हाळा प्रांतामध्ये जो प्रदेश होता त्याचे हे मध्यवर्ती ठाणे होतें. यास्तव तुंगभद्रा नदीच्या अलीकडील व काही पलीकडील प्रांत ताब्यांत आल्यामुळे तेवढी महाराजांची सत्ता अखंड झाली. हे जे विजापूरकरांचे प्रांत त्यांनी काबीज केले ते परत घेण्याचा प्रयत्न त्यांच्याकडून यानंतर झाला नाहीं. कारण त्यांचें घोडदळ बहुतेक खलास झालें असून मोगलांशी व कुतुबशहाशीं लढाया करकरून त्यांची बहुतेक हलाखी झाली होती. तशात आणखी लवकरच पावसाळा सुरू होऊन नद्यानाल्यांस पूर आल्यामुळे तिकडे फौज पाठविण्याची सोय उरली नाहीं. ही एवढी फुरसद जनार्दनपंतास व रघुनाथपंतास मिळाल्यावरून त्यांनी तिकडील एकंदर बंदोबस्त उत्तम करून ठेविला.

हंबीरराव जनार्दनपंतास मदत करून निर्भय केल्यावर पुनः स्वदेशाकडे यावयास निघाला. त्याला वाटेंत देऊरचा किल्ला लागला त्यावर त्यानें हल्ला केला. हें वर्तमान विजापूरकरांस कळल्यावर त्यांनी हुसेनखान नामक सरदारास दहा

१ हा प्रांत मोरोपंताने तेथला सुभेदार कासीमखान याला कांही लाच देऊन घेतला होता, असें प्रो. सरकार म्हणतात.

२ ह्या कारस्थानाचा उल्लेख राजापूर येथील इंग्रज व्यापाऱ्यांनी आपल्या लेखात केला आहे.

हजार लोकांनिशीं त्याच्यावर पाठविलें. त्याचा हंबीररावाने मोड करून त्यास पाडाव केले[१] व हा किल्ला सर केला. त्यावरून त्याच्यावर लोदीखानास पाठविलें त्याचाही पराभव करून हंबीररावाने त्यास कैद केलें. त्याप्रमाणेंच त्यानें गोंडल व बहादूरबंदा हे किल्ले छापा घालून हस्तगत केले. ही अशीं शत्रूची वाटेंत लागली तेवढीं ठाणीं सर करीत करीत हंबीरराव महाराजांकडे येऊन दाखल झाला. त्याच्या ह्या उत्कट कामगिरीबद्दल महाराजांनी त्याचें पुष्कळ गौरव करून त्यास मोठे इनाम दिलें. त्याच्या बरोबर धनाजी जाधव व बयाजी घोरपडे हे ह्या मोहिमेंत होते. त्यांनींही उत्तम पराक्रम केल्यावरून महाराजांनी त्यांची वाखाणणी करून त्यांस इनामें व बढत्या दिल्या. त्याप्रमाणेंच कर्नाटकाच्या मोहिमेत ज्यांनी ज्यांनी चांगल्या कामगिऱ्या केल्या त्यास त्यांनी त्यांच्या योग्यतेप्रमाणें पारितोषिकें देऊन संतुष्ट केलें. ह्या मोहिमेस निघाल्यापासून अठरा महिन्यांनी महाराज स्वदेशी परत आले.

पुढें कांहीं दिवसांनीं रघुनाथपंताकडून महाराजांस असें पत्र आलें की, 'व्यंकोजीराजाची उदासवृत्ती झाली आहे. ते नेत्र झाकून बसतात, कोणाशीं बोलत नाहींत, खाण्यापिण्याकडेही दुर्लक्ष करितात, सदैव एकांती बसून काय करितात तें कळत नाहीं, आम्ही जवळ गेलों म्हणजे कांहीं बोलले तर बोलतात, ब्राह्मणांनी जें कांहीं मागावे तें त्यांस बेलाशक देतात. ही त्यांची वृत्ती वर्ष-सहा महिन्यांनी पालटेल म्हणून वाट पाहिली, पण कांहीं नाहीं. ती आहे तशीच आहे. यास्तव केवळ निरुपायास्तव ती आपणांस कळविली आहे. कळविली नाहीं असा आपणांकडून दोष न यावा. तरी आपणांस जें कर्तव्य असेल तें करावे.' हें वर्तमान ऐकून महाराजांनी व्यंकोजीराजांस येणेंप्रमाणें पत्र लिहिले, 'रघुनाथपंत तुमची भेट घेऊन आले. त्यांनी तुम्हांकडील मजकूर लिहून कळविला तो वाचून मनास फार वाईट वाटलें. कारण महाराजांच्या पोटीं तुम्ही आम्ही उभयता बंधू एकमेकांस आधार असून तुम्ही उदास होऊन बसलां आहां हें ऐकून मनास खेद होतो. उदास होऊन बसण्यासारखे संकट तरी तुम्हांवर काय आलें आहे तें कळवाल तर त्याचें निवारण करितां येईल. आम्हांस कोणतीही गोष्ट कळविण्यास तुम्ही शंका धरू नये. तुमचा जो कांहीं मनोरथ असेल तो तत्काळ पूर्ण होईल. आमच्याकडून तुम्हास संतोष होईल असें करण्यास मुळींच आळस व्हावयाचा नाहीं, ही खात्री ठेवा. तुमच्या मनास अशी विकृती कां झाली ती अवश्य कळवा. तिचे परिमार्जन करितां येईल. इतःपर उदासीनपणानें वागूं नका, वागलां असता जवळ आणून ठेवावें लागेल. मग इकडून तुमचें जाणें घडणार नाहीं. हें मनांत वागवून सरळ रीतीनें वागा. रघुनाथपंताची सल्ला नेहमी ऐकत जा. यांतच तुमचे हित आहे. पुढें तुमची मर्जी!' हें असें पत्र त्यांस पोंचल्यावर ते शुद्धीवर येऊन नीट वागूं लागले.

***

१ हा हुसेनखान मोठा शूर पुरुष होता तो वर सांगितलेल्या तुंगभद्रा व कृष्णा ह्या नद्यांच्या मधल्या प्रांतावर सुभेदार होता. त्याला हंबीररावाने तिकडून हाकून दिल्यावर तो विजापूरास पळाला असावा आणि तेथून तो सैन्य घेऊन हंबीररावाशी पुनः सामना करावयास आला असावा. ह्याला हंबीररावाने पाडाव करून महाराजांपुढे नेल्यावर त्यानी त्याचा आदरमान करून त्यास सोडून दिले. ही अशी बेअब्रू झाल्यामुळे तो पराकाष्ठेचा खिन्न झाला. आणि त्याने विष प्राशन करून देहत्याग केला. प्रो. सरकार पृ. ४०६.

भाग सत्ताविसावा

मोगलांशी शेवटले युद्धप्रसंग (१६७८-१६८०)

कर्नाटकांतील मोहीम फत्ते करून व तिकडील पुष्कळ मुलखावर आपला ताबा बसवून शिवाजीमहाराज विजयी होऊन स्वदेशी आले, ही खबर औरंगजेबास कळली तेव्हां त्यास अतिशयित वाईट वाटलें. बहादूरखानास द्रव्याचें आमिष दाखवून व मोगल बादशहास खंडणी देण्याचे कबूल करून त्यांनी स्वराज्यास त्यांच्याकडून उपद्रव न लागे असें केलें होतें. ह्या सलोख्याचें औरंगजेबास पहिल्याने फारसें कांही वाटलें नव्हतें. हा असा सलोखा होणें त्या समयी त्यास सोईचे वाटलें होतें. याचे कारण अर्थात असें होतें कीं, तो उत्तरेस पठाणांशीं लढण्यांत गुंतला होता, त्यामुळें त्याला दक्षिणेंतील सुभेदारास कुमक पाठविण्यास सवड नव्हती. पुढें त्यास हा तह नापसंत होऊन त्यानें बहादूरखानास दोष दिला खरा; परंतु महाराजांच्या मुलखावर त्याला गर्दी करावयास न सांगतां दिलेरखानाच्या सूचनेवरून त्यानें कुतुबशहाशीं युद्ध करण्यास त्यास परवानगी दिली; परंतु त्यांत त्याला यश आलें नाहीं. एवढे मात्र झालें कीं, त्याची पुष्कळ फौज ह्या धामधुमीत खलास झाली. त्यामुळें मोगलांस महाराजांच्या मुलखांत गडबड करण्यास त्राण उरले नाहीं. ह्या वेळीं औरंगजेबाचा असा हिशोब होता कीं, कर्नाटकासारख्या बिकट, अनोळखी व दूरच्या प्रांतांत स्वारी करून शिवाजीमहाराजांचे सैन्यबळ कमी होऊन ते बरेच दुर्बल झाले म्हणजे त्यांना जिंकण्यास फारसे आयास पडणार नाहींत; परंतु हा त्याचा अजमास अगदीं चुकला. त्यांनी ह्या स्वारींत कर्नाटकांतल्या बऱ्याच मुलखावर कायमची सत्ता बसवून विजापूरकरांचा तिकडील अंमल पुष्कळ कमी केला व तिकडूनही त्या सरकारच्या मुलखावर चढाई करण्याचा मार्ग सुगम करून ठेविला. हें पाहून औरंगजेबास असें वाटूं लागलें कीं, 'आतां शिवाजीमहाराज विजापूर सरकारच्या उरलेल्या मुलखावर चोहोकडून गर्दी करून अदिलशाही बुडवून टाकतील व आपला अंमल थेट रामेश्वरापर्यंत बसवितील आणि आपला बेत जो दक्षिणेंतील दोन्ही मुसलमानी शाह्या बुडवून दक्षिण समुद्रापर्यंत एकछत्री सत्ता करण्याचा तो आतां निष्फळ होतो!' म्हणूनच त्यानें दिलेरखानाच्या सूचनेवरून शिवाजीमहाराज कर्नाटकांतून परत येण्यापूर्वी अदिलशाही बुडविण्याचा विचार मनांत आणिला होता परंतु त्यांत त्यास यश आलें नाहीं. मग त्यानें बहादूरखानास दक्षिणच्या सुभेदारीवरून दूर करून आपला पुत्र मोअझिम यास पुनः ह्या सुभ्यावर पाठविलें.

मागल्या भागांत सांगितल्याप्रमाणें मसाऊदखानाच्या हातीं विजापूरकरांचा कारभार देऊन त्याशीं दिलेरखानानें तह केल्यावर मोरोपंतानें आपल्या प्रत्येक ठाण्याची व्यवस्था स्वत: जातीनें जाऊन पाहून सर्व बंदोबस्त नीट ठेविला व जिकडेतिकडे आपल्या लोकांची जय्यत तयारी केली. मोगल व विजापूरकर एक होऊन आपल्या मुलखावर लवकरच स्वारी करतील अशी त्याला भीती होती. ह्या वेळीं कोंकणात शिद्दीनें गडबड आरंभिली होती. त्याच्याशीं मोरोपंतास कांही वेळ युद्ध करावे लागलें. त्याचा तपशील पुढील भागांत देऊं.

मसाऊदखानाशीं दिलेरखानानें केलेला तह औरंगजेबास पसंत वाटला नाहीं. त्यानें त्याबद्दल त्या सरदारास दोष दिला व त्यास असा हुकूम पाठविला कीं, विजापूर सरकाराच्या लष्कराचा थकलेला मुशाहिरा अद्यापि दिला नाहीं तो

देववावा; त्या दरबारचे जितके सरदार आपल्या तर्फेचे होतील तितके करून घ्यावे. सर्व राज्यकारभार आपल्या तंत्राने चालेल असें करावें किंबहुना सर्व राज्य आपल्या आश्रयानें चालेल असें करावें ह्या बादशाही हुकमाप्रमाणे दिलेरखानानें त्या दरबारच्या बहुतेक अफगाण सरदारांस आपल्या पक्षास सामील करून घेतलें. परंतु दुसरे काही सरदार होते त्यास मोगलांचा पुरा तिटकारा असे. ते कांही केल्या वश होईनात. बालराजाची बहीण पादशाबिबी औरंगजेबाच्या मुलास देण्याचे ठरविलें होतें. त्याप्रमाणें तिची मागणी करण्याकरितां बादशहाचे लोक आले तेव्हां ह्या सरदारांनी एकच कल्ला केला. त्यांच्या मनातून मोगलबादशहाशीं हा शरीरसंबंध करावयाचें नव्हतें. ते ह्या वेळा प्रतिपक्षाशीं युद्ध करण्यास सिद्ध झाले. दुसरा पक्षही पादशाबिबीस मोगलांकडे पाठविण्याचा हेका धरून बसला. हा असा गृहकलह माजून राहिला असतां तो विकोपास जाऊन आपल्या बंधूचें राज्य लयास जाऊ नये म्हणून बिबी स्वतः पडदपोशी सोडून बाहेर येऊन लोकांस म्हणाली कीं, 'मी मोगलांकडे जाण्यास तयार आहें!' ही अशी तिची स्वतःची इच्छा लोकांस कळली तेव्हां विरुद्ध पक्ष भांडण सोडून स्वस्थ बसला. बिबी दिलेरखानाच्या छावणींत जाऊन दाखल झाली व त्या खानाने तिला मोठ्या लवाजम्यानिशीं दिल्लीस पाठवून दिलें.

एवढ्याने दिलेरखानाचा संतोष झाला नाहीं. मसाऊदखानानें तहाप्रमाणें वर्तन केलें नाहीं म्हणून त्याचें पारिपत्य करण्यासाठीं त्या खानानें विजापुरावर चाल केली. तेव्हां हें अरिष्ट कसें टाळावें हा विचार मसाऊदखानाला पडला. ह्या आणीबाणीच्या प्रसंगी आपणांस शिवाजीमहाराजांकडून साहाय्य मिळतें तर पाहावें असा त्यानें विचार केला. त्यानें ह्या वेळीं असें मनांत आणिलें कीं, शिवाजीमहाराजांचे आपल्या सरकाराविषयीं अंतःकरण शुद्ध नाहीं. त्यांच्याकडे मदत मागितली असतां ती ते देतील न देतील. तथापि ते शहाजीराजांचे पुत्र आहेत. त्यांचे वडील ह्या राज्याच्या आश्रयानें वाढले होते हें ध्यानांत आणून ते ह्या प्रसंगी आपल्या पूर्वीच्या नात्यास जागतात कीं कसें तें पाहावे. ह्यांत त्यांचा कुलीनपणा दिसून येईल. पुनः मोगलांशी त्यांचा विरोध आहेच. तेव्हां कदाचित ते त्यांशीं लढण्याची ही संधी साधण्यास तत्पर होतील.' असा विचार करून त्यानें महाराजांस लिहिले कीं, 'आम्ही एकमेकांचे शेजारी आहों आम्ही एकच निमक खात आहों. ह्या शाहीसंबंधानें जशी मला चिंता आहे तशीच तुम्हांलाही आहे. शत्रु ह्या शाहीचा नाश करण्यास रात्रंदिवस टपले आहेत. तर तुम्ही आम्ही एक होऊन मोगलांना इकडून हाकून लावूंया! दिलेरखान पुष्कळ सैन्यानिशी विजापुरापाशीं येऊन थडकला आहे. ही पादशाहत तुमची आहे. तरी लवकर येऊन मदत केली पाहिजे'.

आता येथें एका प्रकरणाचा उल्लेख अवश्य केला पाहिजे. ह्या वेळीं कुतुबशहाच्या मनांत शिवाजीमहाराजांसंबंधानें वैमनस्य उत्पन्न झाले होते. त्याचा दिवाण मादण्णा याने महाराज कर्नाटकाच्या मोहिमेस जातांना त्यांच्याशी, स्नेहभाव दृढ करून आपल्या शहाकडून त्यांच्या मोहिमेस लागणारा खर्च व मदतीस फौज व तोफखाना देवविला होता; परंतु महाराजांनी तिकडील एवढे मुलूख व किल्ले काबीज केले असून व प्रचंड लूट स्वदेशी आणिली असून कुतुबशहाला त्यातला एकही मुलूख किंवा किल्ला दिला नाही आणि मोहिमेसाठी घेतलेल्या रक्कमेतून एक कपर्दिकाही परत केली नाही, हे पाहून कुतुबशहाला त्यांचा पराकाष्ठेचा क्रोध आला आणि ह्या ठकबाजीबद्दल त्यांचे पारिपत्य करावयाचा निर्धार करून त्याने विजापूरकरांशी संगनमत करण्याचे योजिले. त्याने मसाऊदखान व त्याचे प्रतिस्पर्धी जे सारजाखान वगैरे सरदार त्यांच्याशी ह्याबाबतीत बोलणे करून त्यांच्या लष्कराचा मुशाहिरा थकला होता तो देण्यासाठी त्यांस लागला तेवढा पैसा पुरविला आणि त्यांनी एक होऊन शिवाजीमहाराजांस कोंकणाबाहेर पडू द्यावयाचे नाही असा निश्चय करून त्यांच्याशी लढाई करण्यासाठी मोठी फौज एकवट केली परंतु; वर सांगितल्याप्रमाणे दिलेरखानाने विजापुरावर गर्दी केली तेव्हां ह्या दोन्ही शाहींचा बेत जागच्याजागी राहिला आणि मसाऊदखानाला उलट महाराजांपाशीच मदत मागणे प्राप्त झाले. त्यांची मदत मागितल्यामुळे तर दिलेरखानाला अधिकच त्वेष आला.

मसाऊदखानाच्या सदरील विनंतीस महाराजांनी मोठ्या आनंदाने मान देऊन पन्हाळ्यास आपलें घोडदळ जमा केलें व सात हजार स्वार विजापुराकडे पाठवून दिले. ह्या सैन्यास त्यांनी असा हुकूम केला कीं, 'तुम्ही विजापूरचा

किल्ला ताब्यांत घेऊन त्यांत मोठ्या हुशारी राहावें, व आम्ही बाकीच्या स्वारांनिशीं शत्रूच्या पिछाडीवर हल्ला करून त्याची रग जिरवितों.' ह्या हुकमाप्रमाणें महाराजांचे स्वार विजापुरापाशी गेले तेव्हां त्यास मसाऊदखानाने सांगितलें कीं, तुम्ही अटंग नदीच्या तीरी तळ देऊन शत्रूच्या मुकाबल्यास तयार रहा! महाराजांचे सरदार तें ऐकतना. ते शहरानजीक जाऊन खानापूर व खुसकपूर येथें डेरे देऊन राहिले व त्यानी खानास सांगून पाठविलें कीं, किल्ल्याचा एक दरवाजा व एक बुरूज आमच्या स्वाधीन करावा म्हणजे आम्ही किल्ल्याचे रक्षण करितों! परंतु मसाऊदखानास तें मान्य होईना व तो मराठ्याच्या ह्या सैन्यातील मोठमोठ्या सरदारांखेरीज कोणासही शहरांत येऊ देईना. मग हे मराठे जोहारपुरांत किल्ल्यानजीकच्या मैदानात जाऊन उतरले. येथें थोडे दिवस राहिल्यावर महाराजांचे कांहीं लोक व्यापाराच्या मिषानें शहरांत जाऊं लागले. बैलांवर गल्याच्या गोण्या घालून त्यांत तरवारी व हत्यारे लपवून प्रत्येक बैलामागे एकएक स्वार असे तें शहरात जाऊं लागले व निरनिराळ्या जागी टोळ्या करून राहूं लागले. हें त्यांचें ढोंग लवकरच उघडकीस आलें. तेव्हां अर्थात त्यांस लागलीच प्रतिबंध झाला. ह्यावरून महाराजांचे कांहीं सरदार मसाऊदखानाकडे जाऊन म्हणूं लागले कीं, 'आम्ही तुमच्या कुमकेस आलों असून आमच्या लोकांस तुम्ही आंत येऊं देत नाहीं. अशाने आम्ही शत्रूच्या तोंडी सांपडण्याचा संभव आहे. त्या वेळीं आमचे रक्षण होणें कठीण जाणार आहे. ऐन प्रसंगी तुम्ही आम्हांस किल्ल्यांत तर जागा देणार नाहीं.' मसाऊदखानानें त्यांच्या ह्या बोलण्याची परवा मुळींच केली नाहीं. कारण त्याला महाराजांचा भरवसा बिलकूल वाटत नव्हता. महाराजांच्या मनात ह्या वेळीं साधल्यास विजापूर शहर काबीज करावयाचें होतें असें दिसते मसाऊदखान मराठ्यांस सामोपचारानें शहरांत प्रवेश करूं देईना तेव्हां अर्थात उघड वैर करून त्यांनीं त्या शहरावर एकच गर्दी केली. दौलतपूर व खुसकपूर ही लुटून त्यांनी तेथील श्रीमान उदम्यांस पकडून कैद केलें. त्याप्रमाणेंच त्यांनी जोहारपुरावरही हल्ला केला. त्यांच्याशीं लढण्यास काही लोक आले त्यांस त्यांनी घायाळ करून पिटाळून लाविलें. ह्या चकमकींत कांहीं सरदार ठार झाले. इतक्यांत किल्ल्यावरून त्यांच्यावर तोफांचा सारखा भडिमार होऊं लागला. त्यामुळें ते अंमळ मागें हटले. मग किल्ला हस्तगत करण्याचा प्रयत्न मराठ्यांनीं कांही दिवस केला. परंतु तो असा हातीं येणें शक्य नव्हते. शिवाय दिलेरखान मोठ्या सैन्यानिशी विजापूराकडे येत होता, यास्तव ते तेथून माघारी गेले.[१]

इकडे दिलेरखान विजापुराजवळ येऊन थडकला. त्याच्या हालचालीवर महाराजांची नजर होतीच. तो विजापुराशीं तळ देऊन राहिला कीं, त्याच्यावर मागून हल्ला करण्याच्या तयारीनें ते त्याच्या छावणीपासून सात आठ कोसांवर येऊन ठेपले. तेथें आल्यावर त्यांना असें कळले कीं, दिलेरखानाच्या सैन्यांत पठाण लोकांचा भरणा पुष्कळ असून त्याचा जमाव फार मोठा आहे. त्यावरून त्यानी असा विचार केला कीं त्याच्याशीं ह्या समयी सामना करून आपले लोक विनाकारण नासावे त्यापेक्षा तो इकडें लढण्यांत गुंतला असतां आपण त्याच्या मुलखांत शिरून यथेच्छ लुटालूट करावी. असा बेत करून ते तेथून उलटले व मोठ्या वेगानें भीमानदीच्या अलीकडे येऊन मोगलांच्या प्रांतांत शिरले. तिकडे त्यांनी सारखा कहर उडवून दिला. तरी दिलेरखानानें विजापुरास वेढा घातला होता तो काहीं ढिला केला नाहीं, किंवा मराठ्यांच्या पारिपत्यास लोकही पाठविले नाहींत.[२] महाराजांनी भीमानदीपासून गोदावरीनदीपर्यंत मोगलांचा एकंदर मुलूख लुटला. धरमगाव, चोप्रा वगैरे मोठमोठी व्यापाराचीं शहरें त्यांनी लुटल्यावर ते गोदावरीच्या अलीकडे

---

१ कित्येक बखरींत असा उल्लेख आहे की, मराठ्यांनी विजापूरच्या किल्लेदारास पन्नास हजार होन लाच देऊन किल्ला स्वाधीन करून घेतला व हे पैसे मसाऊदखान त्या किल्लेदारापाशीं मागूं लागला. तेव्हां तो सरजाखानास दहा हजार होन देऊन त्याच्या पाठीशीं पडला.

२ प्रो. सरकार म्हणतात की, मसाऊदखानानें दिलेरखानाशी ह्या वेळीं समेट करून त्यास विजापूर शहरात बोलावून मोठ्या थाटाचा पाहुणचार केला व त्याच्या साहाय्याने महाराजांच्या लोकांवर तो चालून गेला. इतक्यांत त्यास असे वर्तमान लागले की, महाराज स्वतः सात-आठ हजार फौजेनिशी आपल्या लोकांच्या मदतीस येत असून मोगलांची किंवा विजापूरकरांची फौज पुढें आल्यास तीवर रात्रीचा छापा घालण्याच्या तयारीत ते आहेत. परंतु मसाऊदखान व सरजाखान यांच्यामध्ये बेबनाव होऊन मोगलांच्या साहाय्याने मराठ्यांवर स्वारी करण्याचा बेत रहित झाला.

येऊन ते जालना शहरात शिरले व तें शहर त्यांनी तीन दिवस सावकाश लुटले. जवळ औरंगाबादेस सुलतान मोअझिम होता. पण त्याची त्यांनी मुळींच भीती धरिली नाहीं. द्रव्य व जवाहीर लोकांनी कोठे लपवून ठेविले असे तें त्याना नक्की ठाऊक असेल तर तें ते आपल्या लोकांस बेचूक दाखवून देत. त्यांच्या लोकांनी ह्या प्रसंगी मुसलमान फकिरांचीही घरे लुटली असें म्हणतात. महाराजांच्या नेहमींच्या नियमांविरुद्ध ही गोष्ट घडली. कारण अशा धर्मपरायण लोकांस उपद्रव देऊं नये अशी त्यांची आपल्या लष्करास ताकीद असे. हा नियमभंग केल्याबद्दल त्यांनी गुन्हेगारांस शासन केल्याचें कोठेंही लिहिले नाहीं.[१]

ह्याप्रमाणें जमलेली गडगंज लूट रायगडावर सुरक्षितपणें पावती करण्यासाठीं महाराज जावयास निघाले असतां त्यांस वाटेंत गांठून सामना द्यावा ह्या इराद्यानें शहाजाद्यानें रणमस्तखानास दहा हजार स्वारांनिशीं पाठविलें. त्यानें त्यांचा पाठलाग करून त्यांस संगमनेराजवळ गाठले.

उभय पक्षांची मोठ्या निकराची लढाई झाली. ह्या वेळीं संताजी घोरपड्यास मोठा आवेश चढून तो अंमळ अविचाराने रणकंदनात घुसला. त्यामुळें त्याच्या हाताखालील सैन्यभागांत थोडासा घोटाळा झाला व ह्या हातघाईत सिधोजी निंबाळकर पडला. तथापि महाराज मुळींच डगमगले नाहींत. जिवाची परवा न करितां पुढें सरसावून ते आपल्या लोकांस उत्तेजन देऊं लागले. आपला धनी स्वत: हातांत शस्त्र घेऊन सगळ्यांच्या पुढें आहे असें पाहून त्यास पराकाष्ठेचा हुरूप येऊन ते शत्रूवर एकदम तुटून पडले. त्यामुळें मोगलांचा धीर निघेनासें होऊन ते रानोमाळ पळत सुटले.[२] ह्याप्रमाणें मोगलांचा पुरा मोड होऊन महाराज विजयी झाले व सगळी लूट घेऊन पुढें कूच करूं लागले.

वर सांगितल्याप्रमाणें रणमस्तखानाच्या फौजेची दाणादाण झाली असतां त्यास कुमक करण्याकरितां शहाजाद्यानें केशनसिंगास[३] फौज देऊन पाठविलें. ही अशी मदत पोचल्यावर जिकडेतिकडे पांगलेल्या मोगलांस पुनः दम येऊन ते एकवट झाले व त्यांनी महाराजांस एका खिंडीपाशीं गांठलें. ह्या खिंडींतून पार निघून जाण्याचा त्यांचा इरादा होता. आता ह्या नव्या दमाच्या मोगलसैन्याबरोबर झगडण्याचें त्राण ह्या वेळीं आपल्या लोकांत मुळींच उरले नाहीं हें त्यांस समजून चुकले होतें. तेव्हां आतां काय करावे ह्या फिकिरींत ते पडले. त्यांच्याजवळ बहिरजी नाईक म्हणून एक हेर होता, त्यानें हें आपल्या धन्याचे संकट पाहून अशी हमी घेतली कीं, महाराजांची सगळी लूट व सैन्य मोगलांची गांठ पडूं न देता घाट उतरून घेऊन जातों असें म्हणून त्यानें अहोरात्र सारखे कूच करून दुसऱ्याच एका खिंडींतून महाराजांचे सगळे लष्कर खाली नेले त्याचा सुगावा मोगलांस कांहींएक लागला नाहीं. मराठे आपल्या तळावर नाहींत हें पाहून मोगलांचे लोक ते कोठून कोणीकडे गेले तें पाहूं लागले; परंतु त्यांस मुळींच पत्ता लागला नाहीं. कारण त्यांना ती खिंडच उमगली नाहीं. मग ते ज्या खिंडीपाशीं महाराजांची वाट पाहत बसले होते तींतून खालीं उतरले. तो इकडे महाराजांचे सैन्य मोठ्या वेगाने कूच करून पट्टा येथे[४] सुरक्षित जाऊन पोंचलें. ह्याप्रमाणें शत्रूच्या तावडीतून आपण बरेपणीं निभावून आपणांस ह्या गडावर विश्रांती मिळाली म्हणून त्यांनी त्याचें नाव विश्रामगड असें ठेविले. मराठे पट्टा

---

१ मुसलमान बखरकार असे म्हणतात की, महाराजांनी ह्या समयी मुसलमान साधूला त्रास दिला म्हणून त्यांस लवकर मरण आले. प्रो. सरकार म्हणतात की, ह्या शहरात सय्यद जानमहंमद नावाचा एक साधु होता, त्याच्या मठात श्रीमंत लोक आपले जडजवाहीर घेऊन जाऊन लपून बसले. याचा सुगावा महाराजांच्या लोकांस लागून ते त्या मठात शिरले; आणि त्या साधूच्या विनवणीस न जुमानता त्यांनी तेथे लपलेल्या सगळ्या सावकारांस मारहाण करून त्यांचे सगळे जवाहीर लुटले. असें सांगतात की, ह्या साधूने शिवाजीमहाराजांस शाप दिला. ह्या लुटीनंतर पाच महिन्यांनी महाराज मरण पावले ह्या साधूच्या शापामुळे त्याचा असा अकाली अंत झाला असे मुसलमान लोक म्हणूं लागलें!

२ काही बखरकार म्हणतात की, हंबीरराव ह्या लढाईत जखमी झाला.

३ हा जयसिंगराजाचा नातू ह्याचे नाव सभासद केशरसिंग असें देतो. चित्रगुप्त म्हणतो कीं, ह्या केशरसिंगानें तीन कोसावर मुक्काम करून महाराजांस असा गुप्त निरोप पाठविला की, तुमचे आमचे बंधुत्वाचें नातें आहे. आमची गाठ पडली नाहीं तो तुम्ही कूच करून वेगाने निघून जावे.

४ सभासद म्हणतो की, तें पावनगडास आलें.

येथें जाऊन बंदोबस्तानें राहिलें असें पाहून मोगल सैन्य निराश होऊन माघारी औरंगाबादेस गेलें. ह्या कठीण प्रसंगी बहिरजी नाइकाने मोठेच साहाय्य केलें, म्हणून त्यास महाराजांनी पुष्कळ इनाम दिलें. पट्टा येथें विश्रांती घ्यावयासाठीं महाराज काहीं दिवस राहिले असता त्यांनी असा निश्चय केला कीं, ह्या गडाच्या आसपास असलेले एकंदर किल्ले काबीज करण्यास ही संधी चागली आहे, तरी दिलेरखान विजापुराकडे गुंतला आहे इतक्यात हा बेत सिद्धीस न्यावा. मग त्यांनी मोरोपंतास ही कामगिरी सांगून त्याच्या साहाय्यास कोंकणांतून पायदळ मागविलें व त्याशिवाय त्याच्या हाताखाली पुष्कळ घोडेस्वारही दिले. ह्या हुकमाप्रमाणें किल्ले सर करण्याचें काम मोरोपंतानें मोठ्या सपाट्याने चालविलें. ह्या वेळीं त्याने मुंगीपट्टण शहर काबीज करून शिवनेरी किल्ला मोगलांकडून परत घेण्यासाठी लोक पाठविलें. मराठ्यांनी जुन्नर शहरात प्रवेश करून रात्रीच्यासमयी तीनशें आसामी किल्ल्यास दोऱ्यांच्या शिड्या लावून वर गेले. त्यांस तेथल्या किल्लेदाराने कापून काढले आणि सकाळच्यावेळी त्याने किल्ल्याच्या आसपास कपारीतून व गुहांतून लपून राहिलेल्या मराठ्यांस हुडकून काढले व त्यास इनामें देऊन परत पाठविले आणि महाराजांस निरोप दिला कीं, 'मी येथला किल्लेदार आहे, तोपर्यंत हा किल्ला तुमच्या हाती लागण्याची आशा धरू नका!'

महाराज पट्टा येथें असतां मसाऊदखानाकडून एक जासूद पत्र घेऊन मोठ्या तातडीने आला. त्या पत्रातील आशय येणेंप्रमाणें होता 'तुम्ही ह्या प्रसंगीं ह्या दरबाराशी साधेल तेवढे नेकीने वागून शहाजीराजाचे योग्य पुत्र आहा असें दर्शविले! शहाजीराजांनी खाल्लेल्या निमकाचे तुम्ही चीज केले. तुमच्याशी ह्या दरबाराचे वैमनस्य असतां, तुम्ही ऐन प्रसंगी येऊन साहाय्य केलें. तुम्ही आपल्याकडून अगदीं शर्थ केली. तुम्ही जी मसलत केली कीं, गलिमाच्याच मुलखांत धामधूम करून त्याला इकडून उखळून काढावें व मग त्यास चोहोंकडून घेरून मारावें, तीही उत्तम होती. ह्या मसलतीप्रमाणें त्याच्या सगळ्या मुलखाची तुम्ही खराबी केली व त्याचा एकदोन ठिकाणी चांगलाच पराजय केला. त्याप्रमाणेंच आमच्या राजधानीच्या किल्ल्यातही तुमच्या लोकानी आम्हांस चांगली मदत केली; परंतु दिलेरखान केवळ हट्टास पेटला आहे. मोगलांची सगळी दौलत खराब झाली तरी चिंता नाहीं, परंतु विजापूर घेतल्यावांचून येथून जावयाचें नाहीं असा त्याचा निर्धार झालेला दिसतो. तो इकडचा वेढा कांहीं केल्या उठवीत नाहीं. तो राजधानीच्या कोटानजीक येऊन भिडला आहे. तरी ह्या समयी तुमच्याकडून मदत मिळाल्यावांचून आमचा निभाव लागेलसें दिसत नाहीं. अशा संकटात मागचापुढचा कांहीएक विचार मनात न आणितां मोठ्या त्वरेनें येऊन अदिलशाहीचें रक्षण केलें पाहिजे!' हा निरोप पोचताच महाराज पुन: विजापुराकडे जावयास निघाले. इतक्यात त्यांस अशी बातमी आली कीं, संभाजी पळून जाऊन दिलेरखानास मिळाला. तेव्हां हंबीररावास फौजेसह विजापूरकरांच्या मदतीस पाठवून आपण स्वत: पन्हाळ्यास गेले व संभाजीला शत्रूच्या गोटातून परत कसें आणावें ह्या विचारास लागले.

आता संभाजी ह्याप्रमाणें आपल्या तीर्थरूपांवर रुसून शत्रूस जाऊन मिळण्याचे कारण येथें सांगणे इष्ट होय. संभाजीस सुशिक्षण प्राप्त व्हावें म्हणून महाराजांनी चांगली व्यवस्था केली होती. त्याच्याकडून विद्याभ्यास करविण्यासाठीं व त्यास सदाचाराचे वळण लावण्यासाठी मोठमोठे पंडित ठेवून दिले होते; परंतु त्याचा काहीएक उपयोग झाला नाहीं; त्याचें वर्तन नेहमी उच्छृंखल असे. राज्याधिकार योग्य रीतीनें चालविता येण्यास आवश्यक अशा गुणांचा विकास त्याच्या ठायीं व्हावा एतदर्थ महाराजांचा सदोदित प्रयत्न असतां त्यापासून इष्ट परिणाम कांहींएक झाला नाहीं. त्याला योग्य वेळीं युवराज्याभिषेक करितां यावा म्हणून त्याचा व्रतबंधही केला होता; परंतु तो सर्वदा उन्मत्तपणे व अनर्गलपणें वागत असल्यामुळें महाराजांस परम खेद वाटे. एके दिवशीं शितळगौरीप्रीत्यर्थ राजवाड्यांत हळदकुंकवाचा समारंभ झाला. किल्ल्यावरील एकंदर सुवासिनी स्त्रिया वाड्यांत आल्या, त्यांत एक ब्राह्मण स्त्री अत्यंत लावण्यसंपन्न होती. तिला पाहून संभाजी अगदीं मोहित झाला. हें वर्तमान महाराजांस कळले तेव्हां त्यांस पराकाष्ठेचा संताप आला, आणि ते म्हणाले : 'हे राज्याचे अधिकारी असतां श्रेष्ठ वर्णाचा असा उपमर्द करितात. सर्व प्रजा म्हटली म्हणजे तिला राजाने आपल्या कुटुंबाप्रमाणें लेखलें पाहिजे. असे अनन्वित कर्म केल्याबद्दल यांस शिक्षा अवश्य केली पाहिजे! पुत्र झाले

म्हणून काय झालें? त्यांच्या हातून असें दुष्कर्म होऊं लागलें तर त्याचा आम्ही त्याग करूं!'[१] असे म्हणून त्यांनी त्याला कैद करून पन्हाळ्यावर नेऊन ठेविले. पुढें कांहीं दिवसांनी त्यांस सक्त कैदेतून काढून त्याच किल्ल्यावर नजरकैदेत ठेविले. ही कैद अर्थात संभाजीला अगदी असह्य झाली होती. तीर्थरूप दूर मोगलांशी लढण्यांत गुंतले आहेत असें पाहून त्यानें पन्हाळ्यावरून पळून जाण्याचा बेत केला व दिलेरखानास त्यासंबंधानें आगाऊ सूचनापत्र पाठविलें. त्या खानास ही घरफूट पाहून अर्थात मोठा आनंद झाला. संभाजीस सामोरे जाऊन आणण्यासाठी एकलासखान व वैरातखान यास तीनचार हजार स्वार देऊन पाठविलें.

ह्याप्रमाणें संभाजी पळून गेला असें कळताच महाराजांनीं त्याच्या पाठलागास लोक पाठविले. इतक्यांत सुप्याच्या पलीकडे चार कोसांवर संभाजीची व एकलासखानाची गांठ पडून त्यास मोगलांचा आश्रय मिळाला. त्याच्या पाठलागास गेलेल्या लोकांनी पाहिले कीं, शत्रूच्या लोकांचा जमाव मोठा आहे, त्यावर हल्ला करण्यांत कांहींएक अर्थ नाही. म्हणून ते निराश होऊन परत स्वस्थानीं आले. इकडे दिलेरखान संभाजीस भेटण्यास एवढा उत्कंठित झाला होता कीं, तो स्वतः कांही लोकांनिशी संभाजीस सामोरा गेला. शिवाजीमहाराजांच्या गादीचा वारस आपल्या स्वाधीन झाल्यामुळे त्यांस परम हर्ष वाटला. त्याला सगळी दक्षिण जिंकिल्यासारखे वाटून मोठें समाधान वाटले. संभाजी त्याच्या गोटात येऊन पोचल्यावर त्याने नौबती वगैरे रणवाद्यांचा गजर करविला. त्याला त्याने सात हजारी सरदार करून राजा हा किताब दिला व एक हत्ती नजर केला.

दिलेरखानानें संभाजीचा मोठा आदरमान केला, हें वर्तमान औरंगजेबास कळविलें व त्यास असें सुचविले कीं, संभाजी आपल्या पक्षास येऊन मिळाला हें फार चांगले झालें आहे. शिवाजीमहाराजांच्या पदरचे कांही सरदार संभाजीच्या पक्षास येऊन मिळण्याचा संभव आहे. अशी घरफूट झाल्याने ते लवकरच दुर्बळ होतील व आपला डाव अनायासें साधेल. संभाजीला आपल्या एका सैन्यभागावर प्रमुख नेमून त्याच्या बापाविरुद्ध लढण्यास पाठविलें असतां त्याच्या ताब्यांतले प्रांत व किल्ले काबीज व्हावयास विलंब लागणार नाही!' परंतु बादशहास ही सूचना पसंत वाटली नाही. कारण त्याला असा वहीम येणें साहजिक होतें कीं, शिवाजीमहाराजांचेच हें कारस्थान असावें. संभाजीला त्यांनी आपल्या लष्करांतील भेद काढावयास किंवा विश्वास दाखवून दगा करावयास पाठविलें असावें. औरंगजेबाकडून ह्या संबंधाचे निषेधपत्र येऊन पोंचण्यापूर्वी दिलेरखानानें संभाजीबरोबर आपले कांहीं लोक देऊन त्यास भूपाळगडावर हल्ला करावयास पाठविलें. हें महाराजांचे अगदी पूर्वेकडील ठाणे असून चांगले मजबूत बांधून त्यात धान्याचा वगैरे मुबलक पुरवठा केला होता व मोगलांशी युद्ध करताना आपल्या प्रजेस त्याच्या आश्रयाने राहता यावें अशी तजवीज केली होती. त्या किल्ल्यातील लोक मोठ्या निकराने लढण्यास सिद्ध झाले. त्यांनी मोगलांच्या ह्या वेढ्यास मुळींच दाद दिली नसती; परंतु महाराजांचा पुत्र संभाजी प्रत्यक्ष किल्ल्याच्या दरवाजापाशी उभा आहे असें पाहून त्याच्यावर गोळागोळी कशी करावी, अशी त्यांस पंचाईत पडली. संभाजीने त्या किल्ल्याच्या हवालदारास असा दम भरला कीं, दरवाजा उघडला नाहींस तर शिरच्छेद करीन! तेव्हां अर्थात किल्ल्यावरील लोकांस मोठी दहशत पडली. ते वाट फुटेल तिकडे पळत सुटले. ह्या किल्ल्याचा हवाला फिरंगोजी नरसाळा याजकडे होता. शास्ताखानानें चाकणच्या किल्ल्यास वेढा घातला असतां ज्याने तो किल्ला मोठ्या शौर्याने लढविला तोच हा वीर होय परंतु ह्या प्रसंगी त्याच्या लोकांचा धीर न निघून ते त्याला भराभर सोडून गेले तेव्हां त्याचा निरुपाय झाला. त्याचें अवसान अगदीं खचले. बरें, शत्रूवर तोफाचा भडिमार करावा तर संभाजी पुढें उभा. आपल्या धन्याच्या पुत्रावर गोळा सोडतां तर येत नाहीं, अशा पेंचांत तो सापडला. म्हणून तो रात्रीच्या वेळीं किल्ला सोडून पळून गेला. त्यामुळें तो किल्ला मोगलांच्या हातीं सहज लागला. किल्ल्यावर जे कांहीं लोक राहिले होते ते सगळे मोगलांनी पकडले. दिलेरखानाने येथे येऊन सातशे योद्ध्यांचे डावे

---

१ हे आपल्या तीर्थरूपांचे क्रोधोद्गार ऐकून संभाजी घाबरून जाऊन रातोरात आपल्या पत्नीस घेऊन पळून गेला, असे कित्येक ठिकाणी म्हटलें आहे.

हात तोडविले व इतर लोकांना पकडून गुलाम केले. त्या निरापराध लोकांना असे छिन्नभिन्न केले, हें क्रूरकर्म संभाजीस योग्य वाटलें नाहीं. ही उग्र शिक्षा करण्याचें कारण अर्थात् असें असावें की, इतर किल्ल्यांवरच्या लोकांस तेणेंकरून दहशत बसावी. त्याला तेथे पुष्कळ लूट सांपडली. जी चीजवस्तू त्याला नेता आली नाही ती त्याने जाळून टाकली व किल्ल्याची तटबंदी वगैरे पाडून टाकून तो अगदी उजाड केला. ह्या किल्ल्यावर मोगलांनी चढाई केल्याचे वर्तमान ऐकून महाराजांनी त्याच्या रक्षणासाठी सोळा हजार घोडदळ पाठविलें. परंतु ते तिकडे जाऊन पोहोचण्यापूर्वीच किल्ला वर सांगितल्याप्रमाणें मोगलांच्या हाती जाऊन त्याची दुर्दशा झाली. महाराजांच्या लोकांनी मोगलांच्या सैन्यावर दुरून दुरून छापे घालून तीस हैराण केले. त्यांचा सरदार इराजखान व बजाजी निंबाळकर हे दिलेरखानाच्या सैन्यासाठी अन्नसामुग्री घेऊन जात होते, त्यांस गाडून त्यांनी त्यांचा पुरा मोड केला व त्यांच्या ताब्यातले सगळे धान्य वगैरे लुटले. संभाजीमुळे भूपाळगड आपल्या हातचा जाऊन आपल्या लोकांची अशी दुर्दशा झाली, तरी पुढे आणखी असा प्रकार होऊ नये म्हणून त्यांनी इतर किल्लेदारांस अशी ताकीद दिली की, संभाजी बेदिल होऊन मोगलांकडे पळून गेला आहे. तो त्यांचे लोक घेऊन कोणत्याही किल्ल्यापुढें आला असतां त्यास यत्किंचित्ही जुमानूं नये. त्याच्याशी बेलाशक लढावे. किल्ला सोडून देऊं नये!'

मग महाराजांनी संभाजीकडे कारकून पाठवून त्यास येणेंप्रमाणे बोध करविला : 'हे असें वर्तन तुम्ही करीत आहां हें काय? आम्ही श्रम करून स्वराज्य स्थापिलें, तें तुम्हांसाठी कीं दुसऱ्या कोणासाठी? यवनास सामील होऊन पुनः हें राज्य त्यांच्या घरांत घालण्याची ही बुद्धी तुम्हांस कोठून सुचली? ह्यापासून अपाय कोणास होणार? तुम्हांस कीं आम्हांस? आम्हांविषयी म्हणाल तर आम्हांला ह्यापुढे कांहींएक कर्तव्य उरले नाहीं. एखाद्या क्षेत्रांत जाऊन राहावें किंवा रामदासगुरूपाशीं जाऊन बसावे, असें आमच्या मनात अलीकडे आलें आहे. तेव्हां हें राज्य नष्ट झालें तर त्यांत हानी तुमचीच आहे. मागें झाल्या गोष्टी त्या झाल्या. त्या मनात न ठेवितां निघून यावें. याउपर शत्रूकडे राहू नये. खासगी खर्चास तालुका लावून घेऊन पाहिजे तेथें राहावें. कारभार आटपवेल तितका करावा!' हा व अशाच आशयाचा पुष्कळ बोध त्या कारकुनाने केला. पण त्यामुळें संभाजीचे डोळे कांहीं उघडले नाहींत.

तिकडे हंबीरराव मोहिते सरनोबत महाराजांच्या हुकमाप्रमाणे सैन्य घेऊन विजापूरकरांच्या मदतीस चालला असतां त्याला रणमस्तखानानें आठनऊ हजार स्वारांनिशीं वाटेंत गांठले. उभय पक्षांची लढाई झाली. तींत तो मोगल सरदार पराभव पावून पळून गेला. मग हंबीरराव दिलेरखानाच्या छावणीजवळ जाऊन तिजवर वेळोवेळा छापें घालूं लागला. त्याच्या लष्करास दाणावैरण कोठूनही मिळूं नये असें त्यानें केलें. त्यामुळें मोगलांची उपासमार होऊ लागली. हत्ती, घोडे व माणसे अन्नावांचून पटापट मरू लागली. तेव्हां अर्थात खानाचा उपाय खुंटून त्यास आपला तळ हलवावा लागला व मराठ्यांच्या तावडीतून जेमतेम सुटून कसाबसा एकदाचा तो औरंगाबादेस येऊन पडला. हंबीररावापाशीं सैन्याचा जमाव मोठा नसल्यामुळे खानाशीं त्याला सामना करिता आला नाहीं. तरी त्याचें सैन्य औरंगाबादेस जाऊन पोहोचेपर्यंत सेनापतीनं त्याचा चांगलाच पाठपुरावा केला.

इतक्याने दिलेरखानाची रग कांहीं जिरली नाहीं. पावसाळा संपताच त्यानें पुन: आपल्या फौजेची तयारी केली आणि विजापूर सरकाराच्या मुलखांत शिरून तो लुटालूट करूं लागला. त्याचा वर सांगितल्याप्रमाणे पराभव झाला असल्यामुळें त्याला पराकाष्ठेचा चेव येऊन त्याचा सूड विजापूर सरकारच्या गरीब रयतेवर उगविण्याचा क्रम त्याने मोठ्या निर्दयपणाने चालविला. पुरुष, बायका व मुले यांस पकडून त्यांस गुलाम करण्याचा सपाटा त्याने सुरू केला. हिंदू-मुसलमानांच्या बायकांनी त्याच्या हाती लागून विटंबना व्हावयाची ती टाळण्यासाठी विहिरींत व तलावात उड्या टाकून प्राणत्याग केला! त्याने गावेच्यागावे लुटून जाळून बेचिराख केली. एका मोठ्या गावातले तीन हजार हिंदू रहिवाशी पकडून त्यांस त्याने गुलाम म्हणून विकून टाकले. अथणी नावाचे एक मोठे व्यापाराचें शहर होतें तें लुटून त्याने साफ जाळून टाकले व त्यांत सापडलेल्या सगळ्या हिंदू लोकांस गुलाम करून नेलें. ह्या वेळीं संभाजी

त्याच्याबरोबर होता त्याला खानाचें हें अत्यंत भयंकर क्रूरकर्म पाहून पराकाष्ठेचें वाईट वाटले आणि त्याबद्दल त्यानें त्याचा निषेध केला; पण खानाने काही आपला घोर क्रम सोडला नाही. हे त्याचे घोर कर्म पाहून संभाजीचे डोळे उघडले आणि त्याने स्वीकारलेल्या मार्गाचा त्यास पश्चाताप झाला. हंटी म्हणून एक मोठे शहर होतें तें त्यानें लुटून कृष्णानदीस उतार मिळताच तिच्या पलीकडे जाऊन त्यानें कर्नाटकांत लुटालूट चालविली. ह्या वेळीं त्यानें आपल्या सैन्याच्या दोन टोळ्या करून दोन बाजूंस रवाना केल्या. एका टोळीवर अर्थात आपण स्वत: प्रमुख झाला. जनार्दनपंतास ही त्याची धामधूम कळताच त्यानें सहा हजार लोकांनिशीं त्याच्यावर हल्ला केला व त्याच्याशीं लढून त्याचा अगदीं मोड करून टाकला. तो व त्याचे लोक मराठ्यांच्या मारापुढें हतवीर्य होऊन पळत सुटले. ह्याप्रमाणें मोगलांची एक टोळी उधळून लाविल्यावर जनार्दनपंतानें त्यांच्या दुसऱ्या टोळीस गाडून तीही कापून काढली. हा असा पुरा पराभव झाल्यामुळें खान अगदीं सर्द होऊन मागें पळत सुटला. ह्या वेळीं महाराजांनी भूपाळगड पुनरपि काबीज करून त्याची दुरुस्ती केली व त्यावर पुनः आपले ठाणे बसविले, असे म्हणतात.

दिलेरखानाची अशी दुर्दशा उडाल्याचे वर्तमान औरंगजेबास कळले तेव्हां त्याचा त्याला फारच राग आला. त्याचें हें करणें त्याला मुळींच आवडले नाहीं. आपल्या सुभ्याचा बंदोबस्त राखण्याचें सोडून तो विजापूरकरांशीं लढाई करावयास गेला म्हणून त्यास त्यानें ठपका दिला व त्यास असा हुकूम पाठविला कीं, 'शिवाजीमहाराजांचा पुत्र संभाजी हा तुमच्याकडे आला आहे, त्यास सरदारी देऊन आपल्या लष्करांत ठेवणे धोक्याचे आहे. कारण तो कांहींतरी फितवाफितवी करून आपला पुरा नाश करण्यास चुकणार नाही. यास्तव त्यास कैद करून दिल्लीस पाठवावें!' हा बादशहाचा हुकूम दिलेरखानास मुळींच आवडला नाहीं. त्यानें संभाजीस आपल्या गोटांतून पळून जावयास सांगितलें. त्यावरून संभाजी तेथून लगबगीने निघून महाराज पन्हाळ्याजवळ होते तेथें येऊन त्यांस भेटला.[१] ह्या वेळी पन्हाळा किल्ल्यावर दिलेरखान संभाजीसह वर्तमान हल्ला करण्याच्या बेतात आहे असे कळल्यावरून महाराजांनी ह्या किल्ल्याची मजबुती केली होती. फ्रेंचांकडून घेतलेल्या पन्नास तोफा ह्या किल्ल्यावर त्यांनी लावून ठेविल्या होत्या.

ह्याप्रमाणें संभाजी परत आला त्यास भेटून महाराजांनी त्याच्याशी येणेंप्रमाणें बुद्धिवाद केला : 'तुम्ही आम्हांस सोडून मोगलांस जाऊन मिळाला ही फार वाईट गोष्ट केली. औरंगजेबाशीं आपला दावा असून दिलेरखानाचें आणि आपले हाडवैर आहे. असें असतां त्यांच्या तावडींत तुम्हीं आयतेच जाऊन पडला हें मोठेंच धाडस केलें. त्यांनीं तुम्हांला दगाच करावा, परंतु जगदंबेची कृपा होती म्हणून तुम्हीं त्यांच्या हातून जिवानिशी सुटून आला हा एक दिलेरखानाचा आमच्यावर उपकारच झाला. तुम्ही हिंदुपदपातशाहीचे अधिकारी असून थोर कुळांत उत्पन्न झाला आहां. तुम्ही कांही सामान्य नाहीं. ही आमची सगळी कमाई तुमच्यासाठी आहे. असें असतां यःकश्चित सरदार जो दिलेरखान त्याच्या आश्रयास तुम्ही जावे आणि आपला अपमान व घात करून घ्यावा हें तुम्हांसारख्या बुद्धिमान, हुशार व अभिमानी पुरुषास शोभलें तरी कसें? तुम्ही पुढें आमच्या गादीचे मालक होणार. तेव्हां ही सर्व प्रजा तुम्हांस लेंकरांसमान वाटली पाहिजे. तिच्या वित्ताचे, जीविताचे व अब्रूचे रक्षण करणें हें तुमचे परम पवित्र कर्तव्य आहे. असें असतां तुम्हींच जर अनन्वित कर्म करून आपल्या प्रजेस दुःख देऊं लागला तर तिचे पालन व्हावें कसें? अगम्यागमन किंवा परस्त्रीगमन हें यशःक्षय करून पुरा नाश करणारे आहे. रावणादी राज्यकर्त्यांची ह्या पातकामुळे कशी दुर्दशा झाली व तेणेंकरून राज्यभ्रंश व कुलक्षय कसा झाला, याचा विचार मनांत आणा. तुमच्या अंगचा हा महादोष निघावा म्हणून मी केवळ पुत्रवात्सल्यास्तव तुम्हांस थोडीशी शिक्षा केली. तीबद्दल तुम्हांस विषाद वाटून तुम्ही हा अविचार केला. पण

---

१ प्रो. सरकार म्हणतात की, दिलेरखानाचा पूर्वोक्त प्रकारचा क्रूरपणा पाहून संभाजीस त्याचा वीट येऊन तो त्याच्या छावणीतून विजापूराकडे पळाला. त्याच्याबरोबर त्याची स्त्री येसूबाई ही होती. तिला त्याने पुरुषवेष दिला होता. विजापूरास मसाऊदखानाने त्याचा आदरमान करून त्यास आश्रय दिला. दिलेरखानास हे कळताच मसाऊदखानास लाच देऊन संभाजीस परत पकडून आणण्यासाठी त्याने आपला एक सरदार पाठविला. ह्या गोष्टीचा सुगावा लागताच संभाजी विजापुराहून रातोरात पळाला आणि महाराजांनी त्याला घेऊन यावयास पाठविलेल्या लोकांस भेटून तो पन्हाळ्यास येऊन पोहोचला.

त्यामुळें कांहीं अनिष्ट प्रकार घडला नाही, हा जगदंबेचा आम्हावर मोठाच प्रसाद झाला. आतां हे ढंग तुम्ही पुनरपि करूं नका. अशी घरफूट झाल्याने शत्रूंस आनंद वाटून आमचा नाश करण्याच्या कामी त्यांस मोठा हुरूप येईल. यवनांच्या ताबेदारीतून सुटण्याचे दीर्घ परिश्रम आम्हीं इतकीं वर्षे अव्याहतपणें करून स्वातंत्र्य व स्वराज्य ही संपादिलीं असतां, ह्या गोष्टीची कांही दरकार न धरितां पुनः यवनाच्या आश्रयास जाण्याची तुम्हांस दुर्बुद्धी सुचावी हें मोठेच दुर्भाग्य होय. तुम्हांस राजपद भोगावयाची इच्छा झाली असल्यास ह्या राज्याचे दोन विभाग करून तुंगभद्रेपासून कावेरीपर्यंतचा सगळा मुलूख तुम्हांस देतो व नर्मदानदीपासून तुंगभद्रानदीपर्यंतचा मुलूख राजारामास देतो आणि मी स्वत: एखाद्या पुण्यक्षेत्रांत जाऊन बसतो, किंवा रामदासस्वामींच्या चरणांपाशीं राहून उरले आयुष्य परमेश्वराच्या भक्तींत घालवितो परंतु ही व्यवस्था लावीतोंपर्यंत तुम्हांस पन्हाळ्यावर अटकेंत ठेवणे प्राप्त आहे. कारण तुमचा मला आतां भरंवसा वाटत नाहीं. रायगडावर जाऊन राजारामाचें लग्न करून येतो आणि मग पुढें काय करावयाचें ते पाहतों!' असें बोलून त्यांनीं संभाजीस पन्हाळ्यावर पुनः नजरकैदेत ठेवलें, त्याच्या खर्चासाठी त्या प्रांतांतील तीन लक्ष उत्पन्नाचा तालुका लावून दिला, त्याचा कारभार पाहावयास विठ्ठल त्रिंबक देशपांडे यास खासनीस हा हुद्दा देऊन ठेविले,[१] त्याच्या बंदोबस्ताकडे सोमाजी नाईक बंकी, बाबाजी नाईक समशेरबहादर व बाबाजी ढमढेरे ह्या परमविश्वासू सरदारांस ठेविले व त्यांस असा हुकूम देऊन ठेविला कीं, संभाजीशी नित्य बुद्धिवाद करून त्यास वाटेवर आणण्याचा उपाय करीत राहावें, त्याच्याशी मोठ्या युक्तीनें वागावे, त्यास आमच्या आलेंवांचून गडाखालीं कदापि उतरू देऊं नये आणि किल्ल्याचा एकंदर बंदोबस्त तेथील हवालदाराच्या हातीं असावा, त्यात संभाजीस सहसा हात घालू देऊं नये. संभाजीच्या खर्चास लावून दिलेल्या प्रांताची व्यवस्था जनार्दन नारायण सुमंत याजकडे सोपवून त्यालाही त्याच्यावर नजर ठेवावयास सांगितलें.

वर सांगितल्याप्रमाणें मोगलसैन्याची खराबी होऊन त्यास परत जावें लागून विजापूर सरकार त्याच्या कचाट्यातून सुटले हें संकटनिवारण शिवाजीमहाराजांच्या साहाय्यानें झाल्यामुळें त्यांस त्या सरकारांतून एक पत्र आलें. त्यांतील आशय असा होता कीं, 'तुम्ही आम्हांस ह्या प्रसंगी चांगली मदत करून शत्रूच्या तावडींतून सोडविलें हा तुमचा मोठाच थोरपणा व कुलीनपणा होय. तुम्ही शहाजीराजांचे पुत्र त्यांच्या ऋणांतून आज उतराई झाला. आमच्या सरकाराशीं तुम्ही विरोध केल्यामुळें तुमचें व ह्या सरकाराचे वैर इतके दिवस चालले असून व तुमच्या वर्तनास्तव शहाजीराजास आमच्या सरकाराने फारच त्रास दिला, असें असून तुम्ही हा सगळा अपकार मनास न आणतां आमच्या विनंतीस मान देऊन आम्हांस योग्य प्रसंगीं मदत केली, यामुळे तुमची दिगंत कीर्ती झाली आहे. हें पत्र वकिलाबरोबर पाठवून महाराजांस वस्त्रे जवाहीर, हत्ती, घोडे वगैरे नजर पाठविले व ह्या पत्रास महाराजांकडून असा जबाब गेला कीं, 'आम्ही तुमच्या पादशाहीतींल इतका मुलूख काबीज केला असूनही आमचे तीर्थरूप आम्हांस बिलकूल सामील नाहींत अशी आपली खात्री झाली. तेव्हां त्यांच्याकडे असलेली जाहगीर अद्यापपावेतो कायम राखून त्यांचें व त्यांच्या मागें त्यांच्या दुसऱ्या पुत्रांचे थोर मनाने चालविलें हा आमच्या घराण्यावर आपला मोठाच उपकार झाला आहे. आम्ही तुमच्याच आश्रयानें आजपर्यंत वाढलो आहों. आम्हीं जी कांहीं दौलत मिळविली आहे व जी फौज जमविली आहे ती निदानीं तुमच्या उपयोगी पडावी यांतच आम्हांस कृतकृत्यता वाटते. तुमच्या सरकाराचे ताल सबळ होते म्हणून तुम्हांस ही फत्ते मिळाली. आमच्याकडून झालें तितके आम्ही केलें. यानंतर संकट पडेल तेव्हां साहाय्य करण्याविषयी आम्हांस अवश्य लिहावे मनांत काही दुजाभाव वागवू नये. हा जबाब आपल्या वकिलाच्या हातीं देऊन त्यानी अदिलशहास यथोचित नजरनजराणा पाठविला व तहाच्या अटींची यादी त्याच्याकडे दिली तीं तीन कलमे येणेप्रमाणें होतीं : १) कोपल व बेलवाडी (बिलारी) ह्यांसभोवतालचा मुलूख आमच्या स्वाधीन करावा; २) द्रविड देशांत जो मुलूख आम्ही काबीज

१ हा प्रसिद्ध मुरारबाजी देशपांडे यांचा नातू.

केला आहे त्याच्यावर अदिलशहानें कांहींएक हक्क सांगू नये; ३) तंजावर वगैरे जे प्रांत शहाजीराजांच्या जहागिरीत मोडतात त्यावर अदिलशहानें कोणत्याही प्रकारचा ताबा चालवू नये, तर त्यावर आमचा पूर्ण अंमल चालावा आणि ४) प्रसंगोपात्त एकमेकांनी एकमेकांस साहाय्य करावे ह्या अटी मसाऊदखानानें कबूल करून ह्या आशयाचा तह मंजूर झाला. मग महाराज मसाऊदखानाच्या भेटीसाठीं विजापुराकडे गेले व त्यांचें आणखी कांहीं गुप्त खलबत झालें. ह्या वेळी महाराजाच्या मनात असे आले कीं, विजापूर शहरात जाऊन अदिलशहाची भेट घ्यावी. मसाऊदखानाने ह्या त्याच्या उद्देशास अनुमोदन देऊन पाचशे लोकांसह विजापूरास अदिलशहाच्या भेटीस यावें असा त्यांस निरोप पाठविला परंतु मोरोपंत पिंगळ्याने त्यांस असे धाडस करू नये असे सुचविल्यावरून त्यांनी हा बेत रहित केला.

ह्याप्रमाणें कर्नाटकांतील व द्रविड देशांतील प्रांतांवर शिवाजीमहाराजांचे प्रभुत्व विजापूर सरकारानें कबूल केल्याचें वर्तमान व्यंकोजीराजांस कळले तेव्हां त्यांस अतिशयित विषाद वाटला व आपलें स्वातंत्र्य आतां अगदींच नष्ट झालें असें त्यांना वाटूं लागलें. आधीच महाराजांनी त्यांच्यावर रघुनाथपंताचा शह पुरा बसवून त्यांच्या जहागिरीची बहुतेक व्यवस्था आपल्या हातीं घेतली होती. त्यांत आणखी विजापूर सरकारानें त्या जहागिरीवर आपला काहींएक ताबा नाहीं असें सदरील तहांत कबूल केल्यामुळें त्या सरकाराकडून मागेंपुढें कांहीं मदत मिळून आपण आपल्या बंधूंच्या शहांतून मुक्त होऊं अशी थोडीशी आशा त्यांच्या मनांत होती ती समूळ खुंटली. ह्यामुळें ते अगदी उदास होऊन बसले. आपल्या नित्यव्यवहाराकडे दुर्लक्ष करून ते विरक्तासारखे वागू लागले. त्याच्या वृत्तींत जो हा पालट झाला त्याविषयी रघुनाथपंतानें महाराजांस कळविल्यावरून त्यांनी त्यांस पुढील आशयाचे एक पत्र पाठविलें 'पुष्कळ दिवस झाले, तुमच्याकडून पत्र येऊन काहीएक वर्तमान कळले नाहीं. त्यामुळें जिवास काळजी लागली आहे. रघुनाथपंत लिहितात कीं, तुम्ही उदास व खिन्न होऊन आपल्या देहाची निगा राखीत नाहीं. तुम्हांस आपल्या जिवाचा कंटाळा आला आहे. तुम्ही कोणतेही सण किंवा उत्सव करीत नाहीं. तुमची सेना स्वस्थ बसली असून तुम्ही दरबारच्या कामकाजांत मुळींच लक्ष घालीत नाहीं. तुम्ही पुरे बैरागी बनून कोणत्यातरी पवित्र स्थानीं बसून काळ दवडण्याच्या गोष्टी बोलत आहां. असा पुष्कळ मजकूर ते तुमच्या संबंधाने लिहितात. तो वाचून आम्हांस फार खेद झाला आहे. आमच्या वडिलांचे उदाहरण तुमच्यापुढे असतां तुमची वृत्ती अशी व्हावी याचे आम्हांला नवल वाटतें. सर्व संकटांच्या प्रसंगीं ते कसे वागले, त्या प्रसंगांचें निवारण त्यांनी कसें हुशारीनें, धैर्यानें व दृढ निश्चयानें केलें आणि मोठा लौकिक व मान संपादून तो कसा आमरण राखिला, याचा अंमळ विचार करा. त्यांचें हें उज्ज्वल चरित्र तुमच्या डोळ्यांसमोर घडले त्याचा तुम्हांस नित्य समागम घडला असून त्यांची हुशारी व चाणाक्षपणा ही तुम्हांस नेहमीं पाहावयास मिळाल्यामुळें तुमचा त्यापासून पुष्कळ फायदा व्हावा. आम्हीं स्वतः अनुकूल स्थित्यनुसार स्वरक्षण करून स्वराज्य कसें संपादन केलें हें तुम्हांस विदित आहेच. तुम्हांस सांप्रत चांगली अनुकूल संधी प्राप्त झाली असतां तुम्ही सर्व प्रपंचाचा त्याग करून बैरागी बनावे हें तुम्हांस उचित आहे काय? तुम्ही आपला सगळा कारभार दुसऱ्यांच्या हातीं द्यावा आणि त्यांनी तुमचे संस्थान गिळंकृत करावे हें चांगले काय? तुम्ही आपल्या दौलतीचा नाश होऊं द्यावा व स्वतःस अपाय करून घ्यावा हें बरोबर नाहीं. हा कसला शहाणपणा? व याचा शेवट काय होईल बरें? आम्ही तुमचे वडील बंधू असून तुमचे संरक्षण करण्यास सर्वदा तत्पर आहों. आमच्यापासून तुम्हांला काहीएक भीती बाळगायला नको. तरी आतां ही वृत्ती सोडून द्या ! विरक्त होऊं नका, उदासीनता टाका. सुखाने कालक्रमणा करा. व्रते, उद्यापनें, सण, उत्सव व इतर व्यवहार नीट पाळा. आपल्या जिवास जेणेंकरून सुख होईल त्याजकडे लक्ष पुरवा. आपल्या पदरच्या लोकांस रिकामे बसूं देऊं नका. आपल्या लष्कराची व्यवस्था नीट राखा. महत्त्वाच्या राजकारणांत मन घाला. आपल्या पदरच्या लोकांकडून आपआपलीं कामे नीट करून घ्या. त्यास कामगिऱ्या सांगून त्या ते बरोबर रीतीनें बजावितात कीं काय तें दक्षतेने पाहा. योग्य रीतीनें वागून नावलौकिक संपादन करा. तुम्ही आमचे धाकटे बंधू तुमची कीर्ती व उत्कर्ष झालेला आमच्या कानीं

आल्यानें आम्हांस समाधान वाटेल. तुमच्या सन्निध रघुनाथपंडित आहेत, ते कोणी परके नाहींत. कोणत्या प्रसंगी कोणती गोष्ट करणे उचित आहे तें त्यांच्या मसलतीने ठरवीत जा. ते तुम्हांस आमच्या प्रमाणेंच मानून चालतील. आमचा सर्व भरवसा त्यांच्यावर आहे. तसाच तुम्हीही त्यांच्यावर भरंवसा ठेवा. त्यांस सहसा सोडू नका. त्यांचा तुम्हांस व तुमचा त्यांस पूर्ण आश्रय असावा. येणेंकरून तुमची ख्याती होईल. विशेष सांगावयाचें तें हेंच कीं, आळस करूं नका. अनुकूल संधी येईल ती व्यर्थ दवडूं नका. आपल्या लष्कराकडून कांहीं तरी कामगिरी करून घेत चला. हें वय पराक्रम करण्याचें आहे. बैरागी व्हावयाचें तें वृद्धापकाळीं व्हावें. तर आतां उठा, उदासीनता टाका, आळस झाडा आणि कांहीं तरी पराक्रम करून आम्हांला दाखवा. तुम्ही सुज्ञच आहां! तुम्हांस बहुत काय लिहिणें?' हें महाराजांचे व्यंकोजीराजास बहुतेक शेवटलेंच पत्र असावें. ह्यानंतर लवकरच त्यांची प्रकृती बिघडून त्यांतच त्यांचा अंत झाला.

***

भाग अठ्ठाविसावा

इंग्रज व शिद्दी
(१६७४–१६८०)

महाराजांनी स. १६६१ त राजापूर शहर लुटलें. स. १६६४ त सुरत शहर पहिल्याने लुटलें. स. १६६५ त कारवार शहरावर हल्ला करून खंड बसविला. स. १६७० त सुरत शहर पुनः लुटले व स. १६७३ त हुबळी शहर लुटलें. ह्या सर्व ठिकाणीं इंग्रजांच्या वखारी असून त्या त्या प्रसंगीं त्यांचे बरेंच नुकसान झालें होतें, हें मागें सांगितलेंच आहे. राजापूर शहर महाराजांच्या ताब्यांत आल्यावर तेथील वखार इंग्रजांनी उठवली होती. स. १६६८ त सुरतेच्या इंग्रज व्यापाऱ्यांनीं मुंबई बेटांत[१] वखार घालून तेथें आपलें कायमचे ठाणे केलें, व सभोंवतालच्या मुलखांत व्यापार सुरू केला.

ह्या बेटाच्या लगत्यास साष्टी प्रांतांत फिरंग्यांचा अंमल होता. त्यांस मुंबई बेट आपल्या हातचे गेल्यामुळें फार वाईट वाटलें व ते इंग्रज व्यापाऱ्यांचा द्वेष करूं लागले. ते आपल्या ताब्यांतील प्रांतांत त्यांस कोणत्याही प्रकारचा व्यापार करू देईनात. मुंबईतील इंग्रजांस धान्यादिकांचा पुरवठा साष्टीं प्रांतांतून मुळींच होईना. त्यामुळें त्यांस दुसऱ्या प्रांतांतून दाणागल्ला आणावा लागत असे. आतां साष्टीखेरीज करून मुंबईच्या आसपासच्या इतर प्रांतांवर शिवाजीमहाराजांचा अंमल होता. यास्तव त्यांच्याशीं सलोखा ठेवण्यात आपलें हित आहे असें इंग्रजांस वाटणें साहजिक होतें. शिवाय महाराजांचीही ह्या लोकांवर वक्रदृष्टी असण्याचे कांही एक कारण नव्हतें. ते कुशल व्यापारी व हुशार दर्यावर्दी आहेत असें त्यांजविषयीं महाराजांचे मत होतें. त्यांच्या व्यापारानें आपल्या मुलखाचें हित आहे असें त्यांस वाटे. दुसरें असें कीं, शिद्दीशीं युद्धप्रसंग करावे लागत; यास्तव त्यांच्याकडून आरमाराची वगैरे मदत आपणांस मिळेल अशी त्यांस आशा होती. त्यांची जहाजें मजबूत व मोठी असत. अशीं जहाजें आपणांस त्यांच्याकडून मिळतील व चांगल्या बंदुका, तोफा व दारूगोळा ते आपणांस पुरवतील असें महाराजांस वाटे. आणखी असें कीं, शिद्दी मोगलांच्या साहाय्याने इंग्रजांच्या ह्या बंदरांत शिरून आपल्या कुर्ला वगैरे प्रांतास उपद्रव करील अशी भीती त्यांस नेहमीं असे. ती टाळण्याचा एक उपाय म्हटला म्हणजे इंग्रजांस आपले स्नेही करून ठेवणें हा होय असें त्यांचें धोरण होतें. खरें म्हटलें असतां इंग्रजांस ह्या बेटातून हाकून देऊन तेथें आपलें ठाणें बसविण्यास महाराजांना कांहीं कठीण होतें असें नाहीं; परंतु अशा परदेशांतील व्यापाऱ्यांस विनाकारण त्रास द्यावा व आपल्या मुलखाशीं त्यांचा व्यापार होत आहे तो बंद पाडावा हें त्यास बरोबर वाटलें नसावे. सगळ्या पश्चिम किनाऱ्यावर आपली सत्ता बसवावी असा दृढ संकल्प महाराजांचा होता पण तो साध्य व्हावयास चांगले मजबूत आरमार आपणांस तयार केलें पाहिजे असें त्यांस वाटे व हें तयार करण्याच्या कामी ज्यांच्याकडून साहाय्य होण्याचा संभव असे त्यांस ते साधेल तेवढें न दुखविण्याचा प्रयत्न करीत. ह्याच कारणास्तव ते फ्रेंच, डच वगैरे परस्थ व्यापाऱ्यांशीं मित्रभावानें वागत. फिरंगी लोकांशी त्यांचा पहिल्या पहिल्याने सलोखा असे; परंतु

---

१ हे बेट इंग्लंडच्या दुसऱ्या चार्ल्स राजाला सन १६६१ त पोर्तुगालच्या राजाच्या मुलीशीं विवाह केल्याबद्दल आंदण म्हणून मिळाले होते. हे चार्ल्स राजाने ईस्ट इंडिया कंपनीला प्रतिवर्षी दहा पौंड घेण्याचें ठरवून सन १६६८ त दिले होते. हे सूरत येथल्या इंग्रज व्यापाऱ्यांचा प्रमुख सर जॉर्ज ऑक्झिंग्डन याच्या हवाली केले.

त्यांच्यांत धर्मवेडाचा फैलाव झाल्यामुळे ते हिंदू प्रजेस छळू लागले. हें महाराजांस खपेनासें होऊन ते शेवटीं शेवटीं त्यांच्याशीं वैर करू लागले होते. तरी ते तहाप्रमाणें तोफा, बंदुका व दारूगोळा प्रतिवर्षी पुरवीत. यास्तव महाराजांनी त्यांची थोडीशी सबुरी केली होती. ते आणखी कांही वर्षे जगले असते तर ह्या फिरंग्यांचा त्यांनी ह्या देशांतून पुरा उठावा केला असता.

आतां, इंग्रज व्यापारी सुरतेस मोगलांच्या आश्रयाने असल्यामुळें त्यांच्याकडून आपणांस फारसे साहाय्य होईल असें महाराजांस वाटत नसे. म्हणून त्यांनीं त्यांच्या वखारी वारंवार लुटल्या; परंतु पुढें सदरी निर्दिष्ट केल्याप्रमाणें इंग्रज व्यापारी मुंबईस येऊन राहिल्यावर त्यांचा महाराजांशीं अंमळ निकट संबंध आला इंग्रज व्यापाऱ्यांस मुंबई बेट मिळाल्यावर चार वर्षांनी म्हणजे स. १६७२ त आंगिअर नांवाचा एक हुशार व धोरणी गव्हर्नर तेथल्या वखारीवर आला. त्यानें शिवाजीमहाराजांशी कायमची मैत्री करण्याचा विचार मनांत आणला व त्या उद्योगास तो लागला. इकडे शिद्दीच्या मनांतही असा उद्देश होता कीं, इंग्रजांस अनुकूल करून घेऊन मुंबई बेटाच्या बंदरांत आपलें आरमार न्यावें व तेथून शिवाजीमहाराजांच्या कुर्ला वगैरे प्रांतास उपद्रव द्यावा. तो मोगलांचा ताबेदार झाल्यावर त्या सरकाराचें आरमारही त्याच्या स्वाधीन झालें होतें व त्या सरकाराच्या वशिल्यानें तो मुंबई बंदरांत प्रवेश करावयास जेव्हां तेव्हां पाहात असे परंतु आंगिअर त्यास तसें करूं देत नसे. सुरतेचा मोगल सुभेदार त्यास वेळोवेळा निरोप पाठवी कीं, शिद्दीस तुमच्या बंदरांत येऊ द्या? पण अंगिअर शिवाजीमहाराजांच्या धाकाने त्या गोष्टीस कदापि कबूल होत नसे. हें त्याचें तिऱ्हाईतपणाचें वर्तन महाराजांस पसंत वाटे व त्यांचें त्याच्याविषयी चांगले मत झालें होतें.

महाराजांच्या फौजेची फिरंग्यांच्या वसई प्रांतालगत किल्ले वगैरे बांधण्यासंबंधाची धामधूम सुरू झाली तेव्हां त्यांचा आपणांसही कदाचित् उपद्रव होईल ह्या भीतीनें आंगिअर याने त्यांच्याशी सलोख्याचा तह करण्यासाठीं लेफ्टेनन्ट उस्टिक यास त्यांच्याकडे पाठविलें.[१] परंतु तो राजापूर व हुबळी येथें झालेलें एकंदर बत्तीस हजार होनांचे नुकसान भरून द्यावे असें एक कलम पुढें करूं लागला. म्हणून त्यांनी त्या वेळीं इंग्रजांशी तह केला नाही. पुढें पुनः दुसऱ्या वर्षी आंगिअर यानें निकल्सनामक एक वकील संभाजीच्या मार्फत तह करण्यास महाराजांकडे पाठविला पण ह्या वेळीं सुद्धा उभय पक्षांचे करारमदार जमले नाहींत. महाराजांचे म्हणणें असें होतें कीं, ‘राजापूर येथे तुमच्या मंडळीचे नुकसान झालें आहे तें आम्ही भरून देऊं? परंतु तुमच्या लोकांचे जे काही व्यक्तिशः नुकसान माझ्या लोकांनी केले असेल ते मजकडे मागू नका. कारण ते मजकडे जमा झाले नाही. आता हुबळी येथें तुम्ही म्हणतां तितकें तुमचें नुकसान आमच्या हातून झालें नाहीं.’ ह्यासंबधानें त्यांची खात्री करण्यासाठीं महाराजांनी त्यांस आपल्या हुबळी येथील लुटीच्या याद्याही दाखविल्या, हें मागें सांगितलेंच आहे.[२] हा असा उभय पक्षांमध्यें लढा पडला होता. दुसरें असें कीं, महाराज इंग्रजांकडे तोफा मागत होते. व ते मोगल व शिद्दी यांच्या भीतीमुळे देण्यास राजी नव्हते.

---

१ ह्या वेळीं महाराजांनी ह्या इंग्रज व्यापाऱ्यांकडे दारूगोळ्याची वगैरे मागणी केली होती. ती त्यांनी मान्य केली नाही, म्हणून त्यांच्या जहाजांस आपल्या ताब्यातील कोकणच्या बंदरात येण्याची महाराजांनी मनाई केली. त्यामुळे त्यांस सरपण वगैरे मिळण्याची पंचाईत पडू लागली. म्हणून त्यानी लेफ्टनन्ट उस्टिक यास महाराजांकडे पाठविले. त्यांस दारुगोळा पुरविण्याची लालूच दाखवून त्यानी राजापूर लुटले. तेव्हा इंग्रज व्यापाऱ्यांचे जे नुकसान झाले होते त्याची भरपाई करून देण्याविषयीचे त्याने बोलणे केले; त्याप्रमाणेच महाराजांच्या सत्तेतल्या मुलखात इंग्रजांना व्यापार करण्याची मोकळीक सरसकट दोन टक्के जकात घेऊन द्यावी अशी त्याने त्यांजपाशी मागणी केली. ह्या वेळीं इंग्रज व्यापाऱ्यांच्या सुरत येथील अध्यक्षानें असें लिहून कळविले होतें की, शिवाजीमहाराजांशी दारूगोळा पुरविण्याचा किंवा शिद्दीशी लढण्यास मदत करण्याचा स्पष्ट करार करू नये, तर नुसती वचने देऊन त्यांस आशा दाखवावी, ती पुरी कधीही करु नयेत.

२ पृ. ३६४ पाहा. हुबळी लुटली तेव्हां आपल्या व्यापाऱ्यांचे ७८९४ होन नुकसान झालें होते असे त्याचें म्हणणें होते; परंतु महाराजांच्या या वेळच्या लुटीच्या याद्यांत त्यांचा फक्त दोनशे होन किंमतीचा माल हाती लागल्याचा तपशील होता.

पुढें कांही दिवसांनी शिद्दीनें मुबई बंदरांत इंग्रजांच्या परवानगीची दरकार न करता आपलें आरमार नेलें व महाराजांच्या प्रांतात तो धामधूम करूं लागला. हें आंगिअर यास बरें न वाटून त्यानें त्यास मनाई केली व त्याचें आरमार आपल्या बंदरांतून काढून लावले. हें वर्तमान महाराजांस कळले तेव्हां त्यांनी इंग्रजांवर फार खूष होऊन त्यांस असें सांगून पाठविलें कीं, तुमच्या-आमच्यातला तिढा काढून टाकून तह करण्यासाठीं तुम्हीं आपला वकील आमच्याकडे पाठवून द्यावा; परंतु ह्या वेळीं सुरतेच्या मोगल सरदाराकडून आंगिअर यास पुनःपुनः अशीं पत्रे येऊ लागली कीं, येत्या पावसाळ्यांत शिद्दीच्या आरमारास तुमच्या बंदरांत राहू द्यावे तेव्हां त्या इंग्रज गव्हर्नरास मोठा पेंच पडला. मोगलांस नाखूष केल्यानें सुरतेहून आपला उठावा होईल अशी भीती त्यास वाटणें साहजिक होतें. हा पत्रव्यवहार महाराजांच्या कानी आला तेव्हां त्यांनीं इंग्रजांस असा धमकीचा निरोप पाठविला कीं, 'तुम्ही मोगल सुभेदाराचें ऐकून शिद्दीस आपल्या बंदरांत येऊ द्याल तर डच लोकांचे आरमार तुमच्या बेटावर हल्ला करावयास येत आहे व त्या वरील सरदार आमच्याकडे मदत मागत आहे, त्यास आम्ही दहा हजार लोकांनिशीं मदत करून तुमचे बेट सर करूं!'[१] इकडे शिद्दीनें तर आपलें आरमार मुंबई बंदराजवळ आणून उभें केलें. आंगिअरनें त्यास तेथून निघून जाण्यास सांगितलें; परंतु हें त्याचें सांगणे न जुमानता शिद्दीच्या आरमारातील कांहीं पडाव खाडींत शिरले व शिवाच्या उत्तरेकडील बाजूस किनाऱ्यावर त्यांचे बरेच लोक उतरले व तेथील रहिवाशांना हाकून देऊन तेथें पावसाळ्यात आपली छावणी करण्याचा त्यांनीं बेत केला; परंतु त्यांस इंग्रजांच्या शिपायांनी तेथून हाकून दिलें. मग पुनः शिद्दीचे पाचशे हत्यारबंद शिपाई पडावात बसून माजगांवाजवळील किनाऱ्यास आले व खालीं उतरू लागले. तेव्हां त्यांच्यावर इंग्रजांनी तोफांचा मारा सुरू केला. त्यामुळें त्यांस तेथून पळून जावे लागलें. इतक्यांत डच लोकांचे जे आरमार उत्तरेकडे येत होतें तें वेंगुर्ल्याजवळ विसकळून थोडेंसें सुरतेकडे गेलें, थोडेंसें इराणकडे गेलें व बाकीचे खाली सिंहलद्वीपाकडे गेलें. ही वार्ता मुंबईच्या इंग्रजांस कळल्यावर त्यांस धीर आला व शिवाजीमहाराजांच्या धमकीचा बाऊ त्यांस अंमळ कमी वाटूं लागला. इकडे शिद्दीच्या लोकांनी जमिनीवर उतरण्याचा दोन वेळा केलेला प्रयत्न व्यर्थ गेला, तरी शिद्दी कांहीं मुंबई बंदराजवळून आपलें आरमार काढून नेईना.[२] तो फारच लगट करूं लागला तेव्हां इंग्रजांनीं त्याच्याशी असा ठराव केला कीं, त्याचे तीनशेंपेक्षां अधिक लोक बंदरांत राहू नयेत, त्यांच्यावर इंग्रजांच्या लोकांचा पाहारा असावा व ते शिवाजीमहाराजाच्या प्रांतांस उपद्रव देऊं लागले असतां त्यांस इंग्रजांनी एकदम हाकून द्यावे त्याने पुनः बंदरांतून छत्तीस लढाऊ जहाजे पाठविली होती ह्या जहाजांच्या साहाय्याने महाराजांच्या ताब्यांतल्या निरनिराळ्या बंदरांवर हल्ले करून ती लुटण्याचा सपाटा चालविला आणि तेथल्या शेकडो पाडावांचा नाश केला. ह्या धामधुमीच्यावेळी महाराजांची सहा लढाऊ जहाजे मुंबई बंदराच्या आश्रयाने होती, त्यांवर मोगल आरमारांनी हल्ला केला तेव्हां इंग्रज व्यापाऱ्यांनी मोगल सरदाराला असे सांगितले कीं, ही जहाजे आम्ही जप्त करून ठेवली आहेत. शिवाजीने राजापूर स. १६६० त लुटले तेव्हां तेथे आमचे जे नुकसान झाले त्याच्या भरपाईसाठी ही जहाजे आम्ही अडकवून ठेवली आहेत. हे त्यांचे म्हणणे खरें वाटून मोगल सरदारांने त्यांस हात लावला नाही. मोगलांचे साहाय्य मिळाल्यावर शिद्दी संबळ याने महाराजांचा सरदार दौलतखान याच्या ताब्यातील आरमारावर स. १६७४ च्या मार्च महिन्यात मुचकुंद खाडीत (सातवली नदीत) हल्ला केला. उभय आरमारांचे घनघोर युद्ध होऊन शिद्दीचा काटा काढून टाकण्याचा महाराजांनी निश्चय करून त्याच्याशी निकराचा सामना करण्यासाठी ते ह्या वेळीं कोंकणात लढाईची सर्व सामुग्री व लोक एकसारखे पाठवित होते आणि त्यांनी बारदेशपर्यंत सगळा कोंकण किनारा हस्तगत करून सगळ्या बंदरात लढाईची जय्यत तयारी करून ठेवली

---

१ ही गोष्ट स. १६७२ - ७४ सालाच्या दरम्यान घडली. ह्या सुमारास डच व इंग्रज यांच्यामध्ये युरोपांत युद्ध चालू होतें. डच लोकांचा सेनापती रिकलॉफ वानगाऐन याने शिवाजीमहाराजांशी असें बोलणे लावले कीं, 'मुंबईच्या इंग्रजांशी लढण्याच्या कामीं आम्हांस मदत करा म्हणजे तुम्हांस आम्ही शिद्दीकडून दंडाराजपुरी परत घेण्यास मदत करतो. हे त्याचे बोलणे महाराजांस पसंत पडले नाही. यावरून त्यांचा डच लोकांपेक्षा इंग्रजांवर विशेष भरवंसा होता हे उघड दिसते.

२ स. १६७३ च्या ऑक्टोबर महिन्यात शिद्दीने मुंबई बंदरातून आपले काही लोक पेण व नागोठणा ह्या खाड्यातून महाराजांच्या मुलखात पाठवून तेथील खेडी लुटून जाळून टाकण्याचा सपाटा चालविला. तेव्हा महाराजांच्या लोकांनी त्यांच्यावर हल्ला करून त्यांच्या शंभर लोकांची कत्तल उडवली आणि त्यांच्या सरदारांची शिरे महाराजांकडे नेली. प्रो. सरकार, पृ. ३४९.

ह्या वेळीं महाराजांचा वकील[१] मुंबईस तहाची कलमे ठरविण्याकरिता आला होता. त्यानें इंग्रज व्यापाऱ्यांची शिद्दीस अनुकूलता नसून ते आपणांस साधेल तेवढी मदत करण्यास उद्युक्त आहेत असे त्यांना लिहून कळविल्यावर त्यास इंग्रजांच्या वर्तनाबद्दल समाधान वाटून त्यांस आपला वकील तहाची कलमे ठरविण्यास गडावर पाठवून द्यावयास लिहिलें. त्याप्रमाणें आंगिअर याने आपला एक वकील [२] लवाजम्यानिशीं रायगडावर पाठवून दिला. हा इंग्रजांचा वकील रायगडापाशीं गेल्यावर त्याला गडावर जाण्याची मनाई झाली. कारण त्या वेळीं महाराज गडावर नव्हते. ते ह्या सुमारास राज्याभिषेकाच्या गडबडींत असून प्रतापगडावर देवीच्या दर्शनास गेले होते.[३] ते तिकडून परत आल्यावर त्यांच्या परवानगीने तुम्हांस वर जावयास मिळेल असें इंग्रज वकिलास गडावरच्या अधिकाऱ्यांनी सांगितल्यावरून त्यास गडाच्या पायथ्याशी पाचाड नामक गांवी तंबू ठोकून राहावें लागलें. आपण कोणत्या कामासाठीं आलों आहों हें इंग्रज वकिलाने नारायणजी पंडित[४] यास कळविल्यावरून तो त्याच्या भेटीस आला. तेव्हां त्या वकिलाने त्याला आंगिअरचें पत्र दाखविले आणि महाराजांस व इतर मुत्सद्यांस आणलेले नजराणे दाखविले. ते पाहून तो खूष झाला, आणि त्यानें त्या वकिलास असें वचन दिलें कीं, महाराज प्रतापगडावरून परत आल्यावर तुम्हांस त्यांची मुलाखत करून देतो मग त्यानें तहाची कलमे लिहून आणली होतीं तीं नारायणजी पंडितास दाखवली आणि त्यासंबंधानें त्याचा काय अभिप्राय आहे तें विचारले. तेव्हां त्यांत शिद्दीशीं महाराजांनी सलोखा करावा असें एक कलम होतें, त्या संबंधाने नारायणजी पंडित म्हणाला, 'हें कलम तुम्ही अजीबात गाळा. तें आमच्या महाराजांस मुळींच पसत होणार नाहीं! शिद्दीस नाहीसा करून जंजिरा हस्तगत करण्याचा त्याचा विचार आजकालचा नाहीं. स. १६४८ सालापासून ते त्याच्या पिच्छास एकसारखे लागले आहेत. त्यामुळें त्यांचें आजपर्यंत पुष्कळ नुकसान झालें आहे. त्याचा नायनाट केल्यावाचून आमची कोंकणपट्टी सुरक्षित होणार नाहीं. यास्तव कांहीं झाले तरी त्यास बुडविण्याचा त्यांचा पक्का निर्धार झाला आहे. ह्यासाठी माणसांची व पैक्याची खराबी कितीही झाली तरी ती करण्यास ते तयार आहेत. सांप्रत त्याच्या जंजिऱ्यास वेढा दिला असून तो सर होण्याचा संभव आहे. प्रतिदिवशीं तोफा, दारूगोळा, लोक व पैका तिकडे पाठवीत आहेत. तेव्हां अर्थात् हें तुमचे कलम त्यांस मुळींच रुचणार नाहीं. ह्यासाठी तें गाळाल तर ठीक होईल!' ह्यावरून त्यानें तें कलम गाळले हें सांगावयास नकोच. मग हा वकील म्हणूं लागला कीं, महाराजांनी आपल्या राज्यांतून चोहोंकडच्या व्यापाऱ्यांस जाण्यायेण्याचा मार्ग मोकळा करावा. बालेघाटाचा रस्ता बंद आहे तो खुला करावा. अशाने व्यापारी लोकांस आपला माल बंदरांत आणतां येईल व तेणेंकरून महाराजांच्या रयतेचा व आमचाही पुष्कळ फायदा होईल. महाराजांचें सर्व वय शिपाईगिरीत गेल्यामुळें त्यांच्या लक्षांत ही गोष्ट येत नसावी. तरी तुम्हीं त्यांची ह्या प्रकरणी नीट समजूत घालावी. त्यावर नारायणजी म्हणाला, ही व्यवस्था लवकरच होईल. कारण विजापूर सरकारास आतां महाराजांशी वैर करून एकसारखे युद्धप्रसंग करण्याचा पुरा त्रास आला आहे, व तसें करण्यास त्याला आतां त्राणही उरले नाहीं, म्हणून तें सरकार महाराजांशीं तह करून समेट करण्याच्या विचारांत आहे. ह्या उद्देशाने तिकडून अनेक वेळां वकीलही आले होते. हा तह दोनतीन महिन्यांत होऊन जिकडेतिकडे शांतता होईल व व्यापारी लोकांस सगळ्या वाटा खुल्या होऊन त्यांस आपला माल पाहिजे तिकडे सुरक्षितपणें नेण्याची सोय होईल. महाराज तक्तनशीन झाल्यावर राजपदास अनुरूप असें प्रजापालन करण्याकडे आपलें सगळें लक्ष पुरवतील आणि आपल्या राज्यातील व्यापार वाढविण्याचा हरएक उपाय दक्षतेनें करतील. हा काळपावेतों त्यांस विजापूरकरांशीं व मोगलांशी सतत युद्धप्रसंग करावे लागल्यामुळें ह्या

---

१ महाराजांनी ह्या वेळीं भिमाजी पंडीत यास इंग्रज व्यापाऱ्याचा दुभाषी नारायण शेणवी याजबरोबर रायगडाहून पाठविले होतें. त्यानें ह्या वेळीं लुटीच्या भरपाईसंबंधाचा वाद मिटवून दहा हजार पंचवीस होन देण्याचे कबूल केलें. ही तोड सुरत येथील काउन्सिलास मान्य झाली; परंतु महाराजांस ह्या वेळीं कोल्हापूराकडे लढाई करावयास जावे लागल्यामुळे तहाची कलमे ठरविण्याचे लांबणीवर पडले.

२ याचे नाव हेन्री ऑक्झिंग्डन असे होते. हा १६७७ पासून १६७९ पर्यंत मुंबईचा डेप्युटी गव्हर्नर होता.

३ ह्या वेळीं महाराजांनी सव्वा मण सोन्याचा नजराणा देवीला नेला होता असे डॉ. फ्रिअर आपल्या प्रवासवृत्तांत म्हणतो.

४ हे नाव डॉ. फ्रिअर देतो. हा मुंबईतील इंग्रज व्यापाऱ्यांचा दुभाषी होता. हे वर एका टीपेत सांगितले आहेच

गोष्टींकडे लक्ष पुरविण्यास हवी तितकी स्वस्थता त्यांस मिळाली नाहीं. ह्याप्रमाणें इंग्रज वकिलाचा आणि नारायणजी पंडिताचा संवाद झाल्यावर त्या वकिलानें त्याला एक हिऱ्याची आंगठी नजर केली व त्याच्या वडील मुलासही बक्षीस दिलें आणि महाराजांची भेट लवकर करून देण्याविषयी त्यास विनंती केली.

महाराज परत आल्यावर ह्या इंग्रज वकिलास गडावर येण्याची परवानगी मिळाली व त्यास राहाण्यासाठी एक बंगला दिला. नंतर नारायणजी पंडिताने महाराजांजवळ जाऊन ह्या वकिलाच्या तर्फेनें फारच विनवणी केल्यावरून त्यांनीं त्यास चार दिवस लोटल्यावर हुजुरास घेऊन येण्याविषयीं परवानगी दिली. इंग्रज वकिलानें महाराजांपाशीं जाऊन तहाची कलमे समजावून सांगितली. तीं त्यांस पसंत होऊन त्यांनी त्याला असें आश्वासन दिलें कीं, 'तुम्हांस आमच्या राज्यांतील कोणत्याही भागांत व्यापार करण्यास मुळींच हरकत होणार नाहीं व तुम्हांस किंवा तुमच्या मालास आमच्याकडून बिलकूल उपद्रव होणार नाहीं. ह्या संबंधाच्या तहास आमची पूर्ण अनुकूलता आहे!' त्यावर तो वकील म्हणाला. ह्याच उद्देशाने मला आमच्या काऊन्सिलाच्या अध्यक्षानें आपल्याकडे पाठविलें आहे. हिंदुस्थानांत व इराणांत जशा सवलती आम्हांस तिकडील बादशहांनी दिल्या आहेत तशाच आपणाकडूनही मिळाव्या एवढीच आमची विनंती आहे. महाराजांनी 'ठीक आहे' असें बोलून त्या वकिलानें तहाच्या कलमांची यादी आणली होती ती नीट पाहून तीत काहीं कमीजास्त असल्यास कळविण्याविषयीं मोरोपंतास हुकूम केला आणि आपण स्वत: राज्याभिषेकासंबंधाच्या तयारीसाठीं लगबगीने दरबारांतून उठून गेले.

त्या वकिलास नंतर असें कळलें कीं, आपल्या कामाचा निकाल राज्याभिषेकविधी आटपेपर्यंत कांहीं एक लागणार नाहीं. मग त्यानें नारायणजी पंडिताकडे जाऊन इतर मुत्सद्यासाठीं आणलेले नजराणे कसे द्यावे ह्याविषयी त्याचा सल्ला विचारला. तेव्हां त्याने त्या वकिलास असें सांगितलें की, 'मोरोपंतासाठी आणलेला नजराणा तुम्ही स्वत: घेऊन गेलें पाहिजे. इतर मुत्सद्यांस नजराणे द्यावयाचे ते कोणा कारकुनाच्या हातीं पाठविले तरी चालेल; परंतु तुमचे काम लवकर व सुरळीत झालें पाहिजे तर तुम्ही ह्या मुत्सद्यांस चांगलेच नजराणे दिले पाहिजेत. त्यांच्यासाठी तुम्ही ज्या वस्तू आणल्या आहेत त्या कांहींच नव्हेत. तुम्हांस त्यांना आणखी वस्तू दिल्या पाहिजेत! हें त्यांचें म्हणणें त्या वकिलास खरें वाटून त्यानें मुंबईहून लागोलाग आणखी वस्तू मागविल्या. ह्या रीतीनें त्या मुत्सद्यास खूष करण्यांत कांहीं अधिक पैका खर्च झाला तरी पत्करला, पण पावसाळा सुरू होऊन त्या गडावर तीनचार महिने अडकून पडणें त्यास सोईचें वाटलें नाहीं

असें सांगतात कीं, इंग्रजांच्या वकिलानें महाराजांपुढे वीस कलमे मांडली होतीं; त्यापैकीं अठरा कलमें त्यांस कबूल झाली. त्यातील कांहीं येणेंप्रमाणें होतीं. राजापूर येथें इंग्रजांचें नुकसान झालें त्याबद्दल दहा हजार होन महाराजांनी त्यांस द्यावे; राजापूर, दाभोळ, चेऊल व कल्याण येथें इंग्रजांनीं वखारी घालाव्या. महाराजांच्या सर्व राज्यांत व्यापार करण्यास इंग्रजांस मोकळीक असावी; त्यांनी योग्य वाटेल त्या दरांनीं क्रयविक्रय करावा, त्यांचे निरख अमुकच असावे असा कांहीं निर्बंध नसावा; इंग्रजानी मालाच्या किंमतीप्रमाणें आयात मालावर शेंकडा अडीच टक्के जकात द्यावी. आतां जी दोन कलमे महाराजांस नापसंत झालीं त्यांपैकीं एक असें होतें कीं, इंग्रजाचे नाणे महाराजांच्या राज्यांत चालावे ह्यावर महाराजांचे म्हणणें असें पडलें कीं, हे कलम तहात ठरण्याची आवश्यकता नाहीं. कारण कोणतेंही नाणें आमच्या राज्यांत चालण्याविषयीं आमच्याकडून मुळींच प्रतिबंध होत नसतो व जें नाणें घेतल्यानें आमच्या प्रजेचे नुकसान होण्याचा संभव असतो तें घेण्याविषयी आमच्याकडून तिच्यावर जुलूम होणें रास्त नाहीं. तुमचे नाणे मोगलांच्या नाण्याइतकें जड व चांगले असल्यास ते चालण्यास आमच्याकडून काही एक हरकत नाहीं![१] तो प्रजेच्या खुषीचा सौदा आहे. आता दुसरें कलम असे होते. तुफानाने किंवा दुसऱ्या कोणत्याही कारणानें इंग्रजाची

१ मुंबईत जे नाणे ह्या वेळीं चालू होतें ते हलके असून त्याची किंमत कमी जास्त होत असे. स . १६७४ व १६८३ अशा दोन साली ह्या बेटांत बंडे झाली त्याचे एक कारण नाण्यांचा खोटेपणा हे होते असें म्हणतात.

तारवें फुटून त्यांतील जो माल किनाऱ्यास लागे तो, किंवा जीं तारवें किनाऱ्यास लागून फुटत तीं त्यांस परत मिळावीं. ह्या कलमास महाराजांची हरकत अशी होती की, कोकणच्या किनाऱ्यावर तारवें फुटून लागणारा माल किंवा तीं फुटलेलीं तारवें परत देण्याची वहिवाट नाहीं. त्यांवर तेथील राजाचा हक्क प्राचीन काळापासून चालत आला आहे. तो सोडून देणें आम्हांस योग्य दिसत नाहीं. इंग्रजांस ही सवलत दिली असतां फ्रेंच वगैरे इतर व्यापारी ती मागू लागतील. यास्तव ह्या अटीविषयीं आग्रह धरू नये.' अशा फुटलेल्या तारवावरच्या खलाशांस मात्र लागेल ते साहाय्य करण्याची व त्यांचा बचाव करण्याची व्यवस्था लावण्यात येईल. ह्याप्रमाणें महाराजांचा अभिप्राय पडल्यामुळें त्या कलमासंबधानें इंग्रज वकिलास काहीं एक बोलतां येईना तरी नारायणजी पंडिताने त्यास असें सांगितलें कीं, हेंही कलम मंजूर होण्यास फारशी अडचण पडणार नाहीं. कारण मोगलबादशहाकडून व अदिलशहाकडून तुम्हांस ही सवलत मिळाली आहे. तेव्हां ती आमच्या राज्यांतूनही मिळावी असें महाराजांच्या मनांत येण्यासारखे आहे. ह्याप्रमाणें ह्या तहाच्या कलमांची वाटाघाट होऊन शेवटीं सगळी कलमे मंजूर झाली.[१] आणि राज्याभिषेकानंतर काहीं दिवसांनी ह्या तहावर महाराजांची सही झाली व एकंदर प्रधानांच्याही त्यावर सह्या झाल्या. ह्या तहाअन्वयें राजापूर येथें झालेल्या नुकसानाबद्दल इंग्रजांस दहा हजार होन द्यावयाचे ते रोख न देतां त्यांची फेड येणेंप्रमाणें करण्याचें ठरलें : इंग्रजांनीं महाराजांकडून सतत तीन वर्षे पाचपाच हजार होनांचा माल खरेदी करावा व त्याबद्दल त्यांस फक्त अर्धी किंमत द्यावी; म्हणजे अर्थात् तीन वर्षांत एकंदर साडेसात हजार होन किंमतीचा माल मिळाला व बाकीच्या अडीच हजार होनांसंबधानें असा करार केला कीं, इंग्रजांनी राजापुरास वखार घातल्यावर त्या बंदरांत जो त्यांचा माल येईल त्यावरची जकात, अडीच हजार होनाची रक्कम होईपर्यंत माफ करावी. हा असा तह ठरून त्याची यादी वर सांगितल्याप्रमाणें सह्या झाल्यावर नारायणजी पंडिताने इंग्रज वकिलाच्या हातीं दिली व महाराजांचा त्याला असा निरोप सांगितला कीं, तुमची वसाहत आमच्या राज्यानजीक होऊन तुमचा व्यापार आमच्या राज्यांत, चांगला चालल्यानें आमच्या रयतेचे पुष्कळ कल्याण होईल असें वाटल्यावरून तुमच्याशी आम्हीं हा सलोख्याचा तह केला आहे. तर हा तुमचा आमचा स्नेह दृढ राहावा अशी आमची इच्छा आहे.'

राज्याभिषेक झाला त्यावेळीं हा वकील मुंबईच्या गव्हर्नराचा प्रतिनिधी ह्या नात्यानें दरबारास गेला होता. त्यावेळीं त्याने महाराजांस एक हिऱ्याची आंगठी नजर केली. ह्या वकिलास महाराजांच्या सिंहासनापर्यंत जाण्याचा योग आला होता. तेव्हां त्याला त्याची रचना पाहावयास मिळून त्याचें त्यानें येणेंप्रमाणें वर्णन केलें आहे : 'सिंहासनाच्या दोन्ही बाजूंस सोन्याच्या भाल्यांच्या टोंकावर सत्ताप्रदर्शक पुष्कळ सांकेतिक चित्रे होतीं. उजवे बाजूच्या भाल्यांवर दोन मोठे सोन्याचे मासे असून त्यांच्या विक्राळ दाढा दाखविल्या होत्या व डावे बाजूच्या भाल्यांवर घोड्यांच्या शेपट्या असून दोन मोठ्या उंच भाल्यांच्या टोकांवर सोन्याचा तराजू समतोल ठेवला होता. मासे दाखविले होते त्यावरून समुद्रावर महाराजांची सत्ता आहे हें सुचविले होतें व घोड्यांच्या शेपट्या दाखविल्या होत्या त्यावरून जमिनीवर त्यांची सत्ता आहे असें सुचविले होतें आणि तराजू अशासाठी दाखविला होता कीं, ह्या राज्यांतील सर्व प्रजेस सारखे वागवून योग्य न्याय मिळेल, असें आश्वासन एकंदर लोकांस मिळावे.

---

१ ऑर्मी म्हणतो की, ज्या दोन कलमांसंबंधानें महाराजांनी हरकत घेतली होती तीं काहीं मंजूर झाली नाहींत. डॉ. फ्रिअर म्हणतो की, नाण्यांसंबंधाचें तेवढे कलम खेरीज करून बाकीची कायम केली. मुळातील मजकूर ग्रांट डफच्या इतिहासातून घेतला आहे. डॉ. फ्रिअर म्हणतो की, राज्याभिषेक-समारंभ झाल्यावर थोड्यादिवसांनी नारायण शेणवी याने इंग्रज वकीलास असे सांगितले की, नाण्यासंबंधाच्या कलमाखेरीज बाकी सगळ्या कलमांस शिवाजीमहाराजांची मंजुरी मिळाली. ह्या तहनाम्यावर ता. १२ जून १६७४ रोजी सह्या झाल्या. रा. राजवाडे यांनी आपल्या आठव्या खंडात ह्या तहाच्या संबंधाचा एक कागद छापला आहे. त्यात येणेंप्रमाणे उल्लेख आहे : इंग्रजांनी शिवाजीमहाराजांकडे चार सवलती मागितल्या होत्या त्या अशा (१) महाराजांच्या राज्यात इंग्रज व्यापारास जकात घेतल्यावाचून व्यापार करावयास मोकळीक असावी; (२) इंग्रजाच्या मालावर महाराजांच्या ताब्यातील बंदरांत जकात घेऊ नये; (३) इंग्रज लोकांचे नाणे महाराजांच्या राज्यात चालू करावे आणि (४) इंग्रजाची व्यापारांची जहाजे फुटून जो माल त्यांच्या बंदरास लागेल तो त्यांच्या स्वाधीन करावा व त्यांची फुटकी जहाजे त्यांस मिळावी. या कलमांपैकी पहिली दोन कलमे महाराजांनी कबूल केली. दुसरी दोन मान्य केली नाहीत.

इंग्रजाचा हा वकील रायगडावर एक महिना होता असें म्हणतात. त्यानें रायगडाचें व तेथील इमारती व राजमंदिर यांचें वर्णन केलें आहे, तें डॉ. फ्रिअर नामक त्या वेळच्या एका प्रवाशानें आपल्या प्रवासवृत्तांत लिहिलें आहे. तें येथें विस्तारभयास्तव उतरून घेत नाहीं.[१] इंग्रज वकिलाने ह्या वेळीं जें वर्णन केलें व जो पोक्तपणा दाखविला त्यावरून महाराजांचा इंग्रजांविषयीं बराच अनुकूल ग्रह झाला. तहाप्रमाणें राजापुरास इंग्रजांनीं वखार घातली.[२] परंतु ती फार दिवस टिकली नाहीं. तेव्हा सदरीं निर्दिष्ट केलेल्या अटीप्रमाणें त्यांस सगळी रक्कम मिळाली कीं नाही याविषयी शंका वाटते. ह्या तहानंतर दोन वर्षांनी आंगिअर मृत्यु पावला.[३] व त्याच्या मागून झालेला गव्हर्नर त्याच्यासारखा हुशार व धोरणी नव्हता.

मागें सांगितलें आहे कीं, शिद्दी मुंबईच्या खाडींत शिरून महाराजांच्या कुर्ला वगैरे प्रांतास फार उपद्रव देई. तो महाराजांच्या प्रांतांतील निरपराध रयतेस पकडून, पुरुष असत त्यांस ठार मारी आणि बायका व मुले यांस गुलाम म्हणून विकी. असा कहर त्यानें स. १६७३ त केल्याचें वर सांगितलेंच आहे. हा त्याचा धिंगाणा इंग्रजांस मुळींच आवडत नसे. ते आपल्याकडून होई तेवढा त्यांस प्रतिबंध करीत; परंतु कधीकधी त्याचा काहीच उपयोग होत नसे. मोगलांच्या धाकामुळे त्यास त्याच्याशीं उघडपणे युद्ध करण्याचें धैर्य नसे. त्याचा जंजिरा काबीज करून तेथें आपली वखार घालावी व मुंबईचें ठाणे उठवावें, असें त्यांच्या मनांत येऊन त्यांनी कंपनीच्या डायरेक्टरांकडे त्याबद्दल परवानगी मागितली; परंतु त्यांनी ती त्यांस दिली नाहीं. शिद्दीच्या घोर कृत्यांचा परिणाम एखादेवेळीं आपणांसही भोगावा लागेल असें त्यांस महाराजाच्या धाकामुळें वाटे; परंतु शिद्दीशीं वाकडे चालल्यानें मोगल रुष्ट होऊन त्यांच्या राज्यांत आपणांस थारा मिळणार नाहीं, अशी त्यांस धास्ती असे. ह्याप्रमाणें एकीकडून शिवाजीमहाराजांचा व दुसरीकडून औरंगजेबाचा असा दुहेरी धाक असल्यामुळें त्यावेळीं शिद्दीस न दुखवितां साधेल तेवढें तटस्थ राहाण्यातच आपला निभाव आहे, असें इंग्रज व्यापाऱ्यांस वाटे.

शिद्दीस चांगली शिक्षा करावयाची असा निर्धार करून महाराजांनी आपली फौज व आरमार हीं सिद्ध करून त्याच्याशीं युद्ध सुरू केलें. दंडाराजपुरी पूर्वी मोगलांच्या मदतीनें त्यानें परत घेतली होती ती महाराजांनी पुनः काबीज केली. जंजिऱ्यापासून गोव्यापर्यंत सगळा कोंकणकिनारा त्यांच्या ताब्यांत आला. शिद्दीनें मोगलांच्या आरमाराच्या साहाय्यानें महाराजांच्या ताब्यांतील कोंकणकिनाऱ्यावरील गांवे लुटीत व जाळीत वेंगुर्ल्यापर्यंत दौड केली परंतु विजयदुर्गाजवळील महाराजांच्या आरमारानें त्याच्यावर हल्ला करून त्यास सुरतेपर्यंत पिटाळून लावले. इकडें महाराजांच्या लोकांनी जंजिऱ्यास पाण्यांतून व जमिनीवरून वेढा देऊन त्याच्यावर सारखा मारा चालविला. पाण्यात मोरचे उभे करून त्यांवर तोफांचा भडिमार चालविला. जमिनीवरून जंजिऱ्यापर्यंत एक मोठा बांध घालण्याचा प्रयत्न सुरू केला, परंतु इतक्यांत शिद्दी संबळ सुरतेकडून मोठें आरमार घेऊन आला तेव्हां मराठ्यांना जंजिऱ्याचा वेढा उठवावा लागला. तरी

---

१ डॉ. फ्रिअर याने आपल्या प्रवासवृंत्तात ह्या वेळची एक मौजेची गोष्ट नमूद केली आहे आणि मि. किंकेड यांनी या गोष्टीचा अनुवाद केला आहे. ती गोष्ट अशी : एक खाटीक गडावरील लोकांस मांस पुरवित असे. तो इंग्रज वकीलांस पाहावयासाठी मुद्दाम गडावर आला. याचे कारण असे कीं, या इंग्रजांनी एका महिन्यात त्यांच्याकडून जेवढे मांस खरेदी केले तेवढे रायगडावरील सगळ्या लोकांनी उभ्या वर्षात खाल्ले नव्हते. तेव्हां अशा मांस भक्षकास प्रत्यक्ष डोळ्यांनी पाहण्याची त्याला इच्छा झाली !

२ ह्या पुनः घातलेल्या वखारीवर सर जॉन चाइल्ड यास प्रमुख नेमले; परंतु कोंकणचा महाराजांचा सुभेदार अण्णाजी दत्तो हा त्यांस अनुकूल नसल्यामुळे इंग्रजांचा व्यापार तेथे चांगला चालेना. तेव्हा इंग्रजांकडून पुनः महाराजांकडे वकील गेला. आपल्या व्यापारास ठरल्याप्रमाणे सवलती न मिळाल्यास आपण राजापूरची वखार उठवू असे त्याने महाराजांस सांगितले. तेव्हा महाराजांनी त्याची समजूत करून त्यास आपला चांगला आश्रय मिळेल असे अभिवचन दिले आणि राजापूरच्या लुटीच्यावेळी त्याच्या झालेल्या नुकसानाची भरपाई करावयाची राहिली आहे ती दाना, गवत, सुपारी वगैरे जिनसा त्यास पुरवून करण्यात येईल असे त्यांस सांगितले.

३ ग्रांट डफ म्हणतो की, हा स. १६७६ त मुंबईस मरण पावला; परंतु दुसऱ्या एकेठिकाणी असे म्हटले आहे की, हा १६७७ त सुरत येथे मरण पावला.

दुसऱ्या वर्षी (स. १६७६ त) पुनः मोरोपंत पिंगळ्यांबरोबर दहा हजार लोक देऊन व्यंकोजी दत्तोजी शिद्दीशीं युद्ध करीत होता त्याच्या मदतीस पाठविलें आणि जंजिऱ्यावरील हल्ला पुनः मोठ्या नेटानें चालू केला. त्या वेळीं तें बेट मराठ्यांच्या हातीं येण्याचा दृढ संभव दिसूं लागला. इतक्यांत शिद्दी काशीम मोगल आरमार घेऊन आला आणि त्यानें मराठ्यांचे पाण्यातील मोरचे उडवून देऊन आरमार उधळून लावले आणि जमिनीवरील मराठ्यांच्या लष्करावर तोफांचा एकसारखा भडिमार चालविला. त्यामुळे त्यांना वेढा उठवून परत जाणें भाग पडले; परंतु जंजिरा काबीज करण्याचा त्यांचा निश्चय अखेरपर्यंत राहिला. सदरील झटापटींत शिद्दीच्या हजारों लोकांचा नाश होऊन तो अगदीं डबघाईस आला; परंतु मोगलांच्या आश्रयाने तो पुनः लवकरच सावरला.

पुढे महाराज कर्नाटकांत मोहिमेवर गेले असें वर्तमान शिद्दीच्या कानी येतांच त्यानें कोंकण किनाऱ्यावर पुनः धामधूम सुरू केली. ह्या धामधुमीत त्यास मोगलांच्या आरमाराचें पूर्ण साहाय्य होतें, हें सांगावयास नकोच. त्यानें जयतापूर शहरावर हल्ला करून त्यास आग लावून दिली; परंतु तेथील ठाण्यावरच्या लोकांनी त्याच्यावर निकराचा हल्ला केल्यामुळें त्याला तेथल्या खाडींतून पुढें जातां आलें नाहीं. महाराजांच्या आरमारानें त्याचा पाठलाग केला, पण त्यास न गाठता तो आपलीं जहाजें घेऊन मुंबईच्या बंदरांत शिरला व माजगावांस उतरून तेथें मुक्काम करून राहिला.[१] येथें असता महाराजांच्या ताब्यांतील कुर्ला प्रांतांत राहाणारा एक दुष्ट ब्राह्मण शिद्दीपाशीं येऊन म्हणाला, 'तुम्ही मला साहाय्य कराल तर मराठ्यांच्या अंमलांतील कित्येक संभावित ब्राह्मणांस पकडून तुमच्या हवालीं करतो!' ह्या त्याच्या म्हणण्यास तो अर्थात् कबूल झाला आणि त्याच्याबरोबर त्यानें आपले थोडेसे लोक व एक पडाव देऊन त्यांस गुप्तपणें रवाना केलें. ह्या कृष्णकर्मांत आपलें अंग आहे असें त्यानें इंग्रजांस कळूं दिलें नाहीं. त्या दुष्ट ब्राह्मणानें शिद्दीच्या लोकांच्या साहाय्याने चार ब्राह्मण पकडून आणले. त्यास शिद्दीने कोणांस समजू न देतां आपल्या जहाजांत कैद करून ठेवले. हें वर्तमान चेऊल येथील महाराजांच्या सुभेदारास कळतांच त्यानें मुंबईतील इंग्रजांस असें जरबेचें पत्र पाठविलें कीं, 'तुमच्या बेटांत आमच्या प्रांतातले ब्राह्मण पकडून नेले आहेत त्यांस सोडवून एकदम पाठवून द्या, नाहीं तर तुमच्याकडे इकडून दाणागल्ला व सरपण जात असतें तें बंद करूं! हें कांहींच नाहीं, तर याहूनही वाईट परिणाम तुम्हांस भोगावा लागेल!' इंग्रजांस हा धमकीचा निरोप पोहोचतांच त्यांनी शिद्दीपाशीं ह्या गोष्टीचा तपास केला. त्यानें पहिल्यानें कानांवर हात ठेवले. परंतु इंग्रज अगदी जिकिरीस आले असें पाहून तो म्हणूं लागला कीं, ह्या प्रकरणांत माझे अंग मुळींच नव्हतें. शेवटीं त्याला त्या ब्राह्मणांस सोडून द्यावें लागलें. ज्या पडावांतून त्या ब्राह्मणांस आणलें होतें, त्यावरील अकरा खलाशांस इंग्रजांनीं पकडले व त्यापैकीं तिघांस देहांत शासन देऊन बाकीच्यांस सेन्ट हेलेना येथें रवाना केलें. ही गोष्ट स. १६७७ त जॉन पेटीट नामक मुंबईच्या डेप्युटी गव्हर्नरच्या कारकिर्दीत घडली.

महाराज कर्नाटकांतून परत आल्यावर मोरोपंत पेशवां वगैरे ब्राह्मण कामदारांनी त्यांजपाशीं असें गाऱ्हाणें केलें कीं, शिद्दीनें आमच्या राज्यांतील ब्राह्मणांस पकडून नेऊन त्यांची विटंबना केली आहे. यास्तव त्याचें पारिपत्य अवश्य केलें पाहिजे. हल्ली मुंबई बंदरात त्याचें आरमार असून इंग्रजांनीं त्यास मोगलांच्या आग्रहास्तव माजगांव येथें पावसाळ्यांत छावणी करून राहाण्यास परवानगी दिली आहे. तरी त्याच्या आरमारास आग लावण्यासाठी आपले लोक पाठवावे.' हें त्यांचें म्हणणें महाराजांस अर्थात् मान्य होऊन त्यांनी आपल्या आरमाराचे सरदार दर्यासारंग व दौलतखान यांस चार हजार लोकांनिशीं जुलई महिन्यांत पनवेल येथें पाठविलें; परंतु त्यांस पलीकडे घेऊन जाण्यास पुरेसे पडाव सापडताना आणि पाऊस असल्यामुळें दुसरीकडून तेथें पडाव आणण्याची सोय नव्हती. ह्याप्रमाणें त्यांची निराशा होऊन तिकडून माजगांवास येण्याचा बेत त्यांस रहित करावा लागला. मग दौलतखान तेथून

---

१ ह्या सुमारास शिद्दी संबळ यास बडतर्फ करून शिद्दी कासीम यास मोगलांनी आपल्या आरमारावर मुख्य सरदार नेमले; परंतु शिद्दी संबळ आपल्याकडचा अधिकार देण्यास प्रथम राजी होईना; परंतु शेवटी तो त्यांस देणे भाग पडले. तेव्हां तो शिवाजीमहाराजांच्या आरमारावर जाऊन राहिला, असे ऑर्मी म्हणतो.

कल्याणकडे कूच करून गेला व ठाणें प्रांतात प्रवेश करण्याची परवानगी फिरंग्यांपाशीं मागूं लागला. यांत त्याचा मनसोबा असा होता कीं, ठाण्यावरून जाऊन माहीमची खाडी ओलांडून मुंबई बेटात शिरावे आणि शिद्दीच्या छावणीवर व किनाऱ्याजवळील त्याच्या तारवांवर हल्ला करावा आणि तेथें पडाव पैदा करून जवळच ओरवा करून असलेल्या त्याच्या आरमारावर चढून त्यास आग लावून द्यावी.

महाराजांचे हे लोक पनवेलीस आल्याचे वर्तमान कळलें तेव्हां इंग्रज फारच घाबरून गेले. त्यांनीं बेटाच्या रखवालीस ठेवलेले बहुतेक शिपाई माजगांवाजवळ नेऊन ठेवले. पुढें दौलतखान आपल्या लोकांनिशीं कल्याणकडे गेला असें समजले तेव्हां त्यांनीं आपलें लष्कर माहिमास आणून ठेवले व माहिमच्या खाडींत एक लढाऊ जहाज (फ्रिगेट) आणून ठेवले; परंतु ह्या खबरदारीची कांही एक जरूर लागली नाहीं. कारण वसईच्या फिरंग्यांसही महाराजांचे लोक जवळ आल्याबद्दल दहशत वाटून त्यांस आपला साष्टी प्रांत कसा सुरक्षित राहतो याचा विचार पडला. तेथील फिरंग्यांचा सुभेदार आपलें निवडक सैन्य घेऊन ठाण्यास आला आणि त्यानें तेथील खाडींत चाळीस पडाव चांगले सज्ज करून ठेवले. ह्यामुळे दौलतखानाचा ठाण्यावरून येण्याचा मार्ग खुंटला. ह्याप्रमाणें तो सरदार निरुपाय होऊन, येवढ्या दूर इतके लोक आणले त्याचें कांहीं तरी चीज करावें म्हणून तो फिरंग्यांच्या मुलखांत शिरून गांवचे गांव लुटून उद्ध्वस्त करीत सुटला. त्यानें आपले कांही लोक दमण व सुरत या शहरांकडे लुटालूट करावयास पाठविले. इतक्यांत रायगडावरून त्यास परत निघून येण्याविषयीं हुकूम आला तेव्हां त्यास आपल्या लोकांनिशीं तिकडे जाणें प्राप्त झालें.

हा असा इंग्रजांचा आश्रय करून शिद्दी आपल्या अंमलांतील मुलखास उपद्रव करतो हें पाहून महाराजांस मनस्वी राग आला, हें साहजिक आहे. इंग्रजांनीं त्यास असा आश्रय द्यावा हें त्यांच्याशी केलेल्या सलोख्याच्या तहास अगदीं विरुद्ध होतें. पूर्वी जसे ते तिऱ्हाईतपणानें वागून शिद्दीस आपल्या बंदरांत थारा देत नसत, तसेंच त्यांनीं नेहमी करावयास हवें होतें; परंतु आंगिआर मृत्यु पावल्यापासून मोगलांच्या धाकास्तव त्यांनीं ही तटस्थवृत्ती अंमळ सोडली होती. म्हणूनच त्यांनी ह्या वेळीं शिद्दीस आपल्या बंदरांत पावसाळाभर राहूं दिलें होतें. ह्या लपंडावाबद्दल इंग्रजांस शिक्षा करण्याचें महाराजांनी मनावर घेतलें असतें तर त्यांत कांहीं अन्याय झाला नसता; परंतु महाराजांचे धोरण कांहीं निराळें होतें. मोगलांच्या पायी इंग्रज हें असें आपल्या इच्छेविरुद्ध वर्तन करीत हें त्यांस कळून चुकले होतें. तेव्हां ह्या अशा अपरिहार्य कारणास्तव त्यांच्याकडून होणाऱ्या आगळिकी बद्दल त्यांच्यावर शस्त्र धरणें त्यांस उचित दिसलें नाहीं. दुसरें असें कीं, इंग्रजांच्यामुळे त्यांच्या राज्यांत व्यापार वाढून प्रजेच्या हातांत पैसा खेळू लागला होता. शिवाय आपण मोगलांची सुरत वगैरे ठाणी सर करून शिद्दीचा जंजिरा किल्ला हस्तगत केल्यावर इंग्रजांवरचा शह नाहींसा होईल आणि मग त्यांच्या साहाय्यानें आपलें आरमार सुधारता येईल अशी त्यास उमेद होती. इंग्रज लोकांस होतां होईतों न दुखाविण्याविषयीं महाराज किती जपत याचें एक उदाहरण येथें देऊं. चेऊलचा सुभेदार पेटिट नांवाच्या एका इंग्रज व्यापाऱ्याकडे व्यापारासंबधानें थकलेल्या कांहीं बाकीची मागणी करीत होता; त्याप्रमाणेंच सुरत येथें इंग्रजांचा एक मुनीम होता, त्याच्या भावाला अशाच कांही बाकी विषयीं त्यानें एकसारखा तगादा लावला होता; परंतु त्यांनी ह्या बाकीची फेड करण्याचें बरेच दिवस दिरंगाईवर टाकले होतें. त्याबद्दल त्यांचा सूड उगविण्याचा विचार त्या सुभेदारानें मनांत आणला. ह्या वेळीं शिद्दीचें आरमार जाळण्याचा प्रयत्न फसल्यामुळें महाराजांस वाईट वाटलें होतें. यास्तव आपण ह्या संधीस इंग्रजांचा सूड घेतला तर तो महाराजांस मुळींच नापसंत होणार नाहीं असें त्याला वाटलें. मग मुंबईचे पडाव त्याच्या ताब्यांतील बंदरांत व्यापार करावयास आले होते ते सगळे त्यानें पकडले. तेव्हां मुंबईच्या काउन्सिलानें चार पडावावर साठ युरोपिअन नेमून त्यांना धरलेले पडाव सोडविण्यास पाठविलें. त्या सुभेदारानें पकडलेल्या पडावावर आपले लोक रखवालीस ठेवले होते, त्यांवर ह्या इंग्रज शिपायांनी हल्ला करून बहुतेक पडाव सोडवून आणले. इंग्रजांच्या ह्या कृत्याबद्दल त्या सुभेदारानें महाराजांकडे तक्रार केली आणि असें लिहून कळविलें कीं, 'आपल्या सत्तेचा त्यांनी उपमर्द केला आहे, तरी त्यांस अवश्य शिक्षा केली पाहिजे!' त्यांनी त्यास असा जबाब पाठविला कीं, 'इंग्रजानी

जें कांहीं केलें तें बरोबर आहे. त्यांची जहाजे व माल तुम्हीं कबजांत घेतला असेल तो त्यांचा पावता करावा!' ह्या हुकमाप्रमाणे त्या सुभेदारास करणें प्राप्त झालें.

स. १६७८ च्या अखेरीस महाराजांनी आपलें आरमार चांगलें तयार करून जंजिऱ्यास पाण्यांतून वेढा दिला व त्यावर तोफांचा भडिमार चालविला. शिद्दी काशीम हा ह्या वेळीं मुंबईच्या बंदरांत होता. त्याच्या लोकांचा मुशाहिरा थकल्यामुळें ते बेदिल झाले होते. त्याच्यापाशीं पैसा नव्हता. सुरतेच्या सुभेदाराकडे त्यानें कांहीं पैसा मागितला होता; पण तो वेळेवर आला नाहीं म्हणून त्याला तेथून हलतां येईना. अशा रीतीनें शिद्दी तिकडें निरुपाय होऊन अडकून पडला तरी जंजिरा कांही केल्या महाराजांच्या हातीं येईना. तेव्हां ह्या वेळीही त्यांस तो वेढा उठवून जावें लागलें.

महाराजांनी ह्या वेळीं असें मनांत आणले कीं, शिद्दीशीं आजपर्यंत केलेल्या झटापटींत आपणांस यश येत नाहीं याचे मुख्य कारण हें होय कीं, त्यास वाटेल तेंव्हा मुंबईच्या बंदरांत दडी मारून राहाता येतें. इंग्रज मध्यें नसतील तर त्याच्याकडून आपल्या मुलखास उपद्रव घडणार नाहीं. इंग्रजांचा त्यास हवा तेव्हां आश्रय मिळून आपल्या राज्यांत मनसोक्त धुडगूस घालता येतो. यास्तव शिद्दीची व मोगलांची मुंबई बंदराजवळील हालचाल साधेल तेवढी बंद पाडण्याची व इंग्रजांसही पुरे धाकांत ठेवण्याची कांहीं तरी तजवीज केली पाहिजे. असा विचार करून त्यांनीं ही पुढील युक्ती काढली. मुंबईपासून बारा मैलांच्या अंतरावर खांदेरी व उंदेरी अशी दोन लहान बेटें आहेत. ही समोरील किनाऱ्यावरून दोनतीन मैलांच्या अंतरावर आहेत. ह्या बेटांत कधींच कोणी वस्ती केली नसून त्यावर पुष्कळ रान होते. ह्या बेटांतून इंग्रजांस कधींकधीं सरपण मिळत असे. ह्याहून दुसरा कांहीं उपयोग त्यांचा होईल असें कोणांस कधीं वाटलें नव्हतें. ह्या बेटावरून मुंबई बंदरांत जाणाऱ्या येणाऱ्या प्रत्येक जहाजावर नजर ठेवता येऊन शत्रूची तिकडील हालचाल हवी तेव्हां कळण्याजोगी आहे असें महाराजांच्या लक्षांत आलें. त्यांनीं तीं आपल्या ताब्यांत घेऊन त्यावर मजबूत किल्ले बांधण्याचें मनांत आणले आणि आपले तीनशें शिपाई व तितकेच मजूर शस्त्रें व विखणें मुबलक देऊन प्रथम खांदेरीबेटावर पाठविले व तटबंदीचें काम झपाट्याने सुरू केलें. हें वर्तमान इंग्रजांस कळले तेव्हां ते मोठ्या फिकिरींत पडले. ह्या बेटांवर महाराजांचें ठाणें झालें असतां आपणांस किती धोका आहे हें त्यांच्या तेव्हांच लक्षांत आलें. यास्तव ते म्हणू लागले कीं, 'ह्या बेटांवर आपला हक्क आहे. फिरंग्यांनीं मुंबईबेटाबरोबरच ही बेटें आम्हांस दिली होतीं.' तिकडे वसईचे फिरंगीही त्यांवर हक्क सांगू लागले. ते म्हणाले कीं, 'ह्या बेटांवर इंग्रजांचा मुळींच हक्क नाहीं. हीं आज पुष्कळ वर्षे आमच्याच ताब्यांत आहेत. आम्ही त्यांवर वसाहत करणार होतों परंतु त्यांवर विहिरी खणल्या त्यांस गोडें पाणी लागलें नाहीं, म्हणून तो बेत आम्ही रहित केला.' महाराजांनी ह्या त्यांच्या म्हणण्याकडे मुळींच लक्ष पुरविलें नाहीं.

इंग्रजांनी महाराजांस हरकत करण्याचा निश्चय केला. त्यांनी तीन शिबाडें तयार करून त्यांवर चाळीस युरोपियन नेमले व त्यांस असें सांगितलें कीं, 'शिवाजीमहाराजांची तारवें खांदेरीजवळ येऊ देऊं नका व बेटावर त्यांचे अंमलदार आहेत त्यांस आपले लोक घेऊन निघून जावयास सांगा!' ह्याप्रमाणें ही शिबाडें त्या बेटापाशीं गेलीं आणि त्यावरील अंमलदारांनी महाराजांच्या लोकांस तेथून निघून जावयास सांगितलें. त्यावर त्यांनी असा जबाब दिला कीं, 'आमच्या धन्याच्या हुकमावाचून आम्ही आमची कामगिरी सोडून जाणार नाही! मग ही इंग्रजांची तारवें त्या बेटासभोवतीं दहा दिवस घिरट्या घालीत होतीं व शेवटीं वादळ झालें तेव्हां तीं तेथून परत गेली. इंग्रजांनीं त्याबरोबर आणखी एक रिवेन्ज नांवाचें फ्रिगेट देऊन ती पुनः खांदेरीकडे रवाना केलीं. ह्या रिवेन्जवर सोळा तोफा होत्या. ही इंग्रजाची तारवें पुन: खादेरीजवळ फिरूं लागली. एका शिबाडावरचा लेफ्टनन्ट दारू पिऊन छाकटा झाला होता. तो आपलें शिबाड बेटाला लावून आपल्या हाताखालच्या लोकांनिशीं वर चढला. तेव्हां त्यांची व महाराजांच्या लोकांची झटापट होऊन त्या अंमलदारास व आणखी सहा इंग्रज शिपायांस त्यांनी ठार मारून बाकीच्यांस कैद करून ठेवले आणि त्यांचें तें तारू किनाऱ्यावर ओढून घेऊन बांधून ठेवले. वारा जोराचा सुटला असून भरतीचें ताण असल्यामुळें दुसऱ्या शिबाडांस त्याच्या मदतीस जावयाला मुश्कील पडली. त्यांचा काहींच इलाज चालेना व अनुकूल वारा लागून लाटांचा जोर कमी झाला तरी त्यांस खांदेरीजवळ जाण्याचे धैर्य होईना.

मराठ्यांचीं तारवें खांदेरीजवळ येतील त्यांस प्रतिबंध करण्याचें काम त्या तारवांवरच्या इंग्रज शिपायांस सांगितले होतें, परंतु तेही त्यांच्याकडून नीट होईना. मराठ्यांची तारवें रात्रीचीं झपाट्याने येऊन तटबंदीस लागणारा मालमसाला व लोकांस लागणारी अन्नसामग्री आणून पोहचवीत आणि तशींच त्वरेनें परत जात. त्यांचा पाठलाग इंग्रजांच्या जहाजांच्यानें होत नसे. याचें मुख्य कारण असें होतें कीं, मराठ्यांच्या पडावाच्या वल्ह्यांची व तारवांची रचना अशी होती कीं, तीं वारा किंवा लाटा कितीही प्रतिकूल असल्या तरी जलद चालत; इंग्रजांची तारवें तशी जलद चालत नसत. शिवाय त्यांचा जमाव फार थोडा असल्यामुळें त्यांस मराठ्यांवर हल्ला करण्याचें धैर्यही होत नसे. म्हणून इंग्रज अंमलदारांनी आपल्या वरिष्ठांपाशीं आणखी कुमक मागितली. त्यावरून त्यांनीं आणखीं कांहीं जहाजें भाड्यानें घेतलीं आणि त्यांवर लोक नेमून तीं खांदेरीकडे रवाना केलीं. असें सांगतात की, ह्या बेटापाशीं इंग्रजांची एकंदर आठ जहाजें होती. एक फ्रिगेट, दोन गुराबा, तीन शिबाडें व दोन मचवे. ह्या जहाजांवर युरोपियन व इतर शिपाई मिळून एकंदर दोनशे लोक होते. ह्याशिवाय आणखी खलाशी होते.

दौलतखानाच्या हाताखालील आरमार खांदेरीच्या समोर चेउलजवळ ओरवा करून होतें. तेथून प्रत्येक रात्री कांहीं जहाजें तो बेटावर पाठवी आणि शत्रूचा पाठलाग होण्यापूर्वी तीं पुनः त्या आरमारापाशीं येत. एके समयीं दौलतखानानें आपलें आरमार तेथून उठवून बेटाकडे चालविले. तें इतक्या त्वरेनें चाललें होतें कीं, इंग्रजांची तारवें नांगर ओढून घेऊन तयार होण्यापूर्वी तें त्यांच्या जवळून पार निघून गेलें. जाताजाता त्यानें इंग्रजांचें एक गुराबा हातीं लागलें तें पकडून नेले. तेव्हां इंग्रजाची बाकीची जहाजें तेथून पळत सुटली. एकटे रिव्हेन्ज मात्र धीर धरून राहिलें; पण त्यास मराठ्यांच्या आरमाराने चोहोंकडून घेरले. रिव्हेन्जवर तोफा चांगल्या रचल्या असल्यामुळें त्याच्यावरून होणाऱ्या सरबत्तीपुढें महाराजांचा टिकाव लागेना. ह्या वेळीं ह्या रिव्हेन्जच्या कॅप्टनने आणखी अशी दगाबाजी केली कीं, आपली शिडें पाडून आपण हतवीर्य होऊन शरण आल्याचा बहाणा केला. हा दौलतखानास खरा वाटून तो त्याच्याजवळ चोवीस गुराबांनिशीं आला आणि त्या इंग्रज जहाजावर आपले लोक पाठविण्यासाठी त्यानें होड्या पाण्यांत लोटल्या. त्याबरोबर त्या कॅप्टनानें तोफांची एकदम सरबत्ती सुरू केली. त्यामुळें मराठ्यांचें बरेंच नुकसान झालें आणि त्यांचीं पाच जहाजें फुटून बुडाली.[१] ही अशी त्यांची झटापट चालली असतां तिकडे बेटावर कांहीं आणखी लोक, अन्नसामुग्री व मालमसाला पोहोचवून पडाव निघून गेले. ह्याप्रमाणें आपली मुख्य कामगिरी शेवटास गेली असें पाहून दौलतखानानें आपलें आरमार नागोठण्याच्या बंदराकडे चालविले. इंग्रजांचें फ्रिगेट कांहीं वेळ त्याच्या मागून गेलें; पण तें आरमार दूर निघून गेलें तेव्हां तें परत आलें.[२] ह्याप्रमाणें दौलतखानानें नागोठण्याच्या खाडींत राहून खांदेरीवर लागणारी सामुग्री पुरविण्याचा क्रम एकसारखा चालविला होता. त्यास इंग्रजांच्या जहाजांकडून म्हणण्यासारखा कांही एक प्रतिबंध झाला नाहीं.

ही अशी खांदेरीपाशी मराठ्यांच्या व इंग्रजाच्या जहाजांची धावपळ चालली असतां महाराजांनी पाच हजार लोक कल्याणास पाठविले. त्यांनीं पूर्वीप्रमाणेंच पुनः वसईच्या फिरंग्यांपाशीं ठाण्यावरून मुंबईकडे जाण्यास परवानगी मागितली, ती ते देईनात. हें मराठ्यांचें सैन्य कल्याणकडे आल्याची बातमी मुंबईच्या इंग्रजांस कळतांच त्यांना मोठी धास्ती पडली. फिरंग्यानीं त्यास आपल्या प्रांतांतून येण्याची परवानगी दिली किंवा त्यांस पुरेतसे पडाव मिळाले तर ते आपल्या बेटावर खास चालून येतील असें त्यांस वाटू लागलें. पूर्वीसारखा माजगावांपाशीं किंवा माहिमपाशीं बंदोबस्त करण्याचेंही त्यांस आतां अनुकूल नव्हतें. कारण ह्या वेळीं त्यांचे बहुतेक शिपाई व सर्व जहाजें खांदेरीपाशीं गुंतली होतीं. हें असें संकट प्राप्त झालें तेव्हां ते अगदी घाबरून गेले व त्यांनीं रायगडावर आपला वकील तहाचें बोलणें करण्यासाठी पाठविला.

---

१ ह्या झटापटीत जी इंग्रजांची गुराबे पळून जाऊन किनाऱ्यास लागली होती ती दौलतखानाने हस्तगत केली आणि अगोदर एकतर त्याने काबीज केलेच होते. ह्याप्रमाणें रिव्हेंज फ्रिगेटच्या मदतीस पाठविलेल्या खास गुराबांपैकी सहा दौलतखानाच्या हाती ह्या वेळीं लागली असे म्हणतात.

२ आर. ॲन्ड ओ स्ट्राची याचे 'किंगविंन्स रिबेलियन' पृ. ३८ व ३९ पाहा.

इकडे खांदेरीपाशीं इंग्रजांची जहाजें जमा होऊन मराठ्यांच्या आरमारास अटकाव करण्याचा प्रयत्न त्यांनी चालविला होता तरी त्यांस न जुमानतां मराठ्यांचें पडाव त्या बेटापाशीं मालमसाला घेऊन एकसारखे येतच होते. इतक्या अवकाशांत बेटावर तोफा लावण्याचें काम पुरें करून त्या ते इंग्रजांच्या आरमारावर सोडूं लागले. त्यामुळें त्यांस आपलीं जहाजें तोफांच्या माऱ्याबाहेर न्यावीं लागली इतक्यांत सुरतेहून कांहीं जहाजें त्यांच्या मदतीस आलीं. त्यांत हंटर नांवाचें फ्रिगेट होतें. त्यावर सोळा तोफा असून छत्तीस युरोपिअन होते. ही अशी कुमक मिळाल्यावर इंग्रजांस थोडा धीर आला व नागोठण्याच्या खाडीच्या तोंडावर राहून मराठ्यांचीं जहाजें बाहेर न येऊं देण्याचा त्यांनीं प्रयत्न चालविला; परंतु हा त्यांचा प्रयत्न व्यर्थ झाला. कारण त्या खाडीस दुसरीकडून वाट होती; त्या वाटेनें मराठ्यांचे पडाव बेलाशक बाहेर पडून बेटाकडे जात-येत. मग इंग्रजांनीं असा विचार केला कीं, खाडींत शिरून मराठ्यांच्या आरमारास आग लावून द्यावी; परंतु हा त्यांचा बेत मुंबईच्या गव्हर्नरास व सुरतेच्या अध्यक्षासही पसंत पडला नाहीं. कारण अशानें शिवाजीमहाराज अतिशयित संतापून आपला पुरा धुव्वा उडवून देतील अशी त्यास दहशत वाटत होती. शिवाय रायगडावर पाठविलेल्या वकिलानें महाराजांशीं पुनः तह केल्यावर हा कलह मिटेल अशी त्यांना आशा होती.

ह्याप्रमाणें महाराजांनी खांदेरी-उंदेरीवर आपली ठाणी घालण्याचा उद्योग जारीनें चालविला असून इंग्रजांकडून त्यांस कांही एक अटकाव होईना व फिरंगी तर तटस्थ होऊन राहिले होते, हें वर्तमान सुरत येथील मोगल सुभेदारास कळलें तेव्हां त्यासही मोठी दहशत वाटली. आजपर्यंत शिवाजीमहाराजांचें प्राबल्य जमिनीवरच विशेष झालें होतें, तें आता समुद्रावरही स्थापित होऊन आपला दोहोंकडून कोंडमारा होण्याचा समय आला असें त्यास वाटू लागलें. सुरतेचें महत्त्व काय तें परदेशांतील व्यापारामुळें वाढलें होतें. त्या व्यापारावर महाराजांचा पुरा शह बसून सुरत शहर व दुसरीं बंदरे लवकरच त्यांच्या हाती जातात असें भय त्यास वाटले. की, आपला जंजिरा आतां महाराजांच्या हातीं जाऊन आपला नायनाट खास होईल.

त्यानें ह्या वेळीं महाराजांच्या आरमारास प्रतिबंध करावा; परंतु त्याचे लोक मुशाहिरा न मिळाल्यामुळें नाराज झाले होते. तो मोगलांपाशीं कांहीं द्रव्य साहाय्य मागत होता; परंतु तें द्यावे कीं देऊं नये ह्या विचारांत मोगल बादशहा होता. इतक्यात महाराजांनी हें नवीन ठाणें समुद्रांत बसवून सर्वांसच शह देण्याचा बेत केलेला पाहून त्यानें शिद्दीस हवें होतें तेवढें साहाय्य करून व आपलींही जहाजे त्याच्या मदतीस देऊन मराठ्यांच्या आरमारावर रवाना केलें. शिद्दी आपल्या आरमारासह मुंबईच्या बंदरांत येऊन पहिल्यानें तेथल्या इंग्रज काउन्सिलास भेटला. त्याच्याशी कांहीं खलबत केल्यावर तो इंग्रजांच्या कुमकेस म्हणून खांदेरीजवळ गेला. शिद्दीने बेटाभोवतीं फिरून त्याची बारकाईने पाहणी केली आणि इंग्रज अंमलदारांशी असें बोलणे लावले कीं, 'तुम्ही मला मदत कराल तर हा मराठ्यांचा किल्ला मी हस्तगत करतो.' हें त्याचें बोलणें त्यांस योग्य वाटलें नाहीं. कारण त्यांस असें कळून चुकलें होतें कीं, 'शिद्दी आपल्या मदतीनें हें बेट सर करून बळकावून बसेल व मग त्याच्याकडून आपणांस फार त्रास होईल. त्यापेक्षा शिवाजीमहाराजांकडून होणारा त्रास पतकरला.' म्हणून ते शिद्दीस साहाय्य करण्यास अळमटळम करूं लागले.

शिद्दीस इंग्रज मदत करीतना तेव्हां त्यानें स्वत: बेटावर आपल्या जहाजांवरून तोफा सोडण्यास आरंभ केला आणि बेटावरूनही मराठ्यांनी आपल्या तोफांचा भडिमार सुरू केला. हा सगळा प्रकार इंग्रज लोक तटस्थ वृत्तीने पाहात राहिले. हें त्यांचें वर्तन पाहून मराठ्यांच्या आरमारानें त्यांस उपद्रव देण्याचें सोडून सगळा रोख आपला हाडवैरी जो शिद्दी त्याच्यावर धरला. ह्या वेळीं रायगडावर इंग्रजांचा वकील जाऊन तहाचें बोलणें करीत आहे हें शिद्दीस समजलें होतें. ह्या बोलण्यात बिघाड करण्याच्या हेतूनें त्यानें आपली कांहीं जहाजें मुंबईच्या बंदरात नेऊन महाराजांच्या प्रांतांत प्रवेश केला आणि तिकडील चार गांव जाळून उद्ध्वस्त करून पुष्कळ माणसें पकडून आणली.

ह्याप्रमाणें शिद्दीचें व इंग्रजांचें आरमार खांदेरी बेटापाशीं घिरट्या घालीत असतां त्याची परवा न करता नागोठण्याच्या खाडींतून मराठ्यांचे पडाव बेटास येऊन लागत व अन्नपाण्याची व दारूगोळ्याची सामुग्री त्यावरील लोकांस एकसारखी पुरवीत. आपलीं सर्व जहाजे घेऊन एकदां शत्रूंच्या मुकाबल्यास जातें, असा विचार करून दौलतखानानें नागोठण्याच्या खाडीच्या तोंडाशीं आपल्या कांहीं गुराबा आणल्या. हीं मराठ्यांचीं जहाजें बाहेर येऊं पाहातां आहेत असें शिद्दीच्या व इंग्रजांच्या दृष्टीस पडून त्यांस प्रतिबध करण्याच्या इराद्यानें त्यांनी आपलीं आरमारें तिकडे फिरविलीं. हा शत्रूंचा जमाव पाहून मराठ्यांच्या आरमाराने माघार घेतली व शत्रू आंत शिरूं नयेत म्हणून खाडीचे तोंड अडविण्यासाठीं कांहीं पडाव दौलतखानानें तेथें ठेवून दिले. हे पडाव आपल्या आरमारापाशीं रात्रीचे अकस्मात् येऊन त्यास आग लावून देतील ह्या भीतीनें शिद्दीनें तें तेथून काढून नेलें आणि इंग्रजांचे आरमार एकटेंच तेथें टेहळणीस राहिलें. शिद्दी पुनः बेटाकडे वळून त्यावर तोफांचा भडिमार करूं लागला परंतु मराठ्यांनीं त्याला बिलकूल दाद दिली नाहीं.

खांदेरीवर मराठ्यांनीं तोफा वगैरे रचून उत्तम बंदोबस्त केल्यामुळें तें हस्तगत होण्याचा आतां संभव नाहीं असें पाहून शिद्दीनें मोठी शिताफी करून उंदेरीवर आपल्या तोफा व माणसें चढवली आणि इंग्रजांस असें कळवले कीं, 'हें बेट मी आपल्या ताब्यात घेणार!' हें त्याचें कृत्य पाहून दौलतखान आपल्या आरमारानिशीं खाडीबाहेर पडला व त्याच्या आरमारावर चालून गेला. दोन्ही पक्षांचें तुंबल युद्ध झालें. त्यांत कोणाचीच सरशी झाली नाहीं. इंग्रज लोकांची जहाजें त्या ठिकाणी जाऊन पोहोचण्यापूर्वी हें त्यांचें युद्ध संपले. मग दौलतखानानें उंच ठिकाणी तोफा चढवून उंदेरीवर मारा सुरू केला व खांदेरीवरूनही त्या बेटावर तोफांची सरबत्ती होऊं लागली. हा असा उभय पक्षांकडचा मारा कांहीं दिवस सारखा चालला होता. मग पुनः दौलतखान आपल्या आरमारानिशीं शिद्दीच्या आरमारावर तुटून पडला. उभय पक्षाचे चार तासपर्यंत मोठ्या निकराचें युद्ध झालें. ह्या लढाईत मराठ्यांच्या चार गुराबा व चार लहान जहाजें नाश पावलीं व सुमारें पाचशें लोक प्राणांस मुकले. पुष्कळ लोक शिद्दीच्या हातीं लागले व दौलतखान जखमी झाला. ह्या लढाईत शिद्दीचे फारसे नुकसान झालें नाहीं असें म्हणतात. ह्या लढाईनंतर मराठ्यांचें उरलेले आरमार आपल्या घायाळ झालेल्या सरदारास घेऊन राजापुरास गेलें. तेथें फुटलेल्या जहाजांची दुरुस्ती करून नवीन माणसांची भरती केली व पुनः तें आरमार शत्रूंशी लढण्यास तयार झालें.

तिकडे रायगडावर जो इंग्रजांचा वकील तहाचें बोलणे लावण्यासाठीं गेला होता त्यास अनुकूल जबाब मिळून महाराजांनी आपला वकील मुंबईस तहाचीं बोलणी करण्यासाठीं पाठविला. ही महाराजांची अनुकूलता पाहून इंग्रजांनी खांदेरी बेटाजवळील आपलें आरमार परत बोलाविलें व शिद्दीस जो नुकताच विजय मिळाला होता तो आपणांस मुळींच पसंत नाहीं असें दर्शविलें. महाराजांचा वकील मुंबईस येऊन तह ठरवीत आहे तो मोडेल तर पाहावें, असा विचार करून शिद्दीनें मराठ्यांच्या गुराबा पकडल्या होत्या. त्या मुंबईस विकावयास पाठविल्या व मुंबईच्या बंदरांत आपल्या आरमारांनिशी येण्याविषयीं तो इंग्रजांपाशीं परवानगी मागूं लागला. ती त्यांनी त्यास अर्थात् दिली नाहीं. तेव्हां तो पेनच्या खाडींत शिरून दोन्हीं किनाऱ्यावरील गांव जाळून उद्ध्वस्त करूं लागला. ह्या धामधुमींत त्यानें हजारांहून अधिक लोक पकडून नेले असें म्हणतात.

शिद्दीची अशी गडबड चालली असतां मुंबईस स. १६८० च्या मार्च महिन्यांत महाराजांचा व इंग्रजांचा पुनः तह झाला. त्यांत स. १६७४ त केलेला तह कायम केला व शिद्दीच्या आरमारास इंग्रजांनी आपल्या बंदरांत पावसाळ्यात आश्रय देऊं नये आणि दिलाच तर त्यांनी त्याच्याकडून महाराजांच्या मुलखास किमपि उपद्रव न करण्याचा करार करून घ्यावा असें ठरलें.

ह्या तहानंतर खांदेरी व उंदेरी हीं बेटे महाराजांच्या ताब्यांत आलीं. एकट्या शिद्दीला मराठ्यांस त्या बेटावरून काढून लावण्याचें सामर्थ्य नव्हतें. उंदेरीवर त्यानें वर सांगितल्याप्रमाणें आपल्या तोफा चढविल्या होत्या, पण दोन्ही बाजूंकडून होणाऱ्या मराठ्यांच्या माऱ्यापुढें तेथें त्याचा निभाव न लागून तें बेट आपल्या स्वाधीन ठेवण्याचा विचार त्यास सोडावा लागला. ही आपल्या बंदराजवळील दोन्ही बेटें मराठ्यांच्या ताब्यांत जाऊन त्यांवर त्यांची ठाणीं बसलीं याबद्दल इंग्रजांस पुढें मोठें वैषम्य वाटूं लागलें. तीं आपल्या ताब्यांत असावीं असें त्यांच्या मनांत फार होतें. यास्तव मराठ्यांशीं लढून तीं परत घेण्याविषयीं त्यांनी कोर्ट ऑफ डायरेक्टर्स यापाशीं परवानगी मागितली; परंतु त्यांस ती मिळाली नाहीं. त्या कोर्टाचे असें म्हणणें पडलें कीं, मराठ्यांसारख्या प्रबळ लोकांशी वैमनस्य करून आपणांस तेथें थारा नाहींसा करण्यात कांहीं शहाणपणा नाहीं.

ही बेटें कबजांत घेऊन पुढें ज्या गोष्टी कराव्या असें महाराजांच्या मनांत होतें त्या सिद्धीस न्यावयास महाराज जगले नाहींत. ही खांदेरीबेटाजवळील धामधूम संपल्यानंतर लवकरच त्यांचें देहावसान झालें.

***

भाग एकुणतिसावा

सज्जनसेवा

एथपर्यंत आमच्या महाप्रतापी चरित्रनायकाचें जीवनवृत्त कथन केलें आहे. त्यांत त्यांच्या अंगच्या शौर्य, वीर्य, औदार्य, राजकार्यनिपुणत्व, प्रजापालनपटुत्व, युक्तिमत्ता, बुद्धिमत्ता, मातृपितृभक्ती इत्यादी उज्ज्वल गुणांचें दिग्दर्शन अनेक प्रसंगीं झालें आहे. तशीच त्यांच्या ठायींची धर्मशीलताही कित्येक प्रसंगी व्यक्त झाली आहे. ही वृत्ती महाराजांच्या ठायीं केवढी निःसीम वसत होती हें साधुसमागम व साधुसेवा याविषयी ते सर्वदा किती सोत्कंठ असत तें सांगितल्यानें प्रत्ययास येणारें आहे. यास्तव ह्यासंबंधाच्या काही गोष्टींचें निरूपण प्रकृत भागांत करूं.

सदाचारसंपन्न व धर्मशील मातेच्या सहवासानें महाराजांच्या ठायीं धर्मबुद्धी अगदीं अल्प वयापासून जागृत होऊन तिची वृद्धी कथापुराणादिकांच्या श्रवणाने उत्तरोत्तर होत गेली होती. पुढें दादाजी कोंडदेवासारख्या धर्मपरायण व पापभीरू पुरुषाच्या देखरेखीखाली त्यांचें कांही वय गेल्यामुळें ह्या वृत्तीचा परिपोष विशेषच झाला होता. हें जें वळण त्यांस तरुण वयांत प्राप्त झालें तें आमरण कायम राहिलें होतें. ह्या उज्ज्वल वृत्तीस्तव त्यांस नेहमीं असें वाटे कीं, केवळ ऐहिक ऐश्वर्यप्राप्तीनें जीवितसाफल्य व्हावयाचें नाहीं, तर खरें जीवितसार्थक्य परलोकसाधनांतच आहे. महाराजांच्या वेळीं महाराष्ट्रांत भागवतधर्माचा सर्वत्र प्रसार होऊन भक्तिमार्गाचे सुलभ साधन सर्व जातींच्या व सर्व दर्जांच्या लोकांस संतमंडळाच्या बोधानें अनुकूल झालें होतें. मुकुंदराज, ज्ञानदेव, नामदेव, एकनाथ वगैरे पूर्वकालीन संतमंडळाचा चरित्रमहिमा व बोधामृत यांचें श्रवण महाराजांस नेहमीं घडत असे. त्याप्रमाणेंच मुक्तेश्वर, रामदासस्वामी, वामनपंडित, तुकारामबावा, जयरामस्वामी, रंगनाथस्वामी, आनंदमूर्ती, केशवस्वामी इत्यादी महासाधू व ग्रंथकार महाराजांचे समकालीन असून त्यांची कीर्ती व कांहीं कवनेंही महाराजांच्या कानी वेळोवेळां पडत असत. शिवाय त्या काळीं पंढरीस वर्षांतून दोन वेळां लक्षावधी भगवद्भक्तांचा मेळा जमत असे. ह्या वारीस बहुतकरून प्रत्येक गांवांतून वारकरी ज्ञानदेव नामदेवादिकांचें अभंग गात व विठ्ठलनामाचा घोष करीत पंढरीस जात. ही अशी धर्मजागृती एकंदर महाराष्ट्रांत त्या काळीं झाली असल्याकारणानें तिचा सुपरिणाम महाराजांचे मनावर व्हावयास विलंब लागला नाहीं, हें स्पष्टच आहे.

महाराजांनी स्वराज्यस्थापनेस ज्या प्रांतांत आरंभ केला त्यांत ज्ञानदेव व तुकारामबावा ह्या महासाधूंचीं आळंदी व देहू हीं ठिकाणे आहेत. तेव्हां अर्थात् त्यांच्या संबंधाच्या गोष्टी व त्यांनी केलेल्या बोधप्रचुर कविता लहान वयापासूनच त्यांस ऐकावयास मिळाल्या होत्या. त्यांतून तुकारामबावांची उत्कृष्ट कीर्तनें तर त्यांस लहानपणापासूनच ऐकावयास मिळालीं होतीं. त्यामुळें ह्या महासाधूविषयीं महाराजांच्या मनांत अत्यंत आदरबुद्धी वसत असे. तुकारामबावार त्या काळच्या कीर्तनकारांत अग्रणी असून पराकाष्ठेचे भाविक व प्रेमळ भगवद्भक्त असल्याकारणानें त्यांची बोधवाणी अत्यंत प्रासादिक व मनोवेधक असे. यास्तव महाराजांस त्यांची कीर्तनें ऐकण्याचा अतिशय उल्हास असे. तुकारामबावा वेळोवेळी पुण्यास येऊन कीर्तने करीत. तीं ऐकावयास ते जात असत. शिवाय कोठें आसपासच्या गांवांत त्यांचें कीर्तन होणार आहे असें कळल्यास ते रात्रीचे त्या गांवीं जाऊन कीर्तनश्रवणाचा लाभ अवश्य साधीत असत. तुकारामबावांचें कीर्तन श्रवण करण्याचा हव्यास महाराजांस किती होता याचे एक उदाहरण येथें देऊं.

कोणे एके समयी तुकारामबावांस कांहीं भाविक लोकांनी पुण्यास आणून त्यांचीं कीर्तनें घरोघर करण्याचा क्रम आरंभिला. ह्या वेळीं महाराज सिंहगडावर होते. त्यांना हें वर्तमान कळल्यावरून ते दररोज रात्रीं गडावरून पुण्यास कीर्तने ऐकावयास येऊं लागले.[१] ते नेहमी रात्रीं पुण्यास येतात असें यवनांस कळल्यावरून ते त्यांच्या पाळतीस राहिले. एके दिवशी एका वाण्याच्या घरीं कीर्तन असून शिवाजीमहाराज तें ऐकावयास येणार आहेत अशी बित्तम बातमी चाकणच्या यवन किल्लेदारास कळतांच त्यानें दोन हजार पठाण महाराजांस पकडून आणण्यासाठी त्या ठिकाणीं पाठविले. ह्या पठाणांनीं त्या वाण्याच्या घरास वेढा घातला. त्यांनी महाराजांस पूर्वी कधींही पाहिले नसल्यामुळें कीर्तन ऐकावयास बसलेल्या एकंदर लोकांस पकडून नेण्याचा बेत केला. हें अरिष्ट पाहून कीर्तन श्रवण करावयास बसलेले लोक घाबरून जाऊन गलबला करूं लागले. तुकाराममहाराजांनीं गडबड कशाची म्हणून विचारितां त्यांस तें संकट निवेदन केलें आणि म्हटलें कीं, शिवाजीमहाराजांस येथून पळून जाण्याची आज्ञा व्हावी. तेव्हां तुकारामबाबा म्हणाले कीं, कीर्तन चाललें असतां मध्येंच उठून जाऊं नये असें आहे. आज एकादशी आहे. अशा सुदिनीं आपणा सर्वांस हरिकथा श्रवण करीत असतां मरण प्राप्त झालें तर आपलें मोठेच भाग्य समजावयाचें. विठ्ठलाच्या भक्तीत गुंतले असतां मृत्यू आला तर कैवल्य प्राप्त होऊन जन्ममरणाची येरझार चुकेल. ह्यासाठीं येथून कोणींही निघून जाऊं नये. असें म्हणून बावांनी विठ्ठलनामाचा गजर करून देवाचा परम सद्‌गदित अंतःकरणानें धावा चालविला. इकडे महाराजही अशा समयीं कीर्तनांतून उठून जावयाचें नाहीं असा निर्धार करून जागच्या जागीं मोठ्या धैर्यानें बसून राहिले. तेव्हां त्यांच्याबरोबर जे विश्वासू नोकर आले होते त्यांपैकीं एकाने आपल्या धन्यावर आले हे संकट निवारण्याची अशी युक्ती योजिली कीं, तो राजांचा शिरपेंच चढवून एका घोड्यावर बसून यवनांस दिसेल अशा रीतीनें तेथून निसटून गेला. त्याला असा हळूच भरधांव घोडा टाकून पळून जातांना पाहून यवनांस वाटलें कीं, हे शिवाजीमहाराजच पळून जात आहेत. म्हणून त्यांनी आपले घोडे त्याच्या मागोमाग भरधांव सोडले. तीं चांदणी रात्र असल्यामुळे तो मराठा स्वार जिकडे पळत गेला त्या दिशेनें त्यांनीं त्याचा पुष्कळ वेळपर्यंत पाठलाग केला; परंतु तो कांहीं केल्या हातीं लागेना. शेवटी चंद्र अस्तास जाऊन चोहोंकडे काळोख पडला. इतक्यांत तो स्वारही आडवाटेनें निसटून पार निघून गेला. त्या वाण्याच्या घरापाशीं कांही पठाण होते तेही आपल्या सोबत्यांच्या मागोमाग निघून गेले आणि कीर्तनास असलेले लोक निर्भय होऊन आपआपल्या ठिकाणी गेले. महाराजही तुकारामबावांचा निरोप घेऊन रातोरात सिंहगडावर निघून गेले.[२]

तुकारामबावांच्या बोधाचा परिणाम महाराजांच्या हृदयावर होत असे याचें एक उदाहरण आहे. तें असें. एके समयीं तुकारामबावा लोहगांवास येऊन रात्रीस घरोघर कीर्तनें करीत आहेत असें ऐकून महाराज त्यांपैकीं एक श्रवण करावयास एकदां आपल्या बरोबरच्या लोकांसह गेले. कीर्तनास आरंभ होऊन पहिलें मंगलाचरणच अशा थाटानें सुरू झालें कीं, तें ऐकून महाराज अगदीं थक्क होऊन गेले. भाविक श्रोत्यांचीं चित्ते प्रेमभरानें उचंबळून जो तो देहभान विसरून टाळ्याचुटक्या वाजवीत व मुखानें विठ्ठलनामोच्चारण करीत नाचूं लागला. असा अद्‌भूत भक्तिरस महाराजांनी पूर्वी कधींही अनुभविला नव्हता. पुढें प्रतिपादन सुरू झालें. त्यांत तुकारामबावांनी वैराग्यवृत्तीचें महत्त्व व लक्षण वर्णन करून विठ्ठलावांचून ह्या विश्वामध्यें दुसरें कांहींच थोर नाहीं, आपल्या जीविताचें सार्थक ज्यास करावयाचें असेल त्यानें विठ्ठलभक्तीचा सोपा मार्ग स्वीकारावा, असा अनेक दाखले देऊन व मधूनमधून तात्कालिक स्फूर्तीनें प्रासादिक अभंग म्हणून श्रोत्यांस बोध केला. ऐहिक वैभवाची व ऐश्वर्याची अस्थिरता, सुखविषयांची अनर्थावहता व जीविताची क्षणभंगुरता श्रोतृवृंदाच्या मनात पूर्णपणें ठसण्यासारखा त्यांचा तो बोध श्रवण करून महाराजांच्या चित्तवृत्तीत विलक्षण

१ हीं कीर्तनें लोहगावीं होत होतीं असें एके ठिकाणी म्हटलें आहे.

२ हें अरिष्ट देवानें शिवाजीमहाराजांचे रूप धारण करून त्या पठाणांस आपल्या मागून धावावयास लावून निवारण केलें, असा भाविक लोकांचा त्या वेळीं समज झाला. महिपतीने व चिटणिसानें आपल्या ग्रंथांत हाच समज कायम ठेविला आहे; परंतु आपल्या धन्याचा जीव वांचविण्यासाठी आपला प्राण संकटांत घालण्याचें साहस करण्यास तयार होणाऱ्या स्वामिभक्तांची कमताई त्या काळीं नव्हती.

पालट झाला. ते मूळचेच भाविक व सुवृत्त असल्यामुळें तुकारामबावांचें ते बोधामृतप्रचुर वक्तृत्व श्रवण करून त्यांचें चित्त तल्लीन झालें आणि त्यांच्या उपदेशानुसार वर्तन केल्यास निःसंशय कैवल्यप्राप्ती होईल अशी त्यांच्या प्रेमळ व ऋजु अंतःकरणाची तत्काळ खात्री झाली.

कीर्तन आटोपल्यावर महाराज बावांचा निरोप घेऊन आपल्या मुक्कामास गेले व तेथून उठून रानांत एकांती जाऊन बसले व बावांच्या बोधाचें मनन करूं लागले. ही त्यांची वृत्ती पाहून बरोबरचे कारभारी त्यांच्याकडे जाऊन, ही अशी उपरती ह्या वयांत आपणांस होणें उचित नव्हे, असा त्यांशीं बुद्धिवाद करूं लागले. हें त्यांचें बोलणें महाराजांनी मुळींच मनास आणिलें नाहीं. त्यांनी त्यांस असें निक्षून सांगितलें कीं, 'तुम्ही कोणी माझ्याकडे येऊं नका. तुम्हांला वाटेल तशी माझ्या दौलतीची व्यवस्था करा. मला त्यांत इतःपर मुळींच मन घालणें नाहीं. आयुष्य क्षणभंगुर आहे. तें केव्हा संपेल याचा नेम नाही. यास्तव माझ्या जन्माचें सार्थक्य मला ह्या क्षणापासूनच करावयास लागलें पाहिजे. राज्यसाधनाच्या जंजाळास लागून मी मोक्षसुखास अंतरावें हें मला मुळींच योग्य वाटत नाहीं!' हें महाराजांचे भाषण ऐकून कारभारीमंडळीस मोठी चिंता उत्पन्न झाली आणि त्यांनीं ही सगळी हकीकत जिजाबाईमातुःश्रीस लिहून कळविली. तेव्हां ती लागलीच शिबिकेंत बसून लोहगांवास आली आणि पहिल्याने तुकारामबावांच्या दर्शनास जाऊन तिनें त्यांना हात जोडून व पदर पसरून अशी विनंती केली कीं, 'स्वामिमहाराज माझा पुत्र शिवाजी आपलें कीर्तन ऐकून विरक्त झाला आहे आणि संसाराचा त्याग करून वनांत जाऊन बसला आहे. त्यानें संपादिलेलें राज्य आतां कोण सांभाळील बरें? तें पुनः यवनांच्या हातीं जाऊन गरीब हिंदुप्रजेस त्या विधर्मीयांचा जाच पुनरपि सोसावा लागेल. तेव्हां ह्या गोष्टीकडे नजर पुरवून त्यास राज्यसाधनाचा उद्योग न सोडण्याविषयीं बोध करावा!' हें तिचें नम्रतेचे भाषण ऐकून तुकारामबावांनी तिचें आश्वासन केलें आणि सांगितलें कीं, शिवाजीमहाराज नेहमींप्रमाणें आज रात्री कीर्तनास येतील, त्या वेळीं मी त्यांना दोन गोष्टी सांगून त्यांचें मन पुनः संसाराकडे लागेसें करितो!

ह्याप्रमाणें व्यवस्था करून जिजाबाई रात्रीं बावांच्या कीर्तनास येऊन बसली. महाराजही नित्यनियमाप्रमाणें कीर्तनास आले. ह्या प्रसंगीं बावांनी कर्मकांडाचे प्रयोजन काय आहे तें सांगून, ज्याने त्यानें आपआपल्या धर्माप्रमाणें वर्तन करावें यांतच खरे श्रेय आहे असें प्रतिपादन केलें. हरिभक्तीसाठी संसाराचा त्याग करून वनांत जाऊन बसण्याचें कांहींएक कारण नाहीं. जनांत राहून आपला संसार नेकीने व माणुसकीनें चालवून आपल्या बांधवांच्या सुखांत शक्त्यनुसार भर घालण्यास अहर्निश झटावें यांत खरा मर्दपणा आहे. आपल्या सभोंवतालील जनांची सर्व प्रकारे वाईट स्थिती प्रतिक्षणीं दृष्टीस पडत असतां, अशा विपन्न जनांचा त्याग करून केवळ स्वमोक्षासाठीं गिरिकुहरांत जाऊन बसण्यांत मुळींच पुरुषार्थ नाहीं आणि स्वजनकल्याणहेतूनें संसारांत राहावयाचें म्हटलें म्हणजे गृहस्थाश्रमासारखा दुसरा आश्रम मनुष्यास हितप्रद होणें नाहीं. जगास कंटाळून, बायकामुलांचा त्याग करून व अंगास राख फासून जे विरक्त होतात, त्यांच्या हातून इंद्रियांचें दमन न होऊन ते पुनः पुनः मोहवश होतात आणि जनांच्या अधिक्षेपास पात्र होतात. अशा विटंबना पावणाऱ्या मनुष्यास कोठेंच मान नाहींसा होतो व खऱ्या मोक्षसुखासही आंचवतो. तेव्हां तात्पर्य काय कीं, गृहस्थाश्रमाचा त्याग करून गोसावी बनून इतस्ततः भ्रमण करीत राहाण्यापेक्षां, संसारांत राहून नीतीनें वागावें व परोपकार आणि हरिभक्ती करण्यांत आयुष्य घालवावें हें विशेष चांगलें. ह्याप्रमाणें सर्वसाधारण असा बोध करून तुकारामबावांनी राजाच्या कर्तव्यासंबंधानें थोडेसे विवेचन केलें. त्यांत त्यांनीं असें दाखवून दिलें कीं, राजा जर सदाचारी व प्रजापालनदक्ष असला तर त्याच्या हातून लोककल्याण पुष्कळ होण्यासारखे असतें. पुराणांतरी वर्णिलेल्या अंबरीष, जनक, धर्म आदिकरून राजर्षींचीं उदाहरणें देऊन त्यांनी असें सिद्ध केलें कीं, हरिभक्ती व सद्वर्तन साध्य करण्यासाठीं राजानें स्वराज्यत्याग करण्याची गरज नाहीं. हा असा अनेक दृष्टांत देऊन मोठ्या कळवळ्यानें केलेला सद्बोध महाराजांनी ऐकिला तेव्हां त्यांची वृत्ती अगदीं तटस्थ होऊन गेली. वावांनी केलेला एकंदर बोध सत्य असून तदनुसार वागण्यांतच वास्तविक हित आहे असा त्यांच्या बुद्धीचा निर्धार झाला आणि मग बावांच्या व आपल्या मातुःश्रीच्या चरणांवर मस्तक ठेवून ते स्वस्थानीं परत गेले व आपला स्वराज्यसंपादनाचा स्तुत्य क्रम त्यांनीं पुढें चालविला.

ह्याप्रमाणें तुकारामबावांवर महाराजांची श्रद्धा अतिशयित बसून ह्या अशा महासाधूचें सानिध्य आपणांस नेहमीं घडावें व त्याच्या बोधामृताचे सेवन सदोदित करावें अशी उत्कट इच्छा त्यांच्या हृदयांत उत्पन्न झाली आणि त्यांनी त्यांस ह्या आशयाचे एक पत्र लिहिले व तें एका कारकुनाकडे देऊन त्यांस आणावयास घोडा, छत्री वगैरे सरंजाम त्याच्याबरोबर दिला. बावांनी तें पत्र वाचून महाराजांस उत्तरादाखल कांहीं अभंग लिहून पाठविले. त्यांपैकीं दोन येथें देतो : –

विरंचीनें केलें ब्रह्मांड सकळ। तयामाजी खेळ नाना युक्ति ।।१।।
युक्तीचे चाळक तपोनिष्ठ ज्ञानी । गुरुभक्ती मनीं विश्वासेंची ।।२।।
ऐका तुझा प्रेमा कळे कांहीएक । पाहुनियां लेख पत्रिकेचे ।।३।।
शिव नाम तुझें ठेविले पवित्र।छत्रपति सूत्र विश्वाचें कीं ।।४।।
व्रत नेम तप ध्यान योग कळा । करूनि मोकळा झालासी तूं ।।५।।
हेत लागला आमुचिये भेटी। पत्रामाजी गोष्टी हेचि थोर ।।६।।
याचें हें उत्तर ऐकें गा भूपति । लिहितों विनंति हेताची हे ।।७।।
अरण्यवासी आम्ही फिरीं उदासीन । दर्शन हें हीन अमंगळ ।।८।।
वस्त्रावीण काया झालीसे मलीन । अन्नरहित जाण फळाहारी ।।९।।
रोड हातपाय दिसे अवकळा । काय तो सोहळा दर्शनाचा ।।१०।।
तुका म्हणे माझी विनंति सलगीची । वार्ता हे भेटीची करूं नका ।।११।।
तुम्हांपाशीं आम्ही येऊनियां काय । वृथा आहे शीण चालण्याचा ।।१।।
मागावे हें अन्न तरी भिक्षा थोर । वस्त्रासी हे थोर चिंध्याबिंदी।।२।।
निद्रेसी आसन उत्तम पाषाण । वरी आवरण आकाशाचें ।।३।।
तेथें काय करणें कवणाची हे आस । वायां होय नाश आयुष्याचा ।।४।।
राजगृहा यावें मानाचिये आसे । तेथें काय वसे समाधान ।।५।।
रायाचिये घरी भाग्यवंता मान । इतरां सन्मान नाहीं तेथें ।।६।।
देखोनियां वस्त्रभूषणांचे जन । तत्काळ मरण येतें आम्हां ।।७।।
ऐकोनियां मनीं उदास व्हाल जरी । तरी आम्हां हरि उपेक्षीना ।।८।।
आतां हेंचि तुम्हां सांगेन कौतुक। भिक्षे ऐसें सुख नाहीं नाहीं ।।९।।
तपव्रतयाग महाभले जन । आशाबद्ध दीन वर्तताती ।।१०।।
तुका म्हणे आम्ही श्रीमंत मनाचे । पूर्वील दैवाचे हरिभक्त[१] ।।११।।

हें असें अत्यंत निस्पृहतेचें पत्रोत्तर आल्यामुळे महाराजांची इच्छा अतृप्त राहिली; परंतु त्याबद्दल त्यांस कांहींएक विषाद वाटला नाही. तर उलट त्या महासाधूविषयीं त्यांची आदरबुद्धी व पूज्यत्वबुद्धी विशेषच वृद्धिंगत झाली. पुढें त्या साधूचा अंत होईपर्यत सवडीप्रमाणे त्याच्या दर्शनास किंवा कीर्तनास ते जात असत. बावांचे अकिंचनत्व पाहून त्यांस कांहीं तरी नेमणूक करून त्यांचा योगक्षेम नीट चालेसें करावे असें महाराजांच्या मनांत फार दिवस होतें. परंतु हा उद्देश सिद्धीस जाण्यापूर्वीच बावांचे देहावसान झालें. तरी त्यांच्या बोधामृताचें अनेकदा प्राशन केल्याचें कांहीं तरी उतराई झालें पाहिजे व त्यांनी जनांस सदाचाराचा व ईश्वरभक्तीचा जो आपल्या आयुर्दायात बोध केला त्याबद्दल थोडासा मोबदला त्यांस नाहीं तर त्यांच्या वंशजांस दिला पाहिजे, असें मनांत आणून महाराजांनी त्यांच्या मुलास तीन गांवांची सनद करून दिली. ती अद्यापि त्यांच्या वंशजांत चालत आहे.[२]

---

१ हें असें सहा अभगांचें पत्र आहे; परंतु काहीं अभंगांत अष्टप्रधान व रामदासस्वामी ह्यांचा उल्लेख आहे. त्यावरून ते प्रक्षिप्त आहेत असें म्हणावें लागतें. कारण ह्या वेळीं अष्टप्रधानांची योजना केली नसून रामदासस्वामींचेंही दर्शन महाराजांस झालें नव्हतें तुकारामबावा १६४९ त वारले हें आतां बहुतेक निर्विवाद आहे.

२ हा तुकारामबावांसंबंधाचा मजकूर बहुतेक जशाचा तसा प्रकृत लेखकाने त्या साधूचें चरित्र लिहून प्रसिद्ध केलें आहे त्यातून घेतला आहे.

तुकारामबावांस गुरु करून त्यांच्या समागमानें आपलें आयुष्य घालवावें असा महाराजांचा हेतू फार होता. तो बावांच्या अकालिक निधनाने तसाच असिद्ध राहिला. त्या काळी पुष्कळ साधुसंत होते, परंतु ते तुकारामबावांच्या तोडीचे नसल्यामुळें महाराजांच्या मनात त्यांपैकीं कोणास आपला गुरू करण्याचें आलें नसावे. एके दिवशीं महाराज महाडास असतां तेथें एका हरिदासाचे कीर्तन झालें. तें श्रवण करावयास ते गेले. हरिदासाने ध्रुवाख्यान लावून ध्रुवाच्या ईश्वरप्राप्तीविषयींच्या अढळ निश्चयाचें सुरस वर्णन केलें. तें ऐकून महाराजांच्या मनात असें आलें कीं, ध्रुवास नारदगुरू प्राप्त झाल्यामुळें मोक्षसिद्धी घडली, तसा आपणांसही कोणी गुरू मिळाला पाहिजे. गुरूवांचून परलोकसिद्धि घडणे नाहीं; परंतु हा गुरू करावयाचा तो खरा सात्विक व मोक्ष साध्य करून देणारा असा पाहिजे, असें महाराजांस वाटत असल्यामुळें त्यांच्या कसोटीस कोणी फारसा उतरेना. तुकारामबावांचें अलौकिक साधुत्व व ईश्वरनिष्ठा अवलोकन करावयास मिळाल्यामुळें त्यांची कसोटी अंमळ उच्च प्रतीची होती. दुसरें असें कीं, स्वराज्यसाधनाच्या खटपटींत व संपादिलेल्या दौलतीचें रक्षण करण्याच्या प्रयत्नांत त्यांचा बहुतेक काळ गेला असल्यामुळें त्यांस साधुपरिचर्या करून त्याचें अंतेवासित्व स्वीकारण्यास मुळींच अवकाश नव्हता म्हणूनच त्यांनी तुकारामबावांस आपल्या सन्निध राहावयास बोलाविलें होतें परंतु ते बावा अत्यंत विरक्त असल्यामुळें त्यांच्या ऐश्वर्यास व बहुमानपुरःसर केलेल्या आमंत्रणास ते भुलले नाहींत. त्यावरून महाराजांची अशी खात्री होती कीं, खरे साधू असतात त्यांचे ठायीं निःसीम वैराग्यवृत्ती बाणली असल्यामुळें ते कोणाचीच परवा करीत नाहींत व त्यांस कोणाच्या आश्रयाची बिलकूल दरकार नसते. यास्तव असा साधू आपल्याजवळ येऊन राहाण्यास तयार होणें कठीण आहे असें त्यांस वाटे. तरी खऱ्या साधूचा समागम व्हावा व त्याच्या अनुग्रहानें कैवल्यसाधन करावें असें त्यांच्या मनांत अहर्निश वाटे. जेथें जेथें कोणी साधुसंत असत तेथें सवडीनुसार जाऊन त्यांचें दर्शन घेण्याचा महाराजांचा परिपाठ असे. त्यांचा परामर्श घेऊन त्यांच्या योगक्षेमाची ते योग्य तजवीज करीत.

रामदासस्वामी हे एक अशातले साधुपुरुष होते. ते अतिशयित विरक्त असून सर्वदा रानावनांत भ्रमण करीत असत. ते एके ठिकाणीं असे कोठेंच कायमचा वास करीत नसत. ते चाफळखोऱ्यांत रघुपतीचें देवालय व मठ बांधून तेथें बहुतकरून असतात असे कळल्यावरून महाराज त्यांच्या दर्शनासाठी तेथें गेले. देवालयांत जाऊन देवाचे दर्शन घेऊन बाहेर मंडपांत येऊन रामदासस्वामी कोठें आहेत म्हणून चौकशी करूं लागले. तेव्हां त्या खोऱ्यांत महाराजांनी नेमलेला अधिकारी नरसोमलनाथ हा तेथें येऊन मुजरा करून म्हणाला कीं, 'स्वामी नेहमी मठात राहात नाहींत, बहुतकरून अरण्यांतच असतात. हल्लीं कोंडवण्याच्या घळीनजीक बहिरवगड आहे तेथें ते आहेत!' मग महाराज त्यांच्याविषयींची सविस्तर हकीगत त्याला विचारीत असतां रामदासस्वामींचे शिष्य विठ्ठल गोसावी व भानजी गोसावी यांनी महाफळ, गंध व पुष्पमाळा असा देवाचा प्रसाद त्यांस आणून दिला. तो घेऊन त्यांनी त्या गोसाव्यांस नमस्कार करून विचारिलें कीं, हें देवालय कोणी बांधिले? समर्थ इतके दिवस येथे वास करीत असून त्यांची आम्हांकडून कांहींच सेवा घडली नाहीं हें कसें?' त्या गोसाव्यांनीं उत्तर केलें कीं, आपणांस समर्थांचे दर्शन घडले नाहीं तरी हें देवालय बांधण्यास पैसा आपणांकडूनच आला आहे. तेव्हां महाराज म्हणाले : 'तुम्ही आम्हांस थोरपणा देण्याकरितां हें बोलत आहां असें वाटतें. हें खरें असेल तर आमच्याकडून केव्हां व कसा पैसा आला तें सांगा!' गोसावी म्हणाले गिरिगोसावी नाशिककर यांचे पुण्यास आपल्या उपाध्यायांच्या घरीं कीर्तन झालें, तें ऐकावयास आपण गेला होतां. कीर्तन चांगले झालें असें वाटून आपण त्या गोसाव्यास तीनशें होन देऊं लागला तेव्हां तो म्हणाला कीं, 'मी निरिच्छ आहें. मला हें द्रव्य नको !' त्यावर आपण बोललां कीं, 'आम्ही हें द्रव्य अर्पण केलें तें केलें. आपण भगवद्भक्त आहां. आपल्या इच्छेस येईल तसा त्याचा विनियोग करावा.' तेव्हां त्या गोसाव्यानें आपणांस सांगितलें कीं, चाफळखोऱ्यांत रामदासस्वामी रघुपतीचे देवालय बांधीत आहेत. तेथें हें द्रव्य पावतें करावें आपण बरें म्हणून ती रक्कम आपले मामलेदार नरसोमलनाथ यांच्या हस्ते स्वामींकडे पावती केलीं. हें ऐकून महाराजांस आठवण होऊन खूण पटली. नंतर ते त्या टेंकासभोंवतीं फिरून पाहू लागले तो त्यांच्या दृष्टीस असें पडलें कीं, उत्तरेकडून वाहणाऱ्या एका

ओढ्यामुळे टेंकास उपद्रव होत आहे. तो नाहींसा करण्यासाठी त्यांनीं नरसोमलनाथास सांगितलें कीं, जो काय खर्च होईल तो करून ओढा वळवावा व त्यावर एक पूल बांधावा व ह्या कामीं पाचशें होन रक्कम सरकार तिजोरींतून खर्चाची. ह्याप्रमाणें तेथली व्यवस्था करून महाराज कोंडवणच्या घळीस समर्थांच्या दर्शनास गेले; पण तेथेही त्यांची भेट झाली नाहीं. तेव्हां निराश होऊन ते प्रतापगडावर आले. महाबळेश्वरास जाऊन तेथल्या देवस्थानाचें दर्शन महाराजांनीं घेतलें व तेथून ते पुनः वांईस उतरले आणि तेथें ब्राह्मणभोजनें, दानधर्म वगैरे करून माहुलीस आले. येथें कृष्णावेण्यासंगमी स्नान करून दानधर्म करण्यांत व ब्राह्मणभोजनें घालण्यांत गुंतले आहेत तो त्यांस रामदासस्वामींचे एक ओवीबद्ध पत्र आले. तें असे: –

निश्चयाचा महामेरू । बहुत जनांसी आधारू ।
अखंड स्थितीचा निर्धारू । श्रीमंत योगी ।।१।।
परोपकाराचिया राशी । उदंड घडती जयासी ।
तयाचे गुणमहत्त्वासी । तुलना कैची ।।२।।
नरपति हयपति गजपति । गडपीत भूपति जलपति ।
पुरंदर आणि छत्रपति । शक्ति पृष्ठभागीं ।।३।।
यशवंत कीर्तिवंत । सामर्थ्यवंत वरदवंत ।
पुण्यवंत नीतिवंत । जाणता राजा ।।४।।
आचारविचारशील । दानशील धर्मशील ।
सर्वज्ञपणें सुशील । सकलां ठायीं ।।५।।
धीर उदार गंभीर । शूर वीर्यासी तत्पर ।
सावधपणें नृपवर । तुच्छ केले ।।६।।
तीर्थक्षेत्रें मोडिलीं । ब्राह्मणस्थानें भ्रष्ट झालीं ।
सकळ पृथ्वी आंदोळली । धर्म गेला ।।७।।
देव धर्म तो ब्राह्मण । करावया संरक्षण ।
हृदयस्थ झाला नारायण । प्रेरणा केली ।।८।।
उदंड पंडित पुराणिक । कवीश्वर याज्ञिक वैदिक ।
धूर्त तार्किक सभानायक । तुमच्या ठायीं ।।९।।
या भूमंडळाचे ठायीं । धर्म रक्षी ऐसा नाहीं ।
महाराष्ट्रधर्म राहिला कांही । तुम्हांकरितां ।।१०।।
आणिकहि धर्मकृत्ये चालती । आश्रित होऊनी कित्येक राहति ।
धन्य धन्य तुमची कीर्ति । विश्वी विस्तारली ।।११।।
कित्येक दुष्ट संहारिले। कित्येकांस धाक सुटले ।
कित्येकांस आश्रय झाले । शिव कल्याण राजा ।।१२।।
तुमचे देशी वास्तव्य केलें । परंतु वर्तमान नाहीं घेतलें ।
ऋणानुबंधे विस्मरण झालें । काय नेणूं ।।१३।।
सर्वज्ञ मंडळी धर्ममूर्ति । सांगणें काय तुम्हांप्रति ।
धर्मस्थापनेची कीर्ति । सांभाळिली पाहिजे ।।१४।।
उदंड राजकारण तटलें। तेणें चित्त विभागलें ।
प्रसंग नसतां लिहिलें । क्षमा केली पाहिजे ।।१५।।

हें असें पत्र आलें त्याचा मोठ्या प्रेमानें स्वीकार करून तें महाराजांनीं वाचून पाहिलें व पत्र घेऊन येणाऱ्या शिष्याचा आदरमान करून उलट जबाब लिहिला कीं, 'स्वामीराज, मी अपराधी आहें. आपण क्षमाशील आहां. आशीर्वादपत्र पाठविलें तें पाहून परमानंद झाला तो पत्रांत कोठवर लिहूं? आपल्या पत्रांत माझी स्तुती केली आहे, तीस मी सर्वथा पात्र नव्हें. स्वामींच्या दर्शनाची मला फार दिवस उत्कंठा लागली आहे. तरी मी आपल्या दर्शनास येत आहें. कृपा करून मला दर्शनलाभ घडावा व माझी बहुत दिवसांची इच्छा तृप्त व्हावी. ह्या अशा आशयाचें पत्र लिहून महाराजांनी त्या शिष्याच्या हातीं दिलें व त्यास स्वामिमहाराज कोठें आहेत म्हणून विचारिलें. त्यानें सांगितलें कीं, 'सांप्रत ते चाफळ येथें आहेत; परंतु त्यांचा नेम नाहीं. कारण ते क्षणांत एका स्थळाहून दुसऱ्या स्थळीं जातात.' ह्याप्रमाणें बोलून तो शिष्य पत्राचा जबाब घेऊन परत गेला.

मग दुसरे दिवशीं महाराज स्वारीच्या लोकांसह चांफळास गेले. तेथें रघुपतीचे दर्शन घेऊन ते रामदासस्वामी कोठें आहेत म्हणून विचारूं लागले. शिष्यमंडळी म्हणाली : 'समर्थ शिंगणवाडीच्या मारुतीपाशीं आहेत. काल अस्तमानीं आपलें पत्र घेऊन शिष्य आला तें कल्याणगोसाव्यानें आजच स्वामींकडे नेले आहे. आपण आतांच स्वामीपाशीं जाण्याची घाई न करितां, येथें नैवेद्य तयार होत आहे तो देवास समर्पण झाल्यावर मंडळींसह प्रसाद घेऊन पुढें जावें तोपर्यंत आपण दर्शनास आल्याची वर्दी स्वामीमहाराजांस देऊन जबाब आणतो.' महाराज म्हणाले, 'आज गुरुवार आहे. स्वामीमहाराजांचें दर्शन घेतल्यावांचून अन्नग्रहण करावयाचें नाहीं, असा आम्ही निर्धार केला आहे!' तेव्हा शिष्यमंडळी म्हणाली : 'पुष्कळ मंडळींसहवर्तमान गेल्यास गांठ पडण्याचा नेम नाहीं. यास्तव गडबड करूं नये !' हें ऐकून महाराजांनी दिवाकरभटजी ह्या नांवाचा एक शिष्य वाट दाखववावयासाठीं बरोबर घेऊन आपले एकदोन मनुष्य समागमें घेऊन शिंगणवाडीच्या मारुतीपाशीं आले; तो रामदासस्वामी तेथून खडीच्या खालीं बागेंत गेले आहेत असें समजलें; म्हणून ते तिकडे गेले. त्या समयी स्वामी उंबराखालीं बसले होते व कल्याणगोसाव्यानें नुकतेंच नेऊन दिलेलें महाराजांचे पत्र वाचून हसत होते. इतक्यांत दिवाकरभटजी पुढें व त्याच्या मागून महाराज तेथें जाऊन पोहंचले महाराज स्वामींपुढें श्रीफळ ठेवून साष्टांग दंडवत करून उभे राहिले. तेव्हां रामदासस्वामी अगदीं चकित होऊन बोलले : 'शिवाजीराजे, पत्र व तुम्ही एकदमच आलां, फारच त्वरा केली. तुमच्या देशीं आम्ही इतके दिवस आहों, आमचा परामर्श आजपर्यंत बराच घेतला आणि आज कां आला,' महाराज म्हणाले : 'मी आज बरेच दिवस आपले दर्शन घेण्याचा प्रयत्न करीत आहें; परंतु तो आजपर्यंत सफळ झाला नाहीं. याबद्दल मला क्षमा करावी. आज मला अनुग्रहप्रसाद व्हावा अशी माझी उत्कट इच्छा आहे. ती पूर्ण करणार स्वामी समर्थ आहेत ! ही त्यांची विनंती रामदासस्वामींनी मान्य केली; व कल्याण गोसाव्याच्या सांगण्यावरून महाराजांनी पूजेचें साहित्य आणविलें आणि महाराजांनी स्नान केल्यावर दिवाकरभटजीनें पूजाविधी सांगितला. त्याप्रमाणें समर्थांची पूजा करून महाराजांनीं त्यांच्या चरणी मस्तक ठेविले तेव्हां त्यांनी त्यांस उपासनेच्या मंत्राचा अनुग्रह दिला व यथोचित बोध केला. तो दासबोधांतील तेराव्या दशकाच्या सहाव्या समासांत अंतर्भूत झाला असून त्यास लघुबोध अशी संज्ञा आहे, असें म्हणतात'.

हा बोध श्रवण करून महाराजांची वृत्ती अगदीं पालटली व त्यांनीं रामदासस्वामींस अशी विनंती केली कीं, 'मला हा राज्य संपादण्याचा खटाटोप आतां पुरे आहे. तो सोडून आपल्या शिष्यमंडळीबरोबर राहून आपली सेवा करण्यांत उरलेलें आयुष्य घालवावें असें माझ्या मनांत आलें आहे. तर आपल्या समागमें राहण्याची मला आज्ञा व्हावी. ही त्यांची विनंति ऐकून रामदासस्वामी बोललेः 'याकरिताच मला शरण आलां कीं काय? तुमचा मुख्य धर्म क्षात्र. क्षत्रियांनी राज्य रक्षण करून प्रजेचें पालन करावें. देवब्राह्मणांची सेवा करावी. तुमच्या हातून अद्यापि पुष्कळ अलौकिक पराक्रम व्हावयाचे आहेत. फार दिवस म्लेंच्छमय पृथ्वी झाली आहे. त्यांचे निर्मूलन तुमच्या हातून करवावें अशी श्रीरघुपतीची इच्छा आहे. श्रीकृष्णानें अर्जुनास भगवद्गीतेंत बोध केला आहे तो तुम्हांस माहीत आहेच. तो लक्षांत आणा तुम्हांस मुख्यतः क्षात्रधर्माचेंच अनुकरण केलें पाहिजे. पूर्वी राजे झाले त्यांच्या कथा पुराणांतरी सांगितल्या

आहेत त्यांचें श्रवण तुम्हांस घडतच आहें आणि तुमच्या पूर्वजांनी केलेले पराक्रम तुम्हांस विदित आहेत. ते लक्षांत आणून तुम्ही तुमच्या क्षात्रधर्मास अनुरूप असें वर्तन करा. तें सोडून भलतेंच कर्म करण्याची इच्छा तुम्ही धरितां ती बरोबर नव्हे!' हा स्वामींचा बोध श्रवण करून महाराजांनी आपला उद्देश रहित केला व ते स्वस्थानीं निघून आले.

ह्यानंतर महाराज फुरसतीप्रमाणें रामदासस्वामींस वेळोवेळां भेटत असत व त्यांच्या आध्यात्मिक बोधाचें चित्तपूर्वक श्रवण करीत असत. ह्या सत्पुरुषाच्या ठायीं त्यांची परमनिष्ठा होती. कार्यबाहुल्यास्तव त्यांस स्वामींच्या दर्शनास वारंवार जाण्यास फावत नसे व ते मनास येई तिकडे भ्रमण करीत असल्यामुळें त्यांच्या दर्शनाचा योग मोठ्या प्रयासानें येत असे. जासुदांस पाठवून पहिल्यानें स्वामी कोठें आहेत त्याचा शोध करून मग त्यांच्या भेटीचा लाभ साधावा लागत असे. ह्याप्रमाणें त्यांच्या दर्शनासंबंधानें नेहमी अनिश्चय असल्याकारणानें त्यांस आपल्या जवळ कोठें तरी ठेवून घ्यावे असें महाराजांच्या मनांत फार असे व ह्यासंबंधानें ते त्यांस वारंवार आग्रह करीत असत. शेवटीं रामदासस्वामींनी त्यांच्या इच्छेप्रमाणें वागण्याचें कबूल करून परळीस आपण राहतों असें म्हटलें. त्यावरून त्यांस महाराजांनी मोठ्या समारंभाने त्या गडावर आणिलें. तेथें एक वाडा होता त्यांत समर्थांस ठेवावें असें त्यांच्या मनांत होतें; परंतु त्यांनी तो पाहून म्हटलें कीं, 'हा वाडा जीर्ण झाला आहे, तो सोडून नवा बांधवावा. तोपर्यंत किल्ल्याच्या दरवाजाचे उत्तरेस ओवऱ्या आहेत त्यांत आम्ही राहूं'.

हा किल्ला नुकताच हातीं आला असल्यामुळें त्यावरची व्यवस्था वगैरे नीट नव्हती, ती महाराजांनी चांगली लावून दिली. ह्या किल्ल्यावर जिजोजी काटकर यास हवालदार नेमिलें होतें. त्यास समर्थांच्या आज्ञेंत सर्वदा वागावयास सांगितलें. किल्ल्यावर व किल्ल्याखालीं राहणाऱ्या एकंदर लोकांनी समर्थांच्या आज्ञेंत वागावें असा एकसहा हुकूम देऊन ठेविला. समर्थांकडील नेहमींच्या भोजनखर्चास मौजे वावरदरें ह्या गांवाचा वसूल लावून दिला. ह्या संबंधाची व्यवस्था कोंडोपंत नांवाच्या कारकुनास वाकनिसाच्या निसबत पाहावयास सांगितली व त्यानें नेहमी गडावर स्वामींपाशीं असावें अशी त्यास आज्ञा केली. रामदासस्वामी परळीस येऊन राहिल्यावर त्या किल्ल्याचे नांव सज्जनगड असें ठेविलें. ह्या गडावर नाना देशींचे साधुसंत नेहमी समर्थांच्या भेटीस येत. त्यांचें दर्शन महाराजांस अनायासें होऊं लागलें, पुढें समर्थांचा शिष्यसमुदाय फारच वाढल्यामुळें पूर्वी लावून दिलेलें उत्पन्न भोजनखर्चास पुरेनासें झालें. म्हणून महाराजांनी ही नेमणूक पुष्कळ वाढविली. ही नेमणूक वाढविली त्याच वर्षी महाराज कर्नाटकाच्या मोहिमेवर गेले असा समर्थांच्या चरित्रलेखांत उल्लेख आहे. तेव्हां अर्थात ही नेमणूक स. १६७६ त वाढविली हें सिद्ध होतें.

महाराज व समर्थ यांच्या भेटीच्या अनेक प्रसंगांचा उल्लेख समर्थांच्या चरित्रलेखांत केला आहे; परंतु त्यांचें निरूपण अद्‌भुत चमत्कारांनी युक्त असल्याकारणानें त्यांचा अनुवाद प्रकृत ग्रंथांत करणें उचित दिसत नाहीं. तरी त्या गोष्टींवरून एवढे अनुमान काढतां येण्यासारखें आहे कीं, महाराजाच्या ठायीं गुरुभक्ती, स्वधर्मनिष्ठा व सदाचारशीलता ह्या सदवृत्तींचा विकास उत्कृष्ट प्रकारें झाला असून ते ह्या सद्‌गुणांस्तव रामदासस्वामींसारख्या अत्यंत निस्पृह साधूच्या आदरास व प्रीतीस पात्र झाले होते. यावरून त्यांची जनक, अंबरीष, धर्म इत्यादी पुराणप्रसिद्ध साधुनृपवरांत गणना केली असतां अत्युक्ती होणार नाही.

रामदासस्वामींनी महाराजांस तीन गोष्टी करावयास सांगितल्या होत्या असें म्हणतात. एक गोष्ट अशी कीं, महाराज पूर्वीपासून सांबाची भक्ती करीत आले होते. यास्तव त्यांनी श्रावणमासीं कोटी पार्थिवलिंगे करून ब्राह्मणभोजनें घालावी. दुसरी गोष्ट अशी कीं, ते विद्वान ब्राह्मणांची संभावना वेळोवेळां करीत असत. ती त्यांनीं दरसाल श्रावणमहिन्यांत स्वराज्यांतील विद्वान ब्राह्मणांस बोलावून करीत जावी. मागे राज्यव्यस्थाप्रकरणांत सांगितलें आहेच कीं, पढलेल्या ब्राह्मणांची परीक्षा श्रावण महिन्यांत घेऊन त्यांस त्यांच्या विद्वत्तेप्रमाणें दक्षिणा देण्याचा क्रम त्यांनीं चालू ठेविला होता. तिसरी गोष्ट अशी कीं, महाराजांच्या राज्यांतील हिंदूप्रजेने एकमेकांस जोहार करण्याचें सोडून रामराम करावा व कागदोपत्रींही एकमेकांस रामराम लिहावा. ही रामराम करण्याची पद्धत कोणांच्या मतें पूर्वीपासूनच सुरू होती असें

आहे. आणखी एका गोष्टीच्या संबंधाने येथें उल्लेख करणें अवश्य आहे. ती अर्थात महाराजांच्या भगव्या निशाणासंबंधाची होय. त्यांच्या निशाणास हा रंग रामदासस्वामींच्या अंगावरील भगव्या वस्त्रांवरून आला होता असें म्हणतात. ह्या संबंधाची आख्यायिका येणेंप्रमाणें आहे. एके समयी महाराजांची स्वारी साताऱ्यास असतां रामदासस्वामी आपल्या कांहीं शिष्यांसहवर्तमान त्या शहरांत भिक्षा मागावयास गेले. महाराज शहरांत आहेत हें त्यांस ठाऊक नसल्यामुळें ते भिक्षा मागत मागत महाराज राहात होते त्या वाड्यापाशीं गेले. हें वर्तमान त्यांस कळताच त्यांनीं बाळाजी आवजी चिटणीस यास एक चिट्ठी लिहावयास सांगितली व तींत असा मजकूर लिहविला कीं, 'आजपर्यंत जें राज्य मिळविलें आहे तें स्वामिभिक्षेस अर्पण होवो!' मग त्या चिठ्ठीवर खूण करून ती महाराजांनी समर्थांच्या झोळींत घालून त्यांस भक्तिपुरःसर नमस्कार केला. तेव्हां समर्थांनी त्यांस पुसलें : 'शिवबा, भिक्षेस धान्य घालावयाचें असून तुम्हीं चिठ्ठी घातली ती कसली?' महाराज म्हणाले, 'भिक्षेस घालावयाचें तेंच घातले आहे. मग समर्थांनीं ती चिठ्ठी कल्याणगोसाव्यास वाचावयास सांगितली. तींतील मजकूर ऐकून समर्थ म्हणाले : 'शिवबा, तुम्ही सर्व राज्य भिक्षेस घातले आतां तुम्ही काय करणार?' महाराज म्हणाले : 'स्वामिराज, आपल्या इतर शिष्यमंडळीप्रमाणें आपली सेवा करून राहावें, हीच माझी इच्छा आहे. ही अशी त्यांची वृत्ती पाहून समर्थांनी त्यांस दाशरथी राम व विदेही जनक याच्या कथा सांगून व्यवहाररीत्या राजधर्माप्रमाणें आचरण करून परमार्थ साधण्यांतच खरा पुरुषार्थ आहे असा पुनरपि बोध केला व त्यास आपल्या वतीनें सर्व राज्यकारभार पूर्ववत चालविण्याची आज्ञा केली. ती शिरसावंद्य करून तदनुसार ते वागूं लागले आणि हें राज्य रामदासस्वामींचे आहे हें सर्वांस समजण्यासाठी त्यांनी आपल्या निशाणास भगवा रंग दिला.[१]

आतां येथें एका महत्त्वाच्या गोष्टीसंबंधानें थोडेंसें लिहिणें इष्ट दिसतें. रामदासस्वामींना गुरू करून त्यांच्यावर एवढी निष्ठा महाराजांनी प्रगट केल्यावरून कित्येकांचा असा तर्क आहे कीं, त्या साधूकडून त्यांस राज्यसाधनाच्या कामीं हरएक प्रसंगी सल्लामसलत मिळत असे. समर्थांचे चरित्रलेख आज उपलब्ध आहेत त्यांत समर्थांच्या वडील बंधूंचा हनुमानस्वामी म्हणून एक वंशज होता. त्यानें समर्थांच्या देहावसानानंतर सुमारे सवाशें वर्षांनी समर्थांचे एक चरित्र लिहिलें तेंच पहिलें असून तदनंतरच्या इतर एतद्विषयक लेखांस आधारभूत झालें. हनुमानस्वामींच्या ह्या बखरींत महाराजांस समर्थांकडून स. १६४९ त अनुग्रह मिळाला होता व तेव्हांपासून ते समर्थांच्या उपदेशानुरूप राज्यव्यवहारांत वागत असत, असा स्पष्ट उल्लेख आहे; परंतु ही अनुग्रहाची तारीख बिलकुल खरी नाहीं. सदरील चरित्रलेखांत ज्या कांहीं तारखा दिल्या आहेत त्या बहुतेक विश्वसनीय वाटत नाहींत. महाराजांच्या चरित्रक्रमासंबंधानें काही तारखा यांत दिल्या आहेत त्या बहुतेक चुकल्या आहेत. रामदासस्वामींची महती वाढविण्याच्या उद्देशाने त्यांच्या चरित्रकारांनीं हा सत्यापलाप केला असावा किंवा पूर्वपरंपरागत चालत आलेल्या आख्यायिका सत्यवत् मानून त्यांचा अनुवाद त्यांनीं स्वलेखांत केला असावा. हे पूर्वकालीन चरित्रकार महिपतीचें अनुकरण करून अद्भूत चमत्कारांचे वर्णन स्वग्रंथांत करितात. त्यावरून त्यांची सत्यनिष्ठा कितीशी होती हें उघड दिसत आहे. महासाधूंच्या लीला वर्णन करावयाच्या म्हटल्या म्हणजे त्यांत चमत्कारांचें कथन अवश्य झालें पाहिजे अशी समजूत सामान्य लोकांची असल्यामुळें त्यांच्या एतद्विषयक लेखांस ऐतिहासिकरीत्या प्रमाण म्हणवत नाहीं. तरी त्यांच्या ह्या अद्भूतकथामय ग्रंथांत सत्याचा अंश बराच असतो. तो सत्यान्वेषण करणारानें निवडून घेतला पाहिजे; परंतु हें कर्तव्य आमचे कित्येक आधुनिक पंडित विसरतात किंवा त्यास पराङ्मुख होतात, म्हणून सामान्य जनांच्या भ्रमांचा निरास होत नाहीं. आतां हा अनुग्रहकाळ कसा चुकला आहे तें येथें थोडक्यांत सांगणे इष्ट होय.

---

१ ही आख्यायिका महाराजांच्या कोणत्याही बखरींत आढळत नाही.

रामदासस्वामींचे जे चरित्रलेख आहेत त्या सर्वांत महाराजांस समर्थांचें दर्शन प्रथम चांफळखोऱ्यांत झालें असून त्या वेळीं ह्या खोऱ्यावर महाराजांची सत्ता होती व तेथें त्यांचा एक मामलेदारही होता असें सांगितलें आहे. तसेंच ह्या चाफळगांवाकडे जावयासाठी महाराज प्रतापगडावरून निघून महाबळेश्वरास गेले व तेथून कऱ्हाड, वांई व माहुली ह्या गांवांवरून आले असून वाई व माहुली येथें ब्राह्मणभोजनें व दानधर्म पुष्कळ केल्याचा उल्लेख त्या चरित्रांत आहे. ह्यावरून हें उघड होतें कीं, अनुग्रह घेण्याच्यापूर्वी प्रतापगड बांधला असून ह्या प्रांतावर महाराजांची त्या वेळीं सत्ता स्थापित झाली होती. परंतु वास्तविक इतिहास असा आहे कीं, महाराजांनी प्रतापगड १६५८ च्या सुमारास बांधला असून वाई, माहुली वगैरे प्रांत महाराजांनी स. १६७३ त पहिल्यानेंच काबीज केले.[१] ह्यापूर्वी ते त्यांच्या कबजांत आले नव्हतें. त्याप्रमाणेंच महाराजांनी रामदासस्वामींचा अनुग्रह घेतल्यावर एकदोन वर्षांनीं त्यांस परळीच्या किल्ल्यावर नेऊन ठेविलें व प्रसिद्ध स्वराज्यदानाचा प्रकार साताऱ्यास घडला असें सदरील लेखांत म्हटलें आहे; परंतु हे दोन्ही किल्ले महाराजांनी स. १६७६ तच हस्तगत केले होते. ह्या एका ऐतिहासिक प्रमाणामुळें रामदासस्वामींच्या भक्तांनी सर्वत्र प्रसृत केलेला वादविषयक प्रवाद अगदीं निराधार आहे असें म्हणण्यास कांहीं एक प्रत्यवाय नाहीं.

महाराजांच्या चरित्राच्या ज्या बखरी प्रसिद्ध झाल्या आहेत त्यांत अद्भुत चमत्कारांचा लवलेश नसून त्या बहुतेक इतिहासकथनात्मकच आहेत. तेव्हां त्यांवर विश्वास ठेवण्यास फारशी हरकत वाटत नाहीं. ह्या बखरींत महाराजांनी कोणत्याही प्रसंगीं रामदासस्वामींचा सल्ला घेतल्याचा उल्लेख आढळत नाहीं. नाहीं म्हणावयाला एका प्रसंगीं मात्र त्यांचें मत विचारल्याचें आढळतें. तो प्रसंग राज्याभिषेकसमारंभाचा होय.[२] आतां चिटणीसकृत बखरींत व श्रीशिवदिग्विजयात महाराजांनी रामदासस्वामींचा अनुग्रह घेतल्याची तारीख इ. स. १६४९ ही दिली आहे, तीही

---

१ मागे भाग बाविसावा पाहा.

२ महाराजांनी समर्थांचा सल्ला हरएक महत्वाच्या प्रसंगी घेतल्याचे उल्लेख ऐतिहासिक बखरींतून नाहीत. याविषयी समर्थभक्तांस वैषम्य वाटून हनुमानस्वामींच्या बखरींत ह्या उल्लेखांच्या अभावाची मीमांसा पुढील भाकडकथा देऊन केली आहे. शिवाजीमहाराजांनी स. १६४९ त अनुग्रह घेतल्यापासून ते प्रतिगुरुवारी रामदासांच्या दर्शनास येऊन राजकीय प्रकरणी सल्लामसलत विचारीत. हा त्यांचा नेम पाळण्यास त्यांना कित्येक वेळा निकडीच्या प्रसंगांमुळे अडचण येऊ लागली. हे जाणून समर्थांनी त्यास एकेप्रसंगी असे सांगितले कीं, 'शिवबा, तुमचा हा नेम चालणार नाही, तुम्ही प्रसंग येईल तशी मसलत करून काम करत असावे!' महाराजांनी म्हटले कीं, 'हा प्राण जावो की राहो. आपल्या आज्ञेवाचून पाऊलही पुढें पडावयाचें नाही!' हा असा त्यांचा निर्धार पाहून रामदासांनी त्यांस अशी तोड सुचविली की, 'हे राजा, शुचिर्भूत होऊन एक प्रश्न विचारणारा व एक लेखक असे तिघे एकांती बसा आणि कार्यासंबंधाने प्रश्न विचारावयाचा असेल तो प्रश्न विचारणाराने विचारावा म्हणजे तुमच्या अंगात देवी संचरुन तुमच्या मुखे बोलेल ते शब्द लेखकाने लिहून ठेवावें मग देवीचे वारें विसर्जन पावल्यावर लिहून ठेवलेला मजकूरवाचून त्यांत केलेल्या आज्ञेप्रमाणें वर्तत जा ! ही अशी भाकडकथा रचण्याला सदर स्वामीला आधार एवढाच होता की, महाराजांना एखादा बिकटप्रसंग प्राप्त होऊन कांही एक सुचेनासें झाले. म्हणजे त्याच्या अंगात देवीचे वारे येऊन त्या प्रसंगी कसे वागावें तें वदत असत, असे इतिहासात नमूद झाले असून ते सर्वश्रुत होते; परंतु रामदासांसारख्या कट्ट्या रामभक्ताने ज्या देवतांचा- आपल्या काव्यात अनेकशः उपहास केला आहे. त्यातल्या एका देवतेचे साहाय्य घेण्याचा उपदेश करावा हे विचित्र दिसते. रामदास स्वतः हवे तेथें हवे तेव्हा प्रगट होत असत अशी त्यांच्या संबंधाने अख्यायिका हनुमानस्वामींच्या बखरींत दिली आहे. तीस अनुसरून त्यानी महाराजांना असे का नाही सांगितले कीं, 'शिवबा, तुला एखाद्या कार्यासंबंधाने पेंच प्राप्त होईल तेव्हां माझे स्मरण कर म्हणजे मी प्रगट होईन!' समर्थ एवढे निःसीम रामभक्त होते कीं, त्याना पंढरपूरच्या विठोबाचे त्या वेळी अतिशयित गाजत असलेलें माहात्म्य तुच्छ वाटे. एकदा कोणाच्या आग्रहास्तव पंढरपुरास ते गेले तेव्हां विठोबाची मूर्ती रामरूप झाली अशी कथा आहे. शिवाय ते मारुतीचे अवतार असून त्यांनी जिकडेतिकडे रामांची व मारुतीचीं देवालये स्थापिल्याचा प्रवाद आहे. ह्या दोन्ही प्रवादांस अनुसरून त्यानी महाराजांस तुमच्या अंगी राम किंवा मारूती संचरून जी आज्ञा देईल तदनुसार वागा असे सांगावयास हवे होते. हनुमानस्वामी, समर्थ व महाराज यांच्यात तीस-बत्तीसवेळा झालेल्या भेटींच्या गोष्टी देतो. त्यातील एकाही प्रसंगी महाराजांनी त्यास राजकीय बाबतीत सल्ला मसलत विचारिल्याचा उल्लेख तो कोठेही करीत नाही. शिवाय रामदाससाधूंशी १६४९ पासून संघटन झाले होते. हे जर खरें, तर महाराजांच्या मनात उपासनांतर का उद्‌भवले नाही हे एक कोडेंच आहे. खरे पाहता महाराज अखेरपर्यंत भवानीचे उपासक होते. ते रामभक्त झाल्याचा पुरावा नाहीं.

खोटी कीं काय? असा कोणीं प्रश्न केल्यास त्यास उत्तर एवढेंच कीं, ती समर्थांच्या चरित्रलेखांवरून त्या बखरकारांनीं उतरून घेतलेली स्पष्ट दिसते.[१] महाराजांच्या इतर जुन्या चरित्रलेखांत हा अनुग्रह घेतल्याचा उल्लेखच मुळीं केलेला नाहीं.[२] ह्या अनुग्रहकालाचा निर्णय रामदासस्वामींचा शिष्य दिवाकर गोसावी याच्या वंशजांजवळ मिळालेल्या पत्रसंग्रहापैकीं कांहीं अस्सल पत्रांचे उतारे प्रसिद्ध झाले आहेत,[३] त्यांवरून बहुतेक झालाच आहे. त्यांवरून पाहतां महाराजांची प्रथम भेट स. १६७२ त झाली. त्याप्रमाणेंच स. १६७६ पर्यंत समर्थ परळीवर कायमचे राहावयास आले नव्हतें. आणखी असे कीं, चाफळ येथील मठांस किंवा परळी येथील मठांस किंवा समर्थांनी स्थापलेल्या दुसऱ्या कोणत्याही देवस्थानास गावांचे वगैरे उत्पन्न लावून देण्यासाठी महाराजांनी १६७४ सालापूर्वी एकही सनद करून दिलेली सापडत नाही. रा. राजवाडे व सत्कार्योत्तेजक मंडळी यांनी आजपर्यंत कितीतरी कागदपत्रे हुडकून काढून प्रसिद्ध केली आहेत; परंतु स. १६७४ पर्यंतची एकही सनद त्यांस अद्यापि सापडली नाही. हा चमत्कार नव्हे काय? तेव्हां अर्थात् हनुमानस्वामीने आपल्या बखरीत सन १६४९ त अनुग्रह झाल्यावर समर्थांस जमिनीच्या सनदा करून दिल्या व पुढे अफझुलखानाच्या वधानंतर पुनः एकदा अशाच आणखी सनदा करून दिल्या असा उल्लेख केला आहे तो अगदी खोटा आहे. त्या वेळी ह्या गुरु-शिष्यांची मुळी गाठच जर पडली नव्हती तर इनामाच्या सनदा कोठून सापडणार?

---

१ रामदासस्वामींचे देहावसान झाल्यावर त्यांच्या वडील बंधूंच्या वंशजाकडे त्यांच्या मठाची व्यवस्था आली आणि हनुमानस्वामी नावाच्या त्यांच्या एका वंशजाने रामदासस्वामींचे चरित्र प्रथम लिहिले. हे रामदासांच्या निधनानंतर सुमारे सव्वाशे वर्षांनी लिहिले हे वर सांगितलेच आहे. ह्याच सुमारास मल्हार रामराव चिटणीस याने शिवाजीमहाराजांचे चरित्र लिहिले. ह्या उभय चरित्रकारांनी आपआपल्या कामी परस्परांचे पुष्कळ साहाय्य घेतले असावें. तरी त्यांतल्या त्यांत चिटणीसाने महाराजांच्या इतिहासास अगदीच विरुद्ध अशा कित्येक गोष्टी ज्या हनुमानस्वामींनें रामदासांच्या चरित्रात त्यांची महती वाढविण्याच्या उद्देशाने लिहिल्या आहेत त्या सगळ्यांचाच अनुवाद केलेला नाही. रामदासांनी महाराजांस अनुग्रह दिल्याची हकीकत मात्र त्याने हनुमानस्वामींच्या बखरींवरूनच घेतली आहे. हनुमानस्वामीने महाराजांच्या व रामदासांच्या वारंवार झालेल्या भेटींसंबंधाच्या तीस-बत्तीस भाकड कथा आपल्या बखरींत लिहिल्या आहेत. त्यांचा चिटणीसाने उल्लेख केलेला नाही. दिल्लीस जातांना मात्र महाराजांनी रामदासांचे दर्शन घेतले होते असा ह्या बखरकाराने आपल्या बखरींत उल्लेख केलेला आहे; पण राज्याभिषेकाच्या प्रसंगाखेरीज इतर कोणत्याहीप्रसंगी महाराजांनी त्यांची सल्लामसलत घेतल्याचा उल्लेख केलेला नाही. अनुग्रहाची तारीख त्याने स. १६४९ अशी दिली आहे. तरी महाराजांनी रामदासांस परळी किल्ल्यावर स. १६७८ त आणून ठेवले व चाफळखोऱ्यातील मठास ह्याच वेळी इनाम गांव दिलें, असे त्याने लिहिले आहे. हनुमानस्वामी म्हणतो की, रामदासस्वामी परळीस १६५० त जाऊन राहिले. ह्या तारखेस परळीचा किल्ला महाराजांच्या ताब्यात आला नव्हता म्हणून चिटणीसांने ही तारीख दिली नाही असे दिसते. त्याप्रमाणेच स. १६५९ त अफझुलखानाच्या वधानंतर महाराजांनी रामदासांस परळी येथे भेटावयास जाऊन काही गांव इनाम दिल्याची अख्यायिका चिटणीसाला खरी वाटली नाही म्हणून ती त्यानें दिली नाही. शिवदिग्विजयात महाराजांस सज्जनगडावर ब्रह्मविद्येचा लाभ रामदासाकडून झाल्याचा उल्लेख आहे. अनुग्रहाची हकीकत अर्थात् त्यात हनुमानस्वामीच्या बखरींच्या आधारानेच दिली आहे.

२ महाराजांचे देहावसान झाल्यावर थोड्याच वर्षांनी सभासदाने महाराजांच्या चरित्राची बखर लिहिली. तींत रामदासांचा मुळींच उल्लेख नाही. ह्यानंतर चित्रगुप्ताने बखर लिहिली तींत रामदासांचा उल्लेख फक्त दोन स्थळी अगदी त्रोटक केला आहे. त्यांचा अनुग्रह महाराजांनी घेतल्याचा वगैरे उल्लेख मुळीं नाही. राज्याभिषेकानंतर रामदासस्वामींनी महाराजांस राजनितीचा उपदेश केल्याचा मात्र उल्लेख त्यात आहे; पण तोही अगदी संक्षेपतः केला आहे.

३ ही पत्रें रा. गो. का. चांदोरकर यानी केसरीपत्राच्या ता. २६ माहे जून स. १९०६ इसवीच्या अंकात एक पत्र प्रसिद्ध केलें आहे त्यात नमूद केली आहेत. त्यांपैकी दोन उतारे येथें देऊं. केशव गोसावी यानें दिवाकर गोसाव्यास पाठविलेले उत्तर : 'राजेश्री शिवराजे भोंसले समर्थांचे भेटीस येणार म्हणोन लिहिले, समजले. मी येणार होतों पण माझी प्रकृती फार बिघडली येणें होत नाहीं. मी इकडून अकास येणेसाठी लिहिले; परंतु अकाचेंही येणें व्हावयाचे नाही. भानजी गोसावी तेथें असतील. राजे यांची पहिलीच भेट आहे. वाडीचे लोक खटपटीस आणावें. उपयोग होईल... दत्ताजीपंताकडून दोनशे होन उत्सवास पाठविले ते आले असतील. लोभ करावा. मिती चैत्र वद्य १ शके १५९४ (ता. ४ एप्रिल १६७२), महाराजांचे जिजाजी काटकर, हवालदार, कारकून, किल्ले सज्जनगड, यास पत्र : 'श्रीरामदास गोसावी शिवथरी राहतात. सांप्रत कित्येक दिवस गडावरी येतील त्यांस येऊं देणें; राहतील तितके दिवस राहू देणे. उतरतील तेव्हां उतरूं देणे... छ. ८, जमादिलाखर सन सबा सबैन, १०७७ - शके १५९८ (इ .स. १६७६)'

आतां येथें कोणी अशी शंका घेतील कीं, महाराज स. १६७२ पर्यंत त्यांस प्रत्यक्ष भेटले नसले तरी त्यांची माहिती त्यांस असावी. ही माहिती त्यांस निदान स. १६५८ पर्यंत मुळींच नव्हती;[१] व त्यानंतरही समर्थांचे स्मरण त्यांस राहिलें असावें असें दिसत नाहीं. कारण महाराज समर्थांच्या दर्शनासाठी प्रथमच चांफळास गेले तेव्हां, इतके दिवस स्वामींची आपणांकडून कांहींच सेवा घडली नाहीं हें कसें? असा प्रश्न त्यांनी समर्थांच्या शिष्यांस केला होता, असें रामदासांच्या बखरींत लिहिलें आहे. ह्या विस्मरणाचें त्याहूनही बलवत्तर प्रमाण खुद्द रामदास स्वामींच्या वर दिलेल्या ओवीबद्ध पत्रावरून मिळण्यासारखें आहे. त्यांत आपलें वर्तमान घेतलें नाहीं व आपल्याविषयीं विस्मरण झालें असावें असा स्पष्ट उल्लेख समर्थांनी केला आहे. दुसरें असें की, ह्या पत्रांत जी महाराजांची स्तुती केली आहे तिला ते १६४९ त किंवा पुढे पंधरावीस वर्षांनी तरी लायक झाले होते असें सहसा म्हणवत नाहीं. ह्या पत्रांत समर्थांनी महाराजांस जलपती म्हटलें आहे. कोंकणपट्टी काबीज करून तिच्या तीरीं किल्ले बांधण्याच्या व आरमार निर्माण करण्याच्या कामाला त्यांनीं स. १६६३ नंतर सुरुवात केल्याचें इतिहास निश्चितपणे सांगतो. तेव्हां अर्थात् स. १६४९ ह्या वर्षी त्यांस जलपती हे विशेषण लावणे मुळीं शक्य नव्हते. असो; तेव्हां एकंदरीत काय कीं, १६७२ पर्यंत समर्थांची व महाराजांची मुळीं भेटच झाली नव्हती. आतां ही भेट घेतल्यावर लागलीच अनुग्रह घेतला कीं कसें हें निश्चयात्मक सांगतां येत नाहीं.[२] वर समर्थांच्या बखरींतील हकीगत जशाची तशी दिली आहे. ती खरी मानिल्यास वाई, कराड वगैरे प्रांत स. १६७२ तच काबीज केले असावे असें दिसते आणि परळी व सातारा हे किल्ले स. १६७३ त काबीज केले असावे. समर्थांचा शिष्य अनंत गोसावी यानें भैरवभटास एक पत्र पाठविलें होतें.[३] त्यांत 'कैलासवासी शिवाजीराजे भोंसले यांसी परिधावी संवत्सरीं शिंगणवाडीचे मठीं श्रीहनुमंतासमोर परमार्थ झाला' असा स्पष्ट उल्लेख आहे. हा परिधावी संवत्सर स. १६७२ त येतो.

आतां तुकारामबावांच्या सान्निध्याची इच्छा करून महाराजांनी त्यांस आणण्याकरितां लवाजमा व पत्र पाठविलें असतां, त्यांस त्या महाविरक्त साधुवरानें जें एक अभंगात्मक पत्र लिहिलें आहे त्यांत रामदासस्वामींचा उल्लेख असून त्यांच्या ठायीं मन स्थिर करण्याविषयीं बावांनी महाराजांस सांगितलें आहे, ह्यावरून रामदासस्वामींचे दर्शन व अनुग्रह महाराजांस ह्या पत्रव्यवहारापूर्वीच घडला होता असें कोणी म्हणतील, परंतु पूर्वोक्त ऐतिहासिक प्रमाणें असत्य ठरल्यावांचून ह्या अभंगरुप पत्राच्या प्रमाणावर भिस्त ठेवितां येणार नाहीं. दुसरें असें कीं, रामदास स्वामींच्या चरित्रांत दिलेला अनुग्रहाचा शक खरा आहे असें मानून चाललें तर तुकारामबावांचें देहावसान झालें त्याच वर्षी हा अनुग्रह

---

१ दिवाकर गोसाव्यास भास्कर गोसावी यांचे पत्र : 'शिवाजीराजे यांच्याकडे भिक्षेस गेलों. त्यांनी विचारिलें, तुम्ही कोठील कोण, कोणा ठिकाणी असता? त्यावरून आम्हीं बोललो की, आम्ही रामदास श्रीसमर्थांचे शिष्य, चाफळास राहतों. मग ते बोलले कीं, ते कोठें राहतात व मूळगाव कोण? त्यावरून आम्हीं सांगितलें की, 'गंगातीरचे जांबेचे राहणार. प्रस्तुत चाफळास मठ करून श्रीदेवाची स्थापना करून उत्साह महोत्साव चालू करून आम्हां सर्वत्रास आज्ञा कीं, तुम्ही भिक्षा करून उत्साह करीत जावा. ऐसें सांगितल्यावरून आम्ही हिंडत आहों, असें बोलतांच राजश्रींनीं दत्ताजीपंत वाकेनिवीस यास प्रतिवर्षी श्रींचे उत्साहास दोनशें होन देत जाणें म्हणून पत्र पाठविलें. ते होनु समयास येतील, कळावें. फाल्गुन शुद्ध २, शके १५८०' (हें पत्र रा. देव यांनी छापलेल्या दासबोध ग्रंथाच्या प्रस्तावनेंत सेहेचाळीसाव्या पृष्ठावर दिलें आहे.) ही नेमणूक करून दिल्यासंबंधाचा उल्लेख समर्थांच्या शिष्यांचे महाराजांशी जें भाषण झालें त्यात झालेला नाहीं. भेटीसंबंधाचा मजकूर समर्थांच्या बखरींतून घेतला आहे. रा. चांदोरकर आपल्या पूर्वोक्त पत्रांत म्हणतात की, शिवरायांकडून समर्थांस ज्या सनदा मिळाल्या होत्या त्यांत शके १५९४ (१६७२) च्या अलीकडील एकही नव्हती. तेव्हां अर्थात् भास्कर गोसाव्याच्या पत्रांत सांगितलेली वार्षिक रक्कम प्रतिवर्षी नियमानें मिळाली नसून तिचा ठराव त्या वेळीं सनदेने झाला नसावा.

२ पुण्याच्या फर्ग्युसन कॉलेजाचे प्रोफेसर माटे यांनी दोन वर्षापूर्वी ''सज्जनगड व समर्थ रामदास'' नावाचे एक लहानसे पण सुंदर पुस्तक प्रसिद्ध केलें आहे. त्यांत त्यांनी रामदासस्वामी व शिवाजीमहाराज यांचा गुरुशिष्यसंबंध कधीं घडून आला याचा निर्णय प्रकृत ग्रंथातल्यासारखाच केला आहे. ह्या वादाचा योग्य निर्णय विशेष स्पष्टपणें लक्षात यावा असें ज्यांस वाटत असेल त्यानी त्यांचे सदरील पुस्तक अवश्य वाचावें. रा. चांदोरकरांकडची अस्सल पत्रे त्यांनी नीट तपासून वाचून पाहिली आहेत. प्रो. भाटे म्हणतात कीं, केशव गोसाव्याने पूर्वोक्त पत्र पाठविल्यावर आठ दिवसांनी म्हणजे चैत्र वद्य नवमीला महाराजांस अनुग्रह झाला असावा. कारण ह्या तिथीस अमृतसिद्धी योग असून उत्तराषाढा नक्षत्र होते. ह्या अभिजात मुहूर्तावर अनुग्रह झाल्याचा उल्लेख एक-दोन बखरींतही आहे. यास्तव हे त्यांचे अनुमान खरें आहे असे म्हणण्यास हरकत नाही.

३ हेंही पत्र रा. चांदोरकराच्या पुर्वोक्त पत्रात अंशरुपाने अस्सल म्हणून दिले आहे.

झाला असें म्हणावे लागतें. हें जर खरें तर समर्थांचा अनुग्रह घेतल्यानंतर तुकारामबावा, रामदासस्वामी व शिवाजीमहाराज यांच्या अनेक वेळां भेटी झाल्या व परळी येथें मोठा समारंभ झाला तेव्हां तुकारामबावा आले होते, इत्यादी गोष्टी समर्थांच्या बखरींत आहेत त्याही खऱ्या मानून तुकारामबावांचा निधनकाळ बराच पुढें लोटावा लागेल; परंतु तो स. १६४९ सालापलीकडे मुळींच ढकलतां येत नाहीं, हें निर्विवाद आहे. आणखी असें कीं, महाराजांनी बावांस पत्र पाठविलें तें अर्थात् त्यांच्या देहावसानापूर्वी कांही दिवस पाठविलें असलें पाहिजे. परंतु रामदासस्वामींच्या बखरींत तें अनुग्रह घेतल्यानंतर बऱ्याच दिवसांनीं पाठविल्याचा उल्लेख आहे. चिटणीसकृत बखरींतही असाच उल्लेख आहे. ह्या बखरींत तर यासंबंधाचा कांहींसा कृत्रिम प्रकार दिसतो. तींत तुकारामबावांच्या अभंगरूप पत्रोत्तराचे दोन तुकडे केले आहेत. रामदासस्वामींचे दर्शन घडण्यापूर्वी तुकारामबावांस बोलवावयास पाठविलें तेव्हां त्यांनी उत्तर पाठविलें तें दोन अभंगांत दिलें आहे आणि रामदासस्वामींनीं अनुग्रह दिल्यानंतर पुनः महाराजांनी बावांस येऊन दर्शन द्यावयासाठीं विनंतीपत्र लिहिलें, त्याचें उत्तर त्यांनी पाठविलें तें चार अभंगांत दिलें आहे. जर समर्थांच्या ठायीं महाराजांचा भाव दृढ झाला असून त्यांच्या दर्शनाचा वेध लागून राहिला तर तुकारामबावाकडें धाव घेण्याचे त्यांस काय प्रयोजन होतें? नुसते दर्शन घ्यावयाचें होतें तर त्यांस पत्र पाठवून बोलावण्याचें काय कारण होतें? महाराज नेहमीं फिरत असून वेळोवेळां तुकारामबावांचें कीर्तन ऐकावयाची संधी साधीत असत, असा इतरत्र स्पष्ट उल्लेख आहे. अशा समयी त्यांस दर्शन होत नसे काय? तेव्हां अर्थात् हा सगळा प्रकार केवळ बनावट दिसतो.

ह्यावरून असें म्हणावे लागतें कीं, तुकारामबावांच्या कासेस लागण्याचा प्रयत्न महाराज करीत होते तेव्हां समर्थांचे नांवही त्यांस माहीत नसावे. यावर सहजीं अशी शंका उत्पन्न होते कीं, तुकारामबावांनीं आपल्या पत्ररूप अभंगांत जो रामदासस्वामींचा उल्लेख केला आहे त्याची वाट काय? ह्या शंकेचे निरसन असें कीं, त्या अभंगांपैकीं कांहीं अभंग तुकारामबावांचे नसून केवळ प्रक्षिप्त आहेत आणि ते बहुतेक राज्याभिषेकानंतर रामदासस्वामींच्या भक्तांनी रचून त्यात सामील केले आहेत, असें त्यांतील छत्रपती ह्या विशेषणाच्या व अष्टप्रधानांच्या उल्लेखावरून म्हणावें लागतें. कारण तुकारामबावांच्या हयातींत महाराज छत्रपती झाले नसून अष्टप्रधानांचीही योजना त्यांनी केली नव्हती. हा प्रक्षेप करणारांनी आपल्या गुरूची महती वाढविण्यासाठीं हा सत्यापलाप केला नसता तर महाराजांस हीनपणा आणणारा प्रवाद आज महाराष्ट्रात प्रचलित झाला नसता. हा प्रवाद अर्थात् असा कीं, स्वधर्मरक्षण व स्वराज्यसाधन हीं मुख्यत: रामदासस्वामींच्या उपदेशाने महाराजांकडून घडली. ह्या प्रवादाचे सत्यत्व स्थापित करण्यासाठीं कांहीं इतिहाससंशोधक गृहस्थ साधेल तेवढा पुरावाही गोळा करण्यांत गुंतले आहेत असें समजते; परंतु वर नमूद केलेलीं पत्रें खोटीं ठरत नाहीत तोंपर्यंत त्यांचा हा प्रयत्न व्यर्थ होय व त्याचें आजपर्यंतचें एतद्विषयक वाक्पांडित्य केवळ अनर्थक होय.[१]

---

१ रा. राजवाडे यानी तुकारामबावांच्या सदरील अभंगरूप पत्रावरून रामदासस्वामी व शिवाजीमहाराज यांची भेट तुकारामबावांच्या निधनापूर्वी झाल्याचा निर्णय होतो असे प्रतिपादन केलें आहे. तें कितपत सत्य आहे ते वरील विवेचनावरून ध्यानात येण्यासारखे आहे. ह्याशिवाय आणखी तीन कागद त्यांस सापडले आहेत. त्यातील मजकुरावरून प्रथम भेटीच्या काळाचा बराच निर्णय होतो असें त्यांचें म्हणणे आहे. ह्या तीन कागदांपैकी दोन पत्रें आहेत. ही महाराजांनी रामदासस्वामींस राज्याभिषेकानंतर लिहिली आहेत. एका पत्रांत राज्याभिषेकानंतर त्यांची परस्परांची रायगडावर एकांती भेट झाल्याचा उल्लेख आहे आणि दुसरे १६७९ तलें असून त्यात रामदासांच्या कृपेने व उपदेशानुसार वर्तनानेंच आपणांस यशःप्राप्ति झाल्याचा परमलीनतेचा व अहंभावविरहित असा उल्लेख आहे. ह्या अशा औपचारिक उल्लेखाचा आधार केवळ दुर्बळ आहे. महाराजांसारख्या परमभाविक व साधुसंताविषयी परम आदराची वृत्ती सर्वदा हृदयांत वागविणाऱ्या साधुनृपानें आपल्या परमयोग्य गुरुपाशी असा विनय प्रकट करावा हे केवळ अनुरूप होय. त्यावरून भलतेच तर्क करणे अप्रयोजक होय. आता रा. राजवाडे यांना आणखी एक कागद सापडला आहे. त्यात रामदासांच्या चरित्रातील प्रसंगाचें क्रमवार टिप्पण आहे. हनुमानस्वामीनें रामदासांच्या चरित्रग्रंथात जे अद्‌भुत व असंभाव्य प्रसंग वर्णिले आहेत त्याची हे टिप्पण बहुतेक अनुक्रमणिकाच आहे. हे टिप्पण रामदासांच्या निधनानंतर काही दिवसांनी लिहिले असा त्यांत उल्लेख आहे. त्यावर भरंवसा ठेवून रा. राजवाडे म्हणतात कीं, हे टिप्पण इतके जुने आहे त्या अर्थी त्यांतले शक बरोबर असले पाहिजेत आणि हनुमानस्वामींच्या बखरींतले शक ह्या टिप्पणातल्या शकांबरहुकूम आहेत, त्या अर्थी हनुमानस्वामीनें दिलेला अनुग्रहशक बरोबर असलाच पाहिजे; परंतु हे टिप्पण कधी लिहिले याचा काल निश्चित नाही. यास्तव हनुमानस्वामींच्या बखरींतील भाकडकथांचेंच हे टिप्पण असावें. शिवाय तें रामदासस्वामींच्या संप्रदायाच्या अभिमान्यांनी तयार केले आहे. तेव्हां ते हनुमानस्वामींच्या बखरींप्रमाणेच ऐतिहासिक पुराव्यांच्या अभावीं अविश्वसनीय समजले पाहिजे.

आता येथें आणखी एका शंकेचा विचार करून हें प्रकरण संपवूं ही शंका अशी कीं, रामदासस्वामींची शिवाजीमहाराजांनी प्रथम भेट १६७२ त घेतली असून त्या वर्षी किंवा त्याच्या पुढल्या वर्षाच्या आरंभीं त्यांचा अनुग्रह घेतला हें जर निर्विवाद आहे तर समर्थांच्या दासबोधांत जी राजनीत्यादी प्रकरणें त्या राजमणीस उपदेशपर अशीं आढळतात तीं केव्हां लिहिलीं असावीं? ह्या शंकेचे समाधान असें आहे कीं, दासबोधाचे जे एकंदर वीस दशक आजला उपलब्ध आहेत त्यांपैकी पहिले आठ दशक काय ते मूळचे असून दासबोध सगळा एवढाच होतां व बाकीचे दशक एक तर समर्थांच्या शिष्यांनी मागाहून सामील केले असावें किंवा समर्थांनींच ते पुढें प्रसंगोपात्त रचले असावेत. रा. शं. श्री. देव यांनीं आपल्या दासबोधावरील प्रस्तावनेंत (प्रथमावृत्ती) ह्या संबंधाचा पुरावा येणेंप्रमाणें नमूद केला आहे – (१) आठ दशकांच्या अखेरपर्यंत ग्रंथाचा प्रवाह एकसारखा चाललेला दिसतो. त्यांत कोठेंही पुनरुक्ती नाहीं. अनेकवेळां पुनरुक्ती करण्यांत आली आहे ती आठव्या दशकानंतर. श्रीसमर्थांना मुख्यतः अध्यात्मनिरूपण करावयाचें होतें. अध्यात्माशिवाय आठ दशकांच्या अखेरपर्यंत दुसरा विषय नाहीं. राजकारण हा शब्द आठ दशकांपर्यंत कोठेही आलेला नाहीं. श्रीशिवाजीमहाराजांचा ओघ अजून येऊन मिळाला नव्हता. राजकारण हा शब्द प्रथम नवव्या दशकांत ओझरता आला आहे; (२) द. ७– १० –४२ ही ओवी अशी आहे 'सरली शब्दाची खटपट। आला ग्रंथाचा शेवट। येथें सांगितलें पष्ट। सद्‌गुरुभजन।। आणि खरोखरच आतां फक्त ज्ञानदशक सांगून ग्रंथ संपूर्ण करावयाचा होता. (३) नवव्या दशकाच्या सहाव्या समासाची दुसरी ओवी अशी आहे : 'हें दासबोधीं असे बोलिलें। ज्ञानदशकीं प्रांजळ केलें। मूळमायेंत दाखविलें। पंचभूतिक।।' ह्या ओवीवरून हें सिद्ध होतें कीं, हा दशक दासबोधांतील म्हणून लिहिला नाहीं. हीच गति ह्या पुढील दशकांची समजावयाची आणि ज्या अर्थी ह्या शेवटल्या बारा दशकांत कोठेंकोठें शिवाजीमहाराजांस उद्देशून बोध आहे असें म्हणतात त्या अर्थी ते स. १६७२ नंतर रचिले असावे. तेव्हां एकंदरींत ह्या वादावरून असा निष्कर्ष निघतो कीं, समर्थांच्या ज्या बोधाची एवढी महती त्यांचे भक्त गातात तो महाराजांनी स्वराज्यसाधन व स्वातंत्र्यसंपादन यांसंबंधाचा उद्योग बहुतेक आटोपल्यावर झालेला आहे, किंबहुना त्यांच्या ह्या अलौकिक कर्तृत्वावरूनच त्या साधूस हा बोध सुचला असावा. हनुमानस्वामीने आपल्या बखरींत असे लिहिले आहे कीं, स. १६४९ त महाराज समर्थांस भेटावयास गेले तेव्हां समर्थांनी त्यांस दासबोधाच्या तेराव्या दशकातील लघुबोध केला, परंतु ह्या वेळीं दासबोधाचे एक अक्षरही लिहिले नसावें असे दिसते. कारण समर्थांनी १६५४ त एकांती जाऊन दासबोध लिहिण्यास आरंभ केल्याचा पुरावा व दिवाकर गोसाव्याने बहिरंभटास शके १५७६ त पाठविलेल्या पत्रावरून होतो. त्या पत्रात येणेप्रमाणे मजकूर आहे. 'कल्याण गोसावी, चिमणाबाई, आका व अनंतकवी यास घेऊन ग्रंथलेखनाकरितां शिवथराचे घळीत दहा संवत्सर राहाण्याचा संकल्प करून श्रीसमर्थ गेले.[१] शिवाय प्रत्यक्ष दासबोधातही ह्या रचनाकाळाच्या निर्णयास आधार आहे. तो असा दासबोधाच्या सहाव्या दशकाच्या चौथ्या समासात, 'चार सहस्त्र, सातशेंसाठी।। इतुकी कलियुगाची राहाटी।। उरल्या कलियुगाची गोष्टी।। ऐसी असें।।' अशी एक ओवीं आहे. ही वरून समास स. १६५९ त समर्थ लिहीत होते असे म्हणावे लागते.

ह्या प्रथम भेटीच्या काळाच्या निर्णयासंबंधाने आणखी एक तर्क अलीकडे निघाला आहे. त्याचा समाचार घेऊन प्रकृत विवेचन पुरें करूं. हनुमानस्वामीच्या बखरींत एकेठिकाणी अनुग्रहाचा संवत्सर विकारी हा होता असा उल्लेख आहे. प्रथमभेटीची सांप्रदायिक मिती व वार ही ह्या संवत्सरात जुळतात म्हणून ह्या विकारी संवत्सरांत प्रथम भेट झाली असावी असा कित्येकांचा तर्क आहे. हा विकारी संवत्सर स. १६५९ त येतो; परंतु हा शकही वर दिलेल्या कारणास्तव खरा नाही हे उघड आहे. ह्या शकांत महाराजांनी अफझुलखानाचा वध केल्यावर समर्थांचे परळीस जाऊन दर्शन घेतले. त्या वेळी समर्थांनी त्यांना अठराव्या दशकातील सहाव्या समासांतला उत्तम पुरुषलक्षणाचा बोध केला अशी सांप्रदायिक बखरींत एक भाकडकथा आहे. तीवरून सदरील पक्ष आपल्या तर्कास बळकटी येते असें म्हणतो. परंतु ह्या शकांत

१ रा. चांदोरकरानी पूर्वोक्त पत्रात दिवाकर गोसाव्याचा हा पत्रांश अस्सल म्हणून दिला आहे.

समर्थ सदरीं दर्शविल्याप्रमाणे सहावा दशक लिहीत होते. त्या वेळी अठरावा दशक मुळीं लिहिला नव्हता. आणि स. १६५९ त समर्थ परळीस असण्याचा संभव नव्हता. कारण महाराजांनी, तो किल्ला काबीज केल्यावर चाफळाहून त्यांना परळीस आणलें आणखी असे कीं, दिवाकरभटाच्या वर दिलेल्या पत्रावरून असे दिसते कीं, समर्थ ह्या वेळीं शिवथर खोऱ्यांत एकांती जाऊन दासबोध रचनेत गुंतले होते.

एकंदरीत सारांश काय कीं, दादाजी कोंडदेवानें स्वराज्यस्थापनेस आरंभ करून महाराजांस तो मार्ग दाखविला. किंबहुना शहाजीराजांच्या पदरच्या कारकुनांनीं हा स्तुत्य उद्योग महाराजांस पुढें करून सुरू केला असें म्हणणारे इतिहासपंडित आमच्या देशांत झळकत आहेत, त्यांच्या ह्या विधानाचा खोडसाळपणा मागें दाखविण्याचा प्रयत्न केलाच आहे.[१] तसाच हा रामदासस्वामींस महाराजांच्या हातून घडलेल्या एकंदर कर्तृत्वाचें श्रेय देण्याचा प्रयत्न आहे. हा किती खोटा आहे हें सदरील विवेचनावरून वाचकांच्या लक्षांत येईल अशी उमेद आहे.[२]

***

१ मागे पाचवा भाग पाहा

२ ह्या खोटसाळपणाचा आणखी एक मामला येथे नमूद करण्याजोगा आहे. तो असा : 'रामदास व रामदासी' नावाच्या ग्रंथमालेतील नवव्या भागात समर्थांच्या संप्रदायाची कागदपत्रे प्रसिद्ध केली आहेत. त्यांत रा. चांदोरकर यांच्याकडील सदरी निर्दिष्ट केलेल्या पत्रांचा समावेश केलेला नाही! ही पत्रें प्रसिद्ध केल्याने समर्थांच्या संप्रदायास व त्यांच्या आजपर्यंत गाजलेल्या महतीस न्यूनत्व येईल अशी प्रकाशकास दहशत वाटली असावी. रा. चांदोरकराकडील कागदपत्रांची हकीकत प्रो. भाटे यांनी सदरी सांगितलेल्या 'सज्जनगड व समर्थ रामदास' ह्या आपल्या पुस्तकांत दिली आहे. तीवरून पाहता समर्थांचा वर सांगितलेला शिष्य दिवाकरभट याच्या उपाध्ये आडनावाच्या मालेगाव येथल्या एका वंशजाने समर्थ संप्रदायासंबंधाची बरीच कागदपत्रें अत्यंत अमोल निधी म्हणून एका जस्ती पेटीत घालून ह्या उपाध्यायांच्या वडिलांनी जमिनीत पुरुन ठेविली होती. ती रा. चांदोरकरांनी त्याच्या घरीं मध्यरात्रीस जाऊन त्याच्या मातुश्रीस नकळत आणिली. ह्यावरून पाहता. 'रामदास व रामदासी' ग्रंथमालेच्या प्रकाशकांस ह्या कागदपत्रांच्या अस्सलपणाविषयी संशय घेण्यास मुळीं जागा नव्हती. असें असता. ही अशी सत्यगोपनमूलक आवडनिवड त्यांनी का केली तें कळत नाही. प्रो. भाटे यांचे सदरील पुस्तक प्रसिद्ध झाल्यावर 'मराठी रियासती'चें कर्ते रा. सरदेसाई यानी 'नवयुग' नामक मासिक पुस्तकांत एक लेख लिहून शिवाजीमहाराज व रामदासस्वामी यांच्या गुरूशिष्यत्वासंबंधाचा समर्थसांप्रदायानुसार झालेला आपला अभिप्राय आपल्या ग्रंथाच्या पुढल्या आवृत्तीत बदलण्याचे अभिवचन दिले आहे. स. १९०७ त प्रकृत चरित्रग्रंथ पहिल्याने प्रसिद्ध झाला. तो रा. सरदेसाई यांनी वाचला नाही असे म्हणता येत नाही. त्यात सदरी दिलेल्या सांप्रदायिक मताविरूद्ध अभिप्राय नमूद केला होता. तो रा. सरदेसाई यांस पटला नव्हता. परंतु हाच पुरावा प्रो. भाटे यांनी दिला तो त्यास खरा वाटला, ही गोष्ट लक्षात ठेवण्याजोगी आहे. दादाजी कोंडदेव शिवाजीमहाराजांस स्वराज्यस्थापनेच्या कामी स्कूर्तिदाता व साहाय्यकारी होता, किंबहुना स्वराज्याचा मूळ पाया घालणारा होता असा जो रा. सरदेसाई यांचा अभिप्राय आहे तो प्रकृत ग्रंथ पुनः वाचून बदलेल काय?

भाग तिसावा

अंतकाळ

(१६८०)

मागें सांगितल्याप्रमाणें खांदेरी बेटावर ठाणें करून इंग्रजांस व शिद्दीस जागच्या जागीं बसविल्यावर महाराजांस अशी बातमी लागली कीं, औरंगाबाद येथील लष्कराच्या खर्चासाठीं पुष्कळ मोठी रक्कम दिल्लीहून येत आहे. त्यासरशी त्यांनी आपले निवडक घोडेस्वार बरोबर घेऊन, कोणांस कळूं न देतां, ती रक्कम घेऊन येणारांवर हल्ला केला व तें सगळे द्रव्य हस्तगत करून शत्रूकडून हरकत होण्यापूर्वी ते रायगडावर अतिवेगानें येऊन पोचले. ह्या दौडीमुळे त्यांस अतिशयित थकवा आला, त्यांच्या छातीत दुखू लागलें, थुंकीतून रक्त पडूं लागलें व अंगांत मनस्वी ज्वर भरला.[१] हें दुखणें दिवसेंदिवस अधिकाधिक जड होत चाललें. पदरच्या लोकांनी मोठमोठे वैद्य आणून नाना प्रकारचे उपचार केले. अनेक देवतांस नवस केले. सर्व प्रकारचीं अनुष्ठानें केलीं. मांत्रिकांकरवीं जादूटोणे करविले. सारांश, सर्व प्रकारच्या उपायांची पराकाष्ठा केली; पण कांहीं एक उतार पडेना.

आपण आजारी पडून अत्यवस्थ झाल्याची बातमी बाहेर कळूं देऊं नये अशी महाराजांनीं सक्त ताकीद दिली होती आणि ही वार्ता पसरली असती तरी ती कोणीं खरी मानिली नसती. कारण अशी वार्ता पूर्वी अनेक वेळा पसरून ते कोणत्या तरी मोहिमेवर जाण्याच्या तयारींत असत, असें मुसलमान बखरकारांचें म्हणणें आहे. ह्या समयीं महाराजांचे लोक सुरतेच्या तटापर्यंत धुमाकूळ करीत जाऊन त्या शहरावर त्यांनी मोठ्या नेटाचा हल्ला चालविला होता. त्यावरून आंतील लोकांस असें वाटलें कीं, प्रत्यक्ष शिवाजीमहाराज आपल्या शहरावर हल्ला करावयास आले आहेत. त्यामुळें त्यांची अगदीं त्रेधा उडून गेली. इंग्रज व्यापाऱ्यांनी आपला पैसाअडका सगळा तापीनदीच्या पलीकडे स्वाली येथें त्यांची कांहीं जहाजें होतीं त्यांवर पाठवून दिला. सुरतेच्या मोगल सुभेदारानें ह्या वेळीं पुष्कळ खंड भरून मोरोपंत पेशव्यास माघारी परतविलें. ह्या मोहिमेवर महाराजांचा स्वतः जाण्याचा विचार होता; परंतु प्राणांत दुखणें लागल्यामुळें तो बेत रहित करणें प्राप्त झालें. वर सांगितल्याप्रमाणें गुजराथ प्रांतांत लुटालूट करून व खंड वसूल करून मोरोपंत रायगडावर आला तो महाराजांची प्रकृती बेसुमार बिघडली होती.

आपला अंतसमय समीप आला असें पाहून महाराजांनी आपले प्रधान वगैरे कारभारी व आप्तजन जवळ बोलाविले. त्या वेळीं मोरोपंत पेशवे, प्रल्हादपंत न्यायाधीश, बाळाजी आवजी चिटणीस, रामचंद्रपंत अमात्य, रावजी सोमनाथ, सूर्याजी मालुसरे, बाजी कदम, महादजी नाईक पानसंबळ वगैरे गृहस्थ जवळ होते. त्यांस महाराज म्हणाले :

१ सभासद व चित्रगुप्त म्हणतात की, त्यांच्या अंगांत नुसता शीतज्वराचा प्रादुर्भाव झाला होता. चिटणीस व रायरींची बखर लिहिणारा हे म्हणतात कीं, ज्वराची व्यथा झाली होती. ग्रांट डफ गुडघीचा रोग झाला होता असें म्हणतो. बुंदेल्याच्या बखरींत मरणाचे कारण निराळेंच दिलें आहे. तो म्हणतो की, महाराजांनी जालनाशहरावर हल्ला केला तेव्हा त्यांच्या लोकांनी तेथील मुसलमान फकिरांस उपद्रव दिल्यामुळें त्यांनी महाराजांस शाप दिले. त्या शापामुळे ते आजारी पडून मरण पावले ! शिवदिग्विजयात तर याहूनही चमत्कारिक कारण दिलें आहे. तें असें की, महाराजांची द्वितीय पत्नी सोयराबाई हिनें महाराजांस विषप्रयोग केला! तो अशासाठीं की, संभाजी पन्हाळ्यास अटकेत आहे ही संधी साधून आपला पुत्र राजाराम यास गादीवर बसवावें. मुळातील हकीकत त्या वेळचा प्रवासी डॉ. फ्रिअर व प्रसिद्ध इतिहासकार ऑर्मी यांच्या ग्रंथांवरून घेतली आहे.

''आमच्या आयुष्याची मर्यादा संपली. आतां आमचा निधनसमय दिसतो. अतःपर आमचा देह राहात नाहीं. आमच्या वडिलांची चाळीस हजार होनांची जहागीर होती, ती वाढवून एक कोट होनांचें राज्य आम्हीं मिळविले. ऐंशी हजार पागा केली. ह्या राज्याचे आमच्या मागें मर्दुमकीनें, हिमतीनें व हुशारीनें रक्षण करावे. राजाराम अल्पवयी आहे, तो वांचला तर तो एक हें राज्य संभाळून वाढवील. संभाजी वडील मुलगा असून तो जाणता आहे वडील पुत्रानें राज्य करावे व कनिष्ठ पुत्रानें त्याच्या आज्ञेंत चालून त्याची सेवा करावी, असा राजधर्म आहे; उभयतां पुत्रांस राज्य वांटून देत होतों; परंतु संभाजी त्यास कबूल झाला नाहीं. इतकेही करून राज्याचे विभाग करावे, तर लष्करातले नामांकित शूर सरदार संभाजी वडील म्हणून त्याच्या पक्षाकडे जातील. राजाराम धाकटा म्हणून लष्कराचा ओढा त्याच्याकडे न होऊन त्याचा पक्ष दुर्बल होईल. कारभारी लोक राजारामाचा पक्ष धरून राहतील. अशानें दुफळी होईल. क्षुद्र लोकांचा वरपगडा होईल. जे नामांकित व घरंदाज पुरुष क्षमसाहस करून आजपर्यंत आम्हांला सहाय्य झाले त्यांचा अपमान व अप्रतिष्ठा होऊन राज्याची एकंदर शिस्त बिघडेल. आम्हीं गुणसंपन्न माणसें मिळवून स्वराज्याचा पाया घातला. त्या माणसांची आमच्या पश्चात दुर्दशा व बेअदबी होऊन तीं राहणार नाहींत. हा असा आमच्या राज्यांत घोटाळा झाला म्हणजे औरंगजेबास आयतेंच फावेल. तो आजपर्यंत आमच्या धाकाने जागच्याजागीं राहिला आहे. तो ही अव्यवस्था पाहून मोठ्या फौजेनिशीं दक्षिणेंत स्वारी करील. पहिल्यानें अदिलशाही व कुतुबशाही पादशाहती दुर्बल झाल्या आहेत. त्यांचा नायनाट करून तो आमच्या राज्यावर चढाई करील. औरंगजेब त्याचा सर्वस्वीं नाश करण्यास प्रवृत्त होईल.

हें असें निदानींचे व निरुत्साहाचे भाषण ऐकून सर्वांचे कंठ दाटून आले. त्यांच्या नेत्रांतून अश्रुधारा वाहू लागल्या. त्यांस पराकाष्ठेचें दुःख झालेलें पाहून महाराज बोलले, ''तुम्हीं अणुमात्र श्रमी होऊं नका. ह्या मानवी देहास ईश्वराने मृत्यू नेमिला आहे. हा मृत्युलोक आहे. जितके उत्पन्न झाले तितके जावयाचे. चिरंजीव असा कोणीच नाहीं. धन, सुत, जाया, वीरश्री, पराक्रम, अहंता हीं सर्व मिथ्या असून येथल्या येथेंच रहावयाचीं. त्यांस लुब्ध होऊन मोहवश झाल्यानें चित्तास नसती तळमळ लागते. त्यांत कांहीं हित नाहीं. ज्या काळीं जें घडावयाचें तें प्रमाण मानून निरपेक्ष चित्तानें वर्तावें यांतच कल्याण आहे. तुम्ही सर्व पराक्रमी आहां. कळेल तसा प्रयत्न करून स्वराज्याचें रक्षण करा. सर्व जण एका विचारानें वागा. आमच्या प्रकृतीस आराम पडावा म्हणून तुम्हीं करावयाचे तेवढे प्रयत्न केले. सर्व मानवी प्रयत्न कुंठित झाले. आतां प्रयत्न करूं नका. आमची आयुष्यमर्यादा पूर्ण झाली. आम्ही स्वर्गानुभवास जावयास सिद्ध झालो. आतां तुम्ही सावध रहा. आमच्यामागें क्रियापूर्वक राज्यरक्षण करा. संपूर्ण भरतखंड जिंकावें, दिल्लीचे तक्त घ्यावें, श्रीभागीरथी करमुक्त करावी, अटकनदीच्या पलीकडे राज्य आक्रमण करून शासन चालवावें; असा आमचा उत्कट हेतू होता तो, असिद्ध राहिला. आमचें आयुष्य खुंटलें. तुम्ही ह्या गोष्टीचा शोक करूं नये. विवेकानें चित्ताचें समाधान करावें.'' ह्याप्रमाणें त्यांचें सांत्वन करून महाराजांनी सगळ्यांस बाहेर जावयास सांगितलें.

मग त्यांनीं भागीरथीचें उदक आणून प्रायश्चित्तविधियुक्त स्नान केलें. सर्व अंगास अग्निहोत्राचें भस्मलेपन करून त्यांनी रुद्राक्ष व तुळशीमाळा धारण केल्या. दर्भासनीं बसून मोठमोठ्या पंडितांस व संन्याशांस जवळ बोलाविलें व त्यांशीं आत्मानात्मविचार चालविला. अशी विरक्तता धारण करून ते सर्व काळ भगवदभजन करूं लागले व कथाकीर्तनादी श्रवण करून काळ घालवूं लागले. शतगोप्रदानें आपल्या समक्ष करवून त्यांनीं सहस्त्र गोप्रदानांचा द्रव्यद्वारा संकल्प केला आणि भगवद्गीता व सहस्रनाम यांचे पाठ चालविले. असा आसमंतात ब्रह्मवृंदाच्या वाणीचा घोष चालला असतां, शके १६०२ रौद्रनाम संवत्सरे उत्तरायणीं चैत्र शुद्ध पोर्णिमेस रविवारी दोन प्रहरी (ता. ५, एप्रिल १६८० इ.) 'श्रीराम' हे शब्द उच्चारून महाराजांनीं अत्यंत शांतपणें व समाहित चित्ताने देहत्याग केला. ह्याप्रमाणें आमरण अविश्रांत परिश्रम व पराक्रम करून संपादिलेलें ऐश्वर्य व दौलत सोडून जातांना त्यांस अत्यल्पही खेद झाला नाहीं, हें कांहीं लहानसान धैर्य नव्हे धर्मपरायणतेनें प्राप्त होणारे मनोजय करण्याचें सामर्थ्य त्यांच्या ठायीं किती वसत होतें हें ह्यावरून चांगले व्यक्त होतें. पुराणांतरीं वर्णिलेल्या राजर्षींच्या क्रमास अनुसरून सर्व राज्य पुत्राच्या स्वाधीन करून व सर्वसंगपरित्याग

करून ईश्वरप्राप्तीच्या मार्गाचें अखंड अवलंबन करावें असा विचार त्यांच्या मनांत वारंवार येई; परंतु यवनपादशाहतीचें भरतभूमींतून समूळ उच्चाटन करून हिंदुपदपातशाहीची संस्थापना करण्याचा जो आपला हेतू आहे तो अपूर्ण राहिला आहे, तशात आपल्या पश्चात– स्वराज्याचें रक्षण करून प्रजेचें यथान्याय पालन करण्याजोगे गुण आपल्या वडील पुत्राच्या अंगी नाहींत, तेव्हां अशा स्थितींत राज्यत्याग करून वानप्रस्थाश्रमाचा अंगीकार केल्यास स्वप्रजेचें अहित होऊन स्वराज्यनाश होईल व तेणेंकरून आपली सर्वत्र अपकीर्ती होईल, हे विचार त्यांच्या मनांत येऊन संसारत्यागाचा विचार त्यांस अकालिक वाटे. शेवटीं त्यांनी असा निर्धार केला होता कीं, संसारांत राहून धर्माचरण करावें, सत्समागम करावा, विषयसुखांत आसक्त होऊं नये व स्वकर्तव्य यथासांग करून मोक्ष साधावा यांतच खरा पुरुषार्थ आहे. संसारत्याग करून गिरिकुहराचा वास केल्याने स्वकर्तव्यपराङ्मुख झाल्याचा दोष पदरीं येऊन आपला भ्याडपणा व्यक्त होईल असें त्यांस वाटे.

महाराजांचे देहावसान झालें तेव्हां सर्व कारभारी, सरदार व आप्तजन यांस पराकाष्ठेचें दुःख झालें. आबालवृद्ध शोकसागरांत बुडाले. प्रधानमंडळीनें किल्ल्याचे दरवाजे बंद करून ही निधनवार्ता बाहेर न पसरेल अशी खबरदारी घेतली. सर्व राजचिन्हांनीं युक्त अशी प्रेतयात्रा काढून महाराजांच्या कलेवरास विधिपूर्वक मंत्राग्नि दिला. महाराजांची तृतीय पत्नी पुतळाबाई हिने सहगमन केलें उत्तरक्रिया साबाजी भोसले[१] शिंगणापूरकर यांच्याकडून राजारामास समीप बसवून सांगोपाग करविली. दानधर्म बहुत केला.

महाराजांस सात बायका होत्या त्या अशा : (१) सईबाई, ही फलटणच्या प्रख्यात निंबाळकरांच्या घराण्यातील होती.[२] (२) सोयराबाई, ही शिर्के घराण्यातील होती. (३) पुतळाबाई,[३] (४) सकवारबाई, ही गायकवाड घराण्यातील होती. (५) सगुणाबाई, ही शिर्क्यांच्या घराण्यातील होती. (६) लक्ष्मीबाई,[४] (७) गुणवंताबाई. सईबाईस संभाजी, सखुबाई व अंबिकाबाई अशी तीन अपत्य झाली. सखुबाई ही फलटणच्या महादजी नाईक निंबाळकर यास दिली होती. ह्या शरीरसंबंधाविषयीची अशी गोष्ट आहे कीं, फलटणचा बजाजी निंबाळकर हा कांही कारणांमुळे मुसलमान झाला. हा महाराजांचा नातेवाईक असल्यामुळे त्याला शुद्ध करून परत हिंदुधर्मात घ्यावे असे मातुश्री जिजाबाई हिच्या मनात येऊन तिने शिंगणापूरच्या एका उपाध्यायास तयार करून बजाजीस प्रायश्चित्त देऊन शुद्ध करविले आणि तो असा शुद्ध होऊन स्वज्ञातीत आल्याबद्दल कोणास संशय वाटू नये म्हणून त्याचा मुलगा वर सांगितलेला महादजी यास महाराजांची मुलगी सखुबाई ही दिली.[५] सईबाईची दुसरी मुलगी हरजी राजे महाडीक तारळेकर यांस दिली होती.[६] सोयराबाईस राजाराम व दिपाबाई अशी दोन मुले झाली. दिपाबाई[७] ही विसाजीराव नावाच्या एका सरदारास दिली होती.

---

१ ग्रांट डफ ह्याचें नाव शहाजी भोंसले असें देतो.

२ मागे ४८ व्या पृष्ठावर ही शिर्क्यांच्या घराण्यातील होती असें आम्ही म्हटले आहे ते अर्थात् चुकीचे आहे. शेडगावकर भोसल्यांकडील वंशावळीच्या आधारावरून मि. किंकेड म्हणतात की, सईबाई विठोजी मोहिते नेवासकर यांची कन्या होती. (पृ.२७७)

३ ही जाधव किंवा इंगळे यांच्या घराण्यातील होती असे जेध्यांच्या शकावलीवरून दिसते; पण रा. राजवाडे यांनी आपल्या संकीर्ण लेखांत दिलेल्या यादीवरून ती पालकराची मुलगी होती असें दिसतें.

४ ह्या दोघींची नावे रा. राजवाडे यांनी प्रसिद्ध केलेल्या यादींत नाहींत. हीं नांवे शेडगावकरांच्या वंशावळीवरून घेतली आहेत. रा. राजवाड्याच्या यादीत जाधवांच्या घराण्यांतली काशीबाई हें एक नाव आहे. जेध्यांच्या शकावलींत जाधवांशी शरीरसंबंध केल्याचा उल्लेख आहे. तो कदाचित ह्या काशीबाईसंबंधाचा असावा. रा. राजवाड्यांच्या यादींत आठ बायका होत्या असे म्हटलें असून सहा बायकांची नावें दिली आहेत. आणि दोघींची नांवे न देतां. त्या फर्जंद व विचारे यांच्या घराण्यातल्या होत्या असे म्हटले आहे.

५ ही पतितपावन केल्याची अलौकीक गोष्ट फलटणच्या निंबाळकरांच्या दफ्तरातून घेतली आहे. ह्या जावयाला महाराजांनी पुरंदर तालुक्यांतल्या एका गांवाची पाटीलकी बाराशें होनांस खरेदी करून अर्पण केली होती असें म्हणतात.

६ रा. राजवाडे यांच्या सदरीं सांगितलेल्या यादींत सईबाईला आणखी एक राणूबाई नांवाची मुलगी असून ती जाधवांच्या घराण्यांत दिली होती असा उल्लेख आहे.

७ हिचे नांव बाळीबाई होतें असें रा. राजवाड्यांच्या यादींत नमूद केलें आहे.

सकवारबाईला एक मुलगी झाली. तिचे नाव कमळाबाई ही जानोजी पालकर यास दिली होती. जेध्यांच्या शकावलीवरून असे दिसते कीं, ह्या सखवारबाईशी महाराजांनी १६५७ साली विवाह केला आणि ही स. १६७४ च्या मार्च महिन्यात ती निवर्तली. पुतळाबाई अपत्यहीन होती. हीने महाराजांबरोबर सहगमन केले. सगुणाबाईस राजकुवारबाई (नानीबाई) नावाची मुलगी होती. ती गणोजीराजे शिर्के मालेकर यास दिली होती. बाकीच्या दोघी गुणवंताबाई व लक्ष्मीबाई या अपत्यहीन होत्या. महाराजांच्या स्त्रियांच्या संख्येसंबंधाने बखरकारांचे एकमत नाही. ह्या चरित्रलेखाच्या प्रथमावृत्तीत आम्ही फक्त तीन बायकांची नावे देऊन निरनिराळ्या बखरकारांचे व इतिहासवृत्तलेखकाचे काय म्हणणे आहे ते लिहिले होते. महाराजांचा प्रथम चरित्रलेखक जो सभासद तो महाराजांच्या सात बायका होत्या असे म्हणतो परंतु त्याने त्यांची नावे दिली नाहीत. रामदासांच्या चरित्रात्मक बखरींत सईबाई, पुतळाबाई, सगुणाबाई अशा तीन बायकांच्या नावाचा निर्देश करून आणखी त्यांच्या दोन उपस्त्रिया होत्या असे म्हटले आहे. ह्या अशा उपस्त्रिया असल्याचा उल्लेख इतरत्र आढळत नाही, तेव्हां तो विश्वसनीय नसावा.

त्या बखरींत नमूद केलेल्या इतर भाकडकथांसारखीच ही एक भाकडकथा असावी. ह्या बखरकाराला पुतळाबाई जी महाराजांच्या चितेवर सती गेली तिचे नावही ठाऊक नव्हते. रा. राजवाडे हे आपल्या 'संकीर्ण लेखसंग्रहा'त तंजावर येथे सापडलेल्या एका यादीच्या आधारावरून असे म्हणतात कीं, महाराजांच्या आठ बायका होत्या. त्यापैकी सहा बायकांची ते नावे वगैरे देतात. बाकीच्या दोघींची नावे ते देत नाहीत. यावरून कोणी असा तर्क करितात कीं, ह्या दोघी त्यांच्या राखा असाव्या. आता ऐतिहासिक पुरावा पाहता महाराजांची एक बायको स. १६७४ च्या मार्च महिन्यात मरण पावल्याचा उल्लेख इंग्रज व्यापाऱ्यांचा वकील नारायण शेणवी याने ह्या व्यापाऱ्यांस पाठविलेल्या एका पत्रात केला आहे. इंग्रज व्यापारी हेन्री ऑक्झिंन्डेन याचा महाराजांच्या राज्याभिषेकासंबंधाने स. १६७४ तील ता. २७ मे चा लेख आहे. त्यात असा उल्लेख आहे कीं, महाराज ह्यावेळी दोन नव्या बायका करण्याच्या विचारात होते. जेध्यांच्या शकावलीत असा उल्लेख आहे कीं, महाराजांनी राज्याभिषेकासमारंभापूर्वी आपला व्रतबंध विधी वेदोक्त मंत्र उच्चारून करविला आणि मग दोन दिवसांनी वेदोक्तमंत्रोच्चारापूर्वक आपला एक विवाह करविला. हेन्री ऑक्झिंग्डनचे सदरील म्हणणे खरें असण्याचा दृढ संभव असल्याकारणाने महाराजांनी राज्याभिषेकानंतर लागलीच पुनः आणखी एक वेदमंत्रोच्चारपूर्वक विवाह मोठ्या थाटाने केला असावा असे दिसते. त्यावेळचा डॉ. फ्रिअरनामक प्रवासी आपल्या प्रवासवृत्तात म्हणतो कीं, राज्याभिषेकासमयी महाराजांनी चौथी बायको केली. ऑक्झिंडनच्या स. १६७४ तील जून महिन्याच्या आठव्या तारखेच्या पत्रात असा उल्लेख आहे कीं, शिवाजीमहाराजांनी राज्याभिषेकानंतर आणखी चौथी बायको केली. या व्यापाऱ्याने वर निर्दिष्ट केल्याप्रमाणे ता. २७ मे रोजी लिहिलेल्या आपल्या पत्रात दोन बायका करण्याच्या तयारीत शिवाजीमहाराज आहेत असे म्हटले होते. ह्यावरून असे सिद्ध होते की, ही शेवटी चौथी म्हणून जी बायको केली ती जीवंत असलेल्या बायकांपैकी चौथी होती. सईबाई स. १६५९ त मरण पावली व दुसरी बायको स. १६७४ च्या मार्च महिन्यात मरण पावली. ह्या दोघी सदरील इंग्रज लेखकांनी जमेस धरिल्या नसाव्या. आता पुतळाबाई जी महाराजांच्या पश्चात सती गेली तिच्याशी महाराजांनी बऱ्याच वर्षांपूर्वी विवाह केला असावा. कोणी म्हणतात कीं, सईबाई निवर्तल्यावर स. १६५९ त पुतळाबाईंशी विवाह केला असावा. ही बाई सती गेली यावरून तिचे महाराजांशी बहुत वर्षांचे साहचर्य असून तिचे त्यांजवर अकृत्रिम प्रेम होते असे दिसते. राज्याभिषेकावेळी केलेल्या दोन तरूण बायकांपैकी कोणी अशी सती जाण्यास तयार होणे असंभवनीय नव्हते. तेव्हां सारांश काय कीं, महाराजांस सहा बायका तर खास होत्या असे दिसते. सभासद सात बायका होत्या असे म्हणतो, पण त्यांची नावे देत नाही. रा. राजवाड्यांच्या पूर्वोक्त लेखात आठ बायकाचा उल्लेख आहे. परंतु त्यापैकी सहांचीच तेवढी नावे तींत नमूद केली आहेत. शेडगावकरांच्या वंशावळीत सात बायकांचा उल्लेख असून त्या सगळ्यांची नावे दिली आहेत. यास्तव सभासदांच्या एतद्विषयक उल्लेखाला सदरील वंशावळीतली सात नावे परिपोषक असल्यावरून सात बायका होत्या असे गृहीत धरून त्यांची नावे दिली आहेत.

ह्या सगळ्या राण्यांमध्ये सईबाई ही मोठी सुशील, शहाणी व पतिव्रता होती. तिच्यावर महाराजांची अतिशयित प्रीती होती. ती मरण पावल्यापासून महाराजांस कुटुंबसुख चांगलेसे लाभले नाही. तिचा मुलगा संभाजी ह्याचे आचरण शुद्ध नसल्यामुळे महाराजांना तो मुळी आवडत नसे. सोयराबाईचा मुलगा राजाराम हा स. १६६४ त[१] जन्मला. ह्याची लक्षणे बरी असून तो पुढें चांगला निपजेल असा महाराजांचा अभिप्राय झाला होता. सोयराबाई मोठी कारस्थानी बायको होती. आपला पुत्र राजाराम ह्यास गादी मिळावी अशी तिची उत्कट इच्छा असून तत्सिद्ध्यर्थ तिचा प्रयत्न महाराज हयात असतांनाच सुरू होता. तिनें बहुतेक प्रधान आपल्या ह्या उद्देशास अनुकूल करून घेतले होते. विशेषतः अण्णाजी दत्तोपंत सचिव तिच्या तर्फेचा होता. कारभारीमंडळी सोयराबाईच्या पक्षास अनुकूल झाली व राजारामास गादीवर बसवून त्याच्या वतीनें राज्यकारभार चालविण्याचा विचार त्यांनी केला. हा आपला बेत निर्विघ्नपणें सिद्धीस जावा म्हणून त्यांनी महाराजांच्या मृत्यूची वार्ता संभाजी पन्हाळ्यावर नजरकैदेंत होता त्याला मोठ्या बंदोबस्तानें सक्त कैदेंत ठेवीपर्यंत कोणास कळूं न द्यावी असा त्यांचा प्रयत्न होता. ह्या उद्देशाने त्यांनी जनार्दनपंत सुमंत यास सैन्यासह पन्हाळ्यास रवाना केलें, रायगडावर आणखी लोकांची भरती करून तें ठाणे मजबूत केलें, पंचवडी येथें दहा हजार घोडेस्वार ठेविले. हंबीरराव सेनापतीस कऱ्हाड येथें मोठ्या सैन्यानिशीं तयार रहावयास सांगितले. ही एवढी तयारी करावयास कांहीं अवधी लागणार म्हणून हिरोजी फर्जंद यास संभाजीच्या बंदोबस्ताकडे नेमिलें होतें त्यास त्यांनी पुढें काय व्यवस्था करावयाची तें कळविण्यासाठीं एक पत्र पाठविलें. एवढी खबरदारी प्रधानमंडळीनें घेतली होती तरी महाराजांच्या मृत्यूचे वर्तमान संभाजीस अगोदरच कळून चुकलें होतें असें दिसतें निदान त्याला असा संशय तरी खास आला असावा. कारण सदरील पत्र घेऊन जासूद किल्ल्यावर आला, त्यास पाहताच संभाजीनें त्याला पकडून लखोटा आपल्या स्वाधीन करण्याविषयीं सांगितलें. न केल्यास देहांतशिक्षा होईल अशी त्यास धमकी घातली. तेव्हां त्या जासुदानें निरुपाय होऊन तो लखोटा त्याच्या हातीं दिला. आपणांस प्रधानमंडळानें पाठविले गुप्त मजकुराचें पत्र संभाजीच्या हातीं लागलें असें कळताच हिरोजी फर्जंद घाबरून कोंकणांत पळून गेला. संभाजीने किल्ल्यावरील सर्व लोकांस आपल्या ताब्यांत घेऊन त्यांच्या दोन अंमलदारांनीं थोडीशी कुरबूर केल्यावरून त्यांस ठार मारिलें, किल्ला आपल्या स्वाधीन राखण्यासाठीं त्यावर चोहोंकडून चांगला बंदोबस्त करून तो प्रधानमंडळी पुढे काय करते तें पाहत राहिला. संभाजीने पन्हाळा किल्ला आपल्या कबजांत घेतला असून त्यावर सैन्य नेण्याचा मार्ग उरला नाहीं असें पाहून जनार्दनपंताने आपल्या फौजेचा त्या किल्ल्यास वेढा दिला. तेथें तो आपल्या लोकांनिशीं कांही दिवस राहिल्यावर वेढा तसाच ठेवून तो कोल्हापुराकडे गेला.

इकडे प्रधानांनी राजारामास गादीवर बसवून त्याच्या नावाने राज्यकारभार सुरू केला परंतु ह्या प्रधानांमध्ये असावें तसें ऐक्य नव्हतें. पेशवा व सचिव यांच्याकडे पहिल्यापासून थोडीशी चुरस होती, ती आतां वाढली. हंबीररावास त्यांनी आपल्या ह्या मसलतींत घेतलें नसल्यामुळें तोही त्यांच्या ह्या करण्यास प्रतिकूलच होता. जनार्दनपंत तरी पन्हाळ्याचा वेढा तसाच सोडून स्वत: कोल्हापुराकडे गेला त्याचें कारण बहुतकरून असेंच कांहीं तरी असावें. त्यानें पन्हाळ्यापाशीं ठेवलेल्या लोकांपैकी कांहीं जणांस संभाजीनें वश करून घेतलें व जनार्दनपंत तेथें आला असतां कांहीं मावळ्यांनिशीं त्याच्या छावणीवर रात्रीचा छापा घालून त्यास कैद करून पन्हाळ्यावर आणून ठेविलें. संभाजीचे हें कृत्य ऐकून हंबीरराव सेनापतीस असें वाटलें कीं, शिवाजीमहाराजांच्या पुत्रास अनुरूप असा पराक्रम याच्या अंगीं आहे, यास्तव याचा पक्ष आपण धरावा हें ठीक दिसते जनार्दनपंतास संभाजीने कैद केल्याचें वर्तमान रायगडावर पोंचतांच मोरोपंत पिंगळे त्यास सोडविण्याच्या मिषानें सैन्य घेऊन पन्हाळ्याकडे गेला परंतु तो संभाजीशीं युद्ध करण्याचें सोडून त्यासच सामील होऊन बसला. ही त्याची अनुकूलता पाहून संभाजीनें त्याचा हुद्दा त्याच्याकडे कायम केला. हंबीररावही आपल्या सगळ्या फौजेनिशीं पन्हाळ्यावर येऊन संभाजीस मिळाला. ही अशी आपल्या पक्षाची बळकटी झाली असें

---

१ कांहीं बखरीत ही तारीख स. १६६१ अशी दिली आहे.

पाहून संभाजी रायगडावर चालून आला. तो रायगडावर येऊन पोंचण्यापूर्वीच त्या किल्ल्यावरच्या गार्दी लोकांनी त्यांच्या पक्षाचे होऊन त्याच्या विरुद्ध असलेल्या सगळ्या लोकांस कैद करून ठेविलें. त्याप्रमाणेंच पंचवडी येथें ठेवलेलें सैन्यही संभाजीस येऊन मिळालें. ह्याप्रमाणे चोहोंकडून अनुकूलता झाल्यावर त्याला रायगडकिल्ल्यावर प्रवेश करण्यास बिलकूल हरकत झाली नाहीं. वर जातांच पहिल्यानें त्यानें अण्णाजी दत्तोपंत सचीव याच्या पायांत बेड्या ठोकल्या व त्याची सर्व मालमत्ता जप्त केली, राजारामाला कैद केलें, सोयराबाईला पकडून आणून तिची अतिशयित कठोर शब्दांनी निर्भर्त्सना केली, महाराजांस विषप्रयोग केल्याचा तिच्यावर आरोप केला व तिचे हालहाल करून मारण्याचा आपल्या लोकांस हुकूम दिला, तिच्या पक्षाच्या सर्व लोकांचा शिरच्छेद केला, एका इसमाला तर गडाच्या तटावरून खालीं लोटून दिलें आणि ह्याप्रमाणे प्रतिपक्षाचा अगदी बींमोड करून आपणांस ऑगस्ट महिन्यात राज्याभिषेक करून घेतला.

***

भाग एकतिसावा

दौलतीचा हिशोब

आमच्या महातेजस्वी व प्रौढप्रताप चरित्रनायकाचें जीवनवृत्त मागील भागात आटोपलें. आतां त्यांनी एकसारखीं छत्तीस वर्षे अव्याहत परिश्रम करून प्रबल यवनपादशहांच्या हातची किती दौलत हिसकावून घेतली त्याचा अंदाज प्रकृत भागांत देणें इष्ट दिसतें अदिलशाहींत नोकरी पतकरून शहाजीराजे कर्नाटकांत जाऊन राहिले तेव्हां महाराष्ट्रांत दादाजी कोंडदेवाच्या हवाली राजांची जी जहागीर होती, तींत पुणे, सुपे, इंदापूर, बारामती व मावळप्रांताचा कांहीं भाग एवढ्या परगण्यांचा अंतर्भाव होत होता. महाराजांच्या हातीं आयती आलेली वडिलांची जोड काय ती एवढीच होती आणि तीही अदिलशहाच्या पूर्ण आटोक्यात होती. त्याला वाटेल तेव्हां ती खालसा करता येण्याजोगी होती. ह्याप्रमाणें यवनपादशहाच्या कृपेनें प्राप्त झालेल्या जहागिरीचा ताबा वडिलांच्या विद्यमाने महाराजांच्या हातीं आल्यावर त्यांनीं ही दौलत स्वतंत्र करून तींत किती भर घातली त्याचें निरूपण करूं. हें अर्थात् व्हावें तसें यथास्थित होणार नाहीं. तरी निरनिराळ्या बखरींत ज्या याद्या दिल्या आहेत त्यांच्या आधाराने पुढील हिशोब दिला आहे. हा महाराजांनी आपल्या हयातींतच करून ठेवलेला दिसतो. कारण संभाजी दुर्वृत्त निघून एक वेळ शत्रूसही जाऊन मिळाला होता. तेव्हां मागेंपुढें तो सर्व दौलतीचा नाश करील ही भीती त्यांस वाटत होती. यास्तव राजारामास व त्यास राज्य विभागून देण्याचा त्यांचा मनोदय होता असें कित्येक बखरींवरून दिसते. असो. तर हा हिशोब येथें देऊं.

महाराजांच्या ताब्यांतील मुलखाचे एकंदर चौदा विभाग चिटणिसाच्या बखरींत दिले आहेत व ह्या प्रत्येक विभागांत किती किल्ल्यांचा अंतर्भाव होतो हें सांगितलें आहे. ही यादी येथें बहुतेक जशीची तशी उतरून घेऊं.

१) प्रांत मावळ सह्याद्री- यांत सांप्रतचे मावळ, सासवड, जुन्नर व खेड हे तालुके मोडतात. ह्या प्रांतांत एकंदर अठरा किल्ले होते. त्यांची नांवें येणेंप्रमाणें आहेत - रोहिडा, सिंहगड, नारायणगड, कुंवारी, केळना, पुरंधर, दौलदतमंगळ, मोरगिरी, लोहगड, रुद्रमाळ, राजगड, तुंग, तिकोना, राजमाची, तोरणा, दातेगड, विसापूर, बासोटा व सिवनेरी.

२) प्रांत सातारा वाई- यांत अकरा किल्ले होते. ते येणेंप्रमाणें सातारावैराटगड, वर्धनगड, परळी (सज्जनगड), पांडवगड, महिमानगड, कमलगड, वंदनगड, ताथवडा, चंदनगड व नांदगिरी.

३) प्रांत कऱ्हाड - यांत वसंतगड, मचिंद्रगड, भूषणगड व कसबा कराड असे चार किल्ले होते.

४) प्रांत पन्हाळा - यांत तेरा किल्ले होतें. त्यांची नांवे - पन्हाळा, खेळणा, विशाळगड, पावनगड, रांगणा, गजेंद्रगड, भुदरगड, पारगड, मदनगड, भीवगड, भूपाळगड, गगनगड व बावडा

५) प्रांत कोंकण बंधारी व नलदुर्ग - यांत एकंदर अठ्ठावन किल्ले होते. त्यांचीं नांवे - मालवण, सिंधुदुर्ग, विजयदुर्ग, जयदुर्ग, रत्नागिरी, सुवर्णदुर्ग, खांदेरी, उंदेरी, कुलाबा, राजकोट, अंजनवेल, रेवदंडा, रायगड, पाली, कलानिधिगड, आरनाळा, सुरंगगड, मानगड, महिपतगड, महिमंडन, सुमारगड, रसाळगड, कर्नाळा, भोरप, बल्लाळगड,

सारंगगड, माणिकगड, सिंदगड, मंडणगड, बाळगड, महिमंतगड, लिंगाणा, प्रचीतगड, समानगड, कांगोरी, प्रतापगड, तळागड, घोसाळागड, बिरवाडी, भैरवगड, प्रबळगड, अवचितगड, कुंभगड, सागरगड, मनोहरगड, सुभानगड, मित्रगड, प्रल्हादगड, मंडणगड, सहनगड, शिकेरागड, वीरगड, महीधरगड, रणगड, सेटगागड, मकरंदगड, भास्करगड, माहुली व कावन्ही.

६) प्रांत त्रिंबक – यांत पंचवीस किल्ले होते. त्यांचीं नांवे – त्रिंबक, बाहुला, मनोहरगड, थळागड, चावडंस, मृगगड, करोला, राजपेहर, रामसेन, मासणागड, हर्षण, जवळागड, चांदवड, सबलगड, आवढा, कणकई, गडगडा, मनरंजन, जीवधन, हडसर, हरींद्रगड, मार्कंडेयगड, पटागड, टणकई व सिद्धगड.

७) प्रांत बागलाण – यांत सात किल्ले होते. त्यांची नांवे – सालेरी, नाहावा, हरसळ, मुलेरी, कणेरा, अहिवंतगड व घोडप.

८) प्रांत वनगड वगैरे – यांत धारवाड जिल्ह्यांतला बराच भाग मोडतो. यांत एकंदर बावीस किल्ले होते. त्यांचीं नांवे – वनगड, गहनगड, चिमदुर्ग, नलदुर्ग, मिरागड, श्रीमंतदुर्ग, श्रीगदनगड, नरगुंद, महतगड, कोपलगड, बाहदूरबिंडा, व्यंकटगड, गंधर्वगड, ढाकेगड, सुपेगड, पराक्रमगड, कनकादिगड, ब्रह्मगड, चित्रदुर्ग, प्रसनगड, हडपसरगड, कांचनगड, अचलागिरिगड व मंदनगड.

९) प्रांत फोंडें बिदनूर – यांत बारा किल्ले होते. त्यांचीं नांवे – कोटफोंडे, कोट काहूर कोट बकर, कोट ब्रह्मणाळ, कोट कडवळ, कोट अकोलें, कोट कठर, कोट कलबर्गे, कोट शिवेश्वर, कोट मंगरूळ, कोट कडणार व कोट कृष्णगिरी.

१०) प्रांत कोल्हापूर, बाळापूर – यांत सत्तावीस किल्ले होते. त्यांचीं नांवे – कोल्हार, ब्रह्मगड, वडनगड, भास्करगड, महीपाळगड, मृगमदगड, आबेनिराईगड, बुधला कोट, माणिकगड, नंदीगड, गणेशगड, खळगड, हातमंगळगड, मंचकगड, प्रकाशगड, भीमगड, प्रेईवारगड, सोमसेखरगड, मेदगिरीचेनगड, श्रीवर्धनगड, बिदनूरकोट, मलकोल्हारकोट, ठाकूरगड, सरसगड, मल्हारगड, भूमंडलगड व बिरूट कोट.

११) प्रांत श्रीरंगपट्टण – यांत बावीस किल्ले होते. त्यांची नांवे – कोटधर्मपुरी, हरिहरगड, कोटगरुड, प्रमोदगड, मनोहरगड, भवानीदुर्ग, कोट अमरापूर, कोट कुसू, कोट तळेगिरी, सुंदरगड, कोट तळगोंडा, कोट आटतूर, कोट त्रिपादुरे, कोट टुटानेटी, कोट लखनूर, कळपगड, महिनदीगड, रंजनगड, कोट आलू, कोट शामल, कोट विराडे व कोट चंदमाल.

१२) प्रांत कर्नाटक – प्रांत जगदेवगड – यांत अठरा किल्ले होते. त्याची नांवे – जगदेवगड, सुदर्शनगड, रमणगड, नंदीगड, प्रबळगड, बहिरवगड, वारुणगड, महाराजगड, सिद्धगड, जवादिगड, मार्तंडगड, मंगळगड, गगनगड, कृष्णगिरी, मल्लिकार्जुनगड, कस्तूरीगड, दीर्घपलिगड व रामगड

१३ प्रांत वेलूर – यांत सांप्रतचा अर्कांटजिल्हा मोडतो. यांत पंचवीस किल्ले होते. त्यांची नावे – कोट अरकाट, कोट लखनूर, कोट पळणापट्टण, कोट त्रिमल, कोट त्रिवादी, पाळे कोट, कोट त्रिकोनदुर्ग, कैलासगड, चंजिबरा कोट, कोट वृंदावन, चेतपाव्हली, कोलबाळगड, रसाळगड, कर्मटगड, यशवंतगड, मुख्यगड, गर्जनगड, मडविंडगड, महिमंडणगड, प्राणगड, सामरगड, साजरागड, गोजरागड, दुभेगड व अनूरगड.

१४) प्रांत चंदी – यांत सहा किल्ले होते. त्यांची नांवे – राजगड, चेनगड, कृष्णगिरी, मदोन्मत्तगड, आखलुगड व काळा कोट.

ह्या किल्ल्यांशिवाय आणखी दुसऱ्या बखरींतील याद्यांत किल्ल्यांची नावे आढळतात तीं येणेंप्रमाणें : – घनगड, कोट लावट, कोट केचर, वल्लभगड, येलबर्गीगड, सालोभागड, कोट कुष्टगी, नौबतगड, कोट हालियाळ, तानवडा, ठकरीगड, हरुषगड, कुरडू ऊर्फ मंदरगड, केदारकोट, कोरागड, कासेगड, कोलजागड, कोहीमगड, कोठारगड, कंकणीगड, कुलागड, कैहात कोट, कुडाळ कोट, कडवरीगड, कारडीगड, कोचनागड, नागिरीगड, तरूगड, देवगड, गुणवंतगड, ढाळगड, चंद्रगड, चतुरगड, रत्नगड, राजहंसगड, सुधाकरगड, सुगाणागड, सामत्रागड, सेरगागूड, व्येंद्रगड, वरूपगड, विंदाविंदगड, विश्वासी ईश्वरकोट, शरगागड, शेवळगड, कांगरीगड, महानगड, मानाडगड, मत्तगड, मृगगड, महोगड, महीतळीगड, मकरंदगड, भोरगिरी, भिलवडी, भद्रगड, पाराशरगड, पहारगड, वीरकोट, बळराज कोट, पताकागड, पद्यागड, कोथळागड, कमरगड, मयोरगड ऊर्फ निवलगुंद, पटगड, सोनगड, कुंजरगड, वारुगड, सुबकरगड, नाकगड, लोणजागड, काचणागड, सिदीचागड, खोलगड, प्रौढगड, बालेराजा, सरगड, मुरगोड, कोट येलूर, नाचणागड, वल्लभगड, सेवडागड, सेवकगड, कोहजगड, कठोरगड, कोट बोटगिरी, कंबलगड, स्वरूपगड, ढोलागड, बहुलगड, महींद्रगड, बळवंतगड, सुगलवडगड, पवित्रगड, सुमनगड, गंभीरगड, मंदरगड, दहीगड, मोहनगड, कपलगड, हरिश्चंद्रगड, वजगड, पिला ऊर्फ प्रकाशगड, कोट ढकूर, कोट कोलारकदीम, दुर्गमगड, मरसगड, अहिनिज्यादुर्ग, कट्टरगड, मेजकोल्हारगड, महीपालगड, बुंदीकोट, अर्जुनगड, पडवीरगड, भंजनगड, मुखणेगडकोटवेल, भातुर, पतनगदनेगड, केवळगड, महाराजगड, शिदगड, मदगड, बिगेवालुंगगड, बहिरवगड, कोटसुभा, मनगड, वेटवल ऊर्फ क्येल, लागगडचंदी, कोट त्रिचंदी, कोट देवणापाटी, चिंताहरकोट, वृद्धाचल, चवीकोट, निलसाजितगड, कर्नाटकगड, चेलगडचंदी, गर्वगड, कोंडापूरकोट, काणपूर, कामकोट, गोकाककोट, भवानीदुर्ग, धरापूरकोट, त्रिचनापूरकोट, मृगाकगड, बागलकोट, रायदुर्ग, विराटकोट व शिरोळ कोट.[१] नवामाला ह्या एकंदर किल्ल्यांपैकीं एकशे अकरा किल्ले महाराजांनी नवे बांधले असें एका बखरींत म्हटलें असून त्यांची यादीही दिली आहे. कित्येकांच्या मते महाराजांनीं फक्त चौऱ्यांऐशीं किल्ले नवे बांधले होतें असें आहे.

आता खजिना व उंची कापड यांच्या हिशोबाची यादी येथें देऊं. पहिल्याने सोन्याचें नाणें किती होतें तें पाहूं :– गंबार (गादर अथवा गबरे) एक लक्ष, मोहरा दोन लक्ष, पुतळ्या तीन लक्ष, पातशाही होन सुमारें साडेतेरा लक्ष, सणगिरी होन सुमारें पावणेतेरा लक्ष, अच्युतराई होन सुमारें अडीच लक्ष, देवराई होन सुमारें तीन लक्ष, रामचंद्रराई होन सुमारें एक लक्ष, गुप्ती होन एक लक्ष, धारवाडी होन दोन लक्ष. किरकोळ नाणे तीन लक्ष[२], सतलाम्या एक लक्ष, इभराम्या एक लक्ष, शिवराई होन चार लक्ष, कावेरी होन (पाला) पंधरा लक्ष, प्रलखटी होन दोन लक्ष, पामनाइकी होन एक लक्ष, आदवणी होन तीन लक्ष, जडमाल होन पाच लक्ष, ताडपत्री होन एक लक्ष चाळीस हजार, तुती होन एक लक्ष, सैल्याघटी होन दोन लक्ष, रालोरी होन पन्नास हजार, निशाणी होन पाच लक्ष व साधें सोनें नग एक लक्ष, वजन साडेबारा खंडी. आतां रुप्याच्या नाण्याची यादी देऊं : – रुपये पांच लक्ष, आसरपद्या दहा लक्ष, दाभोळी कबरी पंचवीस लक्ष, चुली कबरी दहा लक्ष, बसरी कबरी पांच लक्ष, साधें रुपे व रुप्याचीं भांडीं नग दहा लक्ष वजन पन्नास खंडी.

ह्याशिवाय आणखी जडजवाहीर दोन कोट होनांचे होतें. जवाहीराची नांवे : – माणिक, पाचू, वैडूर्य, नीळ, पैराज, मोती, पोंवळें, पुष्कराज व हिरा. तसेंच नाना प्रकारचें कापड अजमासें एक कोट होन किंमतीचें होतें.

---

१ ही किल्ल्यांची यादी अंमळ मोठी झाली; परंतु शिवरायाच्या ऐश्वर्यातला कोणताही अंश सांगितल्यावाचून ठेवूं नये म्हणून ही यादी निरनिराळ्या बखरींवरून जुळविली आहे.

२ ह्यांत बारा प्रकारचे होन दिले आहेत, त्याची नांवें : अफरजी, त्रिवाळुरी, त्रिसुळी, चंदावरी, बिलधरी, उलफकरी, महमदशाई, वेळुरी, कटेराई, देवजवळी, रामनाथपुरी व कुनगोटी.

आता लष्कराचा हिशोब पाहूं. महाराजांच्या खास पागेंत ऐंशी हजार स्वार होते व शिलेदारपागेंत पंचवीस हजार स्वार होते. एकूण एक लक्ष पाच हजार स्वार होते. खास पागेच्या सरदारांचीं नांवें येणेंप्रमाणें होतीं : – हंबीरराव सरनोबत, आनंदराव, नेताजी पालकर, मानाजी (मानसिंग) मोरे, स्वरूपजी (रूपाजी) भोसले, गोदजी जगताप, खंडोजी जगताप, संताजी जगताप, धनाजी जाधव, नेताजी काटकर, दादाजी काकडे, निळोजी काठे, संताजी घोरपडे, तेलंगराव पागेसरदार, तुकोजी निंबाळकर, व्यंकोजी खांडेकर जुमलेदार, निंबाजी पाटोळा, शमणखान पणी, गंगोजी (गणोजी) शिर्के, मालोजी निंबाळकर, कृष्णाजी पवार, धर्माजी निगडे, अग्रोजी भालेकर, धनाजी शिगडा, संभाजी हंबीरराव, बुवाजी (उदाजी) पोवार, परसोजी भोसले, कृष्णाजी घाटगे, परशराम पवार, बनाजी बिर्जे, मालोजी मचाळे, कानोजी दिवेकर, आप्पाजी तांबे, निंबाजी पाटोळे, बाळोजी बाटकर, शामराव, राघोजी शिर्के, भवानराव, सावजी मोहिते, साबाजी भोसले शिंगणापूरकर, जयसिंग पालकर, आनंदराव निंबाळकर, बाजी मोहिते, पदाजी काटकर, रामोजी शिर्के, हरजीराजे महाडिक, महादाजी नाईक निंबाळकर, खंडेराव दाभाडे, खंडोजी आटोळे, गणोजी दरेकर, कान्होजी आंग्रे, बाजी नलगे, मालोजी नलगे, संभाजी कावजी भुजबळराव, बहीरजी घोरपडे, संभाजी काटकर, सूर्याजी काटकर, रायजी गडघे, देवजी उघडे, केरोजी पवार, गोमाजी नाईक पानसंबळ, संताजी भोसले, महादजी नाईक पानसंबळ, मकाजी आनंदराव, पिलाजी शिर्के, तानाजी शिर्के, संभाजी शिर्के, जयसिंग पालकर, अचलोजी राजे महाडीक, तुकोजी पालकर, येसाजी थोरात, नेमाजी शिंदे, मुधोजी खाजणकर, सोमवंशी, कान्होजी भाडलकर, बहिरजी नाईक इंगळे, कृष्णाजी घाटगे, कृष्णाजी पवार, हिरोजी सेलके, खापणे, बहिरजी बांडगे, बळवंतराव देवकाते, परसोजी शितोळे, सयाजी नलगे, येसाजी खांडेकर, अमदोजी पांढरे, अमृतराव निंबाळकर, भवानराव देवकाते, काकडे, कडू कोकाटे, ढमढेरे, बांडे व उचले.

मावळे व हेटकरी यांचें पायदळसैन्य एकंदर सुमारें एक लक्ष होतें[१] ह्या पायदळावरील सरदारांचीं नांवे – येसाजी कंक सरनोबत, सूर्याजी मालुसरे, गणोजी दरेकर, मुरबाजी बेनमणा, मालसावंत, विठोजी लाड, इंद्रोजी गावडे, जावजी महानलाग, नागोजी प्रल्हाद, पिलाजी गोळे, दत्ताजी इडिलकर, पिलाजी सणस, जावजी पाये, भिकजी दळवी, कोंडाजी वडखले, त्रिंबकजी प्रभू कोंडजी फरजंद, तानाजी तुंदुसकर, तानसावंत मावळे, महादजी फरजंद, मुधोजी सोनदेव, कृष्णाजी भास्कर कलघोडे, हिरोजी मराठे, रामाजी मोरे, हिरोजी भालदार, तुकोजी कडू, राम दळवी, येसजी दरेकर, बाळाजीराव दळेकर, सोनदळवी, चांगोजी स्व कोंडाळकर, ढवळेकर, तानसावत भोसले, तानाजी मालुसरे, जिवा माहाला, सोन माहाला, राजपाटील यशवंतराव, रामाजी विश्वासराव, कृष्णाजी नाईक, तुकाजी लाड, डोळे, जावजी पारळे, मुधोजी हुणकणे, विठोजी कडू इंद्राजी गोरड, जावजी मोहने, हिराजी भानगिरे, मुधोजी खानवेलकर, सुभानजी नाईक, बाजीराव पासलकर, बाजीप्रभू देशपांडे (हिरडस मावळ), बाजीमुरार देशपांडे (माहाडकर), हिरोजी फर्जंद, नागोजी फर्जंद, नाईक, हरबाजी फर्जंद, पारडे, ठाकूर, ढमाले, दादाजी बापूजी देशपांडे, चिमणाजी बापूजी देशपांडे, बागराव, दिनकरराव तुळाजी फर्जंद, कृष्णाजी भोसले, राणोजी दरेकर, हरजी नाईक जासूद, खंडोजी नाईक जास्त, गणोजी कावळे, सोमाजी नाईक बंकी, सूर्याजी काळे व बापूजी मांढरे.

आतां महाराजांच्या आरमाराचा हिशोब एकदोन बखरींत आढळतो तो येथें देऊं– मोठ्या गुराबा तीस, गलबतें शंभर, जहागिऱ्या दीडशें, लहान गुराबा पन्नास, तारवें साठ, पाल पंचवीस, मचवे पन्नास, जूग पंधरा, होड्या दहा व लहान होड्या दीडशें अशी एकंदर सहाशें चाळीस नगांची यादी आढळते; परंतु लहानमोठी हजारांवर तारवें महाराजांच्या आरमारांत होती असा इतरत्र उल्लेख आहे. आतां पाण्यातील किंवा पाण्यालगतच्या जंजिऱ्यांचीं नावे किल्ल्याच्या यादींत वर आलींच आहेत; परंतु ती येथें निराळी देणे इष्ट दिसते ही नावे येणेप्रमाणे होत – कुलाबा, खांदेरी, उंदेरी,

१ ह्याशिवाय आणखी प्रत्येक किल्ल्याच्या रक्षणास ठेविलेले गडकरी असत. त्यांच्या संख्येचें मान किल्ल्याच्या संख्येवरून वाचकांच्या लक्षात सहज येण्याजोगें आहे.

अंजनवेली, रत्नागिरी, पद्मदुर्ग, सरजाकोट, विजयदुर्ग, गहनदुर्ग, खाकेरी, सुवर्णदुर्ग, राजकोट व सिंधुदुर्ग. ह्या जंजिऱ्यांच्या आसपास आरमार नेहमी तयार असे. ह्या आरमारावरील सरदाराची नावे बखरींतून तीनचारच आढळतात. तीं ही – दर्यासागर, मायनाक भंडारी, इब्राहिमखान व दौलतखान. बाकीच्या सरदारांचीं नांवें कां दिली नाहींत न कळे; परंतु ह्या आरमारावर सरदार व तांडेल ह्या नात्यानें पुष्कळ कोळी व भंडारी उदयास आले असावे. कारण ह्या जंजिऱ्यांच्या आसपासच्या गांवांत ह्या जातींची पुष्कळ मोठमोठीं घराणी आढळतात.

आतां महाराजांच्या ह्या स्वराज्यसिद्धीच्या कामी ज्या ब्राह्मण व प्रभू लोकांनी मोठ्या नेकीनें व इमानानें कमीजास्त महत्त्वाच्या निरनिराळ्या कामगिऱ्या केल्या त्यांची नांवे येथें देऊं – मोरो त्रिंमक पिंगळे, रामचंद्र नीलकंठ, रघुनाथ नारायण पंडितराव, अण्णाजी दत्तो, बाळाजी रघुनाथ, नरहर बल्लाळ सबनीस, रावजी सोमनाथ सुभे, व्यंकाजी दत्तो, जनार्दनपंत हणमंते, दत्ताजीपंत वाकनीस, बाळाजी सोनदेव, शामजी नाईक पुंडे, पोतदार, शंक्राजी नीलकंठ, रघुनाथ बल्लाळ कोरडे, कृष्ण जोशी, नरहर आनंदराव, निराजी रावजी, प्रल्हाद निराजी, गंगो मंगाजी पागे, प्रभाकरभट उपाध्ये, दत्ताजी गोपीनाथ बोकील, अण्णाजी रंगनाथ केळकर, विठ्ठल पिलदेव गारुडकर, तिमाजी केशव सबनीस, कोन्हेरपंत, त्रिंबक भास्कर, शिवाजी शंकर, कृष्णाजीपंत मथुरे, काशीपंत मथुरे, विश्वासराव, विसाजीपंत मथुरे, शिवभट उपाध्ये, बाळंभट गोसावी उपाध्ये, कृष्णाजी सखाजी, येसाजी गोविंद, शामराज पद्मनाभ, गोविंदभट उपाध्ये, कृष्णंभट गोसावी उपाध्ये, रघुनाथपंत, नारो सदाशिव, आजी मल्हार, दाजी आनदराव, शामजी सदाशिव[१], बाळाजी अनंत, तिमाजीपंत, अण्णाजी सोमनाथ, धर्माजी नरहर, उधो रघुनाथ, जयरामपंत, नारो संभाजी, बापुजीराम, गंगाजी दपटशा, नरसो गोपाळ, भिकाजी गोपाळ, कृष्णाजी अनंत, तिमाजी भगवंत, पुरुषोत्तमपंत, लिंगो नारायण, व्यंकटाद्रिपंत, जनार्दन कोनेर, होनो नरहर, विसाजी रामचंद्र, गंगाधर त्र्यंबक, विठ्ठल कृष्ण, दत्ताजी दामोदर, दादी अनंत, बाळाजी मोरेश्वर व सुंदर दत्ताजी.

कांही प्रभुगृहस्थांची नांवें एका बखरींत निराळी दिलीं आहेत, तीं येणेंप्रमाणें. – बाळाजी आवजी चिटणीस, चिमणाजी आवजी दफ्तरदार, शामजी आवजी कारखानीस, त्रिंबक विठ्ठल खासनीस, चंदो नारायण, गणेश शिवदेव, कृष्णाजी बहिरव, रायाजी जनार्दन, नीलकंठ येसाजी पारसनिवीस, महादाजी नारायण, बापोजी नीलकंठ, चंदो बिरदेव, संक्राजी राम, काकाजी लक्ष्मण, जसाजी, रामाजी भास्कर, रायाजी गोविंद, नागोजी बल्लाळ, राघो बल्लाळ व दादाजी.

ह्याप्रमाणें महाराजांनी संपादिलेल्या दौलतीचा हिशोब निरनिराळ्या बखरींत आढळला तसा जुळवून एकवट करून येथें दिला आहे. हा अर्थात् अपुरा आहे; परंतु त्यास उपाय नाहीं. एकंदर बेचूक हिशोब कोणी प्रसिद्ध करीपर्यंत ह्यावरच निर्वाह करणें प्राप्त आहे. त्याप्रमाणेंच महाराजांस ज्या लोकांनी स्वराज्यसाधनाच्या कामीं साहाय्य केलें होतें त्यांपैकीं कांही जणांची नावे बखरींत आढळतात, तीं सगळी वर दिलीं आहेत. त्यांशिवाय आणखी पुष्कळ गृहस्थांची नांवें द्यावयाची राहिलीं आहेत हें उघडच आहे. मुख्यत्वेकरून पुष्कळ प्रभुकामदारांचीं व बहुतेक किल्ल्यांवरील हवालदारांची नांवें वरील यादींत आलेली नाहींत.

***

१ येथपर्यंत जी यादी दिली आहे तींत कांहीं प्रभू गृहस्थांचींही नांवें असावी. ह्या पुढील नांवे सगळी ब्राह्मणाचींच आहेत व हे निरनिराळ्या महालांचे सुभेदार होते.

भाग बत्तीसावा

गुणदोषविवेचन

येथपर्यंत महाराजांच्या उज्ज्वल चरित्राचें कथन उपलब्ध माहितीच्या आधारानें साधेल तेवढें सुसंगत केलें आहे. त्याचें पर्यालोचन करणारांस त्यांच्या ठायीं कोणकोणते गुण वाखाणण्यासारखे होते व शत्रूंनी त्यांच्यावर जे दोष लादण्याचा प्रयत्न केला आहे त्यांत किती तथ्य आहे, हें सहज समजण्यासारखें आहे. तथापि अभियुक्त ग्रंथकारांच्या पद्धतीस अनुसरून ह्या गुणदोषांचे यथातथ्य स्वरूप सामान्य वाचकांच्या सोयीसाठीं एकवटीनें निदर्शित करणें उचित दिसते. दुसरें असें कीं, चरित्रनायकाच्या अनेक कथाप्रसंगांचें निरूपण करीत असतां त्यांच्या गुणावगुणांचें विवेचन ज्या त्या स्थलीं करीत राहिल्यानें रसहानी होते, ती टाळण्याचा प्रयत्न केल्यामुळें प्रस्तुत लेखकास त्या गोष्टीसंबंधानें बहुतेक मूकभाव धारण करावा लागला. तरी आतां मुख्य कथाभाग आटोपल्यावर कथानायकाच्या ठायीं कोणते गुणावगुण होते व तच्चरितश्रवणानें महाराष्ट्रीयांस किंबहुना अखिल भारतवर्षीयांस कोणता बोध प्राप्त होण्यासारखा आहे याचें दिग्दर्शन यथामती करण्याचा अधिकार चरित्रकारास आहे, हें जाणून हा पुढील गुणदोषांचा आढावा वाचकांपुढे मांडला आहे. त्याचा यथोचित आदर करून त्यांत कांहीं चूकभूल असल्यास तीबद्दल लेखकास वाचक क्षमा करतील अशी उमेद आहे.

कोणताही महापुरुष पाहिला तरी तो सर्वगुणमंडित व सर्वदोषविवर्जित असा असणें सर्वथा शक्य नव्हे. वास्तविक पूर्णत्व हें मानवास कदापि साध्य नव्हें ह्या दृष्टीनें पाहतां आमच्या प्रतापशाली चरित्रनायकाच्या ठायीं कांहीं दोष चिकित्सकांस दिसले तर ते केवळ क्षम्य होत, हें स्पष्टच आहे. ज्याच्या कर्तृत्वाचा व्याप मोठा असतो व परस्परविरुद्ध हितसंबंध ज्यांचे असतात अशा लोकांशीं ज्याला वर्तन करणें प्राप्त होतें, त्याच्या चरित्रांत वरपांगीं दोषास्पद दिसणारे असे प्रसंग अनेक असतात; परंतु ते वास्तविक दोषार्ह आहेत किंवा कसें हें पाहण्याचे काम कोणा तरी सत्यनिष्ठ पुरुषानें करीतोंपर्यंत त्या पुरुषाची खरी योग्यता सामान्य जनांच्या लक्षांत यावी तशी येत नसते. त्याच्या कर्तबगारीनें ज्यांचें कल्याण झालें असतें तें त्याची सर्वदा स्तुतीच करीत असतात व ज्यांचें अकल्याण झालें असतें ते त्याची अनेक प्रकारे निंदा करीत असतात. हा मनुष्यमात्राचा नेहमींचा क्रमच आहे; परंतु कोणी तिऱ्हाईत मनुष्य ह्या दोन्ही पक्षांच्या म्हणण्याचा यथान्याय विचार करून त्या पुरुषाचें वास्तविक स्वरूप दाखवून देतो तेव्हां त्याची खरी योग्यता सामान्य जनांच्या लक्षांत येते. अशा उदासीन सत्यनिर्णय करणाऱ्या ग्रंथलेखकाचा सुयोग आमच्या कथानायकाच्या चरित्रास आजपर्यंत फारसा झाला नाहीं हें बहुश्रुत वाचकांस सांगावयास नको.[१] प्रकृत लेखक महाराष्ट्रवासी असून शिवाजीमहाराजांचा

---

१ अलीकडे मि. किंकेड यांनी रा. बा. पारसनीस यांच्या साहाय्यानें मराठ्यांचा इतिहास लिहिण्याचा उद्योग चालविला आहे. त्यांच्या इतिहासाचा पहिला भाग नुकताच प्रसिद्ध झाला आहे. त्यांतील मजकुरावरून असें दिसते की, त्यांच्या ठायी मराठ्यांविषयी आणि विशेषतः शिवाजीमहाराजांविषयी बरीच आदरबुद्धी वसत आहे. महाराजांवर आंग्लग्रंथकारांनी यवनी ग्रंथाच्या आधारानें जे कित्येक दोषारोप केले आहेत ते निराधार आहेत असें त्यांनी दाखवून दिलें आहें. चंद्रराव मोरे, अफझुलखान इत्यादिकांशी त्यांचे जे वर्तन घडलें तें केवळ सदोष नव्हतें असें त्यांनी सिद्ध केलें आहे. यवनी बखरकारांच्या आधारावरच मुख्यतः भिस्त ठेवल्यामुळे आमच्या देशी

पूर्ण अभिमानी असल्याकारणानें त्याच्या हातून ही कामगिरी यथास्थित होणें शक्य नाहीं हें उघड आहे; परंतु महाराष्ट्रीयांचे शिवाजीमहाराजांच्या सबंधाने काय म्हणणें आहे व त्यांस यवनग्रंथकारांनी व त्यांच्याच म्हणण्याचा अनुवाद करणाऱ्या आंग्लग्रंथकारांनी[२] जे दोष लावले आहेत त्यासंबंधानें त्यांचे काय अभिप्राय आहेत ते येथें सविस्तर सांगणें इष्ट दिसतें.

बंडखोरपणाचा आरोप

त्यांचा पहिला दोषारोप असा आहे कीं, महाराजांनीं विजापूरकरांशीं निमकहरामी करून त्या सरकाराविरुद्ध बंड केलें, हें कांहीं चांगले केलें नाहीं. ह्या बंडखोरपणास्तव त्यांची त्यांनी त्या काळच्या पुंडपाळेगारांत गणना केली आहे. अदिलशहानें महाराजांच्या वडिलास ऐन संकटाच्या प्रसंगीं आश्रय देऊन जहागीर करून दिल्याचे उपकार न स्मरतां त्यांनी कृतघ्न होऊन त्या सरकारावर शस्त्र धरले व त्याची सत्ता बरीच कमी केली, ह्याबद्दल हे इतिहासकार त्यांस दोष देतात; परंतु हा दोषारोप अगदीं अयथार्थ आहे. कृतज्ञतेच्या ओझ्याखालीं दडपून जाऊन परतंत्रावस्थेत आमरण खितपत राहणें तेजस्वी व स्वाभिमानी पुरुषास असह्य वाटलें तर तो त्याचा अपराध समजणें बरोबर नाहीं. परस्थ यवनांनी येथें येऊन सत्ताधीश व्हावें व गरीब हिंदू प्रजेस हवें तसें वागवावें आणि हिंदुधर्माची सर्वत्र ग्लानी व्हावी, हें पाहून कोणा देशभक्तास व स्वधर्माभिमानी पुरुषास परस्थांच्या कृपे प्राप्त झालेल्या वैभवानें सुख वाटेल बरें? पुन: हें वैभव परकीयांच्या कृपेनें प्राप्त झालेलें असल्यामुळें त्यास मुकण्याची पाळी केंव्हा येईल याचा नेम नसे. यास्तव त्यांत सुख मानून खाविंदांची मर्जी साधेल त्या उपायाने राखण्यांतच आपला तरणोपाय आहे असें खऱ्या तेजस्वी पुरुषास सहसा वाटावयाचें नाहीं. तो ही परतंत्रता नाहींशी करण्यासाठीं योग्य उपायांचा अवलंब करून झटला तर त्यांत त्यास दोष लावण्यासारखें काय झालें बरें? असा बंडखोरपणा आजपर्यंत जगाच्या इतिहासांत पुष्कळ राज्यस्थापकांनी केला आहे; परंतु त्यांच्या त्या बंडखोरपणाचें दोषावहत्व त्यांच्या राज्यवैभवामुळें विगलित होऊन ते मानार्ह होऊन बसले आहेत. हाच मान आमच्या चरित्रनायकास मिळणे रास्त आहे. परस्थांच्या मगरमिठींत सांपडलेला स्वदेश सोडवून त्यास त्यांनीं स्वातंत्र्यानुभव घडवून दिला हा आम्हां हिंदुस्थानवासी जनावर त्यांचा मोठा उपकार झाला. त्याबद्दल आमच्या शिरीं त्यांचें उपकारऋण कायमचें आहे. ही स्वतंत्रता फार दिवस टिकली नाहीं, हा दोष शिवाजीमहाराजांचा बिलकूल नव्हे. तो त्यांच्यामागून हें स्वातंत्र्य कायम राखण्याचे काम ज्यांच्या हातीं आलें त्यांसच लावला पाहिजे, हें

इतिहासलेखकांच्याही मनाची कशी अवस्था होते हे अलीकडे प्रो. जदुनाथ सरकार यांनी जें शिवाजीमहाराजांचे चरित्र इंग्लिश भाषेत लिहिले आहे तें वाचल्यानें ध्यानांत येईल. तें हिंदी गृहस्थ असून पारशी भाषेंत पारंगत आहेत. त्यांनी जुन्या पारशी ग्रंथाचें आलोडन करून मोगलांच्या इतिहासाची व विशेषत: औरंगजेबाच्या सगळ्या कारकिर्दीची बरीच माहिती मिळविली आहे व ती औरंगजेबाच्या चरित्राचे चार भाग इंग्रजीत लिहून प्रसिद्ध केली आहे. शिवाजीमहाराजांचे चरित्र त्यांनीं लिहिले आहे तें केवळ मोगली बादशहांच्या दक्षिणेतील चळवळींचें एक उपकथानक म्हणून लिहिले आहे. ते वाचतांना त्या काळच्या कोणी यवन ग्रंथकाराने तें लिहिले आहे काय असा भास होतो. प्रो. सरकारांनी ह्या चरित्र लेखात जागोजाग यवनी ग्रंथकारांचा अनुवाद करून महाराजांच्या संबंधाने अनुदारतेने व असत्यमय उल्लेख केले आहेत. त्यांचा ते वारंवार 'शिवा' हें एकेरी व तिरस्कारसूचक नांवानें उल्लेख करतात हें एकेरी नांव वाचून खऱ्या देशभक्तांच्या व विशेषत: महाराजांविषयी यथार्थ अभिमान वाहणाऱ्या महाराष्ट्रीयांच्या मनाला वाईट वाटण्यासारखे आहे.

२ हे आमचे विधान अत्युक्तिरूप नाहीं, हे मि. किंकेड यांच्या पूर्वोक्त ग्रंथातील पुढील उताऱ्यावरून लक्षांत येण्याजोगें आहे : ''शिवाजीसंबंधाने इतिहासकारांनी जेवढा अन्याय केला आहे तेवढा दुसऱ्या कोणत्याही ऐतिहासिक व्यक्तीसंबंधाने त्यांनी केलेला नाही. ग्रांट डफचे मत निर्विवाद आहे असे त्यांनीं सर्वांनी गृहित धरले आहे आणि ग्रांट डफनें आपलें मत खाफीखानाच्या आधारानें नमूद केले आहे. ऑर्मीने आपल्या लेखांत शिवाजीसंबंधाने विशेष यथार्थ अभिप्राय प्रदर्शित केला आहे, तो ह्या इतिहासकारांनीं अमान्य ठरविला आहे! शिवाजीच्या कर्तृत्वावर त्यांनी अतिशयित कडक टीका केली असून त्याच्या शत्रूंच्या बाबतींत त्यांनी हा कडवटपणा यत्किंचितही व्यक्त केलेला नाही, हा मोठा चमत्कार होय. औरंगजेबाची सहस्रावधी नीच कृत्यें व विजापूर व अहमदनगर येथील उमरावांची भयंकर कृष्ण-कारस्थानें याविषयी त्यांना फारसे कांही वाटत नाही.'' (भाग पहिला, पृ. २७१).

इतिहासज्ञांस सांगणें नलगे. महाराजांनी अदिलशाहींत बंड उभारून स्वराज्यस्थापनेचा परम स्तुत्य उद्योग आरंभिला तो सिद्धीस गेला नसता तर त्यांस हे ग्रंथकार बंडखोर म्हणून आणखी हूड व अविचारीही म्हणते; परंतु ते यशस्वी झाल्यामुळें त्यांस येवढा तरी दोष देऊन त्यांच्या शुद्ध कीर्तीस ते ग्रंथकार काळिमा लावण्याचा प्रयत्न करतात. वादविषयक दोषारोप यवनग्रंथकारांनीं केला तर तो काहींसा क्षम्य आहे परंतु स्वतंत्रतादेवतेचे निःसीम भक्त जे युरोपियन ग्रंथकार त्यांनींही यवनांच्या ह्या अभिप्रायाचा अनुवाद स्वग्रंथांत करावा हें चमत्कारिक दिसतें. त्यांनीं आमच्या ह्या देशोद्धार करणाऱ्या वीरमणीविषयीं अभिप्राय निःपक्षपातबुद्धीनें देणें योग्य होय परंतु ही चित्ताची समता राखणें कठीण आहे. आज आमचें स्वराज्य कायम असतें तर हा अभिप्राय त्यांनी असा निक्षून दिला नसता हें उघड आहे.

कपटीपणाचा आरोप

ह्या ग्रंथकारांचा महाराजांवर दुसरा दोषारोप असा आहे कीं, ते महाकपटी, घातकी व क्रूर होते. महाराजांच्या अनेक कृतींचें वरवरून अवलोकन करणारांचा व विशेषतः यवनांचा हा अभिप्राय होणें साहजिक आहे; परंतु त्यांच्या उद्दिष्ट कार्याचें महत्त्व केवढें होतें व तें सिद्ध करण्यास लागणाऱ्या साधनसामुग्रीचे आनुकुलय किती होतें हें लक्षांत आणले असतां त्यांनी अनेक प्रसंगीं कापट्याचा जो अवलंब केला तो यथायोग्य होता असें आम्हां महाराष्ट्रीयांस म्हणावें लागतें. अदिलशाही, कुतुबशाही व मोगलशाही अशा महाप्रबल पादशाह्यांशीं महाराजांसारख्या अगदीं क्षुल्लक जहागिरदारानें विरोध मांडण्याचें धाडस करणें हा केवढा विलक्षण अविचार आहे असें त्या काळच्या लोकांस वाटलें असावें, हें कांहीं सांगावयास नको. प्रत्यक्ष महाराजांचा प्रतिपाल करणारा दादाजी कोंडदेव यास हा आपल्या धन्याच्या पुत्राचा विलक्षण हूडपणा महाघातक वाटल्यामुळे तो कसा चिंताज्वराने मरणाच्या दारीं बसला हें वाचकांस विदित आहेच. तेव्हां अशा अतिप्रबल शत्रूंशी झगडण्यांत यशप्राप्ति होणें ती कापट्य व धूर्तता यांच्याच पूर्ण साहाय्यानें होण्यासारखी होती. हे गुण महाराजांच्या ठायीं नसते किंवा ते अल्प प्रमाणानें असते तर त्यांच्या हातून जगास थक्क करून सोडणारी कामगिरी कदापि झाली नसती आणि महाराष्ट्रीयांस कांही काळपर्यंत जो स्वातंत्र्यानुभव घडला तो किमपि घडला नसता. त्या काळीं वैभवाच्या शिखरास पोहोचलेला अदिलशहा व सार्वभौमसत्ता पावलेला मोगलबादशहा अमर्याद द्रव्यबल व प्रचंड सैन्यबल यांच्या साहाय्यानें महाराजांचा सर्वस्वीं नाश करून टाकण्यास सर्वदा उद्युक्त असतां त्यांस पुरून उरून त्यांची सत्ता कमीकमी करून टाकण्यास महाराजांच्या ठायींचा हा कापट्यगुण किती उपयोगीं पडला हें वाचकांस विदित आहेच. परंतु हें कपटाचे वर्तन महाराजांनीं सगळ्यांशींच केलें असें मात्र सहसा म्हणतां येणार नाहीं. त्यांच्याशीं इमानानें व माणुसकीनें वागून त्यांच्या इष्ट कार्यास जे कोणी अनुकूल होत त्यांच्याशीं त्यांचें वर्तन अत्यंत सरळ व इतबाराचें असे. अफझुलखान व शास्ताखान यांनी मोठ्या सेनांनिशी महाराजांवर स्वारी केली असतां त्यांच्याशीं समरांगणांत गांठ घालून युद्धप्रसंग करण्याचें सामर्थ्य महाराजांस बिलकूल नव्हतें. तेव्हां अशा दुर्धर प्रसंगीं आपला व आपल्या पदरच्या लोकांचा पुरा नाश करून स्वराज्यसिद्धीस कायमचें अंतरून लोकाधिक्षेपास सर्वतोपरी पात्र व्हावें त्यापेक्षा कपटप्रबंध रचून शत्रूचा नाश करण्यास पुऱ्या धैर्यानें प्रवृत्त व्हावें हें बिलकूल गर्हणीय नव्हें, असें आम्हां महाराष्ट्रीयांस वाटणें साहजिकच आहे. असा किंवा याहून हीन प्रकारचा कपटप्रयोग करून दुसऱ्यांच्या स्वातंत्र्याचा किंवा राज्याचा अपहार केल्याचीं उदाहरणें इतिहासांतरीं अनेक आहेत; परंतु महाराजांचा उद्देश असा हीन प्रतीचा नव्हता. स्वराज्यसाधनाचें पवित्र कार्य साध्य करण्यासाठीं त्यांनीं हा यवनांच्या दृष्टीनें घातकीपणा केला. तो नसता केला तर त्यांचा समूळ नाश होऊन आज सारी इमामशाही सर्वत्र माजली असती व मराठ्यांचें नाव जगाच्या इतिहासांत अमर होऊन राहण्याचा योग आला नसता. शत्रू वेशीशीं येऊन भिडला असून आपला सर्वस्वीं नाश करण्यास कदापि चुकणार नाहीं व त्यांच्याशीं शुद्ध नीतीनें वागून निभाव लागणार नाहीं अशी खात्री झाल्यावर त्याला साधेल त्या उपायानें नामोहरम करणें हें राजनीतीस किंबहुना व्यवहारनीतीस बिलकूल असंमत नव्हे. दुसरें असें कीं, आपल्याबरोबर आपल्या आश्रयानें असलेल्या सहस्त्रावधी मनुष्यांचा संहार होण्याचा किंवा त्यांस अखंड विपत्तींत

पडण्याचा अनिवार समय जेथें प्राप्त होतो तेथें उदात्त नीतीचीं सर्व तत्त्वें एकीकडे गुंडाळून ठेवून स्वजनरक्षण करण्यासाठीं एखाद्या अनन्वित उपायाचा अवलंब केल्यानें कोणीही मनुष्य दोषार्ह ठरत नाहीं हे निर्विवाद आहे. शिवाय त्या काळची समाजस्थिती पाहिली असता तींत कैक शतकेपर्यंत शांतता कसली ती मुळींच नव्हती. त्या काळीं चोहोंकडे सतत संगरावस्था माजून राहिली असल्याकारणानें राजनीतीचीं तत्त्वें आधुनिक काळच्या इतकीं उज्ज्वल नसणें स्वाभाविक आहे. अशी कल्पना करा कीं, शिवाजीमहाराजांना कैद करण्याचा किंवा ठार मारण्याचा जो कपटप्रबंध अफझुलखानाने रचला होता त्यांत त्यास यश आलें असतें तर त्याला किती धन्यता वाटली असती व विजापूर दरबारांत त्याचे केवढे देव्हारे माजले असते? महाराजांसारख्या सहसा हातीं न लागणाऱ्या वीरास पकडण्यासाठी किंवा त्याचा कांटा अजीबात काढून टाकण्यासाठी शास्ताखान वाटेल तें घोर कर्म करण्यास प्रवृत्त झाला असता यात बिलकूल सदेह नाहीं. यावरून पाहता अफझुलखानाचा वध व शास्ताखानावरील छापा यांमुळें महाराज दोषास पात्र होत नाहींत, तर ते उलट शत्रुपराजयाच्या ह्या अप्रतिम युक्त्या योजल्याबद्दल प्रशंसेसच पात्र होतात. ह्या अशा युक्तींमुळें ज्यांचें अतिशयित नुकसान झालें त्यांस वाईट वाटून त्यांनीं महाराजांस शिव्याशाप द्यावें हें स्वाभाविक आहे; परंतु युरोपीय ग्रंथकारांनी त्यांच्या ह्या निर्भर्त्सनेचा अनुवाद स्वग्रंथांत करावा हें मात्र चमत्कारिक होय.

ह्या काळाच्या इतिहासात कपटयुक्ती व दगाबाजी योजून कार्यसिद्धी करून घेण्याकडे सगळ्यांची सारखीच प्रवृत्ती होती. याची उदाहरणे मोंगलांच्या व दक्षिणेतील सुलतानांच्या इतिहासात पुष्कळ आहेत. यापैकी कित्येकांचा उल्लेख येथे अप्रस्तुत होणार नाही. शिवाजीमहाराजांना महाडहून परत येताना पकडण्याची कपटयुक्ती अदिलशहाचा सरदार बाजी शामराज याने जावळीच्या चंद्रराव मोऱ्याच्या साहाय्याने योजिली होती. शहाजीराजांना पकडण्याची अधमपणाची युक्ती घोरपड्याने केली होती. शिवाजीमहाराज आग्ऱ्याहून परत आल्यावर त्यांस पकडून ठार करण्याची अत्यंत घोर युक्ती योजण्याचे प्रत्यक्ष जयसिंगाने औरंगजेबास पत्राद्वारे अभिवचन दिले होते हे मागे सांगितलेच आहे. औरंगजेबाने गोवळकोंडे काबीज करण्याच्या इराद्याने सुलताना महंमद नावाच्या सरदाराबरोबर मोठी फौज देऊन तिकडे पाठविले. ही फौज त्याने त्या नगरावर हल्ला करण्याच्या स्पष्ट उद्देशाने न पाठविता. त्याचा मुलगा दंगबल्यास विवाहनिमित्ताने चालला होता, त्याच्या बरोबर म्हणून पाठविले आणि मार्गांत गोवळकोंड्यास मुक्काम करण्याच्या बहाण्याने ही फौज शहरात शिरली. कुतुबशहाने तिला हरकत केली नाही परंतु नगरात शिरताच त्या फौजेने चोहोंकडे धुमाकूळ उडवून देऊन तेथल्या लोकांची भयंकर कत्तल उडविली व लुटालूट केली. ही दगाबाजी व हे क्रूर कर्म अती घोर नव्हे काय? आता त्या काळच्या इंग्रज व्यापाऱ्यांनी शिवाजीमहाराजांशी केलेल्या विश्वासघाताची दोन उदाहरणे येथें देतो. महाराज पन्हाळाकिल्ल्यावर असता त्या किल्ल्यास विजापूरकरांनी दारुगोळा वगैरे मदत केली व त्यांस तोफा डागण्यास मदत केली, हे त्यांनी महाराजांशी केवळ दग्याचे वर्तन केले. आपण उभय पक्षांच्या कलहात तटस्थवृत्ती स्विकारणार असा बहाणा करून त्यांनी हा असा विश्वासघात केला. ह्याहूनही वाईट प्रकारच्या दगाबाजीचे उदाहरण म्हटले म्हणजे खांदेरी बेटाजवळ इंग्रजांच्या एका अंमलदाराने महाराजांच्या आरामारावरील अमलदाराशी केलेल्या अनन्वित प्रकारचे होय.

क्रूरपणाचा आरोप

आतां महाराज क्रूर व खुनशी होते असा जो आरोप त्यांच्यावर केला आहे तो तर मुळींच निराधार होय. त्यांच्या चरित्राचें ज्यानें नुसतें वरवरून अवलोकन केलें आहे त्यास देखील यांत मुळींच तथ्य नाहीं असें वाटल्यावाचून राहणार नाहीं. विनाकारण रक्तपात करू नये असा तर त्यांचा नेहमीचा क्रम असे. शत्रूशीं रणकंदन करून त्याचा पराजय झाल्यावर त्याचे कोणी लोक पाडाव होऊन हातीं लागले असतां त्यांस ते कधींही क्रूरपणाने वागवीत नसत.[१] इतकेंच नव्हे तर, त्यांचा उलट यथोचित आदरमान करून त्यांस वस्त्राभरणें, घोडी व वाटखर्चास पैसा देऊन स्वस्थानीं रवाना

१ ह्या संबंधाचे उल्लेख प्रकृत ग्रंथात जागोजाग केल्याचे वाचकांस स्मरत असतीलच.

करीत. हें त्यांचें औदार्य आधुनिक सुधारलेल्या राष्ट्रांच्या युद्धनीतीसही लाजविणारें आहे. त्या काळचे यवन युद्धांत पाडाव केलेल्यांचे अनेक प्रकारीं हाल करीत, त्यांस धर्मांतर करावयास लावीत, त्यांस दास म्हणून विकीत, किंवा बंदींत ठेवीत.[१] तसा कांहींएक प्रकार महाराजांच्या हातून कदापि होत नसे. निःशस्त्र होऊन शरण आलेला शत्रू कितीही अपराधी असला तरी त्यांच्याशीं उदारपणे वर्तन करून त्याला लाजविण्याची अलौकिक कला महाराजांस साधली असल्यामुळें त्यांच्या पदरीं नोकरी पतकरून राहाण्यास शत्रूंकडील वीर सर्वदा तयार असत. असे कांहीं वीर पुढें स्वराज्यसाधनाच्या कामीं प्राण द्यावयासही कसे उद्युक्त झाले हें वाचकास ठाऊक आहेच. ह्यावरून पाहतां हा क्रूरपणाचा व खुनशीपणाचा दोषारोप अगदींच शुष्क आहे. हा महाराजांविषयींचा निरर्थक ग्रह बाजी घोरपड्याच्या वधामुळें कित्येकांचा झाला असावा व कांहीं जणांचे असें म्हणणें आहे कीं, हा अंमळ क्रूरपणा तर खराच. एका बाजी घोरपड्याच्या अपराधाबद्दल त्याच्या कुटुंबातील सर्व पुरुषांस, त्याच्या सर्व नातलगांस व त्याच्या सर्व आश्रितांस देहांत प्रायश्चित्त मिळावें हें अगदीं योग्य नाहीं; परंतु बाजी घोरपड्यासारख्या मराठेसरदारानें स्वोत्कर्षावरच दृष्टी देऊन आपल्या जातीच्या महातेजस्वी पुरुषाचा घात करण्यास यवनांच्या सांगण्यावरून प्रवृत्त व्हावें हें अत्यंत गर्हणीय व अक्षम्य होतें. ह्या त्याच्या कृष्णकर्माचा परिणाम केवढा भयंकर होण्याचा संभव होता हें वाचकांस सांगावयास नकोच. महाराजांच्या ठायीं निःसीम पितृभक्ती असल्याकारणानें त्यांच्या बचावासाठीं आपला स्वराज्यसाधनेचा उद्योगही त्यांस सर्वथैव सोडावा लागला असता आणि शहाजीराजे बंदिमुक्त होततोपर्यंत त्यास जवळ जवळ चार वर्षे स्वस्थ बसावेंही लागलें होतें. हें मनात आणले म्हणजे पितृप्रेम व स्वराज्यसाधनप्रीती ह्या सदवृत्तींस वश होऊन त्यांनी जो हा घोरपड्याचा अती भयंकर रीतीनें सूड उगवला तो कांहींसा क्षम्य होय असें म्हणावे लागतें. शिवाय ह्या प्रकरणी खुद्द शहाजीराजांची आज्ञा असल्याकारणाने ती पितृप्रेमास अनुरूप अशा रीतीने पाळणे हे सुपूत्राचे पवित्र कर्तव्य आहे असे मनात येऊन त्यांच्या ठायीचा हा आवेश विशेष उग्र स्वरूप पावला असावा असे वाटते.

द्रव्यलोभाने लूट केल्याचा आरोप

प्रतिपक्षाचा तिसरा दोषारोप असा आहे कीं, महाराजांस द्रव्यलोभ अमर्याद असल्याकारणानें ते यवनी अंमलांतील निरपराध प्रजेस सर्वदा लुटीत व अनेक प्रकारे त्रास देत. त्यामुळें जिकडेतिकडे धामधूम व अस्वस्थता माजून राहिली होती. हा आरोप कांहीं अशीं खरा आहे, असें आमच्यापैकींही कांहीं जणांचे म्हणणें आहे; परंतु त्याचें वास्तविक स्वरूप लक्षांत आलें असतां प्रतिपक्ष म्हणतो तेवढा दोष महाराजांच्या माथीं येत नाहीं. प्रथम असें पाहा कीं, महाराजांनीं स्वराज्यसिद्धीच्या आरंभापासून अगदीं शेवटपर्यंत जो हा क्रम धरिला होता त्यांत त्यांचा हेतू केवळ स्वधनवृद्धी करण्याचा नव्हता. तीन प्रबळ व धनाढ्य पादशाहतींशीं एकसारखा विरोध मांडून त्यांच्या प्रचंड सेनांशीं हरदम लढत राहण्यास लोकबळ व द्रव्यबल किती हवें होतें हें कोणासही कळणारें आहे. आपल्या पदरचे लोक सर्वदा राजी राखून ते हातीं घेतलेल्या महत्कार्यसिध्यर्थ हातावर शिर घेऊन दांडग्या इसमांशी लढण्यास तयार करण्यासाठीं त्यास द्रव्याच्या आमिषावांचून आणखी कोणतें आमिष दाखविण्यासारखें होतें बरें? दुसरें असें कीं, महाराजांस आपलें

---

१ शिद्दीच्या स्वाऱ्या मराठ्यांच्या अंमलातील मुलखात वेळोवेळी होत. त्या समयी त्याच्या हातून किती भयंकर क्रूर कर्मे होत, त्याप्रमाणेच शास्ताखानाने महाराजांच्या मुलखावर स्वारी केली तेव्हां त्याने चोहोंकडे कसा हाहाकार उडवून दिला हे वाचकांस आठवत असेलच. दिलेरखानाने १६७९ त स्वारी केली त्या वेळीं त्याने जी अत्यंत घोर कर्मे केली ती पाहून संभाजी, जो त्यासमयी महाराजांवर रुसून त्याच्या छावणीत पळून गेला होता, तो जात्या क्रूर स्वभावाचा असूनही त्याला अतिशयीत वाईट वाटून व त्या मोंगल सरदाराचा त्याबद्दल निषेध करून त्याच्या छावणींतून निसटून परत आपल्या प्रांतात आला. शिवाजीमहाराजांवर व विजापूरकरांवर केलेल्या बहुतेक मोहिमांत मोगलांनी अनाथ बायकामुलांना पकडून त्यांचे अनेक प्रकारे हाल केल्याचे व रयतेचा जेवढा संहार होईल तेवढा करण्याविषयीं औरंगजेबानें आपल्या सरदारांस वेळोवेळी ताकीद केल्याचे उल्लेख खाफीखान वगैरे यवनी बखरकारांनी केले आहेत; परंतु शिवाजीमहाराज शत्रूच्या मुलखातल्या बायकांमुलास व निरापराध रयतेस कोणत्याही प्रकारचा त्रास मुळीं देत नसत असा उल्लेख खाफीखानासारखे हिंदूंचे कट्टे द्वेष्टेही करतात. यावरून काय समजायचें बरें?

सैन्यबळ साधेल तेवढें वाढविल्यावाचून बिलकूल गती नव्हती. ह्या एवढ्या सैन्यास द्यावा लागणारा मुशाहिरा त्यांनी कोठून आणावयाचा होता? त्याचप्रमाणें स्वराज्यरक्षणास व स्वराज्यवर्धनास सर्व प्रकारे साहाय्यभूत असे जें शेकडो किल्ले त्यांची नेहमीं दुरुस्ती करून त्यांवर उत्तम बंदोबस्त राखण्यास व नवीन शेकडो किल्ले बांधावयास लागणारे उमाप द्रव्य त्यांनीं कोठून आणावयाचें होतें? स्वसत्तेंतील मुलखाच्या उत्पन्नावर हा एवढा अवाढव्य खर्च भागण्यासारखा होता काय? जर नाहीं, तर हें द्रव्यबल त्यांस लुटालूट करूनच मिळविणें प्राप्त होतें हें निर्विवाद आहे. हल्लीं जसें सुधारलेल्या राष्ट्रांस युद्धादी प्रसंगांसाठीं राजरोसपणें हवें तितकें कर्ज काढून त्याचा बोजा स्वप्रजेच्या शिरीं अक्षयींचा लादण्याचा व तिला करांच्या ओझ्याखालीं अगदीं हैराण करण्याचा मार्ग साध्य आहे, तसा कांहीं प्रकार त्या काळी अनुकूल होता काय? आधुनिक राष्ट्रांच्या राष्ट्रीय कर्जाचे आंकडे आपण पाहिले म्हणजे आपली छाती अगदीं दडपून जाते आणि असें वाटतें कीं, ह्या राष्ट्रांचीं दिवाळी निघालीं पाहिजेत एक, किंवा अनाथ प्रजेस त्यांनीं सर्वथैव पिळून काढले पाहिजे एक; परंतु हीं राष्ट्रें जे युद्धप्रसंग करतात ते सर्व स्वत्वरक्षणार्थ किंवा स्वातंत्र्यसंपादनार्थ करतात काय? त्यांच्या आपआपसांतल्या कलागती केवळ एखाद्या दुसऱ्या राजाच्या किंवा मुत्सद्याच्या हरामखोरीमुळें, मूर्खपणामुळे किंवा राज्यतृष्णेमुळें उद्भवतात आणि त्यांच्या पायीं लक्षावधीं मनुष्यांचे बळी पडून त्याबद्दलचा सगळा दंड त्यांच्या प्रजेस पुत्रपौत्रपरंपरेनें भरीत राहावें लागतें. ह्या अत्यंत अनर्थावह, अक्षय विपत्तिमूलक व अन्याय पद्धतीशीं महाराजांचा वादविषयक द्रव्यप्राप्तीचा मार्ग ताडून पाहतां तो केवळ क्षम्य होय असें म्हणावें लागतें. त्यास लागणारे अमर्याद द्रव्यसाहाय्य त्यांनीं स्वप्रजेस अशा रीतीनें नाडून मिळविलें नाहीं, तर जे परस्थ इकडे येऊन येथील प्रजेच्या जिवावर हवे तसे गबर होऊन बसले होते त्यांच्यावर व त्यांच्या आश्रयाने जे हिंदुलोक सधन झाले होते त्यांच्यावर खंड बसवून त्यांनी ज्यांस परतंत्र करून सोडले होते त्यांस स्वतंत्र करण्याच्या पुण्यकृत्याप्रीत्यर्थ त्या द्रव्याचा विनियोग केला यात त्यांच्याकडून मोठेंसें पातक घडले असें आम्हां महाराष्ट्रीयांस तरी निदान कदापि वाटणार नाहीं. त्यांनीं अशा रीतीनें लुटालूट करून द्रव्य मिळवावयाचें नव्हतें असा नीतिबोध करणें म्हणजे त्यांनी स्वराज्य व स्वातंत्र्यही संपादण्याच्या प्रयत्नासच मुळीं लागावयाचें नव्हतें असें म्हणणें होय. लक्ष गणित पागा व पायदळ सर्वदा जय्यत राखून अगदी लहान दर्जाच्या शिपाईप्याद्यापासून मोठमोठ्या सेनापतींपर्यंत सर्व लष्करास रोख पगार द्यावयास नेहमीं किती पैका लागत असावा व त्यांच्या सत्तेतील मुलखाचें उत्पन्न त्या काळीं किती असावें याचा अदाज केला असतां अशा रीतीनें बाहेरून द्रव्य मिळविल्यावाचून गती नव्हती हें उघड आहे. शिवाय औरंजेबासारख्या सार्वभौम बादशहाची आपणांवर लवकरच चढाई होऊन आपणांस त्याच्याशीं निकराचा संग्राम करावा लागणार, तेव्हां त्या प्रसंगीं द्रव्याचें मुबलक साहाय्य लागणार हें महाराज जाणून होते. यास्तव ते साधेल तेवढा द्रव्यसंग्रह करीत असत. ह्या तरतुदीस जर कोणी द्रव्यलोभ म्हणत असतील तर तो त्यांचा निवळ खोडसाळपणा होय. गिझनीच्या महमदानें हिंदुस्थानांत सतरा वेळां स्वाऱ्या करून अगणित द्रव्यराशी केली व मरणसमयीं तें सर्व द्रव्य सोडून आपण जाणार म्हणून शोकाश्रू ढाळले. अशा कोटींतले शिवाजी महाराज होते असें कोण म्हणेल?

लुटीसंबंधाचे निर्णय

आता ही लुटालूट महाराज करीत असत ती केवळ निर्बंधरहित होती किंवा तिला कांहीं नियमांचा आळा होता हें पाहणे उचित आहे. यासंबंधाचे त्यांचे नियम कसे होते हें मागें सांगितलेंच आहे.[१] गरीब रयतेस व शेतकऱ्यांस त्यांच्या लोकांकडून मुळींच उपद्रव होत नसे. स्त्रिया व मुले यांस पकडूं नये किंवा त्यांची बेअदबी करूं नये अशी त्यांची आपल्या लोकांस सक्त ताकीद असे. देवस्थानें, मशिदी, साधुसंत व मुसलमान फकीर यांस बिलकूल त्रास देऊ नये असा त्यांचा कडक कायदा असे. तसेंच लुटालूट करताना हातीं लागेल तो माल बुचाडून शिपायांनी किंवा अंमलदारांने गबर व्हावें असा प्रकार त्यांच्या मुलुखगिरींत मुळींच होत नसे. सर्व लूटीचा हिशोब सरकारांत द्यावा

१ भाग चोवीसावा पाहा.

लागत असे. त्यामुळें त्यांच्या लष्करास परराज्यांतील प्रजेवर यथेष्ट चरण्याचें मुळींच साधत नसे. पुढें पेशवाईत जसें सरकारी सैन्याबरोबर बाजारबुणगें जाऊन जिकडेतिकडें धुमाकूळ उडवून देत असत व सरकारी लष्करासही अन्नसामुग्री मिळण्याची पंचाईत करून सोडीत असत, तसा प्रकार महाराजांच्या लष्करांत मुळींच नसे. दुसरें असें कीं, जे अमीरउमराव किंवा शेटसावकार आपल्या द्रव्याची छपवाछपवी न करता मुकाट्याने आपल्या मगदुराप्रमाणे मागतील तो खंड देण्यास तयार होत त्यांस महाराजाच्या लोकांकडून कदापि उपद्रव होत नसे. त्याप्रमाणेंच ज्या शहरांतले लोक अमुक इतका खंड द्यावयास राजी होत त्यांत त्यांचें लष्कर कधींही प्रवेश करीत नसे. बाहेर वेशीपाशीं राहून ठरलेला खंड मिळतांच तें तेथून निघून जाई. जे संस्थानिक वार्षिक खंड द्यावयास सिद्ध होत त्यांच्या संस्थानांत ते मुळींच मुलुखगिरीस जात नसत. पुढें अदिलशहानें व कुतुबशहानें वार्षिक खंडण्या देण्याचें कबूल केल्यावर त्यांच्या सत्तेंतील मुलखांत महाराज स्वारीस जातनासे झाले; परंतु त्यांचा हा तह फार दिवस टिकला नाहीं म्हणून त्यांस पुनःपुनः त्यांच्या राज्यांतील सधन प्रजेवर घाले घालावे लागत. ह्या लुटालुटीच्या सबंधाने आणखी एक गोष्ट ध्यानांत ठेवली पाहिजे ती ही कीं, महाराजांचे लोक एका हातांत तरवार व दुसऱ्या हातांत आग घेऊन गरीब प्रजेची सरसकट कत्तल उडवीत नसत किंवा घरेदारे जाळीत नसत. असला अप्रयोजक क्रूरपणा त्यांच्या हातून मुळींच होत नसे. द्रव्य कोणापाशीं आहे हें पाहिल्यानें हेरांच्या द्वारें समजून घेऊन केवळ अशाच लोकांवर घाला घालावा व त्यांनी आपले द्रव्य बिनहरकत स्वाधीन केल्यास त्यांना सोडून द्यावे असा महाराजांचा नियम असे. तेव्हां तात्पर्य काय कीं, वर निर्दिष्ट केलेल्या एकंदर गोष्टींचा नीट विचार केला असतां महाराजांस लुटारू व क्रूर लोकांच्या वर्गांत गणून त्यांची अवहेलना व निंदा करणें सर्वथा उचित नव्हे असें खऱ्या विचारी मनुष्यास पटल्यावाचून राहणार नाहीं.

लुटीचा उद्देश

ह्या लुटालुटीच्या प्रकाराचे आणखी एक प्रयोजन येथे निर्दिष्ट केले पाहिजे. ते पुष्कळांच्या लक्षांतून गेले असावे असे वाटते. ते प्रयोजन अर्थात् असें कीं, यवनी अंमलांत अशी सतत धामधूम करीत राहिल्यानें तेथील प्रजेकडून यवनबादशहांस मिळावा तसा कर न मिळून त्यांची शक्ती क्षीण व्हावी व अशा लुटारूं व प्रबळ रिपूस संतुष्ट राखल्यावाचून आपली सत्ता निर्वेध चालणें कठीण आहे असें त्यास वाटावें. ह्या सतत होणाऱ्या त्रासापासून मुक्त होण्यासाठीं अदिलशहा व कुतुबशहा हे महाराजांस वार्षिक खंडणी देण्यास तयार झाले हें मागें सांगितलेंच आहे. ह्या खंडणीशिवाय आणखी चौथाई व सरदेशमुखी हें हक्क अदिलशहाच्या सत्तेतील मुलखांतून वसूल करण्याचा क्रम त्यांनीं मोगलांच्या सामलातीनें सुरू केला होता, याचा उल्लेख मागें केलाच आहे. त्याप्रमाणेंच कुतुबशाहीत हे हक्क स्थापित करण्याचा त्यांचा विचार होता. तो कर्नाटकांतल्या मोहिमेमुळें अंमळ लांबणीवर टाकावा लागला होता. असेच हक्क मोगलांच्या दक्षिणेंतील मुलखांतून वसूल करण्याची मुभा मिळविण्याविषयीं त्यांची खटपट चालली होती आणि ते कांहीं वर्षे जगते तर ते हक्क त्यांनी मोगलबादशहाकडूनही कबूल करून घेतले असते. आता ह्या हक्कांचें धोरण काय होतें हें कोणासही सांगावयास नकोच. हिंदुरयतेपासून मिळणाऱ्या कराच्या जोरावर यवनबादशहा प्रबळ झाले होते. त्याचा कांहीं अंश असा हिसकावून घेतल्यानें तेवढें त्यांचें सामर्थ्य कमी व्हावें आणि त्या मानानें आपली शक्ती वाढवून त्यांच्याशीं झगडण्यास लागणारी तयारी आपणांस करता यावी असा महाराजांचा उद्देश होता.

आता येथें कोणी असा प्रश्न करील कीं, यवनी पातशाहती दुर्बल करण्याच्या ह्या प्रयत्नांत निरपराध प्रजेस नाहक त्रास देणें हें मोठें पातक नव्हे काय? ह्या प्रश्नाचें उत्तर एवढेंच आहे कीं, महाराज यवनी अंमलांतील सर्वच प्रजेला सरसकट उपद्रव देत नसत. त्यांचा डोळा नेहमी सधन लोकांवर असे. त्यांच्या वित्ताचा कांहीं अंश स्वराज्य व स्वातंत्र्य ही साध्य करण्याच्या महत्पुण्याच्या कार्मी योजावा असा त्यांचा संकल्प असे. त्यांच्याकडून बहुतकरून सधन यवनांसच त्रास होत असें व त्यांच्या आश्रयाने गबर झालेल्या इतर लोकांवर त्यांचा खंड असे, हें मागें सांगितलेंच आहे. त्यांच्या ह्या सदुद्देशाविषयीं परमुलखांतील लोकांस कितीही सांगितलें तरी तें त्यांस पटून ते आपल्या वित्ताचा

अंश ह्या राष्ट्रीय कार्यास राजीखुषीनें देण्यास तयार झाले नसते हें उघडच आहे. यास्तव त्यांच्यावर जुलूम केल्यावाचून दुसरी गती नव्हती. सर्व हिंदुजनांस जी कार्यसिद्धी हितावह होणारी होती तिच्या प्रीत्यर्थ त्यापैकीं थोड्याशा लोकांस अल्प काळपर्यंत कांहींशी घस सोसावी लागली तर तें मोठेसे पाप झालें असें सहसा म्हणवत नाहीं. महाराजांचा अंतिम हेतू काय होता याचा जो नीट विचार करील त्यास ह्या त्यांच्या करण्यांत कांहीं वैगुण्य आहे असें बिलकूल वाटणार नाहीं.

राज्यतृष्णेचा आरोप

प्रतिपक्षाचा आणखी एक दोषारोप असा आहे कीं, केवळ राज्यतृष्णेस वश होऊन महाराजांनी हा सगळा खटाटोप केला; यास्तव तो कोणत्याही दृष्टीनें क्षम्य नव्हे. ह्या दोषारोपांचे निरसन करावयाचें म्हणजे अर्थात् त्यांच्या ह्या खटाटोपाचें वास्तविक स्वरूप जगाच्या प्रत्ययास आणून दिलें पाहिजे. स्वराज्य संपादण्याचा मूळ उद्देश पाहिला असतां तो यवनांच्या ताबेदारींतून सुटून स्वतः स्वतंत्र व्हावें असा होता, हें उघडच आहे आणि ह्याच उद्देशानें महाराज आरंभीं ह्या भगीरथ उद्योगास लागले असावे यांत कांहीं शंका नाहीं; परंतु त्या उद्देशांत सर्व हिंदुप्रजेस यवनत्रासमुक्त करण्याच्या उद्देशाचे मिश्रण नव्हतें असें सहसा म्हणवणार नाहीं. कारण त्यांनीं आरंभीं जीं माणसें आपल्या केवळ असाध्य दिसणाऱ्या कार्यास अनुकूल करून घेतलीं त्यांच्या हृदयांत यवनसत्तेविषयीं तिरस्कार व स्वातंत्र्यप्रीती ह्या वृत्तींचें उद्दीपन केलें नसतें तर त्यांनीं जें साहाय्य त्यांस स्वसुखाची व स्वजीविताची यत्किंचित्ही परवा न करता केलें तें त्यांच्या हातून घडलें नसतें. अफझुलखानाकडून आलेला ब्राह्मणवकील, जयसिंग, यशवंतसिंग वगैरे पुरुषांस अनुकूल करून घेण्यांत महाराजांस जें यश आलें त्याचें इंगित पाहू जातां, केवळ आपला वास्तविक उद्देश जो यवनसत्ताविनाशाचा तोच त्यांस नीट समजावून सांगून त्याविषयीं त्यांच्या ठायीं अभिमान जागृत करण्याचा प्रयत्न महाराजांनी केला हेंच होय; एरवी त्यांनी त्यांच्या स्वराज्यप्राप्तीच्या उद्योगांस कितीही आमिष दाखविलें असतें तरी, आनुकुल्य प्रगट केलें नसतें. राज्यतृष्णा महाराजांच्या ठायीं अनिवार होती असें म्हणणारांनी त्यांस तीनचार प्रसंगीं विरक्तता प्राप्त होऊन राज्यत्याग करून मोक्षसाधनाच्या मार्गाचें अवलंबन करण्याचा त्यांनीं विचार कसा केला होता व त्या विचारापासून त्यांस परावृत्त करण्यास त्यांच्या पदरच्या लोकांस किती सायास पडले हें अंमळ लक्षांत आणावें आलेक्झॅन्डर, सीझर, तैमुरलंग, बाबर, औरंगजेब अशा स्वसत्तावृद्धीच्छू पुरुषांशीं ह्या बाबतींत महाराजांची तुलना कदापि करणें रास्त नव्हें. परकीयांच्या स्वातंत्र्याचा व राज्याचा अपहार करून आपली सत्ता वृद्धिंगत करण्यात जो प्रचंड मनुष्यसंहार ह्या राज्यतृष्णावश पुरुषांनी केला तो सर्वथा क्षम्य नव्हे. हें केवळ महापातक होय. हा दोष महाराजांच्या पदरीं बांधता येत नाहीं. हिंदुस्थान हिंदुंचें असून त्यांत राज्य करण्याचा हक्क फक्त हिंदूंसच असावा, असें असतां परस्थांनी त्यांत प्रवेश करून त्यावर आपली सत्ता बसवावी व तेथील प्रजेस वाटेल तसें नाडावें, हा अत्यंत मोठा अन्याय होय. अशा अन्यायी व जुलमी सत्ताधीशांचें स्वदेशांतून निष्कासन करून पुनरपि स्वराज्य व स्वातंत्र्य स्थापन करण्यास उद्युक्त होण्यांत मुळींच अन्याय नाहीं, उलट हें महत्पुण्यकर्म होय आणि हें करण्यास जो नरपुंगव प्रवृत्त झाला त्याचें अखिल भारतवर्ष अक्षयींचे ऋणी झालें तर त्यांत नवल तें कोणते? अशा सत्कार्यास राज्यतृष्णादोषानेंही बिलकूल हीनत्व येत नाहीं. एखादे कार्य करण्यास मनुष्य कोणत्याही उद्देशानें प्रवृत्त झाला तरी त्या कार्याचा परिणाम जर सर्वजनसमाजास हितकर झाला तर तें कार्य अत्यंत स्तुत्य होय अशी नीती आहे. ह्या दृष्टीने पाहता महाराज केवळ राज्यतृष्णेस वश होऊन स्वराज्यसाधनास प्रवृत्त झाले असें मानले तरी त्यांत त्यांस वैगुण्य आणणारे असें कांहींच झालें नाही अशी आमची मनोदेवता आम्हांस सांगते. ह्या त्यांच्या कर्तृत्वामुळें ज्या परस्थांस अपाय घडला त्यांनीं ह्याबद्दल त्यांस कितीही नावे ठेवली तरी तीं अगदीं व्यर्थ होत. जगाच्या इतिहासांत स्वातंत्र्यसंपादक महापुरुषांची खरे निरपेक्ष व निःपक्षपाती इतिहासकार सर्वदा वाखाणणीच करतात व स्वातंत्र्यमूलक जे राष्ट्रीय सुख त्याचें वर्धनन केल्याबद्दल त्यांचा धन्यवाद करतात. ह्या धन्यवादास आमचे चरित्रनायक सर्व प्रकारें पात्र होत हें निर्विवाद आहे.

स्वार्थपरतेचा आरोप

ह्या राज्यतृष्णारूप दोषाच्या अनुषंगानें असणारे स्वार्थपरता व महत्त्वाकांक्षा हे दोन दोष महाराजांच्या अंगीं वसत होते असें प्रतिपक्षाचें म्हणणें आहे. यांत कितपत तथ्य आहे पाहूं स्वार्थपर मनुष्य केवळ आपला उत्कर्ष साधण्यास सर्वदा तत्पर असतो. दुसऱ्याच्या सुखदुःखाचा विचार तो बिलकूल करीत नसतो. महाराजांनीं असा आप्पलपोटेपणाचा प्रकार कोणता केला तें त्याच्या चरित्रावरून मुळींच दिसून येत नाहीं. स्वराज्यसाधन करून वैभव भोगावें असें त्यांच्या मनांत असतें तर त्यानी आमरण जो उपद्व्याप व जी दगदग केली ती कदापि केली नसती त्यांनीं प्राप्त ऐश्वर्याचा यथेच्छ उपभोग घेण्याचें कधीं मनांतही आणले नाहीं. त्यांस सर्व सुखविषयांची पूर्ण अनुकूलता असतांही त्यांत ते एक क्षणही गुंतून राहिले नाहींत. त्यांची दिनचर्या पाहिली असतां अशा सुखानुभवास एका पळाचाही अवकाश त्यांनी राहूं दिला नव्हता. लौकिक कृत्यांत त्यांचा सगळा वेळ अगदीं व्यापून जात असे. संपादित राज्याचे संरक्षण करून सुव्यवस्था लावण्यांत व तद्वृद्धचर्थ अहर्निश झटण्यांत त्यांच्या बुद्धिसर्वस्वाचा व शक्तिसर्वस्वाचा सर्वदा व्यय होत असल्या कारणानें त्यांस फुरसत अशी बिलकूल नसे. ह्या अत्यंत परिश्रमानें श्रांत होणाऱ्या त्यांच्या देहास किंवा मनास आराम असा कधींच प्राप्त झाला नाहीं हें त्यांचें चरित्र लक्षपूर्वक वाचणाराच्या ध्यानांत आल्यावाचून राहाणार नाहीं. सर्व हिंदुस्थानदेश यवनसत्तेंतून मुक्त केल्यावाचून विश्रांतीच मुळीं घ्यावयाची नाहीं, असा ज्या महापुरुषाचा दृढ संकल्प होता त्याच्यावर स्वसुखार्थ व स्ववैभववृद्धचर्थ त्यानें हा सारा खटाटोप केला असा आरोप करणें सर्वथा युक्त नव्हे. महाराजांनी इतकी दौलत संपादन केली होती तरी आपला डौल किंवा दिमाख वाढविण्याकडे त्यांनीं तिचा फारसा उपयोग केला होता असें सहसां म्हणवत नाहीं. त्यांचा पेहराव नेहमीं साधा असे व अंगावर अलंकारादी धारण करण्याचा त्यांस मुळींच शोक नसे. तरी आपली छाप व वजन हीं परकीयांस व स्वकीयांस योग्य प्रकारें भासावी यासाठीं स्वारीचा व दरबाराचा जितका थाट ठेवणे उचित वाटे तेवढा ते अवश्य ठेवीत. दुसरें असें कीं, आपल्या पदरच्या लोकांनी चांगल्या कामगिऱ्या केल्या असतां त्यांस योग्य पारितोषिक देण्यासंबंधानें त्यांचें औदार्य फारच मोठे दिसून येत असे. त्याप्रमाणेंच स्वसेवकांस त्यांच्या कामाच्या महत्त्वानुरूप व योग्यतेनुरूप वेतनें देण्यांत ते कदापि कंजूष नसत. ज्याच्या साहाय्याने एवढी दौलत आपणांस लाभली त्यांस संतुष्ट ठेवण्यांत ते कधीं कुचराई करीत नसत. संपादिलेल्या द्रव्याचा उपयोग स्वराज्याच्या रक्षणाकडे व वर्धनाकडेच मुख्यतः केला पाहिजे व जेणेंकरून स्वजनहित होईल, किंबहुना अखिल भरतवर्ष यवनत्रासरहित होईल, तें साधण्याकडेच तिचा विनियोग झाला पाहिजे, असा त्यांचा नेहमींचा विचार असे. ह्या दौलतीचे आपण रक्षक व वर्धक आहों, भोक्ते नव्हें, हें तत्त्व त्यांच्या हृदयांत पूर्णपणें बिंबले होतें असें म्हणण्यास मुळींच प्रत्यवाय नाहीं. अशा तत्त्वास अनुसरून ज्यांनी आपलें आचरण आमरण राखिलें, त्यांस स्वार्थपरतेचा दोष लावणे बिलकूल यथार्थ नव्हे.

महत्त्वाकांक्षेचा आरोप

आता, स्वार्थपरतेच्या अनुषंगाने असणारी जी महत्त्वाकांक्षा ती तरी महाराजांच्या अंगीं वस्तुतः वास करीत होती कीं काय तें पाहूं स्वतःचा बडेजाव वाढावा, आपली सत्ता सर्वत्र स्थापित होऊन सर्व आपले अंकित व्हावे व आपली कीर्ती सर्वतोमुखी व्हावी अशी अनावर इच्छा ज्याच्या ठायीं वास करीत असते त्या राजास महत्त्वाकांक्षी म्हणणें रास्त आहे. महाराजांनीं सर्व आर्यभूमीस पालाण घालण्याचा संकल्प करून जो प्रचंड उद्योग आजन्म केला तो ह्या दोषरूप वृत्तीसच अनुसरून केला असावा असा तर्क होणें साहजिक आहे; परंतु असें पाहा कीं, जरकरिता ह्या वृत्तीचा अनिवार क्षोभ होऊन ते हिंदूंचे स्वराज्य स्थापून परतंत्रतारूप महागर्तेतून त्यांचा उद्धार करण्यास प्रवृत्त झाले हें खरें मानले तरी ते त्याबद्दल लवमात्रही दोषास पात्र होत नाहींत. ज्या महत्त्वाकांक्षेचा परिणाम असा राष्ट्रोत्कर्षास कारणीभूत होतो ती दोषरूप कशी म्हणावी? परंतु महाराजांच्या एकंदर कर्तृत्वाचा ताळेबंद पाहिला असता असें दिसून येतें कीं,

स्वराज्यसाधन व स्वातंत्र्यसंपादन करण्यास अहर्निश झटणें हें आपलें अत्यंत पवित्र कर्तव्य होय अशी त्याची परम उदात्त वृत्ती बहुतेक आरंभापासून झाली होती. हे महत्कार्य करण्यासच आपण जन्म पावलों आहों व तें साध्य करण्यांतच आपल्या जीविताचें सार्थक्य आहे असें त्यांस सदैव वाटत असे, असें म्हटल्यास अत्युक्तीचा दोष प्रकृत लेखकाच्या माथीं येईल असें मुळींच वाटत नाहीं. ही अलौकिक वृत्ती त्यांच्या ठायीं अशी पूर्णपणे विकसीत झालेली नसती तर जगाच्या इतिहासांत ज्यांस जोड नाहीं अशीं साहसाचीं व शौर्याचीं कृत्यें त्यांच्या हातून कदापि घडली नसती.

हा महत्त्वाकांक्षारूप दोष त्यांस लावण्याचें मुख्य कारण कोणी असें सांगतील कीं, महाराजांनी स्वराज्यस्थापनेस आरंभ केला तेव्हां बहुतेक स्वतंत्र होऊन बसलेल्या कित्येक हिंदू सरदारांस बुडविण्याचा उद्योग त्यांनी केला हें बरोबर नाही. यवनांच्या ताबेदारींतून सुटावयाचें तर त्यांनीं आपल्याच लोकांवर शस्त्र धरले तें कशाला? ह्यावरून असें होत नाहीं काय कीं, आपल्या सत्तेव्यतिरिक्त अन्य कोणाही सरदाराची सत्ता महाराष्ट्रात नसावी असा शिवाजीमहाराजांचा निर्धार होता? आणि ह्यावरून त्यांच्या ठायींची ही महत्त्वाकांक्षा अक्षय्य होती असे नको का म्हणावयाला? अशी शंका घेणारास महाराजांच्या एतद्विषयक कर्तृत्वाचें वास्तविक स्वरूप नीट कळलें नाहीं असें म्हणावे लागतें. ज्या देशाची परकीयांच्या सत्तेंतून मुक्तता करावयाची त्यांस जो तो स्वतंत्र होऊन किंवा परकीय सरकाराशीं पुंडावा करून आपआपला टापू आटपून बसला तर त्यापासून काहीएक फलनिष्पती होणें नाहीं, हें कोणालाही सांगावयास नको. अशा एकेकट्या पुंडांस हतवीर्य करून वरिष्ठ सरकार त्यांचा सुळसुळाट नाहींसा करण्यात सर्वदा समर्थ असतें. तेव्हां अशा पुंडास किंवा बंडखोरांस वश करून घेऊन किंवा त्यांचा नायनाट करून स्वसत्तावृद्धी करण्यांतच तरणोपाय आहे असें महाराजांस वाटलें तें यथायोग्य होतें. त्या प्रमाणेंच जे कित्येक मराठे जहागिरदार अदिलशहाची ताबेदारी स्वीकारून राहिले होते त्यांस वश करून घेण्याचा प्रयत्न करणें किंवा ते सामोपचारानें वश होत नसल्यास त्यांना हर उपायाने जेर करणें हें महाराजांनी हातीं घेतलेल्या महत्कार्याच्या सिद्धीस अत्यावश्यक होतें हें कोणीही कबूल करील. इटली देशांत परराष्ट्रांनी चोहोंकडे लांडा कारभार आरंभून स्वसत्ता स्थापित करण्याचा उद्योग मांडला तेव्हां तेथील कारळ काव्हुरादी पंचायतनानें स्वराष्ट्रास स्वतंत्र करण्याच्या कामीं केलेला उद्योग किंवा जर्मनीच्या माजी बादशहाने सर्व जर्मनराष्ट्र एका छत्राखालीं आणण्याचा केलेला उद्योग जसा निपःक्षपाती इतिहासवेत्यांस क्षम्य व स्तुत्यही वाटत आहे तसाच हा महाराजांचा वादविषयक उद्योग वाखाणण्यासारखा आहे. त्यास महत्त्वाकांक्षेच्या किंवा स्वार्थपरतेच्या दोषानें हीनत्व आणणें सर्वथा युक्त नव्हे. महाराजांनी हा सकृद्दर्शनी अन्यायाचा असा भासणारा प्रकार केला नसता तर महाराष्ट्रास स्वराज्य व स्वातंत्र्य याचा अनुभव कदापि घडला नसता. सर्व लोकांच्या हितासाठीं थोड्याशा लोकांचें तात्कालिक नुकसान करण्याचा प्रसंग आला तर तो सर्वथा निषिद्ध नव्हे, हें आज कोणालाही सांगावयास नको.

भित्रेपणाचा आरोप

आता आणखी एका दोषाविषयीं थोडेसे लिहून ह्या प्रकरणाचा पूर्वार्ध संपवूं, तो दोष असा कीं, महाराजांनीं आपल्या वर्तनक्रमांत शौर्यापेक्षां भित्रेपणाच अनेक प्रसंगी प्रगट केला. हा भ्याडपणा त्यांच्या अंगी नसता तर त्यांनीं आपल्या शत्रूंशीं विरोध करण्यांत जो कपटाचा व युक्तिप्रयुक्तीचा अवलंब निरनिराळ्या प्रसंगीं केला तो ते न करते. खरा शूर पुरुष असतो तो शत्रूशीं समोरासमोर युद्ध करून विजय संपादित असतो, लपूनछपून व नाना कावे करून त्यास हतवीर्य करण्याच्या निंद्य कर्माचा तो अवलंब करीत नसतो. ह्या दृष्टीनें पाहता महाराजांची खऱ्या शूर पुरुषांत गणना करणें युक्त नव्हे, असा कित्येकांचा अभिप्राय आहे. हा अगदींच निराधार व हास्यास्पद आहे असें त्यांचें चरित्र लक्षपूर्वक वाचणारांस वाटल्यावाचून राहणार नाहीं. आता हें खरें कीं, महाराजांस पुष्कळ प्रसंगीं जी यशःप्राप्ती झाली ती शौर्यापेक्षां युक्तिमत्तेच्याच बळावर विशेष झाली. महाराज फारच धूर्त व सावध असत. अविचार व नसतें धाडस असें त्यांनी कधीच केलें नाहीं. हरएक प्रसंगीं आपलें व शत्रूचें बलाबल पाहून ते वागत. जी गोष्ट थोड्या आयासानें

व पदरच्या लोकांचा विनाकारण नाश न होता होण्यासारखी असे ती ते युक्तिप्रयुक्तीनें साध्य करून घेत असत. रक्तपात होईल तेवढा टाळावा असा त्यांचा नेहमींचा संकल्प असे. ही युक्तिमत्ता त्यांच्या अंगी नसती तर त्याचा किंवा मराठ्यांचा इतिहास लिहिण्याचा योगच आज आला नसता. शत्रूंच्या प्रबल सेनांपुढें त्यांच्या तुटपुंजा लोकांचा कधींच सप्पा उडून गेला असता व त्यांनीं आरंभिले महत्कार्य असिद्ध राहून त्यांची आज बंडखोरांत व पुंडपाळेगारांतच इतिहासकारांनी गणना केली असती व हिंदुपदपादशाहीचे अधिष्ठाते म्हणून जो त्यांचा आज सर्व जगांत गौरव होत आहे त्याच्या ऐवजीं त्यांची निंदा मात्र सर्वतोमुखीं झाली असती. ह्या दृष्टीने पाहतां महाराजांच्या युक्तिमत्तेस भ्याडपणा म्हणून त्यांची अवहेलना करणारांच्या मूर्खत्वाचा अधिक्षेप करावा तितका थोडाच आहे.

येथवर परकीयांनीं महाराजांस जे दोष लावले आहेत त्यापैकीं बहुतेकांचे विवेचन करून त्यात कितपत तथ्य आहे तें सांगितलें. आता आमच्या देशांतील कित्येक इतिहासपंडितांनी त्यांच्या कर्तृत्वास अंमळ लघुत्व आणणारीं अशी जी कांहीं विधानें केली आहेत त्यांचें दिग्दर्शन करून तीं कितपत यथार्थ आहेत तें पाहणे इष्ट होय.

भागवतधर्माचे साहाय्य

ह्या इतिहासज्ञांचें पहिलें विधान असें आहे कीं, महाराष्ट्रांत भागवतधर्माचा सर्वत्र प्रसार होऊन उच्चनीचत्वाचा भाव बराच लोपल्यामुळें निरनिराळ्या जातींच्या लोकांचें ऐक्य संभवलें. आपण एकाच देवाचीं लेंकरें असून आपणां सर्वांचा मोक्षमार्ग एकच आहे, यास्तव व्यवहारातही एकमेकांच्या हितासाठीं झटून सर्वांचें कल्याण ज्या गोष्टींत आहे त्यांचा पुरस्कार करण्यास एकमतानें झटणें उचित होय, असें समंजस लोकांस वाटूं लागलें. ह्या भागवतधर्मास महाराष्ट्रधर्म असें अभिधान रामदासस्वामींनीं ठेवून त्याच्या संरक्षणार्थ व संवर्धनार्थ शिवाजीमहाराजांस व इतर महाराष्ट्रमंडळास वेळोवेळां बोध केला. म्हणूनच हें राष्ट्रोद्धाराचें महत्कार्य शिवाजीमहाराजांच्या व त्यांच्या अनुयायी पुरुषांच्या हातून सिद्धीस गेलें. ह्या विधानांत कितपत तथ्य आहे तें पाहू.

पहिला प्रश्न असा कीं, भागवतधर्म शिवाजीमहाराजांच्या काळीं किंवा त्यांच्या पूर्वीच्या काळी महाराष्ट्रांत सर्वत्र प्रसृत झाला होता काय? ह्या प्रश्नाचें निश्चयात्मक उत्तर देणें कठीण आहे. कारण भागवतधर्मप्रतिपादक अशी जी संतमालिका महिपतीनें वर्णिली आहे, तिचा छळ करणारे सनातनधर्माभिमानी कर्मठ ब्राह्मणादी पुरुष त्या काळी महाराष्ट्रांत सर्वत्र होते; त्याप्रमाणेंच पंढरिमहात्म्य जें ह्या संतमालिकेनें एवढें वाढविले होतें तें सर्वांसच महशूर किंवा मान्य होतें असें सहसा म्हणतां येणार नाहीं. ह्या सगुणोपासक वेदांतमतवादी संतमंडळाचें उपास्य दैवत जो पंढरीचा विठोबा तोच सर्वांस उपासनार्ह वाटत होता असें विधान करणें साहसात्मक होईल. कारण त्या काळीं संतमडळाच्या ह्या पंथाखेरीज आणखी अनेक पंथ महाराष्ट्रांत प्रचलित होते. दुसरें असें कीं, संतमंडळाचा हा भक्तिमार्ग सनातन हिंदुधर्मास सर्वथा असंमत होता असें नाहीं. तेव्हां तो धर्मक्रांतिरूप होता असें मानणे उचित नव्हे. त्या पंथाचा पुरस्कार ज्ञानदेवादी संतमंडळानें केला इतकेंच. तसेच त्या पंथामुळें जातिभेदादी भेदभाव विनष्ट होऊन महाराष्ट्रीयांचा ऐक्यभाव संभवला हें म्हणणेंही युक्त नव्हे. कारण तेव्हांची वस्तुस्थिती पाहतां ह्या म्हणण्यास मुळींच आधार नाहीं. संतमंडळीनें व पंढरपूरच्या इतर वारकऱ्यांनी ह्या पवित्र क्षेत्री गेल्यावर जातिभेदाविषयीं थोडीशी बेपरवाई दर्शविली असली तरी ते स्वग्रामीं परत आल्यावर ती वृत्ती कायम ठेवून तदनुरूप व्यवहारात वर्तन करीत असें कोण म्हणेल? सनातनधर्मविहित उच्चनीचत्वाचा भाव अन्नव्यवहार व लग्नव्यवहार यासंबंधाने ते सभोंवतालील कर्मठ लोकांप्रमाणेंच पाळीत असत. ह्यावरून पाहतां संतमडळाच्या भागवत धर्मामुळें त्या काळच्या समाजस्थितींत फारसे रूपांतर झालें होतें असें सहसा म्हणवत नाहीं. हा पंथ अस्तित्वांत आला नसता तर शिवाजीमहाराजांस ज्या पुरुषांनी स्वराज्यसाधनाच्या कामीं साहाय्य केलें त्यांस तें करण्याची बुद्धी झाली नसती असे कोण म्हणेंल? ह्या पुरुषांपैकीं कोण बरें पंढरीचे वारकरी होते किंवा भागवतधर्माचे मोठे पुरस्कर्ते होते? असा कांहीं पुरावा ह्या इतिहासज्ञांनी मिळविलेला आहे काय? बखरकार तर अशा

प्रकारचा कांहींएक उल्लेख करीत नाहींत. प्रत्यक्ष शिवाजीमहाराज व त्यांचें वाडवडील सांब व भवानी यांचे उपासक असून हरएक महत्संकटीच्या प्रसंगीं महाराजांनीं भवानीचा कौलच मिळविण्याचा प्रयत्न केला होता. ह्या त्यांच्या क्रमावरून हें स्पष्ट होते कीं, भागवतधर्मावर म्हणजे त्यांची अढळ श्रद्धा होती असें वाटत नाहीं; तर ते आमरण देवीचे उपासकच होते. शेवटींशेवटीं रामदास्वामींचें दर्शन घडून व बोधामृत श्रवण करून त्यांच्याठायी थोडेंसें उपासनांन्तर झालें होतें असें वाटतें. तरी खुद्द समर्थांनीं त्यांस त्यांचें उपास्य दैवत जें सांब त्याच्या प्रसादाप्रीत्यर्थ कोटी पार्थिवलिंगे करण्याविषयीं आग्रहपूर्वक सांगितले होतें आणि हें गुरूवचन त्या सच्छिष्यानें पाळलें असावें यांत शंका नाहीं. ह्यावरून असें म्हणावें लागतें कीं, महाराज मूळचे कट्टे शैवमताभिमानी असून पुढें रामदासस्वामींच्या संघटनानें त्यांची वृत्ती द्विधा झाली असावी; परंतु हे संघटन घडल्यावर लवकरच त्यांचें देहावसान झाल्यामुळें तिचें पर्यवसान काय झालें असतें हे आज खात्रीनें सांगतां येत नाहीं. आणखी असें कीं, महाराज स्वत: देवी-उपासक शैव होते त्याप्रमाणेंच मावळांतील, घाटमाथ्यावरील व कोकणातील मराठे, शिलेदार, हेटकरी, व बारगीर बहुतेक शैवच होते व त्यास जेजुरीचा खंडोबा व तुळजापूरची भवानी हींच दैवते विशेष उपासनार्ह वाटत. ह्या दैवतांच्या प्रतिमा महाराष्ट्रांत गांवोगांव अनेक नांवांनीं स्थापन केल्या असून त्यांचा प्रसाद साधण्यांतच त्यांस इतिकर्तव्यता वाटे, हें त्यांच्या अनेक धर्मविधींवरून व चालींवरून व्यक्त होतें. उदाहरणार्थ, विजयादशमीचा सण मराठे लोक किती उत्साहानें व थाटानें पाळतात हें सर्वांस विदित आहे. ह्यावरून हें सिद्ध होतें कीं, भागवतधर्माच्या उदार मतांचा सुपरिणाम ह्या जनसमाजावर होऊन ते शिवाजीमहाराजांच्या निशाणास येऊन मिळाले असें म्हणणें प्रमादजनक आहे. आतां महाराजांस साहाय्य करणारे ब्राह्मण व प्रभू हे तरी भागवतपंथानुयायी वैष्णव होते म्हणूनच किंवा भागवतपंथाचा त्यांच्यावर परिणाम झाला होता म्हणूनच ते महाराजांच्या भजनीं लागले असें म्हणण्यास काय आधार आहे? ह्यांचे साहाय्यकर्ते ब्राह्मण मुत्सद्दी व ब्राह्मण वीर तर पक्के कर्मठ होते आणि त्यांच्या पदरचे कायस्थ प्रभू वीर व अत्यंत विश्वासू कारभारी सगळे सांब व भवानी हीच आपली उपस्य दैवते मानीत.

भागवतधर्माचा वास्तविक परिणाम

तेव्हां तात्पर्य काय कीं, महाराजांनीं जो एवढा लोकसंग्रह केला व त्यांच्याकडून जें हें अपूर्व देशकार्य करविलें त्याच्या मुळाशीं भागवतधर्मप्रसाररूप कारण नसून केवळ महाराजांच्या अंगच्या अलौकिक करामतीचेंच तें फळ होय. त्याचें थोडेंसें श्रेय ह्या भागवतधर्मास देणें म्हणजे वस्तुस्थितीचा विपर्यास करणें होय असें मोठ्या कष्टानें म्हणावें लागतें. खरें म्हटलें असतां संतमंडळानें प्रचलित केलेल्या निवृत्तिमार्गामुळें महाराष्ट्रांतील प्रवत्तिमार्ग तीनशें वर्षें बहुतेक लोपल्यासारखा झाला होता असें म्हणण्यास हरकत नाहीं. राम व रहिम एक म्हणणारे, शांत, विरक्त, अहंताशून्य, उदासीन व परमार्थसाधनपर भगवद्भक्त संसार क्षणभंगुर मानून त्यांतून मुक्त होण्याचीच उत्कट इच्छा अहर्निश करीत असत. त्यांना ऐहिक सुखदु:खांचें मुळींच कांहीं वाटत नसे व सर्व जनांस हाच उपदेश ते कंठरवानें करीत असत. त्यांच्या हातून यवननिर्दालनाचा उपदेश होणें मुळींच शक्य नसे आणि हा असा उपदेश रामदासखेरीजकरून अन्य कोणाही साधूच्या ग्रंथांत यत्किंचितही सापडेल असें वाटत नाहीं. हा ऐहिक पसारा जलतरंगवत् मानणाऱ्या साधूंस असला विचार कोठून सुचणार? ही वैराग्यवृत्ती किंवा निवृत्तिपरता आमच्या लोकांच्या हाडींमासी खिळली असल्यामुळें मुख्यत: यवनांचा क्लेशप्रद अंमल आमच्या महाराष्ट्रांत सतत तीनशें वर्षें सारखा चालू असतां त्याला प्रतिकार करण्यास कोणीही मराठा सरदार किंवा ब्राह्मण मुत्सद्दी पुढें सरसावला नाहीं. यवनानी तोंडावर टाकलेला लहानमोठा भाकरीचा तुकडा चघळीत बसण्यांतच त्यांना सौख्य वाटलें. भागवतधर्माचा दुंदुभी त्यांच्या कर्णविवरांत सारखा दुमदुमत होता; पण त्यामुळें त्यांच्या ठायीं स्वराज्यसाधनबुद्धी जागृत न होतां उलट समाधानवृत्ती व उदासवृत्ती मात्र नि:सीम बाणली होता असें दिसतें. पुढें शिवाजीमहाराज स्वराज्यसंपादनाच्या उद्योगास प्रवृत्त झाले असता त्यांचा हिरमोड करणारे व उत्साहभंग करणारे मराठे सरदार व ब्राह्मण मुत्सद्दी किती होते हें इतिहासज्ञांस सांगावयास नको. फार काय पण वादविषयक विधान

करणारे इतिहासपंडित अशा एका सरदाराचें किंवा मुत्सद्याचें नाव सांगतील काय कीं, जो भागवतधर्ममूलक ऐक्यभाव जागृतीस्तव शिवाजीमहाराजांस आपण होऊन येऊन मिळाला होता? असा प्रकार झाला असता तर प्रारंभी त्यास जो शुद्ध नीत्यभिमानी जनांच्या मते अंमळ अनन्वित प्रकार कित्येक मराठे व ब्राह्मण सरदारांच्या संबंधानें करावा लागला त्याचें प्रयोजनच मुळीं राहातें ना. मोरोपंत पिंगळे, बाळाजी सोनदेव, दत्ताजीपंत आदीकरून ब्राह्मण मुत्सद्दी; बाळाजी आवजी, बाजीप्रभू देशपांडे, मुरारबाजी इत्यादी स्वामिभक्त प्रभू गृहस्थ व तानाजी मालुसरे, प्रतापराव गुजर व हंबीरराव मोहिते यांच्यासारखे प्रतापशाली वीर महाराजांपाशी आरंभी केवळ स्वोत्कर्षलालसेनेंच जमा झाले असून पुढें सूर्यकमलन्यायानें त्याच्या ठायींच्या उज्ज्वल गुणाचा विकास व परिपाक महाराजांच्या अंगच्या अलौकिक तेजानेंच केवळ झाला असें आम्हांस वाटतें. ह्या संसिद्धीस हें वास्तविक व समर्पक कारण पुरेसें असतां तिचें यश बापड्या संसारसुखबहिष्कृत साधुमंडळाच्या निवृत्तिमार्गास अंशत: तरी देणें म्हणजे आमच्या चरित्रनायकाच्या वास्तविक योग्यतेस लघुत्व आणणें होय असें आम्ही समजतों.

स्वधर्माभिमान

आता येथें कोणी असा प्रश्न करील कीं, महाराजांनी यवनांची सत्ता भरतभूमींतून सरळ नाहींशी करण्याचा जो सत्संकल्प केला त्याच्या मुळाशीं स्वधर्माभिमानरूप वृत्ती नव्हती काय? ह्या प्रश्नाचें होय असें प्रांजलपणे उत्तर देणें रास्त आहे. महाराजांच्या ठायीं स्वधर्माभिमानाचें बीजारोपण बाल वयापासूनच झालें असून त्यांची वृत्ती आमरण धर्मशील होती. ह्या वृत्तीस्तवच आरंभी त्यांच्या ठायीं यवनद्वेष उद्भवला असावा असेंही म्हणण्यास प्रत्यवाय नाही; परंतु ह्या धर्माभिमानाबरोबरच स्वातंत्र्यप्रीतीही त्यांच्या हृदयांत उद्भूत होऊन उत्तरोत्तर प्रबल होत गेली होती. ह्या उभय वृत्तींच्या क्षोभामुळेच त्यांच्या ठायीं पुढील कर्तृत्वसंकल्प दृढ झाला व जगास थक्क करून सोडणारे पराक्रम त्यांच्या हातून घडले; परंतु हा स्वधर्माभिमान अमर्याद स्वातंत्र्यप्रीतीवाचून केवळ पंगू होता हें मात्र विसरता कामा नये. त्याप्रमाणेंच ह्या उभय वृत्तींस अप्रतिम कर्तृत्वशक्तीचें साहाय्य नसतें तर त्या असून नसून सारख्याच होत्या. ह्या तिहींचा संयोग व प्रकर्ष महाराजांच्या ठायीं झाला म्हणूनच त्यांचें चरित्र आज जगदुद्धारक झालें आहे. आता हा स्वधर्माभिमान भागवतधर्मप्रसारामुळेंच केवळ उद्भूत झाला असें म्हणतां येणार नाहीं. कारण हा संतमंडळाचा पंथ अत्यंत उदार असून त्यांत अभिमानरूप हृदयवृत्तीस बिलकूल थारा नव्हता. राम व रहिम एक म्हणणाऱ्या साधुसंतांच्या भक्तिपंथांत असल्या मनोवृत्तीस मुळीं अवकाशच नव्हता. शिवाय महाराज ह्या वैष्णवपंथाचे मोठेसे पुरस्कर्ते होते असें विधान करावयास कांहींएक पुरावा नाहीं. त्यांची पूर्ण श्रद्धा सनातन धर्मावरच अगदीं दृढ होती आणि म्हणूनच त्यांच्या ठायीं देवभोळेपणा व भवानीविषयींची भक्ती ही आमरण कायम राहिली होती. त्यांनीं आपल्या साहाय्यकारी मंडळींत स्वराज्यप्रीतीबरोबरच स्वधर्माभिमानाची जागृती केली, ती ह्या वैष्णवपंथाच्या साहाय्यानें बिलकूल केली नाहीं, तर गोब्राह्मणांस आपली दैवतें समजावयास लावणाऱ्या, जातिभेद अवश्य पाळला पाहिजे असे म्हणणाऱ्या, प्रतिमापूजेचा पुरस्कार करणाऱ्या व सर्व कर्मकांडाचा उपयोग प्रतिपादन करणाऱ्या सनातनधर्माचा तो अभिमान होता हें मुळीच विसरता कामा नये. महाराजांचे व त्यांच्या बहुतेक अनुयायीजनांचें आचरण ह्या धर्मास अनुसरूनच होतें हें निर्विवाद आहे. कारण ह्याच्याविरुद्ध पुरावा कोणत्याही बखरींत यत्किंचित् सापडत नाहीं.

महाराजांच्या कर्तृत्वाच्या व स्वातंत्रसंपादनाच्या अचाट उद्योगाच्या योगाने महाराष्ट्रातील जनसमाजास स्वधर्माचारानुसार स्ववर्तन ठेवण्यास यवनांकडून प्रत्यवाय होण्याचे बंद झाले व त्यामुळे एकप्रकारे धर्मजागृती चोहोकडे पुनरपि झाली असे म्हणण्यास चिंता नाही; परंतु ती केवळ सनातन धर्माच्या बाबतीतच होय. तीस भागवतधर्माचे वळण लावण्याचा उद्देश त्यांच्या मनात कधी आला नसावा, किंबहुना त्याचे महत्त्व त्यांच्या मनात भरले नसावे. त्यांच्या काळी त्यांच्या आश्रयाने असलेले शास्त्री व पंडीत यांच्या ठायी सनातनधर्मविहित कर्मकाडांचा अभिमान किती प्रबळ वसत होता हे महाराजांनी आपणांस राज्याभिषेक करून घेण्याचे मनात आणले तेव्हां चांगला दृग्गोचर झाले.

ते त्यांस क्षुद्र मानून क्षत्रियोचित राज्याभिषेकास ते पात्र नाहीत असा आग्रह धरून बसले. त्या समयी गागाभट्टासारखा उत्तरेकडचा सर्वशास्त्रपारंगत ब्राह्मण ह्या शास्त्र्यांच्या नेत्रांत अंजन घालावयास नसता व बाळाजी आवजीसारखा स्वामिकार्यदक्ष पुरुष नसता, तर राज्याभिषेक समारंभाचा अपूर्व विधी महाराष्ट्रास स्वातंत्र्यानुभव करून देणाऱ्या ह्या महापराक्रमी राजर्षीला कदापि साध्य झाला नसता. त्या काळी कर्मठ ब्राह्मणांच्या ठायी जातिभेदाचे बंड किती प्रखर वसत होते हे कायस्थांच्या बाबतीत त्यांनी दाखविलेला अती निचतेचा तिरस्कार व अवगणना यावरून स्पष्ट होते. असो. आता प्रो. सरकार म्हणतात कीं, महाराष्ट्रात जातीभेदमूलक वैरभाव प्रखर असल्याकारणाने महाराष्ट्रीयांनी बहुत कष्टांनी मिळविलेले स्वराज्य लवकरच अंत पावेल. हे त्यांचे म्हणणे कांही खोटे नाही. ते आणखी म्हणतात : 'जातिमत्सर प्रत्यक्ष शिवाजीमहाराजांच्या वेळीही प्रखर स्वरूपाने वसत होता. महाराष्ट्रातील लोकांचे शिवाजीमहाराजांच्या वेळी जे एकीकरण झाले ते केवळ कृत्रिम होते. त्यात कायमपणाचे तत्व मुळीच नव्हते. ते केवळ तात्पुरते असून क्षणभंगुर होते. त्या काळी शिवाजीसारखा विलक्षण कर्तबगार राज्यसंस्थापक व शास्ता निर्माण झाला म्हणून ते एकीकरण अल्प काळ तरी टिकले; परंतु असे अलौकीक पुरुष महाराष्ट्रात आणखी निर्माण न झाल्यामुळे हे एकीकरण लवकरच लय पावले.' यावरून प्रो. सरकार शिवाजीमहाराजांच्या स्वराज्यसंस्थापनारूप महाकार्यात असे वैगुण्य दाखवितात कीं, त्यांनी लोकांचे वास्तविक एकीकरण करण्याचा व लोकाची शिक्षणप्रसारादिकेकरून सुधारणा करण्याचा कांहीच उद्योग केला नाही परंतु त्याना स्वराज्य स्थापना करून स्वत्व कायम राखण्यासाठी प्रचंड शत्रूंशी आमरण एकसारखे झगडावें लागल्यामुळे ह्या इष्ट गोष्टी करता आल्या नाहीत, हे त्यांच्या लक्षात आले कीं नाही न कळे.

आता येथें कोणी अशी शंका घेईल की, महाराजांच्या कर्तृत्वाचा व्याप ज्या प्रांतांत विशेषतः होता त्यांत तुकारामादी वैष्णव भक्त पुष्कळ असून त्यापैकीं कांहीं जणांचे चरित्र महाराजांच्या डोळ्यांपुढें घडत होतें व प्रत्यक्ष तुकारामबावांवर तर त्यांची फारच निष्ठा होती. असें असतां त्यांच्या मनावर ह्या भक्तिपंथाचा मुळींच कांही परिणाम झाला नाहीं काय? ह्या शंकेचे समाधान अर्थात् असें कीं, तुकारामादी साधुसंतांच्या उज्ज्वल आचरणामुळें तें त्यांस परम वंद्य वाटत आणि त्यांची बोधवाणी श्रवण करण्यास व त्यांचा समागम साधण्यास ते सर्वदा उत्सुक असत हें निर्विवाद आहे, परंतु ह्या साधूंना सनातनधर्माविरुद्ध काहीं सांगावयाचें आहे किंवा तद्विरुद्ध त्यांचें आचरण आहे असें महाराजांच्या कधीं ध्यानींमनींही आलें नाहीं व त्या काळच्या संतमडळासही आपल्या पथांत सनातनधर्माहून विशेष असें कांहीं आहे असें कधींही वाटलें नाहीं. ही भेददृष्टी आधुनिक पंडितांची आहे.[१] तिचा आरोप त्या काळाच्या साध्या, सरळ व भाविक लोकांवर करणें बरोबर नाहीं. फार काय पण सांप्रत काळी हा वैष्णवपंथ अस्तित्वांत असून महाराष्ट्रांतील बहुतेक गांवांतून पंढरीचे वारकरी आढळतात व लाखो लोक पंढरीच्या यात्रेस जातात; परंतु त्यात कांहीं विशेष आहे असें एकंदर लोकांस वाटत नाहीं व अशा वारकरी लोकांचा कर्मठपणा व जात्यभिमान विगलित झाला आहे असें अनुभवास येत नाहीं.

---

१ महाराष्ट्रात निर्माण केलेल्या साधुसंतांनी त्या काळच्या लोकांस आपल्या प्रासादिक वाणीने जो सद्बोध केला, आणि ह्या त्यांच्या बोधामुळे जी धर्मक्रांती झाली त्यांचे साहाय्य शिवाजीमहाराजांनी घडवून आणलेल्या राज्यक्रांतीस प्रमुखत्वें करून झाले, असा सिद्धांत न्यायमूर्ती रानडे यांनी प्रथम स्पष्टपणे आपल्या ग्रंथात प्रणीत केला. हा अर्थात् सोळाव्या शतकात युरोपात प्रचंड धर्मक्रांती झाल्यावर राज्यसुधारणा व राज्यक्रांती उद्भवल्या ह्या गोष्टींवर लक्ष ठेवून आमच्या ह्या पंडितांनी प्रसृत केला आहे. कारण शिवाजीमहाराज निर्माण होण्यापूर्वी व त्यांच्या हयातीत महाराष्ट्रात कर्मकांडाचा अव्हेर करून भक्तिमार्गाचे महात्म्य प्रतिपादन करणारे साधू निर्माण झाले होते. केवळ ह्या एवढ्या साम्यावरून सदरील सिद्धांत प्रणीत करणें बरोबर नाही. रा. राजवाडे हे जरी असें म्हणतात की, शिवाजीमहाराजांना स्वराज्यस्थापनेची स्मृर्ती रामदासस्वामींकडूनच मुख्यतः प्राप्त झाली असली तरी न्यायमूर्ती रानडे यांचा सिद्धांत जो की, साधुसंतांच्या बोधामुळे पुरातन धर्मात क्रांती क्रांती होऊन भागवतधर्म प्रवृत्त झाला, तो केवळ निराधार आहे असे ते प्रतिपादन करतात. ते म्हणतात की, त्या काळचे कोणीही संत पूर्वकाळापासून आराध्य मानल्या गेलेल्या देवतांस अपूज्य मानीत नसत किंवा पुरातन धर्माचा अव्हेर करीत नसत. जातिभेदनिषेध, मूर्तिपूजानिषेध वगैरे गोष्टींचा ते पुरस्कार करीत नसत.

रामदासस्वामींकडून स्कूर्ती मिळाली नाही

ह्या एकंदर वादाचा निष्कर्ष मिळून एवढाच कीं, प्रत्यक्ष महाराज किंवा त्यांस साहाय्य करणारे मुत्सद्दी व वीर भागवतधर्माच्या उदार तत्त्वास्तव स्वराज्यस्थापनेस प्रवृत्त झाले, एरवीं होते ना, हें म्हणणें बरोबर नाहीं.[१] आता वादविषयक विधानाच्या उत्तरार्धात रामदासस्वामींस एतद्विषयक श्रेय देण्याचा जो प्रयत्न केला आहे त्यांत कितपत तथ्य आहे तें पाहूं प्रतिपक्षाचें पहिलें विधान असें आहे कीं, रामदासस्वामींनीं ह्या भागवतधर्मास महाराष्ट्रधर्म असें नांव देऊन त्यांचें संरक्षण व संवर्धन करण्याविषयीं शिवाजीमहाजांस आमरण बोध केला म्हणून त्यांच्या हातून एवढा अचाट उद्योग झाला. एरवीं होता ना. ह्या म्हणण्यांत कांहींएक जीव नाहीं, हें एकूणतिसाव्या भागाच्या शेवटीं सप्रमाण दाखवून दिलें आहे. त्याची येथें पुनरुक्ती नको. समर्थांनीं महाराजांस स. १६४९ त अनुग्रह देऊन त्यांचें गुरुत्व स्वीकारले असा जो जनप्रवाद समर्थांच्या चरित्रलेखांवरून व त्यांचा आधार सत्यवत् मानून चिटणीस व शिवदिग्विजयकार यांनी केलेल्या एतद्विषयक उल्लेखांवरून सर्वत्र प्रचलित झाला आहे, तो सप्रमाण मानून आमच्या इतिहासपंडितांनी हें विधान केले आहे; परंतु ही रामदासांच्या भेटीची व अनुग्रहाची तारीख अगदीं खोटी ठरून पुढें तेवीसचोवीस वर्षांनी त्यांची प्रथम भेट झाल्याचा अस्सल पुरावा हल्लीं महाराष्ट्रीयांच्या अवलोकनांत आला आहे. त्यामुळें हा सर्व विभू निखालस ढासळून जाऊन महाराजांच्या यशाचे अंशभाक् रामदासस्वामी बिलकूल ठरत नाहींत. वास्तविक पाहता हा एवढा यशाचा वाटा रामदासस्वामींस देऊं पाहणे सदरील पुराव्याच्या अभावीं देखील युक्त नव्हतें. महाराजांनी स्वराज्यसाधनाचा जो सत्संकल्प केला तो स. १६४९ सालापूर्वी निदान पाचसहा वर्षे तरी केला होता हें निर्विवाद आहे. त्याप्रमाणेंच रामदासस्वामींनी महाराजांस पाठविलेल्या प्रथम पत्रांतच जो त्यांचा स्तुतिपाठ केला आहे त्यास ते स. १६४९ त किंवा त्यानंतर पंधरावीस वर्षे तरी पात्र झाले होते असें सहसा म्हणवत नाहीं. दुसरें असें की, वांई, कऱ्हाड, सातारा, परळी वगैरे ठाणीं महाराजांनीं स. १६७२ -७३ सालापूर्वी जिंकली नव्हतीं तेव्हां त्या ठिकाणीं ह्या गुरुशिष्यांच्या ज्या भेटी वगैरे झाल्याचें समर्थाच्या बखरींत लिहिलें आहे त्या कशा संभवतात याचा ह्या इतिहासपंडितांनीं अमळ विचार करावयास हवा होता. तसेंच ज्या दासबोधाच्या बळकट पुराव्यावरून हें विधान त्यांनी इतके निक्षून केलें आहे त्याचें तरी त्यांनीं सूक्ष्म दृष्टीनें साद्यंत अध्ययन करावयाचे होतें. असा कांहींच विचार न करता महाराजांस समर्थांकडून स्वराज्यसाधन व स्वधर्मरक्षण करण्याच्या कार्मी स्फूर्ती व उपदेश प्राप्त झाला असें विधान त्यांनी बेधडक करून ठेवले आहे, याचें नवल वाटतें. प्रो. रोलिन्सन यांनी अलीकडे शिवाजीमहाराजांचे एक लहानसे चरित्र इंग्रजी भाषेत लिहिले आहे आणि मि. किंकेड यांनी मराठ्यांचा इतिहास लिहिण्याचा संकल्प करून त्याचा पहिला भाग प्रसिद्ध केला आहे, त्यांत महाराजांचे चरित्र दिले आहे. हे दोन्ही ग्रंथ त्या आंग्ल लेखकांनी महाराष्ट्रीय इतिहासतज्ञाच्या साहाय्याने लिहिले असून त्यातसुद्धा रामदास व शिवाजीमहाराज यांच्या संबंधाचा निराधार प्रवाद नमूद केला आहे, याचा फारच चमत्कार वाटतो. प्रकृत चरित्रग्रंथ तेरा वर्षांपूर्वी प्रसिद्ध झाला असून त्यांत ह्या प्रवादाचे निराधारत्व आम्ही स्पष्टपणे व सप्रमाण स्थापित केले असून त्या संबंधाचा वाद तेव्हांपासून मधूनमधून होत आला आहे. असे असता आम्ही दिलेली प्रमाणे खोटी ठरविण्याचा कांहीच प्रयत्न न करता सदरील आंग्ल लेखकांना स्वग्रंथात खोटी विधाने करावयास लावणे हा मोठाच सत्यापलाप होय. अलीकडे प्रो. भाटे यांनी आमच्या पुराव्याचे स्वतंत्र रीतीनें समर्थ केले आहे. तरी देखील कित्येक इतिहाससंशोधक ह्या बाबतीत अद्यापि साशंकच आहेत. प्रो. सरकार ह्या प्रवादावर फारसा भरवंसा ठेवीत नाहीत.

---

१ ह्या सदरील विवेचनावरून भागवतधर्म सनातन धर्माहून उच्च प्रतीचा नव्हे असें आमचे मत आहे असें मात्र कोणीही समजूं नये. त्याचें अनुसरण सुसंगतपणें करणाऱ्यांच्या ठायी कर्मठांच्यापेक्षांही शतपट जास्त औदार्य व समता हीं वसण्याचा संभव आहे हें निर्विवाद आहे. प्रकृत वाद जो आम्ही केला आहे तो त्या पंथापासून तदभिमानी पंडित म्हणतात तितकें राजकीय पुनरुज्जीवनास साहाय्य झालें होतें किंवा कसें तें पाहावें ह्यासाठींच होय.

मि. किंकेड व रा. ब. पारसनीस यांना हनुमंतस्वामींची बखर व तींत वर्णिलेले चमत्कार खरें वाटतात असे दिसते. कारण त्यांनी वर निर्दिष्ट केलेल्या इतिहासग्रंथात रामदासांनी केलेल्या कांही चमत्कारांचा उल्लेख मोठ्या आवडीने केला आहे! असल्या भाकडकथा दिल्याने आपल्या ग्रंथाची इतिहास ह्या दृष्टीने विश्वसनीयता कमी होते हे त्यांच्या लक्षात कसे आले नाही?

ह्या गुरुशिष्यांची प्रथम भेट स. १६७२ त झाली हें जर आता निश्चित झालें आहे तर स्वराज्यसंपादनाची बहुतेक खटपट आटोपल्यावर समर्थांची उपदेशवाणी महाराजांस श्रवण करण्याचा योग आला होता हें उघड आहे. जर कोणी येथें असें म्हणेल कीं, समर्थांचे प्रत्यक्ष दर्शन घडलें नसलें तरी त्यांच्या शिष्यांच्या द्वारे हा बोध त्यांस प्राप्त झाला असावा, तर तेंही निराधार आहे. कारण महाराजांस समर्थांविषयींची माहिती एकदोन वेळांच काय ती झाली असून तिचें विस्मरण त्यांस पुढें प्रथम भेटीपर्यंत झाल्याचें समर्थीच्या बखरींतच लिहिलें आहे. त्यावरून 'राजकीय पुनरुजीवनार्थ' रामदासस्वामींनीं जो प्रयत्न केला असें म्हणतात[१] त्यास हा वेळपावेतों मुळीं आरंभच झाला नव्हता, असें म्हणावे लागतें आणि पुढेही तो कितपत चालू झाला हें समर्थांच्या चरित्रलेखांवरून किंवा महाराजाच्या बखरींवरून कांहीं एक कळून येत नाहीं. इतिहासाकडे डोळेझाक करून कल्पनासृष्टींत रममाण व्हावयाचें असेल तर स्वाभिप्रेत मतांचे कसें तरी प्रणयन करावयाचे असेल तर हवें तें विधान बेलाशक ठोकून द्यावें; पण तें मोठ्या शोधकपणाच्या बडेजावाखालीं खपलें जावें हें आमच्या देशाचें मोठेंच दुर्भाग्य होय. हा एवढा ऊहापोह करण्याचा हेतू तरी एवढाच आहे कीं, वास्तविक सत्य असेल त्याचें निरूपण करून ज्याची जितकी खरी योग्यता असेल तितकी निःपक्षपातबुद्धीनें जगास विदित करावी.

---

१ रा. वि. का. राजवाडे 'श्रीसरस्वतिमंदिरा'च्या सहाव्या वर्षाच्या पहिल्या अंकात (चैत्र शके १८२८) येणेंप्रमाणें विधान करतात – 'शक १६०० (इ. स. १६७८) मध्यें सर्व महाराष्ट्रभर रामदासाचीं मतें पाळणारे व कृती करणारे सुमारें १२०० रामदासी काम करीत होते. शके १६०० त १२०० लोक एकाच मताचा प्रसार व एकाच कृतीची सिद्धी करणारे पाहिले म्हणजे समर्थांनी महाराष्ट्राच्या राजकीय पुनरुज्जीवनार्थ केवढें मोठें यंत्र निर्मिले होतें याचा अदाज करता येतो. श. १६०० त महाराष्ट्र समर्थांच्या विचाराने व कृतीनें सर्वस्वी भारून गेला होता, असेंच म्हणावे लागतें. (पृ. ३३). ह्या विधानाचे धोरण काय आहे तें मार्मिक वाचकांस सांगावयास नकोच. तें अर्थात– हेंच की, सर्व राजकीय पुनरुज्जीवनाचें श्रेय समर्थांस द्यावयाचें, शिवाजीमहाराज केवळ निमित्तमात्र होते; खुद्द त्यांच्या हातून असें फारसे काहींच झालें नाही. स. १६७२ –७३ पर्यंत महाराजांनी केलेला खटाटोप हें समर्थनिर्मित यंत्र अस्तित्वात येईपर्यंत केवळ व्यर्थ होता ना! त्या खटाटोपामुळें स्वराज्यविषयक अभिमान व तत्प्रीत्यर्थ समर्यी स्वप्राणांची आहुती देण्यासही सिद्ध होण्याची बुद्धी महाराजांच्या पदरच्या लोकांत उद्भवली नव्हती ना! एकंदरीत ह्या इतिहासशोधकांची सत्यनिष्ठा प्रशंसनीय समजावयाची! ह्या इतिहासपंडिताच्या सदरील विधानाच्या आधारावर दुसऱ्या एका रामदासभक्तांस उकळी फुटून त्यानें श्रीसयाजीविजयाच्या ता. २४ नवेंबर स. १९०६ च्या अंकात 'रामदासी साप्रदाय' ह्या मथळ्याखालीं एक लेख लिहून बरेंच आकांडतांडव केलें आहे. हा सर्व प्रकार पाहून त्याच्या रामदासभक्तीस केवढा ऊत आला आहे व त्याबरोबर सत्यापलाप करून महाराजांस लघुत्व आणण्याची त्याची धडपड कशी चालू आहे हें उघड होतें. रा. राजवाडे आणखी असे म्हणतात की, रामदास्वामींचे मठ शिवाजीमहाराजांच्या राज्यात किंबहुना दक्षिणेत तंजावरापर्यंत स्थापित झालेले आढळतात, ह्या गोष्टीवरून रामदासीपंथाच्या प्रसाराबरोबर शिवाजीमहाराजांचा राज्यविस्तार झाला असे मानण्यापेक्षा महाराजांची सत्ता जिकडे जिकडे स्थापित झाली तिकडे तिकडे समर्थांच्या शिष्यास मठ स्थापण्याचे उत्तेजन व सवड मिळाली, असे म्हणणे विशेष सयुक्तिक दिसते. रा. सरदेसाई तर आपल्या रियासतीत असे स्पष्ट विधान करतात की, 'शिवाजीच्या राज्योपक्रमांत आरंभी रामदासाचे अंग बिलकूल नव्हते. शिवाजीस राज्यस्थापनेची स्कूर्ती रामदासांपासून झालेली नाही... शिवाजीचा उपक्रम पाहून रामदासांच्या मनात नवीन प्रकाश पडला... व त्यांस नवीन दिशा दिसू लागली, ती राजकारणाची होय. (म.रि.ष. १११) असे विधान करूनही ते म्हणतात की, ह्या गुरुशिष्याची भेट प्रथम १६४९ त झाली ! पण अलीकडे प्रो. भाटे याचे 'रामदास व सज्जनगड' ह्या नावाचे पुस्तक प्रसिद्ध झाल्यापासून त्यांचे हे शेवटले मत बदलल्याचे त्यांनी जाहीर केले आहे. प्रो. भाटे यांनी दिलेला पुरावा आम्ही १९०७ साली ह्या ग्रंथात नमूद केला होता तो त्यांस त्यावेळी खरा वाटला नव्हता!

भागवतधर्म व महाराष्ट्रधर्म

आता शेवटीं वादविषयक विधानातील एका गौण मुद्यांचा येथें विचार करूं. तो मुद्दा असा कीं, ह्या भागवतधर्मास रामदासस्वामींनी महाराष्ट्रधर्म अशी संज्ञा दिली होती व त्याचाच प्रसार त्यांनीं स्वबोधाच्या द्वारें सर्वत्र केल्यामुळें महाराष्ट्रीयांच्या ठायीं स्वदेशाभिमानाची जागृती झाली; परंतु येथें असा प्रश्न उद्‌भवतो कीं, ह्या विठ्ठलभक्त वैष्णवाचा पंथ रामदासस्वामींस सर्वतोपरी मान्य होता कीं काय? दासबोधाचें सूक्ष्मरीत्या अवलोकन केलें असतां तो रचणाऱ्याचा पंथ काहींसा निराळाच होता आणि हा रामदासी पंथ वैष्णवपंथाहून निराळा आहे असा महाराष्ट्रांत त्या काळी हळूहळू पसरत चालला होता. ह्या पंथाचे लोक पंढरीच्या वारीस फारसे जात नसत. खुद्द रामदासस्वामींस मोठ्या आग्रहानें एक वेळ पंढरीस नेलें असतां तेथें कोणता अद्‌भूत चमत्कार घडला तें त्यांचें चरित्र वाचणारास विदित आहेच. असो. तर 'संताळ्यां'चा हा वैष्णवपंथ रामदासी पंथाहून अंमळ भिन्न असून त्याची सनातन धर्मावरच विशेष भिस्त होती असें वाटतें. यास्तव ह्या वैष्णवपंथास त्यांनीं महाराष्ट्रधर्म हें नांव दिलें असावें असें वाटत नाहीं. एक विद्वान गृहस्थ ह्या शब्दाचा अर्थ महाराष्ट्राचें कर्तव्य असा करतो, त्यांत तर कांहींच जीव नाहीं. महाराष्ट्राचें कर्तव्य म्हणून कांहीं निराळाच एखादा वर्तनक्रम होता असें म्हणवत नाहीं. ह्या शब्दाचा साधा सरळ अर्थ टाकून हे पंडित उगेच आडरानांत कां शिरले न कळे. प्रस्तुत लेखकास ह्या सामासिक पदाचा अर्थ महाष्ट्रांतील लोकांचा धर्म असा असावा असें वाटतें. महाराजांस पाठविलेल्या स्तुतिपर पत्रांत जो हा शब्द योजला आहे त्याचा दुसरा कांहींएक अर्थ होणें संभवत नाहीं. महाराजांनी त्या काळी महाराष्ट्राचा बराच भाग काबीज करून तेथील यवनी अंमल अजीबात उडवून दिल्यामुळें तेथील प्रजा इतर अनेक बाबतींप्रमाणें धर्मसंबंधानें निर्भय झाली होती. ह्या इष्ट स्थितीस अनुलक्षून रामदासस्वामींनीं महाराजांची स्वपत्रांत स्तुती केली आहे व संभाजीस त्याचें सगोपन व संवर्धन करण्याविषयी बोध केला आहे. महाराजांचा जन्म कर्नाटकांत होऊन तेथें त्यांनी स्वराज्यसंपादनाद्वारा स्वधर्मसंगोपन केलें असतें तर समर्थांनी 'कर्नाटकधर्म राहिला कांही तुम्हाकीरतां' असें विधान अवश्य केलें असतें. दुसरें असें कीं, हें महाराष्ट्रधर्मपद रामदासांच्या इतर कोणत्याही कवनांत आढळत नाहीं. त्यावरून त्याचा उपयोग फक्त शिवाजीमहाराजांच्या कर्तृत्वाची प्रशंसा करण्यापुरताच केला होता असें म्हणावें लागतें असल्या लेच्यांपेच्यां आधारावर रामदासांनी महाराष्ट्रीयांच्या ठायीं स्वदेशाभिमान जागृत करण्यासाठींच केवळ हा असा शब्द प्रचारांत आणला असें म्हणणें निखालस अप्रमाण होय. 'मराठा तेवढा मिळवावा, महाराष्ट्रधर्म वाढवावा' वगैरे उद्‌गार संभाजीस लिहिलेल्या पत्रांत त्यांनी काढले ते त्याचे पुत्र बहुतेक पहिले व शेवटलेच होतें.[१] कारण ज्या वर्षी हें पत्र त्यांनी संभाजीस लिहिलें त्या वर्षी त्यांचें देहावसान झालें आहे.[२] व त्यांच्या पश्चात त्यांच्या शिष्यवर्गानें हें व्रत पुढें चालविल्याचें कोठेंही लिहिलेले नाही. नुसती कल्पना करावयाची तर तो इतिहास नव्हे हें समर्थभक्तांनी विसरता कामा नये. तेव्हां एकंदरींत काय कीं, स्वदेशाभिमान, स्वधर्माभिमान, स्वराज्याभिमान व स्वातंत्र्यप्रीती ह्या वृत्ती समर्थांसारख्या गोसाव्याच्या बोधानें महाराष्ट्रांत पुढें कांहीं काळ जागत राहिल्या असें म्हणण्यापेक्षां त्यांचे बीजारोपण व संगोपन शिजीमहाराजांच्या. उज्ज्वल चरित्रमहिम्यानेंच मुख्यतः झालें होतें हें म्हणणें विशेष सयुक्तिक दिसतें. औरंगजेबानें संभाजीस पकडून ठार मारून स्वराज्य बहुतेक पायांखालीं तुडविलें असतां त्याच्याशीं मोठ्या आवेशाने व शौर्यानें सतत एकुणतीस वर्षे टक्कर देऊन त्याला ज्या वीरांनीं त्राहित्राहि करावयास लाविलें त्यांस रामदासीपंथाकडून मुळींच साहाय्य झालें नसावें, तर हा अलौकिक आवेश शिवरायाच्या कर्तृत्वामुळें व त्याच्या तालमीत तरबेज झाल्यामुळें त्यांच्या ठायी संचरला होता असेंच म्हटलें पाहिजे. ह्याचें सर्व यश त्या राजमणीसच दिलें पाहिजे. समर्थांनीं लिहिलेल्या एखाद्या-दुसऱ्या चिठोऱ्यास तें देऊन त्यांचा नसता बडेजाव वाढविणें अन्यायाचें होणार आहे.

---

१ संभाजीस समर्थांनी पाठविलेलें पत्र जें जगदीश्वर छापखान्यांत छापून प्रसिद्ध झालेल्या रामदासस्वामींच्या चरित्राच्या एका जुन्या बखरींत व रा. चौबळकृत स्वामींच्या चरित्रांत छापले आहे, त्यांत 'मराठा तेवढा मिळवावा, महाराष्ट्र धर्म वाढवावा' हे शब्द नाहींत. हे महत्त्वाचें शब्द त्यांनी का गाळले असावे बरें? किंवा ते मूळचे त्या पत्रांत नसून पुढें कोणी तरी रामदासभक्तानें घुसडले तर नसावे?

२ शके १६०३ च्या पौष महिन्यांत हें पत्र लिहिलें असून त्याच वर्षाच्या माघ महिन्यांत समर्थांचें देहावसान झालें.

पूर्वीचे सरदार व मुत्सद्दी यांचे साहाय्य

ह्याप्रमाणें आमच्या कांहीं इतिहासपडितांच्या सदरीं नमूद केलेल्या एका विधानाचे अयथार्थत्व किती आहे तें सांगितलें. हें अंमळ विशेष विस्तुत झालें ह्याबद्दल वाचक प्रस्तुत लेखकास क्षमा करितील अशी उमेद आहे. ह्या त्यांच्या विधानामुळें आमच्या चरित्रनायकास बरेंच लघुत्व येण्यासारखें आहे असें वाटलें म्हणून हा एवढा पाल्हाळ करावा लागला. आतां ह्या इतिहासपंडिताचें दुसरें एक असें विधान आहे कीं, ब्राह्मणी राज्याच्या कांहीं विभागांत पुष्कळ ब्राह्मणमुत्सद्दी व मराठेसरदार उदयास येऊन त्यांस आपल्या ठायीं कांहीं कर्तृत्व आहे असें वाटूं लागलें व पुढें महाराजांच्या ठायीं स्वराज्य साध्य करण्यास हवें असणारे सामर्थ्य व शहाणपण आहे असें पाहून ते त्यांस हळूहळू अनुकूल झाले, म्हणून त्यांच्या साहाय्यानें स्वराज्याचा पाया त्यांस घालता आला. ह्या विधानाचें सत्यत्व महाराजांचा एकंदर इतिहास लक्षपूर्वक पाहिला असतां मुळींच दिसून येत नाहीं. त्यांच्या मुत्सद्दीमंडळींत एकही असा कोणी नव्हता कीं, जो स्वत: किंवा ज्याचे पूर्वज यवनी पादशाहतींत मोठे मुत्सद्दी होते. त्याप्रमाणेंच जे सरदार महाराजांच्या लष्करांत उदयास आले त्यांपैकीं कोणीही यवनपादशाहींतला मोठा जहागिरदार नव्हता. नेताजी पालकर, प्रतापराव गुजर, हंबीरराव मोहिते, संताजी घोरपडे, खंडेराव दाभाडे, धनाजी जाधव वगैरे सरदार पूर्वीचे मोठेसे जहागिरदार होते असें म्हणण्यास मुळींच आधार नाहीं. ते सारे लहानसान मोकासदार किंवा देशमुख असावे. मागे राज्यव्यवस्थाप्रकरणांत सांगितल्याप्रमाणें रयतेकडून वसूल गोळा करण्याचे हक्क मोकासदारांकडून व देशमुखांकडून काढून घेतले तेव्हां ते महाराजांच्या लष्करांत नोकरी पतकरून स्वतःच्या कर्तबगारीनें हळूहळू उदयास आले होते. त्यावेळचे बडे सरदार म्हटले म्हणजे फलटणचे निंबाळकर, मुधोळचे घोरपडे, म्हसवडचे माने, वाडीचे सावंत, शृंगारपूरचे सुर्वे, शिर्के व दळवी, जावळीचे मोरे इत्यादी होत. हे सारे विजापूरसरकारचे शेवटपर्यंत अंकित राहिले असून, पहिले तिघे आपल्या धन्याच्या वतीनें महाराजांशीं विरोध करण्यास सर्वदा तयार असत आणि बाकीच्या सरदारांस महाराजांनी जिंकिलें नसते तर ते आपण होऊन महाराजांस येऊन मिळाले असते असें सहसा म्हणवत नाहीं. ह्यावरून पाहतां मराठे जहागिरदारांचें पुढें महाराजांस आयतेंच साहाय्य मिळालें हें म्हणणें अगदीं खरें नव्हे. महाराजांच्या पदरीं जे कोणी सरदार किंवा मुत्सद्दी होते ते सगळे मुशाहिऱ्याच्या आशेनें त्यांची नोकरी पतकरून राहिले होते. शिवाजीमहाराज मोठ्या देशकार्यास उद्युक्त झाले आहेत म्हणून आपण त्यांस साहाय होऊन ह्या उद्योगास हातभार लावावा ह्याच बुद्धीनें केवळ त्यांस येऊन कोणी मिळाले होते असें आज उपलब्ध असलेल्या माहितीवरून तर म्हणता येत नाहीं. पुढें त्यांच्या ठायीं स्वराज्याभिमान जो विकास पावला त्याचें बीजारोपण व वर्धन महाराजांच्या उन्नतिप्रद संघटनानेंच मुख्यतः झालें होतें. यास्तव ह्याबद्दलचें सर्व यश महाराजांस दिलें पाहिजे. त्यास न्यनत्व आणणारें वादविषयक विधान केवळ भ्रामक होय.

स्वराज्यस्थापना महाराष्ट्रापुरतीच नव्हती

ह्या इतिहासवेत्त्यांचें महाराजांस लघुत्व आणणारें आणखी एक असें विधान आहे कीं, स्वराज्यस्थापना महाराष्ट्रापुरतीच करावी असा संकल्प महाराजांचा होता. हेंही विधान अगदीं खरें नव्हे. ज्या महाशय पुरुषाने सर्व भरतभूमी यवनसत्तेपासून मुक्त करून स्वधर्माचें रक्षण करावें व हिंदुपदपातशाहीची स्थापना करावी असा सत् संकल्प केला होता, त्याच्या कर्तृत्वाची मर्यादा अशी संकुचित करणें म्हणजे वस्तुस्थितींचा विपर्यास करणें होय. महाराष्ट्रापुरतेंच स्वराज्य स्थापावें असा त्यांचा उद्देश होता असें म्हणावे तर त्यांनीं कर्नाटकांत अठरा महिने मोहीम करून तिकडे पुष्कळ मुलूख व किल्ले काबीज करून जागोजाग आपलीं ठाणीं बसविलीं व कित्येक प्रांताच्या संरक्षणासाठी नवे किल्लेही बांधले त्यांचें काय प्रयोजन होतें बरे? त्याप्रमाणेंच पुढें १६७९-८० सालांत विजापूरसरकारचा कुलकारभारी मसाऊदखान याच्याशीं तह करून त्यांत आपल्या वडिलांची जहागीर स्वतंत्र करून ती आपल्या ताब्यांत घेतली, त्यांत त्यांचा काय हेतू होता बरें? प्रस्तुत लेखकास तर असें वाटतें कीं, थेट रामेश्वरापर्यंत सर्व मुलूख काबीज करून तेथें आपली सत्ता कायमची बसवावी

असा जो त्यांचा संकल्प कांहीं बखरकारांनी लिहून ठेवला आहे तो खरा असून, त्यांस आणखी थोडें आयुष्य असतें तर हा उद्देश त्यांनीं सिद्धीसही नेला असता. कर्नाटकांतील मोहिमेचा दुसरा उद्देश अर्थात् असा होता कीं, अदिलशहाच्या सत्तेचा संक्षेप त्यांनी जसा पश्चिमेकडून व उत्तरेकडून बराच केला होता तसाच तो दक्षिणेकडूनही करावा व अशा रीतीनें त्या सरकाराची सत्ता संपुष्टांत आणून योग्य संधी आली म्हणजे ती अजीबात उडवून द्यावी ह्या मोहिमेंत त्यांचा आणखी असा रोंख होता कीं, कुतुबशहाच्या सत्तेसही दक्षिणेकडून व पूर्वेकडून शह द्यावा. महाराजांनी कर्नाटकांतून परत येतांना तिकडे ठेवलेल्या आपल्या सरदारांस मद्रासकडील प्रांत काबीज करून पूर्व समुद्रापर्यंत आपली सत्ता बसविण्याचा क्रम चालू ठेवावयास सांगितलें होतें. ह्याप्रमाणें कर्नाटकांतील मोहिमेचा दुहेरी तिहेरी हेतू होता ह्या दोन्ही शाह्या उत्तरेप्रमाणे दक्षिणेकडूनही कोरीत यावें असा त्यांचा मानस होता हें स्पष्ट दिसतें आता पश्चिम किनारा सबंध आपल्या ताब्यांत यावा म्हणून तर आरमार तयार करून तें उत्तरोत्तर प्रबळ करण्याचा त्यांचा क्रम सुरू होता. शिद्दीचा पश्चिमकिनाऱ्यावरील काटा समूळ उपटून टाकण्यासाठीं त्यांचा जो एकसारखा प्रयत्न चालू होता त्यातले इंगित मुख्यतः हेंच होतें. गुजराथप्रांतांत दमन व सुरत ह्या शहरांपर्यंत त्यांनी आपली ठाणीं बसविण्यास आरंभ केला होता. गुजराथेत मोहीम केल्यावाचून स. १६७० पासून स. १६८० पर्यंत एकही वर्ष गेलें नाहीं असें म्हटलें असतां चालेल. मोगलांचा अंमल तिकडे असल्यामुळें तो प्रांत एकदम हस्तगत करणें अंमळ जोखमीचें होतें हें ते जाणून असत. आपल्या शक्तीपलीकडची अशी कोणतीही गोष्ट सहसा करूं नये असें त्यांचें धोरण असल्यामुळें औरंगाबादचें मोगलांचे प्रबळ ठाणेंही त्यांनी तसेंच राहूं दिलें होतें. तेथपर्यंत लुटालूट करीत जावें, परंतु त्यावर हल्ला करू नये असा त्याचा क्रम असे. आतां मोगलबादशाहीवर महाराजांचा डोळा मुळींच नव्हता असेंही म्हणतां येणार नाहीं. कारण असें पाहा कीं, जयसिंगराजा दक्षिणेंत प्रबळ सैन्यानिशीं आला असतां त्याच्याशीं शास्ताखानासारखे कपटाचें आचरण न करता त्याला सर्वस्वी वश करून घेण्याचा जो उपाय महाराजांनी योजला त्याचा हेतू काय असावा बरें? पुरंदरास दिलेरखानानें वेढा दिला होता त्यांत म्हणजे त्याची सरशी झाली होती असें नाहीं. त्या एका किल्ल्याखाली मोगलांची बरीच रग जिरली होती. त्याप्रमाणेंच सिंहगड घेण्याचा जयसिंगानें त्या मोहिमेंत केलेला प्रयत्न व्यर्थ गेला होता. तेव्हां मोगलांपुढें आता आपला निभाव लागणें नाहीं असें त्यांस वाटण्याजोगा कांहींच प्रकार घडला नसून जयसिंगराजाच्या गोटांत त्यांनी आपण जातीनें जाऊन व त्या गर्विष्ठ दिलेरखानाशींही नम्रतेनें वागून तहाचे बोलणें लावले व पुढें जयसिंगाच्या मसलतीनें दिल्लीसही जावयास ते तयार झाले, याचें कारण काय असावें बरे? औरंगजेबासारखा महाकपटी, विश्वासघातकी व कट्टा शत्रू आपल्या नाशास सर्वदा टपलेला आहे हें महाराजांस पक्के ठाऊक असतां त्याच्या तावडींत सहज जाऊन मिळण्याचे धाडस जें त्यांनी केलें त्यांत त्यांचा काय हेतू होता बरें? प्रस्तुत लेखकास तर यात त्यांचें फार मोठे धोरण होतें असें वाटतें. तें अर्थात् असें कीं, जयसिंगासारख्या बलाढ्य रजपूतराजास वश करून घ्यावें, मोगलदरबारांतील इतर रजपूतसरदारांच्या ओळखी करून त्यांस जयसिंगाच्या द्वारें आपल्या पुढील कार्यास अनुकूल करून घ्यावें, उत्तरेकडील मुलखाची थोडीबहुत माहिती मिळवावी व तूर्त आदिलशहा व कुतुबशहा यांजवर मोगलांच्या स्नेहानें आपला शह पुरा बसवावा. हे सगळे उद्देश त्यांनीं बरेच सिद्धीस नेले होते हें त्यांच्या चरित्रावरून उघड होतच आहे. दक्षिणेंतील मराठे जहागिरदार जसे यवनांचें पुरे ताबेदार होऊन बसले असून, सर्व एक होऊन स्वतंत्र सत्ता स्थापित करण्याचें त्यांच्या मनांतही कधीं आलें नव्हतें, तद्वतच हे रजपूत राजे मोगलबादशहाचे मांडलिक होऊन जो तो आपल्यापुरते पाहात होता. सर्व एक होऊन मोगलसत्तेशीं विरोध करण्याची बुद्धी त्यांस कधींही सुचली नव्हती. तरी आपण जो दक्षिणेत क्रम आरंभिला त्याचीच नक्कल उत्तरेकडील ह्या रजपूतसरदारांनीं आपल्या साहाय्यानें करावी असा महाराजांचा मानस असावा यांत कांहीं शंका नाहीं. एरवीं त्यांनीं मरणसमयीं जे खेदोद्गार काढल्याचे[१] बखरकार लिहितात ते त्यांनी काढले

१ स्वातंत्र्यप्राप्तर्थ शिवाजीमहाराजांनी केलेल्या दीर्घोद्योगाने स्फूर्ती पावलेल्या रजपूतराजांपैकीं बुंदेलखंडाचा राजा छत्रसाल हा एक होता. मोगलबादशहाशी विरोध करण्याच्या हेतूने हा राजा महाराजांकडे आला असता त्यास त्यांनी आपल्या राज्यात जाऊन स्वातंत्र्याचा झेंडा उभारून यवनांशी युद्ध करण्यास उद्युक्त व्हावयास सांगितले हे मागे लिहिलेच आहे.

नसते. त्याप्रमाणेंच शहाजीराजे आपल्या ह्या महाप्रतापी सुपुत्राची भेट घेऊन कर्नाटकांत गेले तेव्हां त्यांनी व्यंकोजीराजांस बोधाचे दोन शब्द सांगतांना महाराजांच्या कर्तृत्वासंबंधाचे जे प्रशंसापर उद्‌गार काढले होते, ते केवळ अत्युक्तिरूप होते असें म्हणवत नाहीं. ह्या सर्व गोष्टी लक्षांत आणल्या म्हणजे त्यांचा संकल्प केवढा मोठा होता हें सहज दिसून येतें. हा महासंकल्प पूर्णपणें सिद्धीस नेण्यास दीर्घायुष्याची त्यांस अनुकूलता झाली नाहीं म्हणून त्यांचा व्याप संकुचित होता असें मानून त्यांस लघुत्व आणूं पाहणें सर्वथा युक्त नव्हे.

येथवर आरंभी संकल्प केल्याप्रमाणें दोन मोठ्या प्रकरणांचा विचार झाला. त्यावरून वाचकांच्या लक्षांत आलेंच असेल कीं, आमच्या चरित्रनायकास परके लोक जे निरनिराळे दोष लावतात ते निराधार आहेत व आमच्या देशांतील इतिहासज्ञ त्यांच्या वास्तविक योग्यतेंस कमीपणा आणणारीं जी कित्येक स्थूलमानानें विधानें करतात तीही अप्रयोजक आहेत.

आता त्यांच्या ठायींच्या कांहीं उज्ज्वल गुणांचें येथें निरूपण करणें इष्ट होय. वरील विवेचनांत त्यांच्या अंगच्या कांहीं सद्गुणांचें दिग्दर्शन झालेंच आहे. तरी त्यांच्या आणखी काहीं ठळकठळक गुणांचे थोडक्यांत विवेचन करूं. हें गुणपरिगणन करावयाचें म्हटलें म्हणजे त्यांत महाराजांच्या चार प्रकारच्या वर्तनाचा विचार प्रसक्त होतो. ते प्रकार अर्थात् हे होत १) राजकीय वर्तन, २) व्यावहारिक वर्तन, ३) कौटुंबिक वर्तन व ४) धर्मसंबंधी वर्तन.

लोकसंग्रह व औदार्य

पहिल्याने राजकीय वर्तनाविषयीं विचार करूं. प्रबल यवनांच्या सत्तेशीं विरोध करून स्वराज्यस्थापनेच्या उद्योगांत सुयश संपादन करण्यास आवश्यक असे जे त्यांच्या ठायींचे शौर्य, वीर्य, पराक्रम, युक्तिमत्ता, साहस इत्यादी उत्कृष्ट गुण त्यांचें येथें उज्ज्वलन करूं पाहणें म्हणजे सूर्यास काडवात दाखविणें होय. ह्या अप्रतिम गुणांचा प्रत्यय त्यांच्या चरित्रांत जागोजाग इतका मिळणारा आहे कीं, त्यांविषयीं येथें स्वतंत्र रीतीनें विवेचन करण्याची आवश्यकता बिलकूल नाहीं.[१] स्वराज्यसाधनरूप कार्यांत पूर्ण यशस्वी व्हावयास ह्या वरील गुणांहून आणखी कांहीं गुणांची अनुकूलता लागते. हे गुण महाराजांच्या अंगीं कसे काय होते तें पाहूं पहिला गुण असा कीं, असला सकृद्दर्शनी असंभवी वाटणारा उद्योग यशोलाभास आणूं पाहणारास लोकांस अनुकूल करून घेण्याची कला चांगलीच साध्य असावी लागते. ह्या कलेंत महाराज इतके कुशल होते कीं, तशी कला जगाच्या इतिहासांत आजपर्यंत कोणालाही साधली नसेल. महाराजांस मधुर व मोहक रसवंती बाल वयापासून अनुकूल होती म्हणूनच त्यास मावळांतले बहुतेक देशमुख व इतर लोक अगदीं आरंभापासून आपल्या कार्यास साहाय्यकारी करून घेतां आले. कोणी कसाही पुरुष त्यांच्यापाशीं एक वेळ आला म्हणजे त्यांच्या ह्या मोहनींत सांपडून त्यांच्याविषयी त्याच्या ठायीं अत्यंत आदरबुद्धी व स्नेहभाव हीं उत्पन्न होत असत आणि त्यांनी योजलेल्या महत्कार्याविषयीं त्याच्या अंगांत अभिमान संचरून तो त्यांस कायावाचामनें करून साहाय्य करण्यास उद्युक्त होत असे. ही अशी अलौकिक जादू त्यांस साधली असल्यामुळें विश्वासू व स्वामिनिष्ठ सेवकांची त्यांस कधींही उणीव पडली नाहीं. असा लोकसंग्रह करणाराच्या अंगीं लोकप्रीती संपादण्यास आणखी एक गुण हवा असतो. तो अर्थात् औदार्यरूप होय. पदरच्या लोकांशी उदारपणानें वागण्यात तर महाराजांची बरोबरी कोणाही इतिहासप्रसिद्ध नृपतीच्यानें होणार नाहीं. आपल्या लोकांनी चागली कामगिरी केली असतां त्यांस त्या कामगिरीच्या महत्त्वाच्या मानानें इनामें व शाबासकी देण्यास ते सर्वदा तयार असत. त्यांचीं वेतने वेळच्या वेळीं देऊन त्यांस संसारातील अनेक कठीण

---

१ महाराजांचा कट्टा शत्रू जो औरंगजेब त्याचे उद्‌गार येथें नमूद केल्यानें ह्या गुणांची साक्ष उत्तम पटेल. ते उद्‌गार हे होत : ''तो महारणशूर सेनानी होता. हिंदुस्थानातील प्राचीन राज्यांचा नाश करण्याचा प्रयत्न मीं एकसारखा चालविला असतां नूतन राज्य पराक्रमादी गुण त्याच्याहून अन्य कोणाच्याही ठायीं नव्हतें. माझ्या प्रबळ फौजा त्याच्याशीं लढण्यांत सतत एकूणीस वर्षे गुंतल्या होत्या तरी त्याची सत्ता एकसारखी वृद्धिंगत होत होती.'' महाराजांस 'पहाडका चुवा' म्हणणारांचा हा अभिप्राय आहे.

प्रसंगीं साहाय्य करण्यात त्यांचा हात सर्वदा सढळ असे. युद्धादी प्रसंगांत गतप्राण झाला असतां त्याच्या कुटुंबाचा चरितार्थ त्याच्या पश्चात नीट चालेल असें करण्यास तें नेहमीं तत्पर असत. त्याचा एखादा मुलगा किंवा भाऊ सरकारचाकरी करण्यास लायक असला तर त्याच्या योग्यतेप्रमाणें त्यास काम देण्याची ते व्यवस्था करीत. ह्यामुळे पदरच्या लोकांची नेहमीं अशी खात्री असे कीं, ह्या प्रभूच्या कामगिरीत प्रसंगीं स्वप्राणांची आहुती पडली तरी हा आपल्या कुटुंबांचें आपल्यामागें अवश्य चालवील.

गुणज्ञता व निःपक्षपातबुद्धी

लोकसंग्रह करणारा प्रभू खरा गुणज्ञ व गुणांची बूज करणारा असला पाहिजे. महाराजांच्या ठायीं ही गुणग्राहकता अलौकिक होती. प्रत्येकाच्या अंगच्या वास्तविक गुणांची पारख करून त्यास यथोचित कामगिरी सांगावी व त्याच्या अंगच्या वर्धमान योग्यतेच्या मानानें त्याची बढती केवळ निःपक्षपातबुद्धीनें करावी असा त्यांचा अव्याहत क्रम असे. हा आपला मित्र किंवा हा आपला सुहृत्संबंधी आहे, याला मोठ्या मानाची किंवा मोठ्या किफायतीची कामगिरी सांगावी, असा पक्षपाताचा कांहींच प्रकार त्यांच्या हातून कदापि घडत नसे. खऱ्या लायक माणसांच्या हक्काचा विचार करून तंतोतंत न्यायानें त्यांची योग्यता वाढवावी असा त्याचा नियम असे. ह्यामुळें ज्याला त्याला अशी पूर्ण खात्री असे कीं, आपल्या गुणांचा व कर्तृत्वाचा योग्य विचार करून आपली बढती करणारा असा हा खरा गुणज्ञ प्रभू आहे. दुसरा एक उत्कृष्ट गुण ह्या लोकनायकांच्या अंगीं असा वसत असे कीं, आपल्या पदरच्या लोकांच्या ठायीं विश्वासूपणा उत्पन्न करण्याची हातोटी त्यांस उत्तम साधलेली असे. कोणालाही एखादे कितीही महत्त्वाचें काम सोपविल्यावर तें बजावण्यासबंधानें त्याच्यावर ते पूर्ण भरंवसा टाकीत असत. प्रथमतः असा भरवसा ठेवण्यास तो मनुष्य लायक आहे किंवा कसें हें नीट पाहावयाचें आणि मग एकदा त्याच्यावर भरंवसा टाकला म्हणजे त्याच्याविषयीं सहसा संशय घ्यावयाचा नाहीं. त्याच्या संबंधानें कोणी द्वेषी किंवा मत्सरी मनुष्यानें महाराजांचें मन कलुषित करीन म्हटले तर त्याची त्यांच्या कानास लागण्याची प्राज्ञा नसे. अशा मनुष्यास आपल्या वाऱ्यासही ते घेत नसत. कोणाच्या लौकिक वर्तनाविषयी अंमळ संशय आला असतां त्याची माहिती ते आपल्या गुप्त हेरांच्याद्वारें पहिल्यानें मिळवीत आणि मग त्यासंबंधाचा वास्तविक पुरावा काय आहे तो राजरोस रीतीनें पाहून त्याची योग्य शहानिशा करीत. ह्या त्यांच्या वृत्तीस्तव त्यांच्या पदरच्या लहानमोठ्या सर्व कामदारांस असा पक्का भरंवसा असे कीं, आपण आपली कामें नेकीनें व दक्षतेनें केली असतां आपणांस आपल्या हुद्यावरून दूर होण्याची भीती ह्या प्रभूकडून कदापि नाहीं. हा असा प्रत्येकावर पूर्ण भरंवसा टाकल्यामुळें व त्याला आपल्या ह्याविषयींची निश्चित शाश्वती वाटत असल्यामुळें लोकांच्या ठायीं इमान, स्वामिनिष्ठा, स्वकार्यदक्षता इत्यादी वृत्तींचा विकास होत गेला.

निष्कपटीपणा व मित्रभाव

लोकसंग्रह करणाऱ्या लोकनायकाच्या हातून पदरच्या लोकांशीं निष्कपटीपणाचें व मित्रत्वाचें वर्तन होणें इष्ट असतें. ह्यासंबंधानें तर महाराजांचा हातखंडा असे. ज्यांवर एकवेळ इतबार टाकला त्यांच्याशीं ते कदापि कपटानें वागत नसत. आपण योजलेले बेत व तत्सिद्ध्यर्थ करावयाचे उपाय ह्याविषयीचा खल ते आपल्या विश्वासू कामदारांशी केवळ प्रांजल बुद्धीनें करीत असत. त्यांची काय मसलत असे ती ते आदरपूर्वक ऐकून घेत असत. आत एक व बाहेर एक असें त्यांचें आपल्या लोकांशीं कधींही वर्तन नसे. तसेच अधिकाराच्या जोरावर कोणाशीं दिमाखाचें किंवा गर्वाचें वर्तन ते कधींही करीत नसत. आपल्या हाताखालचे लोक आपल्या मित्रांसमान आहेत असें समजून त्यांच्याशीं ते खऱ्या स्नेहभावानें वर्तत असत. कोणाचा उपमर्द किंवा मानहानी ते सहसा करीत नसत. ह्याप्रमाणें स्वकीय जनांशीं त्यांचें सदोदित आचरण असल्यामुळें ज्याला त्याला वाटे कीं, आपला स्वाभिमान व इभ्रत कायम राखून ह्या प्रभूची सेवा आपणांस करितां येईल आणि त्यांच्या स्नेहयुक्त वर्तनामुळें प्रत्येकाच्या ठायीं त्यांजविषयीं प्रेम व अभिमान ह्या वृत्ती उत्पन्न होत असत.

जरब

महाराज ह्याप्रमाणें आपल्या अधिकाऱ्यांशीं मित्रभावानें व आदरानें वागत असत, तरी त्यांजवर जरबही पराकाष्ठेची असे. महाराज आपला इतका मानमरातब राखतात व आपणाशी स्नेहभावानें वागतात एवढ्यावर जाऊन कोणी कारभाऱ्यानें शिरजोर होऊं पाहिलें किंवा आपल्या कामांत कुचराई केली तर त्यास महाराजांकडून कदापि गय होत नसे. तो केवढाही मोठा अंमलदार असला तरी त्यास त्याबद्दल योग्य शासन करण्यास ते कधींही चुकत नसत. ह्यामुळें त्यांचा दरारा सर्वांवर सारखा असे आणि त्यांस असें वाटे कीं, ह्या प्रभूची सेवा इमानानें व हुशारीनें केली तरच ह्याची कृपा आपणांवर कायम राहावयाची. हा असा त्यांचा करडा अंमल असल्याकारणानें त्यांस इतक्या लोकांवर पूर्ण ताबा चालवितां येऊन त्यांच्याकडून हवी ती कामगिरी करवून घेतां आली.

उद्यमशीलता

हा असा दरारा राहाण्यास आणखी एका गोष्टीची महाराजांस पूर्ण अनुकूलता असे. ती गोष्ट ही कीं, त्यास स्वतः अंग मोडून मेहनत करण्याची लहानपणापासून सवय असून राज्यप्राप्तीस व राज्यव्यवस्थेस लागणाऱ्या हरएक गुणाचा व कर्तबगारीचा विकास त्यांच्या ठायीं उत्तम प्रकारें झाला होता. रणभूमीवर शत्रूशीं लढतांना आपल्या सैनिकांस शत्रूच्या तोंडीं देऊन स्वत: कोठें तरी सुरक्षित जागीं प्रेक्षकाप्रमाणें उभे राहण्याचा जसा कित्येक सेनापतींचा किंवा राजांचा क्रम असतो, तसा प्रकार महाराजांकडून कदापि होत नसे. हातीं समशेर घेऊन रणकंदनांत ते सर्वांच्यापुढें असत व आपल्या अंगचें अप्रतिम शौर्य, वीर्य व युद्धकौशल्य हीं प्रगट करीत. तेणेंकरून त्यांच्या पदरच्या कोणाही वीरास महाराजांपेक्षां आपल्या अंगीं हे गुण अधिक आहेत अशी घमंडी मिरविण्यास बिलकूल अवकाश नसे. त्याप्रमाणेंच आपल्या सेनापतींस मुलुखगिरीवर किंवा एखाद्या स्वारीवर पाठवून आपण स्वस्थ मजा मारीत असावें असा क्रम बहुतेक नृपतींचा असतो. त्यामुळें विजयशाली सेनापतीचें प्रस्थ त्याच्या राज्यात पराकाष्ठेचें माजतें व अशा सेनापतींच्या मुठींत असले राजे बहुतकरून असतात; परंतु महाराजांच्या हातून असा प्रकार आमरण झाला नाहीं. ते स्वतः कोणत्या ना कोणत्या मोहिमेंत सर्वकाळ गुंतलेले असत. आळशासारखें स्वस्थ बसून राहण्यास त्याना मुळीं सवडच नव्हती. अशा उद्योगसातत्यामुळें व अविश्रांत परिश्रमामुळें त्यांनीं आपणांवर कोणाही सेनापतीची किंवा सरदाराची मात्रा चालूं दिली नाहीं. आपण जे निरनिराळ्या मोहिमा करून जे पराक्रम गाजवितों त्यापेक्षा कांकणभर जास्त पराक्रम महाराजांच्या हातून घडतात असें पाहून त्यास स्वतःचा दिमाख किंवा तोरा मिरविण्यास मुळींच जागा नसे. महाराजांपुढे आपण केवळ हीनपराक्रम आहों असें त्याना सर्वदा भासे. असाच प्रकार राज्य व्यवस्थेसंबंधानेंही असे. किल्ल्यांचा बंदोबस्त, जमीनमहसुलाची सुव्यवस्था, बिकट कारस्थानें रचण्याच्या कामीं लागणारी युक्तिमत्ता इत्यादिकांसंबंधानें त्यांच्या पदरच्या कोणाही मुत्सद्द्यांस त्यांजवर शेखी मिरविण्यास मुळींच सवड नसे. हा असा अष्टपैलूपणा त्यांच्या अंगी पूर्णपणे वागत असल्यामुळें प्रत्येक कामदार त्यांच्यापुढें अगदीं लीन व नम्र असे व त्यांचा दरारा प्रत्येकास अतिविलक्षण वाटे. ह्याच सुप्रसिद्ध गुणास्तव त्यांस रामदासस्वामींनी आपल्या पत्रात सर्वज्ञ हें विशेषण दिलें आहे.

लोकवशीकरण

तेव्हां एकंदरीत काय कीं, लोक वश करून घेऊन त्यांच्याकडून हवी ती कामगिरी इमानेंइतबारें करवून घेण्याची कला जी महाराजांस इतकी अप्रतिम साधली होती तिची मीमांसा सदरी निर्दिष्ट केलेल्या गुणसमुच्चयाचा विकास त्यांच्या ठायीं उत्तम झाला होता हें लक्षांत आणल्यानें होणारी आहे. ही लोकवशीकरणाची मोहिनी किंवा जादू त्यांस उत्तम साधली असल्यामुळें त्यांच्या पदरच्या सर्व कामदारांत इमान, स्वामिनिष्ठा व कर्तव्यदक्षता हे गुण उत्पन्न झाले असून त्यांची परस्परांत नेहमीं चढाओढ लागून राहिलेली असे. महाराजांकडून शाबासकी मिळविण्यांतच त्यांस

कृतकृत्यता वाटे. स्वामिकार्यी प्राणाहुती देण्याचा प्रसंग आला तरी त्याचें त्यांस कांहींच वाटत नसे. अशा अलौकिक पुरुषाची सेवा कायावाचामनेंकरून करण्यातच आपलें जीवितसाफल्य आहे असा त्यांच्या बुद्धीचा पूर्ण निर्धार झाला होता. पुढेंपुढें तर महाराज कोणत्या पुण्यकार्यात गुंतले होते हें त्यांच्या लक्षांत आल्यामुळे त्यांच्याशी बेइमानाचें किंवा दग्याचें वर्तन केलें असतां महत्पाप होईल असें त्यांस वाटूं लागलें. ही अशी त्यांच्या ठायीं महाराजांविषयी पूर्ण भक्ती व देशकार्याची खरी महती पूर्णपणें बिंबल्याकारणानें त्यांच्या हातून फंदफितुरी किंवा दगाफटका असा बिलकूल झाला नाहीं. महाराज आग्र्यास जाऊन तेथें अटकेंत पडले व आठनऊ महिने पुनः स्वराज्यांत आले नाहींत त्या वेळीं किंवा कर्नाटकांत मोहीम करून तिकडेच अठरा महिने ते गुंतून राहिले, त्या वेळीं त्यांच्या पदरच्या कोणाही मुत्सद्द्यानें किंवा सरदारानें त्यांच्याशीं दग्याचे वर्तन करण्याचें मनांतही आणले नाहीं. हा त्या धामधुमीच्या काळीं मोठाच चमत्कार समजला पाहिजे, परंतु महाराजांच्या ठायीं लोकवशीकरणास लागणाऱ्या लोकोत्तर गुणांचा विकास कसा झाला होता हे लक्षांत आणले म्हणजे हे एवढे गूढ कोणासही वाटणार नाही.

कल्पकता

महाराजाच्या ठायींचा दुसरा मोठा ठळक गुण म्हटला म्हणजे अप्रतिम कल्पकता हा होय. हा गुण त्यांच्या अंगी इतका परिपूर्ण वसत नसता तर स्वराज्यसाधनाची बुद्धी त्यांस कदापि सुचली नसती. कारण असे पाहा कीं, यवनी अंमलांत दहाहजारी, वीसहजारी असे बलाढ्य मराठे सरदार नांदत असतां व ते मोठमोठ्या जहागिरी वहिवाटीत असतां, त्यांच्या मनांत ही स्वराज्यसाधनाची कल्पना कां उत्पन्न झाली नाहीं बरें? त्या सगळ्यांच्याच ठायीं स्वातंत्र्यप्रीती, स्वधर्माभिमान व यवनसत्ताद्वेष ह्या वृत्ती वसत नव्हत्या असें कोण म्हणेल? त्याप्रमाणेंच शौर्यपराक्रमादी गुणांचा त्यांच्या ठायीं अभाव होता असें म्हणतां येईल काय? तर ह्या सरदारांस ही बुद्धी कां सुचली नाहीं बरें? ह्या प्रश्नाचें उत्तर एवढेच आहे कीं, त्याच्या ठायीं कल्पकता हा गुण फारसा वसत नव्हता. स्वराज्यसाधना कोणत्या उपायांनीं करता येईल व त्यापैकी कांहीं उपाय प्रसंगी फसले असता दुसरे कोणते उपाय योजता येतील याचा योग्य विचार करून तदनुरूप वागण्यास लागणारी कल्पकता महाराजांच्या अंगी अल्पवयापासूनच विकसित झाली होती. ही कल्पकता मुख्यत्वेंकरून बुद्धिमत्तेवर अवलंबून असते. महाराजांची बुद्धी अतितीव्र असून त्यांस सर्व प्रकारची माहिती मिळविण्याचा हव्यास अमर्याद होता. ह्या चौकसपणामुळें त्यांचें ज्ञानभांडार सर्वदा परिपूर्ण असे. दुसऱ्यांच्या अनुभवाचें उत्तम साहाय्य घेऊन त्यांत आपल्या प्रत्यक्ष अनुभवांची भर घालून हें सर्व ज्ञान आपल्या दिलदप्तरांत कायमचें नमूद करून ठेवण्यांत त्यांची बरोबरी कोणाच्यानेंही होणार नाहीं. हा फक्त स्मृतीचा गुण झाला परंतु नुसती स्मरणशक्ती प्रबल असल्यानें कल्पकता वाढत नसते. तिला विवेकशक्तीचें उत्तम साहाय्य हवें असतें. ही विवेकशक्ती महाराजांच्या ठायीं अतिप्रखर होती हें निर्विवाद आहे. ह्या स्मरणशक्तीच्या व विवेकशक्तीच्या अप्रतिम बलाने प्राप्त अनुभवाचा व ज्ञानाचा उद्दिष्ट कार्याच्या सिद्धीकडे विनियोग करता येऊन अलौकिक युक्तिमत्ता त्यांच्या ठायीं विकास पावली. एक युक्ती फसली असतां दुसरी युक्ती योजावी, तीही फसली असतां तिसरी योजावी, हताश होऊन कदापि बसू नये, असा त्यांचा नेहमीं निर्धार असे. हा निर्धार सर्वांसच साधत नसतो. ज्याच्या ठायीं कल्पकतेच्या बलावर युक्तिप्रयुक्तींचा जसा काय अखंड झरा वाहत असतो त्यालाच तो साधतो. महाराजांनी हा अप्रतिम गुण अगदीं आरंभापासून प्रगट केल्यामुळेंच त्यांच्यावर त्यांच्याहून जाणत्या व अनुभवी लोकांची श्रद्धा ते अल्पवयी असतांही इतकी निःसीम बसली कीं, हा वयानें लहान परंतु बुद्धीनें थोर आहे, अशी खात्री झाल्यामुळें त्यांच्या सकृद्दर्शनी असंभवी दिसणाऱ्या बेतास त्यांच्या आसपासचे लोक सर्वस्वीं अनुकूल झाले. त्यांची कल्पना उत्तम असून ती साध्य करण्यास त्यांनीं सुचविलेल्या युक्त्या यथायोग्य आहेत अशी त्या लोकांची पूर्ण खात्री झाली म्हणून ते त्यांच्याबरोबर आपले जीव धोक्यांत घालावयास सिद्ध झाले, एरवीं होते ना. ह्या कल्पकतेच्या बलावर त्यांनी पुढें आपणांवरील मोठमोठीं अरिष्टें कशी निवारण केली हें त्यांच्या चरित्रांत पदोपदी आढळून येतें, किंबहुना त्यांच्या एकंदर कर्तृत्वाचे मूळ ह्या गुणांतच मुख्यतः आहे असें म्हणण्यास प्रत्यवाय नाहीं.

ह्या गुणाच्या साहाय्यानें त्यांनी आपल्या पदरच्या लोकांच्या ठायीं आपणांविषयीं पुरा भरंवसा उत्पन्न केला होता. म्हणूनच ते स्वराज्यसिद्धीच्या कार्मी आपल्या प्राणांचे स्वाहास्वधाकार करण्यास प्रवृत्त झाले. कोणता कसाही बिकट प्रसंग प्राप्त झाला तरी त्यांतून पार पडून स्वकार्यसिद्धी करण्यास हवी असणारी युक्तिमत्ता ह्या लोकनायकाच्या ठायीं परिपूर्ण आहे अशी खात्री त्यांच्या पदरच्या एकूणएक लोकांची होऊन ते पाहिजे तें धाडसाचें कृत्य करण्यास सर्वदा उद्युक्त असत.

तेजस्विता व स्वाभिमान

महाराजांच्या ठायींचा तिसरा वर्णनीय गुण म्हटला म्हणजे तेजस्विता हा होय. खरे तेजस्वी पुरुष जे असतात त्यांस दुसऱ्याची ताबेदारी बिलकूल सहन होत नाहीं. ते पुरे स्वाभिमानी असल्यामुळें स्वाभिमानास प्रतिकूल अशी जी परतंत्रता ती त्यांस अगदीं असह्य होते. स्वतःच्या पायांवर उभे राहून काय ओलीकोरडी भाकर मिळेल तींत संतोष मानून राहण्यातच त्यांस विशेष सुख वाटतें. महाराजांच्या अंगी हा लोकोत्तर गुण वसत असल्याकारणानें स्वपित्याची परावलंबी स्थिती त्यांस मुळींच चांगली वाटली नाहीं. ती झुगारून देण्यांत जीवितहानी होण्याचा संभव आहे हें ते पूर्णपणें जाणून होते; परंतु अशी श्ववृत्ती स्वीकारून यवनांनी तोंडावर टाकलेला तुकडा खात बसण्यापेक्षां जीवितसंशय पतकरला, असा त्यांच्या मनाचा धडा होऊन गेला होता. आपण अंगीकारलेल्या दुर्घट उद्योगांत हटकून यश येईल याची त्यांस आरंभीं भ्रांतिच होती असें म्हणण्यास कांहीं चिंता नाहीं; परंतु परतंत्रतामूलक ऐहिक धनसंपदा व सौख्य ही त्यांस अत्यंत तुच्छ वाटून त्यांनी ह्या उद्योगास मोठ्या धैर्यानें व अढळ निश्चयानें हात घातला. प्राप्त स्थितींत सुख मानून राहावें असे म्हणणाऱ्या दादाजी कोंडदेवासारख्या पुरुषांनी त्यांस त्या उद्योगापासून परावृत्त करण्याविषयीं प्रयत्न केला, परंतु त्यांचा निश्चय अचल राहिला. पुढें प्रत्यक्ष त्यांच्यावर नाही तरी त्यांच्या प्रिय पित्यावर प्राणसंकट आलें असतां मुळींच न डगमगतां त्यांतून त्याची मुक्तता करण्याची त्यांनीं अजब युक्ती योजिली? परंतु स्वसंकल्प कदापि सोडला नाहीं. यांत त्यांच्या ठायींचा तेजस्वीपणा चांगलाच व्यक्त होतो. ह्या गुणाच्या अनुषंगाने असणारा जो स्वाभिमान तो तर त्यांच्या अंगांत ओतप्रोत भरला होता. मोगलदरबारांत औरंगजेबासारख्या सार्वभौम बादशहाच्या पूर्ण तावडीत तें सापडले असतांही तेथें झालेली मानखंडना त्यांस बिलकूल सहन झाली नाहीं हें वाचकांनी मागें वाचलेच आहे. खरे वीर पुरुष जे असतात त्यांचा हा महाभूषणप्रद गुण होय. ह्या गुणाच्या अभावीं पुरुष केवळ निर्माल्यवत् होतो. कोणीं आपला उपमर्द करूं नये किंवा कोणीं आपणांस दोष लावूं नये किंवा तुच्छ लेखूं नये, ह्याविषयीं महाराज अहर्निश जपत असत. म्हणूनच त्यांच्या हातून असे अलौकिक पराक्रम झाले. महातेजस्वी पुरुष राष्ट्राच्या अभ्युदयास कसे कारणीभूत होतात हें महाराजांच्या चरित्रावरून उत्तम प्रकारें प्रत्ययास येतें. वीर्य, शौर्य, साहस आदिकरून उज्वल गुण व सदाचार, निर्व्यसनता इत्यादी नैतिक गुण ह्यांचें मूळ ह्या तेजस्वितारूप गुणांत आहे. कारण तेजस्वी पुरुष आपली तेजोहानी जेणेंकरून होण्यासारखी असते तें सर्व हरप्रयत्नानें टाळून वास्तविक तेज जेणेंकरून वृद्धिंगत होईल तें करण्यास सर्वदा तत्पर असतो. इतकेंच नव्हे तर, आपल्या ठायींच्या तेजाच्या प्रभावानें अन्य जन सुखी व समृद्ध करण्यास सर्वदा झटल्यानेंच आपल्या जीविताचें साफल्य होईल असें त्यास वाटत असतें. ही कसोटी लावून पाहतां तीस महाराज किती उत्तम प्रकारें उतरतात हें मार्मिक वाचकांस सांगावयास नकोच. सारांश काय कीं, महाराजांच्या ठायींच्या ह्या तेजस्वितेमुळेंच मुख्यतः आमच्या देशास कांहीं काळ स्वातंत्र्य प्राप्त होऊन महाराष्ट्रीयांच्या ठायीं कांहीं विशेष ओज आहे असें सर्व जगास विदित झालें.

स्वप्रजावात्सल्य

स्वप्रजावात्सल्य हा महाराजांच्या ठायींचा आणखी एक स्तुत्यर्ह गुण होय. ह्या गुणाचें दिग्दर्शन राज्यव्यवस्थाप्रकरणांत चांगलेंच झालें आहे, त्याची येथें पुनरुक्ती नको. शेतकरी, व्यापारी व उदमी यांचा उत्कर्ष व्हावा, त्यांस कोणाकडूनही

उपद्रव होऊं नये व त्यांस योग्य न्याय मिळावा ह्यासाठीं ते आपल्या राज्याची सुव्यवस्था लावण्यास सर्वदा झटत असत. हा सर्व कारभार बिनबोभाट चालावा व कोणत्याही प्रकारची बेबंदाई होऊं नये म्हणून त्यांनी पूर्वी कोणाही नृपतीस न सुचलेली अशी अष्टप्रधानमंडळाची कल्पना काढली. राज्यांतल्या निरनिराळ्या कारभाराची जबाबदारी निरनिराळ्या प्रधानांवर टाकून त्याच्यावर एकंदर प्रधानमंडळाची व स्वतःची जरब ठेवल्याने रयतेस सुख लाभेल असें त्यांच्या लक्षांत आलें. म्हणूनच त्यांनी आपल्या अधिकाराची अशी समसमान वाटणी केली व आपल्या पदरच्या लायक पुरुषांची इभ्रत व दबदबा ही चोहोंकडे स्थापित केली. प्रजेस अन्यायाने त्रास देणारा अधिकारी कितीही मोठा असला तरी त्यास शासन करावयास ते कदापि चुकत नसत. त्यांच्या हातून कसा काय कारभार होतो, हें पाहण्यासाठी मुख्य प्रधानांची तर त्यांवर देखरेख असे. त्याशिवाय आणखी त्यांचे हेर स्वराज्यांत जिकडे तिकडे सर्व काळ हिंडत. त्यामुळें प्रत्येक अंमलदारास असें वाटे कीं, रयतेशीं आपण यत्किंचितही अन्यायाचें वर्तन केलें तर त्याची वार्ता महाराजांस कळून, योग्य चौकशी होऊन आपणांस शिक्षा होईल. हा धाक सर्व लहानमोठ्या अधिकाऱ्यांस सर्व काळ असल्यामुळें महाराजांच्या रयतेस शांती व सुख यांचा अनुभव घडूं लागला. ह्याशिवाय आणखी शेतकऱ्यांस हरएक प्रकारची मदत करण्यासंबंधानें त्यांचे काय नियम असत हें मागें सांगितलेंच आहे.

ह्या प्रजावात्सल्याचें आणखी एक असें अंग असतें कीं, राजाने आपल्या प्रजेला समतेनें व निःपक्षपातपणें वागवावें. ह्यात तर महाराजांची बरोबरी करणारा प्रभू आजपर्यंत कोणीच झाला नाहीं असें म्हटल्यास अतिशयोक्ती होईल असें वाटत नाहीं. आपल्या अंमलातील निरनिराळ्या जातींच्या लोकांस त्यांच्या मगदुराप्रमाणें राज्यांतील कमीजास्त महत्त्वाचीं कामें सांगून त्यांस संतुष्ट व सुखी करावें असा त्यांचा क्रम असे. केवळ आपले जातभाईच तेवढे आपल्या कृपेस पात्र आहेत असा पक्षपात त्यांच्या मनांत कदापि वागला नाहीं. फार काय पण त्यांच्या अंमलांतील यवनी प्रजेसंबंधानेंही हा पक्षपात त्यांनी कधीं केला नाहीं. जे यवन आपल्याशी इमानानें वागून त्यावर सोपलेली कामे दक्षतेनें करतील असे वाटे, त्यांस ते मोठमोठ्या कामगिऱ्या सांगून खूष राखीत.[१] ह्या अशा निःपक्षपाताच्या वर्तनामुळें त्यांच्या राज्यांत फंदफितूर किंवा दंगेधोपे कधींही झाले नाहींत. सर्व जातींची प्रजा त्यांस देवासारखे पूज्य मानी.

व्यावहारिक वर्तन

आता महाराजांच्या व्यावहारिक वर्तनांत कोणते गुण विशेषत: दृष्टीस पडत तें थोडक्यांत सांगू. बखरकारांचें मुख्य लक्ष राजकीय घडामोडींकडेच असल्यामुळें त्यांनीं महाराजांच्या व्यावहारिक आचरणाचा उल्लेख फारसा कोठें केलेला नाहीं, यास्तव ह्या संबंधाने विशेष कांहीं सांगतां येणार नाहीं. तरी ते आचरणानें फार शुद्ध असत. त्यांचा पोषाख नेहमीं अगदीं साधा असे. त्यांना कोणतेंही व्यसन नसे. थट्टामस्करी व विनोद यांचा त्यांस पुरा तिटकारा असे. महाकवींचीं काव्यें व कथापुराणें ऐकण्याचा तेवढा नाद त्यांस असे. इतर कोणत्याही सुखविषयांत ते रममाण होत नसत व तसें रममाण होण्यास त्यांना आमरण अवकाशही नव्हता. कोणीही गुणी मनुष्य किंवा विद्वान पुरुष आला असतां त्याची योग्य संभावना करण्यास ते सर्वदा तयार असत. ज्या गुणी जनांचा आपणांस उपयोग होण्यासारखा असे त्यांस ते योग्य वेतन देऊन पदरीं ठेवून घेत. त्याप्रमाणेंच आपल्या सुहत्संबंधी जनांचा व इतर सरदार व राजे यांचा यथोचित आदरमान करण्यात ते सर्वदा दक्ष असत. सारांश काय कीं, ऐश्वर्यमद, सत्तामद इत्यादी अनन्वित वृत्ती त्यांच्या चित्तास कदापि शिवल्या नाहींत व त्यांच्या हातून कोणत्याही प्रकारचा अनाचार किंवा अन्याय झाला नाहीं.

---

१ महाराजांच्या आरमारावर दौलतखान नावाचा एक सरदार असून त्याने स. १६७९ त मुंबईच्या इंग्रज व्यापाऱ्यांशी खांदेरीजवळ कशी झटापट केली ते मागे अठ्ठाविसाव्या भागात सांगितले आहे.र

कौटुंबिक वर्तन

पूर्वसंकल्पास अनुसरून महाराजांच्या कौटुंबिक वर्तनासबंधानें येथें दोन शब्द बोलले पाहिजेत; परंतु ह्यासंबंधानें बखरकारांनीं फारसा उल्लेख केलेला नाहीं. महाराजांच्या ठायीं मातृपितृभक्ती व बंधुप्रेम ही किती निःसीम वसत होतीं हें मागें अनेक प्रसंगीं सांगितलेंच आहे. त्याविषयीं येथें विशेष रीतीनें लिहिण्याची आवश्यकता नाहीं. एवढें ऐश्वर्य व एवढी सत्ता केवळ स्वपराक्रमानें प्राप्त झाली असतां त्याच्या गर्वानें फुगून जाऊन स्वमातापितरांचा व स्वबंधूचा उपमर्द किंवा अवहेलना करण्याचें निंद्य कर्म महाराजांसारख्या सत्ताधीशाच्या हातून कदापि झालें नाहीं. हें त्या काळच्या यवनबादशहांची स्थिती पाहतां मोठें अलौकिक होय. आता महाराजांचे स्वस्त्रियांशीं कसें काय वर्तन होतें तें कळत नाहीं; परंतु विरुद्ध पुराव्याच्या अभावीं एवढे मात्र निश्चितपणें सांगतां येईल कीं, ते बिलकूल स्त्रैण नसत व आपल्या राण्यांचें ऐकून कोणताही अयोग्य प्रकार ते कधींही करीत नसत. स्त्रियांनी राज्यकारभारांत ढवळाढवळ करूं नये असें त्याचें मत असे. प्रत्यक्ष मातेलाही ते असला प्रकार बिलकूल करूं देत नसत; मग आपल्या स्त्रियांचा काय पाड? असें होतें तरी स्वस्त्रियांविषयीं आदर व प्रेम ह्या वृत्ती त्यांच्यांत नव्हत्या असें मुळींच म्हणतां येणार नाहीं. सईबाईवर तर त्यांचें अतिशयित प्रेम होतें असें बखरकार म्हणतात. महाराजांच्या ठायीं एकंदर स्त्रीजातीविषयीं अतिशयित आदरबुद्धी वसत होती. म्हणूनच त्यांचा आपल्या लष्करास सर्वदा असा हुकूम असे कीं, कोणांच्याही स्त्रियांस कदापि त्रास देऊं नये. ह्यामुळे त्यांच्या लष्कराकडून कधीं कोणाच्या स्त्रीवर जुलूमजबरी झाली नाहीं. खुद्द महाराजांनीच आपल्या एतद्विषयक आचरणाचा कित्ता आपल्या पदरच्या लोकांस अगदीं बालवयापासूनच घालून दिला होता. कल्याणच्या मुलाणाच्या सुनेची गोष्ट आमच्या वाचकांच्या स्मरणांतून गेली नसेलच. असें जर महाराजांचे पवित्र व्रत होतें तर ते स्वस्त्रियांविषयीं बेदरकार किंवा निष्ठुर होते असें कोणालाही म्हणतां येणार नाही. आता, स्वपुत्रांविषयीं त्यांच्या ठायीं निसर्गतःच प्रेम वसत असून त्यांस सुशिक्षण प्राप्त व्हावें व ते स्वसंपादित राजपदास लायक व्हावे ह्याविषयीं त्यांनी योग्य तजवीज केली होती. असें करूनही त्यांचा वडील पुत्र बदफैल व दुर्वृत्त निघून परस्त्रीपातिव्रत्याचा भंग करण्यास प्रवृत्त झाला तेव्हां, हा माझा पुत्र आहे, यास शिक्षा काय करावयाची, असा कांहींच विचार त्यांनीं मनांत न आणता त्यास एकदम सक्त कैदेंत ठेवले. यावरून ते आपल्या पुत्रांचे नसते लाड करणारे नव्हते हें उघड होतें. तेव्हां सारांश काय कीं, ते आपल्या कौटुंबिक आचरणावरून उत्तम पुत्र, उत्तम पती, उत्तम पिता व उत्तम बंधू ह्या विशेषणांस सर्वथा पात्र होते.

धर्मनिष्ठा व धर्माभिमान

शेवटीं एका प्रकारच्या वर्तनक्रमाविषयीं थोडेंसें लिहून हें गुणदोषविवेचनाचे प्रकरण समाप्त करूं. हा वर्तनक्रम अर्थात् धर्मसंबंधाचा होय. मागें जागोजाग व विशेषत: एकुणतिसाव्या भागांत ह्या सबंधाचे बरेंच निरूपण केलें आहे. तेव्हां त्याची येथें पुनरुक्ती करण्याची गरज नाहीं. महाराजांच्या ठायीं धर्मनिष्ठा व धर्माभिमान ह्या वृत्ती बाल वयापासूनच उत्पन्न झाल्या असून त्यांचें वर्धन वयमानानें अधिकाधिक होत गेलें होतें. ही धर्मशीलता किती अनावर होती हें त्यांनीं तीनचार प्रसंगीं स्वराज्यसंपादनाचा क्रम सोडून मोक्षसिद्धी करण्यात शेष जीवित घालविण्याचा बेत कसा केला होता हें लक्षांत आणले म्हणजे कळून येण्यासारखे आहे. ते कर्नाटकांत मोहिमेस चालले असतां वाटेत मल्लिकार्जुनाच्या देवस्थानासमोर स्वदेहत्यागाचा विचार त्यांच्या मनांत कसा अनावर उत्पन्न झाला होता हें वाचकांस स्मरतच आहे. त्याप्रमाणेंच सज्जनसेवा करण्यास व साधुसंतांचा परामर्ष घेण्यास ते सर्वदा किती तत्पर असत व ब्राह्मणभोजनें, देवस्थानें व धर्मग्रंथांचें अध्ययन करणारांची संभावना यात ते किती द्रव्यव्यय करीत असत हें मागें सांगितलेंच आहे. ही धर्मशीलता अनावर होऊन स्वराज्यसाधनाचा उद्योग ते अजिबात सोडून देतात कीं काय अशी भीती त्यांच्या मसलतगारांस नेहमी वाटत असे; परंतु श्रीभवानीनें मालोजी राजांस स्वप्नांत सांगितल्याप्रमाणें भोंसल्यांच्या कुळांत शककर्ता उत्पन्न होऊन सर्व हिंदुप्रजेस यवनत्रासापासून मुक्त करील असें जें त्यांच्या प्रिय मातेस सर्वदा वाटत असे त्याचा प्रत्यय

आपल्या ठायीं स्वमातेस व स्वजनांस पाहावयाचा सुयोग आला आहे अशी भावना त्यांच्या ठायीं पुढेपुढे उद्‌भूत होऊन आपण कोणी सामान्य मनुष्य नाहीं, तर ह्या आर्यभूचे पांग फेडण्यासाठीं आपलें जीवित आहे असें त्यांस वाटे व स्वराज्यसाधनद्वारा हिंदुप्रजेस यवनांच्या ताबेदारींतून सोडविण्याचें पुण्यकर्म आमरण करीत राहण्यातच स्वजीविताची सार्थकता आहे असें असा त्यांच्या बुद्धिचा सुनिश्चय झाला होता. ह्या आपल्या कार्यास श्रीभवानी सर्वप्रकारे अनुकूल आहे अशी त्यांच्या चित्ताची पूर्ण भावना झाल्याकारणाने हरएक बिकटप्रसंगी तिची आराधना करण्यास ते प्रवृत्त होत असत. ही आराधना अत्यंत ऋजु अंतःकरणाने व परम सद्‌भावपूर्वक केल्यामुळे त्यांच्या ठायी भवानीचा संचार होऊन ते संकटनिवारणाचा उपाय बोलत असत. ह्यावरून कित्येकांची अशी कल्पना धावते कीं, हा प्रकार ते आपल्या पदरच्या साध्याभोळ्या लोकांस भुरळ घालून स्वसंकल्पास वश करून घेण्यासाठीच केवळ करीत असत. त्यावर त्यांची श्रद्धा होती असे म्हणता येणार नाही; परंतु ह्या संबंधाने प्रकृत लेखकाचे असे मत आहे की, हा असा स्वजनवंचनाचा प्रकार महाराज जाणूनबुजून मुळीच करत नसत. महाराष्ट्रात त्या काळी असा प्रकार सर्वत्र आढळत असे. आपल्या उपास्य देवतेचे वारे कोणाच्या तरी अंगात आणून तिचा कौल घेण्याचा प्रघात त्या काळी जिकडेतिकडे होता व तो सांप्रतही पुष्कळ ठिकाणी चालू आहे. यात म्हणजे सर्वच लोक लबाडी करतात असे सहसा म्हणवत नाही. ह्या दृष्टीने पाहता महाराजांचे यात पूर्ण कपट होते असे न म्हणता त्यांच्या अंगी भाविकपणा अतिशयीत होता असे म्हणणे युक्त होय. अनेक कठीण पेचांच्या प्रसंगी कोणती युक्ती योजावी याविषयी पदरच्या लोकांशी खलबत केल्यावरही त्यातून निभावण्याचा योग्य मार्ग दिसेनासा झाला म्हणजे ते श्रीभवानीचे साहाय्य मागून विचार करण्यात अत्यंत गुंग झाले असता हे वारे त्यांच्या अंगात संचरे आणि त्यांनी आपल्या मनाशी केलेल्या संकल्पांचे उद्‌गार ह्या स्थितीत त्यांच्या मुखावाटे निघत. तो साक्षात श्रीभवानीचाच कौल आहे असे समजून ते स्वतः व त्यांच्या पदरचे लोक एखाद्या धाडसाच्या गोष्टीचा उपक्रम बिनदिक्कत करीत असत. अशा वर्तनास प्रत्येक वेळी यश येत गेल्यामुळे त्यांच्या पदरच्या भोळ्या व भाविक लोकांस ह्या प्रभूवर श्रीभवानीचा वरप्रसाद आहे असे वाटून त्यांच्यावर पूर्ण भरवंसा त्यांनी ठेवला, तर त्यात कांही नवल नाही. तेव्हां तात्पर्य काय की, महाराजांच्या ठायीच्या त्या काळास अनुरूप अशा ह्या पराकाष्टेच्या भाविकपणास आधुनिक काळाच्या विचारयुगात निर्माण झालेल्या पंडितांनी दोष लावणे किंवा त्याची उपपत्ती कपटादिकांनी करणे सर्वथा उचित नव्हे.

ह्याप्रमाणें प्रारंभीं उपोद्घात केल्याप्रमाणें महाराजांच्या अंगच्या मुख्य मुख्य गुणांचे दिग्दर्शन करून त्यांस वृथा दोष लावूं पाहाणारांच्या व लघुत्व आणू इच्छिणारांच्या विधानात कितपत तथ्य आहे तें सांगितलें. हें निरूपण कोणांस पक्षपातप्रचुर वाटलें तर त्यास इलाज नाहीं. आम्हां महाराष्ट्रीयांस ह्या महापुरुषाची वास्तविक योग्यता किती वाटत आहे त्याचें दिग्दर्शन करणें हें आमचे काम आहे. तें कोणास रुचेल किंवा नाहीं, ह्या प्रश्नाचा विचार आम्ही बिलकूल करीत नाहीं. महाराष्ट्रीयांस किंबहुना अखिल भारतवर्षीयास शिवाजीमहाराज जे आजपर्यंत ललामभूत होऊन राहिले आहेत ते कोणत्या गुणांस्तव याचे विवेचन आजपर्यंत कोणीही करावें तसें सविस्तर केलें नाही म्हणून त्यांच्याविषयी पुष्कळांचे निरनिराळे प्रतिकूल ग्रह होऊन राहिले आहेत. त्यांचा निरास होऊन शिवाजीमहाराजांची वास्तविक योग्यता लोकांच्या लक्षांत पूर्णपणें येण्यास व त्यांजविषयींचा यथार्थ अभिमान व कृतज्ञताबुद्धी सर्व काळ जागत राहण्यास हा चरित्रलेख यकिंचित् जरी साहाय्यभूत झाल्यास प्रकृत लेखक आपल्या श्रमाचे सार्थक्य झालें असें समजेल.

प्रकृत्त चरित्रापासून बोध

शेवटीं ह्या चरित्रापासून आधुनिक काळाला अनुरूप असा कोणता बोध घेण्याजोगा आहे, त्याचें निरूपण थोडक्यांत करणें इष्ट दिसतें हा बोध अर्थात् दोन प्रकारच्या लोकांस होणारा आहे : एक लोकाग्रणी जनांस व दुसरा साधारण संसारी जनांस. लोकाग्रणींत पुनः दोन प्रकार आहेत : एक लोकनायक राजे व दुसरे इतर अग्रेसर जन. राजेलोकांनीं घ्यावयाचा जो बोध तो अर्थात् देशकालवर्तमान पाहून घेतला पाहिजे. सांप्रत आपला हा देश जगांतील

अत्यंत प्रबल व विचारसंपन्न अशा परस्थ राष्ट्राच्या सत्तेखालीं जाऊन त्यास अननुभूतपूर्व अशा शांतीचा अनुभव चिरकाल होण्याचा सुयोग प्राप्त झाला आहे. सततसंगरावस्था विनष्ट होऊन सर्वत्र शांतीची संस्थापना झाल्याकारणानें उद्योगयुगाचा प्रभाव आमच्या देशांत इतर पुष्कळ राष्ट्रांहून विशेष रीतीनें दृष्टोत्पत्तीस येऊं लागला आहे. ही अवस्था समाजशास्त्रवेत्त्यांच्या मतें अत्यंत स्पृहणीय होय. सर्व सुधारणेचा अंतिम हेतू हाच आहे. ज्या राष्ट्रांस परचक्रभीती किंवा देशांतल्या देशांत उद्भवणाऱ्या युद्धप्रसंगांची भीती अहर्निश असते त्यांस वास्तविक स्वास्थ्याचा अखंड अनुभव सहसा घडत नाहीं. आणि जेथे अप्रतिबंध स्वास्थ नाही तेथें मनुष्यसुखवर्धक अशा औद्योगिक सस्थांचा सुविकास होणें शक्य नाहीं. आमच्या देशास हा स्वास्थ्यानुभव आयताच प्राप्त झाला आहे. निदान देशांतल्या देशांत होणारे युद्धप्रसंगतरी ब्रिटिश लोकांच्या प्रतापानें सर्वथा बंद पडले आहेत. सर्व देश त्यांच्या शांतिछत्राखालीं निर्वेध झाला आहे. आतां हें खरें कीं, ही शांती आमचे स्वातंत्र्य नष्ट होऊन आम्हांस प्राप्त झालेली आहे; परंतु ही परतंत्रता यवनी रियासतींत जशी अनेक प्रकारीं असह्य झाली होती तशी ती आता नाहीं. अन्याय, जुलूम व पक्षपात यांस ब्रिटिश रियासतींत उत्तरोत्तर कमी थारा मिळत आहे व हें राष्ट्र अत्यंत सुधारलेलें असल्यामुळें जितजेतेसंबंध हळूहळू लोपत जाण्याचा दृढ संभव आहे. यवनी अंमलांतील जहागिरदारापेक्षां आमच्या आधुनिक संस्थानिकांची स्थिती पुष्कळ चांगली आहे. ते आपआपल्या संस्थानांचे पूर्ण मालक असून सार्वभौम सत्ताधीशांशीं ठरलेल्या नियमाप्रमाणें वागत राहिल्यानें त्यास स्वस्थानभ्रष्ट होण्याची भीती फारशी नाहीं. अशा स्थितीमध्यें पूर्ण स्वातंत्र्य संपादण्याचा सर्व प्रकारे असंभाव्य हेतू कोणा संस्थानिकाच्या स्वप्नींही येणे नाहीं. तेव्हां अशा अपरिहार्य अवस्थेंत प्राप्त ऐश्वर्याचा अनुभव साधेल तेवढा घेऊन स्वस्थपणे कालक्रमणा करावी व सार्वभौम प्रभूची कृपा जेणेंकरून कायम राहील तें करण्यास सर्व काळ जपावें एवढीच आपली इतिकर्तव्यता आहे असें त्यांस वाटण्याचा संभव आहे? परंतु ही समजूत अगदीं अनिष्ट आहे. कारण येणेंकरून त्यांच्या ठायीं आळस व व्यसनासक्ती प्रबळ होऊन ते अगदीं निर्माल्यवत् होऊन जाण्याची भीती आहे. अशा पुरुषांना शिवाजीमहाराजांच्या चरित्रापासून घेण्याजोगा पुष्कळ बोध आहे. तलवारीच्या प्रखर तेजानें शत्रूंची हृदयें कंपायमान करण्याची सोय नाहींशीं झाली असली तरी स्वबुद्धितेजानें सर्व जनांस दिपवून टाकण्याची सोन्यासारखी संधी त्यांस प्राप्त झाली आहे. यथावकाश ज्ञानार्जन करून प्राप्त ज्ञानाचा सदुपयोग स्वप्रजेच्या वास्तविक हिताकडे करण्यांत अहर्निश गुंतून राहण्यात जें सौख्य व चित्ताचें समाधान आहे तें इतर कोणत्याही व्यवसायानें प्राप्त होणारें नाहीं. आपल्या संस्थानाची सुव्यवस्था लागावी, त्यांतील उद्योगधंदे व व्यापारउदीम उत्तरोत्तर वृद्धिंगत व्हावे, सुशिक्षणाचा लाभ एकंदर लोकांस होऊन त्यांची नीती व आचार ही एकसारखीं सुधारत राहावीं इत्यादी गोष्टींचा आमच्या संस्थानिकांस सर्वदा निदिध्यास लागेल तर त्यांना त्यांची प्रजा दुवा देऊन पूर्वार्जित ऐश्वर्याचा योग्य उपयोग केल्याचें श्रेय व लौकिक हीं त्यांस प्राप्त होतील. शिवाजीमहाराजांनीं स्वराज्यसिद्धीसाठीं जे अविश्रांत आमरण परिश्रम केले त्याच्या एक शतांश परिश्रम जरी आमच्या संस्थानिकांनी स्वसंस्थानाच्या उत्कर्षाप्रीत्यर्थ केले तरी पुरणार आहेत. शत्रूंशीं सतत युद्धप्रसंग करावे लागले असूनही महाराजांच्या ठायी प्रजावात्सल्य किती निःसीम वसत होतें व त्यांच्या सुखवृद्धीसाठीं त्यांनी किती उपायांची योजना केली होती याचा विचार आमच्या संस्थानिकांनी अवश्य करावा. आपल्या संस्थानातल्या प्रत्येक दरज्याच्या लोकांचा यथोचित उत्कर्ष होईल अशी व्यवस्था राखण्यास त्यांनी झटले पाहिजे. आधुनिक जीवनकलहामध्यें जो जनवर्ग मागें पडून दुर्बल होत चालला आहे त्याची स्थिती सुधारण्यासाठीं विशेष उपायांची योजना करण्याचें त्यांनी मनावर घेतलें पाहिजे. जे लोक खरोखर लायक असतील अशांसच आपलीं कामें सांगून वाढविलें पाहिजें. कोणाही संबंधाने पक्षपात किंवा अन्याय बिलकूल करता कामा नयें. परस्थांचे अनुकरण करून स्वप्रजेवर फाजील करांचा बोजा बसवून त्यांचे शिव्या शाप घेऊं नयेत. केवळ सत्तामदवश होऊन कोणावर जुलूम करूं नये, कोणाच्या वित्तादिकांचा अपहार करूं नये किंवा कोणाशीं अन्यायानें व उद्दामपणानें वागूं नये. स्वतःचें आचरण सर्वदा शुद्ध राखावें, निंद्य व्यसनासक्त होऊन स्वतःच्या आरोग्याचा व आयुष्याचा क्षय करून लोकाधिक्षेपास पात्र होऊं नये. लहरी, छांदिष्ट, चलबुद्धी, अविश्वासू निर्लज्ज, आळशी, उधळे, अविचारी वगैरे विशेषणांनीं स्वतःची मानखंडना व तेजोहानी करून

घेऊं नये. राजानें कांहीं केलें तरी चालतें अशा समजुतीवर जाऊन कोणत्याही अविचारमूलक फंदांत सहसा पडूं नये. ह्या सर्व बाबतींत शिवाजीमहाराजांचें आचरण किती निर्दोष व अनुकरणीय होतें याचा सदोदित विचार करावा. ज्यांच्या कर्तृत्वबलेंकरून प्रत्यक्ष किंवा परंपरेनें स्वतःस हा ऐश्वर्यलाभ झाला आहे त्यांचा योग्य अभिमान वाहून आमच्या राजांनीं त्यांच्या चरित्रमहिम्याचें सतत मनन केलें असतां त्यांच्या ठायीं त्या महात्म्याचे थोडे तरी गुण खास उगम व विकास पावतील.

लोकाग्रणींनी घेण्यासारखा बोध

आतां इतर लोकाग्रणींनीं कोणता बोध घ्यावा तें सांगू अखिल जनसमाजाच्या कल्याणासाठीं किंवा विवक्षित जनवर्गाच्या उत्कर्षासाठीं उपस्थित झालेल्या संस्थांचें चालकत्व ज्यांच्याकडे असतें त्यांनी शिवाजीमहाराजांस उत्तम प्रकारें साधलेल्या लोकवशीकरणाच्या कलेचा अवलंब अवश्य केला पाहिजे. कारण कोणतेंही लौकिक कृत्य उत्तम प्रकारें सिद्धीस नेण्यास संघशक्तीची आवश्यकता अतिशयित असते. जो अग्रेसर सामान्य जनांची परवा करित नाहीं किंवा त्यांच्याशीं उद्दामपणानें व पक्षपातानें वागून त्यांस असंतुष्ट व बेदिल करतो त्याचें अग्रणीच त्यांस असह्य व अपायकारक वाटतें. अशानें ऐक्यभावाचा लोप होऊन संघशक्तीस व्याघात घडतो. त्याप्रमाणेंच जो कोणी लोकस्थितीस्तव किंवा स्वकीर्तीची लालसा धरून अग्रेसरत्वाचा मान मिळवूं पाहतो व अंगीकृत कार्यात स्वार्थैकपरताच केवळ प्रगट करतो त्याचीं पावलें ओळखण्यास लोकांना उशीर लागत नाहीं. हा मनुष्य निरपेक्ष बुद्धीने लौकिक कृत्यांत वागत नाहीं, यांत याचा कांहीं तरी मतलब आहे, असें लोकांच्या नजरेस एक वेळ आलें म्हणजे त्याच्यावरून त्यांचा विश्वास उडतो, ते त्याच्या तंत्रानें वागतनासे होतात व त्याला साहाय्य करावयाचें सोडून मागें लोटून देतात. महाराजांनीं केवळ राज्यतृष्णावश होऊन स्वैश्वर्यवृद्ध्यर्थच जर खटपट केली असती तर त्यांस जे निःसीम स्वामिनिष्ठ अनुयायी लाभले ते कदापि लाभतेना. त्यांचीं स्वोत्कर्षलालसा ह्या अनुयायी जनांच्या दृष्टीस पडतांच ते त्यांच्याशीं दगा करण्यास प्रवृत्त झाले असते व परंतु त्यांचा अनन्य हेतू जो यवनसत्ताविनाश करून स्वदेश स्वतंत्र करण्याचा तो सिद्धीस नेण्यांतच आपली इतिकर्तव्यता आहे असा त्यांच्या मनाचा पूर्ण निर्धार झाला असून तत्सिद्ध्यर्थच त्यांचा सारा उद्योग आहे अशी त्यांच्या पदरच्या लोकांची पूर्ण खात्री झाली असल्यामुळें त्यांनी त्यांस असें उत्तम साहाय्य केलें. हें देशकार्याचें पवित्र व्रत आमच्या पुढाऱ्यांनी धारण केलें असतां त्यांच्या उद्योगास लोकसाहाय्य मिळण्यास मुळींच अडचण पडणार नाहीं.

आमच्या देशांत अनेक धर्म प्रचलित असून सहस्रावधी जातींचे बंड अस्मार्त काळापासून चोहोंकडे माजलें असल्याकारणानें येथील जनसमाजाचे सहस्वावधी खंडविखंड झाले आहेत. स्वधर्माभिमान व स्वजात्यभिमान यांचा लोकांच्या हृदयांत वरपगडा होऊन ते एकमेकांचा मत्सर व हेवा करत आहेत व एकमेकांस हीन व तुच्छ समजत आहेत. अशा स्थितीमध्यें सार्वजनिक कल्याणाचा हेतू धरून कोणी पुरुष पुढें सरसावलें असतां त्यांच्या मनातला हा आपपरभाव समूळ नष्ट झाला पाहिजे. केवळ आपल्या धर्माच्या किंवा आपल्या जातीच्या लोकांस तेवढे एकवट करून त्यांचें हित साधण्याचा उद्देश मनांत धरला असतां त्यांस इतर जनांचें साहाय्य कदापि मिळणार नाहीं. आरंभी ते काहींसे फसले तरी त्यांचा वास्तविक उद्देश काय आहे तें समजतोच तें त्यांस आपले अग्रणी समजणार नाहींत व त्यांजवर विश्वास ठेवणार नाहींत. असें झालें म्हणजे संघशक्तीनें होणारीं कार्ये कदापि यशोलाभास येणार नाहींत. ह्या बाबतींत महाराजांनी आमरण कसें वर्तन ठेवले होतें तें सर्वदा लक्षांत वागविण्यासारखें आहे. त्यांनी आपल्या सत्तेंतल्या जनसमाजांतील अमुक एका जातीवर किंवा जनवर्गावर विशेष कृपादृष्टी न करता सर्वांस समबुद्धीनें वागविलें. ते लोकांच्या अंगच्या गुणांकडे व योग्यतेकडेच फक्त पाहत असत. त्यांची जात कोणती आहे किंवा त्यांचा धर्म कोणता आहे याचा विचार ते सहसा करीत नसत. फार कशाला, यवनांविषयीं आरंभी त्यांच्या मनांत एवढी प्रबळ अढी होती तरी ती लवकरच नाहींशी होऊन त्यांस आपल्या पदरीं ठेवण्यास ते तयार झाले. शिवाय त्यांच्या राज्यांत जी यवनप्रजा

असे तिला ते इतर हिंदुप्रजेसारखीच वागवून धर्माच्या भिन्नत्वास्तव त्यांचा छळ किंवा तिरस्कार यत्किंचित्‌ही करीत नसत. ही त्यांच्या ठायींची समता त्यांच्या त्या काळच्या समजुतींप्रमाणें व व्यवहाराप्रमाणें पाहतां अत्यंत स्तुत्यर्ह होय. सांप्रत काळीं विचारयुगाचा प्रभाव सर्वत्र इतका झाला असतां हा आपपरभाव आमच्या पुढारी म्हणविणाऱ्या लोकांच्या चित्तांतून निर्मूळ होऊं नये हें चमत्कारिक नव्हे काय? ग्रंथ लिहावयाचे, वर्तमानपत्रें व मासिक चालवावयाचीं, सार्वजनिक संस्था स्थापावयाच्या किंवा मोठमोठे कारखाने घालावयाचे त्यात स्वजातीच्या किंवा स्वधर्माच्या लोकांचा बडेजाव व उत्कर्ष कसा होईल इकडेच लक्ष पुरविणारे पुरुष लोकाग्रणी म्हणवून घेण्यास मुळींच लायक नाहींत. त्यांनी शिवरायाची गुणैकदृष्टी आपल्या अंगीं वाढविण्याचा प्रयत्न अवश्य केला पाहिजे. अशा निःपक्षपाताच्या वर्तनास त्यांचे कोत्या समजुतीचे जातिबांधव कांहीं वेळ दोष देतील हें खरें परंतु एकंदर जनसमूहाचें हित साधण्याचें पुण्यकर्म त्याच्या हातून सुसाध्य होऊन ते शेवटीं लोकस्तुतीस पात्र होतील. आमच्या शिवरायांचें एतद्विषयक व्रत पुढें पेशवाईत पाळले गेलें असतें तर आम्हांस जी आज परतंत्रता प्राप्त झाली आहे ती कदाचित कधींही आली नसती. एवढा प्रचंड राष्ट्रीय अनर्थ ज्या जात्यभिमानामुळें व स्वार्थैकपरतेमुळें गुदरला व ज्याचीं विषमय फळें आम्हांस व आमच्या वंशजांस आणखी कैक शतकें भोगावीं लागतील असा दृढ संभव आहे, तो आमच्या अग्रेसर म्हणविणाऱ्या लोकांच्या अंगांतून अद्यापि जाऊं नये हें आमच्या देशाचें मोठेंच दुर्भाग्य होय. आमच्या देशांतला जातिभेद नष्ट होण्यास कालावधी लागणार हें खरें आहे. तरी जात्यभिमानमूलक पक्षपात व मत्सरभाव यांचा सांप्रतच्या दैन्यावस्थेंत समूळ उच्छेद होणें अत्यंत इष्ट होय. ही इष्टता लक्षांत वागवून आमच्या अग्रेसर म्हणविणाऱ्या गृहस्थांनीं स्ववर्तन ठेवण्यास झटलें असतां त्यांचें अनुकरण इतर सामान्य जन हळूहळू करूं लागतील व आमच्या जनसमाजांत परस्परांमध्ये ऐक्य, प्रेम व विश्वास ह्या वृत्ती उत्तरोत्तर वृद्धिंगत होत जातील आणि जे ते आपआपल्या जातीपुरते जे उद्योग उपस्थित करून फळ्या व तट करीत आहेत ते बंद होऊन त्यास खरें सार्वजनिक स्वरूप प्राप्त होईल व त्यांस संघशक्तीचे यथोचित साहाय्य मिळून ते सर्वजनसुखवर्धक होतील. तेव्हां तात्पर्य काय कीं, लोकाग्रणीच्या ठायीं खरी देशहितबुद्धी वास करूं लागून ते वास्तविक लोकमान्य व्हावे असें असल्यास त्यांनी शिवरायाच्या चरित्राचें मनन सर्व काळ करणें उचित होय.

संसारी जनांनी घेण्याजोगा बोध

येथवर लोकनायकांनी व लोकाग्रणींनी महाराजांच्या चरित्रापासून कोणता बोध घेण्यासारखा आहे त्याचें नुसते दिग्दर्शन केलें. आतां सामान्य संसारी जनांनीं त्यांच्या चरित्रापासून कोणता बोध घ्यावा तें थोडक्यांत सांगून ह्या ग्रंथाचा उपसंहार करूं. प्रपंचांत नेहमीं सुख व यश लाभावें असें प्रत्येकांस वाटत असतें. त्यांची सिद्धी मुख्यत्वेंकरून उद्योगशीलता, निर्व्यसनता, दृढ निश्चय, सदाचार, साहस बुद्धिमत्ता, कुशलता इत्यादी गुणांनी प्राप्त होणारी असते. ह्या गुणांचा प्रकर्ष महाराजांच्या ठायीं किती झाला होता हें त्यांचें चरित्र वाचल्यानें ध्यानांत येणारें आहे. प्राप्त स्थितींत समाधान मानून स्वस्थ बसण्यांत कांहींएक पुरुषार्थ नाही. ती साधेल त्या योग्य उपायानें सुधारण्याचा उद्योग निरलसपणें अहर्निश करीत राहिल्यानें अंगीं खरा मर्दपणा उद्‌भवून व्यसनासक्ती व दुर्वर्तन यांस थारा नाहींसा होतो. हें उत्तम तत्त्व महाराजांच्या चरित्रश्रवणानें प्रत्येकाच्या मनावर उत्तम प्रकारें बिंबणारें आहे. बुद्धिमत्ता व कुशलता अंगी उत्तरोत्तर वृद्धिंगत व्हावी एतदर्थ अहोरात्र परिश्रम केल्यावाचून आपलें तेज कोठेंच पडावयाचें नाहीं व साहसादी इष्ट गुणांचा प्रादुर्भाव अंगी कदापि व्हावयाचा नाहीं. कारण असें पाहा कीं, ज्याला स्वबुद्धीबलाचा व स्वतःच्या अंगच्या कर्तबगारीचा पुरा विश्वास नसतो त्यांच्या हातून कोणतेंही धाडसाचे कृत्य होणें नाहीं. महाराजांच्या ठायीं ह्या गुणांचा विकास उत्तम प्रकारें झाला होता म्हणून त्यांच्या हातून एवढा पराक्रम झाला. तसेंच वित्ताची व ऐश्वर्याची कितीही अनुकूलता असली तरी सन्मार्गापासून कदापि च्युत व्हावयाचें नाहीं व कोणतेंही दुर्व्यसन लावून घ्यावयाचें नाहीं असा अढळ निर्धार करून आपलें आचरण सर्वदा पवित्र राखणारास खरी सौख्यप्राप्ति होऊन लोकांकडून मान मिळतो, ही गोष्ट महाराजांच्या चरित्रांत उत्तम प्रकारे प्रत्ययास येते.

सांप्रतच्या दुर्वह स्थितींत प्रत्येक मनुष्य आपल्यापुरतें पाहूं लागला तर तें कदापि चालणार नाहीं. ज्या देशांत किंवा ज्या जनसमाजांत आपणांस आयुष्यक्रमण करावयाचें आहे त्याच्यांशीं आपलें कर्तव्य काय आहे तें पूर्णपणे ओळखून तें बजावण्यास त्यानें कायावाचामनेंकरून झटलें पाहिजे. सार्वजनिक हितसंबंधांत खासगी द्वेषमत्सरादिकांस अजिबात फांटा दिला पाहिजे. जातिभेदमूलक उच्चनीचत्वाचा भाव जितका कमी होईल तितकें आपल्या समाजांत ऐक्य व परस्परप्रेम वृद्धिंगत होऊन हरएक देशकार्य सुसाध्य होणार आहे, हें तत्त्व त्यानें अहर्निश चित्तांत वागविलें पाहिजे. कोणत्याही धर्मसंबंधी किंवा व्यावहारिक चालीचा अप्रयोजक अभिमान धरून समाजांत दुफळी किंवा कलह माजविण्याचे दिवस आतां उरले नाहींत. सांप्रत संघशक्ती जितकी वाढेल तितकी आपल्या देशाच्या हिताची आहे हें लक्षांत ठेवून तिला विघातक अशी कृती ज्याच्या हातून होत असेल त्याचा निषेध व अधिक्षेप करण्यास कधींही चुकतां कामा नये. तो आपल्या जातीचा आहे किंवा आपल्या धर्माचा आहे हा विचार बिलकूल न करता त्याचें करणें सर्वजनसमाजाच्या हिताविरुद्ध आहे, यास्तव तो देशद्रोही आहे असें मानावे. अशा रीतीनें जो वागेल तोच खरा स्वदेशाभिमानी होय. हल्लीं पाहावें तर आमच्या समाजांतील कित्येकांच्या बोलण्याचालण्यांत जो स्वदेशाभिमान दृष्टोत्पत्तीस येत आहे तो बऱ्याच अंशीं स्वजात्यभिमानमूलक आहे. कित्येकांच्या आचरणांत तर स्वदेशाभिमान व स्वजात्याभिमान हे एकरूप होऊन गेले आहेत. ही अनिष्ट मनोविकृती हळूहळू नाहींशी होईल तरच आमच्या देशाचा तरणोपाय आहे; परंतु अलीकडे कांहीं सुशिक्षित म्हणविणाऱ्या मनुष्यांच्या ठायीं ही मनोविकृती विशेष प्रबल झालेली दृष्टीस पडते. त्यावरून ही अभीष्ट संसिद्धी व्हावयास अद्यापि पुष्कळ काळ काढावा लागेल असें वाटतें. एकंदर जनसमाजाचें हित जेणेंकरून सुसाध्य होईल अशा संस्था उपस्थित करून त्या चालविण्याची योग्यता आमच्या लोकांत अद्यापि आली नाहीं असें स्वजात्याभिमानानें पछाडलेल्या आमच्या सुशिक्षित म्हणविणाऱ्या गृहस्थांच्या सध्यांच्या आचरणावरून मोठ्या कष्टानें म्हणावे लागतें. स्वधर्माचा किंवा स्वजातीचा अप्रयोजक अभिमान चित्तांत वागवून जे लोकाग्रणी समाजांत वैरभाव व दुफळी माजविण्यास प्रवृत्त होत असतील त्यांचें अग्रणीत्व बिलकूल मान्य करावयाचें नाहीं व त्यांस कोणत्याही प्रकारचें उत्तेजन द्यावयाचें नाहीं असा निर्धार प्रत्येकानें केला तर असल्या अहंमन्य देशबुडव्या लोकांच्या त्रासापासून आमचा देश लवकरच मुक्त होईल. आम्हांस आज जे पुढारी पाहिजेत ते शिवरायासारखे पवित्र व्रत पाळणारे पाहिजेत. ह्या कसोटीस जे खरोखर उतरतील तेच आपले पुढारी होत असें प्रत्येकास वाटलें पाहिजे.

येथें प्रकृत लेखकाची लेखणी विराम पावणार. त्यानें जो हा उद्योग केला आहे त्याचा मुख्य उद्देश एवढाच आहे कीं, शिवाजीमहाराजांविषयीं महाराष्ट्रांत किंबहुना अखिल भरतखंडांत जो अभिमान सांप्रत काळीं जागृत झाला आहे तो लोकांच्या मनांत कायम राहून त्यांजविषयींची यथार्थ बुद्धी सर्व लोकांच्या मनांत वसावी. महाराजांचें साद्यंत चरित्र अवलोकन केल्यावांचून ही बुद्धी कायम राहणें शक्य नाहीं. त्यांचें देहावसान होऊन आज सव्वादोनशे वर्षे लोटलीं आहेत. इतक्या अवकाशांत त्यांचा चरित्रमहिमा अनेक गद्य पद्यात्मक ग्रंथांत ग्रंथित केला आहे. अनेक यवनी व युरोपीय ग्रंथकारांनी त्यांच्याविषयीं यथाबुद्धी उल्लेख केले आहेत; त्याप्रमाणें ते आज कीर्तिरूपानें अमर होऊन राहिले आहेत. परंतु त्यांचे तें कीर्तितेज एका केंद्रांत आणून त्याचा वास्तविक प्रभाव किती आहे व तें कलंकमिश्रित आहे असें जें कित्येकांचें म्हणणें आहे त्यात कितीसें तथ्य आहे हें त्यांचें समग्र चरित्र कथन करून आजपर्यंत कोणींही दाखविण्याचा प्रयत्न केला नव्हता तो प्रकृत लेखकानें यथामती व यथाशक्ती केला आहे. त्याचा यथोचित आदर महाराष्ट्रीयांकडून होईल अशी त्यास पूर्ण उमेद आहे.

समाप्त

परिशिष्ट

ह्या पुस्तकाच्या एकोणिसाव्या भागाच्या शेवटी औरंगजेबाच्या एका मुलीचें शिवाजीमहाराजावर प्रेम जडल्याची दंतकथा दिली आहे, ती खरी नसावी असें प्रो. जदुनाथ सरकार यांनी औरगजेबाच्या ह्या मुलीसंबंधाने दिलेल्या वृत्तांतावरून म्हणावे लागतें. आम्ही सदरील दंतकथेंत वर्णिलेल्या औरंगजेबाच्या मुलीवर शहाजादा अकबर याच्या बंडास सामील असल्याचा आरोप येऊन तिला दिल्लीजवळील एका गडावर बंदींत ठेवले असून तेथेंच तिचा १७०२ सालीं अंत झाला. तेव्हां अर्थात् संभाजीच्या मुलाचें पालन तिच्याकडून घडलें नाहीं आणि ती काही आपल्या बापाबरोबर दक्षिणेंत आली नव्हती औरंगजेबाबरोबर होती ती त्याची दुसरी मुलगी तिचे नांव झिनातऊन-निसा असें होते. संभाजीच्या मुलाचें संगोपन केले ते ह्याच शहाजादीनें. संभाजीला पकडल्यावर, मुसलमानी धर्म स्वीकारशील तर तुला सोडूं, असें त्याला सांगितलें तेव्हां, ही शहाजादी मला द्याल तर मी मुसलमान होतों, असे त्याने म्हटलें अशी दंतकथा आहे. आम्हीं दिलेल्या दंतकथेंत औरगजेबाच्या मुलीचें जें वर्णन केलें आहे ते ह्या दुसऱ्या शहाजादीला लागत नाही. तुरुंगात टाकलेल्या मुलीचें नांव जेब-ऊन-निसा असें असून तिला तें वर्णन लागतें तरी पण ज्या अर्थी आम्हीं दिलेली दंतकथा एका मुसलमानी बखरींतूनच घेतली आहे त्या अर्थी ती अंशतः तरी खरी असावी असें दिसतें. तिला अटकेंत ठेवल्यामुळें तिच्या हातून संभाजीच्या मुलाचें सगोपन होणें शक्य नव्हतें तरी तिच्या बहिणीनें तें केलें आणि दोघींच्याही नावांच्या शेवटीं निसा हा शब्द असून त्या निसाबेगम ह्या नांवानें प्रसिद्ध असल्याकारणानें तुरुंगांतली मुलगीच पुढें आपल्या बापाबरोबर दक्षिणेंत गेली असून तिच्याच हातून संभाजीच्या मुलाचें संगोपन झालें असें मानण्यात आले असावें. आमच्या दंतकथेंतली शहाजादी पुढें अटकेत पडली असली तरी तिच्या मनात शिवाजीमहाराजांविषयी प्रेमवृत्ती उद्भवली नव्हती असें म्हणण्यास कांही आधार नाहीं.

***

टीपा (व्यक्ती)

परकीय इतिहासकार, प्रवासी

कारे बार्तेलमी

फ्रान्सच्या राजाचा प्रतिनिधी म्हणून बार्तेलमी कारे इ. स. १६६६ मध्ये फ्रान्सहून निघून फेब्रुवारी १६६८ मध्ये सुरतला पोचला. तेथून फ्रेंच इस्ट इंडिया कंपनीच्या कामानिमित्त निरनिराळ्या ठिकाणी भेटी देऊन फेब्रुवारी १६७१ मध्ये सुरतहून परत फ्रान्सला गेला. त्यानंतर तो १६७२-१६७४ या काळात परत भारतात आला. या दुसऱ्या प्रवासाचा वृत्तांत त्याने फ्रेंच भाषेत लिहिला. त्याचा लेडी एम. ई. फॉसेट यांनी केलेला इंग्रजी अनुवाद ' द ट्रॅव्हल्स ऑफ दि अॅबे कारे' या नावाने तीन खंडांमध्ये हॅक्लूट सोसायटीने इ. स. १९४७ मध्ये प्रकाशित केला आहे. कारेने केलेल्या या दोन्ही प्रवासांवर आधारित त्याचा ग्रंथ Voyage des Indes Orientales mele de plusieurs Histories Curieuses अशा नावाने दोन भागांमध्ये इ. स. १६९९ मध्ये पॅरीसहून प्रकाशित झाला आहे. कॅरेच्या या प्रवासवर्णनामध्ये शिवाजी महाराजविषयक माहिती येते. कॅरेच्या ग्रंथातील शिवाजीविषयीच्या सर्व भागाचा श्री. सुरेंद्रनाथ सेन यांनी केलेला इंग्रजी अनुवाद त्यांनीच संपादित केलेल्या 'फॉरिन बायॉग्राफीज ऑफ शिवाजी' या ग्रंथात प्रकाशित झाला आहे.

कोस्मि द ग्वार्द

कोस्मि द ग्वार्द याने पोर्तुगीज भाषेत 'पौर्वात्य भारतातील प्रसिद्ध व अत्यंत यशस्वी अशा शिवाजीचे चरित्र व त्याची कृत्ये' या नावाचे शिवचरित्र इ. स. १६९५ मध्ये लिहिले. इ. स. १७३० मध्ये ते छापून प्रकाशित करण्यात आले. तो 'मुरगावचा रहिवासी' असल्याचे त्याने नावाखाली नमूद केलेले आहे. त्याच्याविषयी याहून अधिक माहिती मिळत नाही. अफजलखान वध, शायिस्ताखान व जसवंतसिंह यांच्या मोहिमा, शिवरायांनी केलेली सुरतेची लूट, मिर्झाराजे जयसिंहाची शिवरायांविरुद्धची मोहीम, आग्रा भेट, सुरतेची दुसरी लूट, शिवरायांचा मृत्यू या व इतर काही प्रसंगांची हकीकत कोस्मि द ग्वार्दच्या शिवचरित्रात येते. त्याचे काही तपशील अचूक आहेत तर अनेक ठिकाणी ऐकीव माहितीचा व कपोलकल्पिताचा आधार घेतला आहे. एका समकालीन परकीय लेखकाचे शिवाजी महाराजांविषयी काय आकलन होते, हे समजण्यासाठी या चरित्राचा उपयोग होतो. डॉ. सुरेंद्रनाथ सेन यांनी ग्वार्दच्या शिवचरित्राचे इंग्रजी भाषांतर केले असून त्यांच्या 'फॉरिन बायॉग्राफीज ऑफ शिवाजी' या ग्रंथात छापलेले आहे.

ग्रँट डफ (१७८९-१८५८)

ईस्ट इंडिया कंपनीच्या लष्करातील अधिकारी. १८१७ साली तो पुण्यात माउंट स्टुअर्ट एल्फिन्स्टनच्या सेवेत रुजू झाला. १८२२ पर्यंत त्याने पोलिटिकल एजंट म्हणून साताऱ्यास राज्यकारभाराचे काम पाहिले. या काळात त्याने मराठ्यांच्या इतिहासाचा अभ्यास केला. "History Of the Marathas' हा ग्रंथ १९२६ मध्ये प्रसिद्ध केला. साम्राज्यवादी विचारांचा इतिहास संशोधक म्हणून डफ ओळखला जातो. 'मराठ्यांचा उदय म्हणजे अचानकपणे सह्याद्री पर्वतावर लागलेला वणवा आहे!' असे मत त्याने मांडले. १८२९ साली डेव्हिड केपन यांनी बाबा साने यांच्या मदतीने या ग्रंथाचे 'ग्रँट डफ कृत मराठ्यांची बखर' या नावाने भाषांतर केले.

जेम्स टॉड

राजस्थानचा इतिहासकार, Annals And Antiquities of Rajasthan हा राजस्थानच्या इतिहासावरील ग्रंथ प्रसिद्ध. औरंगजेबाच्या दरबारच्या अखबारांपैकी जेम्स टॉड याने ३३०४ उतारे जयपूर संस्थानकडून मिळवून सन १८२९ साली लंडनच्या रॉयल एशियाटिक सोसायटीस भेट दिले.

तावेर्निए, झां बातिस्त (१६०५–१६८९)

झां बातिस्त तावेर्निए याचा जन्म इ. स. १६०५ मध्ये पॅरीस येथे झाला. लहानपणापासून पर्यटनाची त्याला तीव्र इच्छा होती. वयाच्या पंचविशीपर्यंत त्याने युरोपातील बहुतेक देशांना भेटी दिल्या होत्या. सन १६३८ ते १६४३, १६४५ ते १६४८, १६५२ ते १६५४, १६५९ ते १६६१, १६६५ ते १६६६ या काळात तो भारतात आला होता. त्या नंतर त्याने जगभर प्रवास करून त्याचा वृत्तांत प्रसिद्ध केला आहे. रत्नांचा व रत्नजडित मौल्यवान चिजांचा व्यापार करण्यासाठी जगभरातील अनेक देशांना, राजेरजवाड्यांना त्याने भेटी दिल्या. त्याच्या प्रवासाचा वृत्तांत Travel in India या नावाने प्रसिद्ध झाला आहे.

द ओरलँ

पोर्तुगीज लेखक प्येर झोझेप द ओरलँ यांचे 'शिवाजी आणि त्याचा उत्तराधिकारी या भारतातील अलीकडच्या विजेत्यांचा इतिहास' ही सदतीस पृष्ठांची पुस्तिका इ. स. १६८८ मध्ये पॅरीस येथे प्रकाशित झाली. आजपर्यंत ज्ञात असलेल्या शिवचरित्रांपैकी तेच सर्वांत प्रथम छापले गेलेले पुस्तक आहे. आपले हे शिवचरित्र थेवेनो व बर्निए यांच्या वृत्तांतावर आणि गोव्याहून पाठविण्यात आलेल्या आणखी एका वृत्तांतावर आधारित असल्याचे द ओरलँने म्हटले आहे. द ओरलँने शिवचरित्रात वर्णिलेले प्रसंग इतर साधनांतील माहितीप्रमाणेच आहेत.

निकोलाय मानुची

जन्म १६३९ च्या सुमारास इटलीमध्ये झाला. वयाच्या पंधरा वर्षांचा असताना व्हेनीसच्या जहाजामध्ये प्रवास करताना पकडला गेला. त्या वेळी इंग्लंडच्या एका राजदुताबरोबर प्रवास करीत तो १६५६–५७ ला सुरत बंदरावर उतरला. तेथून तो मृत्यूपर्यंत सुमारे ६५ वर्षे भारतातच होता. दिल्लीला दारासिकोच्या तोफखान्यामध्ये अधिकारी म्हणून नोकरीस लागला. त्याने काही दिवस वैद्यकीचा धंदाही केला. सन १६६५–६६ साली मिर्झा राजा जयसिंगाबरोबर त्याच्या सैन्यातील तोफखान्याचा अधिकारी म्हणून मनुची दख्खनला आला. शिवाजी महाराज व जयसिंगाच्या भेटीची हकीकत त्याने लिहून ठेवलेली आहे. त्याने शिवाजी महाराजांची भेट घेऊन त्यांच्या संभाषणाचे तपशीलही लिहून ठेवले आहेत. पुरंदरच्या तहानंतर जयसिंगाला सोडून मनुची मुंबईजवळ वांद्र्याला अकरा महिने राहिला. तेथून तो लाहोरला गेला. तेथे त्याची नेताजी पालकरशी भेट झाली. तेथून तो परत गोव्यास आला. १६८४ मध्ये तो मोअजमबरोबर गोवळकोंड्याच्या मोहिमेवर गेला. तेथून मद्रास, पाँडिचेरीला गेला. त्याने Storia Do Mogor (मुघल साम्राज्याची हकीगत) हा ग्रंथ लिहिला. या ग्रंथाचा विल्यम आयर्विन यांनी केलेला चतुष्खंडात्मक सटीक इंग्रजी अनुवाद Storia Do Mogor or Mogul India या नावाने इ. स. १९०७–०८ मध्ये प्रकाशित झाला आहे. या ग्रंथात त्याने व्हेनिसहून निघाल्यापासून ते दिल्ली येथे मुघल शाहजादा दारा शुकोह याच्या पदरी नोकरी लागेपर्यंतचे स्वतःचे प्रवासवृत्त लिहिले आहे. त्यामध्ये ५६ चित्रे असून शिवाजी महाराजांचे एक अधिकृत चित्रही आहे.

फ्रायर, जॉन (१६५०–१७३३)

जॉन फ्रायरचा जन्म सन १६५० च्या सुमारास लंडनमध्ये झाला. इस्ट इंडिया कंपनीमध्ये नोकरीनिमित्ताने त्याने भारतभर प्रवास केला. इ. स. १६७३–१६८२ या काळातील भारतातील प्रवासावर आधारित त्याचा A New Account of East India and Persia, Being nine years travels, १६७२ – १६८१ हा ग्रंथ लंडनहून इ. स. १६९८ मध्ये प्रसिद्ध. त्याची विल्यम क्रूक यांनी इंग्रजीत तीन खंडांमध्ये संपादित केलेली सटीक आवृत्ती १९०९ मध्ये प्रसिद्ध. यामध्ये शिवाजी महाराजांविषयक माहिती येते.

बर्निए

बर्निएचा जन्म इ. स. १६२० साली फ्रान्समध्ये झाला. जग पाहण्याच्या लालसेपोटी विश्वपरिभ्रमण. १६५९ ते १६६७ या काळात भारतातील विविध भागांत प्रवास. त्याने आपला प्रवासवृत्तांत चार भागांमध्ये लिहिला. त्याचा व्हिन्सेंट स्मिथ यांनी संपादित केलेला इंग्रजी अनुवाद Travels in the Mogul Empire : AD १६५६–१६६८ या नावाने ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेसने इ. स. १९१४ मध्ये प्रकाशित केला आहे. बर्निएच्या ग्रंथात शिवरायांचा शायिस्तेखानावरील छापा, जयसिंहाची स्वारी व पुरंदरचा तह, आग्रा भेट, शिवरायांची बारदेशवरील स्वारी आदी प्रसंगांची हकीगत येते.

मारतँ फ्रांस्वा

फ्रांस्वा मारतँ यांचा जन्म इ. स. १६३४ मध्ये फ्रान्समध्ये झाला. फ्रेंच इस्ट इंडिया कंपनीमध्ये नोकरी. १६६९ मध्ये प्रथम सुरतला आला. त्यानंतर त्याची नेमणूक मच्छलीपट्टण येथील फ्रेंच वखारीचा प्रमुख म्हणून झाली. फ्रेंचांच्या व्यापारी व लष्करी हालचालींमध्ये महत्त्वपूर्ण भूमिका. १७०६ मध्ये पाँडिचेरी येथे निधन. त्याची इ. स. १६६५ ते १६९४, १७०१ ते १७०२, १७०२ ते १७०३ या काळातील रोजनिशीतील वृत्तांत १९३४ साली प्रसिद्ध झाला आहे. या छापील आवृत्तीतील १६७० ते १६९४ या काळातील भागाचे श्रीमती लतिका वरद राजन यांनी India in the 17th Century अशा नावाने प्रत्येकी दोन भागांच्या दोन खंडांत सटीक इंग्रजी भाषांतर केले आहे. सतराव्या शतकाच्या उत्तरार्धातील भारताचा इतिहास समजण्यासाठी मारतँचा वृत्तांत महत्त्वाचा आहे. मराठ्यांच्या इतिहासापुरते पाहिले तर शिवाजी, संभाजी व राजाराम या तिघांच्याही कारकिर्दीच्या इतिहासाकरिता मारतँचा वृत्तांत फार उपयोगी आहे. शिवरायांच्या जिंजी–वेलोरकडील स्वारीच्या हकीगतींच्या अभ्यासाकरिता मॉरतँचा वृत्तांत हे समकालीन विश्वसनीय साधन आहे.

रॉबर्ट ऑर्म

मराठ्यांचा आद्य इतिहासकार. त्याने मोघलांचा व मराठ्यांचा इतिहास लिहिला (१८०३). त्याच्या लेखनावरून शिवाजी महाराजांविषयी परकीयांचे मत काय होते, याची कल्पना येते. 'मुघलांच्या साम्राज्यविस्ताराला ठामपणे विरोध करण्यास उभा ठाकलेला जबर नेता' अशी शिवरायांची ओळख ऑर्म करून देतो व त्यांच्या चरित्रातील विविध प्रसंगांची माहिती देतो. शिवरायांच्या व्यक्तिमत्त्वाबद्दल व त्यांच्या नेतृत्वगुणांबद्दल त्याने गौरवपूर्ण उद्‌गार काढले आहेत.

भारतीय

पगडी सेतू माधवराव (१९१०–१९९४)

भारतीय प्रशासकीय सेवेत दीर्घकाळ अधिकारी. उर्दू व फारशी भाषांचा विशेष अभ्यास. अनेक फारसी कागदपत्रांचे भाषांतर व साक्षेपी संपादन. मराठा व मोघलांच्या इतिहासाचे अग्रगण्य संशोधक, इतिहासकार. 'मोगल आणि मराठे', 'मोगल दरबारची बातमीपत्रे', 'मराठ्यांचे स्वातंत्र्ययुद्ध', 'मराठे व निजाम', 'शिवचरित्र : एक अभ्यास', "Life of Shivaji', "Studies in Maratha History' हे काही निवडक ग्रंथ. 'जीवनसेतू' हे आत्मचरित्र. 'फिर्दोसीच्या कथा', 'भारतीय मुसलमान : शोध आणि बोध' वगैरे साहित्य प्रसिद्ध.

बाळकृष्ण (१८८२–१९४०)

सिंध प्रांतातील मुलतान येथे जन्म. लाहोरच्या दयानंद अँग्लो वैदिक कॉलेजमध्ये व गव्हर्नमेंट कॉलेजमध्ये उच्च शिक्षण. लंडन विद्यापीठाची पीएच. डी. (१९२२). आर्य समाजाचे प्रचारक. १९२२ साली राजाराम कॉलेज, कोल्हापूरच्या प्राचार्यपदी नियुक्ती. इंग्रजी, हिंदी व मराठीमधून अनेक शोधनिबंध प्रसिद्ध. हिंदू धर्म, तत्त्वज्ञान आणि

संस्कृती, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, इतिहास या विषयांवरील पंधराहून अधिक ग्रंथ प्रसिद्ध. Shivaji The Great (चार खंड)(१९३२-४०), Shivaji Album, History of India (हिंदी व मराठी), Demands of Democracy या ग्रंथांचे लेखक. Shivaji The Great या ग्रंथामध्ये शहाजी राजांच्या कारकिर्दीचाही समावेश आहे. या द्विखंडात्मक ग्रंथाचे चार भाग असून एकंदर पृष्ठसंख्या १६३० आहे. पहिल्या भागात शहाजीराजांचे चरित्र, दुसऱ्या व तिसऱ्या भागात शिवचरित्र आणि चौथ्या भागात शिवशाहीच्या प्रधान अंगांची चर्चा केलेली आहे. हे एक अव्वल प्रतीचा संशोधनपर शिवचरित्र आहे.

बेंद्रे वासुदेव सीताराम (१८९३-१९८६)

मराठ्यांच्या इतिहासाचे व्यासंगी अभ्यासक. मालोजी, शहाजी, शिवाजी, संभाजी, राजाराम यांची साधार चरित्रे त्यांनी लिहिली. संभाजी महाराजांच्या कारकिर्दीचा खरा इतिहास त्यांच्या संशोधनामुळे पुढे आला. संत तुकारामांवर त्यांनी मौलिक संशोधन केले आहे. 'छत्रपती शिवाजी महाराजांचे वडीलबंधू संभाजीराजे भोसले' (१९६६), 'मालोजीराजे आणि शहाजी महाराज यांची विचिकित्सक चरित्रे' (१९६७), 'राजाराम महाराज' (१९७५), 'संभाजी महाराज यांचे विचिकित्सक चरित्र' (१९७१), 'संभाजीराजे भोसले' (१९६६), 'शिवाजी महाराज यांचे विचिकित्सक चरित्र' (१९७२), 'महाराष्ट्रेतिहासाची साधने' (१९६७), 'तुकाराम महाराज यांचे संत तुकाराम महाराज यांचे संतसांगाती' (१९५८), 'तुकाराम' (१९६३) यांसारखे संशोधनग्रंथ प्रसिद्ध. सत्यान्वेषी, संशोधनशील इतिहासकार म्हणून ख्याती.

भाटे गो. चि. (१८७०-१९४६)

तत्त्वज्ञान, अर्थशास्त्र, सौंदर्यशास्त्र, प्रवासवर्णन, वाङ्मयेतिहास इत्यादी विविध विषयांशी संबंधित पुस्तकांचे लेखक, शिक्षणशास्त्रज्ञ. मुंबई विद्यापीठाचे एम. ए. फर्ग्युसन कॉलेजमध्ये पाश्चात्त्य व पौर्वात्य तत्त्वज्ञानाचे प्राध्यापक. गो. ग. आगरकर व गोपाळ कृष्ण गोखले यांचे अनुयायी. सामाजिक समता, जातिभेदनिर्मूलन, स्त्रीस्वातंत्र्य, विधवाविवाह आदी चळवळींत उक्ती व कृती यांसह सहभाग. त्यांनी लहानमोठी मिळून बावीस पुस्तके लिहिली. त्यांतील बारा प्रवासवर्णनात्मक असून इतर काही पुढीलप्रमाणे - समाजशास्त्रावरील व्याख्याने अथवा हिंदू समाजातील काही चालीरीतींचे समाजशास्त्रदृष्ट्या विवेचन (१९१४), कार्लाईल व हिंदू चालीरीती (१९२०). 'सज्जनगड आणि समर्थ रामदास' (१९१९).

राजवाडे वि. का. (१८६३-१९२६)

अग्रगण्य इतिहाससंशोधक व इतिहास मीमांसक. इतिहासाचार्य राजवाडे या नावाने विख्यात. व्याकरणशास्त्र, भाषाशास्त्र, समाजशास्त्र, पुरातत्त्वविद्या इत्यादी विविध ज्ञानशाखांतील पारंगत विद्वान. १८९० मध्ये पुण्याच्या डेक्कन कॉलेजमधून बी. ए. उत्तीर्ण. स्वाभिमानी राष्ट्रवादाची समाजाला दीक्षा देण्याच्या हेतूने फकिरी जीवन पत्करून इतिहास, भाषा, संस्कृती इत्यादी विषयांच्या संशोधनास त्यांनी स्वतःला आमरण वाहून घेतले. भारत इतिहास संशोधन मंडळाची स्थापना (१८९८). महाराष्ट्रभर फिरून त्यांनी मराठ्यांच्या इतिहासाची कागदपत्रे संकलित केली व 'मराठ्यांच्या इतिहासाची साधने' या २४ खंडात्मक ग्रंथांतून प्रसिद्ध केली. या सर्व खंडांची पृष्ठसंख्या प्रस्तावनांसह सुमारे साडेचार हजार एवढी भरते. या साधनग्रंथांतून शहाजीराजे भोसले यांच्यापासून तो दुसऱ्या बाजीरावापर्यंतच्या कालखंडातील मराठ्यांचा इतिहास येतो. त्यांनी सतत ३६ वर्षे कार्यतत्पर राहून विविध विषयांवर प्रचंड लेखन केले. त्यांच्या संशोधनपर, चिकित्सक प्रस्तावना विशेष गाजल्या. उदा. 'राधामाधवविलासचंपू' आणि 'महिकावतीची बखर' या ग्रंथांच्या प्रस्तावना. त्यांच्या स्फूर्तीने अनेक संशोधक निर्माण झाले. 'राजवाडे लेखसंग्रह भाग १ व २' (१९२८) मध्ये त्यांचे हे संकीर्ण लेख व निबंध समाविष्ट केलेले आहेत. त्यांचा 'मराठी धातूकोश'(१९४२), 'नामादि शब्दव्युत्पत्तीकोश' हे ग्रंथही मौलिक आहेत. १९२६ मध्ये पुण्यास झालेल्या शारदोपासक संमेलनाचे अध्यक्षपद देऊन त्यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला. शेवटी ते धुळ्यास स्थायिक झाले. त्यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या स्मरणार्थ धुळे येथे राजवाडे संशोधन मंदिर स्थापन केले गेले. तेथे ऐतिहासिक कागदपत्रे, हस्तलिखिते, पोथ्या, वस्तू, मूर्ती, पुस्तके यांचा मोठा संग्रह आहे.

रानडे महादेव गोविंद (१८४२–१९०१)

आधुनिक भारतातील उदारमतवादी, समाजसुधारक, धर्मसुधारक, राजनीतिज्ञ, इतिहासकार आणि अर्थतज्ज्ञ. निफाड (जि. नाशिक) येथे जन्म. १८६६ साली एम. ए. इतिहास, भूगोल, गणित, अर्थशास्त्र, तर्कशास्त्र, इंग्लिश इत्यादी विषयांवर चांगले प्रभुत्व. १८७१ पासून न्यायाधीश तर १८९३ मध्ये उच्च न्यायालयाचे न्यायाधीश. वसंत व्याख्यानमाला, सार्वजनिक सभा, प्रार्थना सभा, पुनर्विवाह उत्तेजक संस्था अशा अनेक संस्थांच्या स्थापनेत पुढाकार. सामाजिक चळवळींमध्ये वैचारिक योगदान. न्या. रानडे यांचे भागवत धर्मावर प्रार्थना समाजात झालेले 'पहिले दोन उपदेश' (१८९५), 'धर्मपर व्याख्याने' (१९१०), 'व्यापारासंबंधी व्याख्याने' (१८७३), 'एकनाथी भागवतातील वेचे' (१८९४) हे काही ग्रंथ. तसेच "Rise of Maratha Power' (१९००) आणि " Miscellaneous writings of the late Hon. Mr. Justice M. G. Ranade' (१९१५) हे त्यांचे महत्त्वाचे इंग्रजी ग्रंथ आहेत. पहिल्या मराठी ग्रंथकार संमेलनाचे (१८७८) ते अध्यक्ष होते.

सरकार जदुनाथ (१८७०–१९५८)

प्रख्यात भारतीय इतिहासकार. कलकत्ता विद्यापीठामधून एम. ए. (१८९२). कलकत्ता, पाटणा, कटक येथील महाविद्यालयांमध्ये प्राध्यापक. बनारस हिंदू विद्यापीठामध्ये इतिहासाचे अध्यापन. रॉयल एशियाटिक सोसायटी लंडनचे सन्माननीय सदस्यत्व (१९२३). कलकत्ता विद्यापीठाचे कुलगुरू (१९२६). अनेक भाषांवर प्रभुत्व, A History of Jaipur (१८९४), Military History of India, Famous Battles of Indian History, History Of Aurangzib, (५ खंड) (१९१२–२४), Mughal Administration (१९२०), Shivaji and His Times (१९१९), The House of Shivaji, Shivaji : The fall of the Mugal Empire (४ खंड) (१९३२–३८), A History of Bengal इत्यादी संशोधनपर ग्रंथ प्रसिद्ध. मिर्झाराजा जयसिंगांच्या पत्रांचा अनुवाद व संपादन.

सरदेसाई गो. स. (१८६५–१९५९)

मराठ्यांचा इतिहास लिहिणारे ज्येष्ठ इतिहासकार. प्राथमिक शिक्षण वरवळ व शिपोशी येथे आणि मॅट्रीकपर्यंतचे शिक्षण रत्नागिरी येथे. १८८८ साली बी. ए. बडोदा संस्थानात रीडर म्हणून नोकरी (१८८९). महाराजांना वर्तमानपत्रे, पुस्तके वाचून दाखविण्याचे काम त्यांना करावे लागत असे. त्यासाठी ते टिपणे काढीत. अशा टिपणांतूनच पुढे त्यांनी लिहिलेल्या रियासतींचा जन्म झाला. ट्यूटर म्हणून काढलेल्या इतिहासाची टिपणे अधिक विस्तारून त्यांनी मुसलमानी रियासत (१८९८) या नावाने प्रसिद्ध केली. सयाजीरावांच्या बरोबर त्यांनी युरोपमध्ये प्रवास केला. 'हिंदुस्थानचा अर्वाचीन इतिहास' या मालेतील 'मुसलमानी रियासत पूर्वार्ध', 'मराठी रियासत पूर्वार्ध' तसेच 'ब्रिटिश रियासत पूर्वार्ध' असे ग्रंथ लिहून त्यांनी पूर्ण केले. १९२५ साली सयाजीराव महाराजांच्या सेवेतून निवृत्ती घेतली. त्या नंतरचे आयुष्य कामशेत येथे इतिहासलेखनाच्या कामात व्यतीत केले. 'मराठी रियासत', "History of Marathas' हे त्यांचे महत्त्वाचे ग्रंथ. पेशवे दप्तराचे ४५ खंड संपादित करून प्रसिद्ध करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले. 'माझी संसारयात्रा' हे त्यांचे आत्मचरित्र. सयाजीराव महाराजांच्या आठवणींचे पुस्तक प्रसिद्ध.

सेन सुरेंद्रनाथ (१८९०–१९६२)

सुप्रसिद्ध इतिहासकार, कलकत्ता विद्यापीठामध्ये प्राध्यापक, दिल्ली विद्यापीठ येथे प्राध्यापक. National Archives मध्ये १९३९ ते १९४० या काळात कार्यरत. Studies in Indian History (१९१०) इत्यादी ग्रंथ प्रसिद्ध. मराठ्यांचा इतिहास लिहिणारे बंगाली इतिहासकार. त्यांचे "Administrative of Marathas(१९२३), Military System of Marathas हे मराठ्यांच्या इतिहासावरील महत्त्वपूर्ण ग्रंथ. याबरोबरच " ShivaChatrapati' (१९२०), 'Foregign biographies of Shivaji' (१९२७) हे शिवचरित्रविषयक विश्वसनीय साधनग्रंथ.

ऐतिहासिक साधने

शिवभारत

परमानंदाने शिवाजी महाराजांच्या सांगण्यावरून 'शिवभारत' उर्फ 'अनुपुराण' हे पद्यमय शिवचरित्र रचले. त्याला 'कवींद्र' अशी उपाधी होती. 'शिवभारता'च्या पाच हस्तलिखित प्रती आतापर्यंत सापडल्या आहेत. त्यांपैकी चार प्रती तंजावरच्या सरस्वती महाल ग्रंथालयामध्ये आहेत व पाचवी प्रत पुण्याच्या भारत इतिहास संशोधन मंडळाच्या संग्रहात आहे. एप्रिल १६६४ ते मार्च १६७३ या कालखंडातील समकालीन ऐतिहासिक साधनांमध्ये परमानंदांचे उल्लेख आढळतात. 'शिवभारत'मध्ये बत्तीस अध्याय व २२६२ श्लोक आहेत. सर जदुनाथ सरकारांच्या मते, जून १६७४ मध्ये शिवराज्याभिषेकाच्यावेळी शिवाजी महाराजांवर महाकाव्य लिहिण्याचे काम परमानंदाकडे सोपविण्यात आले. शिवाजी महाराजांच्या मृत्यूपर्यंत त्या महाकाव्याचे ३१ अध्याय व बत्तिसाव्याचे नऊ श्लोक लिहून झाले होते. 'श्री राजा शिवछत्रपती' या ग्रंथाचे कर्ते गजानन भास्कर मेहेंदळे यांच्या मते, सरकारांची विधाने निराधार आहेत. इ. स. १६६१ नंतर 'शिवभारत' लिहून पूर्ण झाले असेल. परमानंद हा शिवकालीन असल्याने व शिवाजीच्या आज्ञेवरून त्याने 'शिवभारत' रचल्याने ते विश्वसनीय, अधिकृत शिवचरित्र झाले आहे. परमानंदाने 'शिवभारत'मध्ये फक्त दोनच तारखा दिलेल्या आहेत – एक शिवजन्माची आणि दुसरी अफजलखान वधाची. त्यामुळे घटना–प्रसंगांची तारीखवार, कालक्रमानुसार माहिती मिळत नाही.

शिवकाव्य

संकर्षण सकळकळे याने 'शिवकाव्य' हे संस्कृत काव्य रचले असून सोळा अध्यायांमध्ये एकूण सुमारे ११६० श्लोक आहेत. या काव्याचा रचनाकाल नमूद केलेला नाही. शिवाजी महाराजांच्या जावळीवरील स्वारीपासून (इ. स. १६५६) शायिस्ताखानावरील छाप्यापर्यंतची (इ. स. १६६३) हकीगत या चरित्रकाव्यात आलेली आहे. शिवरायांची चंद्रराव मोऱ्यांवरील स्वारी आणि उत्तर कोकणातील मोहीम (इ. स. १६५७–५८) या दोन घटनांची इतरत्र न आलेली माहिती या काव्यात येते.

पर्णालपर्वतग्रहाणाख्यानम्

जयराम याने लिहिलेल्या या संस्कृत काव्यात पाच अध्याय असून त्यांत एकूण ३५४ श्लोक आहेत. शिवरायांच्या सैन्याचा पर्णालपर्वतावरील म्हणजे पन्हाळ्यावरील विजय (इ. स. १६७३) आणि त्या पाठोपाठ झालेली प्रतापराव व बहलोलखान यांच्यातील लढाई या दोन प्रसंगांचे वर्णन या ग्रंथात येते. त्यात तारखा दिलेल्या नाहीत. 'राधामाधवविलास' या काव्याचा कर्ता जयराम पिंडणे हाच असण्याची शक्यता असून यामध्ये रचनाकाल नमूद केलेला नसला तरी ते १६७३–१६७४ च्या आसपास रचले असल्याची शक्यता आहे.

शिवराजराज्याभिषेककल्पतरु

निश्चिलपुरी या तांत्रिक गोसाव्याचा शिष्य गोविंद नारायण बर्वे याने ही संस्कृत काव्य रचले आहे. यामध्ये शिवाजी महाराजांच्या दुसऱ्या राज्याभिषेकाची (२३ सप्टेंबर १६७४) माहिती येते. या काव्यामध्ये आठ अध्याय, २३५ पूर्ण श्लोक व तीन अर्धे श्लोक आहेत. हे काव्य राजारामाच्या काळात (१६६९–१७००) रचले असावे, असा अंदाज आहे.

राधामाधवविलास

जयराम पिंड्ये रचित या संस्कृत ग्रंथात अकरा उल्लास (प्रकरणे) असून प्रत्येकाचा काही भाग गद्यात व काही भाग पद्यात आहे. ग्रंथकार महाराष्ट्रातून कर्नाटकात शहाजीराजांकडे आश्रयास गेला. त्यास बारा भाषा येत होत्या. शहाजीराजांचे चरित्र जाणून घेण्यासाठी हा ग्रंथ उपयुक्त आहे. ग्रंथांच्या पहिल्या पाच प्रकरणांमध्ये राधा व माधव यांच्या शृंगाराचे वर्णन येते व बाकीच्या प्रकरणांमध्ये शहाजी राजांची प्रशंसा येते. हा ग्रंथ इ. स. १६६४ नंतर लिहिला असावा, असा अंदाज आहे. वि. का. राजवाडे यांनी हा ग्रंथ विस्तृत प्रस्तावनेसह संपादित केला आहे.

शिवभूषण

भूषण कवीने रचलेल्या या काव्यग्रंथात भाषेच्या अलंकाराच्या व्याख्या दिलेल्या असून त्यांतील प्रत्येक अलंकाराच्या व्याख्येनंतर उदाहरणासाठी सर्व प्रसंग शिवचरित्रातील घेतले आहेत. शिवरायांची कीर्ती ऐकून भूषण कवी रायगडला आला व त्याने 'शिवभूषण' हा ग्रंथ रचला, असे ग्रंथाच्या सुरुवातीस म्हटले आहे. 'शिवभूषण' हा काही इतिहासग्रंथ नाही, परंतु काही उदाहरणांमध्ये ऐतिहासिक माहिती आलेली असून त्यांमधील कित्येक विधाने ऐतिहासिकदृष्ट्या अचूक असल्याचे आढळून आले आहे.

आलमगीर नामा

मिर्झा मुहम्मद काजिम याने औरंगजेबाच्या हुकुमावरून औरंगजेबाच्या कारकिर्दीच्या पहिल्या दहा वर्षांचा इतिहास फार्सीमध्ये लिहिला. हा फार्सी ग्रंथ लिहिण्यासाठी ग्रंथकारास सुभ्याहून येणारी बातमीपत्रे व दरबारची बातमीपत्रे उपलब्ध करून द्यावीत, आवश्यक ते तपशील त्याने संबंधित अधिकाऱ्यांकडून व खुद्द बादशहाकडून माहीत करून घ्यावेत आणि लिहिलेला मजकूर बादशाहास वाचून दाखवून दुरुस्त करून घ्यावा, अशा सूचना औरंगजेबाने दिल्या होत्या. आलमगीरनामा हा औरंगजेब बादशहाचा दरबारी इतिहास आहे. ग्रंथकाराला सरकारी कागदपत्रे उपलब्ध झाल्यामुळे त्यात अनेक घटना-प्रसंगांचा सविस्तर व अचूक तपशील दिलेला आहे. परंतु औरंगजेबाला नामुष्की पत्करावया लागलेल्या घटना-प्रसंगांची माहिती त्यात दिलेली नाही किंवा दिलीच तर अगदी संक्षिप्त दिलेली आहे. उदा. शिवाजी महाराजांनी सुरतेची लूट (१६६४) केल्याच्या घटनेचा आलमगीरनाम्यात अजिबात उल्लेख नाही. शिवरायांनी शायिस्ताखानावर घातलेल्या छाप्याची नोंद फक्त चार-पाच ओळींत केलेली आहे. आलमगीरनाम्याचा पहिल्या दहा वर्षांचा इतिहास लिहून झाल्यावर पुढील इतिहास लिहिण्यास औरंगजेबाने मनाई केली. आलमगीरनाम्याचा फारसी पाठ प्रसिद्ध झाला आहे. यातील शिवचरित्राशी संबंधित भागाचा ग. ह. खरे यांनी केलेला मराठी अनुवाद 'शिवचरित्र वृत्तसंग्रहा'च्या तिसऱ्या खंडात छापलेला आहे.

मआसिर-इ-आलमगीरी (आलमगिराची संस्मरणीय कृत्ये)

औरंगजेबाच्या कारकिर्दीचा हा इतिहास मुहम्मद साकी मुस्तइद्दखान याने फार्सीमध्ये लिहिला आहे. एका मुघल सरदाराकडे काही वर्षे नोकऱ्या केल्यानंतर इ. स. १६८५ मध्ये वकाएनिवीस म्हणून हा मुघलांच्या सरकारी नोकरीत रुजू झाला. त्याने निरनिराळ्या खात्यांमध्ये मुश्रिफ (पर्यवेक्षक) म्हणून काम केले. औरंगजेबाचा मुलगा बहादुरशाह याच्या कारकिर्दीत (इ. स. १७०७-१७१२) त्याचा वजीर इनयतुल्लाखान याने मुस्तइद्दखानास औरंगजेबाच्या कारकिर्दीचा इतिहास लिहिण्यास सांगितले. त्या नुसार मुस्तइद्दखानाने इ. स. १७१०-११ मध्ये हा ग्रंथ लिहून पूर्ण केला. आलमगीरनाम्यावरून औरंगजेबाच्या पहिल्या दहा वर्षांच्या कारकिर्दीची हकीगत यात दिलेली आहे. त्या पुढील माहिती समकालीन सरकारी कागदपत्रांमधून घेतलेली आहे. सामान्यतः मआसिर-इ-आलमगीरी हे इतिहासाचे एक विश्वसनीय साधन मानले जाते. याचा फार्शी पाठ कलकत्त्याच्या 'दि एशियाटिक सोसायटी'ने प्रकाशित केला आहे. या ग्रंथाचा इंग्रजी अनुवाद सर जदुनाथ सरकार यांनी केला असून तोही दि एशियाटिक सोसायटीने प्रकाशित केला आहे. मआसिर-इ-आलमगीरीतील शिवचरित्राशी संबद्ध अशा उताऱ्यांचा श्री. ग. ह. खरे यांनी केलेला मराठी अनुवाद 'शिवचरित्र वृत्तसंग्रहा'च्या तिसऱ्या खंडात प्रसिद्ध झाला आहे.

मुन्तखबुल्लुबाब (म्हणजे निवडक सारांश)

खाफीखान (१६६३-६४ ते १७३१-३२) हा मोगल इतिहासकार. त्याचे बालपण दख्खनमध्ये गेले. इ. स. १९८१-८२ च्या सुमारास तो मुघलांच्या महसूल खात्यात नोकरीत रुजू झाला. अहमदाबादचा वकाएनवीस म्हणून त्याने काही काळ काम केले. त्याने 'मुन्तखबुल्लुबाब' (म्हणजे निवडक सारांश) हा त्रिखंडात्मक ग्रंथ फार्सीमध्ये

लिहिला आहे. या ग्रंथाच्या पहिल्या खंडात इब्राहीम लोदीपर्यंतच्या दिल्लीच्या सुलतानांचा इतिहास येतो. दुसऱ्या खंडात मुघल राजवटीचा संस्थापक बाबर याच्यापासून ते मुहम्मदशाहाच्या कारकिर्दीच्या चौदाव्या शतकापर्यंतचा (इ. स. १७२३) इतिहास येतो. तिसऱ्या खंडात बहामनी सल्तनत, तिच्यातून फुटून निर्माण झालेल्या पाच दख्खनी सल्तनती आणि खानदेशातील फारुकी सल्तनत यांचा इतिहास येतो. 'आपण इतिहासाकडे एक ज्ञानशाखा म्हणून पाहतो. हा इतिहास लिहिण्यासाठी सरकारकडून आपली नेमणूक झालेली नाही तसेच कुणाही वजिराला वा अमिराला खूष करण्याचा आपला हेतू नाही, अशी आपली इतिहासलेखनविषयक भूमिका खाफीखानाने स्पष्ट केली आहे.

तारीखे दिल्कुशा (चित्ताकर्षक इतिहास)

प्रसिद्ध मोगल इतिहासकार भीमसेन सक्सेना यांनी 'तारीखे दिल्कुशा' हा फार्सी ग्रंथ लिहिला आहे. त्यांच्या आयुष्याचा बराचसा काळ दख्खनमध्ये मोगली लष्करी सेवेत गेला. दख्खनमधील इ. स. १७०९ पर्यंतच्या राजकीय व लष्करी घडामोडींची हकीगत 'तारीखे दिल्कुशा'मध्ये येते. भीमसेनचा बाप रघुनंदनदास हा औरंगजेबाच्या दख्खनच्या सुभ्याच्या तोफखान्याचा पर्यवेक्षक होता. भीमसेनही वयाच्या आठव्या वर्षी बापाबरोबर औरंगाबादला आला व तेथेच लिहिणे, वाचणे शिकला. पुढे त्याने दख्खनमधील निरनिराळ्या सुभेदारांकडे काम केले. अनेक लष्करी मोहिमांमध्ये तो स्वतः हजर होता. त्यामुळे त्याने ग्रंथित केलेल्या अनेक घटना व तपशील बरोबर असल्याचे प्रत्यंतर येते. शिवचरित्राशी संबद्ध अनेक घटना व युद्धप्रसंगांचे वर्णन 'तारीखे दिल्कुशा'मध्ये आलेले आहे. परंतु घटनांची नेमकी तारीख दिलेली नाही. 'तारीखे दिल्कुशा'चा व्ही. जी. खोबरेकर यांनी संपादित केलेला इंग्रजी अनुवाद प्रकाशित झाला आहे. तसेच सेतू माधवराव पगडी यांनी केलेला मराठी अनुवाद 'मोगल आणि मराठे' (तारीखे दिल्कुशा) या नावाने प्रकाशित झाला आहे.

बसातीनुस्सलातीन (सुलतानांची उद्याने)

मुहम्मद इब्राहीम अझ्झुबैरी याने इ. स. १८२४-२५ मध्ये हा फार्सी ग्रंथ लिहिला. यामध्ये आदिलशाही इतिहास येतो. एकेका आदिलशाहाच्या कारकिर्दीस एक-एक प्रकरण दिले असून त्याला प्रकरण म्हणण्याऐवजी बुस्तान (उद्यान) म्हटले आहे. अशी आठ बुसातीन (उद्याने), म्हणजे आठ प्रकरणे या ग्रंथात आहेत. आदिलशाहीही सुरुवात पंधराव्या शतकाच्या अखेरीस झाली. येथपासून ते इ. स. १६८६ मध्ये मुघल साम्राज्यात ती विलीन करण्यात आली, येथपर्यंतचा इतिहास या ग्रंथांमध्ये येतो. तसेच विजापूर शहराची हिजरी सन १२४० पर्यंतची माहितीही येते. बुसातीनुस्सलातीनमधील मुहम्मद आदिलशहाचा इतिहास (इ. स. १६२७-१६५६) प्रामुख्याने मुहम्मदनाम्यातून आणि अली आदिलशाहाचा (इ. स. १६५६-१६७२) इतिहास प्रामुख्याने तारीख-इ-अली आदिलशाही व अलीनामा या ग्रंथांमधून घेतलेला आहे. त्या पुढील घटनांची माहिती शेख अबुल हसन, इब्राहीम असदखानी व खाफीखान यांच्या ग्रंथांमधून घेतलेली असावी, असे दिसते. त्यामुळे ऐतिहासिकदृष्ट्या महत्त्वाची अशी माहिती बसातीनुस्सलातीनमध्ये मिळते. हा ग्रंथ शिवचरित्राचे साधन म्हणून अत्यंत उपयुक्त व विश्वसनीय मानला जातो.

सभासद बखर

छत्रपती राजाराम महाराजांच्या सांगण्यावरून कृष्णाजी अनंत सभासद यांनी ही बखर सन १६९७ साली जिंजी येथे लिहिली. सभासदाची बखर ही शिवाजी महाराजांवरील सर्वांत जुनी व महत्त्वाची बखर आहे. सभासद हा शिवरायांचा समकालीन होता. बखरीत घटनांच्या कालानुक्रमांत अनेक चुका आहेत. इतर बखरीमध्ये आढळणाऱ्या अतिशयोक्ती, कपोलकल्पित कथन या दोषांपासून ही बखर सामान्यतः मुक्त आहे.

एक्क्याण्णव कलमी बखर उर्फ रायरीची बखर उर्फ मराठी साम्राज्याची बखर उर्फ शहाण्णव कलमी बखर

या बखरीच्या लेखकाने हिला विशिष्ट असे काही नाव दिलेले नाही. या बखरीच्या काही प्रतींमध्ये मजकुराची एक्क्याण्णव कलमे पडलेली असल्यामुळे एक्क्याण्णव कलमी बखर या नावाने ही सामान्यतः ओळखली जाते. रायरीची बखर, मराठी साम्राज्याची छोटी बखर, शहाण्णव कलमी बखर अशीही नावे तिला आहेत. या बखरीच्या लेखकाविषयी पाठभेद आहेत. बखरीच्या उपलब्ध झालेल्या प्रतींवर दत्ताजी वाकनीस, रघुनाथ नारायण हणमंते, बाळाजी आवजी चिटणीस यांची नावे आढळतात. त्यामुळे बखरकर्ता निश्चित सांगता येत नाही. ही बखर साधारणपणे इ. स. १७५० च्या सुमारास लिहिली गेली असावी, असे मानतात.

चित्रगुप्त बखर

रघुनाथ यादव चित्रगुप्त यांनी ही बखर लिहिली असून त्याने बखरीला विशिष्ट नाव दिलेले नाही. त्यामुळे ती त्याच्या आडनावावरून ओळखले जातो. बखरकाराने बखरीचा लेखनकाल नमूद केलेला नाही. त्याने वयाच्या बाराव्या-तेराव्या वर्षापासून राजाराम महाराजांचा पुत्र संभाजी यांच्याकडे चाळीस वर्षे चिटणिशी लेखनाची सेवा केली. संभाजीच्या मृत्यूनंतर त्यांची पत्नी जिजाबाई व विश्वासू सुभेदार यशवंतराव शिंदे यांच्याकडे त्याने नोकरी केली. सभासदाची बखर कालौघात सदोष झाली असल्याने तिचे पुनर्लेखन करण्याची आज्ञा यशवंतरावाने दिल्यावरून आपण ही बखर लिहिली, अशी माहिती बखरकाराने बखरीच्या अखेरीस दिली आहे. ही बखर १७६० ते १७८३ च्या दरम्यान लिहिली असली पाहिजे.

चिटणीस बखर (सप्तप्रकरणात्मक चरित्र)

छत्रपती शाहूंनी (मृत्यू १८०८) आपल्या पूर्वजांचा इतिहास लिहिण्याची आज्ञा केल्यावरून मल्हार रामराव चिटणीस यांनी ही बखर लिहिली आहे. या बखरीची सात प्रकरणे पाडलेली असल्यामुळे हिला सप्तप्रकरणात्मक चरित्र असेही म्हणतात. आधीच्या बखरी व ऐकीव मौखिक माहिती यांवर विसंबून बखरलेखन केले आहे, असे दिसते. बखरीमध्ये अनेक चुकाही आढळतात.

शिवदिग्विजय बखर

ही बखर इ. स. १८१८-१९ मध्ये लिहिलेली असून बखरकाराने स्वतःचे नाव नमूद केलेली नाही. बखरीतील बहुतांश माहिती चिटणीस व एक्क्याण्णव कलमी या बखरींमधून घेतलेली आहे. शिवाय या दोन्हींमध्ये नसलेले इतरही काही तपशील बखरकाराने दिलेले आहेत. या बखरीत चुका अतोनात आहेत. बखरीचे स्वरूप पौराणिक घाटाचे व अत्यंत पाल्हाळिक आहे.

श्री शिवाजी प्रताप बखर

बखरकाराने त्याच्या आश्रयदात्याच्या इच्छेवरून ही बखर १८२९ साली बडोदा येथे लिहिली. शिवजन्मापूर्वीची बरीच हकीगत व शिवचरित्रातील काही मोजक्या प्रसंगांची माहिती बखरीत दिलेली आहे. या माहितीसाठी वापरलेल्या साधनांचे संदर्भ बखरीत दिलेले नाहीत. शिवाय ऐकीव माहितीचा व कल्पिताचाही भरपूर भरणा केलेला आहे. बखरीतील माहिती अत्यंत विसकळीत स्वरूपाची असून तिच्यात अनेक चुका आहेत. त्यामुळे शिवचरित्राचे साधन म्हणून या बखरीचा उपयोग नाही.

शेडगावकर बखर

शेडगावच्या (जि. अहमदनगर) भोसले घराण्याच्या दप्तरात मिळालेल्या या बखरीमध्ये शिवाजी महाराज व त्यांच्या सातारा गादीचे इ. स. १८५४ पर्यंतचे वंशज यांची चरित्रे वर्णन केलेली आहेत. त्यावरून ही बखर इ. स. १८५४ मध्ये किंवा त्यानंतर लगेच लिहिलेली असावी. बखरकाराने स्वतःचे नाव लिहिलेले नसल्याने शेडगावकर

भोसले घराण्याच्या नावावरून ती शेडगावकर बखर म्हणून ओळखली जाते. या बखरीतील बराच भाग सभासद बखरीमधून घेतलेला आहे. तसेच काही नवी माहितीही हिच्यात दिलेली आहे. शिवचरित्राचे साधन म्हणून या बखरीची उपयुक्तता अत्यल्प आहे.

हनुमंतस्वामींची बखर उर्फ रामदासस्वामींचे चरित्र

संत रामदासांच्या मृत्यूनंतर (इ. स. १६८१) त्यांच्या वडीलबंधूंच्या वंशजांकडे त्यांच्या मठाची व्यवस्था आली. हनुमानस्वामी नावाच्या त्यांच्या एका वंशजाने रामदासांच्या मृत्यूनंतर सुमारे १७८९ ते १७९२ या दरम्यान रामदास स्वामींचे चरित्र लिहिले. 'हनुमंतस्वामींची बखर' म्हणूनही ते ओळखले जाते. बखरीचे स्वरूप एखाद्या पुराणासारखे असून तीमध्ये अनेक कपोलकल्पित, अतर्क्य, अविश्वसनीय असे चमत्कार पानोपानी वर्णन केलेले आहेत. शिवाजी महाराज व रामदास यांचे संबंध हा इतिहासातील एक मोठा वादविषय झाला असून त्याचे मूळ ही हनुमंतस्वामींची बखर आहे.

जेधे शकावली

जेधे घराण्याच्या कागदपत्रांमध्ये ही शकावली मिळाल्यामुळे 'जेधे शकावली' म्हणून सामान्यतः ओळखली जाते. तिच्यावर काही शीर्षक नाही व लेखकाचे नावही नमूद नाही. या शकावलीची जुनी हस्तलिखित प्रत अठराव्या शतकाच्या उत्तरार्धात किंवा एकोणिसाव्या शतकाच्या सुरुवातीस लिहिलेली असावी, असा अंदाज आहे. या शकावलीत इ. स. १६१८ पासून (औरंगजेबाचा जन्म) इ. स. १६९७ पर्यंतच्या (जिंजीचा वेढा) काळातील सुमारे तीनशे नोंदी आहेत. शिवचरित्राचे एक अतिशय विश्वसनीय साधन म्हणून 'जेधे शकावली' अभ्यासली जाते.

शिवकालीन पोवाडे

शिवकालात रचलेले व आज उपलब्ध असलेले असे फक्त चारच पोवाडे ज्ञात आहेत. ते पुढीलप्रमाणे– १. यमाजीकृत बाजी पासलकरांचा पोवाडा २. अज्ञानदासकृत अफजलखान वधाचा पोवाडा ३. फतनजीकृत अफजलखानवधाचा पोवाडा ४. अज्ञान यमाजीकृत दत्ताजी जाधवरावाचा पोवाडा

***

वाय ६४६-११०० (पु.) अे४ ५.२०१९

शासकीय मुद्रणालय, कोल्हापूर.